श्री आनन्दवर्धनाचार्य विरचित

ध्वन्यालोक

व त्यावरील श्री अभिनव गुप्तांची **लोचन टीका**



द्वितीय खंड

मूळ संस्कृत संहिता व तिचा विस्तृत विवेचक टीपांसह मराठी अनुवाद

संपादक

प्रा. पु. ना. वीरकर

प्रा. मा. वा. पटवर्धन

प्रा. **पु. ना वीरकर**, एम्. ए., बी. टी., टी. डी. (लंडन). एम्. ए. मध्ये १ ल्या वर्गात १ ले; तीन सुवर्ण पदकांचे व एका पदव्युत्तर शिष्यवृत्तीचे मानकरी; डेक्कन एज्युकेशन सोसायटी (पुणे) चे आजीव सदस्य (१९४१ ते १९७२), प्रमुख, न्यू इं. स्कूल, सातारा व न्यू इं. स्कूल टिळक रस्ता, पुणे (२० वर्षे); मुंबई राज्य माध्यमिक शालाप्रमुख परिषदेचे अध्यक्ष, १९५४; ऑल इंडिया कौन्सिल फॉर सेकंडरी एज्युकेशन (दिल्ली) च्या उपसमितीचे सदस्य (२ वर्षे);

भारत सरकारने १ ले पारितोषिक दिलेल्या **संस्कृत–विहार** या पुस्तकाचे लेखक; संस्कृत–विभाग–प्रमुख, विलिंग्डन कॉलेज, सांगली (६ वर्षे) व फर्ग्युसन कॉलेज, पुणे (५ वर्षे); पुणे विद्यापीठ – एम. ए. ला संस्कृत साहित्यशास्त्राचे प्राध्यापक (६ वर्षे);

संस्कृत कविश्रेष्ठ, सुरत नाटिका, किशोर–संगीत, कल्पलता, संस्कृत निबंधलेखन, अनुवाद–मंजूषा, कुमार–संभव सर्ग ४ चा समवृत्त पद्य अनुवाद व इतर अनेक पुस्तकांचे लेखक; केंद्र सरकारने अनुदान दिलेल्या 'मराठीकडून संस्कृताकडे' या शैक्षणिक विरचनेचे कल्पक; महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या **संस्कृत–प्रवेशिका व संस्कृत–परिचय** या पुस्तकांचे एक संपादक; **सह्याद्रि, किर्लोस्कर, मनोहर महाराष्ट्र साहित्य – पत्रिका प्रसाद, नवभारत**, Progress of Education. यांत लेख प्रसिद्ध;

सेवानिवृत्तीनंतर (१९७२) जे. जे स्कूल ऑफ आर्ट, मुंबई येथे व्याख्याने (३ वर्षे), १९७२ पासून अद्यापि अभिनव कलामहाविद्यालय येथे 'भारतीय सौंद्र्यशास्त्रा'चे व टिळक विद्यापीठ, पुणे, येथे संस्कृत साहित्य शास्त्राचे सन्मान्य प्राध्यापक;

'आद्य श्रीमद्भगवद्गीता व तिचा मूळ उपदेशक' या संशोधनात्मक निबंधास पारितोषिक, आनंदवर्धन, अभिनवगुप्त यांच्या लेखनावर व इतर विषयांवर इंग्रजी व मराठी संशोधनात्मक नियतकालिकांतून कित्येक लेख प्रसिद्ध,

'**मराठी रघुवंश** (गेयकाव्य)' या पुस्तकाचे कर्ते (१९८२).

*

प्रा. मा. वा. पटवर्धन. एम्. ए.; तीन शिष्यवृत्त्यांचे व एका पारितोषिकाचे मानकरी; डेक्कन एज्युकेशन सोसायटी (पुणे) चे आजीव सदस्य (१९३३ ते १९६७); संस्कृत व प्राकृत या भाषांचे प्राध्यापक विलिंग्डन कॉलेज, सांगली (१७ वर्षे) व फर्ग्युसन कॉलेज, पुणे (१४ वर्षे); पुणे विद्यापीठ, एम्. ए. ला संस्कृत व प्राकृत या भाषांचे प्राध्यापक (१४ वर्षे); प्रमुख, न्यू. इंग्लिश स्कूल, रमणबाग, पुणे (५ वर्षे);

दशवैकालिक सूत्राचे अध्ययन (इंग्रजी); बाणभट्टाच्या कादंबरीच्या काही भागांचे रुपांतर (इंग्रजी), हस्तिमल्ल या जैन लेखकाची संस्कृत–प्राकृत नाटके (इंग्रजी), वज्जालग्ग – प्राकृत सुभाषित संग्रह (इंग्रजी), शान्तरस व अभिनवगुप्तकृत रसास्वादोपपत्ति (प्रा. जे. एल. मॅसन यांचे सहकार्याने, इंग्रजी) भरताच्या नाट्यशास्त्रातील रसाध्याय, व रसास्वाद (प्रा. जे. एल. मॅसन यांच्या सहकार्याने इंग्रजी) या पुस्तकांचे व महिमभट्टाच्या व्यक्तिविवेकावरील परिचयग्रंथाचे लेखक. त्यांनी संपादिलेल्या हालाची गाथासप्तशती या ग्रंथाचा पहिला खंड प्रसिद्ध झाला आहे.

संस्कृत साहित्यशास्त्रविषयक प्रश्नांवर त्यांचे काही लेख इंग्रजी व मराठी संशोधनात्मक नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहेत.

श्री आनन्दवर्धनाचार्यविरचित

ध्वन्यालोक [द्वितीय खंड]

व त्यावरील श्री अभिनवगुप्तांची
'**लोचन**' टीका
मूळ संस्कृत संहिता व तिचा विस्तृत विवेचक टीपांसह
मराठी अनुवाद
द्वितीय खंड

संपादक व अनुवादक
प्रा. पु. ना. वीरकर,
एम्. ए., बी. टी., टी. डी. (लंडन)
प्रा. मा. वा. पटवर्धन,
एम्. ए.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती – एप्रिल, १९८९

प्रकाशक :
सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

© प्रकाशकाधीन

मूल्य : ९० रुपये

मुद्रक :
श्री. रवींद्र कुलकर्णी
रचना एंटरप्रायझेस
४/४० 'चंद्रप्रकाश', कर्वे रोड,
पुणे ४११ ००४.

निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने मराठी भाषा व साहित्य यांचा विकास करून त्यांना समृद्ध करण्यासाठी व साहित्य, इतिहास व कला इत्यादी क्षेत्रात महाराष्ट्राचा थोर वारसा जतन करण्यासाठी अनेक योजना कार्यान्वित केल्या आहेत. आधुनिक शास्त्रे, ज्ञानविज्ञाने, तंत्र, अभियांत्रिकी या क्षेत्रात व प्राचीन भारतीय संस्कृती, इतिहास, कला इत्यादी विषयात मराठी भाषेला विद्यापीठीय स्तरावर ज्ञानदान करण्याचे सामर्थ्य यावे या दृष्टीने कार्यक्रम तयार करून तो कार्यवाहीतही आणला जात आहे.

श्री. आनंदवर्धनाचार्य यांचा "ध्वन्यालोक" हा संस्कृत साहित्यशास्त्राचा एक पायाभूत ग्रंथ असून तो एक युगप्रवर्तक अलंकारमीमांसा करणारा ग्रंथ होय. या ग्रंथावर "लोचन" टीका लिहिणाऱ्या श्री. अभिनवगुप्तांनी "सहृदयाच्या हृदयाशी संवाद पावणारा" असे या ग्रंथाचे वर्णन केले आहे. अशा या ग्रंथाचा मराठीत संपूर्ण व यथार्थ अनुवाद व संपादन प्रा. पु. ना. वीरकर व प्रा. मा. वा. पटवर्धन यांनी केले असून त्याचा प्रथम खंड मंडळाने सन १९८३ मध्ये प्रकाशित केला आहे.

प्रस्तुत ग्रंथाचा हा दुसरा खंड आता छापून पूर्ण झाला असून त्याचे प्रकाशन करण्यास मंडळास अत्यंत आनंद होत आहे. या खंडाची छपाई चालू असतानाच प्रा. मा. वा. पटवर्धन यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या हयातीतच हा खंडही प्रकाशित झाला असता तर ती त्यांच्या दृष्टीने एक मोठ्या समाधानाची घटना ठरली असती. परंतु तसे होऊ शकले नाही. प्रा. पु. ना. वीरकर व कै. प्रा. मा. वा. पटवर्धन यांनी हा ग्रंथ अनुवाद करून व संपादन करून मंडळाकडे प्रकाशनार्थ दिल्याबद्दल मंडळाच्या वतीने मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. संस्कृतचे अध्यापक, स्नातक–स्नातकोत्तर स्तरावरील विद्यार्थी व जिज्ञासू वाचकवर्ग या ग्रंथाचे यथोचित स्वागत करतील अशी खात्री आहे.

मुंबई.
दिनांक ४ मार्च, १९८९.

यशवंत मनोहर
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

संपादकांचे हृद्‌गत

या संपूर्ण ग्रंथाचे हस्तलिखित आम्ही जून १९७८ मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाला सादर केले. त्यानंतर ५ वर्षांनी त्याचा पहिला खंड छापला गेला. तो १९ फेब्रुवारी १९८४ ला नागपूरचे ख्यातनाम साहित्यशास्त्रज्ञ डॉ. ग. त्र्यं. देशपांडे यांचे हस्ते प्रकाशित झाला. त्या निमित्ताने पाठवलेल्या संदेशात महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिले—

'ध्वन्यालोकाचा दुसरा भाग लवकरच प्रकाशित होणे आवश्यक आहे. या पूर्वार्धापेक्षा तो अधिक महत्त्वाचा आहे. ध्वनिसिद्धांताचा रसप्रक्रियेशी असलेला घनिष्ठ संबंध त्यात स्पष्ट होतो म्हणून महाराष्ट्र राज्य सा. सं. मंडळाने तो दुसरा भाग—उत्तरार्ध—शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध करावा.'

रँग्लर डॉ. ग. स. महाजनी यांनीही दुसरा खंड लवकर प्रकाशित होणे अगत्याचे आहे असे मुद्दाम पत्र लिहून कळवले.

डॉ. वा. म. कुलकर्णी, भूतपूर्व संचालक, भाषासंचालनालय यांनी समग्र ग्रंथ वाचून कित्येक मौलिक सूचना केल्या. दुसरा खंड लवकर बाहेर पडावा, म्हणून तीव्र इच्छा व्यक्त करताना म्हटले—

'ग्रंथ मुद्रित होऊन बाहेर पडेल, तेव्हा अभियुक्त या ग्रंथाची 'अपूर्व, अप्रतिम, अलौकिक' म्हणून प्रशंसा करतील यात संदेह नाही.

मा. लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. अण्णासाहेब महाजनी व डॉ. वा. म. कुलकर्णी यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

दि. १९—२—८४ ला 'केसरी' मध्ये डॉ. चि. ग. काशीकर, उपकुलगुरू टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांनी 'ध्वन्यालोक ग्रंथाचा यथातथ्य अनुवाद' या शीर्षकाने एक विवेचक अभिप्राय लिहिला.

दि. ४—४—८४ च्या 'लोकसत्ते' तही महाराष्ट्रकवि यशवंत यांनी पहिल्या खंडावर विस्तृत अभिप्राय लिहून 'हा मौल्यवान् ग्रंथ सुबोध मराठीत आणून आम्हा फारसे संस्कृत न जाणणाऱ्या मराठी साहित्यसेवकांना प्रा. वीरकर व प्रा. पटवर्धन यांनी ऋणी करून ठेवले आहे, असे उद्‌गार काढले व दुसरा खंड लवकर प्रकाशित करून मराठी रसिकांना उपकृत करावे अशी मंडळाला विनंती केली.

एम्. ए. ला शिकवणाऱ्या अनेक संस्कृतच्या प्राध्यापकांनी दुसरा खंड आम्हाला हवा आहे, केव्हा बाहेर पडणार असे आम्हाला अनेकवार विचारले.

दुसरा खंड छापायला जून १९८६ मध्ये प्रारंभ झाला. त्यानंतर मंडळाला अनेक अडचणी आल्या. काही दिवस छपाई थांबली. सर्वांवर मात करून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने १९८९ च्या प्रारंभी ग्रंथ छापून पुरा केला, याबद्दल मंडळाचे आभार मानावे तेवढे थोडेच.

पु. ना. वीरकर

मा. वा. पटवर्धन

हा हन्त हन्त

कित्येक वर्षे माझ्याबरोबर काम करून हा ग्रंथ शक्य तेवढा परिपूर्ण करण्यास ज्यांनी मला मदत केली ते माझे सह-लेखक प्रा. मा. वा. पटवर्धन दुसऱ्या खंडाची छपाई पुरी होत आली असताना दि. २५ नोव्हेंबर १९८८ ला दिवंगत झाले याचे मला परम दुःख होते. पहिल्या खंडाच्या प्रकाशनास ते उपस्थित होते. दुसरा खंड छापलेला पाहायला ते आणखी काही महिने तरी जगले असते, तर!.

पु. ना. वीरकर

ध्वन्यालोक

द्वितीय खंड

विषयानुक्रम

उपोद्घात

उपोद्घात

ध्वन्यालोक या संस्कृत साहित्यशास्त्रावरील अग्रगण्य ग्रंथाच्या एकूण चार उद्‌द्योतांपैकी पहिले दोन उद्‌द्योत, त्यावरील लोचन टीका व त्या दोहोंचा मराठी अनुवाद आणि सविस्तर स्पष्टीकरण प्रथम खंडात प्रसिद्ध झाले आहेतच. या द्वितीय खंडात उरलेले दोन म्हणजे तृतीय व चतुर्थ उद्‌द्योत, लोचन, मराठी अनुवाद व स्पष्टीकरण यांसह वाचकांपुढे सादर केले जात आहेत.

एकूण ग्रंथातून आलेले प्रमुख विषय व आनंदवर्धनांनी साहित्यशास्त्रात घातलेली मौलिक भर इ. १ ल्या खंडातील उपोद्‌घातात दाखविले आहेच. पण ३ व ४ या उद्‌द्योतांत आलेल्या विषयांचा सविस्तरपणे निर्देश या उपोद्‌घातात करीत आहो.

उद्‌द्योत तिसरा

दुसऱ्या उद्‌द्योतात व्यंग्यार्थाच्या निरनिराळ्या प्रकारांचा विचार करून त्यांना अनुसरून ध्वनीचे प्रकार व स्वरूप विविधतेने कसे प्रकट होऊ शकते ते दाखवले. आता व्यंजकांचे म्हणजे शब्द व वाच्य अर्थ यांच्या नानाविध प्रकारांनुसार ध्वनीचे कैक प्रकार कसे होऊ शकतात ते दाखवण्यात येत आहे. प्रथम अविवक्षितवाच्य ध्वनीचे प्रकार व मग विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीचे कित्येक प्रकार एखाद्या पदातून किंवा वाक्यातूनही कसे प्रकट होतात ते आनंदवर्धन उदाहरणांसह दाखवतात. 'पदे (शब्द) ही वाचक नसतात, तर स्मारक असतात' असे काहींचे मत सांगून ध्वनि हे विशेष प्रकारचे काव्य असताना ते एखाद्या पदातून कसे प्रकट होईल अशी त्यांची शंका कल्पून तिचे आनंदवर्धन उदाहरणे देऊन निरसन करतात.

मग अलक्ष्यक्रमव्यंग्य म्हणजे रसादिध्वनि हा वर्णांतून, पदातून, पदांशातून, वाक्यातून, 'संघटने'तून व प्रबंधातून म्हणजे समग्र काव्यातूनही प्रकाशित कसा होऊ शकतो ते दाखविले आहे. विशिष्ट वर्णांची योजना ही काही रसांच्या अभिव्यक्तीस हानिकारक असली, तरी इतर काही रसांना पोषक होऊ शकते हे दाखवताना पुढे ज्याचा विशेषत्त्वाने पुरस्कार करण्यात येणार आहे, त्या औचित्य सिद्धांताच्या प्रतिपादनास अप्रत्यक्षपणे प्रारंभच झाला आहे.

एखाद्या वाक्यातून म्हणजे पदसमूहातून, तसेच एखाद्या विशिष्ट पदातूनही रसादिध्वनि विशेषत्वाने कसा प्रकट होऊ शकतो हे उदाहरणांद्वारे दाखवल्यावर 'संघटने'च्या तीन प्रकारांचा निर्देश केला आहे. त्यांद्वारे संघटनेचे स्वरूप काय हे लगेच लक्षात येते. काव्यात सामासिक शब्द मुळीच न वापरणे किंवा अतिशय लहान, सोपे समास वापरणे याला 'असमासा' संघटना म्हटले आहे. मध्यम लांबीचे समास वापरणे याला मध्यमसमासा संघटना व लांब लांब समासांची योजना करणे याला दीर्घसमासा संघटना म्हटले आहे. यांपैकी कोणत्याही एका प्रकारची संघटना काही रसांना अनुपकारक, तर तीच दुसऱ्या काही रसांना उपकारक होऊ शकते.

काव्यात कोणत्या संघटनेचा वापर करावा हे त्यातून मुख्यतया अभिव्यक्त होणाऱ्या रसावर अवलंबून आहे, ही महत्त्वाची गोष्ट सांगितल्यावर त्या त्या रसाच्या अभिव्यक्तीस 'उचित' अशीच संघटना असावी असे प्रतिपादन करून शेवटी औचित्य हेच संघटनेचे नियामक कारण होय हे आनंदवर्धन सांगतात.

हे औचित्य अनेक कारणांवरून ठरते. काव्यातील वक्ता कोणत्या प्रकारचा आहे, त्याला कोणता वाच्यार्थ प्रकट करायचा आहे, यांनुसार ते औचित्य निश्चित करता येते.

काव्यबंधाचा म्हणजे रचनेचा प्रकार यांवरही ते औचित्य अवलंबून आहे, हे सांगून काव्यबंधाच्या कैक प्रकारांचा आनंदवर्धन उल्लेख करतात. उदा. मुक्तक, संदानितक, विशेषक, कुलक वगैरे. या निरनिराळ्या प्रकारांना कोणत्या संघटना विशेष अनुकूल म्हणून योजाव्या व कोणत्या प्रतिकूल म्हणून वर्ज्य कराव्या, हे आनंदवर्धन सांगतात.

मग मुख्यतः रसादींची संपूर्ण काव्यातून (प्रबंधातून) अभिव्यक्ति करण्याची इच्छा असल्यास कवीने कोणकोणती पथ्ये पाळावीत व काय काय कसोशीने टाळावे हा विषय आनंदवर्धन चर्चेस घेतात. 'रसभंगाचे कारण अनौचित्याखेरीज दुसरे कोणतेही नाही. सहृदयांना मान्यअसलेले औचित्य दक्षतेने पाळणे हे रसाच्या परिपोषाचे परमोच्च रहस्य होय' हे ते आवर्जून सांगतात. उत्तम प्रतीच्या पात्रांचे रति वगैरे स्थायिभाव त्यांच्या दर्जाला साजेसे असेच प्रकट करावेत; त्यांचा ग्राम्य लोकांच्या पातळीवर जाऊन, आविष्कार केल्यास ते वर्णन असभ्य व लोकांचे हसे ओढवून घेण्यास कारण होईल असे प्रतिपादन करतात.

देवादिकांची रति वर्णन करताना औचित्य पाळण्याच्या बाबतीत काही वेळा महाकवींचा देखील विवेक सुटतो, असे आढळते, हा त्यांचा दोषच होय असे आनंदवर्धन निर्भीडपणे सांगतात. तो दोष महाकवींच्या प्रतिभेमुळे झाकला जातो, पण नवकवींनी मात्र औचित्यभंग करणे कसोशीने टाळावे.

यासाठी नाटककारांनी आपल्या नाटकासाठी सर्वपरिचित असलेले कथानक निवडावे, म्हणजे अनौचित्याच्या चुका होण्याचा संभव पुष्कळच कमी होईल असे मार्गदर्शन आनंदवर्धन करतात. कल्पनानिर्मित कथानक निवडल्यास अनौचित्य टाळण्यासाठी फार जागरूक राहावे लागेल व जराही औचित्यभंग झाल्यास त्यामुळे कवीचे हसे मात्र होईल असे ते सांगतात.

कथानकाच्या बाबतीतच नव्हे, तर विभाव, अनुभाव इ. रसांगांच्या बाबतीतही औचित्यभ्रंश होऊ देऊ नये. रामायणादि ग्रंथांतून कथाभाग निवडताना कवींनी काही कल्पित प्रसंग घातले तर ते लवमात्र रसविरोधी होणार नाहीत असे पाहावे.

याच संदर्भात आनंदवर्धन एक महत्त्वाचे वाक्य लिहून जातात. 'रामायणादि ग्रंथांतींल कथानकाच्या आधारे काव्य लिहिताना कवींना मुळातलाच एखादा प्रसंग रसभंग करणारा आहे असे वाटल्यास त्याचा त्याग करून रसानुकूल असा प्रसंग त्यांनी आपल्या प्रतिभेने कल्पून घालावा. आहे तसे लिहिण्याने कवीला कवि ही पदवी मिळत नाही. कारण इतिहासात ते लिहिलेले असतेच!'

भरतादि मुनींनी नाटकातले जे संधि वगैरे सांगितले आहेत, त्यांचे पालन केवळ शास्त्र पाळायचे या बुद्धीने करू नये, तर रसादींची यथायोग्य अभिव्यक्ति करण्यासाठीच; अन्यथा शास्त्रनियम पाळण्याची केवळ यांत्रिक दृष्टि ठेवल्यास त्यामुळे रसहानि होते, याचे—वेणीसंहार नाटकातील दुसऱ्या अंकात प्रतिमुख संधीचे 'विलास' नावाचे अंग शास्त्रपालनासाठीच केल्याने रसहानिकारक झाले आहे— हे उदाहरण आनंदवर्धन देतात.

कवीच्या अंगी अलंकार गुंफण्याची शक्ति कितीही असली, तरी अलंकारांचा उपयोग रसाला अनुकूल होईल असाच करावा, हे आनंदवर्धन कटाक्षाने पुन्हा सांगतात. 'पुन्हा' असे म्हणण्याचे कारण उद्‌द्योत २, कारिका १६ मध्ये हा मुद्दा त्यांनी विशेष प्रामुख्याने मांडला होता. पण कित्येक कवि रसाकडे लक्ष न देता केवळ अलंकारांवरील आपले प्रभुत्व दाखविण्याच्या लालसेने ग्रासलेले दिसतात, हे पाहून आनंदवर्धनांना हा मुद्दा पुन्हा मुद्दाम सांगावासा वाटला.

ध्वनीचा अनुरणनरूप व्यंग्य म्हणूत जो प्रकार सांगितला, तोही काही प्रबंधातून प्रकाशित होतो हे सांगताना आनंदवर्धन महाभारतातल्या गिधाड व कोल्हा यांच्या विवादाचे सुंदर उदाहरण देतात. तेच उदाहरण पुढे मम्मटाने काव्यप्रकाश, उल्लास ४ मध्ये (पाहा, झळकीकर आवृत्ति, पृष्ठ १६६–१६७) दिले आहे.

त्यानंतर १६ व्या कारिकेमध्ये ग्रंथकाराने विभक्तिप्रत्यय, क्रियापदाचे प्रत्यय, वचन, कृत् व तद्धितप्रत्यय, तसेच समासांच्या द्वारेही रसांचे विशेष पोषण केले जाते, हे सांगण्यात आले आहे. त्या कारिकेचे **विवरण करताना आनंदवर्धन हनूमन्नाटकातले न्यक्कारो ह्ययमेव मे** इ. उत्कृष्ट उदाहरण देतात (पाहा, "उद्‌द्योत - ३ 'अलक्ष्यक्रम' ध्वनि हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादि अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे **न्यक्कारो ह्ययमेव** इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण" मध्ये) त्यातले प्रत्यय, वचन वगैरे लहानसे अंशही रौद्ररसाला पोषक कसे होतात हे एकदम प्रत्ययाला येते. त्या श्लोकाचे तिळातिळाएवढे बारीक तुकडे केले, तरी ते व्यंजक कसे झाले आहेत व एकूण रसाची ते केवढी तरी पुष्टि करतात, हे अभिनवगुप्तांनी सुरेख प्रदर्शित केले आहे.

असेच बारीक अंशसुद्धा व्यंजक व रसपरिपोषक असेच निवडण्याची कवींनी काळजी घ्यावी म्हणजे त्यांना थोर कवि अशी कीर्ति मिळेल हे आनंदवर्धन मनावर ठसवितात. असे व्यंजक अंश योजिल्याची आणखीही पुष्कळ उदाहरणे आनंदवर्धनांनी दिली आहेत.

मग रसपरिपोषाला विरोधी ज्या गोष्टी असतील त्या टाळण्याचा कवीने कसून प्रयत्न केला पाहिजे– मग त्याचे काव्य मुक्तक (एक स्फुट श्लोक) या स्वरूपाचे असो किवा मोठा प्रबंध या स्वरूपाचे असो– हे सांगण्यात आले आहे. १८ व १९ या कारिकांत कोणकोणत्या गोष्टी रसविरोधी होतात यांचा निर्देश केला आहे व त्यानंतर वृत्तीमध्ये त्यांची उदाहरणेही दिली आहेत. हे विवेचन करीत असताना आनंदवर्धन पुढील महत्त्वाचे, विधान करतात :–

'आणि म्हणूनच, म्हणजे केवळ कथानकालाच महत्त्व देणे आणि मुख्य कोणते आणि अंगभूत कोणते याचा विवेक सोडून रसभावनांचा समावेश करणे यामुळे कवींच्या हातून अशा प्रकारचे प्रमाद घडतात, म्हणून कवींनी रसादिरूप व्यंग्यार्थालाच सर्वाधिक महत्त्व देणे योग्य होय हे प्रतिपादन करण्यासाठी आम्ही हा ग्रंथ लिहिण्याचा उद्योग हाती घेतला, केवळ ध्वनीचे प्रतिपादन करण्याच्या उद्देशाने नव्हे.'

मात्र विरोधी रसाची अंगे काही विशिष्ट खबरदारी घेऊन समाविष्ट केली, तर मात्र त्यांचा समावेश मुख्य रसाला प्रतिकूल होत नाही. खबरदारी कोणती घ्यावी हे कारिका २० पासून सांगण्यात आले आहे.

उद्दिष्ट रसाला पुरेशी उत्कटता प्राप्त झाली, म्हणजे मात्र त्याला बाधा येणार नाही अशा तऱ्हेने, किंवा उलट ती त्याला उपकारक होईल अशा रीतीने विरोधी रसाची अंगे समाविष्ट केली, तर ते मुळीच दोषास्पद होत नाही, हे आनंदवर्धनांनी उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे.

याचाच तिसरा प्रकार म्हणजे दोन अंगे एकमेकांशी विरोधी असली तरी ती दोन्ही प्रस्तुत रसाची अंगे होतील अशा तऱ्हेने समाविष्ट केली, तर त्यांचा परस्परांमधील विरोध नाहीसा होतो. याची उदाहरणे आनंदवर्धनांनी तर दिली आहेतच पण अभिनवगुप्तांनी रोजच्या व्यवहारातले दिलेले सुंदर उदाहरण प्रथम खंडाच्या उपोद्घाताच्या शेवटी (२ अभिनवगुप्त – एक अलौकिक भाष्यकार) वाचकांच्या नजरेस आणलेच आहे. ते असे—पाणी आणि अग्नि यांमध्ये असलेले थंडपणा व उष्णत्व हे गुणधर्म परस्परविरोधी असले, तरी त्यांचा उपयोग तांदळावर संस्कार करण्यासाठी केला, तर त्या दोहोंमुळे तांदळापासून मऊ भात तयार होतो!

काही स्थायिभावांचा परस्परांशी विरोध असतो, तो दोन प्रकारचा असतो. काही स्थायिभाव एकाच पात्राचे ठिकाणी असल्याचे दाखवल्यास ते अस्वाभाविक, अत एव विरोधी वाटते. उदा. वीर आणि भयानक या रसांचे स्थायिभाव. जो माणूस हाडाचा शूर आहे, तोच भित्रा दाखवला, तर ते हास्यास्पद होईल. दुसरे काही स्थायिभाव, एकाच पात्राच्या ठिकाणी दाखवण्यात काही दोष नसतो, पण ते एकामागून एक लगेच म्हणजे मुळीच अंतर न सोडता उद्भवल्याचे दाखविल्यास ते विरोधी होतात, म्हणजेच अस्वाभाविक वाटतात.

यांपैकी पहिल्या प्रकारचा रसविरोध टाळण्याचा उपाय म्हणजे ते निरनिराळ्या पात्रांच्या ठिकाणी दाखवावेत. उदा. एक पात्र शूर (उत्साह या स्थायिभावाने युक्त) दाखवले, तर त्याच्या शत्रूच्या ठिकाणी भय हा स्थायिभाव उपजलेला दाखवण्यात विरोध नाही.

दुसऱ्या प्रकारचा विरोध टाळण्याचा उपाय म्हणजे त्या दोनही रसांशी अविरुद्ध असा एखादा रस त्या दोहोंच्या मध्ये अंतर्भूत करावा. हा दोन्ही प्रकारचा विरोध टाळण्याच्या उपायांची अनेक उदाहरणे आनंदवर्धनांनी दिली आहेत.

'शांत' हा स्वतंत्र व नववा रस आहे. याला विरोध करणाऱ्या लोकांच्या मतांचे आनंदवर्धनांनी जोरदारपणे खंडन केले आहे. तृष्णा म्हणजे असक्ति सोडल्याने जे सुख प्राप्त होते, ते शांत रसाचा स्थायिभाव होय. सामान्य लोकांच्या तो अनुभवास येत नसला, तरी असामान्य महाप्रभावी लोकांची ती एक मनोवृत्ति असल्याने ती नाहीच असे म्हणता येणार नाही. वीररसात त्याचा अंतर्भाव करू म्हटले तर तेही योग्य नाही, कारण वीररसाच्या मुळाशी स्वतःच्या मोठेपणाचा अभिमान असतो, तर अहंकाराचा प्रशम हा शांत रसाचा पाया होय.

हा शांतरस 'आहे' एवढेच नव्हे तर तो इतर सर्व रसांहून श्रेष्ठ आहे असे अभिनवगुप्त प्रतिपादन करितात. याचे कारण शम हा शांत रसाचा स्थायिभाव असून तो मोक्ष या परमपुरुषार्थाला कारण होतो.

मुख्य, प्रस्तुत रसाशी विरोध कसा टाळावा याची सोदाहरण चर्चा केल्यावर ही काळजी शृंगार रसाच्या बाबतीत विशेषत्वाने घ्यावी कारण तो सर्व रसांत अत्यंत नाजूक असा आहे; असे २८ व २९ या कारिकांत सांगण्यात आले आहे

हा शृंगार रस सर्वांच्या अनुभवांशी जुळणारा असल्याने त्यांच्या अंगांचा उपयोग शांत वगैरे सारखा शृंगाराशी सर्वथैव विरुद्ध असणारा रस मुख्य असताना त्या काव्याला उठाव देण्यासाठीच किंवा वाचकांना मुख्य रसाकडे आकृष्ट करण्यासाठीच केला, तर तो तसा उपयोग करणे मुळीच, दोषास्पद ठरत नाही.

शृंगाराच्या अंगांचा शांत रसाला ती उपकारक होईल अशा रीतीने उपयोग केल्यास त्याने शांतरस अधिक प्रभावीपणे प्रत्ययास येतो हे आनंदवर्धनांनी व अभिनवगुप्तांनीही उदाहरणे देऊन दाखवले आहे.

शेवटी काव्यात रसादींनाच प्राधान्य देऊन त्यांना उचित अशीच शब्द, अर्थ इत्यादिकांची योजना करणे हेच कवीने आपले मुख्य उद्दिष्ट समजावे असे आनंदवर्धन पुन्हा एकदा आवर्जून सांगतात.

काव्यात रसालाच प्राधान्य दिले पाहिजे आणि त्याला उचित अशीच काव्याच्या जुळणी प्रत्येक घटकांची केली पाहिजे हा आनंदवर्धनांनी मांडलेला सिद्धांत आधुनिक काळात सुद्धा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याला केवळ काव्याच्याच नव्हे, तर चित्र, संगीत इत्यादि इतर ललित कलांच्याही दृष्टीने असाधारण महत्त्व आहे. कलाकृतीतून कोणत्यातरी भावनेचा आविष्कार केला, तर ती कलाकृति 'सजीव' वाटते व तो भावनेचा आविष्कार सर्वांगसुंदर रीतीने केला, तर ती कृति थोर कलाकृति म्हणून गणली जाते. भरतांनी '**गोपुच्छाग्रसमानं तु बन्धनं तस्य कीर्तितम्**' हे जे नाट्याच्यासं विधानकासंबंधी सांगितले, ते कोणत्याही ललितकलेला लागू आहे. गायीच्या शेपटाच्या गोंड्याचा प्रत्येक केस जसा एकाच टोकाकडे वळलेला असतो, तसाच कोणत्याही ललितकलाकृतींतील प्रत्येक बारीकसारीक तपशील मुख्य रसाला उठाव देईल असाच कलावंताने समाविष्ट केला पाहिजे. उदा. चित्रकला. पतिनिधनाचे दुःख असह्य झालेल्या स्त्रीचे चित्र काढताना तिने अंगावर दागदागिने घालताना किंवा भरजरी सुंदर वस्त्रे परिधानकेलेली दाखवणे हे अनुचितच होणार नाही काय? इतकेच नव्हे, तर तिने चापून चोपून केशरचना करण्याकडे, प्रसाधनाकडे लक्ष पुरविले असे काहीही दाखवता कामा नये. तिच्या शोकाला अनुकूल दिसेल, करुण रसाचा परिपोष करील असेच सर्व चित्रण पाहिजे. या दृष्टीने जे जे Setting किंवा जी पार्श्वभूमि चित्रित करावयाची, तिचा तपशील देखील करुणरसाच्या प्रतीतीस सर्वस्वी उचित असाच हवा.

संगीतकलेबद्दलही असेच म्हणता येईल. करुणरसाचा प्रसंग असताना सूरही करुणरसानुकूलच निघाले पाहिजेत. द्रुतलय वगैरे विरोधी बाबींचा त्यावेळी उपयोग करता कामा नये. मुख्य रस वा भावाशी विसंवादी पार्श्वसंगीत असण्यापेक्षा ते पार्श्वसंगीत नसलेले पुरवले!

त्यानंतर 'क्रम' म्हणजे वाच्य व व्यंग्य या दोन अर्थांपैकी वाच्य आधी कळतो व व्यंग्य मागून कळतो हे सांगून सर्वत्र हा क्रम असला तरी काही ठिकाणी व्यंग्यार्थ वाच्यार्थानंतर इतक्या लवकर कळतो, की मध्ये काही वेळ गेला, हे लक्षातही येत नाही, म्हणून अशा काव्यप्रकाराला 'अलक्ष्यक्रमव्यंग्य' म्हणतात असे आनंदवर्धनांनी सांगितले आहे. अशा ठिकाणी व्यंग्यार्थ हा रस, भाव या स्वरूपाचा असतो. दुसऱ्या प्रकारामध्ये संदर्भ वगैरे ध्यानात घेतल्यावर म्हणजे काही वेळाने व्यंग्यार्थ समजतो. अशा प्रकाराला 'संलक्ष्यक्रम' म्हणतात.

पहिल्या उद्‌द्योतात व्यंग्यार्थ हा वाच्यार्थापेक्षा भिन्न असतो हे प्रमाणे व उदाहरणे देऊन सिद्ध केले होते. आता काही विरोधकांची मते विचारात घेऊन त्यांचे खंडन केले आहे. प्रथम तात्पर्यवाद (संपूर्ण वाक्यातून शेवटी जो अर्थ मुख्यत्वाने प्रत्ययास येतो, त्यालाच वाच्यार्थ म्हणा) हे मीमासकांचे मत आनंदवर्धनांनी खोडून काढले आहे. तदनंतर स्वरूपभेद, विषयभेद इ. जी वाच्यार्थ व व्यंग्यार्थ हे वेगळे असतात हे दाखविण्यासाठी प्रमाणे दिली होती, तीच अधिक विस्ताराने मांडली आहेत.

मग पहिल्या उद्‌द्योतातील १० व्या कारिकेत 'संपूर्ण वाक्याचा अर्थ जसा त्या वाक्यातील शब्दांच्या अर्थांच्या द्वारेच कळतो, तसे व्यंग्यार्थाचे ज्ञान वाच्यार्थाचे ज्ञान झाल्यावर त्याद्वारेच होते' असे जे सांगितले होते, ते व्यंग्यार्थ वाच्यार्थाहून वेगळा आहे हे लवकर ध्यानात यावे म्हणून सांगितले होते. पण आता तो दृष्टांत अधिक सुधारण्यासाठी आनंदवर्धन घट आणि दिवा याचा दृष्टांत देतात. ज्याप्रमाणे दिव्यामुळे घटाने दर्शन झाल्यावर दिव्याचा प्रकाश निवृत्त होत नाही, त्याप्रमाणे व्यंग्यार्थाचा प्रत्यय आल्यावर वाच्यार्थाचे भान दूर होत नाही.

मग आश्रय–भेद (व्यंजकत्व हे काही वेळा वाचकत्वाच्या आश्रयाने राहते, तर काही वेळा गुणवृत्तीच्या आश्रयाने राहते. दोहोंपैकी कोणत्याही एकाच्याच आश्रयाने नेहमी राहत असे नाही.), स्वरूपभेद, विषयभेद हीच प्रमाणे देऊन् व्यंजकत्व हे लक्षणेहूनही कसे वेगळे आहे हे पहिल्या उद्‌द्योतापेक्षा अधिक सविस्तरपणे पुन्हा स्पष्ट केले आहे.

पुढे महिमभट्टाने ध्वनिसिद्धांताला प्रबळ विरोध करणारा 'व्यक्तिविवेक' नावाचा एक ग्रंथ लिहिला. 'व्यंजकत्व हे अनुमानाहून वेगळे नाही' हे आपले मत त्याने मांडले आहे. व्यंजकत्वाची गणना पुढे कोणीतरी अनुमानात करतील अशी कल्पना आधी येऊनच की काय आनंदवर्धनांनी अनुमान हा पूर्वपक्ष मांडून त्याचे खंडन केले आहे.

मग वाक्यशास्त्रज्ञ म्हणून गणले जाणारे मीमांसक व पदशास्त्रवेत्ते जे वैयाकरण त्या दोघांचाही ध्वनीला विरोध असण्याचे कारण का नाही ते आनंदवर्धन विशद करतात.

अशा तऱ्हेने पूर्वपक्ष मांडून त्याचे युक्तिवादपूर्वक खंडन करणे ही गोष्ट ध्वन्यालोकापूर्वीच्या कोणत्याही साहित्यशास्त्रावरील ग्रंथात आढळत नाही. नाही म्हणायला काव्यादर्शात एके ठिकाणी उपमा व उत्पेक्षा यांची चर्चा करताना पूर्वपक्ष–उत्तरपक्ष या पद्धतीचा अवलंब केलेला आढळतो. पण ध्वन्यालोकात अनेक पूर्वपक्ष मांडून त्याने मुद्देसूदपणे खंडन करून व्यंजनाव्यापाराची स्थापना केलेली आहे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे ध्वन्यालोकानंतरच्या काव्यप्रकाश, व्यक्तिविवेक, साहित्यर्पण, अलंकारसर्वस्य, रसगंगाधर इ. ग्रंथात पूर्वपक्षखंडन आणि स्वपक्षस्थापन ही पद्धत अवलंबिलेली दिसते, तिचे मूळ ध्वन्यालोकामध्ये सापडते.

३४ व्या कारिकेत काव्याचा ध्वनीखेरीज दुसरा, 'गुणीभूतव्यङ्ग्य' नावाचा प्रकार असलेला आढळतो, असे सांगण्यात आले आहे. 'ध्वनि' या प्रकारात व्यंग्यार्थ मुख्य व वाच्यार्थ गौण, व्यंग्यार्थज्ञानाचे साधन, किंवा व्यंग्यार्थाला खुलविणारा असतो. तर गुणीभूतव्यंग्य प्रकारात व्यंग्यार्थांकडे दुय्यमपणा येतो व तो मुख्यत्व दिलेल्या वाच्यार्थाला अलंकृत करतो. मात्र वाच्यार्थाला खुलविणाऱ्या इतर गोष्टींपेक्षा व्यंग्यार्थामुळे त्याचे सौंदर्य कमालीने वाढते.

रस, भाव वगैरे स्वरूपाचा व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत असला, तर तेथे रसबदादि अलंकार असतात हे उद्द्योत २ कारिका ५ मध्ये सांगितलेच. वस्तुसः रसादि हा व्यंग्यार्थाच्या प्रकारांमध्ये सर्वश्रेष्ठ असताना काही ठिकाणी तरी त्याला गौणत्व कसे येत हे स्पष्ट करण्यासाठी राजाला सुद्धा जो आपल्या स्वतःच्या विवाहासाठी मिरवणुकीने निघाला आहे अशा सेवकाच्या मागूनच जावे लागते, तसे, हा आनंदवर्धनांनी दृष्टांत दिला आहे. हाच दृष्टांत पुढे मम्मटाने काव्यप्रकाश, उल्लास ४, झळकीकर आवृत्ति पृ. १२७ येथे दिला आहे.

गुणीभूत झालेला व्यंग्यार्थ अलंकारस्वरूपाचा असणे याचे उदाहरण म्हणजे दीपक वगैरे अलंकारांचे होय. (दीपकात उपमा गौणत्वाने व्यंग्य असते.)

ध्वनिप्रकारच्या काव्याचे सविस्तर विवरण आतापर्यंत केले तोच प्रकार सर्वांना आपल्या सर्व कृतींत उपयोजिता आला नाही, तरी निदान गुणीभूत व्यंग्याचा उपयोग करावा, कारण व्यंग्यार्थाच्या स्पर्शामुळे वाच्यार्थाला नितान्त सुंदरता प्राप्त होते, असे आनंदवर्धन सांगतात.

३६ व्या कारिकेत सांगण्यात आले आहे की, प्रसिद्ध काव्यातून कित्येक अर्थालंकारांना जर व्यंग्यार्थाचा स्पर्श असला तर त्यामुळे त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त झाल्याचे दिसून येते. अलंकारशास्त्रावर पहिला ग्रंथ लिहिणारा भामह याने 'वक्रोक्ति ही सर्व कवींनी आपल्या काव्यात आणावी, तिच्यामुळे काव्य विषयाला विशेष सौंदर्य प्राप्त होते.' असे म्हटले आहे. वक्रोक्तिं म्हणजेच अतिशयोक्ति ही व्यंग्यत्वाने समाविष्ट असून मुख्य असली, तर त्या काव्याची 'ध्वनि' काव्यात गणना होते. ती गौण असली तर ते काव्य गुणीभूतव्यंग्य या सदरात येते.

'काकु' म्हणजे शब्द उच्चारताना स्वरात केलेला विशिष्ट बदल. त्यामुळे वाच्यार्थातून वेगळा अर्थ प्रत्ययाला येतो. ते गुणीभूतव्यंग्याचे उदाहरण होय.

ध्वन्यालोकापूर्वी लिहिलेल्या कोणत्याही साहित्यशास्त्रीय ग्रंथात गुणीभूतव्यंग्यनामक काव्यप्रकाराचा निर्देश केलेला आढळत नाही. वस्तुतः व्यंग्यार्थाची प्रमाणे देऊन स्थापना करणे, आणि ती व्यंग्यार्थ मुख्य असणे वा गौण असणे हा विचारही यापूर्वी कोणीही प्रकट केलेला नाही.

३८ व्या कारिकेत समारोपादाखल सांगितलेले आहे की, सर्व काव्यांतून या गुणीभूतव्यंग्य प्रकाराचा उपयोग केलेला आढळतो खरा, पण म्हणून रसिकांनी विवेक करावा. जेथे जेथे व्यंग्यार्थ असेल तेथे तेथे सर्वत्र ध्वनि आहे अशी गैरसमजूत करून घेऊ नये. याची आनंदवर्धनांनी अनेक उदाहरणेही दिली आहेत. कोणतेही काव्य ध्वनिप्रकारचे आहे की गुणीभूतव्यंग्यप्रकारचे आहे याबाबत सहृदयांचा लवमात्र गोंधळ उडू नये यासाठी उदाहरणासह चर्चा केली आहे.

४१ व ४२ या कारिकांत एका महत्त्वाच्या विषयाचे प्रतिपादन आहे. व्यंग्यार्थ हा काव्याला प्राण. तो ज्या रचनेत नसेल, त्याला ध्वन्यालोकाने 'काव्य' म्हटलेले नाही, तर 'चित्र' (म्हणजे केवळ उक्तिवैचित्र्य) म्हटले आहे. 'काव्य' दोन प्रकारचे.व्यंग्यार्थ मुख्य असेल तर ते ध्वनिकाव्य आणि वाच्यार्थाला महत्त्व दिल्यामुळे व्यंग्यार्थाला ज्या ठिकाणी गौणत्व आले असेल, ते गुणीभूतव्यंग्य काव्य. वरील दोन्ही कारिकत केवळ 'चित्र' हाच शब्द वापरला आहे, कोठेही त्याला काव्य हे विशेष्य जोडलेले नाही. पहिल्या कारिकेत

तर 'काव्य दोन प्रकारचे : ध्वनि व गुणीभूतव्यंग्य. त्याहून इतर जे असेल, त्याला 'चित्र' म्हणतात.' असे स्वच्छ सांगितले आहे. वृत्तीमध्येही चित्ररचनेबाबत **न तन्मुख्यं काव्यम् । काव्यानुकारो ह्यसौ** । (ते खरेखुरे काव्य नव्हे, ती काव्याच्या केवळ बहिरंगाची नक्कल होय.) असे स्पष्टपणे म्हटले आहे. लोचनातही याचे विवरण **आलेख्यप्रख्यमिति । रसादिजीवरहित मुख्यप्रतिकृतिरूपं चेत्यर्थ : ।** (एखाद्या चित्रासारखे– म्हणजे ज्यात रस, भाववगैरे स्वरूपाचा 'जीव' नाही असे, मूळ वस्तूच्या प्रतिकृतीच्या स्वरूपाचे असलेले असा अर्थ) असे केले आहे.

अशा तऱ्हेने काव्यरचनेची प्रतवारी करण्याचा विचार आनंदवर्धनांपूर्वी कोणीही मांडलेला नाही. आनंदवर्धनांपासून कल्पना घेऊनच पुढे मम्मटाने व जगन्नाथाने 'काव्याचे प्रकार' कल्पिले. पण पुढे मम्मटाने काव्यप्रकाश, उल्लास १ येथे काव्याचे स्पष्टपणे ३ प्रकार करून शब्दचित्र व वाच्यचित्र या दोहोंना 'अवर काव्य' म्हटले आहे. जगन्नाथानेही वाच्यचित्राला मध्यम काव्य मानून शब्दचित्राला अधमकाव्य मानले आहे.

यानंतरच्या विवेचनात वृत्तीमध्ये एक महत्त्वाचे विधान आहे. **परिपाकवतां कवीनां रसादितात्पर्यविरहे व्यापार एव न शोभते ।** (रसोचित शब्दार्थ उपयोजिण्याच्या बाबतीत जे अनुभवी आहेत, अशा कवींनी मुख्यत्वाने रसादींची प्रतीति घडविण्याची इच्छा न बाळगता काव्यरचना करण्याचा उद्योग आरंभावा हेच त्यांच्या दर्जाला शोभणारे नाही.) त्याआधी 'रसादींची प्रतीति प्रामुख्याने घडविण्याकडे दुर्लक्ष करून काव्यरचना करण्याकडे कवींची प्रवृत्ति होते हे आढळून आल्याने आम्ही हा चित्रनामक प्रकार कल्पिला आहे' असे वाक्य आहे हे लिहिताना आनंदवर्धनांच्या डोळ्यांपुढे भारवीच्या किरातार्जुनीयातील (सर्ग १५) **ननोननुन्नो नुन्नोन्नो** यासारखे व माघाच्या शिशुपालवधातील (सर्ग १९) **दाददो दुद्ददुद्दादी** यासारखी रचना असल्यास नकळे.

तृतीय उद्द्योताच्या उरलेल्या भागापैकी बराचसा भाग आतापर्यंत ध्वनींचे व गुणीभूतव्यंग्याचे जे कित्येक प्रकार उदाहरणांसह वर्णिले, त्या प्रकारांची एकमेकांशी संसृष्टि किंवा संकर झाल्याने काव्याचे अक्षरशः अगणित प्रकार कसे होऊ शकतात, हे दाखविले आहे व त्यांची भरपूर उदाहरणेही दिली आहेत. हे सर्व सविस्तरपणे देण्याचा हेतु हा की सत्काव्य लिहू इच्छिणाऱ्यांनी किंवा सत्काव्याचा आस्वाद घेऊ इच्छिणाऱ्यांनी काव्यात कोणकोणती वैशिष्ट्ये समाविष्ट करावीत किंवा अनेक काव्यातून सत्काव्य कसे पारखून घ्यावे यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी.

काव्याचे जे सौन्दर्यहेतु आतापर्यंतच्या आलंकारिकांनी सांगितले त्यांत 'रीति' हा एक आहे. रीतींच्या पुरस्कर्त्यांना ध्वनितत्त्वाचे अंधुकपणे दर्शन झाले होते, पण ते ह्याचे अचुक विवरण करू शकले नाहीत. त्यांनी रीतींपर्यंतच मजल मारून रीतींचाच पुरस्कार केला.

वामनाने **विशिष्टा** (म्हणजे गुणवती) **पदरचना रीतिः ।** अशी रीतींची व्याख्या करून रीति हाच काव्याचा आत्मा असे म्हटले. गुणांचे यथार्थ स्वरूपही त्याने स्पष्ट केले नाही. गुण हे रसाचे धर्म हे आनंदवर्धनानी उद्द्योत २ कारिका ६ येथे प्रथमच सांगितले. वामन रसापर्यंत जाऊ शकला नाही, त्याने 'रस हाच करण्याचा आत्मा' असे म्हटले नाही. पण अलंकार वगैरेंपेक्षा गुण हे रसाला पुष्कळच जवळचे, म्हणून 'ध्वनितत्त्व' रीतींच्या पुरस्कर्त्यांना अस्पष्टपणे दिसले होते, असे आनंदवर्धनांनी म्हटले असावे.

कारिका ४७ मध्ये काव्याचे हे (म्हणजे व्यंग्यव्यंजक संबंधाचे विवेचन ज्यात आहे, ते) स्वरूप नीट ध्यानात आले, म्हणजे शब्दस्वरूपाच्या आश्रयाने असलेल्या, अनुप्रासप्रकार या स्वरूपाच्या उपनागरिका वगैरे आणि अर्थस्वरूपावर अवलंबून असलेल्या कैशिकी वगैरे—दोन्ही प्रकारच्या वृत्तींचेही स्वरूप स्पष्ट होते, असे म्हटले आहे. कारण अर्थात् त्या दोन्ही प्रकारच्या वृत्तींचे प्राणतत्त्व रस हेच असते.

अशा रीतीने अनंदवर्धनांनी केवळ ध्वनिसिद्धान्ताचेव रसादींचेच माहात्म्य वर्णिले नाही तर आधीच्या काव्यशास्त्रकारांनी प्रतिपादिलेल्या विविध सौंदर्य हेतूंचाही विचार करून त्यांचे काव्यक्षेत्रात योग्य स्थान कोणते, तेही दाखविण्याची कामगिरी केली.

प्रथम उद्द्योताचे अखेरीस 'ध्वनीचे तत्त्व शब्दांनी वर्णन करता येण्यासारखे नाही.' हे जे अवर्णनीयतावाद्यांचे मत, त्याचे खंडन केले होते. आता तेच खंडन विस्ताराने केले जात आहे. त्याचा सारांश असा :— आतापर्यंत ध्वन्यालोकाच्या तीन उद्द्योतांमध्ये ध्वनिकाव्याचा आम्ही जो निरनिराळ्या दृष्टिकोनांतून विचार केला, त्यावरून हे स्पष्ट होते की ध्वनि या संकल्पनेचे स्वरूप अनाख्येय नसून पूर्णपणे विशद करण्यासारखे आहे. असे असूनही 'ध्वनिस्वरूप अवर्णनीय आहे.' असे म्हणणे हे विचारशक्तीचा व आकलनशक्तीचा लोप झाल्याचे लक्षण होय. काव्याच्या ठिकाणी आढळणारे जे व्यंग्यव्यंजकभावावर आधारलेले रसादिमूलक सौंदर्यरूपी वैशिष्ट्य, त्याचे आकलन व विवेचन अधिकारी सहृदयांना करता येते व ते त्यांना वाचकांपर्यंत पोहोचविता येते. तेव्हा ध्वनिरूपी काव्यवैशिष्ट्य अवर्णनीय आहे असे म्हणणे शक्य नाही. जगामध्ये अशी कोणतीही संकल्पना नाही की जिचे वैशिष्ट्य शब्दांच्या द्वारा प्रकट होऊ शकत नाही. एखादी संकल्पना अवर्णनीय आहे असे म्हणणे म्हणजे 'अवर्णनीय' या शब्दाने तिचे 'अवर्णनीयत्व' हे वैशिष्ट्य प्रकट करणेच होय.

उद्द्योत चवथा

हा उद्द्योत सर्वांत लहान आहे. त्याच्या प्रारंभीच असे सांगितले आहे की, आतापर्यंत ध्वनीच्या व गुणीभूतव्यंग्य काव्याच्या अनन्त प्रकारांचे विवेचन केले. त्यामुळे कवींच्या प्रतिभेला अनंत विषय मिळतील इतकेच नव्हे तर एखादा विषय पूर्वीच्या कवींनी जरी हाताळलेला असला, तरी ध्वनीच्या एकाही प्रकाराने नटवून तोच कवीने पुन्हा रसिकांपुढे आणला तरीही त्यात रसिकांना नवीनता वाटते हा मुद्दा आनंदवर्धनांनी कैक उदाहरणे देऊन स्पष्ट केला आहे. त्यातही तो व्यंग्यार्थ रसस्वरूपाचा असेल, तर काव्यविषयांना नवीन तरतरी येते. वसंतऋतूत वृक्षांना नवीन बहर येतो ना, त्याप्रमाणे.

पाचव्या कारिकेत एक महत्त्वाचे विधान केले आहे. ते नवीन नाही, पण सर्व ग्रन्थात जो विषय मुख्यत्वाने प्रतिपादिला, तो दृष्टीआड होऊ नये, त्याची सर्वाधिक श्रेष्ठता कवि आणि रसिक यांच्या लक्षात नेहमी राहावी, म्हणून. ते विधान असे—

व्यंग्यार्थांचे आणि व्यंजकांचे जरी कित्येक प्रकार संभवत असले, तरी कवीने त्यांपैकी 'रसादि' (रस, भाव वगैरे) या एकाच प्रकारावर आपले लक्ष केंद्रित करावे.

उद्द्योत १, कारिका ५ मध्ये 'तोच (म्हणजे रसादिरूप' व्यंग्यार्थ हाच) काव्याचा आत्मा होय. या वाक्याने मुख्य विषयाचा प्रारंभ करून शेवटी चवथ्या उद्द्योतातील या पाचव्या कारिकेने तोच मुद्दा रसिकांच्या मनावर विशेषत्वाने ठसविला आहे.

त्यानंतर रामायण व महाभारत या महाकाव्यांत मुख्य रस कोणता याचे आनंदवर्धनांनी विवेचन केले आहे. रामायणात मुख्य रस 'करुण' असून बाकीचे (वीर वगैरे) रस त्याला अंगभूत आहेत याची दोन कारणे आनंदवर्धनांनी दिली आहेत. एक तर रामायणाच्या प्रारंभी (सर्ग २ श्लोक ४० येथे) वाल्मीकींनी स्वतः 'शोक श्लोक झाला आहे' असे उद्गार काढले आहेत व दुसरे म्हणजे रामाला झालेल्या सीतेच्या कायमच्या वियोगातच रामायण काव्याचा शेवट झालेला दाखविला आहे.

महाभारतात 'शान्त' रस हा मुख्य आहे असे आनंदवर्धन सांगतात. कारण या काव्याचे तात्पर्य वैराग्य उदित व्हावे हे असून मोक्ष या 'परम' पुरुषार्थाची प्राप्ति हा विषय मुख्यतः प्रतिपादिला आहे. यादव व पांडव यांचाही दुःखदायकच शेवट झाला हे अखेरीस दाखवून जनमनाला उद्वेग वाटावा व त्या दयासागर परमेश्वरावरच सर्वांनी आपले लक्ष केंद्रित करावे हाच भगवान् व्यासांच्या मनातील प्रमुख हेतु आहे.

तेव्हा रसादिरूप व्यंग्यार्थाची प्रतीति घडविणे हे मुख्य उद्दिष्ट ठेवून त्याला अनुकूल अशी पदरचना केली तर अशा प्रत्येक वर्णनात रसिकांना नवीनता वाटते व त्यामुळे त्यांना प्रतिक्षणी नवनवा आनंद प्राप्त होतो.

ही वर्णनामधील नवता अनेक कारणांमुळे भासमान होते. ज्या वस्तूंचे किंवा व्यक्तींचे वर्णन करायचे त्यांच्या निरनिराळ्या अवस्था, निरनिराळे काल, निरनिराळी ठिकाणे यामुळे दरवेळी त्या वस्तू वा व्यक्ति नित्यनूतन स्वरूपाने नटलेल्या वाटतात, हेही आनंदवर्धनांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले आहे. आनंदवर्धनांच्या या विवेचनामुळे '**क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः**' या माघाच्या वचनातील स्वारस्य चांगले लक्षात येते.

११ व्या कारिकेपासून 'काव्यार्थसंवाद' या संज्ञेखाली एक नवा विषय चर्चिला आहे. नवा म्हणजे यापूर्वी कोणीही काव्यशास्त्रकाराने न मांडलेला. 'संवाद' म्हणजे एका काव्याचे दुसऱ्या काव्याशी दिसणारे साम्य. मोठमोठ्या कवींच्या कृतींमध्येही अनेक वेळा साम्य आढळते. ते सदासर्वदा त्याज्यच आहे, असे समजू नये. या साम्याचे 'ध्वन्यालोका' त तीन प्रकार सांगण्यात आले आहेत— (१) मूळ वर्ण्य विषय आणि त्याचे प्रतिबिंब यांमध्ये आढळणारे साम्य (२) मूळ कृति आणि तिची प्रतिकृति म्हणजे चित्र यांमधील साम्य आणि (३) वस्तुतः भिन्न पण एकमेकांसारख्या दिसणाऱ्या दोन व्यक्तींमध्ये असणारे साम्य यांपैकी पहिल्या प्रकारात प्रतिबिंब व मूळ या दोहोंमधील आशय एकच असतो. दुसऱ्या प्रकारात चित्रातील आशय वेगळा असला, तरी तों उपेक्षणीय असतो. तो असून नसल्यासारखा असतो. तिसऱ्या प्रकारात मात्र तो वस्तुतः वेगळा विषय असूनही सारखा असल्याप्रमाणे दिसतो, इतकेच. हे तिसऱ्या प्रकारचे साम्य कवीने केव्हाही त्याज्य समजू नये. त्यात वेगळा रसादिरूप व्यंग्य अर्थ असल्याने ते बाह्य साम्य सुंदरीच्या चंद्राप्रमाणे झळकणाऱ्या मुखासारखे शोभूनच दिसते.

अशा रीतीने सबंध ध्वन्यालोकामधून आनंदवर्धनांनी पानोपानी नवनवे विचार मांडले आहेत. काव्याला महत्त्व खरोखर कशामुळे प्राप्त होते, सत्काव्याचे मर्म नेमके कोणते, काव्य सर्वांगसुंदर

होण्यासाठी काय काय टाळावे, यासंबंधी त्यांनी उदाहरणांसह भरपूर मार्गदर्शन केलेले आहे. म्हणूनच ध्वन्यालोक हा ग्रंथ साहित्यशास्त्राच्या क्षेत्रात युगप्रवर्तक मानला जातो. नंतरच्या मम्मटासारख्या मोठमोठ्या काव्यशास्त्रकारांवर या ग्रंथातील मार्गदर्शनाचा जबरदस्त प्रभाव पडला, परदेशी तज्ज्ञांनीही त्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले आणि जगन्नाथासारख्या पंडितराजानेही स्वतः होऊन म्हटले—

ध्वनिकृतामालंकारिकसरणिव्यवस्थापकत्वात् । [रसगंगाधर, काव्यमाला आवृत्ति, (१९४७) पृ. ५६९]

तृतीय उद्द्योतः

ध्वन्यालोकः

एवं व्यङ्ग्यमुखेनैव ध्वनेः प्रदर्शिते सप्रभेदे स्वरूपे पुनर्व्यञ्जकमुखेनैतत्प्रकाश्यते—

अविवक्षितवाच्यस्य पदवाक्यप्रकाशता ।
तदन्यस्यानुरणनरूपव्यङ्ग्यस्य च ध्वनेः ॥ १ ॥

अविवक्षितवाच्यस्यात्यन्ततिरस्कृतवाच्ये प्रभेदे पदप्रकाशता यथा महर्षेर्व्यासस्य - 'सप्तैताः समिधः श्रियः ', यथा वा कालिदासस्य 'कः सन्नद्धे विरहविधुरां त्वय्युपेक्षेत जायाम्', यथा वा 'किमिव हि मधुराणां मण्डनं नाकृतीनाम् ।' एतेषूदाहरणेषु 'समिध' इति 'सन्नद्ध' इति 'मधुराणाम्' इति च पदानि व्यञ्जकत्वाभिप्रायेण कृतानि ।

उद्द्योत तिसरा

ध्वन्यालोक

याप्रमाणे (दुसऱ्या उद्द्योतात) व्यंग्यार्थाच्या दृष्टीनेच ध्वनीचे स्वरूप त्याच्या प्रकारांसह स्पष्ट केल्यावर आता व्यंजकांच्या दृष्टीने ते स्वरूप व त्याचे प्रकार यानंतर आणखी एकदा दाखवले जात आहेत—

'अविवक्षितवाच्य' आणि त्याहून दुसरा, अनुरणनरूप व्यंग्यार्थ असलेला (म्हणजे रसादिव्यतिरिक्त विवक्षितान्यपरवाच्य) ध्वनि हा पदाच्या तसेच वाक्याच्याहि द्वारे प्रकाशित होऊ शकतो'. ॥ १ ॥

अविवक्षितवाच्याचा 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' हा प्रकार पदातून प्रकाशित होतो, याचे उदाहरण महर्षि व्यासांचे 'या सात लक्ष्मीच्या समिधा[१] होत' हे होय, किंवा कालिदासाचे 'तू चिलखत चढवलेला असताना[२] विरहाने व्याकुळ झालेल्या आपल्या पत्नीची उपेक्षा कोण करील?,' किंवा 'गोड[३] आकृतींना कोणते बरे भूषण खुलवीत नाही?' या उदाहरणांत अनुक्रमे 'समिधा', 'चिलखत चढवलेला' आणि 'गोड' ही पदे काही विशेष सुचवण्याच्या उद्देशानेच वापरली आहेत.

लोचनम्

स्मरामि स्मरसंहारलीलापाटवशालिनः ।
प्रसह्य शम्भोर्देहार्धं हरन्तीं परमेश्वरीम् ॥

उद्द्योतान्तरसङ्गतिं कर्तुमाह वृत्तिकार :—एवमित्यादि । तत्र वाच्यमुखेन तावदविवक्षितवाच्यादयो भेदाः । वाच्यश्च यद्यपि व्यञ्जक एव, यथोक्तम्— 'यत्रार्थः शब्दो वा' इति, ततश्च व्यञ्जकमुखेनापि भेद उक्तः, तथापि स वाच्योऽर्थो व्यङ्ग्यमुखेनैव भिद्यते । तथा ह्यविवक्षितो वाच्यो व्यङ्ग्येन न्यग्भावितः, विवक्षितान्यपरो वाच्य इति व्यङ्ग्यार्थप्रवण एवोच्यते, इत्येवं मूलभेदयोरेव

यथास्वमवान्तरभेदसहितयोर्व्यञ्जकरूपो योऽर्थः स व्यङ्ग्यमुखप्रेक्षिताशरणतयैव भेदमासादयति । अत एवाह—व्यङ्ग्यमुखेनेति । किं च यद्यप्यर्थो व्यञ्जकस्तथापि व्यङ्ग्यतायोग्योऽप्यसौ भवतीति, शब्दस्तु न कदाचिद्व्यङ्ग्यः अपि तु व्यञ्जक एवेति । तदाह व्यञ्जकमुखेनेति । न च वाच्यस्याविवक्षितादिरूपेण यो भेदस्तत्र सर्वथैव व्यञ्जकत्वं नास्तीति पुनःशब्देनाह । व्यञ्जकमुखेनापि भेदः सर्वथैव न न प्रकाशितः किन्तु प्रकाशितोऽप्यधुना पुनः शुद्धव्यञ्जकमुखेन । तथाहि व्यङ्ग्यमुखप्रेक्षितया विना पदं वाक्यं वर्णाः पदभागः सङ्घटना महावाक्यमिति स्वरूपत एव व्यञ्जकानां भेदः, न चैषामर्थवत्कदाचिदपि व्यङ्ग्यता सम्भवतीति व्यञ्जकैकनियतं स्वरूपं यत्तन्मुखेन भेदः प्रकाश्यत इति तात्पर्यम् ।

यस्तु व्याचष्टे— 'व्यङ्ग्यानां वस्त्वलङ्काररसानां मुखेन 'इति, स एवं प्रष्टव्यः—एतत्तावत्त्रिभेदत्वं न कारिकाकारेण कृतम् । वृत्तिकारेण तु दर्शितम् । न चेदानीं वृत्तिकारो भेदप्रकटनं करोति । ततश्चेदं कृतमिदं क्रियत इति कर्तृभेदे का सङ्गतिः? न चैतावता सकलप्राक्तनग्रन्थसङ्गतिः कृता भवति, अविवक्षितवाच्यादीनामपि प्रकाराणां दर्शितत्वादित्यलं निजपूज्यजनसगोत्रैः साकं विवादेन । चकारः कारिकायां यथासङ्ख्यनिवृत्त्यर्थः । तेनाविवक्षितवाच्यो द्विप्रभेदोऽपि प्रत्येकं पदवाक्य प्रकाश इति द्विधा । तदन्यस्य विवक्षिताभिधेयस्य सम्बन्धी यो भेदः क्रमद्योत्यो नाम स्वभेदसहितः सोऽपि प्रत्येकं द्विधैव । अनुरणनेन रूपं रूपणसादृश्यं यस्य तादृग्व्यङ्ग्यं यत्र तस्येत्यर्थः । महर्षेरित्यनेन तदनुसन्धत्ते यत्प्रागुक्तम्, अथ च रामायणमहाभारतप्रभृतिनि लक्ष्ये दृश्यते इति ।

धृतिः क्षमा दया शौचं कारुण्यं वागनिष्ठुरा ।
मित्राणां चानभिद्रोहः सप्तैताः समिधः श्रियः ॥

समिच्छब्दार्थस्यात्र सर्वथा तिरस्कारः, असम्भवात् । समिच्छब्देन च व्यङ्ग्योऽर्थोऽनन्यापेक्षलक्ष्म्युद्दीपनक्षमत्वं सप्तानां वक्त्रभिप्रेतं ध्वनितम् । यद्यपि— 'निःश्वासान्ध इवादर्शः' इत्याद्युहरणादप्ययमर्थो लभ्यते, तथापि प्रसङ्गाद्बहुलक्ष्यव्यापित्वं दर्शयितुमुदाहरणान्तराण्युक्तानि । अत्र च वाच्यस्यात्यन्ततिरस्कारः पूर्वोक्तमनुसृत्य योजनीयः, किं पुनरुक्तेन । सन्नद्धपदेन चात्रासम्भवत्स्वार्थेनोद्यतत्वं लक्षयता वक्त्रभिप्रेता निष्करुणकत्वाप्रतिकार्यत्वाप्रेक्षापूर्वकारित्वादयो ध्वन्यन्ते । तथैव मधुरशब्देन सर्वविषयरञ्जकत्वतर्पकत्वादिकं लक्षयता सातिशयाभिलाषविषयत्वं नात्राश्चर्यमिति वक्त्रभिप्रेतं ध्वन्यते ।

लोचन

मदनाचा नाश सहज लीलेने करण्यातील (आपल्या) नैपुण्याने शोभणाऱ्या शंकराचे अर्धे शरीर बळेच बळकावणाऱ्या[४] पार्वतीचे मी स्मरण करितो.

मागच्या उद्द्योताशी या (तिसऱ्या) उद्द्योताचा तर्कदृष्ट्या संबंध दाखविण्यासाठी वृत्तिकार 'याप्रमाणे इ.' असे म्हणतात. दुसऱ्या उद्द्योतामध्ये आधी[५] त्या ध्वनीचे वाच्यार्थाच्या दृष्टीने 'अविवक्षितवाच्य' इ. प्रकार होतात असे सांगितले. (पहिल्या उद्द्योताच्या तेराव्या कारिकेत) 'ज्या ठिकाणी वाच्य अर्थ स्वतःकडे व वाचकशब्द' इ. शब्दांनी सांगितल्याप्रमाणे वाच्य अर्थ हा जरी व्यंजकच असला आणि त्यामुळे व्यंजकाच्या दृष्टीने सुद्धा व्यंग्य अर्थाचे होणारे प्रकार जरी सांगून झाले असले तरी त्या व्यञ्जक वाच्यार्थाचे जे प्रकार होतात ते (मुख्यतः) व्यंग्य अर्थाचे द्वारेच होतात. [६] कारण विवक्षित नसलेला वाच्यार्थ व्यंग्य अर्थामुळे

खाली दाबला जातो (म्हणजे व्यंग्य अर्थामुळे वाच्य अर्थाचे महत्त्व कमी केले जाते, तर विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीमध्ये) वाच्यार्थ विवक्षित असला तरी तो 'अन्यपर' असतो, म्हणजे व्यंग्यार्थ प्रकट करण्यासाठीच असतो, असे म्हटले आहे. अशा रीतीने ध्वनीचे मूळ दोन प्रकार व त्यांचे आपापले अवान्तर प्रकार यांमध्ये व्यंजक असलेल्या वाच्य अर्थाचे जे भेद होतात, ते तो व्यंजक अर्थ ज्याला प्रकट करण्यासाठी असतो, त्या व्यंग्य अर्थाच्या दृष्टीनेच होतात. म्हणूनच वृत्तीत 'व्यंग्यार्थाच्या दृष्टीनेच' असे म्हटले. आणखी असे की, अर्थ हा जरी व्यंजक असला तरी तो (काही वेळा कवीच्या इच्छेनुसार) व्यंग्य स्वरूपही धारण करू शकतो, पण 'शब्द' मात्र केव्हाही व्यंग्य असू शकत नाही, तर तो नेहमी व्यंजकच असू शकतो. म्हणून वृत्तीत 'व्यंजकांच्या दृष्टीने' असे म्हटले आहे. आणि वाच्यार्थ विवक्षित नसणे वगैरेमुळे ध्वनीचे जे प्रकार होतात, त्यात (शब्दांचे व अर्थाचे) व्यञ्जकत्व मुळीच नसते असे नाही, हे वृत्तीतील 'आणखी एकदा' या शब्दांनी सांगितले जात आहे. आणि व्यंजकांच्या दृष्टीने होणारे प्रकारही पूर्वी मुळीच सांगितले गेले नाहीत असे नाही. तर पूर्वी (अप्रत्यक्षपणे) सांगितले गेले असले[७] तरी आता (तिसऱ्या उद्द्योतात) पुन्हा 'केवळ' व्यंजकांच्या दृष्टीनेच (सांगितले जाणार आहेत) कारण, व्यंग्य अर्थ विचारात न घेताच (शब्दरूपी) व्यंजकाचे स्वतःच्याच दृष्टीने पद, वाक्य, वर्ण, पदाचा (प्रकृति किंवा प्रत्यय या स्वरूपाचा) अंश, संघटना व महावाक्य (म्हणजे प्रबंध) हे प्रकार होतात. आता हे प्रकार केव्हाही अर्थाप्रमाणे 'व्यंग्य' होऊ शकत नाहीत, (तर सदैव 'व्यंजक'च असतात), म्हणून व्यंजकाचे 'केवळ व्यंजक' हे जे स्वरूप असू शकते, त्याच्या दृष्टीने आता (या उद्द्योतात) व्यंजकांचे प्रकार दर्शविले जाणार आहेत हे (वृत्तिकारांच्या म्हणण्याचे) तात्पर्य आहे.

पण ज्या एका टीकाकाराने (वृत्तीतील 'व्यंग्यार्थाच्या दृष्टीने' याचे) 'व्यंग्य अर्थांच्या म्हणजे वस्तु, अलंकार व रस यांच्या दृष्टीने' असे व्याख्यान केले, त्याला असे विचारले पाहिजे :— पहिली गोष्ट म्हणजे व्यंग्यार्थाचे वस्तु, अलंकार व रसादि हे तीन प्रकार कारिकाकारांनी सांगितलेले नाहीत. पण वृत्तिकारांनी मात्र (हे तीन प्रकार दर्शविले) आहेत.[८] आणि आता ३ ऱ्या उद्द्योतात ध्वनीचे व्यंजकांच्या दृष्टीने जे भेद सांगितले जात आहेत, ते (वृत्तिकारांकडून सांगितले जात नसून) कारिकाकारांकडून (कारिका १, २ व १६ मध्ये) सांगितले जात आहेत. त्यामुळे 'हे केले, हे केले जात आहे,' या दोहोंचो कारिका व वृत्ति यांचे कर्ते वेगळे असताना संगति कशी लावावयाची?[९] आणि एवढे केले[१०] तरीही पूर्वीच्या सर्व ग्रंथांची (म्हणजे पहिल्या दोन्ही उद्द्योतांची) आता सांगितल्या जाणार असलेल्या विषयाशी संगति लावली असे होत नाही, कारण यापूर्वी म्हणजे दुसऱ्या उद्द्योतात व्यंग्यार्थाचे 'अविवक्षितवाच्य' वगैरे प्रकारही दाखविण्यात आले आहेत.[११] म्हणून आम्हाला आदरणीय असलेल्या व्यक्तींच्या वंशातील लोकांशी[१२] अधिक वादविवाद करणे पुरे झाले. (पहिल्या) कारिकेतला 'आणि' हा शब्द कारिकेत सांगितले जाणारे (पदातून प्रकाशित होणारा व वाक्यातून प्रकाशित होणारा हे) पोटभेद (अविवक्षितवाच्य व अनुरणनरूपव्यंग्य या प्रकारांच्या बाबतीत) अनुक्रमे घ्यावयाचे अशी समजूत दूर करण्यासाठी वापरला आहे. त्यामुळे अविवक्षितवाच्याचे (अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य हे) दोन्ही प्रकारही प्रत्येकी पदाच्या द्वारे प्रकाशित होणारा व वाक्याच्या द्वारे प्रकाशित होणारा असे दोन प्रकारचे आहेत. 'त्याहून दुसरा' म्हणजे विवक्षितवाच्य', त्याचाही ज्याच्या बाबतीत क्रम लक्षात येतो असा जो दुसरा प्रकार तो व त्याचे उपप्रकार[१३] यांचेही प्रत्येकी पदाच्या द्वारे प्रकाशित होणारा व वाक्यातून प्रकाशित होणारा असे दोन दोन पोटभेद होतात. अनुरणनाशी त्यांचे 'रूप' म्हणजे स्वरूपसादृश्य आहे असा व्यंग्यार्थ ज्या प्रकारात आहे त्या (अनुरणनरूपव्यंग्या) चे,[१४] असा आशय. 'महर्षि' या विशेषणाचा रोख मागे (प्रथमखंड, उद्द्योत पहिला पाहा वर) 'आणि रामायण, महाभारत इ. काव्यग्रंथांमध्ये तर त्याचा वापर स्पष्टपणे दिसून येतो' असे जे म्हटले होते, त्याकडे आहे.

'संतुष्टता, सहनशीलता, सहानुभूति, शुचित्व, भूतदया, मृदु भाषण आणि मित्रांचा विश्वासघात न करणे या सात लक्ष्मीच्या समिधा होत.

'समिधा' या शब्दाचा वाच्यार्थ येथे संपूर्णतया टाकून द्यावा लागतो, कारण तो (संतुष्टता इ. गुणांच्या बाबतीत) असंभवनीय आहे. आणि 'समिधा' शब्द वापरण्यामध्ये वक्त्याला अभिप्रेत असलेला जो व्यंग्यार्थ प्रामुख्याने सूचित होत आहे तो हा की, या सात गुणांचे ठिकाणी इतर साधनांची मदत न घेता स्वतंत्रपणे लक्ष्मीचे वर्धन करण्याचे सामर्थ्य आहे.[१५] जरी 'निःश्वासांनी आंधळ्या झालेल्या आरशाप्रमाणे'[१६] वगैरे उदाहरणांनी देखील हा कार्यभाग[१७] होतो, तरी आता अविवक्षितवाच्य ध्वनीच्या 'पदप्रकाश' या प्रकाराचे विवेचन करणे हा विषय प्रस्तुत असल्यामुळे आणि ध्वनीचा हा प्रकार पुष्कळ काव्यांतून आढळतो हे दाखविण्यासाठी येथे आणखीही (तीन) उदाहरणे दिली आहेत. 'समिधा' या उदाहरणामध्ये वाच्यार्थाचा संपूर्णपणे त्याग कसा केला जातो हे आम्ही पूर्वी केलेल्या ('निःश्वासांनी आंधळ्या' इ. उदाहरणाच्या) विवरणाला अनुसरूनच समजून घ्यावे. तेच येथे पुन्हा सांगण्याची काय गरज आहे? 'चिलखत चढवलेला' याचा वाच्यार्थही येथे (मेघाच्या बाबतीत) संभवनीय नाही. ते विशेषण '(आपले कार्य करावयास) तयार झालेला' हा लक्ष्यार्थ दाखविते व त्या लक्षणेमागील प्रयोजन वक्त्याला इष्ट असलेले निर्दयपणा, त्याचा प्रतिकार करिता न येणे, अविचारीपणा इ. धर्म सुचविणे हे आहे. त्याचप्रमाणे 'गोड' शब्दाचा लक्ष्यार्थ '(पाहणाऱ्या) सर्व व्यक्तींना रंजविण्याचे व तृप्त करण्याचे सामर्थ्य असणे इ. धर्म' हा आहे व त्या लक्षणेमागील प्रयोजन वक्त्याला अभिप्रेत असलेला 'त्या आकृति अतिशय हव्याशा वाटणाऱ्या आहेत यात काही आश्चर्य नाही' हा अर्थ सुचविणे हे आहे.

टीपा

१) पाहा, महाभारत, ५—३८—३८.

२) पाहा, **मेघदूतम्** ८.

३) पाहा, **अभिज्ञानशाकुन्तलम्** १—१५.

४) तुलना—**कुमारसंभवम्**, १—५० मधील प्रेम्णा शरीरार्धहरां हरस्य हा चरण.

५) आधी म्हणज उद्द्योत २ मधील कारिका १ ते ४ मध्ये व त्यांवरील वृत्तीमध्ये, तसेच प्रथम खंड, उद्द्योत -१ "ध्वनिकाव्य व काव्यातील 'ध्वनि'"पाहा.

६) पाहा, उद्द्योत २, कारिका १ नंतरच्या वृत्तीतील 'अशा दोन प्रकारच्या वाच्यार्थामुळे व्यंग्यार्थाचेच —' इ. हे (प्रथम खंड, उद्द्योत — २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार—वरील) वाक्य.

७) जेथे जेथे व्यंग्यार्थ असतो, तेथे तेथे त्याला प्रकट करणारे व्यंजक शब्द व अर्थही असणारच. पण पूर्वी म्हणजे दुसऱ्या उद्द्योतात व्यंजक अर्थामुळे होणारे व्यंग्य अर्थाचे भेद सांगितले, तर आता तिसऱ्या उद्द्योतात कोणत्या प्रकारच्या व्यंजक शब्दांमुळे व्यंग्यार्थाचे वेगवेगळे प्रकार होतात हे सांगितले जाणार आहे.

८) तिसऱ्या उद्‌द्योतातील कारिकांमध्ये जे सांगितले आहे, त्याची संगति पहिल्या दोन उद्‌द्योतांतील 'कारिकांत' जे सांगितले गेले त्याच्याशीच (वृत्तिकारांनी) लावणे उचित होय हे अभिनवगुप्तांचे म्हणणे ठीक आहे. पण कारिकाकारांनी वस्तु, अलंकार व रसादि हे व्यंग्यार्थाचे तीन प्रकार यापूर्वी सांगितलेच नाहीत हे अभिनवगुप्तांचे विधान बरोबर वाटत नाही. या तीन प्रकारांचा उल्लेख प्रथम वृत्तीमध्ये प्रथम खंड, उद्‌द्योत – १ "प्रतीयमानाचा 'वस्तु' हा प्रकार वाच्य अर्थाहून वेगळा, कारण (१) स्वरूपभेद" वर आला हे खरे, पण २ ऱ्या उद्‌द्योतात कारिका ३ मध्ये रसादिध्वनि, कारिका २२ व २४ मध्ये वस्तुध्वनि व कारिका २१ व २५ मध्ये अलंकारध्वनि यांचा स्पष्ट निर्देश केलेला आहे. त्या दृष्टीने अभिनवगुप्तांनी 'वृत्तिकारांनी केलेले आहेत, कारिकाकाराने केलेले नाहीत' असे का म्हणावे कळत नाही. या परिस्थितीत प्राचीन टीकाकाराचे व अभिनवगुप्तांचे 'व्यङ्‌ग्यमुखेन' याचे विवरण ही दोन्ही समर्थनीय वाटतात.

९) 'हे केले' व 'हे केले जात आहे' या दोन क्रियांची संगति दोन्ही क्रियांचा कर्ता एकच असेल तरच दाखविण्याचा प्रश्न येतो. त्या दोन क्रियांचे कर्ते वेगळे असल्यास त्यांची संगति लावण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

येथे **कर्तृभेदे का सङ्गतिः**? असे जे अभिनवगुप्तांनी म्हटले आहे, त्यावरून कारिकाकार व वृत्तिकार या दोन भिन्न व्यक्ति होत्या असे त्यांचे मत असावे असे मानण्यास बळकटी येत आहे. परंतु पुढे काशी आवृत्ति पृ. ३०२ वर कारिका २ चे व्याख्यान करिताना अभिनवगुप्तांनी केलेल्या शब्दयोजनेवरून मात्र कारिकाकर व वृत्तिकार एकच होते अशी अभिनवगुप्तांची समजूत असल्यासारखे वाटते. याचे अधिक विवरण लोचनातील काशी आवृत्ति पृ. ३०२ च्या भाषांतराचे वेळी केले जाईल ते पाहावे.

१०) म्हणजे त्या प्राचीन टीकाकाराच्या मताप्रमाणेच **व्यङ्‌ग्यमुखेन** याचा अर्थ केला तरीही.

११) म्हणजे केवळ वस्तु, अलंकार व रसादि हे तीनच प्रकार पूर्वी सांगितले गेले असे नाही, तर अविवक्षितवाच्य वगैरे आणखीही प्रकार २ ऱ्या उद्‌द्योतात सांगितले गेले आहेत. त्यांच्याशी प्रस्तुत उद्‌द्योतातील प्रकारांची संगति लावली असे होत नाही.

१२) पुढे लोचनात (काशी आवृत्ति पृ. ३८६, ४१० व ४८५ वर) 'चंद्रिका' या टीकेच्या कर्त्याला 'पूर्ववंश्य' असे म्हटले आहे, त्यावरून येथेही काशी आवृत्ति पृ. ३८६ वर व ४८५ वर उल्लेखिलेला प्राचीन टीकाकार हा चंद्रिकाकारच असावा असे वाटते.

१३) त्याचे उपप्रकार म्हणजे शब्दशक्त्युद्‌भव, अर्थशक्त्युद्‌भव, शब्दार्थशक्त्युद्‌भव आणि त्यांचे पोटप्रकार.

१४) म्हणजे 'अनुरणनरूपव्यंग्य' हा 'बहुव्रीहिगर्भ बहुव्रीहि' समास समजावयाचा. पहिल्या बहुव्रीहि समासाचा विग्रह **अनुरणनेन रूपं** (**रूपसादृश्यं**) **यस्य तद् अनुरणनरूपम्** असा व दुसऱ्या बहुव्रीहि समासाचा विग्रह **अनुरणनरूपं व्यङ्‌ग्यं यस्मिन् सः अनुरणनरूपव्यङ्‌ग्यः** असा करावयाचा.

१५) अभिनवगुप्तांनी 'समिधा' या शब्दाचा लक्ष्यार्थ सांगितला नाही, तर केवळ 'या सात गुणांचे ठिकाणी स्वतंत्रपणे लक्ष्मीचे वर्धन करण्याचे सामर्थ्य आहे' हा व्यंग्यार्थ सांगितला आहे. परंतु क. ल. वि. पृ. १५९

येथे वरील अर्थ ही समिधा या शब्दाचा लक्ष्यार्थ म्हणून सांगितला असून 'लक्ष्मी या तीन लोकांना सहजलभ्य असते' हा व्यंग्यार्थ म्हणून सांगितला आहे.

१६) पाहा, प्रथम खंड, उद्द्योत – २ " 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार (२) 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' प्रकार".

१७) हा कार्यभाग म्हणजे पदाच्या द्वारे अविवक्षितवाच्य ध्वनि प्रकट होणे. कारण 'आंधळ्या' या पदाच्या द्वारे तेथे अविवक्षितवाच्य या स्वरूपाचा व्यंग्यार्थ प्रकट होत आहे.

ध्वन्यालोकः

तस्यैवार्थान्तरसङ्क्रमितवाच्ये यथा 'रामेण प्रियजीवितेन तु कृतं प्रेम्णः प्रिये नोचितम्' । अत्र रामेणेत्येतत्पदं साहसैकरसत्वादिव्यङ्ग्याभिसङ्क्रमितवाच्यं व्यञ्जकम् ।

यथा वा–

एमेअ जणो तिस्सा देइ कवोलोवमाअँ ससिबिंबं ।
परमत्थविआरे उण चंदो चंदो च्चिअ वराओ ॥

अत्र द्वितीयश्चन्दशब्दोऽर्थान्तरसङ्क्रमितवाच्यः ।

ध्वन्यालोक

त्या अविवक्षितवाच्य ध्वनीचाच जो दुसरा म्हणजे 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य[१]' हा प्रकार, तो पदाने प्रकाशित होऊ शकतो याचे उदाहरण– 'हे प्रिये, स्वतःचे जीवितच प्रिय मानणाऱ्या रामाने मात्र आपल्या प्रेमाला साजेसे काही केले नाही.[२]'

या उदाहरणात 'रामाने' या पदाचा वाच्यार्थ 'पराक्रम करण्यातच रस घेणाऱ्या रामाने' या (व्यंग्य) अर्थात संक्रमित होऊन व्यंजक झाला आहे.

किंवा–

'लोक अशाच प्रकारे (म्हणजे आंधळेपणाने) तिच्या गालांना चन्द्रबिम्बाची उपमा देत असतात. पण खरोखर विचार केल्यास मात्र तो चन्द्र बिचारा (अगदी) चन्द्रच होय.

या उदाहरणातला दुसरा 'चन्द्र' हा शब्द 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' आहे.

लोचनम्

तस्यैवेति । अविवक्षितवाच्यस्य यो द्वितीयो भेदस्तस्येत्यर्थः ।
'प्रत्याख्यानरुषः कृतं समुचितं क्रूरेण ते रक्षसा
सोढं तच्च तथा त्वया कुलजनो धत्ते यथोच्चैः शिरः ।
व्यर्थं सम्प्रति बिभ्रता धनुरिदं त्वद्व्यापदः साक्षिणा' इति ।

रक्षःस्वभावादेव यः क्रूरोऽनतिलङ्घ्य [क. ल. वि. **अनभिलङ्घ्य**] शासनत्वदुर्मदतया च प्रसह्य निराक्रियमाणः क्रोधान्धः तस्यैतत्तावत्स्वचित्तवृत्तिसमुचितमनुष्ठानं यन्मूर्धकर्तनं नाम, माऽन्योऽपि कश्चिन्ममाज्ञां लङ्घयिष्यतीति । त इति यथा [काशी आवृत्तीत यथा...तया असा व क. ल. वि. मध्ये यया...तथा असा पाठ आहे. त्यापैकी तस्यास्तव याच्याशी जुळण्यासाठी आम्ही क. ल. वि. मधील यया हा पाठ स्वीकारला व तया आणि तथा हे दोन्ही पाठ वाक्यार्थाला उपकारक नसल्यामुळे उपेक्षिले आहेत. (क. ल. वि. = कल्पलताविवेकनामक टीकाग्रंथ)] तादृगपि यया न गणितस्तस्यास्तवेत्यर्थः । तदपि तथा अविकारेणोत्सवापत्तिबुद्ध्यां नेत्रविस्फारतामुखप्रसादादिलक्ष्यमाणया सोढम्, यथा येन प्रकारेण कुलजन इति यः कश्चित्पामरप्रायोऽपि कुलवधूशब्दवाच्यः, उच्चैः शिरो धत्ते, एवंविधाः किल वयं कुलवध्वो भवाम इति । अथ च शिरःकर्तनावसरे त्वया शीघ्रं कृत्यतामिति तथा सोढं तथोच्चैः शिरो धृतं यथान्योऽपि कुलस्त्रीजन उच्चैः शिरो धत्ते नित्यप्रवृत्ततया । एवं रावणस्य तव च समुचितकारित्वं निर्व्यूढम् । मम पुनः सर्वमेवानुचितं पर्यवसितम् । तथाहि राज्यनिर्वासनादिनिरवकाशीकृतधनुर्व्यापारस्यापि कलत्रमात्ररक्षणप्रयोजनमपि यद्यापमभूत्तत्संप्रति त्वय्यरक्षितव्यापत्रायामेव निष्प्रयोजनम्, तथापि च तद्धारयामि । तन्नूनं निजजीवितरक्षैवास्य प्रयोजनत्वेन संभाव्यते । न चैतद्युक्तम् । रामेणेति । असम [काशी आवृत्तीतील सम या पाठापेक्षा क. ल. वि. मधील असम हा पाठ अधिक चांगला आहे व म्हणून आम्ही तो स्वीकारला.] साहसरसत्वसत्यसंधत्वोचितकारित्वादिव्यङ्ग्यधर्मान्तरपरिणतेनेत्यर्थः । 'कापुरुषादिधर्मपरिग्रहस्त्वादिशब्दात्' इति यद्व्याख्यातम्, तदसत्; कापुरुषस्य ह्येतदेव प्रत्युतोचितं स्यात् । प्रिय इति शब्दमात्रमेवैतदिदानीं संवृत्तम् । प्रियशब्दस्य प्रवृत्तिनिमित्तं यत्प्रेम नाम तदप्यनौचित्यकलङ्कितमिति शोकालम्बनोद्दीपनविभावयोगात्करुणरसो रामस्य स्फुटीकृत इति । एमेअ इति ।

एवमेव जनस्तस्या ददाति कपोलोपमायां शशिबिम्बम् ।
परमार्थविचारे पुनश्चन्द्रश्चन्द एव वराकः ॥ (इति छाया)
एवमेवेति स्वयमविवेकान्धतया । जन इति लोकप्रसिद्धगतानुगति-

कतामात्रशरणः । तस्या इत्यसाधारणगुणगणमहार्धवपुषः । कपोलोपमायामिति निर्व्याजलावण्यसर्वस्वभूतमुखमध्यवर्तिप्रधानभूतकपोलतलस्योपमायां प्रत्युत तदधिकगुणं [काशी आवृत्तीत **तदधिकवस्तु** असा पाठ आहे, पण क. ल. वि. मधील (पृ. १५७) **तदधिकगुणं वस्तु** हा अधिक चांगला म्हणून आम्ही स्वीकारला आहे.] वस्तु कर्तव्यं ततो दूरनिकृष्टं शशिबिम्बं कलङ्कव्याजजिह्मीकृतम् । एवं यद्यपि गड्डरिकाप्रवाहपतितो लोकः, तथापि यदि परीक्षकाः परीक्षन्ते तद्वराकः कृपैकभाजनं यश्चन्द्र इति प्रसिद्धः स चन्द्र एव । क्षयित्वविलासशून्यत्वमलिनत्वधर्मान्तरसंक्रान्तोऽ स्या[काशी आवृत्तीमधील पाठ स **चन्द्र एव... योऽर्थः** । असा आहे. त्याऐवजी क. ल. वि. (पृष्ठ १५७) मधील पाठ आम्ही घेतला आहे.]र्थः । अत्र च यथा व्यङ्ग्यधर्मान्तरसङ्क्रान्तिस्तथा पूर्वोक्तमनुसन्धेयम् । एवमुत्तरत्रापि ।

लोचन

'त्याचाच' म्हणजे अविक्षितवाच्याचा दुसरा जो अर्थान्तरसंक्रमितवाच्य हा प्रकार, त्याचे उदाहरण, हा अर्थ.

'तू रावणाची विनंती झिडकारल्यामुळे त्या निर्दय राक्षसाने आपल्या क्रोधाला साजेसे वर्तन तुझ्या बाबतीत केले.[३] आणि तूही अशा तऱ्हेने ते सहन केलेस की ज्यामुळे कुलीन स्त्रिया आपली मान अभिमानाने उंच ठेवू शकतात. आता तुझा मृत्यु होऊन गेला हे प्रत्यक्ष पाहून सुद्धा हे धनुष्य व्यर्थ धारण करणाऱ्या (रामाने मात्र– इ.)

तो रावण स्वतः राक्षस असल्यामुळेच निर्दय होता, आणि स्वतःची आज्ञा कोणीही मोडणे शक्य नाही अशी खात्री असल्याने तो मदोन्मत्त झाला होता. त्याला तू जोराने विरोध केल्यामुळे तो रागाने अंध होऊन गेला. तुझा शिरश्छेद करणे हे त्याचे कृत्य त्याच्या मनोवृत्तीला साजेसेच होते. कारण तसे करण्यामागील त्याचा हेतु दुसऱ्या कोणी आपली आज्ञा मोडू नये हा होता. 'तुझ्या बाबतीत' म्हणजे तो रावण तशा प्रकारचा असूनही जिने त्याची पर्वा केली नाही अशा तुझ्या बाबतीत, असा अर्थ. (आता) तुझे डोळे पूर्ण विकसित असणे, मुख प्रसन्न असणे इ. लक्षणांवरून मला असेच वाटते की, ते (म्हणजे त्याने तुझ्यावर केलेला हल्ला) तू त्या प्रकारे म्हणजे अविचलपणे जणू काय एखादा आनंदाचाच प्रसंग येत आहे अशा वृत्तीने सहन केलेस. आणि त्यामुळे ज्या कोणी स्त्रिया 'कुलजन' म्हणजे सामान्य असूनही 'कुलवधू' म्हणवून घेण्यास पात्र असतील, त्याही 'आम्ही कुलवधू अशा प्रकारच्या असतो' या अभिप्रायाने आपली मान (चालू काळातही) ताठ ठेवतात. आणखी असे की, रावण तुझे मस्तक तोडावयास प्रवृत्त झाला असताना 'ताबडतोब तोडून टाक' असे म्हणून तू ती आपत्ती इतक्या धैर्याने सहन केलीस म्हणजे आपली मान त्याच्यासमोर इतकी उंच केलीस की ज्यामुळे इतर सर्व कुलस्त्रियाही नेहमीच[४] मान उंच ठेवून वावरतात. याप्रमाणे रावणाने आणि तूही आपापल्या स्वभावाला साजेल असेच वर्तन केले. माझ्या हातून मात्र सगळ्या गोष्टी अनुचित अशाच घडल्या. म्हणजे असे की, राज्यातून मला हद्दपार केल्यामुळे, मी धनुष्याचा उपयोग करावयाचा प्रसंगच उरला नव्हता.[५] तरीही ते धनुष्य पत्नीच्या रक्षणासाठी तरी उपयोगी पडत होते. पण आता असहाय अवस्थेतच तू मरण पावल्यामुळे ते धनुष्य सर्वस्वी निरुपयोगी झाले. तरीदेखील मी ते धारण करितोच आहे! तेव्हा त्याचा उपयोग आता फक्त माझे स्वतः चे रक्षण करणे इतकाच आहे असे मला वाटते. आणि हे तर मुळीच योग्य नाही! 'रामाने' – लोकोत्तर पराक्रम करण्याची हौस असणे, आपली प्रतिज्ञा खरी करणे, योग्य वेळी योग्य तेच करण्याचा बाणा इ (वाच्य नव्हे, तर) व्यङ्ग्य धर्मांनी विशिष्ट अशा रामाने (असा अर्थ).[६] वृत्तीतील 'वगैरेंनी' यातील 'वगैरे' शब्दाने भेकड माणूस इत्यादींच्या गुणधर्माचा बोध होतो, असे जे कोणीतरी विवरण केले आहे ते चुकीचे आहे, कारण उलट हेच वागणे भेकड माणसाला शोभणारे झाले असते.[७] 'प्रिये' हे तुला उद्देशून मी वापरलेले संबोधन आता केवळ पोकळ, नाममात्रच होऊन राहिल आहे. ('प्रिये' यातील) 'प्रिय हा शब्द प्रेम (प्रेमाचा विषय) या अर्थाने वापरला जातो, पण तो अर्थही येथे अनौचित्यामुळे विशोभित दिसतो.[८] अशा रीतीने रामाचा शोक या स्थायिभावाच्या आलंबन व उद्दीपन विभावः[९] यांच्या संयोगामुळे करुणरस या उदाहरणातून प्रकट होत आहे.

'लोक अशाच प्रकारे इ.' —अशाच प्रकारे म्हणजे स्वतः अविचाराने आंधळे होऊन. 'लोक' म्हणजे जगात सुपरिचित असलेल्या केवळ गतानुगतिकपणाच्या आहारी गेलेली सर्वसामान्य जनता. 'तिच्या' म्हणजे जिचे शरीर असामान्य गुणसंपदेमुळे अनमोल (विलोभनीय) झाले आहे. अशा (तिच्या), 'गालाच्या पृष्ठभागाला उपमा देताना' – अकृत्रिम लावण्यातिशयाचे आगर असलेल्या मुखाच्या मध्यभागी प्रमुखपणे झळकणाऱ्या गालाला उपमा देताना उलट त्या मुखाहून वरचढ अशा उपमानाची निवड करावयास पाहिजे

होती, पण लोक त्या मुखाहून फारच निकृष्ट असलेले, कलंकामुळे विद्रूप झालेले (चंद्रबिंब उपमान म्हणून निवडतात[१०]!) याप्रमाणे लोक जरी गड्डरिकाप्रवाहपतित[११] असले, तरी चिकित्सकांनी जर योग्य विवेक केला, तर जो चन्द्र म्हणून जगात प्रसिद्ध आहे, तो बिचारा, कीव करण्यासारखा चंद्रच होऊन क्षय पावणे, नखरेलपणाने विरहित असणे, कलंकित असणे इ. धर्मानी युक्त असलेला एक पदार्थ बनतो. या दोन्ही[१२] उदाहरणांमध्ये वाच्यार्थ हा व्यंग्य धर्मानी युक्त अशा अर्थात कसा परिणत होतो हे समजण्यासाठी पूर्वी (प्रथम खंड उद्द्योत - २ 'अविवक्षितवाच्च' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार व (२) 'अत्यन्ततिरस्कृतवाच्च' हा प्रकार वर) केलेले विवरण पाहावे. याप्रमाणेच पुढे दिलेल्या '**विषमयितः**' इ. उदाहरणाच्या बाबतीतही समजून घ्यावे.

टीपा

१) पाहा. प्रथम खंड, उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्च' ध्वनीचे दोन उपप्रकार वरील कारिका १ ली व उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्च' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्च' हा प्रकार वरील पहिलेच उदाहरण.

२) सीतापहरणानंतर रावणाने सीतेचे मायावी शिर निर्मून ते रामाच्या दृष्टीस पडेल असे केले. त्याबरोबर उद्विग्न होऊन राम वरीलप्रमाणे म्हणतो. प्रस्तुत श्लोक यशोवर्म्याच्या 'रामाभ्युदय' या नाटकातून घेतला आहे. (पाहा, नाट्यदर्पण, पृ. ५०). वरील ओळ ही प्रस्तुत श्लोकाची ४ थी ओळ असून पहिल्या तीन ओळी अभिनवगुप्तांनी 'लोचना'त उद्धृत केल्या आहेत.

३) म्हणजे तुझा शिरश्छेद केला.

४) लोचनातील **नित्यप्रवृत्ततया** हा शब्द वरील श्लोकाच्या दुसऱ्या ओळीतील धत्ते या वर्तमानकाळी रूपाच्या स्पष्टीकरणार्थ योजिला आहे. असेच स्पष्टीकरण प्रथम खंड उद्द्योत – १ ध्वनीला लाक्षणिक मानणारे (भक्तिवादी) वर **आहुः** या वर्तमानकाळी रूपाच्या संदर्भात केले आहे. "उद्द्योत – १ 'गुणवृत्ति' शब्दाचे अभिनवगुप्तांनी सांगितलेले चार अर्थ" वरील ३ री टीपही पाहा.

५) उदाः स्वदेशाचे परचक्रापासून संरक्षण करणे इ. कामगिरी उरली नव्हती.

६) प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्च' ध्वनीचे दोन उपप्रकार- (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्च' हा प्रकार" वरील 'मी राम सर्व सहन करू शकतो' या वरील लोचनातील विवरण व त्यावरील दुसरी टीप पाहा. तसेच पुढे ४ थ्या टीपेत (ध्वनीच्या 'अर्थान्तरसंक्रमितवाच्च' प्रकाराच्या....)'केलेले सविस्तर स्पष्टीकरणही पाहावे.

७) म्हणजे **प्रेम्णः उचितं न कृतम्** यातील स्वारस्य नष्ट झाले असते, कारण, राम हा जर भेकडच असता तर त्याने प्रेमाला उचित असे काही न करणे यात अयोग्य ते काय झाले असते? पण असामान्य पराक्रमी रामाने मात्र प्रेमाला योग्य असे वर्तन न करणे हे अनुचित आहे.

'बालप्रिया' टीकेच्या कर्त्याने या संदर्भात असे म्हटले आहे की, चक्रवर्ती, प्रदीपकार इ. काव्यप्रकाशावरील टीकाकारांनी **रामेण** या शब्दाचे कातरत्व, ढोंगी प्रेम इ. लक्ष्य अर्थ सांगितले आहेत. त्यांच्या मते याच धर्मांचा उत्कटपणा असा व्यंग्य अर्थ होईल. म्हणजे हे सर्व टीकाकार अभिनवगुप्तांनी निर्देशिलेल्या टीकाकाराच्या पंक्तीतच जाऊन बसतात. अभिनवगुप्तांनी मात्र 'राम' या शब्दाची व्यंग्यार्थ कोणता हे सांगताना कमालीचा रसिकपणा दाखविला आहे.

८) कारण रामाने तिला वाचविण्यासाठी काही एक न करिता तिला 'प्रिये' म्हणणे हे अनुचितच होय.

९) सीतेचे मरण हा रामाच्या शोकाचा आलंबनविभाव व तिने दाखविलेल्या धैर्याचे रामाने केलेले अनुमान हा उद्दीपनविभाव होय.

१०) लोचनातील वाक्य पूर्ण करण्याकरिता कंसांतील शब्द अध्याहृत घेणे आवश्यक आहे.

११) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ रसादिरूप अर्थ ज्यात प्रधान, तीच असंलक्ष्यक्रम ध्वनीची उदाहरण" वरील ५ वी टीप. येथे 'गडुरिकाप्रवाहपतित' याचा अर्थ 'अंधानुकरणाने तिच्या गालाला चंद्रबिंबाची उपमा देणारे.'

१२) दोन्ही म्हणजे रामेण व चन्द्रः हे शब्द असलेली उदाहरणे.

ध्वन्यालोकः

अविवक्षितवाच्यास्यात्यन्ततिरस्कृतवाच्ये प्रभेदे वाक्यप्रकाशता यथा–

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥

अनेन हि वाक्येन न निशार्थो न जागरणार्थः कश्चिद्विवक्षितः । किं तर्हि? तत्त्वज्ञानावहितत्वमतत्त्वपराङ्मुखत्वं च मुनेः प्रतिपाद्यते, इति तिरस्कृतवाच्यस्यास्य व्यञ्जकत्वम् ।

तस्यैवार्थान्तरसंक्रमितवाच्यस्य वाक्यप्रकाशता यथा-
विसमइओ च्चिअ काण वि काण वि वोलेइ अमिअनिम्माणो [ध्वन्यालोक, काशी आवृत्तीमध्ये **णिम्माओ** असा पाठ आहे, पण अभिनव गुप्तांनी **निम्माणो असा** पाठ स्वीकारलेला दिसतो.] ।
काण वि विसामिअमओ काण वि अविसामओं कालो ॥
(विषमयित एव केषामपि केषामपि प्रयात्यमृतनिर्माणः ।
केषामपि विषामृतमयः केषामप्यविषामृतः कालः ॥)

अत्र हि वाक्ये विषामृतशब्दाभ्यां दुःखसुखरूपसंक्रमितवाच्याभ्यां व्यवहार इत्यर्थान्तरसंक्रमितवाच्यस्यास्य [का. आ. मध्ये वाच्यस्याव्यञ्जकत्वम् असा पाठ आहे, तो आम्ही वाच्यस्यास्य व्यञ्जकत्वम् असा सुधारून घेतला आहे.] **व्यञ्जकत्वम् ।**

ध्वन्यालोक

आता 'अविवक्षितवाच्या' चा 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' प्रकार वाक्यातून प्रकाशित होत असतानाचे उदाहरण—

'सर्व प्राणिमात्रांची जी रात्र असते, तिच्या बाबतीत संयमी मुनि हा जागृत असतो. आणि प्राणिमात्र जिच्या बाबतीत जागरूक असतात, ती द्रष्टया मुनीला रात्र असते.[१]'

या वाक्याने 'रात्र' (निशा) या शब्दाचा किंवा जागरणार्थी असलेल्या शब्दांचा 'वाच्यार्थ' कवीला विवक्षित नाही. मग कवीला काय प्रतिपादन करावयाचे आहे? तर (चिरंतन) तत्त्व जाणून घेण्याच्या बाबतीत मुनि सावधान असतो व जे (चिरंतन) तत्त्व नाही त्याकडे पाठ फिरवितो (म्हणजे दुर्लक्ष करितो). हे कवीला विवक्षित आहे म्हणून हे सगळे वाक्य 'तिरस्कृतवाच्य' असून व्यंजक आहे.

त्याच म्हणजे अविवक्षितवाच्याचाच 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' प्रकार वाक्यातून प्रकाशित होतो याचे उदाहरण—

काही लोकांचा काल विषमय, काहींचा अमृतमय, काहींचा विष आणि अमृत या दोहोंनी युक्त असा, तर काहींचा विष अगर अमृत या दोहींनी विरहित असा जातो.

या वाक्यात विष व अमृत या शब्दांचा उपयोग अशा तऱ्हेने केला आहे की, त्यांचे वाच्यार्थ अनुक्रमे दुःख व सुख या अर्थांमध्ये संक्रमित झाले आहेत. म्हणून 'अर्थान्तरसंक्रमित' झालेला वाच्यार्थ येथे व्यंजक होतो.

लोचनम्

एवं प्रथमभेदस्य द्वावपि प्रकारौ पदप्रकाशत्वेनोदाहृत्य वाक्यप्रकाशत्वेनोदाहरति या निशेति । विवक्षित इति । तेन ह्युक्तेन न कश्चिदुपदेश्यं प्रत्युपदेशः सिद्ध्ययति । निशायां जागरितव्यमन्यत्र रात्रिवदासितव्यमिति किमनेनोक्तेन । तस्माद्वाधितस्वार्थमेतद्वाक्यं संयमिनो । लोकोत्तरतालक्षणेन निमित्तेन तत्त्वदृष्टाववधानं मिथ्यादृष्टौ च पराङ्मुखत्वं ध्वनति । सर्व शब्दार्थस्य चापेक्षिकतयाप्युपपद्यमानतेति न सर्वशब्दार्थान्यथानुपपत्त्यायमर्थ आक्षिप्तो मन्तव्यः । सर्वेषां ब्रह्मादिस्थावरान्तानां चतुर्दशानामपि भूतानां या निशा व्यामोहजननी तत्त्वदृष्टिस्तस्यां संयमी जागर्ति कथं प्राप्येतेति । न तु विषयवर्जनमात्रादेव संयमीति यावत् । यदि वा सर्वभूतनिशायामेव मोहिन्यां जागर्ति कथमियं हेयेति । यस्यां तु मिथ्यादृष्टौ सर्वाणि भूतानि जाग्रति अतिशयेन सुप्रबुद्धरूपाणि सा तस्य रात्रिरप्रबोधविषयः । तस्यां हि चेष्टायां नासौ प्रबुद्धः । एवमेव लोकोत्तराचारव्यवस्थितः पश्यति मन्यते च । तस्यैवान्तर्बहिष्करणवृत्तिश्चरितार्था । अन्यस्तु न पश्यति न च मन्यत इति तत्त्वदृष्टिपरेण भाव्यमिति

तात्पर्यम् । एवं च पश्यत इत्यपि मुनेरित्यपि च न स्वार्थमात्रविश्रान्तम् [काशी आवृत्तीमध्ये **विभ्रान्तम्** असा पाठ आहे, पण आम्ही क. ल. वि. मधील **विश्रान्तम्** हा पाठ स्वीकारला आहे.] । **अपि तु व्यङ्ग्य एव विश्राम्यति । यत्तच्छब्दयोश्च न स्वतन्त्रार्थतेति सर्व एवायमाख्यातसहायः पदसमूहो व्यङ्ग्यपरः । तदाहअनेन हि वाक्येनेति । प्रतिपाद्यत इति । ध्वन्यत इत्यर्थः । विषमयितः विषमयतां प्राप्तः । केषांचिद्दुष्कृतिनामतिविवेकिनां वा । केषांचित्सुकृतिनामत्यन्तविवेकिनां वातिक्रामत्यमृतमयनिर्माणः । केषांचिन्मिश्रकर्मणां विवेकाविवेकवतां वा विषामृतमयः । केषामपि मूढप्रायाणां धाराप्राप्तयोगभूमिकारूढानां वा अविषामृतमयः कालोऽतिक्रामतीति संबन्धः । विषामृतपदे च लावण्यादिशब्दवन्निरूढलक्षणारूपतया सुखःदुखसाधनयोर्वर्तेते । यथा विषं निम्बममृतं कपित्थमिति । न चात्र सुखदुःखसाधने तन्मात्रविश्रान्ते । अपि तु स्वकर्तव्यसुखदुःखपर्यवसिते । न च ते साधने सर्वथा न विवक्षिते । निःसाधनयोस्तयोरत्राभावात् । तदाह संक्रमितवाच्याभ्यामिति । केषांचिदिति चास्य विशेषे संक्रान्तिः । अतिक्रामतीत्यस्य च क्रियामात्रसंक्रान्तिः । काल इत्यस्य च सर्वव्यवहारसंक्रान्तिः । उपलक्षणार्थ तु विषामृतग्रहणमात्रसंक्रमणं वृत्तिकृता व्याख्यातम् । तदाह—वाक्य इति ।**

लोचन

याप्रमाणे (ध्वनीच्या) पहिल्या (म्हणजे अविवक्षितवाच्य या) प्रकाराचे (अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य) हे दोन्ही उपप्रकार पदातून प्रकाशित कसे होतात याची उदाहरणे दिल्यावर ते प्रकार वाक्यातून प्रकाशित कसे होतात हे दाखविण्यासाठी वृत्तिकार (प्रथम) 'सर्व प्राणिमात्रांना जी रात्र असते, इ.' उदाहरण[१] देतात.(कवीला) विवक्षित 'नाही' कारण तो (म्हणजे जागरण इ. अर्थ) वाच्य केल्याने जिला उपदेश करावयाचा त्या व्यक्तीला (म्हणजे अर्जुनाला) काहीही उपदेश केल्यासारखे होत नाही. रात्री जागावे व इतर वेळी रात्रीप्रमाणे आराम करावा असे सांगून काय फायदा आहे?[२] त्यामुळे या वाक्याच्या वाच्यार्थाचा बाध होतो व मग हे वाक्य संयमी माणसाच्या ठिकाणी असणारा लोकोत्तरपणा या कारणामुळे त्या संयमी माणसाचे लक्ष तत्त्व जाणून घेण्यावर केन्द्रित झालेले असते व मिथ्याज्ञानाकडे तो दुर्लक्ष करतो, हा अर्थ सुचविते.या श्लोकातील 'सर्व प्राणिमात्रांना' यातील 'सर्व' शब्दामध्ये संयमी माणसाचाही अन्तर्भाव होतो, म्हणून तो रात्री झोपत नाही व दिवसा झोपतो असे म्हणणे तर्कविसंगत ठरते. त्यामुळे हा संयमी माणसासंबंधीचा अर्थही 'सर्व' शब्दापासून अर्थापत्तीने ज्ञात[३] होतो (व्यंजनेने नव्हे)असे समजू नये, कारण येथे 'सर्व' शब्दाचा अर्थ 'इतर सर्व' (म्हणजे संयमी व्यक्ती सोडून इतर सर्व) असा सापेक्ष घेतल्यानेही वाक्याचा अर्थ व्यवस्थित लागतो. सर्व म्हणजे ब्रह्मदेवापासून स्थावरापर्यंतच्या चौदाही प्रकारच्या सृष्ट पदार्थांच्या[४] दृष्टीने जी रात्र म्हणजे त्यांना आपल्यापासून परावृत्त करणारी[५] तत्त्वदृष्टि, ती बाबत म्हणजे ती तत्त्वदृष्टि कशी प्राप्त करून घ्यावी याबाबत संयमी मनुष्य जागरूक असतो. म्हणजे केवळ विषयांचा त्याग करण्यामुळेच कोणीही संयमी होतो असे नाही, असे तात्पर्य. किंवा असाही अर्थ करिता येईल की सर्व भूतांना भुरळ पाडणाऱ्या मिथ्याज्ञानरूपी रात्रीबाबत ह्या रात्रीचा त्याग कसा करावा यासंबंधी संयमी मनुष्य जागृत असतो, म्हणजे विचार करीत असतो.

पण ज्या मिथ्याज्ञानाच्या बाबतीत सर्व प्राणी जागृत असतात म्हणजे अतिशय दक्ष असतात (म्हणजे ज्या मिथ्या ज्ञानामध्ये ते गुरफटून गेलेले असतात) ते मिथ्याज्ञान या मुनीची रात्र असते म्हणजे अप्रबोधाचा विषय असते, म्हणजे तो त्या मिथ्याज्ञानाकडे पाठ फिरवितो. कारण त्या मिथ्याज्ञानरूपी क्रियेच्या बाबतीत त्याला विशेष आस्था नसते. अशा रीतीने लोकोत्तर वागणूक अंगवळणी पडलेला (संयमी मनुष्यच) खरोखर 'पाहतो' व तोच खरोखर जाणतो.[६] त्याच मनुष्याच्या अंतःकरणाचे व्यापार व बाह्य इंद्रियांचे व्यापार कृतार्थ

झालेले असतात. इतर म्हणजे सर्वसामान्य माणसे तत्त्व पाहातही नाहीत व जाणीतही नाहीत. म्हणून तत्त्वदृष्टि संपादन करण्याकडेच मनुष्याने सर्व अवधान द्यावे हे वरील श्लोकाचे तात्पर्य आहे.याप्रमाणेच 'द्रष्ट्या' या पदाचे आणि 'मुनीला' याही पदाचे काम केवळ वाच्यार्थाचा बोध करून देऊनच संपत नाही, तर (वाच्यार्थांचे ज्ञान करून दिल्यानंतर आम्ही वर सांगितलेल्या) व्यंग्यार्थांचा बोध करून दिल्यावरच संपते. आणि 'जी', 'तिच्या, 'जिच्या' व 'ती' या पदांना काही स्वतंत्र अर्थ नाही (कारण ती पदे केवळ संबंधी सर्वनामेच आहेत.) म्हणून (जागृत असतो आणि जागतात या) क्रियापदांसह या सर्वच शब्दसमूहाचे कार्य शेवटी (वर दाखविलेल्या) व्यंग्यार्थाचा बोध करून देणे हेच आहे. म्हणून वृत्तिकार 'या वाक्याने निशा' इ. म्हणतात. 'प्रतिपादिले जात आहे' याचा 'सुचविले जात आहे' हा अर्थ आहे.

विषमयित : म्हणजे विषमय झालेला. काही लोकांचा म्हणजे दुष्कृत्ये करणाऱ्यांचा किंवा विशेष ज्ञानी लोकांचा[७] तर काहींचा म्हणजे सत्कृत्ये करणाऱ्यांचा किंवा सर्वस्वी अविचारी लोकांचा.[८] अमृताचा बनल्याप्रमाणे निघून जातो (म्हणजे त्यांना तो तसा वाटतो). इतर काहींचा म्हणजे काही चांगली व काही वाईट दोन्ही प्रकारची कृत्ये करणाऱ्यांचा किंवा काही बाबतीत विवेकाने आणि काही बाबतीत अविवेकाने वागणाऱ्यांचा (काळ) विष व अमृत या दोहोंनी भरलेला असा जातो. आणि 'व काहींचा' म्हणजे मोहाने ग्रासलेल्यांचा किंवा क्रमाक्रमाने उच्चतम आध्यात्मिक पातळीवर जाऊन पोहोचलेल्यांचा[९] विष व अमृत या दोहोंनी विरहित असा काळ जातो, असा अन्वय व अर्थ लावावा. विष व अमृत हे शब्द 'लावण्य' वगैरे शब्दांप्रमाणेच रूढिमूल लक्षणेने युक्त असल्याने[१०] दुःखाचे साधन व सुखाचे साधन या अर्थांनीच वापरलेले आहेत. उदा. 'कडुलिंबाचे फळ हे विष आहे व कवठ हे अमृत आहे' हे वाक्य. आणि प्रस्तुत उदाहरणामध्ये दुःखाचे साधन व सुखाचे साधन हे विष व अमृत यांचे अर्थ स्वतःचा बोध झाल्यानंतर तेथेच विश्रांति पावत नाहीत, तर त्या साधनांची अनुक्रमे दुःख व सुख ही जी कार्ये, त्या (व्यंग्य) अर्थांत त्या अर्थांचे पर्यवसान होते. आणि ते म्हणजे दुःखसाधन व सुखसाधन हे अर्थ मुळीच विवक्षित नाहीत असेही नाही. कारण दुःख व सुख ही आपआपल्या कारणांशिवाय उद्‌भवूच शकणार नाहीत. म्हणून वृत्तिकार 'त्यांचे वाच्य अर्थ दुसऱ्या अर्थांमध्ये संक्रमित झाले आहेत' असे म्हणतात.[११] 'काहींचा' या सामान्य अर्थवाचक शब्दाच्या वाच्यार्थाचे 'विशिष्ट गुणधर्मांनी युक्त[१२] असे लोक' या अर्थात संक्रमण होत आहे. आणि 'निघून जातो' या शब्दाचा वाच्य अर्थ 'होतो' किंवा असतो,' या सामान्य क्रियास्वरूपी अर्थात परिणत होतो, 'काल' या विशिष्टार्थवाचक शब्दाच्या वाच्यार्थाचे 'व्यवहारातल्या सर्व गोष्टी' या व्यंग्य अर्थात संक्रमण होत आहे. वृत्तिकारांनी विष व अमृत या दोनच शब्दांच्या वाच्यार्थाच्या संक्रमणाचे व्याख्यान केले, ते केवळ दिग्दर्शनासाठी.[१३] म्हणून वृत्तिकार 'वाक्यात' असे म्हणतात.

टीपा

१) **निशा, जागर्ति, जाग्रति, पश्यतः** इत्यादि अनेक शब्द श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या २ ऱ्या अध्यायातील या श्लोकात लाक्षणिक आहेत, एकच पद लाक्षणिक नाही, म्हणून या उदाहरणातील ध्वनि 'वाक्यातून प्रकाशित होणारा आहे' असे म्हटले आहे.

२) फायदा नाही, कारण असे वागणे व्यवहाराच्या विरुद्ध आहे! पाहा, मनुस्मृति, १–६५ मधील पुढील ओळ–

रात्रिः स्वप्नाय भूतानां चेष्टायै कर्मणामहः ।

३) 'अर्थापत्ति' या शब्दाच्या माहितीसाठी प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्यांच्या तीन पक्षांच्या म्हणण्याचा लोचनात दिलेला सारांश'" वरील १२ वी टीप पाहा. प्रतिपक्ष्याच्या मताप्रमाणे येथे वाच्यार्थ हा तर्कविसंगत असल्याने अर्थापत्तीचा अवलंब करूनच संयमी माणसाच्या बाबतीतले (तथाकथित व्यंग्य) अर्थ ध्यानात येतात. यावर अभिनवगुप्तांचे उतर असे की, 'सर्व' या शब्दाचा अर्थ येथे 'बहुतेक सर्व' असाच असल्याने येथे वाच्यार्थामध्ये तर्कविसंगतपणा उत्पन्न होत नाही. अशा स्थितीत संयमी माणसाच्या बाबतीतील जे अर्थ मागाहून लक्षात येतात, ते व्यंजनेनेच, अर्थापत्तीने नव्हे.

४) हे चौदाही प्रकार ५३ व्या सांख्यकारिकेमध्ये निर्देशिलेले आहेत.

५) लोचनात तत्त्वदृष्टीला **व्यामोहजननी** म्हटले आहे. या **व्यामोहजननी** शब्दाचा अर्थ 'अज्ञान उत्पन्न करणारी' असा घेऊन चालणार नाही, कारण तत्त्वदृष्टि ही अज्ञान उत्पन्न करिते असे कसे म्हणता येईल? म्हणून 'व्यामोहजननी' याचा अर्थ, तिजकडे म्हणजे तत्त्वदृष्टीकडे पाठ फिरवावयास लावणारी म्हणजेच 'तिजपासून परावृत्त करणारी' असा घेतला पाहिजे.

६) लोचनातील **पश्यति** (पाहतो) व **मन्यते** (जाणतो) हे शब्द गीतेतील **पश्यतः** व **मु**नेः या शब्दांचे विवरण करणारे आहेत. 'मुनि' हा शब्द **मन्** या धातूपासून बनला आहे असे म्हणतात. (**मननात् मुनिः**)

७) दुष्कृत्ये करणाऱ्यांच्या बाबतीत त्यांचे दुराचरण परिणामी दुःखाचे साधनहोणारे असते. तर अत्यंत ज्ञानी लोकांना जगातले सर्व व्यवहार हे दुःखाचे साधन वाटत असल्यामुळे ते त्यापासून परावृत्त होतात.

८) सत्कृत्ये करणाऱ्यांना आपल्या सत्कृत्यांबद्दल समाधान वाटत असते तर अविवेकी लोकांना आपल्या दुष्कृत्यामध्ये (त्यावेळेपुरता) पराकाष्ठेचा आनंद वाटत असतो. त्यावेळी त्यांना परिणामाचा विचारही शिवत नाही.

९) पाहा, श्रीमद्‌भगवद्‌गीता, ६–३ मधील पुढील वचन–

योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ।

१०) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'कोणत्या शब्दांना 'ध्वनिकाव्य' म्हणावे'" वरील टीप १.

११) म्हणजे येथे 'विष' व 'अमृत' या शब्दांचे व्यंग्यार्थ अनुक्रमे 'दुःखसाधनांचा परिणाम असणारे दुःख' व 'सुखसाधनांचा परिणाम असणारे सुख' असे असून त्या व्यंग्यार्थात दुःखसाधन व सुखसाधन हे अर्थ (टाकून दिले गेले नसून) अंतर्भूतच झाले आहेत.

१२) विशिष्ट गुणधर्मानी युक्त असलेले लोक म्हणजे लोचनात सांगितलेले दुष्कृत्ये करणारे किंवा विशेष ज्ञानी वगैरे निरनिराळे लोक.

१३) म्हणजे केवळ विष व अमृत हेच शब्द अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनीची उदाहरणे नसून 'काहींचा', 'निघून जातो' व 'काळ' हे शब्दही अर्थांतरसंक्रमितवाच्य ध्वनीचीं उदाहरणे होतात.

ध्वन्यालोकः

विवक्षिताभिधेयस्यानुरणनरूपव्यङ्ग्यस शब्दशक्त्युद्भवे प्रभेदे पदप्रकाशता यथा—

प्रातुं धनैरर्थिजनस्य वाञ्छां दैवेन सृष्टो यदि नाम नास्मि ।
पथि प्रसन्नाम्बुधरस्तडागः कूपोऽथवा किं न जडः कृतोऽहम् ॥ १ ॥

अत्र हि जड इति पदं निर्विण्णेन वक्त्रात्मसमानाधिकरणतया प्रयुक्तमनुरणनरूपतया कूपसमानाधिकरणतां स्वशक्त्या प्रतिपद्यते ।

तस्यैव वाक्यप्रकाशता यथा हर्षचरिते सिंहनादवाक्येषु— 'वृत्तेऽस्मिन्महाप्रलये धरणीधारणायाधुना त्वं शेषः' ।

एतद्धि वाक्यमनुरणनरूपमर्थान्तरं शब्दशक्त्या स्फुटमेव प्रकाशयति ।

ध्वन्यालोक

'विवक्षितवाच्य' ध्वनीतील व्यंग्यार्थ अनुरणनस्वरूप असताना त्याचा 'शब्दशक्त्युद्भव' प्रकार पदातून प्रकाशित होतो, याचे उदाहरण—

विधात्याने मला जर गरजू लोकांना धन वगैरे त्यांना हवे असेल ते देऊन त्यांची इच्छा पुरवण्यासाठी जन्माला घातले नसेल, तर मग त्याने 'जड' अशा मला स्वच्छ जलाने परिपूर्ण असा रस्त्यावरील तलाव किंवा आड का नाही बनवले?

या उदाहरणातील 'जड'[१] हा शब्द, निराश झालेल्या वक्त्याने स्वतःचे विशेषण म्हणून वापरला आहे, पण तो द्व्यर्थी असल्याने व्यंजनेने, अनुरणनाप्रमाणे ते 'आडा' चे विशेषण म्हणून प्रत्ययास येते.

याच प्रकारातील व्यंग्यार्थ वाक्यातूनही प्रकाशित होतो, याचे उदाहरण 'हर्षचरिता' तील **सिंहनादा**[२] च्या पुढील वाक्यात मिळते—

'हा महाप्रलय झाला असताना आता धरणीचा भार धारण करावयास तू 'शेष' (१. उरलेला, २. 'शेष' नाग) आहेस.'

हे वाक्य त्यातील द्व्यर्थी पदांमुळे अनुरणनस्वरूपी दुसरा व्यंग्यार्थ स्पष्टपणे प्रत्ययास आणते.

लोचनम्

एवं कारिकाप्रथमार्धलक्षितांश्चतुरः प्रकारानुदाहृत्य द्वितीयकारिकार्धस्वीकृतान् षडन्यान् प्रकारान् क्रमेणोदाहरति विवक्षिताभिधेयस्येत्यादिना । प्रातुमिति पूरयितुम् । धनैरिति बहुवचनं यो येनार्थी तस्य तेनेति सूचनार्थम् । अत एवार्थिग्रहणम् । जनस्येति बाहुल्येन हि लोको धनार्थी, न तु गुणैरुपकारार्थी । दैवेनेति । अशक्यपर्यनुयोगेनेत्यर्थः । अस्मीति । अन्यो हि तावदवश्यं कश्चित्सृष्टो न त्वहमिति निर्वेदः । प्रसन्नं लोकोपयोगि अम्बु धारयतीति । कूपोऽथवेति । लोकैरप्यलक्ष्यमाण इत्यर्थः । आत्मसमानाधिकरणतयेति । जडः किङ्कर्तव्यतामूढ इत्यर्थः, अथ च कूपो जडोऽर्थिता कस्य कीदृशीत्यसम्भवद्विवेक इति । अत एव जडः शीतलो निर्वेदसन्तापरहितः । तथा जडः शीतजलयोगितया परोपकारसमर्थः । अनेन तृतीयार्थेनायं जडशब्दस्तटाकार्थेन पुनरुक्तार्थसम्बन्ध इत्यभिप्रायेणाह- कूपसमानाधिकरणतामिति । स्वशक्त्येति शब्दशक्त्युद्भवत्वं योजयति । महाप्रलय इति । महस्य उत्सवस्य आसमन्तात्प्रलयो यत्र तादृशि शोककारणभूते वृत्ते धरण्या राज्यधुराया धारणायाश्वासनाय त्वं शेषः शिष्यमाणः । इतीयता पूर्णे वाक्यार्थे कल्पावसाने भूपीठभारोद्वहनक्षम एको नागराज एव दिग्दन्तिप्रभृतिष्वपि प्रलीनेष्वित्यर्थान्तरम् ।

लोचन

याप्रमाणे १ ल्या कारिकेच्या पूर्वार्धात निर्देशिलेल्या चार प्रकारांची उदाहरणे दिल्यावर वृत्तिकार कारिकेच्या उत्तरार्धात उल्लेखिलेल्या इतर सहा प्रकारांची[३] क्रमाने उदाहरणे देण्यास 'विवक्षितापरवाच्य ध्वनीतील व्यंग्यार्थ' इ. वाक्याने प्रारंभ करितात. 'पुरविण्यासाटी' म्हणजे पूर्ण करण्यासाठी. **धनैः** हे बहुवचन 'ज्याला जे जे हवे असेल ते ते देऊन' हा अर्थ सुचविण्यासाठी योजिले आहे. म्हणूनच 'गरजू' शब्द (कवीने) वापरला आहे. 'लोकांना' असे म्हणण्याचे कारण बहुतेक लोकांना पैसाच हवा असतो, दात्याच्या गुणांचा आपणास कसा उपयोग करून घेता येईल याची त्यांना फिकीर नसते. 'विधात्याने'- (मला निर्धन का केलेस असा) जाब ज्याला विचारणे अशक्य आहे अशाने' हा अर्थ. 'मला' —असे म्हणून दुसऱ्या कोणाला तरी खात्रीने (धनसंपन्न करून) जन्माला घातले असणार, मला मात्र नाही असा (बोलणाऱ्याच्या मनातील) उद्वेग सुचविला आहे. 'स्वच्छ' म्हणजे लोकांच्या उपयोगाला येणारे पाणी ज्यात आहे असा. 'किंवा आड' म्हणजे लोकांच्या सहजासहजी दृष्टीस न पडणारा, असा अर्थ. स्वतःचे विशेषण म्हणून— 'जड' म्हणजे काय करावे हे ज्याला सुचत नाही असा (मी) आणि आड हा **'जड'** म्हणजे (अचेतन असल्यामुळे) कोणाला कशाची गरज आहे याचे ज्ञान ज्याच्या ठिकाणी असणे असंभवनीय आहे असा. म्हणूनच जड म्हणजे थंड, म्हणजे उद्वेगाच्या दाहाने न पोळला जाणारा. तसेच 'जड' म्हणजे थंड पाण्याने युक्त असल्यामुळे दुसऱ्याची तहान भागवून त्याच्यावर उपकार करू शकणारा. या तिसऱ्या (म्हणजे थंड पाण्याने युक्त या) अर्थाने 'जड' या शब्दाचा 'तलाव' या अर्थाशी अन्वय केल्यास पुनरुक्ति होईल, यासाठी 'आडाचे विशेषण म्हणून' असे वृत्तिकार म्हणतात.[४] 'स्वतःच्या शक्तीने'[५] असे म्हणून वृत्तिकार, हे शब्दशक्तिमूल ध्वनीचे उदाहरण आहे, असे दाखवितात.

'महाप्रलय'— मह म्हणजे आनंदोत्सव. त्या आनंदोत्सवाचा 'आ' म्हणजे सगळ्या बाजूंनी लोप झाला आहे ज्यामध्ये, अशी शोकजनक परिस्थिति[६] उत्पन्न झाली असताना. 'धरणी' म्हणजे राज्याची जबाबदारी, ती धारण करण्यास म्हणजे प्रजाजनांचे सान्त्वन करण्यास तूच 'शेष' म्हणजे उरलेला आहेस, या इतक्या अर्थाने या वाक्याचा अर्थ पूर्णपणे ध्यानात आल्यावर कल्पान्त होण्याचे वेळी दिग्गज वगैरेंचाही

नाश झाला असताना पृथ्वीतलाचा भार पेलू शकेल असा म्हणजे एकटा नागराज शेषच (तू आहेस) हा दुसरा[७] व्यंग्य अर्थ प्रत्ययास येतो.

टीपा

१) **जड**– किंकर्तव्यतामूढ हे झाले बोलणाराचे विशेषण. अर्थात आडालाही, कोणास काय हवे हे कळत नसल्याने त्यालाही जड (म्हणजे अचेतन) म्हणता येईल, पण संस्कृतमध्ये **ड** व **ल** यांत फरक मानू नये असा संकेत असल्याने **जडः = जलः = जलवान्** म्हणजे 'थंड पाण्याने भरलेला' असा आडाकडे जोडता येणारा अर्थ मागाहून प्रतीत होतो. तलावाकडे हे विशेषण लावावयाचे नाही, कारण 'स्वच्छ जलाने निर्भर' असे तलावाचे विशेषण आहेच, पुन्हा 'पाण्याने भरलेला' असे म्हटल्यास ती पुनरुक्ति होईल. 'जड' या शब्दाचे लोचनात सांगितलेले पहिले दोन व्यंग्यार्थ तलावाकडेही लावता येतील, पण तिसरा अर्थ मात्र लावता येणार नाही.

२) 'सिंहनाद' हे हर्षवर्धन राजाच्या सेनापतीचे नाव आहे. (हर्षचरित, निर्णयसागर आवृत्ति, पृ. १२७)

३) हे सहा प्रकार म्हणजे अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीच्या शब्दशक्तिमूल, अर्थशक्तिमूल कविप्रौढोक्तिनिष्पन्न, अर्थशक्तिमूल स्वतःसंभवी या तीन प्रकारांचे प्रत्येकी पदप्रकाश व वाक्यप्रकाश हे मिळून एकूण सहा.

४) पुनरुक्ति कशी, यासाठी वरील १ ली टीप पाहा. प्रस्तुत श्लोकातील आशयाशी उद्द्योत २, प्रथम खंड, "अलंकारध्वनीची उदाहरणे" वरील 'एकवेळ एखाद्यावन प्रदेशात' इ. गाथेचा आशय मिळता जुळता आहे. 'माझ्यापेक्षा एखादा तलाव किंवा आडही बरा' असा व्यतिरेकालंकारही यातून ध्वनित होत आहे.

५) स्वतःच्या शक्तीने म्हणजे 'जड' हा शब्द द्व्यर्थी असल्यामुळे.

६) ही शोकजनक परिस्थिति म्हणजे प्रभाकरवर्धन राजाचा झालेला मृत्यु.

७) रूपक या स्वरूपाचा.

ध्वन्यालोकः

अस्यैव कविप्रौढोक्तिमात्रनिष्पन्नशरीरस्यार्थशक्त्युद्भवे प्रभेदे पदप्रकाशता यथा हरिविजये—

चूअंकुरावअंसं छणपसरमहग्धमणहरसुरामोअं ।
असमाप्पिअं [हेमचंद्राच्या 'काव्यानुशासना' त पृ. ७९ येथे **अपणामिअं** असा पाठ आढळतो.] **पि गहिअं कुसुमसरेण महुमासलच्छीऍ** [काशी आवृत्तीमधील **लच्छिमुहम्** याऐवजी हेमचंद्राच्या काव्यानुशासनातील लच्छीऍ **मुहं** या पाठाचा स्वीकार केला आहे, कारण त्यामुळे द्वितीय पादाप्रमाणे चतुर्थ पादातही २० मात्रा होतात.]**मुहं ।**

अत्र ह्यसमर्पितमपि कुसुमशरेण मधुमासलक्ष्म्या मुखं गृहीतमित्यसमर्पितमपीत्येतदवस्थाभिधायिपदमर्थशक्त्या कुसुमशरस्य बलात्कारं प्रकाशयति ।

अत्रैव प्रभेदे वाक्यप्रकाशता यथोदाहृतं प्राक् 'सञ्जेइ सुरहिमासो' इत्यादि । अत्र सञ्जयति सुरभिमासो न तावदर्पयत्यनङ्गाय शरानित्ययं वाक्यार्थः कविप्रौढोक्तिमात्रनिष्पन्नशरीरो मन्मथोन्माथकदनावस्थां वसन्तसमयस्य सूचयाति ।

ध्वन्यालोक

याच ध्वनीच्या प्रकारामध्ये वाच्यार्थ केवळ कविकल्पनेने निर्मिलेला असताना त्या ध्वनीच्या 'अर्थशक्तिमूल' प्रकारातील व्यंग्यार्थ हा पदातून प्रकाशित होतो, त्याचे हरिविजयामध्ये[1] असलेले पुढील उदाहरण-

"आम्राच्या पल्लवांनी अलंकृत, तसेच थाटामाटाचा वसंतोत्सव सुरू झाल्याने मदनदेव आपला प्रभाव सर्वत्र गाजवीत असलेले मधुमासलक्ष्मीचे मुख (प्रारंभ) (दुसरा अर्थ—मदिरेचा मोहक गंध असलेले मुख म्हणजे वदन) तिने आपल्यापुढे अर्पण केले नसले, तरी मदनाने आपल्या ताब्यात घेतले."

'वसंतलक्ष्मीने आपले मुख अर्पण केले नसतानाही मदनाने त्याचा ताबा घेतला' या वाक्यातले' अर्पण केले नसतानाही' हे शब्द त्यांच्या अर्थाच्या सामर्थ्याने मदनामुळे (हठकामुकाकडून नववधूवर केला जाणारा) बलात्कार सुचवितात. (अर्पण केले नसतानाही) हे शब्द मुखाची, 'पुढे केलेले नसणे' ही अवस्था अभिधेने प्रतिपादन करितात.

याच प्रकारात व्यंग्यार्थ **वाक्यातून** प्रकाशित होतो, याचे उदाहरण मागे (प्रथम खंड "उद्द्योत – २ उभयशक्तिमूल ध्वनीचे उदाहरण. अर्थशक्तिमूल 'अनुरणनरूप' ध्वनीचे दोन प्रकार" वर दिलेले) 'वसंतऋतु मदनासाठी' ... इ. हे होय. या उदाहणातले 'वसंत ऋतु बाण नुसते सज्जच करीत नाही, तर ते मदनाच्या स्वाधीनही करीत आहे' हा संपूर्ण वाक्याचा अर्थकविकल्पनेतच शक्य आहे. हा अर्थ 'वसंतऋतु हा मदनामुळे उत्पन्न होणारी व मनाला बेचैन आणि क्षुब्ध करून सोडणारी अवस्था निर्माण करितो' असे सुचवितो.

लोचनम्

चूताङ्कुरावतंसं क्षणप्रसरमहार्घमनोहरसुरामोदम् ।
महार्घेण उत्सवप्रसरेण मनोहरसुरस्य मन्मथदेवस्य आमोदश्चमत्कारो यत्र तत् । अत्र महार्घशब्दस्य परनिपातः, प्राकृते नियमाभावात् । छ ण इत्युत्सवः ।

असमर्पितमपि गृहीतं कुसुमशरेण मधुमासलक्ष्मीमुखम् ॥

मुखं प्रारम्भो वक्त्रं च । तच्च सुरामोदयुक्तं भवति । मध्वारम्भे कामश्चित्तमाक्षिपतीत्येतावानयमर्थः कविप्रौढोक्त्यार्थान्तरव्यञ्जकः सम्पादितः । अत्र कविनिबद्धवक्तृप्रौढोक्तिशरीरार्थशक्त्युद्भवे पदवाक्यप्रकाशतायामुदाहरणद्वयं न दत्तम् । 'प्रौढोक्तिमात्रनिष्पन्नशरीरः सम्भवीस्वतः' इति प्राच्यकारिकाया इयतैवोदाहृतत्वं भवेदित्यभिप्रायेण । तत्र पदप्रकाशाता यथा—

—सत्यं मनोरमाः कामाः सत्यं रम्या विभूतयः ।
किंतु मत्ताङ्गनापाङ्गभङ्गलोलं हि जीवितम् ॥

इत्यत्र कविना यो विरागी वक्ता निबद्धस्तत्प्रौढोक्त्य । जीवितशब्दोऽर्थशक्तिमूलतयेदं ध्वनयति— सर्व एवामी कामा विभूतयश्च स्वजीवितमात्रोपयोगिनः, तदभावे हि सद्भिरपि तैरसद्रूपताप्यते । तदेव च जीवितं प्राणधारणरूपत्वात्प्राणवृत्तेश्च चाञ्चल्यादनास्थापदमिति विषयेषु वराकेषु किं दोषोद्घोषणदौर्जन्येन, निजमेव जीवितमुपालभ्यम् । तदपि च निसर्गचञ्चलामिति न सापराधमित्येतावता गाढं वैराग्यमिति । वाक्यप्रकाशता यथा— 'शिखरिणि' इत्यादौ ।

लोचन

'आम्राच्या पल्लवांनी अलंकृत' — थाटामाटाचा उत्सव सुरू झाल्याने मन विचलित करणाऱ्या रूपसुंदर देवाचा म्हणजे मदनदेवाचा आमोद म्हणजे चमत्कार म्हणजे आश्चर्यकारक प्रमाक् ज्यात आहे असा (वसंतलक्ष्मीचा प्रारंभ).

गाथेतील 'क्षणप्रसर' इ. समासात 'महार्घ' शब्द उत्तरपद म्हणून योजिला आहे. कारण प्राकृतात समासातील घटक पदांच्या क्रमाबाबत नियम नसतो. 'छण' (क्षण) म्हणजे उत्सव. 'तिने आपल्यापुढे अर्पण केले नसले तरी' इ.— मुख म्हणजे (१) प्रारंभ आणि (२) वदन. आणि ते (म्हणजे कामिनीचे वदन) मदिरेच्या गंधाने युक्त असते. वसंत ऋतूच्या प्रारंभी मदन मनात खळबळ उत्पन्न करितो, हा इतका (साधा, सरळ) अर्थ प्रस्तुत पद्यामध्ये कवीने कल्पनाशक्ति योजून केलेल्या वर्णनामुळे[२] दुसरा अर्थ[३] सूचित करण्यास समर्थ झाला आहे. या ठिकाणी कविनिर्मित पात्राच्या कल्पनेने वर्णिलेला वाच्यार्थ ज्यात असतो असा अर्थशक्तिमूल ध्वनि पदातून व वाक्यातून प्रकाशित होतो, या दोन प्रकारांची उदाहरणे (वृत्तिकारांनी) दिली नाहीत. कारण 'दुसरा वस्तुरूप अर्थ' इ. पूर्वी[४] येऊन गेलेल्या कारिकेची आतापर्यंत दिली इतकी उदाहरणे पुरेशी आहेत, हा वृत्तिकारांचा अभिप्राय. तो व्यंग्यार्थ पदातून प्रकाशित होतो याचे उदाहरण—

'खरे आहे की, उपभोग्य विषय[५] मनाला भुरळ पाडतात. ऐश्वर्य मनाला सुखविते हेही खरे. पण जीवित हे यौवनाच्या मदाने धुंद झालेल्या ललनांच्या तिरप्या कटाक्षपाताप्रमाणेच चंचल असते. (याला कोण काय करणार?)'

हा श्लोक कवीने ज्या विरक्त वक्त्याच्या तोंडी घातला आहे त्या विरक्त वक्त्याने जी कल्पनारम्य उपमा द्वितीयार्धात दिली आहे, त्या उपमेमुळे 'जीवित' हा शब्द अर्थशक्तीने पुढील आशय सुचवितो— हे सर्व उपभोगावेसे वाटणारे विषय आणि ऐश्वर्य ही फक्त आपले मानवी जीवित सुखमय करण्याच्या उपयोगाला येणारी आहेत. कारण जीविताचाच नाश झाला तर या गोष्टी असूनही नसल्यासारख्या होतात. आणि तेच जीवित केवळ प्राणधारण करणे याच स्वरूपाचे असल्यामुळे आणि प्राणांचे अस्तित्व हे अस्थिर असल्यामुळे ते जीवित (विवेकी माणसाच्या दृष्टीने) मुळीच किंमत देण्याच्या लायकीचे नाही, म्हणून बिचाऱ्या विषयांना नावे ठेवण्याचा वाईटपणा दाखविण्यात काय अर्थ आहे? त्यापेक्षा दोष द्यावयाचा असेल तर तो आपल्या जीविताला च द्यावयास हवा. पण ते जीवितही स्वभावतःच चंचल असल्यामुळे त्याचा काहीच दोष नाही. या सर्व गोष्टी विचारात घेतल्यास वैराग्यच जास्त जास्त दृढ होत जाते. ध्वनीचा तो प्रकार[६] वाक्यातून प्रकाशित होतो याचे उदाहरण म्हणजे मागे दिलेले[७] 'हे तरुणि!' इ.

टीपा

१) सर्वसेनकृत प्राकृत भाषेतले काव्य. 'वक्रोक्तिजीवित' या ग्रंथात कुतकानेही सर्वसेनाचा उल्लेख केला आहे. पाहा, 'वक्रोक्तिजीवित' १ ला उन्मेष, कारिका ५२ वरील वृत्ति. शिवाय पाहा, द्वितीय खंड कारिका ११ वरील वृत्तीतील 'सर्वसेन' शब्दावरील टीप २ री.

२) कल्पनाशक्ति योजून केलेले वर्णन म्हणजे 'अर्पण केले नसताही ताब्यात घेतले' यामधील 'विभावना' अलंकार. 'विभावना' अलंकाराचे लक्षण म्हणजे 'कारण नसले तरी कार्य घडून आले' असे वर्णन. उदा. 'सुंदर तरुणी विवेकी तरुणांचीहि हृदये शस्त्र न वापरताच विदीर्ण करितात.'

३) दुसरा अर्थ म्हणजे वसंतऋतूमध्ये कामी पुरुष नवोढा वधूचे मोठ्या आवेगाने चुंबन व्रतात, हा अर्थ.

४) उद्द्योत २, कारिका २४. या कारिकेत फक्त प्रौढोक्ति' इतकेच म्हटले आहे. तिचे कविप्रौढोक्ति व कविनिबद्धवक्तृप्रौढोक्ति हे दोन प्रकार कारिकेत सांगितले नसून वृत्तीत सांगितले आहेत. तेव्हा केवळ कारिकेच्या दृष्टीने कविनिबद्धवक्तृप्रौढोक्ति या, वृत्तीतच सांगितलेल्या प्रकाराची उदाहरणे देण्याची आवश्यकता वृत्तिकारांना वाटली नाही.

५) पुढे ३—३० या कारिकेनंतर वृत्तीमध्ये हा श्लोक दिलेला आहे. मात्र त्यात **कामाः** या ऐवजी **रामाः** असा पाठ आहे.

६) तो प्रकार म्हणजे कविनिबद्धवक्तृप्रौढोक्तिनिष्पन्न अर्थशक्तिमूल प्रकार.

७) पाहा, प्रथमखंड "उद्द्योत — १ ध्वनीचे दोन प्रकार" वरील (लोचनातील)' आणि एका प्रेमी वक्त्याने इ. वाक्य. 'तेथे हे तरुणि!' इ. पद्य स्थूलमानाने विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीचे उदाहरण म्हणून दिले होते. तो प्रसंग त्या ध्वनीचे बारीकसारीक प्रकार सांगण्याचा नव्हता. ते प्रकार आता सांगितले जात आहेत.

ध्वन्यालोकः

स्वतः सम्भविशरीरार्थशक्त्युद्भवे प्रभेदे पदप्रकाशता यथा—

वाणिअअ हत्थिदंता कुत्तो अम्हाण वग्घकित्ती अ ।
जाव लुलिआलअमुही घरम्मि परिसक्कए सुण्हा ॥

अत्र लुलितालकमुखीत्येतत्पदं व्याधवध्वाः स्वतः सम्भावितशरीरार्थशक्त्या सुरतक्रीडासक्तिं सूचयत्तदीयस्य भर्तुः सततसम्भोग क्षामतां प्रकाशयति ।

तस्यैव वाक्यप्रकाशता यथा—

सिहिपिच्छकण्णऊरा वहुआ वाहस्स गव्विरी भमइ ।
मुत्ताहलरइअपसाहणाणँ मज्झे सवत्तीणं ॥

अनेनापि वाक्येन व्याधवध्वाः शिखिपिच्छकर्णपूराया नवपरिणीतायाः कस्याश्चित्सौभाग्यातिशयः प्रकाश्यते । तत्सम्भोगैकरतो मयूरमात्रमारणसमर्थः पतिर्जात इत्यथप्रकाशनात् तदन्यासां चिरपरिणीतानां मुक्ताफलरचितप्रसाधनानां दौर्भाग्यातिशयः ख्याप्यते । तत्सम्भोगकाले स एव व्याधः करिवरवधव्यापारसमर्थ आसीदित्यर्थप्रकाशनात् ।

ध्वन्यालोक

वाच्यार्थ व्यवहारात संभवणारा असताना 'अर्थशक्तिमूल' ध्वनि एका पदातूनही प्रकाशित होऊ शकतो याचे उदाहरण–

"बाबा सौदागरा! जिचे केश तोंडावर इतस्ततः विखुरले आहेत अशी सुनबाई जोवर या घरात इकडे तिकडे तोऱ्याने संचार करीत आहे, तोवर, आमच्या जवळ हस्तिदंत आणि वाघाची कातडी कुठली असायला?"

या उदाहरणातल्या, 'जिच्या तोंडावर केसांच्या बटा इतस्ततः विखुरल्या आहेत अशी' या अर्थाच्या 'लुलितालकमुखी' या पदाचा वाच्यार्थ लौकिक सृष्टीत संभवनीय आहे, आणि ते विशेषण त्या वाच्यार्थाच्या सामर्थ्याने (नखरेल) सुनेची प्रणयक्रीडेविषयीची आसक्ति सुचवून तिचा नवरा सतत संभोगामुळे क्षीण झाला आहे (आणि म्हणून तो अलीकडे शिकारीसाठी बाहेर पडू शकत नाही) हे प्रकाशित करीत आहे.

हाच प्रकार वाक्यातून प्रकाशित होत असतानाचे उदाहरण–
"मोरपिसांची कर्णभूषणे ल्यालेली पारध्याची पत्नी मोत्यांचे दागिने अंगावर घातलेल्या सवतींच्या मध्ये मोठ्या दिमाखाने हिंडते."

याही वाक्यामुळे मोरपिसांची कर्णभूषणे ल्यालेल्या कोणा नवविवाहित व्याध पत्नीचा विशेष आकर्षकपणा प्रकाशित होत आहे. पति केवळ तिच्या संभोगाचीच अभिलाषा करणारा. त्यामुळे त्याच्यात फक्त मोरच मारण्याची ताकद उरली आहे असा अर्थ प्रकट झाल्यामुळे विवाह होऊन बरेच दिवस झालेल्या आणि अंगावर मोत्यांचे दागिने घालून मिरवणाऱ्या सवती आपल्या पतीला हिच्या इतक्या आकृष्ट करू शकल्या नाहीत हे सुचविले जात आहे. कारण तोच पारधी त्यांच्याशी रममाण होत असताना मोठमोठे हत्ती मारू शकत होता[२] असा अर्थ (व्यंजनेने) निष्पन्न होतो.

लोचनम्

वाणिजक हस्तिदन्ताः कुतोऽस्माकं व्याघ्रकृत्तयश्च ।
यावल्लुलितालकमुखी गृहे परिष्वक्कते स्नुषा ॥ इति छाया ।

सविभ्रमं चंक्रम्यते । अत्र लुलितेति स्वरूपमात्रेण विशेषणमवलिप्ततया च हस्तिदन्ताद्यनाहरणं सम्भाव्यमिति वाक्यार्थस्य तावत्येव न काचिदनुपपत्तिः ।

सिहिपिच्छेति । पूर्वमेव योजिता गाथा ।

लोचन

'बाबा सौदागरा!' इ.— इकडे तिकडे तोऱ्याने संचार करीत आहे. म्हणजे नखरेलपणाने एकसारखी घरात मिरवीत आहे. या गाथेत 'जिच्या तोंडावर केसांच्या बटा विखुरलेल्या आहेत' हे वर्णन अगदी वस्तुस्थितीला धरून आहे[३] आणि सुंदर बायको मिळाल्याच्या गर्वामुळे (घराच्या बाहेर पडून) पारध्याने हस्तिदंत वगैरे न आणणे हे अगदी संभवनीय आहे[४] म्हणून या वर्णनात वाक्यार्थ सुसंगतपणे लागण्यात काही अडचण येत नाही. (कारण संपूर्ण वाक्य हे स्वतःसंभवी आहे.)

मोरपिसांची इ. —या गाथेचे विवरण पूर्वीच (म्हणजे प्रथमखंड, "उद्‌द्योत — २ उभयशक्तिमूल ध्वनीचे उदाहरण. अर्थशक्तिमूल 'अनुरणनरूप'ध्वनीचे दोन प्रकार "वर) करण्यात आले आहे.

टीपा.

१) सर्वसेनकृत प्राकृत भाषेतले काव्य. 'वक्रोक्तिजीवित' या ग्रंथात कुंतकानेही सर्वसेनाचा उल्लेख केला आहे. पाहा, 'वक्रोक्तिजीवित', १ ला उन्मेष, कारिका ५२ वरील वृत्ति.

२) पाहा, प्रथमखंड "उभयशक्तिमूल ध्वनीचे उदाहरण. अर्थशक्तिमूल 'अनुरणनरूप'ध्वनीचे दोन प्रकार ", वरील 'मोरपिसांची कर्णभूषणे'... इ. श्लोक व त्यावरील लोचन. 'हत्तीच्या गंडस्थळात मोत्ये असतात' असा कविसंकेत आहे.

३) म्हणजे या वर्णनात कविकल्पनेचा मुळीच उपयोग केलेला नाही.

४) म्हणजे येथेही कोणत्याही कविकल्पनेचा वापर नाही.

ध्वन्यालोकः

ननु ध्वनिः काव्यविशेष इत्युक्तं, तत्कथं तस्य पदप्रकाशता । काव्यविशेषो हि विशिष्टार्थप्रतिपत्तिहेतुः शब्दसन्दर्भविशेषः । तद्भावश्च पदप्रकाशत्वे नोपपद्यते । पदानां स्मारकत्वेनावाचकत्वात् । उच्यतेस्यादेष दोषः, यदि वाचकत्वं प्रयोजकं ध्वनिव्यवहारे स्यात् । न त्वेवम्; तस्य व्यञ्जकत्वेन व्यवस्थानात् । किं च काव्यानां शरीराणामिव संस्थानविशेषावच्छिन्नसमुदायसाध्यापि चारुत्वप्रतीतिरन्वयव्यतिरेकाभ्यां भागेषु कल्प्यत इति पदानामपि व्यञ्जकत्वमुखेन व्यवस्थितो ध्वनिव्यवहारो न विरोधी ।

'अनिष्टस्य श्रुतिर्यद्वदापाद्याति दुष्टताम् ।

श्रुतिदुष्टादिषु व्यक्तं तद्वदिष्टस्मृतिर्गुणम् ॥ १ ॥

पदानां स्मारकत्वेऽपि पदमात्रावभासिनः
तेन ध्वनेः प्रभेदेषु सर्वेष्वेवास्ति रम्यता ॥ २ ॥

विच्छित्तिशोभिनैकेन भूषणेनेव कामिनी ।
पदद्योत्येन सुकवेर्ध्वनिना भाति भारती ॥'

इति परिकरश्लोकाः ।

ध्वन्यालोक

पण काय हो, तुम्ही ध्वनि म्हणजे एक विशेष प्रकारचे 'काव्य' आहे असे म्हणता, मग तो पदातून कसा प्रकाशित होईल? कारण विशेष प्रकारचे काव्य म्हणजे विशिष्ट अर्थाचा बोध करून देणारा एक विशिष्ट प्रकारचा 'शब्दसमूह'[१] होय. तेव्हा ध्वनि (सुट्या) पदातून प्रकाशित होतो असे मानल्यास 'विशेष प्रकारचे काव्य' या संज्ञेची उपपत्ति लागणार नाही. कारण पदे ही 'स्मारक' असल्यामुळे 'वाचक' असत नाहीत.[२]

याचे उत्तर असे—जर ध्वनि हे नाव (पदांच्या) वाचकत्वावर अवलंबून असते, तर (पदे वाचक नसल्याने ध्वनि हा पदातून प्रकाशित होणार नाही) हा दोष उत्पन्न झाला असता. पण ध्वनि या नावाला वाचकत्व हे कारणीभूत नाहीच! कारण ध्वनि हा व्यंजकत्वावर अलंबून आहे. शिवाय असे की, काव्यातून प्रतीत होणारे सौंदर्य हे शरीराच्या सौंदर्याप्रमाणेच विशिष्ट ठेवणीने परस्परांशी संबद्ध असलेल्या (पदरूपी) अवयवांच्या समुदायातूनच[३] प्रतीत होणारे असले, तरी ते अन्वय व व्यतिरेक[४] या उपायांमुळे अवयवांच्या ठिकाणी असते, असे मानिले जाते. म्हणून वाक्याचे अवयव असणारी पदेदेखील व्यंजक असल्यामुळे त्या पदांतून ध्वनि प्रकाशित होतो असे म्हटल्याने काही बिघडणार नाही.

"ज्याप्रमाणे श्रुतिदुष्टादि[५] दोष असलेल्या काव्यांमधील एखादे दुसरेच अनिष्ट पद ऐकल्याने सर्व काव्यात दोष उत्पन्न होतो, त्याप्रमाणे इष्ट अर्थाचे (व्यंग्यार्थाचे) स्मरणदेखील त्या सर्व उदाहरणात गुणवत्ता निर्माण करू शकते.

त्यामुळे पदे ही स्मारकच असली, तरीसुद्धा केवळ (सुट्ट्या) पदातून प्रकाशित होणाऱ्या ध्वनीच्या सर्वच प्रकारांत, रम्यता येऊ शकते.

शोभिवंत अशा एका अलंकारामुळेही ज्याप्रमाणे एखादी सुंदरी शोभून दिसते, त्याप्रमाणे एका पदातून प्रकाशित होणाऱ्या व्यंग्यार्थामुळेही सत्कवीची वाणी मनोहर वाटते."

हे झाले या विवेचनाचे तात्पर्य थोडक्यात सांगणारे श्लोक.

लोचनम्

नन्विति । समुदाय एव ध्वनिरित्यत्र पक्षे चोद्यमेतत् । तद्भावश्चेति । काव्यविशेषत्वमित्यर्थः । अवाचकत्वादिति यदुक्तं सोऽयमप्रयोजको हेतुरिति च्छलेन तावद्दर्शयति स्यादेष दोष इति । एवं छलेन परिहृत्य वस्तुवृत्तेनापि परिहरति किं चेति । यदि परो ब्रूयात् – न मया अवाचकत्वं ध्वन्यभावे हेतूकृतं किं तूक्तं काव्यं ध्वनिः । काव्यं चानाकाङ्क्षप्रतिपत्तिकारि वाक्यं न पदमिति तत्राह सत्यमेवं, तथापि पदं न ध्वनिरित्यस्माभिरुक्तम् । अपि तु समुदाय एव तथा च पदप्रकाशो ध्वनिरिति प्रकशपदेनोक्तम् । ननु पदस्य तत्र तथाविधं सामर्थ्यमिति कुतोऽखण्ड एव प्रतीतिक्रम इत्याशङ्क्याह–काव्यानामिति । उक्तं हि प्राग्विवेककाले विभागोपदेश इति ।

ननु भागेषु पदरूपेषु कथं सा चारुत्वप्रतीतिरारोपयितुं शक्या? तानि हि स्मारकाण्येव । ततः किम्? मनोहारिव्यङ्ग्यार्थस्मारकत्वाद्धि चारुत्वप्रतीतिनिबन्धनत्वं केन वार्यते । यथा श्रुतिदुष्टानां पेलवादिपदानामसभ्यपेलाद्यर्थं प्रति न वाचकत्वम् । अपि तु स्मारकत्वम् । तद्वशाच्च चारुस्वरूपं काव्यं श्रुतिदुष्टम् । तच्च श्रुतिदुष्टत्वमन्वयव्यतिरेकाभ्यां भागेषु व्यवस्थाप्यते तथा प्रकृतेऽपीति । तदाह– अनिष्टस्येति । अनिष्टार्थस्मारकस्येत्यर्थः । दृष्टतामित्यचारुत्वम् । गुणमिति चारुत्वम् । एवं दृष्टान्तमभिधाय पादत्रयेण तुर्येण दार्ष्टान्तिकार्थ उक्तः । अधुनोपसंहरतिपदानामिति । यत एवमिष्टस्मृतिश्चारुत्वमावहति तेन हेतुना सर्वेषु प्रकारेषु निरूपितस्य पदमात्रावभासिनोऽपि पदप्रकादास्यापि ध्वने रम्यतास्ति स्मारकत्वेऽपि पदानामिति समन्वयः । अपिशब्दः काकाक्षिन्यायेनोभयत्रापि सम्बध्यते । अधुना चारुत्वप्रतीतौ पदस्यान्वयव्यतिरेकौ दर्शयति –विच्छित्तीति ॥ १ ॥

लोचन

'पण काय हो', इ.– 'विशिष्ट धर्मानी युक्त असा शब्दसमूह हाच ध्वनि' असे जे मत (कारिका १३, उद्द्योत १ मध्ये) सांगितले, त्याचा आधार घेऊन 'पण काय हो' इ. शब्दांनी हा आक्षेप घेतला जात आहे. 'तसे असणे' म्हणजे विशिष्ट प्रकारचे काव्य असणे हा धर्म, असा अर्थ.[६] 'पदे ही वाचक असू शकत नाहीत म्हणून' असा जो पूर्वपक्षाने हेतू सांगितला, तो इष्टसिद्धि करू शकणारा हेतु नसून हेत्वाभास आहे हे वृत्तिकार 'तर हा उत्पन्न दोष झाला असता' इ. वाक्याने शब्दच्छलाचा अवलंब करून दाखवीत आहेत. याप्रमाणे शब्दच्छलाच्या द्वारे प्रतिपक्ष्याच्या आक्षेपाचे खंडन केल्यावर (शब्दच्छलाचा आश्रय न करता म्हणजे) वस्तुतः सुद्धा, वृत्तिकार आक्षेपाचे 'शिवाय असे की' इ. वाक्याने खंडन करितात. यावर जर तो पूर्वपक्षी म्हणेल की, "पदे ही वाचक नसतात हे कारण 'ध्वनि नाही' असे सिद्ध करण्यासाठी मी पुढे केलेले नाही. पण (तुम्ही) 'काव्याला' ध्वनि म्हटलेले आहे (व ते मलाही मान्य आहे) आणि काव्य म्हणजे तर पूर्ण अर्थाचा[७] बोध करून देणारे वाक्य होय, 'पद' नव्हे!" तर त्यावर (सिद्धान्त्याचे) उत्तर असे की, हे खरे आहे,[८] पण 'पद म्हणजे ध्वनि' असे आम्ही कोठेही म्हटलेले नाही, तर पूर्णार्थबोधक शब्दसमूहालाच (म्हणजे वाक्यालाच) आम्ही 'ध्वनि' म्हणतो. आणि असे असल्यामुळे 'पदप्रकाश' यातील 'प्रकाश' या शब्दाने 'तो ध्वनि (वाक्याचा घटक असणाऱ्या) पदातून प्रकाशित होतो' असेच वृत्तिकारांनी म्हटले आहे. 'पण काय हो, पदाच्या ठिकाणी तशा प्रकारचे म्हणजे ध्वनि प्रकाशित करण्याचे सामर्थ्य असते, हे कसे काय जुळणारे आहे? कारण व्यंग्यार्थाचा बोध वाक्यातून, अखंडपणेच होतो!' अशी शंका कल्पून वृत्तिकार तिला 'काव्यातून प्रतीत होणारे' इ. वाक्याने उत्तर देतात. कारण पूर्वी[९] सांगितलेच होते की, शास्त्रीय दृष्ट्या विश्लेषण करण्याचे वेळी व्यंग्यार्थाच्या विभागांचा निर्देश करण्यात येतो.

शंका—पण काय हो, संपूर्ण वाक्यातून होणारी सौंदर्याची प्रतीति त्या वाक्याचे 'पद' या स्वरूपाचे जे भाग, त्यांच्यावर बळेच कशी लादता येईल? कारण पदे ही केवळ 'स्मारकच' असतात![१०] उत्तर-बरे, (तुमच्या म्हणण्याप्रमाणे) पदे ही स्मारकच मानली, तरी काय बिघडले? पदे ही मनाला आनंद देणाऱ्या व्यंग्य अर्थाचे स्मरण करून देणारी असल्यामुळे[११] ती पदे सौंदर्याची प्रतीति घडविण्यास कारणीभूत होतात, हे कसे काय नाकारता येईल? जसे— 'पेलव' वगैरे 'श्रुतिदुष्ट' पदे असभ्य अशा 'वृषण' वगैरे अर्थाची वाचक नसतात, तर (केवळ) स्मारकच असतात. आणि त्या स्मरणामुळे (इतर दृष्टींनी) रम्य असलेले सर्व काव्यच 'श्रुतिदुष्ट' दोषाने मलिन होते. आणि तो 'श्रुतिदुष्ट' दोष अन्वय व व्यतिरेक यांच्या आधारे[१२] ज्याप्रमाणे त्या काव्याच्या विशिष्ट भागात आहे असे समजण्यात येते, त्याप्रमाणेच येथेही समजावे (म्हणजे रम्य असा संपूर्ण वाक्याचा व्यंग्यार्थही पदांवर आरोपित केला जातो.) म्हणून वृत्तिकार 'एखादे दुसरेच अनिष्टपद ऐकल्याने' इ. म्हणतात. 'अनिष्ट (पद)' याचा अर्थ असभ्य अर्थाचे स्मरण करून देणारे (पद). 'दोष म्हणजे असुंदरपणा. गुणवत्ता म्हणजे सौंदर्य. याप्रमाणे पहिल्या सारांशात्मक श्लोकाच्या पहिल्या तीन चरणांच्या द्वारे दृष्टान्त दिल्यावर उरलेल्या चौथ्या चरणाच्या द्वारे ज्या विषयाच्या बाबतीत तो दृष्टान्त दिला, तो प्रस्तुत विषय सांगितला आहे. आता 'पदे ही स्मारकच असली' इ. दुसऱ्या श्लोकाने वृत्तिकार प्रस्तुत विषयाचा उपसंहार करितात. ज्या अर्थी इष्ट अशा व्यंग्य अर्थाचे स्मरणही सौंदर्य निर्माण करिते, त्या अर्थी पदे ही जरी केवळ स्मारकच असली तरी आतापर्यंत वर्णिलेल्या सर्वच प्रकारांत केवळ पदातूनच प्रकाशित होणाऱ्या म्हणजे 'पदप्रकाश' ध्वनीच्या सर्वच प्रकारांत रमणीयता उत्पन्न होते, असा अन्वय व अर्थ लावावा. 'तरीसुद्धा' हा शब्द काकाक्षिन्यायाने[१३] दोन्हीकडेही[१४] लावावयाचा आहे. आता सारांशात्मक श्लोकांपैकी तिसऱ्या श्लोकाने अन्वय व व्यतिरेक[१५] यांमुळे पदे ही संपूर्ण काव्यातून होणाऱ्या सौंदर्यप्रतीतीला कशी कारणीभूत होतात हे वृत्तिकार 'शोभिवंत अशा' इ. श्लोकाने सांगत आहेत.

टीपा

१) अखंडवाक्यार्थस्फोटवादी वैयाकरण व त्यांना अनुसरणारे वेदांती व प्राभाकर मीमांसक हे 'सबंध वाक्यातच वाचकत्व असते,' असे म्हणतात. त्यांच्या मते पदांना वाचकत्वाच्या दृष्टीने वाक्याहून वेगळे अस्तित्व नाही. म्हणूनच पदे ही अर्थाची 'वाचक' नसतात असे वर म्हटले आहे.

या मतामागील युक्तिवाद असा असावा —पदांचा संकेत 'सामान्य' अर्थावरच झालेला असतो. संपूर्ण वाक्यातून ध्यानात येणारा अर्थ हा विशिष्ट स्वरूपाचा असल्यामुळे त्या विशिष्ट स्वरूपाच्या अर्थावर त्यांचा संकेत कधीच झालेला नसतो. म्हणून पदे विशिष्टस्वरूपी असलेल्या वाक्यार्थाची वाचक नसतात.

अखंडवाक्यार्थवादी वैयाकरण, वेदांती आणि प्राभाकर मीमांसक यांच्या मते संपूर्ण वाक्य हेच आपल्या एकूण अर्थाचे वाचक असते. पदांना वाक्याहून वेगळे अस्तित्व नाही असेच त्यांचे मत असल्याने पदे ही वाचक असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वाक्यातले एकेक पद जसजसे कानी पडत जाते, तसतसे ते आपापल्या अर्थाची श्रोत्याला केवळ आठवण करून देते. वाक्यातले शेवटचे पद ऐकताच संपूर्ण वाक्य आपल्या एकूण अर्थाचे वाचक होते.

२) पूर्वपक्ष्याला वस्तुतः असे म्हणावयाचे आहे की ध्वनि हे 'काव्य' असल्यामुळे संपूर्ण वाक्यालाच ध्वनिसंज्ञा देता येईल, ती केवळ एका पदाला देता येणार नाही, कारण व्यंग्यार्थ हादेखील संपूर्ण वाक्यातूनच प्रतीत

होतो, एका सुट्या शब्दातून नाही. कारण सुटी पदे ही जशी संपूर्ण वाच्यार्थाची वाचक नसतात, तशी ती संपूर्ण अर्थाची व्यंजकही असू शकत नाहीत.

यावर ध्वनिवाद्याचे प्रथम असे उत्तर आहे की, पदांचे ध्वनित्व हे त्यांच्या वाचकत्वावर अवलंबून नसल्याने 'पदे ही वाचक नसल्यामुळे' हे पूर्वपक्ष्याचे म्हणणे आमच्या म्हणण्याला बाध आणीत नाही. वस्तुतः 'वाचकत्व हे ध्वनिव्यवहाराला प्रयोजक नाही' हे म्हणणे 'ध्वनि हा पदप्रकाश नसतो' हा पूर्वपक्ष्याचा आक्षेप खोडण्यास समर्थ नाही. ते म्हणणे प्रतिपक्ष्याला क्षणभर गप्प बसवावयालाच पुरेसे आहे. म्हणून अभिनवगुप्तांनी अशा उत्तराला 'छल' म्हणजे 'फसवे उत्तर' आहे* असे म्हटले आहे.

याला खरे उत्तर "ध्वनि हा संपूर्ण वाक्यातूनच प्रकाशित होत असला, तरी तो प्रकाशित करण्यात जेव्हा एखादे विशिष्ट पद **मुख्यतः** जबाबदार असते, तेव्हा त्या ध्वनीला आम्ही 'पदप्रकाश' म्हणतो" हेच आहे.

३) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'लावण्य' हे अलंकार किंवा अवयव यांहून निराळे" वर उद्‌धृत केलेले आंग्लकवी पोप याचे वाक्य.

४) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" वरील टीप १ ली.

५) पाहा, उद्‌द्योत २, कारिका ११ वी, व प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'श्रुतिदुष्टादि अनित्य दोन शृंगार व तत्सम रस-ध्वनीमध्येच वर्ज्य'" वरील लोचन.

६) वृत्तीतील 'तद्‌भाव' याचा अर्थ अभिनवगुप्तांनी 'काव्यविशेषत्व' म्हणजे विशिष्ट धर्मांनी युक्त असे काव्य असणे असा केला आहे. वृत्तीतील तद्भाव : यापूर्वीचे विशिष्टार्थप्रतिपत्तिहेतुः शब्दसंदर्भविशेषः हे शब्द पाहिले म्हणजे 'तद्‌भाव' याचा आनंदवर्धनांच्या मनातील अर्थ 'विशिष्ट अर्थाचे सूचन करणारा शब्दसमूह असणे,' हा असावा असे वाटते.

७) लोचनात 'अनाकांक्षप्रतिपत्ति' असे म्हटले आहे. आकांक्षा या शब्दाच्या अर्थासाठी प्रथमखंड उद्‌द्योत – १ पाहा, वरील दुसरी टीप पाहा. तेव्हा अनाकांक्षप्रतिपत्ति म्हणजे अर्थामध्ये स्वयंपूर्णता असणे. एका पदामध्ये अर्थाच्या दृष्टीने स्वयंपूर्णता असू शकत नाही, कारण नुसते 'बैल इतकेच म्हटले, तर 'त्यांचे काय?' ही जिज्ञासा, हा अपुरेपणा शिल्लक राहतो.

८) 'हे' म्हणजे पूर्ण अर्थाचा बोध करून देणारे 'वाक्य' च असू शकते, हे म्हणणे.

९) पूर्वी म्हणजे प्रथम खंड, "उद्‌द्योत - १ अभाववाद्यांचा पहिला वर्ग" टीप १७ मध्ये.

१०) हे आम्ही नुकतेच, वर म्हटले आहे.

११) वस्तुतः 'पेलव' हा शब्द वृषणवाचक नसून 'पेल' हा 'लाट' भाषेतील शब्द तद्वाचक आहे. पण 'पेल' ही दोन अक्षरे 'पेलव' या शब्दामध्ये अंतर्भूत असल्यामुळे 'पेलव' शब्द ऐकला की 'पेल' शब्दाच्या अर्थाची आठवण होते व म्हणून 'पेलव' सारख्या शब्दाची योजना सदोष म्हटली आहे. 'पेल' हा शब्द संस्कृत भाषेत असता तर, 'पेलव' शब्दाच्या उपयोगाला सदोष म्हणता आले असते; पण इतर सर्व प्रादेशिक भाषांचे ज्ञान कवीला असले पाहिजे ही अपेक्षा रास्त नाही.

१२) काव्यातील कोणत्याही पदातून असभ्य अर्थाची स्मृति होत असेल, तर ते सर्व काव्य श्रुतिदुष्ट दोषाने युक्त होते हा 'अन्वय' आणि कोणत्याही पदातून तशी स्मृति न झाल्यास काव्यात श्रुतिदुष्टता असत नाही, हा 'व्यतिरेक', अन्वय व व्यतिरेक यांचे स्पष्टीकरण प्रथमखंड, "उद्द्योत - १ रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही" वरील पहिल्याच टीपेमध्ये पाहा.

१३) म्हणजे कावळ्याला एकच डोळा असून तो ज्याप्रमाणे दोन्ही बाजूचे पाहण्यास उपयोगात येतो त्याप्रमाणे. 'देहलीदीपन्याया' चा अर्थही असाच आहे.

१४) दोन्हीकडे म्हणजे पदे ही स्मारक असली तरीसुद्धा आणि केवळ पदातून प्रकाशित होणाऱ्या ध्वनीच्या सर्व प्रकारांतसुद्धा, असा अर्थ.

१५) वस्तुतः वृत्तीतील तिसऱ्या परिकरश्लोकामध्ये केवळ अन्वयच आहे, व्यतिरेक नाही. एक जरी पद सुंदर अर्थ सूचित करणारे असले तरी त्यामुळे काव्याला शोभा येते, हा अन्वय आहे. यावरून एकही रमणीयार्थ सूचित करणारे पद नसेल तर काव्याला शोभा येणार नाही असा व्यतिरेक कल्पावा लागेल.

ध्वन्यालोक :

यस्त्वलक्ष्यक्रमव्यङ्ग्यो ध्वनिर्वर्णपदादिषु ।
वाक्ये सङ्घटनायांच स प्रबन्धेऽपि दीप्यते ॥ २ ॥

तत्र वर्णानामनर्थकत्वाद्द्योतकत्वमसम्भवीत्याशङ्क्येदमुच्यते—

शषौ सरेफसंयोगो ढकारश्चापि भूयसा ।
विरोधिनः स्युः शृङ्गारे ते न वर्णा रसश्च्युतः ॥ ३ ॥

त एव तु निवेश्यन्ते बीभत्सादौ रसे यदा ।
तदा तं दीपयन्त्येव तेन वर्णा रसश्च्युतः ॥ ४ ॥

श्लोकद्वयेनान्वयव्यतिरेकाभ्यां वर्णानां द्योतकत्वं दर्शितं भवति ।

ध्वन्यालोक

पण ध्वनीचा अलक्ष्यक्रम हा प्रकार मात्र वर्ण, पद, इत्यादीमधून[१] आणि वाक्य, संघटना[२] आणि प्रबन्ध[३] यांतूनही प्रकाशित होतो. ॥ २ ॥

त्यांपैकी वर्णांना अर्थ नसल्याने त्यांच्या ठिकाणी द्योतकत्व असणे हे देखील असंभवनीय आहे अशी शंका येईल, म्हणून पुढीलप्रमाणे सांगण्यात येत आहे—

श, ष्, हे वर्ण, त्याचप्रमाणे र्प, र्क अशासारखी रेफाने सुरू होणारी जोडाक्षरे, आणि द्द् हे वर्ण वारंवार वापरणे शृंगाररसाच्या बाबतीत प्रतिकूल होते. ते वर्ण शृंगाररसनिष्पत्ति करू शकत नाहीत. ॥ ३ ॥

पण तेच वर्ण जर बीभत्स वगैरे रसांच्या बाबतीत उपयोजिले गेले, तर त्या रसांचा मात्र ते परिपोष करितात. त्यामुळे ते वर्ण त्या रसांची निष्पत्ति करणारे होतात. ॥ ४ ॥

वरील दोन श्लोकांवरून अन्वय व व्यतिरेक[४] यांमुळे वर्णांच्या ठिकाणी द्योतकत्व (रसप्रकाशकत्व) असते हे सिद्ध होते.

लोचनम्

एवं कारिकां व्याख्याय तदसङ्गृहीतमलक्ष्यक्रमव्यङ्ग्यं प्रपञ्चयितुमाह-यस्त्विति । तुशब्दः पूर्वभेदेभ्योऽस्य विशेषद्योतकः । वर्णसमुदायश्च पदम् । तत्समुदायो वाक्यम् । सङ्घटना पदगता वाक्यगता च । सङ्घटितवाक्यसमुदायः प्रबन्धः इत्यभिप्रायेण वर्णादीनां यथाक्रममुपादानम् । आदिशब्देन पदैकदेशपदद्वितयादीनां ग्रहणम् । सप्तम्या निमित्तत्वमुक्तम् । दीप्यतेऽवभासते सकलकाव्यावभासकतयेति पूर्ववत्काव्यविशेषत्वं समर्थितम् ॥ २ ॥

भूयसेति प्रत्येकमभिसम्बध्यते । तेन शकारो भूयसेत्यादि व्याख्यातव्यम् । रेफप्रधानस्संयोगः र्क ह्र्ग र्द्र इत्यादिः । विरोधिन इति । परुषा । वृत्तिर्विरोधिनी शृङ्गारस्य । यतस्ते वर्णा भूयसा प्रयुज्यमाना न रसांश्च्योतन्ति स्रवन्ति । यदि वा तेन शृङ्गारविरोधित्वेन हेतुना वर्णाः शषादयो रसाच्छृङ्गाराच्च्यवन्ते तं न व्यञ्जयन्तीति व्यतिरेक उक्तः । अन्वयमाह—त एव त्विति । शादयः । तमिति बीभत्सादिकं रसम् । दीपयन्ति द्योतयन्ति । कारिकाद्वयं तात्पर्येण व्याचष्टे-श्लोकद्व येनेति । यथासंख्यप्रसङ्गपरिहारार्थं श्लोकाभ्यामिति न कृतम् । पूर्वश्लोकेन हि व्यतिरेक उक्तो द्वितीयेनान्वयः । अस्मिन्विषये शृङ्गारलक्षणे शषादिप्रयोगः सुकवित्वमभिवाञ्छता न कर्तव्य इत्येवंफलत्वादुपदेशस्य कारिकाकारेण पूर्व व्यतिरेक उक्तः । न च सर्वथा न कर्तव्योऽपि तु बीभत्सादौ कर्तव्य एबेति पश्चादन्वयः । वृत्तिकारेण त्वन्वयपूर्वको व्यतिरेक इति शैलीमनु सर्तुमन्वयः पूर्वमुपात्तः ।

एतदुक्तं भवति—यद्यपि विभावानुभावव्यभिचारिप्रतीतिसम्पदेव रसास्वादे निबन्धनम्, तथापि विशिष्टश्रुतिकशब्दसमर्प्यमाणास्ते विभावादयस्तथा भवन्तीति स्वसंवित्सिद्धमदः । तेन वर्णानामपि श्रुतिसमयोपलक्ष्यमाणार्थानपेक्ष्यपि श्रोत्रैकग्राह्यो मृदुपरुषात्मा स्वभावो रसास्वादे सहकार्येव । अत एव च सहकारितामेवाभिधातुं निमित्तसप्तमी कृता वर्णपदादिष्विति । न तु वर्णैरेव रसाभिव्यक्तिः,

विभावादिसंयोगाद्धि रसनिष्पत्तिरित्युक्तं बहुशः । श्रोत्रैकग्राह्योऽपि च स्वभावो रसनिष्यन्दे व्याप्रियत एव, अपदगीतध्वनिवत् पुष्करवाद्यनियमितविशिष्टजातिकरण घ्राणाद्यनुकरणशब्दवच्च ।

लोचन

याप्रमाणे (पहिल्या) कारिकेचे विवरण केल्यानंतर त्या कारिकेत ध्वनीच्या ज्या प्रकाराचा निर्देश झाला नव्हता, त्या 'अलक्ष्यक्रमव्यंग्य' प्रकाराचे सविस्तर विवरण करण्यासाठी (कारिकाकार) 'पण ध्वनीचा' इ. कारिका सांगतात.[५] (दुसऱ्या) कारिकेतील 'पण' हा शब्द ध्वनीच्या यापूर्वी (म्हणजे कारिका १ मध्ये) सांगितलेल्या प्रकाराहून आता सांगितला जाणारा (असंलक्ष्यक्रमव्यंग्य हा) प्रकार निराळा आहे हे सुचवितो. 'पद' म्हणजे वर्णाचा समुदाय[६] आणि 'वाक्य' म्हणजे पदांचा समुदाय होय. संघटना ही पदामध्ये असू शकते.[७] आणि वाक्यामध्येही असू शकते.[८] परस्परांशी संबद्ध[९] असलेल्या वाक्यांचा समूह म्हणजे प्रबंध. या अभिप्रायाने कारिकाकारांनी 'वर्ण' वगैरे शब्दांचा उल्लेख या विशिष्ट क्रमाला अनुसरून केला आहे. 'इत्यादींमधून' यातील 'इत्यादि' शब्दाने पदाचा अंश,[१०] दोन किंवा अधिक पदांचा समूह यांचा निर्देश झाला आहे असे समजावे. **वर्णपदादिषु, वाक्ये** इ. पदांमधील सप्तमीचा प्रत्यय हा निमित्ताचा[११] वाचक आहे. **दीप्यते** म्हणजे 'प्रकाशित होतो' म्हणजे सर्व काव्याला उजळवून टाकतो. अशा रीतीने 'ध्वनि म्हणजे विशिष्ट प्रकारचे काव्य' या मताला मागच्या प्रमाणेच[१२] दुजोरा दिला गेला ॥ २ ॥

'वारंवार' या शब्दाचा अन्वय कारिकेत निर्देशिलेल्या प्रत्येक वर्णाशी करावा. त्यामुळे वारंवार वापरला गेलेला श्, वारंवार वापरला गेलेला ष्, यांप्रमाणे विवरण करावे. रेफाने युक्त म्हणजे रेफाचे प्रामुख्य असलेली र्क, र्ग्ग, र्द्र यांसारखी जोडाक्षरे.[१३] प्रतिकूल—'परुषा'वृत्ति (म्हणजे कठोर वर्णांचा अनुप्रास[१४]) शृंगाररसाला बाधक होय. कारण ते (म्हणजे कारिकेत सांगितलेले श्, ष्, इ.) वर्ण पुन्हा पुन्हा वापरले, तर ते कोमल रसांची निष्पत्ति करीत नाहीत, म्हणजे त्यांतून कोमल रस स्रवत नाहीत किंवा त्यामुळे म्हणजे ते वर्ण शृंगाराला प्रतिकूल असतात या कारणामुळे श्, ष् वगैरे वर्ण शृंगाररसापासून च्युत होतात म्हणजे शृंगाररसाचे व्यंजक होत नाहीत. अशा रीतीने (कोणताही पाठ घेतला,[१५] तरी) या कारिकेत व्यतिरेक पद्धतीने विधान केले आहे. आता (चवथ्या कारिकेत) कारिकाकार 'मात्र तेच' इ. शब्दांनी अन्वय पद्धतीने विधान करीत आहेत. तेच म्हणजे श् इ. वर्ण. 'त्या' म्हणजे बीभत्स वगैरे[१६] रसांना. 'प्रकाशित करितात' म्हणजे त्यांचे व्यंजकच होतात 'श्लोकांच्या जोडीच्या योगाने' इ. शब्दांनी वृत्तिकार ३ व ४ या कारिकांचे तात्पर्य सांगून विवरण करितात. वृत्तीमध्ये 'दोन श्लोकांच्या योगाने' असे न म्हणता वृत्तिकारांनी 'श्लोकांच्या जोडीच्या योगाने' असे म्हटले आहे. याचे कारण असे की, पहिल्यात अन्वय व दुसऱ्यात व्यतिरेक असा वृत्तीतील अन्वय व व्यतिरेक या शब्दांचा संबंध कारिका ३ व ४ यांच्याशी अनुक्रमाने जोडला जाऊ नये. कारण पहिल्या कारिकेने 'व्यतिरेक' सांगितला असून दुसऱ्या कारिकेने 'अन्वय' दाखविला आहे. चालू म्हणजे शृंगाररस या विषयाच्या संदर्भात श्, ष्, इत्यादींचा वापर श्रेष्ठ कवि होण्याची आकांक्षा बाळगणाऱ्याने करू नये हे सांगणे हे कारिका ३ मध्ये केलेल्या विधानाचे उद्दिष्ट असल्यामुळे कारिकाकारांनी आधी व्यतिरेक सांगितला आणि या वर्णांचा वापर केव्हाच करू नये असे नाही, तर बीभत्स वगैरे रसांच्या बाबतीत तो अवश्य करावाच असा कारिकाकारांचा अभिप्राय असल्यामुळे त्यांनी नंतर (म्हणजे कारिका चार मध्ये) अन्वयपद्धतीने विधान केले. पण वृत्तिकारांनी मात्र आधी अन्वय व मग व्यतिरेक या वहिवाटीप्रमाणे चालण्यासाठी[१७] आधी अन्वयाचा उल्लेख केला.

(कारिका ३ व ४) या लिहिण्यामध्ये कारिकाकारांचा उद्देश असा आहे—विभाव, अनुभाव व व्यभिचारिभाव यांची यथायोग्य प्रतीति हीच जरी रसास्वादाला कारण होत असली तरीसुद्धा त्या विभावादिकांचे प्रतिपादन जर विशिष्ट वर्णांनी युक्त असलेल्या शब्दांमधून केलेले असले, तरच ते विभावादिक तसे' म्हणजे रसास्वादाला कारणीभूत होतात ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. त्यामुळे वर्ण जेव्हा कानांवर पडतात, त्यावेळी ध्यानात येणारे त्या वर्णांचे कर्णेन्द्रियानेच ग्रहण करिता येण्याजोगे जे कोमल किंवा कठोर या प्रकारचे स्वरूप, (ते स्वरूप) त्यांचा वाच्यार्थ जरी श्रोत्याच्या ध्यानात आला नाही तरी रसास्वादाला उपकारक होते यात शंका नाही. म्हणूनच **वर्णपदादिषु** ही निमित्तवाचक सप्तमी योजिण्यामागील हेतु ते वर्ण रसास्वादाला केवळ मदत करणारेच असतात हे सांगणे हा आहे. मात्र रसाची अभिव्यक्ति ही केवळ वर्णामुळेच होत नाही, तर खरी रसनिष्पत्ति विभाव, अनुभाव इत्यादिकांच्या संयोगामुळेच होते हे यापूर्वी पुष्कळ वेळा सांगून झाले आहे.[१८] अर्थात वर्णांचे जे केवळ कर्णेन्द्रियाद्वारे ग्रहण करता येणारे स्वरूप, तेही रसप्रतीति घडविण्याच्या कामी उपयोगाला येतेच. (कसे म्हणाल, तर) सार्थ शब्द न वापरताही म्हटलेल्या गाण्यातील आलाप वगैरेंप्रमाणे. तसेच मृदंगवाद्याने नियंत्रित केलेल्या विशिष्ट जाति,[१९] हातापायांच्या हालचाली व नासिका, नेत्र, भुवया आणि ओठ यांनी केले जाणारे अभिनय हे[२०] जसे रसाभिव्यक्तीस उपकारक होतात, त्याप्रमाणेच.

टीपा

१) 'इत्यादि' या शब्दाने सामासिक पदाचा अवयव (पदैकदेश), किंवा दोन किंवा अधिक पदांचा समूह आणि सामासिक असलेल्या किंवा नसलेल्या पदाचे प्रकृति व प्रत्यय हे विभाग सुचविले जातात.

२) 'संघटने'च्या स्वरूपाचे विवरण पुढे कारिका ५ मध्ये आले आहे.

३) प्रबन्ध म्हणजे एखादे स्फुट वाक्य नव्हे, किंवा श्लोक नव्हे, तर अनेक संघटित वाक्यांचा किंवा श्लोकांचा बनलेला काव्यग्रन्थ.

४) ते (श्, ष्, इ.) वर्ण असले की बीभत्सादि रसांची प्रतीति होते हा अन्यय (कारिका ४) आणि ते वर्ण नसले, तर बीभत्सादि रसांची प्रतीति होत नाही, किंवा शृंगारादिकांच्या प्रतीतीला बाध येत नाही हा व्यतिरेक (कारिका ३).

५) "उद्द्योत – ३ 'अविवक्षितवाच्य ध्वनीच्या अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य प्रकारांच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे'" वरील ९ वी टीप पाहा. प्रस्तुत वाक्यात पहिल्या कारिकेचे विवरण केल्यानंतर असे शब्द आहेत, हे विवरण वृत्तिकारांनी केले आहे, आणि 'पण ध्वनीचा' इ. कारिका वृत्तिकारांनी सांगितली नसून कारिकाकारांनी सांगितली आहे. १ ल्या कारिकेचे विवरण करणारी व्यक्ति व २ री कारिका लिहिणारी व्यक्ति एकच असली पाहिजे असे अभिनवगुप्तांचे मत असावे असे म्हणावे लागते. पाहा, पाणिनीचे '**समानकर्तृकयोः पूर्वकाले ।** (३–४–२१) हे सूत्र. पण मागे "उद्द्योत – ३ 'अविवक्षितवाच्य ध्वनीच्या अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य प्रकारांच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे'" वरील कर्ते वेगळे असताना' इ. विधानावरून कारिकाकार व वृत्तिकार भिन्न असावेत असे अभिनवगुप्तांचे मत होते असे दिसते.

६) कारिका २ मध्ये 'पद' या शब्दापूर्वी 'वर्ण' हा शब्द आहे. त्याचे विवरण अभिनवगुप्तांनी केलेले नाही. वर्ण म्हणजे एकेक सुटे अक्षर.

७) पदामध्ये असू शकणारी संघटना ते पद सामासिक आहे किंवा नाही यावर अवलंबून आहे (पाहा, हाच उद्‌द्योत, कारिका ५ वीं)


८) वाक्यामधील संघटना म्हणजे नक्की काय, याचे विवरण अभिनवगुप्तांनी केलेले नाही. तेव्हा वाक्यात सर्वत्र एकाच प्रकारची संघटना वापरल्यास ती कंटाळवाणी होते, म्हणून तीत मधूनमधून बदल करणे असा काहीतरी 'वाक्यगत संघटना' याचा अर्थ मानावा लागतो; किंवा एकाच विषयाचे प्रतिपादन करणारी अनेक वाक्ये एकमेकांशी आकांक्षा, योग्यता व संनिधि या धर्मांनी महावाक्य या रूपात बांधली गेलेली असणे, असाही वाक्यगत संघटना याचा अर्थ लावता येईल.

९) प्रबंधातील महावाक्यांचा परस्परांशी संबंध म्हणजे ती महावाक्ये तर्कदृष्ट्या एकमेकांशी सुसंबद्ध असणे.

१०) पदाचा अंश म्हणजे प्रकृति अगर प्रत्यय हा भाग किंवा सामासिक पदाचा 'घटकपद' हा भाग.

११) निमित्त म्हणजे सहकारी कारण.

१२) मागच्याप्रमाणे म्हणजे द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ ध्वनि 'पदप्रकाश' कसा असू शकेल ही शंका व तिचे समाधान" वरील वृत्तीत सांगितल्याप्रमाणे.

१३) कारिकेतील **सरेफसंयोगः** याचा सरळ अर्थ 'रेफयुक्त जोडाक्षर' म्हणजे र्पू किंवा प्र्, र्क् किंवा क्र् अशा दोन्ही प्रकारची जोडाक्षरे. पण अभिनवगुप्तांनी '**रेफप्रधान** जोडाक्षरे' असे म्हणून  ही उदाहरणे देऊन रेफ प्रथम स्थानी असलेली जोडाक्षरे' असा केला आहे. पण द्वितीयस्थानी र असलेल्या क्र्, प्र्, त्र, यासारख्या जोडाक्षरांची पुनरावृत्ति सुद्धा शृंगार रसाला बाधक होईल.

१४) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" वरील टीप ७ वी.

१५) अभिनवगुप्तांनी केलेल्या दोन विवरणांवरून त्यांच्यापुढे तिसऱ्या कारिकेत रसश्च्युतः (रसस्रावी) आणि रसच्युतः (म्हणजे रसाभिव्यक्तीपासून ढळणारे) हे दोन्ही पाठ असावेत असे दिसते. अभिनवांच्या विवरणाचा आशय लक्षात घेऊन आम्ही ३ व ४ या दोन्ही कारिकांत **रसश्च्युतः** हा पाठ स्वीकारला आहे. क. ल. वि. मध्येही हाच पाठ दोन्ही कारिकांत आहे. पण ४ थ्या कारिकेतही **रसश्च्युतः** हा पाठ कल्पिला, तर ते न **वर्णा रसश्च्युतः** म्हणजे ते श्, ष् इ. वर्ण बीभत्सादि रसांची हानि करीत नाहीत असा अर्थ करावा लागेल.

१६) वगैरे म्हणजे वीर, रौद्र इ.

१७) वृत्तिकारांनी केवळ वहिवाटीला अनुसरण्यासाठीच 'अन्वयव्यतिरेकाभ्याम्' असे म्हटले असेल असे नाही, तर अल्पाच्तरम् । (२–२–३४) या पाणिनिसूत्राप्रमाणे 'अन्वय' या शब्दात 'व्यतिरेक' या शब्दापेक्षा

कमी स्वर असल्यामुळेही त्यांनी 'अन्वयव्यतिरेकाभ्याम्' या द्वंद्व समासात 'अन्वय' हा शब्द आधी वापरला असणे शक्य आहे.

१८) उदा. वृत्ति, (प्रथमखंड) "उद्‌द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'".

१९) जाति हा शब्द 'लोचनात' पूर्वी आला आहे. पाहा, प्रथम खंड "उद्‌द्योत – १ 'प्रतीयमान अर्थाचे अस्तित्व सिद्ध करणारे आणखी एक कारण'" त्या शब्दावरील त्याच्यापुढेच दिलेली ५ वी टीप ही पाहा.

२०) येथे घ्राणाद्यनुकरण यानंतर शब्द असा पाठ आहे, पण तो लेखकप्रमाद वाटतो. कारण हातापायांच्या हालचाली, घ्राण इत्यादींनी केले जाणारे अभिनय यांच्या बाबतीत शब्दांचा म्हणजे आवाजाचा काहीही संबंध दिसत नाही. ध्वन्यालोक, काशी आवृत्ति, पृ. ४१७ वर वृत्तीमध्ये **अशब्दस्यापि चेष्टादेः अर्थप्रकाशनप्रसिद्धेः ।** असेच म्हटले आहे.

ध्वन्यालोकः

पदे चालक्ष्यक्रमव्यङ्ग्यस्य द्योतकत्वं यथा
'उत्कम्पिनी भयपरिस्खालितांशुकान्ता
ते लोचने प्रतिदिशं विधुरे क्षिपन्ती ।
क्रूरेण दारुणतया सहसैव दग्धा
धूमान्धितेन दहनेन न वीक्षितासि ॥'
अत्र हि ते इत्येत्पदं रसमयत्वेन स्फुटमेवावभासते सहृदयानाम् ।

ध्वन्यालोक

आणि अलक्ष्यक्रमव्यंग्य (एका) पदातूनही प्रकाशित होतो याचे उदाहरण–

'थरथर कापणाऱ्या, भयाने पदर ढळलेल्या, अतिशय भयभीत झालेली आपली 'ती' नजर चहूकडे भिरभिर फिरवणाऱ्या तुला क्रूर अग्नीने निर्दयपणे तडकाफडकी जाळून टाकले. धुराने डोळे अंध झाल्यामुळे त्या अग्नीला तू दिसलीही नाहीस[१]!'

या श्लोकातले 'ती' हे पद विशेष रसनिष्पति करणारे आहे हे सहृदयांच्या स्पष्टपणेच प्रत्ययास येते.

लोचनम्

पदे चेति । पदे च सतीत्यर्थः । तेन रसप्रतीतिर्विभावादेरेव । ते विभावादयो यदा विशिष्टेन केनापि पदेनार्प्यमाणा रसचमत्कारविधायिनो भवन्ति तदा पदस्यैवासौ महिमा समर्प्यत इति भावः । अत्र हीति । वासवदत्तादाहाकर्णनप्रबुद्धशोकनिर्भरस्य वत्सराजस्येदं परिदेवितवचनम् । तत्र च शोको नामेष्टजनविनाशप्रभव इति । तस्य जनस्य ये भ्रूक्षेपकटाक्षप्रभृतयः पूर्वं रतिविभावतामवलम्बन्ते स्म त एवात्यन्तविनष्टाः सन्त इदानीं स्मृतिगोचरतया निरपेक्षभावत्वप्राणं करुणमुद्दीपयन्ति इति स्थितम् । ते

लोचने इति तच्छब्दस्तल्लोचनगतस्वसंवेद्याव्यपदेश्यानन्तगुणगणस्मरणाकारद्योतको रसस्यासाधारणनिमित्ततां प्राप्तः । तेन यत्केनचिच्चोदितं परिहृतं च तन्मिथ्यैव । तथाहि चोद्यम्— प्रक्रान्तपरामर्शकस्य तच्छब्दस्य कथमियति सामर्थ्यमिति । उत्तरं च रसाविष्टोऽत्र पराम्रष्टेति । तदुभयमनुत्थानोपहतम् । यत्र ह्यनूद्दिश्यमानधर्मान्तरसाहित्ययोग्यधर्मयोगित्वं वस्तुनो यच्छब्देनाभिधाय तद्बुद्धिस्थधर्मान्तरसाहित्यं तच्छब्देन निर्वाच्यते, यत्रोच्यते— 'यत्तदोर्नित्यसंबन्धत्वम्' इति, तत्र पूर्वप्रक्रान्तपरामर्शकत्वं तच्छ ब्दस्य । यत्र पुनर्निमित्तोपनतस्मरणविशेषाकारसूचकत्वं तच्छब्दस्य स घट इत्यादौ यथा, तत्र का परामर्शकत्वकथेत्यास्तामलीकपरामर्शकैः पण्डितंमन्यैः सह विवादेन । उत्कम्पिनीत्यादिना तदीयभयानुभावोत्प्रेक्षणम् । मयाऽनिर्वाहितप्रतिकारमिति शोकावेगस्य विभावः । ते इति सातिशयविभ्रमैकायतनरूपे अपि लोचने विधुरे कांदिशीकतया निर्लक्षे क्षिपन्ती कस्त्राता क्वासावार्यपुत्र इति । तयोर्लोचनयोस्तादृशी चावस्थेति सुतरां शोकोद्दीपनम् । क्रूरेणेति । तस्यायं स्वभाव एव । किं कुरुतां, तथापि च धूमेनान्धीकृतो द्रष्टुमसमर्थ इति । न तु सविवेकस्येदृशानुचितकारित्वं संभाव्यते, इति स्मर्यमाणं तदीयं सौन्दर्यमिदानीं सातिशयशोकावेशविभावतां प्राप्तमिति, 'ते' । शब्दे सति सर्वोऽयमर्थो निर्व्यूढः । एवं तत्र तत्र व्याख्यातव्यम् ।

लोचन

आणि (एका) पदातूनही म्हणजे काव्यात विशिष्ट प्रकारचे (एक) पद (सहकारी कारण) असताना त्यातूनही (रसनिष्पत्ति होते) असा अर्थ. त्यामुळे रसांची प्रतीति ही मुख्यतः विभावादिकांपासून होते. (पण) त्या विभावादिकांचे प्रतिपादन एखादे खास पद योजून केल्यामुळे काव्यामधून जेव्हा लोकोत्तर आनंद देणारी रसाची प्रतीति येते, तेव्हा ही प्रतीति घडविण्याचे श्रेय त्या पदालाच देण्यात येते हा भावार्थ.

'या श्लोकातले' इ — (लावाणकदाहामध्ये) वासवदत्ता जळून मेली हे वृत्त ऐकून प्रदीप्त झालेल्या शोकाने व्याकुळ होऊन वत्सराज उदयनाने विलाप करिताना काढलेले हे उद्‌गार आहेत. आता 'शोक' हा प्रिय माणसाच्या मृत्यूमुळे उत्पन्न होतो, म्हणून त्या प्रिय व्यक्तीचे भ्रूविलास, कटाक्ष इ. जे पूर्वी नायकाच्या रतीचे विभाव होत असत, ते आता पूर्णपणे नाहीसे झाले असल्यामुळे केवळ स्मृतिरूपानेच उरतात. म्हणून व पुनर्भेटीची[२] आशा नसणे[३] हाच ज्याचा गाभा आहे अशा शोकाचे उद्दीपन करितात[४] अशी वस्तुस्थिति आहे. 'ती नजर' यातील 'ती' हा शब्द त्या वासवदत्तेच्या नजरेत जी असंख्य वैशिष्ये होती व जी अवर्णनीय असून केवळ उदयनाने स्वतः अनुभवलेली होती, त्या वैशिष्ट्यांचे (उदयनाला होणारे) स्मरण सुचवितो. म्हणून 'ती' हा शब्द (वाचकाचे ठिकाणी) रसाची निष्पत्ति करणारे अनन्यसाधारण कारण झाला आहे. 'ती' या शब्दाचा अर्थ असा असल्यामुळे कोणातरी टीकाकाराने जी शंका उपस्थित करून तिचा पुढीलप्रमाणे परिहारही केला आहे, ती शंका व तिचे उत्तरही अनाठायीच होत. त्याने उपस्थित केलेली शंका अशी— 'तत्' हे सर्वनाम केवळ प्रस्तुत विषयाचा मागाहून निर्देश करण्यासाठी वापरले जाते. तेव्हा त्या सर्वनामामध्ये इतका अर्थ सुचविण्याचे सामर्थ्य कसे असेल? या शंकेला त्याने उत्तर दिले आहे ते असे की, या ठिकाणी 'ती' हा शब्द उच्चारणारा वक्ता स्वतः शोकाने व्याकुळ झालेला आहे म्हणून त्याला 'ती नजर' यापूर्वी, 'जी मी पूर्वी अनुभवली होती' इतके म्हणण्याचे भान राहिले नाही.[५] या दोन्ही गोष्टी म्हणजे शंका व तिचा परिहार उत्पन्न होण्यास कारणच नाही.[६] कारण (जो विद्वान् असतो तो पूज्य असतो यासारख्या) एखाद्या जोडवाक्यात एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी असलेल्या व त्या जोडवाक्यातील घटक वाक्यांपैकी दुसऱ्या वाक्यात सांगण्यात येणार असलेल्या (पूज्यत्व या सारख्या) धर्माशी (त्याचे कारण असल्यामुळे) साहचर्य पावण्यास योग्य असणाऱ्या (विद्वत्ता या) धर्माने ती व्यक्ति युक्त आहे असे 'तो' या शब्दाने सुरू होणाऱ्या

दुसऱ्या घटकवाक्यात सांगितले जाते.[७] अशी परिस्थिति ज्या जोडवाक्याच्या बाबतीत असते, तेथे 'जो व तो यांचा अतूट संबंध असतो' हा नियम लागू पडतो आणि अशा जोडवाक्यांच्या बाबतीतच 'तो' हे सर्वनाम पूर्वी 'जो' या सर्वनामाने निर्देशिलेल्या व्यक्तीचा मागाहून निर्देश करणारे असते. पण ज्या ठिकाणी 'तो' हे सर्वनाम प्रसंगाने आठवलेल्या विशिष्ट गोष्टीचेच सूचन करिते, जसे– 'तो घडा' इ. उदाहरणात. त्या ठिकाणी 'तो' या सर्वनामाने पूर्वी निर्देशिलेल्या गोष्टीचा मागाहून निर्देश करण्याचा प्रश्नच कोढून उत्पन्न होतो[८]? म्हणून चुकीच्या पद्धतीने विचार करीत बसणाऱ्या तथाकथित विद्वानांशी[९] वादविवाद करणे पुरे झाले.

'थरथर कापणाऱ्या' वगैरे शब्दांनी वासवदत्तेच्या ठिकाणचे (उदयनाने प्रत्यक्ष न पाहिलेले, पण) कल्पिलेले भयाचे अनुभाव वर्णिले जात आहेत. तिचे भय मी दूर करू शकलो नाही हा विचार उदयनाच्या शोक या स्थायीभावाचा उद्दीपन विभाव होय. 'ते' म्हणजे परमसुंदर विलासांचे एकमेव निधान असलेले डोळेही भयभीत म्हणजे कोणीकडे जावे हे न सुचल्यामुळे शून्य झालेले. ती वासवदत्ता 'कोण माझे रक्षण करील, माझे आर्यपुत्र कोठे आहेत?' अशा विचाराने (ते डोळे) इकडेतिकडे वळवीत होती. तशा अनुपमेय सुंदर डोळ्यांची अशी अवस्था होणे हा विचार उदयनाच्या शोकाला अधिकचं वृद्धिंगत करणारा आहे. 'क्रूर अग्नीने'– हा त्या अग्नीचा स्वभावच आहे. तो तरी त्या स्वभावापुढे काय करणार? पण (त्या अग्नीनेही आपल्या क्रूर स्वभावामुळेच तुला जाळले असे नाही, तर) धुराने तोही आंधळा झाल्यामुळे तू त्याला दिसू शकली नाहीस म्हणून (तुला जाळून टाकण्याचे कृत्य त्याच्या हातून घडले), नाहीतर (कोणत्याही) विवेकी व्यक्तीच्या हातून असले अयोग्य वर्तन घडणे संभवनीय नाही. अशा रीतीने तिच्या सौंदर्याची आता आठवण झाली असताना ते सौंदर्य उदयनाच्या पराकाष्ठेच्या शोकावेगाचा उद्दीपनविभाव झाले आहे, असा आशय. 'ती (नजर)' हे शब्द वापरले असल्यामुळेच उदयनाच्या उद्‌गारातील हा सर्व आशय सुचविला जातो. असेच यासारख्या सर्व उदाहरणांचे बाबतीत (विशिष्ट एकेकट्या पदांनी सुचविल्या गेलेल्या आशयाचे) विवरण करावे.

टीपा

१) हा श्लोक 'मायुराज' याच्या 'तापसवत्सराज' नाटकाच्या २ ऱ्या अंकातील आहे.

२) पाहा, भरत, नाट्यशास्त्र, ६–४५ व ४६ यांमधील गद्य भाग. (रसभावविचार, कंगले आवृत्ति, पृ. २५७)

३) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'पारध्याने क्रौञ्चपक्ष्यांच्या जोडप्यापैकी नर मारला की मादी? (टीप ४)"१ वरील ८ वी टीप.

४) तुलनार्थ पाहा, ध्वन्यालोक, काशी आवृत्ति पृ. ३७६ वरील **यतः प्रकृतिमधुरा पदार्थाः** (कारण स्वभावतःच प्रिय असणाऱ्या गोष्टींना...) इ वृत्तीतील वाक्य.

५) टीकाकारांचा अभिप्राय असा की, 'जी मी पूर्वी अनुभवली होती' हे शब्द बोलणाऱ्याने प्रत्यक्ष उच्चारले नसले तरी ते त्याच्या मनामध्ये आहेतच. त्यामुळे 'अनंत वैशिष्ट्ये' इ. अर्थ 'ती 'याशब्दाने व्यंग्य होत नसून 'जी नजर मी पूर्वी अनुभवली होती' या (अध्याहृत) शब्दांनी वाच्यच झाला आहे.

६) **अनुत्थानोपहत** पा शब्दाचा उपयोग प्र. खंड, "उद्‌द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वर लोचनात आला आहे.

७) वरील लांबलचक व गुंतागुंतीच्या विधानाचा थोडक्यात आशय असा—विद्वत्व आणि पूज्यत्व यांसारख्या दोन धर्मांचे साहचर्य वरील जोडवाक्यातल्या जो आणि तो या शब्दांनी सुरू होणाऱ्या दोन वाक्यांत सांगितले आहे. त्या दोन धर्मांपैकी विद्वत्त्व ही धर्म कारण आहे, आणि पूज्यत्व ही धर्म त्याचे कार्य आहे. म्हणून त्या दोन धर्मांमध्ये साहचर्य असते.

८) सामान्यतः 'तो' या सर्वनामाला 'जो' या सर्वनामाची अपेक्षा असली तरी (१) ज्या विषयाचे वर्णन आधीच सुरू झाले आहे (प्रक्रान्त), (२) जो विषय लोकांना सुपरिचित आहे (प्रसिद्ध) आणि (३) जो विषय वक्त्याने स्वतः अनुभवलेला असतो, या तीन विषयांचे बाबतीत 'ती' या सर्वनामाला 'जो' या सर्वनामाची अपेक्षा नसते. पाहा, व्यक्तिविवेक, विमर्श २, पृ. १९९ हिंदी संस्करण.

९) 'तथाकथित विद्वान्' या शब्दांनी अभिनवगुप्तांनी भट्टनायकाचा निर्देश केला असावा असे वाटते, कारण भट्टनायक ही केवळ अभिधाव्यापार मानणारा आहे, व्यंजनाव्यापार मानणारा नाही. या संदर्भात पाहा, प्रथमखंड "उद्‌द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार" वरील टीप ५ वी.

'ती नजर' यातील 'तो' हा शब्द 'मी पूर्वी अनुभवलेली' हा अर्थ अभिधेनेच प्रकट करतो असे टीकाकाराचे मत. पण हे मान्य केले तरी त्या नजरेतील केवळ वक्त्यालाच जाणवलेले असंख्य गुण अभिधेनेच वाचकाच्या लक्षात येणे शक्य नाही. सहृदयाला स्वतःच्या प्रतिभेनेच ती नजर कशी असेल याची कल्पना करावी लागते, म्हणून वाचकाला या गुणांची व्यंजनेनेच कल्पना येते हे अभिनवगुप्तांचे म्हणणे योग्य वाटते. या संबंधात प्रथमखंड, उद्‌द्योत – २ "अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार" वर' सुचविलेले म्हणजे साक्षात बोलून न दाखविलेले' या शब्दांनी सुरू झालेले व त्याच्यापुढील परिच्छेदात अखेरचे लोचनातील विवेचन व त्यावरील ११ वी टीप पाहा.

ध्वन्यालोकः

पदावयवेन द्योतनं यथा—
'व्रीडायोगान्नतवदनया संनिधाने गुरूणां
बद्धोत्कम्पं कुचकलशयोर्मन्युमन्तर्निगृह्य ।
तिष्ठेत्युक्तं किमिव न तया यत्समुत्सृज्य बाष्पं
मय्यासक्तश्चकितहरिणीहारिनेत्रत्रिभागः ॥'
इत्यत्र त्रिभागशब्दः ।

ध्वन्यालोक

एका पदाच्या अवयवाने (देखील) रसादींचे प्रकाशन होऊ शकते, याचे उदाहरण—

"वडील माणसे जवळ होती म्हणून तिने लज्जेने आपले मुख खाली केले होते. माझ्यावरील रागामुळे[१] तिचा ऊर वरखाली होत होता. तो राग तिने (कसाबसा) आतल्या आत आवरून मला 'थांब (जाऊ नकोस)' असेच म्हटले नाही का? कारण अश्रू गाळून तिने वावरलेल्या हरिणीच्या डोळ्यांप्रमाणे मनोहर असलेल्या आपल्या डोळ्याचा कटाक्ष (एक तृतीयांश भाग) मजवर खिळवला.

या उदाहरणातल्या समासाचा अवयव असलेला 'त्रिभाग' (एक तृतीयांश भाग) हा शब्द व्यंजक आहे.

लोचनम्

त्रिभागशब्द इति । गुरुजनमवधीर्यापि सा मां यथा तथापि साभिलाषमन्युदैन्यगर्भमधुरं[२] विलोकितवतीत्येवं स्मरणेन परस्परहेतुकत्वप्राणप्रवासविप्रलम्भोद्दीपनं त्रिभागशब्दसंनिधौ स्फुटं भातीति ।

लोचन

'त्रिभाग' हा शब्द—वडील माणसे जवळ आहेत याकडे तिने दुर्लक्षही केले व काहीही करून तिने अभिलाष, कोप, असहायता यांनी निर्भर असल्यामुळे सुंदर[२] दिसणाऱ्या नजरेने माझ्याकडे पाहिले, असे नायकाला स्मरण झाल्यामुळे (दोघा प्रेमिकांना) आपण एकमेकांचे जीवितसर्वस्व आहोत असे वाटणे हे जिचे सार आहे अशा प्रवासविप्रलंभ रतीचे उद्दीपन 'त्रिभाग' शब्दाच्या सांनिध्यामुळे होत असल्याचे वाचकांच्या स्पष्टपणे प्रत्ययास येते.

टीपा

१) तिने 'जाऊ नको' असे मला म्हटले असताही मी प्रवासाला जायला उद्युक्त झाली, यामुळे तिचा माझ्यावरील राग.

२) काशी आवृत्तीमध्ये गर्वमन्थरम् असा पाठ आहे, पण आम्ही काव्यमाला संस्करणातील गर्भमधुरम् हा पाठ स्वीकारला आहे; कारण प्रस्तुत श्लोकामध्ये 'गर्व' या मनोवृत्तीला काही आधार नाही.

ध्वन्यालोकः

वाक्यरूपश्चालक्ष्यक्रमव्यङ्ग्यो ध्वनिः शुद्धोऽलंकारसंकीर्णश्चेति द्विधा मतः । तत्र शुद्धस्योदाहरणं यथा रामाभ्युदये— 'कृतककुपितैः' इत्यादिश्लोकः । एतद्धि वाक्यं परस्परानुरागं परिपोषप्राप्तं प्रदर्शयत्संवत एव परं रसतत्त्वं प्रकाशयति ।

अलंकारान्तरसंकीर्णो यथा— 'स्मरनवनदीपूरणोढाः' इत्यादि श्लोकः । अत्र हि रूपकेण यथोक्तव्यञ्जकलक्षणानुगतेन प्रसाधितो रसः सुतरामभिव्यज्यते ।

ध्वन्यालोक

वाक्यातून प्रकाशित होणारा 'असंलक्ष्यक्रम' ध्वनि दोन प्रकारचा मानला आहे– १) शुद्ध, २) अलंकाराने युक्त. त्यांपैकी पहिल्या म्हणजे शुद्ध प्रकाराचे उदाहरण 'रामाभ्युदया'[१] मधील '(माझी आई) तुझ्यावर अनेक वेळा लटके रागावली' इ. श्लोक.

हे सगळेच वाक्य (म्हणजे त्यातील एखादाच शब्द नव्हे) (राम व सीता यांचे) परस्परांवरचे प्रेम परिणतावस्थेला गेलेले दाखवून पराकाष्ठेचा (विप्रलंभशृंगार हा) रस अभिव्यक्त करीत आहे.

(असंलक्ष्यक्रमव्यंग्यध्वनि) एखाद्या अलंकाराने युक्त असतानाचे उदाहरण– "प्रीतिरूपी नदीच्या नव्या पुरामुळे एकमेकांसमोर वाहून आणलेले" इ. श्लोक. या उदाहरणात व्यंजक अलंकाराच्या पूर्वी (उद्द्योत २, कारिका १८ व १९ यांमध्ये) सांगितलेल्या लक्षणांनी युक्त असलेल्या रूपक अलंकारांमुळे सुशोभित झालेला (अभिलाष-विप्रलंभ हा) रस उत्कटतेने अभिव्यक्त होतो.

लोचनम्

वाक्यरूपश्चेति । प्रथमानिर्देशेनाव्यतिरेकनिर्देशस्यायमभिप्रायः । वर्णपदतद्भागाविषु सत्स्वेवालक्ष्यक्रमो व्यङ्ग्यो निर्भासमानोऽपि समस्तकाव्यव्यापक एव निर्भासते । विभावादिसंयोगप्राणत्वात् । तेन वर्णादीनां निमित्तत्वमा त्रमेव । वाक्यं तु ध्वनेरलक्ष्यक्रमस्य न निमित्ततामात्रेण वर्णादिवदुपकारि । किं तु समग्रविभावादिप्रतिपत्तिव्यापृतत्वाद्रसादिमयमेव तन्निर्भासत, इति वाक्य इत्येतत्कारिकयां न निमित्तसप्तमीमात्रम् । अपि त्वनन्यत्रभावविषयार्थमपीति । शुद्ध इत्यर्थालंकारेण केनाप्यसंमिश्रः ।

'कृतककुपितैर्बाष्पाम्भोभिः सदैन्यविलोकितै–
र्वनमपि गता यस्य प्रीत्या धृताऽपि तथाम्बया ।
नवजलधरश्यामाः पश्यन् दिशो भवतीं विना
कठिनहृदयो जीवत्येव प्रिये स तव प्रियः ॥'

अत्र तथा तैस्तैः प्रकारैर्मात्रा धृतापीत्यनुरागपरवशत्वेन गुरुवचनोल्लङ्घनमपि त्वया कृतमिति । प्रिये, प्रिय इति परस्परजीवितसर्वस्वाभिमानात्मको रतिस्थायिभाव उक्तः । नवजलधरेत्यसोढपूर्वं प्रावृषेण्यजलदालोकनं विप्रलम्भोद्दीपनविभावत्वेनोक्तम् । जीवत्येवेति सापेक्षभावता एवकारेण करुणावकाशनिराकरणायोक्ता । सर्वत एवेति । नात्रान्यतमस्य पदस्याधिकं किंचिद्रसव्यक्तिहेतुत्वमित्यर्थः । रसतत्त्वमिति विप्रलम्भशृङ्गारात्मतत्वम् ।

'स्मरनवनदीपूरेणोढाः पुनर्गुरुसेतुभि–
र्यदपि विधृता दुःखं तिष्ठन्त्यपूर्णमनोरथाः ।
तदपि लिखितप्रख्यैरङ्गैः परस्परमुन्मुखाः
नयननलिनीनालानीतं पिबन्ति रसं प्रियाः ॥'

रूपकेणेति । स्मर एव नवनदीपूरः प्रावृषेण्यप्रवाहः, सरभसमेव प्रवृद्धत्वात् । तेनोढाः परस्परसांमुख्यमबुद्धिपूर्वमेव नीताः । अनन्तरं गुरवः श्वश्रूप्रभृतय एव सेतवः, इच्छाप्रसररोधकत्वात् । अथ च गुरवोऽलङ्घ्याः सेतवस्तैः विधृताः प्रतिहतेच्छाः । अत एवापूर्णमनोरथास्तिष्ठन्ति । तथापि परस्परोन्मुखतालक्षणेनान्योन्यतादात्म्येन स्वदेहे सकलवृत्तिनिरोधाल्लिखितप्रायैरङ्गैर्नयनान्येव नलिनीनालानि तैरानीतं रसं परस्पराभिलाषलक्षणमास्वादयन्ति, परस्पराभिलाषात्मकदृष्टिच्छटामिश्रीकारयुक्त्यापि कालमतिवाहयन्तीति । ननु नात्र रूपकं निर्ब्यूढम्, हंसचक्रवाकादिरूपेण नायकयुगुलस्यारूपितत्वात् । ते हि हंसाद्या एकनलिनीनालानीतसलिलपानक्रीडादिषूचिता इत्याशङ्क्याह—यथोक्तव्यञ्जकेति । उक्तं हि पूर्वम्—'विवक्षा तत्परत्वेन' इत्यादौ 'नातिनिर्वहणैषिता' इति । प्रसाधित इति । विभावादिभूषणद्वारेण रसोऽपि प्रसाधित इत्यर्थः ॥ ३, ४ ॥

लोचन

वाक्यातून प्रकाशित होणारा ध्वनि— 'होणारा' हे विशेषण आणि 'ध्वनि' हे विशेष्य, दोन्ही प्रथमेत वापरून त्यांचा अभेद प्रतिपादन करण्यामागील हेतु असा—अलक्ष्यक्रम स्वरूपाचा व्यंग्यार्थ हा जरी विशिष्ट वर्ण, विशिष्ट पद, किंवा पदाचा विशिष्ट भाग असतानाच प्रकट होत असला, तरी तो व्यंग्यार्थ सर्व काव्याला व्यापीतच प्रकट होतो; कारण विभाव, अनुभाव इत्यादींचा यथायोग्य मिलाफ हाच असंलक्ष्यक्रम— व्यंग्याचा प्राण असतो. त्यामुळे वर्ण, पद वगैरे[२] हे व्यंग्यार्थप्रकाशनाचे केवळ (सहकारी) कारण असतात; पण वाक्य हे केवळ निमित्त म्हणून त्या वर्णादिकांप्रमाणे अलक्ष्यक्रमध्वनीला उपकारक असत नाही, तर सर्व विभावादिकांचे ज्ञान वाचकांना करून देण्यामध्ये गुंतलेले असल्यामुळे ते समग्र वाक्य रसमय असल्याचेच प्रत्ययास येते. म्हणून दुसऱ्या कारिकेतील वाक्ये ही सप्तमी केवळ निमित्तवाचक नाही, तर (असंलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनि हो वाक्याखेरीज) इतरत्र असू न शकणे हा जो 'विषय' शब्दाचा अर्थ, तो अर्थही ती सप्तमी ज्ञात करून देते.[३] 'शुद्ध' म्हणजे कोणत्याही अर्थालंकाराशी मिश्रित न झालेला.[४]

'माझी आई तुझ्यावर अनेकवेळा लटके रागावली, अश्रू गाळून तिने तुझ्याकडे दीनवाण्या नजरेने पाहिले आणि अशा (निरनिराळ्या) प्रकारांनी तुला अडविण्याचा प्रयत्न केला तरीही तू माझ्यावरील प्रेमामुळे वनातही आलीस. तोच तुला इतका आवडणारा मी मात्र, हे प्रिये! तुझ्यापासून माझी ताटातूट झाली असतानाही आणि सर्व दिशा नवमेघांनी झाकळलेल्या दिसत असूनही मन कठोर करून अजून जगतोच आहे.'

या श्लोकात 'त्या त्या उपायांनी तुला अडविण्याचा आईने प्रयत्न केला तरी' या शब्दांनी माझ्यावरील प्रेमातिशयामुळे तू वडील माणसाचे म्हणणेसुद्धा ऐकले नाहीस असे सुचविले आहे. 'प्रिये!', 'तुला आवडणारा' या विशेषणांनी एकमेकांना आपले जीवितसर्वस्व वाटणे हेच ज्याचे सार आहे असा रति हा स्थायिभाव सूचित केला आहे. 'नवमेघांनी' या शब्दाने पूर्वी रामाला कधीही सहन करावे न लागलेले पावसाळ्यातील मेघांचे दर्शन हे विप्रलंभरतीचा उद्दीपनविभाव म्हणून म्हटले आहे. 'जगतोच आहे' यातील 'च' या अव्ययाने येथे करुणरसाचा शोक हा स्थायी भाव असल्याची शंकाही येऊ नये म्हणून पुनर्भेटीची आशा सूचित केली आहे. वृत्तीमध्ये 'हे सगळेच उदाहरण' असे म्हणण्याचा भावार्थ 'या श्लोकातील एखादाच शब्द रसाभिव्यक्तीला इतर शब्दांहून अधिक कारणीभूत होतो असे नाही' असा आहे. 'रस' म्हणजे विप्रलंभशृंगार हा रस.

'प्रीतिरूपी नदीच्या नव्या पुरामुळे एकमेकांसमोर खेचून आणलेले, पण पुन्हा वडीलमाणसे हेच कोणी बांध, त्यांमुळे अडवून धरलेले प्रिया व प्रियकर, मनोरथ पूर्ण न झालेल्या अवस्थेत जरी एकमेकांजवळ उभे राहिले आहेत, तरीही चित्रात रेखाटलेल्या व्यक्तीप्रमाणे स्तब्ध उभे राहून एकमेकांकडे आतुरतेने बघत परस्परांच्या नेत्ररूपी कमलिनी देठांतून आपल्या आटोक्यात आणलेला प्रीतिरस ते प्राशन करीत आहेत.'

रूपक अलंकारामुळे—प्रीति हाच नदीचा नवा पूर म्हणजे पावसाळ्यातील फुगलेला जलप्रवाह. कारण ती प्रीति नदीच्या पुराप्रमाणे एकाएकीच खूप वाढलेली आहे. त्यामुळे ते खेचून आणले गेले आहेत. म्हणजे न कळतच एकमेकांसमोर आणले गेले आहेत. त्यानंतर वडील माणसे म्हणजे सासू वगैरे हेच कोणी बांध, कारण त्यांची उपस्थिति ही त्या प्रेमिकांच्या इच्छापूर्तीला अडथळा करिते. आणखी असे की, वडील माणसे हेच नदीमध्ये घातलेले जे दुर्लघ्य बांध, त्यांनी रोखून धरलेले म्हणजे त्यांच्यामुळे ज्यांच्या इच्छा अतृप्त राहिल्या आहेत असे. म्हणूनच मनोरथ पूर्ण न झालेल्या अवस्थेत ते उभे राहिले आहेत. तरीसुद्धा परस्परांकडे उत्सुकतेने पाहणे यामुळे सूचित झालेल्या मानसिक तद्रूपतेमुळे आपापल्या शरीरावयवांचे सर्व व्यापार बंद झाल्याने त्यांचे अवयव चित्रात रेखाटल्याप्रमाणे दिसत आहेत. अशा अवस्थेत डोळे हेच जे कमलिनीचे देठ, त्यांनी त्यांच्यापर्यंत आणलेला परस्परांविषयीचा अभिलाष या स्वरूपाचा प्रेमरस ते प्राशन करीत आहेत. म्हणजे एकमेकांविषयीच्या अभिलाषाने ओसंडणाऱ्या आपल्या नजरा एकमेकांशी मिळवून (म्हणजे आपले कटाक्ष एकमेकांकडे फेकीत) त्या उपायाने कसा तरी काळ घालवीत आहेत, असा अर्थ.[६]

'पण काय हो, या ठिकाणी नायक-नायिकांवर हंस—हंसी किंवा चक्रवाक—चक्रवाकी वगैरेंचा आरोप केलेला नसल्यामुळे रूपक पूर्णतेला नेलेले नाही.[७] कारण त्या हंस वगैरेंनी कमलिनीच्या एकाच देठातून आणलेले पाणी पिणे इ. क्रीडा करणे ही त्यांची पद्धतच आहे'[८] अशी शंका कल्पून वृत्तिकार 'व्यंजक अलंकाराच्या लक्षणांनी युक्त असलेल्या रूपकाने' इ. उत्तर देतात. कारण पूर्वी (उद्द्योत २ मध्ये सांगितलेल्या) 'रूपकादि अलंकार रसादींना प्राधान्य देऊन उपयोजावेत इ.' (म्हणजे १८ व १९ या) कारिकांमध्ये' त्या अलंकारांचा वाजवीपेक्षा जास्त विस्तार करण्याची इच्छा बाळगू नये' असे म्हटलेच होते[९] 'सुशोभित झालेला' — विभाव, अनुभाव वगैरेंना भूषवून त्यांच्या द्वारे (प्रस्तुत श्लोकातील) रसही भूषविला गेला आहे, हा आशय ॥ ३, ४ ॥

टीपा

१) पुढे १० ते १४ या कारिकांवरील वृत्तीतील **सन्ति सिद्धरसप्रख्याः** या श्लोकानंतरच्या **कथामार्गे न चाल्पोऽ प्यतिक्रमः ।** इत्यादि वाक्यावरील टीकेमध्ये अभिनवगुप्तांनी असे म्हटले आहे की, 'रामाभ्युदय' हे नाटक यशोवर्मन् या कवीने लिहिले आहे. पाहा, उद्द्योत ३, कारिका १० ते १४ यांवरील वृत्तीतील **सन्ति सिद्धरसप्रख्याः** इ. श्लोकानंतरची टीप १ ली.

२) 'वगैरे' म्हणजे पदाचा अवयव व संघटना.

३) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत — १ '(व्यंगार्थप्रधान काव्यातील) व्यंजक शब्द, व्यंग अर्थ, व्यंजना — व्यापार, व्यंजक वाच्यार्थ हे चारही 'ध्वनि' च' पण या सर्वांच्या समुदायाला 'ध्वनिकाव्य' म्हणावे"तेथेही 'लोचना'त 'विषय' शब्दाचा अर्थ दुसरीकडे अस्तित्व नसणे' असाच सांगितला आहे.

४) ध्वन्यालोकाच्या 'काव्यमाला' आवृत्तीत पदप्रकाश असंलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनीचे 'उत्कम्पिनी इ.' श्लोकानंतर **यथा वा** असे म्हणून **झगिति कनकचित्रे** इ. आणखी एक उदाहरण दिले आहे. पण अभिनवगुप्तांनी त्यावर काहीही विवरण केलेले नसल्यामुळे त्यांच्या समोरील प्रतीमध्ये तो श्लोक नसावा असे समजून आम्ही तो श्लोक येथे दिला नाही. पण हा श्लोक अभिनवगुप्तांनंतरच्या महिमभट्टांच्या 'व्यक्तिविवेका'त, हेमचन्द्राच्या 'विवेक' टीकेत व क. ल. वि. मध्येही आढळतो.

५) आता तू माझ्यापासून दूर गेली असलीस तरी पुन्हा तू भेटशील या आशेवरच मी जगतो आहे, हे 'च' ने सूचित होत आहे असा अभिनवगुप्तांचा अभिप्राय.

६) यासारखीच कल्पना प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'" वर 'म्हणून हा दिवस' इ. वाक्यात आली आहे.

७) म्हणजे पूर्वपक्ष्याला असे म्हणावयाचे आहे की, रूपक पूर्ण केलेले नसताना वृत्तिकारांनी 'रूपक अलंकारामुळे सुशोभित झालेला रस' असे कसे म्हटले आहे?

८) यासारख्या कल्पनेसाठी पाहा, कुमारसंभव, ३–३६ या श्लोकाचा **मधु द्विरेफः कुसुमैकपात्रे** इ. पूर्वार्ध.

९) 'प्रियेने रागावून' इ. उदाहरणाच्या बाबतीत (पाहा, **प्रथमखंड**, "उद्‌द्योत – २ 'ती दक्षता म्हणजे ५) अलंकाराचा विकास करावा लागला तरी तो अंगच राहावा'") जसे **बाहुलतिका** येवढेच रूपक योजून रूपक पूर्ण करण्याचे टाळले आहे, तसेच या श्लोकातही **नयननलिनी** येवढेच रूपक योजिले असून 'हंस–हंसी' वगैरे आरोप करीत बसण्याचे टाळले आहे.

ध्वन्यालोकः

अलक्ष्यक्रमव्यङ्ग्यः संघटनायां भासते ध्वनिरित्युक्तं, तत्र संघटनास्वरूपमेव तावन्निरूप्यते–

असमासा समासेन मध्यमेन च भूपिता ।
तथा दीर्घसमासेति त्रिधा संघटनोदिता ॥ ५ ॥
कैश्चित् । तां केवलमनूद्यदमुच्यते–
गुणानाश्रित्य तिष्ठन्ती माधुर्यादीन्व्यनक्ति सा ।

रसान्–

सा संघटना रसादीन्व्यनक्ति गुणानाश्रित्य तिष्ठन्तीति । अत्र च विकल्प्यं गुणानां संघटनायाश्चैक्यं व्यतिरेको वा । व्यतिरेकेऽपि द्वयी गतिः । गुणाश्रया संघटना, संघटनाश्रया वा गुणा इति । तत्रैक्यपक्षे संघटनाश्रयगुणपक्षे च गुणानात्मभूतानाधेयभूतान्वाश्रित्य तिष्ठन्ती संघटना रसादीन्व्यनक्तीत्ययमर्थः । यदा तु नानात्वपक्षे गुणाश्रय :– संघटनापक्षः तदा गुणानाश्रित्य तिष्ठन्ती गुणपरतन्त्रस्वभावा न तु गुणरूपैवेत्यर्थः ।

ध्वन्यालोक

अलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनि हा संघटनेतून प्रकाशित होतो असे जे मागे म्हटले (पाहा, हाच उद्‌द्योत, कारिका २ री), त्या बाबतीत पहिल्याने 'संघटने' चे स्वरूप काय असते, तेच सांगण्यात येत आहे—

संघटना ही तीन प्रकारची म्हणून सांगितली आहे— १. समासरहित किंवा फारच थोडे समास असलेली, २. मध्यम (आकाराच्या) समासांनी शोभणारी, आणि, ३. लांब लांब समास असलेली. ॥ ५ ॥

(सांगितली आहे म्हणजे) काहींनी सांगितली आहे.

त्या संघटनेचे वरील प्रकार गृहीत धरून असे सांगितले जात आहे की—

(माधुर्य इ.) गुणांचा आश्रय करून असणारी ती (संघटना) रसांना अभिव्यक्त करिते.

गुणांचा आश्रय करून राहणारी ती संघटना रस वगैरेंना अभिव्यक्त करिते, असे (कारिकेत सांगितले) आहे. आणि या बाबतीत दोन पक्षांची कल्पना करणे शक्य आहे. १) गुण आणि संघटना एकच असू शकतील किंवा २) भिन्न असू शकतील. आणि ती दोघे भिन्न असली, तरीही दोन शक्यता आहेत— एकतर संघटना ही गुणांचा आश्रय असू शकेल किंवा गुण हे संघटनेचा आश्रय असू शकतील. त्यांपैकी पहिला, म्हणजे गुण आणि संघटना एकच हा पक्ष आणि संघटना हा गुणांचा आश्रय हा (गुण व संघटना भिन्न असताना संभवणारा दुसरा) पक्ष[1] विचारात घेतल्यास वरील कारिकाभागाचा अर्थ असा होईल—गुणांशी एकरूप असलेली किंवा आश्रित असणाऱ्या गुणांचा आश्रय या रूपाने असलेली संघटना रस वगैरेंना अभिव्यक्त करिते. पण जर संघटना व गुण भिन्न असून त्यात गुण हे संघटनेचा आधार आहेत हा पक्ष स्वीकारला, तर वरच्याच कारिकाभागाचा अर्थ गुणांच्या आश्रयाने राहणारी म्हणजे गुणांच्या अधीन असलेली, (जिचे स्वरूप गुणांवर पूर्णपणे अवलंबून आहे), परंतु जी गुणांशी एकरूप नाही, असा होईल.

लोचनम्

संघटनायामिति भावे प्रत्ययः । वर्णादिवच्च निमित्तमात्रे सप्तमी । उक्तमिति कारिकायाम् । निरूप्यत इति । गुणेभ्यो विविक्ततया विचायत इति यावत् । रसानिति कारिकायां द्वितीयार्धस्याद्यं पदम् । 'रसांस्तन्नियमे हेतुरौचित्यं वक्तृवाच्ययोः' इति कारिकार्धम् । बहुवचनेनाद्यर्थः संगृहीत इति दर्शयति— रसादीनिति । अत्र चेति । अस्मिन्नेव कारिकार्धे । विकल्पेनेदमर्थजातं कल्पयितुं व्याख्यातुं शक्यम् । किं तदित्याह गुणानामिति । त्रयः पक्षा ये संभाव्यन्ते ते व्याख्यातुं शक्याः । कथमित्याह तत्रैक्यपक्ष इति । आत्मभूतानिति । स्वभावस्य कल्पनया प्रतिपादनार्थं प्रदर्शितभेदस्य स्वाश्रयवाचोयुक्तिर्दर्श्यते । शिंशपाश्रयं वृक्षत्वमिति । आधेयभूतानिति । संघटनाया धर्मा गुणा इति भट्टोद्‌भटादयः । धर्माश्च धर्म्याश्रिता इति प्रसिद्धो मार्गः । गुणपरतन्त्रेति । अत्र नाधाराधेयभाव आश्रयार्थः । न हि गुणेषु संघटना तिष्ठतीति । तेन राजाश्रयः प्रकृतिवर्ग इत्यत्र यथा राजाश्रयौचित्येनामात्यादिप्रकृतय इत्ययमर्थ एवं गुणेषु परतन्त्रस्वभावा तदायत्ता तन्मुखप्रेक्षिणी संघटनेत्ययमर्थो लभ्यत इति भावः ।

लोचन

दुसऱ्या कारिकेतील **संघटनायाम्** यातील 'संघटना' या शब्दामध्ये **अन** हा प्रत्यय 'भाव' म्हणजे 'क्रिया' या अर्थी लागला[२] आहे, आणि **संघटनायाम्** ही सप्तमी **वर्णपदादिषु** यातील सप्तमीप्रमाणे[३] निमित्तवाचक म्हणजे सहकारी कारण या अर्थाची वाचक आहे. 'मागे म्हटले' म्हणजे (२ ऱ्या) कारिकेमध्ये (म्हटले). 'सांगण्यात येत आहे'– (संघटनेचे स्वरूप) गुणांहून वेगळे कसे याचा विचार केला जात आहे, असा अर्थ.

रसांना– हा (६ व्या) कीरिकेतील २ ऱ्या अर्धाचा पहिला शब्द आहे व **रसांस्तन्नियमे हेतुरौचित्यं वक्तृवाच्ययोः** । ('रसांना अभिव्यक्त करिते; वक्ता आणि त्याच्या बोलण्याचा वाच्यार्थ यांचे औचित्य हे संघटनेचे नियमन करणारे कारण होय') हा ६ व्या कारिकेचा उत्तरार्ध आहे.

'रसांना' हे बहुवचन वापरल्याने 'रस इत्यादींना' या अर्थाचा समावेश झाला आहे असे वृत्तिकार वृत्तीत 'रस वगैरेंना' या शब्दांनी सांगतात आणि या बाबतीत– (६ व्या) कारिकेच्या याच म्हणजे पहिल्याच अर्धभागाच्या बाबतीत (म्हणजे त्या अर्धभागात जो आश्रयाश्रयिभाव सांगितला आहे, त्याच्या बाबतीत) कल्पना करणे शक्य आहे– म्हणजे दोन पक्ष एकमेकांना पर्याय म्हणून कल्पून त्यांचे विवरण करणे शक्य आहे. कोणते दोन पक्ष? असे विचाराल, तर त्याचे उत्तर वृत्तिकार 'गुण व संघटना' इ. शब्दांनी देत आहेत. (या दोन पक्षांपैकी दुसऱ्या पक्षाचे पोटभेद विचारात घेतल्यास) जे तीन पक्ष संभवतात, तेही स्पष्ट करून दाखविता येतील. कसे म्हणाल, तर वृत्तिकार ते मांडण्यास 'त्यांपैकी पहिला म्हणजे गुण आणि संघटना एकच' इ, शब्दांनी सांगतात. गुणांशी एकरूप असलेली– एखाद्या वस्तूचा जातिरूप धर्म त्या वस्तूहून निराळा नसला, तरी त्या जातिरूप धर्माचे स्पष्टीकरण करण्याकरिता तो त्या वस्तूहून वेगळा आहे अशी कल्पना करून ती वस्तु त्या धर्माचा आश्रय आहे असे (शास्त्रीय चर्चा करिताना) म्हणण्याची पद्धत दिसते. उदा. 'वृक्षत्व हे शिंशपा वृक्षाच्या आश्रयाने आहे' असे म्हणणे.[४] 'आश्रित असलेल्या (गुणांचा आश्रय म्हणून असलेली)'– भट्टोद्भट वगैरेंचे मत असे की, गुण हे संघटनेचे धर्म आहेत,[५] आणि धर्म हे धर्मीच्या आश्रयाने असतात हे म्हणणे तर सर्वमान्यच आहे.[६] 'गुणांच्या अधीन असलेली' - यात 'आश्रय' शब्दाचा अर्थ 'आधार' असा घ्यावयाचा नाही (व संघटना ही 'त्यामध्ये असलेली' असा अर्थ घ्यावयाचा नाही.) कारण गुणांमध्ये संघटना 'राहात' नाही. त्यामुळे ज्याप्रमाणे 'राजाच्या आश्रयाने असणारा प्रकृतिवर्ग' या उदाहरणात 'राजाच्या आश्रयाने' याच्याशी जुळण्यासाठी 'राजावर अवलंबून असलेला प्रकृतिवर्ग म्हणजे अमात्य वगैरे' असा अर्थ घ्यावा लागतो[७], त्याप्रमाणे गुणाच्या अधीन जिचे स्वरूप असते अशी, म्हणजे गुणांवर अवलंबून असणारी, जिला गुणांच्या तोंडाकडे पाहावे लागते अशी संघटना, असा अर्थ प्राप्त होतो, हा आशय.

टीपा

१) यावरून संघटना म्हणजे पदांची विशिष्ट रचना. विशिष्ट म्हणजे त्या पदांचे समास करणे किंवा नाकरणे आणि केल्यास ते लहान किंवा मध्यम किंवा मोठे करणे असे संघटनेचे स्वरूप मानले जात होते असे दिसते.

२) **सम्+घट्** या धातूला (**भावे**) **ल्युट् च** । (३-३-११५) या पाणिनि–सूत्राप्रमाणे भाव (म्हणजे क्रिया) या अर्थी **ल्युट्** म्हणजे अ**न** हा प्रत्यय लागला आहे. त्यामुळे संघटना = संघटनक्रिया = रचना, मांडणी.

३) पाहा, द्वितीय खंड "उद्‌द्योत – १ 'अलक्ष्यक्रमव्यंग ध्वनीला 'वर्ण' ही प्रकाशित करू शकतात'" वरील ४ थी टीप.

४) म्हणजे वृक्षत्व हा धर्म शिशपानामक वृक्षाहून वस्तुतः वेगळा नसला, तरी तो वेगळा आहे असे कल्पून तो शिंशपा वृक्षाच्या आश्रयाने राहतो असे म्हणणे.

५) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत - १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" वरील १ ली टीप.

६) उद्‌भटाच्या काव्यालंकारसारसंग्रहामध्ये हे विधान आढळत नाही. कदाचित् ते त्याच्या (अनुपलब्ध) 'भामहविवरणात' असावे.

७) 'आश्रय' हा शब्द दोन अर्थानी वापरला जातोः— १) भौतिक आश्रय, उदा. भूमि हा घटाचा आश्रय आहे या उदाहरणात व २) (लक्षणेने घेतली जाणारा) पोषिंदा, म्हणजे दुसरा ज्याच्यावर अवलंबून असतो, तो. उदा. राजा हा त्याच्या सेवकांचा आश्रय असतो.

ध्वन्यालोकः

किं पुनरेवं विकल्पनस्य प्रयोजनमिति? अभिधीघते । यदि गुणाः संघटना चेत्येकं तत्त्वं संघटनाश्रया वा गुणास्तदा संघटनाया इव गुणानामनियतविषयत्वप्रसङ्गः । गुणानां हि माधुर्यप्रसादप्रकर्षः करुणप्रिलम्भशृङ्गारविषय एव । रौद्राद्‌भुतादिविषयमोजः । माधुर्यप्रसादौ रसभावतदाभासविषयावेवेति विषयनियमो व्यवस्थितः । संघटनायास्तु स विघटते । तथा हि शृङ्गारेऽपि दीर्घसमासा दृश्यते रौद्रादिष्वसमासा चेति ।

तत्र शृङ्गारे दीर्घसमासा यथा— 'मन्दारकुसुमरेणुपिञ्जरितालका' इति । यथा वा—

'अनवरतनयनजललवनिपतनपरिमुषितपत्रलेखं ते ।
करतलनिषण्णमबले वदनमिदं कं न तापयति ॥'

इत्यादौ ।

तथा रौद्रादिष्वप्यसमासा दृश्यते यथा— 'यो यः शस्त्रं विभर्ति स्वभुजगुरुमदः' इत्यादौ । तस्मान्न संघटनास्वरूपाः न च संघटनाश्रया । गुणाः । ननु यदि सुंघटनां गुणानां नाश्रयस्तत्किमालम्बना । एते परिकल्प्यन्ताम्? उच्यते—प्रतिपादितमेवैषामालम्बनम् ।

'तमर्थमवलम्बन्ते येऽङ्गिनं ते गुणाः स्मृताः ।
अङ्गाश्रितास्त्वलंकारा मन्तव्याः कटकादिवत् ॥' इति ।

ध्वन्यालोक

पण यावर कोणी विचारील की, इतके पक्ष कल्पीत बसण्याचा उपयोग काय? तर त्याला आमचे उत्तर असे की– जर गुण आणि संघटना हे एकरूप असतील किंवा ते भिन्न असून संघटना हा गुणांचा आश्रय असेल, तर ज्याप्रमाणे संघटनेचा आपल्या विषयांशी म्हणजे रसादींशी संबंध अव्यभिचारी असलेला आढळून येत नाही, त्याप्रमाणे गुणही आपापल्या विषयांशी म्हणजे रसांशी अव्यभिचारीपणाने निगडित नसतात, अशी आपत्ति पत्करावी लागेल! पण गुणांपैकी माधुर्य व प्रसाद या गुणांचा 'प्रकर्ष' फक्त विप्रलंभशृंगार व करुण या रसांतच आढळतो. ओजोगुणाचा विषय रौद्र, अद्‌भूत वगैरे[१] रस हा आहे. माधुर्य आणि प्रसाद हे गुण रस[३], भाव व त्यांचे आभास यांतच आढळतात असा त्यांच्या विषयांबाबत नियम आहे, पण संघटनेच्या बाबतीत या नियमांचा भंग झालेला दिसतो. कारण, शृंगारातदेखील संघटना लांब लांब समास असलेली दिसते आणि रौद्रादि रसांच्या बाबतीतही ती समासरहित (किंवा लहानसा एखादा दुसरा समास असलेली) दिसते. त्यांपैकी शृंगारातही दीर्घ समासयुक्त संघटना असते, याचे उदाहरण– "मन्दारकुसुमरेणुपिञ्जरितालका"[४] म्हणजे मंदारपुष्पांच्या परागांनी जिचे केश पिंगट झाले आहेत अशी. किंवा–

'हे अबले! अखंड अश्रुबिंदु गळल्यामुळे गालांवरील लतापल्लवांच्या आकृति पुसून गेलेले व तळहातावर टेकलेले हे तुझे मुख कोणाला दुःख देत नाही?'[५]

तसेच रौद्रादि रसांच्या बाबतीतही संघटना थोडे व छोटे समास असलेली दिसते. जसे–

'स्वतःच्या बाहुबळाबद्दल फार घमेंड बाळगणारा जो जो कोणी (पांडवांच्या सेनेत) शस्त्र धारण करीत असेल' ... इ. श्लोकांमध्ये.[६]

म्हणून गुण व संघटना यांचे स्वरूप एकच नव्हे, आणि संघटना हा गुणांचा आश्रयही नव्हे.

पण काय हो, संघटना हा गुणांचा आश्रय नसेल, तर गुणांचा आश्रय कोणता मानावा?

सांगतो. गुणांचा आश्रय तर मागे[७] सांगितलाच आहे!

जे 'तो' (म्हणजे रसादि) अर्थ अंगी असताना त्याच्या आश्रयाने असतात, त्यांना 'गुण' मानिले आहे. पण जे 'अंगां'च्या आश्रयाने असतील, त्यांना कंकणे वगैरेंप्रमाणे 'अलंकार' समजावे.

लोचनम्

संघटनाया इवेति । प्रथमपक्षे तादात्म्येन समानयोगक्षेमत्वात्, इतरत्र तु धर्मत्वेनेति भावः । भवत्वनियतविषयतेत्याशङ्क्याह– गुणानां हीति । हिशब्दस्तुशब्दार्थे । न त्वेवमुपपद्यते, आपद्यते तु न्यायबलादित्यर्थः । स इति । योऽयं गुणेषु नियम उक्तोऽसावित्यर्थः । तथात्वे लक्ष्यदर्शनमेव हेतुत्वेनाह– तथा हीति । दृश्यत इत्युक्तं, तत्र दर्शनस्थानमुदाहरणं सूत्रयति-तत्रेति । नात्र शृङ्गारः कश्चिदित्याशङ्क्य द्वितीयमुदाहरणमाह–यथा वेति । एषा हि प्रणयकुपितनायिकाप्रसादनायोक्तिर्नायकस्येति । तस्मादिति ।

नैतद्व्याख्यानद्वयं कारिकायां युक्तमिति यावत् । किमालम्बना इति । शब्दार्थालम्बनत्वे हि तदलंकारेभ्यः को विशेष इत्युक्तं चिरंतनैरिति भावः । प्रतिपादितमेवेति । अस्मन्मूलग्रन्थकृतेत्यर्थः ।

लोचन

'ज्याप्रमाणे संघटनेचा इ.'– पहिल्या पक्षी गुण व संघटना यांचे तादात्म्य असल्यामुळे, म्हणजे गुण व संघटना ह्यांचा अभेद असल्यामुळे, आणि दुसऱ्या पक्षी, म्हणजे संघटना हा गुणांचा आश्रय या पक्षी, गुण हे संघटनेचे धर्म असल्याने गुण व संघटना यांची परिस्थिति एकच आहे (म्हणजे संघटनेप्रमाणेच तेही रसांशी अव्यभिचारी संबंधाने निगडित असणार नाहीत अशी आपत्ति ओढवेल) असा अर्थ. यावर 'नसेना का गुणांचा रसांशी अव्यभिचारी संबंध! (त्यामुळे काय बिघडणार आहे?)' असे कोणी म्हणेल, तर वृत्तिकार 'पण गुणांपैकी' इ. वाक्याने त्याला उत्तर देतात. वृत्तीमधील (**गुणानां** हि यातील) हि हा शब्द 'पण' या अर्थी घ्यावा. हे म्हणजे 'गुण हे रसांशी अव्यभिचारी नसणे.' हे तर्कशुद्ध नसले, तरी (संघटना व गुण एकच किंवा संघटना हा गुणांचा आश्रय असे मानिले, तर) दोघांना एकच न्याय लावणे इष्ट असल्याने तसे मानणे अटळ होईल! 'या नियमाचा'– म्हणजे गुणांच्या बाबतीतला हा (म्हणजे ठराविक गुण ठराविक रसांशी अव्यभिचारीपणे संबद्ध असतात, हा) जो नियम सांगितला त्याचा, असा अर्थ. संघटनेच्या बाबतीत नियमभंग झालेला दिसतो याच्या पुष्ट्यर्थ वृत्तिकार 'कारण शृंगारातदेखील' इ. शब्दांनी उदाहरण देतात.

'दिसते' असे म्हटल्यावर नियमभंग दिसण्याचे ठिकाण असलेले उदाहरण देण्याची प्रस्तावना वृत्तिकार 'त्यांपैकी' या शब्दाने करितात. 'मंदार' इ. उदाहरणात कोठेही शृंगार नाही[८] अशी कोणी शंका घेईल असे कल्पून वृत्तिकार 'किंवा' असे म्हणून दुसरे उदाहरण देतात.

'हे अवले!' इ. वाक्य एका नायकाने प्रेमात रुसलेल्या नायिकेला प्रसन्न करण्याकरिता म्हटले आहे.[९] 'म्हणून गुण व संघटना' इ.– हे पहिले दोन पक्ष[१०] कारिकेच्या खऱ्या आशयाच्या दृष्टीने बरोबर नाहीत, हे तात्पर्य. 'गुणांचा आश्रय कोणता मानावा'– गुणांचा आश्रय शब्द आणि अर्थ असे मानल्यास गुण व शब्दार्थाचे अलंकार यांमध्ये फरक तो काय राहिला? असे प्राचीनांनी[११] म्हटले आहे, असा आशय. 'सांगितलाच आहे'– आमच्या मूलग्रंथाच्या कर्त्यांनी (म्हणजे कारिकाकारांनी[१२]) असा अर्थ.

टीपा

१) वगैरे म्हणजे बीभत्स व वीर हे रस. अदभुत रस व ओजोगुण यांमधील संबंधासाठी पाहा, प्रथम खंड, उद्द्योत – २ 'ओजस' गुण मध्ये व त्यावरील टीप ५ वी.

२) माधुर्य हा गुण येथे सौम्य स्वरूपातला अभिप्रेत आहे, 'प्रकर्ष' स्वरूपातला नव्हे.

३) रस म्हणजे येथे (करुण आणि विप्रलंभ शृंगार सोडून उरलेले, म्हणजे) संभोगशृंगार, हास्य, भयानक व शांत हे घ्यावेत. प्रसाद मात्र सर्व रसांना साधारण असतो. शिवाय सौम्य स्वरूपाचा माधुर्य, व प्रसाद हे गुण भाव, रसाभास, व भावाभास यांमध्येही आढळतात.

४) हा समास भामहाच्या 'काव्यांलंकारा' च्या २ ऱ्या परिच्छेदातील २ ऱ्या कारिकेच्या उत्तरार्धात ओजोगुणाचे उदाहरण म्हणून आलेला आहे.

५) मूळ संस्कृत उदाहरणात या अर्थाचा '**अनवरतनयनजललवनिपतनपरिमुषितपत्रलेखम्** (वदनम्)' असा लांब समास वापरला आहे.

६) प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'ओजस' गुण".

७) उद्द्योत २, कारिका ६.

८) 'मंदारपुष्पांच्या परागांनी जिचे केश पिंगट झाले आहेत अशी' इतकेच या ओळीत म्हटले आहे. हे एखाद्या नायिकेचे विशेषण मानिले तरी केवळ तेवढ्या वर्णनावरून शृंगाररसाची प्रतीति होते असे म्हणता येणार नाही, असे प्रतिपक्ष्यांचे म्हणणे.

९) म्हणजे हे ईर्ष्याविप्रलंभ शृंगाराचे उदाहरण होय. आणि असे असूनही यात '**अनवरत**'... इ. प्रदीर्घ समास वापरला आहे.

१०) म्हणजे १) संघटना व गुण एकच हा पक्ष. व २) संघटना हा गुणांचा आश्रय हा पक्ष.

११) भरताने शब्द व अर्थ यांचे मिळून दहा व वामनाने शब्दाचे दहा व अर्थाचे दहा गुण सांगितले आहेत. म्हणजे गुण हे शब्द व अर्थ यांच्या आश्रयाने राहणारे आहेत असे त्यांचे मत होते, इतके फार तर म्हणता येईल. पण गुण व अलंकार ही दोन्ही शब्द व अर्थ यांच्या आश्रयाने राहणारे असतील, तर गुण व अलंकार यामध्ये फरक राहणार नाही हे कोणत्या प्राचीनाने म्हटले आहे याचा पत्ता लागत नाही. उलट 'उद्भटाने गुण व अलंकार सारखेच मानिले आहेत' असे रुय्यकाने काव्यालंकारसर्वस्व, पृ. ९ वर म्हटले आहे.

१२) 'सांगितलाच आहे' हे शब्द वृत्तिकारांचे आहेत व त्यांचे विवरण करिताना 'आमच्या मूळ ग्रंथकर्त्यांनी' असे शब्द घालून ते वाक्य अभिनवगुप्तांनी पुरे केले आहे. यावरून वृत्तिकारांच्या मते कारिकांचा कर्ता वेगळा असावा अशी अभिनवगुप्तांची समजूत असावीसे दिसते.

ध्वन्यालोकः

अथवा भवन्तु शब्दाश्रया एव गुणाः । न चैषामनुप्रासादितुल्यत्वम् । यस्मादनुप्रासादयोऽनपेक्षितार्थशब्दधर्मा एव प्रतिपादिताः । गुणास्तु व्यङ्ग्यविशेषावभासिवाच्यप्रतिपादनसमर्थशब्दधर्मा एव । शब्दधर्मत्वं चैषामन्याश्रयत्वेऽपि शरीराश्रयत्वमिव शौर्यादीनाम् ।

ननु यदि शब्दाश्रया गुणास्तत्संघटनारूपत्वं तदाश्रयत्वं वा तेषां प्राप्तमेव । न ह्यसंघटिताः शब्दा अर्थविशेषप्रतिपाद्यरसाद्याश्रितानां गुणानामवाचकत्वादाश्रया भवन्ति । नैवम् । वर्णपदव्यङ्ग्यत्वस्य रसादीनां प्रतिपादितत्वात् । अभ्युपगते वा वाक्यव्यङ्ग्यत्वे रसादीनां न नियता काचित्संघटना

तेषामाश्रयत्वं प्रतिपद्यते इत्यनियतसंघटनाः शब्दा एव गुणानां व्यङग्यविशेषानुगता आश्रयाः । ननु माधुर्ये यदि । नामैवमुच्यते तदुच्यताम् । ओजसः षुनः कथमनियतसंघटनशब्दाश्रयत्वम् । न ह्यसमासा संघटना कदाचिदोजस आयश्रतां प्रतिपद्यते । उच्यते-यदि न प्रसिद्धिमात्रग्रहदूषितं चेतस्तदत्रापि न न ब्रूमः । ओजसः कथमसमासा संघटना नाश्रयः । यतो रौद्रादीन्हि प्रकाशयतः । काव्यस्य दीप्तिरोज इति प्राक्प्रतिपादितम् । तद्यौजो यद्यसमासायामपि संघटनायां स्यात्तत्को दोषो भवेत् । न चाचारुत्वं सहृदयहृदयसंवेद्यमस्ति । तस्मादनियतसंघटनशब्दाश्रयत्वे गुणानां न काचित्क्षतिः । तेषां तु चक्षुरादीनामिव यथास्वं विषयनियमितस्य स्वरूपस्य न कदाचिद्व्यभिचारः । तस्मादन्ये गुणा अन्या च संघटना, न च संघटनामाश्रिता गुणा इत्येकं दर्शनम् ।

ध्वन्यालोक

किंवा गुणांचा आश्रय 'शब्द' असे समजले तरी चालेल. पण त्यामुळे गुण हे अनुप्रास वगैरे (शब्दालंकारां)च्या सारखेच (म्हणजे पूर्णपणे शब्दांवर अवलंबून) असतील, अशी शंका घेऊ नये, कारण अनुप्रास वगैरे हे अर्थावर अवलंबून नसलेले, केवळ शब्दांचेच धर्म आहेत असे सांगितले गेले आहे. पण गुण मात्र अशा प्रकारच्या वाच्य अर्थाचे प्रतिपादन करणाऱ्या शब्दांचे धर्म असतात की, जो वाच्यार्थ विशिष्ट प्रकारच्या व्यंग्य अर्थाचे प्रकाशन करू शकेल. आणि शौर्यादि गुणांचा खरा आश्रय निराळा (आत्मा हा) असूनही ज्याप्रमाणे शरीर हा त्यांचा आश्रय मानला जातो, त्याप्रमाणे या गुणांचा वास्तविक आश्रय रसादि अर्थ हा असला, तरी (वरील प्रकारचे) शब्द हाच त्यांचा आश्रय समजला जातो, (ते केवळ उपचारानेच[१]).

'पण काय हो, गुणांचा आश्रय जर शब्द हा असला, तर ते गुण संघटनेशी एकरूप असणे किंवा संघटना हा त्यांचा आश्रय असणे यांपैकी एक ओघानेच आले! (कारण शब्द हे गुणांचा आश्रय होऊ शकण्यास ते संघटित असायला पाहिजेत!) कारण असंघटित (म्हणजे सुटे) शब्द हे 'वाचक'[२] नसल्यामुळे ते (असंघटित शब्द) विशेष प्रकारच्या (वाच्य) अर्थाकडून अभिव्यक्त होणाऱ्या रसादींमध्ये राहणाऱ्या गुणांचे आश्रय होऊ शकत नाहीत.[३]'

असे कोणी म्हटल्यास ते बरोबर नाही, कारण, रसादि हे वर्ण, पद, यांजकडूनही अभिव्यक्त केले जातात,[४] असे सांगितले गेले आहे.

(किंवा) रसादि हे वाक्यातूनच अभिव्यक्त होऊ शकतात हे मत मान्य केले तरीसुद्धा एखादी विशिष्ट संघटना गुणांचा आश्रय असते, असे नाही. म्हणून विशिष्ट संघटनेवर अवलंबून नसलेले (म्हणजे त्या शब्दात अमुक एक संघटना आहे की नाही या विचाराची अपेक्षा नसलेले) आणि विशिष्ट प्रकारचा व्यंग्यार्थ प्रकाशित करणारे शब्द हेच गुणांचे आश्रय समजावे. यावर कोणी असे म्हणेल की, 'माधुर्य या गुणाच्या बाबतीत विशिष्ट संघटनेची गरज नसते,' असे म्हणणे असेल तर तसे म्हणा एकवेळ, पण विशिष्ट (म्हणजे दीर्घसमासयुक्त) संघटना नसलेले शब्द ओजोगुणाचा आश्रय कसा असू शकतील? कारण समासरहित किवा छोटे समास असलेली संघटना ही ओजोगुणाचा आश्रय असू शकत नाही.' या शंकेला आम्ही असे उत्तर देतो की, तुमच्या मनावर जर प्रसिद्ध असलेल्या मतांचाच[५] पगडा बसलेला नसेल (म्हणजे तुमचे मत पूर्वग्रहदूषित नसेल), तर या बाबतीतही आम्ही काही बोलू शकणार नाही असे नाही. समासरहित किंवा छोट्या समासांनी युक्त असलेली संघटना ओजोगुणाचा आश्रय नसते, असे कसे म्हणता येईल? कारण ज्या काव्यातून रौद्रादि रस प्रकाशित होतात, त्या काव्यातील 'दीप्ति' म्हणजेच ओजोगुण होय, हे मागे

(पाहा, उद्‌द्योत २, कारिका ९) सांगितलेच आहे. आणि तो ओजोगुण जरी समासरहित अथवा छोटे समास असलेल्या संघटनेत असला, तरी त्यात काय बिघडले? कारण अशा उदाहरणात सहृदयांना कोठलीही सौंदर्यहीनता असलेली जाणवत नाही. म्हणून विशिष्ट संघटनेवर अवलंबून नसलेले शब्द हे गुणांचे आश्रय मानले, तरी त्यामुळे काही हानि होणार नाही. मात्र आपापल्या विषयांशी म्हणजे विशिष्ट रसादिकांशी अव्यभिचारीपणाने निगडित असणे असे जे त्यांचे (गुणांचे) स्वरूप आहे, त्याला कधीही बाध येत नाही. डोळे वगैरे इंद्रियांचा आपापल्या विषयांशी म्हणजे 'रूप' वगैरेंशी जसा अव्यभिचारी संबंध आहे, तसाच गुणांचाही आपापल्या विषयांशी म्हणजे रसादिकांशी आहे. म्हणून गुण वेगळे आणि संघटना वेगळी. आणि संघटना हा गुणांचा आश्रयही नव्हे, हे झाले एका पक्षाच्या (म्हणजे गुण व संघटना एकरूप आहेत, किंवा संघटना हा गुणांचा आश्रय आहे या पक्षाच्या) बाबतीत (आमचे उत्तर).

लोचनम्

अथ वेति । न ह्येकाश्रितत्वादेवैक्यम्, रूपस्य संयोगस्य चैक्यप्रसङ्गात् । संयोगे द्वितीयमपेक्ष्यमिति चेत्, इहापि व्यङ्ग्योपकारकवाच्यापेक्षास्त्येवेति समानम् । न चायं ममस्थितः पक्षः । अपि तु भवत्वेषामविवेकिनामभिप्रायेणापि शब्दधर्मत्वं शौर्यादीनामिव शरीरधर्मत्वम् । अविवेकी हि औपचारिकत्वविभागं विवेक्तुमसमर्थः । तथापि न कश्चिद्दोष इत्येवंपरमेतदुक्तमित्येतदाह—शब्दधर्मत्वमिति । अन्याश्रयत्वेऽपीति । आत्मनिष्ठत्वेऽपीत्यर्थः । शब्दाश्रया इति । उपचारेण यदि शब्देषु गुणास्तदेदं तात्पर्यम्—शृङ्गारादिरसाभिव्यञ्जकवाच्यप्रतिपादनसामर्थ्यमेव शब्दस्य माधुर्यम् । तच्च शब्दगतं विशिष्टधटनयैव लभ्यते । अथ संघटना न व्यतिरिक्ता काचित्, अपि तु संधटिता एव शब्दाः, तदाश्रितं तत्सामर्थ्यमिति संघटनाश्रितमेवेत्युक्तं भवतीति तात्पर्यम् ।

ननु शब्दधर्मत्वं शब्दैकात्मकत्वं वा तावतास्तु किमयं मध्ये संघटनानुप्रवेश इत्याशङ्क्य स एव पूर्वपक्षवाद्याह—न हीति । अर्थविशेषैर्न तु पदान्तरनिरपेक्षशुद्धपदवाच्यैः सामान्यैः प्रतिपाद्या व्यङ्ग्या ये रसभावतदाभासतत्प्रशमास्तदाश्रितानां मुख्यतया तन्निष्ठानां गुणानामसंघटिताः शब्दा आश्रया न भवन्त्युपचारेणापीति भावः । अत्र हेतुः—अवाचकत्वादिति । न ह्यसंघटिता व्यङ्ग्योपयोगिनिराकाङ्क्षरूपं वाच्यमाहुरित्यर्थः । एतत्परिहरति—नैवमिति । वर्णव्यङ्ग्यो हि यावद्रस उक्तस्तावदवाचकस्यापि पदस्य श्रवणमात्रावसेयेन स्वसौभाग्येन वर्णवदेव यद्रसाभिव्यक्तिहेतुत्वं स्फुटमेव लभ्यत इति तदेव माधुर्यादीति किं संघटनया? तथा च पदव्यङ्ग्यो यावद्ध्वनिरुक्तस्तावच्छुद्धस्यापि पदस्य स्वार्थस्मारकत्वेनापि रसाभिव्यक्तियोग्यार्थावभासकत्वमेव माधुर्यादीति तत्रापि कः संघटनाया उपयोगः ।

ननु वाक्यव्यङ्ग्ये ध्वनौ तर्ह्यवश्यमनुप्रवेष्टव्यं संघटनया । स्वसौन्दर्यं वाच्यसौन्दर्यं वा तया विना कुत इत्याङ्क्याह—अभ्युपगत इति । वाशब्दोऽपिशब्दार्थे, वाक्यव्यङ्ग्यत्वेऽपीत्यत्र योज्यः । एतदुक्तं भवतिअनुप्रविशतु तत्र संघटना, न हि तस्याः संनिधानं प्रत्याचक्ष्महे । किं तु माधुर्यस्य न नियता संघटना आश्रयो वा स्वरूपं वा तया विना वर्णपदवयङ्ग्ये रसादौ भावान्माधुर्यादेः, वाक्यव्यङ्ग्येऽपि तादृशीं संघटनां विहायापि वाक्यस्य तद्रसव्यञ्जकत्वात्संघटना संनिहितापि रसव्यक्तावप्रयोजिकेति । तस्मादौपचारिकत्वेऽपि शब्दाश्रया एव गुणा इत्युपसंहरतिशब्दा एवेति । नन्विति । वाक्यव्यङ्ग्यध्वन्यभिप्रायेणेदं मन्तव्यमिति केचित् ।

वयं तु ब्रूमः—वर्णपदव्यङ्ग्येऽप्योजसि रौद्रादिस्वभावे वर्णपदानामेकाकिनां स्वसौन्दर्यमपि न तादृगुन्मीलति तावद्यावत्तानि संघटनाङ्कितानि न कृतानीति सामान्येनैवायं पूर्वपक्ष इति । प्रकाशयत इति 'लक्षणहेत्वोः' इति । शतृप्रत्ययः । रौद्रादिप्रकाशानालक्षणमोज इति भावः । न चेति । चशब्दो हेतौ । यस्मात् 'यो यः शस्त्रं' इत्यादौ नाचारुत्वंप्रतिभाति तस्मादित्यर्थः । तेषां त्विति गुणानाम् । यथास्वमिति । 'शृङ्गार एव परमो मनःप्रह्लादनो रसः' इत्यादिना च विषयनियमं उक्त एव ।

लोचन

'किंवा'— दोन वस्तूंचा आश्रय एकच आहे, येवढ्याने त्या दोन वस्तू एकच आहेत असे होत नाही, कारण मग रूप व संयोग या दोन गोष्टी एकच असे म्हणण्याचा प्रसंग येईल[६] ! यावर 'संयोगाला संयुक्त असलेल्या दुसऱ्याही गोष्टीचा आधार आवश्यक असतो[७]' असे म्हणणे असेल, तर येथे देखील (म्हणजे गुण व शब्दालंकार यांचे बाबतीत देखील, शब्द हा गुणांचा एकच आधार असतो असे नाही, तर) व्यंग्यार्थाच्या प्रतीतीला उपकारक अशा वाच्य अर्थाचीही गुणांना आवश्यकता असतेच! अशा रीतीने संयोग व गुण यांची परिस्थिति सारखीच आहे.[८] आणि 'गुणांचा आश्रय शब्द असे समजले तरी चालेल' हे आम्ही म्हटले येवढ्यावरून त आमचे खरे मत आहे असे नव्हे, तर नीट विचार न करणाऱ्या लोकांच्या मताप्रमाणे (**तुष्यतु दुर्जनः** या न्यायाने) गुण हे शब्दाचे धर्म समजले तरी फारसे बिघडत नाही, असे आम्ही म्हटले; कारण अविवेकी लोक शौर्यादि गुणांना शरीराचेच धर्म मानितात, त्याप्रमाणे ते माधुर्यादि गुणांना शब्दाचे धर्म मानितात. कारण अविवेकी मनुष्य मुख्य काय आणि गौण काय याचा वेगळेपणा स्पष्टपणे जाणू शकत नाही.[९] तरीही बिघडत नाही (विवेकी माणसाने मात्र योग्य प्रकारे शब्दप्रयोग करावा) हा 'किंवा गुणांचा आश्रय शब्द असे मानिले तरी चालेल' असे म्हणण्यामागील वृत्तिकारांचा आशय आहे. (शौर्यादि गुणांचा खरा) आश्रय (शरीराहून) निराळा असला तरी म्हणजे (शौर्यादि गुणांचा खरा) आश्रय आत्मा हा असला तरी, असा अर्थ.

'गुणांचा आश्रय शब्द हा असला'— गुण हे शब्दांचे ठिकाणी असतात असे जर गौण अर्थाने म्हटले, तर त्या म्हणण्याचा निष्कर्ष असा निघतो :— शब्दामध्ये माधुर्य असणे म्हणजे हेच की, त्याच्या ठिकाणी शृंगार इ.[१०] रसांची अभिव्यक्ति करील असा वाच्यार्थ प्रकट करण्याचे सामर्थ्य असणे.[११] आणि शब्दांच्या ठिकाणी राहणारे ते माधुर्यगुणरूपी सामर्थ्य त्या शब्दांना विशिष्ट संघटनेमुळेच प्राप्त होते. आता संघटना म्हणजे शब्दाहून वेगळे असे काही नाही, तर संघटित म्हणजे विशिष्टपणे एकमेकांशी जोडलेले शब्द. आणि त्या विशिष्टपणे जोडलेल्या शब्दांतच ते रसव्यंजक वाच्यार्थ प्रतिपादन करण्याचे सामर्थ्य असते, म्हणून ते संघटनेवरच अवलंबून असते असे म्हटले जाते, असा आशय.

पण काय हो, गुण हे शब्दांशी एकरूप असतात किवा शब्दांचे धर्म असतात असे (उपचाराने) म्हटले ते जाऊ दे, पण तुम्ही हा संघटनेचा विषय मध्येच कशाला घुसडला?[१२] अशी ध्वनिवादी शंका घेईल असे समजून तोच पूर्वपक्षी पुन्हा 'कारण असंघटित (म्हणजे सुटे)' ...इ. वाक्य म्हणतो. दुसऱ्या शब्दांची आकांक्षा नसलेल्या सुट्या शब्दांनी प्रतिपादिलेले जे सामान्य अर्थ, त्यांच्यामुळे रस, भाव, त्यांचे आभास व त्यांचे प्रशम हे सुचविले जात नसून विशिष्ट प्रकारच्या म्हणजे संपूर्ण वाक्यातून सुसंबद्धपणे प्रतीत होणाऱ्या अर्थामुळे सुचविले जातात. त्या रस, भाव वगैरे व्यंग्यार्थांचे आश्रित असलेल्या म्हणजे मुख्यत्वेकरून त्या व्यंग्यार्थामध्ये राहणाऱ्या गुणांचे आश्रय असंघटित शब्द कधी असू शकणार नाहीत. लक्षणेचा अवलंब करूनसुद्धा तसे म्हणता येणार नाही, असा पूर्वपक्ष्याचा अभिप्राय. असे पूर्वपक्ष्याने म्हणण्याचे कारण 'शब्द हे (वाक्याच्या एकमुखी अर्थाचे) वाचक नसल्यामुळे' या शब्दांनी सांगितले आहे.[१३] असंघटित शब्द

व्यंग्यार्थाला उपकारक असलेल्या स्वयंपूर्ण वाक्यार्थाचे ज्ञान करून देऊ शकत नाहीत, असा अर्थ. या पूर्वपक्ष्याच्या आक्षेपाचे वृत्तिकार 'ते बरोबर नाही' इ. शब्दांनी खंडन करितात. ज्या अर्थी 'रस हा वर्णांनीही व्यक्त होऊ शकतो' असे[१४] म्हटले आहे, त्या अर्थी (वाक्यरूपाने एकमेकांशी न जोडलेले) हे शब्द व्यंग्य अर्थाला उपयोगी अशा स्वयंपूर्ण वाक्यार्थाचे वाचक नसले, तरी केवळ ऐकूनदेखील त्यांच्या ठिकाणचे जे सौंदर्य प्रतीत होते, तेवढ्यामुळे वर्णांप्रमाणेच ते शब्द रसाभिव्यंजक होऊ शकतात हे स्पष्टच आहे. हे त्यांचे रसाभिव्यंजकत्व म्हणजेच त्यांच्या ठिकाणचे माधुर्य वगैरे गुण होत. अशा रीतीने माधुर्य इ. गुण हे शब्दांचेच धर्म असल्यामुळे संघटनेच्या कल्पनेचा काय उपयोग आहे? तसेच ज्या अर्थी ध्वनि हा पदातून व्यक्त होऊ शकतो असे म्हटले आहे, त्या अर्थी असंघटित किंवा सुटी पदेही संपूर्ण वाक्याच्या अर्थाची वाचक नसून केवळ स्मारक असली, तरी तेवढ्यामुळे ती पदे रसाभिव्यक्ति करू शकणारा वाक्यार्थ प्रकट करितात व असा अर्थ प्रकट करणे हेच त्यांच्या ठिकाणचे माधुर्य वगैरे गुण होत, असे असल्याने पदांच्याही बाबतीत संघटनेच्या कल्पनेची काय आवश्यकता आहे?

पण काय हो, वाक्यातून प्रकाशित होणाऱ्या रसादिध्वनीच्या बाबतीत तरी विशिष्ट प्रकारच्या संघटनेचे महत्त्व मान्य करणे आवश्यक आहे, कारण संघटनेशिवाय वाक्याचे स्वतःचे किंवा त्याच्या अर्थाचे सौंदर्य कोठून येणार? अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'किंवा हे मत[१५] मान्य केले तरी' इ. उत्तर देतात. वृत्तीतला **वा** हा शब्द 'तरीसुद्धा' या अर्थी घ्यावा, आणि त्याचा अन्वय 'ध्वनि वाक्यातून प्रकाशित होतो हे मान्य केले तरीसुद्धा' असा करावा.' हे मान्य केले तरीसुद्धा' असे म्हणण्यातील वृत्तिकारांचा आशय असा आहे :— संपूर्ण वाक्यातून प्रकाशित होणाऱ्या ध्वनीमध्ये विशिष्ट प्रकारची संघटना असेना का, तिची उपस्थिति आम्ही नाकारीत नाही. पण अमुकच एक संघटना हा माधुर्यगुणाचा आश्रय नव्हे किंवा ती माधुर्यगुणाशी एकरूपही नव्हे. कारण, संघटना नसताही वर्ण किंवा सुटी पदे यांतून प्रकाशित होणाऱ्या रस वगैरेमध्ये माधुर्य इ. गुण असू शकतात. म्हणून वाक्यातून प्रकाशित होणाऱ्या रसध्वनीमध्येही त्या ठिकाणी वापरलेली विशिष्ट प्रकारची संघटना विचारात न घेतली, तरी ते वाक्य त्या रसाची अभिव्यक्ति करू शकत असल्यामुळे त्या वाक्यात विशिष्ट संघटना असली, तरी ती रसाभिव्यक्ति करण्यास कारणीभूत नसते. म्हणून गुण हे शब्दांच्या ठिकाणी राहतात असे लक्षणेने जरी म्हटले, तरी शब्द हेच गुणांचे आश्रय, (संघटना नव्हे). म्हणून 'शब्द हेच गुणांचे आश्रय' असा या विषयाचा वृत्तिकार उपसंहार करितात. 'यावर कोणी' इ.— वाक्यातून प्रकाशित होणाऱ्या ध्वनीला अनुलक्षून ही शंका घेतली[१६] गेली आहे, असे काही (टीकाकार) म्हणतात.

पण आमचे म्हणणे असे :— 'रौद्रादि रसांचा धर्म असलेला ओजोगुण वर्ण व पदे यांमुळे प्रकट होत असला तरी सुट्या, एकेकट्या वर्णांचे व पदांचे स्वतःचे म्हणजे श्रवणेंद्रियाने ग्राह्य असलेले सौंदर्यही जोपर्यंत ते वर्ण व पदे वाक्यरूपाने संघटित केली जात नाहीत, तोपर्यंत तितकेसे प्रत्ययास येत नाही' असा सर्वसामान्यपणे[१७] पूर्वपक्ष्याच्या म्हणण्याचा आशय आहे. **प्रकाशयतः** यात **लक्षणहेत्वोः क्रियायाः**[१८] । या सूत्राप्रमाणे शतृ[१९] प्रत्यय लागला आहे, रौद्रादि रस प्रकाशित करणे हे ज्या दीप्तीचे वैशिष्ट्य आहे, त्या दीप्तीला ओजोगुण म्हणतात असा आशय. न **चाचारुत्वं**...इ.— यातील **च** हा शब्द 'कारण' या अर्थी घ्यावा. ज्या अर्थी 'स्वतःच्या बाहुबलाबद्दल फार घमेंड बाळगणारा' इ.[२०] उदाहरणात सौंदर्यहीनता भासत नाही त्या अर्थी, असा अर्थ. मात्र 'त्यांचे' म्हणजे त्या गुणांचे. 'आपापल्या विषयांशी'— 'शृंगार हाच मनाला पराकाष्ठेचा आनंद देणारा आणि म्हणूनच मधुर असा रस होय.[२१]' इ. वाक्यांनी गुणांचे आपआपल्या विषयांशी (म्हणजे रसांशी) असलेले नियतसाहचर्य सांगितलेच आहे.

टीपा

१) मम्मट काव्यप्रकाशातील ८ व्या उल्लासात सांगतो की, या गुणांचे वास्तव्य शब्द व वाच्य अर्थ यांच्या ठिकाणी मानले आहे, ते केवळ लक्षणेने.

२) पाहा, द्वितीय खंड "उद्‌द्योत – ३ 'ध्वनि पदप्रकाश कसा असू शकेल ही शंका व तिचे समाधान'" 'पण काय हो',... इ. परिच्छेद व त्यातील १ ली टीप.

३) शृंगारादि रसांची अभिव्यक्ति करणाऱ्या वाच्य अर्थाचा बोध करून देण्याचे सामर्थ्य म्हणजेच गुण असा पूर्वपक्ष्याचा म्हणण्याचा आशय. हे सामर्थ्य संघटित शब्दांच्याच ठिकाणी असू शकते; सुट्या असंघटित शब्दात नव्हे, म्हणून गुण हे संघटनेचे धर्म असे पूर्वपक्षी म्हणतो.

४) पाहा, द्वितीय खंड "उद्‌द्योत – ३ 'ध्वनि पदप्रकाश कसा असू शकेल ही शंका व तिचे समाधान'"

५) 'ओजोगुण म्हणजे पुष्कळ समासांनी युक्त असणे हा गद्याचा (व पद्याचाही) प्राण होय' असे दंडी आपल्या 'काव्यदर्शा' त १–८० येथे म्हणतो. पण ओजोगुण म्हणजे दीर्घसमासप्राचुर्य या पूर्वसूरींच्या मताचा डोळे मिटून स्वीकार केला पाहिजे असे नाही. प्रत्यक्षात जो अनुभव येत असेल त्यावरच आपण मत बनवले पाहिजे असे आनंदवर्धनांचे म्हणणे.

६) घटाचे रूप म्हणजे त्यांचा विशिष्ट रंग व आकार. आणि संयोग म्हणजे घटाचा भूतलाशी झालेला संयोग. रूप व संयोग यांचा आश्रय घट हा एकच असला, तरी त्या दोन गोष्टी भिन्न आहेत, एक नाहीत ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाची आहे.

७) घटाचा भूतलाशी संयोग होतो, तेव्हा त्या संयोयाचा आधार घट हा एकच नसतो, तर भूतल हाही असतो. रूप हा धर्म मात्र फक्त धटाच्याच ठिकाणी स्वतःसिद्ध असतो, त्याला तो घट भूतलाशी संयूक्त आहे किंवा नाही याची अपेक्षा नसते, म्हणून रूप व संयोग या दोन गोष्टी एकच आहेत असे मानण्याचा प्रसंग येणार नाही असे पूर्वपक्ष्याचे म्हणणे.

८) रूप व शब्दालंकार यांची स्थिति सारखी म्हणता येईल, कारण रूपाचा घट व शब्वालंकारांचा शब्द हा एकच आधार असतो. पण गुण हे शब्द व अर्थ या दोहोंच्याही आश्रयाने असतात, तसाच संयोगही घट व भूतल या दोहोंच्याही आश्रयाने असतो. म्हणून संयोग व गुण यांची परिस्थिति सारखीच आहे. यामुळे रूप व संयोग यांच्यामध्ये जसे एकरूपत्व नाही तसेच गुण व शब्दालंकार यांच्यामध्येही ते नाही, असे अभिनवगुप्तांचे म्हणणे.

९) म्हणजे गुण हे शब्दांच्या ठिकाणी राहतात असे आम्ही म्हणतो ते लक्षणेने म्हणजे गौण अर्थाने. पण प्रतिपक्षी मात्र ते 'गौण अर्थाने' असे न समजता खऱ्या अर्थानेच समजतो!

१०) इ. म्हणजे करुण व शान्त.

११) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – २ 'माधुर्य' गुण" 'हेच माधुर्याचे स्वरूप आहे' हे शब्द शेवटी असलेले वाक्य.

१२) म्हणजे गुण हे शब्दांशी एकरूप मानिले किंवा शब्दांचे धर्म मानिले, तरी ते संघटनेशी एकरूप किंवा संघटनेचे धर्म कसे काय होतात?

१३) पाहा, द्वितीयखंड, "उद्‌द्योत – ३ ध्वनि 'पदप्रकाश' कसा असू शकेल ही शंका व तिचे समाधान" वरील टीप १ ली.

१४) याच उद्‌द्योताच्या २ ऱ्या कारिकेमध्ये.

१५) हे मत म्हणजे रस हे वाक्यातूनच अभिव्यक्त होऊ शकतात, हे.

१६) वृत्तीमध्ये समासरहित किंवा छोटे समास असलेली संघटना ओजोगुणाचा आश्रय असू शकत नाही असे जे म्हटले आहे, त्याचा अर्थ असाः—ओजोगुणाला दीर्घसमासा संघटनाच आवश्यक असते, व दीर्घसमासां संघटना ही वाक्यातच संभवते, केवळ सुटे वर्ण किंवा सुटे शब्द यांमध्ये संभवत नाही.

१७) सर्वसामान्यपणे म्हणजे केवळ वाक्यातून प्रकट होणाऱ्या रसादिध्वनीपुरतीच ही शंका नसून वर्ण, पद इत्यादिकांतून प्रकट होणाऱ्या रसादिध्वनीलाही अनुलक्षून आहे.

१८) अष्टाध्यायी, ३—२—१२६.

१९) जेव्हा एखादी गौण क्रिया दुसऱ्या प्रधान क्रियेचे वैशिष्ट्य दाखविणारी असते किंवा एक क्रिया मुख्य क्रियेचे कारण (किंवा फळ) असते, तेव्हा गौण क्रियावाचक धातूला शतू म्हणजे **अत्** हा प्रत्यय लागतो. उदा. **शयाना भुञ्जते यवनाः** । व **अधीयानो गुरुगृहे** वसति । येथे शयनक्रिया व अध्ययनक्रिया या अनुक्रमे भोजनक्रिया व वसनक्रिया यांना गौण असून शयनक्रिया ही भोजनक्रियेचे वैशिष्ट्य दाखविते व अध्ययनक्रिया ही वसनक्रियेचे कारण किंवा फळ दर्शविते.

२०) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – २ 'ओजस' गुण".

२१) उद्‌द्योत २, कारिका ७ ते १०.

ध्वन्यालोकः

अथवा संघटनारूपा एव गुणाः । यत्तूक्तम्— 'संघटनावद्‌गुणानामप्यनियतविषयत्वं प्राप्नोति, लक्ष्ये व्यभिचारदर्शनात्' इति । तत्राप्येतदुच्यते—यत्न लक्ष्ये परिकल्पितविषयव्यभिचारस्तद्विरूपमेवास्तु । कथमचारुत्वं तादृशविषये सहृदयानां नावभातीति चेत्, कविशक्तितिरोहितत्वात् । द्विविधो हि दोषः—कवेरव्युत्पत्तिकृतोऽशक्तिकृतश्च । तत्राव्युत्पत्तिकृतो दोषः शक्तितिरस्कृतत्वात्कदाचिन्न लक्ष्यते । यस्त्व—शक्तिकृतो दोषः स झटिति प्रतीयते । परिकरश्लोकश्चात्र—

‘अव्युत्पत्तिकृतो दोषः शक्त्या संव्रियते कवेः ।
यस्त्वशक्तिकृतस्तस्य स झटित्यवभासते ॥’

तथा हि—महाकवीनामप्युत्तमदेवताविषयप्रसिद्धसंभोगश्रृङ्गारनिबन्धनाद्यनौचित्यं शक्तितिरस्कृतत्वाद् ग्राम्यत्वेन् न प्रतिभासते । यथा कुमारसंभवे देवीसंभोगवर्णनम् । एवमादौ च विषये यथौचित्यत्यागस्तथा दर्शितमेवाग्रे । शक्तितिरस्कृतत्वं चान्वयव्यतिरेकाभ्यामवसीयते । तथा हि शक्तिरहितेन कविना एवंविधे विषये शृङ्गार उपनिबध्यमानः स्फुटमेव दोषत्वेन प्रतिभासते ।

नन्वस्मिन्पक्षे— ‘यो यः शस्त्रं विभर्ति—’ इत्यादौ किमचारुत्वम्? अप्रतीयमानमेवारोपयामः । तस्माद्गुणव्यतिरिक्तत्वे गुणरूपत्वे च संघटनाया अन्यः कश्चिन्नियमहेतुर्वक्तव्य इत्युच्यते ।

ध्वन्यालोक

किंवा संघटना आणि गुण एकरूप समजावयाचे असले, तरी तसे समजा!

अर्थात मागे आम्ही म्हटले होते की, या पक्षी संघटनेचा ज्याप्रमाणे ठराविक रसांशीच संबंध नसतो, तसाच गुणांचाहि ठराविक रसांशी संबंध नाही असा प्रसंग ओढवेल! कारण काव्यामध्ये विशिष्ट संघटना आणि विशिष्ट रस यांमध्ये काही नियम असलेला दिसत नाही.

पण त्याही बाबतीत आम्ही असे म्हणतो की, ज्या काव्यात संघटनेचा स्वविषयांशी म्हणजे रसांशी व्यभिचार असल्याचे म्हणजे संघटनेचा ठराविक रसांशी असणारा संबंध मोडल्याचे दिसून येईल, त्या काव्यात काहीतरी न्यून किंवा विचित्रपणा आहे असेच समजा! यावर तुम्ही जर असे म्हणाल की, मग अशा उदाहरणात काही सौंदर्य हीनता आहे असे सहृदयांना का नाही जाणवत? तर त्यावर आमचे उत्तर असे की, त्या उदाहरणात ते न्यून कवीच्या प्रतिभेने झाकले जाते, म्हणून ते उदाहरण सौंदर्यहीन भासत नाही. कारण दोष हा दोन प्रकारचा. कवीची विद्वत्ता कमी असल्याने उत्पन्न होणारा आणि कवीची प्रतिभा बेताची असल्याने उत्पन्न होणारा. त्यांपैकी पहिला म्हणजे विद्वत्ता कमी पडल्याने उत्पन्न होणारा दोष एखादे वेळी लक्षात येण्याइतका स्पष्ट दिसत नाही, कारण तो कवीच्या प्रतिभेने झाकला जातो. पण जो दोष कवीची प्रतिभा बेताची असल्याने उत्पन्न होणारा असतो, तो तत्काळ उठून दिसतो. हा आशय थोडक्यात सांगणारा श्लोक असा—

विद्वत्तेच्या उणीवेमुळे उत्पन्न होणारा दोष कवीच्या प्रतिभेने झाकला जातो. पण जो दोष कवीची प्रतिभा अगदी अल्प असल्यामुळे उत्पन्न होणारा असतो, तो झटकन उजेडात येतो.[१]

उदाहरणार्थ— श्रेष्ठ देवतांसंबंधीचा मानवी व्यवहारातील संभोगशृंगार वर्णन करणे वगैरे प्रकारचे अनौचित्य महाकवींच्या हातूनही घडते, पण त्यांच्या प्रतिभेने ते झाकले गेल्यामुळे ते ग्राम्य म्हणून जाणवत नाही. जसे कुमारसंभवातील, पार्वती देवीच्या संभोगाचे वर्णन[२] आणि अशा तऱ्हेच्या उदाहरणात औचित्यभंग[३] ज्या ज्या कारणांमुळे होऊ शकतो, त्या त्या कारणांचे दिग्दर्शन पुढे[४] केलेच आहे. आणि प्रतिभेने हा दोष झाकला जातो हे अन्वय आणि व्यतिरेक यांवरून ठरवण्यात येते. कारण प्रतिभा नसलेल्या

कवीने अशा (म्हणजे उत्तम देवतादि) पात्रांच्या बाबतीत शृंगार वर्णिला, तर तो दोष म्हणून अगदी उघडपणे दिसतो.

पण काय हो, या (म्हणजे अचारुत्व झाकले जाते या) पक्षी 'स्वतःच्या बाहुबलाबद्दल जो जो कोणी'...इ. श्लोकामध्ये जो असुंदरपणा प्रतिभेने झाकला जातो असे तुम्ही म्हणता, तो कोणता[५] आहे? तर याचे उत्तर असे की, यात असुंदरपणा अनुभवास येत नसताही (येथे दीर्घसमासा संघटना नसल्याने) तो आपण उगाचच मानीत आहोत! (पण असे जरी आम्ही मानिले, तरी तो मानीव दोष येथे प्रतिभागुणामुळे झाकला जात आहे.) म्हणून संघटना ही गुणांहून वेगळी असो किंवा त्यांच्याशी एकरूप असो; त्या संघटनेचे नियामक (रस आणि गुण यांहून) वेगळे कोणते तरी कारण सांगणे आवश्यक आहे, म्हणूनच ते कारण आता सांगण्यात येत आहे.

लोचनम्

अथ वेति । रसाभिव्यक्तावेतदेव सामर्थ्य शब्दानां यत्तथा तथा संघटमानत्वमिति भावः ।

शक्तिः प्रतिभानं वर्णनीयवस्तुविषयनूतनोल्लेखशालित्वम् । व्युत्पत्तिस्तदुपयोगिसमस्तवस्तुपौर्वापर्यपरामर्शकौशलम् । तस्येति कवेः । अनौचित्यमिति । आस्वादयितृणां यः चमत्काराविघातस्तदेव रससर्वस्वमास्वादायत्तत्वात् । उत्तमदेवतासंभोगपरामर्शे च पितृसंभोग इव लज्जातङ्कादिना कश्चमत्कारावकाश इत्यर्थः । शक्तितिरस्कृतत्वादिति । संभोगोऽपि ह्यसौ वर्णितस्तथा प्रतिभानवता कविना यथा तत्रैव विश्रांतं हृदयं पौर्वापर्यपरामर्श कर्तुं न ददाति । यथा निर्व्याजपराक्रमस्य पुरुषस्याविषयेऽपि युध्यमानस्य तावत्तस्मिन्नवसरे साधुवादो वितीर्यते न तु पौर्वापर्यपरामर्शे तथात्रापीति भावः । दर्शितमेवेति । कारिकाकारेणेति भूतप्रत्ययः । वक्ष्यते हि— 'अनौचित्यादृते नान्यद्रसभङ्गस्य कारणम्' इत्यादि । अप्रतीयमानमेवेति । पूर्वापरपरामर्शविवेकशालिभिरपीत्यर्थः । गुणव्यतिरिक्तत्व इति । व्यतिरेकपक्षे हि संघटनाया नियमहेतुरेव नास्ति । ऐक्यपक्षेऽपि न रसो नियमहेतुरित्यन्यो वक्तव्यः ।

लोचन

'किंवा संघटना' इ.— शब्दांचे रसाभिव्यक्ति करण्याचे सामर्थ्य म्हणजे त्या शब्दांची तशी तशी (त्या त्या रसाच्या अभिव्यक्तीला पोषक अशी) जुळणी होणे हेच होय, असा अभिप्राय.

'शक्ति' म्हणजे प्रतिभा, म्हणजे 'वर्ण्य' वस्तूच्या नित्यनवीन पैलूंचा आविष्कार करण्याचे सामर्थ्य[६] (आणि) 'व्युत्पत्ति' म्हणजे त्या नवीन पैलूंच्या आविष्काराला उपयोगी पडणाऱ्या सर्व वस्तूंपैकी महत्त्वाची कोणती व कमी महत्त्वाची कोणती याचा औचित्याला अनुसरून विचार करण्याचे कौशल्य. (परिकरश्लोकातील) 'त्याच्या' म्हणजे कवीच्या. 'अनौचित्य'— रसास्वाद घेणाऱ्या सहृदयांच्या विस्मययुक्त आनंदामध्ये विघ्न न येणे हेच रसाचे सारसर्वस्व होय, कारण रस हा आस्वादावर (सर्वस्वी) अवलंबून असतो. श्रेष्ठ देवतांच्या संभोगाच्या वर्णनाची जाणीव मातापित्यांच्या संभोगाच्या वर्णनाप्रमाणे लज्जा, अमंगलाची (म्हणजे पावित्र्यभंगाची) शंका इ. विकार उत्पन्न करिते, मग त्यावेळी विस्मययुक्त आनंदाला वावच कोठला, असा अर्थ. "कारण तो कवीच्या प्रतिभेने झाकला जातो"— कारण

कुमारसम्भवामध्ये तो संभोगही त्या प्रतिभाशाली कवीने (म्हणजे कालिदासाने) अशा प्रकारे वर्णिला आहे की त्यामुळे रसिकाचे हृदय त्या संभोगवर्णनाच्या आनंदातच निमग्न होते व ते रसिकहृदयाला आपल्या योग्यायोग्यतेचा विचार करण्यास सवडच देत नाही. जसे उपजत पराक्रमी असणारा पुरुषदेखील जरी एखादेवेळी अयोग्य कारणासाठी लढाई करीत असला, तरी तो लढत असताना प्रेक्षकांकडून त्याची वाहवाच केली जाते, त्याच्या लढाईच्या कारणाच्या योग्यायोग्यतेचा विचार[७] करून तो अयोग्य कारणासाठी लढत आहे असे कळल्यावर त्याची वाहवा केली जात नाही.[८] तशीच परिस्थिति याही बाबतीत आहे, असा आशय.

"दिग्दर्शन पुढे केलेच आहे"– (म्हणजे) कारिकाकारांनी[९], म्हणून "केले" असे भूतकाळी रूप वापरले आहे.[१०] कारण पुढे[११] वृत्तिकार "रसभंगाचे कारण अनौचित्याशिवाय दुसरे नाही"– वगैरे म्हणणारच आहेत. "सौंदर्यहीनता प्रतीत होत नसली तरी"– योग्य काय व अयोग्य काय याचा विवेक करण्यास समर्थ असलेल्यांना सुद्धा, असा भावार्थ. 'गुणांहून वेगळी असो'– 'संघटना ही गुणांहून वेगळी' या पक्षी संघटनेचे नियमन करणारे कारणच नाही[१२] आणि 'संघटना व गुण एकच' या पक्षीसुद्धा रस हे संघटनेचे नियामक कारण नसल्यामुळे गुण व रस यांहून वेगळे कोणते तरी नियामक कारण सांगणे अवश्य आहे.

टीपा

१) आनंदवर्धनाच्या याच मताचा उल्लेख राजशेखर आपल्या 'काव्यमीमांसेत' अध्याय ५ मध्ये 'प्रतिभा व व्युत्पत्ति यांपैकी प्रतिभा ही अधिक श्रेष्ठ असे आनंदवर्धन म्हणतात' या वाक्याने करितो.

२) **कुमारसंभवम्**, सर्ग ८. जगन्नाथाने जयदेव वगैरे कवींच्या बाबतीत या प्रकारच्या अनौचित्याचा उल्लेख रसगंगाधर, (काव्यमाला आवृत्ति), पृ. ६४ वर केला आहे. त्या कवींनी जे तसे केले, ते गर्हणीयच होय. म्हणून आपण तसे करणे मुळीच योग्य होणार नाही, असे जगन्नाथ म्हणतो.

३) औचित्यत्याग आणि औचित्यात्याग असे दोन पाठभेद वेगवेगळ्या प्रतींमध्ये सापडतात. वर औचित्य–त्याग हा पाठभेद घेऊन अनुवाद केला आहे. औचित्यात्याग हा पाठ स्वीकारला, तर त्याची कारणे (औचित्याचा भंग ज्या उपायांनी टाळता येतो, ती) पुढे कारिका १० ते १४ यांमध्ये व त्यावरील वृत्तीमध्ये दिली आहेत, असा अर्थ होईल.

४) औचित्यभंग ज्या कारणांमुळे होतो, ती कारणे कारिका १८ ते १९ यांमध्ये पाहा

५) या ठिकाणी **किमचारुत्वम्**? हा पूर्वपक्ष्याचा प्रश्न आणि **अप्रतीयमानमेव आरोपयामः** हे उत्तर, असा काही प्रतींतील पाठ घेऊन आम्ही अनुवाद केला आहे. काही प्रतीत **किमचारुत्वमप्रतीयमानमेवारोपयामः** हे सर्व वाक्य पूर्वपक्ष्याचेच, असा पाठ आहे. त्याचा अर्थ 'काय, अचारुत्व प्रत्ययास येत नसतानाही ते आम्ही बळेच मानतो? असा होईल. पण तो पाठ घेतल्यास त्यावर आनंदवर्धनाचे उत्तर मिळत नाही, म्हणून तो पाठ आम्ही स्वीकारत नाही. जगन्नाथाने (रसगंगाधर, काव्यमाला आवृत्ति, पृ. ४५ वर) वेणीसंहारातील **कृतमनुमतं** दृष्टं **वा यैः** इ. श्लोकामध्ये रौद्ररस असूनही त्याला अनुकूल अशी समासप्रचुर रचना नसल्यामुळे

सौंदर्यहानि होते असे मत प्रकट केले आहे. जगन्नाथाचे हे मत **यो यः शस्त्रं बिभर्ति** या प्रस्तुत श्लोकालाही लागू पडेल. तेव्हा आनंदवर्धन व जगन्नाथ या दोघांमध्ये या बाबतीत मतभेद दिसतो.

६) पाहा, रुद्रट, काव्यालंकार, १—१५ :—

मनसि सदा सुसमाधिनि विस्फुरणमनेकधाभिधेयस्य ।
अक्लिष्टानि पदानि च भवन्ति यस्यामसौ शक्तिः ॥

शिवाय प्रथम खंड, "उद्‌द्योत — १ 'प्रतिभा शब्दाचा अर्थ'" वरील टीप ७ वी पाहा.

७) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत - १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" वरील टीप १० वी. रुद्रट 'काव्यालंकार,' १—१८मध्ये म्हणतो :—

युक्तायुक्तविवेको व्युत्पत्तिरियं समासेन ।

८) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत — १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही" रावणाची रति'... इ. वाक्य.

९) वृत्तिकारांनी **दर्शितमेवाग्रे** असे म्हणून **दर्शितम्** असे भूतकाळी विशेषण वापरले आहे. **अग्रे दर्शितम्** असे म्हटले असल्यामुळे सर्व कारिका वृत्तीच्या आधीच लिहिल्या गेल्या असल्या पाहिजेत व त्यामुळे कारिकाकार हा वृत्तिकाराहून भिन्न व वृत्तिकाराच्या आधी होऊन गेला असला पाहिजे असा म. म. डॉ. काणे यांनी निष्कर्ष काढला आहे. पण आतंदवर्धनांनी सर्व कारिका आधी लिहून काढल्या असतील व मागाहून त्या सर्वांवर विवरण केले असेल असेही मानणे शक्य आहे. त्यामुळे येथे **दर्शितम्** हा शब्दप्रयोग कारिकाकार व वृत्तिकार हे भिन्नच होते, असे निर्णायकपणे सिद्ध करू शकत नाही.

१०) पाहा, अष्टाध्यायी, ३—२—१०२.

११) पाहा, ध्वन्यालोक, काशी आवृत्ति, पृ. ३३० वरील **अनौचित्यादृते नान्यद्** इ, श्लोक.

१२) केवळ गुणच रसांशी अव्यभिचारी संबंधाने निगडित असू शकतात, म्हणून रस हे गुणांचे नियामक कारण मानिता येईल, पण संघटना ही गुणांहून वेगळी मानिल्यास ती रसांशी अव्यभिचारी संबंधाने निगडित नसल्यामुळे रस हे तिचे नियामक कारण होऊ शकणार नाही.

ध्वन्यालोकः

—तन्नियमे हेतुरौचित्यं वक्तृवाच्ययोः ॥ ६ ॥

तत्र वक्ता कविः कविनिबद्धो वा, कविनिबद्धश्चापि रसभावरहितो रसभावसमन्वितो वा, रसोऽपि कथानायकाश्रयस्तद्विपक्षाश्रयो वा, कथानायकश्च धीरोदात्तादिभेदभिन्नः पूर्वस्तदनन्तरो वेति विकल्पाः ।

वाच्यं च ध्वन्यात्मरसाङ्गं रसाभासाङ्गं वा, अभिनेयार्थमनभिनेयार्थं वा, उत्तमप्रकृत्याश्रयं तदितराश्रयं वेति बहुप्रकारम् । तत्र यदा कविरपगतरसभावो वक्ता, तदा रचनायाः कामचारः । यदापि कविनिबद्धो वक्ता रसभावरहितस्तदा स एव; यदा तु कविः कविनिबद्धो वा वक्ता रसभावसमन्वितो रसश्च प्रधानाश्रितत्वाद् ध्वन्यात्मभूतस्तदा नियमेनैव तत्रासमासामध्यमसमासे एव सङ्घटने । करुणविप्रलम्भशृङ्गारयोस्त्वसमासैव सङ्घटना । कथमिति चेत्, उच्यते—रसो यदा प्राधान्येन प्रतिपाद्यस्तदा तत्प्रतीतौ व्यवधायका विरोधिनश्च सर्वात्मनैव परिहार्याः । एवं च दीर्घसमासा सङ्घटना समासानामनेकप्रकारसम्भावनया कदाचिद्रसप्रतीतिं व्यवदधातीति तस्यां नात्यन्तमभिनिवेशः शोभते । विशेषतोऽभिनेयार्थे काव्ये, ततोऽन्यत्र च विशेषतः । करुणविप्रलम्भशृङ्गारयोः । तयोर्हि सुकुमारतरत्वात् स्वल्पायामप्यस्वच्छतायां शब्दार्थयोः प्रतीतिर्मन्थरीभवति । रसान्तरे पुनः प्रतिपाद्ये रौद्रादौ मध्यमसमासा सङ्घटना कदाचिद्धीरोद्धतनायकसम्बद्धव्यापाराश्रयेण दीर्घसमासापि वा तदाक्षेपाविनाभाविरसोचितवाच्यापेक्षया न विगुणा भवतीति सापि नात्यन्तं परिहार्या । सर्वासु च सङ्घटनासु प्रसादाख्यो गुणो व्यापी । स हि सर्वरससाधारणः सर्वसङ्घटनासाधारणश्चेत्युक्तम् । प्रसादातिक्रमे ह्यसमासापि सङ्घटना करुणविप्रलम्भशृङ्गारौ न व्यनक्ति । तदपरित्यागे च मध्यमसमासापि न न प्रकाशयति । तस्मात्सर्वत्र प्रसादोऽनुसर्तव्यः । अत एव च 'यो यः शस्त्रं बिभर्ति' इत्यादौ यद्योजसः स्थितिर्नेष्यते तत्प्रसादारव्य एव गुणो न माधुर्यम् । न चाचारुत्वम्, अभिप्रेतरसप्रकाशनात् । तस्माद्गुणाव्यतिरिक्तत्वे गुणव्यतिरिक्तत्वे वा सङ्घटनाया यथोक्तादौचित्याद्विषयनियमोऽस्तीति तस्या अपि रसव्यञ्जकत्वम् । तस्याश्च रसाभिव्यक्तिनिमित्तभूताया योऽयमनन्तरोक्तो नियमहेतुः, स एव गुणानां नियतो विषय इति गुणाश्रयेण व्यवस्थानमप्यविरुद्धम् ।

ध्वन्यालोक

वक्ता आणि त्याच्या बोलण्याचा वाच्यार्थ यांचे औचित्य हे संघटनेचे नियमन करणारे कारण होय ॥ ६ ॥

त्यापैकी वक्ता हा कवि स्वतःच आहे की, कवीने निर्मिलेले पात्र आहे; कविनिर्मित पात्र असले तर ते रसभावांनी रहित आहे, की रसभावांनी युक्त आहे; रसदेखील कथानायकाच्या ठिकाणी राहणारा आहे की प्रतिनायकाच्या आश्रयाने रहाणारा आहे; आणि कथानायकसुद्धा 'धीरोदात्त' वगैरेंपैकी कोणत्या प्रकारचा आहे, तसेच तो मुख्य की उपनायक आहे; हे (वक्त्याचे निरनिराळे) प्रकार असू शकतात. वाच्यार्थदेखील प्रधानभूत रसाला अभिव्यक्त करणारा आहे की प्रधानभूत रसाभासाला; त्या वाच्यार्थाच्या द्वारा सुचविला जाणारा रसभावादि अर्थ हा अभिनयाच्या द्वारा प्रकट करण्याजोगा आहे की त्याहून वेगळा आहे; तो वरच्या दर्जाच्या पात्रांनी बोलून दाखविला आहे की त्याहून वेगळ्या दर्जाच्या पात्रांनी; असा पुष्कळ प्रकारचा असू शकेल. त्यांपैकी कवि हा स्वतःच वक्ता असून रसभावांनी विरहित असेल, तर हवी ती संघटना वापरावी. कविनिर्मित पात्र हा वक्ता असून तो रसभावरहित असेल तेव्हाही तसेच, म्हणजे संघटनेबाबत काहीही नियम नाही. पण जेव्हा कवि किंवा कविनिर्मित पात्र वक्ता असून रसभावांनी युक्त असाच असेल आणि रसदेखील प्रधान असल्यामुळे त्या ध्वनिकाव्याचा आत्माच असेल तेव्हा त्या काव्यात मुळीच समास नसलेली, किंवा फार तर मध्यम लांबीचे समास असलेली, याच संघटना वापराव्या. मात्र करुण किंवा विप्रलम्भ शृंगाररस (मुख्य) असताना समासरहित संघटनाच वापरावी. का असे विचाराल, तर सांगतो— ज्यावेळी रसप्रधान म्हणून प्रतिपादन करायचा असेल त्यावेळी त्या रसाच्या प्रतीतीमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या किंवा त्या प्रतीतीला विरोध करणाऱ्या[1] गोष्टी हरप्रयत्नाने टाळाव्या; आणि त्याचप्रमाणे

समासांचे विग्रह अनेक प्रकारे होऊ शकत असल्यामुळे दीर्घसमास असलेली संघटना काही काही वेळा रसाच्या प्रतीतीला अडथळा आणते, म्हणून तसल्या संघटनेच्या बाबत कवीला फार आसक्ति असणे शोभत नाही. ही आसक्ति विशेषेकरून अभिनयाच्या द्वारा ज्याचा व्यंग्यार्थ प्रकट करावयाचा असतो, अशा आणि त्याव्यतिरिक्त म्हणजे अभिनयासाठी नसलेल्या, पण करुण व विप्रलंभ शृंगार मुख्य असलेल्या काव्यात मुळीच नसावी. कारण ते दोन रस अतिशय नाजूक प्रकृतीचे असल्यामुळे त्यांत थोडा जरी गढूळपणा आला, तरी त्यामुळे शब्दार्थांच्या प्रतीतीला विलंब लागतो. पण त्या दोहोतून निराळ्या, म्हणजे रौद्र वगैरे रसांचे प्रतिपादन करावयाचे असल्यास मध्यम समास असलेली संघटना, किंवा काही वेळा नायक धीरोद्धत असून त्याच्या मनाचा प्रक्षोभ व्यक्त करावयाचा असल्यास दीर्घ समास असलेली संघटनादेखील अगदी टाळली पाहिजे, असे नाही. वरीलसारख्या परिस्थितीत तीसुद्धा अगदी विसंवादी ठरत नाही. कारण दीर्घसमासा संघटनेकडून जो रसादि अर्थ सुचवावयाचा असतो, त्या रसादि अर्थाची अभिव्यक्ति करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वाच्यार्थाला त्या दीर्घसमासा संघटनेंची मदतच होत असते.

आणि संघटना कोणतीही असली तरी तिला प्रसाद हा गुण व्यापणारा असलाच पाहिजे (ही काळजी घ्यावी). कारण प्रसाद हा गुण सर्व रसांना व सर्व संघटनांना व्यापणारा आहे, म्हणजे त्या सर्वांच्या बाबतीत आवश्यक आहे हे (पूर्वी)[२] सांगितलेच आहे. कारण प्रसाद गुणाच्या अभावी समासरहित संघटनासुद्धा करुण व विप्रलंभशृंगार हे रस अभिव्यक्त करीत नाही. आणि प्रसादगुण जर सोडला नाही, तर मध्यम समासांनी युक्त अशी संघटनाही ते रस प्रकाशित करू शकत नाही असे नाही. म्हणून सर्व ठिकाणी प्रसादगुणाचा अवलंब करावा. म्हणूनच "स्वतःच्या बाहुबळाबद्दल फार गर्व बाळगणारा..." या उदाहरणात जर ओजोगुण आहे असे तुम्हाला वाटत नसेल, तर तेथे प्रसादच आहे असे समजा, पण माधुर्य मात्र नव्हे. आणि त्या उदाहरणात (ओजोगुण नसून प्रसादगुण आहे असे मानिले, तरी) कसलीही सौंदर्यहीनता नाही, कारण तो श्लोक इष्ट रसाची (म्हणजे रौद्र रसाची) अभिव्यक्ति करितो म्हणून संघटना ही गुणांहून वेगळी असो किंवा ते आणि ती एकचअसो, कोणत्या विषयाच्या म्हणजे रसाच्या बाबतीत कोणती संघटना वापरावी हे आताच सांगितलेल्या औचित्यावर अवलंबून असते. म्हणून ती (संघटना) ही रसाची अभिव्यंजक होऊ शकते. आणि ती रसादींच्या अभिव्यक्तीस कारणीभूत होण्यासाठी (औचित्य हा) जो नियामक हेतु नुकताच सांगितला, तोच गुणांनाही आपापल्या विषयांशी नियमाने बांधून टाकणारा असल्याने गुण हे संघटनेचा आश्रय असतात या पक्षीसुद्धा अडचण उत्पन्न होऊ नये.[३]

लोचनम्

तन्नियम इति कारिकाविशेषः । कथां नयति स्वकर्तव्याङ्गभावमिति कथानायको यो निर्वहणे फलभागी । धीरोदात्तादीति । धर्मयुद्धवीरप्रधानो धीरोदात्तः । वीररौद्रप्रधानो धीरोद्धतः । वीरशृङ्गारप्रधानो धीरललितः । दानधर्मवीरशान्तप्रधानो धीरप्रशान्त इति चत्वारो नायकाः क्रमेण सात्त्वत्यारभटीकैशिकीभारतीलक्षणवृत्तिप्रधानाः । पूर्वः कथानायकस्तदनन्तर उपनायकः । विकल्पा इति । वक्तृभेदा इत्यर्थः । वाच्यमिति । ध्वन्यात्मा ध्वनिस्वभावो यो रसस्तस्याङ्गव्यञ्जकमित्यर्थः । अभिनेयो वागङ्गसत्त्वाहार्यैराभिमुख्यं साक्षात्कारप्रायं नेयोऽर्थो व्यङ्ग्यरूपो ध्वनिस्वभावो यस्य तदभिनेयार्थं वाच्यं; स एव हि काव्यार्थ इत्युच्यते । तस्यैव चाभिनयेन योगः । यदाह मुनिः— 'वागङ्गसत्त्वोपेतान् काव्यार्थान् भावयन्ति' इत्यादि, तत्र तत्र । रसाभिनयनान्तरीयकतया तु तद्विभावादिरूपतया वाच्योर्थोऽभिनीयते इति वाच्यमभिनेयार्थमित्येषैव युक्ततरा वाचोयुक्तिः । न त्वत्र व्यपदेशिवद्भावो व्याख्येयः यथान्यैः । तदितरेति । मध्यमप्रकृत्याश्रयमधमप्रकृत्याश्रयं चेत्यर्थ । एवं वक्तृभेदान्वाच्यभेदांश्चाभिधाय तद्गतमौचित्यं

नियामकमाह—तत्रेति । रचनाया इति सङ्घटनायाः । रसभावहीनोऽनाविष्टस्तापसादिरुदासीनोऽपीतिवृत्ताङ्गतया यद्यपि प्रधानरसानुयाय्येव, तथापि तावति रसादिहीन इत्युक्तम् । स एवेति कामचारः । एवं शुद्धवक्त्रौचित्यं विचार्य वाच्यौचित्येन सह तदेवाह यदा त्विति । कविर्यद्यपि रसाविष्ट एव वक्ता युक्तः, अन्यथा 'स एव वीतरागश्चेत्' इति स्थित्या नीरसमेव काव्यं स्यात्, तथापि यदा यमकादिचित्रदर्शनप्रधानोऽसौ भवति, तदा 'रसादिहीन' इत्युक्तम् । (यदा) नियमेन रसभावसमन्वितो वक्ता न तु कथञ्चिदपि तटस्थः, रसश्च ध्वन्यात्मभूत एव न तु रसवदलङ्कारप्रायः, तदासमासामध्यमसमासे एव सङ्घटने, अन्यथा तु दीर्घसमासापीत्येव योज्यम् । तेन नियमशब्दस्य द्वयोश्चैवकारयोः पौनरुक्त्यमनाशङ्क्यम् । कथमिति चेदिति । किं धर्मसूत्रकारवचनमेतदिति भावः । उच्यत इति । न्यायोपपत्त्येत्यर्थः । तत्प्रतीताविति । तदास्वादे ये व्यवधायका आस्वादविघ्नरूपा विरोधिनश्च तद्विपरीतास्वादमया इत्यर्थः । सम्भावनयेति । (समासविग्रहः) अनेकप्रकारः संभाव्यते सङ्घटना तु सम्भावनायां प्रयोक्त्रीति द्वौ णिचौ । विशेषतोऽभिनेयार्थेति । अत्रुटितेन व्यङ्ग्येन तावत्समासार्थाभिनयो न शक्यः कर्तुम् । काक्वादयोऽन्तरप्रसादगानादयश्च तत्र दुष्प्रयोज्याः, बहुतसन्देहप्रसरा च तत्र प्रतिपत्तिर्न नाटयेऽनुरूपा स्यात् । प्रत्यक्षरूपत्वात्तस्या इति भावः । अन्यत्र चेति । अनभिनेयार्थेऽपि । मन्थरीभवतीति । आस्वादो विघ्नितत्वात्प्रतिहन्यत इत्यर्थः । तस्या दीर्घसमाससङ्घटनायाः य आक्षेपस्तेन विना यो न भवति व्यङ्ग्याभिव्यञ्जकस्तादृशो रसोचितो रसव्यञ्जकतयोपादीयमानो वाच्यस्तस्य यासावपेक्षा दीर्घसमाससङ्घटनां प्रति सा अवैगुण्ये हेतुः । नायकस्याक्षेपो व्यापार इति यद्व्याख्यातं तन्न श्लिष्यतीवेत्यलम् । व्यापीति । या काचित्सङ्घटना सा तथा कर्तव्या, यथा वाच्ये झटिति भवति प्रतीतिरिति यावत् । उक्तमिति । 'समर्पकत्वं काव्यस्य यत्तु' इत्यादिना । न व्यनक्तीति । व्यञ्जकस्य स्ववाच्यस्यैवाप्रत्यायनादिति भावः । तदिति प्रसादस्यापरित्यागे । अभीष्टत्वादत्रार्थे स्वकण्ठेनान्वयव्यतिरेकावुक्तौ । न माधुर्यमिति । ओजोमाधुर्ययोर्ह्यन्योन्याभावरूपत्वं प्राङ्निरूपितमिति तयोः सङ्करोऽत्यन्तं श्रुतिबाह्य इति भावः । अभिप्रेतेति । प्रसादेनैव स रसः प्रकाशित, न न प्रकाशित इत्यर्थः । तस्मादिति । यदि गुणाः सङ्घटनैकरूपास्तथापि गुणनियम एव सङ्घटनाया नियमः । गुणाधीनसङ्घटनापक्षेऽप्येवम् । सङ्घटनाश्रयगुणपक्षेऽपि सङ्घटनाया नियामकत्वेन यद्वक्तृवाच्यौचित्यं हेतुत्वेनोक्तं तद्गुणानामपि नियमहेतुरिति पक्षत्रयेऽपि न कश्चिद्विप्लव इति तात्पर्यम् ॥ ५—६ ॥

लोचन

तन्नियमे... इ. हा ६ व्या कीरिकेचा उरलेला भाग आहे. (वृत्तीचा भाग नाही), जो कथानकातील घटनांना आपल्या कार्याच्या अंगत्वाप्रत नेतो (म्हणजे आपण मिळविणार असलेल्या फळाचे साधन बनवितो), तो कथानायक. तो कथेच्या शेवटच्या भागामध्ये इष्ट फळ पदरात पाडून घेणारा असतो. "धीरोदात्त वगैरेंपैकी"— धर्म व युद्ध यांच्या बाबतीतला उत्साह हा स्थायिभाव ज्याच्यात प्रामुख्याने असतो, तो "धीरोदात्त" होय. वीर व रौद्र या दोहोंचेही (उत्साह व क्रोध हे) स्थायिभाव ज्याच्यामध्ये मुख्यत्वाने असतात, तो "धीरोद्धत." वीर आणि शृंगार यांच्या (उत्साह व रति या) स्थायिभावांचे प्राबल्य असणारा, तो "धीरललित" व दान, धार्मिक आचरण यांच्या बाबतीतल्या उत्साहाचे व शांत रसाच्या निर्वेद या स्थायिभावाचे प्राबल्य असणारा तो "धीरप्रशांत." या चार प्रकारच्या नायकांमध्ये सात्वती, आरभटी, कैशिकी व भारती या प्रकारच्या अर्थवृत्ति[४] अनुक्रमे प्रमुख असतात. 'मुख्य' म्हणजे कथानायक व 'त्याच्या नंतरचा' म्हणजे उपनायक. 'प्रकार' म्हणजे (कविनिर्मित) वक्त्याचे निरनिराळे प्रकार. 'वाच्यार्थ' इ.— ध्वनि हा ज्याचा आत्मा म्हणजे स्वरूप आहे अशा रसाचे अंग म्हणजे व्यंजक असलेला वाच्यार्थ, हा आशय. अभिनयाच्या द्वारा प्रकट करण्याजोगा म्हणजे वाचिक, आंगिक, सात्त्विक व आहार्य या चार प्रकारच्या[५]

अभिनयांनी सहृदयांच्या समोर म्हणजे त्यांच्या अनुभवाला आणला जाणारा ध्वनिस्वरूपी म्हणजे मुख्य असलेला व्यंग्यार्थ आहे ज्याचा, असा वाच्यार्थ म्हणजे अभिनेयार्थ वाच्य होय. कारण, त्या व्यंग्यार्थालाच काव्यार्थ म्हणतात. आणि त्या अर्थाचाच अभिनयाचे अंतिम साध्य म्हणून अभिनयाशी संबंध असतो. कारण भरतमुनींनी नाट्यशास्त्रात निरनिराळ्या ठिकाणी[६] म्हटलेच आहे– "वाणी, अंगे, सत्त्व या साधनांनी युक्त असे जे काव्यार्थ, त्यांना प्रकट करणारे ते 'भाव' होत, इ." रसाचा साक्षात्कार घडवावयास आवश्यक अशा विभाव वगैरेंच्या स्वरूपाचा असलेल्या वाच्यार्थाचा अभिनय केला जातो, म्हणून 'वाच्यार्थ हा अभिनेयार्थ[७] असतो' असे म्हणणे हेच योग्य आहे. इतर टीकाकारांनी याचे जसे विवरण केले आहे तसे म्हणजे 'व्यपदेशिवद्' भावाचा[८] अवलंब करून विवरण करणे योग्य होणार नाही. 'त्याहून वेगळ्या दर्जाच्या म्हणजे मध्यम दर्जाच्या व अधम दर्जाच्या पात्रांनी,' असा अर्थ. याप्रमाणे वक्त्यांचे प्रकार व वाच्यार्थांचे प्रकार सांगून झाल्यावर संघटनेचे नियमन करणारे वक्त्यांचे व वाच्यार्थांचे औचित्य कशा तऱ्हेचे असते हे वृत्तिकार 'त्यांपैकी' इ. शब्दांनी स्पष्ट करितात.' 'रचनेच्या' म्हणजे संघटनेच्या (बाबतीत). 'रसभावरहित' म्हणजे रसभावांनी व्याप्त न झालेली व तपस्वी वगैरेंसारखी संसारापासून अलिप्त असलेली पात्रेसुद्धा इतिवृत्ताची घटक अंगे असल्याने जरी त्यातील मुख्य रसाला अंगभूत असली, तरीसुद्धा ती तेवढ्यापुरती म्हणजे स्वतःपुरती रसभावांनी विरहित असतात असे वृत्तीमध्ये म्हटले आहे. 'संघटनेबाबत काहीही नियम नाही' म्हणजे हवी ती संघटना वापरावी. याप्रमाणे केवळ वक्त्याच्या औचित्याचा विचार केल्यावर वाच्यार्थाच्या औचित्याबरोबरच (म्हणजे एकाच वेळी) वक्त्याचे औचित्य वृत्तिकार 'पण जेव्हा' इ. शब्दांनी सांगत आहेत. कवि हा स्वतःच वक्ता असताना तो जरी रसभावांनी युक्त असणेच योग्य होईल– नाहीतर 'पण त्याचीच चित्तवृत्ति जर विषयपराङ्मुख असेल' इ. उक्तीप्रमाणे[९] त्याचे काव्य नीरसच होईल– तरीसुद्धा तो कवि एखादेवेळी मुख्यतः यमक वगैरे चित्रबंध रचण्याच्याच नादी लागतो. त्यावेळी तो रसादिरहित असतो असे वृत्तिकारांनी म्हटले आहे. काव्यातील वक्ता (म्हणजे स्वतः कवि किंवा कविनिर्मित पात्र) जेव्हा रस–भावांनी युक्त असाच असतो आणि कोणत्याही प्रकारे उदासीन असत नाही. आणि जेव्हा रस हा ध्वनि स्वरूपच म्हणजे प्रधानत्वाने सुचविलेला असतो, रसवदलंकारात असतो तसा म्हणजे गौणत्वाने सुचविलेला नसतो, त्यावेळी समासरहित किंवा थोडे समास असलेली किंवा मध्यम समास असलेलीच संघटना योजावी. तसे नसल्यास म्हणजे वक्ता रसभावरहित म्हणजे तटस्थ असेल तेव्हा किंवा रसभावादि अप्रधान असतील तेव्हा दीर्घसमास असलेली संघटनासुद्धा चालेल, असा अर्थ करावा. त्यामुळे 'नियम' हा शब्द आणि दोनदा **एव** म्हणजे 'च' हे अव्यय वापरल्यामुळे पुनरुक्ति झालेली आहे असे समजू नये.[१०] 'का असे विचाराल, तर' याचा आशय, ही काय धर्मसूत्रकारांची आज्ञा आहे (म्हणून सर्वांनी ते कसेही असले तरी मान्य केलेच पाहिजे)? 'सांगतो'– तर्कशुद्धपणे पटवून देतो, असा अर्थ 'त्या रसाच्या प्रतीतीमध्ये'– त्या रसाच्या आस्वादामध्ये ज्या गोष्टी अडथळा उत्पन्न करणाऱ्या म्हणजे आस्वादनाच्या क्रियेमध्ये विघ्ने ठरणाऱ्या आणि विरोध करणाऱ्या म्हणजे अगदी विरूद्ध रसाचा आस्वाद घडविणाऱ्या असतील त्या गोष्टी, असा अर्थ. 'होऊ शकत असल्यामुळे'– वाचक, समासांचा विग्रह अनेक प्रकारांनी करतात (म्हणजे व्हावयास लावतात) आणि संघटना ही अनेक प्रकारांनी वाचकांना विग्रह करावयास लावते, अशा रीतीने **सम्+भू** या धातूला प्रयोजकाचा प्रत्यय दोनदा लावला आहे.[११]

'विशेषेकरून अभिनयाच्या द्वारा ज्याचा व्यंग्यार्थ'– रचना दीर्घसमासयुक्त असताना व्यंग्यार्थाचे विभाग न पाडता म्हणजे अखंडपणे त्याचा अभिनय करणे शक्य नाही.[१२] शिवाय काकु[१३] वगैरे, तसेच आंतरगान, प्रसादगान[१४] इ. गोष्टी रचना दीर्घसमासा असताना करावयास कठीण होतील आणि दीर्घसमासा रचनेमुळे अर्थाबाबत अनेक संशय उत्पन्न होऊन त्या रचनेपासून नाटकामध्ये योग्य अशी प्रतीति होणार नाही, कारण नाट्यामध्ये काकु, आंतरगान इत्यादींपासून होणारा बोध प्रत्यक्ष ज्ञानापासून होणाऱ्या

बोधासारखा असणे इष्ट आहे.' आणि त्याव्यतिरिक्त म्हणजे अभिनयाने ज्यातील व्यंग्यार्थ प्रकट करण्याजोगा नसतो, अशा काव्याच्या बाबतीतसुद्धा, प्रतीतीला विलंब लागतो, म्हणजे त्या रचनेपासून होणाऱ्या रसास्वादामध्ये विघ्ने उत्पन्न झाल्याने तो आस्वाद खंडित होतो, असा अर्थ. त्या दीर्घसमासा संघटनेच्या द्वारे ज्याला अटळपणे व्यंजकत्व प्राप्त होते, जो क्रोध या व्यंग्य स्थायी भावाचा व्यंजक असतो व म्हणून रौद्र रसाच्या अभिव्यक्तीला उचित असतो व त्यामुळेच जो रौद्र रसाचा व्यंजक म्हणून स्वीकारला जातो, त्या वाच्यार्थाला दीर्घसमासा संघटना रौद्रादि रसांच्या अभिव्यक्तीसाठी प्रतिकूल ठरत नाही. आता 'त्याचा म्हणजे नायकाचा आक्षेप म्हणजे' व्यापार असे जे कोणी वृत्तीतील **तदाक्षेप** या शब्दाचे विवरण केले आहे, ते योग्य नाही. तेव्हा झाली एवढी चर्चा पुरे. 'व्यापणारा' जी कोणती संघटना योजावयाची असेल, ती अशा तऱ्हेने हाताळावी की त्यामुळे, वाच्यार्थाची प्रतीति लवकर होईल असा आशय. 'सांगितलेच आहे'– पण कोणत्याही रसाची प्रतीति' इ. (उद्‌द्योत २ मधील १० व्या) कारिकेमध्ये. 'अभिव्यक्त करीत नाही'– कारण (प्रसादगुण नसल्यास) काव्याचा स्वतःचा वाच्यार्थ– जो करुण व विप्रलभ शृंगाराचा व्यंजक म्हणून योजिला असतो, त्याचेही ज्ञान (समासरहित संघटनेतसुद्धा) होत नाही, हा भावार्थ. 'तो सोडला नाही तर'– म्हणजे प्रसादगुणाचा त्याग केला नाही तर. प्रसादगुणाच्या बाबतीत त्या गुणांचे महत्त्व वृत्तिकारांना विशेष वाटत असल्यामुळे त्यांनी स्वमुखाने या प्रसादगुणाच्या बाबतीतले अन्वय व व्यतिरेक[१५] ('प्रसादगुण जर सोडला नाही' आणि 'प्रसादगुणांच्या अभावी' या शब्दांत) सांगितले आहेत. 'पण माधर्य मात्र नव्हे'– कारण ओजस् माधुर्य या गुणांवर एकमेकांचा अभाव असतो[१६] असे पूर्वी[१७] सांगितले असल्यामुळे त्या दोन गुणांचा संकर झाल्याचे म्हणजे ते दोन गुण एकत्र आल्याचे कधीच ऐकिवात नाही, हे तात्पर्य. 'इष्ट रसाची' प्रसाद गुणामुळेच तो रस[१८] प्रकाशित केला जातो, प्रकाशित केला जात नाही असे नाही, असा आशय. 'म्हणून' जरी गुण हे संघटनेशी एकरूप आहेत असे मानिले, तरी विशिष्ट गुण विशिष्ट रसांशी संबद्ध असतो हाच नियम संघटनेलाही लागू पडतो संघटना ही (गुणांहून भिन्न असली तरी ती) गुणांवर अवलंबून असते हा पक्ष स्वीकारला, तरी वरीलप्रमाणेच (म्हणजे गुणांचा रसांच्या बाबतीतला नियम संघटनेलाही लागू पडेल). 'संघटना हा गुणांचा आश्रय आहे' या पक्षी सुद्धा संघटनेचे नियमन करणारे कारण म्हणून वक्त्यांचे व वाच्यार्थांचे जे औचित्य सांगितले, ते गुणांचेही नियामक होईल. अशा रीतीने तिन्ही पक्षी कोणतीही अडचण उत्पन्न होत नाही, [१९], हे तात्पर्य ॥ ५, ६ ॥

टीपा

१) म्हणजे विपरीत रसभावादींची प्रतीति घडवून आणणाऱ्या.

२) पाहा, उद्‌द्योत २ रा, कारिका १० व तीवरील वृत्ति.

३) गुण व संघटना या दोहोंनाही आपापल्या विषयांशी (म्हणजे रसादिकांशी) बांधून टाकणारा हेतू औचित्य हा एकच असल्याने गुण व संघटना एकरूप समजा, किंवा वेगळे समजून ते तिचा किंवा ती त्यांचा आश्रय समजा; कोणत्याही पक्षी अडचण होत नाही.

४) या वृत्तींची माहिती नाट्यशास्त्र, अध्याय २० मध्ये दिली आहे. अध्याय ६, २४–२५ येथे ती संक्षेपाने दिलेली आढळेल. याच उद्‌द्योतातील कारिका १९ वरील वृत्तीमध्ये व कारिका ३३ ते ४७ मध्येही या वृत्तींना अर्थवृत्ति असे संबोधून त्यांचा निर्देश केलेला आहे, त्यावरील संबंधित टीपही पाहावी

५) या चार प्रकारच्या अभिनयांचे विवेचन भरतांनी नाट्यशास्त्र, अध्याय ७. (सात्त्विक), अध्याय ८ ते १३ (आंगिक), अध्याय १४ ते १७ (वाचिक) व अध्याय २१ (आहार्य) यांमध्ये केले आहे.

६) नाट्यशात्र, अध्याय ७, कारिका १ पूर्वीच्या गद्य भागात आणि कारिका १ ते ३ मध्ये.

७) 'अभिनेयार्थ' हा समास मूळ वृत्तीमध्ये व लोचनातही 'अभिनेय आहे अर्थ ज्याचा' असा, बहुव्रीहि आहे.

८) 'व्यपदेशिवद्भाव' म्हणजे दोन गोष्टी एकच असून त्या भिन्न आहेत असे मानणे. उदा. 'राहूचे शिर' असे म्हणण्यात (राहूला शरीर नसल्याने) राहु हेच शिर असते, व तरीही 'राहूचे शिर' असे म्हटले जाऊन राहु व त्याचे शिर ही दोन वेगळी आहेत असा भास निर्माण केला जातो. तसेच येथे 'अभिनेय आहे वाच्यार्थ ज्याचा' असा वाच्यार्थ, असा विग्रह केल्यास वाच्यार्थ ही वस्तुतः एकच असून 'वाच्यार्थाचा वाच्यार्थ' असे म्हणण्याने वाच्यार्थ भिन्न आहेत असा भास निर्माण केला जातो. म्हणून 'अभिनेय आहे व्यंग्यार्थ ज्याचा' असा वाच्यार्थ असे अभिनवगुप्त विवरण करितात.

९) उद्द्योत ३. कारिका ४२ वरील वृत्तीमध्ये उद्धृत केलेल्या श्लोकात हे वाक्य आले आहे.

१०) कारण **नियमेनैव** या शब्दांचा अन्वय **रसभावसमन्वितः** याच्याशी झालेला असून एका **एव** चा संबंध **नियमेन** याकडे व दुसऱ्या **एव** या शब्दाचा संबंध **असमासामध्यमसमासे** याकडे आहे.

११) 'समासांचे विग्रह अनेक प्रकारे संभवतात' ही प्रयोजकाचा प्रत्यय न लागलेली अवस्था. वाचक समासांचे विग्रह अनेक प्रकारे करितात (म्हणजे व्हावयास लावतात) ही प्रयोजकाचा पहिला प्रत्यय लागलेली अवस्था आणि 'दीर्घसमासा संघटना वाचकांना समासांचे विग्रह अनेक प्रकारे करावयास लावते' ही प्रयोजकाचा दुसरा प्रत्यय लागलेली अवस्था होय.

१२) म्हणजे अशा रचनेमध्ये व्यंग्यार्थाचे विभाग पाडूनच त्याचा अभिनय करावा लागेल व तसे करणे इष्ट नाही, कारण रसभावादिकांचा अभिनय अखंडपणेच करावयाचा असतो, तुकडे पाडून नाही.

१३) म्हणजे स्वरामध्ये बदल करणे. पाहा, प्रथमखंड "उद्द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्यांचे खंडन'" वरील टीप ७९ वी.

१४) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'प्रसाद' गुण".

१५) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" वरील पहिली टीप.

१६) म्हणजे हे गुण परस्परविरोधी आहेत.

१७) म्हणजे प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'ओजस्' गुण वरील" 'याप्रमाणे माधुर्य आणि दीप्ति' इ. वाक्यामध्ये. मन द्रवणे (माधुर्य) व मन प्रदीप्त होणे (ओजस्) या दोन अवस्था परस्पर विरुद्ध आहेत, हे स्पष्टच आहे.

१८) म्हणजे 'स्वतःच्या बाहुबलाबद्दल' इ. श्लोकातून प्रकट होणारा रौद्र रस. हा श्लोक प्रथम खंड, "उद्द्योत - २ 'ओजस' गुण" वर आला आहे.

१९) कारण या तिन्ही पक्षी गुण व संघटना या दोहोंनाही आपापल्या विषयांशी (म्हणजे रसादिकांशी) बांधून टाकणारा 'औचित्य' हा एकच हेतु आहे.

ध्वन्यालोकः

विषयाश्रयमप्यन्यदौचित्यं तां नियच्छति ।
काव्यप्रभेदाश्रयतः स्थिता भेदवती हि सा ॥ ७ ॥

वक्तृवाच्यगतौचित्ये सत्यपि विषयाश्रयमन्यदौचित्यं सङ्घटनां नियच्छति । यतः काव्यस्य प्रभेदा मुक्तकं संस्कृतप्राकृतापभ्रंशानिबद्धम् । सन्दानितकाविशेषककलापककुलकानि । पर्यायबन्धः परिकथा खण्डकथासकलकथे सर्गबन्धोऽभिनेयार्थमाख्यायिकाकथे इत्येवमादयः । तदाश्रयेणापि सङ्घटना विशेषवती भवति । तत्र मुक्तकेषु रसबन्धाभिनिवेशिनः कवेस्तदाश्रयमौचित्यम् । तच्च दर्शितमेव । अन्यत्न कामचारः ॥

ध्वन्यालोक

विषय म्हणजे काव्याचा प्रकार. त्यासंबंधीचे औचित्य हेदेखील त्या संघटनेचे नियामक कारण असते. कारण काव्याचा जो प्रकार असेल त्याप्रमाणे ती संघटनाही निरनिराळ्या प्रकारची असू शकते ॥ ७ ॥

काव्यातील बोलणारी व्यक्ती आणि वाच्यार्थ यांचे औचित्य जरी (संघटनेचे नियमन करीत) असले, तरी काव्याच्या प्रकाराला अनुसरून असणारे आणखी एक औचित्य त्या संघटनेचे नियमन करिते. कारण काव्याचे प्रकार म्हणजे (१) मुक्तक, हे संस्कृत, प्राकृत अगर अपभ्रंशात रचलेले असू शकते. (२) संदानितक, (३) विशेषक, (४) कलापक, (५) कुलक (६) पर्यायबंध, (७) परिकथा (८) खंडकथा (९) सकलकथा (१०) सर्गबंध (११) साभिनय प्रयोगाचा विषय असलेले काव्य, (१२) आख्यायिका, (१३) कथा इत्यादि. यांपैकी कवीने जो प्रकार रचावयास घेतला असेल, त्या प्रकाराला अनुसरून संघटनासुध्दा वेगवेगळी असते. त्यांपैकी मुक्तकांमधून कवीला रसाभिव्यक्ति घडवावयाची इच्छा असल्यास कवीने त्या रसादींबाबतचे संघटनेचे औचित्य पाळावे. ते औचित्य कोणते हे काही वेळा पूर्वी (पाहा, कारिका ६ वरील वृत्तीचा प्रारंभीचा भाग) सांगितलेच आहे. इतर ठिकाणी कवीने इच्छेला येईल ती संघटना वापरावी.

लोचनम्

नियामकान्तरमप्यस्तीत्याह– विषयाश्रयमिति । विषयशब्देन सङ्घातविशेष उक्तः । यथा हि सेनाद्यात्मकसङ्घातनिवेशी पुरुषः कातरोऽपि तदौचित्यादनुगुणतयैवास्ते तथा काव्यवाक्यमपि सङ्घातविशेषात्मकसन्दानितकादिमध्यनिविष्टं तदौचित्येन वर्तते । मुक्तकं तु विषयशब्देन यदुक्तं तत्सङ्घाताभावेन स्वातन्त्र्यमात्रं प्रदर्शयितुं स्वप्रतिष्ठितमाकाशमिति यथा । अपिशब्देनेदमाह–सत्यपि वक्तृवाच्यौचित्ये विषयौचित्यं केवलं तारतम्यभेदमात्रव्याप्तम्, न तु विषयौचित्येन वक्तृवाच्यौचित्यं निवार्यत इति । मुक्तकमिति मुक्तमन्येनानालिङ्गितं तस्य सञ्ज्ञायां कन् । तेन स्वतन्त्रतया

परिसमाप्तनिराकाङ्क्षार्थमपि प्रबन्धमध्यवर्ति न मुक्तकमित्युच्यते । मुक्तकस्यैव विशेषणं संस्कृतेत्यादि । क्रमभावित्वात्तथैव निर्देशः । द्वाभ्यां क्रियासमाप्तौ सन्दानितकम् । त्रिभिर्विशेषकम् । चतुर्भिः कलापकम् । पञ्चप्रभृतिभिः कुलकम् । इति क्रियासमाप्तिकृता भेदा इति द्वन्द्वेन निर्दिष्टाः । अवान्तरक्रियासमाप्तावपि वसन्तवर्णनादिरेकवर्णनीयोद्देशेन प्रवृत्तः पर्यायबन्धः । एकं धर्मादिपुरुषार्थमुद्दिश्य प्रकारवंचित्र्येणानन्तवृत्तान्तवर्णनप्रकारा परिकथा । एकदेशवर्णना खण्डकथा । समस्तफलान्तेतिवृत्तवर्णना सकलकथा । द्वयोरपि प्राकृतप्रसिद्धत्वाद् द्वन्द्वेन निर्देशः । पूर्वेषां तु मुक्तकादीनां भाषायामनियमः । महाकाव्यरूपः पुरुषार्थफलः समस्तवस्तुवर्णनाप्रबन्धः सर्गबन्धः संस्कृत एव । अभिनेयार्थं दशरूपकं नाटिकात्रोटकरासकप्रकरणिकाद्यवान्तरप्रपञ्चसहितमनेकभाषाव्यामिश्ररूपम् । आख्यायिकोच्छ्वासादिना वक्त्रापरवक्त्रादिना च [काव्यानुशासन, पृ. ४६६ व क. ल. वि. पृ. १७१ येथे 'वसन्तवर्णनाद्येक' असा पाठ आढळतो]. **युक्ता । कथा तद्विरहिता । उभयोरपि गद्यबन्धस्वरूपतया द्वन्द्वेन निर्देशः । आदिग्रहणाच्चम्पूः । यथाह दण्डी- 'गद्यपद्यमयी चम्पूः' इति । अन्यत्रेति । रसबन्धानभिनिवेशे ।**

लोचन

संघटनेचे नियमन करणारे दुसरेही कारण आहे असे कारिकाकार 'विषयासंबंधीचे औचित्य' इ. शब्दांनी सांगतात. 'विषय' हा शब्द काव्याच्या घटकावयवांचा[१] विशिष्ट प्रकारचा समूह' या अर्थाचा वाचक आहे. कारण ज्याप्रमाणे सैन्य वगैरे स्वरूपाच्या समुदायामध्ये घटक म्हणून अंतर्भूत झालेला एखादा माणूस भित्रा असला तरी त्या समुदायाला योग्य दिसण्याच्या दृष्टीने त्या समुदायाला उपकारक होईल अशा रीतीने म्हणजे भित्रा नसल्याप्रमाणेच वागतो, त्याप्रमाणेच काव्यात वापरलेल्या वाक्याचे स्वरूप सुद्धा विशिष्ट प्रकारचा समूह या स्वरूपाच्या संदानितक वगैरे प्रकारात प्रविष्ट केलेले असल्याने त्या प्रकाराला उचित असे असते. कारिकेतल्या 'विषय' या शब्दाचे विवरण करिताना वृत्तीत 'मुक्तका' चा निर्देश केला आहे. पण मुक्तक हे 'संघात' (म्हणजे काव्यघटक पद्यांचा समूह) या स्वरूपाचे नसते. तेव्हा 'मुक्तक' हा शब्द केवळ त्याच्या बाबतीत कवीला कोणत्याही प्रकारची संघटना वापरण्याचे स्वातंत्र्य असते हे दर्शविण्यासाठीच वापरला आहे. जसे 'आकाश हे स्वतःच्या ठिकाणीच राहणारे आहे' असे म्हटले जाते, ते इतर[२] महाभूतांहून आकाशाचे स्वातंत्र्य दर्शविण्यासाठीच म्हटले जाते, त्याप्रमाणे. 'देखील' या शब्दाने कारिकाकार असे सुचवितात– वक्ता आणि वाच्यार्थ यांचे औचित्य संघटनेचे नियामक आहेच, आणि तरीही विषयाचे म्हणजे काव्यप्रकाराचे औचित्य केवळ थोडा बदल करावयास लावणारे आहे. त्याचा अर्थ असा नव्हे की, विषयांचे औचित्य हे वक्ता आणि वाच्यार्थ यांच्या औचित्याला बाजूला सारणारे असते.[३] 'मुक्तक'– मुक्त म्हणजे दुसऱ्या पद्यांशी वाक्यरचनेच्या दृष्टीने निगडित नसलेले असे स्वयंपूर्ण पद्य. त्या 'मुक्त' शब्दाला **कन्**[४] (म्हणजे क) हा प्रत्यय 'संज्ञा' या अर्थी लागून 'मुक्तक' हा शब्द बनला आहे.[५] त्यामुळे एखादा श्लोक स्वतंत्रपणे म्हणजे आपल्यापुरता संपूर्ण अर्थाचा बोध करून देणारा असला व दुसऱ्या कोणत्याही पद्यावर अवलंबून नसला तरी तो जर एखाद्या प्रबंधामध्ये समाविष्ट झालेला असला, तर त्याला 'मुक्तक' म्हणत नाहीत. 'संस्कृत प्राकृत...' इ. विशेषण केवळ मुक्तकाचेच आहे.[६] संस्कृतपासून प्राकृत व प्राकृतपासून अपभ्रंश निर्माण झाले असल्यामुळे वृत्तीमध्ये (संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश यांचा) त्याचप्रमाणे निर्देश केला आहे. दोन श्लोकात मिळून एक क्रिया संपूर्ण[७] होत असल्यास ते 'संदानितक[८]' होय. क्रिया तीन श्लोकात पूर्ण होत असली, तर ते 'विशेषक' व चार श्लोकात क्रिया पूर्ण केली असली तर ते 'कलापक' होय. आणि पाच किंवा त्यांहून अधिक श्लोकांत एक क्रिया पूर्ण झाली असल्यास त्याला 'कुलक' म्हणावे. किती श्लोकांत एक क्रिया पूर्ण होते, यावर हे काव्यप्रकार अवलंबून असल्यामुळे त्यांचा वृत्तीमध्ये एकाच द्वंद्व समासात निर्देश केला आहे. एकेका श्लोकात जरी एकेक अवांतर क्रिया[९] आपल्यापुरती पूर्ण होत असली

तरी वसंतऋतु वगैरेसारख्या एकेका विषयाचे वर्णन करण्याच्या उद्देशाने लिहिलेल्या श्लोकांचा समूह म्हणजे 'पर्यायबंध'.[१०] धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांपैकी एका पुरुषार्थासंबंधी निरनिराळ्या प्रकारांनी अनेक घटना वर्णन करणारी कथामालिका म्हणजे 'परिकथा.[११]' 'खंडकथा ही कोणत्याही संपूर्ण इतिवृत्ताच्या एका भागाचे कथारूपाने वर्णन करणारी असते.[१२] एका संपूर्ण म्हणजे फलप्राप्तीसहित इतिवृत्ताचे वर्णन करणारी[१३] ती 'सकलकथा'. परिकथा व खंडकथा या दोन्ही प्राकृतात लिहिल्या जाणाऱ्या म्हणून प्रसिद्ध आहेत, यास्तव त्या दोहोंचा वृत्तिकारांनी एकाच द्वंद्व समासाने उल्लेख केला आहे. त्यापूर्वीच्या (म्हणजे मुक्तकापासून परिकथेपर्यंतच्या) प्रकारांच्या बाबतीत ते अमुकच भाषेत लिहावे असा नियम नाही. महाकाव्याच्या रूपात असणारा आणि पुरुषार्थाची प्राप्ति झाल्याचे वर्णन करणारा, सर्गरूपी विभाग असणारा, एखाद्या विषयाचे संपूर्ण वर्णन करणारा प्रबंध, हा संस्कृतातच लिहिलेला असतो[१४]. ज्याचा विषय अभिनयाच्या द्वारा प्रकट केला जातो, ते म्हणजे नाटिका, त्रोटक, रासक, प्रकरणिका वगैरे उपप्रकारांसहित असलेली दहा प्रकारची रूपके.[१५] ती (संस्कृत, प्राकृत, शौरसेनी, मागधी वगैरे) अनेक भाषांत लिहिली जातात. आख्यायिका ही 'उच्छ्वास' वगैरे नावे असलेल्या भागांनी व मधूनमधून वक्त्र, अपरवक्त्र वगैरे छंदांनी युक्त असणारी गद्यकथा होय. 'कथा' ही उच्छ्वास नामक भाग, वक्त्र, अपरवक्त्र इ. वृत्तांनी विरहित असते. या दोन्ही[१६] गद्य स्वरूपात असतात, म्हणून त्यांचा निर्देश एका ('आख्यायिकाकथे' या) द्वंद्व समासाने केला आहे. वृत्तीतल्या 'इत्यादि' या शब्दाने 'चम्पू' या काव्यप्रकाराचा बोध होतो. तिचे 'गद्य व पद्य या दोहोंचे मिश्रण असलेली ती चम्पू' असे वर्णन दण्डीने केले आहे.[१७] इतर ठिकाणी म्हणजे ज्यातून रस, भाव वगैरेचे प्रतिपादन करण्याची कवीची इच्छा नसते, अशा काव्यप्रकारांमध्ये.

टीपा

१) हे घटकावयव म्हणजे काव्यातील वाक्ये, श्लोक, इ.

२) इतर म्हणजे पृथ्वी, जल, तेज आणि वायु ही महाभूते आकाशाच्या ठिकाणी राहतात, पण आकाश मात्र इतर महाभूतांपैकी कोणाच्याही ठिकाणी राहात नाही म्हणून ते स्वतःच्या ठिकाणीच राहते असे म्हटले जाते, त्याप्रमाणे मुक्तक हेही विशिष्ट संघटनेला बांधलेले नाही.

३) म्हणजे विषयाचे (काव्यप्रकाराचे) औचित्य वक्ता आणि वाच्यार्थ यांच्या औचित्याला पूरक आहे, त्यांना बाजूला सारणारे नाही.

४) अष्टाध्यायी, ५–३–८७, **संज्ञायां कन्**।

५) पाहा, पुढे ७ व्या कारिकेवरील लोचनातील 'कारण आधीच्या किंवा नंतरच्या...' इ. वाक्य.

६) म्हणजे संदानितक, विशेषक इत्यादींचे नाही असे अभिनवगुप्तांना म्हणावयाचे आहेसे दिसते. पण 'मुक्तकापासून परिकथेपर्यंतच्या काव्यप्रकारांमध्ये भाषेसंबंधी नियम नाही' असे खुद्द अभिनवगुप्तांनीच काही वेळापूर्वी म्हटले हेमचंद्रही (काव्यानुशासन, अहमदाबाद संस्करण, पृ. ४६६ वर) **एतानि** (**मुक्तकादीनि**) **विशेषानभिधानात् सर्वभाषाभिर्भवति**। असे म्हणतो.

७) 'क्रिया संपूर्ण होणे' म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण होणे.

८) या 'संदानितका' लाच 'युग्म' असेही म्हणण्यात येते.

९) अवान्तर क्रिया म्हणजे मुख्य क्रियेवर अवलंबून असणारी गौण क्रिया.

१०) हेमचंद्राने (काव्यानुशासन, पृ. ४६६ वर) 'पर्यायबंध' या ऐवजी 'पर्या' असा शब्द वापरला आहे. त्याने 'पर्या' याचे लक्षण अभिनवगुप्तांप्रमाणेच केले आहे. क. ल. वि. मध्ये (पृ. १७१ वर) सोमेश्वराची काव्यप्रकाशटीका येथेही 'पर्या' असाच पाठ आहे. तो म्हणतो.– **अवान्तरवाक्यसमाप्तावपि वसन्ताद्येकवर्णनीयोद्देशेन मुक्तकानामुपनिबन्धः पर्या । सो कोशेषु प्रचुरं दृश्यते ।** यातील वसन्ताद्येकवर्णनीय हा पाठ लोचनातील वसन्तवर्णनादिरेकवर्णनीय या पाठापेक्षा अधिक चांगला वाटतो. कालिदासाचे 'ऋतुसंहार' हे पर्यायबन्धाचे उदाहरण मानिता येईल. भर्तृहरीच्या नीतिशतकालाही 'पर्यायबन्ध' म्हणता येईल, कारण त्यातही सज्जनप्रशंसा, दुर्जननिंदा इ. विषयवारीने मुक्तकांचे समूह रचले आहेत. प्राकृत भाषेतील **वज्जालग्ग** ही ग्रंथही 'पर्यायबन्ध'च आहे.

११) परिकथा या प्रकाराचा एकही ग्रंथ सध्या उपलब्ध नाही. पण भोजाने व हेमचंद्राने 'शूद्रककथे' चा परिकथा म्हणून निर्देश केला आहे आणि 'कीथ' या लेखकाने Sanskrit Drama, पृ. १२९ वरील ४ थ्या तळटीपेमध्ये 'शूद्रकवध' या नावाच्या परिकथेचा उल्लेख केला आहे. डॉ. राघवन् यांच्या मते (शृंगारप्रकाश, पृ. ८२० तळटीप, ४) 'शूद्रकवध' हे नाव शूद्रककथा ऐवजी चुकीचे पडले आहे, कारण शूद्रकाचा वध झाला नव्हता.

१२) भोजाने व हेमचन्द्राने 'इन्दुमती' हा ग्रंथ खंडकथेचे उदाहरण म्हणून उल्लेखिला आहे, तो उपलब्ध नाही

१३) समस्तफलान्त–इतिवृत्तवर्णना याचा एक अर्थ वर दिला आहे. दुसरा अर्थ 'सर्व पुरुषार्थांच्या प्राप्तीमध्ये शेवट होणाऱ्या इतिवृत्ताचे वर्णन' असाही करिता येईल, भोजाने व हेमचंद्राने सकलकथेमध्ये एका व्यक्तीच्या चरित्रात इतर प्रसिद्ध कथांचा समावेश केलेला असतो. तिच्या उदाहरणादाखल हरिभद्राच्या 'समरादित्यकथे' चा निर्देश केला आहे.

१४) महाकाव्याचे लक्षण सविस्तरपणे 'काव्यालंकार', १–१९ ते २३ मध्ये भामहाने व 'काव्यादर्श' १–१४ ते १९ मध्ये दण्डीने केले आहे. भोजाने व हेमचन्द्राने काव्यानुशासन, पृ. ४४९ वर महाकाव्य हे संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश वगैरे भांषांमध्ये सुद्धा रचले जाते, असे म्हटले आहे. प्राकृतातील 'सेतुबंध' हे महाकाव्य प्रसिद्धच आहे.

१५) रूपकांच्या व उपरूपकांच्या सविस्तर माहितीसाठी नाट्यशास्त्र, दशरूपक, साहित्यदर्पण इ. ग्रंथ पाहावे.

१६) या दोन्हींचे विवेचन, भामह, काव्यालंकार, १–२५ ते २९ व दण्डी काव्या दर्श १–२३ ते २८ यांमध्ये केले आहे. विश्वनाथ, साहित्यदर्पण, ६–३३२ ते ३३६ मध्ये व हेमचन्द्र काव्यानुशासनामध्ये या पृष्ठांवर

आख्यायिका व कथा यांचे विवेचन करितात. कथेचे प्रसिद्ध उदाहरण बाणाची 'कादंबरी' अ आख्यायिकेचे प्रसिद्ध उदाहरण बाणाचे 'हर्षचरितम्'हं होय.

१७) काव्यादर्श, १—३१.

ध्वन्यालोक :

मुक्तकेषु प्रबन्धेष्विव रसबन्धाभिनिवेशिनः कवयो दृश्यन्ते । यथा ह्यमरुकस्य कवेर्मुक्तकाः शृंगाररसस्यन्दिनः प्रबन्धायमानाः प्रसिद्धा एव । सन्दानितकादिषु तु विकटनिबन्धनौचित्यान्मध्यमसमासादीर्घसमासे एव सङ्घटने । प्रबन्धाश्रयेषु यथोक्तप्रबन्धौचित्यमेवानुसर्तव्यम् । पर्यायबन्धे षुनरसमासामध्यमसमासे एव सङ्घटने । कदाचिदर्थौचित्याश्रयेण दीर्घसमासायामपि सङ्घटनायां परुषा ग्राम्या च वृत्तिः परिहर्तव्या । परिकथायां कामचारः, तत्रेतिवृत्तमात्रोपन्यासेन नात्यन्तं रसबन्धाभिनिवेशात् । खण्डकथासकलकथयोस्तु प्राकृतप्रसिद्धयोः कुलकादिनिबन्धनभूयस्त्वाद्दीर्घसमासायामपि न विरोधः । वृत्त्यौचित्यं तु यथारसमनुसर्तव्यम् । सर्गबन्धे तु रसतात्पर्ये यथारसमौचित्यमन्यथा तु कामचारः, द्वयोरपि मार्गयोः सर्गबन्धविधायिनां दर्शनाद्रसतात्पर्यं साधीयः । अभिनेयार्थे तु सर्वथा रसबन्धेऽभिनिवेशः कार्यः । आख्यायिकाकथयोस्तु गद्यनिबन्धनबाहुल्याद्गद्ये च छन्दोबन्धभिन्नप्रस्थानत्वादिह नियमे हेतुरकृतपूर्वोऽपि मनाक्रिक्रियते ॥ ७ ॥

ध्वन्यालोक

कवी प्रबंधांप्रमाणेच मुक्तकांमधूनही रसप्रतीति घडवून आणण्याचा आग्रह बाळगताना आढळतात. उदा. शृंगार रसाने ओथंबलेली आणि प्रबंधांप्रमाणेच (विभावादिकांनी परिपूर्ण) असणारी अमरुक कवीची[1] मुक्तके प्रसिद्धच आहेत. पण संदानितक वगैरेंमध्ये 'विकट' (म्हणजे शब्दाची भरीव, दृढ, अविरल) अशी रचना योजणे उचित असल्यामुळे मध्यम लांबीचे आणि लांब लांब समास असलेल्या रचनाच वापराव्या. प्रबंधात हे संदानितकादि प्रकार जर सामाविष्ट केले असतील, तर त्यांचे बाबतीत पुढे[2] प्रबंधासंबंधीचे जे औचित्य सांगितले आहे तेच अवलंबावे (तेथे विकटबंधासंबंधीचा नियम नाही). पण पर्यायबन्धामध्ये छोटे किंवा मध्यमसमास असलेलीच संघटना वापरावी. आणि प्रतिपादन करावयाच्या अर्थाच्या औचित्याच्या दृष्टीने एखाद्यावेळी दीर्घसमासा रचना अवलंबावीशी वाटली, तरी 'परुषा' आचि 'ग्राम्या' या वृत्ति टाळाव्या. परिकथेच्या बाबतीत संघटना कोणतीही चालेल, कारण परिकथेत केवळ इतिवृत्तकथन करणे हाच मुख्यतः उद्देश असल्याने विशेषत्वाने रसाभिव्यक्ति करावी हा हेतु नसतो. प्राकृत वाङ्मयात प्रसिद्ध असलेल्या 'खण्डकथा' व 'सकलकथा' यांमध्ये मात्र कुलके वगैरे पुष्कळ प्रमाणात योजिली जात असल्याने दीर्घ समास असलेली रचना वापरावयालाही प्रतिबन्ध नाही. पण रसाला अनुसरून असेल ते वृत्तींचे औचित्य पाळावे. महकाव्यातही रसाभिव्यक्ति घडवणे हे मुख्य उद्दिष्ट असल्यास त्या त्या रसाला अनुसरून असलेले (संघटनेचे) औचित्य पाळावे. रसाभिव्यक्तीची इच्छा नसेल, तर मात्र हवी ती संघटना किंवा वृत्ति वापरावी. (रसाभिव्यक्ति घडवणे व केवळ कथा सांगणे या) दोन्ही मार्गांमध्ये (म्हणजे या दोन्हीपैकी कोठलेही उद्दिष्ट समोर ठेवून) कवि महाकाव्य रचताना दिसतात. म्हणून त्यांपैकी रसाभिव्यक्ति हे उद्दिष्ट केव्हाही अधिक चांगले होय. काव्याचा आशय जेथे अभिनयाने प्रकट करावयाचा असतो, तेथे मात्र सर्वस्वी रसाभिव्यक्तीचाच आग्रह धरावा. पण आख्यायिका व कथा यात पुष्कळशी गद्यच रचना असते आणि गद्याचे

बाबतीत पद्यरचनेपेक्षा नियम वेगळे असल्याने त्या गद्यामध्ये वापरावयाच्या संघटनेचा नियामक हेतु यापूर्वी कोणी सांगितला नसला, तरी त्या दिशेने आम्ही येथे थोडासा प्रयत्न करीत आहोत.

लोचनम्

ननु मुक्तके विभावादिसङ्घटना कथं, येन तदायत्तो रसः स्यादित्याशङ्क्याह– मुक्तकेष्विति । अमरुकस्येति ।

कथमपि कृतप्रत्यापत्तौ प्रिये स्खलितोत्तरे
विरहकृशया कृत्वा व्याजप्रकल्पितमश्रुतम् ।
असहनसखीश्रोत्रप्राप्तिं विशङ्क्य ससम्भ्रमं
विवलितदृशा शून्ये गेहे समुच्छ्वसितं ततः ॥

इत्यत्र हि श्लोके स्फुटैव विभावादिसम्पत्प्रतीतिः । विकटेति । असमासायां हि सङ्घटनायां मन्थररूपा प्रतीतिः साकाङ्क्षा सती चिरेण क्रियापदं दूरवर्त्यनुधावन्ती वाच्यप्रतीतावेव विश्रान्ता सती न रसतत्त्वचर्वणायोग्या स्यादिति भावः । प्रबन्धाश्रयेष्विति । सन्दानितकादिषु कुलकान्तेषु । यदि वा प्रबन्धेऽपि मुक्तकस्यास्तु सद्भावः, पूर्वापरनिरपेक्षेणापि हि येन रसचर्वणा क्रियते तदेव मुक्तकम् । यथा 'त्वामालिख्य प्रणयकुपिताम्' इत्यादिश्लोकः । कदाचिदिति रौद्रादिविषये । नात्यन्तमिति । रसबन्धे यो नात्यन्तमभिनिवेशस्तस्मादिति सङ्गतिः । वृत्त्यौचित्यमिति । परुषोपनागरिकाग्राम्याणां वृत्तीनामौचित्यं यथाप्रबन्धं यथारसं च । अन्यथेति । कथामात्रतात्पर्ये वृत्तिष्वपि कामचारः । द्वयोरपीति सप्तमी । कथातात्पर्ये सर्गबन्धो यथा भट्टजयन्तकस्य कादम्बरीकथासारम् । रसतात्पर्यं यथा रघुवंशादि । अन्ये तु संस्कृतप्राकृतयोर्द्वयोरिति व्याचक्षते । तत्र तु रसतात्पर्यं साधीय इति यदुक्तं तत्किमपेक्षयेति नेयार्थं स्यात् ॥ ७ ॥

लोचन

'पण काय हो, मुक्तकामध्ये विभाव वगैरेंची जुळणी कशी शक्य होणार, की ज्यामुळे (विभावादिकांच्या जुळणीवर अवलंबून असलेली) रसाची अभिव्यक्ति होईल?' अशी शंका कल्पून वृत्तिकार '(कवी प्रबंधाप्रमाणेच) मुक्तकांमधूनही' इ. शब्दांनी उत्तर देतात. अमरुक कवीची (मुक्तके)–

(अनेक विनवण्या केल्यावर) प्रियकर एकदाचा कसातरी (नायिकेजवळ) आला असताना व त्याने तिला चुकून सवतीच्याच नावाने हाक मारली असताना विरहाने कृश झालेल्या नायिकेने आपण ते नाव ऐकलेच नाही असा बहाणा केला. पण आपल्या रागीट मैत्रिणींच्या कानी ते सवतीचे नाव पडले असेल अशी शंका येऊन तिने घाईघाईने आपली नजर घराच्या आतील बाजूस टाकली व घरात कोणीही मैत्रीण नाही अशी खात्री पटल्यावर (सुटकेचा) एक निःश्वास टाकला.[३]

या मुक्तकामध्ये विभाव इत्यादिकांचा[४] सुंदर योग जुळून आलेला वाचकांच्या स्पष्टपणे प्रत्ययास येतो. 'विकट'– कारण समासरहित किंवा थोडे समास असलेल्या संघटनेमधून सावकाशपणे होणाऱ्या प्रतीतीला क्रियापदाविषयी आकांक्षा राहते व ती आकांक्षा पूर्ण करण्यासाठी ती प्रतीति लांब असलेल्या

क्रियापदाकडे हळूहळूच धाव घेत राहिल्यामुळे केवळ वाच्यार्थाच्या प्रतीतीमध्ये विश्रांति पावते व म्हणून रसरूपी व्यंग्यार्थाचा आस्वाद घडविण्यास ती समर्थ होत नाही, हे तात्पर्य. 'प्रबंधात हे संदानितकादि प्रकार जर समाविष्ट केले असतील'– संदानितकापासून कुलकापर्यंतचे प्रकार. किंवा मुक्तकाचे अस्तित्व प्रबंधातही असते, असे मानिले तरी चालेल. कारण आधीच्या किंवा नंतरच्या पद्याची अपेक्षा न ठेवताही जे (पद्य) स्वतंत्रपणे रसास्वाद घडविण्यास समर्थ असते, तेच मुक्तक होय.[६] उदा. 'तू प्रणयात रुसली आहेस अशी कल्पना करून मी तुझे चित्र काढून' इ. श्लोक.[७] 'एखाद्या वेळी' म्हणजे रौद्र वगैरे रस काव्यातून प्रकट करावयाचे असताना. 'विशेषत्वाने रसाभिव्यक्ति करणे हा हेतु नसतो'– रसप्रतीति घडविण्याची उत्कट इच्छा नसल्यामुळे, असा अन्वय करावा. 'वृत्तीचे औचित्य'– परुषा, उपनागरिका व ग्राम्या या वृत्तींचे औचित्य हे प्रबंधाच्या प्रकाराला व रसाला अनुसरून (असावे). 'रसाभिव्यक्तीची इच्छा नसेल'– म्हणजे केवळ कथानकातील घटना वर्णन करण्याची इच्छा असेल, तर कवीने वृत्ति आपल्या इच्छेप्रमाणे उपयोजाव्या. वृत्तीतील द्वयोः (दोन्ही मार्गांमध्ये) ही सप्तमी विभक्ती आहे.[८] केवळ कथा सांगणे हेच सर्गबन्धाचे म्हणजे महाकाव्याचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे उदाहरण म्हणजे भट्टजयंतकाचे[९] 'कादंबरीकथासार' हे महाकाव्य. रसाभिव्यक्ति हे मुख्य उद्दिष्ट असलेले महाकाव्य म्हणजे 'रघुवंश' इ. पण दुसरे टीकाकार 'दोन्हीमध्ये' याचे विवरण 'संस्कृत व प्राकृत या भाषांमध्ये' असे करितात. पण तसे केल्यास 'त्यांपैकी रसाभिव्यक्ति हे उद्दिष्ट केव्हाही अधिक चांगले होय' असे जे वृत्तिकारांनी म्हटले आहे, ते 'कोणत्या उद्दिष्टापेक्षा अधिक चांगले?' असा प्रश्न उपस्थित होतो (व त्याचे उत्तर मिळत नाही). म्हणून त्या टीकाकाराच्या विवरणात नेयार्थ' हा दोष[१०] उत्पन्न होतो. ॥ ७ ॥

टीपा

१) अमरुक कवीचा एकेक श्लोक शंभर प्रबंधांच्या तोडीचा (म्हणजे तितका रसमय) आहे, असे एका कवीने म्हटले आहे. (अमरुककवेरेकः श्लोकः प्रबन्धशतायते ।)

२) म्हणजे याच उद्‌द्योतातील कारिका १० ते १४ यांमध्ये सांगण्यात येणार असलेले.

३) अमरुशतकम्, ७५.

४) यास प्रियकर हा ईर्ष्याविप्रलंभ रतीचा आलंबनविभाव, त्याने सवतीचे नाव उच्चारणे हा उद्दीपन विभाव, नायिकेचे डोळे अश्रूंनी डबडबणे वगैरे हे अनुभाव, असूया, क्रोध वगैरे व्यभिचारिभाव. हाच विभावादिकांचा सुंदर योग होय. यातील विभाव 'वाच्य' असून अनुभाव इ. व्यंग्य आहेत.

५) म्हणजे असे समजले तरी काही बिघडत नाही, असे अभिनवगुप्तांचे म्हणणे. हे मत म्हणजे हाच खंड, "उद्‌द्योत – ३ 'वरीलपैकी कोणताही पक्ष स्वीकारला, तरी संघटनेचे नियमन करणारे कारण वक्ता आणि त्याच्या बोलण्याच्या वाच्यार्थाचे औचित्य, हे होय'" वरील 'तर त्याला मुक्तक म्हणत नाहीत' या मतात अभिनवगुप्तांनी केलेली सुधारणा आहे.

६) पाहा, अग्निपुराण, अध्याय ३३७, श्लोक ३६ मधील पुढील ओळ–

मुक्तकं श्लोक एवैकश्चमत्कारक्षमः सताम् ।

७) मेघदूतम्, १११. या श्लोकात रेखाटलेली यक्षाची विप्रलंभरति यापूर्वीच्या किंवा यानंतरच्या श्लोकाचा विचार न करिताही प्रत्ययास येते, म्हणून हे मुक्तक मानण्यास काही हरकत नाही.

८) म्हणजे द्वयोः ही षष्ठी विभक्ति नाही.

९) 'कादम्बरीकथासार' नावाचे पद्यमय काव्य 'काव्यमाले' मध्ये प्रसिद्ध झाले आहे. ते जयन्ताचा पुत्र अभिनन्द याचे आहे. 'लोचना'त ते भट्ट जयन्तकाने लिहिले असे म्हटले आहे. **भट्टजयन्तपुत्रकस्य** या ऐवजी **भट्टजयन्तकस्य** असे लेखकप्रमादाने लिहिले गेले असावे.

डॉ. राघवन् यांनी 'शृंगारप्रकाश' या प्रबंधात पृ. ६१२, टीप (२) येथे यासंबंधी चर्चा केली आहे. भट्टजयन्त हा 'न्यायमंजरी' चा कर्ता असून अभिनन्द हा त्याचा मुलगा होता.

१०) पाहा, भामह, १,३८–३९ व वामनाचे २–१–१२ मधील 'नेयार्था'चे पुढील लक्षण– **कल्पितार्थं नेयार्थम् । अश्रुतस्यापि उन्नेयस्य पदार्थस्य कल्पनात् ।** म्हणजे अर्थ ध्यानात येण्यासाठी आवश्यक असलेले शब्द न वापरणे (व त्यामुळे वाचकाला आपली कल्पना चालवावी लागणे). उदा. 'वामना'ने '**पङ्क्तिविहङ्गमनामभृत्**' हा शब्द नेयार्थाचे उदाहरण म्हणून दिला आहे. तो कवीने 'दशरथ' या अर्थी वापरला आहे, हे ध्यानात येण्यास बुद्धीची फारच ओढाताण करावी लागते. 'पङ्क्त' = दश आणि 'विहङ्गमनाम भत्' = (चक्रवाक पक्ष्याच्या नावाचा एक भाग म्हणजे चक्र, ते धारण करणारा तो) रथ हे लक्षात येणे मुळीच स्वाभाविक नाही.

ध्वन्यालोकः

एतद्यथोक्तमौचित्यमेव तस्या नियामकम् ।
सर्वत्र गद्यबन्धेऽपि छन्दोनियमवर्जिते ॥ ८ ॥

यदेतदौचित्यं वक्तृवाच्यगतं सङ्घटनाया नियामकमुक्तमेतदेव गद्ये छन्दोनियमवर्जितेऽपि विषयापेक्षं नियमहेतुः । तथा ह्यत्रापि यदा कविः कविनिबद्धो वा वक्ता रसभावरहितस्तदा कामचारः । रसभावसमन्विते तु वक्तरि पूर्वोक्तमेवानुसर्तव्यम् । तत्रापि च विषयौचित्यमेव । आख्यायिकाया तु भूम्ना मध्यमसमासादीर्घसमासे एव सङ्घटने । गद्यस्य विकटबन्धाश्रयेण छायावत्त्वात् । तत्र च तस्य प्रकृष्यमाणत्वात् । कथायां तु विकटवन्धप्राचुर्येऽपि गद्यस्य रसबन्धोक्तमौचित्य मनुसर्तव्यम् ॥ ८ ॥

ध्वन्यालोक

पद्यरचनेच्या बंधनांपासून मुक्त असलेल्या गद्यरचनेमध्येदेखील आतापर्यंत सांगितलेले औचित्यच सगळीकडे संघटनेचे नियामक समजावे ॥ ८ ॥

हे जे वक्ता व वाच्यार्थ यांचे औचित्य संघटनेचे नियामक म्हणून सांगितले, तेच छंदोवद्ध रचनेच्या बंधनापासून मुक्त असलेल्या गद्यामध्येही विषयाप्रमाणे (म्हणजे काव्याच्या प्रकाराप्रमाणे) त्या संघटनेचे नियमन करणारे कारण समजावे. कारण गद्यातही जेव्हा कवि किंवा कविनिर्मित पात्र हे रस, भाव यांनी विरहित असेल, तेव्हा संघटना पाहिजे ती वापरावी. पण तो जर रसभावयुक्त असेल, तर मात्र पूर्वी सांगितल्याप्रमाणेच (वक्ता व वाच्यार्थ यांचे) औचित्य पाळावे. अर्थात् येथेही काव्यप्रकाराचे औचित्य पाळावेच. आख्यायिकेमध्ये मात्र बह्वंशी मध्यम समास व दीर्घ समास असलेल्याच संघटना वापराव्या. कारण भरीव, अविरल रचनेनेच गद्याला सौंदर्य प्राप्त होते. [१] आणि विकट (भरीव) रचनेमध्येच (गद्याच्या) सौंदर्याला विशेष उठाव प्राप्त होतो. कथेत भरीव (किंवा अविरल) रचना मोठ्या प्रमाणावर वापरली, तरी रसमय वाङ्मयाच्या संबंधात सांगितलेले औचित्य पाळावे.

लोचनम्

विषयापेक्षमिति । गद्यबन्धस्य भेदा एव विषयत्वेनानुमन्तव्याः ॥ ८ ॥

लोचन

'विषयाप्रमाणे' (म्हणजे काव्याच्या प्रकाराप्रमाणे[२]) गद्यरचनेचे वर सांगितलेले[३] प्रकारच येथे 'विषय' म्हणून विवक्षित आहेत असे मानावे. ॥ ८ ॥

टीपा

१) दण्डी म्हणतो—समासांचे प्राचुर्य म्हणजेच ओजोगुण हे गद्याचे जीवितसर्वस्व होय. (पाहा—काव्यादर्श १,८०).

२) ७ व्या कारिकेमध्ये 'काव्याचा जो प्रकार असेल त्याप्रमाणे' असे म्हटले आहे. त्यातील 'काव्य' या शब्दाचा अर्थ पद्यरूप काव्य असा असावा, कारण गद्यासंबंधी विधान आठव्या कारिकेत केले आहे. वृत्तिकारांनी मात्र ७ व्या कारिकेमधील वृत्तीमध्ये गद्य व पद्य या दोन्ही प्रकारच्या काव्यांना अनुलक्षून विवरण केले आहे. त्यामुळे ८ व्या कारिकेत काही नवीन सांगितल्यासारखे होत नाही. म्हणून वृत्तिकारांनी ७ व्या कारिकेतील गद्य प्रकारांना अनुसरून असलेला भाग ८ व्या कारिकेतील वृत्तीत समाविष्ट केला असता, तर बरे झाले असते.

३) म्हणजे आख्यायिका, कथा वगैरे.

ध्वन्यालोकः

रसबन्धोक्तमौचित्यं भाति सर्वत्र संश्रिता ।
रचना, विषयापेक्षं तत्तु किञ्चिद्विभेदवत् ॥ ९ ॥

अथवा पद्यवद्गद्यबन्धेऽपि रसबन्धोक्तमौचित्यं सर्वत्र संश्रिता रचना भवति । तत्तु विषयापेक्षं किञ्चिद्विशेषवद्भवति, न तु सर्वाकारम् । तथा हि गद्यबन्धेऽप्यतिदीर्घसमासा रचना न विप्रलम्भशृङ्गारकरुणयोराख्यायिकायामपि शोभते । नाटकादावप्यसमासैव, न रौद्रवीरादिवर्णने । विषयापेक्षं त्वौचित्यं प्रमाणतोऽपकृष्यते प्रकृष्यते च । तथा ह्याख्यायिकायां नात्यन्तमसमासा स्वविषयेऽपि नाटकादौ नातिदीर्घसमासा चेति सङ्घटनाया दिगनुसर्तव्या [ध्वन्यालोकाच्या काही हस्तलिखितांत **इति काव्यार्थविवेको योऽयं चेतश्चमत्कृतिविधायी । सूरिभिरनुसृतसारैरस्मदुपज्ञो न विस्मार्यः ।** असा श्लोक यानंतर आढळतो. त्यामुळे तो प्रक्षिप्त आहे की नाही हे सांगणे कठीण आहे.] **॥ ९ ॥**

ध्वन्यालोक

रसमय वाङ्मयाच्या संबंधात सांगितलेल्या औचित्याला अनुसरून असणारी रचना सदैव शोभून दिसते. पण काव्याचा जो प्रकार उपयोगात आणिला असेल, त्याप्रमाणे त्या औचित्यात थोडासा बदल करावा लागतो ॥ ९ ॥

किंवा पद्याप्रमाणेच गद्य रचनेतही रसमय वाङ्मयाच्या संबंधात सांगितलेल्या औचित्याने युक्त अशीच संघटना सर्वत्र असावी. पण काव्याच्या प्रकाराला अनुसरून त्या औचित्यात किंचित् फरक करावा लागतो. ते औचित्य (रसौचित्याहून) संपूर्णपणे निराळे मात्र नसावे. उदाहरणार्थ, गद्यरचनेतही आख्यायिकेमध्येसुद्धा विप्रलंभशृंगार आणि करुण हे रस असताना अतिशय लांब समास असलेली संघटना शोभत नाही. तसेच नाटक वगैरेमध्येदेखील (सर्वत्र) समासरहित संघटनाच असावी. मात्र नाटक इत्यादींमध्ये रौद्र, वीर वगैरे रस अभिव्यक्त करावयाचे असताना केवळ समासरहित रचना खुलून दिसत नाही. पण हे काव्यप्रकाराच्या औचित्याचे प्रमाण कमीजास्त होते. उदाहरणार्थ आख्यायिकेत समासरहित संघटनेचे विषय असणारे (म्हणजे शृंगारादि रस) वर्णिताना देखील संघटना सर्वस्वी समासरहित नको आणि नाटकांदीमध्येही दीर्घसमासा संघटनेचे विषय असणारे (म्हणजे रौद्रवीरादि रस) वर्णावयाचे असतानादेखील अतिशय लांब समास असलेली नको. याप्रमाणे संघटनेच्या बाबतीत धोरण अवलंबावे.

लोचनम्

स्थितपक्षं तु दर्शयति—रसबन्धोक्तमिति । वृत्तौ च वाशब्दोऽस्यैव पक्षस्य स्थितिद्योतकः । यथा—

स्त्रियो नरपतिर्वह्निर्विषं युक्त्या निषेवितम् ।
स्वार्थाय यदि वा दुःखसम्भारायैव केवलम् ॥ इति ॥

रचना सङ्घटना । तर्हि विषयौचित्यं सर्वथैव त्यक्तं, नेत्याहतदेव रसौचित्यं विषयं सहकारितयापेक्ष्य किञ्चिद्विभेदोऽवान्तरवैचित्र्यं विद्यते यस्य सम्पाद्यत्वेन तादृशं भवति । एतद्व्याचष्टे—तत्त्विति । सर्वाकारमिति क्रियाविशेषणम् । असमासैवेति । सर्वत्रैवेति शेषः ॥ तथा हि वाक्याभिनयलक्षणे 'चूर्णपादैः प्रसन्नैः' इत्यादि मुनिरभ्यधात् । अत्रापवादमाह—न चेति । नाटकादाविति । सविषयेऽपीति सम्बन्धः ॥ ९ ॥

लोचन

आता कारिकाकार स्वतःचे अंतिम मत 'रसमय वाङ्मयाच्या संबधात सांगितलेल्या' इ. शब्दांनी प्रकट करितात. आणि वृत्तीतला 'किंवा' हा शब्द हेच (म्हणजे यानंतर सांगितले जाणार असलेले) मत कारिकाकारांचे अंतिम मत होय, असे सुचवीत आहे. जसे– स्त्रिया, राजा अग्नि आणि विष यांचे सेवन चातुर्याने केले, तर ते सेवन करणाऱ्याचा फायदा करून देते; किंवा हेच खरे की, ते सेवन केवळ सर्व प्रकारची दुःखे वाढविण्यासच कारणीभूत होते.[१]

(कारिकेतील) 'रचना' हा शब्द संघटना या अर्थी वापरला आहे. 'तर (म्हणजे या ९ व्या कारिकेत सांगितल्याप्रमाणे संघटनेच्या बाबतीत रसाचे औचित्य पाळावयाचे म्हटले, तर) विषयाचे औचित्य पूर्णपणे बाजूला टाकले असे होईल' अशी शंका कोणी घेतली तर तिला 'तसे नाही' असे कारिकाकारांचे उत्तर आहे. हेच उत्तर 'तेच रसौचित्य[२]' विषयाकडून म्हणजे काव्यप्रकाराकडून सहकार्याची अपेक्षा करीत असते व त्यामुळे त्यात थोडासा बदल घडवून आणणे इष्ट असते. याचेच विवरण (वृत्तिकार) 'पण काव्याच्या प्रकाराला अनुसरून त्यात' इ. शब्दांनी करितात. 'संपूर्णपणे' हे क्रियाविशेषण आहे.[३] 'समासरहितच' (किंवा थोडे समास असलेलीच) यानंतर (नाटक इ. काव्यप्रकारात) 'निरपवादपणे सर्वत्र' अशी भर घालावी. कारण वाक्यार्थाभिनयाचे निरूपण करिताना 'स्पष्टार्थक व सुट्या शब्दांच्या द्वारा[४]' इ. भरतमुनींनी म्हटले आहे. याला (म्हणजे नाटक इ. मध्येसुद्धा सर्वत्र समासरहित संघटना असावी या नियमाला) अपवाद वृत्तिकारांनी 'मात्र नाटक इ. मध्ये' या शब्दांनी सांगितला आहे. 'नाटकादींमध्येही' याचा संबंध स्वविषयेपि याकडे आहे[५] ॥ ९ ॥

टीपा

१) या श्लोकात सांगितलेले १) फायद्यास कारणीभूत होणे व २) सर्व प्रकारची दुःखे वाढविण्यास कारण होणे हे दोन पक्ष तुल्यबल नसून दुसरा पक्ष हाच वक्त्याला अभिप्रेत असलेला पक्ष आहे.

२) रसौचित्य म्हणजे रसाभिव्यक्तीच्या दृष्टीने संघटनेचे औचित्य.

३) **सर्वाकारम्** हा शब्द पूर्वी वृत्तीत (प्रथमखंड, "उद्‌द्योत – २ 'रसवदलंकाराबाबत पूर्वपक्षाचे खंडन'"पाहा) येऊन गेला आहे. त्याचे विवरण अभिनवगुप्तांनी (प्रथमखंड, "उद्‌द्योत – २ 'रसवदलंकाराबाबत पूर्वपक्षाचे खंडन'"वर) 'सर्वाकारम्' हे क्रियाविशेषण आहे' असेच केले आहे.

४) ध्वन्यालोकाच्या (काशी आवृत्ति) पृष्ठ ३२८ वर हे शब्द नाट्यशास्त्रात आहेत असे म्हटले आहे. पण तेथे अध्याय व श्लोक यांचा निर्देश केलेला नाही. **चूर्णपादैः प्रसन्नैः** असा शब्दप्रयोग असलेला श्लोक नाट्यशास्त्रामध्ये आढळत नाही. **चूर्णपदैः** याऐवजी **चूर्णपादैः** असे लेखकप्रमादाने लिहिले गेले असावे. ना. शा. २२–४४ (बडोदा संस्करण) **चूर्णपदैः** असा पाठ आढळतो व त्याचे विवरण अभिनवगुप्तांनी **चूर्णपदात्मकानि** (**यानि पदानि**) **तैः युक्तः... वाक्याभिनयः** असे केले आहे.

५) म्हणजे अभिनवगुप्तांच्या मते वृत्तीतील स्वविषयेऽपि याचा संबंध देहलीदीपन्यायाने **आख्यायिकायाम्** व **नाटकादौ** या दोहोंकडे घ्यावा. दोहोंकडे घेताना 'स्वविषय' याचे वेगवेगळे अर्थ होतात. ते आम्ही 'वृत्ती' च्या भाषांतरात दिलेले आहेतच.

ध्वन्यालोकः

इदानीमलक्ष्यक्रमव्यङ्ग्यो ध्वनिः प्रबन्धात्मा रामायणमहाभारतादौ प्रकाशमानः प्रसिद्ध एव, तस्य तु यथा प्रकाशनं तत्प्रतिपाद्यते—

विभावभावानुभावसञ्चार्यौचित्यचारुणः ।
विधिः कथाशरीरस्य वृत्तस्योत्प्रेक्षितस्य वा ॥ १० ॥

इतिवृत्तवशायातां त्यक्त्वाऽननुगुणां स्थितिम् ।
उत्प्रेक्ष्याऽप्यन्तराभीष्टरसोचितकथोन्नयः ॥ ११ ॥

सन्धिसन्ध्यङ्गघटनं रसाभिव्यक्त्यपेक्षया ।
न तु केवलया शास्त्रस्थितिसम्पादनेच्छया ॥ १२ ॥

उद्दीपनप्रशमने यथावसरमन्तरा ।
रसस्यारब्धविश्रान्तेरनुसन्धानमङ्गिनः ॥ १३ ॥

अलङ्कृतीनां शक्तावप्यानुरूप्येण योजनम् ।
प्रबन्धस्य रसादीनां व्यञ्जकत्वे निबन्धनम् ॥ १४ ॥

प्रबन्धोऽपि रसादीनां व्यञ्जक इत्युक्तं तस्य व्यञ्जकत्वे निबन्धनम् । प्रथमं तावद्विभावभावानुभावसञ्चार्यौचित्यचारुणः कथाशरीरस्य विधिर्यथायथं प्रतिपिपादयिषितरसभावाद्यपेक्षया य उचितो विभावो भावोऽनुभावः सञ्चारी वा तदौचित्यचारुणः कथाशरीरस्य विधिर्व्यञ्जकत्वे निबन्धनमेकम् । तत्र विभावौचित्यं तावत्प्रसिद्धम् । भावौचित्यं तु प्रकृत्यौचित्यात् । प्रकृतिर्ह्युत्तममध्यमाधमभावेन दिव्यमानुषादिभावेन च विभेदिनी । तां यथायथमनुसृत्यासङ्कीर्णः स्थायी भाव उपनिबध्यमान औचित्यभाग् भवति । अन्यथा तु केवलमानुषाश्रयेण दिव्यस्य केवलदिव्याश्रयेण वा केवलमानुषस्योत्साहादय उपनिबध्यमाना अनुचिता भवन्ति । तथा च केवलमानुपस्य राजादेर्वर्णने सप्तार्णवलङ्घनादिलक्षणा व्यापारा उपनिबध्यमानाः सौष्ठवभृतोऽपि नीरसा एव नियमेन भवन्ति, तत्र त्वनौचित्मेव हेतुः ।

ननु नागलोकगमनादयः सातवाहप्रभृतीनां श्रूयन्ते, तद्लोकसामान्यप्रभावातिशयवर्णने किमनौचित्यं सर्वोर्वीभरणक्षमाणां क्षमाभुजामिति । नैतदस्ति, न वयं ब्रूमो यत्प्रभावातिशयवर्णनमनुचितं राज्ञाम्, किं तु केवलमानुषाश्रयेण योत्पाद्यवस्तुकथा क्रियते तस्यां दिव्यमौचित्यं न योजनीयम् । दिव्यमानुष्यायां तु कथायामुभयौचित्ययोजनमविरुद्धमेव । यथा पाण्ड्वादिकथायाम् । सातवाहनादिपु तु येषु यावदपदानं श्रूयते तेषु तावन्मात्रमनुगम्यमानमनुगुणत्वेन प्रतिभासते । व्यतिरिक्तं तु तेषामेवोषनिबध्यमानमनुचितम् । तदयमत्र परमार्थ :

अनौचित्यादृते नान्यद्रसभङ्गस्य कारणम् ।
प्रसिद्धौचित्यबन्धस्तु रसस्योपनिषत्परा॥

ध्वन्यालोक

रामायण, महाभारत वगैरे प्रबन्धात असंलक्ष्यक्रमव्यंग्य (म्हणजे रसादि) ध्वनि आत्मा म्हणूनच प्रकाशित होतो, हे प्रसिद्धच आहे. आता तो कोणत्या प्रकारांनी प्रकाशित करावा हे आम्ही (पुढीलप्रमाणे) सांगत आहोत.

कथेचे शरीर (म्हणजे कथानक), मग ते पूर्वीच्या (म्हणजे रामायणादि) ग्रंथांत येऊन गेलेले असो, किंवा कल्पनामिर्मित असो, त्याची घडण किंवा जुळणी ही विभाव, स्थायी भाव, अनुभाव व संचारिभाव यांच्या औचित्याने नटलेली हवी. ॥ १० ॥

इतिवृत्ताच्या ओघात रसाला अनुकूल नसणारे प्रसंग आल्यास ते टाळून मधूनमधून इष्ट रसाला उचित असे (नवे) प्रसंग कल्पून देखील मूळच्या कथानकात सुधारणा घडवून आणावी. ॥ ११ ॥

संधि[१] व संध्यङ्गे[२] यांची योजना रसाभिव्यक्तीला अनुकूल होईल याच दृष्टीने करावी, केवळ शास्त्रात सांगितल्याप्रमाणे करण्याच्या हव्यासाने त्यांचा समावेश करू नये. ॥ १२ ॥

मधूनमधून (औचित्यानुसार) रसाचे उद्दीपन किंवा प्रशमन करावे, (म्हणजे रसाची उत्कटता जास्तकमी करावी,) आणि मुख्य रस क्षीण होऊ पाहात आहेसे वाटले, तर त्याचे पुनरुज्जीवन करावे. ॥ १३ ॥

(अलंकार रचण्याचे) सामर्थ्य हवे तेवढे असले, तरी अलंकारांची योजना ते (रसाला) अनुरूप होतील अशाच तऱ्हेने करावी. या सर्व गोष्टी प्रबन्ध रसाभिव्यञ्जक होणाला उपायभूत असतात. ॥ १४ ॥

प्रबन्धदेखील रसादींना अभिव्यक्त करू शकतो असे म्हटले (पाहा, तिसरा उद्द्योत, कारिका दुसरी). तो रसाभिव्यञ्जक व्हावयास पुढील उपाय उपयोगी पडतात— १) पहिल्याने विभाव, स्थायिभाव, अनुभाव, संचारिभाव यांच्या औचित्यपूर्ण प्रतिपादनाने नटलेल्या कथाशरीराची जुळणी करणे म्हणजे जो रस, भाव वगैरे प्रतिपादन करण्याची मनीषा असेल, त्याला उचित असणाऱ्या विभाव, स्थायिभाव, अनुभाव किंवा संचारिभाव यांच्या औचित्याने रमणीय झालेल्या कथाशरीराची (कथानकाची) जुळणी करणे हा झाला एक उपाय. त्यांपैकी विभावांचे औचित्य तर (व्यवहारात व भारताच्या नाट्यशास्त्रात) प्रसिद्धच आहे. स्थायिभावांचे औचित्य म्हणजे पात्रांच्या स्वभावांना अनुरूप असे त्यांचे प्रतिपादन करणे होय. कारण पात्रांचे स्वभाव हे ती पात्रे उत्तम, मध्यम किंवा अधम असण्यामुळे व दैवी, मानवी, वगैरे असण्याने वेगवेगळे असू शकतात. या बाबतीतली परिस्थिति जशी असेल तसतसे स्थायिभावांचे प्रतिपादन सरमिसळ होऊ न देता केल्यास ते औचित्यपूर्ण होते. नाहीतर दैवी पात्रांने उत्साह वगैरे स्थायिभाव केवळ मानवांसारखे किंवा निव्वळ मानवी असलेल्या पात्रांचे उत्साहादि स्थायिभाव निव्वळ दैवीच असलेल्या पात्रांप्रमाणे वर्णिल्यास ते अनुचित होतात. तसेच निव्वळ मानव असलेल्या राजादिकांचे वर्णन करिताना “तो सात समुद्र ओलांडून

गेला" यासारखी (अद्‌भुत) कृत्ये कितीही चांगल्या रीतीने वर्णन केली तरी ती हटकून नीरसच होतात, त्याचे कारण अनौचित्य हेच होय!

(पूर्वपक्ष)– "पण काय हो, सातवाहन वगैरे राजे पाताळात गेले इ. वर्णन वाचण्यात येते की! मग सगळ्या पृथ्वीच्या रक्षणाचा भार धारण करू शकणाऱ्या राजांचा अलौकिक महान् प्रभाव वर्णन केल्यास त्यात अनौचित्य ते कसले?"

(उत्तरपक्ष) हे म्हणणे बरोबर नाही. अर्थात् आम्हाला असे म्हणायचे नाही की, राजांचा विशेष प्रभाव वर्णन करणे हे अनुचित आहे. पण केवळ मानवी असलेली पात्रे योजून जे कथानक कल्पिले जाते, त्या कथानकात दैवी पात्रांना योग्य अशा गोष्टींचे (मानवी पात्रांच्या बाबतीत) वर्णन करू नये. अंशतः दैवी व अंशतः मानवी पात्रे असलेल्या कथेत मात्र दैवी व मानवी दोन्ही प्रकारचे औचित्य योजणे हे मुळीच विरुद्ध नाही. उदा. 'पांडु' वगैरेंच्या कथेत मात्र सातवाहन वगैरेंच्या बाबतीत मूळकथेत जितका अलौकिक पराक्रम वर्णिला असेल, तेवढीच मर्यादा कवीने आपल्या वर्णनात पाळली, तर ते वर्णन योग्य दिसते. पण त्यांच्या वर्णनात मूळ कथेहून निराळा अलौकिकपणा आणल्यास ते अनुचित ठरते. तेव्हा या बाबतीत तात्पर्य असे–

रसभंगाचे कारण अनौचित्याशिवाय दुसरे नाही. पण जेवढे परंपरेला किंवा सहृदयांस मान्य असेल, तेवढे औचित्य पाळणे हे रसाच्या परिपोषाचे परमोच्च रहस्य होय.

लोचनम्

एवं सङ्घटनायां चालक्ष्यक्रमो दीप्यत इति निर्णीतम् । प्रबन्धे दीप्यत इति तु निर्विवादसिद्धोऽयमर्थ इति नात्र वक्तव्यं किञ्चिदस्ति । केवलं कविसहृदयान् व्युत्पादयितुं रसव्यञ्जने येतिकर्तव्यता प्रबन्धस्य सा निरूप्येत्याशयेनाह–इदानीमिति । इदानीं तत्प्रकारजातं प्रतिपाद्यत इति सम्बधः । प्रथमं तावदिति । प्रबन्धस्य व्यञ्जकत्वे ये प्रकारास्ते क्रमेणैवोपयोगिनः । पूर्वं हिं कथापरीक्षा, तत्राधिकावापः, फलपर्यन्ततानयनम्, रसं प्रति जागरणम्, तदुचितविभावादिवर्णनेऽलङ्कारौचित्यमिति । तत्क्रमेण पञ्चकं व्याचष्टे–विभावेत्यादिना । तदौचित्येति । शृङ्गारवर्णनेच्छुना तादृशी कथा संश्रयणीया यस्यामृतुमाल्यादेर्विभावस्य लीलादेरनुभावस्य हर्षधृत्यादेः संञ्चारिणः स्फुट एव सद्भाव इत्यर्थः । प्रसिद्धमिति । लोके भरतशास्त्रे च । व्यापार इति । तद्विषयोत्साहोपलक्षणमेतत् । स्थाय्यौचित्यं हि व्याख्येयत्वेनोपक्रान्तं नानुभावौचित्यम् । सौष्ठवभृतोऽपीति । वर्णनामहिम्नेत्यर्थः । तत्र त्विति नीरसत्वे । व्यतिरिक्तं त्विति । अधिकमित्यर्थः ।

एतदुक्तं भवति–यत्र विनेयानां प्रतीतिखण्डना न जायते तादृग्वर्णनीयम् । तत्र केवलमानुषस्य एकपदे सप्तार्णवलङ्घनमसम्भाव्यमानतयाऽनृतमिति हृदये स्फुरदुपदेश्यस्य चतुर्वर्गोपायस्याप्यलीकतां बुद्धौ निवेशयति । रामादेस्तु तथाविधमपि चरितं पूर्वप्रसिद्धिपरम्परोपचितसम्प्रत्ययोपारूढमसत्यतया न चकास्ति । अत एव तस्यापि यदा प्रभावान्तरमुत्प्रेक्ष्यते तदा तादृशमेव । न त्वसम्भावनापदं वर्णनीयमिति ।

लोचन

अशा रीतीने (दुसऱ्या कारिकेत सांगितल्याप्रमाणे) 'संघटनेमुळेही अलक्ष्यक्रम हा ध्वनीचा प्रकार प्रकाशित होतो' हे आम्ही युक्तिवादाने सिद्ध केले. 'प्रबंधातून ध्वनि प्रकाशित होतो' ही गोष्ट निर्विवादपणे सिद्ध असल्यामुळे त्याबाबतीत काही सांगण्याची म्हणजे ते पटविण्याची आवश्यकता नाही. केवळ कवि आणि सहृदय यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रबंधातून रसाभिव्यक्ति कोणत्या रीतीने घडवावी ते सांगणे इष्ट आहे, म्हणून वृत्तिकार 'आता आम्ही' इ. शब्दांनी प्रस्ताव करीत आहेत. 'आता' या शब्दाचा 'आम्ही ते सर्व प्रकार सांगत आहोत' याच्याशी अन्वय करावा. 'पहिल्याने'– कारण प्रबंध ज्या उपायांनी रसाभिव्यक्ति करितो, ते उपाय कारिकेत सांगितलेल्या क्रमाने उपयोगात आणले, तरच ते रसाभिव्यक्तीला उपकारक होतात. १) पहिली गोष्ट म्हणजे कथानकाचा सूक्ष्म दुष्टीने विचार, २) दुसरा उपाय म्हणजे कथानकात आणखी प्रसंगांची भर घालणे; ३) तिसरा उपाय म्हणजे त्या कथानकाला त्याचे उद्दिष्ट सफल होण्याच्या अवस्थेस नेणे, ४) चवथा उपाय म्हणजे रसांच्या बाबतीत जागरूक राहणे (म्हणजे अपेक्षित फलाच्या दृष्टीने कथानकाचा विकास करणे) ५) आणि पाचवा उपाय म्हणजे रसांना उचित अशा विभावादिकांचे वर्णन करिताना योजावयाच्या अलंकारांचे औचित्य सांभाळणे. म्हणून वृत्तिकार त्या पाच प्रकारांचे विवरण क्रमाने '(पहिल्याने) विभाव, अनुभाव...' इ. वाक्याने करितात. विभाव, अनुभाव यांच्या औचित्याने' –शृंगाररसाची प्रतीति घडवू इच्छिणाऱ्या कवीने असे कथानक निवडावे की, ज्यामध्ये ऋतु, फुले इ. विभावांचे, शरीराच्या मोहक हालचाली इ. अनुभावांचे, हर्ष व धृति इ संचारिभवांचे अस्तित्व असलेले उघड दिसेल, असा अर्थ. 'प्रसिद्धच आहे'– लौकिक व्यवहारात आणि भारताच्या नाटयशास्त्रात.[४]' (अद्‌भुत) कृत्ये' – त्या कृत्यांना कारणीभूत होणाऱ्या 'उत्साह' या स्थायिभावाचा बोधक म्हणून 'कृत्ये' हा शब्द योजिला आहे. कारण प्रस्तुत परिच्छेदात वृत्तिकारांनी स्थायींचे औचित्य वर्णन करावयास घेतले आहे, अनुभावांचे नाही. 'चांगल्या रीतीने वर्णन केले असले तरी' म्हणजे वर्णन करण्याची रीत उत्तम असल्यामुळे, असा आशय. 'त्याचे' कारण– 'त्याचे' म्हणजे नीरस होण्याचे. पण मूळ कथेहून 'निराळा' म्हणजे 'अधिक' (अलौकिकपणा), असा अर्थ.

वृत्तिकारांच्या या विवरणावरून त्यांच्या म्हणण्याचा निष्कर्ष असा निघतो :– ज्या वर्णनामुळे वाचकांना होणाऱ्या रसप्रतीतीमध्ये कोणतेही विघ्न उपस्थित होणार नाही, असे वर्णन करावे. तेव्हा केवळ मानव असलेल्या पात्राने एका उडीमध्ये सात समुद्र ओलांडून जाणे हे असंभवनीय असल्यामुळे[५] वाचकाच्या मनाला खोटे वाटू लागते व म्हणून काव्याच्या द्वारा सांगावयाचा जो चार पुरुषार्थांच्या प्राप्तीचा उपाय, तोही असत्य आहे असे वाचकाचे मत बनते. पण रामादि लोकोतर विभूतींची कृत्येही तशाच प्रकारची असली, तरी पूर्वीपासून अखंडपणे चालत आलेल्या प्रसिद्धीमुळे त्यांवर लोकांचा विश्वास बसलेला असतो व म्हणून ती कृत्ये अविश्वसनीय वाटत नाहीत. म्हणूनच त्यांचा म्हणजे रामादिकांचाही परंपरागत पराक्रमाहून निराळा असा दुसरा एखादा अद्‌भुत पराक्रम वर्णिला, तरी तोही तसाच (म्हणजेच असंभाव्य[६]) वाटतो. सारांश, कवीने असंभवनीय वाटेल असे वर्णन करू नये.

टीपा

१) भरताच्या नाट्यशास्त्रात नाटकाच्या रचनेचे पाच संधि सांगितले आहेत :– १) मुख–यामध्ये नाटकाच्या अंतिम उद्दिष्टाच्या बीजाची पेरणी केली जाते. २) प्रतिमुख–यात त्या बीजाला अंकुर फुटतात. ते अंकुर काहीसे दिसतात, तर काहीसे दिसत नाहीत. ३) गर्भ–यात त्या अंकुराची पूर्वीपेक्षा अधिक वाढ झालेली दिसते. तथापि त्या वाढीतही विघ्ने उत्पन्न होतात व दूर होतात. ४) विमर्श–यात अंकुर गर्भसंधीपेक्षा अधिक

वाढीला लागलेला असतो. पण अचानक शापासारखे मोठे विघ्न उपस्थित होऊन त्या अंकुराची वाढ एकदम खुंटल्यासारखी होते. ५) निर्वहण—यात कथानकाचे यापूर्वी इतस्ततः विखुरलेले धागेदोरे एकत्र केले जाऊन उद्दिष्टाच्या प्राप्तीवर केंद्रित केले जातात. संधि व संध्यंगे यांबद्दल अधिक माहितीसाठी डॉ. कीथ यांच्या Sanskrit Drama मधील पृ. २९८ ते ३०० पाहा. पुढे लोचनातही हा विषय काशी आवृत्ति, पृ. ३३८ व ३३९ वर येणार आहे.

२) वरील पाच संधींची अनुक्रमाने १२, १३, १३, १२ व १४ अशी एकूण ६४ घटक अंगेही सांगितली आहेत.

३) वृत्तीतील यथा या शब्दाचा अर्थ 'ज्या प्रकारांनी' असा आहे. त्याला अनुलक्षून तत् याचा अर्थ अभिनवगुप्तांनी तत् प्रकारजातम् म्हणजे 'ते सर्व प्रकार' असा केला आहे.

४) नाट्यशास्त्र, अध्याय ६ व ७ यांमध्ये.

५) अभिनवगुप्तांनी अभिनवभारतीमध्ये (रसभावविचार, कंगले आवृत्ति पृ. १६१) रसास्वादामधील जी सात विघ्ने सांगितली आहेत, त्यांपैकी संभावनाविरह (वर्णन शक्य कोटीतील नसणे) हे पहिलेच विघ्न म्हणून सांगितले आहे. रुद्रटाने काव्यलंकार, अध्याय १६, आर्या ३७ ते ३९ यांमध्ये हाच विषय हाताळला आहे. त्यात मनुष्याने एकाच उडीत कुलपर्वत, सागर व पृथ्वीवरील सात द्वीपे ओलांडणे या असंभाव्य घटनांचा उल्लेख केला आहे.

६) अभिनवगुप्तांनी येथे 'तसाच' इतकेच म्हटले आहे. 'तसाच' याचे येथे दोन अर्थ होऊ शकतील. १) 'तसाच' म्हणजे निव्वळ मानवी पात्रांची अद्‌भुत पराक्रम जसा अविश्वसनीय वाटतो, तसा व २) 'तसाच' म्हणजे रामादि लोकोत्तर व्यक्तींचे प्रसिद्ध, अद्‌भुत पराक्रम जसे विश्वसनीय वाटतात, तसाच.

ध्वन्यालोकः

अत एव च भरते प्रख्यातवस्तुविषयत्वं प्रख्यातोदात्तनायकत्वं च नाटकस्यावश्यकर्तव्यतयोपन्यस्तम् । तेन हि नायकौचित्यानौचित्यविषये कविर्न व्यामुह्यति । यस्तूत्पाद्यवस्तु नाटकादि कुर्यात्तस्याप्रसिद्धानुचितनायकस्वभाववर्णने महान् प्रमादः ।

ननु यदुत्साहादिभाववर्णने कथञ्चिद्दिव्यमानुष्याद्यौचित्यपरीक्षा क्रियते तत्क्रियताम्, रत्यादौ तु किं तया प्रयोजनम्? रतिर्हि भारतवर्षोचितेनैव व्यवहारेण दिव्यानामपि वर्णनीयेति स्थितिः । नैवम्; तत्रौचित्यातिक्रमेण सुतरां दोषः । तथा ह्यधमप्रकृत्यौचित्येनोत्तमप्रकृतेः शृङ्गारोपनिबन्धने का भवेन्नोपहास्यता? त्रिविधं प्रकृत्यौचित्यं भारते वर्षेऽप्यस्ति शृङ्गारविषयम् । यत्तु दिव्यमौचित्यं तत्तत्रानुपकारकमेवेति चेत् न वयं दिव्यमौचित्यं शृङ्गारविषयमन्यत्किञ्चिद् ब्रूमः । किं तर्हि? भारतवर्षविषये यथोत्तमनायकेषु राजादिषु शृङ्गारोपनिबन्धस्तथा दिव्याश्रयोऽपि शोभते । न च राजादिषु प्रसिद्धग्राम्यशृङ्गारोपनिबन्धनं प्रसिद्धं नाटकादौ, तथैव देवेषु तत्परिहर्तव्यम् । नाटकादेरभिनेयार्थत्वादभिनयस्य च सम्भोगशृङ्गारविषयस्यासभ्यत्वात्तत्र परिहार इति चेत्—न, यद्यभिनयस्यैवंविषयस्यासभ्यता तत्काव्यस्यैवंविषयस्य सा केन निवार्यते? तस्मादभिनेयार्थेऽनभिनेयार्थे वा

काव्ये यदुत्तमप्रकृते राजादेरुत्तमप्रकृतिभिर्नायिकाभिः सह ग्राम्यसम्भोगवर्णनं तत्पित्रोः सम्भोगवर्णनमिव सुतरामसभ्यम् । तथैवो तमदेवतादिविषयम् ।

ध्वन्यालोक

म्हणूनच नाटकाचे कथानक हे प्रसिद्ध कथेवरच आधारलेले असावे आणि नाटकाचा नायक हा प्रसिद्ध असा धीरोदात्त नायक असावा अशी अट भरताच्या नाट्यशास्त्रात[१] आवश्यक म्हणून सांगितली आहे. कारण त्यामुळे (म्हणजे तशा कथानक व नायकांमुळे) नायकाच्या औचित्य-अनौचित्याच्या बाबतीत कवि गोंधळून जात नाही, (किंवा त्याच्या हातून प्रमाद होत नाही). पण नाटकासारख्या रूपकप्रकारांचे कथानक जो कल्पून रचील, त्याने जर नायकाचा स्वभाव अनुचित, अप्रसिद्ध (म्हणजे अस्वाभाविक) असा वर्णिला, तर ती त्याची फार मोठी चूक ठरते.

पूर्वपक्ष—पण काय हो, उत्साह वगैरे स्थायिभावांचे वर्णन करिताना दैवी (म्हणजे देवादिकांच्या बाबतीतले) व मानवी (म्हणजे मनुष्यांच्या बाबतीतले) औचित्य असा विवेक करावयाचा असला तर करा वाटल्यास, पण 'रति' वगैरेंच्या बाबतीत या (दैवी—मानवी) औचित्याच्या विवेकाची काय गरज आहे? कारण भारतात ज्या पद्धतीची रति (म्हणजे प्रणयक्रीडा) परिचयाची आहे, त्याच पद्धतीची रति दैवी पात्रांच्या बाबतीतदेखील वर्णन केली पाहिजे असा संकेत आहे.

उत्तरपक्ष—हे बरोबर नाही. त्या बाबतीत औचित्याचे पालन न झाल्यास ती फारच मोठी चूक होईल. कारण उत्तम पात्रांचा शृंगार जर अधम पात्रांनाच शोभेल अशा पद्धतीचा वर्णिला, तर ते कमालीचे हास्यास्पद झाल्यावाचून राहील काय? भारतातही शृंगाराच्या बाबतीत पात्रांच्या स्वभावानुसार औचित्य तीन प्रकारचे आहे. यावर 'दिव्य औचित्य म्हणून जे आहे, ते या, म्हणजे भारतातील त्रिविध पात्रांच्या बाबतीत काहीही उपयोगाचे नाही' असे म्हणणे असेल तर, आम्हालाही दिव्य औचित्य हे शृंगाराच्या बाबतीत काही वेगळे आहे असे म्हणायचे नाही. तर मग काय म्हणायचे आहे? इतकेच की, भारतवर्षात उत्तम नायक म्हणजे राजे वगैरे यांच्या बाबतीत जसे शृंगारवर्णन योग्य ठरेल, तसेच दिव्यपात्रांच्या बाबतीतही शोभून दिसेल. आणि नाटक वगैरेंमध्ये राजे इत्यादिकांच्या बाबतीत ग्राम्य म्हणून प्रसिद्ध असलेला शृंगार वर्णन करण्याचा प्रघात नाही, तसाच तो ग्राम्य शृंगार देवांच्या बाबतीतही टाळावा. यावर तुमचे जर असे म्हणणे असेल की, नाटक वगैरेंचा विषय अभिनयाने प्रकट करून दाखवावयाचा असतो, आणि संभोगशृंगाराचा अभिनय असभ्य असल्यामुळे नाटकापुरता संभोगशृंगार टाळावा, तर ते बरोबर नाही. (कारण) जर संभोग शृंगाराचा अभिनय (तुमच्या मते) सभ्यतेला सोडून असेल, तर अशा प्रकारच्या (म्हणजे संभोगशृंगार या) विषयावरील (श्रव्य) काव्याच्या बाबतीत ती असभ्यता येणे कशामुळे टळू शकेल? म्हणून काव्य साभिनय प्रयोगासाठी असो किंवा नसो, त्यामध्ये राजादि (उत्तम असणाऱ्या) पात्रांचा उत्तम नायिकांशी संभोगशृंगार जर ग्राम्य पद्धतीने वर्णिला, तर ती मातापित्यांच्या संभोगाच्या वर्णनाप्रमाणे अतिशय असभ्य होईल. तसेच उत्तम देवता इत्यादिकांच्या शृंगाराच्या बाबतीतही आहे.

लोचनम्

तेन हीति । प्रख्यातोदात्तनायकवस्तुत्वेन । (न) व्यामुह्यतीति । किं वर्णयेयमिति । यस्त्विति कविः । महान् प्रमाद इति । तेनोत्पाद्यवस्तु नाटकादि न निरूपितं मुनिनेति न कर्तव्यमिति तात्पर्यम् । आदिशब्दः प्रकारे, डिमादेः प्रसिद्धदेवचरितस्य संग्रहार्थः ।

अन्यस्तु 'उपलक्षणमुक्तो बहुव्रीहिरिति प्रकरणमत्रोक्तमि'त्याह । 'नाटिकादि' इति वा पाठः । तत्रादिग्रहणं प्रकारसूचकम् । तेन मुनिनिरूपिते नाटिकालक्षणे 'प्रकरणनाटकयोगादुत्पाद्यं वस्तु नायको नृपति' इत्यत्र यथासंख्येन प्रख्यातोदात्तनृपतिनायकत्वं बोद्धव्यमिति भावः ।

लोचन

'कारण त्यामुळे' म्हणजे (नाटकामध्ये) नायक प्रसिद्ध व उदात्त असल्यामुळे व कथानकही प्रसिद्ध असल्यामुळे. 'गोंधळून जात (नाही)'— काय वर्णन करावे[२] या बाबतीत. 'पण जो' म्हणजे कवि. 'फार मोठी चूक'— म्हणून कविकल्पित कथानकावर आधारलेल्या नाटक वगैरे रूपकप्रकारांचे विवेचन भरतमुनींनी केलेले नसल्यामुळे अशा प्रकारचे नाटक लिहू नये, हा सारांश होय. 'नाटक वगैरे' या मधील 'वगैरे' हा शब्द, 'प्रकार' म्हणजे 'सदृश' या अर्थी आहे. तो शब्द, देवांच्या प्रसिद्ध कृति वर्णन करणाऱ्या 'डिम[३]' इ रूपकप्रकारांचाही समावेश व्हावा या हेतूने योजिला आहे.

पण दुसऱ्या कोणी टीकाकाराने म्हटले आहे की, वृत्तीतला 'नाटकादि' हा बहुव्रीहि समास[४] 'प्रकरण' या रूपकप्रकाराचा बोधक आहे. किंवा (वृत्तीत) 'नाटकादि' याऐवजी 'नाटिकादि' असाही पाठ आढळतो. त्या पाठातील 'आदि' हा शब्द 'प्रकार' याच अर्थाचा बोधक होईल. तो पाठ स्वीकारल्यास भरतमुनींनी (नाटयशास्त्र, १८—५३ मध्ये) नाटिकेचे लक्षण सांगताना 'प्रकरण व नाटक यांच्या वैशिष्ट्यांचे नाटिकेत मिश्रण झालेले असल्यामुळे नाटिकेचे कथानक (प्रकरणाप्रमाणे) कविकल्पित असावे व तिचा नायक (नाटकाप्रमाणे) राजा असावा' असे जे म्हटले आहे, त्यातील 'कविनिर्मित कथानक[५]' व 'राजा नायक' या शब्दांचा संबंध अनुक्रमे प्रकरण व नाटक यांच्याशी आहे असे समजावे असा (वृत्तिकारांचा) आशय होईल.

टीपा

१) पाहा, नाट्यशास्त्र, १८—१०, **प्रख्यातोदात्तविषयं प्रख्यातोदात्तानायकम्** ।

२) हा संकेत नाट्यशास्त्रातील अध्याय १८, श्लोक ९८ ते १०० यांमध्ये सांगितला आहे. 'पृथ्वीवर अनेक प्रदेश असले, तरी भारतवर्ष नावाचा प्रदेश समृद्धीने भरलेला आहे, व तेथे सुख व दुःख या दोहोंचाही अनुभव येतो. याउलट इतर प्रदेशांमध्ये दुःख वा शोक यांचा मागमूसही नसतो. भारतवर्षात मानवांनी केलेल्या शुभ कर्मांची सुखद फळे त्यांना इतर लोकांमध्ये अनुभवावयास मिळतात.

३) **किं वर्णयेयम्** याचे दोन अर्थ 'होणे शक्य आहे—' १) काय (म्हणजे कोणत्या पराक्रमांचे) वर्णन करावे व २) अद्‌भुत पराक्रमांचे वर्णन करावे किंवा न करावे.

४) 'डिम' या नाटयप्रकाराचे लक्षण नाट्यशास्त्र, अध्याय १८, ७६ ते ८० या कारिकांमध्ये केले आहे. त्यातील पहिली ओळ अशी :—

प्रख्यातवस्तुविषयः प्रख्यातोदात्तनायकश्चैव । १८, ७९ मध्ये पुढील ओळ आहे— **देवभुजगेन्द्रराक्षसयक्षपिशाचावकीर्णश्च** ।

५) 'नाटकादि' या बहुव्रीहि समासाचा विग्रह 'नाटक आहे पूर्वी ज्याच्या' (ते नाटकादि, म्हणजे प्रकरण) असा करावयाचा. दहा रूपकांच्या यादीत 'नाटक' हा शब्द पहिला असून प्रकरण या शब्दाच्या लगेच आधी आलेला आहे. म्हणून नाटकादि याचा अर्थ 'प्रकरण' असा या दुसऱ्या टीकाकाराच्या मते होतो.

६) **प्रख्यातोदात्तनृपतिनायकत्वम्** यापूर्वी उत्पाद्यवस्तु हा शब्द असून लिहिताना तो गळला असावा, असे वाटते. कारण, त्यावाचून 'अनुक्रमे' या शब्दाला काहीही अर्थ राहात नाही.

ध्वन्यालोकः

न च सम्भोगशृङ्गारस्य सुरतलक्षण एवैकः प्रकारः, यावदन्येऽपि प्रभेदाः परस्परप्रेमदर्शनादयः सम्भवन्ति, ते कस्मादुत्तमप्रकृतिविषये न वर्ण्यन्ते? तस्मादुत्साहवद्रतावपि प्रकृत्यौचित्यमनुसर्तव्यम् । तथैव विस्मयादिषु । यत्त्वेवंविधे विषये महाकवीनामप्यसमीक्ष्यकारिता लक्ष्ये दृश्यते स दोष एव । स तु शक्तितिरस्कृतत्वात्तेषां न लक्ष्यत इत्युक्तमेव । अनुभावौचित्यं तु भरतादौ प्रसिद्धमेव ।

इयत्तूच्यते भरतादिविरचितां स्थितिं चानुवर्तमानेन महाकविप्रबन्धांश्व पर्यालोचयता स्वप्रतिभां चानुसरता कविनावहितचेतसा भूत्वा विभावाद्यौचित्यभ्रंशपरित्यागे परः प्रयत्नो विधेयः । औचित्यवतः कथाशरीरस्य वृत्तस्योत्प्रेक्षितस्य वा ग्रहो व्यञ्जक इत्यनेनैतत् प्रतिपादयति—यदितिहासादिषु, कथासु रसवतीषु विविधासु सतीष्वपि यत्तत्र विभावाद्यौचित्यवत्कथाशरीरं तदेव ग्राह्यं नेतरत् । वृत्तादपि च कथाशरीरादुत्प्रेक्षिते विशेषतः प्रयत्नवता भवितव्यम् । तत्र ह्यनवधानात् स्खलतः कवेरव्युत्पत्तिसम्भावना महती भवति ।

परिकरश्लोकश्चात्र—
कथाशरीरमुत्पाद्यवस्तु कार्यं तथा तथा ।
यथा रसमयं सर्वमेव तत्प्रतिभासते ।
तत्र चाभ्युपायः समयग्विभावाद्यौचित्यानुसरणम् । तच्च दर्शितमेव । किञ्च—
सन्ति सिद्धरसप्रख्या ये च रामायणादयः ।
कथाश्रया न तैर्योज्या स्वेच्छा रसविरोधिनी ॥

तेषु हिं कथाश्रयेषु तावत्स्वेच्छैव न योज्या । यदुक्तम्— 'कथामार्गे न चाल्पोऽप्यतिक्रमः' । स्वेच्छापि यदि योज्या, तद्रसविरोधिनी न योज्या ।

आणि संभोगशृंगाराचा रतिक्रीडा हा एकच प्रकार नाही, तर परस्परांविषयीचे प्रेम प्रकट करणे इ. अनेक प्रकार संभवतात. ते उत्तम पात्रांचे बाबतीत काय म्हणून वर्णन केले जाऊ नयेत? म्हणून उत्साहाप्रमाणे रतीच्याही बाबतीत पात्रांच्या स्वभावाचे औचित्य पाळावे. तसेच विस्मय वगैरे स्थायिभावांच्या बाबतीत (पात्रांच्या स्वभावाचे औचित्य पाळावे). आता अशा प्रकारचा विषय असलेल्या वाङ्मयामधे महाकवींच्या हातूनही अविवेक झालेला दिसतो, तो त्यांचा दोषच होय. पण ती त्यांच्या प्रतिभेने झाकला गेल्यामुळे दिसून येत नाही, हे पूर्वी सांगितलेच आहे. अनुभवांचे औचित्य भरतादिकांच्या ग्रंथांतून सविस्तरपणे वर्णिलेलेच आहे.

पण आम्ही येथे इतके मात्र सांगतो की, कवीने भरतादिकांनी सांगितलेले नियम पाळून, महाकवींच्या वाङ्मयकृतीचे अवलोकन करून आणि स्वतःच्या प्रतिभेला अनुसरून सावधगिरीने विभावादिकांच्या औचित्याचा भंग होणार नाही याबाबत पराकाष्ठेचा प्रयत्न करावा. कथानक प्राचीन ग्रंथातील किंवा कल्पिलेले असले, तरी ते औचित्यपूर्ण असेल असेच निवडावे, हे सांगण्यामागचा हेतु हाच की, प्राचीन ग्रंथांमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या रसमय कथा असल्या, तरी त्यांमध्ये जे कथानक विभावादिकांच्या औचित्याने युक्त असेल तेच निवडावे, त्याहून वेगळे असेल ते निवडू नये. आणि प्राचीन ग्रंथातून घेतलेल्या कथानकापेक्षा कल्पित कथानकाचे बाबतीत औचित्य विशेषच जागरूकपणे पाळावे, कारण कथानक कल्पित असताना कवीच्या हातून बेसावधपणामुळे चूक झाली, तर त्याची 'अनभिज्ञ' म्हणून फार मोठी बदनामी होते.

या बाबतीत तात्पर्य सांगणारा श्लोक असा—कल्पित कथानक असलेल्या कथेला असा आकार द्यावा की, जेणेकरून ती सर्वच कथा रसपरिपूर्ण असल्याचा प्रत्यय येईल.

आणि त्या बाबतीतला उपाय म्हणजे विभावादिकांच्या औचित्याचे नीट परिपालन करणे हा होय. आणि ते औचित्य पूर्वी (याच उद्द्योतातील कारिका १० मध्ये व तीवरील वृत्तीमध्ये) सांगितलेच आहे.

आणखी असे की,

कथानकांना आधारभूत असणाऱ्या रामायण वगैरे ज्या ग्रंथामध्ये रसाभिव्यक्तीची सामग्री सिद्ध असल्याचे प्रसिद्ध आहे, त्यांच्या बाबतीत कवीने स्वतःच्या मर्जीनुसार त्या रसांना विरोधी होईल असा कोणताही फेरबदल करू नये.

आधी त्या कथानकाचा आधार असलेल्या त्या ग्रंथांविषयी कवीने स्वतःची इच्छा वापरूच नये. कारण म्हटलेच आहे— 'कथानकाच्या बाबतीत आम्ही विरोधी होईल असा थोडाही बदल केला नाही.'[१] आणि जर स्वतःची इच्छा वापरावयाचीच असेल तर ती रसाच्या विरुद्ध असलेली तरी वापरू नये.

लोचनम्

कथं तर्हि सम्भोगशृङ्गारः कविना निबध्यतामित्याशङ्क्याहन चेति । तथैवेति । मुनिनापि स्थाने स्थाने प्रकृत्यौचित्यमेव विभावानुभावादिषु बहुतरं प्रमाणीकृतं 'स्थैर्येणोत्तममध्यमाधमानां नीचानां संभ्रमेण' इत्यादि वदता ।

इयत्त्विति । लक्षणज्ञत्वं लक्ष्यपरिशीलनमदृष्टप्रसादोदितस्वप्रतिभाशालित्वं चानुसर्तव्यमिति संक्षेपः । रसवतीष्वित्यनादरे सप्तमी । रसक्त्वं चाविवेचकजनाभिमानाभिप्रायेण मन्तव्यम् । विभावाद्यौचित्येन हि विना का रसवत्ता? कवेरिति । न हि तन्नेतिहासवशादेव मया निबद्धमिति जात्युत्तरमपि सम्भवति । तत्र चेति । रसमयत्वसम्पादने । सिद्धेति । सिद्धः आस्वादमात्रशेषो न तु भावनीयो रसो येषु । कथानामाश्रया इतिहासाः, तैरितिहासार्थैः सह स्वेच्छा न योज्या । सहार्थश्चात्र विषयविषयिभाव इति व्याचष्टे, तेष्विति सप्तम्या । स्वेच्छा तेषु न योज्या, कथञ्चिद्वा यदि योज्यते, तत्तत्प्रसिद्धरसविरुद्धा न योज्या । यथा रामस्य धीरललितत्वयोजनेन नाटिकानायकत्वं कश्चित्कुर्यादिति त्वत्यन्तासमञ्जसम् । यदुक्तमिति । रामाभ्युदये । यशोवर्मणा ।

लोचन

यावर 'मग कवीने राजादिकांच्या संभोगशृंगाराचे चित्रण कसे करावे?[२]' अशी शंका कल्पून वृतिकार तिला 'आणि संभोगशृंगाराचा रतिक्रीडा' इ. वाक्याने उत्तर देतात. 'तसेच'— भरतमुनींनीसुद्धा निरनिराळ्या ठिकाणी 'उत्तम व मध्यम पात्रांच्या बाबतीत आवेग हा व्यभिचारभाव धीमेपणा दाखवून व्यक्त करावा व नीच पात्राच्या बाबतीत घबराट दाखवून व्यक्त करावा.[३]' इ. उद्‌गार काढून विभाव, अनुभाव इत्यादींचे वर्णन करिताना पात्रांच्या स्वभावांच्या औचित्याला अतिशय महत्त्व दिले आहे.

'पण आम्ही येथे इतके मात्र'— प्राचीन काव्यशास्त्रज्ञांनी आपल्या ग्रंथांत केलेले साहित्यविषयक विवेचन, प्रसिद्ध काव्यांचे बारकाईने अवलोकन व पूर्वसुकृतामुळे[४] व देवादिकांच्या कृपेमुळे आपल्याला प्राप्त झालेला प्रतिभागुण या सर्वांस अनुसरून कवींनी वागावे, हे तात्पर्य. वृत्तीतील **रसवतीषु कथासु सतीषु** ही सप्तमी अनादराची वाचक आहे[५] आणि त्या कथानकातील तथाकथित रसमयत्व हे वास्तविक नसून केवळ जाणकार नसलेल्या लोकांना तसे वाटत असते असे समजावे. कारण विभावादिकांचे औचित्य पाळले नाही, तर काव्यात रसनिष्पति कोठून होणार?[६] 'त्याची (म्हणजे कवीची) बदनामी'— कारण कल्पित कथानकाच्या बाबतीत 'इतिहासाला अनुसरूनच मी हे कथानक लिहिले आहे' असे लंगडे समर्थन[७] करणेही शक्य नाही. 'आणि त्या बाबतीत'— म्हणजे कथानकाला रसमय बनविण्याचे बाबतीत. 'सिद्ध असल्याचे'— म्हणजे ज्या (रामायणादि) ग्रंथांमध्ये रसिकांनी रसाचा केवळ आस्वादच घेणे शिल्लक असते, रसाची नव्याने निष्पत्ति करावयाची नसते.' कथांना आधारभूत असणारे' म्हणजे इतिहासादि ग्रंथ त्या इतिहासांशी म्हणजे इतिहासांच्या बाबतीत कवीने स्वतःच्या इच्छेनुसार बदल करू नये.' त्या इतिहासांशी' यातील तृतीयेचा अर्थ **सह** असा असून ती तृतीया, विषय—विषयी संबंधाची वाचक आहे, हे वृत्तिकार **तेषु** ही सप्तमी योजून दर्शवितात. त्यांच्या बाबतीत स्वतःच्या इच्छेचा वापर करू नये आणि काही काही कारणाने स्वेच्छेचा वापर केला, तरी तो त्या ग्रंथातील प्रसिद्ध असलेल्या रसाच्या विरुद्ध होईल असा करू नये. उदा. रामाला धीरललित[८] स्वभावाचा दाखवून कोणी कवि त्याला आपल्या नाटिकेचा नायक बनवील तर त्या कवीचे ते कृत्य अतिशय असमंजसपणाचे होईल. 'म्हटलेच आहे'— म्हणजे 'रामाभ्युदया'त यशोवर्म्याने.

टीपा

१) मूळ यशोवर्म्याच्या रामाभ्युदय नाटकातील श्लोकार्ध असा आहे :— औचित्यं वचसां प्रकृत्यनुगतं, सर्वत्र पात्रोचिता । पृष्टिः स्वावसरे रसस्य च, कथामार्गे न चातिक्रमः ॥

२) म्हणजे राजादिकांच्या ग्राम्य संभोगाचे.

३) नाट्यशास्त्र, ७—६३ मध्ये **नीचानां चापसर्पणैः** असा पाठ आहे, तर अभिनवगुप्तांनी **नीचानां संभ्रमेण** (च) असा पाठ स्वीकारला आहे. शिवाय (काशी आवृति, पृ. ३३३ वरील) लोचनात **उत्तममध्यमाधमानाम्** असा पाठ छापला आहे. तो एकतर वृत्ताला विरोधी आहे व त्यात 'अधम' शब्दाने पुढील 'नीच' या शब्दाच्या अर्थांची पुनरुक्ति होत आहे. शिवाय तो नाट्यशास्त्रातील पाठाशी जुळत नसल्याने तेथे **उत्तममध्यानाम्** असेच वाचणे योग्य.

४) लोचनातील 'अदृष्टप्रसाद' या शब्दाचा आम्ही जो वर अर्थ केला आहे, त्याला काव्यानुशासन पृ. ६ व रसगंगाधर (काव्यमाला आवृत्ति) पृ. ९ येथे आधार सापडतो.

५) वृत्तीमध्ये **सतीषु** यानंतर **अपि** हा शब्द असल्यामुळे 'अनादर' हा अर्थ **अपि** या शब्दानेच सांगितला जातो. पण अभिनवगुप्तांनी ही सप्तमी अनादरवाचक आहे असे म्हटल्यामुळे त्यांचेपुढील प्रतीमध्ये **अपि** हा शब्द नसावा असे वाटते.

६) पुराण इ. प्राचीन ग्रंथांमधील कथांमध्ये विभावादिकांचे औचित्य अनेक ठिकाणी पाळलेले नसल्यामुळे त्यांत रसमयत्व असणार नाही, हा आशय.

७) मुळातील **जात्युत्तरम्** यांचे भाषांतर आम्ही 'लंगडे समर्थन' असे केले आहे. 'तर्कभाषे'च्या (शि. म. परांजपे आवृत्ति) पृ. १११ वर **असदुत्त जातिः** अशी व्याख्या दिली असून पृ. ११२ वर जातीची उदाहरणे दिली आहेत.

८) धीरललित नायकाचे लक्षण मागे द्वितीय खंड, "उद्द्योत -३ 'वरीलपैकी कोणताही पक्ष स्वीकारला, तरी संघटनेचे नियमन करणारे कारण वक्ता आणि त्याच्या बोलण्याच्या वाच्यार्थाचे औचित्य, हे होय'" वर 'लोचनात' आलेच आहे.

ध्वन्यालोकः

इदमपरं प्रबन्धस्य रसाभिव्यञ्जकत्वे निबन्धनम् । इतिवृत्तवशायातां कथञ्चिद्रसाननुगुणां स्थितिं त्यक्त्वा पुनरुत्प्रेक्ष्याप्यन्तराभीष्टरसोचितकथोन्नयो विधेयः यथा कालिदासप्रबन्धेषु । यथा च सर्वसेनविरचिते हरिविजये । यथा च मदीय एवार्जुनचरिते महाकाव्ये । कविना काव्यमुपनिबध्नता सर्वात्मना रसपरतन्त्रेण भवितव्यम् । तन्नेतिवृत्ते यदि रसाननुगुणां स्थितिं पश्येत्तदेमां भङ्क्त्वापि स्वतन्त्रतया रसानुगुणं कथान्तरमुत्पादयेत् । न हि कवेरितिवृत्तमात्रनिर्वहणेन किञ्चित्प्रयोजनम्, इतिहासादेव तत्सिद्धेः ।

ध्वन्यालोक

प्रबन्ध रसाभिव्यञ्जक होण्यासाठी आणखी एक उपाय असा– प्राचीन ग्रंथांतील कथेच्या ओघात कुठून तरी रसाला अनुकूल नसणारा एखादा प्रसंग आला तर, तो टाकून देऊन मध्ये पुनः कल्पनेने का होईना, पण नवा प्रसंग निर्मून कथेला इष्ट रसानुकूल असे वळण द्यावे. जसे कालिदासाच्या ग्रंथांतून[१] दिले आहे तसे, जसे सर्वसेनाने रचलेल्या 'हरिविजय' या ग्रंथामध्ये आहे,[२] तसे, आणि जसे माझ्याच 'अर्जुनचरित' या महाकाव्यात आहे,[३] तसे. काव्य रचताना कवीने सर्वथैव रसाच्याच अधीन होऊन जावे. तो तसा, म्हणजे रसाधीन झाला असताना प्राचीन ग्रंथात जर रसाला अनुकूल नसलेला एखादा प्रसंग दिसला, तर तो बाजूला सारूनही स्वतंत्र बुद्धीने रसाला अनुकूल असा दुसरा प्रसंग निर्मावा.[४] कारण केवळ प्राचीन ग्रंथात असेल, त्याबरहुकूम लिहिण्यापासून कवीला काहीही फायदा नसतो. कारण प्राचीन ग्रंथातील घटना इतिहासानेच सिद्ध झालेली असते.

लोचनम्

स्थितिमिति कथाशय्याम् । कालिदासेति । – रघुवंशेऽजादीनां राज्ञां विवाहादिवर्णनं नेतिहासेषु निरूपितम् । हरिविजये कान्तानुनयाङ्गत्वेन पारिजातहरणादि निरूपितमितिहासेष्वदृष्टमपि । तथार्जुनचरितेऽर्जुनस्य पातालविजयादि वर्णितमितिहासाप्रसिद्धम् । एतदेव युक्तमित्याह–कविनेति ।

लोचन

(वृत्तीतील) 'स्थिति (प्रसंग)' म्हणजे कथेच्या मांडणीतील प्रसंग.[५] 'जसे कालिदासाच्या'– 'रघुवंशा'तील अज वगैरे राजांच्या विवाह[६] इत्यादींचे वर्णन इतिहासग्रंथात केलेले आढळत नाही. 'हरिविजया'तील स्वर्गातून पारिजात वृक्ष हिरावून आणणे वगैरे प्रसंग इतिहासामध्ये आढळत नसले तरी प्रियपत्नी सत्यभामा हिला प्रसन्न करण्याचा उपाय म्हणून कवीने (कल्पून) वर्णिलेले आहेत. तसेच 'अर्जुनचरिता'मध्ये[७] अर्जुनाचे पातालविजय वगैरे पराक्रम वर्णिले आहेत, तेही इतिहासात प्रसिद्ध नाहीत.

हेच (म्हणजे त्या कवींनी रसाला प्रतिकूल असलेले प्रसंग टाळून नवीन रसानुकूल प्रसंग कल्पून घातले हेच) योग्य झाले हे वृत्तिकार '(काव्य रचताना) कवीने' इ. शब्दांनी सांगतात.

टीपा

१) उदा. रघुवंशात कालिदासाने वर्णिलेला अजराजाच्या विवाहाचा प्रसंग रामायण वगैरे प्राचीन ग्रंथात आलेला नाही. पण तो स्वतःच्या कल्पनेने समाविष्ट करून कालिदासाने ६, ७ व ८ या सर्गांमध्ये निरनिराळ्या रसांचा परिपोष केला आहे.

२) सर्वसेनाचा 'हरिविजय' हा ग्रंथ सध्या उपलब्ध नाही. पण तो प्राकृतात लिहिलेला होता. यापूर्वी द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'प्रौढोक्तिमात्रनिष्पत्र व स्वतःसंभवी या प्रकारांच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे'" वर येऊन गेलेले 'आम्राच्या पल्लवांनी' इ. पद्य हरिविजयातील असावे असा तर्क म. म. डॉ. वा. वि. मिराशी यांनी केला आहे (पाहा, Some Royal Poets of the Vakataka age, Indian Historical

Quarterly, Vol. XXI, no. 3, p. 19). या सर्वसेनाचा उल्लेख दण्डीने 'अवन्तिसुन्दरीकथा' या ग्रंथात 'हरिविजया'चा कर्ता म्हणून केला आहे. तो वाकाटक सम्राट् प्रवरसेन याचा पुत्र असून त्याचा समय इ. स. चे ४ थे शतक असे म. म. मिराशी यांनी सिद्धभारती भाग २, पृ. १७८ वर म्हटले आहे. सर्वसेनाच्या 'हरिविजय' या प्राकृत महाकाव्याविषयी संशोधन करून डॉ. वा. म. कुलकर्णी यांनी भांडारकर प्राच्यविद्यासंशोधनमंदिराच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त १९७८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या खंडात पृ. ६९१ ते ७१० येथे चर्चा केली आहे, ती पाहावी.

३) अर्जुन–चरितात निर्मिलेले, अर्जुनाने केलेला पातालविजय वगैरे प्रसंगही प्राचीन वाङ्मयात आढळत नाहीत.

४) हे आपले मत निःशङ्कपणे मांडून आनन्दवर्धनांनी वाचकांना आपल्या कमालीच्या रसिकपणाचा प्रत्यय घडविला आहे. प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'पारध्याने क्रौञ्चपक्ष्यांच्या जोडप्यापैकी नर मारला की मादी? (टीप ४)'" वरील थी टीप पाहा. मूळ कथेत पारध्याने क्रौञ्च पक्ष्याला मारले असे असताना 'क्रौञ्च पक्षिणीचा वध झाला' असा बदल आनंदवर्धनांनी मुद्दाम रसाभिव्यक्तीसाठीच केला यात शंका नाही. महाभारतात कण्वाश्रमातून हस्तिनापुरास परत गेल्यावर दुष्यंत अंतःपुरातील स्त्रियांत रमून गेल्यामुळे शकुंतलेला पूर्णपणे विसरतो. हे इष्ट न वाटल्यामुळे शाकुंतलात दुर्वासांच्या शापामुळेच तो शकुंतलेला विसरला असे दाखवून कालिदासाने केवढा तरी रसपरिपोष साधला आहे.

५) पाहा, डॉ. राघवन्कृत Some Concepts of Alankra s'astra, पृ. ३०५ डॉ. राघवन् यांच्या तेथील प्रतिपादनानुसार मूळ लोचनात '**स्थितमिति यथा शय्याम्**' या ऐवजी '**स्थितिमिति कथाशय्याम्**' । अशी दुरुस्ती आम्ही केली आहे.

६) अज राजाच्या विवाहाचा प्रसंग रघुवंश, सर्ग ७ मध्ये वर्णिला आहे.

७) 'अर्जुनचरित' हे संस्कृत महाकाव्य आनंदवर्धनांनीच लिहिले असून त्याचा उल्लेख पुढे कारिका २५ वरील वृत्तीत (काशी आवृत्ति, पृष्ठ ३८८ वर) आला आहे. या वृत्तीवर विवरण करिताना अभिनवगुप्तांनी याच काव्यातील **समुत्थिते धनुर्ध्वनौ** इ. दोन ओळी उद्धृत केल्या आहेत.

ध्वन्यालोकः

रसादिव्यञ्जकत्वे प्रबन्धस्य चेदमन्यन्मुख्यं निबन्धनम्, यत्सन्धीनां मुखप्रतिमुखगर्भावमर्शनिर्वहणाख्यानां तदङ्गानां चोपक्षेपादीनां घटनं रसाभिव्यक्त्यपेक्षया, यथा रत्नावल्याम्; न तु केवलं शास्त्रस्थितिसम्पादनेच्छया, यथा वेणीसंहारें विलासाख्यस्य प्रतिमुखसन्ध्यङ्गस्य प्रकृतरसनिबन्धाननुगुणमपि द्वितीयेऽङ्के भरतमतानुसरणमात्त्रेच्छया घटनम् ।

ध्वन्यालोक

आणि प्रबन्ध रसाभिव्यंजक होण्यासाठी आणखी प्रमुख उपाय हा की, कथानकाच्या मुख, प्रतिमुख, गर्भ, अवमर्श आणि निर्वहण या नावाच्या संधींची[१] आणि त्यांच्या उपक्षेप[२] इ. अंगांची जुळणी रसाभिव्यक्ति

करण्यासाठी जशी आवश्यकता असेल, तशी करावी. ज्याप्रमाणे 'रत्नावली' नाटिकेत केली आहे, त्याप्रमाणे.[३] केवळ शास्त्रात सांगितलेले नियम पाळण्याच्या बुद्धीने नव्हे. जसे 'वेणीसंहार' नाटकाच्या दुसऱ्या अंकात 'प्रतिमुख' संधीचे 'विलास' नावाचे अंग[४] प्रस्तुत म्हणजे वेणीसंहार या नाटकातील वीररसाच्या अभिव्यक्तीला अनुकूल नसतानाही केवळ भरताच्या मताप्रमाणे करण्याच्याच इच्छेने समाविष्ट केले आहे.

लोचनम्

सन्धीनामिति । इह प्रभुसम्मितेभ्यः श्रुतिस्मृतिप्रभृतिभ्यः कर्तव्यमिदमित्याज्ञामात्रपरमार्थेभ्यः शास्त्रेभ्यो ये न व्युत्पन्नाः, न चाप्यस्येदं वृत्तममुष्मात्कर्मण इत्येवं युक्तियुक्तकर्मफलसम्बन्धप्रकटनकारिभ्यो मित्रसम्मितेभ्य इतिहासशास्त्रेभ्यो लब्धव्युत्पत्तयः, अथ चावश्यं व्युत्पाद्याः प्रजार्थसम्पादनयोग्यताक्रान्ता राजपुत्रप्रायास्तेषां हृदयानुप्रवेशमुखेन चतुर्वर्गोपायव्युत्पत्तिराधेया । हृदयानुप्रवेशश्च रसास्वादमय एव । स च रसश्चतुर्वर्गोपायव्युत्पत्तिनान्तरीयकविभावादिसंयोगप्रसादोपनत इत्येवं रसोचितविभावाद्युपनिबन्धे रसास्वादवैवश्यमेव स्वरसभाविन्यां व्युत्पत्तौ प्रयोजकमिति प्रीतिरेव व्युत्पत्तेः प्रयोजिका । प्रीत्यात्मा च रसस्तदेव नाट्यं नाट्यमेव वेद इत्यस्मदुपाध्यायः । न चैते प्रीतिव्युत्पत्ती भिन्नरूपे एव, द्वयोरप्येकविषयत्वात् । विभावाद्यौचित्यमेव हि सत्यतः प्रीतेर्निदानमित्यसकृदवोचाम । विभावादीनां तद्रसोचितानां यथास्वरूपवेदनं फलपर्यन्तीभूततया व्युत्पत्तिरित्युच्यते । फलं च नाम यददृष्टवशाद्देवताप्रसादादन्यतो वा जायते । न च तदुपदेश्यम्, तत उपाये व्युत्पत्त्ययोगात् । तेनोपायक्रमेण प्रवृत्तस्य सिद्धिः, अनुपायद्वारेण प्रवृत्तस्य नाश इत्येवं नायकप्रतिनायकगतत्वेनार्थानर्थोपायव्युत्पत्तिः कार्या । उपायश्च कर्त्राश्रीयमाणः पञ्चावस्था भजते । तद्यथा—स्वरूपं, स्वरूपात्किञ्चिदुच्छूनतां, कार्यसम्पादनयोग्यतां, प्रतिबन्धोपनिपातेनाशङ्क्यमानतां, निवृत्तप्रतिपक्षतायां बाधकबाधनेन सुदृढफलपर्यन्तताम् । एवमार्तिसहिष्णूनां विप्रलम्भभीरूणां प्रेक्षापूर्वकारिणां तावदेवं कारणोपादानम् । ता एवंविधाः पञ्चावस्थाः कारणगता मुनिनोक्ता :—

संसाध्ये फलयोगे तु व्यापारः कारणस्य यः ।
तस्यानुपूर्व्या विज्ञेयाः पञ्चावस्थाः प्रयोक्तृभिः ।
प्रारम्भश्च प्रयत्नश्च तथा प्राप्तेश्च सम्भवः ।
नियता च फलप्राप्तिः फलयोगश्च पञ्चमः ॥ इति ।

एवं या एताः कारणस्यावस्थास्तत्सम्पादकं यत्कर्तुरितिवृत्तं (तत्) पञ्चधा विभक्तम्, त एव मुखप्रतिमुखगर्भावमर्शनिर्वहणाख्या अन्वर्थनामानः पञ्च सन्धय इतिवृत्तखण्डाः, सन्धीयन्त इति कृत्वा तेषामपि सन्धीनां स्वनिर्वाह्यं प्रति तथा क्रमदर्शनादवान्तरभिन्ना इतिवृत्तभागाः सन्ध्यङ्गानि— 'उपक्षेप परिकरः, परिन्यासो विलोभनम्' इत्यादीनि ।

अर्थप्रकृतयोऽत्रैवान्तर्भूताः । तथा हि स्वायत्तसिद्धेर्बीजं बिन्दुः कार्यमिति तिस्र । बीजेन सर्वव्यापाराः, बिन्दुनानुसन्धानं, कार्येण निर्वाहः, सन्दर्शनप्रार्थनाव्यवसायरूपा ह्येतास्तिऽस्त्रोऽर्थे सम्पाद्ये कर्तुः प्रकृतयः स्वभावविशेषाः । सचिवायत्तसिद्धित्वे तु सचिवस्य तदर्थमेव वा स्वार्थमेव वा स्वार्थमपि वा प्रवृत्तत्वेन प्रकीर्णत्वप्रसिद्धत्वाभ्यां प्रकरीपताकाव्यपदेश्यतयोभयप्रकारसम्बन्धी व्यापारविशेषः

प्रकरीपताकाशब्दाभ्यामुक्त इति । एवं प्रस्तुतफलनिर्वाहणान्तस्याधिकारिकस्य वृत्तस्य पञ्चसन्धित्वं पूर्णसन्ध्यङ्गता च सर्वजनव्युत्पत्तिदायिनी निबन्धनीया । प्रासङ्गिके त्विति वृत्ते नायं नियम इत्युक्तम्—

'प्रासङ्गिके परार्थत्वान्न ह्येष नियमो भवेत्'

इति मुनिना । एवं स्थिते रत्नावल्यां धीरललितस्य नायकस्य धर्माविरुद्धसम्भोगसेवायामनौचित्याभावात्प्रत्युत 'न निस्सुखः स्यादि' ति श्लाध्यत्वात्पृथ्वीराज्यमहाफलान्तरानुबन्धिकन्यालाभफलोद्देशेन प्रस्तावनोपक्रमे पञ्चापि सन्धयोऽवस्थापञ्चकसहिताः समुचितसन्ध्यङ्गपरिपूर्णा अर्थप्रकृतियुक्ता दर्शिता एव । 'प्रारम्भेऽस्मिस्वामिनो वृद्धिहेतौ' इति हि बीजादेव प्रभृति 'विश्रान्तविग्रहकथः' इति, राज्यं निर्जितशत्रु इति च वचोभिः 'उपभोगसेवावसरोऽयम्' इत्युपक्षेपात्प्रभृति हि निरूपितम् । एतत्तु समस्तसन्ध्यङ्गस्वरूपं तत्पाठपृष्ठे प्रदर्श्यमानमतितमां ग्रन्थगौरवमावहति । प्रत्येकेन तु प्रदर्श्यमानं पूर्वापरानुसन्धानवन्ध्यतया केवलं संमोहदायि भवतीति न विततम् । अस्यार्थस्य यत्नावधेयत्वेनेष्टत्वात्स्वकण्ठेन यो व्यतिरेक उक्तो 'न तु केवलया' इति, तस्योदाहरणमाह—न त्विति । केवलशब्दमिच्छाशब्दं च प्रयुञ्जानस्यायमाशयःभरतमुनिना सन्ध्यङ्गानां रसाङ्गभूतमितिवृत्तप्राशस्त्योत्पादनमेव प्रयोजनमुक्तम् । न तु पूर्वरङ्गाङ्गवददृष्टसम्पादनं विध्नादिवारणं वा । यथोक्तम्—

इष्टस्यार्थस्य रचना वृत्तान्तस्यानपक्षयः ।
रागप्राप्तिः प्रयोगस्य गुह्यानां चैव गूहनम् ॥
आश्चर्यवदभिख्यानं प्रकाश्यानां प्रकाशनम् ।
अङ्गानां षड्विधं ह्येतद् दृष्टं शास्त्रे प्रयोजनम् ॥ इति ।

ततश्च—

समीहा रतिभोगार्था विलासः परिकीर्तितः ।

इति प्रतिमुखसन्ध्यङ्गविलासलक्षणे, रतिभोगशब्द आधिकारिकरसस्थायिभावोपव्यञ्जकविभावाद्युपलक्षणार्थत्वेन प्रयुक्तः, यथातत्त्वं नाधिगतार्थ इति । प्रकृतो ह्यत्र वीररसः ।

लोचन

'संधींची (जुळणी)'— या जगात श्रुति, स्मृति वगैरे शास्त्रांचे तात्पर्य 'अशा प्रकारचे वर्तन करा' अशी धन्याप्रमाणे केवळ आज्ञा करणे[५] हेच असते. तसेच इतिहासादि शास्त्रे युक्तिवादाने 'अमुक कर्मामुळे अमुक मनुष्याच्या बाबतीत असे असे घडून आले' अशा प्रकारे कर्म आणि फळ यांचा कार्यकारणसंबंध मित्राप्रमाणे दाखवितात. अशा दोन्ही प्रकारच्या शास्त्रांपासून कसे वागावे यासंबंधी मार्गदर्शन राजपुत्रांसारख्या लोकांना मिळत नाही. परंतु प्रजेचे कल्याण करण्याची जबाबदारी लवकरच येणार असल्याने त्यांना शिक्षण देणे तर आवश्यकच असते. त्यांना चारी पुरुषार्थांच्या प्राप्तीच्या उपायांचे ज्ञान करून द्यावयाचे, तर ते त्यांच्या हृदयात शिरूनच (म्हणजे हृदयंगम पद्धतीनेच) करून देणे अगत्याचे आहे. आणि त्यांच्या हृदयात शिरणे

म्हणजे त्यांना काव्यातील रसांचा आस्वाद घडविणे हेच होय. आणि तो रस चारही पुरुषार्थांच्या प्राप्तीच्या उपायांचे ज्ञान करून देण्याला अनिवार्यपणे उपयोगी पडणारा व विभाव वगैरेंच्या यथायोग्य जुळणीमुळे निष्पन्न होणारा असतो.[६] अशा रीतीने रसाला योग्य अशा विभाव इत्यादिकांची योजना कवीने केल्यामुळे राजपुत्रादिक हे रसास्वादाने अनिवार्यपणे भारले जातात. त्या रसास्वादाचा स्वाभाविक परिणाम उपदेश हा असल्यामुळे रसास्वादाने ते (राजपुत्र वगैरे) भारले जाणे हेच त्या उपदेशाचे कारण असते. म्हणून शेवटी रसास्वादामुळे होणारा आनंद हेच व्युत्पत्तीचे कारण होय. आणि आनंद हेच रसाचे स्वरूप होय, तो रस म्हणजेच नाट्य होय आणि नाट्य हाच वेद होय,[७] असे आमचे गुरु सांगतात.[८] आणि काव्यापासून मिळणारा आनंद व उपदेश यांची स्वरूपे एकमेकांहून मुळीच वेगळी नाहीत, कारण त्या दोहोंचा विषय[९] एकच आहे. कारण विभाव इत्यादींचे औचित्य सांभाळणे हेच खरोखर आनंदाचे कारण होय हे आम्ही पुष्कळ वेळा सांगितले आहे[१०] त्या त्या रसाला उचित असलेल्या व त्या त्या रसाच्या आस्वादाला कारणीभूत असणाऱ्या विभाव, अनुभाव इत्यादींचे यथार्थ ज्ञान (सामाजिकाला) होणे यालाच 'व्युत्पत्ति' म्हणण्यात येते. कोणत्याही प्रयत्नाचे अंतिम फळ पूर्वकर्मानुसार, किंवा देवतेच्या कृपेमुळे किंवा (मित्र वगैरेंचे साहाय्य अशा) इतर काही कारणाने प्राप्त होते, आणि (केवळ) त्या फळाचा निर्देश केल्यामुळे त्याच्या प्राप्तीच्या उपायाबद्दल काही विशेष मार्गदर्शन मिळत नाही.[११] त्यामुळे योग्य उपाय योजून कार्य करण्यास प्रवृत्त झाल्यास यश मिळते व अयोग्य उपायांचा अवलंब करून कार्यप्रवृत्त झाल्यास नाश ओढवतो, अशा रीतीने कवीने नायकाच्या यशःप्राप्तीच्या व प्रतिनायकाच्या अपयशप्राप्तीच्या कारणांचे वाचकांना ज्ञान करून द्यावयाचे असते. आणि इष्ट फलाच्या प्राप्तीसाठी कोणत्याही कर्त्याने योजावयाच्या उपायाच्या पाच अवस्था असतात. त्या अशाः— १) 'स्वरूप' म्हणजे कर्त्याला उपायाचे स्वरूप कळणे, २) त्या उपायाच्या केवळ ज्ञानापेक्षा त्या उपायाची किंचित् झालेली वाढ म्हणजे त्याच्या वापरामुळे झालेली प्रगति, ३) तो उपाय कार्य—सिद्धि करण्यास समर्थ होणे, ४) काही अडचण उपस्थित झाल्याने तो उपाय कार्य घडवून आणणार की नाही याबद्दल कर्त्याला शंका वाटू लागणे आणि ५) अडचणींवर मात केल्यामुळे त्या अडचणी दूर झाल्या असणे व त्यामुळे फळाची प्राप्ति निश्चितपणे होणे. याप्रमाणे जीवनातील संकटांना धैर्याने तोंड देणारे व फलप्राप्तीच्या बाबतीत आपली वंचना होईल की काय अशा भीतीमुळे विचारपूर्वक पावले टाकणारे कर्ते अशा (पाच अवस्थांनी युक्त असलेल्या) उपायांचा अवलंब करिताना दिसतात. उपायांच्या त्या, अशा प्रकारच्या पाच अवस्था भरतमुनींनी नाट्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत[१२] :—

'फळ प्राप्त करून घेण्याच्या बाबतीत उपायांचा जो वापर केला जातो, त्याच्या क्रमाने पुढील पाच अवस्था असतात असे नाटक रचू इच्छिणाऱ्यांनी व त्याचा प्रयोग करू इच्छिणाऱ्यांनी जाणून घ्यावेः— १) प्रारंभ २) प्रयत्न ३) फलप्राप्तीची शक्यता उत्पन्न होणे ४) फलप्राप्ती होणार अणी खात्री वाटणे व ५) प्रत्यक्ष फळ मिळणे.

अशा रीतीने उपायाच्या ज्या अवस्था असतात, त्या घडवून आणणारे नायकाच्या वृत्तांताचे म्हणजे कृतींचे पाच विभाग केले जातात. ते पाच विभाग म्हणजे मुख, प्रतिमुख, गर्भ, अवमर्श व निर्वहण ही सार्थ नावे असलेले पाच 'संधि' म्हणजे इतिवृत्ताचे पाच भाग होत. यांना 'संधि' म्हणण्याचे कारण हे कथानकाचे भाग परस्परांशी 'सांधलेले' व कथानकाशी जोडलेले असतात. त्या संधींचाही फलप्राप्तीच्या दृष्टीने तसा[१३] क्रम असलेला दिसून येतो, म्हणून कथानकाच्या संधिनामक मुख्य भागांचेही आणखी उपप्रकार केले गेले आहेत; त्यांना 'संधींची अंगे' म्हणतात. संधींची ती अंगे म्हणजे उपक्षेप, परिकर, परिन्यास, विलोभन वगैरे.[१४]

'अर्थप्रकृतीं'चा अंतर्भाव या पाच संधींतच होतो. कारण, नायक जर 'स्वायत्तसिद्धि[१५]' असला, तर त्याच्या बाबतीत बीज, बिंदु, आणि कार्य अशा तीन अर्थप्रकृति असतात. 'बीज' या शब्दामुळे फलप्राप्तीसाठी नायकाने करावयाच्या सर्व खटपटींच्या त्याला झालेल्या सूक्ष्म जाणीवेचा बोध होतो. 'बिंदु' या शब्दामुळे नायकाने कथानकाच्या मुख्य उद्दिष्ट फलाकडेच सतत नजर ठेवणे व त्या दृष्टीने सतत प्रयत्न करणे याचा बोध होतो.[१६] 'कार्य' या शब्दाने इष्ट प्राप्तीसाठी प्रत्यक्ष केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा निर्देश केला जातो. या तीन अर्थप्रकृतींचे स्वरूप अनुक्रमे संदर्शन (म्हणजे उद्दिष्टाचे नायकाला झालेले बिनचूक ज्ञान), प्रार्थना (म्हणजे नायकाने ते उद्दिष्ट प्राप्त करून घेण्याची उत्कट इच्छा धरणे) व व्यवसाय म्हणजे त्या उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी त्याने सतत धडपड करणे असे आहे. या तिहींना 'अर्थप्रकृति' म्हणण्याचे कारण 'अर्थ' म्हणजे नायकाचा कार्यभाग व 'प्रकृति' म्हणजे तो साधण्यासाठी नायकाच्या स्वभावाची प्रकट झालेली वैशिष्ट्ये म्हणजेच त्याचे प्रयत्न.[१७] नायक जर 'सचिवायत्तसिद्धि'[१८] या प्रकारचा असेल, तर सचिव हा नायकाच्या कल्याणासाठीच किंवा आपल्या स्वार्थासाठीच किंवा नायक व स्वतः या दोघांच्या फायद्यासाठी झटत असल्यामुळे सचिवाचा त्या दोन्ही प्रकारांशी[१९] संबद्ध असणारा विशिष्ट प्रयत्न 'प्रकीर्ण' स्वरूपाचा[२०] आहे की, प्रसिद्ध स्वरूपाचा आहे यामुळे त्या सचिवाच्या खटपटीला 'प्रकरी' किंवा 'पताका' अशी नावे देणे योग्य असते, म्हणून तो त्याचा प्रयत्न 'प्रकरी'[२१] व 'पताका'[२२] या दोन शब्दांनी संबोधिला आहे.

याप्रमाणे उद्दिष्ट फलाची प्राप्ति होईपर्यंतच्या संपूर्ण मुख्य कथानकाचे पाच संधि व त्या संधींची (योग्य असतील ती) सर्व अंगे सगळ्या लोकांना चतुर्वर्गप्राप्तीच्या उपायाचे ज्ञान व्हावे म्हणून कवीने आपल्या काव्यात समाविष्ट करावीत. पण दुय्यम कथानकाच्या बाबतीत हा (म्हणजे सर्व संधि व त्यांची सगळी अंगे योजावीत, हा) नियम लागू नाही असे भरतमुनींनी 'प्रासंगिक कथानक हे मुख्य कथानकाचे अंग असल्यामुळे त्याला हा नियम लागू नाही' या शब्दात सांगितले आहे.[२३] (पाच अवस्था, पाच संधि, संधींची अंगे आणि पाच अर्थप्रकृति यांच्या बाबतीत) आम्ही वर सांगितल्याप्रमाणे परिस्थिति आहे. 'रत्नावली' नाटकाच्या 'धीरललित' नायकाने धर्माच्या विरुद्ध नसलेल्या[२४] प्रणयक्रीडेचा उपभोग घेण्यामध्ये काहीही अनौचित्य नाही; राजाने सुखांचा त्याग करू नये असे अर्थशास्त्रात म्हटले आहे.[२५] म्हणून धर्माशी अविरुद्ध असा संभोग करणे हे उलट योग्यच आहे. त्यामुळे पृथ्वीच्या राज्याची प्राप्ति ह्या प्रमुख फळाला[२६] उपकारक होणारा (रत्नावली या) राज्यकन्येचा लाभ या फळाच्या प्राप्तीसाठी प्रस्तावनेच्या द्वारे कथानकाला प्रारंभ झाल्यावर प्रस्तुत पाच अवस्थांनी युक्त, आपापल्या योग्य अंगांनी परिपूर्ण व पाच अर्थप्रकृतींनी संपन्न असे पाचही संधि प्रस्तुत नाटिकेमध्ये दाखविण्यात आले आहेत. कारण 'आमच्या महाराजांच्या उत्कर्षाला कारण होणाऱ्या या माझ्या प्रयत्नाला (दैवाने हातभार लावला असताना)[२७] इ. श्लोकात या नाटिकेचे बीज प्रकट झाले आहे. 'आमच्या महाराजांच्या बाबतीत युद्धाचे बोलणे संपले आहे[२८] आणि 'माझ्या राज्याच्या सर्व शत्रूंचा पाडाव झालेला[२९] आहे' इ. श्लोकात, 'आता उपभोगाचे सेवन करण्याला योग्य अशी वेळ आहे'[३०] या वाक्यांनी बीजाची स्थापना झाल्यापासून पुढे संधि, त्यांची अंगे इ. सर्व योजिण्यात आली आहेत. पण हे संधींचे व त्यांच्या सर्व अंगांचे स्वरूप त्यांच्या उदाहरणांच्या संदर्भासह दाखवावयाचे म्हणजे ग्रंथ[३१] फारच लांबला असता आणि आधीच्या व नंतरच्या घटनांचा निर्देश न करिता प्रत्येक संधि व त्याची अंगे उदाहरणे न देता दाखविली, तर ते वाचकांना केवळ गोंधळातच पाडील म्हणून (वृत्तीमध्ये आणि लोचनामध्येही) या विषयाचा विस्तार केलेला नाही. (संधि व संध्यंगे यांची रचना रसाभिव्यक्तीस अनुकूल होईल अशी करावी) या गोष्टीकडे प्रयत्नपूर्वक लक्ष देणे जरूर आहे व म्हणून तिचे विवरण करण इष्ट असल्यामुळे कारिकाकारांनी स्वमुखाने 'केवळ शास्त्रात सांगितल्याप्रमाणे' इ. शब्दांनी काय करू नये असा जो व्यतिरेक कारिका १२ च्या उत्तरार्धात सांगितला, त्याचे उदाहरण वृत्तीत 'केवळ.. नव्हे' इ. वाक्याने सांगितले आहे.[३२] 'केवळ' आणि 'हव्यास' हे शब्द वापरण्यामागील (ग्रंथकारांचा) आशय पुढीलप्रमाणे आहे—

भरतमुनींनी कथानकाला सुंदर स्वरूपाने नटवून रसाभिव्यक्तीस उपकारक करणे हे संध्यंगांचे प्रयोजन म्हणून सांगितले आहे, पूर्वरंगाच्या अंगांप्रमाणे केवळ पुण्यप्राप्ति किंवा विघ्न वगैरेंचे निवारण हे (संध्यंगांचे प्रयोजन) नव्हे. कारण भरतांनी म्हटलेच आहे—[३३]

'कथानकाच्या इष्ट घटकांची जुळणी, कथानकात खंड न पडणे, नाट्यप्रयोगात रंजकता निर्माण करणे, प्रेक्षकांपासून लपविण्यास इष्ट असलेल्या गोष्टी लपविणे,[३५] प्रेक्षकांना विस्मययुक्त आनंद देईल अशाच रीतीने कथन करणे[३५] व प्रकट करण्यास योग्य अशा गोष्टी (योग्य वेळी) प्रकट करणे, अशी संध्यंगांची सहा प्रयोजने नाट्यशास्त्रामध्ये दिलेली आढळतात.'

आणि असे असल्यामुळे भरतमुनींनी प्रतिमुख संधीच्या 'विलास' या अंगाचे लक्षण करिताना असे म्हटले आहे की—

'रतिसुख उपभोगण्याची इच्छा म्हणजे विलास असे म्हटले जाते.[३६]

भरतांनी 'रतिसुख उपभोगणे' हे शब्द नाट्यातील प्रमुख रसाच्या स्थायी भावाचे व्यंजक असणाऱ्या विभावादिकांचे उपलक्षण म्हणजे निदर्शक म्हणून[३८] वापरले आहेत. त्या शब्दांचा मुनींना अभिप्रेत असलेला अर्थ वेणीसंहाराच्या कर्त्याने ध्यानात घेतला नाही, कारण वेणीसंहारातील मुख्य रस वीररस हा आहे.[३९]

टीपा

१) पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रामायण,महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा'" यासंबंधी मार्गदर्शन वरील टीप पहिली.

२) उपक्षेप हे 'मुख' संधीचे पहिलेच अंग आहे.

३) रत्नावली ही नाटिका श्रीहर्ष नावाच्या कर्त्याने रचली असून तीमध्ये मुख इ. पाचही संधि, आरंभ, यत्न इ. पाच अवस्था, पंचसंधीची योग्य ती घटक अंगे आणि पाच 'अर्थप्रकृति' यांचा योग्य असाच वापर केला आहे असे अभिनवगुप्त म्हणतात. पंच अवस्था, पंच अर्थप्रकृति, पंचसंधींची चौसष्ट अंगे यांबद्दलची माहिती भरतनाट्यशास्त्र, अध्याय १९ व साहित्यदर्पणाच्या ६ व्या परिच्छेदात पाहावी.

४) 'विलास' म्हणजे 'रतिभोगाची इच्छा' असे भरताने (अध्याय १९, श्लोक ७० मध्ये) म्हटले आहे. भरताने प्रत्येक संधीची सर्व अंगे वर्णिली आहेत खरी, पण ती सर्व प्रत्येक नाट्यकृतीत घातलीच पाहिजेत असे नाही. त्यांपैकी जेवढी प्रकृत रसाला पोषक असतील तेवढीच घालावी, असा त्याचा अभिप्राय आहे. हा त्याचा अभिप्राय न उमगल्यामुळे वेणीसंहारात भट्टनारायणाने वीररस प्रस्तुत असताना मध्येच त्याला अनुचित असा दुर्योधन व भानुमती यांच्या शृंगाराचा प्रसंग केवळ भरताने विलास प्रतिमुख संधीचे अंग असते असे म्हटल्यामुळेच निर्मून घातला आहे.

५) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत -१ 'सहृदया' चे (रसिकाचे) अभिनवगुप्तांनी केलेले लक्षण" व "उद्द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" (लोचन). अभिनवगुप्तांनी वेद, इतिहास, व काव्य यांमध्ये जो भेद

दाखविला आहे, त्याची पूर्वसूचना प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'हे पारध्या यातील शोक हा मुनीचा शोक नव्हे'" वरील भट्टनायकाच्या शब्दाला इ श्लोकामध्ये मिळते. याचसारखे विचार कुन्तक (पाहा, वक्रोक्तिजीवित, हिंदी संस्करण, पृ. ९–१०), महिमभट्ट (व्यक्तिविवेक, हिंदी संस्करण, पृ. १०१–१०२) व त्यानंतर मम्मट, विश्वनाथ इत्यादिकांनी प्रकट केले आहेत. भामहाने काव्यालंकार परिच्छेद ५, श्लोक २ व ३ यांमध्ये शास्त्र व काव्य यातील भेद स्पष्ट केला आहे. रुद्रटाने काव्यालंकार, १२–१ व २ मध्येही शास्त्र व काव्य यांमधील फरक दाखविला आहे. प्रभुसंमित, मित्रसंमित व जायासंमित हे दृष्टांत मात्र प्रथम अभिनवगुप्तांनीच दिलेले दिसतात.

६) लोचनामध्ये **रसः चतुर्वर्गोपायव्युत्पत्तिनान्तरीयकविभावादिसंयोगप्रसादोपनतः** । अशी शब्दयोजना आहे. **चतुर्वर्गोपाय**, इ. लांबलचक समास **चतुर्वर्गोपायव्युत्पत्तिनान्तरीयकः विभावादिसंयोगप्रसादोपनतश्च** । असा कर्म धारय घेणे हेच आम्हाला इष्ट वाटते. कारण चतुर्वर्गोपायाच्या व्युत्पत्तीला म्हणजे ज्ञानाला रस हा नान्तरीयक (म्हणजे आवश्यक) आहे व त्या रसाला विभाव इत्यादिकांची योग्य जुळणी आवश्यक आहे. व्युत्पत्तीला ही जुळणी साक्षात् नान्तरीयक नाही.

७) नाट्याला पंचमवेद ही संज्ञा का दिली गेली हे नाट्यशास्त्र, अध्याय १, १२ ते १८ मध्ये स्पष्ट केले आहे.

८) हे गुरु म्हणजे 'काव्यकौतुक' हा ग्रंथ लिहिणारे भट्टतीत असावेत, कारण या अवतरणातील **तदेव** (म्हणजे **रसः एव**) **नाट्यम्** या अंशाचा निर्देश अभिनवभारतीमध्ये (कंगले, रसभावविचार, पृ. १९५) येथे करून त्याच्या समर्थनार्थ भट्टतीतांच्या 'काव्यकौतुक' या ग्रंथातील काही ओळी उद्‌धृत केल्या आहेत.

९) विषय म्हणजे 'कारण' म्हणजे प्रस्तुत ठिकाणी रसाच्या दृष्टीने विभावादिकांचे औचित्य हे होय.

१०) विभावादिकांच्या औचित्याचे पालन रसपरिपोषास कारण होते हे अनेक वेळा सांगितले गेले आहे उदा. प्रथम खंड, (लोचन) "उद्‌द्योत- १ 'ध्वन्यालोक-कारिका २ वरील 'साहित्यदर्पण' काराच्या आक्षेपाचे खंडन (टीप १ पाहा)'", "उद्‌द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" व द्वितीय खंड, (वृत्ति) "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवीनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" इ. पण 'औचित्य हेच आनंदाचे कारण' अशा तऱ्हेची शब्दयोजना मात्र आम्हास अद्यापि कोठेही आढळली नाही.

११) अमुक व्यक्तीला अमुक फळ मिळाले' असे म्हटल्याने ऐकणाऱ्याला काहीही मार्गदर्शन होत नाही. पण 'अमुक उपायाने त्या व्यक्तीला ते फळ प्राप्त झाले' असे म्हटले की, त्या फळासाठी त्या उपायाचा अवलंब करावा असे मार्गदर्शन श्रोत्याला मिळू शकते.

१२) पाहा, नाट्यशास्त्र, १९, ६–७ व दशरूपक, १–१९.

१३) 'तसा' म्हणजे ज्या क्रमाने वृत्तीत या पाच संधींचा निर्देश केला आहे, तो क्रम.

१४) पाहा, नाट्यशास्त्र, अध्याय १९, श्लोक ५३ ते ६३ व त्यांवरील अभिनवभारती (दशरूपकविधान, कंगले आवृत्ति, पृ. २३१–२७६). यात एकूण ६४ संध्यंगांचे वर्णन आले आहे.

१५) 'स्वायत्तसिद्धि' म्हणजे सचिवावर अवलंबून न राहता स्वतःच सर्व निर्णय घेणारा.

१६) इतर गोष्टींमुळे नायकाच्या प्रयत्नांत खंड पडला, तरी फलावरची नजर ढळू न देता त्याचा सातत्याने पाठपुरावा करणे (अनुसंधान) याला 'बिंदु' म्हणतात. बीज आणि बिंदु या दोन्ही अर्थप्रकृति सर्व इतिवृत्ताला व्यापणाऱ्या असतात. 'बिदु' हे नाव देण्याचे कारण तेलाचा बिंदु जसा पाण्याच्या पृष्ठभागावर सर्वत्र पसरतो, तशी 'बिंदु' ही अर्थप्रकृति सर्व कथानकाला व्यापून कथानकात कोणत्याही कारणाने खंड पडला असताना कथानकाचा सांधा जोडण्याची कामगिरी करिते.

१७) दशरूपक, १—१८ वरील टीकेमध्ये धनिकाने **अर्थप्रकृतयः** याचे विवरण **प्रयोजनसिद्धिहेतवः** असेच केले आहे.

१८) 'सचिवायत्तसिद्धि' म्हणजे आपल्या कार्यसिद्धीसाठी आपल्या सचिवावर पूर्णपणे अवलंबून असणारा नायक होय. उदा. 'मुद्राराक्षस' नाटकातील 'चंद्रगुप्त.'

१९) ते दोन प्रकार म्हणजे केवळ दुसऱ्यासाठी हा एक प्रकार व स्वतः व दुसरा या दोहोंसाठी हा दुसरा प्रकार.

२०) 'प्रकीर्ण' या शब्दाचा नीट अर्थ लावणे कठीण आहे. 'पसरलेला' असा अर्थ केल्यास त्यामुळे अर्थ स्पष्ट होण्यास मदत होत नाही. नाट्यशास्त्र, १९—२४ वरील अभिनवभारतीमध्ये **प्रकर्षेण स्वार्थानपेक्षया** करोति इति प्रकरी असे म्हटले आहे. त्याचा अर्थ सचिवायत्तसिद्धि नायकाच्या बाबतीत 'सचिवाने केवळ नायकाच्या फायद्यासाठी केलेला प्रयत्न' असा होतो. तेव्हा 'प्रकीर्ण' म्हणजे पसरलेला' म्हणजे स्वतःच्या बाहेरच पसरलेला, दुसऱ्या साठीच असलेला, असा काहीतरी अर्थ लावता येईल.

'पताका' या शब्दाचे लक्षण नाट्यशास्त्र, १९—२३ (कंगले, दशरूपकविधान) येथे दिले आहे. त्यानुसार जे उपकथानक स्वतः महत्त्वाचे असूनही कथानकाला उपकारक असते, ते पताका होय. पताका ही स्वतःची प्रसिद्धि करून प्रधानाचीही प्रसिद्धि करिते. या दृष्टीने अभिनवगुप्तांनी 'प्रसिद्ध' हा शब्द 'प्रसिद्धित्व' या अर्थी वापरलेला दिसतो. ना. शा. १९—२३ वरील टीकेमध्ये अभिनवगुप्तांनी 'प्रसिद्धि' हाच शब्द वापरला आहे. 'प्रकरी' म्हणजे छोटे उपकथानक व 'पताका' म्हणजे मोठे उपकथानक होय.

२१) 'प्रकरी' चे लक्षण नाट्यशास्त्र, १९, २४ मध्ये असे केले आहे— **फलं प्रकल्प्यते यस्याः परार्थायैव केवलम् । अनुबन्धविहीनत्वात्प्रकरीति विनिर्दिशेत् ॥** एकंदरीत प्रकरी म्हणजे असे उपकथानक की ज्याचे उद्दिष्ट मुख्य कथानकाच्या नायकाचे हित साधणे हेच असते. प्रकरीच्या नायकाचे उदाहरण अभिनवभारतीमध्ये अभिनवगुप्तांनी वेणीसंहारातील श्रीकृष्ण हे सांगितले आहे. शाकुंतलाच्या ६ व्या अंकातील धीवराचे कथानक हेही प्रकारीचे उदाहरण मानिता येईल.

२२) नाट्यशास्त्र, १९, २३ मध्ये पताकेचे लक्षण केले आहे, ते असे—

यद् वृत्तं तु परार्थं स्यात् प्रधानस्योपकारकम ।
प्रधानवच्च कल्प्येत सा पताकेति कीर्तिता ॥

म्हणजे ज्या कथानकाचे उद्दिष्ट मुख्य नायक व उपकथानकाचा नायक या दोघांच्याही हितासाठी असते, असे उपकथानक. त्याचे उदाहरण रामचरित्रावरील नाटकांमध्ये सुग्रीव किंवा बिभीषण यांची उपकथानके मृच्छकटिकातील मदनिका आणि शर्विलक यांचे उपकथानक हे पताकेचे उदाहरण मानिता येईल.

२३) नाट्यशास्त्र, १९—१८.

२४) पाहा, श्रीमद्भगवद्गीता, ७—११ मधील **धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ।** हे वचन.

२५) कौटिलीय अर्थशास्त्र, १—७—६.

२६) पृथ्वीच्या राज्याची प्राप्ति हे जरी या नाटिकेचे प्रमुख फळ असले तरी त्याला उपकारक होणारे रत्नावलीची प्राप्ति उदयनाला पत्नी म्हणून होणे हे अवांतर फळ आहे व त्याचेच वर्चस्व ह्या नाटिकेत सर्वत्र असलेले आढळते. त्यामुळे या नाटिकेचे एकंदर स्वरूप विलासप्रधान झालेले आहे, म्हणून अभिनवगुप्तांनी 'ही उपभोगाची वेळ प्राप्त झाली आहे' हा निष्कर्ष काढला आहे.

२७) रत्नावली १—७.

२८) रत्नावली १—८

२९) रत्नावली १—९

३०) 'ही उपभोगास योग्य अशी वेळ आली आहे' हे वाक्य रत्नावलीत नाही. तो आधी उद्धृत केलेल्या वाक्यांवरून अभिनवगुप्तांनी काढलेला निष्कर्ष आहे.

३१) ग्रंथ म्हणजे मूळ ध्वन्यालोकाची वृत्ति व तीवरील लोचन.

३२) **स्वकण्ठेन** इ. वाक्यात अभिनवगुप्तांनी कारिकाकार व वृत्तिकार हे शब्द वापरले नाहीत, पण **न तु केवलया** हे शब्द कारिकाकारांचे असून **न तु केवलं यथा वेणीसंहारे** हे शब्द वृत्तिकारांचे आहेत. लोचनातील अभिनवगुप्तांच्या या शब्दयोजनेमुळे कारिकेतील व वृत्तीमधील वाक्यांचा कर्ता अभिनवगुप्तांच्या मते एकच आहे असा निष्कर्ष निघण्याची शक्यता आहे.

३३) नाट्यशास्त्र, १९, ४७—४८ वरील अभिनवभारतीमध्ये (दशरूपकविधान, कंगले आवृत्ति, पृ. २२६) संध्यंगांच्या प्रयोजनाबाबत अभिनवगुप्तांनी पुढील विवरण केले आहे—संध्यंगांचे प्रयोजन हे संध्यावंदनाच्या प्रयोजनाप्रमाणे केवळ अदृष्ट स्वरूपाचे नसते. तसेच ते पूर्वरंगाच्या अंगांच्या प्रयोजनाप्रमाणे दृष्ट व अदृष्ट फळ देणारेही नसते, तर केवळ दृष्ट फळ देणारेच असते.

३४) मुळात वृतान्तस्यानपक्षयः असे म्हटले आहे. त्याचा अर्थ मध्येच दुसरा वृत्तांत विस्ताराने सांगत बसून मुख्य कथानकाचा विसर न पडू देणे.

३५) म्हणजे प्रेक्षकांची उत्कंठा टिकवून धरण्यासाठी सर्व गोष्टी आधीच सांगून न टाकता त्या योग्यवेळी उघड करीत जाणे.

३६) म्हणजे कथानक आधींच माहीत असले, तरी संध्यंगांची जुळणी कुशलतेने करून कथानकाला नवीनपणा प्राप्त करून देणे.

३७) नाट्यशास्त्र, १९—७०.

३८) म्हणजे 'विलास' याचा अर्थ केवळ 'रतिसुखाची इच्छा' असा न घेत भरतांच्या मते 'मुख्यं रसाला उपकारक असे विभाव अनुभाव वगैरे' असा घ्यावा. 'उपलक्षण हा शब्द शास्त्रीय चर्चेमध्ये स्वप्रतिपादकत्वे सति स्वेतरप्रतिपादकम् या अर्थी वापरला जातो. 'उपलक्षण' म्हणजे स्वतःचा बोध करून देत असताना इतर तत्सदृशांचाही बोध करून देणारे.

३९) भट्टनारायणाने वीररसाली पोषक असा एखादा प्रसंग वेणीसंहाराच्या दुसऱ्या अंकात घालणे योग्य होते. त्याऐवजी संभोगशृंगाराला पोषक असा दुर्योधन व भानुमती यांचा प्रणयप्रसंग वर्णिल्यामुळे रसहानि झाली आहे. अभिनवभारतीमध्ये (दशरूपकविधान, पृ. २४४) अभिनवगुप्तांनी वेणी संहारातील या प्रसंगावर टीका करताना असेच विचार प्रकट केले आहेत.

ध्वन्यालोकः

इदं चापरं प्रबन्धस्य रसव्यञ्जकत्वे निमित्तं यदुद्दीपनप्रशमने यथावसरमन्तरा रसस्य, यथा रत्नावल्यामेव । पुनरारब्धविश्रान्ते रसस्याङ्गिनोऽनुसन्धिश्च । यथा तापसवत्सराजे । प्रबन्धविशेषस्य नाटकादे रसव्यक्तिनिमित्तमिदं चापरमवगन्तव्यं यदलंकृतीनां शक्तावप्यानुरूप्येण योजनम् । शक्तो हि कविः कदाचिदलङ्कारनिबन्धने तदाक्षिप्ततयैवानपेक्षितरसबन्धः प्रबन्धमारभते, तदुपदेशार्थमिदमुक्तम् । दृश्यन्ते च कवयोऽलङ्कारनिबन्धनैकरसा अनपेक्षितरसाः प्रबन्धेषु ।

ध्वन्यालोक

आणि प्रबन्ध रसाभिव्यञ्जक होण्याचा आणखी एक उपाय म्हणजे रसाचे उत्कटत्व अधूनमधून प्रसंगानुसार कमीजास्त करणे, हा जसे रत्नावलीतच केले आहे,[१] तसेच.

आणखी असे की, मुख्य रस क्षीण होत आहे अशी शंका येताच त्याच्याकडे पुन्हा लक्ष पुरवावे. जसे 'तापसवत्सराजां'त पुरविले आहे ना, तसेच.[२] नाटक वगैरे विशेष प्रकारच्या प्रबंधातून रसाभिव्यक्ति व्हावी यासाठी लक्षात घ्यावयाचा आणखी एक उपाय म्हणजे अलंकार योजण्याचे वाटेल तेवढे सामर्थ्य असले, तरी रसाला अनुरूप होईल अशाच रीतीने त्यांची योजना करावी. कारण अलंकार योजू शकणारा कवि एखादे वेळी अलंकार योजताना त्यांच्याच आहारी जाऊन रसपरिपोषाची फारशी दखल न घेता आपला प्रबन्ध लिहू लागतो, त्याला मार्गदर्शन करण्यासाठी हे आम्ही मुद्दाम सांगत आहो. अनेक कवि रसाची विशेष फिकीर न करता केवळ अलंकारच योजण्याच्या ओढीने प्रबंध लिहिताना दिसतातच की!

लोचनम्

उद्दीपन इति । उद्दीपनं विभावादिपरिपूरणया । यथा— 'अयं स राआ उदयणो ति' इत्यादि सागरिकायाः । प्रशमनं वासवदत्तातः पलायने । पुनरुद्दीपनं चित्रफलकोल्लेखे । प्रशमनं सुसङ्गताप्रवेशे, इत्यादि । गाढं ह्यनवरतपरिमृदितो रसः सुकुमारमालतीकुसुमवज्झटित्येव म्लानिमवलम्बेत । विशेषतस्तु शृङ्गारः । यदाह मुनि :—

यद्वामाभिनिवेशित्वं यतश्च विनिवार्यते ।
दुर्लभत्वं यतो नार्याः कामिनः सा परा रतिः ॥ इति ॥

वीररसादावपि यथावसरमुद्दीपनप्रशमनाभ्यां विना झटित्येवाद्भुतफलकल्पे साध्ये लब्धे प्रकटीचिकीर्षित उपायोपेयभावो न प्रदर्शित एव स्यात् । पुनरिति । इतिवृत्तवशादारब्धाशङ्क्यमानप्राया न तु सर्वथैवोपनता विश्रान्तिर्विच्छेदो यस्य स तथा । रसस्येति । रसाङ्गभूतस्य कस्यापीति यावत् । तापसवत्सराजे हि वासवदत्ताविषयो जीवितसर्वस्वाभिमानात्मा प्रेमबन्धस्तद्विभावाद्यौचित्यात् करुणविप्रलम्भादिभूमिका गृह्णन्समस्तेतिवृत्तव्यापी । राज्यप्रत्यापत्त्या हि सचिवनीतिमहिमोपनतया तदङ्गभूतपद्मावतीलाभानुगतयाऽनुप्राण्यमानरूपा परमामभिलषणीयतमतां प्राप्ता वासवदत्ताधिगतिरेव तत्र फलम् । निर्वहणे हि 'प्राप्ता देवी भूतधात्री च भूयः संबन्धोऽभूद्दर्शकेन' इत्येवं देवीलाभप्राधान्यं निर्वाहितम् । इयति चेतिवृत्तवैचित्र्यचित्रे भित्तिस्थानीयो वासवदत्ताप्रेमबन्धः प्रथममन्त्रारम्भात्प्रभृति पद्मावतीविवाहादौ, तस्यैव व्यापारात् । तेन स एव वासवदत्ताविषय; प्रेमबन्धः कथावशादाशङ्क्यमानविच्छेदो ऽ प्यनुसंहितः । तथा हि—प्रथमे तावदङ्के स्फुटं स एवोपनिबद्धः 'तद्वक्त्रेन्दुविलोकनेन दिवसो नीतः प्रदोषस्तथा । तद्गोष्ठयैव' इत्यादिना 'बद्धोत्कण्ठमिदं मनः किमथवा प्रेमाऽसमाप्तोत्सवम्' इत्यत्तेन । द्वितीयेऽपि 'दृष्टिर्नामृतवर्षिणी स्मितमधुप्रस्यन्दि वक्त्रं न किम्' । इत्यादिना स एव विच्छिन्नोऽप्यनुसंहितः । तृतीयेऽपि—

सर्वत्र ज्वलितेषु वेश्मसु भयादालीजने विदुते ।
श्वासोत्कम्पविहस्तया प्रतिपदं देव्या पतन्त्या तथा ।
हा नाथेति मुहुः प्रलापपरया दग्धं वराक्या तया ।
शान्तेनापि वयं तु तेन दहनेनाद्यापि दह्यामहे ॥ इत्यादिना ॥

चतुर्थेऽपि

देवीस्वीकृतमानसस्य नियतं स्वप्नायमानस्य मे
तद्गोत्रग्रहणादियं सुवदना यायात्कथं न व्यथाम् ।
इत्थं यन्त्रणया कथं कथमपि क्षीणा निशा जाग्रतो
दाक्षिण्योपहतेन सा प्रियतमा स्वप्नेऽपि नासादिता । इत्यादिना ।
पञ्चमेऽपि समागमप्रत्याशया करुणे निवृत्ते विप्रलम्भेऽङ्कुरिते ।
तथाभूते तस्मिन्मुनिवचसि जातागसि मयि
प्रयत्नान्तर्गूढां रुषमुपगता मे प्रियतमा ।
प्रसीदेति प्रोक्ता न खलु कुपितेत्युक्तिमधुरं

समुद्भिन्ना पीतैर्नयनसलिलैः स्थास्यति पुनः ॥ इत्यादिना । षष्ठेऽपि 'त्वत्सम्प्राप्तिविलोभितेन सचिवैः प्राणा मया धारिताः' इत्यादिना । अलङ्कृतीनामिति योजनापेक्षया कर्मणि षष्ठी । दृश्यन्ते चेति । यथा स्वप्नवासवदत्ताख्ये नाटके—

'स्वञ्चितपक्ष्मकपाटं नयनद्वारं स्वरूपताडेन ।
उद्घाट्य सा प्रविष्टा हृदयगृहं मे नृपतनूजा' ॥ इति ॥ १४ ॥

लोचन

(मधूनमधून रसाचे) उद्दीपन—करावयाचे, ते (योग्य) विभाव वगैरेंची योजना करून करावे. उदा. 'काय हाच तो उदयन राजा?' वगैरे सागरिकेची वाक्ये.[३] 'रसाचे प्रशमन'— सागरिका वासवदत्तेपासून पळून जातेवेळी.[४] (सागरिकेच्या रतिभावाचे) पुनःउद्दीपन होते, ते दुसऱ्या अंकात सागरिका उदयनाचे चित्र काढते, त्यावेळी.[५] (पुनः) प्रशमन होते, ते सुसंगता प्रवेश करिते तेव्हा,[६] वगैरे. कारण रस एकसारखा अतिशय प्रमाणात हाताळला गेल्यास मालतीच्या नाजूक फुलाप्रमाणे तो ताबडतोब कोमेजून जाईल. हे विशेषतः शृंगाराच्या बाबतीत घडून येईल. जसे (भरत) मुनींनी म्हटले आहे—

'प्रेयसीची प्रियकराशी हट्टाने प्रतिकूल वागण्याची इच्छा, तिने (वरकरणी) संभोग टाळू पाहणे, ती प्रियकराला एकदम वश न होणे हे सर्व प्रियकराच्या आत्यंतिक प्रेमाला कारण होते.[७]

वीररस वगैरेंच्या बाबतीतही योग्य वेळी उद्दीपन व योग्य वेळी प्रशमन केले नाही आणि जादूच्या साहाय्याने उत्पन्न केलेल्या फळाप्रमाणे साध्य झटकन प्राप्त झाले असे दाखविले, तर नायक वगैरेंनी केलेले प्रयत्न व अंतिम फळाची प्राप्ती यांमधील कारणकार्यसंबंध दाखविण्याची कवीची इच्छा असूनही तो कारणकार्यसंबंध त्याने दाखविला नाही असेच होईल! 'आणखी असे की'— कथानकाच्या ओघात मुख्य रस क्षीण होण्यास सुरुवात झाली असताना म्हणजे रस संपुष्टात येतो की काय असे जवळ जवळ वाटू लागले असताना. पण तो खरोखरीच खंडित झाला नसताना, त्या मुख्य रसाकडे म्हणजे मुख्य रसाचा परिपोष करणाऱ्या (विभाव वगैरे) कोणत्या तरी अंशाकडे अवधान द्यावे, हा भावार्थ. कारण 'तापसवत्सराज' नाटकामध्ये उदयन राजाला वासवदत्तेविषयी वाटणारे 'ही माझे जीवितसर्वस्व आहे' अशा स्वरूपाचे प्रेम सर्व कथानकाला व्यापून राहिले आहे, आणि हे प्रेम विभावादिकांच्या औचित्यास अनुसरून करुण, विप्रलंभ इ. निरनिराळी रूपे धारण करीत राहते.[९] वासवदतेची पुनःप्राप्ति हे त्या नाटकाचे उदयनाला अत्यंत हवेसे वाटणारे फळ आहे. त्या पुनःप्राप्तीचा आनंद राज्य पुनः मिळाल्यामुळे वृद्धिंगत झाला आहे. ती राज्यप्राप्ति यौगन्धरायण या सचिवाच्या राजनीतीच्या प्रभावाचा परिणाम असून त्या राज्यप्राप्तीबरोबर मिळालेले दुय्यम फळ म्हणजे उदयनाला झालेला पद्मावतीचा लाभ हे होय. (वासवदत्तेची पुनःप्राप्ति हे या नाटकाचे अंतिम फळ आहे असे म्हणण्याचे) कारण या नाटकातील निर्वहणसंधीमध्ये 'राणी वासवदत्ता व पृथ्वी पुन्हा परत मिळाली आणि दर्शक राजाशी (त्याच्या बहिणीशी आमचा विवाह झाल्याने) संबंध जुळून आला' इ. श्लोकाने उदयनाला वासवदत्तेचा लाभ होणे हीच प्रधान गोष्ट होय असे दाखविले आहे. आणि इतक्या विविध प्रसंगांनी नटलेल्या या कथानकरूपी चित्राचा मुख्य आधार उदयनाचे वासवदत्तेवरील प्रेम हाच आहे, कारण प्रारंभी यौगन्धरायणाने इतर मंत्र्यांशी केलेल्या विचारविनिमयापासून उदयनाचा पद्मावतीशी विवाह इ. मध्ये ते म्हणजे उदयनाचे प्रेमच प्रेरणा देणारे आहे. त्यामुळे वासवदत्तेविषयीचे तेच प्रेम कथेच्या ओघात मधूनमधून खंडित होते की काय अशी शंका येऊ लागली, तरी कवीने त्याच्याकडे पुनः लक्ष पुरवून त्याला

बळकटी आणली आहे. उदा. प्रारंभी पहिल्या अंकात तर ते प्रेमच वर्णिले आहे हे 'तिच्या मुखचंद्राकडे पाहून मी दिवस घालविला व संध्याकाळ तिच्याशी गप्पागोष्टी करून व्यतीत केली' अशा रीतीने सुरुवात झालेल्या व 'माझे मन तिला भेटण्यासाठी पुनः उत्कंठित झाले आहे, तेव्हा प्रेमाचा आनंद कधी संपत नाही हेच खरे' याने संपणाऱ्या श्लोकावरून[१०] उघड होते. दुसऱ्या अंकातसुद्धा 'तिची नजर अमृताचा वर्षाव करीत नव्हती काय? तिच्या मुखातून स्मितरूपी मध ओसंडून वाहत नव्हता काय?' वगैरे वाक्यांनी[११] त्याच प्रेमाचा पुन्हा पाठपुरावा केला आहे. तिसऱ्या अंकातही—

'राजनिवासाच्या परिसरातील इमारतींनी पेट घेतला असताना तिच्या सर्व मैत्रिणी भयाने पळून गेल्या असताना उसासे टाकीत, थरथर कापत, व्याकुळ होऊन ती पावलोपावली अडखळून पडू लागली. 'हे प्राणनाथा!' असा पुन्हा पुन्हा आक्रोश करीत ती बिचारी राणी जळून गेली. पण तो अग्नि कालांतराने विझला असला तरी आम्ही त्या अग्नीने अद्यापि जळतच आहोत![१२]

या उद्‌गारांनी कवीने त्या प्रेमाकडे पुन्हा अवधान दिलेच आहे. चवथ्या अंकात सुद्धा—

'माझे मन राणी वासवदत्तेच्या चिंतनात मग्न झाले असल्यामुळे ती मला स्वप्नात दिसेल व त्या स्वपनात मी तिच्या नावाने तिला संबोधू लागलो असताना 'या सुमुखी (पद्‌मावती)ला दुःख झाल्यावाचून कसे बरे राहील?' या धास्तीने मी झोपी जाण्याचे टाळले व रात्र जागूनच कशीबशी कंठली व त्यामुळे पद्‌मावतीविषयी वाटणाऱ्या दाक्षिण्याच्या पायी माझ्या प्रियतमेची भेट मला स्वप्नातही होऊ शकली नाही!'[१३]

वगैरे श्लोकाने प्रेमाचे पुन्हा स्मरण केले गेले आहे. पाचव्या अंकातही वासवदत्तेच्या भेटीची आशा उत्पन्न झाल्यामुळे करुणरसाचा स्थायिभाव शोक हा दूर होऊत विप्रलंभरति पालवली असताना—

'त्या ऋषीचे ते आश्वासन[१४] जेव्हा खरे होईल व माझ्या हातून तिचा जेव्हा अपराध घडेल, तेव्हा माझी प्रियतमा रागावली, तरी (ती) मोठ्या प्रयत्नाने आपला रोष आपल्या मनातल्या मनातच दडवून ठेवील. आणि 'रागावू नकोस' अशी मी विनवणी केली असताना 'खरेच, मी रागावले नाही' असे मोठ्या गोडपणाने बोलून ती आपली आतल्या आत पिऊन[१५] टाकलेली आसवे गाळीत मजपुढे उभी राहील'— या श्लोकाने (कवीने) प्रेमाची आठवण पुन्हा जागृत केली आहे आणि सहाव्या अंकातही तोच प्रेमाचा विषय चालू ठेवण्याचे काम 'माझ्या सचिवांनी तुझी प्राप्ति होण्याची आशा माझ्या मनात उत्पन्न केल्याने मी जीव धरून राहिलो'[१६] वगैरे श्लोकाने केले आहे. 'अलंकारांची योजना' यातील षष्ठी, ही योजनक्रियेच्या दृष्टीने कर्मवाचक आहे.[१७] 'दिसतातच की'— उदा. 'स्वप्नवासवदत्त' नावाच्या नाटकातील पुढील श्लोक पाहा- '(मी निद्राधीन झाली असताना) ज्यांची पापण्यारूपी कवाडे चांगली घट्ट मिटलेली होती अशी माझी नेत्ररूपी द्वारे आपल्या नेत्रसौंदर्यांच्या आघाताने[१८] उघडून ती राजकन्या माझ्या हृदयरूपी भवनात शिरली![१९]

टीपा

१) उदा. रत्नावलीच्या पहिल्या अंकात सागरिका पहिल्यानेच उदयनास पाहते त्यावेळी तिच्या मनातील उदयनविषयक रतिभावाचे उद्दीपन होते. मग ती वासवदत्ता राजाच्या उपस्थितीत मदनदेवाच्या मूर्तीची

पूजा करीत असताना सागरिका राजाकडे झाडा आडून बघत असते. ती पूजा संपल्यावर वासवदत्ता राजवाड्याकडे जायला निघाली असता सागरिका वासवदत्तेने पूर्वीच सांगितल्याप्रमाणे 'सारिका' पक्षिणीचा सांभाळ करण्याची कामगिरी पार पाडण्यासाठी वासवदत्तेला आपण न दिसू अशा रीतीने पळत जाते. त्या वेळी तिच्या रतिभावाचे प्रशमन होते. पुनः दुसऱ्या अंकात (सागरिकेच्या) रतिभावाचे उद्दीपन करणारा व तिसऱ्या अंकात प्रशमन घडवून आणणारा असे प्रसंग आहेत.

रसाचे उत्कटत्व कमीजास्त करण्याची गरज अशासाठी की, सतत ते एकाच पातळीवर ठेवले, तर त्यामुळे उत्पन्न होणारा ताण प्रेक्षकांनां असह्य होण्याचा संभव असतो.

२) 'तापसवत्सराज' या मायुराजकृत नाटकाचा पूर्वी (हाच "उद्द्योत – ३ ,' त्याच प्रकारच्या ध्वनीला पद व पदाचा अंशही प्रकट करू शकतात याची उदाहरणे' " वरील टीप १ पाहा) उल्लेख आलेलाच आहे. या नाटकाची एकच मुद्रित आवृत्ति उपलब्ध आहे व ती यदुगिरि यतिराज संपत्कुमार रामानुजमुनि यांनी संपादिलेली असून १९२९ साली छापली आहे.

३) रत्नावली, १–२३ नंतरचे वाक्य. हे वाक्य सागरिकेने स्वगत म्हटले आहे. तिच्या या वाक्यावरून उदयनाविषयी तिच्या मनात आधीपासून असलेल्या रतिभावाचे उद्दीपन झाल्याचे सूचित होत आहे.

४) सागरिका जोपर्यंत झाडाआड राहून उदयनाकडे एकाग्र दृष्टीने बघत होती, तोपर्यंत तिच्या रतिभावाचे उद्दीपन झालेले होते. पण वासवदत्ता राजवाड्याकडे जावयास निघालेली पाहून सागरिका जेव्हा घाईने निघून जाते तेव्हा तिच्या रतिभावाचे प्रशमन होते.

५) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'रसादिरूप अर्थ ज्यात प्रधान, तीच असंलक्ष्यक्रम ध्वनीची उदाहरण'" वरील टीप ३५ वी.

६) वस्तुतः सुसंगता ही सागरिकेची सखी असल्यामुळे तिने प्रवेश केल्यावर सागरिकेच्या रतिभावाचे प्रशमन झालेले दिसत नाही .पुढे विदूषकाच्या **एषा खल्वपरा देवी वासवदत्ता ।** या उद्गारांमुळे वासवदत्ता खरोखरच आली असे वाटून सागरिका राजापासून दूर निघून जाते तेव्हा मात्र सागरिकेचा रतिभाव शांत होतो. तेव्हा लोचनात **सुसंगताप्रवेशे** हे शब्द लेखकप्रमादामुळे पडले असावेत असे दिसते. **वासवदत्ताप्रवेशे समुपस्थिते** असे काहीतरी अभिनवगुप्तांनी म्हटले असावे.

७) नाट्यशास्त्र, २२–२०७

८) पाहा, प्रथमखंड, लोचन, "उद्द्योत – १ 'रसप्रतीतीचे स्वरूप अलौकिक असते'" वरील 'जादुगाराने दाखविलेल्या अपूव फुलाप्रमाणे', इ. वाक्य.

९) म्हणजे वासवदत्ता जळून मेली असे कळल्यावर उदयनाने केलेल्या विलापामध्ये त्या प्रेमाला करुण रसाचा स्थायिभाव जो शोक, त्याचे स्वरूप प्राप्त होते. आणि मुनीच्या आश्वासनाप्रमाणे वासवदत्ता आपणास पुन्हा भेटेल असे जेव्हा त्याला वाटते, तेव्हा तीच रति विप्रलंभ रतीचे स्वरूप धारण करते. तुलनार्थ पाहा,

'उत्तररामचरित' नाटकात भवभूतीने केलेले पुढील विधान– **एको रसः करुण एव निमित्तभेदात् । भिन्नः पृथक् पृथगिवाश्रयते विवर्तान् ॥**

१०) तापसवत्सराज–१–१४.

११) तापसवत्सराजातील या (२–९) श्लोकामधील उरलेल्या ओळींचा आशय पुढीलप्रमाणे आहे.– 'तुझे अंतःकरण प्रीतीने आर्द्र नव्हते काय? तुझ्या अवयवांच्या ठिकाणी चंदनाच्या उटीची शीतलता नव्हती काय? त्या दुष्ट अग्नीने तुझ्या शरीराच्या कोणत्या भागात प्रवेश मिळवून तुला जाळून टाकण्याचे हे दुष्कृत्य केले?'

१२) तापसवत्सराज, ३–१०.

१३) म्हणजे मी वासवदत्तेचे नाव उच्चारल्यामुळे पद्मावतीचे मन दुखावेल, या भीतीने.

१४) हा श्लोक 'तापसवत्सराजा'च्या चवथ्या अंकातील आहे असे अभिनवगुप्त म्हणतात. पण या नाटकाच्या उपलब्ध प्रतीत हा ५ व्या अंकातील २४ वा श्लोक आहे व ते बरोबरही वाटते. कारण चवथ्या अंकात उदयन व पद्मावती यांचा विवाहच झालेला नाही. तेव्हा हा पद्मावतीशी विवाह झाल्यानंतरचा श्लोक चवथ्या अंकातील असणे शक्य वाटत नाही.

१५) 'वासवदत्तेसारख्याच राजकन्येशी विवाह केल्याने उदयनाला वासवदत्तेची पुनः प्राप्ति होईल' हे मुनीने दिलेले आश्वासन. या आश्वासनाचा उल्लेख तापसवत्सराजाच्या चवथ्या अंकात आला आहे.

१६) येथे **समुद्भिन्ना पीतैः** (**नयनसलिलैः**) असा पाठ दिला आहे. काशी आवृत्ती तही तोच पाठ आहे, पण बालप्रिया टीकेमध्ये (पाहा पृ. ३४४) **समुद्भिन्नप्रीतिः** (**नयनसलिलैः**) असा आणखी एक पाठ आहे.

१७) या श्लोकातील उरलेल्या ओळींचा आशय असा– 'सचिवांच्या सल्ल्याला मान देऊन मी देहत्याग केला नाही याचा अर्थ माझे तुझ्यावर प्रेम नाही असा नाही. आता तुझ्या मागोमाग येण्याचा अवसर जवळच आला असताना मृत्यूचे स्वागत करावयास मला आनंदच वाटत आहे. परंतु तू आगीमध्ये जळून गेलीस हे कळताक्षणीच माझे निष्ठुर मन, तुला भेटावयास तुझ्या मागोमाग गेले नाही याचे मला दुःख होते.' यातील शेवटच्या वाक्यातील कल्पना पाहिल्यावर कुमारसंभव, ४–२० मधील रतीच्या उद्गारांची आठवण होते. त्याचा प्रा. वीरकस्कृत मराठी अनुवाद असा–

> क्षणमात्र धरून जीवना मदनामागुनि राहिली रती ।
> उरला अपवाद हा सख्या! तुझिया मी जरि येत मागुती ॥

१८) पाहा, पाणिनि, अष्टाध्यायी, २–३–६५.

१९) काशी आवृत्तीमध्ये **स्वरूपताडेन** असा पाठ आहे, पण बालप्रिया टीकेमध्ये **स्वरूपतडितैव** (म्हणजे आपल्या सौंदर्याच्या विद्युत्पाताने) असा आणखी एक पाठ दिला आहे.

२०) हा श्लोक 'स्वप्नवासवदत्त' नाटकाच्या उपलब्ध प्रतीत आढळत नाही. तो कदाचित् लेखकप्रमादाने गळला असावा किंवा सध्या उपलब्ध असलेली आवृत्ति ही रंगावृत्ति मानल्यास तो प्रयोगकर्यांनी गाळला असावा. अभिनवगुप्तांनी हा जो श्लोक उद्धृत केला आहे, तो या श्लोकात रूपक अलंकाराचा अवास्तव विस्तार झालेला दिसतो या दृष्टीने केला आहे. पण स्वप्नप्रसंगाच्या संदर्भात या श्लोकात रूपक अलंकाराचा अवास्तव विस्तार झाला आहे असे आम्हास वाटत नाही. शिवाय एखाद्या नाटकामध्ये एखाद्या श्लोकात एखाद्या अलंकाराचा विस्तार झालेला असणे ही गोष्ट आम्हाला गैर वाटत नाही. मात्र काही विशिष्ट परिस्थितीत रूपकासारख्या अलंकाराचा अवास्तव विस्तार करू नये असे आनंदवर्धन व अभिनवगुप्त यांचे मत दिसते. पाहा. प्रथम खंड पृ. ४५८.

ध्वन्यालोकः

किञ्च,
अनुस्वानोपमात्मापि प्रभेदो य उदाहृतः ।
ध्वनेरस्य प्रबन्धेषु भासते सोऽपि केषुचित् ॥ १५ ॥

अस्य विवक्षितान्यपरवाच्यस्य ध्वनेरनुरणनरूपव्यङ्ग्योऽपि यः प्रभेद उदाहृतो द्विप्रकारः सोऽपि प्रबन्धेषु केषुचिद्द्योतते । तद्यथा मधुमथनविजये पाञ्चजन्योक्तिषु । यथा वा ममैव कामदेवस्य सहचरसमागमे विषमबाणलीलायाम् । यथा च गृध्रगोमायुसंवादादौ महाभारते ।

ध्वन्यालोक

आणखी असे की—

या ध्वनीचा अनुस्वानासारख्या स्वरूपाचा जो प्रकार पूर्वी (पाहा ; उद्द्योत २, कारिका २० वी) उदाहरणांसह सांगितला, तो प्रकारदेखील काही प्रबंधांतून प्रकाशित झालेला दिसतो. ॥ १५ ॥

या म्हणजे 'विवक्षितान्यपरवाच्य' ध्वनीच्या अनुरणनस्वरूपी व्यंग्यार्थ असणाऱ्या ज्या प्रकारच्या दोन[1] उपप्रकारांची पूर्वी उदाहरणे दिली, तोही प्रकार काही प्रबंधांतून व्यंजनेने प्रकाशित होतो. उदाहरणार्थ, मधुमथनविजया[2] मध्ये पाञ्चजन्य नावाच्या पात्राच्या भाषणांमध्ये. किंवा माझ्याच 'विषमबाणलीले' मध्ये कामदेवाची आपल्या सहचरांशी भेट होते, त्याप्रसंगी आणि तसेच महाभारतातील गिधाड व कोल्हा यांचा संवाद वगैरे ठिकाणी.

लोचनम्

न केवलं प्रबन्धेन साक्षाद्व्यङ्ग्यो रसो यावत्पारम्पर्येणापीति दर्शयितुमुपक्रमते—किञ्चेति । अनुस्वानोपमः शब्दशक्तिमूलोऽर्थशक्तिमूलश्च, यो ध्वनेः प्रभेद उदाहृतः सः केषुचित्प्रबधेषु निमित्तभूतेषु । व्यञ्जकेषु सत्सु व्यङ्ग्यतया स्थितः सन् । अस्येति रसादिध्वनेः प्रकृतस्य भासते व्यञ्जकतयेति शेषः । वृत्तिग्रन्थोऽप्येवमेव यीज्यः । अथ वानुस्वानोपमः प्रभेद उदाहृतो यः प्रबन्धेषु भासते अस्यापि 'द्योत्योऽलक्ष्यक्रमः क्वचित्' इत्युत्तरश्लोकेन कारिकावृत्त्योः सङ्गतिः ।

एतदुक्तं भवति—प्रबन्धेन कदाचिदनुरणनरूपव्यङ्ग्यो ध्वनिः साक्षाद्व्यज्यते स तु रसादिध्वनौ । पर्यवस्यतीति । यदि तु स्पष्टमेव व्याख्यायते, तदा ग्रन्थस्य पूर्वोत्तरस्यालक्ष्यक्रमविषयस्य मध्ये ग्रन्थोऽयमसङ्गतः स्यात्, नीरसत्वं च पाञ्चजन्योक्त्यादीनामुक्तं स्यादित्यलम् ॥

लीलादाढग्गुव्वूढसअलमहिमण्डलस्स चिअ अज्ज ।

कीस मुणालाहरणं पि तुज्झ गरुआइ अंगम्मि । इत्यादयः पाञ्चजन्योक्तयो रुक्मिणीविप्रलब्धवासुदेवाशयप्रतिभेदनाभिप्रायमभिव्यञ्जयन्ति । सोऽभिव्यक्तः प्रकृतरसस्वरूपपर्यवसायी । सहचराः वसन्तयौवनमलयानिलादयस्तैः सह समागमे ।

हुमि अवहत्थिअरेहो णिरंकुसो अह विवेअरहिओ वि ।
सिविणे वि तुमम्मि [हेमचन्द्राच्या 'काव्यानुशासना'त 'तु सिविणे वि तुज्झ समए पत्तिअ भत्तिं न पुष्फुसिमि' । असा पाठ आहे.] पुणो भत्तिं णो पंम्हरिस्सामि ॥

इत्यादयो यौवनस्योक्तयस्तत्तन्निजस्वभावव्यञ्जिकाः स स्वभावः प्रकृतरसपर्यवसायी । यथा चेति । श्मशानावतीर्णं पुत्रदाहार्थमुद्योगिनं जनं विप्रलब्धुं गृध्रो दिवा शवशरीरभक्षणार्थी शीघ्रमेवापसरत यूयमित्याह ।

अलं स्थित्वा श्मशानेऽस्मिन्गृध्रगोमायुसङ्कुले ।
कङ्कालबहले घोरे सर्वप्राणिभयङ्करे ॥
न चेह जीवितः कश्चित्कालधर्ममुपागतः ।
प्रियो वा यदि वा द्वेष्यः प्रणिनां गतिरीदृशी ॥

इत्याद्यवोचत् । गोमायुस्तु निशोदयावधि अमी तिष्ठन्तु, ततो गृध्रादपहृत्याहं भक्षयिष्यामीत्यभिप्रायेणावोचत्—

आदित्योऽयं स्थितो मूढाः स्नेहं कुरुत साम्प्रतम् ।
बहुविघ्नो मुहूर्तोऽयं जीवेदपि कदाचन ॥
अमुं कनकवर्णाभं बालमप्राप्तयौवनम् ।
गृध्रवाक्यात्कथं बालास्त्यक्ष्यध्वमविशङ्किता : ॥

इत्यादि । स चाभिप्रायो व्यक्तः शान्तरस एव परिनिष्ठिततां प्राप्तः ॥ १५ ॥

लोचन

संपूर्ण ग्रंथातून रस हा साक्षात् म्हणजे लगेच अभिव्यक्त होतो इतकेच नाही, तर परंपरेने, दुसऱ्या (म्हणजे वस्तुरूप किंवा अलंकाररूप) व्यंग्यार्थाच्या द्वारेही रसाभिव्यक्ति केली जाऊ शकते[३] हे दाखविण्यासाठी वृत्तिकार 'आणखी असे की' या शब्दांनी सुरुवात करितात. अनुस्वानासारख्या स्वरूपाचा म्हणजे शब्दशक्तिमूल व अर्थशक्तिमूल असे दोन उपप्रकार असलेला ध्वनीचा जो प्रकार पूर्वी उदाहरणांसह

सांगितला, तो काही प्रबंध त्याचे व्यंजक झाले असताना व्यंग्य रूपाने असलेला, 'याचा' म्हणजे प्रस्तुत जो रसादिध्वनि, त्याचा 'व्यंजक म्हणून प्रतीत होतो' इतके शब्द 'काही प्रबंधांतून' या शब्दांनंतर अध्याहृत घ्यावेत.[४] वृत्तीचा अर्थही असाच, म्हणजे वर सांगितलेले शब्द अध्याहृत घेऊनच करावा. किंवा 'अनुस्वानासारख्या ज्याप्रकारची उदाहरणे आम्ही पूर्वी दिली व जो प्रकार प्रबंधातून आढळतो, त्यातूनही काही ठिकाणी अलक्ष्यक्रमध्वनि (म्हणजे रसादिध्वनि) प्रकाशित होतो.' अशा रीतीने कारिका व वृत्ति यातील **अस्य** या शब्दाचा संबंध कारिका १६ मधील (**द्योत्यः** याच्या) शी जोडावा.[५]

ग्रंथकाराच्या या म्हणण्याचा अर्थ असा निघतो– प्रबंधातून काही वेळा अनुरणनरूपव्यंग्य ध्वनि लगेच सूचित केला जातो, पण त्याचे पर्यवसान रसादिध्वनीत होते. पण १५ व्या कारिकेचे व तीवरील वृत्तीचे जर सरळसरळ विवरण केले, तर पूर्वीच्या (म्हणजे १० ते १४ या) कारिका व पुढील १६ वी कारिका या असंलक्ष्यक्रमध्वनीसंबंधी असल्यामुळे त्यांमध्ये ही (अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीसंबंधी विवरण करणारी) १५ वी कारिका विसंगत होईल आणि शिवाय वृत्तिकारांनी दिलेली पांचजन्याचे भाषण वगैरे तीनही उदाहरणे नीरस ठरतील[६] ही कारणे आम्ही केलेलेच व्याख्यान ग्राह्य समजण्यास पुरेशी आहेत.

लीलादंष्ट्राग्रोद्व्यूढसकलमहीमण्डलस्यैवाद्य ।
कस्मान्मृणालाभरणमपि गुरु भवति तवाङ्गे ॥

(ही संस्कृत छाया). '(हे कृष्णा! वराहावताराच्या वेळी) तू आपल्या दाढांच्या टोकांवर सर्व भूमंडल सहज लीलेने उचलून धरिले होतेस, पण त्याच तुझ्या शरीराला आज कमलनालाचा एखादा अलंकारसुद्धा का बरे जड झाल्यासारखा वाटत आहे?'

हे व त्यासारखेच पांचजन्य नावाच्या कृष्णाच्या सहकाऱ्याने काढलेले उद्‌गार रुक्मिणी प्राप्त होण्यापूर्वीची श्रीकृष्णाच्या शरीराची अवस्था[७] प्रकट करणे हा बोलणाऱ्याचा अभिप्राय सुचवीत आहेत. तो अभिप्राय अभिव्यक्त झाल्यावर त्याचे, प्रस्तुत जो विप्रलंभशृंगाररस, त्याच्यात पर्यवसान होते. (कामदेवाचे) 'सहचर' म्हणजे वसंत, यौवन, मलयानिल वगैरे, त्यांच्याशी कामदेवाची भेट झाली, त्यावेळी.

भवाम्यपहस्तितरेखो निरङ्कुशोऽथ विवेकरहितोऽपि ।
स्वप्नेऽपि त्वयि पुनर्भक्तिं न प्रस्मरिष्यामि ॥ (छाया)

'मी मर्यादा ओलांडली असेल, संयम सोडून वागलो असेन आणि माझा विवेकही नष्ट झाला असेल, पण तुझी भक्ति[८] करण्याचे मात्र मला स्वप्नातसुद्धा विस्मरण होणार नाही' वगैरे 'यौवन' नावाच्या मदन–सहचराचे उद्‌गार त्याच्या स्वभावाच्या निरनिराळ्या छटांचे सूचक आहेत व त्या स्वभावाचे प्रस्तुत रसाची[९] अभिव्यक्ति करण्यात पर्यवसान होते.

'आणि तसेच' –स्मशानात येऊन (मृत) मुलाला जाळण्याची तयारी करणाऱ्या लोकांना फसविण्यासाठी दिवसा मृत शरीरावर ताव मारण्याच्या इच्छेने 'तुम्ही लवकरच (दिवसाउजेडी) येथून निघून जा' असे गिधाड त्यांना म्हणाले.

'गिधाडे, कोल्हे वगैरेंनी व्याप्त, तसेच हाडाचे सांगाडे जागोजाग विखुरलेल्या आणि सर्व प्राण्यांना भयाण वाटणाऱ्या स्मशानात आता थांबू नका. कोणतीही व्यक्ति, मग ती आपल्याला आवडणारी असो, किंवा नावडणारी असो, एकदा का मृत्यूच्या तावडीत गेली, की ती या जगात पुन्हा जिवंत झालेली नाही. सर्व प्राण्यांना शेवटी अशीच गति प्राप्त होते.'[१०]

वगैरे वाक्ये (त्या गिधाडाने) म्हटली. पण कोल्हा मात्र यांनी रात्र होई तो थांबावे, मग गिधाड येथून गेल्यावर त्याच्या तावडीतून मी हा मृतदेह सोडवून खाईन, अशा अभिप्रायाने पुढील शब्द बोलला—

'अरे मूर्खांनो, हा सूर्य अजून प्रकाशत आहे. आता या बाळावर प्रेम करीत राहा. ही वेळ पुष्कळ अशुभ योगांनी युक्त असल्यामुळे या मुलावर ही आपत्ति आली असेल. (ते अशुभ योग टळल्यावर) हा एखादे वेळी जिवंतही होईल! सोन्यासारखी अंगकांति असलेल्या व अद्यापि तारुण्य प्राप्त न झालेल्या या बाळाला केवळ गिधाडाच्या बोलण्यावरून काहीही शंका न घेता टाकून जावयास तुम्ही कसे उद्युक्त होता?" वगैरे. आणि (गिधाड व कोल्हा यांच्या बोलण्यातून) अभिव्यक्त होणाऱ्या त्या त्या स्वार्थी उद्देशांचे शेवटी शांत रसातच पर्यवसान होते.[११] ॥ १५ ॥

टीपा

१) हे दोन प्रकार म्हणजे शब्दशक्तिमूल व अर्थशक्तिमूल हे होत (पाहा, कारिका २—२०)

२) हा 'मधुमथनविजय' ग्रंथ कोणी रचला वगैरेसंबंधी अभिनवगुप्त काहीही सांगत नाहीत. 'दीधिति' या टीकेचा कर्तादेखील हा ग्रंथ अनुपलब्ध आहे असे म्हणतो. पण **महुमअविअअ** (मधुमथविजय) हे प्राकृत काव्य वाक्पतिराजाने लिहिले हे त्याच्या **गउडवहो** या काव्याच्या प्रस्तावनेतील एका पद्यावरून स्पष्ट होते. पाहा, डॉ. वा. म. कुलकर्णी यांचा 'हरिविजया'वरील लेख, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराचा हीरकमहोत्सव ग्रंथ, (१७९८), पृ. ७१०

३) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत — १ 'रस' प्रकार स्वप्नातही 'वाच्य' नसतो व प्रतीयमान अर्थच काव्याचा आत्मा होय" वरील 'लोचनातील' 'वस्तुध्वनि, व अलंकारध्वनि' या शब्दांनी प्रारंभ झालेली वाक्ये.
४) १५ व्या कारिकेतील **अस्य** या शब्दाचा अर्थ वृत्तीमध्ये 'या म्हणजे विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीचा' असा केला आहे. अभिनवगुप्तांनी अस्य याचा, वरील अर्थाशिवाय 'याचा म्हणजे याच्याकडून' म्हणजे 'अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीकडून' असा अर्थ केला आहे.

५) १५ व्या कारिकेतील **अस्य** या शब्दाचा (अर्थ **अनेन** असा करून त्याचा) संबंध १६ व्या कारिकेतील द्योत्यः अलक्ष्यक्रमः याच्याशी जोडावा व वृत्तीतील अस्य **विवक्षितान्यपरवाच्यस्य** यातील **अस्य** या शब्दाचाही **अनेन** असा अर्थ करून त्याचा संबंध १६ व्या कारिकेवरील वृत्तीमधील **अभिव्यज्यमानो दृश्यते** याच्याशी जोडावा.

६) म्हणजे ती उदाहरणे केवळ अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीचीच ठरतील. रसपर्यवसायी ठरणार नाहीत. पण हे बरोबर नाही, कारण ती सर्व उदाहरणे रसध्वनीची आहेत यात शंका नाही, असे अभिनगुप्तांचे म्हणण आहे व ते बरोबर आहे.

७) लोचनातील 'आशय' या शब्दाचा अर्थ आम्ही 'शरीराची अवस्था' असा केला आहे. तसा न करिता बालप्रिया टीकेत म्हटल्याप्रमाणे कृष्णाचा 'रुक्मिणीविषयक अभिलाष' असा केला तर हे उदाहरण रसध्वनीसध्ये पर्यवसान होणाऱ्या वस्तुध्वनीचे न होता साक्षात् रसध्वनीचेच होईल. म्हणून शरीराला प्राप्त झालेली कृशता' या वस्तुरूप व्यंग्यार्थामुळे कृष्णाची रुक्मिणीविषयीची अभिलाषरति सुचविली जात आहे असेच मानिले पाहिजे.

८) मर्यादा सोडून वागणे वगैरे वाक्यांतून 'यौवनाने काय काय केले असेल' हे सूचित होऊन तसे वागण्याची त्याच्या स्वभावाची छटा सूचित होते, असे समजता येईल. पण 'भक्ति' हा शब्द प्रत्यक्ष वापरला असल्याने येथे 'भाव' हा 'व्यंजित' कसा होतो हा प्रश्नच आहे. तेव्हा अनुरणनरूप वस्तु सूचित होऊन रसादि सूचितच झाल्याचे उदाहरण अभिनवगुप्तांनी देणे इष्ट झाले असते.

९) म्हणजे यौवनाला वाटणाऱ्या मदनविषयक स्नेहभावाची.

१०) महाभारत, शांतिपर्व, अध्याय १२—१५३. कोल्ह्याच्या तोंडचे श्लोकही याच अध्यायात आहेत.

११) गिधाड रात्री बाहेर पडत नाही व गिधाड असेपर्यत कोल्हा त्याच्या तावडीतून ते मृत शरीर सोडवू शकत नाही. म्हणून आपापल्या स्वार्थाला सोयीस्कर होईल अशा रीतीने (म्हणजे दिवस आहे तोवर आपणास मृत शरीर खावयास मिळावे हा गिधाडाचा उद्देश व गिधाड निघून गेल्यावर ते आपल्याला खावयास मिळावे ही कोल्ह्याची इच्छा) हे स्वार्थी उद्देश हा या श्लोकातील अनुरणनरूपी वस्तुध्वनि होय व त्यातून 'सर्व प्राणी स्वार्थी आहेत' असे वाचकाला प्रतीत होऊन त्यामुळे या संसाराविषयी त्याला उद्वेग उत्पन्न होतो. उद्वेग (म्हणजे निर्वेद) शांतरसाचा स्थायिभाव होय.

ध्वन्यालोकः

सुप्तिङ्वचनसम्बन्धैस्तथा कारकशक्तिभिः ।
कृत्तद्धितसमासैश्च द्योत्योऽलक्ष्यक्रमः क्वचित् ॥ १६ ॥

अलक्ष्यक्रमो ध्वनेरात्मा रसादिः सुब्विशेषैस्तिङ्विशेषैर्वचनविशेषैः सबन्धविशेषैः कारकशक्तिभिः कृद्विशेषैस्तद्धितविशेषैः समासैश्चेति । चशब्दान्निषातोपसर्गकालादिभिः प्रत्युक्तैरभिव्यज्यमानो दृश्यते । यथा—

न्यक्कारो ह्ययमेव मे यदरयस्तत्राप्यसौ तापसः ।
सोऽप्यत्रैव निहन्ति राक्षसकुलं जीवत्यहो रावणः ॥
धिग्धिक्छक्रजितं प्रबोधितवता किं कुम्भकर्णेन वा ।
स्वर्गग्रामटिकाविलुण्ठनवृथोच्छूनैः किमेभिर्भुजैः ॥

अत्र हि श्लोके भूयसा सर्वेषामप्येषां स्फुटमेव व्यञ्जकत्वं दृश्यते । तत्र 'मे यदरयः' इत्यनेन सुप्सम्बन्धवचनानामभिव्यञ्जकत्वम् । 'तत्रप्यसौ तापस' इत्यत्र तद्धितानिपातयोः । 'सोऽप्यत्रैव निहन्ति राक्षसकुलं जीवत्यहो रावणः' इत्यत्र तिङ्कारकशक्तीनाम् । 'धिग्धिक्छक्रजितम्' इत्यादौ श्लोकार्धे

कृत्तद्धितसमासोपसर्गाणाम् । एवंविधस्य व्यञ्जकभूयस्त्वे च घटमाने काव्यस्य सर्वातिशायिनी बन्धच्छाया समुन्मीलति । यत्र हि व्यङ्ग्यावभासिनः पदस्यैकस्यैव तावदाविर्भावस्तत्रापि काव्ये कापि बन्धच्छाया, किमुत यत्र तेषां बहूनां समवायः । यथात्रानन्तरोदितश्लोके । अत्र हि रावण इत्यस्मिन् पदेऽर्थान्तरसंक्रमितवाच्येन ध्वनिप्रभेदेनालङ्कृतेऽपि पुनरनन्तरोक्तानां व्यञ्जकप्रकाराणामुद्भासनम् । दृश्यन्ते च महात्मनां प्रतिभाविशेषभाजां बाहुल्येनैवंविधा बन्धप्रकाराः ।

ध्वन्यालोक

'अलक्ष्यक्रम" हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यथांमुळे, क्रियापदाच्या प्रत्ययांमुळे, वचनामुळे, 'सम्बन्धा'मुळे[१] त्याचप्रमाणे विशिष्ट कारकांच्या[२] सामर्थ्यामुळे, व कृत् प्रत्यय,[३] तद्धित प्रत्यय[४] आणि समास यांमुळेसुद्धा प्रकाशित होतो. ॥ १६ ॥

व्यंग्यार्थाचा जो 'अलक्ष्यक्रम' (म्हणजे रसादि) हा सर्वोकृष्ट प्रकार, तो विशिष्ट विभक्तिप्रत्ययांमुळे, विशिष्टक्रियापदप्रत्ययांमुळे, विशिष्ट प्रकारच्या 'संबंधा'मुळे, कारकांच्या अर्थामुळे, विशिष्ट कृत्प्रत्ययांमुळे, विशिष्ट तद्धितप्रत्ययांमुळे व समासांमुळे अभिव्यक्त होताना आढळतो. कारिकेतल्या 'सुद्धा' या शब्दामुळे निपात,[५] उपसर्ग, काल वगैरेमुळेही तो अभिव्यक्त होताना दिसतो (असा अर्थ) उदा.—

"माझ्या बाबतीत शत्रू (असावेत) हेच मुळी (मला) लांछन आहे. त्यातसुद्धा तो (शत्रु) एक (क्षुद्र) 'तापस' आहे! तोही येथेच राक्षसांच्या कुळांचा पार उच्छेद करीत आहे! आणि काय आश्चर्य! रावण जिवंत आहे! धिक्कार, धिक्कार असो इंद्रजिताला. कुंभकर्ण जागा झाल्याचा तरी काय उपयोग झाला? स्वर्गरूपी क्षुद्र खेडे लुटल्यामुळे उगाचच (गर्वाने) फुगलेल्या या (वीस) बाहूंचा तरी काय उपयोग आहे?"

या श्लोकात यांपैकी बहुतेक (अंश) व्यंजक असलेले दिसतात. त्यांपैकी 'माझ्या बाबतीत (अनेक) शत्रु असावेत' यामध्ये विभक्तिप्रत्यय, (षष्ठी विभक्तीचा अर्थ) सामान्य संबंध व वचन हे व्यंजक आहेत. त्यात देखील 'तो शत्रु एक तापस आहे!' यात तद्धित व निपात यांच्या ठिकाणी व्यंजकत्व आहे. 'तो (तापस) ही येथेच राक्षसकुळाचा पार उच्छेद करीत आहे आणि काय आश्चर्य! रावण जिवंत आहे!' यात क्रियापदाचा प्रत्यय आणि कारकांचे सामर्थ्य ही व्यंजक असलेली दिसतात. 'धिक्कार, धिक्कार असो इंद्रजिताला' पासून सुरू होणाऱ्या श्लोकार्धामध्ये कृत् प्रत्यय, तद्धित प्रत्यय, समास व उपसर्ग यांच्या ठिकाणी व्यंजकत्व असलेले आढळते. अशा प्रकारच्या काव्यात व्यंजकांचा वापर विपुल प्रमाणावर केल्यामुळे काव्यरचनेचे सर्वोत्कृष्ट सौंदर्य प्रकट होते. कारण ज्या काव्यात व्यङ्ग्यार्थप्रकाशक असे एकच पद असते, त्या काव्यातही रचनासौंदर्य काही आगळेच असलेले आढळते. तर मग जेथे पुष्कळ व्यंजकांचा समुदाय उपयोजिला असेल, त्या काव्याच्या रचनासौंदर्याबद्दल काय म्हणावे? उदा. आताच उद्धृत केलेला ('माझ्या बाबतीत शत्रु असावेत'— इ.) श्लोकः कारण या श्लोकात 'रावण' हे पद 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' ध्वनीने मंडित असूनही शिवाय वर सांगितलेल्या निरनिराळ्या प्रकारच्या व्यंजकांचा समूह येथे विलसत आहे. विशेष प्रतिभेने संपन्न असलेल्या महात्म्यांच्या काव्यात तर अशा तऱ्हेचे रचनासौंदर्याचे प्रकार मोठ्या प्रमाणांत उपयोजिलेले आढळतात.

लोचनम्

एवमलक्ष्यक्रमव्यङ्ग्यस्य रसादिध्वनेर्यद्यपि वर्णेभ्यः प्रभृति प्रबन्धपर्यन्ते व्यञ्जकवर्गे निरूपिते न निरूपणीयान्तरमवशिष्यते, तथापि कविसहृदयानां शिक्षां दातुं पुनरपि सूक्ष्मदृशान्वयव्यतिरेकावाश्रित्य व्यञ्जकवर्गमाह—सुप्तिङित्यादि । वयं त्वित्थमेतदनन्तरं सवृत्तिकं वाक्यं बुध्यामहे । सुबादिभिः योऽनुस्वानोपमो भासते वक्त्रभिप्रायादिरूपः अस्यापि सुबादिभिर्व्यक्तस्यानुस्वानोपमस्यालक्ष्यक्रमव्यङ्ग्यो द्योत्यः । क्वचिदिति पूर्वकारिकया सह संमील्य सङ्गतिरिति । सर्वत्र हि सुबादीनामभिप्रायविशेषाभिव्यञ्जकत्वमेव । उदाहरणे स त्वभिव्यक्तोऽभिप्रायो यथास्वं विभावादिरूपताद्वारेण रसादीन्व्यनक्ति ।

एतदुक्तं भवति—वर्णादिभिः प्रबन्धान्तैः साक्षाद्वा रसोऽभिव्यज्यते विभावादिप्रतिपादनद्वारेण, यदि वा विभादिव्यञ्जनद्वारेण परम्परयेति तत्र प्रबन्धस्यैतत्परम्परया व्यञ्जकत्वं प्रसङ्गादादावुक्तम् । अधुना तु वर्णपदादीनामुच्यत इति । तेन वृत्तावपि । 'अभिव्यज्यमानो दृश्यते' इति, 'व्यञ्जकत्वं दृश्यते' इत्यादौ च वाक्यशेषोऽध्याहार्यः विभावादिव्यञ्जनद्वारतया पारम्पर्येणेत्येवंरूपः । मे यदरयः इति । मम शत्रुसद्भावो नोचित इति सम्बन्धानौचित्यं क्रोधविभावं व्यनक्ति अरय इति बहुवचनम् । तपो विद्यते यस्येति पौरुषकथाहीनत्वं तद्धितेन मत्वर्थीयेनाभिव्यक्तम् । तत्रापिशब्देन निपातसमुदायेनात्यन्तासम्भावनीयत्वम् । मत्कर्तृका यदि जीवनक्रिया तदा हननक्रिया तावदनुचिता । तस्यां च स कर्ता, अपिशब्देन मनुष्यमात्रक्रम् । अत्रैवेति-मदधिष्ठितो देशोऽधिकरणं निःशेषेण हन्यमानतया राक्षसबलं च कर्मेति तदिदमसंभाव्यमानमुपनतमिति पुरुषकारासम्पत्तिर्ध्वन्यते तिङ्कारकशक्तिप्रतिपादकैश्च शब्दैः । रावण इति त्वर्थान्तरसङ्क्रमितवाच्यत्वं पूर्वमेव व्याख्यातम् । धिग्धिगिति निपातस्य शक्रं जितवानित्याख्यायिकेयमिति उपपदसमासेन सहकृतः । स्वर्गेत्यादिसमासस्य स्वपौरुषानुस्मरणं प्रति व्यञ्जकत्वम् । ग्रामटिकेति स्वार्थिकद्धितप्रयोगस्य स्त्रीप्रत्ययसहितस्याबहुमानास्पदत्वं प्रति, विलुण्ठनशब्दे विशब्दस्य निर्दयावस्कन्दनं प्रति व्यञ्जकत्वम्, वृथाशब्दस्य निपातस्य स्वात्मपौरुषनिन्दां प्रति व्यञ्जकता । भुजैरिति बहुवचनेन प्रत्युत भारमात्रमेतदिति व्यज्यते । तेन तिलशस्तिलशोऽपि विभज्यमानेऽत्र [क. ल. वि., पृ. १७५ वर **निर्भज्यमाने** असा पाठ आहे.] **श्लोके सर्व एवांशो व्यञ्जकत्वेन भातीति किमन्यत् । एतदर्थप्रदर्शनस्य फलं दर्शयतिएवमिति एकस्य पदस्येति यदुक्तं तदुदाहरति—यथात्रेति ।**

लोचन

याप्रमाणे अलक्ष्यक्रमव्यंग्य रसादिध्वनीची अभिव्यक्ति करणारी वर्णांपासून प्रबन्धांपर्यंत सर्व व्यंजक कारणे सांगून झाली असल्याने आता जरी दुसरे काही व्यंजक कारण सांगावयाचे शिल्लक राहिले नसले, तरी कवि आणि सहृदय यांना मार्गदर्शन करण्याकरिता पुन्हा तपशीलवारपणे अन्वय व व्यतिरेक[६] यांचा अवलंब करून आणखी व्यंजक कारणांची माहिती कारिकाकार 'विभक्तिप्रत्ययांमुळे, क्रियापदांच्या प्रत्ययांमुळे' इ. शब्दांनी देत आहेत. पण आम्ही मात्र १५ व्या कारिकेनंतरची १६ वी कारिका व तीवरील वृत्ति या दोहोंचा अर्थ पुढीलप्रमाणे समजतो. विभक्तिप्रत्यय वगैरे व्यंजक कारणांमुळे बोलणाऱ्याचा अभिप्राय वगैरे स्वरूपाचा अनुरणनासारखा जो व्यंग्यार्थ प्रकाशित होतो, त्या अनुरणनरूप व्यंग्यार्थामुळे अलक्ष्यक्रमध्वनि प्रकाशित होतो. 'काही ठिकाणी' याचा, आधीच्या म्हणजे १५ व्या कारिकेत समावेश करून त्याचा अन्वय करावा व त्याबरोबरच त्याचा प्रस्तुत कारिकेशीही संबंध लावावा.[७] कारण सगळीकडे विभक्तिप्रत्यय इ. बोलणाऱ्याच्या विशिष्ट प्रकारच्या अभिप्रायाचेच सूचन करितात. पुढील उदाहरणांमध्ये

त्या त्या उदाहरणातील परिस्थितीमुळे अभिव्यक्त झालेला तो वक्त्याचा अभिप्राय विभाव वगैरेंचे रूप घेऊन त्याद्वारे रसादींची अभिव्यक्ति करितो.[८]

या सर्व विवेचनाचे तात्पर्य असे :— वर्णांपासून प्रबंधापर्यंतच्या व्यंजकांतून एकतर विभावादिकांच्या वर्णनाच्या द्वारे लगेच रसादींची अभिव्यक्ति होते, नाहीतर त्या वर्ण, पद इत्यादींमधून विभावादिकांचे सूचन होऊन रसादि हे परंपरेने म्हणजे मागाहून सूचित होतात. या दोन पर्यायांपैकी प्रबंध हा परंपरेने रसाभिव्यंजक होतो, हे प्रसंगोपात्त[९] असल्यामुळे प्रथम म्हणजे १५ व्या कारिकेत सांगितले. आता म्हणजे १६ व्या कारिकेत वर्ण, पद वगैरे परंपरेने रस वगैरेंचे व्यंजक होतात हे सांगितले जात आहे. त्यामुळे वृत्तीतही 'अभिव्यक्त होताना आढळतो[१०]' या आणि 'व्यंजक असलेले दिसतात.[११]' या दोन वाक्यांमध्ये परंपरेने म्हणजे 'आधी विभावादिकांचे सूचन करून त्याद्वारे' अशा स्वरूपाचे शब्द अध्याहृत घेऊन ती दोन्ही वाक्ये पूर्ण करावीत.

'माझ्या संबंधात (अनेक) शत्रू[१२]' — **मम** यातील षष्ठीने वाच्य असलेला 'संबंध' आणि **अरयः** यातील बहुवचन हे 'मला शत्रु असणे उचित नाही' असा अर्थ म्हणजे संबंधाचे अनौचित्य हा क्रोधाचा उद्दीपनविभाव असलेला अर्थ सूचित करितात.[१३] (केवळ) 'तप आहे ज्याच्या जवळ' अशा रीतीने 'तापस' या शब्दातील (**अण्**[१४] या मत्वर्थी तद्धित प्रत्ययाने) (त्याच्या बाबतीत) पराक्रमाची गोष्ट काढण्याची शक्यता नसणे हे सुचविले जात आहे. **तत्रापि** (त्यातसुद्धा) हा 'निपातांचा' समूह ही गोष्ट[१५] पूर्णपणे असंभवनीय असल्याचे सूचित करितो. जगण्याच्या क्रियेचा कर्ता जर मी असेन, तर[१६] राक्षसांना ठार मारण्याची क्रिया घडावी हेच आधी अनुचित होय. आणि त्यात त्या क्रियेचा कर्ता 'तो' असावा (हे तर अगदीच अनुचित आहे) **अपि** शब्दाने येथे 'एक क्षुद्र मनुष्य असलेला (तो)' असे सुचविले जात आहे. येथेच म्हणजे माझ्या अमलाखाली असलेला प्रदेश हे राक्षसांचा संहार होण्याच्या क्रियेचे ठिकाण असणे आणि राक्षसांचे सैन्य हे पूर्णपणे संहार करणे या क्रियेचे कर्म असणे ही अशक्य कोटीतली गोष्ट शक्य कोटीत आली. त्यामुळे रावणाची स्वतःची पौरुषहीनता क्रियापदाच्या प्रत्ययांनी व कारकशक्तिवाचक शब्दांनी[१७] सुचविली जात आहे. 'रावण' या शब्दात अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनि आहे, हे तर पूर्वीच[१८] दाखविले आहे. धिक् धिक् हा (दोनदा वापरलेला) निपात, शक्रजित् यातील **क्विप्** हा कृत् प्रत्यय आणि **शक्रजित्** हा उपपदसमास या तिहींमुळे (मेघनादाने) इंद्राला जिंकले ही आता केवळ दंतकथा झाली, हा अर्थ सुचविला जातो. स्वर्गग्रामटिकाविलुण्ठन हा समास रावणाला होत असलेली आपल्या पूर्वपराक्रमांची स्मृति या अर्थाचा सूचक आहे. **ग्रामटिका** (क्षुद्र खेडे) यातील **टिकच्** हा स्वार्थी असलेला[१९] तद्धित प्रत्यय 'आ' या स्त्रीलिंगी प्रत्ययासह योजिल्यामुळे रावणाची स्वर्गाविषयीची तुच्छताबुद्धि हा अर्थ व विलुण्ठन या शब्दामधील वि या उपसर्गामुळे निर्दयपणे हल्ला करणे हा अर्थ सुचविला जात आहे. वृथा (उगाचच) हे अव्यय (रावणाचा) स्वतःच्या पराक्रमाची निन्दा करण्याचा उद्देश सुचविते. 'बाहूंचा' यातील बहुवचनाने उलट हे (बाहू) केवळ भारभूत आहेत[२०] हे सुचविले जात आहे. असे असल्यामुळे अधिक काय सांगावे? या श्लोकाचे तिळातिळायेवढे तुकडे केले तरी प्रत्येक तुकडा व्यञ्जकत्वामुळे खुलून दिसतो. हे सर्व व्यंग्यार्थ उकलून दाखविण्याचा फायदा वृत्तिकार 'अशा प्रकारच्या' इ. वाक्याने सांगतात. 'व्यंग्यार्थप्रकाशक असे एक जरी पद' इ. जे म्हटले, त्याचे उदाहरण वृत्तिकार 'उदा. आताच उद्धृत केलेला' इ. वाक्याने देतात.

टीपा

१) 'संबंध' म्हणजे कर्ता, कर्म, करण इ. खास संबंधांहून वेगळा असा, षष्ठीने दाखविला जाणारा, अवयवावयवी संबंधासारखा 'सामान्य' संबंध होय.

२) नामांचे क्रियेशी असणारे कर्ता, कर्म, करण इ. स्वरूपाचे खास संबंध म्हणजे 'कारके' होत.

३) धातूला जे प्रत्यय लावून नामे धातुसाधिते इ. बनवण्यात येतात, त्या प्रत्ययांना **कृत्** प्रत्यय म्हणतात.

४) भाषेमध्ये आधीच सिद्ध असलेल्या शब्दांपासून नवीन शब्द बनवण्यासाठी जे प्रत्यय लावण्यात येतात, त्यांना **तद्धित** प्रत्यय म्हणतात.

५) 'निपात' म्हणजे 'च' (आणि) 'वा' (अथवा) अशा प्रकारची अव्यये.

६) 'व्यंजक विभक्तिप्रत्यय क्रियापदांचे प्रत्यय इ. असले की तेथे रसादिध्वनि असतो' हा अन्वय व 'ते नसले की तो ध्वनि नसतो' हा व्यतिरेक होय. पण १६ व्या कारिकेमध्ये किंवा त्यानंतरच्या वृत्तीमध्ये सर्वत्र अन्वयमुखानेच विवरण केले आहे, व्यतिरेकमुखाने केले नाही.

७) अभिनवगुप्तांचे म्हणणे असे की, १६ व्या कारिकेमध्ये असलेला **क्वचित** (काही ठिकाणी) हा शब्द तेथून उचलून १५ व्या कारिकेमध्ये घालावा व अशा रीतीने दोन्ही कारिकांमिळून एक वाक्य करावे. असे केल्यास होणाऱ्या एकूण अर्थाचा सारांश असा होईल— जो अनुरणनरूप ध्वनि काही प्रबंधांमध्ये काही वेळा विभक्ति प्रत्यय, क्रियापदांचे प्रत्यय, इ. व्यंजक कारणांमुळे प्रकाशित होतो, त्या अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीच्या द्वारा अलक्ष्यक्रमध्वनि प्रकाशित होतो.

८) म्हणजे व्यंजक विभक्तिप्रत्यय इ. मुळे प्रथम वक्त्याचा आशय विभावादि 'वस्तू'च्या स्वरूपात अभिव्यक्त होतो, म्हणून तो अनुरणनरूप असतो. मग त्या वस्तुरूप व्यंग्यार्थातून सरते शेवटी रसादिरूप ध्वनीची अभिव्यक्ति होते.

९) प्रसंगोपात असण्याचे कारण १० ते १४ या कारिकांमध्ये प्रबंधाचे रसाभिव्यंजकत्व हाच वर्णनाचा विषय होता. म्हणून १५ व्या कारिकेत प्रथम तोच हाती घेतला.

१०) पाहा, हाच खंड, "उद्द्योत – ३ 'अलक्ष्यक्रम' ध्वनि हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादी अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे न्यक्कारो ह्यमेव इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण".

११) पाहा, हाच खंड, "उद्द्योत – ३ 'अलक्ष्यक्रम' ध्वनि हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादी अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे न्यक्कारो ह्यमेव इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण".

१२) लोचनाच्या प्रतींमध्ये **ममारयः** असे प्रतीक आहे, पण वृत्तीत उद्धृत केलेल्या श्लोकात मे **यदरयः** असे शब्द असल्यामुळे आम्ही ते प्रतीक घेतले आहे.

१३) मूळ लोचनातील **सम्बधानौचित्यम्** व **बहुवचनम्** हे **व्यनक्ति** या क्रियापदाचे कर्ते मानून व **बहुवचनम्** यानंतरच **च** हे अव्यय अध्याहृत घेऊन आम्ही वरील अर्थ केला आहे, कारण तसे केल्याशिवाय आहे त्या वाक्यातून सुसंगत अर्थ निष्पन्न होणे कठीण आहे.

१४) **अण् च** (५—२—१०३) या सूत्राने **तपस्** या शब्दाला मत्वर्थी ('त्याने युक्त असलेला' या अर्थी) **अण्** हा प्रत्यय लागतो.

१५) ही गोष्ट म्हणजे एक क्षुद्र तपस्वी माझा शत्रु असावा, ही.

१६) म्हणजे मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत.

१७) **निहन्ति** व **जीवति** यांमधील **ति** या क्रियापदाच्या प्रत्ययाला आणि **सः** व **रावणः** या कर्त्यांना अनुलक्षून मत्कर्तृका **जीवनक्रिया** व (**तत्कर्तृका**) **हननक्रिया** हे शब्द वापरले आहेत.

१८) पूर्वीच म्हणजे प्रथमखंड, "उद्द्योत — २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार" व द्वितीय खंड उद्द्योत — ३ 'अविवक्षितवाच्य ध्वनीच्या अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य प्रकारांच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांच उदाहरणे' यात केलेल्या 'राम' शब्दातील अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनीचे जे विवरण केले आहे, त्याच पद्धतीने येथील **रावणः** याही शब्दातील ध्वनीचे विवरण करावे. म्हणजे येथे **अहं जीवामि** असे न म्हणता रावणाने स्वतःच स्वतःच्या नावाचा उल्लेख करणे हे तर्कविसंगत ठरते, म्हणून 'सर्व जगाला घाबरवून सोडणारा रावण' असा व्यंग्य अर्थ (प्रयोजनवती) उपादान लक्षणेने सुचविला जातो.

१९) मुळात 'स्वार्थिक' याऐवजी 'स्वाल्पिक' ही सुधारणा करणे आम्हास इष्ट वाटते. कारण स्वार्थिक प्रत्ययाने 'ग्राम' याहून अधिक अर्थ सूचित होणार नाही. पण अल्पार्थी प्रत्यय मानिल्यास **ग्रामटिका** म्हणजे लहानसे खेडे असा वाच्यार्थ प्रकट होईल व त्यामुळे रावणाच्या मनातील स्वगिविषयीची तुच्छता सुचविली जाते असे म्हणणे शक्य आहे. **टिकच्** असा तद्धित प्रत्यय पणिनीने सांगितला नाही, पण पाणिनीच्या **तद्धिताः** (४—१—७६) या सूत्रातील बहुवचनाने त्याचा बोध होतो असे 'काव्यप्रदीपा' वरील नागेशभट्टांच्या 'उद्द्योत' टीकेमध्ये म्हटले आहे.

२०) कारण ते शत्रूचा पराभव करू शकले नाहीत.

ध्वन्यालोकः

यथा महर्षेर्व्यासस्य—
अतिक्रान्तसुखाः कालाः प्रत्युपस्थितदारुणाः ।
श्वः श्वः पापीयदिवसा पृथिवी गतयौवना ॥

अत्र हि कृत्तद्धितवचनैरलक्ष्यक्रमव्यङ्ग्यः, 'पृथिवी गतयौवना' इत्यनेन चात्यन्ततिरस्कृतवाच्यो ध्वनिः प्रकाशितः ।

एषां च सुबादीनामेकैकशः समुदितानां च व्यञ्जकत्वं महाकवीनां प्रबन्धेषु प्रायेण दृश्यते । सुबन्तस्य व्यञ्जकत्वं यथा—

तालैः शिञ्जद्वलयसुभगैः कान्तया नर्तितो मे
यामध्यास्ते दिवस—विगमे नीलकण्ठः सुहृद्वः ॥

तिङन्तस्य यथा—

अवसर रोतुं चिअ णिम्मिआइँ मा पुंस मे हअच्छीइं ।
दंसणमेत्तुम्मत्तेहि जेहिँ हिअअं तुह ण णाअं ॥

यथा वा—

मा पंथं रुंध महं अवेहि बालअ अहो सि अहिरीओ ।
अम्हे अणिरिक्काओ सुण्णधरं रक्खिअव्वं णो ॥

सम्बन्धस्य यथा—

अण्णत्थ वच्च बालअ ण्हाअंतिं कीस मं पुलोएसि ।
एअं भो जाआभीरुआण तूहं चिअ ण होइ ॥

कृतकप्रयोगेषु प्राकृतेषु तद्धितविषये व्यञ्जकत्वमावेद्यत एव । अवज्ञातिशये कः । समासानां च वृत्त्यौचित्येन विनियोजने । निपातानां व्यञ्जकत्वं यथा—

अयमेकपदे तया वियोगः प्रिययया चोपनतः सुदुःसहो मे ।
नववारिधरोदयादहोभिर्भवितव्यं च निरातपत्वरम्यैः ॥

इत्यत्र चशब्दः । यथा वा—
मुहुरङ्गुलिसंवृताधरोष्ठं प्रतिषेधाक्षरविक्लवाभिरामम् ।
मुखमंसविवर्ति पक्ष्मलाक्ष्याः कथमप्युन्नमितं न चुम्बितं तु ॥

अत्र तुशब्दः । निपातानां प्रसिद्धमपीह द्योतकत्वं रसापेक्षयोक्तमिति द्रष्टव्यम् । उपसर्गाणां व्यञ्जकत्वं यथा

नीवाराः शुकगर्भकोटरमुखभ्रष्टास्तरूणामधः
प्रस्निग्धाः क्वचिदिङ्गुदीफलभिदः सूच्यन्त एवोपलाः ।
विश्वासोपगमादभिन्नगतयः शब्दं सहन्ते मृगा ।
स्तोयाधारपथाश्च वल्कलशिखानिष्यन्दलेखाङ्किताः ॥

इत्यादौ । द्वित्राणां चोपसर्गाणामेकत्र पदे यः प्रयोगः सोऽपि रसव्यक्त्यनुगुणतयैव निर्दोषः । यथा— 'प्रभ्रश्यत्युत्तरीयत्विषि तमसि समुद्वीक्ष्य वीतावृतीन्द्राग्जन्तून्' इत्यादौ । यथा वा— 'मनुष्यवृत्त्या समुपाचरन्तम्' इत्यादौ ।

निपातानामपि तथैव । यथा— 'अहो बतासि स्पृहणीयवीर्यः' इत्यादौ । यथा वा—

ये जीवन्ति न मान्ति ये स्म वपुषि प्रीत्या प्रनृत्यन्ति च
प्रस्यन्दिप्रमदाश्रवः पुलकिता दृष्टे गुणिन्यूर्जिते ।
हा धिक्कष्टमहो क्व यामि शरणं तेषां जनानां कृते ।
नीतानां प्रलयं शठेन विधिना साधुद्विषः पुष्यता ॥ इत्यादौ ।

ध्वन्यालोक

उदा. महर्षि व्यासांचा पुढील श्लोक—

"सुखे निघून गेलेली आणि भीषण संकटे समोर उभी ठाकलेली अशा (सध्याच्या) वेळा आहेत. या पृथ्वीचे तारुण्य नष्ट झालेले असून तिच्यातील उद्याउद्याचा दिवस (अधिकाधिक) पापमय होत आहे.[१]"

या उदाहरणात **कृत्** प्रत्यय, तद्धित प्रत्यय व वचन यामुळे 'अलक्ष्यक्रमव्यंग्य' ध्वनि, तर 'पृथ्वीचे तारुण्य नष्ट झालेले' यामुळे 'अत्यंततिरस्कृतवाच्य' ध्वनि प्रकाशमान होत आहे[२] (व त्याद्वारे असंलक्ष्यक्रमध्वनि प्रकाशित होत आहे).

आणि या विभक्तिप्रत्यय वगैरेंपैकी एकेकाचे किंवा एकाच वेळी अनेकांच्या समुदायांचे व्यंजकत्व महाकवींच्या काव्यांतून बहुतेक ठिकाणी आढळते. विभक्तिप्रत्ययान्त पदाचे व्यंजकत्व पुढीलप्रमाणे—

"तुझा[३] मित्र जो 'मोर', त्याला माझी कान्ता कंकणांच्या किणकिणीमुळे मधुर वाटणाऱ्या तालांवर नाचवते आणि दिवस मावळल्यावर तो मोर स्फटिकाच्या फलकाने युक्त असलेल्या त्या सोन्याच्या सळईवर विसावा घेतो."

क्रियापद व्यंजक असते याचे उदा.—

"जा, हो बाजूला.[४] हे मेले डोळे (ईश्वराने) रडण्यासाठीच निर्माण केले आहेत. उगीच तू त्यांना पुसत बसू नकोस. कारण पूर्वी तुला पाहताक्षणीच ते वेडे झाल्यामुळे तुझे हृदय त्यांना कळले नाही.[४]"

किंवा जसे—

"हो बाजूला, माझा मार्ग अडवू नकोस. अडाण्या, किती निलाजरा आहेस रे तू! मी पराधीन आहे, कारण (मी विवाहित असून) आमच्या रिकाम्या घराची मला राखण करायची आहे[५]!"

'संबंधा'चे व्यञ्जकत्व पुढीलप्रमाणे–

"अरे (अपरिपक्व) पोरा, तु दुसरीकडे जा. मी स्नान करीत असताना माझ्याकडे असा काय टक लावून बघत आहेस? अरे, हा नदीचा घाट बायकोला भिणाऱ्यांच्यासाठी नाहीच मुळी[६]!"

प्राकृतात[७] 'क' सारखे प्रत्यय लावून बनवलेली तद्धित रूपे व्यंजक असलेली दिसून येतातच. 'क' हा प्रत्यय कमालीचा तिरस्कार दर्शवितो. समास हे[८] वृत्तींचे औचित्य पाळून उपयोजिले, तर तेही व्यंजक होतात. 'निपात' हे व्यंजक असल्याचे उदाहरण–

'आधीच मला त्या प्रियेचा अगदी असह्य असा विरह अचानक प्राप्त झाला आहे आणि त्यातच नवीन मेघ आकाशात जमू लागल्यामुळे उन्हाचा ताप संपून (आता), दिवसही रमणीय होणार आहेत[९]!'

या उदाहरणातला 'आणि' हा शब्द.

"सुंदर पापण्यांनी युक्त डोळे असलेली ती (शकुंतला) आपला अधरोष्ठ आपल्या बोटांनी वारंवार झाकून घेत होती. (मला) प्रतिबंध करणारे शब्द उच्चारण्याच्या धडपडीमुळे मोहक वाटणारे आणि ती पुनः पुनः खांद्याच्या बाजूला एकीकडे वळवीत असलेले तिचे मुख मी कसेबसे वर उचलले, पण त्याचे चुंबन मात्र घेतले नाही[१०]!"

यातला 'पण' हा शब्द. निपातांचे व्यंजकत्व वैयाकरणांना मान्य असले, तरी प्रस्तुत संदर्भात रसाच्या दृष्टीने ते त्यांचे व्यंजकत्व असते या अभिप्रायाने त्याचा उल्लेख केला जात आहे.

उपसर्गांच्या व्यंजकत्वाचे उदाहरण–

"आत पोपट असलेल्या ढोल्यांच्या तोंडातून नीवार धान्य वृक्षांच्या तळाशी पडले आहे. काही ठिकाणी प्रस्निग्ध म्हणजे अतिशय तेलकट असलेले दगड, त्यांचा इंगुदीची फळे फोडण्यासाठी उपयोग केला जात असला पाहिजे असेच सुचवतात. हरिणांना (तपोवनात राहणाऱ्या लोकांबद्दल) विश्वास उत्पन्न झालेला असल्याने (रथाचा) आवाज त्यांना सहन होत आहे आणि त्यामुळे त्यांच्या (मंद) चालीत काहीही फरक होत नाही. तसेच जलाशयांकडे जाणाऱ्या मार्गांवर वल्कलांच्या टोकांपासून ठिबकणाऱ्या जलधारांच्या रेघा उमटलेल्या दिसतात.[११]"

यासारख्या श्लोकामध्ये.

दोन तीन उपसर्गाचा एकाच पदामध्ये जो वापर केलेला असतो, तोही रसाभिव्यक्तीस अनुकूल असला तरच निर्दोष होय. जसे–

"उत्तरीय वस्त्रासारखा असलेला अंधार पार गळून पडत असताना अंधाराच्या त्या आवरणातून बाहेर पडलेल्या जीवांना पाहून[१२] लगेच" – इ. श्लोकांशामध्ये.

किंवा

“मनुष्यांप्रमाणे वागणाऱ्या...” इत्यादि उदाहरणांमध्ये.

अनेक अव्ययांचा प्रयोगदेखील तसाच (म्हणजे रसाभिव्यक्तीसाठी) केल्यास तसेच होते (म्हणजे तो प्रयोग निर्दोष ठरतो). उदा. ‘वा! वा! तुझा पराक्रम किती लोभनीय आहे[१३]!’ इ. उदाहरणांमध्ये.

किंवा जसे–

“थोर गुणवान् लोकांच्या दर्शनामुळे ज्यांचे जीवन संपन्न होत असे, ज्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागत असत, ज्यांचा आनंद आपल्या शरीरात मावत नसे, जे रोमांचित होऊन आनंदाने नाचत असत–हाय, अरेरे! किती कठीण परिस्थिति आहे! सज्जनद्वेषी लोकांचेच पोषण करण्याऱ्या कपटी दैवामुळे त्या लोकांवर नाशाचा प्रसंग ओढवला असताना, त्या लोकांसाठी मी कोठे (कोणाला) शरण जाऊ?” यासारख्या उदाहरणांमध्ये.

लोचनम्

अतिक्रान्तं न तु कदाचन वर्तमानतामवलम्बमानं सुखं येषु ते काला इति, सर्व एव न तु सुखं प्रति वर्तमानः स कोऽपि काललेश इत्यर्थः । प्रतीपान्युपस्थितानि वृत्तानि [क. ल. वि. पृ. १७५ वर **निवृत्तानि** असा पाठ आहे.] **प्रत्यावर्तमानानि तथा दूरभावीन्यपि प्रत्युपस्थितानि निकटतया वर्तमानानि भवन्ति दारुणानि दुःखानि येषु ते । दुःखं बहुप्रकारमेव प्रति वर्तमानाः सर्वे कालांशा इत्यनेन कालस्य तावन्निर्वेदमभिव्यञ्जयतः शान्तरसव्यञ्जकत्वम् । देशस्याप्याह्–पृथिवी श्वः श्वः प्रातः प्रातर्दिनाद्दिनं पापीयदिवसा पापानां सम्बन्धिनः पापिष्ठजनस्वामिका दिवसा यस्यां सा तथोक्ता । स्वभावत एव तावत्कालो दुःखमयः, तत्रापि पापिष्ठजनस्वामिकपृथिवीलक्षणदेशदौरात्म्याद्विशेषतो दृःखमय इत्यर्थः । तथा हि श्वः श्व इति दिनाद्दिनं गतयौवना वृद्धस्त्रीवदसंभाव्यमानसंभोगा, गतयौवनतया हि यो यो दिवस आगच्छति स स पूर्वपूर्वापेक्षया पापीयान् निकृष्टत्वात् । यदि वेयसुन्नन्तोऽयं शब्दो मुनिनैवं प्रयुक्तो णिजन्तो वा । अत्यन्तेति । सोऽपि प्रकारोऽस्यैवाङ्गतामेतीति भावः । सुबन्तस्येति । समुदितत्वे तूदाहरणं दत्तं, व्यस्तत्वे चोच्यत इति भावः । तालैरिति बहुवचनमनेकविधं वैदग्ध्यं ध्वनद् विप्रलम्भोद्दीपकतामेति ।**

अपसर रोदितुमेव निर्मिते मा मृड्ढि मे हताक्षिणी ।
दर्शनमात्रोन्मत्ताभ्यां याभ्यां तव हृदयं न ज्ञातम् ॥

उन्मत्तो हि न किञ्चिज्ञानाति इति न कस्याप्यत्रापराधः, दैवेनेत्थमेव निर्माणं कृतमिति । अपसर मा वृथा प्रयासं कार्षीः, दैवस्य विपरिवर्तयितुमशक्यत्वादिति तिङन्तो व्यञ्जकः तदनुगृहीतानि पदान्तराण्यपीति भावः ।

मा पन्थानं रुधः मम अपेहि बालक अहो असि अह्नीकः
वयं परतन्त्राः शून्यगृहं रक्षितव्यं नः ॥

इत्यत्रापेहीति तिङ्न्तमिदं ध्वनति—त्वं तावदप्रौढो लोकमध्ये यदेवं प्रकाशयसि । अस्ति तु सङ्केतस्थानं शून्यगृहं तत्रैवागन्तव्यमिति ।

अन्यत्र व्रज बालक अप्रौढबुद्धे स्नान्तीं मां किं प्रकर्षेणालोकयसि ।

एतद्, भो इति सोल्लुण्ठमाह् वानम्, जायाभीरुकाणां सम्बन्धि तटमेव न भवति । अत्र जायातो ये भीरवस्तेषामेतत् स्थानमिति दूरापेतः सम्बधः इत्यनेन सम्बन्धेनेर्ष्यातिशयः प्रच्छन्नकामिन्याभिव्यक्तः । कृतकेति कग्रहणं तद्धितोपलक्षणार्थम् । कृतः कप्रत्ययप्रयोगो येषु काव्यवाक्येषु यथा जायाभीरुकाणामिति । ये ह्यरसज्ञा धर्मपत्नीषु प्रेमपरतन्त्रास्तेभ्यः कोऽन्यो जगति कुत्सितः स्यादिति कप्रत्ययोऽवज्ञातिशयद्योतकः । समासानां चेति । केवलानामेव व्यञ्जकत्वमावेद्यत इति सम्बधः ।

चशब्द इति जातावेकवचनम् । द्वौ चशब्दावेवमाहतुः,काकतालीयन्यायेन गण्डस्योपरि स्फोट इतिवत्तद्वियोगश्च वर्षासमयश्च समुपनतौ, एतदलं प्राणहरणाय । अत एव रम्यपदेन सुतरामुद्दीपनविभावत्वमुक्तम् । तुशब्द इति । पश्चात्तापसूचकस्सन् तावन्मात्रपरिचुम्बनलाभेनापि कृतकृत्यता स्यादिति ध्वनतीति भावः । प्रसिद्धमपीति । वैयाकरणादिगृहेषु हि प्राक्प्रयोगस्वातन्त्र्यप्रयोगाभावात्, षष्ठयाद्यश्रवणाल्लिङ्गसंख्याविरहाच्च वाचकवैलक्षण्येन द्योतका निपाता इत्युद्घोष्यत एवेति भावः । प्रकर्षेण स्निग्धा इति प्रशब्दः प्रकर्षं द्योतयन्निङ्गुदीफलानां सरसत्वमाचक्षाण आश्रमस्य सौन्दर्यातिशयं ध्वनति । 'तापसस्य फलविशेषविषयोऽभिलाषातिरेको ध्वन्यते' इति त्वसत्, अभिज्ञानशाकुन्तले हि राज्ञ इयमुक्तिर्न तापसस्येत्यलम् । द्वित्राणामित्यनेनाधिक्यं निरस्यति । सम्यगुद्यैविशेषेणेक्षितृत्वे भगवतः कृपातिशयोऽभिव्यक्तः ।

मनुष्यवृत्त्या समुपाचरन्तं स्वबुद्धिसामान्यकृतानुमानाः ।
योगीश्वरैरप्यसुबोधमीश त्वां बोद्धुमिच्छन्त्यबुधाः स्वतर्कैः ॥

सम्यग्भूतमुपांशु कृत्वा आसमन्ताद्यरन्तमित्यनेन लोकानुजिघृक्षातिशयस्तत्तदाचरतः परमेश्वरस्य ध्वनितः ।

तथैवेति । रसव्यञ्जकत्वेन द्वित्राणामपि प्रयोगो निर्दोष इत्यर्थः ॥ श्लाघातिशयो निर्वेदातिशायश्च अहो बतेति हा धिगिति च ध्वन्यते ।

लोचन

'निघून गेलेली' म्हणजे वर्तमानकाळात येऊ शकणारी सुखे ज्यात केव्हाही नाहीत असे कालखंड. म्हणजे सगळेच कालखंड सुखविरहित आहेत, काळाचा कुठलाही बारीकसा अंश सुख देणारा नाही, असा अर्थ. सुखांना विरोध करणारी भयंकर संकटे ज्यांमध्ये उभी राहिली आहेत म्हणजे पूर्वी येऊन गेलेली (भयंकर संकटे) पुन्हा ज्यांमध्ये परत आलेली आहेत, तसेच आतापर्यंत खूप लांब असलेली भयंकर संकटे ज्यांमध्ये जवळ येऊन ठेपलेली आहेत असे कालखंड.[१४] अशा प्रकारे कालाचा प्रत्येक अंश निरनिराळ्या प्रकारच्या दुःखांनाच घेऊन येणारा आहे, असे व्यंजनेने सुचविलेले काळाचे स्वरूप 'निर्वेद' हा स्थायिभाव सुचवून त्या द्वारे शांत रसाची अभिव्यक्ति करीत आहे.[१५] आता स्थळ हेही रसाभिव्यंजक होते हे

उत्तरार्धामध्ये सांगितले आहे. पृथ्वी उद्या उद्या म्हणजे प्रत्येक सकाळी, प्रत्येक दिवशी. **पापीयदिवसा** म्हणजे जिच्यातील दिवस पापमय आहे अशी किंवा अतिशय पापी लोकांचेच प्राबल्य आहे जिच्यातील दिवसांमध्ये[१६] अशी (होत आहे). (सध्याचा) काळ हा आधीच स्वाभाविकपणे दुःखमय आहे. त्यातही अत्यंत पापी लोकांच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या पृथ्वीरूपी स्थलाच्या दुष्टपणामुळे तो काळ विशेषेकरून दुःखमय झाला आहे, असा अर्थ. कारण उद्या उद्या म्हणजे दिवसेदिवस पृथ्वीचे तारुण्य नष्ट होत आहे म्हणजे म्हाताऱ्या स्त्रीप्रमाणे ती सुखोपभोग देण्याला अपात्र होत चालली आहे. कारण तिच्यातील तारुण्य नष्ट झाल्यामुळे जो जो दिवस येतो तो तो पूर्वीपूर्वीच्या दिवसापेक्षा निकृष्ट आहे व म्हणून अधिकाधिक पापमय आहे.किंवा **ईयसुन् हा** (तद्धित) प्रत्यय लावून झालेला **पापीयस्** हा शब्द व्यासमुनींनी असा (म्हणजे त्यातील **स्** गाळून) वापरला आहे,[१७] (म्हणजे आर्ष आहे), किंवा ('पापीय' हा शब्द) **णिच्** प्रत्ययान्त म्हणजे प्रयोजक आहे. असे समजावे.[१८] 'अत्यन्ततिरस्कृत'– तो (म्हणजे अत्यन्ततिरस्कृतवाच्य हा) प्रकारही यालाच (म्हणजे असंलक्ष्यक्रमध्वनीलाच, म्हणजे शांतरसाच्या अभिव्यक्तीलाच) उपकारक होतो, असा भावार्थ. 'विभक्तिप्रत्ययान्त पदाचे (व्यंजकत्व)'– (एकाच श्लोकात) अनेक व्यंजक कारणे असलेले उदाहरण (म्हणजे 'सुखे निघून गेलेली' इ.) दिले, आता एकेक व्यंजक कारण असलेली उदाहरणे देण्यात येतील, हा अभिप्राय.

'तालांवर' हे बहुवचन (यक्षपत्नीची) अनेक प्रकारच्या तालांमधील निपुणता सुचविते आणि त्याद्वारे विप्रलंभरतीचे उद्दीपन करिते.

'जा, हो बाजूला'– कारण प्रेमवेड्या माणसाला कोणत्याही बऱ्यावाईटाची जाणीव नसते, म्हणून यात कोणाचाच दोष नाही. [१९] कारण, दैवाने (माझ्या नेत्रांची) अशीच[२०] निर्मिति केली आहे (त्याला कोण काय करणार?) 'हो बाजूला'– (माझे डोळे पुसण्याचा उगाच निष्फळ प्रयत्न करू नकोस, कारण दैव उलट फिरवणे अशक्य आहे. अशा रीतीने **अपसर** हे क्रियापद तर व्यंजक आहेच[२१] व त्यामुळे इतर पदेही[२२] व्यंजक झाली आहेत.

'हो बाजूला, माझा मार्ग'– या गाथेतील **अपेहि** (हो बाजूला) हे क्रियापद पुढील अर्थ सूचित करिते. 'ज्याअर्थी लोकांच्या समोर तू हे[२३] प्रकट करीत आहेस त्या अर्थी तुला अजून समज आलेली नाही. तथापि माझे रिकामे घर आपले संकेतस्थान होण्यास योग्य आहे, तेथे तू ये.'

अन्यत्र व्रज बालक स्नान्तीं कस्मान्मां प्रलोकयसि ।
एतद् भो जायाभीरुकाणां तटमेव न भवति ॥ (अशी छाया)

अरे पोरा म्हणजे बुद्धि अपरिपक्व असलेल्या, तू दुसरीकडे जा कसा! मी स्नान करीत असताना माझ्याकडे असा निरखून काय पाहतो आहेस? 'अरे' हा शब्द उपरोधाने संबोधणे या अर्थी वापरला आहे. हे तीर[२४] बायकोला भिणाऱ्यांसाठी (स्नानाचे स्थान) नाहीच. या गाथेत बायकोला जे भितात त्यांच्या बाबतीत हे स्नानस्थान असणे अशा तऱ्हेचा (स्नानक्रिया व ती करण्याचे ठिकाण, असा) संबंध दूरच आहे. अशा रीतीने या 'संबंधा'च्या द्वारे त्या चोरून प्रेम करणाऱ्या स्त्रीने त्या गृहस्थाच्या बायकोबद्दलची आपली कमालीची जळफळ सूचित केली आहे.[२५]

'**क**' सारखे प्रत्यय लावून—**क** हा प्रत्यय येथे इतर तद्धित प्रत्ययांचे उपलक्षण म्हणून योजिला आहे. '**क** या प्रत्ययाचा उपयोग ज्या काव्यांतील वाक्यांमध्ये केला आहे' अशा म्हणजे **जायाभीरुकाणाम्** यातल्या प्रमाणे जे अरसिक लोक प्रेमामुळे आपल्या धर्मपत्न्यांच्या अधीन झालेले असतात, त्यांहून दुसरा कोण या जगात निंद्य असेल, अशा रीतीने **क** हा प्रत्यय पराकाष्ठेचा तिरस्कार सुचविणारा आहे. 'समास हे'— केवळ समासांच्या[२६] ठिकाणीही व्यंजकत्व असल्याचे आढळून येते असा मागील वाक्यातील शब्द घेऊन अन्वय करावा.

'आणि हा शब्द' हे येथे वापरलेले एकवचन जातिवाचक[२७] आहे. श्लोकात दोनदा च (म्हणजे 'आणि') शब्द वापरून असे सुचविले आहे की, काकतालीयन्यायाने (म्हणजे योगायोगाने) गळवावर फोड व्हावा, त्याप्रमाणे तिचा वियोग आणि वर्षाकाल हे एकदम आले ही गोष्ट माझे प्राणहरण करण्यास पुरेशी आहे. म्हणूनच 'रमणीय' या शब्दाने (पावसाळ्यातील प्रारंभीचे) दिवस हे विप्रलंभ रतीचे अत्यंत उद्दीपन करणारे असल्याचे सूचित केले आहे. (शाकुंतल नाटकातील) 'पण' हा शब्द (दुष्यंताला आता होणाऱ्या) पश्चात्तापाचा सूचक असून '(त्या वेळच्या) तेवढ्याच चुंबनानेही मी कृतार्थ झालो असतो' असे सुचवितो, हा आशय. 'वैयाकरणांना माहीत असले तरी'— कारण अव्ययांचा उपयोग क्रियापदाच्या आधीच[२८] (म्हणजे प्रारंभीच) करावा लागतो, त्यांचा स्वतंत्रपणे प्रयोग करण्याची शक्यता नसते[२९], त्यांना षष्ठी वगैरे कोणत्याही विभक्तींचे प्रत्यय लावले जात नाहीत व त्यांना लिंग व संख्या नसतात,[३०] यांमुळे अव्यये ही वाचकपदांहून वेगळी असल्याने वैयाकरण वगैरेंच्या वर्तुळातून अव्यये ही द्योतकच आहेत असे मत जोरजोराने मांडले जातेच, असा अभिप्राय. **प्रस्निग्धाः** म्हणजे 'प्रकर्षाने स्निग्ध' यातील **प्र** हा शब्द 'प्रकर्ष' (म्हणजे अतिशय) हा अर्थ सूचित करून इंगुदीच्या फळांचा रसरशीतपणा सुचवून त्याद्वारे (कण्वमुनींच्या) आश्रमाचे कमालीचे सौंदर्य प्रकट[३१] करीत आहे. मात्र '(**प्रस्निग्धाः**) या शब्दाने तपस्वी लोकांची विशिष्ट फलाविषयीची पराकाष्ठेची आसक्ति सूचित होते' असे कोणीतरी विवरण केले आहे, ते चुकीचे आहे, कारण हा श्लोक (अभिज्ञानशाकुंतलातील) राजाने म्हटला आहे, एखाद्या तपस्व्याने म्हटलेला नाही. इतके ते मत चुकीचे आहे हे दाखविण्यास पुरेसे आहे.[३२]

'दोन तीन (उपसर्गांचा)' असे म्हणून वृत्तिकार यांहून जास्त उपसर्ग (एकाच क्रियापदात) वापरू नये असे सुचवितात. (**समुद्वीक्ष्य** यातील **सम्** म्हणजे) चांगल्या तऱ्हेने (**उद्** म्हणजे) उंचावरून व (**वि** म्हणजे) विशेषेकरून अवलोकन करणे यामुळे (सूर्यनारायणाचा) कमालीचा कृपाळूपणा व्यक्त झाला आहे.[३३]

हे ईश्वरा! मनुष्यांचे रूप धारण करून उत्तम तऱ्हेने, गुप्तपणे सर्वत्र वावरणाऱ्या आणि योगिश्रेष्ठांनाही अगम्य असलेल्या तुझ्या खऱ्या स्वरूपाबद्दल आपल्या मर्यादित बुद्धीने अनुमान करून आपापल्या कल्पनांनुसार अज्ञानी लोक तुला जाणू इच्छितात.[३४]

(सम् म्हणजे) उत्तम तऱ्हेने, (**उप** म्हणजे) गुप्तपणे, (**आ** म्हणजे) सगळीकडे असे उपसर्ग योजून निरनिराळ्या कृती करणाऱ्या परमेश्वराची लोकांवर अनुग्रह करण्याची उत्कट इच्छा सूचित केली आहे.[३५]

'तसाच'— म्हणजे रसाची अभिव्यक्ति करण्यासाठी केलेला दोन तीन अव्ययांचा वापरसुद्धा निर्दोष होय, असा अर्थ. **अहो, बत** या दोन अव्ययांमुळे[३६] (इन्द्राने केलेली मदनाची) कमालीची प्रशंसा व **हा, धिक्, कष्टम्, अहो** या चार अव्ययांमुळे (श्लोक म्हणणाऱ्याच्या मनातील) तीव्र उद्वेग सूचित होत आहे.

टीपा

१) महाभारत आदिपर्व, १२८—६

२) पृथ्वीचे तारुण्य नष्ट झाले. यात अत्यंततिरस्कृतवाच्य ध्वनि आहे याचे कारण असे—पृथ्वी ही सचेतन नसल्यामुळे तिच्यातील तारुण्य कसे नष्ट होईल? म्हणून याचा वाच्यार्थ पूर्णपणे टाकून देऊन पृथ्वी तारुण्य नष्ट झालेल्या स्त्रीप्रमाणे सुखोपभोग देण्यास असमर्थ झाली आहे असा लक्ष्यार्थ घ्यावा लागतो. यातील सूचितार्थ, सुखोपभोग देण्यास कमालीची असमर्थ झालेली, हा आहे. हा सूचितार्थ कळल्यावर त्याद्वारे शांत रसाच्या निर्वेद या स्थायिभावाची अभिव्यक्ति होते.

३) या पद्याचा मराठी अनुवाद असा आहे (पाहा, प्रा. वीरकरकृत 'अनुवाद, मञ्जूषा पृ. ६६)—

सोन्याची ती स्फटिकफलके साजते यष्टि, तेथ
सायंकाळी प्रिय तव सखा मोर विश्राम घेत ।
ताला देई मम सहचरी नर्तवाया तयाला
नाचे तोही, अनुदिन भुले कंकणांच्या स्वराला ॥

४) 'बेबर' ने संपादित केलेली 'गाथासप्तशती' गाथा ७०६ वी.

५) 'बेबर' याने संपादिलेली गाथासप्तशती, गाथा ९६१ वी.

६) तळ्यात स्नान करणारी एक स्त्री आपल्याकडे साभिलाषपणे बघणाऱ्या गृहस्थाबद्दल आकर्षण उत्पन्न होऊन त्याला वरीलप्रमाणे म्हणते.

७) 'प्राकृतात' याऐवजी अभिनवांनी लोचनात 'काव्यवाक्यात' असा पाठ घेतला आहे. यांचे कारण असे असावे की, 'क' सारख्या तद्धित प्रत्ययांचा वापर केवळ प्राकृतातच असतो असे नसून संस्कृतातही होतो.

८) समास हे व्यंजक असू शकतात ह्याचे उदाहरण आनंदवर्धनांनी किंवा अभिनवगुप्तांनीही दिलेले नाही. 'वृत्तींचे औचित्य पाळून' याचा अर्थ त्या त्या चित्तवृत्तीला योग्य अशा वर्णांचा वापर करून योजलेले समास. उदा. रौद्रादिरसांच्या अभिव्यक्तीला परुषवर्ण पोषक होतात. ते वापरून त्यांच्या जोडीला समासही वापरले, तर ते त्या रसांच्या अभिव्यक्तीस अधिकच मदत करितात.

९) कालिदासाच्या विक्रमोर्वशीयातील ४—३ हा पुरूरव्याने म्हटलेला श्लोक.

१०) शाकुन्तल नाटकातला हा श्लोक (३·२५) दुष्यन्ताने म्हटलेला आहे

११) अभिज्ञानशाकुन्तल, १—१४.

१२) मयूरकृत सूर्यशतक, श्लोक ४.

१३) इन्द्राने मदनाला म्हटलेले वाक्य. (कुमारसंभव, ३—२०)

१४) म्हणजे प्रत्युपरिथत याचा अर्थ अभिनवगुप्तांनी तीन प्रकारे केला आहे— (१) सुखाला विरोध करण्यासाठी आलेली (नवीन संकटे) (२) पुन्हा एकदा परत आलेली जुनी संकटे आणि (३) आतापर्यंत दूर असलेली, पण आता जवळ येऊन ठेपलेली संकटे.

१५) येथे प्रथम 'काळाचे स्वरूप' या विभावाचे सूचन करून त्याद्वारे निर्वेद हा स्थयिभाव सुचवून शांत रसाची अभिव्यक्ति केली असल्यामुळे हे परंपरेने रसाभिव्यक्ति होण्याचे उदाहरण आहे.

१६) 'पाप हा शब्द १) पाप म्हणजे दुष्कृत्य व २) अत्यंत पापी लोक अशा दोन अर्थांनी घेऊन, तसेच **ईय** हा तद्धित प्रत्यय एकदा मत्वर्थी व एकदा स्वामित्ववाचक मानून अभिननगुप्तांनी दोन प्रकारे विवरण केले आहे.

१७) पाप याला **ईयसुन्** हा तद्धित प्रत्यय लागल्यास पापीयस् असा शब्द तयार होईल. त्याचा 'दिवस' याच्याशी बहुव्रीही समास केल्यास तो पापीयोदिवसा असा व्हावयास पाहिजे. त्याऐवजी (स् गाळून) पापीयदिवसाअसे आर्ष रूप वापरले आहे.

१८) **पापीयस्** या शब्दाला पापीयांसं करोति या अर्थी **णिच्** हा प्रत्यय लावून व त्यानंतर अच् हा कृत् प्रत्यय लाधून पापीय हे अकारान्त विशेषण पापाचरणास प्रवृत्त करणारा या अर्थी बनविले आहे.

१९) म्हणजे माझे डोळे प्रेमवेडे झाले असल्याने त्यांना तुझे हदय कळले नाही, यात त्या डोळ्यांचा काहीही अपराध नाही.

२०) अशीच, म्हणजे (१) रडण्यासाठीच किंवा (२) तुला पाहून वेडे होण्यासाठीच, असा दोन प्रकारे अर्थ करिता येईल.

२१) म्हणजे **अपसर** हे प्रथम 'मला तुझा राग आला आहे' ही 'वस्तु' सुचवून तिच्या द्वारे ईर्ष्याविप्रलंभरति अभिव्यक्त करिते.

२२) इतर पदे म्हणजे **एव** (च) हे अव्यय, रडणे हेच मला फळ मिळाले, **हते** (मेले) हे पद, डोळ्यांचा दुर्दैवीपणा किंवा तुला पाहिल्याबरोबर उन्मत्त होण्याचा वेडेपणा व **तव** (तुझे) हा शब्द, नायकाच्या हृदयाचा दुष्टपणा हे अर्थ सुचवीत आहे. (डोळ्यांचा दुर्दैवीपणा असे म्हणण्याचे कारण तुझ्या प्रेयसीने तुझ्या शरीरावर उमटविलेली प्रणयचिन्हे पाहणे त्यांच्या नशिबी आले आहे.) या इतर पदांना हे व्यंजकत्व **अपसर** या क्रियापदामुळेच प्राप्त झाले आहे.

२३) हे म्हणजे तुझी माझ्याबद्दलची वासना.

२४) तूह हा प्राकृत शब्द 'तीर्थ' या अर्थाने वापरला जातो. 'तीर्थ' याचा अर्थ 'स्नानाचे स्थान' असा आहे. अभिनवगुप्तांनी **तूह** याला तट हा प्रतिशब्द वापरला आहे.

२५) येथेही प्रथम त्या स्त्रीला त्या गृहस्थाच्या बायकोबद्दल असलेली चीड ही 'वस्तु' सूचित केली जाऊन तीद्वारे ईर्ष्याविप्रलंभरति या स्थायिभावाची अभिव्यक्ति होत आहे.

२६) 'केवळ' समास म्हणजे समासांखेरीज इतर कोणतेही व्यंजक कारण नसताना वापरलेले (समास).
२७) मूळ श्लोकात **च** हे अव्यय दोनदा वापरले असले, तरी वृत्तीमध्ये चशब्दः असे एकवचन वापरले आहे. त्याचा अर्थ चशब्दौ असा समजावयाचा.

२८) अव्यये ही जेव्हा उपसर्गासारखी वापरली जातात, तेव्हा त्यांचा प्रयोग क्रियापदाच्या पूर्वीच करावा लागतो. इतर (म्हणजे च, तु वगैरेसारख्या) अव्ययांच्या बाबतीतसुद्धा वाक्यात त्यांचा वापर ठराविक ठिकाणीच करावा लागतो. पण अव्ययांहून इतर शब्दांची जागा (संस्कृतभाषेत) ठरलेली नसते.

२९) म्हणजे अव्यये ही इतर शब्दांच्या सांनिध्यातच वापरावी लागतात. नुसतीच अव्यये वापरून काहीही बोध होत नाही. इतर शब्द मात्र अव्ययांशिवाय वापरले, तरी त्यांपासून अर्थ बोध होऊ शकतो.

३०) पाहा– **सदृशं त्रिषु लिङ्गेषु सर्वासु च विभक्तिषु ।**
वचनेषु च सर्वेषु यन्न व्येति तदव्ययम् ॥

३१) आश्रमाच्या सौन्दर्यामुळे दुष्यंताच्या मनातील रतिभावाचे उद्दीपन झाल्याचे सूचित केले जात आहे असा अभिनवगुप्तांचा अभिप्राय.

३२) दुसऱ्या टीकाकाराच्या मते या श्लोकातून शांत रसाची अभिव्यक्ति होत आहे, कारण विशिष्टफलाविषयी म्हणजे इंगुदीफलाविषयी किंवा मोक्ष या फलाविषयी तापसांना आसक्ति वाटणे हे त्यांच्या मनातील संसाराविषयीच्या निर्वेदाचे द्योतक आहे. पण आश्रमाचे हे स्वरूप दुष्यंताच्या मनातील रतीचे उद्दीपन करिते ह निष्कर्ष अभिनवगुप्तांनी ओढून ताणून काढल्यासारखा वाटतो. कारण दुष्यंताला अजून शकुंतलेचे दर्शनही झालेले नाही. आश्रमाच्या आवारात प्रवेश करिताना तो **शान्तमिदमाश्रमपदम्** इ. उद्‌गार काढतो. तेव्हा या श्लोकातील वातावरण शान्तरसालाच पोषक आहे, शृंगाररसाला नाही असे आम्हाला वाटते. म्हणून त्या दुसऱ्या टीकाकाराच्या म्हणण्यामध्ये ग्राह्यांश नाही असे म्हणता येत नाही.

प्रस्निग्धाः यातील **प्र** या उपसर्गामुळे इंगुदीफलांचा सुचविला गेलेला रसरशीतपणा हा वस्तुरूप अर्थ दुष्यंताच्या मनातील रतिभावाचा उद्दीपनविभाव आहे.

३३) मयूरकविकृत सूर्यशतक, श्लोक ४. येथे सूर्यनारायण अतिशय कृपाळू आहे हा सूर्यविषयक रतीचा वस्तुरूप उद्दीपनविभाव सूचित होऊन त्याचे कवीच्या मनातील सूर्याविषयीची भक्ति ह्या भावध्वनीत पर्यवसान होत आहे.

३४) हा श्लोक कोठून घेतला, हे समजत नाही.

३५) येथे परमेश्वराला लोकांवर अनुग्रह करण्याची अतिशय तळमळ आहे ही परमेश्वरविषयक रतीचा उद्दीपन विभाव सूचित होतो व त्याचे पर्यवसान परमेश्वराबद्दलची भक्ति या भावध्वनीत होत आहे.

३६) निपात हे द्योतक आहेत, म्हणून येथे अहो, बत, या दोन निपातांमुळे प्रथम विस्मय ह्या वस्तुरूप उद्दीपनविभावाचे सूचन होऊन त्याद्वारे इंद्राच्या मनातील मदनविषयक मैत्रीरूपी रतिभावाची अभिव्यक्ति होते. तसेच हा, धिक् या निपातांनी दुःख हा वस्तुरूप उद्दीपनविभाव सूचित होऊन त्याद्वारे निर्वेदाची अभिव्यक्ति होत आहे.

ध्वन्यालोकः

पदपौनरुक्त्यं च व्यञ्जकत्वापेक्षयैव कदाचित्प्रयुज्यमानं शोभामावहति । यथा—

यद्वञ्चनाहितमतिर्बहुचाटुगर्भं
कार्योन्मुखः खलजनः कृतकं ब्रवीति ।
तत्साधवो । न न विदन्ति, विदन्ति, किन्तु
कर्तुं वृथा प्रणयमस्य न पारयन्ति ॥
इत्यादौ ।
कालस्य व्यञ्जकत्वं यथा—
समविसमणिव्विसेसा समंतओ मंदमंदसंचारा ।
अइरा होहिंति पहा मणोरहाणं पि दुल्लंघा ॥
(समविषमनिर्विशेषा समन्ततो मन्दमन्दसञ्चाराः ।
अचिराद्भविष्यन्ति पन्थानो मनोरथानामपि दुर्लङ्घ्याः ॥
(इति च्छाया)

अत्र ह्यचिराभ्दविष्यान्ति पन्थान इत्यत्र भविष्यन्तीत्यस्मिन् पदे प्रत्ययः कालविशेषाभिधायी रसपरिपोषहेतुः प्रकाशते । अयं हि गाथार्थः प्रवासविप्रलम्भशृङ्गारविभावतया विभाव्यमानो रसवान् । यथात्र प्रत्ययांशो व्यञ्जकस्तथा क्वचित्प्रकृत्यंशोऽपि दृश्यते । यथा—

तद्नेहं नतभित्ति मन्दिरमिदं लब्धावगाहं [काव्यप्रकाश, झळकीकर आवृत्ति, पृ. ६९५ वर **लब्धावकाशम्** व **नदन्ति** असे पाठ आढळतात.] **दिवः**

सा धेनुर्जरती चरन्ति [काव्यप्रकाश, झळकीकर आवृत्ति, पृ. ६९५ वर **लब्धावकाशम्** व **नदन्ति** असे पाठ आढळतात.] **करिणामेता घनाभा घटाः ।**
क्षुद्रो मुसलध्वनिः कलमिदं सङ्गीतकं योषिता—
माश्चर्यं दिवसैर्द्विजोऽयमियतीं भूमिं समारोपितः ।

अत्र श्लोके दिवसैरित्यस्मिन् पदे प्रकृत्यंशोऽपि द्योतकः । सर्वनाम्नां च व्यञ्जकत्वं यथानन्तरोक्ते श्लोके । अत्र च सर्वनाम्नामेव व्यञ्जकत्वं हृदि व्यवस्थाप्य कविना क्वेत्यादिशब्दप्रयोगो न कृतः । अनया दिशा सहृदयैरन्येऽपि व्यञ्जकविशेषाः स्वयमुत्प्रेक्षणीयाः । एतच्च सर्वं पदवाक्यरचनाद्योतनोक्त्यैव गतार्थमपि वैचित्र्येण व्युत्पत्तये पुनरुक्तम् ।

ध्वन्यालोक

पदांची पुनरुक्ति हीसुद्धा एखादेवेळी रसाभिव्यञ्जक होण्यासाठीच केली, तर ती शोभून दिसते. उदा :— 'फसवणूक करण्यातच आपले मन गुंतवून कार्यसाधू दुष्ट माणसे खूप खुशामतीने भरलेली असत्य भाषणे करितात, ते काही सज्ञनांना समजत नाही असे नाही; समजते. पण ते त्यांच्या विनंतीचा अव्हेर करू शकत नाहीत.'

यासारख्या उदाहरणात.
'काळ' व्यंजक होतो, याचे उदाहरण—

'(आता) लवकरच रस्त्यांवरचे सपाट भाग व उंचसखल भाग यांत फरक राहणार नाही. सगळीकडे अगदी हळूहळूच चालावे लागेल आणि कल्पनेतदेखील ते रस्ते ओलांडणे कठीण जाईल.'

या उदाहरणात 'रस्ते लवकरच ··· होतील' यामधील 'होतील' या पदातला विशिष्ट (भविष्य) काळ हा अर्थ सांगणारा प्रत्यय रसाच्या परिपोषाला कारणीभूत होत आहे[१] कारण गाथेचा (प्राकृत पद्याचा) हा अर्थ प्रवासविप्रलंभ-शृंगाराचा विभाव असल्याचे लक्षात आल्याने रसाभिव्यक्ति करीत आहे.

वरील उदाहरणात जसा 'प्रत्यय' व्यञ्जक आहे, तसाच काही ठिकाणी मूळ शब्दही व्यञ्जक असलेला दिसतो. उदा.— 'ते भिंतींना पोक आलेले घर, आणि हे गगनाला भिडलेले भवन; ती म्हातारी होत चाललेली गाय आणि ह्या मेघांसारख्या रंगाच्या इतस्ततः संचार करणाऱ्या हत्तींच्या रांगा; तो मुसळांचा भिकार आवाज आणि हे ललनांचे मधुर संगीत. आश्चर्य आहे की, हा ब्राह्मण (म्हणजे कृष्णाचा मित्र सुदाम) (काही) दिवसांमध्ये इतक्या वरच्या स्थितीला चढवला गेला!'

या श्लोकात 'दिवसांमध्ये' या पदातला मूळ शब्द ('दिवस' हा) देखील व्यञ्जक आहे. सर्वनामे ही व्यञ्जक असतात याचे उदाहरण हा आत्ताच उद्धृत केलेला श्लोक होय आणि या श्लोकातल्या सर्वनामांचेच व्यञ्जकत्व लक्षात आणून कवीने 'कोठे (हे आणि) कोठे (ते) अशासारखा शब्दप्रयोग केलेला नाही. याच पद्धतीने सहृदयांनी व्यञ्जकाच्या आणखीही प्रकारांची स्वतः कल्पना करावी. हा सर्व विषय 'पद, वाक्य संघटना या व्यञ्जक असतात' या विधानानेच पूर्वी[२] (सामान्यपणे) सांगितला असला तरी त्याचे निरनिराळे प्रकार रसिकांच्या लक्षात आणावे म्हणून येथे पुन्हा विवेचिला.

लोचनम्

प्रसङ्गात्पौनरुक्त्यान्तरमपि व्यञ्जकमित्याह— पदपौनरुक्त्यमिति । पदग्रहणं वाक्यादेरपि यथासम्भवमुपलक्षणम् । विदन्तीति । त एव हि । सर्वं विदन्ति सुतर । मिति ध्वन्यते । वाक्यपौनरुक्त्यं यथा— 'पश्य, द्वीपादन्यस्मादपि' इति वचनानन्तरं 'कः सन्देहः? द्वीपादन्यस्मादपि' इत्यनेनेप्सितप्राप्तिरविघ्नितैव ध्वन्यते । 'किम् किम्? स्वस्था भवति मयि जीवति' इत्यनेनामर्षातिशयः । 'सर्वक्षितिभृतां नाथ दृष्टा सर्वाङ्गसुन्दरी' इत्युन्मादातिशयः ।

कालस्येति । तिङन्तपदानुप्रविष्टस्याप्यर्थकलापस्य कारककालसंख्योपग्रहरूपस्य मध्येऽन्वयव्यतिरेकाभ्यां सूक्ष्मदृशा भागगतमपि व्यञ्जकत्वं विचार्यमिति भावः । रसपरिपोषेति । उत्प्रेक्ष्यमाणो वर्षासमयः कम्पकारी किमुत वर्तमान इति ध्वन्यते । अंशांशिकप्रसङ्गादेवाह—यथात्रेति ।

दिवसार्थो ह्यत्रात्यन्तासम्भाव्यमानतामस्यार्थस्य ध्वनति । सर्वनाम्नां चेति । प्रकृत्यंशस्य चेत्यर्थः । तेन प्रकृत्यंशेन सम्भूय सर्वनाम व्यञ्जकं दृश्यत इत्युक्तं भवतीति न पौनरुक्त्यम् । तथा हि तदिति पदं नतभित्तीत्येतत्प्रकृत्यंशासहायं समस्तामङ्गलनिधानभूतां मूषकाद्याकीर्णतां ध्वनति । तदिति हि केवलमुच्यमाने समुत्कर्षातिशयोऽपि संभाव्येत । न च नतभित्तिशब्देनाप्येते दौर्भाग्यायतनत्वसूचका विशेषा उक्ताः । एवं सा धेनुरित्यादावपि योज्यम् । एवंविधे च विषये स्मरणाकारद्योतकता तच्छब्दस्य । न तु यच्छब्दसंबद्धतेत्युक्तं प्राक् । अत एवात्र तदिदंशब्दादिना स्मृत्यनुभवयोरत्यन्तविरुध्दविषयतासूचनेनाश्चर्यविभावता योजिता । तदिदंशब्दाद्यभावे तु सर्वमसङ्गतं स्यादिति तदिदमंशयोरेव प्राणत्वं योज्यम् । एतच्च द्विशः सामस्त्यं त्रिशः सामस्त्यमिति व्यञ्जकमित्युपलक्षणपरम् । तेन लोष्टप्रस्तारन्यायेनानन्तवैचित्र्यमुक्तम् । यद्वक्ष्यत्यन्येऽ पीति । अतिविक्षिप्ततया शिष्यबुध्दिसमाधानं न भवेदित्यभिप्रायेण संक्षिपति—एतच्चेति । वितत्याभिधानेऽपि प्रयोजनं स्मारयति वैचित्र्येणेति ।

लोचन

(अनेक उपसर्गांचा किंवा निपातांचा प्रयोग दोषास्पद नाही हे सांगून झाल्यावर) ओघाने आलेला विषय म्हणजे एकाच पदाची पुनरुक्ति. ती देखील व्यंजक होऊ शकते, हे वृत्तिकार 'पदाची पुनरुक्ति हीसुद्धा' या शब्दांनी सांगतात. यातील 'पदाची' हा शब्द योग्य परिस्थिति असेल तेव्हा वाक्य इत्यादींचेही उपलक्षण आहे असे समजावे. 'समजते'—उलट त्यांनाच सर्व पूर्णपणे समजते,[३] असे (पुनरुक्त क्रियापदामुळे) सूचित होते. वाक्याच्या पुनरुक्तीचे उदाहरण म्हणजे 'पाहा, (जगातील) दुसऱ्या खंडातून देखील' इ. (सूत्रधाराने म्हटलेल्या) वाक्यानंतर यौगन्धरायणाने 'यात काय संशय? दुसऱ्या खंडातून देखील इ. त्याच वाक्याने इष्ट फलाची[४] प्राप्ति होण्यामध्ये काहीही विघ्न उत्पन्न होणार नाही, असे सूचित होते. 'काय? काय? मी जिवंत असताना कौरवांचे क्षेम राहील[५]]?' या वाक्याने (भीमाचा) पराकाष्ठेचा क्रोध सूचित होतो.' हे सर्व पर्वतांच्या राजा! तू ती सर्वांगसुंदरी पाहिलीस[६]?' याने पुरूरव्याची कमालीची बेभान अवस्था सुचविली जात आहे.

'काळ'— क्रियापदामध्ये कारक (म्हणजे कर्ता किंवा कर्म), काळ, वचन व पद (म्हणजे परस्मैपद किंवा आत्मनेपद) या चार प्रकारचा अर्थ अंतर्भूत झालेला असतो. या चार प्रकारांपैकी प्रत्ययरूपी अंशापासून ज्ञात होणाऱ्या 'काळ' या अंशाच्या व्यंजकत्वाचा बोध अन्वयव्यतिरेक पद्धतीने[६अ] बारकाईने निरीक्षण केल्यास होण्यासारखा आहे, हा आशय. रसाच्या परिपोषाला (कारणीभूत)— 'आगामी वर्षाकालाची नुसती कल्पनादेखील (विरही माणसाचा) थरकाप उडवते, मग तो वर्षाकाळ खरोखरच येऊन ठेपला तर काय अवस्था होईल' हा वस्तुरूप अर्थ सुचविला जातो[७] अंश आणि अंशिक[८] यांच्या व्यंजकत्वाचा विचार आता चालू असल्यामुळेच वृत्तिकार म्हणतात— 'जसा वरील उदाहरणात' इ. 'ते भिंतींना'— कारण या उदाहरणातील दिवस[९] या मूळ शब्दाचा वाच्य अर्थ या श्लोकात वर्णिलेले परिवर्तन घडून येणे मूळ शब्द आणि सर्वनामेही यातील 'ही' ने सुचविलेला 'दिवस' हा सर्वस्वी असंभवनीय आहे, हा वस्तुरूप अर्थ सुचवितो.[१०] सर्वनामेही म्हणजे सर्वनामेतर मूळ विभक्तिप्रत्ययविरहित शब्द व त्याबरोबर

वापरलेली सर्वनामे, असा अर्थ त्यांमुळे 'सर्वनामे व त्यांच्या सांनिध्यातील सर्वनामेतर विभक्तिप्रत्ययविरहित शब्द असे दोघे मिळून (एकाच वेळी) व्यंजक झालेले दिसतात' असे म्हटल्यासारखे होत आहे. म्हणून 'तद्गेहं' इत्यादि श्लोकात 'दिवस' हा मूळ शब्द व्यंजक आहे असे म्हटल्यानंतर त्याच श्लोकात तद्, **सा** व **सः** इ. सर्वनामे आणि त्यांच्या सांनिध्यात वापरलेली **नतभित्ति** (गेहम्), **जरती** (धेनुः) व **क्षुद्रः** (मुसलध्वनिः) इ. सर्वनामेतर पदे व्यंजक आहेत असे म्हणण्यात पुनरुक्ति नाही.[११] कारण 'ते' हे सर्वनाम 'नतभित्ति' (म्हणजे भिंतीना पोक आलेले) या मूळ शब्दाच्या मदतीने सर्व ओंगळपणाचे माहेरघर असलेली उंदीर वगैरे प्राण्यांचा सुळसुळाट असण्याची अवस्था सुचविते. कारण फक्त 'ते घर' येवढेच म्हटले, तर त्यामुळे घरातील कमालीची संपन्नता सुचविण्याचा कवीचा हेतु आहे असेही वाटण्याचा संभव आहे. तसेच केवळ 'भिंतींना पोक आलेले घर' इतकेच म्हणण्याने हा सर्व कंगालपणा सुचविणाऱ्या धर्मांचा बोध होणार नाही. असाच ती म्हातारी होत चाललेली (गाय) इ. सर्वनामांसह वापरलेल्या सर्वनामेतर मूळ शब्दांच्या बाबतीत अर्थ लावावा. अशा उदाहरणांमध्ये 'तद्' या सर्वनामाचे सूचकत्व (त्या त्या वैशिष्ट्यांचे) स्मरण या (म्हणजे 'स्मार्त प्रतिमेच्या' — (memory image च्या) स्वरूपाचे असते आणि तद् या सर्वनामाचा यद् या सर्वनामाशी संबंध नसतो हे पूर्वी[१२] सांगितलेच आहे, म्हणूनच येथे तद् हे सर्वनाम व इदम् इ. सर्वनामे यांमुळे अनुक्रमे (त्या त्या वस्तूच्या (पूर्वावस्थेची) स्मृति व त्या त्या वस्तूचा चालू काळी येणारा) अनुभव हे अर्थ परस्परांशी सर्वस्वी विरुद्ध असल्याचे सुचविले जात असल्याने त्या विरोधाला 'विस्मय' या स्थायिभावाच्या उद्दीपनविभावाचे रूप दिले गेले आहे. पण **तद्** व **इदम्** इ. शब्दांच्या अभावी चवथ्या ओळीतील 'आश्चर्य' या शब्दाच्या अर्थाची संगति लागणार नाही. म्हणून **तद्** व **इदम्** हे अंशच या श्लोकातील सौंदर्याचे प्राण (म्हणजे मुख्य कारण) आहेत असे समजावे. आणि हे म्हणजे दोन अंशांनी परस्परांशी सहकार्य करून सुचविणे तीन अंशानी एकमेकांशी सहकार्य करून सुचविणे याचे उपलक्षण आहे असे समजावे. त्यामुळे 'लोष्टप्रस्तार'— न्यायाने[१३] निरनिराळ्या अंशांच्या (मिश्रणांच्या) व्यंजकत्वाची विविधता अनंत प्रकारची असू शकते, असे वृत्तिकारांनी सुचविले आहे. कारण यानंतर लगेच वृत्तिकार '(याच पद्धतीने...) आणखीही' इ. वाक्याने हेच सांगणार आहेत. शिष्याला प्रत्येक गोष्ट विस्ताराने सांगत बसल्यास त्याच्या मनाला उद्वेगच उत्पन्न होईल या अभिप्रायाने वृत्तिकार या विषयाचा 'हा सर्व विषय' इ. वाक्याने थोडक्यात समारोप करितात. पण आतापर्यंत विस्ताराने सांगण्यामागील प्रयोजनाची सुद्धा आठवण वृत्तिकार 'निरनिराळे प्रकार' इ. शब्दांनी करून देतात.

टीपा

१) वर्षाकाल हा प्रेमीजनांना विरह असह्य करून सोडणारा काळ होय. वरील ('आता लवकरच...') इ. उदाहरण गाथासप्तशतीतले वे पद्य आहे.

२) पाहा, हाच उद्द्योत, कारिका दुसरी व तीवरील वृत्ति व उदाहरणे.

३) ह्या वस्तुरूप अर्थाच्या द्वारा वक्त्याच्या मनातील साधुविषयक रतिभाव व्यक्त होत आहे.

४) पाहा, रत्नावली, १—६, इष्ट फल म्हणजे उदयन या नायकाला होणार असलेली चक्रवर्तिपदाची प्राप्ति हे होय.

५) पाहा, वेणीसंहार, १–७. यात भीमाने स्वस्था भवन्ति इ. वाक्य एकदा पडद्यामागून व मग रंगभूमीवर प्रवेश करून म्हटले आहे. मात्र या वाक्याच्या आधी अभिनवगुप्त म्हणतात त्याप्रमाणे **किम्, किम्** असे शब्द नसून त्याहूनही अधिक जोरदार असे **आः दुरात्मन्, वृथामङ्गलपाठक शैलूषापसद** असे शब्द आहेत.

६) **विक्रमोर्वशीयम्**, ४–२७, वस्तुतः नाटकामध्ये या वाक्याची पुनरुक्ति राजाने केली नसून राजाच्या वाक्याचा प्रतिध्वनि पर्वताच्या गुहेतून येऊन तो राजाच्या कानी पडतो व त्याची राजाला शेवटी जाणीवही होते, असा प्रसंग आहे. शिवाय हे वाक्य पर्वताला उद्देशून (एकदाच) म्हणणे यामुळे उन्माद सूचित होत आहे असे म्हणता येईल, पण येथे पुनरुक्तिच नसल्या मुळे तीमुळे उन्मादातिशय सूचित होतो हे म्हणणे बरोबर वाटत नाही.

६ अ) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही" वरील टीप १.

७) या वस्तुरूप अर्थाच्या द्वारा विप्रलंभ शृंगाररसाची अभिव्यक्ति होते.

८) 'अंश' या शब्दाला **अत इनिठनी ।** (५–१२–११५) या पाणिनीच्या सूत्राने ठन् म्हणजे इक हा मत्वर्थी प्रत्यय लागून 'अंशिक' हे रूप झालेले आहे. क्रियापद किंवा विभक्तिप्रत्ययान्त पद हे अंशिक व त्यांच्यातील प्रकृति व प्रत्यय हे 'अंश' होत.

९) 'दिवस' या मूळ शब्दाचा अर्थ 'चोवीस तासांचा काळ' हा आहे व इतक्या अल्प काळात सुदाम्याच्या सांपतिक परिस्थितीत एवढे मोठे परिवर्तन घडून येणे असंभवतीय वाटण्यासारखे आहे. हा श्लोक 'काव्यप्रकाशा'त (झळकीवर आवृत्ति, पृ. ६९५ वर) 'पर्याय' अलंकाराचे उदाहरण म्हणून उद्धृत केला आहे.

१०) या वस्तुरूप अर्थाच्या द्वारा सरतेशेवटी अद्भुत रसाची अभिव्यक्ति होते.

११) मूळ शब्दही व्यंजक असतात याचे उदाहरण 'दिवसैः 'हे आहे. आता नुसता मूळ शब्द नव्हे, तर मूळ शब्द व सर्वनामे मिळून व्यंजक होतात याचे उदाहरण तद्गेहं नतभित्ति... इ होय. येथे तद्, सा व सः ही तीन सर्वनामे अनुक्रमे नतभित्ति, जरती, व क्षुद्र या मूळ शब्दांशी सहकार्य करून व्यंजक होतात. म्हणून हे सहकार्याच्या व्यंजकत्वाचे उदाहरण असल्यामुळे 'मूळ शब्दही' 'सर्वनामे आणि मूळ शब्दही 'या वृत्तितल्या म्हणण्यात पुनरुक्ति नाही, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार- (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार" तेथे **रामः** हा शब्द 'कठोरहृदयः' या शब्दाच्या सहकार्याने व्यंजक होतो, असे म्हटले आहे.

१२) पूर्वी म्हणजे द्वितीय खंड "उद्द्योत - ३ त्याच प्रकारच्या ध्वनीला पद व पदाचा अंशही प्रकट करू शकतात याची उदाहरणे" वर.

१३) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत -२ 'रसादिध्वनीचे प्रकार असंख्य'" वरील टीप १.

ध्वन्यालोकः

ननु चार्थसामर्थ्याक्षेप्या रसादय इत्युक्तम्, तथा च सुबादीनां व्यञ्जकत्ववैचित्र्यकथनमनन्वितमेव । उक्तमत्र पदानां व्यञ्जकत्वोक्त्यवसरे । किञ्चार्थविशेषाक्षेप्यत्वेऽपि रसादीनां तेषामर्थ विशेषाणां व्यञ्जकशब्दाविनाभावित्वाद्यथाप्रदर्शितं व्यञ्जकस्वरूपपरिज्ञानं विभज्योपयुज्यत एव । शब्दविशेषाणां चान्यत्र च चारुत्वं यद्विभागेनोपदर्शितं तदपि तेषां व्यञ्जकत्वेनैवावस्थितमित्यवगन्तव्यम् ।

यत्रापि तत्सम्प्रति न प्रतिभासते तत्रापि व्यञ्जके रचनान्तरे यद्दृष्टं सौष्ठवं तेषां प्रवाहपतितानां तदेवाभ्यासादपोद्धृतानामप्यवभासत इत्यवसातव्यम् । कोऽन्यथा तुल्ये वाचकत्वे शब्दानां चारुत्वविषयो विशेषः स्यात्? अन्य एवासौ सहृदयसंवेद्य इति चेत्, किमिदं सहृदयत्वं नाम? किं रसभावानपेक्षकाव्याश्रितसमयविशेषाभिज्ञत्वम्, उत रसभावादिमयकाव्यस्वरूपपरिज्ञाननैपुण्यम? पूर्वस्मिन् पक्षे तथाविधसहृदयव्यवस्थापितानां शब्दविशेषाणां चारुत्वनियमो न स्यात् । पुनः समयान्तरेणान्यथापि व्यवस्थापनसम्भवात् । द्वितीयस्मिंस्तु पक्षे रसज्ञतैव सहृदयत्वमिति । तथाविधैः सहृदयैः संवेद्यो रसादिसमर्पणसामर्थ्यमेव नैसर्गिकं शब्दानां विशेष इति व्यञ्जकत्वाश्रय्येव तेषां मुख्यं चारुत्वम् । वाचकत्वाश्रयाणां तु प्रसाद एवार्थापेक्षायां तेषां विशेषः । अर्थानपेक्षायां त्वनुप्रासादिरेव ।

ध्वन्यालोक

शंका :– पण काय हो, रस हे (वाच्य) अर्थाच्या सामर्थ्यामुळे म्हणजे (वाच्य) अर्थामधील व्यञ्जकत्वामुळे प्रतीत होतात असे तुम्ही म्हटले होते आणि तसे असल्यामुळे विभक्ति प्रत्यय वगैरेंच्या व्यंजकत्वाचे वेगवेगळे प्रकार वर्णन करणे हे विसंगतच आहे!

उत्तर :– या बाबतची वस्तुस्थिति काय आहे ती, आम्ही पदे हीं व्यंजक असतात याचे विवरण करतेवेळी (पाहा, हाच उद्द्योत, कारिका दुसरी व तीवरील वृत्ति) सांगितलीच आहे. आणि रसादि हे विशिष्ट प्रकारच्या (वाच्य) अर्थांमुळेच अभिव्यक्त होत असले तरी ते विशिष्ट प्रकारचे (वाच्य) अर्थ व्यंजक शब्दाशिवाय उत्पन्न होत नसल्यामुळे[१] आम्ही (वाचक) शब्द हे व्यंजक होण्याची जी निरनिराळी कारणे तपशीलवार सांगितली, ती (व्यंग्यार्थाच्या ज्ञानाला) उपयोगी पडणारीच आहेत. आणि दुसऱ्या एका ग्रंथात[२] वेगवेगळ्या शब्दांचे जे सौंदर्य तपशीलवार दाखवले आहे, तेही त्यांच्या रसाभिव्यंजक असण्याच्या सामर्थ्यामुळेच त्यांच्या ठिकाणी आलेले आहे असे समजावे. आता काही ठिकाणी ते शब्द रसाभिव्यंजक असल्याचे प्रत्ययास येत नाही हे खरे, पण तेथेही रसव्यंजक असलेल्या इतर काव्यांमध्ये त्यांचे जे सौंदर्य पूर्वी अनुभवास आलेले असते, त्याच्याच पूर्वपरिचयामुळे ते शब्द आता रसाभिव्यंजक नसूनही सुंदर वाटतात. आता ते शब्द रसाभिव्यंजक संदर्भ नसतां नाही केवळ काव्य लिहिण्याच्या ओघात सहजगत्या वापरलेले असले, तरी ते शब्द येथेही सुंदर वाटावयास पूर्वीच्या रसाभिव्यंजक संदर्भातील त्यांच्या सौंदर्याचा परिचयच कारणीभूत होतो, असे समजावे. नाहीतर, वाचकत्व हे सर्व शब्दांच्या ठिकाणी सारखेच असताना काही शब्दांच्याच ठिकाणी सुंदर असण्याचे कोणते वैशिष्ट्य असावे? यावर तुम्ही जर असे म्हणाल की, त्या सौंदर्याचे कारण काही वेगळेच, सहृदयांनाच समजू शकणारे असते, तर त्यावर आम्ही तुम्हाला असे विचारतो की तुम्ही ज्याला सहृदयपणा म्हणता, तो म्हणजे नक्की काय आहे? ती म्हणजे रस, भाव वगैरेंनी विरहित अशा काव्यात अवलंबिलेल्या विशिष्ट संकेतांची माहिती असणे हा आहे की, रसभावादिकांनी परिपूर्ण अशा काव्याच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान असण्याचे खास सामर्थ्य हा आहे? पहिल्या

पक्षी तशा तऱ्हेच्या सहृदयांनी सुंदर म्हणून ठरविलेल्या शब्दाच्या सौंदर्याला काही निश्चित कारण असणार नाही. कारण पुनः निराळ्या संकेतांचा आश्रय करून दुसरे कोणी निराळ्याच शब्दांना सुंदर आणि पहिल्या शब्दांना असुंदर ठरवणे शक्य आहे. पण दुसरा पक्ष मान्य केल्यास सहृदयपणा म्हणजे रसाचे स्वरूप समजण्याची पात्रताच होय. या (दुसऱ्या) प्रकारच्या सहृदयांना जाणवणारे शब्दांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे रस वगैरेंची प्रतीति करून देण्याचे नैसर्गिक सामर्थ्यच होय. अशा रीतीने त्यांचे व्यंजकत्वावरच अवलंबून असणारे खरे सौंदर्य (हेच त्याचे वैशिष्ट्य होय). (वाच्य) अर्थाच्या दृष्टीने विचार केल्यास शब्दांचे वाचकत्वावर अवलंबून असलेले वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा प्रसाद हा गुणच होय. आणि वाच्यार्थाचा विचार करावयाचा नसला, तर ते शब्द अनुप्रास वगैरेंनी युक्त असणे हेच त्यांचे वैशिष्ट्य म्हणावयाचे.

लोचनम्

नन्विति । पूर्वनिर्णीतमप्येतदविस्मरणार्थमधिकाभिधानार्थं चाक्षिप्तम् । उक्तमत्रेति । न वाचकत्वं ध्वनिव्यवहारोपयोगि येनावाचकस्य व्यञ्जकत्वं न स्यादिति प्रागेवोक्तम् । न तु न गीतादिवद्रसाभिव्यञ्जकत्वेऽपि शब्दस्य तत्र व्यापारोऽस्त्येव; स च व्यञ्जनात्मैवेति भावः । एतद्यास्माभिः प्रथमोद्द्योते निर्णीतचरम् । न चेदमस्माभिरपूर्वमुक्तमित्याह—शब्दविशेषाणां चेति । अन्यत्रेति । भामहविवरणे । विभागेनेति । स्रक्चन्दनादयः शब्दाः शृङ्गारे चारवो बीभत्से त्वचारव इति रसकृत एव विभागः । रसं प्रति च शब्दस्य व्यञ्जकत्वमेवेत्युक्तं प्राक् ।

यत्रापीति । स्रक्चन्दनादिशब्दानां तदानीं शृङ्गारादिव्यञ्जकत्वाभावेऽपि व्यञ्जकत्वशक्तेर्भूयसा दर्शनात्तदधिवाससुन्दरीभूतमर्थं प्रतिपादयितुं सामर्थ्यमस्ति । तथा हि— 'तटी तारं ताम्यति' इत्यत्र तटशब्दस्य पुंस्त्वनपुंसकत्वे अनादृत्य स्त्रीत्वमेवाश्रितं सहृदयैः 'स्त्रीति नामापि मधुरम्' इति कृत्वा । यथा वास्मदुपाध्यायस्य विद्वत्कविसहृदयचक्रवतिनो भट्टेन्दुराजस्य—

इन्दीवरद्युति यदा बिभृयान्न लक्ष्म
स्युर्विस्मयैकसुहृदोऽस्य यदा विलासाः ।
स्यान्नाम पुण्यपरिणामवशात्तथापि
किं किं कपोलतलकोमलकान्तिरिन्दुः ॥

अत्र हीन्दीवरलक्ष्मविस्मयसुहृद्विलासनामपरिणामकोमलादयः शब्दाः शृङ्गाराभिव्यञ्जनदृष्टदाक्तयोऽत्र परं सौंदर्यमावहन्ति । अवश्यं चैतदवगन्तव्यमित्याह्-कोऽन्यथेति । असंवेद्यस्तावदसौ न युक्त इत्याशयेनाहसहृदयेति । पुनरिति । अनियन्त्रितपुरुषेच्छायत्तो हि समयः कथं नियतः स्यात् । मुख्यं चारुत्वमिति । विशेष इति पूर्वेण सम्बन्धः । अर्थापेक्षायामिति । वाच्यापेक्षायामित्यर्थः । अनुप्रासादिरेवेति । शब्दान्तरेण सह या रचना तदपेक्षोऽसौ विशेष इत्यर्थः । आदिग्रहणाच्छब्दगुणालङ्काराणां संग्रहः । अत एव रचनया प्रसादेन चारुत्वेन चोपबृंहिता एव शब्दाः काव्ये योज्या इति तात्पर्यम् ॥ १५, १६ ॥

लोचन

'पण काय हो'– प्रतिपक्ष्याच्या या आक्षेपाचा पूर्वी[३] निर्णय केला गेला असला, तरी हा मुद्दा वाचकांनी विसरून जाऊ नये म्हणून आणि त्याबद्दल अधिक विवरण करिता यावे म्हणून आता वृत्तिकारांनी तो मुद्दा आक्षेपाच्या रूपात पुनः उपस्थित केला आहे. 'या संबंधात सांगितलेच आहे'– ध्वनि या संज्ञेचा वापर वाचकत्वावर अवलंबून नाही. तसे असते तर पदे ही वाचक नसल्यामुळे ती व्यंजकही नाहीत असे म्हणता आले असते, हे मागेच[४] सांगितले आहे. आणि गाणे वगैरे प्रमाणेच[५] काव्य हे रसाची अभिव्यक्ति करीत असले, तरी त्यातील शब्दांचा त्या बाबतीत व्यापारच नसतो असे नाही (तर त्यांचा व्यापार म्हणजे महत्वाचा कार्यभाग असतोच) आणि तो व्यापार व्यंजना या स्वरूपाचाच असतो हे तात्पर्य. आणि ही गोष्ट आम्ही पहिल्या उद्योतात[६] निश्चित केली आहे. शिवाय शब्दांच्या ठिकाणी व्यंजकत्व असण्याची ही गोष्ट आम्ही अगदी प्रथमच सांगितली असेही नाही, हे वृत्तिकार 'निरनिराळ्या प्रकारच्या शब्दांचे सौंदर्य' इ. वाक्याने स्पष्ट करितात. 'दुसऱ्या एका ग्रंथात' म्हणजे (उद्‌भटाच्या) 'भामहविवरण' या ग्रंथात. 'तपशीलवारपणे'– स्रक् (फुलमाळ), चंदन वगैरे शब्द हे शृंगाररस प्रस्तुत असताना सुंदर वाटतात, पण बीभत्स रस प्रस्तुत असताना सुंदर वाटत नाहीत, म्हणून हा भेद (म्हणजे स्रक्, चंदन इ. शब्द सुंदर वाटणे किंवा न वाटणे हे) कोणता रस प्रस्तुत आहे यावरच अवलंबून आहे. आणि शब्दाचा रसाशी व्यंजक या नात्यानेच संबंध असतो हे मागे[७] सांगितलेच आहे.

'आता काही ठिकाणी'– त्या (विशिष्ट) ठिकाणी स्रक्, चंदन वगैरेसारख्या शब्दांमध्ये शृंगार वगैरे रसांची अभिव्यक्ति करण्याचे सामर्थ्य नसले, तरी त्या शब्दांमधील शृंगाररसाची अभिव्यक्ति करण्याचे सामर्थ्य इतर पुष्कळ ठिकाणी अनुभवास आलेले असल्यामुळे त्या शृंगाररसाच्या (रेंगाळत राहिलेल्या) सुवासाने सुंदर झालेला अर्थ प्रकट करण्याचे सामर्थ्य त्या (विशिष्ट) ठिकाणी त्या शब्दांना प्राप्त झालेले असते. उदा. 'तटी अत्यंत व्यथित झाली आहे[८]' या वाक्यात 'तट शब्दाचे पुंलिंग व नपुंसकलिंग यांना दृष्टीआड करून रसज्ञ कवीने तो शब्द स्त्रीलिंगीच वापरला; कारण स्त्री हा शब्दच गोड आहे याची त्याला जाणीव असली पाहिजे. किंवा विद्वान्, कवि आणि सहृदय यांमध्ये अग्रगण्य असलेले आमचे गुरु जे भट्ट इंदुराज, त्यांचा पुढील श्लोक पाहा :–

'चंद्र जरी आपण केलेल्या पुण्याईचे फळ म्हणून निळ्या कमळाच्या वर्णाचा डाग धारण करणार नाही आणि मग जरी केवळ विस्मयकारक आनंद देणारे असे नखरे त्याच्या ठिकाणी उत्पन्न झाले असे मानिले, तरी सुद्धा त्याला सुंदरीच्या गालांच्या कोमल कांतीसारखी कांती प्राप्त होईल काय?'

या श्लोकात **इन्दीवर, लक्ष्म, विस्मयसुहृद्**, (म्हणजे विस्मयकारक आनंदाशी मैत्री असणारे) **विलास, नाम, परिणाम**,[९] **कोमल इ** शब्द इतर ठिकाणी (म्हणजे शृंगाररसाच्या संदर्भात) शृंगाररसाची अभिव्यक्ति करू शकतात याचा अनुभव रसिकांना असल्याने ते शब्द या श्लोकात (शृंगाररसाचा संदर्भ नसूनही[१०]) पराकाष्ठेची रम्यता निर्माण करीत आहेत. आणि ही गोष्टी[११] मान्य केलीच पाहिजे हे पटविण्यासाठी वृत्तिकार 'नाहीतर वाचकत्व हे' इ. (कारण) सांगतात. आणि त्या शब्दांचे हे (सौंदर्यसूचकत्व या स्वरूपाचे) वैशिष्ट्य रसिकांना जाणवतच नाही असे म्हणणे बरोबर नव्हे हे वृत्तिकार 'सहृदयांनाच समजू शकणारे' इ. वाक्याने सांगतात. 'कारण पुनः'– कारण जिला कशाचाच निर्बंध नाही अशा मानवी इच्छेवरच[१२] अवलंबून असलेला संकेत हा एकाच निश्चित स्वरूपाचा कसा असू शकणार? 'खरे सौंदर्य' याचा संबंध मागील वाक्यातील 'वैशिष्ट्य' या शब्दाशी आहे. 'अर्थाच्या दृष्टीने' म्हणजे 'वाच्य'

अर्थाच्या दृष्टीने. 'अनुप्रास वगैरे'– दुसऱ्या समान वर्णाच्या बरोबर जी योजना, तिच्यावर ते वैशिष्ट्य अवलंबून असते,[१३] हा आशय. 'वगैरे' शब्दाने शब्दगुण व शब्दालंकार यांचाही अंतर्भाव केला आहे असे समजावे. म्हणूनच (शब्दगुण व शब्दालंकार यांनी युक्त असलेली) रचना, प्रसादगुण आणि (व्यंजकत्वामुळे प्राप्त होणारे) सौंदर्य यांनी संपन्न असलेल्या शब्दांचाच (औचित्यपूर्ण) वापर काव्यात करावा हे तात्पर्य. ॥ १५, १६ ॥

टीपा

१) शब्दापासून आधी वाच्यार्थाची व मग (रसादि) व्यंग्यार्थाची प्रतीति होत असली, तरी जे शब्द रसादींचे व्यंजक असतात तेच वाच्यार्थाचेही वाचक असतात. अशा रीतीने रसादि हे जरी वाच्यार्थाच्या सामर्थ्याने प्रतीत होत असले, तरी वाच्यार्थ हा वाचक शब्दांमुळेच कळत असल्याने वाचक शब्दांची जी **सुप्,** तिङ् इ. वैशिष्ट्ये असतात, ती व्यंग्यार्थाच्या प्रतीतीला उपयोगी पडणारीच असतात.

२) काव्यमाला आवृत्तीमध्ये **तत्र च अन्यत्र च** असा पाठ आहे, पण काशी आवृत्तीमध्ये **तत्र** गाळून **च** अन्यत्र **च** असा पाठ घेतला आहे. तो स्वीकारल्यास या पाठात **च** चा दोनदा उपयोग निरर्थक वाटतो. आम्ही वर काशी आवृत्तीतला पाठ घेऊन अनुवाद केला आहे. पण काव्यमालेतील पाठ स्वीकारल्यास तत्र म्हणजे रसाभिव्यक्तीच्या संदर्भात आणि **अन्यत्र** म्हणजे रसाभिव्यक्तींचा संदर्भ नसताना असा अर्थ होईल. आम्ही काशी आवृत्तीमधील चान्यत्र च हा जो पाठ स्वीकारला आहे, तो अभिनवगुप्तांनीही अनुसरला असून 'अन्यत्र' या शब्दाचे विवरण 'भामहविवरणामध्ये' असे केले आहे. भामहविवरण या टीकाग्रंथांसाठी पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'त्याच प्रकारच्या ध्वनीला पद व पदाचा अंशही प्रकट करू शकतात याची उदाहरणे'" वरील टीप ५.

३) पूर्वी म्हणजे द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'ध्वनि पदप्रकाश कसा असू शकेल ही शंका व तिचे समाधान'" वरील 'याचे उत्तर असे' पासूनचीकाही वाक्ये.

४) द्वितीय खंड "उद्द्योत – ३ 'ध्वनि पदप्रकाश कसा असू शकेल ही शंका व तिचे समाधान'" वर.

५) गाण्यातील आलापांना (म्हणजे केवळ सुरांना) वाच्यार्थ नसला, तरी रसाभिव्यक्ति करण्यात त्यांचे महत्त्वाचे कार्य असते. तसेच तुमच्या म्हणण्याप्रमाणे पदे ही वाचक नसतात असे मानिले, तरी रसाभिव्यक्ति करण्यात त्यांचा मुख्य कार्यभाग असतोच. तुलनार्थ पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'अलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनीला 'वर्ण' ही प्रकाशित करू शकतात'" वरील लोचनातील शेवटच्या काही ओळी व काशी आवृत्ति, पृ. ४४६.

६) प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रस' प्रकार स्वप्नातही 'वाच्य' नसतो" व "उद्द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'" वरील टीप १२ वी.

७) प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" वरील वृत्तीमधील 'पण व्यंग्यार्थाचा तिसरा' येथपासूनचा मजकूर व त्यापुढे लोचनातील (प्रथम खंड) वरील 'त्यामुळे त्या रसादिकांच्या बाबतीत' इ, वाक्य.

८) **तटी तारं ताम्यति** इतकेच शब्द अभिनवगुप्तांनी 'लोचना'त उद्धृत केले आहेत, पण कुंतकाने 'वक्रोक्तिजीवित', २–२२ वरील वृत्तीमध्ये हा संपूर्ण श्लोकं उद्धृत केला आहे. (पाहा, हिंदी वक्रोक्तिजीवित, डॉ नगेन्द्र, पृ. २५५). २–२२ ही कारिका पुढीलप्रमाणे– **सति लिङ्गान्तरे यत्र स्त्रीलिङ्गं च प्रयुज्यते । शोभानिष्पत्तये, यस्मात् नामैव स्त्रीति पेशलम् ।** या कारिकेतील शब्दयोजना व लोचनातील शब्दयोजना यांमध्ये कमालीचे साम्य आढळते. पण त्यावरून ही शब्दयोजना कोणी कोणापासून घेतली हे सांगणे कठीण आहे. कारण या दोघांपैकी आधी कोण झाला हे अगदी निश्चितपणे सांगणे शक्य नाही.

९) **विलास, कोमल, इन्दीवर** इ. शब्द सौंदर्यसूचक म्हणता येतील, पण **नाम** व **परिणाम** या शब्दांनी काय सौंदर्य सुचविले जाते, हा प्रश्नच आहे.

१०) या श्लोकात वक्त्याला प्रिय असणाऱ्या एखाद्या विशिष्ट स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन नाही, तर कोणत्याही रमणीच्या सौंदर्याचे वर्णन आहे, म्हणून या श्लोकात वक्त्याच्या रतीचा आविष्कार झाला आहेच, असे म्हणता येत नाही.

११) म्हणजे असे शब्द विशिष्ट रसाचा संदर्भ नसलेल्या ठिकाणी वापरले तरी सुंदर वाटतात, ही गोष्ट.

१२) **भिन्नरुचिर्हि लोकः** अशी परिस्थिति असल्यामुळे एकाला जे सुंदर वाटेल त्याला दुसरा कोणीतरी असुंदर म्हणण्याची शक्यता आहे.

१३) उदा. 'गंगालहरी' तील **मरुल्लीलालोलल्लहरिलुलिताम्भोजपटली** इ श्लोक घ्या. या पहिल्या चरणात **ल्** हा वर्ण **ल्** च्या सान्निध्यात वापरल्यामुळेच या चरणाली अनुप्रासाचे सौंदर्य प्राप्त झाले आहे.

ध्वन्यालोकः

एवं रसादीनां व्यञ्जकस्वरूपमभिधाय तेषामेव विरोधिरूपं । लक्षयितुमिदमुपक्रम्यते ।

प्रबन्धे मुक्तके वापि रसादीन् बन्द्धुमिच्छता ।
यत्नः कार्यः सुमतिना परिहारे विरोधिनाम् ॥ १७ ॥

प्रबन्धे मुक्तके वापि रसभावनिबन्धनं प्रत्यादृतमनाः कविर्विरोधपरिहारे परं यत्नमादधीत । अन्यथा त्वस्य रसमयः श्लोक एकोऽपि सम्यङ् न सम्पद्यते ।

कानि पुनस्तानि विरोधीनि यानि यत्नतः कवेः परिहर्तव्यानीत्युच्यते–

विरोधिरससम्बन्धिविभावादिपरिग्रहः ।
विस्तरेणान्वितस्यापि वस्तुनोऽन्यस्य वर्णनम् ॥ १८ ॥

अकाण्ड एव विछित्तिरकाण्डे च प्रकाशनम् ।
परिपोषं गतस्यापि पौनःपुन्येन दीपनम् ॥

रसस्य स्याद्विरोधाय वृत्त्यनौचित्यमेव च ॥ १९ ॥

ध्वन्यालोक

याप्रमाणे रस वगैरेंच्या व्यंजकांचे स्वरूप सांगितल्यावर त्या रसादिकांनाच विरोधी असणाऱ्या कारणांचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी पुढील कारिकेत प्रस्तावना केली जात आहे :—[१]

प्रबन्धात किंवा मुक्तकात रसपरिपोष करू इच्छिणाऱ्या सुज्ञ कवीने रसाला प्रतिकूल असणाऱ्या गोष्टी टाळण्याचा प्रयत्न करावा. ॥ १७ ॥

प्रबन्धात किंवा मुक्तकात रसभावांचा समावेश करण्याची ज्याच्या मनाला आस्था आहे, अशा कवीने विरोधी बाबी टाळण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावा. तसे न केल्यास त्याचा एकही श्लोक धडपणे रसाभिव्यक्ति करणारा होणार नाही.

पण कवीने प्रयत्नपूर्वक टाळाव्या अशा या विरोधी गोष्टी कोणत्या म्हणाल, तर त्या पुढीलप्रमाणे सांगण्यात येत आहेत :—

१) प्रस्तुत रसाला विरोधी असणाऱ्या रसाशी संबंध असलेल्या विभाव वगैरेंचे वर्णन करावयास घेणे. (२) दुसऱ्या एखाद्या वस्तूचा जरी प्रस्तुत रसाशी संबंध असला, तरीदेखील त्या दुसऱ्या वस्तूचे (खूप) विस्ताराने वर्णन करणे. ॥ १८ ॥

(३) प्रस्तुत रसाचा परिपोष करण्याचे काम एकाएकीच (म्हणजे कारण नसतानाच) सोडणे किंवा अचानक (म्हणजे योग्य कारण नसताना) प्रस्तुत रसाची अभिव्यक्ति करू लागणे. (४) रसाचा परिपोष झाल्यावरही तो रस पुन्हा पुन्हा उद्दीपित करणे आणि (५) वृत्तींचे अनौचित्य, या गोष्टी रसाला विरोधकच समजाव्या. ॥ १९ ॥

लोचनम्

रसादीनां यद्व्यञ्जकं वर्णपदादिप्रबन्धान्तं तस्य स्वरूपमभिधायेति सम्बन्धः । उपक्रम्यत इति । विरोधिनामपि लक्षणकरणे प्रयोजनमुच्यते शक्यहानत्वं नाम अनया कारिकया । लक्षणं तु विरोधिरससम्बधीत्यादिना भविष्यतीत्यर्थः ॥ १७ ॥

ननु 'विभावभावानुभावसञ्चार्यौचित्यचारुणः' इति यदुक्तं, तत एव व्यतिरेकमुखेनैतदप्यवगंस्यते । मैवम्; व्यतिरेकेण हि तदभावमात्रं प्रतीयते, न तु तद्विरुद्धम् । तदभावमात्रं च न तथा दूषकं यथा । तद्विरुद्धम् । पथ्यानुपयोगो हि न तथा व्याधिं जनयति यद्वदपथ्योपयोगः । तदाह यत्नत इति । 'विभावे' त्यादिना श्लोकेन यदुक्तं तद्विरुद्धं विरोधीत्यादिनार्धश्लोकेनाह । इतिवृत्तेत्यादिना श्लोकद्वयेन यदुक्तं तद्विरुद्धं विस्तरेणेत्यर्धश्लोकेनाह । 'उद्दीपने' त्यर्धश्लोकोक्तस्य विरुद्धम् 'अकाण्ड' इत्यर्धश्लोकेन । 'रसस्ये' त्यर्धश्लोकोक्तस्य विरुद्धं परिपोषं गतस्येत्यर्धश्लोकेन । 'अलंकृतीनामि 'त्यनेन यदुक्तं तद्विरुद्धमन्यदपि च विरुद्धं वृत्त्यनौचित्यमित्यनेन ।

लोचन

('याप्रमाणे' इ.) रसादिकांची व्यंजक असणारी वर्ण, पद यांपासून प्रबंधापर्यंतची जी कारणे, त्यांचे स्वरूप (कारिका २ ते १६ पर्यंत) सांगून झाल्यावर, असा अर्थ. 'प्रस्तावना केली जात आहे'— विरोधी असणाऱ्या गोष्टींचेही स्वरूप सांगण्याचे प्रयोजन हेच की, त्यांचा त्याग करणे शक्य व्हावे. ते प्रयोजन पुढील (१७ व्या) कारिकेत सांगितले जात आहे. प्रत्यक्ष स्वरूप मात्र 'प्रस्तुत रसाला विरोधी असणाऱ्या रसाशी संबंध असणारे' इ. वाक्यांमध्ये (म्हणजे १८ व १९ या दोन कारिकांमध्ये) सांगितले जाईल, असा अर्थ. ॥ १७ ॥

पण काय हो, 'विभाव, स्थायिभाव, अनुभाव व व्यभिचारिभाव यांच्या औचित्याने नटलेली' इ. वाक्यांनी (१० ते १४ या कारिकांत) ज्या गोष्टी (कराव्या म्हणून) सांगितल्या, त्यांवरूनच व्यतिरेकाच्या द्वारे हेही म्हणजे काय करू नये हेही कळेलच की! (मग त्यांबद्दल आणखी तपशील कशाला सांगावयाला हवा?) पण असे म्हणणे बरोबर नाही. कारण व्यतिरेकद्वारा वरील गोष्टींचा (म्हणजे १० ते १४ या कारिकांमध्ये करावयाच्या म्हणून सांगितलेल्या गोष्टींचा) काव्यात अभाव असू नये इतकेच समजेल, त्यावरून प्रतिकूल गोष्टी कोणत्या आहेत हे कळणार नाही. आणि (कारिका १० ते १४ मध्ये सांगितलेल्या) गोष्टींच्या अभावापेक्षा त्या गोष्टींना प्रतिकूल होणारे घटक अधिक रसहानिकारक असतात. कारण पथ्यकारक म्हणजे हितकारक गोष्टींचे सेवन न करणे यापेक्षा आरोग्यविघातक असणाऱ्या गोष्टींचे सेवन करण्यामुळेच व्याधि जडण्याची जास्त शक्यता असते.[२] म्हणून वृत्तिकार 'कसोशीने प्रयत्न करावा' असे सांगतात. 'कथेचे शरीर' इ. (१० व्या कारिकेत) जे सांगितले, त्याविरुद्ध असलेली गोष्ट १८ व्या कारिकेच्या पूर्वार्धात 'प्रस्तुत रसाला विरोधी असणाऱ्या' इ. शब्दांनी सांगण्यात येत आहे. आणि ११ व १२ या दोन कारिकांत 'इतिवृत्ताच्या ओघात' इ. जे सांगितले, त्याविरुद्ध असणारी गोष्ट १८ व्या कारिकेच्या उत्तरार्धात 'दुसऱ्या एखाद्या वस्तूचा' इ. वाक्याने सांगितली जात आहे. १३ व्या कारिकेच्या पूर्वार्धात 'मधूनमधून औचित्यानुसार' इ. वाक्याने जे सांगितले गेले, त्याविरुद्ध गोष्टी १९ व्या कारिकेच्या प्रारंभीच्या 'प्रस्तुत रसाचा परिपोष' इ. वाक्याने सांगण्यात येत असून १३ व्या कारिकेच्या उत्तरार्धात 'मुख्य रस क्षीण होऊ' इ. जे सांगितले, त्याविरुद्ध गोष्ट १९ व्या कारिकेच्या 'रसाचा परिपोष झाल्यावरही' इ. पहिल्या ओळीने सांगितले जात आहे. तसेच १४ व्या कारिकेच्या पूर्वार्धात 'अलंकारांची योजना' इ वाक्याने जे सांगितले, त्याविरुद्ध गोष्ट व इतरही रसविरोधी गोष्टी १९ व्या कारिकेतील 'आणि वृत्तींचे अनौचित्य' या शब्दांनी सांगण्यात आले आहे.

टीपा

१) या १७ व्या कारिकेत विरोधी बाबींचे वर्णन करण्याचा उपयोग काय, हे सांगितले आहे. त्या वर्णनाचा उपयोग म्हणजे अशा विरोधी बाबींचा त्याग करणे शक्य आहे हे प्रत्ययास आणून देणे होय. त्या विरोधी बाबींचे स्वरूप पुढील, म्हणजे १८ व १९ या कारिकांत सांगितले आहे.

२) म्हणजे १० ते १४ या कारिकांमध्ये रसपरिपोषाला उपकारक गोष्टी कोणत्या ते सांगितले असून १८ व १९ या कारिकांमध्ये रसपरिपोषाला अपकारक गोष्टी कोणत्या ते सांगण्यात येणार आहे.

ध्वन्यालोकः

प्रस्तुतरसापेक्षया विरोधी यो रसस्तस्य सम्बन्धिनां विभावभावानुभावानां परिग्रहो रसविरोधहेतुरेकः सम्भवनीयः । तत्र विरोधिरसविभावपरिग्रहो यथा शान्तरसविभावेषु तद्विभावतयैव निरूपितेष्वनन्तरमेव शृङ्गारादिविभाववर्णने । विरोधिरसभावपरिग्रहो यथा प्रियं प्रति प्रणयकलहकुपितासु कामिनीषु वैराग्यकथाभिरनुनये । विरोधिरसानुभावपरिग्रहो यथा प्रणयकुपितायां प्रियायामप्रसीदन्त्यां नायकस्य कोपावेशविवशस्य रौद्रानुभाववर्णने ।

अयं चान्यो रसभङ्गहेतुर्यत्प्रस्तुतरसापेक्षया वस्तुनोऽन्यस्य कथञ्चिदन्वितस्यापि विस्तरेण कथनम् । यथा विप्रलम्भशृङ्गारे नायकस्य कस्यचिद्वर्णयितुमुपक्रान्ते कवेर्यमकाद्यलङ्कारनिबन्धनरसिकतया महता प्रबन्धेन पर्वतादिवर्णने [हेमचन्द्राच्या 'काव्यानुशासना' त पृ. १७१ वर **समुद्रादेः** असा पाठ आहे.] ।

अयं चापरो रसभङ्गहेतुरवगन्तव्यो यदकाण्ड एवं विच्छित्तिः रसस्याकाण्ड एव च प्रकाशनम् । तत्रानवसरे विरामो रसस्य यथा नायकस्य कस्यचित्स्पृहणीयसमागमया नायिकया कयाचित् परां परिपोषपदवीं प्राप्ते शृङ्गारे विदिते च परस्परानुरागे समागमोपयचिन्तोचितं व्यवहारमुत्सृज्य स्वतन्त्रतया व्यापारान्तरवर्णने । अनवसरे च प्रकाशनं रसस्य यथा प्रवृत्ते प्रवृत्तविविधवीरसङ्क्षये कल्पसङ्क्षयकल्पे सङ्ग्रामे रामदेवप्रायस्यापि तावन्नायकस्यानुपक्रान्तप्रिलम्भशुङ्गारस्य निमित्तमुचितमन्तरेणैव शृङ्गारकथायामवतारवर्णने । न चैवंविधे विषये दैवव्यामोहितत्वं कथापुरुषस्य परिहारो यतो रसबन्ध एव कवेः प्राधान्येन प्रवृत्तिनिबन्धनं युक्तम् । इतिवृत्तवर्णनं तदुपाय एवेत्युक्तं प्राक्— 'आलोकार्थी यथा दीपशिखायां यत्नवाञ् जनः' इत्यादिना ।

अत एव चेतिवृतमात्रवर्णनप्राधान्येऽङ्गाङ्गिभावरहितरसभाव निबन्धेन च कवीनामेवंविधानि स्खलितानि भवन्तीति रसादिरूपव्यङ्गतात्पर्यमेवैषां युक्तमिति यत्नोऽस्माभिरारब्धो न ध्वनिप्रतिपादनमात्राभिनिवेशेन ।

ध्वन्यालोक

प्रस्तुत रसाच्या दृष्टीने जो रस विरोधी असेल, त्याच्याशी संबंध असणारे विभाव, (व्यभिचारि—) भाव व अनुभाव यांचे प्रतिपादन करावयास घेणे हे प्रस्तुत रसाला विरोध करणारे एक कारण असू शकते. त्यांपैकी विरोधी रसाच्या विभावाचे प्रतिपादन करावयाला घेणे याचे उदाहरण म्हणजे शांत रसाच्या विभावांचे प्रतिपादन त्याच रसाचे विभाव या नात्याने केल्यावर लगेच शृंगार[1] वगैरे रसांचे विभाव वर्णन करणे. विरोधी रसाच्या 'भावा'चे (म्हणजे व्यभिचारी भावाचे) वर्णन करावयास घेण्याचे उदाहरण म्हणजे प्रेमकलहात रुसलेल्या स्त्रियांना वैराग्याच्या गोष्टी सांगून प्रसन्न करू पाहणे. विरोधी रसाचा अनुभाव वर्णन करावयास घेणे म्हणजे उदा. प्रेमकलहात रुसलेली प्रिया प्रसन्न होत नाहीसे पाहिल्यावर नायक रागाच्या आहारी जाऊन रौद्राला शोभतील असे अनुभाव प्रकट करितो असे वर्णन करणे.

आणि प्रस्तुत रसाच्या दृष्टीने निराळा वृत्तांत, मग प्रस्तुताशी त्याचा कसातरी संबंध पोहोचत असला, तरी त्याचे विस्तारपूर्वक वर्णन करीत बसणे हे रसभंगाचे आणखी एक वेगळे कारण होय. उदा.

कोठल्या तरी नायकाचा विप्रलंभ शृंगार वर्णन करावयास प्रारंभ केला असताना कवीने यमकादि अलंकार योजण्याच्या हौसेमुळे पर्वत वगैरेंचे वर्णन मोठी लांबण लावून करणे.[२]

आणखी दुसरे रसभंगाचे कारण हे समजावे की रसाचे प्रकाशन विनाकारणच थांबवणे, किंवा ते अयोग्य ठिकाणी किंवा वेळी चालू करणे. त्यांपैकी रसप्रतिपादन अवेळी थांबवण्याचे उदाहरण म्हणजे कोठल्यातरी नायकाला जिचा सहवास हवासा वाटत असेल अशा नायिकेसंबंधीचा त्याचा शृंगार परिपोषाच्या मार्गाला लागला असताना आणि एकमेकांना एकमेकांची आपणावरील प्रीति कळून आली असताना त्यांच्या भेटीच्या उपायाचा विचार करण्याचे काम सोडून स्वतंत्रपणे दुसऱ्याच अप्रस्तुत व्यापारांचे वर्णन करणे. आणि रसाचे प्रकाशन अस्थानी करणे म्हणजे जसे एखादे कल्पान्तासारखे, ज्यात कित्येक वीरांचा संहार चालला आहे असे युद्ध चालू झाले असताना, विप्रलंभाला योग्य असा (म्हणजे भावी वियोगाची जाणीव करून देणारा) प्रसंग नसताना अगदी रामासारख्या देवतातुल्य नायकाने सुद्धा[३] योग्य कारणाशिवायच शृंगाराची भाषा बोलायला सुरुवात केली, असे वर्णन करणे. आणि अशा ठिकाणी कथेतील पात्राला त्याच्या दैवाने भुरळ पाडली असेल असे कारण सांगून कवीची या दोषातून सुटका होणार नाही, कारण रसाभिव्यक्ति करणे हाच प्रधान उद्देश डोळ्यासमोर ठेवून कवीने काव्य रचावयास प्रवृत्त व्हावे हेच उचित होय. कथानक सांगणे हे रसाभिव्यक्तीचे केवळ साधन आहे हे मागे 'दृश्य वस्तु दिसाव्यात अशी इच्छा करणारा मनुष्य ज्याप्रमाणे त्याचे साधन म्हणून प्रथम दिव्याची वात पेटवण्याच्या तयारीस लागतो' इ. कारिकेत सांगितले आहे. (पाहा, उद्द्योत १ कारिका ९).

आणि म्हणूनच, म्हणजे केवळ कथानकालाच महत्त्व देणे आणि मुख्य कोणते व अंगभूत कोणते [४] याचा विवेक सोडून रसभावांचा समावेश करणे यामुळे कवींच्या हातून अशा प्रकारचे प्रमाद घडतात, म्हणून कवींनी रस वगैरे व्यंग्यार्थांनाच सर्वथैव प्राधान्य देणे योग्य होय हे प्रतिपादन करण्यासाठी आम्ही (हा ग्रंथ लिहिण्याचा) उद्योग हाती घेतला, केवळ ध्वनीचे प्रतिपादन करण्याच्या उद्देशाने नव्हे.

लोचनम्

एतत्क्रमेण व्याचष्टे – प्रस्तुतरसापेक्षयेत्यादिना । हास्यशृङ्गारयोर्वीराद्भुतयो रौद्रकरुणयोर्भयानकबीभत्सयोर्न विभावविरोध इत्यभिप्रायेण शान्तशृङ्गारावुपन्यस्तौ, प्रशमरागयोर्विरोधात् । विरोधिनो रसस्य यो भावो व्यभिचारी तस्य परिग्रहः, विरोधिनस्तु यः स्थायी स्थायितया तत्परिग्रहोऽसम्भवनीय एव तदनुत्थानप्रसङ्गात् । व्यभिचारितया तु परिग्रहो भवत्येव । अत एव सामान्येन भावग्रहणम् । वैराग्यकथाभिरितिवैराग्यशब्देन निर्वेदः शान्तस्य यः स्थायी स उक्तः । यथा 'प्रसादे वर्तस्व प्रकटय मुदं सन्त्यज रुषम्' इत्याद्युपक्रम्यार्थान्तरन्यासो । 'न मुग्धे प्रत्येतुं प्रभवति गतः कालहरिणः' इति । मनागपि निर्वेदानुप्रवेशे सति रतेर्विच्छेदः । ज्ञातविषयसतत्त्वो हि जीवितसर्वस्वाभिमानं कथं भजेत । न हि ज्ञातशुक्तिकारजततत्त्वस्तदुपादेयधियं भजते ऋते संवृतिमात्रात् । कथाभिरिति बहुवचनं शान्तसस्य व्यभिचारिणो धृतिमतिप्रभृतीन् संगृह्णाति ।

नन्वन्यदनुन्मत्त : कथं वर्णयेत् किमुत विस्तरत इत्याह– कथञ्चिदन्वितस्येति ।

व्यापारान्तरेति । यथा वत्सराजचरिते चतुर्थेऽङ्के– रत्नावलीनामधेयमप्यगृहणतो विजयवर्मवृत्तान्तवर्णने । अपि तावदिति शब्दाभ्यां दुर्योधनादेस्तद्वर्णनं दूरापास्तमिति वेणीसंहारे

द्वितीयाङ्कमेवोदाहरणत्वेन ध्वनति । अत एव वक्ष्यति 'दैवव्यामोहितत्वम्' इति । पूर्वं तु सन्ध्यङ्गाभिप्रायेण प्रत्युदाहरणमुक्तम् । कथापुरुषस्येति । प्रतिनायकस्येति यावत् ।

अत एव चेति । — यतो रसबन्ध एव मुख्यः कविव्यापारविषयः । इतिवृत्तमात्रवर्णनप्राधान्ये सति यदङ्गाङ्गिभावरहितानामविचारितगुण प्रधानभावानां रसभावानां निबन्धनं तन्निमित्तानि स्खलितानि सर्वे दोषा इत्यर्थ : । न ध्वनिप्रतिपादनमात्रेति । व्यङ्ग्योऽर्थो भवतु मा वा भूत् कस्तत्राभिनिवेशः? काकदन्तपरीक्षाप्रायमेव तत्स्यादिति भावः ।

लोचन

या सगळ्यांचे विवरण क्रमाने 'प्रस्तुत रसाच्या दृष्टीने' वगैरे वाक्यांनी केले जात आहे. वृत्तीत उदाहरणादाखल शांत व शृंगार हे रस घेतले, याचे कारण हास्य व शृंगार, वीर व अद्‌भुत, रौद्र व करुण आणि भयानक व बीभत्स या रसांच्या विभावांचा एकमेकांशी विरोध नसतो, पण 'प्रशम' म्हणजे शांत रसाचा स्थायिभाव [४अ] व 'राग' म्हणजे शृंगाररसाचा रति हा स्थायिभाव हे परस्परांशी विरुद्ध असतात. (प्रस्तुत रसाच्या) विरोधी असलेल्या रसाचा जो 'भाव' म्हणजे व्यभिचारिभाव, त्याचे वर्णन करावयास घेणे. पण विरोधी रसाचा जो स्थायिभाव, त्याचे स्थायिभाव या नात्याने वर्णन करावयास घेणे हे असंभवनीयच आहे, कारण तसे वर्णन केल्यास प्रस्तुत रसाचा स्थायिभाव उदित न होण्याचा प्रसंग ओढवेल. [५] पण प्रस्तुत रसाचा व्यभिचारिभाव म्हणून त्याचा स्वीकार होणे शक्य आहे. म्हणून वृत्तीत स्थूलपणे 'भाव' असा शब्द योजिला आहे. [६] 'वैराग्याच्या गोष्टी सांगून' यातील 'वैराग्य' या शब्दाने शांत रसाचा स्थायिभाव जो निर्वेद, तो सूचित केला आहे. उदा. 'प्रसन्न हो, [७] चर्येवर आनंद दर्शव, रुसवा सोड' वगैरे शब्दांनी सुरुवात करून मग 'अग वेडे' (तारुण्य—) काळरूपी हरिण एकदा निघून गेला की, तो परत येऊ शकत नाही' अशा प्रकारच्या सामान्य विधानाने शेवट ज्यात केला आहे असा श्लोक. येथे चवथ्या ओळीमध्ये निर्वेदाचा जरी थोडासाच शिरकाव झाला असला, तरी त्यामुळे रतिभाव पार नष्ट होत आहे. कारण विषयांचे खरे स्वरूप (म्हणजे फोलपण) ज्याला कळले आहे असा मनुष्य स्त्रीविषयक रतिभावाला आपले जीवितसर्वस्व कसे मानील? कारण शिंपल्यावर भासणाऱ्या चांदीच्या खऱ्या स्वरूपाचे ज्याला ज्ञान झाले, त्याला त्या असत्य चांदीचा आधार असणारा शिंपला आपण उचलून घ्यावा अशी इच्छा होणार नाही. त्याचा भ्रम जोपर्यंत कायम असेल, तोपर्यंतच तो तशी इच्छा करील.

'(वैराग्याच्या) गोष्टी' यातील बहुवचनामुळे शांत रसाच्या धृति, मति [८] इ. व्यभिचारिभावांचा अन्तर्भाव झाला आहे.

'पण काय हो, वेड्या माणसाशिवाय दुसरा कोणीही निराळ्या [९] वृत्तान्ताचे वर्णनच कसे करील? मग ते वर्णन विस्ताराने करण्याचा प्रश्न तर अगदीच बाजूला राहिला!' या शंकेला वृत्तिकार 'प्रस्तुताशी त्याचा कसातरी (म्हणजे दूरान्वयाने) संबंध पोहोचत असला तरी' या शब्दांनी उत्तर देतात. 'दुसऱ्याच अप्रस्तुत व्यापारांचे' — उदा. वत्सराजचरितामध्ये [१०] चवथ्या अंकात नाटककाराने रत्नावलीचे नावही न घेता विजयवर्म्याच्या हकीकतीचे वर्णन केले आहे.

'देवतातुल्य नायकानेसुद्धा— या शब्दांनी वृत्तिकारांनी असे सुचविले आहे की, दुर्योधन वगैरेंच्या बाबतीत तर असे वर्णन करणे अगदीच अयोग्य असल्यामुळे वेणीसंहार नाटकातील दुसरा अंक हे 'रसाचे

अस्थानी प्रकाशन करणे' याचे उदाहरण आहे. असे असल्यामुळेच वृत्तिकार 'दैवाने भुरळ पाडली असेल' वगैरे विधान करणार आहेत. पूर्वी [११] हे दुर्योधनाचे उदाहरण संधींच्या अंगांच्या संदर्भात विरुद्ध उदाहरण म्हणून दिले होते. [१२] 'कथेतील पात्राला' म्हणजे प्रतिनायकाला, असा अर्थ. 'आणि म्हणूनच' – ज्या अर्थी कवीच्या लेखनव्यापाराचे मुख्य उद्दिष्ट रसाचा परिपोष हेच असते, त्या अर्थी कवीने जर केवळ कथानकाच्या वर्णनालाच महत्त्व दिले आणि अंग व अंगी हा संबंध न पाळता, म्हणजे गौण कोणते व मुख्य कोणते याचा विचार न करिता, रसभावादिकांचे चित्रण केले, तर त्यामुळे त्याच्या काव्यात चुका म्हणजे सर्व प्रकारचे दोष निर्माण होतात, असा अर्थ. 'केवळ ध्वनीचे प्रतिपादन करण्याच्या उद्देशाने नव्हे' – (काव्यामध्ये वस्तुरूप अगर अलंकाररूप) व्यंग्य अर्थ असो किंवा नसो, [१३] तो असण्याबद्दल आग्रह कशाला धरावयाचा? कावळ्याला दात किती आहेत हे पाहण्याच्या उद्योगासारखाच [१४] तो खटाटोप (म्हणजे वस्तुरूप किंवा अलंकाररूप ध्वनीसंबंधीचा आग्रह) निरुपयोगी होईल असा आशय.

टीपा

१) शांत रसाचा स्थायिभाव 'प्रशम' व शृंगाराचा 'अनुराग' हे परस्परविरुद्ध होत. ते विरुद्ध असण्याचे कारण एखाद्या व्यक्तीच्या अंतःकरणात प्रशम उदित झाला असताना लगेच अनुराग उत्पन्न होणे असंभवनीय आहे, हे होय.

२) आनंदवर्धनांनी (किंवा अभिनवगुप्तांनीही) येथे प्रत्यक्ष कोणतेही उदाहरण दिलेले नाही, पण कालिदासाच्या मेघदूतातला पूर्वभाग हा त्यांच्या डोळ्यांसमोर असणे शक्य आहे. विरही यक्षाच्या आपल्या पत्नीविषयीच्या उत्कट भावनांचे चित्रण करणे रसपरिपोषासाठी आवश्यक असता अलकानगरी पर्यंतचा मार्ग सांगण्यात कवीने फार श्रम खर्ची घातले आहेत. त्यामुळे अधूनमधून विषयांतर होऊन दुर्लक्ष झाल्यासारखे वाटते.

३) सध्या उपलब्ध असलेल्या रामविषयक नाटकांमध्ये कोठेही अशा तऱ्हेचा प्रसंग आढळत नाही. आनंदवर्धनांनी केवळ युक्तिवादासाठी रामासारख्यांच्या बाबतीत असा प्रसंग कल्पिला असावा, किंवा सध्या उपलब्ध नसलेल्या एखाद्या रामविषयक नाटकात त्यांना असा एखादा प्रसंग आढळला असावा. रामादिकांच्या बाबतीतही जर वरीलसारखे वर्णन अनुचित ठरते, तर मग दुर्योधनासारख्यांच्या बाबतीत किती अनुचित होईल हे सांगावयासच नको.

येथे 'वेणीसंहारा'च्या २ ऱ्या अंकातला दुर्योधनाचा शृंगार सूचित केल आहे. (पाहा, द्वितीय खंड, "तृतीय -३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वरील टीप चौथी)

४) रसभाव हे अंगी आणि इतिवृत्तवर्णन हे त्यांचे अंग हाच 'अंगांगिभाव' येथे अभिप्रेत आहे. ध्वनिप्रतिपादन हे रसादिव्यंग्यार्थाचे प्राधान्य सिद्ध करण्यासाठी उपाय म्हणून केले आहे.

४अ) प्रशम हा शांतरसाचा स्थायी भाव शम, तत्त्वज्ञान, तृष्णाक्षयसुख, निर्वेद, वैराग्य इ. नावांनीही उल्लेखिला जातो. त्यांपैकी पहिली तीन भावरूप आहेत व उरलेली अभावरूप आहेत.

५) मुळात **तदनुत्थानप्रसङ्गात्** असा शब्द आहे. त्यातील **तत्** या सर्वनामाने प्रस्तुत रसाच्या स्थायी भावाचा बोध होतो.

६) 'भाव' या शब्दाचे 'स्थायिभाव' व 'व्यभिचारिभाव' असे दोन अर्थ होऊ शकतात. त्यांपैकी विरोधी रसाचा स्थायिभाव स्थायी या नात्याने प्रस्तुत रसाच्या संदर्भात येणे अशक्य आहे. व्यभिचारिभाव या नात्याने तो येणे 'शक्य' असले, तरी 'इष्ट' नाही.

७) हा संपूर्ण श्लोक असा आहे—

प्रसादे वर्तस्व प्रकटय मुदं सन्त्यज रुषम्
प्रिये शुष्यन्त्यङ्गान्यमृतमिव ते सिञ्चतु वचः ॥
निधानं सौख्यानां क्षणमभिमुखं स्थापय मुखं
न मुग्धे प्रत्येतुं प्रभवति गतः कालहरिणः ॥

हा श्लोक 'चन्द्रक' नावाच्या कवीचा आहे असे 'शार्ङ्गधरपद्धती' — मध्ये म्हटले आहे. (पाहा, काव्यप्रकाश, झळकीकर आवृत्ति पृ. ४३८) यातील चवथ्या ओळीने पहिल्या तीन ओळींतील आशयाचे समर्थन केलेले असल्याने येथे 'अर्थान्तरन्यास' हा अलंकार आहे.

निर्वेदपर विचार शृंगाराच्या परिपोषाला विघातक आहे या मतानुसार अभिनवगुप्तांनी या पद्याकडे पाहिले आहे. त्या दृष्टीने रघुवंश, ९—४७ (**त्यजत मानमलं** इ.) मध्येही शृंगाराच्या अभिव्यक्तीला बाध येतो असे मानावे लागेल. पण कालिदासाने तेथे तसे मानल्याचे मुळीच दिसत नाही. तेव्हा शेवटी कोणत्याही उदाहरणाचा संदर्भ व वैराग्यपर विधानाचा संभाव्य परिणाम या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊनच त्या विधानाची इष्टानिष्टता ठरवावी लागेल. **प्रसादे वर्तस्व** हे उदाहरण आनंदवर्धनांनी दिलेले नाही. त्यांनी वृत्तीत **वैराग्यकथाभिः** असे बहुवचन वापरले आहे. तेव्हा वैराग्यपर विचार दीर्घकाल मनात राहतील इतके असू नयेत असा आनंदवर्धनांचा अभिप्राय असल्यास न कळे!

८) धृति, मति इत्यादींचे स्पष्टीकरण प्रथमखंड "उद्द्योत — १ 'रसादिरूप अर्थ ज्यात प्रधान, तीच असंलक्ष्यक्रम ध्वनीची उदाहरण'" वरील २१ व्या टीपेमध्ये आले आहे.

९) निराळ्या म्हणजे प्रस्तुत रसाशी असंबद्ध असलेल्या.

१०) 'वत्सराजचरित' या नावाचे नाटक उपलब्ध नाही. हे 'तापसवत्सराज' असेल असे म्हणावे, तर त्यात 'रत्नावली' हे पात्रच नाही व हा विजयवर्म्याचा प्रसंगही नाही. 'रत्नावली' ही नाटिका मात्र वत्सराज उदयन याच्या चरित्रावर आधारलेली आहे व त्या नाटिकेच्या ४ थ्या अंकात हा प्रसंगही आहे शिवाय 'रत्नावली' ही तर त्या नाटकाची नायिकाही आहे. तेव्हा 'वत्सराजचरित' या शब्दाने अभिनवगुप्तांना रत्नावली ही नाटिकाच अभिप्रेत असावी, कारण रत्नावलीच्या प्रस्तावनेतील एका श्लोकात 'वत्सराजचरितम्' असा शब्द आहे. शिवाय हा प्रसंग 'अप्रस्तुत गोष्टीचे लांबलचक वर्णन' या सदरात मोडणारा आहे असे आम्हास वाटत नाही. कारण रुमण्वान् या उदयनाच्या अमात्याने कोसलाधिपतीशी लढाई करून मिळविलेल्या विजयाची बातमी घेऊन विजयवर्मा आला आहे. ही इतकी महत्वाची घटना उदयनास सविस्तरपणे ऐकावीशी वाटणे व

विजयवर्म्याने एकच पान भरेल अशा तऱ्हेने ती वर्णन करणे यामुळे प्रस्तुत रसाची हानि झाली आहे असे वाटत नाही.

११) पूर्वी म्हणजे द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वर शिवाय त्यापुढील टीप चौथी पाहा.

१२) पण आता हे रसाचे अस्थानी प्रकाशन करणे याचे उदाहरण म्हणून दिले आहे.

१३) रसादिरूपी व्यंग्यार्थ मात्र काव्यात अटळपणे असलाच पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे.

१४) तुलनार्थ पुढील सुभाषित पाहा–

काकस्य कति वा दन्ता मेषस्याण्डं कियत्पलम् ।
गर्दभे कति रोमाणि, व्यर्थैवैषा विचारणा ॥

हाच काकदन्तांचा दृष्टांत पुढे लोचनात काशी आवृत्ति पृ. ४५७ वर आला आहे.

ध्वन्यालोकः

पुनश्चायमन्यो रसभङ्गहेतुरवधारणीयो यत्परिपोषं गतस्यापि रसस्य पौनःपुन्येन दीपनम् । उपभुक्तो हि रसः स्वसामग्रीलब्धपरिपोषः पुनः पुनः परामृश्यमाणः परिम्लानकुसुमकल्पः कल्पते ।

तथा वृत्तेर्व्यवहारस्य यदनौचित्यं तदपि रसभङ्गहेतुरेव । यथा नायकं प्रति नायिकायाः कस्याश्चिदुचितां भङ्गिमन्तरेण स्वयं सम्भोगाभिलाषकथने । यदि वा वृत्तीनां भरतप्रसिद्धानां कैशिक्यादीनां काव्यालङ्कारान्तरप्रसिद्धानामुपनागरिकाद्यानां वा यदनौचित्यमविषये निबन्धनं तदपि रसभङ्गहेतुः । एवमेषां रसविरोधिनामन्येषां चानया दिशा स्वयमुत्प्रेक्षितानां परिहारे सत्कविभिरवहितैर्भवितव्यम् । परिकरश्लोकाश्चात्र–

मुख्या व्यापारविषयाः सुकवीनां रसादयः ।
तेषां निबन्धने भाव्यं तैः सदैवाप्रमादिभिः ॥
नीरसस्तु प्रबन्धो यः सोऽपशब्दो महान् कवेः ।
स तेनाकविरेव स्यादन्येनास्मृतलक्षणः ॥
पूर्वे विश्रृङ्खलगिरः कवयः प्राप्तकीर्तयः ।
तान् समाश्रित्य न त्याज्या नीतिरेषा मनीषिणा ॥
वाल्मीकिव्यासमुख्याश्च ये प्रख्याताः कवीश्वराः ।
तदभिप्रायबाह्योऽयं नास्माभिर्दर्शितो नयः ॥ इति ॥

ध्वन्यालोक

रसभंग होण्याचे आणखी हे एक दुसरे कारण लक्षात घ्यावे की, रसाचा परिपोष पुरेपूर झाला असताही त्याचे पुन्हा पुन्हा उद्दीपन करणे. विभावादि सामग्रीने रसाचा परिपोष होऊन त्याचा (सहृदयाने) उपभोग म्हणजे आस्वाद घेतल्यावर तो पुन्हा पुन्हा प्रदीप्त केल्यास त्याची कोमेजलेल्या फुलासारखी अवस्था होते.

त्याचप्रमाणे वृत्तीचे म्हणजे वागणुकीचे जे अनौचित्य, [१] तेदेखील रसहानिकारकच होते. जसे एखाद्या नायिकेने योग्य मार्गाचा अवलंब न करिता (म्हणजे अप्रत्यक्षपणे सूचित न करिता) आपला रतिक्रीडेसंबंधीचा अभिलाष नायकाला स्वतःच उघड शब्दांनी सांगणे. किंवा वृत्तींचे म्हणजे भरताच्या नाट्यशास्त्रात प्रसिद्ध असलेल्या कैशिकी [२] वगैरेंचे किंवा इतर काव्यविषयक ग्रंथांत प्रसिद्ध असलेल्या उपनागरिका इत्यादींचे जे अनौचित्य म्हणजे त्यांचा अयोग्य ठिकाणी वापर, तेदेखील रसभंगाला कारण होते. अशा रीतीने या रसविरोधी गोष्टी जाणून आणि इतरांची याच पद्धतीने स्वतःच्या बुद्धीने कल्पना करूनं त्या टाळण्यासाठी सत्कवींनी जागरूक रहावे. या बाबतीत सारांशात्मक श्लोक असे :—

सत्कवींच्या प्रयत्नांची मुख्य उद्दिष्टे रसभावादि हीच असली पाहिजेत. त्यांची अभिव्यक्ति करण्याचे बाबतीत त्यांनी केव्हाही प्रमाद करू नये.

प्रबन्ध रसहीन असणे हे कवीला फारच लांछनास्पद होय. अशा (नीरस) प्रबन्धामुळे तो 'कवि' यासंज्ञेला पात्रच होणार नाही. त्याचे नावदेखील [३] कोणाच्याही लक्षात रहाणार नाही.

कीर्ति मिळविलेल्या पूर्वीच्या कवींच्या वाणीची मर्यादा काही वेळा सुटली असली तरी त्यांच्या त्या गोष्टीचा आधार घेऊन समंजस कवीने हे आम्ही सांगितलेले पथ्य सोडू नये.

वाल्मीकि, व्यास वगैरे जे प्रसिद्ध, श्रेष्ठ कवि होऊन गेले, त्यांच्या काव्यातून जी त्यांची प्रवृत्ति दिसून येते, तिला सोडून हे आम्ही दाखविलेले नियम नाहीत.

लोचनम्

वृत्त्यनौचित्यमेव चेति बहुधा व्याचष्टे । तदपीत्यनेन चशब्दं कारिकागतं व्याचष्टे । रसभङ्गहेतुरेव इत्यनेनैवकारस्य कारिकागतस्य भिन्नक्रमत्वमुक्तम् । रसस्य विरोधायैवेत्यर्थ : । नायकं प्रतीति । नायकस्य हि धीरोदात्तादिभेदभिन्नस्य सर्वथा वीररसानुवेधेन भवितव्यमिति तं प्रति कातरपुरुषोचितमधैर्ययोजनं दुष्टमेव ।

तेषामिति रसादीनाम् । तैरिति सुकविभिः । सोऽपशब्द इति दुर्यश इत्यर्थ : । ननु कालिदासः परिपोषं गतस्यापि करुणस्य रतिविलापेषु पौनःपुन्येन दीपनमकार्षीत्, तत्कोऽयं रसविरोधिनां परिहारनिर्बन्ध इत्याशङ्क्याह— पूर्व इति । न हि वसिष्ठादिभिः कथञ्चिद्यदि स्मृतिमार्गस्त्यक्तस्तद्व्यमपि तथा त्यजामः । अचिन्त्यहेतुत्वादुपरिचरितानामिति [क. ल. वि. पृ. ९० वर मुनिचरितानामिति असा पाठभेद आहे.] **भाव : । 'इति' शब्देन परिकरश्लोकसमाप्तिं सूचयति ॥ १९ ॥**

लोचन

'आणि वृत्तींचे अनौचित्य' याचे विवरण वृत्तिकार निरनिराळ्या प्रकारांनी [३अ] करितात. 'ते देखील' हा एकोणिसाव्या कारिकेतील 'आणि' शब्दाचा वृत्तिकारांनी सांगितलेला अर्थ होय. 'रसहानिकारकच' असे म्हणून वृत्तिकार कारिकेत **एव** हा शब्द अयोग्य ठिकाणी वापरला गेला आहे, [४] असे दर्शवितात. '(या सर्व गोष्टी) रसाला विरोधकच (असतात)' असा अर्थ. 'नायकाला'– धीरोदात्त वगैरे प्रकारचा 'नायक' सर्वस्वी वीररसाचा स्थायिभाव जो उत्साह, त्यानेच युक्त असणे योग्य म्हणून त्यांपैकी कोणत्याही प्रकारचा नायक एखाद्या भित्र्या पुरुषाप्रमाणे धैर्यहीन असल्याचे दाखविणे हे दोषास्पदच होय. [५] (परिकरश्लोक १ मधील) 'त्यांची' म्हणजे रसादींची. 'त्यांनी' म्हणजे सत्कवींनी. लांछनास्पद म्हणजे बदनामी करणारे, असा अर्थ. 'पण काय हो, कालिदासाने रतिविलापात [५अ] आधीच परिपुष्ट झालेल्या करुण रसाचेही पुन्हा पुन्हा उद्दीपन केले आहे [६], तर मग विरोधी गोष्टी टाळण्याचा आग्रह तुम्ही कशाला धरता? अशी शंका लक्षात घेऊन वृत्तिकार 'कीर्ति मिळविलेल्या पूर्वीच्या इ.' वाक्याने ती शंका दूर करितात. कारण वसिष्ठादिकांनी जर कोणत्या तरी कारणाने स्मृतीत सांगितलेला आचरणाचा मार्ग सोडला, [७] तर आपणदेखील तो तसाच सोडून द्यावा, हा विचार योग्य नव्हे. श्रेष्ठ दर्जाचे वर्तन असणारे लोक 'असे' (म्हणजे स्मृतिग्रंथांच्या विरुद्ध) का वागतात, याचे कारण आपल्याला अतर्क्य असते [८], हा आशय. (परिकर श्लोकांच्या शेवटी वापरलेल्या) **'इति'** या शब्दाने सारांशात्मक श्लोक येथे संपले, असे वृत्तिकार सुचवितात. ॥ १९ ॥

टीपा

१) रुद्रटाने काव्यालंकार ११–९ मध्ये व्यवहार, आकार, वेष आणि वचन यांच्या अनौचित्याचा उल्लेख 'ग्राम्यत्व' या दोषाचे विवेचन करिताना केला आहे आणि त्या संदर्भात **प्रागल्भ्यं कन्यानाम्** म्हणजे अविवाहित स्त्रियांनी आपले प्रेम निर्लज्जपणे प्रकट करणे हे एक ग्राम्यत्वाचे उदाहरण म्हणून दिले आहे.

वरील **कन्यानाम्** या शब्दाचा लक्ष्यार्थ नवोढा असा घ्यावा असे नमिसाधु हा टीकाकार म्हणतो.

२) कैशिकी इ. वृत्ति म्हणजे नाटकामध्ये उपयोजिलेले रसानुकूल हावभाव, वेषभूषा, शब्दयोजना इत्यादि. भरताने अशा चार वृत्ति सांगितल्या आहेत. त्यांची नावे भारती, कैशिकी, सात्वती आणि आरभटी अशी आहेत. अधिक माहितीसाठी पाहा, नाट्यशास्त्र, अध्याय २०.

३) मुळात 'लक्षण' असा शब्द आहे. त्याचा अनुवाद आम्ही 'नाव' असा केला आहे. 'नाव' या अर्थाने 'लक्षण' हा शब्द वापरल्याची काही उदाहरणे :– **१) ककुत्स्थ इत्याहितलक्षणोऽभूत् (रघुवंशम्, ६–७१) २) तेषां दिक्षु प्रथितविदिशालक्षणां राजधानीम् । (मेघदूतम्, १–२४)**

३अ) निरनिराळे प्रकार म्हणजे १) व्यवहार म्हणजेच वागणूक, वर्तन २) कैशिकी वगैरे नाट्यवृत्ति आणि ३) उपनागरिका वगैरे शब्दवृत्ति म्हणजे अनुप्रासाचे प्रकार.

४) कारण **एव** हा शब्द **वृत्त्यनौचित्यम्** यानंतर यावयास नको होता, तर **रसस्य स्याद्विरोधाय** यातील **विरोधाय** यानंतर यावयास पाहिजे होता.

५) नायकांच्या धीरोदात्तादि प्रकारांचे स्पष्टीकरण पूर्वी द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'वरीलपैकी कोणताही पक्ष स्वीकारला, तरी संघटनेचे नियमन करणारे कारण वक्ता आणि त्याच्या बोलण्याच्या वाच्यार्थाचे औचित्य, हे होय,'"वर आले आहे. वृत्तिकारांनी नायिकेच्या अनुचित वर्तनाचे उदाहरण दिले. आता लोचनात अभिनवगुप्त नायकाच्या अनुचित वर्तनाचे उदाहरण देतात.

५अ) काशी आवृत्ति व काव्यमाला आवृत्ति यांमध्ये रतिविलासेषु असा चुकीचा पाठ आढळतो. तो आम्ही **रतिविलापेषु** असा दुरुस्त केला आहे.

६) 'रस परिपुष्ट झाला असताही त्याचे पुन्हा पुन्हा उद्दीपन करणे' याचे उदाहरण अभिनवगुप्तांनी कुमारसंभवाच्या ४ थ्या सर्गातील 'रति–विलाप' हे दिले आहे. आनंदवर्धनांनी मात्र हे किंवा कोणतेही उदाहरण दिलेले नाही. कुमारसंभवाचा ४ था सर्ग अवघ्या ४६ श्लोकांचा आहे. त्यात रतीला शोकाचा उमाळा आल्याचे फक्त दोनदाच दाखविले आहे. प्रथम मूर्च्छेतून सावध झाल्यावर रतीला मदनाचे फक्त भस्मच दिसते, त्यावेळी ती भूमीवर गडबडा लोळून विलाप करू लागते, हे तर अगदी स्वाभाविकच आहे. मग ती विलाप करीत असताना काही वेळाने मदनाचा सखा वसंत तिच्या समोर येतो त्यावेळीं तिला पुन्हा भडभडून येते. दुःखी माणसाला, निकटचे आप्तेष्ट भेटले की दुःखाचे कढ येतात ही वस्तुस्थिति तर सर्वांच्या अनुभवाचीच आहे. त्या प्रसंगी रतीला जी पुन्हा शोकाचा उमाळा आला, त्याच्या समर्थनार्थ कालिदासाने **स्वजनस्य हि दुःखमग्रतो विवृतद्वारमिवोपजायते ।** हे सर्वांच्या अनुभवाचे, सुप्रसिद्ध उद्‌गार काढले आहेत. तेव्हा रतिविलापात रसाला उगाचच पुन्हा पुन्हा भर आणला आहे, हे अभिनवगुप्तांचे विधान, पटण्यासारखे नाही. त्याऐवजी उत्तररामचरिताच्या ३ ऱ्या अंकात रामाने कैक वेळा मूर्च्छित पडणे हे किंवा वेणीसंहाराच्या ६ व्या अंकात युधिष्ठिराने भीमाविषयी पुन्हा पुन्हा शोक करणे किंवा अन्य ग्रंथातील यासारखेच उदाहरण देणे इष्ट झाले असते असे वाटते. मात्र रतिविलापामध्ये उमाळा आल्यानंतरच्या विलापासाठी बरेच श्लोक खर्ची घातले आहेत. हा रतिविलापात रसाचे पुनः पुनः उद्दीपन केले आहे, असे म्हणण्यामागे अभिनवगुप्तांचा अभिप्राय असावा.

७) ऋग्वेदाच्या ७ व्या मंडलातील ५५ व्या सूक्ताच्या संदर्भात बृहद्देवतेमध्ये पुढील कथा सांगितली आहे :– वसिष्ठ हा एका रात्री गुपचूपपणे वरुणाच्या घरात शिरला तेव्हा वरुणाच्या कुत्र्याने त्याच्यावर हल्ला केला असता त्या कुत्र्याला गप्प करण्यासाठी वसिष्ठाने ७–५५ या सूक्तातील मंत्र म्हटले. म्हणून वरुणाने वसिष्ठाला आपल्या पाशाने जखडून टाकले. त्यानंतर वसिष्ठाने स्तुति केल्यावर वरुणाने त्याला पाशमुक्त केले. याखेरीज अन्य कोणत्याही ग्रंथात वसिष्ठाने केलेल्या पापाचा उल्लेख आढळत नाही. मात्र 'वसिष्ठादि' यातील 'आदि' शब्दाने विश्वामित्राने कुत्र्याचे मांस भक्षण केल्याचा प्रसंग अभिनवगुप्तांना अभिप्रेत असल्यास न कळे. पाहा, नागानन्द, ४–१५.

८) पाहा, **कुमारसंभवम्,** ५–७५ या श्लोकाचा उत्तरार्ध :– **अलोकसामान्यमचिन्त्यहेतुकं द्विषन्ति मन्दाश्चरितं महात्मनाम् ।**

ध्वन्यालोकः

> **विवक्षिते रसे लब्धप्रतिष्ठे तु विरोधिनाम् ।**
> **बाध्यानामङ्गभावं वा प्राप्तानामुक्तिरच्छला ॥ २० ॥**

स्वसामग्र्या लब्धपरिपोषे तु विवक्षिते रसे विरोधिनां विरोधिरसाङ्गानां बाध्यानामङ्गभावं वा प्राप्तानां सतामुक्तिरदोषा । बाध्यत्वं हि विरोधिनां शक्याभिभवत्वे सति नान्यथा । तथा च तेषामुक्तिः प्रस्तुतरसपरिपोषायैव सम्पद्यते । अङ्गभावं प्राप्तानां च तेषां विरोधित्वमेव निवर्तते । अङ्गभावप्राप्तिर्हि तेषां स्वाभाविकी समारोपकृता वा । तत्र येषां नैसर्गिकी तेषां तावदुक्ताविरोध एव । यथा विप्रलम्भशृङ्गारे तदङ्गानां व्याध्यादीनाम् । तेषाञ्च तदङ्गानामेवादोषो नातदङ्गानाम् । तदङ्गत्वे च सम्भवत्यपि मरणस्योपन्यासो न ज्यायान् । आश्रयविच्छेदे रसस्यात्यन्तविच्छेदप्राप्तेः । करुणस्य तु तथाविधे विषये परिपोषो भविष्यतीति चेत् – न; तस्याप्रस्तुतत्वात्, प्रस्तुतस्य च विच्छेदात् । यत्र तु करुणरसस्यैव काव्यार्थत्वं तत्राविरोधः । शृङ्गारे वा मरणस्यादीर्घकालप्रत्यापत्तिसम्भवे कदाचिदुपनिबन्धो नात्यन्तविरोधी । दीर्घकालप्रत्यापत्तौ तु तस्यान्तरा प्रवाहविच्छेद एवेत्येवंविधेतिवृत्तोपनिबन्धनं रसबन्धप्रधानेन कविना परिहर्तव्यम् ।

तत्र लब्धप्रतिष्ठे तु विवक्षिते रसे विरोधिरसाङ्गानां बाध्यत्वेनोक्तावदोषो यथा–

क्काकार्यं शशलक्ष्मणः क्व च कुलं, भूयोऽपि दृश्येत सा?
दोषाणां प्रशमाय में श्रुतमहो कोपेऽपि कान्तं मुखम् ।
किं वक्षन्त्यपकल्मषाः कृतधियः? स्वप्नेऽपि सा दुर्लभा
चेतः स्वास्थ्यमुपैहि, कः खलु युवा धन्योऽधरं पास्यति ॥

यथा वा पुण्डरीकस्य महाश्वेतां प्रति प्रवृत्तनिर्भरानुरागस्य द्वितीयमुनिकुमारोपदेशवर्णने । स्वाभाविक्यामङ्गभावप्राप्तावदोषो यथा–

भ्रमिमरतिमलसह्रदयतां प्रलयं मूर्च्छां तमः शरीरसादम् ।
मरणं च जलदभुजगजं प्रसह्य कुरुते विषं वियोगिनीनाम् ॥

इत्यादौ । समारोपितायामप्यविरोधो यथा– 'पाण्डुक्षामम्' इत्यादौ । यथा वा– 'कोपात्कोमललोलबाहुलतिकापाशेन' इत्यादौ ।

इयं चाङ्गभावप्राप्तिरन्या यदाधिकारिकत्वात् प्रधान एकस्मिन् वाक्यार्थे रसयोर्भावयोर्वा परस्परविरोधिनोर्द्वयोरङ्गभावगमनं, तस्यामपि न दोषः । यथोक्तम्– 'क्षिप्तो हस्तावलग्न' इत्यादौ । कथं तत्राविरोध इति चेत्, द्वयोरपि–परत्वेन व्यवस्थानात् ।

ध्वन्यालोक

पण अभिप्रेत रसाला एकदा का हवी तेवढी उत्कटता प्राप्त झाली, म्हणजे मात्र विरोधी रसांची अंगे, त्या मुख्य रसाकडून जर बाधित (म्हणजे विरोध करण्यास असमर्थ) होऊ शकणारी असतील, किंवा त्यांना मुख्य रसाचे उपकारकत्व देऊन ती समाविष्ट केलेली असतील, तर त्यात काहीहीं दोष नाही. ॥ २० ॥

पण स्वतःच्या साधनसामग्रीमुळे प्रस्तुत रसाचा परिपोष झाला, की मग त्याच्या विरोधकांचे (म्हणजे विरोधी रसांच्या अंगांचे) वर्णन मुख्य रसाकडून ते जर बाधित होत असतील किंवा ते जर मुख्य रसाला

उपकारक होत असतील तर (ते वर्णन) निर्दोष होय. ती विरोधी अंगे बाधित होणे हे मुख्य रस त्यांना निष्क्रिय करून टाकू शकत असेल तरच संभवते, एरवी नाही. आणि अशा तऱ्हेने त्या विरोधी रसाच्या अंगांचे वर्णन केल्यास ते (उलट) प्रस्तुत रसाच्या परिपोषालाच कारणीभूत होते. आणि त्यांना जर प्रस्तुत रसाचे अंगत्व प्राप्त होत असेल तर त्या रसाला विरोध करण्याचे त्यांचे सामर्थ्यच नाहीसे होते! कारण त्यांचे अंगभूत होणे हे दोन प्रकारांनी संभवते :— (१) ते अंगत्व नैसर्गिकपणेच असणे, किंवा (२) ते कविकल्पनेमुळे त्यांच्या ठिकाणी उत्पन्न होणे. त्यांपैकी ज्यांचे अंगत्व नैसर्गिकपणे असते, त्यांचे प्रतिपादन हे तर विरोधी होतच नाही. उदा. विप्रलंभशृंगार हा रस प्रस्तुत असताना त्याची व्याधि वगैरे जी अंगे करुण रसाचीही नैसगिक अंगे असतील त्यांचेच वर्णन निर्दोष होते. [१] त्यांहून इतर अंगांचे (म्हणजे विप्रलंभशृंगाराची अंगे नसणाऱ्या करुण रसाच्या अंगांचे) सुद्धा वर्णन करणे हा दोषच होईल. आणि 'मरण [१अ]' हे विप्रलंभाचे अंग म्हणून संभवत असले, तरी त्याचा (विप्रलंभशृंगारात) समावेश करणे प्रशस्त नाही. कारण आश्रय तुटल्यावर (विप्रलंभशृंगार) रसदेखील पूर्णतया नष्ट होण्याचा प्रसंग ओढवेल. [२] आणि 'अशा उदाहरणात, (विप्रलंभशृंगाररस नष्ट झाला तरी) करुण रसाचा परिपोष होईलच की!' असे जर तुमचे म्हणणे असेल तर ते बरोबर नाही. कारण अशा उदाहरणात करुणरस हा अप्रस्तुत असून प्रस्तुत असलेल्या विप्रलंभशृंगाररसाचा समूळ नाश झालेला असतो. मात्र ज्या काव्यातला मुख्य विषय करुणरस हाच असेल, तेथे ('मरणा'चा समावेश करणे) सदोष नाही. किंवा विप्रलंभशृंगारातदेखील थोड्याच काळानंतर मृत व्यक्तीची पुनर्भेट होणे संभवनीय असले, तर मरणाचाही एखादेवेळी उल्लेख करणे अगदीच विरोधी होईल असे नाही. पण दीर्घकाळानंतरच मृत व्यक्ति पुन्ह भेटण्याचा संभव असल्यास माप्र त्या विप्रलंभ शृंगाराचा प्रवाह मध्ये तुटल्यासारखाच होतो, म्हणून रसाभिव्यक्ति करणे हे मुख्य उद्दिष्ट असलेल्या कवीने अशा तऱ्हेचा (मरणाचा) वृत्तान्त विप्रलंभशृंगारात समाविष्ट करणे (हे मूळ ग्रन्थाला धरून असले तरी) टाळावे.

त्यांपैकी प्रस्तुत रसाला पुरेशी उत्कटता प्राप्त झाली असल्याने विरोधी रसाची अंगे प्रस्तुत रसाकडून बाधित होतील अशा रीतीने त्यांचा समावेश केल्यास तो निर्दोष होतो याचे उदाहरण पुढीलप्रमाणे :—

"कोठे हे अश्लाघ्य कृत्य आणि कोठे चंद्रापासून उत्पन्न झालेला वंश? ती पुन्हा देखील दिसेल का? मी जो शास्त्राभ्यास केला, तो अनिष्ट प्रवृत्तींना दडपून टाकण्यासाठी होता! ती रागावली तरी तिचे मुख किती सुंदर दिसत होते! आपले पाप नाहीसे केलेली कृतनिश्चयी (थोर) माणसे काय म्हणतील? ती स्वप्नातदेखील भेटणे अशक्य आहे. (माझ्या) मना, शांत हो. कोणा भाग्यशाली तरुणाला तिचे अधरपान [२अ] करायला मिळेल बरे?"

किंवा जसे महाश्वेतेसंबंधी पुंडरीकाला उत्कट प्रेम वाटू लागले असताना दुसऱ्या ऋषिकुमाराने (कपिंजलाने) त्याला केलेल्या [३] उपदेशाचे वेळी.

विरोधी रसाची अंगे नैसर्गिकपणेच प्रस्तुत रसाची अंगे होऊ शकल्यामुळे कोणताही दोष उत्पन्न होत नाही, याचे उदाहरण :—

'मेघरूपी सर्पापासून उत्पन्न होणारे विष (१. पाणी, २. जहर) हे विरहिणींना चक्कर येणे, कशातच गोडी न वाटणे, अंतःकरणास बधिरता येणे, डोळ्यांपुढे अंधेरी, गुंगी, बेशुद्धी, शरीराला ग्लानि येणे आणि मरण असे परिणाम जबरदस्तीने भोगावयास लावते. [४]

अशा सारख्या ठिकाणी. (अंगत्व) कृत्रिम म्हणजे कविकल्पित असतानासुद्धा कोणताही दोष उत्पन्न होत नाही, याचे उदाहरण—

'तुझे फिकट, क्षीण झालेले मुख'....इत्यादि पद्य. किंवा जसे :—

'प्रियेने रागावून सायंकाळी मैत्रिणींच्या देखत'...इत्यादि पद्य. [५]

विरोधी रसाचे अंग हे प्रस्तुत रसाचे अंग होण्याचा आणखी एक प्रकार असा :— वाक्यात प्रस्तुत असल्यामुळे एक अर्थ मुख्य असताना परस्परविरोधी असणारे दोन रस किंवा दोन भाव त्या मुख्य वाक्यार्थाची अंगे म्हणून समाविष्ट केल्यास त्यातही मुळींच दोष नाही. जसे 'प्रियेचा नुकताच अपराध केलेल्या प्रियकराप्रमाणे...' इ. उदाहरणाचे वेळी [६] सांगितले, त्याप्रमाणे. 'त्या उदाहरणात विरोध कसा काय नाही?' असे विचाराल, तर ते दोनही तिसऱ्याची अंगे म्हणून तेथे समाविष्ट केली आहेत हे आमचे उत्तर.

लोचनम्

एवं विरोधिनां परिहारे सामान्येनोक्ते प्रतिप्रसवं नियतविषयमाहविवक्षित इति । बाध्यानामिति । बाध्यत्वाभिप्रायेणाङ्गत्वाभिप्रायेण वेत्यर्थः । अच्छला निर्दोषेत्यर्थः । बाध्यत्वाभिप्रायं व्याचष्टे - बाध्यत्वं हीति । अङ्गभावाभिप्रायमुभयथा व्याचष्टे । तत्र प्रथमं स्वाभाविकप्रकारं निरूपयति तदङ्गानामिति । निरपेक्षभावतया सापेक्षभावविप्रलम्भशृङ्गारविरोधिन्यपि करुणे ये व्याध्यादयस्सर्वथाङ्गत्वेन दृष्टाः, तेषामिति । ते हि करुणे भवन्त्येव त एव च भवन्तीति । शृङ्गारे तु भवन्त्येव नापि त एवेति । अतदङ्गानामिति । यथालस्यौग्र्यजुगुप्सानामित्यर्थः । तदङ्गत्वे चेति । 'सर्व एव शृङ्गारे व्यभिचारिण' इत्युक्तत्वादिति भावः । आश्रयस्य स्त्रीपुरुषान्यतरस्याधिष्ठानस्यापाये रतिरेवोच्छिद्येत, तस्या जीवितसर्वस्वाभिमानरूपत्वेनोभयाधिष्ठानत्वात् ।

प्रस्तुतस्येति । विप्रलम्भस्येत्यर्थः । काव्यार्थत्वमिति । प्रस्तुतत्वमित्यर्थः । नन्वेवं सर्व एव व्यभिचारिण इति विघटितमित्याशङ्क्याहशृङ्गारे वेति । अदीर्घकाले यत्र मरणे विश्रान्तिपदबन्ध एव नोत्पद्यते तत्रास्य व्यभिचारित्वम् । कदाचिदिति । यदि तादृशीं भङ्गिं घटयितुं सुकवेः कौशलं भवति । यथ—

तीर्थे तोयव्यतिकरभवे जह् नुकन्यासरय्वो-
र्देहन्यासादमरगणनालेख्यमासाद्य सद्यः ।
पूर्वाकाराधिकचतुरया सङ्गतः कान्तयासौ
लीलागारेण्वरमत पुनर्नन्दनाभ्यन्तरेषु ॥

अत्र स्फुटैव रत्यङ्गता मरणस्य । अत एव सुकविना मरणे पदबन्धमात्रं न कृतम्, अनूद्यमानत्वेनैवोपनिबन्धनात् । पदबन्धनिवेशे तु सर्वथा शोकोदय एवातिपरिमितकालप्रत्यापत्तिलाभेऽपि ।

अथ दूरपरामर्शकसहृदयसामाजिकाभिप्रायेण मरणस्यादीर्घकालप्रत्यापत्तेरङ्गतोच्यते, हन्त तापसवत्सराजेऽपि यौगन्धरायणादिनीतिमार्गाकर्णनसंस्कृतमतीनां वासवदत्तामरणबुद्धेरेवाभावात्

करुणस्य नामापि न स्यादित्यलमवान्तेरण बहुना । तस्माद्दीर्घकालतात्र पदबन्धलाभ एवेति मन्तव्यम् । एवं नैसर्गिकाङ्गता व्याख्याता । समारोपितत्वे तद्विपरीतेत्यर्थलब्धत्वात् स्वकण्ठेन न व्याख्याता ।

एवं प्रकारत्रयं व्याख्याय क्रमेणोदाहरति - तत्रेत्यादिना । क्वाकार्यमिति । वितर्क औत्सुक्येन, मतिः स्मृत्या, शङ्का दैन्येन, धृतिश्चिन्तया च बाध्यते । एतच्च द्वितीयोद्योतारभ्भ एवोक्तमस्माभिः । द्वितीयेति । विपक्षीभूतवैराग्यविभावाद्यवधारणेऽपि ह्यशक्यविच्छेदत्वे न दार्ढ्यमेवानुरागस्योक्तं भवतीति भावः । समारोपितायामिति । अङ्गभावप्राप्ताविति शेषः ।

पाण्डुक्षामं वक्त्रं हृदयं सरसं तवालसं च वपुः ।
आवेदयति नितान्तं क्षेत्रियरोगं सखि हृदन्तः ॥

अत्र करुणोचितो व्याधिः श्लेषभङ्ग्या स्थापितः । कोपादिति बद्ध्वेति हन्यत इति रौद्रानुभावानां रूपकबलादारोपितानां तदनिर्वाहादेवाङ्गत्वम् । तच्च पूर्वमेवोक्तं 'नातिनिर्वहणैषिता' इत्यत्रान्तरे । अन्येति । चतुर्थोऽयं प्रकार इत्यर्थः । पूर्वं हि विरोधिनः प्रस्तुतरसान्तरेऽङ्गतोक्ता, अधुना तु द्वयोर्विरोधिनोर्वस्त्वन्तरेऽङ्गभाव इति शेषः । क्षिप्त इति । व्याख्यातमेतत् 'प्रधानेऽन्यत्र वाक्यार्थे' इत्यत्र ।

लोचन

याप्रमाणे प्रस्तुत रसाला विरोधी गोष्टी कशा टाळाव्या याबाबत (१८ व्या कारिकेत) सर्वसामान्य नियम सांगून झाल्यावर विशिष्ट प्रसंगी या नियमाला अपवाद कसे असतात हे 'पण अभिप्रेत रसाला' इ. कारिकेने सांगितले जात आहे. 'बाधित होऊ शकणारी —' त्यांना बाधित करण्याच्या उद्देशाने किंवा त्यांना मुख्य रसाचे अंगत्व देण्याच्या उद्देशाने (ती समाविष्ट केली तर) असा अर्थ. **अच्छला**— दोषरहित, असा **अर्थ.** 'बाधित होऊ शकणारी' याचे विवरण 'ती विरोधी अंगे बाधित होणे' इ. शब्दांनी केले जात आहे. 'अंगत्व देऊन' याचे विवरण वृत्तिकार दोन प्रकारांनी करितात. त्यांपैकी पहिल्याने स्वाभाविक अंगत्वाचे विवरण ते 'त्याची व्याधि वगैरे जी अंग करुण रसाचीही नैसर्गिक अंगे असतील' इ. शब्दांनी करितात. प्रिय व्यक्तीच्या पुनर्भेटीची ज्यात आशा असते अशा विप्रलंभ शृंगाराच्या विरुद्ध असलेल्या म्हणजे ज्यात पुनर्भेटीची आशा नसते अशा करुण रसाच्या चित्रणाचे वेळी त्या (विप्रलंभशृंगार) रसाची व्याधि वगैरे जी अंगे नेहमीच असताना आढळतात[७], त्यांचेच (वर्णन करणे) असा अर्थ कारण ती (व्याध्यादि अंगे) करुणरसातच नेहमी असतातच आणि तीच विशिष्ट अंगे करुण रसात असलेली दिसतात. (इतर अंगे दिसत नाहीत). मात्र विप्रलंभ शृंगारात ती व्याध्यादि अंगे असतातच, पण तीच तेवढी विप्रलंभशृंगारात असतात असे नाही.[८] 'त्याहून इतर अंगांचे म्हणजे विप्रलंभशृंगाराचीही अंगे नसलेल्या अंगांचे उदा.— आलस्य, उग्रपणा, जुगुप्सा (तिटकारा) यांचे असा अर्थ. 'आणि मरण हे विप्रलंभाचे अंग—' 'सर्वच व्यभिचारिभाव हे शृंगार रसाला अंगभूत होऊ शकतात' असे भरतमुनींनी [९] म्हटले असल्यामुळे हा भावार्थ. 'आश्रय' म्हणजे रतीचा आधारच असलेली स्त्री व पुरुष या दोहोंपैकी एकाचा नाश झाला असताना रतिभावच मुळासकट उखडून निघेल, कारण स्त्री व पुरुष यांनी एकमेकांना आपले जीवितसर्वस्व मानणे हेच रतिभावाचे स्वरूप असल्याने तो रतिभाव दोघांच्याही आधाराने राहणारा असतो. 'प्रस्तुत' रसाचा म्हणजे विप्रलंभ शृंगाररसाचा (नाश झालेला असल्याने) कसा अर्थ. मुख्य विषय म्हणजे प्रस्तुत विषय. "पण काय हो, असे असल्यास 'सर्वच व्यभिचारिभाव शृंगारात असू शकतात' या भरतमुनींच्या म्हणण्याला बाध येतो [१०]" अशी शंका लक्षात घेऊन वृत्तिकार तिला 'किंवा शृंगारातदेखील' इ. वाक्याने उत्तर देतात. ज्या उदाहरणात मरण ही अवस्था

फार काळ टिकत नाही (व लवकरच नायकनायिकांचा समागम होतो) आणि जेथे कवि हा मरणाचे वर्णन विस्ताराने करीत बसत नाही, तेथे 'मरण' हा शृंगाराचा व्यभिचारिभाव होऊ शकेल. 'एखादे वेळी' जर थोर कवीच्या अंगी त्या प्रकारे [११] वर्णन करण्याचे कौशल्य असेल तर, जसे :—

गंगा आणि सरयू यांच्या जलप्रवाहांच्या संगमामुळे निर्माण झालेल्या तीर्थात म्हणजे पवित्र ठिकाणी देह ठेवून तो लगेच देवांपैकी एक म्हणून मान्यता पावला व पूर्वीच्या रूपापेक्षा अधिक आकर्षक रूप प्राप्त झालेल्या [१२] आपल्या प्रिय पत्नीशी त्याचे पुनर्मीलन होऊन तो तिजबरोबर नंदनवनातील क्रीडागृहांमध्ये विहार करू लागला. [१३]

या श्लोकात मरण हे नंतरच्या काळातील अजाच्या रतीचे अंगच [१४] झाले आहे ही गोष्ट स्पष्टच आहे. म्हणूनच हा श्रेष्ठ कवि 'मरण' या अवस्थेवर मुळीच रेंगाळला नाही, [१४अ] तर त्याचा उल्लेख त्याने अनुवादरूपानेच (म्हणजे केवळ जाताजाताच) केला आहे. (अज राजाच्या) मरणाचे त्याने अधिक वर्णन केले असते, तर अगदी थोड्या वेळाने त्याला प्रिय पत्नीचा जरी पुन्हा लाभ झाला असला, तरीही वाचकांच्या मनात निश्चितपणे शोकाचा उदय झाला असता.

यावर रसिक वाचक हा दुरूनच [१५] काव्याचा आस्वाद घेत असल्यामुळे व त्याला अज व इंदुमती यांचे पुनर्मीलन जरी दीर्घ काळानंतर झाले असते तरी त्या वाचकाला ते फार थोड्याच काळानंतर झाल्यासारखे वाटले असते, म्हणून 'मरण' हे विप्रलंभरतीचे अंगच होय असे म्हणणे असेल, तर मग 'तापसवत्सराजा' तही योगंधरायण वगैरे अमात्यांच्या राजनैतिक बेतांचे वर्णन कानांवर पडून (रसिक प्रेक्षकांच्या मनाला वासवदत्ता व उदयन यांचे पुनर्मीलन होणार याची पूर्ण जाणीव झाली असल्यामुळे) वासवदत्ता मृत्यु पावली आहे असे रसिक प्रेक्षकांना वाटतच नाही, व म्हणून तेथे त्यांच्या दृष्टीने करुण रसाचे नावदेखील उरणार नाही. [१६] तेव्हा आता अवांतर गोष्टीची चर्चा पुरे. म्हणून प्रस्तुत संदर्भात 'दीर्घकाळ टिकणारे (मरण)' या शब्दांचा अर्थ 'कवीने त्याचे विस्ताराने वर्णन केलेले असणे' असाच समजावा. [१७] अशा रीतीने विरोधी भाव हे प्रस्तुत स्थायिभावाचे नैसर्गिकपणे अंग कसे होऊ [१८] शकतात, याचे विवरण केले. त्या भावांच्या ठिकाणी विरोधी रसाचे अंगत्व हे जेव्हा कविकल्पनेमुळे म्हणजे (कृत्रिमपणे) निर्माण होते, तेव्हा वर (नैसर्गिक अंगांचे) जे विवरण केले, त्याच्या उलट परिस्थिति असते असे (तर्काने) समजून येत असल्याने कृत्रिमपणे प्राप्त होणाऱ्या अंगत्वाचे स्वरूप वृत्तिकारांनी स्वतःच्या शब्दांनी वर्णन करून सांगितले नाही.

अशा रीतीने विरोधी रसाच्या अंगांचा समावेश (दोष टाळून) तीन प्रकारांनी कसा करता येईल याचे विवरण केल्यावर वृत्तिकार 'त्यांपैकी प्रस्तुत रसाला' इ. शब्दांनी त्या प्रकारांची क्रमाने उदाहरणे देतात. 'कोठे हे अश्लाघ्य कृत्य' यात (१ ल्या ओळीत) औत्सुक्याने वितर्काचा, (२ ऱ्या ओळीत) स्मृतीने मतीचा, (३ ऱ्या ओळीत) दैन्याने शंकेचा आणि (४ थ्या ओळीत) चिंतेने धृतीचा बाध होत आहे. आणि हे आम्ही दुसऱ्या उद्‌द्योताच्या प्रारंभीच सांगितले आहे. [१९] 'दुसऱ्या ऋषिकुमाराने' इ.— (विप्रलंभशृंगाराला) विरोधी असणाऱ्या वैराग्याच्या विभाव वगैरेंचा बोध होत असला तरी त्यांमुळे पुंडरीकाच्या मनातील विप्रलंभरति दूर होणे अशक्य असल्याने त्या रतीची दृढताच सूचित केली गेली आहे, [२०] असा आशय. 'कविकल्पित असताना' यापूर्वी 'अंगत्व' या शब्दाची भर घालून वाक्याचा अर्थ पूर्ण करावा.

'हे सखे, तुझा हा फिकट व क्षीण झालेला चेहरा, चंदनरसाचा लेप लावलेले हृदय आणि सुस्तावलेले शरीर ही चिन्हे तुझ्या अंतःकरणामध्ये क्षेत्रिय रोग विकोपाला गेला आहे, हे सूचित करीत आहेत. [२१] या उदाहरणात करुण रसाचे व्याधि (म्हणजे सरसहृदययुक्त असाध्य रोग) हे अंग द्व्यर्थी शब्दांचा [२२] उपयोग करून (विप्रलंभ शृंगारावर) (कृत्रिमपणे) लादले आहे. [२३]

'रागावून', 'बांधून', 'बडवीत राहिली' हे (वस्तुतः) रौद्र रसाचे अनुभाव आहेत, [२४] पण ईर्ष्याविप्रलंभरतीवर त्या अनुभावांचा आरोप कवीने येथे रूपकाच्या सामर्थ्याने केला असल्यामुळे व ते रूपक कवीने पूर्ण न करिता मध्येच सोडून दिले असल्यामुळे ते अनुभाव प्रस्तुत असलेल्या विप्रलंभ शृंगाराचे अंग होत आहेत. आणि ही गोष्ट पूर्वीच (प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'शृंगारध्वनीत रूपकादि अलंकार घालताना दक्षता घ्यावयास हवी'" वरील) 'त्यांचा वाजवीपेक्षा जास्त विचार करण्याची इच्छा बाळगू नये' या १८ व्या कारिकेच्या अंशाच्या (प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'ती दक्षता म्हणजे ४) रसपरिपोषाला विघ्न करणारा अलंकारांचा अतिविस्तार टाळावा वरील) विवरणात सांगितली गेली आहे. 'आणखी एक प्रकार' – हा चवथा [२५] प्रकार होय, असा अर्थ. कारण पूर्वी विरोधी रसाची अंगे प्रस्तुत रसाला कोणकोणत्या पद्धतीने उपकारक होऊ शकतात ते सांगितले, तर आता परस्परविरोधी असे दोन भाव तिसऱ्याच गोष्टीची (म्हणजे प्रस्तुत वाक्यार्थाची) अंगे कशी होतात हे दाखविले जात आहे, हे तात्पर्य. 'प्रियेचा नुकताच' इ. – या श्लोकाचे विवरण पूर्वी (प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'रसादि अलंकाराचे दोन प्रकार - २) संकीर्ण' व 'वस्तुतः रसध्वनि हाच आत्मा व अलंकार्य' वर) 'पण ज्या काव्यात दुसराच' इ. कारिकेच्या स्पष्टीकरणाचे वेळी केले आहे.

टीपा

१) आलंबन–विभावाचा जर कायमचा नाश झाला असेल, तरच तेथे करुणरस संभवतो. तसा नाश न होता पुनर्भेटीची शक्यता असेल, तर तेथे विप्रलंभशृंगार संभवेल. आलंबन–विभावाचा कायमचा नाश होणे व पुनर्भेटीची शक्यता असणे या दोन गोष्टी एकाच वेळी संभवत नाहीत, म्हणून हे दोन रस परस्परविरोधी मानले आहेत. मात्र व्याधि वगैरे काही अंगे विप्रलंभ शृंगार व करुण या दोन्ही रसांना साधारण आहेत.

१ अ) 'मरण' याचा अर्थ प्रत्यक्ष मृत्यू न घेता 'मरण येणार अशी भावना' असा घ्यावा, असे अभिनवगुप्तांनी अन्य मत, म्हणून अभिनवभारतीत (रसभावविचार, पृ. २५०–२५१ येथे) उल्लेखिले आहे.

२) आश्रय म्हणजे नायक किंवा नायिका यांपैकी एकाचा नाश झाल्यास रतिभावच नष्ट होईल, कारण स्त्रीपुरुषांनी एकमेकांना आपले जीवितसर्वस्व मानणे असे रतीचे स्वरूप असल्यामुळे रति ही त्या उभयतांच्या ठिकाणी असते.

२अ) काव्यप्रकाश, उल्लास ४, पृ. १२६ (झळकीकर आवृत्ति) येथे **पास्यति** या ऐवजी असा **धास्यति** पाठ आहे.

३) कादम्बरी, पीटर्सनची आवृत्ति, पृ. १४६.

४) या उदाहरणातील चक्कर येणे वगैरे अनुभाव करुण रसाचे असले, तरी ते विप्रलंभाचेही असू शकतात, म्हणून त्यांच्या ठिकाणी विप्रलंभाचे 'नैसर्गिक' अंगत्व आहे. येथे श्लेष या कृत्रिम उपायाचा वापर करावा लागला नसल्याने कृत्रिमपणा आलेला नाही.

५) या श्लोकात 'रागावून', 'बांधून,' बडवीतच राहिली', इ. रौद्ररसाचे अनुभाव रूपकाच्या सामर्थ्यानेच कृत्रिमपणे आणले आहेत. त्या रूपकाचा विस्तार न केल्यानेच ते अनुभाव विप्रलंभाचे अंग झाले आहेत. अशा रीतीने 'तुझे फिकट...' इ. उदाहरणात श्लेषाचा व या म्हणजे 'प्रियेने रागावून...' इ. उदाहरणात रूपकाचा वापर करून अंगत्व साधले आहे.

६) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – २ 'रसादि अलंकाराचे दोन प्रकार - २) संकीर्ण'".

७) हे विवरण द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रसाची अंगेसुद्धा मुख्य रसाला कोणकोणती दक्षता घेतल्यास बाधक होत नाहीत याचे विवरण'" वरील **तदङ्गानाम्** या शब्दाचे आहे. जी अंगे विप्रलंभशृङ्गार व करुण या दोन्ही रसांना साधारण असतील त्या अंगांचा समावेश (विप्रलंभ शृंगाराच्या चित्रणाचे वेळी करावा) असा अर्थ. इतर अंगे म्हणजे जी या उभय रसांना साधारण नसतील अशी. म्हणजे केवळ करुण रसाचीच अंगे.

८) नाट्यशास्त्र, अध्याय ६ मध्ये विप्रलंभ व करुण यांची जी अंगे सांगितली आहेत, त्यांपैकी दोन्ही रसांना साधारण असलेली अंगे पुढीलप्रमाणे :– निर्वेद, ग्लानि, औत्सुक्य, चिंता, जाड्य, श्रम, व्याधि, उन्माद, अपस्मार व मरण. केवळ विप्रलंभ शृंगारामध्ये आढळणारी अंगे म्हणजे शंका, असूया, निद्रा, सुप्त, स्वप्न इ. आणि केवळ करुण रसामध्ये आढळणारी आवेग, भ्रम, मोह, भय, विषाद, दैन्य, त्रास, आलस्य, स्तंभ, वेपथु, वैवर्ण्य, अश्रु इ.

९) भरतमुनींच्या नाट्यशास्त्र, अध्याय ६ मध्ये (पाहा, रसभावाविचार, कंगले आवृत्ति पृ. २४८) **व्यभिचारिणश्चास्य आलस्यौग्र्यजुगुप्सावर्ज्याः** असे म्हटले आहे. त्यावरून (हे तीन व्यभिचारिभाव सोडून) इतर सर्व व्यभिचारिभाव शृंगार रसाला अंगभूत होऊ शकतात असा अभिनवगुप्तांनी निष्कर्ष काढला आहे.

१०) आलस्य, औग्र्य व जुगुप्सा हेच व्यभिचारिभाव भरतांनी शृंगाररसात वर्ज्य म्हणून सांगितले आहेत त्यांत मरणाचा अंतर्भाव नाही.

११) त्या प्रकारे म्हणजे मरणाची अवस्था फार काळ न टिकविता पुनर्भेटीचा प्रसंग आपल्या प्रतिभासामर्थ्याने निर्माण करून.

१२) मल्लिनाथाने **अधिकचतुरया** याऐवजी **अधिकतररुचा** असा पाठ घेऊन विवरण केले आहे. 'चतुर' या विशेषणाचा 'सुंदर' किंवा 'आकर्षक' हा अर्थ आपटे यांच्या कोशात नमूद केलेला आहे.

१३) रघुवंश, ८–९५.

१४) म्हणजे नंतर लाभलेल्या इंदुमतीसमागमाचे एक साधन म्हणून कवीने अजाच्या देहन्यासाचा केवळ एका शब्दातच उल्लेख केला आहे.

१४अ) यासारखाच आशय अभिनवभारतीमध्ये (रसभावविचार, पृ. २५०) अभिनवगुप्तांनी प्रकट केला आहे.

१५) म्हणजे काव्यातील प्रत्यक्ष घटनेपासून वाचक हा कालदृष्ट्या व स्थलदृष्ट्याही कितीतरी दूर अंतरावर असतो. त्यामुळे दोन घटनांमधील प्रत्यक्षात असलेल्या कालदृष्ट्या व देशदृष्ट्या मोठ्या असलेल्या अंतराचा वाचकाला संकोच झालासा वाटतो.

१६) अभिनवगुप्तांच्या या म्हणण्याचे तात्पर्य असे की, या श्लोकातून वाचकाला विप्रलंभरतीची प्रतीति येते याचे कारण कवीने अजाच्या मरणाची घटना फारच संक्षेपाने निर्देशिली आहे, हे होय.ती घटना त्याने विस्ताराने वर्णिली असती, तर वाचकांना करुण रसाची प्रतीति आली असती. वाचकांना ही विप्रलंभ–रतीची प्रतीति होते, ती मूळ घटनेपासून वाचक हे दूर अंतरावर असल्यामुळे त्यांना मरणानंतरचे पुनर्मीलन लवकर झाल्यासारखे वाटते म्हणून नव्हे, तर कवीने 'मरण' या घटनेचा अतिशय संक्षेपाने उल्लेख केला आहे म्हणूनच. तसेच 'तापसवत्सराजा' मध्ये उदयन व वासवदत्ता यांचे पुनर्मीलन होणार याची वाचकांना जरी आधी कल्पना आलेली असली, तरी त्यामुळे त्यांना उदयनाच्या शोकाची प्रतीति होत नाही असे नाही त्या शोकाची त्यांना उत्कटत्वाने प्रतीति ठिकठिकाणी होते याचे कारण उदयनाचा शोक कवीने सविस्तरपणे व प्रभावीपणे वर्णिला आहे हेच होय. पुढे काशी आवृत्ति, पृ. ४९८ वरील वृत्तीत **'अपारे काव्यसंसारे कविरेव प्रजापतिः । यथास्मै रोचते विश्वं तथेदं परिवर्तते ।'** हा जो श्लोक आला आहे, त्यामुळेही कवीच्या वर्णनकौशल्यावरच रसप्रतीति होणे अवलंबून असते हाच मुद्दा बळकट होतो.

१७) तसेच 'दीर्घकाळ न टिकणारे मरण' म्हणजे कवीने मरणाचे वर्णन झटकन आवरते घेतलेले असणे.

१८) नैसर्गिकपणे अंग होणे म्हणजे ते भाव दोन्ही रसांना साधारण असणे.

१९) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'भावोदय, भावप्रशम, भावसंधि व भावशबल'".

२०) म्हणजे या ठिकाणी विप्रलंभ रतीची अंगे ही निर्वेदाच्या अंगांची बाधक होतात. लोचनातील 'वैराग्य' हा शब्द शांत रसाच्या 'निर्वेद' या स्थायिभावाच्या अर्थाने वापरला आहे.

२१) हे पद्य प्रेमविह्वल नायिकेला उद्देशून तिच्या मैत्रिणीनें म्हटले आहे. या संदर्भाला अनुलक्षून 'क्षेत्रिय रोग' याचा अर्थ 'प्रीतीचा रोग' असा करावयाचा. 'क्षेत्रिय' यातील **'क्षेत्र'** या शब्दाचा अर्थ 'स्त्री' किंवा 'पत्नी' असा आहे. त्याला मत्वर्थी **'इय'** हा प्रत्यय लावल्याने 'क्षेत्रिय'याचा 'ज्याला पत्नी आहे असा पुरुष' असा अर्थ होतो, अशा पुरुषावर नायिकेचे प्रेम जडले असल्यामुळे तिला क्षेत्रिय रोग म्हणजे क्षेत्रिय पुरुषावरील प्रीतीमुळे उद्भवलेला रोग जडला आहे असे म्हटले आहे.

२२) 'क्षेत्रिय' या शब्दाचा दुसरा अर्थ 'असाध्य रोग' असा आहे. पाहा. अष्टाध्यायीमधील **क्षेत्रियच् परक्षेत्रे चिकित्स्यः ।** (५–२–९२) हे सूत्र, **परक्षेत्रे चिकित्स्यः** म्हणजे ज्याचे निवारण याच देही (क्षेत्र = देह) करणे शक्य नाही, दुसरा देह प्राप्त होण्याचे वेळी म्हणजे मृत्यूनंतरच ज्याचे निवारण करिता येईल असा. या उदाहरणातील **'सरस'** या शब्दाचा दुसरा अर्थ 'अन्नरसयुक्त' म्हणजे अन्नाचे पचन नीट न झाल्यामुळे कच्चा अन्नरस ज्याच्यात मिसळला आहे असे (हृदय).

२३) या उदाहरणात विप्रलंभरति हा स्थायिभाव प्रस्तुत आहे. या पद्यात वर्णिलेली फिकट, क्षीण झालेला चेहरा आणि सुस्तावलेले शरीर ही अंगे (म्हणजे अनुभाव) विप्रलंभ शृंगार व करुण या दोहोंनाही साधारण आहेत. म्हणजे या अंगांच्या बाबतीतले साम्य हे नैसर्गिक, स्वाभाविक आहे, पण 'सरस' हृदय व 'क्षेत्रिय' रोग हे शब्द मात्र या दोन रसांचे बाबतीत वेगवेगळ्या अर्थाने घ्यावयाचे आहेत. म्हणजे या दोन लक्षणांमधील साम्य हे केवळ श्लेषावर अधारलेले, अतएव कृत्रिम आहे.

२४) हा संपूर्ण श्लोक प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'ती दक्षता म्हणजे – ४) रसपरिपोषाला विघ्न करणारा अलंकारांचा अतिविस्तार टाळावा'" वर आला आहे. रागावणे, बांधणे, व बडविणे हे वस्तुतः रौद्राचे अनुभाव आहेत असे अभिनवगुप्त म्हणतात, पण ते ईर्ष्याविप्रलंभाचे बाबतीतही असू शकतात. म्हणजे हे अनुभाव उभयरससाधारण असल्यामुळे ते विप्रलंभाचे कृत्रिमपणे अंग होतात असे नसून स्वाभाविकपणेच होतात असे आम्हास वाटते.

२५) (१) विरोधी रस प्रस्तुत रसाकडून बाधित होणे, (२) विरोधी रसाचे अंग हे नैसर्गिकपणेच प्रस्तुत रसाचे अंग असणे व (३) विरोधी रसाचे अंग हे कृत्रिमपणे प्रस्तुतरसाचे अंग बनविले जाणे हे तीन प्रकार आतापर्यंत सांगून झाले. म्हणून आता सांगितला जाणारा हा चवथा प्रकार होय.

ध्वन्यालोकः

अन्यपरत्वेऽपि विरोधिनोः कथं विरोधनिवृत्तिरिति चेत्, उच्यते । विधौ विरुद्धसमावेशस्य दुष्टत्वं नानुवादे ।

यथा—
एहि गच्छ पतोत्तिष्ठ वद मौनं समाचर ।
एवमाशाग्रहग्रस्तैः क्रीडन्ति धनिनोऽर्थिभिः ॥

इत्यादौ । अत्र हि विधिप्रतिषेधयोरनूद्यमानत्वेन समावेशे न विरोधस्तथेहापि भविष्यति । श्लोके ह्यस्मिन्नीत्रीर्ष्याविप्रलभ्भशृङ्गारकरुणवस्तुनोर्न विधीयमानवत्वम् । त्रिपुररिपुप्रभावातिशयस्य वाक्यार्थत्वात्तदङ्गत्वेन च तयोर्व्यवस्थानात् ।

ध्वन्यालोक

'ते दोन विरोधी रस तिसऱ्याची अंगे झाले, तरी त्यांच्यामधला विरोध कसा नाहीसा होतो?' असा प्रश्न कराल, तर सांगतो. दोन विरोधी गोष्टींचे मुख्य म्हणून विधान करणे [१] हे दोषास्पद आहे. पण त्यांचाच निर्देश दुसऱ्याचे अंग म्हणून केला, तर तो दोषास्पद नाही. जसे :—

"ये, जा; पड, उठ; बोल, गप्प बैस; असे म्हणून श्रीमंत लोक आशारूपी पिशाचाने पछाडलेल्या याचकांशी खेळत असतात;"

अशासारख्या उदाहरणांमध्ये. कारण येथे जसा विधि आणि निषेध यांचा उल्लेख श्रीमंतांच्या क्रीडेचे अंग म्हणून करणे दोषास्पद नाही, तसेच 'प्रियेचा नुकताच अपराध केलेल्या' या उदाहरणामध्येही दोष नाही असे समजावे. कारण या श्लोकामध्ये ईर्ष्याविप्रलंभ शृंगार व करुण यांची अभिव्यक्ति करणारे अर्थ मुख्य म्हणून विवक्षित नाहीत. त्रिपुराचा शत्रु जो शंकर, त्याचा थोर प्रभाव हा या उदाहरणामध्ये मुख्यत्वाने प्रतिपाद्य अर्थ आहे. आणि ते दोन अर्थ त्याला अंगभूत आहेत.

लोचनम्

नन्वन्यपरत्वेऽपि स्वभावो न निवर्तते, स्वभावकृत एव च विरोध इत्यभिप्रायेणाह– अन्यपरत्वेऽपीति । तत्स्वभावयोरिति हेतुत्वाभिप्रायेण विशेषणम् । उच्यत इति । अयं भाव :– सामग्रीविशेषपतितत्वेन भावानां विरोधाविरोधौ न स्वभावमात्रनिबन्धनौ शीतोष्णविरोधाभावात् विधाविति । तदेव कुरु मा कार्षोरिति यथा । विधिशब्देनात्रैकदा प्राधान्यमुच्यते । अत एवातिरात्रे षोडशिनं गृह्णन्ति न गृह्णन्तीति विरुद्धविधिर्विकल्पपर्यवसायीति वाक्यविदः । अनुवाद इति । अन्याङ्गतायामित्यर्थः । क्रीडाङ्गत्वेन ह्यत्र विरुद्धानामर्थानामभिधानमिति राजनिकटव्यवस्थिताततायिद्व्यन्यायेन विरुद्धानामप्यन्यमुखप्रेक्षितापरतन्त्रीकृतानां श्रौतेन क्रमेण स्वात्मपरामर्शेऽप्यविश्राम्यताम्, का कथा परस्परूपचिन्तायां येन विरोधः स्यात् । केवलं विरुद्धत्वादरुणाधिकरणस्थित्या यो वाक्यीय एषां पाश्चात्त्यः सम्बन्धः सम्भाव्यते स विघटताम् ।

लोचन

'पण काय हो, दोन परस्परविरोधी रस तिसऱ्या एकाच वाक्यार्थाचे अंग असले, तरी त्यांचा एकमेकांना विरोध करण्याचा स्वभावधर्म नाहीसा होणार नाही आणि तो विरोध तर त्यांच्या स्वभावामुळेच उत्पन्न झालेला असतो!' ही शंका कल्पून ती वृत्तिकार 'तिसऱ्याची अंगे झाली तरी' इ. शब्दांनी मांडीत आहेत. दोन विरोधी रस-- एकमेकांशी विरोध असणे हा त्या रसांचा स्वभावधर्म असतो, म्हणून त्या रसांना 'विरोधी असे हेतुगर्भ विशेषण लावले आहे. 'सांगतो' – वृत्तिकारांच्या उत्तरातील भावार्थ असा :– पदार्थांमध्ये विरोध असणे किंवा नसणे हे काही केवळ त्यांच्या परस्परविरोधी स्वभावावर अवलंबून असते असे नाही, तर त्यामधील तो विरोध किंवा अविरोध हा त्या पदार्थाभोवती विशिष्ट परिस्थिति असल्याने निर्माण होतो. काही विशिष्ट परिस्थिति असेल तर [१अ] शीत व उष्ण यांमधील विरोधही शिल्लक राहणार नाही. 'मुख्य म्हणून विधान करणे' – जसा 'एखादी विशिष्ट गोष्टच कर' आणि 'ती करू नको' या दोन वाक्यांमधील विरोध दोषास्पद ठरतो. (वृत्तीमधील) 'विधान करणे' या शब्दांनी येथे (दोन्ही विरोधी गोष्टींचे) एकाच वेळी समप्राधान्याने विधान करणे हा अर्थ दाखविला आहे. म्हणूनच 'अतिरात्रात षोडशीचे ग्रहण करितात [२] व '(अतिरा त्रात षोडशीचे) ग्रहण करीत नाहीत' या दोन परस्परविरोधी आदेशांचे पर्यवसान शेवटी विकल्पात होते असे वाक्यशास्त्राचे जाणकार (मीमांसक) म्हणतात. वृत्तीतील अनुवादे याचा अर्थ 'दुसऱ्याचे अंग म्हणून निर्देश केला गेला तर' असा करावा. कारण येथे 'ये, जा' इ.) पद्यात विरोधी क्रियाचे [३] वर्णन श्रीमंतांनी याचकांशी चालविलेल्या खेळाचे अंग म्हणून केले आहे. परस्परांचे वैरी असलेले दोघेजण जसे राजापुढे आरोपी म्हणून उभे राहतात, (व त्यावेळी ते एकमेकांशी विरोध करीत नाहीत), त्याप्रमाणे या पद्यातील परस्परविरुद्ध असलेल्या क्रियादेखील तिसऱ्याच एका क्रियेवर [४] अवलंबून असल्याने त्या परतंत्र झाल्या आहेत (व त्या एकमेकींना विरोध करू शकत नाहीत.) या श्लोकात ज्या विशिष्ट क्रमाने त्या क्रियांचा उच्चार केला गेला आहे, त्याच क्रमाने (प्रतीत होणाऱ्या) त्या क्रिया स्वतःचा विचार करण्यासही असमर्थ

आहेत, तर मग एकमेकींच्या स्वरूपाचा विचार करून त्या एकमेकींशी विरोध करतील, हा प्रश्नच उद्‌भवत नाही. अरुणाधिकरणामध्ये [५] तांबुस पिंगट डोळ्यांची, एक वर्षाची' इ. वाक्यामधे प्रत्येक विशेषणाचा अन्वय जसा क्रियेशी नीट जुळतो, [६] तसा प्रस्तुत संपूर्ण श्लोकाचा अन्वयनीट लागल्यावर मागाहून केवळ पूर्वार्धाचाच विचार करिताना 'ये, जा' इ. परस्पर विरोधी क्रियांचा अन्वय जुळत नाही असे वाटले, तर वाटेना का! (त्यामुळे काही बिघडत नाही.)

टीपा

१) कोणत्याही वाक्यामध्ये अनुवाद्य आणि विधेय असे दोन अंश असतात. अनुवाद्य हा अंश आधीपासून ज्ञात असल्याने तो गौण समजला जातो व विधेय म्हणजे नव्याने सांगितला जाणारा अंश हा मुख्य मानिला जातो. वृत्तीतील मूळ वाक्यात विधि आणि अनुवाद असे दोन शब्द विधेय आणि अनुवाद्य या अर्थी वापरले आहेत. त्यांचा मराठी अनुवाद आम्ही अभिनवगुप्तांस अनुसरून 'मुख्य म्हणून विधान केले असताना' व 'अंगे म्हणून निर्देश केला असताना' असा केला आहे.

१अ) म्हणजे उदा. भात तयार करिताना पाणी व अग्नि हे दोन परस्परविरोधी (कारण पाणी हे थंड व अग्नि हा उष्ण आहे) पदार्थही सहकार्य करितात. हा दृष्टांत पुढे द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रसाची अंगेसुद्धा मुख्य रसाला कोणकोणती दक्षता घेतल्यास बाधक होत नाहीत याचे विवरण'" वर अभिनवगुप्तांनी दिला आहे. तसेच सूर्याचे ऊन व पाणी यांचेही अंकुराची उत्पत्ति करण्याचे कामी सहकार्य असतेच.

२) अतिरात्र हा 'ज्योतिष्टोम' या महायागातील एक विशिष्ट यज्ञ आहे. 'षोडशि' म्हणजे सोमपात्र. अतिरात्रात षोडशिपात्र ग्रहण करितात व ग्रहण करीत नाहीत. ही दोन्ही वाक्ये तैत्तिरीय संहितेत आली आहेत. यातील ग्रहण करितात व ग्रहण करीत नाहीत या दोन्ही क्रिया विधेय कोटीतील असल्याने या दोहोंमध्ये समप्राधान्य आहे. अशा ठिकाणी म्हणजे श्रुतीने सांगितलेल्या दोन क्रियांमध्ये जेथे समप्राधान्य असते, तेथे एक क्रिया दुसरीचा बाध करू शकत नाही, म्हणून विकल्प मानावा असे मीमांसक सांगतात. म्हणजे प्रस्तुत उदाहरण ग्रहण करणे किंवा ग्रहण न करणे हे वैकल्पिक म्हणजे याग करणाऱ्याच्या मर्जीवर सोपविले आहे.

पण 'प्रियेचा नुकताच अपराध' इ. श्लोकामध्ये ईर्ष्याविप्रलंभरति व शोक हे स्थायिभाव एरवी परस्परविरोधी असले, तरी 'ते शंकराचा प्रभाव' या वाक्यार्थाचे अंग झालेले असल्यामुळे (म्हणजे ते विधेय कोटीत नसून अनुवाद्य कोटीत असल्यामुळे) त्यांच्यामध्ये समप्राधान्य नाही व म्हणून विरोधही नाही, तर गौणत्व आहे.

३) म्हणजे येणे–जाणे, पडणे, उठणे, बोलणे, गप्प बसणे; या त्या परस्परविरोधी क्रिया होत.

४) म्हणजे श्रीमंतांनी याचकांशी खेळणे या एका क्रियेवर.

५) अरुणाधिकरण म्हणजे जैमिनीय सूत्रांतील तिसऱ्या अध्यायाच्या पहिल्या पादातील ६ वे अधिकरण.

६) हे वाक्य **अरुणया एकहायन्या पिङ्गाक्ष्या गवा सोमं क्रीणाति ।** असे आहे. 'तांबुस रंगाची असणे, एक वर्षाची असणे व पिंगट डोळ्यांची असणे हे तीन धर्म ज्या गाईच्या ठिकाणी आहेत अशीच गाय देऊन सोम खरेदी करावा' असा सुसंगत अन्वय यातून निष्पन्न होतो.

ध्वन्यालोकः

न च रसेषु विध्यनुवादव्यवहारो नास्तीति शक्यं वक्तुम्, तेषां वाक्यार्थत्वेनाभ्युपगमात् । वाक्यार्थस्य वाच्यस्य च यौ विध्यनुवादौ तौ तदाक्षिप्तानां रसानां केन वार्येते । यैर्वा साक्षात् काव्यार्थता रसादीनां नाभ्युपगभ्यते तैस्तेषां तन्निमित्तता तावदवश्यमभ्युपगन्तव्या । तथाप्यत्र श्लोके न विरोधः । यस्मादनूद्यमानाङ्गनिमित्तोभयरसवस्तुसहकारिणो विधीयमानांशाद्भावविशेषप्रतीतिरुत्पद्यते ततश्च न कश्चिद्विरोधः । दृश्यते हि विरुद्धोभयसहकारिणः कारणात्कार्यार्वशेषोत्पत्तिः । विरुद्धफलोत्पादनहेतुत्वं हि युगपदेकस्य कारणस्य विरुद्धं न तु विरुद्धोभयसहकारित्वम् । एवंविधविरुद्धपदार्थविषयः कथमभिनयः प्रयोक्तव्य इति चेत्— अनूद्यमानैवंविधवाच्यविषये या वार्ता सात्रापि भविष्यति । एवं विध्यनुवादनयाश्रयेणात्र श्लोके परिहृतस्तावद्विरोधः ।

किं च नायकस्याभिनन्दनीयोदयस्य कस्यचित्प्रभावातिशयवर्णने तत्प्रतिपक्षाणां यः करुणो रसः स परीक्षकाणां न वैक्लब्यमादधाति, प्रत्युत प्रीत्यतिशयनिमित्ततां प्रतिपद्यत इत्यतस्तस्य कुण्ठशक्तिकत्वात्तद्विरोधविधायिनो न कश्चिद्दोषः । तस्माद्वाक्यार्थीभूतस्य रसस्य भावस्य वा विरोधी रसविरोधीति वक्तुं न्याय्यः, न त्वङ्गभूतस्य कस्यचित् ।

अथवा वाक्यार्थीभूतस्यापि कस्यचित्करुणरसविषयस्य तादृशेन शृङ्गारवस्तुना भङ्गिविशेषाश्रयेण संयोजनं रसपरिपोषायैव जायते । यतः प्रकृतिमधुराः पदार्थाः शोचनीयतां प्राप्ताः प्रागवस्थाभाविभिः संस्मर्यमाणैर्विलासैरधिकतरं शोकावेशमुपजनयन्ति । यथा —

अयं स रसनोत्कर्षी पीनस्तनविमर्दनः ।
नाभ्यूरुजघनस्पर्शी नीवीविस्रंसनः करः ॥

इत्यादौ । तदत्र त्रिपुरयुवतीनां शाभ्भवः शराग्निरार्द्रापराधः कामी यथा व्यवहरति स्म तथा व्यवहृतवानित्यनेनापि प्रकारेणास्त्येव निर्विरोधत्वम् । तस्माद्यथा यथा निरूप्यते तथा तथात्र दोषाभावः । इत्थं च —

क्रामन्त्यः क्षतकोमलाङ्गुलिगलद्रक्तैः सदर्भाः स्थलीः
पादैः पातितयावकैरिव पतद्बाष्पाम्बुधौताननाः ।
भीता भर्तृकरावलम्बितकरास्त्वद्वैरिनार्योऽधुना ।
दावाग्निं परितो भ्रमन्ति पुनरष्युद्यद्विवाहा इव ॥
इत्येवमादीनां सर्वेषामेव निर्विरोधत्वमवगन्तव्यम् ।

एवं तावद्रसादीनां विरोधिरसदिभिः समावेशासमावेशयोविषयविभागो दर्शितः ।

आणि यावर "रसांच्या बाबतीत मुख्य व अंग असा प्रकार नसतो. [१]" असे म्हणणे शक्य नाही, कारण रस हे वाक्याचा (व्यंग्य) अर्थ म्हणून मान्य झाले आहेत. वाच्य असणाऱ्या वाक्यार्थाच्या बाबतीत जर प्रधान आणि अंग असा संबंध असतो, तर वाच्यवाक्यार्थातून अभिव्यक्त होणाऱ्या रसांच्या बाबतीत तो अंग–प्रधान भाव कोणच्या कारणाने नाकारता येईल [२]? किंवा रसादि हे काव्याचा प्रत्यक्ष अर्थ असणे ज्यांना संमत नाही, त्यांनी काव्याचा वाच्य अर्थ असलेले जे विभावादि, ते रसादींच्या अभिव्यक्तीला निमित्तभूत असतात, हे तरी मान्य केलेच पाहिजे! तरीदेखील या श्लोकात विरोध नाही. कारण, अंग असलेले विभावादि हे ज्यांची निमित्ते आहेत अशा दोन रसरूपी अर्थाचे [३] सहकार्य लाभलेला जो वाक्याचा प्रधान, (म्हणजे शंकराच्या बाणातून निघालेला अग्नि तुमची पापे जाळून टाको हा) अर्थ, त्यामुळे विशिष्ट भावाची (म्हणजे कवीच्या शिवविषयक रतिभावाची) प्रतीति होते आणि त्यामुळे (करुण व विप्रलंभ शृंगार या दोहोंमध्ये) कोठलाही विरोध उत्पन्न होत नाही. कारण, परस्परविरुद्ध अशा दोन गोष्टी एकाच वेळी ज्याच्याशी सहकार्य करीत आहेत, अशा कारणापासून विशिष्ट कार्य उत्पन्न झाल्याचे व्यवहारात अनुभवास येतेच की! खरे म्हणजे एकाच कारणामुळे एकाच वेळी दोन परस्परविरोधी फळे उत्पन्न होणे यात विरोध आहे. त्या कारणाशी दोन परस्परविरुद्ध गोष्टींचे सहकार्य असणे यात विरोध नाही.

यावर 'अशा परस्परविरुद्ध (रसरूपी व्यंग्य) अर्थांचा अभिनय कसा करून दाखवावयाचा?' अशी शंका असेल तर तिचे उत्तर हेच की अंगभूत असे दोन वाच्यार्थ जेथे परस्परविरुद्ध असतात, तेथे [४] जसे होते तसेच या बाबतीतही [५] होईल! अशा रीतीने विधि–अनुवाद न्यायाचा अवलंब करून आम्ही या श्लोकाच्या बाबतीतला विरोध दूर केला.

आणखी असे की, ज्याचा उत्कर्ष स्वागतार्ह असतो, अशा एखाद्या नायकाचा थोर प्रभाव वर्णन करावयाचा असताना त्याच्या शत्रूंच्या बाबतीत जो करुण रस अभिव्यक्त केला जातो, तो (सहृदय) परीक्षकांना अप्रिय वाटत नाही. एवढेच नव्हे, तर उलट तो त्यांना अत्यंत आनंद वाटावयाश कारणीभूत होतो. यामुळे (तेथे) करुण रसाचे सामर्थ्य कुंठित होत [६] असल्याने तो जरी प्रस्तुत रसाच्या विरूद्ध असला तरी त्यात काही दोष नसतो. म्हणून कोणत्याही वाक्यात मुख्य असलेल्या रसाला किंवा भावाला जो विरोधी असेल त्यालाच रसाचा विरोधी म्हणणे योग्य होईल. अंगभूत असलेल्या कोणत्याही रसाला वा भावाला विरोधी असणाऱ्याला विरोधी म्हणणे योग्य होणार नाही.

किंवा मुख्य असलेल्या करुण रसाला अभिव्यक्त करणारा अर्थ त्याप्रकारच्या (म्हणजे तितक्याच मुख्य असणाऱ्या) शृंगाराला अभिव्यक्त करणाऱ्या अर्थाबरोबर जर विशेष कौशल्याने (म्हणजे अंग म्हणूनच) प्रतिपादिला, तर ते प्रतिपादन रसपरिपोषालाच कारणीभूत होते. कारण स्वभावतःच प्रिय असणाऱ्या गोष्टींना जर शोचनीय अवस्था प्राप्त झाली तर त्यांच्या पूर्वीच्या अवस्थेतील रमणीयतेची आठवण जास्तच शोककारक होते. जसे :–

हा तो हात–कमरपट्टा दूर करणारा, पुष्ट स्तन रगडणारा, नाभि, मांड्या व नितंबभाग यांना स्पर्श करणारा व लुगड्याच्या निरीची गाठ सोडणारा. [११ ७]

इत्यादि उदाहरणामध्ये. तेव्हा या (म्हणजे 'प्रियेचा नुकताच अपराध इ.) श्लोकात शंकराच्या बाणातून बाहेर पडणारा आगीचा लोळ हा नुकताच अपराध केलेला प्रियकर (त्यांचा) ज्याप्रमाणे वागत असे, त्याप्रमाणे वागला, या पद्धतीमुळेही या उदाहरणात (करुण व विप्रलंभ शृंगार यांमध्ये) विरोध नाहीच. म्हणून जसजसा विचार करावा तसतसा या पद्यात करुण व विप्रलंभ शृंगार यांमध्ये विरोध नसल्याचे दिसून येते. आणि याचप्रमाणे :—

'तुझ्या शत्रूंच्या स्त्रियांची मुखे अश्रुजलाच्या प्रवाहाने धुवून निघाली आहेत. दर्भ वाढलेल्या भूमीवरून चालून चालून नाजूक बोटातून रक्त गळल्यामुळे लाल भडक झालेल्या त्यांच्या पायांतून अळित्याचा द्रव निथळतो आहेसे वाटते. त्या घाबरल्यामुळे त्यांच्या पतींनी आपल्या हाताचा आधार त्यांच्या हातांना दिला आहे. अशा रीतीने आता त्या स्त्रिया वणव्याभोवती फिरत आहेत, त्यामुळे (त्याचा) विवाह—विधि पुन्हा होत आहेसे वाटते.

अशासारख्या सर्वच उदाहरणांमध्ये विरोधी मानल्या गेलेल्या रसांमधील विरोधाचा परिहार होतो, हे समजून घ्यावे.

अशा तऱ्हेने रसभावादींचा विरुद्ध रसभावादींबरोबर समावेश केव्हा करू नये व केव्हा करावा, हे तर दाखवले.

लोचनम्

ननु प्रधानतया यद्वाच्यं तत्र विधिः । अप्रधानत्वेन तु वाच्येऽनुवादः । न च रसस्य वाच्यत्वं त्वयैव सोढमित्याशङ्कमानः परिहरतिचेति न प्रधानाप्रधानत्वमात्रकृतौ विध्यनुवादौ । तौ च व्यङ्ग्यतायामपि । भवत एवेति भावः । मुख्यतया च रस एव काव्यवाक्यार्थ इत्युक्तम् । तेनामुख्यतया यत्र सोऽर्थस्तत्रानूद्यमानत्वं रसस्यापि युक्तम् । यदि वानूद्यमानविभादिसमाक्षिप्तत्वाद्रसस्यानूद्यमानता, तदाह-वाक्यार्थस्येति । यदि वा मा भूदनूद्यमानतया विरुद्धयो रसयोः समावेशः, सहकारितया तु भविष्यतीति सर्वथा विरुद्धयोर्युक्तियुक्तोऽङ्गाङ्गिभावो, नात्र प्रयासः । कश्चिदिति दर्शयति यैर्वेति । तन्निमित्ततेति । काव्यार्थो विभावादिर्निमित्तं येषां रसादीनां ते तथा, तेषां भावस्तत्ता । अनूद्यमाना ये हस्तक्षेपादयो रसाङ्गभूता विमावादयस्तन्निमित्तं यदुभयं करुणविप्रलम्भात्मकं रसवस्तु रससजातीयं, तत्सहकारि यस्य विधीयमानस्य शाम्भवशरवह्निजनितदुरितदाहलक्षणस्य, तर माद्भावविशेषे प्रेयोलङ्कारविषये भगवत्प्रभावातिशयलक्षणे प्रतीतिरिति सङ्गतिः । विरुद्धं यदुभयं वारितेजोगतं शीतोष्णं तत्सहकारि यस्य तण्डुलादेः कारणस्य, तस्मात्कार्यविशेषस्य कोमलभक्तकरणलक्षणस्योत्पत्तिर्दृश्यते । सर्वत्र हीत्थमेव कार्यकारणभाव । बीजाङ्कुरादौ नान्यथा ।

ननु विरोधस्तर्हि सर्वत्राकिञ्चित्करः स्यादित्याशङ्क्याह—विरुद्धप. लेति । तथा चाहु :— 'नोपादानं विरुद्धस्य' इति । नन्वभिनेयार्थे काव्ये यदीदृशं वाक्यं भवेत्तदा यदि समस्ताभिनयः क्रियते तदा विरुद्धार्थविषयः कथं युगपदभिनयः कर्तुं शक्य इत्याशयेनादाङ्कमान आह-एवमिति । एतत्परिहरति—अनूद्यमानेति । अनूद्यमानमेवंविधं विरुद्धाकारं वाच्यं यत्र तादृशो विषयः 'एहि गच्छ पतोत्तिष्ठ' इत्यादिस्तत्र या वार्ता सात्रापीति ।

एतदुक्तं भवति– 'क्षिप्तो हस्तावलग्न' इत्यादौ प्राधान्येन भीतविप्लुतादिवृष्ट्युपपादनक्रमेण प्राकरणिकस्तावदर्थः प्रदर्शयितव्यः । यद्यप्यत्र करुणोऽपि पराङ्गमेव तथापि विप्रलम्भापेक्षया तस्य तावन्निकटं प्राकरणिकत्वं महेश्वरप्रभावं प्रति सोपयोगत्वात् । विप्रलम्भस्य तु कामीवेत्युत्प्रेक्षोपमाबलेनायातस्य दूरत्वात् । एवं च साश्रुनेत्रोत्पलाभिरित्यन्तं प्राधान्येन करुणोपयोगाभिनयक्रमेण लेशतस्तु विप्रलम्भस्य करुणेन सादृश्यात्सूचनां कृत्वा । कामीवेत्यत्र यद्यपि प्रणयकोपोचितोऽभिनयः कृतस्तथापि ततः प्रतीयमानोऽप्यसौ विप्रलम्भः समनन्तराभिनीयमाने स दहतु दुरितमित्यादौ साटोपाभिनयसमर्पितो यो भगवत्प्रभावस्तत्राङ्गतायां पर्यवस्यतीति न कश्चिद्विरोधः । एतं विरोधपरिहारमुपसंहरतिएवमिति ।

विषयान्तरे तु प्रकारान्तरेण विरोधपरिहारमाह–किञ्चेति । परीक्षकाणामिति सामाजिकानां विवेकशालिनाम् । न वैक्लव्यमिति । न तादृशे विषये चित्तद्रुतिरुत्पद्यते करुणास्वादविश्रान्त्यभावात् । किन्तु वीरस्य योऽसौ क्रोधो व्यभिचारितां प्रतिपद्यते तत्फलरूपोऽसौ करुणरसः स्वकारणाभिव्यञ्जनद्वारेण वीरास्वादातिशय एव पर्यवस्यति । यथोक्तम्– 'रौद्रस्य चैव यत्कर्म स ज्ञेयः करुणो रसः' इति । तदाह– प्रीत्यतिशयेति । अत्रोदाहरणम्–

कुरबक कुचाघातक्रीडासुखेन वियुज्यसे
बकुलविटपिन् स्मर्तव्यं ते मुखासवसेवनम् ।
चरणघटनाशून्यो यास्यस्यशोक सशोकता –
मिति निजपुरत्यागे यस्य द्विषां जगदुः स्त्रियः ॥

भावस्य वेति । तस्मिन् रसे स्थायिनः प्रधानभूतस्य, व्यभिचारिणो वा यथा विप्रलम्भशृङ्गार औत्सुक्यस्य ।

अधुना पूर्वस्मिन्नेव श्लोके क्षिप्त इत्यादौ प्रकारान्तरेण विरोधं परिहरति– अथवेति । अयं चात्र भावः – पूर्व विप्रलम्भकरुणयोरन्यत्राङ्गभावगमनान्निर्विरोधत्वमुक्तम् । अधुना तु स विप्रलम्भः करुणस्यैवाङ्गतां प्रतिपन्नः कथं विरोधीति व्यवस्थाप्यते–तथाहि करुणो रसो नामेष्टजनविनिपातादेर्विभावादित्युक्तम् । इष्टता च नाम रमणीयतामूला । ततश्च कामीवार्द्रापराध इत्युत्प्रेक्षयेदमुक्तम् । शाम्भवशरवह्निचेष्टितावलोकने प्राक्तनप्रणयकलहवृत्तान्तः स्मर्यमाण इदानीं विध्वस्ततया शोकविभावतां प्रतिपद्यते । तदाह–भङ्गिविशेषेति । अग्राम्यतया विभावानुभावादिरूपताप्रापणया ग्राम्योक्तिरहितयेत्यर्थः । अत्रैव दृष्टान्तमाह–यथा अयमिति । अत्र भूरिश्रवसः समरमुवि निपतितं बाहुं दृष्ट्वा तत्कान्तानामेतदनुशोचनम् । रशनां मेखलां संभोगावसरेषूर्ध्वं कर्षतीति रसनोत्कर्षी । अमुना विरोधोद्धरणप्रकारेण बहुतरं लक्ष्यमुपपादितं भवतीत्यभिप्रायेणाहइत्थं चेति । होमाग्निधूमकृतं बाष्पाम्बु यदि वा बन्धुगृहत्यागदुःखोद्भवम् । भयं कुमारीजनोचितः साध्वसः । एवमियताङ्गभावं प्राप्तानामुक्तिरच्छलेति कारिकाभागोपयोगि निरूपितमित्युपसंहरति–एवमिति । तावद्ग्रहणेन वक्तव्यान्तरमप्यस्तीति सूचयति ॥ २० ॥

लोचन

'पण काय हो, जो अर्थ अभिधेच्या द्वारे मुख्य म्हणून वाच्य केला असेल, तो 'विधि' (म्हणजे विधेय कोटीतला) आणि जो गौणत्वाने वाच्य झाला असेल तो 'अनुवाद' (म्हणजे अनुवाद्य कोटीतला) असे नाही का? आणि रस हा वाच्य असणे ही कल्पनाही तुम्हाला मुळीच सहन होत नाही! [८], अशी शंका कल्पून वृत्तिकार 'आणि यावर रसांच्या बाबतीत' इ. वाक्याने त्या शंकेचे समाधान करितात. विधि असणे आणि अनुवाद असणे हे केवळ प्राधान्य आणि अप्राधान्य यांवरच अवलंबून असते. (वाच्यत्वावर किंवा व्यंग्यत्वावर अवलंबून नसते) आणि म्हणून ते [९] (रस या) व्यंग्य अर्थाच्या बाबतीतही असतातच, हा आशय. आणि रस हाच काव्यामधील वाक्याचा मुख्यत्वाने अर्थ असतो हे (आम्ही) मागे सांगितलेच आहे. [१०] त्यामुळे तो म्हणजे रस हा अर्थ जेथे अप्रधान असेल, तेथे तो अनुवाद्य कोटीतला असणे हे योग्यच होय. किंवा असे समजावे की, काही ठिकाणी रस हा अनुवाद्य कोटीतल्या विभावादिकांकडून सूचित होणारा असतो, म्हणून त्या रसाला अनुवाद्य मानिता येईल. म्हणून वृत्तिकार 'वाच्य असणाऱ्या वाक्यार्थाच्या बाबतीत' इ. सवाल करितात. किंवा विरुद्ध रसांचा अनुवाद्य म्हणून समावेश होतो हे मत जरी स्वीकारले नाही, तरी सहकारी [११] या नात्याने त्यांचा समावेश होईल; म्हणून विरुद्ध रस हे तिसऱ्या 'अंगी' चे (म्हणजे वाक्यार्थाचे) अंग होणे हे कोणत्याही दृष्टीने [१२] विचार केला तरी तर्कसंगतच आहे. ते सिद्ध करण्यासाठी काही विशेष धडपड करण्याची आवश्यकता नाही, हे वृत्तिकार 'किंवा रसादि हे' इ. वाक्याने सांगतात. 'रसादीच्या अभिव्यक्तीला निमित्तभूत' – काव्यातून वर्णिले जाणारे विभावादि ही ज्या रसादींची (सूचक) निमित्ते असतात, ते रसादि तशा प्रकारचे म्हणजे विभावादि निमित्तांवर अवलंबून असणे, हा **तन्निमित्तता** याचा अर्थ. ('प्रियेचा नुकताच अपराध' इ. श्लोकातील) रसांना अंगभूत असणारे, अनुवाद्य कोटीतले जे हातांनी झटकणे वगैरे विभावादि, ते (विभावादि) ज्यांची (सूचक) निमित्ते आहेत असे करुण व विप्रलंभशृंगार या स्वरूपाचे रसाच्या जातीचे [१३] जे अर्थ आहेत, ते विधेय कोटीतला 'शंकराच्या बाणातून पेटलेल्या अग्नीने उत्पन्न केलेला पापनाश' या स्वरूपाच्या अर्थाची सहकारी कारणे आहेत. त्या पापनाशामुळे विशिष्ट भावाची म्हणजे कवीच्या मनातील शंकराच्या अलौकिक प्रभावामुळे उत्पन्न झालेल्या शिवविषयक रतिभावाची प्रतीति होते व अशा रीतीची प्रतीति हा प्रेयोऽलंकाराचा विषय होतो [१४] असा अर्थ. 'कारण परस्परविरुद्ध—' पाणी आणि अग्नि यांच्या ठिकाणी असणारे थंडपणा व उष्णपणा हे गुणधर्म परस्परविरोधी आहेत. पण ते ज्यावेळी तांदूळ वगैरे कारणाशी सहकार्य करितात, त्यावेळी त्या तांदूळ वगैरे कारणाकडून मऊ भात तयार करणे या स्वरूपाच्या विशिष्ट कार्याची उत्पत्ति होताना दिसते. [१५] कारण बीजापासून अंकुर उत्पन्न होणे वगैरे सर्व ठिकाणी अशाच प्रकारचा [१६] कार्यकारण संबंध असतो, निराळ्या प्रकारचा नसतो.

'पण काय हो, असे मानिल्यास [१७] सगळीकडेच विरोध हा असून नसल्यासारखा म्हणजे निष्फळ होईल!' अशी शंका कल्पून वृत्तिकार 'दोन परस्परविरोधी फळे उत्पन्न होणे' इ. शब्दांनी उत्तर देतात. आणि याच आशयाची '(एकाच कारणापासून) दोन परस्परविरोधी फलांची उत्पत्ति होते हे मत (स्वीकार्य) नाही [१८]' अशी (कोणाची तरी) उक्ति आहे. 'पण काय हो. अभिनयप्रधान (म्हणजे नाटकासारख्या) काव्यामध्ये जर या प्रकारचे (म्हणजे 'प्रियेचा नुकताच अपराध' या प्रकारचे) वाक्य असेल, तर त्या संपूर्ण पद्याचा अभिनय करिताना करुण व विप्रलंभ शृंगार या दोन परस्परविरुद्ध रसांचा अभिनय एकाच वेळी करणे कसे शक्य आहे'? अशी शंका कल्पून वृत्तिकार ती शंका 'अशा परस्परविरुद्ध' इ. वाक्याने मांडतात. मग 'अंगभूत असे दोन वाच्यार्थ' इ. शब्दांनी त्या शंकेला उत्तर देतात. अशा प्रकारचे म्हणजे परस्परविरुद्ध असणारे दोन वाच्यार्थ जेथे अंगभूत (म्हणजे उद्देश्य कोटीतले) असतात, अशा 'ये, जा; पड, ऊठ' अशासारख्या उदाहरणात जसा अभिनय करितात, तसाच [१९] येथेही करावा!

वृत्तिकारांच्या या सर्व म्हणण्यातील भावार्थ असा :—

'प्रियेचा नुकताच आपराध केलेल्या 'इ. उदाहरणात क्रमाने घाबरलेली, गोंधळलेली वगैरे दृष्टि दाखवून मुख्यतः प्रस्तुत अर्थाचा (म्हणजे त्रिपुरासुराच्या स्त्रियांची झालेली दुरवस्था या अर्थाचा) अभिनय करून दाखवावयाचा आहे. जरी येथे करुण हादेखील दुसऱ्याचे (म्हणजे शिवविषयक रतीचे) अंगच आहे, तरी ईर्ष्याविप्रलंभाचे मानाने तो प्रस्तुताच्या (म्हणजे शिवविषयक रतीच्या) अधिक जवळचा आहे. कारण महेश्वराचा प्रभाव प्रकट करण्यास तोच उपयोगी आहे. [२०] पण विप्रलंभशृंगार हा 'प्रियकराप्रमाणे' या उत्प्रेक्षेच्या किंवा उपमेच्या [२१] सायर्थ्यानेच निर्माण झालेला असल्यामुळे तो प्रस्तुताला दूरचा आहे. आणि याप्रमाणेच सुरुवातीपासून **साश्रुनेत्रोत्पलाभिः** या शब्दापर्यंत म्हणजे तिसऱ्या चरणाच्या अखेरपर्यंत मुख्यतः करुणाला उचित असा अभिनय करून व विप्रलंभशृंगाराचे करुणाशी साम्य असल्यामुळे विप्रलंभ शृंगाराचे अगदी अल्पांशाने सूचन करून या श्लोकाच्या व्यंग्य अर्थाचा अभिनय करावयाचा आहे. 'प्रियकराप्रमाणे' येथे जरी प्रेमाच्या रुसव्याला योग्य असा अभिनय केला व त्या प्रणयकोपामुळे जरी विप्रलंभ शृंगाराची प्रतीति झाली, तरी तो विप्रलंभशृंगार त्यानंतर लगेच 'तो तुमचे पाप जाळून भस्म करो' या वाक्याचा आदरयुक्त [२२] अभिनय केला जात असताना जो भगवान् शिवाचा प्रभाव प्रकट करावयाचा आहे त्याचे अंग म्हणूनच पर्यवसित होतो. म्हणून त्यामुळे (या श्लोकातील व्यंग्य अर्थाचा अभिनय करण्याच्या बाबतीत) काहीही विरोध उत्पन्न होत नाही. ह्या श्लोकात करुण व विप्रलंभ शृंगार यांमध्ये विरोध नाही हे दाखविणाऱ्या या विवेचनाचा समारोप वृत्तिकार' अशा रीतीने' इ. शब्दांनी करितात.

याहून निराळ्या परिस्थितीमध्ये विरुद्ध रसांमधील विरोधाचा परिहार कसा करावयाचा, हे निराळ्या प्रकारे दाखविण्याचे काम वृत्तिकार 'आणखी असे की' इ. शब्दांनी करितात. परीक्षकांना म्हणजे सुंदर—असुंदराचा विवेक करणाऱ्या वाचकांना व प्रेक्षकांना. 'अप्रिय वाटत नाही—' कारण वरीलसारख्या उदाहरणात सहृदयाचे मन करुणाच्या आस्वादात विश्रान्त होत नाही व म्हणून (सहृदयाचे) मन द्रव पावत नाही. [२३] परंतु जो क्रोध वीररसाचा व्यभिचारिभाव होतो, [२४] त्या क्रोधाचा परिणाम असलेला करुणरस हा आपल्या कारणाची (म्हणजे क्रोधाची) अभिव्यक्ति करून त्याद्वारे वीररसाचा उत्कट आस्वाद घडविण्यातच पर्यवसित होतो. कारण म्हटलेच आहे की [२५] — आणि रौद्राचे जे कार्य, तो करुण रस समजावा.' म्हणून (म्हणजे करुणरस हा वीररसाला उपकारक होत असल्याने) वृत्तिकार' अत्यंत आनंद' इ. विधान करितात याबाबतचे उदाहरण असे :—

'हे कुरवका! तू आता आमच्या दृढालिंगनसौख्याला मुकणार हे बकुलवृक्षा! आम्ही तुझ्यावर आमच्या मुखातून ज्याचा वर्षाव आजवर केला, त्या मद्याच्या सेवनाची तुला आता आठवणच करीत बसावे लागेल. हे अशोका! तुला आता आमच्या चरणांचा आघात न मिळाल्यामुळे तू 'स—शोक होशील.' [२६] असे त्या राजाच्याशत्रूच्या स्त्रियांनी. आपले शहर सोडून जाताना (त्या त्या वृक्षाला उद्देशून) म्हटले [२७] 'किंवा भावाला' — म्हणजे प्रस्तुत रसात प्रधान असलेल्या स्थायिभावाला; किंवा प्रधान असलेल्या व्यभिचारिभावाला, उदा. विप्रलंभ शृंगारात 'औत्सुक्य' या व्यभिचारिभावाला (विरोधी असणारा). [२८]

आता पूर्वीच्याच म्हणजे 'प्रियेचा नुकताच अपराध केलेल्या' इ. श्लोकात करुण व विप्रलंभशृंगार यांमधील विरोधाचा परिहार कसा होतो हे वृत्तिकार निराळ्या प्रकारे, किंवा इ. शब्दांनी सांगतात. आणि त्यांच्या या सांगण्यातील आशय असा :— पूर्वी [२९] (या श्लोकातील) विप्रलंभशृंगार व करुण हे निराळ्या वाक्यार्थाचे अंग असल्यामुळे त्यांच्यात परस्परविरोध नाही असे म्हटले. पण आता विप्रलंभ हा करुणाचेच

अंग झाला असल्यामुळे त्याला विरोधी कसा म्हणता येणार नाही याचे स्पष्टीकरण वृत्तिकार पुढीलप्रमाणे करितात :— कारण करुणरस म्हणजे प्रिय व्यक्तीचा नाश इ. विभावामुळे अभिव्यक्त होणारा आहे, असे (भरतमुनींनी) म्हटले आहे. [३०] आणि व्यक्ति प्रिय असण्याचे कारण त्या व्यक्तीचे आल्हादजनकत्व हे होय, आणि म्हणून ('प्रियेचा नुकताच अपराध केलेल्या प्रियकराप्रमाणे') या उत्प्रेक्षेच्या [३१] द्वारे असे सुचविले आहे की—शंकराच्या बाणातून उफाळलेल्या अग्नीची करणी पाहून त्रिपुरस्त्रियांना पूर्वी आपण आपल्या पतीशी केलेले प्रेमाचे भांडण आठवून आता त्या प्रणयकलहाचा संभव नष्ट झालेला असल्यामुळे तो कलह आता शोकाचा उद्दीपनविभाव झालेला आहे. हेच वृत्तिकार 'विशेष कौशल्याने' इ. शब्दांनी सांगतात. 'विशेष कौशल्याने' म्हणजे ग्राम्यता हा दोष टाळून व ग्राम्य शब्द न वापरता विप्रलंभ शृंगाराच्या विभावादिकांना करुण रसाच्या विभावादिकांचे स्वरूप देऊन, असा अर्थ, याचेच उदाहरण म्हणून वृत्तिकार 'हा तो होत' इ. श्लोक उद्धृत करितात. या श्लोकात भूरिश्रवस् या क्षत्रिय वीराचा रणभूमीवर तुटून पडलेला हात पाहून त्याच्या प्रियपत्न्यांनी केलेल्या शोकाचे हे वर्णन आहे. रशना म्हणजे कमरपट्टा. रतिक्रीडेच्या वेळी जो (त्याला) वर खेचत असे तो 'रशनोत्कर्षी.' विरोधाचा परिहार करण्याच्या या पद्धतीने काव्यातील पुष्कळ उदाहरणांमधील विरोधाचा परिहार करिता येईल या अभिप्रायाने वृतिकार 'आणि याचप्रमाणे' असा प्रस्ताव करितात (व आणखी एक उदाहरण देतात.) अश्रुजल हे होमाच्या अग्नीतून निघणाऱ्या धुरामुळे असेल किंवा विवाहानंतर लगेच माहेर सोडावे लागण्याच्या दुःखामुळे असेल. 'घाबरणे' हा अविवाहित तरुणींना स्वाभाविकपणे वाटणाऱ्या धाकधुकीचा परिणाम होय. याप्रमाणे आतापर्यंतच्या विवरणाने (२० व्या) कारिकेतील 'किंवा त्यांना मुख्य रसाचे उपकारकत्व देऊन ती समाविष्ट केली तर त्यात काहीही दोष नाही' या भागाच्या विशदीकरणाला उपयोगी असे सर्व काही सांगून झाले, म्हणून वृत्तिकार प्रस्तुत विषयाचा 'अशा तऱ्हेने' इ. शब्दांनी समारोप करितात. **तावत्** (हा एक मुद्दा) या शब्दाने इतर मुद्द्यांचेही विवरण करावयाचे आहे असे वृत्तिकार सुचवितात. ॥ २० ॥

टीपा

१) पूर्वपक्षाचे म्हणणे असे की, जो वाच्यार्थ प्रधान असेल तो 'विधि' आणि जो वाच्यार्थ अंगभूत असेल, तो 'अनुवाद.' आणि रस तर वाच्य नसतातच! तेव्हा दोन रसांपध्ये अनुवाद्य—विधेयभाव म्हणजे अंग—प्रधान भाव कसा असणार?

२) वरील टीप १ मधील शंकेला उतर असे की, विधि आणि अनुवाद हे अनुक्रमे प्राधान्यामुळे किंवा अप्राधान्यामुळे होतात. हे प्राधान्य व अप्राधान्य दोन वाच्यार्थांच्या बाबतीतच असते असे नाही, तर दोन व्यंग्यार्थांच्या (म्हणजे रसांच्या) बाबतीतही असू शकेल!

३) हे दोन रसरूपी अर्थ म्हणजे 'प्रियेचा नुकताच अपराध केलेल्या' या श्लोकातून अभिव्यक्त होणारे करुण व विप्रलंभ हे परस्परविरुद्ध असणारे रस.

४) 'ये, जा' यासारख्या उदाहरणांमध्ये.

५) 'प्रियेचा नुकताच अपराध केलेल्या'...इ. श्लोकामध्ये.

६) येथे करुण रसाचे सामर्थ्य कुंठित होते असे म्हणण्याचे कारण सहृदयाचे मन करुणरसाच्या आस्वादात विश्रांत होत नाही. हा करुणरस स्वतःला कारणीभूत असणाऱ्या वीररसाचा व्यभिचारिभाव जो (शंकरांचा) क्रोध, त्याला सूचित करतो व अशा रीतीने करुण रसाचे वीररसाच्या आस्वादात पर्यवसान होत असल्याने तो करुण शिवविषयक रतिभावाला विरोधी होत नाही.

७) महाभारत, ११–२४–१९. भारतीय युद्धात कौरवांच्या बाजूने लढणारा भूरिश्रवा नावाचा वीर रणांगणावर पतन पावल्यावर त्याच्या पत्नीने त्याच्या, अर्जुनाने तोडलेल्या, हाताकडे पाहून केलेला विलाप. येथे शृंगाराला करुणरसासे अंगत्व दिले आहे.

८) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'रस' प्रकार स्वप्नातही 'वाच्य'नसतो" वरील 'तो स्वप्नातही आपल्या वाचक' इ. वाक्य आणि "उद्‌द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही".

९) 'ते' म्हणजे विधि व अनुवाद.

१०) उदा. पहिल्या उद्‌द्योतातील ५ व्या कारिकेतील 'तोच अर्थ काव्याचा आत्मा होय' हे वाक्य. त्यावरील वृत्तीतील प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'प्रतीयमान अर्थच काव्याचा आत्मा होय'" वरील 'काव्याचे सारसर्वस्व म्हणजे तोच अर्थ होय' हे व "उद्‌द्योत – २ 'भावध्वनि'" वरील लोचनातील 'रसामुळेच सर्व काव्यांना सजीवता' इ. वाक्य.

११) सहकारी म्हणजे मुख्य वाक्यार्थाशी सहकार्य करून त्याला उपकारक होणारे.

१२) कोणत्याही दृष्टीने म्हणजे (१) रस हे काव्यातील वाक्यार्थ म्हणजे प्रतिपाद्य अर्थ होत. आणि (२) रस हे साक्षात् वाक्यार्थ नसून वाक्यार्थ असलेले जे विभावादि, त्यांमुळे सूचित होणारे असतात, यांपैकी कोणत्याही दृष्टीने.

१३) त्यांना 'रसादि' न म्हणता 'रसाच्या जातीचे' असे म्हणण्याचे कारण ते या उदाहरणात प्रधान नसून गौण आहेत, हे होय.

१४) प्रेयोऽलंकारात भाव हा वाक्यार्थाला गुणीभूत असतो. परंतु येथे भाव हा मुख्य असल्यामुळे प्रेयोऽलंकार नाही. तथापि भामहाच्या मते जेथे गुरु, देवता, राजा, पुत्र, इत्यादिकांविषयीच्या प्रीतीचे वर्णन असते, तो प्रेयोऽलंकार होय. (पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'रसादि अलंकार'") असे असल्यामुळे अभिनवगुप्तांनी या श्लोकात प्रेयोऽलंकार आहे असे म्हटले आहे.

आनंववर्धनानी दुसऱ्या उद्‌द्योतात हे उदाहरण रसवदलंकाराचे म्हणून दिले आहे. व अभिनवगुप्तांनी ते मान्यही केले आहे.

१५) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रसाची अंगेसुद्धा मुख्य रसाला कोणकोणती दक्षता घेतल्यास बाधक होत नाहीत याचे विवरण'" वरील टीप १ अ.

१६) अशाच प्रकारचा म्हणजे जेथे जेथे उपादानकारणापासून कार्य उत्पन्न होते, तेथे तेथे ते उपादानकारण परस्परविरुद्ध अशा सहकारी कारणांची मदत घेऊनच कार्य उत्पन्न करिते.

१७) म्हणजे दोन परस्परविरुद्ध गोष्टी एकमेकांशी सहकार्य करून एखाद्या कारणापासून कार्योत्पत्ति होण्याच्या कामी हातभार लावतात असे मानिल्यास.

१८) मुळातील **नोपादानं विरुद्धस्य** हे अवतरण धर्मकीर्तीच्या 'प्रमाणवार्तिका'तून (२,२६३–२६४) घेतले आहे. त्याचा अर्थ आम्ही वृत्तीतल्या आशयाला अनुसरून केला आहे. **उपादानम्** याऐवजी **उत्पादनम्** हा पाठ अधिक चांगला झाला असता, असे 'बालप्रिया' टीका म्हणते. मग त्या अवतरणाचा अर्थ **एकस्मात् कारणात् विरुद्धफलद्वयोत्पादनं न** (म्हणजे एकाच कारणापासून दोन परस्परविरुद्ध कार्ये उत्पन्न होऊ शकत नाहीत) असा होईल.

१९) तसाच म्हणजे कसा हे अभिनवगुप्तांनी पुढच्याच परिच्छेदात स्पष्ट केले आहे.

२०) त्रिपुरासुराच्या स्त्रिया त्या अग्नीशी अपराधी प्रियकराशी वागावे त्याप्रपाणे वागल्या या (जवळजवळ अप्रस्तुत) वर्णनापेक्षा त्यांच्या पतीच्या नाशामुळे त्यांची अशी दुरवस्था झाली यामुळेच शंकराचा प्रभाव प्रत्ययास येतो.

२१) येथे अभिनवगुप्तांनी **कामीवार्द्रापराधः** ही उत्प्रेक्षा किंवा उपमा आहे असे म्हटले आहे व द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रसाची अंगेसुद्धा मुख्य रसाला कोणकोणती दक्षता घेतल्यास बाधक होत नाहीत याचे विवरण'" वर ती उत्प्रेक्षाच आहे असे म्हटले आहे. पण ती वस्तुतः उत्प्रेक्षा नसून उपमाच आहे. कारण 'आर्द्रापराधकामी' हे उपमान कल्पनासृष्टीतले नाही, तर नेहमीच्या अनुभवातील आहे.

२२) मुळातील **साटोप** याचा अर्थ आम्ही 'आदरयुक्त' असा केला आहे. आटोप हा शब्द 'यादव' कोशांमध्ये 'संभ्रम' याचा पर्याय म्हणून दिला असून आपटे यांच्या कोशात 'संभ्रम' याचा एक अर्थ 'आदर' असा नमूद केला आहे.

२३) म्हणजे शोकाच्या आहारी जात नाही.

२४) क्रोध हा रौद्र रसाचा स्थायिभाव असला तरी तो वीर रसाचा व्यभिचारिभाव होऊ शकतो. नायकाच्या ठिकाणी क्रोध उद्दीपित झाला म्हणजे त्याचा परिणाम शत्रूच्या दुर्दशेमध्ये होतो व शत्रूची अशी दुर्दशा झाली म्हणजे त्याच्या स्त्रिया वगैरे शोक करू लागतात व त्या शोकामुळे वाचकाला करुण रसाचा अनुभव येतो.

२५) नाट्यशास्त्र, ६–४०. पाहा, रसभावविचार कंगले आवृत्ति, पृ. २२०–२१

२६) अ–शोक, स–शोक हा शब्दप्रयोग पूर्वी प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'ती दक्षता म्हणजे - ३) चालू अलंकाराचा, योग्य वेळ येताच त्यागही करायला हवा'" वर 'तू तुझ्या कोवळ्या पालवीमुळे' इ. उदाहरणात आलेला आहे.

२७) या श्लोकातील शत्रुस्त्रियांच्या दुर्दशेच्या वर्णनामुळे वाचकांना प्रथम करुण रसाची प्रतीति येते. त्या करुण रसाचे कारण वर्ण्य राजाच्या ठिकाणी उद्दीपित झालेला क्रोध हा वीररसाचा व्यभिचारिभाव होय. तो करुणरस वर्ण्य राजाच्या क्रोधाची अभिव्यक्ति करितो व त्या करुणरसाचे पर्यवसान शेवटी वीररसाच्या आस्वादात होते.

२८) उदा. 'कोठे हे अश्लाघ्य कृत्य' (पाहा, द्वितीय खंड. "उद्द्योत – ३ 'रसाची अंगेसुद्धा मुख्य रसाला कोणकोणती दक्षता घेतल्यास बाधक होत नाहीत याचे विवरण'") या श्लोकामधील पहिल्या ओळीत वितर्क हा व्यभिचारिभाव, प्रधान असलेल्या औत्सुक्य या व्यभिचारिभावाला विरोधी आहे, म्हणून त्याला विरोधी म्हणता येईल. मात्र तो 'बाध्य' असल्यामुळे तो विरोधी असला तरी त्याचा समावेश दोषास्पद ठरत नाही.

२९) पूर्वी, म्हणजे द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रसाची अंगेसुद्धा मुख्य रसाला कोणकोणती दक्षता घेतल्यास बाधक होत नाहीत याचे विवरण'" येथे.

३०) नाट्यशास्त्र ६–६२ (रसभावविचार, कंगले आवृत्ति, पृ. २४८).

३१) पाहा, द्वितीय खंड "उद्द्योत – ३ 'प्रबन्धामध्ये एका रसाचे मुख्यत्व कायम ठेवून इतर अनेक रसांचा समावेश केल्यास ते विरोधी होत नाहीत'" वरील टीप २१ वी.

ध्वन्यालोकः

इदानीं तेषामेकप्रबन्धनिवेशने न्याय्यो यः क्रमस्तं प्रतिपादयितुमुच्यते—

प्रसिद्धेऽपि प्रबन्धानां नानारसनिबन्धने ।
एको रसोऽङ्गीकर्तव्यस्तेषामुत्कर्षमिच्छता ॥ २१ ॥

प्रबन्धेषु महाकाव्यादिषु नाटकादिषु वा विप्रकीर्णतयाङ्गाङ्गिभावेन बहवो रसा उपनिबध्यन्त इत्यत्र प्रसिद्धौ सत्यामपि यः प्रबन्धानां छायातिशययोगमिच्छति तेन तेषां रसानामन्यतमः कश्चिद्विवक्षितो रसोऽङ्गित्वेन विनिवेशयितव्य इत्ययं युक्ततरो मार्गः ।

ननु रसान्तरेषु बहुषु प्राप्तपरिपोषेषु सत्सु कथमेकस्याङ्गिता न विरुध्यत इत्याशङ्क्येदमुच्यते—

रसान्तरसमावेशः प्रस्तुतस्य रसस्य यः ।
नोपहन्त्यङ्गितां सोऽस्य स्थायित्वेनावभासिनः ॥ २२ ॥

प्रबन्धेषु प्रथमतरं प्रस्तुतः सन् पुनः पुनरनुसन्धीयमानत्वेन स्थायी यो रसस्तस्य सकलप्रबन्धव्यापिनो रसान्तरैरन्तरालवर्तिभिः समावेशो यः स नाङ्गितामुपहन्ति ।

ध्वन्यालोक

आता (अनेक) रसादिकांचा समावेश एकाच प्रबंधात करावयाचा असताना तो कोणत्या पद्धतीने करणे योग्य होईल हे सांगण्यात येत आहे :—

प्रबंधात निरनिराळे रस समाविष्ट करावेत असे प्रसिद्ध (म्हणजे भरतादिकांनी सांगितले) असले तरी (प्रबंधांना) विशेष सौंदर्य प्राप्त व्हावे अशी इच्छा असणाराने त्यांपैकी एका कोणत्यातरी रसाला 'अंगी' बनवावे. ॥ २१ ॥

प्रबंधामध्ये म्हणजे महाकाव्य वगैरेंमध्ये किंवा नाटक वगैरेंमध्ये निरनिराळ्या पात्रांच्या ठिकाणी निरनिराळे रस अंगागिसंबंधाने समाविष्ट केले जातात असा परिपाठ असला, तरी ज्या कवीला ते प्रबंध विशेष सौंदर्याने संपन्न व्हावेत अशी इच्छा असते, त्याने त्या अनेक रसांपैकी त्याला विवक्षित असेल तो एक रस अंगी म्हणून समाविष्ट करावा, हा मार्ग अधिक योग्य होय.

'पण काय हो, पुष्कळ निरनिराळ्या रसांचा परिपोष झाल्यावर त्यातल्या एकालाच मुख्य केले तर इतर (तसेच परिपुष्ट झालेले) रस त्याच्या मुख्यत्वाला विरोधी कसे होणार नाहीत?' अशी शंका आल्यास त्याचे उत्तर असे :—

प्रस्तुत रस जर समग्र ग्रंथाला स्थायी म्हणजे स्थिर रस म्हणून व्यापून टाकीत असेल, तर त्याचा इतर रसांबरोबर केलेला समावेश प्रस्तुत रसाच्या मुख्यत्वाला बाध आणीत नाही. ॥ २२ ॥

प्रबंधामध्ये प्रधान म्हणून विवक्षित असलेल्या रसाकडे पुन्हा पुन्हा लक्ष पुरवून तो (स्थायी म्हणून) सर्व प्रबन्धाला व्यापक होईल असे केल्यास त्याचा समावेश जरी मधूनमधून प्रकाशित होणाऱ्या इतर रसांबरोबर केला, तरी ते त्याच्या मुख्यत्वाला बाधक होत नाही.

लोचनम्

तदेवावतारयति— इदानीमित्यादिना । तेषां रसानां क्रम इति योजना । प्रसिद्धेऽपीति । भरतमुनिप्रभृतिभिर्निरूपितेऽपीत्यर्थः ।

तेषामिति प्रबन्धानाम् । महाकाव्यादिष्विति । आदिशब्दः प्रकारे । (प्रथमः) अनभिनेयान् भेदानाह, द्वितीयस्त्वभिनेयान् । विप्रकीर्णतयेति । नायकप्रतिनायकपताकाप्रकरीनायकादिनिष्ठतयेत्यर्थः । अङ्गाङ्गिभावेनेत्येकनायकनिष्ठत्वेन । युक्ततर इति । यद्यपि समवकारादौ पर्यायबन्धादौ च नैकस्याङ्गित्वं तथापि नायुक्तता । तस्याप्येवंविधो यः प्रबन्ध, : तद्यथा नाटकं महाकाव्यं वा तदुत्कृष्टतरमिति तरशब्दार्थः ।

नन्विति । स्वयं लब्धपरिपोषत्वे कथमङ्गत्वम्? अलब्धपरिपोषत्वे वा कथं रसत्वमिति रसत्वमङ्गत्वं चान्योन्यविरुद्धं, तेषां चाङ्गत्वायोगे कथमेकस्याङ्गित्वमुक्तमिति भावः । रसान्तरेति । प्रस्तुतस्य समस्तेतिवृत्तव्यापिनस्तत एव विततव्याप्तिकत्वेनाङ्गिभावोचितस्य रसस्य रसान्तरैरितिवृत्तवशायातत्वेन परिमितकथाशकलव्यापिभिर्यः समावेशः समुपबृंहणं स तस्य स्थायित्वेनेतिवृत्तव्यापितया भासमानस्य नाङ्गितामुपहन्ति, अङ्गितां पोषयत्येवेत्यर्थः ।

एतदुक्तं भवति— अङ्गभूतान्यपि रसान्तराणि स्वविभावादिसामग्र्या स्वावस्थायां यद्यपि लब्धपरिपोषाणि चमत्कारगोचरतां प्रतिपद्यन्ते, तथापि स चमत्कारस्तावत्येव न परितुष्य विश्राम्यति किं तु चमत्कारान्तरमनुधावति । सर्वत्रैव ह्यङ्गाङ्गिभावेऽयमेवोदन्तः । यथाह तत्रभवान्—

गुणः कृतात्मसंस्कारः प्रधानं प्रतिपद्यते ।
प्रधानस्योपकारे हि तथा भूयसि वर्तते ॥ इति ॥ २२ ॥

लोचन

आणखी जे विवरण करावयाचे आहे, त्यालाच वृत्तिकार 'आता' इ. शब्दांनी प्रारंभ करितात. 'त्यांचा' म्हणजे 'रसांचा.' क्रम (म्हणजे समावेश करण्याची पद्धत) असा आशय. 'प्रसिद्ध असले तरी' म्हणजे भरतमुनि वगैरेंनी सांगितले असले, [१] तरी. 'त्यांना' म्हणजे त्या प्रबंधांना. [२] '(महाकाव्य) वगैरेंमध्ये' — 'वगैरें' शब्दाचा अर्थ 'सादृश्य' हा आहे. (पहिल्या म्हणजे **महाकाव्यादिषु** यातील आदि या शब्दाने) साहित्याच्या अभिनयाचा विषय नसलेल्या प्रकारांचा बोध होतो व दुसऱ्या (म्हणजे **नाटकादिषु** यामधील आदि या) शब्दाने ज्यांमध्ये अभिनयाचा वापर करावयाचा असतो, त्या प्रकारांचा बोध होतो. 'निरनिराळ्या पात्रांच्या ठिकाणी' म्हणजे नायक, प्रतिनायक, पताका आणि प्रकरी [३] यांचे नायक इत्यादींच्या ठिकाणी' असा अर्थ. 'अंगांगिसंबंधाने' हे एकाच नायकाच्या संबंधात म्हटले आहे. 'अधिक योग्य' — जरी 'समवकार' वगैरे नाट्यप्रकारामध्ये [४] आणि पर्यायबन्ध [५] वगैरे काव्यप्रकारांत एकच रस अंगी असत नाही, तरीही त्यात काहीही अनौचित्य नसते. पण त्यांचीही रचना [६] जर याचप्रमाणे म्हणजे नाटक अथवा महाकाव्य यांतल्याप्रमाणे (एकाच रसाला प्राधान्य देऊन) केली, तर ते अधिक चांगले, असा वृत्तीतल्या ('अधिक योग्य' यातील) 'अधिक' शब्दाचा अर्थ होईल. ॥ २१ ॥

'पण काय हो,' — ('अंगी' रसाहून इतर) जो परिपुष्ट झाला आहे, तो अंगी रसाचे अंग कसा काय होईल? आणि तो जर परिपुष्ट झालेला नसला, तर त्याला 'रस' ही संज्ञा कशी देता येईल? अशा रीतीने रसत्व व अंगत्व हे धर्म परस्परविरुद्ध आहेत. आणि रसांच्या ठिकाणी अंगत्वच असू शकत नसल्यास प्रबंधामध्ये एका रसाला 'अंगी' करावे असे कारिकेमध्ये व वृत्तीमध्ये कसे म्हटले? असा आशय. 'इतर रसांबरोबर' — प्रस्तुत रस हा सर्व कथानकाला व्यापून राहणारा असतो. त्यामुळेच, म्हणजे प्रस्तुत रसाचे क्षेत्र व्यापक असल्यामुळेच त्या रसाला अंगी मानणे योग्य होय. इतर रस हे कथानकाच्या ओघात आलेले असल्यामुळे ते कथानकाच्या काही मर्यादित भागालाच व्यापणारे असतात, म्हणून अशा इतर रसांचा अंतर्भाव म्हणजे परिपोष, प्रस्तुत रस हा स्थायी म्हणजे स्थिर आणि सर्व कथानकाला व्यापून राहणाऱ्या स्वरूपात प्रत्ययास येत असल्याने त्याच्या अंगित्वाला बाधक होऊ शकत नाही. उलट तो अंतर्भाव त्याच्या अंगित्वाला पोषकच ठरतो, असा अर्थ.

या विवेचनाचा सारांश असा— एखाद्या प्रबंधात अंगभूत असलेले रसही आपापल्या विभाव वगैरे सामग्रीमुळे स्वतःपुरते परिपुष्ट होऊन जरी विस्मययुक्त आनंदाचा विषय होतात, तरी तो विस्मययुक्त आनंद तेवढ्यानेच संतुष्ट होऊन तेथेच विराम पावत नाही, तर तो आनंद आणखी दुसऱ्या विस्मययुक्त आनंदाच्या रोखाने धाव घेतो. रसांमध्ये जेथे जेथे अंगांगिसंबंध असतो, त्या सर्वच ठिकाणी अशीच परिस्थिति असते. जसे माननीय आचार्यांनी [७] म्हटलेच आहे की—

गौण असलेली गोष्ट स्वतःच्या परिपोष झाल्यावर शेवटी प्रधानाकडेच जाऊन पोहोचते व त्यामुळे ती गौण गोष्ट प्रधानावर पुष्कळच उपकार करीत असते. ॥ २२ ॥

टीपा

१) पाहा, नाट्यशास्त्र, ७—११९ मधील पुढील ओळ :— **न ह्येकरसजं काव्यं किंचिदस्ति प्रयोगतः ।**

२) कारिकेतील **तेषाम्** याचा संबंध अभिनवगुप्तांनी **प्रबन्धानाम्** याकडे घेऊन त्यांना म्हणजे 'त्या प्रबंधांना' (विशेष सौंदर्य प्राप्त व्हावे अशी इच्छा असणाराने) असा अर्थ केला आहे. वृत्तीमध्ये आनंदवर्धनांनी **तेषाम्** याचा संबंध **नानारसानाम्** याकडे घेऊन 'त्या नाना रसांपैकी एक रस' असे म्हटले आहे. म्हणून कारिकेचा अनुवाद आम्ही वृत्तीला अनुसरून केला आहे.

३) पताका व प्रकरी यांची माहिती द्वितीय खंड "उद्द्योत — ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधातून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वरील टीप २१ व २२, यांमध्ये पाहा. शिवाय दशरूपकविधान, कंगले, उपोद्द्यात, पृ. १६ पाहा.

४) समवकार' हा रूपकाच्या १० प्रकारांपैकी एक आहे. त्याचे विवरण नाट्यशास्त्र, अध्याय १८, ५७ ते ६८ या कारिकांत केले आहे. शिवाय दशरूपकविधान, उपोद्द्यात पृ. १० व ११ पाहा. समवकार या प्रकाराचे एकही उदाहरण सध्या उपलब्ध नाही.

५) हा शब्द वृत्ति, द्वितीयखंड, पृ. ९३ वर आला आहे.

६) लोचनातील **तस्यापि** याचा अर्थ त्यांचीही म्हणजे समवकार व पर्यायबंध यांचीही (रचना) असा आम्ही वर केला आहे. पण **तस्य** ही **शेषे षष्ठी** समजून त्याचा अर्थ **तस्मादपि** असा केला, तर तो 'पण त्यांहून म्हणजे समवकार व पर्यायबन्ध या बहुरसप्रधान प्रकारांपेक्षा नाटक व महाकाव्य यांसारख्या एकरसप्रधान प्रकारांची रचना करणे अधिक चांगले' असा होईल.

७) हे माननीय आचार्य कोण हे समजण्यास मार्ग नाही. मम्मटानेही काव्यप्रकाशात (झळकीकर आवृत्ति, पृ. ४६० वर) हा श्लोक केवळ **उक्तं हि** असेच म्हणून उद्धृत केला आहे. लोचनात आणखी तीन ठिकाणी (का. आ. पृ. १३३—१३४ येथे व पृ. ४१३ येथे) भर्तृहरीला भगवान् किंवा तत्रभवान् असे म्हणून वाक्यपदीयातील अवतरणे उद्धृत केली आहेत. म्हणून प्रस्तुत श्लोकापूर्वी **तत्रभवान्** असा शब्द वापरला असल्याने तो श्लोकही वाक्यपदी यातील असावा असे वाटण्याचा संभव आहे, पण हा श्लोक उपलब्ध वाक्यपदीयात आढळत नाही.

ध्वन्यालोकः

एतदेवोपपादयितुमुच्यते —

कार्यमेकं यथा व्यापि प्रबन्धस्य विधीयते ।
तथा रसस्यापि विधौ विरोधो नैव विद्यते ॥ २३ ॥

सन्ध्यादिमयस्य प्रबन्धशरीरस्य यथा कार्यमेकमनुयायि व्यापकं कल्प्यते, न च तत्कार्यान्तरैर्न सङ्कीर्यते, न च तैः सङ्कीर्यमाणस्यापि तस्य प्राधान्यमपचीयते, तथैव रसस्याप्येकस्य सन्निवेशे क्रियमाणे विरोधो न कश्चित् । प्रत्युत प्रत्युदितविवेकानामनुसन्धानवतां सचेतसां तथाविधे विषये प्रह्लादातिशयः प्रवर्तते ।

ध्वन्यालोक

हेच (दृष्टांताने) पटवून देण्यासाठी पुढीलप्रमाणे सांगितले जात आहे –

कार्य-म्हणजे कथानकाचे मुख्य उद्दिष्ट– हे जसे प्रबंधाला व्यापणारे केले जाते; तसेच मुख्य रसाच्या बाबतीतही केल्यास इतर रसांशी विरोध उरत नाहीच. ॥ २३ ॥

प्रबंधाच्या संधि वगैरेंनी युक्त असलेल्या एकूण कथानकाला ज्याप्रमाणे एक मुख्य उद्दिष्ट अनुस्यूत होऊन व्यापील अशी व्यवस्था केली जाते; त्याच्याशी इतर दुय्यम उद्दिष्टे मिश्रित होत नाहीत असे नाही, आणि त्यांच्याशी मिश्रित असूनही त्या – (मुख्य उद्दिष्टा –) चे प्राधान्य कमी होत नाही, त्याच प्रमाणे एका (प्रधान) रसाचा (इतर रसांबरोबर) समावेश केला, तरी त्यात कोठलाही विरोध (म्हणजे दोष) उत्पन्न होत नाही. उलट ज्यांच्या बुद्धीला विवेकशीलता प्राप्त झाली आहे आणि जे काव्यविषयावर आपले लक्ष केंद्रित करू शकतात, अशा सहृदयांच्या अंतःकरणास अशा प्रकारच्या रसमिश्रणामुळे कमालीचा आनंद प्राप्त होतो.

लोचनम्

उपपादयितुमिति । दृष्टान्तस्य समुचितस्य निरूपणेनेति भावः । न्यायेन चैतदेवोपपद्यते । कार्य हि तावदेकमेवाधिकारिकं व्यापकं प्रासङ्गिककार्यान्तरोपक्रियमाणमवश्यमङ्गीकार्यम् । तत्पृष्ठवतिनीनां नायकचित्तवृत्तीनां तद्बलादेवाङ्गाङ्गिभावः प्रवाहपतित इति किमत्रापूर्वमिति तात्पर्यम् । तथेति व्यापितया । यदि वा एवकारो भिन्नक्रमः तथैव तेनैव प्रकारेण कार्याङ्गाङ्गिभावरूपेण रसानामपि बलादेवासावापततीत्यर्थः । तथा च वृत्तौ वक्ष्यति 'तथैवे' ति ।

कार्यमिति । 'स्वल्पमात्रं समुत्सृष्टं बहुधा यद्विसर्पति' इति लक्षितं बीजम् । बीजात्प्रभृति 'प्रयोजनानां विच्छेदे यदविच्छेदकारणं यावत्समाप्तिबन्धं स तु बिंदुः' इति बिंदुरूपयार्थप्रकृत्या निर्वहणपर्यन्तं व्याप्नोति तदाह-- अनुयायीति । अनेन बीजं बिंदुश्चेत्यर्थप्रकृती सङ्गृहीते । कार्यान्तरैरिति 'आगर्भादाविमर्शाद्वा पताका विनिवर्तते' इति प्रासङ्गिकं यत्पताकालक्षणार्थप्रकृतिनिष्ठं कार्य यानि च ततोऽप्यूनव्याप्तितया प्रकरीलक्षणानि कार्याणि तैरित्येवं पञ्चानामर्थप्रकृतीनां वाक्यैकवाक्यतया निवेश उक्तः तथाविध इति । यथा तापसवत्सराजे । एवमनेन श्लोकेनाङ्गाङ्गितायां दृष्टान्तनिरूपणमितिवृत्तबलापतितत्वं च रसाङ्गाङ्गिभावस्येति द्वयं निरूपितम् । वृत्तिग्रन्थोऽप्युभयाभिप्रायेणैव नेयः ॥ २३ ॥

लोचन

'पटवून देण्यासाठी' – समर्पक असे उदाहरण देऊन, असा आशय. तर्काच्या द्‌ष्टीनेसुद्धा हेच सुसंगत आहे, कारण प्रबंधामध्ये मुख्य कार्य (म्हणजे उद्दिष्ट) एकच असून ते सर्व प्रबंधाला व्यापणारे असते आणि ते कथानकाच्या ओघात उद्‌भवणाऱ्या इतर अवान्तर कार्यांकडून उपकृत होते, ही गोष्ट अवश्य मान्य करावयास पाहिजे. व्यापक अशा एका कार्याला मान्यता दिल्यामुळे त्या कार्याला अनुसरणाऱ्या नायक व इतर पात्रांच्या मनोवृत्ति (म्हणजे स्थायिभाव) त्या मुख्य असलेल्या कार्यालाच अंगभूत होतात व त्या दोहोंमधील अंगांगिसंबंध हा ओघानेच प्राप्त होतो, यात आश्चर्यकारक ते काय आहे, हे तात्पर्य, 'तसे' म्हणजे प्रधान रसाला प्रबंध–व्यापी केल्यास. किंवा (कारिकेच्या चवथ्या चरणातील) **एव** (म्हणजे 'च') हे अव्यय भलत्या जागी पडले आहे असे मानून ते (तिसऱ्या चरणातील) तथा (तसे) याला जोडावे. 'तसेच' म्हणजे त्याच प्रकाराने' म्हणजे प्रधान व गौण कार्यामध्ये जसा अंगागिसंबंध असतो, तसाच प्रबंधातील रसांमध्येही तो (म्हणजे अंगांगिसंबंध) अटळपणे येतोच, असा अर्थ. असे असल्यामुळे (वृत्तिकार) वृत्तीमध्ये 'तसेच' असे म्हणतील.

'उद्दिष्ट' म्हणजे बीजच होय. त्याची व्याख्या भरतांनी पुढीलप्रमाणे [१] केली आहे :– 'जे अगदी थोड्या प्रमाणात (प्रारंभी) प्रकट केले असता अनेक प्रकारांनी विस्तार पावते.' [२] कथानकाचे बीज पेरल्यापासून निर्वहणसंधीपर्यंत 'बिंदु' नामक अर्थप्रकृतीने कार्य हे सर्व कथानकाला व्यापते. या 'बिंदु' नामक अर्थप्रकृतीचे लक्षण भरतांनी असे केले आहे :– 'प्रयोजनांच्या सिद्धीमध्ये बाधा उत्पन्न झाली असताना जो शेवटपर्यंत प्रयोजनांना खंडित होऊ देत नाही, तो 'बिंदु होय.' [३] अशा रीतीने बिदुनामक अर्थप्रकृतीने बीज हे निर्वहणसंधीपर्यंत कथानकाला व्यापते, म्हणून वृत्तिकार 'अनुस्यूत होऊन व्यापील' इ. शब्दांनी 'व्यापी' या शब्दाचे विवरण करितात. 'अनुस्यूत' या विशेषणाने बीज आणि बिंदु या दोन अर्थप्रकृतींचा समावेश झाला. 'इतर दुय्यम उद्दिष्टे' – 'गर्भसंधीच्या पूर्वी किंवा विमर्शसंधीच्या पूर्वी पताका संपलेली असते' [४] असे ज्या पताकानामक अर्थप्रकृतीचे भरतांनी लक्षण केले आहे, [५] त्या पताका नावाच्या अर्थप्रकृति या, प्रसंगाने प्राप्त झालेल्या कार्याशी आणि त्या पताकेहूनही लहान लहान क्षेत्रे व्यापणारी अशी जी प्रकरी [६] नावाची उद्दिष्टे असतात, त्यांच्याशी (मिश्रित होत नाहीत असे नाही). अशा रीतीने पाचही अर्थप्रकृतींची नाटकरूपी महावाक्याशी एकवाक्यतेने म्हणजे अविरोधाने रचना करावी, असे सांगितले आहे. 'अशा प्रकारच्या' – जसे 'तापसवत्सराज' नाटकामध्ये. [७]

याप्रमाणे या (२३ व्या) कारिकेने रसांमधील अंगांगिभावाच्या बाबत दृष्टांत [८] ही एक गोष्ट व कथानकातील मुख्य उद्दिष्ट व दुय्यम उद्दिष्ट यांमधील अंगांगिभावामुळे अटळपणे प्राप्त होणारा रसांमधील अंगांगिभाव, अशा दोन गोष्टींचे विवरण केले आहे. या कारिकेवरील वृत्तीतील विवरणाचाही आशय असाच दोन प्रकारचा आहे हे वाचकांनी समजून घ्यावे.

टीपा

१) नाट्यशास्त्र, १९–२१. या कारिकेचा उत्तरार्ध असा आहे :– **फलावसानयद्यैव बीजं तत् परिकीर्तितम् ।**

२) 'कार्य' याचा खरा अर्थ नाटकाच्या कथानकातील सर्व घटनांचे अंतिम साध्य असा आहे. परंतु त्या अंतिम साध्याच्या प्रभाव सर्व कथानकावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीत्या प्रारंभापासूनच पडत असल्यामुळे ते सर्व

घटनांना प्रेरणा देणारे असते, म्हणून त्याला 'बीज' म्हटले आहे. पाहा, द्वितीय खंड "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वरील टीप १६ वी.

३) नाट्यशास्त्र, १९–२२. नाट्यशास्त्रात या कारिकेचा उत्तरार्ध पुढीलप्रमाणे आहे :– **यावत् समाप्तिर्बन्धस्य स बिन्दुः परिकीर्तितः ।**

४) नाट्यशास्त्र, १९–२८.

५) पाहा, द्वितीयखंड, "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'", टीप २१ वी.

६) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'"वरील टीप २२ वी.

७) 'तापसवत्सराज' या नाटकाच्या 'कार्या'चे परीक्षण अभिनवगुप्तांनी पूर्वी 'लोचना'त द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'"यांवर सविस्तरपणे केले आहे. मात्र त्या नाटकात बीज, बिन्दु पताका, प्रकरी इ. अर्थप्रकृति कोठे कोठे आढळतात हे त्यांनी दाखविलेले नाही. ती स्थळे वाचकांनी स्वतः समजून घ्यावी असा अभिनवगुप्तांचा अभिप्राय दिसतो.

८) कथानकातील व्यापक उद्दिष्ट व गौण उद्दिष्ट यांच्यामधील अंगांगिभाव हा तो दृष्टांत होय.

ध्वन्यालोकः

ननु येषां रसानां परस्पराविरोधः यथा–वीरशृङ्गारयोः शृङ्गारहास्ययो रौद्रशृङ्गारयोर्वीराद्‌भुतयोर्वीररौद्रयो रौद्रकरुणयोः शृङ्गाराद्‌भुतयोर्वा तत्र भवत्वङ्गाङ्गिभावः । तेषां तु स कथं भवेघेषां परस्परं बाध्यबाधकभावः । यथा– शृङ्गारबीभत्सयोर्वीरभयानकयोः शान्तरौद्रयोः शान्तशृङ्गारयोर्वा इत्याशङ्क्येदमुच्यते–

अविरोधी विरोधी वा रसोऽङ्गिनि रसान्तरे ।
परिपोषं न नेतव्यस्तथा स्यादविरोधिता ॥ २४ ॥

अङ्गिनि रसान्तरे शृङ्गारादौ प्रबन्धव्यङ्ग्ये सति अविरोधी विरोधी वा रसः परिपोषं न नेतव्यः । तत्नाविरोधिनो रसस्याङ्गिरसा पेक्षयात्यन्तमाधिक्यं न कर्तव्यमित्ययं प्रथमः परिपोषपरिहारः । उत्कर्ष साम्येऽपि तयोर्विरोधासम्भवात् ।

एक्कत्तो रुअइ पिआ अण्णत्तो समरतूरणिग्घोसो ।
णेहेण रणरसेण अ भडस्य दोलाइअं हिअअं ॥

यथा वा
कण्ठाच्छित्त्वाक्षमालावलयमिव करे हारमावर्तयन्ती
कृत्वा पर्यङ्कबन्धं विषधरपतिना मेखलाया गुणेन ।
मिथ्यामन्त्राभिजापस्फुरदधरपुटव्यञ्जिताव्यक्तहासा
देवी सन्ध्याभ्यसूयाहसितपशुपतिस्तत्र दृष्टा तु वोऽव्यात् ॥

इत्यत्र ।

अङ्गिरसविरुद्धानां व्यभिचारिणां प्राचुर्येणानिवेशनम्, निवेशने या क्षिप्रमेवाङ्गिरसव्यभिचार्यनुवृत्तिरिति द्वितीयः ।

अङ्गत्वेन पुनः पुनः प्रत्यवेक्षा परिपोषं नीयमानस्याप्यङ्गभूतस्य रसस्येति तृतीयः । अनया दिशान्येऽपि प्रकारा उत्प्रेक्षणीयाः । विरोधिनस्तु रसस्याङ्गिरसापेक्षया कस्यचिन्न्यूनता सम्पादनीया । यथा शान्तेऽङ्गिनि शृङ्गारस्य, शृङ्गारे वा शान्तस्य । परिपोषरहितस्य रसस्य कथं रसत्वामिति चेत्— उक्तमत्राङ्गिरसापेक्षयेति । अङ्गिनो हि रसस्य यावान् परिपोषस्तावांस्तस्य न कर्तव्यः, स्वतस्तु सम्भवी परिपोषः केन वार्यते । एतद्यापेक्षिकं प्रकर्षयोगित्वमेकस्य रसस्य बहुरसेषु प्रबन्धेषु रसानामङ्गाङ्गिभावमनभ्युएगच्छताप्यशक्यप्रतिक्षेपमित्यनेन प्रकारेणाविरोधिनां विरोधिनां च रसानामङ्गाङ्गिभावेन समावेशे प्रबन्धेषु स्यादविरोधः । एतद्य सर्व येषां रसो रसान्तरस्य व्यभिचारी भवति । इति दर्शनं तन्मतेनोच्यते । मतान्तरे तु रसानां स्थायिनो भावा उपचाराद्रसशब्देनोक्तास्तेषामङ्गत्वं निर्विरोधमेव ॥ २४ ॥

ध्वन्यालोक

"पण काय हो, ज्या रसांचा एकमेकांशी विरोध नाही, उदा. :— वीर आणि शृंगार, शृंगार व हास्य, रौद्र व शृंगार, वीर व अद्‌भुत, वीर आणि रौद्र, रौद्र व करुण, किंवा शृंगार व अद्‌भुत त्या रसांमध्ये अंग आणि अंगी असा संबंध असू द्या, पण ज्याचा एकमेकांशी बाध्य व बाधक असा संबंध आहे, त्यांच्यामध्ये एक मुख्य व दुसरा त्याचे अंग असा संबंध कसा असू शकेल? उदा. शृंगार आणि बीभत्स, वीर व भयानक शांत व रौद्र किंवा शांत व शृंगार यामध्ये." अशी शंका लक्षात घेऊन पुढीलप्रमाणे सांगण्यात येत आहे —

(रसांपैकी) कोणताही एक रस अंगी असला, तर दुसरा रस— मग तो त्याला विरोधी असो की नसो—परिपोषावस्थेत नेऊ नये, म्हणते कोणताही दोष उत्पन्न होणार नाही ॥ २४ ॥

प्रबंधातून शृंगार वगैरे रस अंगी म्हणून अभिव्यक्त होत असताना त्याला विरोधी असणारा किंवा नसणारा रस परिपोषावस्थेपर्यंत नेऊ नये. त्या बाबतीत परिपोष टाळण्याचा पहिला उपाय म्हणजे दुसरा रस अ—विरोधी असल्यास त्याचा 'अंगी' रसापेक्षा फार अधिक उत्कर्ष न करणे, हा. [१] कारण दोघांचा उत्कर्ष सारखाच असला, तरी त्यांमध्ये विरोध संभवत नाही; जसे—

'एका बाजूला प्रिया रोदन करिते आहे, तर दुसऱ्या बाजूला लढाईच्या वाद्यांचा घोष ऐकू येत आहे. प्रेम आणि लढण्याची ओढ यामुळे वीराचे मन हिंदोळ्याप्रमाणे हेलकावे खात आहे.' [२]

किंवा जसे —

"गळ्यातला हार ओढून काढून तो एखाद्या रुद्राक्षाच्या माळेप्रमाणे हातात घेऊन फिरविणारी, कमरपट्टा सर्पाप्रमाणे वापरून वीरासन घालणारी व मंत्र पुटपुटल्याचा अभिनय करताना जिच्या स्फुरण पावणाऱ्या ओष्ठयुगलातून अस्फुट हसू बाहेर फुटत आहे अशी जी देवी पार्वती । 'संध्ये' बद्दलच्या आपल्या मत्सराने [३] शंकराला हसविताना तेथे दिसली, ती तुमचे रक्षण करो."

या उदाहरणामध्ये

'अंगी' रसाला विरुद्ध असणारे व्यभिचारी भाव (अंगभूत रसांची अभिव्यक्ति करिताना) फार मोठ्या प्रमाणावर समाविष्ट न करणे, किंवा समाविष्ट केले तरी लगेच ते 'अंगी' रसाच्या व्यभिचारिभावाशी मिळतेजुळते होतील असे करणे, हा विरोध टाळण्याचा दुसरा उपाय होय.

एखादा अंगभूत रस परिपोषाच्या अवस्थेला नेला जात असला, तरी तो अंगभूतच राहील अशी पुन्हा पुन्हा काळजी घेणे, हा विरोध टाळण्याचा तिसरा उपाय. या पद्धतींने विरोध टाळण्याचे आणखी [४] प्रकारही (वाचकांनी) जाणून घ्यावेत. मात्र कोणत्याही विरोधी रसाचा उत्कर्ष 'अंगी' रसाच्या तुलनेने थोडा कमी राहील ही दक्षता बाळगावी जसे शांत रस अंगी असताना शृंगाराचा किंवा शृंगार अंगी असताना शान्ताचा. 'ज्याचा परिपोष झाला नाही, त्याला रस कसे म्हणावयाचे?' अशी शंका असेल, तर याबाबतीत आम्ही 'अंगी रसापेक्षा' असे म्हटले आहे. म्हणजे अंगी रसाचा जेवढा परिपोष केला जाईल, तेवढा त्या रसाचा करू नये. त्याचा स्वतःचा योग्य तेवढा परिपोष करू नये असे कोण म्हणतो?

प्रबन्धांमध्ये पुष्कळ रस असतात. त्यांतल्या एका रसाचा उत्कर्ष इतर रसांपेक्षा अधिक साधावा, ही गोष्ट रसारसांमध्ये अंग व अंगी असा संबंध असू शकतो हे मान्य नसणारांनासुद्धा खोंडून काढता येणार नाही. म्हणून या रीतीने प्रबंधात अविरोधी किंवा विरोधी रसांचा अंग व अंगी या संबंधाने समावेश केल्यास (त्यांच्यामध्ये) विरोध राहणार नाही.

आणि हे सर्व एक रस दुसऱ्या रसाचा व्यभिचारी होऊ शकतो असे ज्यांचे मत आहे, त्यांच्या मतानुसार सांगितले जात आहे. पण दुसऱ्या काहींच्या मतानुसार रसांच्या स्थायिभावांना लक्षणेने 'रस' असे म्हटले जाते. ते म्हणजे स्थायिभाव अंग होऊ शकतात, यामध्ये कोणताही विरोध येत नाही.

लोचनम्

शृङ्गारेण वीरस्याविरोधो युद्धनयपराक्रमादिना कन्यारत्नलाभादौ । हास्यस्य तु स्पष्टमेव तदङ्गत्वम् । हास्यस्य स्वयमपुरुषार्थस्वभावत्वेऽपि समधिकतररञ्जनोत्पादनेन शृङ्गाराङ्गतयैव तथात्वम् । रौद्रस्यापि तेन कथात्रिदविरोधः । यथोक्तम्—'शृङ्गारश्च तैः प्रसभं सेव्यते' । तैरिति रौद्रप्रकृतिभिः, रक्षोदानवोद्धतमनुष्यैरित्यर्थः । केवलं नायिकाविषयमौग्र्यं तत्र परिहर्तव्यम् ।

असम्भाव्यपृथिवीसम्मार्जनादिजनितविस्मयतया तु वीराद्भुतयोः समावेशः । यथाह मुनि :— 'वीरस्य चैव यत्कर्म सोद्भुत' इति । वीररौद्रयोर्धोरोद्धते भीमसेनादौ समावेशः क्रोधोत्साहयोरविरोधात् । रौद्रकरुणयोरपि मुनिनैवोक्तः— 'रौद्रस्यैव च यत्कर्म स ज्ञेयकरुणो रसः' इति ।

शृङ्गाराद्भुतयोरिति । यथा रत्नावल्यामैन्द्रजालिकदर्शने । शृङ्गारः बीभत्सयोरिति । ययोर्हि परस्परोन्मूलनात्मकतयैवोद्भवस्तत्र कोऽङ्गाङ्गिभावः । आलम्बननिमग्नरूपतया च रतिरुत्तिष्ठति ततः पलायमानरूपतया जुगुप्सेति समानाश्रयत्वेन तयोरन्योन्यसंस्कारोन्मूलनत्वम् । भयोत्साहावप्येवमेव विरुद्धौ वाच्यौ । शान्तस्यापि तत्त्वज्ञानसमुत्थितसमस्तसंसारविषयनिर्वेदप्राणत्वेन सर्वतो निरीहस्वभावस्य विषयासक्तिजीविताभ्यां रतिक्रोधाभ्यां विरोध एव ।

अविरोधी विरोधी वेति । वाग्रहणस्यायमभिप्राय :-- अङ्गिरसापेक्षया यदा रसान्तरस्योत्कर्षो निबध्यते तदा तदविरुद्धोऽपि रसो निबद्धश्चोद्यावहः । अथ तु युक्त्याङ्गिनि रसेऽङ्गभावतानयेनोपपत्तिर्घटते तद्विरुद्धोऽपि रसो वक्ष्यमाणेन विषयभेदादियोजनेनोपनिबध्यमानो न दोषावह इति विरोधाविरोधावकिञ्चित्करौ । विनिवेशनप्रकार एव त्ववधातव्यमिति । अङ्गिनीति सप्तम्यनादरे । अङ्गिनं रसविशेषमनादृत्य न्यक्कृत्याङ्गभूतो न पोषयितव्य इत्यर्थः । अविरोधितेति । निर्दोषतेत्यर्थः । परिपोषपरिहारे त्रीन् प्रकारानाह, तत्रेत्यादिना तृतीय इत्यन्तेन । ननु न्यूनत्वं कर्तव्यमिति वाच्ये आधिक्यस्य का सम्भावना येनोक्तमाधिक्यं न कर्तव्यमित्याशङ्क्याह—उत्कर्षसाम्य इति ।

एकतो रोदिति प्रिया अन्यतः समरतूर्यनिघोंषः ।
स्नेहेन रणरसेन च भटस्य दोलायितं हृदयम् ॥

इति च्छाया । रोदिति प्रियेत्यतो रत्युत्कर्षः । समरतूर्येति भटस्येति चोत्साहोत्कर्षः । दोलायितमिति तयोरन्यूनाधिकतया साम्यमुक्तम् । एतच्च मुक्तकविषयमेव भवति न तु प्रबन्धविषयमिति केचिदाहुस्तच्चासत्, आधिकारिकेष्वितिवृत्तेषु त्रिवर्गफलसमप्राधान्यस्य सम्भवात् । तथाहिरत्नावल्यां सचिवायत्तसिद्धत्वाभिप्रायेण पृथिवीराज्यलाभ आधिकारिकं फलं कन्यारत्नलाभः प्रासङ्गिकं फलं, नायकाभिप्रायेण तु विपर्यय इति स्थिते मन्त्रिबुद्धौ नायकबुद्धौ च स्वाम्यमात्यबुद्ध्येकत्वात्फलमिति नीत्या एकीक्रियमाणायां समप्राधान्यमेव पर्यवस्यति । यथोक्तम्— 'कवेः प्रयत्ना न्नेतृणां युक्तानाम्' इत्यलमवान्तरेण बहुना ।

एवं प्रथमं प्रकारं निरूप्य द्वितीयमाह—अङ्गीति । अनिवेशमिति । अङ्गभूते रस इति शेषः । नन्वेवं नासौ परिपुष्टो भवेदित्याशङ्क्य मतान्तरमाह-- निवेशने वेति । अत एव वाग्रहणमुत्तरपक्षदाढर्यं सूचयति न विकल्पम् । तथा चैक एवायं प्रकारः । अन्यथा तु द्वौ स्याताम् । अङ्गिनो रसस्य यो व्यभिचारी तस्यानुवृत्तिरनुसन्धानम् । यथा 'कोपात्कोमललोल' इति श्लोकेऽङ्गिभूतायां रतावङ्गत्वेन यः क्रोध उपनिबद्धस्तत्र 'बद्ध्वा दृढम्' इत्यमर्षस्य निवेशितस्य क्षिप्रमेव रुदत्येति हसन्निति च रत्युचितेर्ष्यौत्सुक्यहर्षानुसन्धानम् ।

तृतीयं प्रकारमाह— अङ्गत्वेनेति । अत्र च तापसवत्सराजे वत्सराजस्य पद्मावतीविषयः सम्भोगशृङ्गार उदाहरणीकर्तव्यः । अन्येऽपीति । विभावानुभावानां चापि उत्कर्षो न कर्तव्योऽङ्गिरसविरोधिनां, निवेशनमेव वा न कार्यम् । कृतमपि चाङ्गिरसविभावानुभावैरुपबृंहणीयम् ।

परिपोषिता अपि विरुद्धरसविभावानुभावा अङ्गत्वं प्रति जागरयितव्या इत्यादि स्वयं शक्यमुत्प्रेक्षितुम् । एवं विरोध्यविरोधिसाधारणं प्रकारमभिधाय विरोधिविषयासाधारणपोषपरिहारप्रकारगतत्वेनैव विशेषान्तरमप्याहविरोधिन इति । सम्भवीति । प्रधानाविरोधित्वेनेति शेषः । एतच्चेति । उपकार्योपकारकभावो रसानां नास्ति स्वचमत्कारविश्रान्तत्वात्, अन्यथा रसत्वायोगात्, तदभावे च कथमङ्गाङ्गितेत्यपि येषां मतं तैरपि कस्यचिद्रसस्य प्रकृष्टत्वं भूयःप्रबन्धव्यापकत्वमन्येषां चाल्पप्रबन्धानुगामित्वमभ्युपगन्तव्यमितिवृत्तसङ्कटनाया एवान्यथानुपपत्तेः, भूयः प्रबन्धव्यापकस्य च रसस्य रसान्तरैर्यदि न काचित्सङ्गतिस्तदितिवृत्तस्यापि न स्यात् । सङ्गतिश्चेदयमेवोपकार्योपकारकभावः । न च चमत्कारविश्रान्तेविरोधः कश्चिदिति समनन्तरमेवोक्तं तदाह—अनभ्युपगच्छतापि इति । शब्दमात्रेणासौ नाभ्युपगच्छति । अकाम एवाभ्युपगमयितव्य इति भावः । अन्यस्तु व्याचष्टे—एतच्चापेक्षिकमित्यादिग्रन्थो द्वितीयमतसभिप्रेत्य यत्र रसानामुपकार्योपकारकता नास्ति, तत्रापि हि भयोवृत्तव्याप्तत्वमेवाङ्गित्वमिति । एतच्चासत्; एवं हि एतच्च सर्वमिति सर्वशब्देन य उपसंहार एकपक्षविषयः मतान्तरेऽपीत्यादिना च यो द्वितीयपक्षोपक्रमः सोऽतीव दुःश्लिष्ट इत्यलं पूर्ववंश्यैः सह बहुना संलापेन । येषामिति । भावाध्यायसमाप्तावस्ति श्लोक :—

बहूनां समवेतानां रूपं यस्य भवेद्बहु ।
स मन्तव्यो रसः स्थायी शेषाः संञ्श्चरिणो मताः । इति

तत्रोक्तक्रमेणाधिकारिकेतिवृत्तव्यापिका चित्तवृत्तिरवश्यमेव स्थायित्वेन भाति, प्रासङ्गिकवृत्तान्तगामिनी तु व्यभिचारितयेति रस्यमानतासमये स्थायिव्यभिचारिभावस्य न कश्चिद्विरोध इति केचिद्व्याचचक्षिरे । तथा च भागुरिरपि किं रसानामपि स्थायिसञ्चारितास्तीत्याक्षिप्याभ्युपगमेनैवोत्तरमवोचद्वाढमस्तीति ।

अन्ये तु स्थायितया पठितस्यापि रसस्य रसान्तरे व्यभिचारित्वमस्ति, यथा क्रोधस्य वीरे व्यभिचारितया पठितस्यापि स्थायित्वमेव रसान्तरे, यथा तत्त्वज्ञानविभावकस्य निर्वेदस्य शान्ते; व्यभिचारिणो वा सत एव व्यभिचार्यन्तरापेक्षया स्थायित्वमेव, यथा विक्रमोर्वश्यामुन्मादस्य चतुर्थेऽङ्के, इतीयन्तमर्थमवबोधयितुमयं श्लोकः । बहूनां चित्त वृत्तिरूपाणां भावानां मध्ये यस्य बहुलं रूपं यथोपलभ्यते स स्थायी भाव, स च रसो रसीकरणयोग्यः, शेषास्तु सञ्चारिण इति व्याचक्षते, न तु रसानां स्थायिसञ्चारिभावेनाङ्गाङ्गितोक्तेति । अत एवान्ये रसस्थायीति षष्ठ्या सप्तम्या द्वितीयया वाश्रितादिषु गमिगाम्यादीनामिति समासं पठन्ति । तदाह—मतान्तरेऽपीति । रसशब्देनेति । 'रसान्तरसमावेशः प्रस्तुतस्य रसस्य यः ।' इत्यादिप्राक्तनकारिकानिविष्टेनेत्यर्थः ॥ २४ ॥

लोचन

शृंगाराचा वीररसाशी विरोध असत नाही असे म्हणण्याचे कारण युद्धातील डावपेच व पराक्रम वगैरेंमुळे एखाद्या रमणीचा पत्नी म्हणून लाभ होऊ शकतो. [५] पण हास्य हा शृंगाराला अंगभूत असतो हे उघडच आहे. हास्य हे स्वतः जरी जीवनाच्या (धर्म, अर्थ, काम व मोक्ष या) चार पुरुषार्थांपैकी एक नसले, तरी विशेष मनोरंजन करण्याचे त्यात सामर्थ्य असल्याने शृंगाराचे अंग होऊन त्याला पुरुषार्थाची योग्यता प्राप्त होते. शृंगाराशी रौद्राचाही अविरोध काही परिस्थितीत असू शकेल. कारण भरतांनी म्हटलेच आहे की [६] 'आणि ते रतिक्रीडेचा दांडगाईने उपभोग घेतात' 'ते' म्हणजे रौद्र वगैरे स्वभावाचे राक्षस, दानव व बलदंड

मानव. अशा पात्रांच्या नायिकेशी होणाऱ्या उग्र प्रकारच्या वर्तनाचे वर्णन करणे मात्र कवीने कटाक्षाने टाळावे. [७] वीर व अद्‌भुत यांचा (विरोध उत्पन्न न होता) समावेश होतो असे म्हणण्याचे कारण एखाद्या वीर पुरुषाने सर्व पृथ्वी निष्कंटक करून टाकणे यासारखा असंभवनीय पराक्रम लोकांना आश्चर्य वाटावयास कारणीभूत होतो. कारण भरतमुनींनी म्हटलेच आहे की [८]– 'वीररसाचे (म्हणजे वीररसाचा स्थायिभाव जो उत्साह त्याचे) जे कार्य, तो अद्‌भुत रस होय.' [९] वीर आणि रौद्र यांचा समावेश ते भीमसेन वगैरे धीरोद्धत नायकांचे ठिकाणी दाखवून करिता येईल, कारण उत्साह व क्रोध यांमध्ये विरोध नाही. रौद्र आणि करुण यांमध्येही विरोध नसतो, हे भरतमुनींनीच पुढील वाक्याने सांगितले आहे– 'रौद्राचे जे कार्य, तो करुण समजावा. [१०]'

'शृङ्गार व अद्‌भुत' (यांमध्ये अविरोध असतो) – जसे रत्नावलीमध्ये जादूगार जादूचा प्रयोग दाखवितो, तेव्हा. [११] 'शृगार आणि बीभत्स' – कारण जे दोन स्थायिभाव एकमेकांचा उच्छेद करूनच प्रकट होतात, त्यांच्यामध्ये एक अंगी आणि दुसरा त्याचे अंग असा संबंध कसा असू शकणार? आलंबनविभावात मग्न म्हणजे एकरूप होणे हे रतीचे स्वरूप होय, तर त्यापासून म्हणजे आलंबन विभावापासून दूर पळून जावेसे वाटणे हे जुगुप्सेचे स्वरूप होय. म्हणून रति व जुगुप्सा यांचा आश्रय एकच व्यक्ति असेल, तर ते दोन्ही स्थायिभाव एकमेकांना उखडूनच टाकतात. [१२] भय आणि उत्साह हे स्थायिभावही परस्परविरुद्ध असल्याचे वरील पद्धतीनेच स्पष्ट करिता येईल. [१३] शांत रसाचेही सारसर्वस्व तत्त्वज्ञानामुळे वाटू लागणारी साऱ्या संसाराविषयीची विरक्ति हे असल्यामुळे त्याचे स्वरूप सर्व ऐहिक गोष्टींविषयी निरिच्छपणा असे असते व म्हणून विषयांबद्दलची आसक्ति हेच ज्यांचे सारसर्वस्व असते, अशा रति व क्रोध [१४] या स्थायिभावांशी शांत रसाचा विरोधच असतो.

'विरोधी असो किंवा नसो' -- 'किंवा' हा शब्द योजिण्यामागील हेतु असा– अंगी म्हणजे प्रस्तुत मुख्य रसापेक्षा जेव्हा दुसऱ्या एखाद्या रसाचा अधिक परिपोष केला जातो, तेव्हा तो दुसरा रस अंगी रसाला विरोध करणारा नसला, तरी त्याचा समावेश दोषास्पदच होय. त्या उलट कवि काही युक्ति योजून जेव्हा दुसऱ्या एखाद्या रसाचा समावेश अंगी रसाचे अंग म्हणून करतो, तेव्हा तो दुसरा रस अंगी रसाच्या विरुद्ध प्रकृतीचा असला, तरी त्याचा समावेश दोषार्ह ठरत नाही. आता दुसऱ्या विरुद्ध रसाचा समावेश करिताना ज्या युक्तीचा अवलंब करावयाचा, ती युक्ति म्हणजे त्या दोन रसांचे आश्रय भिन्न आहेत असे दाखविणे, वगैरे. या युक्त्या यानंतर सांगण्यात येणारच आहेत [१५] म्हणून दोन रस परस्परविरुद्ध आहेत किंवा नाहीत याला विशेष महत्त्व नाही. पण ते दोन रस कोणत्या प्रकारे योजिले जात आहेत, याकडे [१६] लक्ष पुरविणे अगत्याचे आहे. **अङ्गिनि** ही सप्तमी अनादर या अर्थी आहे [१७] (आणि तिचा अर्थ 'अंगी असला तरी' असा आहे). अंगी असलेल्या विशिष्ट रसाकडे दुर्लक्ष करून म्हणजे त्या रसाला न जुमानता अंगभूत असलेल्या रसाचा परिपोष करू नये, हा भावार्थ. अविरोधिता म्हणजे दोषास्पद नसणे, असा अर्थ. दुसऱ्या रसाचा परिपोष टाळण्याचे तीन प्रकार (वृत्तीमध्ये) 'त्याबाबतीत' पासून '(हा विरोध टाळण्याचा) तिसरा उपाय' येथपर्यंतच्या शब्दांनी सांगितले जात आहेत. पण काय हो, 'कमी महत्व द्यावे' असे म्हणावयाव्या ऐवजी वृत्तीत 'अधिक उत्कर्ष करू नये' असे का म्हटले आहे? कारण त्या दुसऱ्या रसाला कमी महत्त्व दिल्यास त्याला मुख्य रसापेक्षा अधिक महत्त्व देण्याचा संभवच कोठला? अशी शंका लक्षात आणून वृत्तिकार 'उत्कर्ष सारखाच असला' इ. सांगतात. [१८] ('एका बाजूला प्रिया रोदन करीत आहे') 'प्रिया रोदन करीत आहे' असे म्हटल्यामुळे रति या स्थायी भावाचा उत्कर्ष सूचित होत आहे, 'आणि लढाईच्या वाद्यांचा गजर' व 'वीराचे मन' या शब्दांमुळे उत्साह या स्थायिभावाचा उत्कर्ष व्यक्त होत आहे.

'हिंदोळ्याप्रमाणे हेलकावे खात आहे' या शब्दांनी त्या दोन स्थायिभावांचे साम्य त्या दोहोंपैकी कोणताही कमी नाही किंवा जास्त नाही अशा स्वरूपात सुचविले गेले आहे. पण 'ही परिस्थिति मुक्तकाच्या बाबतीतच असते, प्रबंधाच्या बाबतीत नसते' असे जे काही टीकाकार म्हणतात, ते बरोबर नाही. कारण (प्रबंधाच्या बाबतीत) मुख्य कथानकामध्ये धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांची फळे सारखीच महत्त्वाची असण्याचा संभव असतो. उदा. रत्नावली नाटिकेचा नायक आपल्या सर्व (राजकीय) कार्यांच्या (सिद्धीच्या) बाबतीत सचिवावर (म्हणजे यौगन्धरायणावर) सर्वस्वी अवलंबून असल्याने (सचिवाच्या दृष्टीने विचार केल्यास) उदयनाला पृथ्वीचे राज्य मिळणे हे त्या नाटिकेचे प्रमुख फळ असून सागरिका या सुंदर राजकन्येची प्राप्ति हे प्रासंगिक (किंवा आनुषंगिक) फळ होय. पण नायकाच्या (म्हणजे उदयन या धीरललित राजाच्या) दृष्टीने विचार केल्यास उलट परिस्थिति आहे (म्हणजे राजकन्येची प्राप्ति हे मुख्य फळ व पृथ्वीच्या राज्याचा लाभ हे आनुषंगिक फळ). असे असल्यामुळे मंत्र्यांची दृष्टि आणि नायकाची दृष्टि एकमेकांना विरोधी नाही. म्हणून 'स्वामी आणि अमात्य यांची वृत्ति एकमेकांशी सहकार्य करण्याची असल्यास त्यांना इष्ट फळाची प्राप्ति होते' या न्यायाने [१९] (रत्नावली या नायिकेच्या बाबतीत अमात्य व नायक यांच्या धोरणांमध्ये परस्परविरोध नसल्याने) वीर व शृंगार यांचे प्राधान्य सारखेच आहे असा शेवटी निष्कर्ष निघतो. कारण, म्हटलेच आहे की, 'कवीच्या प्रयत्नामुळे नाटकादि ग्रंथातील नायक आपापल्या कार्यात मग्न झाले असताना [२०]' इ असो, आता ही अवान्तर गोष्टीची अधिक चर्चा नको.

याप्रमाणे परिपोष टाळण्याच्या पहिल्या प्रकाराचे विवरण केल्यावर आता दुसऱ्या प्रकाराच्या विवरणास वृत्तिकार 'अंगी रसाला' इ. शब्दांनी प्रारंभ करितात. 'समाविष्ट न करणे' – 'अंगभूत रसाचे चित्रण करिताना' या शब्दांची भर घालून वाक्य पूर्ण करावे. 'पण काय हो, 'यामुळे (म्हणजे व्यभिचारिभाव विपुल प्रमाणात समाविष्ट केले नाहीत, तर) तो अंगभूत रस पुष्ट होणार नाही!' अशी प्रतिपक्ष्याची शंका लक्षात आणून वृत्तिकार 'किंवा समाविष्ट केले तरी' या शब्दांनी दुसरे मत मांडतात. म्हणूनच 'किंवा' हा शब्द तुल्यबल, वैकल्पिक असा दुसरा पक्ष विकल्प सुचवीत नसून दुसरे मतच अधिक ग्राह्य आहे असे सुचवितो. [२१] आणि असे असल्यामुळे समावेश करणे व न करणे हे दोन्ही मिळून एकच प्रकार समजावा. असे न मानिल्यास हे दोन वेगळे प्रकार झाले असते. [२२] अंगी रसाचा जो व्यभिचारिभाव असेल, त्याला अनुसरणे म्हणजे त्याच्याशी अंगभूत रसाच्या व्यभिचारिभावाने मिळते जुळते होणे. उदा. 'प्रियेने रागावून' इ. (प्रथम खंड, "उद्द्योत – ३ 'ती दक्षता म्हणजे – ४) रसपरिपोषाला विघ्न करणारा अलंकाराचा अतिविस्तार टाळावा'" वरील) श्लोकामध्ये मुख्य असलेल्या रति या स्थायिभावाचे अंग म्हणून 'क्रोधाचा' [२३] समावेश 'रागावून' या शब्दाने बोलून दाखविला आहे. त्या श्लोकातच 'करकचून बांधले' असे म्हणून रौद्र रसाचा स्थायिभाव असलेल्या अमर्षाची अभिव्यक्ति केल्यानंतर तो अमर्ष लगेचच 'रडतरडत,' 'हसून' हे शब्द योजिल्यामुळे 'रतीला उचित अशा ईर्ष्या, औत्सुक्य व हर्ष या व्यभिचारिभावांशी मिळता जुळता झाला आहे. [२४]

परिपोष टाळण्याचा तिसरा प्रकार वृत्तिकार 'तरी तो अंगच राहील' इ. शब्दांनी सांगतात. आणि या तिसऱ्या प्रकाराचे उदाहरण 'तापसवत्सराज' नाटकातील उदायनाचा पद्मावतीविषयक संभोगशृंगार [२५] हे समजावे. 'आणखी प्रकारही'– अंगी रसाला विरोधी असणाऱ्या रसांच्या विभाव – अनुभावांचा उत्कर्ष न करण्याची दक्षता बाळगावी, किंवा अशा (म्हणजे विरोधी रसाच्या) विभावादिकांचे चित्रणच करू नये. आणि त्यांचे असे चित्रण केले तरी त्यांचे अंगी रसाच्या विभावअनुभावांशी तादात्म्य साधूनच त्यांचा परिपोष करावा. आणि अंगी रसाच्या विरोधी रसाच्या विभाव-- अनुभावांचा परिपोष केला, तरी ते विभाव–अनुभाव अंगी रसाचे अंगच राहतील ही दक्षता बाळगावी, वगैरे आणखी उपायांची कल्पना वाचक स्वतःही करू

शकतील. अशा रीतीने विरोधी व अविरोधी – दोन्ही रसांच्या बाबतीत साधारण असणारे, परिपोष टाळण्याचे तीन प्रकार सांगून झाल्यावर केवळ विरोधी रसांच्या बाबतीत लागू पडणाऱ्या परिपोष टाळण्याच्या संबंधातच आणखी एक वैशिष्ट्य (म्हणजे परिपोष टाळण्याचा आणखी एक प्रकार [२६]) म्हणून वृत्तिकार 'कोणत्याही विरोधी रसाचा उत्कर्ष' इ. शब्दांनी सांगतात.

'स्वतःचा योग्य तेवढा' – 'मुख्य रसाला विरोधी होणार नाही. अशा प्रकारे' या शब्दांची भर घालून वाक्य पुरे करावे. ('अधिक उत्कर्ष साधावा) ही गोष्ट' – "रसांमध्ये एक उपकार्य व दुसरा उपकारक असा संबंध नसतो. कारण रसांचे स्वतःच्या विस्मयकारी आनंदातच पर्यवसान होते. तसे होत नसेल, तर त्यांना 'रस' म्हणताच येणार नाही. आणि त्यांच्या ठिकाणी जर रसत्व हा धर्म नसेल, तर त्या दोहोंमध्ये एक अंगी व दुसरा त्याचे अंग असा संबंध कसा असू शकेल?" असे ज्यांचे मत असेल, त्यांनासुद्धा कोणता तरी एक रस उत्कृष्ट असतो म्हणजे तो रस प्रबंधाचा मोठा भाग व्यापतो आणि इतर रस त्या प्रबंधाचा लहानसा भाग व्यापतात हे मान्य करावे लागेल. कारण, तस मान्य केले नाही, तर कथानकाच्या निरनिराळ्या भागांचा एकमेकांशी सांधा जुळणार नाही. प्रबंधाच्या मोठ्या भागाला व्यापणाऱ्या रसाचा (प्रबंधातील लहान भाग व्यापणाऱ्या) इतर रसांशी जर काहीच संबंध नसेल, तर कथानकाच्या मोठ्या व लहान भागांचाही एकमेकांशी काहीच संबंध जुळणार नाही. [२७] आणि त्यांमध्ये जर संबंध असेल, तर तोच रसांमधील उपकार्य–उपकारक संबंध होय. आणि रसांचे पर्यवसान जरी त्यांच्या स्वतःच्या चमत्कारातच होत असले, तरी त्यामुळे रसांमध्ये उपकार्य–उपकारक संबंध असण्यात काहीच विरोध येत नाही हे नुकतेच [२८]सांगून झाले आहे. म्हणून वृत्तिकार 'मान्य नसणारालासुद्धा' इ. म्हणतात. 'हा मान्य नसणारा' फक्त तोंडानेच म्हणजे वरवरच 'मला मान्य नाही' असे म्हणतो. [२९] रसांमधील अंगांगिभाव मान्य करण्याची त्याची इच्छा नसली, तरी (युक्तिवादाच्या सामर्थ्यामुळे) आमचे म्हणणे त्याला मान्य करावयास लावणे शक्य आहे, हा आशय. पण दुसरा कोणीतरी टीकाकार याचे पुढीलप्रमाणे विवरण करितो– 'इतर रसांपेक्षा अधिक उत्कर्ष ही गोष्ट' इ. वाक्य वृत्तीत यानंतर लगेच 'दुसऱ्या काहींच्या मतानुसार' इ. शब्दांनी मांडण्यात येणाऱ्या दुसऱ्या मताला अनुलक्षून आहे. ते मत असे – प्रबंधातील रसांमध्ये एक उपकार्य व दुसरा उपकारक असा संबंध नसतो, [३०] पण असे असले तरी एका स्थायिभावाने प्रबंधाचा पुष्कळसा भाग व्यापणे हेच त्या स्थायिभावाचे अंगित्व होय. (आणि इतर स्थायिभावांनी छोटासा भाग व्यापणे हे त्यांचे अंगत्व होय.) परंतु हे त्या टीकाकारांचे म्हणणे बरोबर नाही, कारण त्यांचे म्हणणे मान्य केल्यास 'आणि हे सर्व' या वृत्तीतल्या वाक्यातील 'सर्व' शब्दाने वृत्तिकारांनी एका मताचा जो समारोप केला आहे व 'दुसऱ्या काहींच्या मतांचा' इ. शब्दांनी दुसरे मत मांडण्यास जो प्रारंभ केला आहे, त्या दोहोंची मुळीच संगति लागणार नाही. [३१] असो, आमच्याच वंशातील पूर्वी होऊन गेलेल्या टीकाकारांश. [३२] अधिक वादविवाद करणे नको. 'ज्यांचे मत' – (नाट्यशास्त्राच्या) भावाध्यायाच्या (म्हणजे ७ व्या अध्यायाच्या) शेवटी पुढील श्लोक आहे [३३] – (एका प्रबंधात) एकत्र आलेल्या अनेक रसांपैकी ज्या रसाची व्याप्ति मोठी असेल, तो रस स्थायी म्हणजे मुख्य समजावा व बाकीचे (त्याचे) संचारी म्हणजे दुय्यम मानले जातात.

वरील श्लोकात म्हटल्याप्रमाणे मुख्य कथानकाला व्यापणारी चित्तवृत्ति (म्हणजे स्थायिभाव) अटळपणे स्थिर म्हणून प्रतीत होते आणि दुय्यम कथानकांना व्यापणारी चित्तवृत्ति व्यभिचारिणी (म्हणजे अस्थिर किंवा गौण) म्हणून प्रत्ययास येते. (संपूर्ण कथानकातील) स्थायिभावांचा रसांच्या रूपाने आस्वाद घेतेवेळी त्यांपैकी एक रस स्थायी असतो आणि इतर रस व्यभिचारी असतात असे मानण्यात काहीही विरोध नाही. [३४] असे काही टीकाकारांनी प्रस्तुत श्लोकाचे विवरण केले आहे. उदा. 'भागुरीने सुद्धा [३५]

'रसांमध्येदेखील एक स्थायी व इतर संचारी असा संबंध असतो काय?' असा प्रश्न उपस्थित करून मग त्या प्रश्नाला स्वीकारपूर्वकच उत्तर दिले की, 'होय, असतो.'

पण (नाट्यशास्त्रावरील) दुसरे काही टीकाकार पुढीलप्रमाणे विवरण करितात– "भरतांनी (एखाद्या रसाच्या संदर्भात) स्थायिभाव [३६] म्हणून सांगितलेला भाव दुसऱ्या रसाच्या संदर्भात व्यभिचारी भाव होऊ शकतो, उदा. क्रोध हा रौद्र रसाचा स्थायी भाव म्हणून सांगितला असला तरी दुसऱ्या म्हणजे वीर रसाच्या संदर्भात तो व्यभिचारी भाव होतो. तसेच व्यभिचारी म्हणून सांगितलेला व्यभिचारी भावही दुसऱ्या रसाच्या संदर्भात स्थायीभाव होतो. उदा. तत्त्वज्ञान हा ज्याचा विभाव आहे असा निर्वेद हा व्यभिचारिभाव (करुण व विप्रलंभ यांचा व्यभिचारिभाव म्हणून सांगितला असला, तरी तो) शांत रसाचा स्थायी होतो. [३७] किंवा एखादा भाव व्यभिचारी भाव म्हणून सांगितला असला, तरी तो दुसऱ्या व्यभिचारिभावांच्या तुलनेने (अधिक व्यापक व स्थिर असल्यामुळे) स्थायीच होऊ शकतो. जसे (भरतांनी उन्माद हा व्यभिचारिभाव म्हणून सांगितला असला, तरी) विक्रमोर्वशीयातील चवथ्या अंकात उन्माद हा ('वितर्क' वगैरे व्यभिचारिभावांच्या तुलनेने स्थायी बनला आहे. [३८]) हा इतका सर्व अर्थ सांगण्याच्या हेतूने वरील (एका प्रबंधात) 'एकत्र आलेल्या' इ. श्लोक भरतांनी लिहिला आहे. (त्या श्लोकाचा अर्थ असा–) चित्तवृत्ति हे स्वरूप असलेल्या अनेक भावांपैकी ज्या भावाचे रूप व्यापक असल्याचे आढळते, तो स्थायिभाव आणि तोच 'रस' म्हणजे आस्वादिला जाण्यास योग्य असतो. पण बाकीचे भाव 'संचारी [३९] (म्हणजे व्यभिचारी भाव) असतात. पण त्या टीकाकारांच्या मते या श्लोकात अनेक रसांच्या बाबतीत स्थायिसंचारिभावामुळे (म्हणजे त्यांपैकी एक स्थायी व इतर संचारी असल्यामुळे) अंगांगिसंबंध असतो असे म्हटलेले नाही. [४०] म्हणूनच हे दुसरे टीकाकार 'रसस्थायी' हा समासयुक्त पाठ स्वीकारतात व त्या सामासिक शब्दाचा विग्रह 'रस' शब्दांची षष्ठी, सप्तमी किंवा द्वितीया योजून करितात. द्वितीया तत्पुरुष समास ते टीकाकार **द्वितीया श्रितातीत**– (२–१–२४) इ. सूत्रावरील (आश्रितादिषु) **गमिगाम्यादीनामुपसंख्या नम्** [४२] । या वार्तिकाप्रमाणे झाला आहे असे मानितात. म्हणून वृत्तिकार 'पण दुसऱ्या काहींच्या मतानुसार' इ. म्हणतात. 'रस असे म्हटले जाते. –' 'प्रस्तुत रस जर समग्र ग्रंथाला व्यापून टाकीत असेल, तर त्याचा इतर रसांबरोबर केलेला समावेश' इ. पूर्वीच्या (म्हणजे २२ व्या) कारिकेमध्ये योजिलेला रस हा शब्द असा अर्थ. ॥ २४ ॥

टीपा

१) मुळात अविरोधी असणाऱ्या रसाचा देखील जर प्रमाणाबाहेर परिपोष केला, तर तो मुख्यरसाला बाधक ठरतो. त्या उलट मुळात विरोधी असणाऱ्या रसाचा परिपोष पुढे सांगण्यात येणाऱ्या उपायांचा अवलंब करून बेताने केला, तर त्यांमधील विरोध दूर होऊ शकतो.

२) येथे रति आणि उत्साह या दोन अ–विरोधी असलेल्या स्थायिभावांचा उत्कर्ष सारख्याच प्रमाणात साधला आहे, म्हणून त्यांमध्ये विरोध उत्पन्न झालेला नाही.

३) शंकर हे संध्यावंदन करीत असताना त्या संध्येबद्दल मत्सर वाटून ती वरीलप्रमाणे शंकराची नक्कल करू लागली. यामुळे येथे शृंगार व हास्य या दोन अविरोधी रसांचा समान उत्कर्ष साधला आहे. पार्वतीला संध्येबद्दल मत्सर वाटतो ही कल्पना कुमारसंभवम्, ८–५० येथे आली आहे.

४) हे आणखी प्रकार कोणते हे द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'" वरील लोचनात सांगितले आहे.

५) व तिच्याबद्दलच्या त्याच्या रतिभावाच्या कवीने केलेल्या वर्णनामुळे वाचकांना शृंगार रसाचा आस्वाद मिळतो.

६) पाहा, नाट्यशास्त्र, ६–६३ नंतरचा गद्य भाग (रसभावविचार, कंगले, पृ. २८८)

७) उदा. वेणीसंहार, अंक २ मधील दुर्योधन या उद्धृत पात्राचे भानुमतीशी होणारे शृंगारिक वर्तन दांडगाईचे नाही.

८) नाट्यशास्त्र, ६–४१.

९) याशिवाय नाट्यशास्त्र ६–३९ मध्ये **वीराच्चैवाद्भुतोत्पत्तिः ।** असेही म्हटले आहे.

१०) पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रसाची अंगेसुद्धा मुख्य रसाला कोणकोणती दक्षता घेतल्यास बाधक होत नाहीत याचे विवरण'". याशिवाय नाट्यशास्त्र ६–३९ मध्येही **रौद्राच्च करुणो रसः** । असे म्हटले आहे.

११) रत्नावली, अंक ४ मध्ये हा प्रसंग आहे. शंबरसिद्धि नावाच्या जादूगाराने राजवाड्याला आग लागल्याचा भास उत्पन्न केला. त्या आगीत सागरिका सापडली असताना तिला वाचविण्यासाठी उदयन अंतःपुराकडे धाव घेतो व त्यावेळी त्याने तिला आपल्या शरीराचा आधार दिल्यामुळे त्या दोघांचे मीलन होते. अशा रीतीने अद्भुत हा शृंगाराचे अंग झाला आहे.

१२) म्हणूनच वृत्तीमध्ये त्यांच्यात बाध्यबाधकभाव असतो असे म्हटले आहे.

१३) वीररसाचा स्थायीभाव उत्साह याचे स्वरूप त्याच्या आलंबनविभावाबाबत ओढ वाटणे हे असते, तर भयानक रसाच्या भय या स्थायिभावाचे स्वरूप त्याच्या आलंबनविभावापासून पळून जावेसे वाटणे असेच असते.

१४) आलंबनविभावाविषयी आसक्ति हे रतीचे तर स्वरूप आहेच, पण ज्या गोष्टीविषयी आसक्ति आहे, तिच्या आड येणाऱ्या व्यक्तीविषयी क्रोध उत्पन्न होतो, म्हणून क्रोधाचेही सारसर्वस्व आसक्ति, असेच म्हटले आहे. पाहा, श्रीमद्भगवद्गीता, २–६२, **कामात् क्रोधोऽभिजायते ।**

१५) यानंतर, कारिका २५ ते २७ यांमध्ये.

१६) याकडे, म्हणजे कारिका २४ ते २७ यांमध्ये सांगितलेल्या गोष्टींकडे.

१७) पाहा, अष्टाध्यायी, २–३–३८, **षष्ठी चानादरे ।** सूत्रातील च या शब्दामुळे सप्तमीचाही बोध होतो.

१८) 'कमी महत्व द्यावे' याचा अर्थ 'अधिक महत्व देऊ नये व समान महत्त्वही देऊ नये' असा होतो. पण वृत्तिकारांना 'अधिक महत्त्व देऊ नये' इतकेच अभिप्रेत आहे. 'समान महत्त्व देऊ नये' हे अभिप्रेत नाही म्हणून त्यांनी अधिक उत्कर्ष करू नये' असे म्हटले.

१९) हा न्याय कोणत्या तरी राजनीतिशास्त्रविषयक ग्रंथातून घेतला असावा असे वाटते.

२०) अभिनवगुप्तांनी वरील अवतरण कोणत्या ग्रंथातून घेतले आहे हे समजत नाही. शिवाय ते पूर्ण वाक्यही उद्धृत केले नसल्याने त्याचा नेमका अर्थ लावणेसुद्धा कठीण आहे. पण ज्या संदर्भात हे अवतरण उद्धृत केले आहे, त्यावरुन त्या सर्व वाक्याचा आशय पुढीलप्रमाणे असण्याचा संभव आहे—कवीच्या प्रयत्नाने नायक आणि सचिव हे आपआपल्या कार्यात मग्न झाले असताना त्यांनी जर एकमेकांशी सहकार्य केले, तर नायकाला इष्ट फळाची प्राप्ति होते.

२१) तुलनेसाठी पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'विषय म्हणजे काव्याचा प्रकार. त्याचे औचित्य हेही संघटनेचे नियामक कारण. गद्यकाव्यातही वर सांगितलेले औचित्य हेच संघटनेचे नियामक कारण' वरील 'आणि वृत्तीतला' इ वाक्य. इंग्रजीमध्ये एक विधान केल्यावर आपण एखादेवेळी 'or rather असे म्हणून दुसरे विधान करितो, तसे येथील दुसऱ्या मतासंबंधी समजावे.

२२) म्हणजे वृत्तिकारांनी 'हा दुसरा उपाय' असे न म्हणता 'हे दुसरा व तिसरा उपाय होत' असे म्हटले असते.

२३) म्हणजे 'अमर्ष' या व्यभिचारी भावाचा.

२४) मिळताजुळता होण्याचे कारण ईर्ष्या, औत्सुक्य व हर्ष हे तिन्ही व्यभिचारिभाव क्रोध व विप्रलंभरति या दोन्ही स्थायिभावांना साधारण आहेत.

२५) पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधातून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वरील 'कारण तापसवत्सराज नाटकामध्ये' इ. वाक्य, व तापसवत्सराजाच्या संविधानकाचे अभिनवगुप्तांनी केलेले परीक्षण. त्या नाटकाचे मुख्य फळ उदयनाला वासवदत्तेची पुनः प्राप्ति होणे हे असून उदयनाची पद्मावतीविषयक रति ही त्याच्या वासवदत्ताविषयक रतीला दुय्यमच राहील अशी नाटककाराने काळजी घेतली आहे.

२६) आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कारिका २४ मध्ये व तीवरील वृत्तीमध्ये सांगण्यात आलेल्या उपायाहून निराळा (उपाय).

२७) अभिनवगुप्तांचे म्हणणे असे की, कथानकाच्या निरनिराळ्या भागांमधील अंगांगिभाव व कथानकातील निरनिराळ्या रसांमधील अंगांगिभाव हे एकमेकांवर अवलंबून असतात.

२८) नुकतेच म्हणजे कारिका २०, २२ व २४ यांमध्ये.

२९) म्हणजे त्याच्या बोलण्याला युक्तिवादाचा आधार नाही.

३०) तर वस्तुतः त्या रसांच्या स्थायिभावांमध्ये उपकार्य– उपकारक भाव असतो. पण रसांमध्ये उपकार्य–उपकारकभाव असतो असे केवळ लक्षणेने म्हणण्यात येते, असा त्या दुसऱ्या मताचा आशय आहे.

३१) आनंदवर्धनांनी एक रस दुसऱ्या रसाला उपकारक असतो हे मत प्रथम मांडून त्याचा समारोप केला व त्यानंतर स्थायिभावांनाच उपचाराने 'रस' म्हणण्याची प्रथा असल्यामुळे रसांमध्ये उपकार्य–उपकारकभाव असतो असे म्हणण्यात काही चूक नाही हे दुसरे मत पुढे स्वतंत्रपणे मांडले आहे. तेव्हा पहिल्या मताच्या समारोपातील वाक्य हे दुसऱ्या मताचे प्रतिपादन करणारे आहे असे कसे म्हणता येईल? तेव्हा दुसऱ्या टीकाकाराचे विवरण बरोबर नाही हे अभिनवगुप्तांचे विधान अगदी योग्य आहे.

३२) पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'अविवक्षितवाच्य ध्वनीच्या अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य प्रकारांचा पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे'" वरील टीप १२ वी. हा टीकाकार अभिनवगुप्तांच्या घराण्यातच होऊन गेलेला कोणीतरी असेल किंवा टीकाकारवंशातील एक म्हणजे आमचा समव्यवसायी, असाही अर्थ करणे शक्य आहे. History of Sanskrit Poetics च्या २०७ व्या पृष्ठावर म. म. डॉ. काणे 'चन्द्रिका, which was composed by someone who belonged to the same family to which अभिनवगुप्त belonged' असे म्हणतात.

३३) पाहा, नाट्यशास्त्र, ७–१२०. रसभावविचार, कंगले, पृ. ४४६.

३४) म्हणजे संपूर्ण प्रबंधातील निरनिराळ्या रसांमध्ये गौणप्रधानभावाने सहकार्य होऊन सर्व रसांचा मिळून एकच आस्वाद सामाजिकांना मिळतो.

३५) 'भागुरि' या नाट्यशास्त्रावरील टीकाकाराचा उल्लेख लोचनातच प्रथम आढळतो असे डॉ. काणे History of Sanskrit Poetics च्या पृ. ५५ वर म्हणतात. भागुरि या नावाचा एक वैयाकरणही होऊन गेला, पण तो व हा टीकाकार एकच आहेत की, भिन्न आहेत हे सांगणे कठीण आहे.

३६) मुळात 'रस' असा शब्द आहे, तो 'भाव या अर्थाने वापरला आहे.

३७) वस्तुतः या दोन विधानांची शब्दयोजना पुढीलप्रमाणे असावयास हवी– **यथा क्रोधस्य रौद्रे स्थायितया पठितस्यापि रसान्तरे (वीरे) व्यभिचारित्वमस्ति यथा तत्त्वज्ञानविभावकस्य निर्वेदस्य शान्ते स्थायितया पठितस्यापि (करुणविप्रलम्भशृङ्गारयोः) व्यभिचारित्वमस्ति ।**

अशा स्वरूपाची शब्दयोजना असती, तर ती वाक्ये त्या आधीच्या सामान्य विधानाच्या स्वरूपाशी सुसंगत झाली असती.

३८) उदा. प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'भावध्वनि'" वरील 'ती माझ्यावर रागावल्यामुळे' इ. श्लोकात वितर्क हा व्यभिचारिभाव मुख्य असल्याचे सांगितले आहे असे व्यभिचारिभाव विशिष्ट श्लोकांमध्ये आढळले, तरी 'उन्माद' हा सर्व अंकाला व्यापणारा स्थायी झाला आहे.

३९) म्हणजे प्रबंधाच्या लहान भागाला व्यापणारे.

४०) म्हणजे या श्लोकात रसांचे स्थायित्व व व्यभिचारित्व सांगितलेले नसून भावांचे स्थायित्व व व्यभिचारित्व सांगितले आहे असे त्या दुसऱ्या टीकाकारांचे म्हणणे. पहिल्या (भागुरि वगैरे) टीकाकारांचे म्हणणे व या दुसऱ्या टीकाकारांचे म्हणणे यांमध्ये फरक असलाच, तर तो फार सूक्ष्म व तांत्रिक आहे. काटेकोरपणे विचार केल्यास दुसऱ्या टीकाकारांचे म्हणणे बरोबर आहे, पण स्थूलमानाने पहिले मतही चुकीचे नाही. आनंदवर्धनांनी व अभिनवगुप्तांनीही 'रस' असाच शब्दप्रयोग अन्यत्र स्थूलपणे केली आहे.
४१) म्हणजे रसस्य स्थायी असा षष्ठी तत्पुरुष किंवा रसे स्थायी असा सप्तमी तत्पुरुष किंवा रसं (प्रति) स्थायी असा द्वितीया तत्पुरुष मानून विग्रह करितात.

४२) सिद्धान्तकौमुदीमध्ये या वार्तिकाचा पाठ **गम्यादीनामुपसंख्यानम्** असा आहे, पण अभिनवगुप्तांनी दिलेला **गमिगाम्यादीनामुपसंख्यानम् ।** हा पाठ काशिका वृत्तीमध्ये आढळतो. वामनाच्या काव्यालंकारसूत्रवृत्तीमध्येही (पाह, ५–२–१३) हाच म्हणजे **गमिगाम्यादीनामुपसंख्यानम् ।** असाच पाठ आहे.

मूळ वार्तिकामध्ये आश्रितादिषु हा शब्द नसून तो अभिनवगुप्तांनी स्पष्टीकरणार्थ घातला आहे. मूळ सूत्रामधील पाठाचा **'द्वितीया आश्रितातीत'** असा पदच्छेद अभिनवगुप्तांनी केला असावा असे वाटते.

ध्वन्यालोकः

एवमविरोधिनां विरोधिनां च प्रबन्धस्थेनाङ्गिना रसेन समावेशे साधारणमविरोधोपायं प्रतिपाद्येदानीं विरोधिविषयमेव तं प्रतिपादयितुमिदमुच्यते –

विरुद्धैकाश्रयो यस्तु विरोधी स्थायिनो भवेत् ।
स विभिन्नाश्रयः कार्यस्तस्य पोषेऽप्यदोषता ॥ २५ ॥

ऐकाधिकरण्यविरोधी नैरन्तर्यविरोधी चेति द्विविधो विरोधी । तत्न प्रबन्धस्थेन स्थायिनाङ्गिना रसेनौचित्यापेक्षया विरुद्धैकाश्रयो यो विरोधी यथा वीरेण भयानकः, स विभिन्नाश्रयः कार्यः । तस्य वीरस्य य आश्रयः कथानायकस्तद्विपक्षविषये सन्निवेशयितव्यः । तथा सति च तस्य विरोधिनोऽपि यः परिपोषः स निर्दोषः । विपक्षविषये हि भयातिशयवर्णने नायकस्य नयपराक्रमादिसम्पत्सुतरामुद्द्योतिता भवति । एतद्य मदीयेऽर्जुनचरितेऽर्जुनस्य पातालावतरणप्रसङ्गे वैशद्येन प्रदर्शितम् ।

ध्वन्यालोक

याप्रमाणे (आतापर्यंत) प्रबन्धातल्या 'अंगी' रसाबरोबर विरोधी किंवा अविरोधी रसांचा समावेश करण्याच्या बाबतीत विरोध टाळण्याचा दोघांनाही समान असलेला उपाय सांगितल्यावर आता केवळ विरोधी रसाच्या बाबतीतच तो (विरोध टाळण्याचा उपाय) पुढील कारिकेत सांगितला जात आहे–

पण जो (स्थायिभाव) (मुख्य, व्यापक) स्थायिभावाला विरोधी असून एकाच पात्राच्या ठिकाणी समाविष्ट केलेला असल्यामुळे) विरोधी होतो, तो दुसऱ्या पात्राच्या ठिकाणी अभिव्यक्त करावा. मग (त्या दुसऱ्या पात्राच्या ठिकाणी) त्याचा परिपोष केला तरी त्यात दोष नाही. ॥ २५ ॥

विरोधी हा दोन प्रकारांनी विरोधी होऊ शकतो—१) पहिला रस व दुसरा रस एकाच पात्राच्या ठिकाणी [१] असल्याने विरोधी, किंवा २) पहिल्यानंतर लगेच दुसरा समाविष्ट केल्याने विरोधी त्यांपैकी प्रबंधामध्ये मुख्य, स्थायी (व्यापक) असलेल्या रसांबरोबर एकाच पात्राच्या ठिकाणी समाविष्ट केल्यास औचित्याच्या दृष्टीने जो विरोधी होत असेल, उदा. वीराबरोबर भयानक, तो वेगळ्या पात्राच्या ठिकाणी दाखवावा. त्या वीररसाचा आश्रय जो कथानायक, त्याच्या शत्रूच्या ठिकाणी भयानक रस समाविष्ट करावा. तसे केल्यास त्या विरोधी रसाचाही जो परिपोष केला जाईल, तो निर्दोष ठरेल. कारण शत्रूच्या ठिकाणी कमालीची भीति असल्याचे वर्णन केल्यास नायकाच्या ठिकाणचे राजकारण कौशल्य, पराक्रम, इत्यादि गुणसंपदा अधिकच उजळून निघते. आणि हे माझ्या 'अर्जुनचरिता'त अर्जुन पाताळात प्रवेश करितो त्याप्रसंगी स्पष्टपणे दाखवले आहे.

लोचनम्

अथ साधारणं प्रकारमुपसंहरन्नसाधारणमासूत्रयति—एवमिति । तमित्यविरोधोपायम् । विरुध्देति विशेषणं हेतुगर्भम् । यस्तु स्थायी स्थाय्यन्तरेणासंभाव्यमानैकाश्रयत्वाद्विरोधी भवेद्यथोत्साहेन भयं, स विभिन्नाश्रयत्वेन नायकविपक्षादिगामित्वेन कार्यः । तस्येति । तस्य विरोधिनोऽपि तथाकृतस्य तथानिबद्धस्य परिपुष्टतायाः प्रत्युत निर्दोषता नायकोत्कर्षाधानात् । अपरिपोषणं तु दोष एवेति यावत् । अपिशब्दो भिन्नक्रमः । एवमेव वृत्तावपि व्याख्यानात् । ऐकाधिकरण्यमेकाश्रयेण सम्बन्धमात्रम्, तेन विरोधी यथा—भयेनोत्साहः । एकाश्रयत्वेऽपि सम्भवति कश्चिन्निः रन्तरत्वेन निर्व्यवधानत्वेन विरोधी, यथा रत्या निर्वेदः । प्रदर्शितमिति । 'समुत्थिते धनुर्ध्वनौ भयावहे किरीटिनो महानुपप्लवोऽभवत्पुरे पुरन्दरद्विषाम् ।' इत्यादिना ॥ २५ ॥

लोचन

यानंतर वृत्तिकार मुख्य रसाला विरोधी किंवा अविरोधी अशा दुसऱ्या रसाला सारख्याच लागू पडणाऱ्या (परिपोषपरिहाराच्या) प्रकाराचा समारोप करीतच असाधारण (म्हणजे केवळ विरोधी रसाला लागू पडणाऱ्या, परिपोष टाळण्याच्या) प्रकाराच्या विवेचनाला 'याप्रमाणे' इ. शब्दांनी प्रारंभ करितात. 'तो' म्हणजे विरोध टाळण्याचा उपाय. (२५ व्या) कारिकेतील 'विरुद्धैकाश्रय' हे विशेषण दुसरा रस पहिल्या रसाच्या विरुद्ध असण्याचे कारण सांगणारे [२] आहे. पण जो दुसरा स्थायिभाव पहिल्या स्थायिभावाबरोबर एका पात्राच्या ठिकाणी राहणे अशक्य असल्यामुळे पहिल्या स्थायिभावाला विरोध करितो— जसे उत्साहाबरोबर भय— तो निराळ्या पात्राच्या ठिकाणी म्हणजे नायकाचा शत्रु वगैरेंच्या ठिकाणी असल्याचे दाखवावे. 'त्याचा' — म्हणजे तो स्थायिभाव दुसऱ्या पात्राच्या ठिकाणी दाखविल्यास [३] त्याचा परिपोष उलट निर्दोषच होतो, कारण त्यामुळे नायकाचा वरचढपणा प्रस्थापित होतो. पण शत्रूच्या ठिकाणी त्याचा परिपोष न करणे हे दोषास्पदच होय, हा आशय **पोषेऽपि** यातल्या **अपि** या शब्दाची जागा चुकली आहे [४] कारिकेचा अन्वय करिताना ती बदलावी, कारण वृत्तीतही तसेच केले आहे (म्हणजे वृत्तीत **अपि** हा शब्द **विरोधिनः** याला जोडला आहे.) 'ऐकाधिकरण्य' म्हणजे एकाच पात्राच्या ठिकाणी राहणे, म्हणजे दोन विरोधी

स्थायिभाव एकच पात्र या आश्रयाशी संबद्ध असणे. त्यामुळे (म्हणजे एकाश्रयत्वामुळे) विरोधी, म्हणजे जसे भयाशी उत्साहाचा विरोध असणे. दोन स्थायिभाव एकाच पात्राच्या ठिकाणी राहणे संभवत असूनही त्यांपैकी एकानंतर लगेच दुसरा स्थायिभाव जागृत झाल्याचे दाखविल्यास विरोधी होतो—जसा रतीशी निर्वेद. [५] '(स्पष्टपणे) दाखविले आहे' – 'अर्जुनाच्या धनुष्याचा भीषण टणत्कार होऊ लागला असताना इन्द्राच्या शत्रूंच्या नगरात महान् अनर्थ माजला' इ. पद्यामध्ये. [६] ॥ २५ ॥

टीपा

१) एकाच पात्राच्या ठिकाणी समाविष्ट करणे म्हणजे एकाच पात्राशी संबंध असणे, इतकेच. त्यामुळे विरोधी असणारे स्थायिभाव म्हणजे उदा. भय व उत्साह. एका पात्राच्या ठिकाणी वेगवेगळ्या वेळी संभवत असूनही एखादा स्थायिभाव दुसऱ्या स्थायिभावानंतर लगेच आल्यास विरोधी होतो. जसा निर्वेद (वैराग्य) रतिभावानंतर आल्यास (विरोधी होतो).

२) म्हणजे विरोधी स्थायिभाव व मुख्य स्थायिभाव यांचा आश्रय एकच असणे हे तो स्थायिभाव मुख्य स्थायिभावाला विरोधी असण्याचे कारण आहे.

३) लोचनात तथाकृतस्य (तसा केल्यास) या शब्दाची आवश्यकता नव्हती, कारण तथानिबद्धस्य (दुसऱ्या पात्राच्या ठिकाणी दाखविल्यास) असे लोचनात म्हटलेच आहे. म्हणून अभिनवगुप्तांपुढील ध्वन्यालोकाच्या प्रतीत वृत्तीमध्ये तथाकृतस्य असा पाठ असावा असे वाटते.

४) वृत्तीमध्ये तस्य विरोधिनः अपि असे म्हटले आहे. तेथे अपि हा शब्द पोषे याला जोडलेला नाही. म्हणजे अपि हा शब्द कारिकेत योग्य ठिकाणी वापरला गेला नाही असेच वृत्तिकाराचेही मत असल्याचे दिसते. कारिका जर वृत्तिकारांनीच लिहिल्या असत्या, तर त्यांना कारिकेतही पोषे तस्याप्यदोषता असे म्हणणे सहज शक्य होते. त्यावरून कारिका व वृत्ति लिहिणारे वेगळे असावे असे मत व्हावयास मदत होत आहे.

५) एकाच पात्राच्या ठिकाणी रति व वैराग्य हे निरनिराळ्या वेळी बऱ्याच अंतराने जागृत होणे शक्य आहे, पण रति जागृत झाल्याबरोबर तिच्या मागोमाग वैराग्याची जागृति होणे अस्वाभाविक होय, म्हणून या दोघांमध्ये अंतर न ठेवता त्यांचे चित्रण करणे हे सदोष आहे.

६) **समुत्थिते** इ. पद्याचे वृत्त प्रमाणिका (किंवा पंचचामर) आहे.

ध्वन्यालोकः

एवमैकाधिकरण्यविरोधिनः प्रबन्धस्थेन स्थायिना रसेनाङ्गभावगमने निर्विरोधित्वं यथा तथा तद्दर्शितम् । द्वितीयस्य तु तत्प्रतिपादयितुमुच्यते—

एकाश्रयत्वे निर्दोषो नैरन्तर्ये विरोधवान् ।

रसान्तरव्यवधिना रसो व्यङ्ग्यः सुमेधसा ॥ २६ ॥

यः पुनरेकाधिकरणत्वे निर्विरोधो नैरन्तर्ये तु विरोधी स रसान्तरव्यवधानेन प्रबन्धे निवेशयितव्यः । यथा शान्तशृङ्गारौ नागानन्दे निवेशितौ ।

शान्तश्च तृष्णाक्षयसुखस्य यः परिपोषस्तल्लक्षणो रसः प्रतीयत एव । तथा चोक्तम्—

यच्च कामसुखं लोके यच्च दिव्यं महत्सुखम् ।
तृष्णाक्षयसुखस्यैते नार्हतः षोडशीं कलाम् ॥

यदि नाम सर्वजनानुभवगोचरता तस्य नास्ति नैतावतासावलोकसामान्यमहानुभावचित्तवृत्तिविशेषः [काव्यानुशासन, पृ. १२४ येथे विशेषः याऐवजी विशेषवत् असा पाठ आहे.] **प्रतिक्षेप्तुं शक्यः । न च वीरे तस्यान्तर्भावः कर्तुं युक्तः । तस्याभिमानमयत्वेन व्यवस्थापनात् । अस्य चाहङ्कारप्रशमैकरूपतया स्थितेः । तयोश्चैवंविधविशेषसद्भावेऽपि यद्यैक्यं परिकल्प्यते तद्वीररौद्रयोरपि तथा प्रसङ्गः । दयावीरादीनां** [हेमचन्द्राच्या काव्यानुशासनात (पृ. १२४) धर्मवीरादीनाम् असा पाठ आहे.] **च चित्तवृत्तिविशेषाणां सर्वाकारमहङ्काररहितत्वेन शान्तरसप्रभेदत्वम्, इतरथा तु वीरप्रभेदत्वमिति व्यवस्थाप्यमाने न कश्चिद्विरोधः । तदेवमस्ति शान्तो रसः । तस्य चाविरुद्धरसव्यवधानेन प्रबन्धे विरोधिरससमावेशे सत्यपि निर्विरोधत्वम् । यथा प्रदर्शिते विषये ।**

ध्वन्यालोक

याप्रमाणे स्थायी रसाशी म्हणजे प्रबंधाला व्यापणाऱ्या मुख्य रसाशी एकाच पात्राच्या ठिकाणी समाविष्ट केल्यामुळे विरोधी असणाऱ्या रसाला (त्या मुख्य रसाचे) अंगत्व दिल्याने विरोध कसा नाहीसा होतो, ते दाखविले. दुसऱ्या प्रकारच्या (म्हणजे लगेच समाविष्ट केल्याने विरोधी होणाऱ्या) रसाच्या बाबतीत (विरोध कसा दूर करावा) ते दाखविण्यासाठी सांगण्यात येत आहे की –

जो रस एकाच पात्राच्या ठिकाणी दाखविल्यास (कोणताही) दोष नसतो, पण मुख्य रसानंतर लगेच घातल्यास विरोधी होतो, तो जाणत्या कवीने त्या दोघांमध्ये तिसरा रस दाखवून अभिव्यक्त करावा ॥ २६ ॥

पण जो एकाच पात्राच्या ठिकाणी असण्यामध्ये दोष नसतो, परंतु मुख्य रसाला लागून लगेच आल्यास विरोधी होतो, तो रस तिसरा रस मध्ये प्रकट करून प्रबंधात समाविष्ट करावा. ज्याप्रमाणे 'नागानंद' नाटकात शांत व शृंगार हे रस समाविष्ट केले आहेत, त्याप्रमाणे.

तृष्णा (म्हणजे आसक्ति) नाहीशी झाल्यामुळे होणारे जे सुख, त्याचा परिपोष हे ज्याचे स्वरूप आहे, असा 'शांत' नावाचा रस अनुभवास येतोच. तसे म्हटलेही आहे की –

या जगात कामवासनेच्या पूर्तीपासून मिळणारे जे सुख असते, किंवा स्वर्गात मिळणारे जे मोठे सुख असते, त्या दोन्ही सुखांना तृष्णा नष्ट झाल्यामुळे होणाऱ्या सुखाच्या सोळाव्या हिश्शाचीही सर येत नाही. [१]

तो शांतरस सर्व लोकांच्या अनुभवाचा विषय होत नाही हे मान्य केले, तरी तेवढ्याने असामान्य, महाप्रभावी लोकांची ती एक खास चित्तवृत्ति असल्याने तो नाकारणे शक्य नाही. आणि त्याचा अंतर्भाव वीररसातही करणे योग्य होणार नाही. कारण तो (वीररस) मोठेपणाच्या अभिमानावर आधारलेला असतो, हे प्रसिद्ध आहे, व हा (शांतरस) तर अहंकाराचे शमन याच स्वरूपाचा आहे आणि त्या दोन रसांमध्ये अशा प्रकारचा फरक असूनही जर त्यांना तुम्ही एकच मानले, तर वीर व रौद्र यांना ही तसेच (म्हणजे एक) मानण्याचा प्रसंग येईल! आणि दयावीर वगैरे [२] ज्या विशिष्ट चित्तवृत्ति आहेत, त्या जर सर्वस्वी अहंकाररहित असल्या, तर शांतरसाचे प्रकार होतील. नाहीतर (म्हणजे त्या चित्तवृति जर अहंकाराने युक्त असतील तर) त्या वीररसाच्या प्रकारात मोडतील [३] अशी व्यवस्था लावल्यास कोणताही विरोध रहाणार नाही तेव्हा याप्रमाणे शांतरस आहे (हे निर्विवाद). त्याचा विरोधी रसाबरोवर प्रबंधात समावेश जर मध्ये एखादा अविरोधी रस दाखवून केला, तर त्यात कोणताही विरोध उरत नाही. जसे – आता दिलेल्या उदाहरणात (म्हणजे नागानन्दात).

लोचनम्

द्वितीयस्येति । नैरन्तर्यविरोधिनः । तदिति । निर्विरोधित्वम् । एकाश्रयत्वेन निमित्तेन यो निर्दोषः न विरोधी, किं तु निरन्तरत्वेन निमित्तेन विरोधमेति स तथाविधविरुद्धरसद्व्याविरुद्धेन रसान्तरेन मध्ये निवेशितेन युक्तः कार्य इति कारिकार्थः । प्रबन्ध इति बाहुल्यापेक्षं, मुक्तकेऽपि कदाचिदेवं भवेदपि । यद्वक्ष्यति– 'एकवाक्यस्थयोंरपि' इति । यथेति । तत्र हि– 'रागस्यास्पदमित्यवैमि न हि मे ध्वंसीति न प्रत्ययः' । इत्यादिनोपक्षेपात्प्रभृति परार्थशरीरवितरणात्मकनिर्वहणपर्यन्तः शान्तो रसः, तस्य विरुद्धो मलयवतीविषयः शृङ्गारः, तदुभयाविरुद्धमद्भुतमन्तरीकृत्य क्रमप्रसरसम्भावनाभिप्रायेण कविना निबद्धः 'अहो गीतमहो वादित्रम्' इति । एतदर्थमेव 'व्यक्तिर्व्यञ्जनधातुना' इत्यादि नीरसप्रायमप्यत्र निबद्धमद्भुतरसपरिपोषकतयात्यन्तसरसतावहमिति, 'निर्दोषदर्शनाः कन्यकाः' इति च क्रमप्रसरो निबद्धः । यथाहुः चित्तवृत्तिप्रसरप्रसंख्यानधनाः सांख्याः 'पुरुषार्थहेतुकमिदं निमित्तनैमित्तिकप्रसङ्गने' ति । अनन्तरं च निमित्तनैमित्तिकप्रसङ्गागतो यः शेखरकवृत्तान्तोदितहास्यरसोपकृतः शृङ्गार, तस्य विरुद्धो यो वैराग्यशमपोषको नागीयकलेवरास्थिजालावलोकनादिवृत्तान्तः, स मित्रावसोः प्रविष्टस्य मलयवती – निर्गमनकारिणः 'संसर्पद्भिः समन्तात्' इत्यादिकाव्योपनिबद्धक्रोधव्यभिचार्युपकृतवीररसान्तरितो निवेशितः ।

ननु नास्त्येव शान्तो रसः, तस्य तु स्थाय्येव नोपदिष्टो मुनिनेत्याशङ्क्याह– शान्तश्चेति । तृष्णानां विषयाभिलाषाणां यः क्षयः सर्वतो निवृत्तिरूपो निर्वेदः, तदेव सुखं, तस्य स्थायिभूतस्य यः परिपोषो रस्यमानताकृतस्तदेव लक्षणं यस्य स शान्तो रसः । प्रतीयत एवेति । स्वानुभवेनापि निवृत्तभोजनाद्यशेषविषयेच्छाप्रसरत्वकाले सम्भाव्यत एव ।

अन्ये तु सर्वचित्तवृत्तिप्रशम एवास्य स्थायीति मन्यन्ते । तृष्णाऽसद्भावस्य प्रसज्यप्रतिषेधरूपत्वे चेतोवृत्तित्वाभावेन भावत्वायोगात् । पर्युदासे त्वस्मत्पक्ष एवायम् । अन्ये तु–

स्वं स्वं निमित्तमासाद्य शान्ताद्भावः प्रवर्तते ।
पुनर्निमित्तापाये तु शान्त एव प्रलीयते ॥

इति भरतवाक्यं दृष्टवन्तः सर्वरससामान्यस्वभावं शान्तमाचक्षाणा अनुपजातविशेषान्तरचित्तवृत्तिरूपं शान्तस्य स्थायिभावं मन्यते । एतच्च नातीवास्मत्पक्षाद् दूरम् । प्रागभावप्रध्वंसाभावकृतस्तु विशेषः । युक्तश्च प्रध्वंस एव तृष्णानाम् । यथोक्तम्— 'वीतरागजन्मादर्शनात्' इति । प्रतीयत एवेति । मुनिनाप्यङ्गीक्रियत एव 'क्वचिच्छमः' इत्यादि वदता । न च तदीया पर्यन्तावस्था वर्णनीया येन सर्वचेष्टोपरमादनुभावाभावेनाप्रतीयमानता स्यात् । शृङ्गारादेरपि फलभूमाववर्णनीयतैव । पूर्वभूमौ तु 'तस्य प्रशान्तवाहिता संस्कारात्, तच्छिद्रेषु प्रत्ययान्तराणि संस्कारेभ्यः' इति सूत्रद्व्यनीत्या चित्राकारा यमनियमादिचेष्टा राज्यधुरोद्वहनादिलक्षणा वा शान्तस्यापि जनकादेर्दृष्टैवेत्यनुभावसद्भावाद्यमनियमादिमध्यसम्भाव्यमानभूयोव्यभिचारिसद्भावाच्च प्रतीयत एव [काव्यानुशासन, पृ. १२३-१२४ येथे न न प्रतीयते असे अधिक शब्द आढळतात.] ।

ननु न प्रतीयते नास्य विभावाः सन्तीति चेत्— न; प्रतीयत एव तावदसौ । तस्य च भवितव्यमेव प्राक्तनकुशलपरिपाकपरमेश्वरानुग्रहाध्यात्मरहस्यशास्त्रवीतरागपरिशीलनादिभिर्विभावैरितीयतैव विभावानुभावव्यभिचारिसद्भावः स्थायी च दर्शितः । ननु तत्र हृदयसंवादाभावाद्रस्यमानतैव नोपपन्ना । क एवमाह स नास्तीति, यतः प्रतीयत । एवेत्युक्तम् ।

'ननु प्रतीयते सर्वस्य [काव्यानुशासन, पृ. १२३—१२४ येथे सर्वस्य यानंतर तु हा शब्द आढळतो.] श्लाघास्पदं न भवति ।' तर्हि वीतरागाणां शृङ्गारो न श्लाघ्य इति सोऽपि रसत्वाच्च्यवतामिति । तदाह— यदि नामेति । ननु धर्मप्रधानोऽसौ वीर एवेति सम्भावयमान आह— न चेति । तस्येति वीरस्य । अभिमानमयत्वेनेति । उत्साहो ह्यहमेवंविध इत्येवंप्राण इत्यर्थः । अस्य चेति शान्तस्य । तयोश्चेति । ईहामयत्वनिरीहत्वाभ्यामत्यन्तविरुद्ध्योरपीति चशब्दार्थः । वीररौद्रयोस्त्वत्यन्तविरोधोऽपि नास्ति । समानं रूपं च धर्मार्थकामार्जनोपयोगित्वम् ।

'नन्वेवं दयावीर [क. ल. वि. पृ. ८३ येथे दयावीरः यानंतर कोऽभिधीयताम्? असे शब्द आढळतात.] धर्मवीरो दानवीरो वा' । नासौ कश्चित् शान्तस्यैवेदं नामान्तरकरणम् । तथाहि मुनि :—

दानवीरं धर्मवीरं युद्धवीरं तथैव च ।
रसं वीरमपि प्राह ब्रह्मा त्रिविधसम्मितम् ॥

इत्यागमपुरःसरं त्रैविध्यमेवाभ्यधात् । तदाह— दयावीरादीनाञ्चेत्यादिग्रहणेन । विषयजुगुप्सारूपत्वाद् बीभत्सेऽन्तर्भावः शङ्क्यते । सा त्वस्य व्यभिचारिणी भवति न तु स्थायितामेति, पर्यन्तनिर्वाहे तस्या मूलत एव विच्छेदात् । आधिकारिकत्वेन तु शान्तो रसो न निबद्धव्य इति चन्द्रिकाकारः । तच्चेहास्माभिर्न पर्यालोचितं, प्रसङ्गान्तरात् । मोक्षफलत्वेन चायं परमपुरुषार्थनिष्ठत्वात्सर्वरसेभ्यः प्रधानतमः । स चायमस्मदुपाध्यायभट्टतौतेन काव्यकौतुके, अस्माभिश्च तद्विवरणे बहुतरकृतनिर्णयपूर्वपक्षसिध्दान्त इत्यलं बहुना ॥ २६ ॥

लोचन

दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे (पहिल्या स्थायिभावानंतर) लगेच घातल्याने विरोधी होणाऱ्या (स्थायिभावांच्या बाबतीत). 'तो' म्हणजे विरोध कसा टाळावा, ते. जो एकाच पात्राच्या ठिकाणी (दुसऱ्या

एका स्थायिभावाबरोबर) दाखविणे या कारणाने दोषास्पद होत नाही म्हणजे विरोधी होत नाही, पण जो (पहिल्या स्थायिभावानंतर) लगेच समाविष्ट करणे या कारणामुळे विरोधी होतो, तो त्या प्रकारे एकमेकांना विरोध करणाऱ्या दोन्ही स्थायिभावांशी विरुद्ध नसलेला असा तिसरा स्थायिभाव त्या दोहोमध्ये घालून त्या (तटस्थ) स्थायिभावाने युक्त करावा, असा कारिकेचा अर्थ आहे. 'प्रबंधात' असे म्हणण्याचे कारण असा प्रकार (म्हणजे दोन विरुद्ध स्थायिभावांमध्ये तिसरा तटस्थ स्थायिभाव समाविष्ट करणे हा प्रकार) बहुतकरून प्रबंधात असलेला आढळून येतो. पण मुक्तकातसुद्धा एखादेवेळी असा प्रकार असणे शक्य होईलही. कारण (वृत्तिकार) पुढे (२७ व्या कारिकेत) 'दोन रस एका वाक्यात समाविष्ट केले तरी [४]' असे म्हणणार आहेत. 'ज्याप्रमाणे' – कारण त्या 'नागानन्द' नाटकात (यौवन हे) मनोविकारांचे निवासस्थान आहे हे मला माहीत आहे. ते नाशवन्त नाही असा माझा अनुभव नाही, [५]' इ. वाक्याने 'उपक्षेप' म्हणजे नाट्याच्या बीजाची पेरणी झाल्यापासून दुसऱ्यासाठी (म्हणजे शंखचूड या नागाचे प्राण वाचविण्यासाठी) आपला देह (गरुडाला) अर्पण करणे या स्वरूपाच्या निर्वहण संधीपर्यंत शांत रस (म्हणजे निर्वेद) आहे व त्याच्या विरुद्ध असलेला नायकाचा मलयवतीविषयक शृंगार म्हणजे प्रीति या दोन्ही रसांना विरोधी नसणारा अद्‌भुत रस (म्हणजे विस्मय) त्या दोहोंच्या मध्ये कवीने 'काय गायन! काय वादन [६]!' या शब्दांनी नायकाच्या मनात शृंगाराचा उदय व्हावयास वाट करून द्यावी या हेतूने समाविष्ट केला आहे. याचसाठी 'वीणावादनाचे दहाही प्रकार स्पष्टपणे प्रकट होत आहेत' इ. श्लोक [७] जवळजवळ नीरसच असला [८], तरी (तो 'काय गायन' इ. वाक्यानंतर लगेच समाविष्ट केल्याने) अद्‌भुत रसाला पोषक होत आहे व म्हणून (अद्‌भुत) रसाचा अतिशय उत्कर्ष करणारा आहे. आणि 'अविवाहित कन्यांकडे पाहण्यात दोष नाही' असे म्हटल्याने पुढील शृंगाराला वाट करून दिली गेली आहे. कारण चित्तवृत्तींच्या व्यापारांचे गणनापूर्वक विवेचन करणे हेच ज्यांचे वैशिष्ट्य आहे अशा सांख्यांनी म्हटलेच आहे की – 'पुरुषाला मोक्ष मिळवून देण्यासाठी प्रवृत्त होणारे हे लिंगशरीर धर्माधर्म इ. निमित्ते म्हणजे कारणे व त्यामुळे प्राप्त होणारी स्थूलशरीरे ही नैमित्तिके म्हणजे कार्ये यांमधील कारण–कार्यसंबंधामुळे [९].....'. आणि नंतर (रतीला) निमित्तभूत असलेल्या उद्दीपन विभावातून त्यांचे कार्य म्हणून शृंगाररस अभिव्यक्त होतो. त्या शृंगाररसाला शेखरकाच्या हकीकतीमुळे व्यक्त झालेल्या हास्यरसाचे साहाय्य मिळते. [१०] त्या शृंगाररसाच्या अभिव्यक्तीनंतर त्याला विरोधी असलेला व वैराग्य आणि शम यांना पोषक असलेला सर्पांची मृतशरीरे, हाडांचे सांगाडे वगैरेंचे जीमूतवाहनानं अवलोकन करण्याचा प्रसंग नाटककाराने वर्णिला आहे. पण त्या वृत्तान्तापूर्वी नाटककाराने वीररसाचे चित्रण केले आहे. आणि तो वीररस मलयवतीला बाहेर जावयास लावणारे मित्रावसूचे आगमन झाले असताना 'सर्व दिशांना भ्रमण करणाऱ्या' इ. श्लोकातून [११] अभिव्यक्त होणाऱ्या क्रोध या व्यभिचारिभावाने उपकृत झाला आहे. [१२]

'पण काय हो, शांत नावाचा रस नाहीच, कारण त्याचा स्थायिभाव भरतमुनींनी (स्थायिभावांच्या यादीत) सांगितला नाही [१३]!' अशी शंका कल्पून वृत्तिकार '(तृष्णा म्हणजे)..... शांत नावाचा रस' इ. विधान करितात. तृष्णांचा म्हणजे विषयाबाबतच्या आसक्तीचा क्षय म्हणजे विषयांपासून सर्वस्वी पराङ्‌मुख होणे. या स्वरूपाचा निर्वेद (म्हणजे तिटकारा) हेच सुख, हा मनाचा एक स्थायिभाव आहे. त्या स्थायिभावाच्या आस्वादापासून झालेला परिपोष हेच ज्याचे असाधारण स्वरूप असते, असा शांत रस. 'अनुभवास येतोच –' सुग्रास अन्न वगैरे विषयांचा यथेच्छ उपभोग घेतल्यावर त्या विषयांबाबतची इच्छा (काही काळ तरी) नाहीशी होते, तेव्हा सामान्य माणसालाही विषयनिवृत्तीच्या सुखाचा अनुभव येत असल्यामुळे तो (म्हणजे शांत रस) मान्य केलाच पाहिजे.

पण दुसरे कोणी 'सर्व चित्तवृत्तींचा प्रशम [१४] हाच शांत रसाचा स्थायिभाव होय असे मानितात. प्रशमाचे स्वरूप (तृष्णेच्या अस्तित्वाचा अभाव, असे) 'प्रसज्यप्रतिषेध [१५]' प्रकारचे मानिल्यास प्रशम हा (सर्व) चित्तवृत्तींचा 'अभाव' होईल व त्यामुळे त्याला स्थायिभाव' म्हणता येणार नाही. पण 'तृष्णाक्षय (किंवा चित्तवृत्तींचा प्रशम)' याचा पर्युदास पद्धतीने [१६] अर्थ लावल्यास ते आमच्याच मताशी जुळेल. पण दुसरे कोणी 'आपापल्या विभावांमुळे शांतापासून म्हणजे प्रशम या स्थायिभावापासून रति वगैरे भाव उदित होतात आणि मग ते विभाव दूर झाले की, ते निरनिराळे भाव शांताच्या स्थायिभावातच विलीन होतात. [१७]' ह्या भरतमुनींच्या कारिकेचा आधार घेऊन 'शांताचे स्वरूप सर्व रसांना साधारण असते' असे म्हणतात व ज्या चित्तवृत्तीला रति, शोक इ. दुसरे कोणतेही विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले नाही, त्या चित्तवृत्तीला शांताचा स्थायिभाव मानितात. आता हे मत आमच्या मताहून फारसे वेगळे नाही. त्यांच्या मते शांत म्हणजे कोणत्याही चित्तवृत्तीचा प्रागभाव म्हणजे कोणतीही चित्तवृत्ति उदित होण्यापूर्वीची स्थिति होय, तर आमच्या मते शांत हा कोणत्याही चित्तवृत्तीचा प्रध्वंसाभाव म्हणजे सर्व चित्तवृत्ति विलय पावल्यानंतरची स्थिति होय, इतकाच त्यांच्या व आमच्या मतात फरक [१८] आहे. आणि सर्व तृष्णांचा (प्रयत्न केल्यामुळे) विलय होणे हेच योग्य होय. कारण म्हटलेच आहे की, 'वीतराग म्हणजे विरागी वृत्तीचा मनुष्य जन्माला आलेला दिसत नाही.' [१९] 'अनुभवाला येतोच' म्हणजे भरतमुनींनीही 'काही ठिकाणी 'शम' असे [२०] म्हणून तो शांत रस मान्य केलाच आहे. आता 'शम' या स्थायिभावाच्या शेवटच्या म्हणजे समाधि या अवस्थेचे वर्णन काव्यनाटकांत करावयाचे नसते, कारण तसे असते तर त्या अवस्थेमध्ये कोणत्याही हालचाली होत नसल्यामुळे शमाचे कोणतेही अनुभाव प्रतीत होणार नाहीत व त्यामुळे तो शांत रस प्रेक्षकांच्या अनुभवाला आला नसता. [२१] शृंगार इत्यादींच्या बाबतीतसुद्धा अंतिम अवस्थेचे वर्णन करणे अशक्य असते [२२] पण 'शम' या स्थायिभावाच्या पूर्वावस्थेमध्ये म्हणजे अंतिम अवस्थेच्या आधीच्या अवस्थेमध्ये शमप्रधान जनकादि पुरुषांच्या बाबतीत निरनिराळ्या प्रकारचे यम–नियम [२३] इ. व्यापार किंवा राज्याचा भार वाहणे वगैरे व्यापार घडत असल्याचे अनुभवास येते, म्हणून 'शम' या स्थायिभावाचे, पूर्वावस्थेत (शारीरव्यापाररूपी) अनुभाव दृष्टोत्पत्तीस येतात हे निर्विवाद आहे. तसेच यम–नियम वगैरेंच्या मधल्या वेळात पुष्कळ व्यभिचारिभाव [२४] प्रकट होण्याची शक्यता असल्यामुळे (शांतरस) अनुभवास येतोच यात शंका नाही. वर सांगितलेले अनुभाव व व्यभिचारिभाव प्रकट होणे याला पुढील दोन सूत्रांचा [२४अ] आधार आहे :– (१) त्याच्यावर म्हणजे त्या चित्तावर (निरोध) हा संस्कार केला असताना ते चित्त शांत असते (म्हणजे कोणत्याही विकाराने विरहित असते.) (२) त्या चित्ताच्या समाधि अवस्थेमध्ये मधून मधून व्युत्थानाच्या (म्हणजे व्यावहारिक स्थितीवर येण्याच्या) ज्या अवस्था प्राप्त होतात त्या अवस्थांमध्ये निराळे, मी, माझे वगैरे अनुभव पूर्वसंस्कारांमुळे येतात. 'पण काय हो, शांतरसाची प्रतीति येत नाही, कारण त्याचे (उद्दीपन) विभाव अस्तित्वात नाहीत,' असे म्हणणे असेल, तर ते बरोबर नाही. कारण तो म्हणजे शांत रस तर अनुभवास येतोच. म्हणून शांत रसाचे (म्हणजे त्याच्या शम नावाच्या स्थायिभावाचे उद्दीपन–) विभावही असलेच पाहिजेत. उदा. पूर्वजन्मी केलेल्या सत्कर्मांचे फळ, परमेश्वराची कृपा, [२५] अध्यात्माचे रहस्य उकलून सांगणाऱ्या शास्त्रांचे परिशीलन व विरक्त सज्जनांचा सहवास, वगैरे. अशा तऱ्हेने आतापर्यंतच्या विवरणात शांतरसाचा स्थायिभाव 'शम,' आणि त्याचे विभाव, अनुभाव व व्यभिचारिभाव हे दाखविता येतात. शंका – 'पण काय हो, त्या शांत रसाच्या स्थायिभावाशी कोणाही मनुष्याचा हृदयसंवाद होण शक्य नसल्यामुळे त्या स्थायिभावाचा आस्वाद मिळू शकतो हे पटण्यासारखे नाही.' उत्तर–कोण असे म्हणतो की, शम या स्थायिभावाशी कोणाही मनुष्याचा हृदयसंवाद होत नाही? कारण 'अनुभवास येतोच' असे वृत्तिकारांनी (द्वितीय खंड, वर) म्हटले आहे! शंका 'पण काय हो, तो अनुभवास येत असला, तरी त्याचे सर्वांना आकर्षण वाटते असे नाही. उत्तर– 'तर मग विरक्त लोकांना शृंगाराचे आकर्षण वाटत नाही, [२६] म्हणून त्यालाही रसांच्या यादीतून वगळा!' हेच वृत्तिकार 'आणि तो शांतरस' इ. वाक्याने सांगतात.

'पण काय हो, तो शांतरस म्हणजे सदाचरणाबाबत वाटणाऱ्या उत्साहावर आधारलेला वीररसच (म्हणजे धर्मवीरच)' अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'आणि त्याचा अंतर्भाव' इ. उत्तर देतात. 'तो म्हणजे वीररस, अभिमानावर आधारलेला—' कारण (वीररसाच्या) उत्साह या स्थायिभावाचे सारसर्वस्व 'मी असा असा आहे' (असे मानणे व म्हणणे) या स्वरूपाचे असते. पण 'हा' म्हणजे शांतरस. 'आणि त्या दोन रसांमध्ये—' एकाच्या बाबतीत महत्त्वाकांक्षांचे प्राचुर्य आणि दुसऱ्याच्या बाबतीत महत्त्वाकांक्षेचा पूर्ण अभाव असल्यामुळे ते दोन रस एकमेकांच्या सर्वस्वी विरुद्ध असले तरी, असा 'आणि' शब्दाचा अर्थ. [२७] पण वीर आणि रौद्र यांच्यामध्ये तर फारसा विरोध सुद्धा नसतो. उलट ते दोन्ही रस धर्म, अर्थ आणि काम या पुरुषार्थांच्या साधनेला उपयोगी असणे या दृष्टीने त्या दोहोंचे स्वरूपही सारखेच असते. [२८]

(शंका—) 'पण काय हो, असे झाले तर [२९] दयावीर हा धर्मवीर आहे की दानवीर आहे'? (उत्तर—) 'तो यांपैकी कोणताही प्रकार नाही. [३०] तो शांताचेच दुसरे नाव आहे. कारण तशा अर्थाचे भरतमुनींचे वचनही आहे, ते असे—

'दानवीर, धर्मवीर आणि युद्धवीर असे वीररसाचेही तीन प्रकार' ब्रह्मदेवाने सांगितले आहेत. [३१]

अशा रीतीने परंपरेचा हवाला देऊन भरतांनी वीराचे तीनच प्रकार सांगितले. म्हणून वृत्तिकार म्हणतात— 'आणि दयावीर वगैरे' यातील 'वगैरे' या शब्दाने (धर्मवीर व दानवीर यांचा बोध होतो.) [३२]

आता शांतरसाचे स्वरूप विषयांबद्दलचा तिटकारा असेच असल्यामुळे त्याचा बीभत्सातच अंतर्भाव होईल, अशी काही जण शंका घेतात. पण तो तिटकारा शांतरसाचा एक व्यभिचारिभाव होऊ शकेल. तो शांतरसाचा स्थायिभाव केव्हाही होऊ शकणार नाही. कारण, शांतरसाच्या अंतिम अवस्थेमध्येमध्ये त्या तिटकाऱ्याचे पूर्णपणे निर्मूलन होते. [३३] मात्र 'शांत रसाची योजना मुख्य रस म्हणून काव्यनाटकांत करू नये' असे चंद्रिकाकार म्हणतो. पण ते त्याचे म्हणणे आम्ही येथे विचारात घेतले नाही, [३४] कारण तो एक निराळाच विषय होईल. आणि शम या स्थायिभावाचे पर्यवसान मोक्षामध्ये होते, म्हणून व शम हा स्थायिभाव मोक्ष या परमपुरुषार्थाला कारणीभूत होतो म्हणून हा शांतरस इतर सर्व रसांहून श्रेष्ठ आहे. [३५] त्या शांतरसाचा विचार आमचे गुरु भट्टतौत यांनी 'काव्यकौतुक' या ग्रंथात व आम्हीही त्या ग्रंथाच्या आमच्या विवरणात पूर्वपक्ष व सिद्धान्त मांडून सविस्तरपणे केला आहे, म्हणून त्याची येथे फार चर्चा नको. ॥ २६ ॥

टीपा

१) महाभारत, शांतिपर्व, अध्याय १७४, श्लोक ४६.

२) वगैरे म्हणजे दानवीर, धर्मवीर.

३) भरतांनी दानवीर, युद्धवीर व धर्मवीर असे तीनच वीररसाचे प्रकार सांगितले आहेत. दयावीराचा त्यांनी निर्देश केलेला नाही. आनंदवर्धनांनी मात्र दयावीर हा वीररसाचा ४ था प्रकार मानून द्या, दान व धर्म हे वीराचे तीन प्रकार अहंकाररहित असतील तर त्यांची गणना शांतरसात होईल आणि अहंकारसहित असतील तर वीररसात होईल असे म्हटले आहे. पण अभिनवगुप्तांनी मात्र दयावीर हा कोणत्याही परिस्थितीत शांत रसच होय असे मानिलेले दिसते.

४) म्हणजे ते दोन रस तिसऱ्या रसाबरोबर एकाच वाक्यात घातले, तरी विरोधी होत नाहीत, तर मग ते प्रबंधातही विरोधी होणार नाहीत, यात शंका नाही.

५) नागानन्द, १–५.

६) नागानन्द, १–१३ नंतर नायकाने उच्चारलेले हे वाक्य. हे वाक्य विस्मय अभिव्यक्त करणारे आहे, पण हे वाक्य इतके लहानसे आहे की, शान्त व शृंगार यांची व्याप्ति लक्षात घेता अदभुत केवळ नावाला समाविष्ट झाला आहे असे दिसते. मात्र पुढच्या **व्यक्तिर्व्यञ्जनधातुना** इ. श्लोकात गायन, वादन यांसंबंधीचे आणखी वर्णन केलेले असल्यामुळे अद्‌भुताचे आणखी पोषण झाले आहे.

७) नागानन्द, १–१४.

८) हा श्लोक संगीतशास्त्रातील पारिभाषिक शब्दांनी भरलेला, म्हणून स्वतः नीरस असला, तरी तो मलयवतीचे संगीतातील नैपुण्य वर्णन करणारा असल्यामुळे अद्‌भुताच्या परिपोषाला हातभार लावतो, म्हणून लक्षणेने त्या पद्यालाही रसमय म्हटले आहे.

९) पाहा, सांख्यकारिका, क्र. ४२. या कारिकेचा उत्तरार्ध असा आहे– **प्रकृतेविभुत्वयोगात् नटवद् व्यवतिष्ठते लिङ्गम्** या वाक्याचे तात्पर्य 'लिंगशरीर नटाप्रमाणे निरनिराळी स्थूलशरीरे (पूर्वी केलेल्या कर्मानुसार) धारण करिते' असे आहे. हा लिंगशरीराचा दृष्टान्त प्रस्तुत ठिकाणी देण्याचे कारण असे– ज्याप्रमाणे लिंगशरीर हे पूर्वीच्या व नंतरच्या अशा दोन स्थूल शरीरांना जोडणारा दुवा असते, त्याप्रमाणे दोन विरुद्ध रसांमध्ये समाविष्ट केलेला तिसरा रस हा त्या दोन रसांना जोडणारा दुवा असतो.

१०) शेखरक हे एक विटाचे नाव असून जीमूतवाहन व मलयवती यांच्या विवाहाच्या उत्सवाचे निमित्ताने केलेल्या मद्यपानामुळे बेहोष होऊन त्याने केलेले असंबद्ध भाषण वगैरेमुळे हास्यरस निर्माण होतो.

११) पाहा, नागानन्द, ३-१५ व १६.

१२) म्हणजे वीररस हा शृंगाररस व शांतरस यांना जोडणारा दुवा आहे.

१३) नाट्यशास्त्र, ६–१५ मध्ये आठच रसांचा निर्देश आहे, शांत रसाचा नाही. ६–१७ मध्ये दिलेल्या स्थायिभावांच्या यादीतही आठच स्थायी भावांचा निर्देश आहे, 'शमा' चा नाही. पण काही हस्तलिखितांमध्ये रसांच्या यादीत शांताचा व स्थायिभावांच्या यादीत शम या स्थायिभावाचा अन्तर्भाव केलेला आढळतो. ज्या प्रतिपक्ष्याने 'शांताच्या स्थायिभावाचा नाट्यशास्त्रात उल्लेख नाही' असे म्हटले आहे, त्या प्रतिपक्ष्यापुढे असलेल्या हस्तलिखितात आठच रस व आठच स्थायिभाव असले पाहिजेत हे उघड आहे.

१४)'प्रशम' म्हणजे सर्व मनोवृत्ति थांबणे.

१५) 'प्रसज्यप्रतिषेध' व 'पर्युदास' हे दोन मीमांसाशास्त्रातील पारिभाषिक शब्द आहेत. प्रसज्यप्रतिषेधामध्ये एखाद्या पदार्थाच्या अस्तित्वाचा निषेध करणे हाच उद्देश असतो. उदा. 'येथे घट नाही' या वाक्याचे तात्पर्य

'घटाचे अस्तित्व नाही' हे आहे. पर्युदासामध्ये एखाद्या पदार्थाच्या अस्तित्वाचा निषेध करण्याचा उद्देश नसतो, तर तो पदार्थ सोडून दुसऱ्या कोणत्या तरी पदार्थाच्या बाबतीत विशिष्ट क्रिया करण्याचा हेतु असतो. उदा. 'अधनिकाला आण' या वाक्यात 'धनिक सोडून दुसऱ्याला' म्हणजे कोणालातरी आणणे या भावात्मक क्रियेवर जोर आहे.

१६) पर्युदासपद्धतीने 'चित्तवृत्तींच्या विरुद्ध असलेली प्रशम ही भावात्मक अवस्था' असा अर्थ होईल.

१७) नाट्यशास्त्राच्या ज्या प्रतीत शांतरसप्रकरण समाविष्ट झालेले आहे, त्या शांतरस प्रकरणातील हा ५ वा श्लोक आहे. यापूर्वीचे दोन श्लोक पुढीलप्रमाणे–

न यत्र दुःखं न सुखं न द्वेषो नापि मत्सरः ।
समः सर्वेषु भूतेषु स शान्तः प्रथितो रसः ॥ ३ ॥
भावा विकारा रत्याद्याः शान्तस्तु प्रकृतिर्मतः ।
विकारः प्रकृतेर्जातः पुनस्तत्रैव लीयते ॥ ४ ॥

१८) शांत रसाचा स्थायिभाव असलेली प्रशम ही मनाची स्वाभाविक, 'प्रकृति' या स्वरूपाची अवस्था आहे आणि बाकीच्या म्हणजे रत्यादि अवस्था काही विशिष्ट कारणांमुळे उदित होणाऱ्या, 'विकृति' या स्वरूपाच्या आहेत. इतर लोकांच्या मतांप्रमाणे प्रशम ही कोणतीही चित्तवृत्ति उदित होण्यापूर्वीची म्हणजे कोणत्याही चित्तवृत्तीच्या प्रागभावाची अवस्था होय, तर अभिनवगुप्तांच्या मताप्रमाणे प्रशम ही इतर चित्तवृतींवर विजय मिळविल्यामुळे उत्पन्न झालेली म्हणजे इतर चित्तवृत्तींचा प्रध्वंसाभाव असलेली मनाची आनंदमय अवस्था आहे. प्रागभाव हा प्रसज्यप्रतिषेधाशी जुळणारा व प्रध्वंसाभाव हा पर्युदासाशी जुळणारा आहे, म्हणूनच द्वितीय खंड, वरती अभिनवगुप्तांनी **पर्युदासे तु अस्मत्पक्ष एवायम् ।** असे म्हटले आहे.

१९) पाहा, न्यायसूत्र, ३–१–१. म्हणजे प्रत्येक मनुष्य सर्व चित्तवृत्ति, वासनांच्या स्वरूपात घेऊनच जन्माला येतो. म्हणजे या सर्व 'Instincts' आहेत. मागाहून त्यांच्यावर (प्रयत्न करून) विजय मिळविता येतो. 'वीतराग' हा शब्दच सांगतो की हे मनोविकार आधी असतात व मगच (काहींच्या बाबतीत) ते प्रयत्नाने निघून जातात. यासारखाच विचार अभिनवगुप्तांनी नाट्यशास्त्र अध्याय ६ वरील टीकेमध्ये मांडला आहे. पाहा, रसभावविचार, कंगले, पृ. १६७ वरील पुढील वाक्य– **जात एव हि जन्तुरियतीभिः संविद्भि परीतो भवति । न हि एतद्चित्तवृत्तिवासनाशून्यः प्राणी भवति ।**

२०) पाहा, नाट्यशास्त्र १–१०६. तेथे भरतमुनींनी 'शम' हा मोक्षाचा प्रतिनिधि म्हणून उल्लेखिला आहे, शांतरसाचा स्थायिभाव म्हणून उल्लेखिला नाही. पण नाट्यशास्त्राच्या काही हस्तलिखितांत आढळणाऱ्या 'शांतरस' प्रकरणात शम हा शांतरसाचा स्थायिभाव आहे असे स्पष्टपणे म्हटले आहे. (पाहा, **शान्तो नाम शमस्थायिभावात्मकः मोक्षप्रवर्तकः ।** रसभावविचार, कंगले, पृ. ३१५)

२१) काव्याबाबत अभिनवांचे हे म्हणणे तितकेसे योग्य वाटत नाही, कारण कालिदासाने कुमारसंभवाच्या ३ ऱ्या सर्गामध्ये शंकरांच्या समाधि अवस्थेचे तपशीलवार वर्णन केले आहे. नाटकामध्ये मात्र या अवस्थेच्या तपशीलाचा अभिनय करून दाखविणे अशक्य असते, म्हणून ही शेवटची अवस्था नाटकात वर्णू नये असे म्हटले आहे.

२२) शृंगाराची अंतिम अवस्था म्हणजे संभोगाची अखेरची अवस्था. त्या अवस्थेचा शेवटचा अभिनय करून दाखविणे अशक्यच असते (पाहा, अमरुशतक, १०१— **कान्ते तल्पमुपागते** इ. व काव्यप्रकाश, झळकीकर आवृत्ति पृ. १३६ वरील **धन्यासि या कथयसि** इ. श्लोक. तसेच बृहदारण्यक उपनिषद, ४—३—२१— **तद्यथा प्रियया स्त्रिया संपरिष्वक्तः न बाह्यं किंचन वेद नान्तरम् ।**

२३) आठ योगांगांपैकी यम व नियम यांचा विचार योगसूत्र, २—२९ ते ३१ यांमध्ये केला आहे. त्यातील अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह ही पाच महाव्रते म्हणजे यम व शौच, संतोष, तप स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे नियम होत. भरतांनीही शांतरस प्रकरणात यमनियम, आत्मचिंतन, उपासना, सर्व भूतांवर दया, इ. अनुभाव शांत रसाच्या 'शम' या स्थायिभावाच्या बाबतीत सांगितले आहेत.

२४) भरतांनी शांतरसप्रकरणात शांताचे निर्वेद, स्मृति, धृति, स्तम्भ, रोमांच इ. व्यभिचारिभाव सांगितले आहेत.

२४अ) योगसूत्र, ३—१० व ४—२७.

२५) नाट्यशास्त्राच्या काही प्रतीत आढळणाऱ्या 'शांतरसप्रकरणा'त 'शांतरसाचे तत्त्वज्ञान, वैराग्य, चित्तशुद्धि इ. विभाव असतात' असे सांगितले आहे. त्यातील 'इत्यादीं' मध्ये अभिनवगुप्तांनी वर सांगितलेल्या विभावांचाही अंतर्भाव होऊ शकतो.

२६) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत — २ 'माधुर्य' गुण" वरील लोचनानुवादातील पुढील वाक्य— 'कारण (विरागी) संन्यासीही रतीच्या वर्णनामुळे प्रभावित होतोच!' या विधानाशी आणि पुढे काशी आवृत्ती, पृ. ४८८ वर अभिनवगुप्तांनी केलेल्या **'न हि वीतरागो विपर्यस्तान् भावान् पश्यति । न ह्यस्य वीणाक्वणितं काकरटितकल्पं प्रतिभाति ।** इ. विधानाशी प्रस्तुत विरक्त लोकांना शृंगाराचे आकर्षण वाटत नाही हे म्हणणे थोडे विसंगत वाटते. श्लाध्यः या शब्दांचा अर्थ 'आसक्ति वाटण्याचा विषय' असा ताणला, तरच या विसंवादाचा परिहार होऊ शकेल.

२७) वस्तुतः वृत्तीत **अपि** हा विरोधवाचक शब्द प्रत्यक्षात वापरला असल्यामुळ च हा अपिच्या अर्थाचा मानण्याची मुळीच जरूर नाही. तो 'च' हा शब्द नेहमीच्या 'आणि' या अर्थानेच वापरला आहे.

२८) धर्म, अर्थ आणि काम या पुरुषार्थांच्या प्राप्तीबाबतचा उत्साह हे वीररसाचे स्वरूप, तर त्या प्राप्तीच्या आड येणाऱ्या विघ्नांच्याबाबत क्रोध हे रौद्र रसाचे स्वरूप असल्यामुळे त्या रसात बरेच साम्य आहे.

२९) 'असे झाले तर' म्हणजे तुम्ही म्हणता त्या प्रमाणे वीर व शांत हे रस परस्परविरुद्ध आहेत असे मानिले तर. भरतांनी दयावीर हा वीररसाचा प्रकार म्हणून मानिला नसल्याने त्याचा अंतर्भाव दानवीरात करावयाचा की धर्मवीरात, असा प्रश्न. काही झाले तरी दयावीराचा अंतर्भाव युद्धवीरात करणे शक्य नाही, असे आक्षेपकाचे म्हणणे.

३०) वृत्तीतील 'दयावीरा' च्या उल्लेखावरून आनंदवर्धनांना दयावीर हा वीर रसाचाच एक प्रकार म्हणून अभिप्रेत असावासे दिसते. पुढे (काशी आवृत्ति पृ. ५१४ वरील) वृत्तीमध्येही आनंदवर्धनांनी **'दयावीरस्यात्र परमार्थतो वाक्यार्थत्वात्' ।** असे म्हटले आहे. दयावीर या प्रकाराचा उल्लेख आनंदवर्धनांपूर्वी कोणीही केलेला दिसत नाही. तो प्रकार त्यांनीच प्रथम उल्लेखिला असावा. दण्डीने काव्यादर्श, २—२८४ येथे वीररसाची उदाहरणे देताना युद्धवीर, धर्यवीर व दानवीर या तीनच प्रकारांची उदाहरणें दिली आहेत. अभिनवगुप्तांना मात्र दयावीराचे वेगळे अस्तित्व मान्य असलेले दिसत नाही. याचे कारण भरतांनी नाट्यशास्त्रात हा प्रकार मानिला नव्हता हे असावे. हे दर्शविण्यासाठीच अभिनवगुप्तांनी, भरतांची 'दानवीर, धर्मवीर' इ. कारिका उद्धृत केली आहे. म्हणूनच 'दयावीर हे शांताचेच दुसरे नाव आहे' असे अभिनवगुप्त येथे व पुढे काशी आवृत्ति, पृ. ५१४ वरील 'लोचनात' म्हणतात. विश्वनाथाने साहित्यदर्पण, ३—२३४ मध्ये दयावीर हा प्रकार मानिला आहे व पुढे जगन्नाथानेही 'वीर हा चार प्रकारचा आहे' असे म्हणून (पाहा, रसंगंगाधर, काव्यमाला आवृत्ति, पृ. ४५) दयावीर हा प्रकार मान्य केला आहे. दयावीर हा अहंकाररहित असेल, तेव्हा तो शांताचाच एक प्रकार मानावा असे आनंदवर्धनांचे मत आहे. तेव्हा तेवढ्यापुरते **शान्तस्यैवेदं नामान्तरकरणम्** हे अभिनवगुप्तांचे म्हणणे आनंदवर्धनांच्या मताला धरून आहे. पण दयावीर हा जर अहंकारमूलक असेल, तर मात्र तो वीराचाच प्रकार होय असे आनंदवर्धनांचे मत.

३१) नाट्यशास्त्र, ६—७९.

३२) लोचनातील **दयावीरादीनां चेत्यादिग्रहणेन** या शब्दांनंतर **धर्मवीरदानवीरयोर्ग्रहणम्** या शब्दांची भर घालणे आवश्यक आहे.

युद्धवीराचा शांतरसाशी काहीही संबंध नाही. बाकीचे दयावीर, धर्मवीर व दानवीर हे प्रकार मात्र अहंकाररहित असतील तेव्हा ते शांतरसाचे प्रकार म्हणावेत व अहंकारमूलक असतील, तेव्हा ते वीररसाचे प्रकार मानावेत असे आनंदवर्धनांच्या म्हणण्याचे तात्पर्य आहे.

३३) विषयांबद्दलचा तिटकारा हा प्रारंभीच्या अवस्थेत जरी शांतरसाचा एक व्यभिचारिभाव होऊ शकला, तरी शम या स्थायिभावाची अंतिम अवस्था नाभिनन्दति न द्वेष्टि (पाहा. भगवद्गीता, २—५७) अशीच असते. नाट्यशास्त्रात शांतरस प्रकरणातील पुढील श्लोकामध्ये या अवस्थेचे वर्णन असेच केले आहे—

न यत्र दुःखं न सुखं न द्वेषो नापि मत्सरः ।
समः सर्वेषु भूतेषु स शान्तः प्रथितो रसः ॥

३४) 'ते आम्ही येथे विचारात घेतले नाही' असे जरी अभिनवगुप्तांनी म्हटले असले, तरी शांतरस हा प्रबंधामध्ये मुख्य रस असू शकतो असेच आनंद वर्धन व अभिनवगुप्त यांचे मत आहे. कारण, नागानन्द हे नाटक व महाभारत हे आर्ष काव्य या दोहोंमध्ये शांत हाच प्रधानरस आहे असे आनंदवर्धन व अभिनवगुप्त अनुक्रमे ३ व ४ या उद्द्योतांमध्ये म्हणतात.

३५) शांतरस हा इतर सर्व रसांहून श्रेष्ट आहे असे म्हणण्याचे आणखी एक कारण अभिनवगुप्तांनी 'अभिनवभारती' मध्ये (रसभावविचार, कंगले, पृ. ३४०) असे सांगितले आहे की, नाट्यशास्त्राच्या ज्या

प्रतींमध्ये शांतरस प्रकरण असलेले आढळते, तेथे शांतरसाचे विवेचन इतर सर्व रसांच्या आधी केलेले आहे. तेथे अभिनवगुप्तांनी शांत रसाला 'इतर सर्व रसांची प्रकृति' म्हटले आहे. भरतांनीही शांत रस प्रकरणात **भावा विकारा रत्याद्याः शान्तस्तु प्रकृतिर्मतः' ।** असे म्हटले आहे.

ध्वन्यालोकः

एतदेव स्थिरीकर्तुमिदमुच्यते—
रसान्तरान्तरितयोरेकवाक्यस्थयोरपि ।
निवर्तते हि रसयोः समावेशे विरोधिता ॥ २७ ॥

रसान्तरव्यवहितयारेकेप्रबन्धस्थयोर्विरोधिता निवर्तत इत्यत्र न काचिद् भ्रान्तिः । यस्मादेकवाक्यस्थयोरपि रसयोरुक्तया नीत्या विरुद्धता निवर्वते । यथा—

भूरेणुदिग्धान् नवपारिजातमालारजोवासितबाहुमध्याः ।
गाढं शिवाभिः परिरभ्यमाणान् सुराङ्गनाश्लिष्टभुजान्तरालाः ।
सशोणितैः क्रव्यभुजां स्फुरद्भिः पक्षैः खगानामुपवीज्यमानान् ।
संवीजिताश्चन्दनवारिसेकैः सुगन्धिभिः कल्पलतादुकूलैः ॥
विमानपर्यङ्कतले निषण्णाः कुतूहलाविष्टतया तदानीम् ।
निर्दिश्यमानान् ललनाङ्गुलीभिर्वीराः स्वदेहान् पतितानपश्यन् ॥

इत्यादौ । अत्र हि शृङ्गारबीभत्सयोस्तदङ्गयोर्वा वीररसव्यवधानेन समावेशो न विरोधी ॥ २७ ॥

विरोधमविरोधं च सर्ववेत्थं निरूपयेत् ।
विशेषतस्तु शृङ्गारे सुकुमारतमो ह्यसौ ॥ २८ ॥

यथोक्तलक्षणानुसारेण विरोधाविरोधौ सर्वेषु रसेषु प्रबन्धेऽन्यत्र च निरूपयेत्सहृदयः; विशेषतस्तु शृङ्गारे । स हि रतिपरिपोषात्मकत्वाद्रतेश्च स्वल्पेनापि निमित्तेन भङ्गसम्भवात्सुकुमारतमः सर्वेभ्यो रसेभ्यो मनागपि विरोधिसमावेशं न सहते ॥ २८ ॥

अवधानातिशयवान् रसे तत्रैव सत्कविः ।
भवेत्तस्मिन् प्रमादो हि झटित्येवोपलक्ष्यते ॥ २९ ॥

तत्रैव च रसे सर्वेभ्योऽपि रसेभ्यः सौकुमार्यातिशययोगिनि कविरवधानवान् प्रयत्नवान् स्यात् । तत्र हि प्रमाद्यतस्तस्य सहृदयमध्ये क्षिप्रमेवावज्ञानविषयता भवति । शृङ्गाररसो हि संसारिणां नियमेनानुभवविषयत्वात् सर्वरसेभ्यः कमनीयतया प्रधानभूतः ॥ २९ ॥

ध्वन्यालोक

हेच पक्के ठसवण्यासाठी पुढीलप्रमाणे सांगितले जात आहे. :—

दोन विरोधी रसांमध्ये जर तिसरा रस घातला, तर ते दोन रस एका वाक्यात समाविष्ट केलेले असले, तरीसुद्धा त्यांतील विरोध नाहीसा होतो. ॥ २७ ॥

एका प्रबन्धामध्ये दोन विरोधी रस, मध्ये तिसरा घालून समाविष्ट केल्यास त्यांमधील विरोध दूर होतो, यात काही शंका नाही. कारण एका वाक्यात असलेल्या दोन विरोधी रसांमधला विरोधदेखील आता सांगितलेल्या उपायाचा अवलंब केल्यास नष्ट होतो. [१] जसे :—

'ताज्या पारिजात पुष्पांच्या माळांमधील परागांमुळे ज्यांची वक्षःस्थले सुगंधित झाली आहेत, आणि ज्यांच्या वक्षःस्थलांना अप्सरांनी आलिंगन दिले आहे अशा वीरांनी धुळीच्या कणांनी माखलेले व कोल्ह्या ज्यांना कवटाळीत आहेत असे आपले (रणांगणावर) पडलेले देह कुतूहलाने प्रेरित होऊन पाहिले. त्या वीरांना चंदनाचे पाणी शिंपडून सुगंधित केलेल्या, कल्पवेलीपासून मिळालेल्या रेशमी वस्त्रांनी वारा घातला जात होता आणि त्यांच्या (मृत) देहांना मांसाहारी गिधाडांच्या फडफडणाऱ्या, रक्तरंजित पंखांनी वारा घातला जात होता. ते वीर त्यावेळी विमानातील मंचकांवर बसले असून अप्सरा त्यांच्या (मृत) देहांकडे अंगुलीनिर्देश करीत होत्या.'

इत्यादि उदाहरणांमध्ये, कारण, येथे शृंगार व बीभत्स या दोन रसांचा म्हणा, किंवा त्यांच्या अंगांचा म्हणजे स्थायिभावांचा म्हणा, समावेश, मध्ये वीररस [२] घालून केलेला असल्याने विरोधी झाला नाही. ॥ २७ ॥

(दोन रसांमध्ये) विरोध किंवा अविरोध (आहे किंवा नाही) हे (कवीने) सगळीकडे या पद्धतीने तपासून घ्यावे. शृंगारात ही पारख विशेष कटाक्षाने करावी. कारण तो अत्यंत नाजूक असतो. ॥ २८ ॥

आतापर्यंत सांगितलेल्या उपायांचा अवलंब करून कवीने प्रबंधातून किंवा इतर वाङ्मयप्रकारांत सर्व रसांच्या बाबतीत विरोध किंवा अविरोध समजून घ्यावेत. शृंगाराच्या बाबतीत विशेषच खबरदारी घ्यावी, कारण रतिभावाचा परिपोष हे त्या रसाचे स्वरूप होय, आणि रतिभावाचा भंग करावयाला लहानसे निमित्तही पुरत असल्याने तो रस सर्व रसांपेक्षा नाजूक असतो व त्याला विरोधी रसाचा समावेश थोडादेखील सहन होत नाही. ॥ २८ ॥

त्याच रसाच्या बाबतीत सुकवीने पराकाष्ठेची दक्षता बाळगावी; कारण त्या रसाच्या बाबतीत जर बेसावधपणा झाला, तर तो (रसिकांच्या) ताबडतोब लक्षात येतो. ॥ २९ ॥

(इतर) सर्व रसांहून अतिशय नाजूक असलेल्या त्याच रसाचे बाबतीत कवीने विशेष लक्ष पुरवावे, म्हणजे कसोशीने प्रयत्न करावा. कारण त्या रसाचे बाबतीत ज्याचे अवधान सुटते, तो कवि अल्प काळातच सहृदयांच्या हेटाळणीचा विषय होतो. कारण शृंगार रस हा संसारी लोकांच्या अनुभवास नियमाने येणारा असतो आणि म्हणून तो सर्व रसांहून रमणीय असल्याने श्रेष्ठ होय. ॥ २९ ॥

लोचनम्

स्थिरीकर्तुमिति । शिष्यबुद्धावित्यर्थः । अपिशब्देन प्रबन्धविषयतया सिद्धोऽयमर्थ इति दर्शयति । भूरेण्विति । विशेषणैरतीव दूरापेतत्वमसम्भावनास्पदमुक्तम् । स्वदेहानित्यनेन देहत्वाभिमानादेव तादात्म्यसम्भावनानिष्पत्तेरेकाश्रयत्वमस्ति, अन्यथा विभिन्नविषयत्वात्को विरोधः । 'ननु वीर एवात्र रसो न शृङ्गारो न बीभत्सः किन्तु रतिजुगुप्से हि वीरं प्रति व्यभिचारीभूते' । भवत्वेवम्, तथापि प्रकृतोदाहरणता तावदुपपन्ना । तदाह-तदङ्गयोर्वेति । तयोरङ्गे तत्स्थायिभावावित्यर्थः । वीररसेति । 'वीराः स्वदेहान्' इत्यादिना तदीयोत्साहाद्यवगत्या कर्तृककर्मणोः समस्तवाक्यार्थानुयायितया प्रतीतिरिति मध्यपाठाभावेऽपि सुतरां वीरस्य व्यवधायकतेति भावः ॥ २७ ॥

अन्यत्र चेति मुक्तकादौ । स हि शृङ्गारः सुकुमारतम इति सम्बन्धः । सुकुमारस्तावद्रसजातीयः ततोऽपि करुणस्ततोऽपि शृङ्गारः इति तमप्रत्ययः ॥ २८-२९ ॥

लोचन

'पक्षे ठसविण्यासाठी' – शिष्यांच्या (म्हणजे वाचकांच्या) मनामध्ये, असा अर्थ. ('समाविष्ट केले तरीसुद्धा' यातील) 'सुद्धा' शब्दाने प्रबंधांच्या विषयांबाबत तर विरोध नाहीसा होतो ही गोष्ट ओघानेच येते, असे वृत्तिकार दर्शवितात. 'ताज्या पारिजात पुष्पांच्या' – या उदाहरणातील (वीर पुरुषांच्या प्रथमान्त विशेषणांमुळे व त्यांच्या मृतदेहांच्या द्वितीयान्त) विशेषणांमुळे नव्या व पूर्वीच्या स्थितीतील महदन्तर हे कल्पनेच्या पलीकडचे आहे असे सूचित केले जात आहे. 'आपल्या (मृत) देहांकडे' या शब्दांनी त्या वीरांना ते देह म्हणजे आपण स्वतःच असा जो आपलेपणा वाटत होता, त्यामुळेच ते वीर पुरुष व त्यांचे देह यांमध्ये अभेदबुद्धि उत्पन्न झाली व म्हणूनच (सुरांगनांना वाटणाऱ्या रतीचा आलंबन विभाव असलेले) ते वीरपुरुष व (त्या वीरपुरुषांना वाटणाऱ्या जुगुप्सेचा आलंबन विभाव असलेले) ते मृतदेह या दोहोंमध्ये (वीरपुरुषांना मृतदेहांबद्दल वाटणाऱ्या अभिमानामुळे) ऐक्य उत्पन्न झाले (म्हणून शृंगार व बीभत्स हे या ठिकाणी एकविषयत्वामुळे विरोधी होतात. तसे नसते तर, म्हणजे त्यांचे विषय वेगळे असते तर त्यांमध्ये (म्हणजे रति व जुगुप्सा यांमध्ये) विरोध कोठून असणार, हा आशयः (शंका–) 'पण काय हो, या उदाहरणातील (मुख्य) रस वीर हाच आहे, शृंगारही नाही किंवा बीभत्सही नाही! मात्र 'रति' आणि 'जुगुप्सा' हे या ठिकाणी वीराचे व्यभिचारिभाव झालेले आहेत!' (उत्तर–) असे का असेना! पण हे प्रस्तुत (म्हणजे कारिका २७ मधील) मुद्द्याचे उदाहरण तर होऊ शकतेच की! म्हणून वृत्तिकार 'किंवा त्यांच्या [३] अंगांचा म्हणा' असे म्हणतात. [४] त्यांची अंगे' म्हणजे त्यांचे स्थायिभाव, असा अर्थ. 'मध्ये वीर रस घालून' – 'ते वीर आपल्या देहांकडे' इ. शब्दांनी त्यांच्या उत्साह [५] वगैरेंचा बोध होऊन (पाहणे या क्रियेचा वीर हा) कर्ता व (आपले देह हे) कर्म, ही दोन्ही (त्या त्या विशेषणांच्या द्वारा) सर्व वाक्याच्या अर्थाला व्यापून राहिली आहेत असे वाचकांना प्रतीत होते व म्हणून 'वीर' हा शब्द विशेषणांच्या मध्ये कोठेही नसला, तरी वीर रस हा शृंगार व बीभत्स यांच्या मध्ये मध्यस्थी करणारा म्हणून आपली भूमिका पार पाडतोच, हा भावार्थ. ॥ २७ ॥

'इतर वाङ्मय – प्रकारांतून' म्हणजे मुक्तक वगैरेंमधून [६] 'कारण तो (शृंगार)' याचा अन्वय 'कमालीचा नाजूक असतो' याच्याशी करावा. आधीच कोणतेही रस, भाव वगैरे नाजूकच असतात. पण त्यातही करुण हा विशेष नाजूक व त्याहूनही [७] शृंगार हा कमालीचा नाजूक असतो, म्हणून (कारिका २८ मध्ये) सुकुमार या विशेषणाला तम हा प्रत्यय मुद्दाम लाविला आहे. ॥ २८-२९ ॥

टीपा

१) मग एखाद्या प्रबंधात या उपायाचा अवलंब केल्यास विरोध नाहीसा होईल, हे काय सांगायला हवे? पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'" व त्यावरील चवथी टीप

२) या उदाहरणातील वीर पुरुषांचे वर्णन ज्या विशेषणांनी केले आहे, त्या शब्दांनी त्या वीरांचा पूर्व पराक्रम व त्यामुळे त्यांचा युद्धविषयक उत्साह हा स्थायिभाव सूचित होऊन वीररसाची प्रतीति होत आहे.

३) त्यांची अंगे म्हणजे शृंगार व बीभत्स यांची अंगे (म्हणजे स्थायिभाव) असे आनंदवर्धनांचे म्हणणे; पण पूर्वपक्ष्याच्या म्हणण्याप्रमाणे रति व जुगुप्सा हे येथे वीररसाचे व्यभिचारिभाव म्हणजे वीररसाची अंगे असा अर्थ होतो.

४) रति व जुगुप्सा हे पूर्वपक्ष्याच्या म्हणण्याप्रमाणे वीररसाचे व्यभिचारिभाव मानिले, तर त्यांमधील विरोधाचा परिहार होईल, पण तो कारिका २७ मध्ये सांगितलेल्या 'वीररसाचे व्यवधान' या कारणामुळे नव्हे, तर मागे कारिका २० मध्ये सांगितल्याप्रमाणे ते वीररसाचे अंग होत असल्यामुळे म्हणून पूर्वपक्ष्याचे म्हणणे मान्य केल्यास अभिनवगुप्त म्हणतात त्याप्रमाणे हे प्रकृताचे म्हणजे कारिका २७ मध्ये सांगितलेल्या परिस्थितीचे उदाहरण होत नाही.

५) वगैरेंचा म्हणजे गर्व, स्वाभिमान इत्यादींचा.

६) मुक्तक वगैरेंचे स्पष्टीकरण मागे द्वितीय खंड, पृ. ९५ ते ९७ वर आलेच आहे.

७) अभिनवगुप्तांचे हे विधान उद्द्योत २, कारिका ८ वरील लोचनातील विधानाशी (पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'माधुर्य' गुण") विसंगत आहे.

ध्वन्यालोकः

एवं च सति—

विनेयानुन्मुखीकर्तुं काव्यशोभार्थमेव वा ।
तद्विरुद्धरसस्पर्शस्तदङ्गानां न दुष्यति ॥ ३० ॥

शृङ्गारविरुद्धरसस्पर्शः शृङ्गाराङ्गानां यः स न केवलमविरोधलक्षणयोगे सति न दुष्यति यावद्विनेयानुन्मुखीकर्तुं काव्यशोभार्थमेव वा क्रियमाणो न दुष्यति । शृङ्गाररसाङ्गैरुन्मुखीकृताः सन्तो हि विनेयाः सुखं विनयोपदेशान् गृह्णन्ति । सदाचारोपदेशरूपा हि नाटकादिगोष्ठी विनेयजनहितार्थमेव मुनिभिरवतारिता ।

किं च शृङ्गारस्य सकलजनमनोहराभिरामत्वात्तदङ्गसमावेशः काव्ये शोभातिशयं पुष्यतीत्यनेनापि प्रकारेण विरोधिनि रसे शृङ्गाराङ्गसमावेशो न विरोधी । ततश्च

सत्यं मनोरमा रामाः सत्यं रम्या विभूतयः ।
किं तु मत्ताङ्गनापाङ्गभङ्गलोलं हि जीवितम् ॥
इत्यादिषु नास्ति रसविरोधदोषः ।

ध्वन्यालोक

आणि असे असल्याने –

सामाजिकांना म्हणजे वाचक प्रेक्षकांना आकृष्ट करण्यासाठी किंवा काव्याला शोभा यावी याच हेतूने त्याच्या (शृंगाराच्या) विरुद्ध असणारा रस प्रस्तुन असताना त्याच्या (म्हणजे शृंगाराच्या) अंगांचा समावेश केल्यास तो दोष ठरत नाही. ॥ ३० ॥

शृंगाराच्या विरुद्ध असलेला रस प्रस्तुत असताना शृंगार रसाचा समावेश वर विरोध टाळण्याचे जे उपाय सांगितले, ते योजून केल्यासच निर्दोष होतो असे नव्हे, तर सामाजिकांच्या ठिकाणी आवड उत्पन्न व्हावी म्हणून काव्याला शोभा आणण्यासाठीही जरी त्याचा समावेश केला, तरी देखील तो दोषास्पद होत नाही. कारण शृंगार रसाच्या अंगांचे प्रतिपादन करून सामाजिकांना आकृष्ट केल्यास ते सदाचरणाचा उपदेश सुखाने [१] स्वीकरतात. कारण सदाचरणाचा उपदेश करणारे नाटक वगैरे वाङ्मयप्रकार भरतादि मुनींनी सामाजिकांचे कल्याण व्हावे, यासाठीच प्रकाशात आणले.

आणखी असे की, शृंगार रस हा सर्व लोकांचे मन वेधून घेण्याइतका रमणीय असल्यामुळे त्याच्या अंगांचा समावेश काव्याला विशेष सौंदर्य प्राप्त करून देतो, या कारणामुळेही बिरोधी रसाच्या संबंधात शृंगाराच्या अंगांचा समावेश दोषास्पद होत नाही. असे असल्यामुळेच –

'सुंदर स्त्रिया मन हरण करितात, हे खरे आहे. ऐश्वर्य मनाला मोह पाडते, हेही खरे. पण जीवित हे यौवनोन्मत्त ललनांच्या कटाक्षपाताइतकेच चंचल असते.'

अशासारख्या उदाहरणांमध्ये (प्रस्तुत, शांत) रसाला (शृंगाराच्या समावेशामुळे) विरोध होण्याचा दोष उत्पन्न होत नाही.

लोचनम्

एवं चेति । यतोऽसौ सर्वसंवादीत्यर्थः तदिति । शृङ्गारस्य विरुद्धा ये शान्तादयस्तेष्वपि तदङ्गानां शृङ्गाराङ्गाना सम्बधी स्पर्शो न दुष्टः । तया भङ्ग्या रसान्तरगता अपि विभावानुभावाद्या वर्णनीया यया शृङ्गाराङ्गभावमुपागमन् । यथा ममैव स्तोत्रे–

त्वां चन्द्रचूडं सहसा स्पृशन्ती प्राणेश्वरं गाढवियोगतप्ता ।

सा चन्द्रकान्ताकृतिपुत्रिकेव संविद्विलीयापि विलीयते मे ॥

इत्यत्र शान्तविभावानुभावानामपि शृङ्गारभङ्ग्या निरूपणम् । विनेयानुन्मुखीकर्तुं या काव्यशोभा तदर्थं नैव दुष्यतीति सम्बन्धः । वाग्रहणेन पक्षान्तरमुच्यते । तदेव व्याचष्टे— न केवलमिति । वाशब्दस्यैतद् व्याख्यानम् । अविरोधलक्षणं परिपोषपरिहारादि पूर्वोक्तम् । विनेयानुन्मुखीकर्तुं या काव्यशोभा तदर्थमपि वा विरुद्धरससमावेशः न केवलं पूर्वोक्तैः प्रकारैः । न तु काव्यशोभा विनेयोन्मुखीकरणमन्तरेणास्ते व्यवधानाव्यवधाने नापि लभ्येते यथान्यैर्व्याख्याते । सुखमिति । रञ्जनापुर :— सरमित्यर्थः । ननु (क्व) काव्यं क्रीडारूपं क्व च वेदादिगोचरा उपदेशकथा इत्याशङ्क्याह— सदाचारेति । मुनिभिरिति-- भरतादिभिरित्यर्थः । एतच्च प्रभुमित्रसम्मितेभ्यः शास्त्रेतिहासेभ्यः प्रीतिपूर्वकं जायासम्मितत्वेन नाट्यकाव्यगतं व्युत्पत्तिकारित्वं पूर्वमेव निरूपितमस्माभिरिति न पुनरुक्तभयादिह लिखितम् ।

ननु शृङ्गाराङ्गताभङ्ग्या यद्विभावादिनिरूपणमेतावतैव किं विनेयोन्मुखीकारः? न; अस्ति प्रकारान्तरं, तदाह— किं चेति । शोभातिशयमिति । अलङ्कारविशेषमुपमाप्रभृतिं पुष्यति सुन्दरीकरेतीत्यर्थः । यथोक्तम्— 'काव्यशोभायाः कर्तारो धर्मा गुणास्तदतिशयहेतवस्त्वलङ्काराः' इति । मत्ताङ्गनेति । अत्र हि शान्तविभावे सर्वस्यानित्यत्वे वर्ण्यमाने न कस्यचिद्विभावस्य शृङ्गारभङ्ग्या निबन्धः कृतः, किं तु सत्यमिति परहृदयानुप्रवेशेनोक्तम्, न खल्वलीकवैराग्यकौतुकरुचिं प्रकटयामः, अपि तु यस्य कृते सर्वमभ्यर्थ्यते तदेवेदं चलमिति । तत्र मत्ताङ्गनापाङ्गभङ्गस्य शृङ्गारं प्रति सम्भाव्यमानाविभावानुभावत्वेनाङ्गस्य लोलतायामुपमानतोक्तेति । प्रियतमाकटाक्षो हि सर्वस्याभिलषणीय इति च तत्प्रीत्या प्रवृत्तिमान् गुडजिह्विकया प्रसक्तानुप्रसक्तवस्तुतत्वसंवेदनेन वैराग्ये पर्यवस्यति विनेयः ॥ ३० ॥

लोचन

'आणि असे असल्याने' म्हणजे तो शृंगार रस सर्वांच्या अनुभवाशी जुळणारा [२] असल्याने, असा अर्थ. 'त्याच्या' म्हणजे शृंगाराच्या विरुद्ध असलेले जे शांत वगैरे, ते (मुख्य) असतानाही त्याच्या अंगांचा म्हणजे शृंगाराच्या अंगांचा समावेश दोषास्पद होत नाही. दुसऱ्या म्हणजे शांत इ. मुख्य रसांचे विभाव—अनुभाव वगैरेही अशा पद्धतीने वर्णावेत की त्यामुळे ते शृंगाराचे विभाव—अनुभाव वगैरे बनतील. [३] उदा. माझेच' (पुढील) स्तोत्र घ्या :—

'हे शंकरा! माझी जाणीव तुझ्या दुःसह वियोगामुळे व्यथित झाल्यावर जेव्हा पंच प्राणांचा अधिपति व चंद्रमौली असलेल्या तुला (ध्यानाचा विषय म्हणून) स्पर्श करिते, तेव्हा ती जाणीव चंद्रकांत पाषाणापासून बनविलेल्या मूर्तीप्रमाणे तुझ्यातच एकदम विलीन होऊनही (प्रत्येक ध्यानाचे वेळी) पुनः पुनः विलीन होत राहते. [४]

या स्तोत्रात शांत रसाच्या विभावानुभावांचे वर्णनही ते शृंगार रसाचे विभावानुभाव वाटतील अशा रीतीने केले आहे. [५] सामाजिकांना (म्हणजे वाचक प्रेक्षकांना) आकर्षण वाटावे म्हणून काव्याला सौंदर्याने नटविण्याच्या हेतूने (विरोधी रसाचा समावेश केल्यास तो) मुळीच दोषार्ह ठरत नाही, असा अन्वय व अर्थ लावावा. 'किंवा' हा कारिका ३० मधील शब्द वापरल्याने 'निराळ्या [६] पक्षी' हा अर्थ प्रकट केला गेला आहे. त्याचेच (म्हणजे त्या निराळ्या पक्षाचे) म्हणजे विरोध टाळण्याच्या चौथ्या उपायाचेच विवरण वृत्तिकार '(विरोध टाळण्याचे वर सांगितलेले उपाय योजून) केल्यासच (विरुद्ध रसाचा समावेश निर्दोष होतो) असे

नाही.' इ. शब्दांनी करितात. हे वृत्तिकारांनी केलेले 'किंवा' या शब्दाचे विवरण होय. अविरोधसंपादनाचे उपाय—मुख्य रसाहून वेगळ्या रसाचा फार परिपोष करू नये वगैरे—पूर्वीच (म्हणजे कारिका २४ ते २६ मध्ये) सांगितले आहेत. विरोधी रसाचा काव्यात जो समावेश करावयाचा, तो केवळ पूर्वी सांगितलेल्या प्रकारांनी केल्यास निर्दोष असतो, येवढेच नव्हे तर सामाजिकांना आकृष्ट करण्यासाठी काव्याला सौंदर्याने नटवावे, म्हणूनही विरोधी रसाचा काव्यात समावेश करणे दोषास्पद ठरत नाही.

दुसऱ्या टीकाकारांनी कारिकेच्या पूर्वार्धाचे निराळे विवरण केले आहे. (ते स्वीकारल्यास सामाजिकांना आकृष्ट करणे व काव्यात सौंदर्य निर्माण करणे हे दोन उपाय परस्परनिरपेक्ष आहेत असे म्हटल्यासारखे होईल). पण ते बरोबर नाही, कारण तसे मानिल्यास सामाजिकांना आकृष्ट करणे हा हेतु नसला तरी काव्यशोभा असू शकते असे म्हटल्यासारखे होईल व पूर्वी कारिका २४ ते २६ मध्ये सांगितलेल्या व्यवधान व अव्यवधान या उपायांचा अवलंब केल्यासही काव्यसौंदर्य नसते असे म्हटल्यासारखे होईल. [७] (पण हेही बरोबर होणार नाही.)

'सुखाने' म्हणजे 'मनोरंजन होऊन' असा अर्थ. (शंका—) 'पण काय हो, काव्य हे केवळ करमणुकीसाठी असलेले, क्रीडेच्या स्वरूपाचे असते. कोठे ते आणि कोठे वेद वगैरेंनी केलेला उपदेश?' अशी शंका कोणी घेईल हे जाणून वृत्तिकार तिला 'सदाचार इत्यादींचा उपदेश करणारे नाटक वगैरे वाङ्मयप्रकार' इ. वाक्याने उत्तर देतात. मुनींनी म्हणजे भरतादि विचारवंतानी, असा अर्थ. नाट्य व काव्य यांचे कार्य प्रियपत्नीसारखे असल्यामुळे ती आनंद देऊन उपदेश करितात व म्हणून धन्याप्रमाणे असणाऱ्या वेदादि शास्त्रांहून व मित्राप्रमाणे असणाऱ्या इतिहासादिकांहून त्यांचे उपदेश करण्याचे सामर्थ्य अगदी वेगळे असते हे सर्व आम्ही पूर्वीच [८] स्पष्ट केले असल्यामुळे पुनरुक्ति होईल या भीतीने येथे पुन्हा लिहिले नाही.

(शंका —) 'पण काय हो, शांताच्या विभाव इत्यादींचे वर्णन त्यांना शृंगाराच्या विभावादिकांचे स्वरूप देऊन करणे हा एकच सामाजिकांना आकृष्ट करण्याचा उपाय आहे काय?' (उत्तर—) 'नाही. आणखीही एक उपाय आहे.' तो वृत्तिकार 'आणखीही असे की' इ. शब्दांनी सांगतात. 'विशेष सौंदर्य (प्राप्त करून देतो) — म्हणजे उपमा इ. विशिष्ट अलंकारांचा 'परिपोष करितो' म्हणजे त्यांना सौंदर्याने नटवितो, असा अर्थ. कारण म्हटलेच आहे— 'गुण हे काव्यामध्ये शोभा निर्माण करणारे धर्म होत, पण अलंकार हे ती शोभा वाढविण्यास कारणीभूत असतात. [९]'

'यौवनोन्मत्त ललनांच्या' — कारण या श्लोकात [१०] 'सर्व गोष्टींचा नश्वरपणा' या शांत रसाच्या विभावाचे वर्णन चालू असताना शांत रसाच्या कोणत्याही उद्दीपन विभावाचे शृंगाराचे अंग म्हणून वर्णन केलेले नाही, तर उलट 'खरे आहे' हे सामान्य जनांच्या मनात शिरण्याच्या उद्देशाने म्हणजे त्यांच्या अनुभवाला मान्यता देण्याच्या उद्देशाने म्हटले आहे. आम्ही खोट्याच म्हणजे असमर्थनीय असलेल्या वैराग्याबद्दलची उत्सुकता किंवा आवड प्रकट करीत आहोत, असे नाही, तर ज्या ऐहिक जीवनासाठी सर्व विषयोपभोग हवेसे वाटतात ते जीवनच मुळात क्षणिक आहे. [११] यांत यौवनोन्मत्त ललनांचे कटाक्षपात हे शृंगाराचे विभाव व अनुभाव [१२] मानणे शक्य असल्यामुळे ते शृंगाररसाचे अंग आहेत. (जीविताच्या) चंचलतेच्या बाबतीत उपमान म्हणून त्या कटाक्षांचे वर्णन केले आहे. प्रियतमेचा कटाक्ष हा सगळ्यांनाच हवासा वाटतो. म्हणून कटाक्षाविषयी वाटणाऱ्या आकर्षणामुळे सामाजिक या वर्णनाकडे ओढला जातो व त्या मधाच्या बोटाच्या [१३] द्वारे म्हणजे प्रत्यक्षात वर्णिलेल्या शृंगाराच्या द्वारे त्याला अनुषंगाने संसाराच्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान होऊन शेवटी त्याच्या ठिकाणी वैराग्य बाणते. ॥ ३० ॥

टीपा

१) सुखाने म्हणजे त्यात रंगून जाऊन.

२) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'माधुर्य' गुण' मध्ये रुद्रटाने काव्यालंकार, १४–३८ मध्ये **अनुसरति रसानां रस्यतामस्य नान्यः । सकलमिदमनेन व्याप्तमाबालवृद्धम् ॥** असे शृंगार रसाच्या बाबतीत म्हटले आहे.

३) मूळ लोचनात **उपागमन्** असे क्रियापद आहे, ते **उपगच्छेयुः** या अर्थी वापरले आहे. तृतीय भूतकाळाचा वापर अ–पाणिनीय आहे.

४) हे भाषांतर आम्ही मुख्य जो शांत रस त्याला अनुकूल होईल असे केले आहे. त्याचे अंग झालेला जो शृंगार, त्याच्या दृष्टीने या स्तोत्राचा आशय पुढीलप्रमाणे होईलः– 'हे (नायिकेच्या) प्राणनाथा! तुझ्या वियोगाच्या दुःसह वेदनांनी व्याकुळ झालेली नायिका तुझ्या शरीराला स्पर्श करिताक्षणीच चांदण्यात ठेवलेल्या चंद्रकांत शिलेच्या मूर्तीप्रमाणे एकसारखी पाझरू लागली आहे.

५) शांत रसाचा 'शिव' हा आलंबन विभाव, वियोगदुःखाने व्याकुळ होणे हा व्यभिचारिभाव व विलीन होणे हा अनुभव आहे. शृंगाराच्या बाबतीत प्रियकर हा आलंबन विभाव, त्याच्या वियोगाने व्याकुळ होणे हा व्यभिचारिभाव आणि त्याला स्पर्श करून त्याच्याशी एकरूप होणे हा अनुभाव होय.

६) कारिका २४ व २६ यांमध्ये विरोधी रसांमधील विरोधाचा परिहार करण्याचे जे तीन उपाय सांगितले, त्यांहून निराळा चवथा, एकच उपाय या कारिकेत सांगितला आहे.

७) **वा** (म्हणजे किंवा) हा शब्द 'विकल्प' हा अर्थ प्रकट करितो. ३० व्या कारिकेत जो **वा** शब्द आहे. तो कोणाचा कोणाशी विकल्प दर्शवितो हा प्रश्न आहे. अभिनवगुप्तांच्या आधीच्या टीकाकारांनी केलेल्या विवरणानुसार 'विनेयांना उन्मुख करण्याकरिता लिहिलेल्या काव्यांमध्ये काव्यशोभा नसते' असा अर्थ निघेल व पूर्वी कारिका २४ ते २६ मध्ये सांगितलेल्या व्यवधान–अव्यवधानांमध्येही काव्यशोभा असत नाही असाही अर्थ निष्पन्न होईल हे बरोबर नाही, म्हणून अभिनवगुप्त तिसाव्या कारिकेच्या पूर्वार्धाचा अर्थ 'विनेयांना उन्मुख करण्याकरिता जी काव्यशोभा निर्मिली जाते, तिच्यासाठी' असा करितात. त्यामुळे विनेयांना उन्मुख करण्याकरिता लिहिलेल्या काव्यांत काव्यशोभा नसते, हा निष्कर्ष दूर झाला; पण या वाक्यात **वा** असल्याने हा २४ ते २६ या कारिकांतील व्यवधान–अव्यवधान यांना विकल्प होतोच व मग 'ध्यवधान अव्यवधानात काव्यशोभा नसते,' असा अर्थ निघतोच. हेही बरोबर नाही, कारण व्यवधान–अव्यवधान हे उपाय आनंदवर्धनांनी काव्यशोभेसाठीच सांगितले आहेत. म्हणून अभिनवगुप्तांच्या या विवरणात एक अनिष्ट दूर झाले, तरी दुसरे शिल्लक राहतेच.

काशी आवृत्तीमध्ये **व्यवधानाव्यवधाने नापि लभ्येते** असे छापले आहे. त्याचे भाषांतर करिताना आम्ही **व्यवधानाव्यवधानेन अपि** असा पदच्छेद केला आहे व **लभ्येते** या ऐवजी **लभ्यते** अशी सुधारणा केली आहे. मूळ छापलेल्या वाक्यातील न गाळून व्यवधानाव्यवधाने **अपि (काव्यशोभाहेतुत्वेन) लभ्येंते** अशीही सुधारणा करणे शक्य आहे. काही झाले तरी ज्या स्वरूपात ते वाक्य छापले आहे, ते दुर्बोध आहे.

८) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'सहृदयाचे (रसिकाचे) अभिनवगुप्तांनी केलेले लक्षण'" "उद्‌द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" व द्वितीय खंड, "उद्‌द्योत -३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'".

९) वामन, काव्यालंकारसूत्रवृत्ति, ३, १, सूत्र १ व २. गुण व अलंकार यांच्यामधील भेद स्पष्ट करण्याचे काम प्रथम वामनानेच केले. आनंदवर्धनांनी उद्‌द्योत २, कारिका ६ मध्ये गुण व अलंकार यांमधील भेद गुण हे आत्म्याचे (रसाचे) धर्म व अलंकार हे (शब्दार्थरूप) शरीराचे (औपाधिक) धर्म असे म्हणून अधिक स्पष्ट केला.

१०) हाच श्लोक अभिनवगुप्तांनी पूर्वी लोचनात (द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ विवक्षितान्यपरवाच्याच्या 'अर्थशक्तुद्‌भव' प्रकाराच्या कविप्रौढोक्तिमात्रनिष्पत्र व स्वतःसंभवी या प्रकारच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे" पाहा) उद्‌धृत करून त्याचे निराळ्या संदर्भात विवरण केले आहे.

११) पाहा. शंकराचार्यांचे पुढील सुप्रसिद्ध वचन—**नलिनीदलगतजलमतितरलं तद्वज्जीवितमतिशयचपलम् ।**

१२) प्रियतमेचा कटाक्ष हा तिच्या रतीचा परिणाम या दृष्टीने 'अनुभाव' तर तोच प्रियकराच्या मनात रति जागृत करण्याचे कारण या दृष्टीने 'विभाव' होय.

१३) हा मधाच्या बोटाचा (किंवा **गुडजिह्विकेचा**) दृष्टांत भामह, काव्यालंकार ५—३ येथे व त्याही पूर्वी **सौन्दरनन्द**, १८—६३ येथे आला आहे. भामहाचे वचन पुढे द्वितीय खंड, ३३ व्या कारिकेवरील 'लोचना'त आले आहे, पण सौन्दरन्दामधील ओळी पुढीलप्रमाणे :—

यन्मोक्षात्कृतमन्यदत्र हि मया तत्काव्यधर्मात् कृतम् ।
पातुं तिक्तमिवौषधं मधुयुतं हृद्यं कथं स्यादिति ॥]

ध्वन्यालोकः

विज्ञायेत्थं रसादीनामविरोधविरोधयोः ।
विषयं सुकविः काव्यं कुर्वन् मुह्यति न क्वचित् ॥ ३१ ॥

इत्थमनेनानन्तरोक्तेन प्रकारेण रसादीनां रसभावतदाभासानां परस्परं विरोधस्याविरोधस्य च विषयं विज्ञाय सुकविः काव्यविषये प्रतिभातिशययुक्तः काव्यं कुर्वन् न क्वचिन्मुह्यति ।

एवं रसादिषु विरोधाविरोधनिरूपणस्योपयोगित्वं प्रतिपाद्य व्यञ्जकवाच्यवाचकनिरूपणस्यापि तद्विषयस्य तत्प्रतिपाद्यते—

वाच्यानां वाचकानां च यदौचित्येन योजनम् ।
रसादिविषयेणैतत्कर्म मुख्यं महाकवेः ॥ ३२ ॥

वाच्यानामितिवृत्तविशेषाणां वाचकानां च तद्विषयाणां रसादिविषयेणौचित्येन यद्योजनमेतन्महाकवेर्मुख्यं कर्म । अयमेव हि महाकवेर्भुख्यो व्यापारो यद्रसादीनेव मुख्यतया काव्यार्थीकृत्य तद्व्यक्त्यनुगुणत्वेन शब्दानामर्थानां चोपनिबन्धनम् ॥ ३२ ॥

ध्वन्यालोक

याप्रमाणे रसादींच्या अविरोधाचे आणि विरोधाचे विषय नीट जाणून घेतले, म्हणजे काव्य रचताना सत्कवि कधीही गोंधळून जात नाही. ॥ ३१ ॥

याप्रमाणे नुकत्याच सांगितलेल्या पद्धतीने रसादींचा म्हणजे रसभाव व त्यांचे आभास यांचा एकमेकांशी विरोध केव्हा असतो व केव्हा नसतो हा विषय उत्तम तऱ्हेने जाणून घेतल्यास काव्य रचण्याच्या बाबतीत विशेष प्रतिभासंपन्न असलेला कवि किंकर्तव्यतामूढ होत नाही.

याप्रमाणे रसादींच्या बाबतीतल्या विरोध व अविरोध यांच्या विवेचनाची उपयुक्तता सांगितल्यावर रसादींचे व्यंजक असलेल्या वाच्याथ व वाचकशब्द यांच्या विवेचनाचीही ती त्या बाबतीतली (उपयुक्तता पुढील कारिकेत) सांगितली जात आहे :—

'वाच्यार्थ व वाचकशब्दांची योजना रसादिविषयक औचित्याला अनुसरून करणे हे महाकवीचे मुख्य कर्तव्य होय' ॥ ३२ ॥

वाच्यार्थांची म्हणजे कथानकातील निरनिराळ्या प्रसंगांची व वाचकांची म्हणजे प्रसंगांना प्रकट करणाऱ्या शब्दांची रसादींच्या संबंधीचे औचित्य पाळून योजना करणे, हेच महाकवीचे मुख्य कार्य होय. कारण महाकवीचे मुख्य काम हेच की रसादींनाच काव्याचे मुख्य विषय करून ते अभिव्यक्त करण्यास अनुकूल असणाऱ्या शब्दांची व वाच्यार्थांची योजना करणे. ॥ ३२ ॥

लोचनम्

तदेतदुपसंहरन् अस्योक्तस्य प्रकरणस्य फलमाह — विज्ञायेत्थमिति ॥ ३१ ॥

रसादिषु रसादिविषये व्यञ्जकानि यानि वाच्यानि विभावादीनि वाचकानि च सुप्तिङादीनि तेषां यन्निरूपणं तस्येति । तद्विषयस्येति रसादिविषयस्य । तदिति उपयोगित्वम् । मुख्यमिति । 'आलोकार्थी' इत्यत्र यदुक्तं तदेवोपसंहृतम् । महाकवेरिति सिद्धवत्फलनिरूपणम् । एवं हि महाकवित्वं नान्यथेत्यर्थः । इतिवृत्तविशेषाणामिति । इतिवृत्तं हि प्रबन्धवाच्यं तस्य विशेषाः प्रागुक्ताः— 'विभावभावानुभावसञ्चार्यौचित्यचारुणः । विधिः कथाहारीरस्य' इत्यादिना । काव्यार्थीकृत्येति । अन्यथा लौकिकशास्त्रीयवाक्यार्थेभ्यः कः काव्यार्थस्य विशेषः? एतच्च निर्णीतमाद्योद्द्योते— 'काव्यस्यात्मा स एवार्थः' इत्यत्रान्तरे ॥ ३२ ॥

लोचन

तेव्हा आता या विषयाचा उपसंहार करण्याच्या इच्छेने आतापर्यंत विवेचिलेल्या प्रकरणाचा (म्हणजे रसांमधील विरोध व अविरोध यांच्या ज्ञानाचा) उपयोग काय, हे (कारिकाकार) 'याप्रमाणे रसादींच्या' इ. कारिकेने सांगतात. ॥ ३१ ॥

रसादिषु म्हणजे 'रसादींच्या बाबतीत.' व्यंजक असलेले वाच्य जे विभाव वगैरे आणि वाचक जे विभक्तिप्रत्यय, क्रियापदाचे प्रत्यय वगैरे, त्यांचे जे विवेचन, त्याची (उपयुक्तता), असा अर्थ. 'त्या बाबतीतल्या' म्हणजे रसादींच्या बाबतीतल्या (विवेचनाची). 'ती' म्हणजे उपयुक्तता. 'मुख्य (काम)'— 'दृश्य वस्तु दिसाव्यात अशी इच्छा असणारा' इ. कारिकेत[१] जे सांगितले होते, त्यांकडेच या (३२ व्या) कारिकेने पुन्हा लक्ष वेधले आहे.[२] 'महाकवीचे' असे म्हणण्यामध्ये महाकवित्व या साध्य फळाचा आधीच सिद्ध असलेल्या साधनासारखा[३] निर्देश केला आहे. कारण अशा रीतीने (म्हणजे वाच्य—वाचकांचा योग्य वापर केल्यानेच) महाकविपद प्राप्त होते, दुसऱ्या मार्गाने नव्हे, असा अर्थ.[४] 'कथानकातील निरनिराळ्या प्रसंगांची' — कारण कथानक हा प्रबंधाचा वाच्यार्थ असून त्याचे घटक पूर्वी 'कथेच्या शरीराची घडण किंवा जुळणी ही विभाव, स्थायिभाव, अनुभाव, संचारिभाव यांच्या औचित्याने नटलेली हवी' इ. वाक्याने (कारिका १० मध्ये) जे सांगितलेच आहेत, ते. 'काव्याचे (मुख्य) विषय करून'— नाहीतर लौकिक म्हणजे लोकांच्या दैनंदिन व्यवहारातील बोलण्याचे अर्थ व शास्त्रग्रंथांतील वाक्यांचे अर्थ यांच्याहून काव्यामधील वाक्यांच्या अर्थांचे वैशिष्ट्य ते काय राहिले? या मुद्द्याचा निर्णय आम्ही पहिल्या उद्द्योतातील 'तोच अर्थ काव्याचा आत्मा होय' या कारिकेच्या[५] विवरणाचे वेळी केला आहे. ॥ ३२ ॥

टीपा

१) उद्द्योत १, कारिका ९.

२) मुळात **उपसंहृतम्** असा शब्द आहे. पण १—९ या कारिकेचा ३—३२ मध्ये (म्हणजे इतक्या उशीरा) 'उपसंहार' केला आहे, असे म्हणणे योग्य वाटत नाही. म्हणून **उपसंहृतम्** याचे भाषांतर आम्ही (त्या दोन कारिकांमध्ये दूरान्वयाने का होईना पण विचारांचे साम्य असल्यामुळे) 'त्याकडे पुन्हा लक्ष वेधले आहे' असे केले आहे.

३) कारिकेत 'जो महाकवि असतो त्याने वाच्य व वाचक यांचा उपयोग रसविषयक औचित्याकडे लक्ष देऊन करावा.' असे म्हटले आहे. पण यामागील अभिप्राय 'वाच्यवाचकांचा योग्य उपयोग केल्यामुळे महाकवित्व हे

साध्य होय. पण कारिकेत 'महाकवित्वामुळे वाच्य–वाचकांचा योग्य उपयोग केला जातो' असे म्हटल्यासारखे झाले आहे.

४) तुलनार्थ पाहा, उद्‌द्योत १, कारिका ८ वी व तीवरील वृत्ति आणि लोचन.

५) पाहा, उद्‌द्योत १, कारिका ५ वी व तीवरील वृत्ति आणि लोचन.

ध्वन्यालोकः:

एतच्च रसादितात्पर्येण काव्यनिबन्धनं भरतादावपि सुप्रसिद्धमेवेति प्रतिपादयितुमाह—

रसाद्यनुगुणत्वेन व्यवहारोऽर्थशब्दयोः ।
औचित्यवान्यस्ता एता वृत्तयो द्विविधाः स्थिताः ॥ ३३ ॥

व्यवहारो हि वृत्तिरित्युच्यते । तत्र रसानुगुण औचित्यवान् वाच्याश्रयो यो व्यवहारस्ता एताः कैशिक्याद्या वृत्तयः । वाचकाश्रयाश्चोपनागरिकाद्याः । वृत्तयो हि रसादितात्पर्येण संनिवेशिताः कामपि नाट्यस्य काव्यस्य च च्छायामावहन्ति । रसादयो हि द्वयोरपि तयोर्जीवभूताः । इतिवृत्तादि तु शरीरभूतमेव ।

अत्र केचिदाहुः – 'गुणगुणिव्यवहारो रसादीनामित्तिवृत्तादिभिः सह युक्तः, न तु जीवशरीरव्यवहारः । रसादिमयं हि वाच्यं प्रतिभासते न तु रसादिभिः पृथग्भूतेमिति । अत्रोच्यते– यदि रसादिमयमेव वाच्यं यथा गौरत्वमयं शरीरम् । एवं सति यथा शरीरे प्रतिभासमाने नियमेनैव गौरत्वं प्रतिभासते सर्वस्य तथा वाच्येन सहैव रसादयोऽपि सहृदयस्यासहृदयस्य च प्रतिभासेरन् । न चैवम्; तथा चैतत्प्रतिपादितमेव प्रथमोद्द्योते ।

स्यान्मतम्; रत्नानामिव जात्यत्वं प्रतिपत्तृविशेषतः संवेद्यं वाच्यानां रसादिरूपत्वमिति । नैवम्; यतो यथा जात्यत्वेन प्रतिभासमाने रत्ने रत्नस्वरूपानतिरिक्तत्वमेव तस्य लक्ष्यते तथा रसादीनामपि विभावानुभावादिरूपवाच्याव्यतिरिक्तत्वमेव लक्ष्येत । न चैवम्; न हि विभावानुभावव्यभिचारिण एव रसा इति कस्यचिदवगमः । अत एवं च विभावादिप्रतीत्यविनाभाविनी रसादीनां प्रतीतिरिति तत्प्रतीत्योः कार्यकारणभावेन व्यवस्थानात्क्रमोऽवश्यंभावी । स तु लाघवान्न प्रकाश्यते इत्यलक्ष्यक्रमा एव सन्तो व्यङ्ग्या रसादयः इत्युक्तम् ।

ध्वन्यालोक

आणि रसादींची अभिव्यक्ति हे मुख्य उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून काव्य रचणे हे भरत वगैरेंच्या ग्रंथामध्येही सुप्रसिद्ध आहे असे सांगण्यासाठी (पुढील कारिकेत) म्हटले आहे की–

अर्थ आणि शब्द यांची योजना रसादिकांना अनुकूल, औचित्यसंपन्न अशी करणे याच दोन प्रकारच्या 'वृत्ति' होत ॥ ३३ ॥

कारण व्यवहाराला (म्हणजे शब्दार्थांच्या 'उपयोगाला') 'वृत्ति' म्हटले जाते. त्यांपैकी रसानुकूल, औचित्यसंपन्न अशी वाच्यार्थाची जी योजना, ती म्हणजेच ह्या कैशिकी वगैरे[१] वृत्ति होत. आणि (अशीच) वाचकशब्दांची योजना म्हणजे उपनागरिका वगैरे [१अ] (वृत्ति). खरोखर वृत्तींचा उपयोग जर रसादींना त्या उपकारक होण्यासाठी केला, तर त्यामुळे नाट्याला व काव्याला अवर्णनीय सौंदर्य प्राप्त होते. कारण रसादि हे त्या दोन्ही प्रकारच्या वृत्तींचे [१आ] प्राण होत. पण कथानक हे केवळ शरीरच होय.

या संबंधात काही जण म्हणतात—रसादींचा कथानकाशी गुण व गुणी (म्हणजे गुणांचा आश्रय असणारा) असा संबंध असणे योग्य आहे. जीव आणि शरीर असा संबंध नव्हे. कारण वाच्यार्थ हा रसादींनी व्याप्त असलेला दिसतो, पण रसादींहून वेगळा असलेला प्रत्ययास येत नाही. या बाबतीत आमचे म्हणणे असे—ज्याप्रमाणे शरीर हे गोरेपणाने व्यापलेले असते, तसे कथानक (किंवा वाच्यार्थ) रसादींनी व्यापलेले असते, असे तुमचे म्हणणे असल्यास ज्याप्रमाणे शरीर दिसले की गोरेपणाही हटकून सगळ्यांच्या दृष्टीस पडतो, त्याचप्रमाणे रसादिदेखील वाच्यार्थाबरोबरच सहृदय असणाऱ्यांच्या व नसणाऱ्यांच्याहि प्रत्ययास आले असते! पण असे होत नाही.[२] आणि ही गोष्ट अशीच आहे हे पहिल्या उद्द्योतात (पाहा, कारिका ७ वी) विशद केलेच आहे.

आता वरील पूर्वपक्ष्याच्या बाजूने असेही म्हणता येईल— ज्या प्रमाणे रत्नांचा जातिवंतपणा किंवा अस्सलपणा हा ज्यांना त्यांची पारख आहे अशांनाच कळतो, त्याप्रमाणेच रसादिमय असणे हा वाच्यार्थाचा धर्मदेखील त्याची पारख असणाऱ्यांनाच (म्हणजे सहृदयांनाच) कळू शकेल! यावर आमचे म्हणणे असे की, हे बरोबर नाही. कारण जे रत्न अस्सल किंवा जातिवंत म्हणून प्रत्ययास येते, त्याचा अस्सलपणा हा काही त्या रत्नाच्या स्वरूपाहून निराळा असल्याचे जाणवत नाही. तसेच रसादिसुद्धा विभाव, अनुभाव वगैरे वाच्यार्थाहून वेगळे नाहीत असाच प्रत्यय यावयास हवा! पण असा प्रत्यय तर येत नाही! कारण विभाव, अनुभाव आणि व्यभिचारिभाव म्हणजेच रस असा काही कोणाचा अनुभव नाही. आणि म्हणूनच रसादींची प्रतीति विभावादींच्या प्रतीतिशिवाय होऊ शकत नाही. यासाठीच त्या दोन प्रतीति एक कारण व दुसरे कार्य अशा संबंधाने निगडित असल्यामुळे त्या प्रतीतीमध्ये 'क्रम' (म्हणजे पौर्वापर्य) असणे अपरिहार्य आहे. तो क्रम, म्हणजे दोघांमधील पौर्वापर्य अत्यंत सूक्ष्म असल्याने लक्षात येत नाही. म्हणूनच 'व्यंग्य असलेले रसादि हे अलक्ष्यक्रम आहेत' असे (पूर्वी)[३] सांगितले.

लोचनम्

एतच्चेति । यदस्माभिरुक्तमित्यर्थः । भरतादावित्यादिग्रहणादलङ्कारशास्त्रेषु परुषाद्या वृत्तय इत्युक्तं भवति । द्वयोरपि तयोरिति । वृत्तिलक्षणयोर्व्यवहारयोरित्यर्थः । जीवभूता इति । 'वृत्तयः काव्यमातृकाः' इति ब्रुवाणेन मुनिना रसोचितेतिवृत्तसमाश्रयणोपदेशेन रसस्यैव जीवितत्वमुक्तम् । भामहादिभिश्च—

स्वादुकाव्यरसोन्मिश्रं वाक्यार्थमुपभुञ्जते ।
प्रथमालीढमधवः पिबन्ति कटु भेषजम् ॥

इत्यादिना रसोपयोगजीवितः शब्दवृत्तिलक्षणो व्यवहार उक्तः । शरीरभूतमिति । 'इतिवृत्तं हि नाट्यस्य शरीरम् 'इति मुनिः । नाट्यं च रस एवेत्युक्तं प्राक् ।

गुणगुणिव्यवहार इति । अत्यन्तसम्मिश्रतया प्रतिभासनाद्धर्मधर्मिव्यवहारो युक्तः । न त्विति । क्रमस्यासंवेदनादिति भावः । प्रथमेति । 'शब्दार्थशासनज्ञानमात्रेणैव न वेद्यते' इत्यदिना प्रतिपादितमदः ।

ननु यद्यस्य धर्मरूपं तत्तत्प्रतिभाने सर्वस्य नियमेन भातीत्यनैकान्तिकमेतत् । माणिक्यधर्मो हि जात्यत्वलक्षणो विशेषो न तत्प्रतिभासेऽपि सर्वस्य नियमेन भातीत्याशङ्कते– स्यादिति । एतत्परिहरति– नैवमिति । एतदुक्तं भवति–अत्यन्तोन्मग्नस्वभावत्वे सति तद्धर्मत्वादिति विशेषणमस्माभिः कृतम् । उन्मग्नरूपता च न रूपवज्ज्ञात्यत्वस्य, अत्यन्तलीनस्वभावत्वात् । रसादीनां चोन्मग्नतास्त्येवेत्येवं केचिदेतं ग्रन्थमनैषुः । अस्मद्गुरवस्त्वाहु :– अत्रोच्यत इत्यनेनेदमुच्यते– यदि रसादयो वाच्यानां धर्मास्तथा सति द्वौ पक्षौ रूपादिसदृशा वा स्युर्माणिक्यगतजात्यत्वसदृशा वा । न तावत्प्रथमः पक्षः, सर्वान् प्रति तथानवभासात् । नापि द्वितीयः, जात्यत्ववदनतिरिक्तत्वेनाप्रकाशात् । एष च हेतुराद्येऽपि पक्षे सङ्गच्छत एव । तदाह– स्यान्मतमित्यादिना न चैवमित्यन्तेन । एतदेव समर्थयति, न हीति । अत एव चेति । यतो न वाच्यधर्मत्वेन रसादीनां प्रतीतिः, यतश्च तत्प्रतीतौ वाच्यप्रतीतिः न सर्वथानुपयोगिनी तत एव हेतोः क्रमेणावश्यं भाव्यं, सहभूतयोरुपकारायोगात् । स तु सहृदयभावनाभ्यासान्न लक्ष्यते अन्यथा तु लक्ष्येतापीत्युक्तं प्राक् । यस्यापि प्रतीतिविशेषात्मैव रस इत्युक्तिः, प्राक्तस्यापि व्यपदेशिवत्त्वाद्रसादीनां प्रतीतिरित्येवमन्यत्र ।

लोचन

'आणि हे मुख्य उद्दिष्ट'— म्हणजे आम्ही (कारिका ३२ व तीवरील वृत्ति यांमध्ये) जे सांगितले ते, असा अर्थ. 'भारत वगैरेंच्या' यातील 'वगैरे' शब्दाने अलंकारशास्त्रात जेथे 'परुषा इ. वृत्तींचा विचार केलेला असतो, तेथे[४]' असा अर्थ प्रकट केला आहे. 'त्या दोहोंचाही' 'म्हणजे वृत्ति या स्वरूपाच्या दोन व्यवहारांचा' असा अर्थ. 'प्राण होत'– 'वृत्ति या काव्याच्या माता होत[५]' असे म्हणून भरतमुनींनी रसाला उचित असे कथानक निवडण्याचा उपदेश करून रस हेच वृत्तींचे जीवित होय असे सुचविले आहे आणि भामह वगैरेंनीही '(वाचक) गोड अशा काव्यरसांनी युक्त असलेल्या (काव्यातील) वाक्यांच्या अर्थाचा आवडीने आस्वाद घेतात. रोग्यांना प्रथय मधाचे बोट चाटविले म्हणजे ते कडू औषध पितात.[६]' इत्यादि कारिकेने रसांचा समावेश हेच शब्दवृत्तींची[७] योजना या स्वरूपाच्या 'व्यवहारा'चे जीवित होय असे सांगितले 'शरीरच'– 'इतिवृत्त हे नाट्याचे शरीर होय'[८] असे भरतांनी म्हटले आहे. आणि नाट्य म्हणजे रसच, हे पूर्वी[९] सांगितलेच आहे.

'गुण व गुणी असा संबंध'— (इतिवृत्त म्हणजे वाच्यार्थ व रस हे) एकमेकात अगदी मिसळून गेलेले भासत असल्यामुळे त्यांच्यामध्ये रस हा धर्म व इतिवृत्त (म्हणजे वाच्यार्थ) हा धर्मी असे मानणे योग्य होईल. 'पण रसादींहून वेगळा असलेला नाही'– कारण त्यांच्यामधील क्रमाची म्हणजे पौर्वापर्याची म्हणजे एक आधी व एक नंतर अशी प्रतीति येत नाही, असा अर्थ.[१०] पहिल्या उद्द्योतात'– 'कारण त्या प्रतीयमान अर्थाचे आकलन' इ. कारिकेमध्ये[११] व तीवरील वृत्तीमध्ये ही गोष्ट सांगितली आहे.

(शंका) 'पण काय हो, जो ज्या पदार्थाचा धर्म या स्वरूपाचा असतो, तो (धर्म) त्या पदार्थाचे ज्ञान झाले असता सर्वांच्या नियमाने प्रत्ययास येतो, हा काही सार्वत्रिक, निरपवाद नियम नव्हे. उदा. जातिवंतपणा किंवा अस्सलपणा हा माणिक या रत्नाचा धर्म असतो आणि तो (धर्म) माणिक दिसले तरी सर्वांनाच हटकून भासमान होतो असे नाही' अशी शंका 'आता वरील पूर्वक्ष्याच्या बाजूने' इ. शब्दांनी वृत्तिकार मांडतात व 'हे बरोबर नाही' इ. शब्दांनी तिचे निरसन करितात. वृत्तिकारांच्या उत्तराचा भावार्थ

असा— वर 'जो ज्या पदार्थाचा धर्म' इ. जी प्रतिज्ञा मांडली तिला 'ज्या धर्माचे स्वरूप पदार्थाच्या स्वरूपाहून अगदी वेगळे असून जो त्या पदार्थाचा धर्म असेल' अशी पुस्ती आम्ही जोडू इच्छितो.[१२] 'जातिवंतपणा किंवा अस्सलपणा या धर्माचे स्वरूप त्या रत्नाच्या स्वरूपाशी पूर्णपणे एकरूप झालेले असल्यामुळे (शरीराचे गोरेपण इ. धर्म जसे उठून दिसतात तसा) जातिवंतपणा हा धर्म उठून दिसत नाही. पण रस इ. मात्र ठळकपणे[१३] प्रत्ययास येतातच' असे काही टीकाकारांनी 'कारण जे रत्न' (वरील काही परिच्छेद ते येथपासून) 'पण असा प्रत्यय तर येत नाही!' येथपर्यंतच्या भागाचे विवरण केले आहे. पण आमच्या गुरूंचे[१४] सांगणे मात्र असे आहे— 'या बाबतीत आमचे म्हणणे असे' इ. (द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रसपरिपोष करावयाचा, तर त्यासंबंधीचे औचित्य पाळणे हे कवीचे मुख्य कर्तव्य होय.'" वरील) वाक्याच्या द्वारे वृत्तिकारांना असे म्हणावयाचे आहे— जर रसादि हे वाच्यार्थाचे धर्म असतील, तर तसे असल्यास दोन पर्याय संभवतात—

१) ते रसादि, शरीराच्या रूप वगैरे धर्माप्रमाणे तरी असतील किंवा २) माणकाच्या ठिकाणच्या अस्सलपणा या धर्माप्रमाणे तरी असतील. यांपैकी पहिला पर्याय तर संभवत नाही. कारण ते रसादि हे (शरीराच्या गोरेपणा वगैरेसारखे) सर्वांच्या अनुभवास येणारे नाहीत (तर केवळ सहृदयांच्याच ध्यानात येणारे आहेत) आणि दुसरा (म्हणजे रसादि हे रत्नाच्या जातिवंतपणा सारखे अनुन्मग्न धर्म आहेत हा) पक्षही बरोबर नाही, कारण रसादि हे जातिवंतपणा वगैरेंसारखे वाच्यार्थाशी एकरूप झालेल्या स्वरूपातही आढळून येत नाहीत.[१५] हा युक्तिवाद पहिल्या पक्षाच्या खंडनाच्या कामीही उपकारकच आहे.[१६] हेच वृत्तिकार 'आता वरील पूर्वपक्ष्याच्या' येथपासून 'पण असा प्रत्यय तर येत नाही!' येथपर्यंतच्या शब्दांनी सांगतात, आणि त्याचेच समर्थन 'कारण विभाव, अनुभाव,' इ. वाक्याने करितात. आणि म्हणूनच— रसादिकांची प्रतीति ही काही ते वाच्यार्थांचे धर्म आहेत अशा प्रकारे येत नाही,[१७] म्हणून आणि रसादींच्या प्रतीतीला वाच्यार्थाची प्रतीति सर्वस्वी निरूपयोगी असते असे नाही (तर उलट उपयोगीच असते) या कारणामुळे वाच्यार्थ व रसादि यांच्या प्रतीतींमध्ये क्रम (म्हणजे पौर्वापर्य) हा असलाच पाहिजे कारण जे एकाच वेळी उदित होतात, त्यांच्या पैकी एक दुसऱ्यावर उपकार करितो असे म्हणता येत नाही.[१८] मात्र तो क्रम म्हणजे ते पौर्वापर्य) सहृदयांना (वाच्यार्थापासून) होणाऱ्या रसादि प्रतीतीचा वारंवार सराव झालेला असतो, म्हणून त्यांच्या लक्षात येत नाही. तसा सराव ज्यांना नसेल, त्यांच्या बाबतीत तो क्रम लक्षात येऊही शकेल, असे पूर्वी[१९] सांगितलेच आहे. आणि ज्याचे म्हणणे 'रस हा विशिष्ट प्रकारची प्रतीति याच स्वरूपाचा असतो,' असे आहे, त्याच्याही बाबतीत 'रसादींची प्रतीति' हा शब्दप्रयोग व्यपदेशिवद्‌भावाचा[२०] अवलंब केल्यास होऊ शकतो हे आम्ही पूर्वीच[२१] इतरत्र (म्हटले आहे[२२]).

टीपा

१) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रसभावयुक्त काव्यप्रकारात रसभावांना विरोधी असल्यामुळे टाळावयाच्या गोष्टी कोणकोणत्या, याचे विवरण'" वरील टीप दुसरी.

१अ) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" वरील ७ ते ९ या टीपा.

१आ) वरील भाषांतर आम्ही अभिनवगुप्तांस अनुसरून केले आहे, पण त्यात **द्वयोरपि तयोः** या शब्दांचा संबंध नाट्य व काव्य यांचेकडेही घेणे शक्य आहे. कोठल्याही प्रकारे अन्वय केला, तरी चालण्यासारखे आहे, कारण वृत्तींचा काव्य व नाट्य या दोहींशी अत्यंत निकटचा संबंध आहे.

२) म्हणजे केवळ सहृदयांच्याच ध्यानात येतात, असहृदयांच्या ध्यानात येत नाहीत. आणि म्हणूनच रसादि व वाच्यार्थ यांमध्ये गुण व गुणी असा संबंध असणे शक्य नाही.

३) ध्वन्यालोक, उद्‌द्योत दुसरा, कारिका ३ री.

४) अलंकारशास्त्रविषयक प्राचीन ग्रंथांत 'परुषा' वगैरे वृत्तींचे विवेचन उद्भट व रुद्रट यांच्याच ग्रंथात केलेले आढळते. या वृत्तींची माहिती प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" यांवर टीपा ७ ते ९ यांमध्ये दिलीच आहे.

५) **वृत्तयः काव्यमातृकाः** असा पाठ नाट्यशास्त्रात आढळत नाही. नाट्यशास्त्राच्या बडोदा संस्करणांमध्ये अध्याय २०, ७२ येथे **एवमेता बुधैर्ज्ञेया वृत्तयो नाट्यसंश्रयाः** । अशी ओळ आहे व खाली **काव्यमातरः** असे पाठांतर नमूद केलेले आढळते.

६) अभिनवगुप्तांनी ही कारिका उद्‌धृत करिताना **वाक्यार्थमुपभुञ्जते** असे म्हटले आहे. पण भामह काव्यालंकार, ५, ३ येथे **शास्त्रम् अपि उपयुञ्जते** असा पाठ आहे व तो अधिक चांगला आहे.

७) येथे **शब्दवृत्तिलक्षणः** याऐवजी **शब्दार्थवृत्तिलक्षणः** असे म्हणणे योग्य झाले असते. कारण भामहाच्या वचनाचा रोख केवळ शब्दवृत्तींकडे नसून कैशिकी इ. अर्थवृत्तींकडेही आहे.

८) नाट्यशास्त्र, १९, १. मात्र १४, २ मध्ये **वाचि यत्नस्तु कर्तव्यो नाट्यस्यैषा तनुः स्मृता ।** असे म्हटले आहे. पण या दोन विधानांमध्ये विरोध नाही असे अभिनवगुप्त म्हणतात, कारण इतिवृत्त हे भाषेच्याच द्वारे वाचकांपुढे मांडावयाचे असते.

९) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वरील भट्टतौतांचे **प्रीत्यात्मा च रसः, तदेव नाट्यम् ।** हे वचन.

१०) या अर्थाचा संबंध **वृत्तीतील न तु रसादिभिः पृथग्‌भूतम् ।** याच्याशी आहे, प्रारंभीच्या **न तु जीवशरीरव्यवहारः** याच्याशी नाही.

११) पाहा, १–७ व तीवरील वृत्ति, प्रथमखण्ड, "उद्‌द्योत – १ 'प्रतीयमान अर्थाचे अस्तित्व सिद्ध करणारे आणखी एक कारण'".

१२) म्हणजे पदार्थांचा जो धर्म वरवर पाहतासुद्धा ध्यानात येणारा असतो, त्याचेच ज्ञान पदार्थाच्या ज्ञानाबरोबर होते; पण ज्या धर्माचे स्वरूप त्या पदार्थाच्या स्वरूपाशी सर्वथैव मिळून गेलेले असते, तो धर्म त्या पदार्थाच्या ज्ञानाबरोबर वेगळेपणाने प्रत्ययास येत नाही.

१३) लोचनाच्या सर्व प्रतीत **उन्मग्नता** असा पाठ असल्याने 'वेगळेपणाने उठून दिसणारे' असे भाषांतर आम्ही केले आहे. पण हा पाठ स्वीकारल्यास टीकाकार आनंदवर्धनांच्या मताशी विसंगत असे विधान

करितात, असे होईल. कारण 'रसादि हे सहृदयांनाच प्रतीत होतात, सर्वांना होत नाहीत' असे आनंदवर्धनांचे मत आहे. म्हणून येथे **उन्मग्नता** याऐवजी **अनुन्मग्नता** अशी सुधारणा करणे अधिक योग्य होईल. मग त्यावरही अभिनवगुप्तांच्या गुरूंचे उत्तर असे की, रसादि हे अनुन्मग्न आहेत, पण 'धर्म' नाहीत.

१४) हे गुरु म्हणजे भट्ट इंदुराज की अन्य कोणी हे सांगणे कठीण आहे.

१५) म्हणजे रसादींची प्रतीति ही वाच्यार्थाच्या प्रतीतीहून वेगळी आहे.

१६) कारण शरीराच्या ठिकाणचे गोरेपण हे ठळकपणाने दिसणारे असले, तरी ते शरीराहून स्वतन्त्र असल्याचे प्रत्ययास येत नाही. पण रसादींची प्रतीति ही वाच्यार्थाच्या प्रतीतीहून स्वतंत्र असल्याचे प्रत्ययास येते.

१७) आतापर्यंतच्या एकंदर विवेचनाचा सारांश असा :— गौरत्व हा शरीराचा उन्मग्न धर्म आहे, आणि जातिवंतपणा हा रत्नांचा अनुन्मग्न धर्म आहे. पण रसादि हा वाच्यार्थाचा धर्मच नाही. म्हणून तो गौरत्वाप्रमाणेही नाही किंवा जातिवंतपणाप्रमाणेही नाही. उलट, रसादि हा धर्मी आहे व वाच्यार्थ हाच त्याचा 'धर्म' आहे. शरीर हा आत्म्याचा उपाधिस्वरूपी धर्म असतो, तसाच.

१८) एकाच वेळी उदित होणाऱ्या दोहोंच्या बाबतीत गायीची दोन शिंगे हा दृष्टांत दिला जातो. ती दोन्ही एकाच वेळी उगवतात, म्हणून एक दुसऱ्यावर उपकार करिते असे म्हणता येत नाही. हाच सिद्धान्त पुढे द्वितीय खंड, उद्द्योत – ३ वर उपकारिणो हि (उपकार्यापेक्षया) पूर्वभाविता या शब्दांनी सांगितला आहे.

१९) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'वाच्यार्थ हे व्यंग्यार्थप्रकटीकरणाचे साधन'" वरील 'जो अत्यन्त संवेदनाशील नाही, इ. वाक्ये.

२०) **व्यपदेशिवद्भाव** हा शब्दप्रयोग पूर्वी द्वितीय खंड "उद्द्योत – ३ 'वरीलपैकी कोणताही पक्ष स्वीकारला, तरी संघटनेचे नियमन करणारे कारण वक्ता आणि त्याच्या बोलण्याच्या वाच्यार्थाचे औचित्य, हे होय,'" वर लोचनात आला आहे. त्या शब्दाच्या स्पष्टीकरणार्थ द्वितीय खंड, "उद्द्योत – १ 'वरीलपैकी कोणताही पक्ष स्वीकारला, तरी संघटनेचे नियमन करणारे कारण वक्ता आणि त्याच्या बोलण्याच्या वाच्यार्थाचे औचित्य, हे होय,'"वरील टीप ८ वी पाहा.

२१) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'रसप्रक्रियेविषयी इतर काही मते (टीपा ३६ ते ४४)'" वरील टीपा ५३ व ५४. "उद्द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वर **व्यपदेशिवद्भाव**' हा शब्द प्रत्यक्ष वापरला नसला, तरी **व्यपदेशिवद्भावाला** अनुसरूनच तेथे विवरण केले आहे. प्रथम खंड "उद्द्योत – २ 'रसप्रक्रियेविषयी इतर काही मते (टीपा ३६ ते ४४)'"वरील टीप ५३ हीही पाहा.

२२) 'म्हटले आहे' या अर्थाचा **उक्तम्** यासारखा शब्द मूळ लोचनात वापरलेला नाही, पण तो अध्याहृत घेतल्याशिवाय **प्राक्** या शब्दाची संगति लागत नाही

ध्वन्यालोकः

ननु शब्द एव प्रकरणाद्यवच्छिन्नो वाच्यव्यङ्ग्ययोः सममेव प्रतीतिमुपजनयतीति किं तत्र क्रमकल्पनया । न हि शब्दस्य वाच्यप्रतीतिपरामर्श एव व्यञ्जकत्वे निबन्धनम् । तथा हि गीतादिशब्देभ्योऽपि रसाभिव्यक्तिरस्ति । न च तेषामन्तरा वाच्यपरामर्शः । अत्रापि ब्रूमःप्रकरणाद्यवच्छेदेन व्यञ्जकत्वं शब्दानामित्यनुमतमेवैतदस्माकम् । किं तु तद्व्यञ्जकत्वं तेषां कदाचित्स्वरूपविशेषनिबन्धनं कदाचिद्वाचकशक्तिनिबन्धनम् । तत्र येषां वाचकशक्तिनिबन्धनं, तेषां यदि वाच्यप्रतीतिमन्तरेणैव स्वरूपप्रतीत्या निष्पत्रं तद्भवेन्न तर्हि वाचकशक्तिनिबन्धनम् । अथ तन्निबन्धनं, तन्नियमेनैव वाच्यवाचकभावप्रतीत्युत्तरकालत्वं । व्यङ्ग्यप्रतीतेः प्राप्तमेव ।

स तु क्रमो यदि लाघवान्न लक्ष्यते तत्किं क्रियते । यदि च वाच्यप्रतीतिमन्तरेणैव प्रकरणाद्यवच्छिन्नशब्दमात्रसाध्या रसादिप्रतीतिः स्यात्तदनवधारितप्रकरणानां वाच्यवाचकभावे च स्वयमव्युत्पन्नानां प्रतिपत्तृणां काव्यमात्रश्रवणादेवासौ भवेत् । सहभावे च वाच्यप्रतीतेरनुपयोगः, उपयोगे वा न सहभावः । येषामपि स्वरूपाविशेषप्रतीतिनिमित्तं व्यञ्जकत्वं यथा गीतादिशब्दानां, तेषामपि स्वरूपप्रतीतेर्व्यङ्ग्यप्रतीतेश्च नियमभावी क्रमः । तत्तु शब्दस्य क्रियापौर्वापर्यमनन्यसाध्यतत्फलघटनास्वाशुभाविनीषु वाच्येनाविरोधिन्यभिधेयान्तरविलक्षणे रसादौ न प्रतीयते ।

ध्वन्यालोक

'पण काय हो, शब्दच संदर्भ वगैरेंच्या साहाय्याने वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांचा बोध एकदमच करून देतो असे असल्यामुळे त्या दोहोंमध्ये पौर्वापर्य असते अशी कल्पना करण्याची काय आवश्यकता आहे? कारण शब्दाच्या वाच्यार्थाचे ज्ञान विचारात घेणे हेच काही तो शब्द व्यञ्जक असावयाचे कारण असते असे नाही. कारण गाणे इत्यादींच्या शब्दांपासून म्हणजे सुरांपासूनही रसप्रतीति होतेच की! आणि ते सूर ऐकणे व रसप्रतीति होणे यांमध्ये काही वाच्यार्थाच्या विचाराचा प्रश्नच उपस्थित होत नाही!'

याही बाबतीत आमचे म्हणणे असे—शब्दांच्या ठिकाणी जे व्यंजकत्व येते, ते संदर्भ वगैरेच्या मदतीने येते हे आम्हाला मान्यच आहे. पण त्यांचे ते व्यंजकत्व काही वेळा त्या शब्दांच्या विशिष्ट (म्हणजे नादमय) स्वरूपावर अवलंबून असते, तर काही वेळा ते त्यांच्या ठिकाणच्या अभिधाशक्तीवर (म्हणजे वाच्यार्थाचा बोध करून देण्याच्या शक्तीवर) अवलंबून असते. त्यांपैकी ज्यांचे व्यञ्जकत्व अभिधाशक्तीवर अवलंबून असते, त्यांच्या बाबतीत ते व्यञ्जकत्व जर वाच्यार्थाच्या ज्ञानाशिवायच केवळ त्यांच्या (नादमय) स्वरूपाच्या ज्ञानामुळे त्या शब्दांच्या ठिकाणी येत असेल, तर त्या ठिकाणी ते व्यंजकत्व अभिधाशक्तीवर अवलंबून नाही (असे म्हणता येईल.) पण जर ते व्यंञ्जकत्व त्या (शब्दांच्या ठिकाणी असणाऱ्या वाच्यार्थ प्रकट करण्याच्या) शक्तीवर अवलंबून असेल, तर वाच्यवाचकसंबंधाच्या ज्ञानानंतर निरपवादपणे व्यंग्यार्थाचे ज्ञान होते हे मान्य करणे अटळ आहे. मात्र रसभावादि व्यंग्य अर्थाची प्रतीति ही वाच्यार्थाच्या प्रतीतीनंतर फार लवकर होत असल्याने त्यांमधला क्रम म्हणजे पौर्वापर्य लक्षात येत नाही, याला कोण काय करणार? आणि जर रस, भाव वगैरेंची प्रतीत वाच्यार्थांच्या प्रतीतीवाचूनच, केवळ संदर्भाची मदत असलेल्या शब्दावरूनच होत असती, तर वाच्यार्थ व वाचकशब्द यांच्या संबंधाची ज्यांना माहिती झालेली नाही अशा श्रोत्यांना संदर्भ स्वतःला माहीत नसला तरी[1] दुसऱ्याने सांगितल्यामुळे लक्षात आल्यावर काव्य केवळ ऐकल्याबरोबर

रसादींची प्रतीति आली असती. वाच्यार्थप्रतीति व रसादिप्रतीति या जर एकाच वेळी होत असतील, तर वाच्यार्थाच्या प्रतीतीचा (रसादिप्रतीतीला काहीही) उपयोग नाही, आणि उपयोग असला तर त्या दोन प्रतीति एकदम येऊ शकणार नाहीत.[१अ] आणि गाण्यामधील स्वररूपी शब्दांच्या व्यंजकत्वाप्रमाणे ज्या शब्दांचे व्यंजकत्व त्यांच्या विशिष्ट (नादमय) स्वरूपाचे ज्ञान होण्यावर (म्हणजे ते सूर केवळ कानी पडण्यावर) अवलंबून असते, त्याही शब्दांच्या बाबतीत त्यांच्या स्वरूपाचे ज्ञान आणि (रसभावादि) व्यंग्यार्थाची प्रतीती यांमध्ये क्रम (म्हणजे पौर्वापर्य) अनिवार्यपणे असतोच. मात्र शब्दांमधील वाच्यार्थाचा बोध करून देण्याची क्रिया आणि व्यंग्यार्थाचा बोध करून देण्याची क्रिया यांमधील पौर्वापर्य वाच्यार्थाशी विरुद्ध नसलेल्या पण कोणत्याही वाच्यार्थापेक्षा आगळ्या असणाऱ्या रसादींच्या बाबतीत (ते वाच्यार्थाशी विरुद्ध नसल्यामुळे) ध्यानात येत नाही. याचे कारण त्या काव्यातल्या घटना[२] हे होय. त्या घटनांचे साध्य रसप्रतीती वाचून दुसरे कोणतेही नसते, तर निश्चितपणे रसप्रतीति हेच असते. म्हणून आणि त्या घटना आपले रसप्रतीति घडवण्याचे कार्य फारच लवकर करितात, म्हणूनही तो क्रम लक्षात येत नाही.

लोचनम्

ननु भवन्तु वाच्यादतिरिक्ता रसादयस्तत्रापि क्रमो न लक्ष्यत इति तावत्त्वयैवोक्तम् । तत्कल्पने च प्रमाणं नास्ति । अन्वयव्यतिरेकाभ्यामर्थप्रतीतिमन्तरेण रसप्रतीत्युदयस्य पदविरहितस्वरालापगीतादौ शब्दमात्रोपयोगकृतस्य दर्शनात् । ततश्चैकयैव सामग्र्या सहैव वाच्यं व्यङ्ग्याभिमतं च रसादि भातीति वचनव्यञ्जनव्यापारद्वयेन न किञ्चिदिति । तदाह । नन्विति । यत्रापि गीतशब्दानामर्थोऽस्ति तत्रापि तत्प्रतीतिरनुपयोगिनी ग्रामरागानुसारेणापहस्तितवाच्यानुसारतया रसोदयदर्शनात् । न चापि सा सर्वत्र भवन्ती दृश्यते । तदेतदाह – न चेति । तेषामिति गीतादिशब्दानाम् । आदिशब्देन वाद्यविलपितशब्दादयो निर्दिष्टाः । अनुमतमिति । 'यत्रार्थः शब्दो वा' इति ह्यवोचामेति भावः । न तर्हीति । ततश्च गीतवदेवार्थावगमं विनैव रसावभासः स्यात्काव्यशब्देभ्यः । न चैवम् । इति वाचकशक्तिरपि तत्रापेक्षणीया; सा च वाच्यनिष्ठैवेति प्राग्वाच्ये प्रतिपत्तिरित्युपगन्तव्यम् । तदाह-अथेति । तदिति वाचकशक्तिः । वाच्यवाचकभावेति । सैव वाचकशक्तिरित्युच्यते ।

एतदुक्तं भवति । मा भूद्वाच्यं रसादिव्यञ्जकम्; अस्तु शब्दादेव तत्प्रतीतिस्तथापि तेन स्ववाचकशक्तिस्तस्यां कर्तव्यायां सहकारितयावश्यापेक्षणीयेत्यायातं वाच्यप्रतीतेः पूर्वभावित्वमिति । ननु गीतशब्दवदेव वाचकशक्तिरत्राप्यनुपयोगिनी । यत्तु क्वचिच्छ्रुतेऽपि काव्ये रसप्रतीतिर्न भवति तत्रोचितः प्रकरणावगमादिः सहकारी नास्तीत्याशङ्क्याहयदि चेति । प्रकरणावगमो हि क उच्यते? किं वाक्यान्तरसहायत्वम्? अथ वाक्यान्तराणां सम्बन्धि वाच्यम् । उभयपरिज्ञानेऽपि न भवति प्रकृतवाक्यार्थावेदने रसोदयः । स्वयमिति । प्रकरणमात्रमेव परेण केनचिद्येषां व्याख्यातमिति भावः । न चान्वयव्यतिरेकवतीं वाच्यप्रतीतिमपह्नुत्यादृष्टसद्भावाभावौ शरणत्वेनाश्रितौ मात्सर्यादधिकं किञ्चित्पुष्णीत इत्यभिप्रायः ।

नन्वस्तु वाच्यप्रतीतेरुपयोगः, क्रमाश्रयेण किं प्रयोजनम्? सहभावमात्रमेव ह्युपयोग एकसामग्र्यधीनता लक्षणमित्याशङ्क्याह– सहेति । एवं ह्युपयोग इति अनुपकारके सञ्ज्ञाकरणमात्रं वस्तुशून्यं स्यादिति भावः । उपकारिणो हि पूर्वभावितेति त्वयाप्यङ्गीकृतमित्याह– येषामिति । त्वद्दृष्टान्तेनैव वयं वाच्यप्रतीतेरपि पूर्वभावितां समर्थयिष्याम इति भावः । ननु संश्चेत्क्रमः किं न लक्ष्यत इत्याशङ्क्याह–तत्त्विति । क्रिया पौर्वापर्यमित्यनेन क्रमस्य स्वरूपमाह– क्रियेते इति क्रिये,

वाच्यव्यङ्ग्यप्रतीती । यदि वाभिधाव्यापारो व्यञ्जनापरपर्यायो ध्वननव्यापारश्चेति क्रिये, तयोः पौर्वापर्यं न प्रतीयते । क्रेत्याह– रसादौ विषये । कीदृशि । अभिधेयान्तरात्तदभिधेयविशेषाद्विलक्षणे सर्वथैवानभिधेये । अनेन भवितव्यं तावत्क्रमेणेत्युक्तम् । तथा वाच्येनाविरोधिनि, विरोधिनि तु लक्ष्यत एवेत्यर्थः । कुतो न लक्ष्यते इति निमित्तसप्तमीनिर्दिष्टं हेत्वन्तरगर्भं हेतुमाह – आशुभाविनीष्विति । अनन्यसाध्यतत्फलघटनासु, घटनाः पूर्वं माधुर्यादिलक्षणाः प्रतिपादिता गुणनिरूपणावसरे ताश्च तत्फलाः रसादिप्रतीतिः फलं यासाम्, तथा अनन्यत्तदेव साध्यं यासाम्, न ह्योजोघटनायाः करुणादिप्रतीतिः साध्या ।

एतदुक्तं भवति–यतो गुणवति काव्येऽसंकीर्णविषयतया सङ्घटना प्रयुक्ता ततः क्रमो न लक्ष्यते । ननु भवत्वेवं सङ्घटनानां स्थितिः क्रमस्तु किं न लक्ष्यते? अत आह–आशुभाविनीषु । वाच्यप्रतीतिकालप्रतीक्षणेन विनैव झटित्येव ता रसादीन् भावयन्ति तदास्वादं विदधतीत्यर्थः । एतदुक्तं भवति–सङ्घटना व्यङ्ग्यत्वाद्रसादीनामनुपयुक्तेऽप्यर्थविज्ञाने पूर्वमेवोचितसङ्घटनाश्रवण एव यत आसूत्रितो रसास्वादस्तेन वाच्यप्रतीत्युत्तरकालभवेन परिस्फुटास्वादयुक्तोऽपि पश्चादुत्पत्रत्वेन न भाति । अभ्यस्ते हि विषयेऽविनाभावप्रतीतिक्रम इत्थमेव न लक्ष्यते । अभ्यासो ह्ययमेव यत्प्रणिधानादिनापि विनैव, संस्कारस्य बलवत्त्वात्सदैव प्रबुभुत्सुतया अवस्थापनम् । इत्येवं यत्र धूमस्तत्राग्निरिति हृदयस्थितत्वाद्व्याप्तेः पक्षधर्मज्ञानमात्रमेवोपयोगि भवतीति परामर्शस्थानमाक्रामति, झटित्युत्पन्ने हि धूमज्ञाने तद्व्याप्तिस्मृत्युपकृते तद्विजातीयप्रणिधानानुसरणादिप्रतीत्यन्तरानुप्रवेशविरहादाशुभाविन्यामग्निप्रतीतौ क्रमो न लक्ष्यते, तद्वदिहापि । यदि तु वाच्याविरोधी रसो न स्यादुचिता च घटना न भवेत्तेल्लक्ष्येतैव क्रम इति ।

चन्द्रिकाकारस्तु पठितमनुपठतीति न्यायेन गजनिमीलिकया व्याचचक्षे–तस्य शब्दस्य फलं तद्वा फलं वाच्यव्यङ्ग्यप्रतीत्यात्मकं तस्य; घटना निष्पादना यतोऽनन्यसाध्या शब्दव्यापारैकजन्येति । न चात्रार्थसतत्त्वं व्याख्याने किञ्चिदुत्पश्याम इत्यलं पूर्ववंश्यैः सह विवादेन बहुना ।

लोचन

(शंका–) "पण काय हो, रसादि हे वाच्यार्थाहून निराळे असेनात का! पण त्यांच्याही बाबतीत क्रम म्हणजे पौर्वापर्य लक्षात येत नाही हे जे तुम्ही म्हटले, ते सिद्ध करावयास काहीही प्रमाण नाही. कारण वाच्यार्थाचा बोध न होताही अन्वय आणि व्यतिरेक[३] यांच्या आधारे रसाची प्रतीति होते असे काही ठिकाणी दिसून येते. उदा. ज्यात पदे (म्हणजे सार्थ शब्द) नसतात अशाही ठिकाणी म्हणजे स्वर, आलाप इत्यादींचे गायन वगैरेंमध्ये ती रसादींची प्रतीति केवळ स्वनरूपी आलापांमुळेही होताना आढळते. असे असल्यामुळे (प्रकरण, वक्त्याचे वैशिष्टय इ.[४]) सामग्री एकच असून तीमुळे वाच्यार्थ व तुम्ही व्यंग्य म्हणून मानलेले रसादि यांची प्रतीति एकाच वेळी येते, म्हणून अभिधा व व्यंजना असे दोन वेगळे व्यापार मानण्याला[५] काही आधार दिसत नाही" ही शंका वृत्तिकार वृत्तीतल्या 'पण काय हो, शब्दच संदर्भ वगैरेंच्या साहाय्याने' इ. शब्दांनी मांडतात. आणि ज्या काही गीत वगैरेंमधील शब्दांनाही अर्थ असतो, तेथेही त्या अर्थाचे ज्ञान रसादिप्रतीतीला काहीही उपयोगाचे नसते, कारण, तेथे वाच्यार्थाची प्रतीति बाजूला सारली जाते व गाण्यातील ग्राम,[६] राग इत्यादींना अनुसरल्यामुळे रसादींची प्रतीति होते, असे आढळून येते. आणि ती वाच्यार्थाची प्रतीति सगळ्याच गाण्यांच्या बाबतीत आणि सर्वच श्रोत्यांना होते असेही दिसत नाही. हेच वृत्तिकार 'आणि ते सूर ऐकणे' इ. शब्दांनी सांगतात. ते (सूर) म्हणजे गाणे इत्यादींमधील सूर.[७] 'इत्यादि' या शब्दाने वृत्तिकारांनी वाद्यांचे सूर, विलापांचे स्वर,[८] वगैरेंचा निर्देश केला आहे. 'हे आम्हाला मान्य'–

कारण आम्ही पहिल्या उद्द्योतात 'ज्या ठिकाणी वाच्य अर्थ स्वतःकडे व शब्द' इ. म्हटलेच आहे.[९] 'तर त्या ठिकाणी ते व्यंजकत्व'– आणि म्हणून (पदविरहित) गाण्यातल्या प्रमाणेच काव्यातील शब्दांपासूनही वाच्य अर्थाच्या ज्ञानाशिवायच रसादिकांची प्रतीति झाली असती. पण असे तर होताना दिसत नाही, म्हणून काव्याच्या बाबतीत अभिधाशक्तीचीही आवश्यकता असते आणि ती अभिधाशक्ति वाच्यार्थाच्या बोधात पर्यवसान होणारी असते, म्हणून काव्यात रसादिकांची प्रतीति होण्याच्या आधी वाच्यार्थाची प्रतीति होते असे मान्य केले पाहिजे. तेच वृत्तिकार 'पण जर ते व्यंजकत्व' इ. शब्दांनी सांगतात. 'त्या शक्तीवर अवलंबून,' यातील 'ती शक्ति' म्हणजे वाचकशक्ति (म्हणजे अभिधा). 'वाच्यवाचकसंबंधाच्या–' त्या संबंधालाच वाचकशक्ति म्हणण्यात येते.

वृत्तिकारांच्या या सर्व विवेचनाचा आशय असा– वाच्यार्थ हा रसाची अभिव्यक्ति करणारा नसेना का? शब्दापासूनच रसाची प्रतीति होते असेही घटकाभर मानू या. पण तरीही तो शब्द जेव्हा रसाची प्रतीति करून देतो, तेव्हा त्यालाही आपल्या अभिधाशक्तीची सहकारिणी म्हणून[१०] गरज भासतेच. आणि त्यामुळे वाच्यार्थाची प्रतीति रसाच्या प्रतीतीच्या आधी होते हे ओघाने आलेच. पण काय हो, गाण्यातील शब्दांच्या वाच्यार्थाच्या प्रतीतीप्रमाणे[११] काव्यातील शब्दांच्या वाच्यार्थाची प्रतीति हीदेखील रसादींच्या प्रतीतीला निरुपयोगी असते. आता काही वेळा काव्य ऐकले तरी रसादींची प्रतीति होत नाही असे घडते, त्याला कारण तेथे योग्य संदर्भाचे ज्ञान वगैरे योग्य सहकारी कारणे नसतात हेच होय,'[१२] अशी शंका कल्पून वृत्तिकार तिला 'आणि जर रसादींची प्रतीति' इ. शब्दांनी उत्तर देतात. कारण संदर्भाचे ज्ञान याचा अर्थ तरी तुम्ही काय करिता? दुसऱ्या (म्हणजे प्रस्तुत वावयाच्या जवळपासच्या) वाक्यांच्या केवळ आवाजांचे ग्रहण किंवा आसपासच्या इतर वाक्यांच्या वाच्यार्थाचे ज्ञान? जरी त्या दोहोचेही ज्ञान झाले, तरीसुद्धा प्रस्तुत म्हणजे काव्यातील वाक्यांचा वाच्यार्थ कळल्याशिवाय रसाची प्रतीति होत नाही. 'स्वतःला माहीत नसला,' म्हणजे ज्यांना दुसऱ्या कोणीतरी (स्थूल मानाने) केवळ संदर्भच[१३] सांगितला असेल, असा अर्थ.

आणि वाच्यार्थापासून अन्वय व व्यतिरेक यांनी रसादींची प्रतीति सिद्ध होत असतानासुद्धा ती बळेच दडवून ठेवून रसादींची प्रतीति होणे किंवा न होणे याचे आजपर्यंत कोणीही न सांगितलेले कारण संदर्भ वगैरेच्या ज्ञानाचे[१४] अस्तित्व किंवा अभाव हे मानावयाचे, यामुळे तुमच्या मनातील आमच्या विषयीच्या मत्सराशिवाय काहीही सिद्ध होत नाही, असा अभिप्राय.

'पण काय हो, रसादींच्या प्रतीतीला वाच्यार्थाच्या प्रतीतीचा उपयोग होत असला तर होऊ द्या, पण त्या बाबतीत क्रम किंवा पौर्वापर्य मानण्याची काय आवश्यकता आहे? कारण उपयोग म्हणजे एकाच सामग्रीमुळे उत्पन्न होणारी वाच्यप्रतीति व रसादिप्रतीति यांचे केवळ समकालीनत्व होय' अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'या जर एकाच वेळी होत असतील' इ. शब्दांनी उत्तर देतात. कारण 'उपयोग' या शब्दाचा असा[१५] अर्थ करणे म्हणजे कोणताही उपकार न करणाऱ्या गोष्टीला ती उपकारक आहे असे केवळ पोकळ, अर्थशून्य बोलणे, इतकेच होय, आणि उपकार करणारा हा 'उपकार्या'च्या म्हणजे ज्यावर उपकार करावयाचा, त्याच्या आधी अस्तित्वात असतो, हे तर तुम्ही म्हणजे शंका घेणाऱ्यांनीही मान्य केले आहे[१६] हे वृत्तिकार 'आणि गाण्यामधील स्वररूपी शब्दांच्या व्यंजकत्वाप्रमाणे ज्या शब्दांचे व्यंजकत्व' इ. शब्दांनी सांगतात. तुम्ही दिलेलेच उदाहरण[१७] घेऊन आम्ही वाच्यार्थाची प्रतीति ही रसादींच्या प्रतीतीच्या आधी घडते हे सिद्ध करू, असा आशय. 'पण काय हो, हा क्रम म्हणजे हे पौर्वापर्य जर असेल, तर ते लक्षात काय म्हणून येत नाही'? अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'मात्र शब्दांमधील' इ, वाक्याने उत्तर देतात.

'क्रियांमधील पौर्वापर्य' या शब्दांनी वृत्तिकार क्रमाचे स्वरूप (म्हणजेच 'क्रम' या शब्दाचा अर्थ पौर्वापर्य हा होय असे) सांगतात. 'क्रिया' म्हणजे ज्या 'केल्या जातात,' त्या. म्हणजेच वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांच्या प्रतीति. किंवा 'क्रिया' म्हणजे अभिधाव्यापार व ज्याला व्यंजना असे दुसरे नाव आहे असा ध्वननव्यापार.

(क्रिया या शब्दाचा यांपैकी कोणताही अर्थ घेतला तरी) त्या दोन क्रियांमधील पौर्वापर्य जाणवत नाही. कोणत्या बाबतीत (जाणवत नाही)? या प्रश्नाला 'रसादींच्या बाबतीत (जाणवत नाही)' असे वृत्तिकार उत्तर देतात. कोणत्या प्रकारच्या रसादिकांच्या बाबतीत? तर विशिष्ट वाच्यार्थाहून म्हणजे कोणत्याही वाच्यार्थाहून (निराळ्या असणाऱ्या) म्हणजे कोणत्याही प्रकारे वाच्य होऊ न शकणाऱ्या[१८] रसादींच्या बाबतीत. अशा रीतीने रसादि व वाच्यार्थ हे एकरूप नसल्यामुळे वाच्यार्थाची प्रतीति व रसादींची प्रतीति यांमध्ये पौर्वापर्य तर असलेच पाहिजे, असे (वृत्तिकारांनी) सुचविले आहे. तसेच जे वाच्यार्थाशी विरुद्ध नसतात, अशा रसादींच्या बाबतीत (क्रम लक्षात येत नाही), पण वाच्यार्थाशी विरुद्ध असलेल्या (वस्तुरूप)[१९] व्यंग्यार्थांच्या बाबतीत तो क्रम लक्षात येतोच. का लक्षात येत नाही याचे निमित्तवाचक सप्तमीने सांगितलेले व सप्तमीने वाच्य झालेल्या ज्या कारणामध्ये दुसरे एक कारण प्रविष्ट होऊन बसले आहे,[२०] असे कारण वृत्तिकार 'फार लवकर करितात' या शब्दांनी सांगतात. 'ज्या घटनांचे साध्य रसप्रतीतीवाचून दुसरे कोणतेही नाही, रसप्रतीति हेच आहे, अशा घटनांमुळे.' घटना (म्हणजे माधुर्य इ. गुण) यांचे स्वरूप पूर्वी[२१] गुणांचे विवरण करितेवेळी सांगितलेच आहे. त्या घटना 'तत्फल' असणाऱ्या म्हणजे रसादींची प्रतीति हेच ज्यांचे कार्य आहे अशा, तसेच रसाची प्रतीति घडविण्याखेरीज दुसरे साध्य ज्यांचे नसते, अशा घटना. कारण 'ओजस्' या घटनेचे (म्हणजेच गुणाचे) साध्य करुण वगैरे रसांची प्रतीति घडविणे हे नसते.

वृत्तिकारांच्या या म्हणण्याचा आशय असा– (माधुर्यादि) गुणांनी युक्त अशा काव्यामध्ये विशिष्ट संघटना (म्हणजे गुण) भेसळ होऊ न देता. (म्हणजे बिनचूकपणे म्हणजे विशिष्ट रसाला पोषक होतील अशाच रीतीने) योजिलेल्या असतात, म्हणूनच वाच्यप्रतीति व रसप्रतीति यांमधील पौर्वापर्य लक्षात येत नाही. (शंका–) 'पण काय हो, काव्यांमध्ये संघटना (म्हणजे गुण) अशा प्रकारे म्हणजे बिनचूकपणे, असंमिश्र स्वरूपात योजिलेल्या असल्या तर असू देत, पण त्यामुळे पौर्वापर्य का बरे लक्षात येऊ नये? या शंकेला उत्तर म्हणून वृत्तिकार 'फार लवकर कार्य करणाऱ्या' असे म्हणतात. वाच्यार्थाच्या प्रतीतीसाठी मुळीच वाट पहावी न लागता,[२२] लगेचच त्या संघटना रसादींची प्रतीति घडवून आणितात, म्हणजे रसादींचा आस्वाद सहृदयाला प्राप्त करून देतात, असा अर्थ. या म्हणण्याचे तात्पर्य असे–रसादि हे संघटनेकडून म्हणजे माधुर्यादि गुणांकडून अभिव्यक्त होणारे असतात, म्हणून वाच्यार्थाच्या ज्ञानाचा अजून उपयोग झाला नसलातरीसुद्धा त्या आधीच उचित अशी संघटना कानी पडल्याबरोबरच ज्या अर्थी रसास्वादाची पूर्वतयारी होते, त्या अर्थी तो रसास्वाद वाच्यार्थाच्या प्रतीतीनंतर अधिक स्पष्ट झाला असला, तरी[२३] तो वाच्यार्थप्रतीतीच्या नंतर घडला असे लक्षात येत नाही. कारण पूर्वीच्या सरावाने जो विषय परिचयाचा झालेला असतो, त्याच्या बाबतीत अनुमान करिताना व्याप्तीची स्मृति व अनुमान यांमधील पौर्वापर्य याप्रमाणेच कळून येत नाही.[२४] कारण सराव म्हणजे तरी काय? तर मनाला अनुमानातील प्रतिज्ञा, व्याप्ति इ. टप्प्यांचा विचार करावा न लागता त्या अनुमानाबाबत पूर्वी झालेले संस्कार फार प्रबळ असल्यामुळे अनुमानाचे साध्य असलेल्या विषयाने अनुमानकर्त्याला स्वतःचा बोध करून देण्यासाठी त्याच्या मनात सदैव उपस्थित होणे असे असल्यामुळे 'जेथे जेथे धूर असतो तेथे तेथे अग्नि असतो' ही व्याप्ति अनुमानकर्त्याच्या मनात नेहमीच असल्याने हेतु पक्षावर आहे येवढेच ज्ञान अनुमितीला पुरेसे होते, म्हणून ते

ज्ञान, परामर्श ही अवस्था[२५] तत्क्षणी ओलांडून पुढे जाते. कारण पर्वतावर धूर आहे याचे ज्ञान झाल्यावर धुराच्या अग्नीशी असलेल्या व्याप्तीचे लवकर स्मरण होते व त्या स्मरणामुळे 'उपनय[२६]' वगैरे वेगळ्या प्रकारच्या गोष्टींचा विचार करण्याची जरूर पडत नसल्याने अग्नीची प्रतीति फार लवकर होते व त्या प्रतीतीचा क्रम म्हणजे ती प्रतीति धूमज्ञानानंतर झाली आहे हे लक्षातही येत नाही, तसेच येथेही (वाच्यार्थाची प्रतीति व रसादींची प्रतीति यांमधील पौर्वापर्यक्रमही ध्यानात येत नाही असे समजावे). पण जर रसादि हे वाच्याशी अविरुद्ध नसतील (म्हणजे विरुद्ध असतील[२७]) व रसोचित घटनेचा म्हणजे माधुर्यादि गुणांचा वापर केलेला नसेल, तर वाच्यार्थप्रतीति व रसादिप्रतीति यांमधील पौर्वापर्य रसिकांच्या ध्यानात येईलच!

'चन्द्रिका' नामक टीकेच्या कर्त्याने मात्र 'आपण जे वाचले त्याचा योग्य विचार न करिता सरळ म्हणजे केवळ शब्दाला प्रतिशब्द देऊन अर्थ लावावयाचा' या पद्धतीला अनुसरून ग्रंथकाराच्या आशयाकडे डोळेझाक[२८] करून 'अनन्यसाध्यतत्फल' या सामासिक शब्दाचे व्याख्यान पुढीलप्रमाणे केले आहे— ('तत्फल' म्हणजे) 'त्याचे म्हणजे शब्दाचे फल' (षष्ठीतत्पुरुष समास) किंवा ते फल (कर्मधारय समास) म्हणजे वाच्यार्थाची व व्यंग्यार्थाची प्रतीति हे फल त्या फलाची घटना म्हणजे ते घडवून आणणे हे ज्या अर्थी अनन्यसाध्य, म्हणजे केवळ शब्दव्यापारामुळेच निष्पन्न होणारे आहे, त्या अर्थी. पण या व्याख्यानातून (वृत्तिकारांच्या आशयाशी) सुसंगत असा काही अर्थ निघतो असे आम्हाला दिसत नाही.[२९] पण आमच्या वंशातील प्राचीनांशी फार वादविवाद करणे नको.

टीपा

१) ध्वन्यालोकाच्या काव्यमाला व काशी या दोन्ही आवृत्तींमधील वृत्तीमध्ये **अनवधारितप्रकरणानाम्** असा पाठ आहे. त्याचे विवरण करिताना अभिनवगुप्तांनी त्याचा **स्वयम्** या शब्दाशी दूरान्वयाने संबंध जोडून 'ज्यांना स्वतःला संदर्भ वगैरे माहीत नव्हता, पण दुसऱ्याने सांगितल्यामुळे माहीत झाला आहे' असे केले आहे. त्यामुळे दुसऱ्याने सांगितले म्हणून का होईना, **अवधारितप्रकरणानाम्** असाच अर्थ निष्पन्न होतो. त्यापेक्षा **अवधारितप्रकरणानाम्** असाच पाठ स्वीकारला, तर दूरान्वयाचा दोष टळतो. व **स्वयम्** या शब्दाचा **अव्युत्पन्नानाम्** याच्याशी चांगल्या तऱ्हेने अन्वय जुळतो.

१अ) कारण कोणत्याही कार्याला उपयोगी पडणारा त्या कार्याच्या आधी असावा लागतो.

२) येथे वृत्तीत 'घटन' हा शब्द 'गुणोचित वर्णरचना' या अर्थाने वापरला आहे, या उद्द्योतातील पाचव्या कारिकेत सांगितलेली समासरहित वगैरे प्रकारची संघटना या अर्थाने नव्हे. अभिनवगुप्तांनी घटना या शब्दाचा अर्थ माधुर्यादि गुण असाच केला आहे. घटना हा शब्द किंवा अभिनवगुप्तांनी लोचनामध्ये अनेक वेळा वापरलेला संघटना हा शब्द यांचा काव्यातील शैली असा व्यापक अर्थ आहे. शैलीमध्ये रसाला पोषक माधुर्यादि गुण, अनुप्रास उपमादि अलंकार आणि लहान अथवा मोठ्या समासांचा वापर या सर्वांचा अंतर्भाव होईल. त्यांपैकी गुणांचा विचार उद्द्योत २, ६ ते १० मध्ये अलंकारांचा विचार १६ ते १९ मध्ये व समासांचा विचार उद्द्योत ३, कारिका ५ ते ९ यांमध्ये केला आहे.

३) या शब्दांचे स्पष्टीकरण प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" वर टीप १ मध्ये आले आहे.

४) प्रकरण, वक्त्याचे वैशिष्ट्य इ. शब्दांच्या स्पष्टीकरणासाठी काव्यप्रकाश, उल्लास ३, झळकीकर आवृत्ति, पृ. ७२ पाहा. ही सामग्री तेथे व्यंग्यार्थाच्या ज्ञानाला उपयोगी आहे असे म्हटले आहे, पण ती सामग्री वाच्यार्थांच्या बिनचूक ज्ञानासाठीही आवश्यक असते.

५) म्हणजे हा 'केवळ अभिधा' वादी मीमांसक दिसतो. पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'"

६) 'ग्राम, राग इ. शब्दांचे स्पष्टीकरण प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'काव्यात व्यङग्य अर्थच प्रधान. आणि तो अर्थ योग्य प्रकारे काव्यातून प्रकट'" वरील टीप ५ मध्ये येऊन गेले आहे.

७) त्या सुरांचे श्रवण व त्यामुळे होणारी रसप्रतीति यांच्यामध्ये वाच्यार्थांची प्रतीति होत नाही, असा वृत्तीतल्या **न च तेषाम्** इ. वाक्याचा अर्थ करावयाचा.

८) विलापाच्या स्वरांचा (उद्गारांचा) उल्लेख मागे प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'प्रतीयमान अर्थच काव्याचा आत्मा होय'" वर आला आहे.

९) उद्द्योत १, कारिका १३. त्या कारिकेत जे सांगितले, ते सांगताना प्रकरण, वक्त्याचे वैशिष्ट्य, इ. सामग्रीच्या मदतीनेच शब्द व वाच्यार्थ हे व्यंजक होऊ शकतात, असाच आमचा अभिप्राय आहे.

१०) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'रस' प्रकार स्वप्नातही 'वाच्य' नसतो व दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन" वरील टीप १२ वी.

११) गाण्यामधील आलाप, ताना यांना वाच्यार्थ नसतोच. शब्दांना वाच्यार्थ असला, तरी गाताना गायक शब्दांचे उच्चार इतक्या विकृतपणे करितात, की त्यांपासून श्रोत्याला अर्थाचा बोध होतच नाही.

१२) म्हणजे केवळ शब्दांचे श्रवण व संदर्भ इत्यादींचे ज्ञान येवढ्यानेच रसप्रतीति होते, ती होण्यास वाच्यार्थांच्या ज्ञानाची आवश्यकता नसते, असे पूर्वपक्ष्याचे म्हणणे.

१३) म्हणजे ज्यांना फक्त संदर्भच माहीत झाला आहे, पण प्रस्तुत काव्यातील शब्दांचे अर्थ माहीत झालेले नाहीत, अशांना. (पाहा द्वितीय खंड, वरील टीप १)

१४) मूळ लोचनात अदृष्टसद्भाव– अभावौ असा शब्द आहे. यातील 'अदृष्ट' या शब्दाचा अर्थ (दैव किंवा त्यासारखा नसून) आतापर्यत कोणीही पुढे न केलेले कारण–म्हणजेच संदर्भ इत्यादिकांचे ज्ञान असा आहे.

१५) असा अर्थ म्हणजे उपयोग = समकालीनत्व हा अर्थ.

१६) पाहा, वृत्ति द्वितीय खंड उद्द्योत – ३ वाच्यार्थ रसादि यांच्या प्रतीतीमध्ये क्रम असतोच, पण तो लक्षात येत नाही; म्हणून 'अलक्ष्यक्रम' वरील १४ ते १९ या ओळी व लोचनातील वरील ओळी ५ ते ८.

१७) तुम्ही म्हणजे पूर्वपक्ष्याने दिलेले आलाप—गायकीच्या स्वरांची प्रतीति ही रसादिकांच्या प्रतीतीच्या आधी होते, हे.

१८) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'रस' प्रकार स्वप्नातही 'वाच्य' नसतो" वरील 'तो स्वप्नातही वाच्य असत नाही' हे वाक्य.

१९) म्हणजे उदा. हे धार्मिका!' इ. वस्तुध्वनीच्या उदाहरणात वाच्यार्थ व व्यंग्यार्थ हे अनुक्रमे विधिरूप व निषेधरूप असल्यामुळे परस्पविरुद्ध आहेत. (पाहा, प्रथमखंड "उद्द्योत – १ 'रस' प्रकार स्वप्नातही 'वाच्य' नसतो")

२०) **घटनासु** यातील सप्तमी ही हेतुवाचक आहे. म्हणजे **घटनासु** याचा अर्थ 'घटनांमुळे' असा करावयाचा. आता या सप्तमीने वाच्य झालेल्या हेतूमध्ये **आशुभाविनी** (लवकर कार्य करणाऱ्या) हा आणखी एक हेतु गर्भित आहे

२१) पूर्वी, म्हणजे उद्द्योत २, कारिका ६ ते १० यामध्ये

२२) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'रसप्रतीतीचे स्वरूप अलौकिक असते'" वरील लोचन व त्यावरील २८ व ३० या टीपा. तसेच प्रस्तुत खंड, "उद्द्योत -३ 'अलक्ष्यक्रमव्यंग ध्वनीला 'वर्ण' ही प्रकाशित करू शकतात'". मात्र प्रथम खंडाच्या "उद्द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वर शब्द व अर्थ हे दोघे एकमेकांशी सहकार्य करून रसप्रतीति घडवितात असे म्हटले आहे. तेव्हा प्रस्तुत ठिकाणी म्हटलेल्या वाक्याचे तात्पर्य असे समजावयाचे की, उचित घटना या वाच्यार्थ कळण्यापूर्वी रसाप्रतीतील अनुकूल अशी चित्तवृत्ति उत्पन्न करितात, व मग वाच्यार्थाचे ज्ञान झाल्यावर रसप्रतीति अधिक स्पष्टतेने होते.

२३) मूळ लोचनात **आसूत्रितो रसास्वादः वाच्यप्रतीत्युत्तरकालभवेन परिस्फुटास्वादयुक्तोऽपि** असे आहे. त्यामुळे... **भवेन** हे कोणाचे विशेषण आहे समजावयास अडचण पडते. त्याऐवजी परिस्फुटास्वादेन युक्तोऽपि किंवा परिस्फुटत्वेन युक्तोऽपि अशी सुधारणा केल्यास **उत्तरकालभवेन** या विशेषणाचा संबंध **परिस्फुटास्वादेन** या किंवा **परिस्फुटत्वेन** या विशेष्याशी चांगल्या प्रकारे जुळतो.

२४) म्हणजे धूर हा हेतु पर्वत या पक्षावर आहे यावरून अग्नि पर्वतावर आहे ही अनुमिति ताबडतोब केली जाते.

२५) 'परामर्श' किंवा 'उपनय' हा पंचावयवी अनुमानातील ४ था टप्पा होय. 'पर्वतावर अग्नि आहे' हा निष्कर्ष काढताना हा पर्वत अग्नीने व्याप्त असलेल्या धुराने युक्त आहे या ज्ञानाला 'परामर्श' म्हणावयाचे.

२६) 'उपनय' म्हणजेच परामर्श. वरील २५ ही टीप पाहा.

२७) अर्थात् रसादि हे वाच्यार्थाला विरोधी केव्हाही असू शकत नाही (कारण वाच्यार्थ हा रसप्रतीति स्पष्टपणे घडवण्यास कारणीभूत असतो), पण ते विरोधी असणे शक्य आहे असे मानिले, तर क्रम ध्यानात येईल!

२८) 'गजनिमीलिका' हा शब्द प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'अभाववाद्यांच्या तिसऱ्या वर्गाच्या मताचे खंडन'" वर 'लोचनात आला असून त्याचा अनुवाद पुढे केलेला आहे.

२९) 'चन्द्रिका' काराचे म्हणणे अगदीच चुकीचे आहे असे वाटत नाही, कारण वाच्यार्थ व व्यंग्यार्थ या दोहोंचीही प्रतीति शब्दांच्या व्यापारामुळे व शब्द ऐकल्याबरोबर ताबडतोब होत असल्यामुळे त्या दोन प्रतीतींमधील पौर्वापर्य लक्षात येत नाही असे 'चन्द्रिकाकारांचे म्हणणे, म्हणून 'यातून काही सुसंगत अर्थ निघत नाही' हा अभिनवगुप्तांचा मुद्दा तितकासा ग्राह्य वाटत नाही.

ध्वन्यालोकः

क्वचित्तु लक्ष्यत एव । यथा नुरणनरूपव्यङ्ग्यप्रतीतिषु । तत्रापि कथमिति चेदुच्यते– अर्थशक्तिमूलानुरणनरूपव्यङ्ग्ये ध्वनौ तावदभिधेयस्य तत्सामर्थ्याक्षिप्तस्य चार्थस्याभिधेयान्तरविलक्षणतयात्यन्तविलक्षणे ये प्रतीती तयोरशक्यनिह्नवो निमित्तनिमित्तिभाव इति स्फुटमेव तत्र पौर्वापर्यम् । यथा प्रथमोद्द्योते प्रतीयमानार्थसिद्ध्यर्थमुदाहृतासु गाथासु । तथाविधे च विषये वाच्यव्यङ्ग्ययोरत्यन्तविलक्षणत्वाद्यैव एकस्य प्रतीतिः सैवेतरस्येति न शक्यते वक्तुम् ।

शब्दशक्तिमूलानुरणनरूपव्यङ्ग्ये तु ध्वनौ—

'गावो वः पावनानां परमपरिमितां प्रीतिमुत्पादयन्तु' इत्यादावर्थद्वयप्रतीतौ शाब्द्यामर्थद्वयस्योपमानोपमेयभावप्रतीतिरुपमावाचकपदविरहे सत्यर्थसामर्थ्यादाक्षिप्तेति तत्रापि सुलक्षमभिधेयव्यङ्ग्यालङ्कारप्रतीत्योः पौर्वापर्यम् ।

पदप्रकाशशब्दशक्तिमूलानुरणनरूपव्यङ्ग्येऽपि ध्वनौ विशेषणपदस्योभयार्थसम्बन्धयोग्यस्य योजकं पदमन्तरेण योजनमशाब्दमप्यर्थादवस्थितमित्यत्रापि पूर्ववदभिधेयतत्सामर्थ्याक्षिप्तालङ्कारमात्रप्रतीत्योः सुस्थितमेव पौर्वापर्यम् । आर्थ्यपि च प्रतिपत्तिस्तथाविधे विषये उभयार्थसम्बन्धयोग्यशब्दसामर्थ्यप्रसावितेति शब्दशक्तिमूला कल्प्यते ।

अविवक्षितवाच्यस्य तु ध्वनेः प्रसिद्धस्वविषयवैमुख्यप्रतीतिपूर्वकमेवार्थान्तरप्रकाशनमिति नियमभावी क्रमः । तत्राविवक्षितवाच्यत्वादेव वाच्येन सह व्यङ्ग्यस्य क्रमप्रतीतिविचारो न कृतः । तस्मादभिधानाभिधेयप्रतीत्योरिव वाच्यव्यङ्ग्यप्रतीत्योर्निमित्तनिमित्तिभावान्नियमभावी क्रमः । स तूक्तयुक्त्या क्वचिल्लक्ष्यते कचिन्न लक्ष्यते ।

ध्वन्यालोक

पण काही ठिकाणी हा क्रम (म्हणजे हे पौर्वापर्य) लक्षात आल्यावाचून रहात नाही. उदा. जेव्हा अनुरणनरूप व्यंग्यार्थाचे ज्ञान होते, तेव्हा तेथेदेखील क्रम कसा ध्यानात येतो असे म्हणत असाल, तर सांगतो :– वाच्य अर्थाच्या सामर्थ्याने अनुरणनस्वरूपी व्यंग्यार्थ ज्यात प्रत्ययास येतो, त्या ध्वनीच्या प्रकारात वाच्यार्थ आणि त्याच्या सामर्थ्याने सूचित केला जाणारा, वाच्यार्थापेक्षा निराळा असलेला व्यंग्यार्थ या दोघांचे प्रत्यय अगदी वेगळे असल्याने त्यांमधला कारणकार्यसंबंध नाकबूल करणे अशक्य आहे; म्हणून

तेथे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांच्या बोधांचे पौर्वापर्य अगदी स्पष्ट आहे. उदा. पहिल्या उद्‌द्योतात (प्रथम खंड "प्रतीयमानाचा 'वस्तु' हा प्रकार वाच्य अर्थाहून वेगळा, कारण (१) स्वरूपभेद" पासून पुढे) व्यंग्यार्थाची सिद्धि करण्यासाठी उदाहरणे म्हणून दिलेल्या गाथांमध्ये. तशा उदाहरणांत वाच्यार्थ व व्यंग्यार्थ हे सर्वस्वी भिन्न असल्याने त्यांपैकी एकाची जी प्रतीति तीच दुसऱ्याचीही असे म्हणणे शक्य नाही. पण अनुरणनरूप व्यंग्यार्थ असलेल्या ध्वनीच्या शब्दशक्तिमूल प्रकारात :— 'त्या चंडकिरण सूर्याचे पवित्र करणारांमध्ये अग्रगण्य असे किरण (दुसरा अर्थ—गायी) तुमच्या मनास अपरिमित आनंद देवोत.[१]' अशासारख्या उदाहरणात दोन्ही अर्थांची प्रतीति (द्‌व्यर्थी) शब्दांमुळेच होत असली, तरी त्या दोन अर्थांमधील उपमानोपमेयसंबंधाची प्रतीति ही उपमावाचक पद नसताना अर्थाच्या सामर्थ्याने सूचितच होते, म्हणून तेथेही वाच्यार्थ व व्यंग्य अलंकार यांच्या प्रतीतींमधले पौर्वापर्य सुस्पष्ट आहे.

अनुरणनस्वरूपी व्यंग्यार्थ पदातून प्रकाशित होणाऱ्या शब्दशक्तिमूल ध्वनीमध्येही दोन्ही अर्थांशी (म्हणजे विषयांशी, किंवा विशेष्यांशी) ज्याचा संबंध लावता येतो, अशा विशेषणस्वरूपी पदाचा, जोडणाऱ्या पदाशिवाय दोन्ही अर्थांशी संबंध जोडणे हे शब्दाने वाच्य नसले, तरी अर्थाच्या सामर्थ्याने प्रतीत होते. म्हणून पूर्वीप्रमाणे[२] याही प्रकारात वाच्यार्थाची प्रतीति आणि त्याच्या सामर्थ्याने सुचवलेल्या अलंकाराचीच प्रतीति यांमधले पौर्वापर्य सहज लक्षात येण्याजोगे आहे. येथे व्यंग्यार्थाचा (म्हणजे उपमा इ. अलंकाराचा) बोध हा वस्तुतः अर्थाच्या सामर्थ्याने होणारा असला, तरी अशा उदाहरणात तो बोध दोन्ही विशेष्यांशी जोडावयास योग्य अशा (विशेषणस्वरूपी द्‌व्यर्थी) शब्दाच्या सामर्थ्याने उत्पन्न झालेला असतो, म्हणून तो बोध आम्ही शब्दशक्तिमूल मानिला आहे. अविक्तक्षितवाच्य ध्वनीच्या बाबतीत शब्दाचा स्वतःचा जो सुप्रसिद्ध वाच्यार्थ, तो त्याज्य आहे अशी आधी प्रतीति येऊन मगच दुसऱ्या (प्रयोजनरूपी) अर्थाची अभिव्यक्ति होते म्हणून त्या दोन अर्थांच्या प्रतीतींमध्ये पौर्वापर्य हटकून असायला पाहिजे. त्या प्रकारात वाच्यार्थ हा अविवक्षित असल्यामुळेच त्या वाच्यार्थाच्या प्रतीतीच्या व व्यंग्यर्थ्याच्या प्रतीतीच्या क्रमाचा (म्हणजे पौर्वापर्याचा) आम्ही विचार केला नाही.[३] तेव्हा शब्दाची प्रतीति आणि त्याच्या वाच्यार्थाची प्रतीति यांमध्ये जसा कारणकार्यसंबंध आहे, तसाच वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांच्या प्रतीतींमध्येही कारणकार्यसंबंध असल्यामुळे क्रम अनिवार्यपणे असतो. मात्र तो क्रम वर (द्वितीय खंड, "उद्‌द्योत — ३ वाच्यार्थ रसादि यांच्या प्रतीतीमध्ये क्रम असतोच, पण तो लक्षात येत नाही; म्हणून 'अलक्ष्यक्रम' ही संज्ञा" वर) सांगितलेल्या कारणामुळे काही उदाहरणांत लक्षात येतो, तर काहींमध्ये येत नाही.

लोचनम्

यत्र तु सङ्घटनाव्यङ्ग्यत्वं नास्ति तत्र लक्ष्यत एवेत्याह—क्वचित्त्विति । तुल्ये व्यङ्ग्यत्वे कुतो भेद इत्याशङ्कते—तत्रापीति । स्फुटमेवेति ।

अविवक्षितवाच्यस्य पदवाक्यप्रकाशता ।
तदन्यस्यानुरणनरूपव्यङ्ग्यस्य च ध्वनेः ॥

इति हि पूर्वं वर्णसङ्घटनादिकं नास्य व्यञ्जकत्वेनोक्तमिति भावः । गाथास्विति 'भम धम्मिअ' इत्यादिकासु । ताश्च तत्रैव व्याख्याताः । शाब्द्यामिति । शाब्द्यामपीत्यर्थः । उपमावाचकं यथेवादि । अर्थसामर्थ्यादिति । वाक्यार्थसामर्थ्यादिति यावत् ।

एवं वाक्यप्रकाशशब्दशक्तिमूलं विचार्य पदप्रकाशं विचारयतिपदप्रकाशेति विशेषणपदस्येति । जड इत्यस्य । योजकमिति कूप इति च अहमिति चोभयसमानाधिकरणतया संवलनम् । अभिधेयं च तत्सामर्थ्याक्षिप्तं च तयोरलङ्कारमात्रयोः ये प्रतीती तयोः पौर्वापर्यक्रमः । सुस्थितं सुलक्षितमित्यर्थः । मात्रग्रहणेन रसप्रतीतिस्तत्राप्यलक्ष्यक्रमैवेति दर्शयति । नन्वेवमार्थत्वं शब्दशक्तिमूलत्वं चेति विरुद्धमित्याशङ्क्याह—आर्थ्यपीति । नात्र विरोधः कश्चिदिति भावः । एतच्च वितत्य पूर्वमेव निर्णीतमिति न पुनरुच्यते ।

स्वविषयेति । अन्धशब्दादेरुपहतचक्षुष्कादिः स्वो विषयः, तत्र यद्वैमुख्यमनादर इत्यर्थः । विचारो न कृत इति । नामधेयनिरूपणद्वारेणेति शेषः । सहभावस्य शङ्कितुमत्रायुक्तत्वादिति भावः । एवं रसादयः कैशिक्यादीनामितिवृत्तभागरूपाणां वृत्तीनां जीवितमुपनागरिकाद्यानां च, सर्वस्यास्योभयस्यापि वृत्तिव्यवहारस्य रसादिनियन्त्रितविषयत्वात्, इति यत्प्रस्तुतं तत्प्रसङ्गेन रसादीनां वाच्यातिरिक्तत्वं समर्थयितुं क्रमो विचारित इति । एतदुपसंहरति—तस्मादिति । अभिधानस्य शब्दरूपस्य पूर्वं प्रतीतिस्ततोऽभिधेयस्य । यदाह तत्रभवान्—

'विषयत्वमनापन्नैः शब्दैर्नार्थः प्रकाश्यते' इत्यादि । 'अतोऽनिर्ज्ञातरूपत्वात्किमाहेत्यभिधीयते ।' इति । अत्रापि चाविनाभाववत् समयस्याभ्यस्तत्वात् क्रमो न लक्ष्येतापि ।

लोचन

पण ज्या उदाहरणांत घटनेमुळे म्हणजे (माधुर्यादि गुणांमुळे) (रसादींची) अभिव्यक्ति होत नाही, तेथे (वाच्यार्थाची प्रतीति व व्यंग्यार्थाची प्रतीति यांमधील) पौर्वापर्य लक्षात येते, असे वृत्तिकार 'पण काही ठिकाणी' या शब्दांनी सांगतात. दोन्ही ठिकाणी[४] व्यंग्यार्थ असणे ही परिस्थिति सारखीच असताना क्रम लक्षात येणे व न येणे हा फरक कशामुळे? ही शंका वृत्तिकार 'तेथेदेखील क्रम कसा' इ. शब्दांनी मांडतात. 'अगदी स्पष्ट आहे'— कारण 'अविवक्षितवाच्य आणि त्याहून दुसरा, अनुरणनरूप व्यंग्यार्थ असलेला (म्हणजे रसादिव्यतिरिक्त विवक्षितान्यपरवाच्य) ध्वनि हा पदाच्या, तसेच वाक्याच्याही द्वारे प्रकाशित होऊ शकतो' असे जे पूर्वी[५] म्हटले, त्यात वर्णांची योजना इ. कारणे अनुरणनरूप प्रकारच्या व्यंग्यार्थ्याची व्यंजक म्हणून सांगितली नव्हती,[६] असा आशय. 'गाथांमध्ये'— म्हणजे हे धार्मिका!' इत्यादींमध्ये.[७] त्या गाथांचे विवरणही तेथेच केलेले आहे. शब्दांमुळे '(द्व्यर्थी) शब्दांमुळे होत असली, तरीसुद्धा' असा अर्थ. 'उपमावाचक पद' म्हणजे **यथा, इव** यासारखा शब्द. 'अर्थाच्या सामर्थ्याने' म्हणजे एकूण वाक्याच्या अर्थामधील (व्यञ्जकत्व—) सामर्थ्याने, असा अर्थ. याप्रमाणे वाक्यातून प्रकाशित होणाऱ्या शब्दशक्तिमूल ध्वनीमध्ये पौर्वापर्यक्रम जाणवतो या मुद्द्याचा विचार केल्यावर पदातून प्रकाशित होणाऱ्या शब्दशक्तिमूल ध्वनीमधील पौर्वापर्यक्रमाचा विचार वृत्तिकार 'पदातून प्रकाशित होणाऱ्या शब्दशक्तिमूल' इ. शब्दांनी करितात. 'विशेषणरूस्वपी पदाच्या'— म्हणजे 'जड'[८] या पदाच्या. जोडणाऱ्या 'आड' आणि 'मी' या दोघांशी समानविभक्तिक असल्यामुळे त्यांच्याशी संबद्ध होणाऱ्या.[९] वाच्य असलेला (अलंकार) आणि त्याच्या (व्यंजकत्व—) सामर्थ्याने सुचविलेला (अलंकार) अशा दोन्ही अलंकारांच्याच[१०] ज्या प्रतीति, त्यांमधील. 'सुस्थित' म्हणजे सहज लक्षात येणारे (पौर्वापर्य) असा अर्थ. ('अलंकाराचीच' यातील) 'च' या अव्ययाने 'विधात्याने मला जर'— या उदाहरणातसुद्धा रसाची[११] प्रतीति 'अलक्ष्यक्रम'च आहे असे वृत्तिकार सुचवितात. 'पण काय हो, अशा प्रकारे या श्लोकात व्यंग्यार्थाची प्रतीति ही शब्दशक्तिमूल[१२] आहे व रसाची प्रतीति 'आर्थी' म्हणजे वाच्यार्थामुळे होणारी आहे, हे जे तुम्ही सांगता, ते परस्परविरुद्ध नाही का?' अशी

शंका कल्पून वृत्तिकार तिचे निरसन 'अर्थाच्या सामर्थ्याने प्रतीत होणारा असला, तरी' इ. शब्दांनी करितात. म्हणजे यात कोणताही विरोध[१३] नाही, हा भावार्थ. आणि या विषयासंबंधीचा निर्णय आम्ही पूर्वीच[१४] घेतला असल्याने येथे आम्ही त्याबद्दल पुन्हा काही सांगत नाही. 'शब्दाचा स्वतःचा जो सुप्रसिद्ध वाच्यार्थ'– 'अंध' वगैरे शब्दांचे 'दृष्टि नष्ट झालेला' वगैरे जे स्वतःचे वाच्यार्थ, त्यांच्याकडे पाठ फिरविणे म्हणजे दुर्लक्ष करणे, हा आशय. 'विचार केला नाही' या वाक्यात 'ह्या (अविवक्षितवाच्य) प्रकाराला ('संलक्ष्यक्रम' हे) नाव देऊन त्याद्वारे' या शब्दांची भर घालावी (व वाक्य पूर्ण करावे). कारण येथे (म्हणजे अविवक्षितवाच्य ध्वनीच्या बाबतीत) वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांची प्रतीति एकाच वेळी होते अशी शंका घेणे उचित नाही, असा भावार्थ. याप्रमाणे रसादि हे, कथानकाचा भाग असलेल्या कैशिकी वगैरे अर्थवृत्ति व उपनागरिका वगैरे शब्दवृत्ति यांचे जीवित होत, कारण या दोन्ही प्रकारच्या सर्व वृत्तींच्या वापराचे क्षेत्र रसादींमुळेच नियंत्रित होते. (वृत्ति म्हणजे रसादींना पोषक असा शब्द व अर्थ यांचा वापर) या विषयाचा जो आता[१५] विचार सुरू केला होता, त्याच्या अनुषंगाने रसादिकांचे वाच्यार्थाहून वेगळेपण सिद्ध करण्यासाठी पौर्वापर्यक्रमाचा विचार केला. आता या विषयाचा वृत्तिकार 'तेव्हा शब्दाची प्रतीति' इ. वाक्याने समारोप करितात. अभिधानाची म्हणजे शब्दाची प्रतीति आधी होते आणि त्यानंतर अभिधेयाची म्हणजे वाच्यार्थाची प्रतीति होते. म्हणून माननीयांनी[१६] म्हटलेच आहे की–

'शब्द हे कानी आल्याशिवाय ते अर्थाचा बोध करून देऊ शकत नाहीत' वगैरे. त्याप्रमाणेच–

'म्हणून शब्द नीट ऐकू आले नाहीत, तर श्रोता वक्त्याला 'काय म्हणालात?' असे म्हणतो (म्हणजे त्याला ते शब्द पुन्हा म्हणून दाखविण्याची विनंती करितो). येथे सुद्धा ज्याप्रमाणे अनुमानाच्या बाबतीत हेतु व साध्य यांमधील व्याप्ति ध्यानात न येताच सरावामुळे अनुमान केले जातेच, त्याचप्रमाणे संकेत हा सहृदयाच्या सरावाचा झालेला असल्यामुळे शब्दश्रवण व वाच्यार्थाचे ज्ञान यांमधील पौर्वापर्य लक्षात येणारही नाही.[१७]

टीपा

१) पाहा, प्रथम खंड उद्द्योत – २ श्लेषमूलक (शब्दशक्तिमूल) ध्वनीसंबंधी पाच मते.

२) म्हणजे **गावो वः पावनानां** इ. उदाहरणांप्रमाणे. (द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'काही काव्यांत मात्र वाच्यार्थ व व्यंगार्थ यांच्या प्रतीतींमधला क्रम लक्षात येतो, म्हणून त्याला 'संलक्ष्यक्रम' ही संज्ञा'")

३) म्हणजे तो संलक्ष्यक्रम आहे अशी संज्ञाही त्याला मुद्दाम दिली नाही, कारण त्याचे संलक्ष्यक्रमत्व अगदीच उघड आहे.

४) म्हणजे अर्थशक्तिमूल अनुरणनरूप ध्वनि व अर्थशक्तिमूल रसादिध्वनि या दोहोंमध्ये.

५) पाहा, उद्द्योत ३, कारिका पहिली.

६) तर 'केवळ पद, वाक्य यांमुळेच त्या प्रकारचा ध्वनि अभिव्यक्त होतो' असे म्हटले होते.

७) पाहा, प्रथम खंड, उद्द्योत – १ प्रतीयमानाचा 'वस्तु' हा प्रकार वाच्य अर्थाहून वेगळा, कारण (१) स्वरूपभेद पासून पुढे ("प्रतीयमानाचा वस्तु प्रकार वाच्यार्थाहून भिन्न कारण (२) विषयभेद" पर्यंत).

८) हा **जड** शब्द द्वितीय खंड, "उद्द्योत – ३' विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीच्या 'शब्द शक्त्युद्भव' प्रकाराच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे'" वरील **प्रातुं धनैः** इ. उदाहरणातील **जड** हा शब्द होय.

९) म्हणजे वाच्यार्थकक्षेमध्ये **जडः** (= किंकर्तव्यमूढः) या पदाचा **अहम्** या पदाशी समानविभक्तिकत्वामुळे अन्वय होतो, आणि व्यंग्यार्थ कक्षेमध्ये **जडः** (= थंड) या पदाचा **कूपः** याच्याशी तो पुनः उच्चारला नसला तरी समानविभक्तिकत्वामुळे अन्वय होतो.

१०) मूळ वृत्तीमध्ये अलंकार मात्र प्रतीत्योः अशी शब्दयोजना असून अभिनवगुप्तांनीही तीच घेऊन विवरण केले आहे. पण वृत्तीत 'अलंकार' या ऐवजी 'वस्तु' हा शब्द वापरणे अधिक योग्य झाले असते. कारण **अत्रापि** म्हणजे **प्रातुं धनैः** या उदाहरणात व्यंग्य अलंकाराची प्रतीति होत नसून व्यंग्य वस्तूची प्रतीति होती आणि व्यंग्य अलंकाराचा विषय पूर्वी **गावो वः पावनानां** या (द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'काही काव्यांत मात्र वाच्यार्थ व व्यंगार्थ यांच्या प्रतीतींमधला क्रम लक्षात येतो, म्हणून त्याला 'संलक्ष्यक्रम' ही संज्ञा'" वरील) उदाहरणात येऊन गेलेला आहे. आम्ही सुचविलेल्या सुधारणेस अनुसरून लोचनामध्ये पुढीलप्रमाणे बदल करणे शक्य होईल :– **अभिधेयं च तत्सामर्थ्याक्षिप्तं च वस्तुमात्रम्, तयोः ये प्रतींती, तयोः, पौर्वापर्यक्रमः**...

वृत्तीचा व लोचनाचा अनुवाद करिताना आम्ही आहेत तेच पाठ घेऊन अनुवाद केली आहे. **प्रातुं धनैः** इ. उदाहरण आनंदवर्धनांनी वस्तुध्वनीचे म्हणूनच दिले आहे. त्यात वाच्य किंवा व्यंग्य 'अलंकार' असल्याचा उल्लेख त्यांनी केलेला नाही. अभिनवगुप्तांनीही येथे वाच्य अलंकार व व्यंग्य अलंकार असल्याबद्दल अवाक्षरही काढले नाही. 'दीधिति' या टीकेच्या कर्त्याने या उदाहरणात व्यंग्य अलंकार 'व्यतिरेक' आहे असे म्हटले आहे. ते मत स्वीकारले, तर वृत्तीतील शब्दयोजनेचा अर्थ नीट लागेल. तो असा :– वाच्यार्थाची प्रतीति व त्याच्या सामर्थ्याने सुचविलेला जो व्यंग्य (व्यतिरेक) अलंकार, त्याची प्रतीति या दोहोंमधील पौर्वापर्य... इ.

पण व्यंग्य अलंकार 'व्यतिरेक' मानिला तरी अभिनवगुप्तांच्या विवरणाचा योग्य अर्थ लागत नाही, कारण येथे 'व्यंग्य' अलंकार असला, तरी 'वाच्य' अलंकार कोणता समजावयाचा? मग अर्थात् अभिनवगुप्तांच्या म्हणण्याच्या समर्थनार्थ 'येथे' 'बालप्रिया' टीकेने म्हटल्याप्रमाणे वाच्य अलंकार 'दीपक' समजावा लागेल व 'दीधिति' टीकेने म्हटल्याप्रमाणे व्यंग्य अलंकार 'व्यतिरेक' समजावा लागेल!

११) रसाची म्हणजे 'शान्त' रसाची.

१२) या श्लोकात 'जड' या शब्दापासून सुचविले जाणारे अनेक व्यंग्यार्थ हे वस्तुरूप आहेत. त्यामुळे येथे 'शब्दशक्तिमूल' या शब्दाने व्यंग्य अलंकार अभिप्रेत नसून व्यंग्य वस्तु अभिप्रेत आहे.

१३) विरोध नाही, कारण दोन्ही प्रकारच्या व्यंग्यार्थ्यांचे आधार हे एकमेकांपासून भिन्न, स्वतंत्र आहेत. वस्तुव्यंग्याचा आधार 'जड' हे पद व शान्त रसाचा आधार संपूर्ण श्लोकाचा वाच्यार्थ हा आहे.

१४) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'अलंकारध्वनीची उदाहरणे'" वरील 'कारण ध्वनीचे सर्वच प्रकार' इ. वाक्ये.

१५) म्हणजे द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रसपरिपोष करावयाचा, तर त्यासंबंधीचे औचित्य पाळणे हे कवीचे मुख्य कर्तव्य होय'" वर.

१६) माननीयांनी म्हणजे भर्तृहरीने, पाहा, वाक्यपदीय, १–५६ व १–५७. त्या संपूर्ण कारिका अशा आहेत :–

विषयत्वमनापन्नैः शब्दैर्नार्थः प्रकाश्यते ।
न सत्तयैव तेऽर्थानामगृहीताः प्रकाशकाः ॥ ५६ ॥

अतोऽनिर्ज्ञातरूपत्वात्किमाहेत्यभिधीयते ।
नेन्द्रियाणां प्रकाश्येऽर्थे स्वरूपं गृह्यते तथा ॥ ५७ ॥

१७) प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'वाच्यार्थ हे व्यंग्यार्थप्रकटीकरणांचे साधन'" वरील 'ज्याचा सहृदयता हा गुण अगदी वरच्या पायरीला पोहोचलेला' इ. वाक्य व द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'वाच्यार्थ रसादि यांच्या प्रतीतींमध्ये क्रम असतोच, पण तो लक्षात येत नाही; म्हणून 'अलक्ष्यक्रम' ही संज्ञा'" वरील 'पूर्वीच्या सरावाने जो विषय परिचयाचा' इ. वाक्य.

ध्वन्यालोकः

तदेवं व्यञ्जकमुखेन ध्वनिप्रकारेषु निरूपितेषु कश्चिद् ब्रूयात्किमिदं व्यञ्जकत्वं नाम? व्यङ्ग्यार्थप्रकाशनम्? न हि व्यञ्जकत्वं व्यङ्ग्यत्वं चार्थस्य । व्यञ्जकसिद्ध्यधीनं व्यङ्ग्यत्वं व्यङ्ग्यापेक्षया च व्यञ्जकत्वसिद्धिरित्यन्योन्यसंश्रयादव्यवस्थानम् ।

ननु वाच्यव्यतिरिक्तस्य व्यङ्ग्यस्य सिद्धिः प्रागेव प्रतिपादिता, तत्सिद्ध्यधीना च व्यञ्जकसिद्धिरिति कः पर्यनुयोगावसरः । सत्यमेवैतत्; प्रागुक्तयुक्तिभिर्वाच्यव्यतिरिक्तस्य वस्तुनः सिद्धिः कृता, स त्वर्थो व्यङ्ग्यतयैव कस्माद्व्यपदिश्यते? यत्र च प्राधान्येनावस्थानं तत्र वाच्यतयैवासौ व्यपदेष्टुं युक्तः, तत्परत्वाद्वाक्यस्य । अतश्च तत्प्रकाशिनो वाक्यस्य वाचकत्वमेव व्यापारः । किं तस्य व्यापारान्तरकल्पनया? तस्मात्तात्पर्यविषयो योऽर्थः स तावन्मुख्यतया वाच्यः । या त्वन्तरा तथाविधे विषये वाच्यान्तरप्रतीतिः, सा तत्प्रतीतेरुपायमात्रं पदार्थप्रतीतिरिव वाक्यार्थप्रतीतेः ।

अत्रोच्यते— यत्र शब्दः स्वार्थमभिदधानोऽर्थान्तरमवगमयति तत्र यत्तस्य स्वार्थाभिधायित्वं यच्च तदर्थान्तरावगमहेतुत्वं तयोरविशेषो विशेषो वा? न तावदविशेषः; यस्मात्तौ द्वौ व्यापारौ भिन्नविषयौ भिन्नरूपौ च प्रतीयेते एव । तथाहि– वाचकत्वलक्षणो व्यापारः शब्दस्य स्वार्थविषयः, गमकत्वलक्षणस्त्वर्थान्तरविषयः । न च स्वपरव्यवहारो वाच्यव्यङ्ग्ययोरपह्नोतुं शक्यः, एकस्य सम्बधित्वेन प्रतीतेरपरस्य सम्बन्धिसम्बन्धित्वेन । वाच्यो ह्यर्थः साक्षाच्छब्दस्य सम्बन्धी तदितरस्त्वभिधेयसामर्थ्याक्षिप्त

सम्बधिसम्बन्धी । यदि च स्वसम्बन्धित्वं साक्षात्तस्य स्यात्तदार्थान्तरत्वव्यवहार एव न स्यात् । तस्माद्विषयभेदस्तावत्तयोर्व्यापारयोः सुप्रसिद्धः ।

ध्वन्यालोक

तेव्हा याप्रमाणे व्यंजकांच्या दृष्टीने ध्वनीचे प्रकार सविस्तरपणे प्रतिपादन केल्यावर एखादा म्हणेल :– "हे व्यंजकत्व म्हणजे काय प्रकार आहे? तो म्हणजे काय व्यंग्यार्थाचा बोध करून देण्याचे सामर्थ्य? (व्यंजकत्व म्हणजे व्यंग्यार्थाचा बोध करून देण्याचे सामर्थ्य असे जर तुमचे म्हणणे असेल ते बरोबर नाही.) कारण कोणत्याही अर्थाच्या ठिकाणी व्यंजकत्वं असणे किंवा व्यंग्यत्व असणे हे संभवत नाही. कारण व्यंग्यत्वाची सिद्धि ही आधी व्यंजकत्व सिद्ध होण्यावर अवलंबून आणि व्यंग्यार्थाची सिद्धि झाली, तरच व्यंजकत्व सिद्ध होणार, असे असल्यामुळे येथे 'अन्योन्यसंश्रय' हा दोष येतो, व म्हणून या दोहोंपैकी एकही सिद्ध होत नाही."

पण यावर आम्ही (म्हणजे ध्वनिवादी) म्हणू की, वाच्यार्थांहून वेगळ्या असलेल्या व्यंग्यार्थाची सिद्धि पूर्वीच (पहिल्या उद्‌द्योतात) केली की! तो सिद्ध झाल्यामुळे व्यंजकत्वाची सिद्धि ही आपोआपच होत असल्याने शंका घ्यायला जागाच कोठे आहे?

याउपरही तो (पूर्वपक्षी) म्हणेल "हे खरेच आहे. पूर्वी सांगितलेल्या कारणांमुळे तुम्ही वाच्याहून वेगळ्या अर्थाची सिद्धि केलीत खरी, पण त्या वेगळ्या अर्थाला व्यंग्यार्थ म्हणुनच का म्हणता? आणि ज्या ठिकाणी तो दुसरा अर्थ प्रधान असेल, त्या ठिकाणी संपूर्ण वाक्य हे 'तत्पर' म्हणजे त्याला प्रकाशित करण्यासाठीच योजिलेले असल्याने त्या प्रधान अर्थाला वाच्यच म्हणणे योग्य होईल. आणि यामुळे तो प्रधान अर्थ प्रकट करणाऱ्या वाक्याचा जो व्यापार असतो, तो वाचकत्व हाच होय. त्या अर्थाचा बोध करून देण्यासाठी त्या वाक्याचा दुसरा वेगळा व्यापार कल्पावयाची काय आवश्यकता आहे? म्हणून वक्त्याला (वाक्याच्या द्वारा सरतेशेवटी) अभिप्रेत असलेला जो अर्थ, तोच इतर कोठल्याही अर्थापेक्षा मुख्य असल्याने 'वाच्य' होय. आणि अशा ठिकाणी मध्येच जी त्याहून निराळ्या वाच्य अर्थाची प्रतीति होते, ती त्या मुख्य असलेल्या अर्थाच्या प्रतीतीचे केवळ साधनच असते, जसे पदाच्या अर्थाचे ज्ञान हे वाक्याच्या अर्थाच्या ज्ञानाचे साधन असते, त्याप्रमाणे".

याबाबतीत आमचे म्हणणे असे :–

ज्या ठिकाणी शब्द स्वतःचा (प्रसिद्ध) अर्थ सांगून शिवाय दुसऱ्या अर्थाचा बोध करून देतो, त्या ठिकाणी त्याचा स्वतःचा अर्थ सांगण्याचा जो व्यापार आणि त्याचाच दुसऱ्या अर्थाचा बोध करून देण्याचा जो व्यापार, त्या दोहोंमध्ये काही फरक नाही किंवा आहे? फरक नाही असे तर म्हणता येणार नाही. कारण त्या दोन व्यापारांचे स्वरूप, आणि विषय म्हणजे त्या व्यापारांनी प्रकट केले जाणारे अर्थ, वेगवेगळे असल्याचे निर्विवादपणे अनुभवास येते. म्हणजे असे की, शब्दाचा 'वाचकत्व हा व्यापार शब्दाच्या स्वतःच्या (म्हणजे प्रसिद्ध) अर्थाचा बोध करून देतो, तर गमकत्व हा व्यापार शब्दाच्या स्वतःच्या प्रसिद्ध अर्थाहून निराळ्या अर्थाचा बोध करून देतो. वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांचे शब्दांशी असलेले स्वकीयत्वाचे आणि परकीयत्वाचे (म्हणजे जवळचे आणि दूरचे) नाते नाकबूल करणे शक्य नाही. कारण त्या दोहोंपैकी एक शब्दाचा (निकट) संबंधी, तर दुसरा शब्दाच्या 'संबंधीचा संबंधी' असल्याचे अनुभवास येते. कारण वाच्य अर्थ हा

शब्दाचा प्रत्यक्ष संबंधी असतो तर त्याहून निराळा असणारा अर्थ वाच्यार्थाच्या सामर्थ्यामुळे प्रतीत झालेला म्हणजे संबंधीचा संबंधी असतो. आणि जर दुसरा अर्थ हा शब्दाचा स्वतःचा प्रत्यक्ष संबंधी असता, तर त्याला 'निराळा' अर्थ असे कोणी म्हटलेच नसते. म्हणून त्या दोन (अभिधा व व्यंजना या) व्यापाराचे विषय (म्हणजे त्यांनी बोधित केलेले अर्थ) भिन्न आहेत, हे अगदी स्पष्ट आहे.

लोचनम्

उद्द्योतारम्भे यदुक्तं व्यञ्जकमुखेन ध्वनेः स्वरूपं प्रतिपाद्यत इति तदिदानीमुपसंहरन् व्यञ्जकभावं प्रथमोद्द्योते समर्थितमपि शिष्यानामेकप्रघट्टकेन हृदि निवेशयितुं पूर्वपक्षमाह— तदेवमिति । कश्चिदिति । मीमांसकादिः । किमिदमिति । वक्ष्यमाणश्चोदकस्याभिप्रायः । प्रागेवेति । प्रथमोद्द्योते अभाववादनिराकरणे । अतश्च न व्यञ्जकसिद्ध्या तत्सिद्धिर्येनान्योन्याश्रयः शङ्क्येत, अपि तु हेत्वन्तरैस्तस्य साधितत्वादिति भावः । तदाह—तत्सिद्धीति ।

स त्विति । अस्त्वसौ द्वितीयोऽर्थः, तस्य यदि व्यङ्ग्य इति नाम कृतम्, वाच्य इत्यपि कस्मान्न क्रियते? व्यङ्ग्य इति वा वाच्याभिमतस्यापि कस्मान्न क्रियते? अवगम्यमानत्वेन हि शब्दार्थत्वं तदेव वाचकत्वम् । अभिधा हि यत्पर्यन्ता तत्रैवाभिधायकत्वमुचितम्, तत्पर्यन्तता च प्रधानीभूते तस्मिन्नर्थे— इति मूर्धाभिषिक्तं ध्वनेर्यद्रूपं निरूपितं तत्रैवाभिधाव्यापारेण भवितुं युक्तम् । तदाह— यत्र चेति । तत्प्रकाशिन इति । तद्व्यङ्ग्याभिमतं प्रकाशयत्यवश्यं यद्वाक्यं तस्येति ।

उपायमात्रमित्यनेन साधारण्योक्त्या भाट्टं प्राभाकरं वैयाकरणं च पूर्वपक्षं सूचयति । भाट्टमते हि—

वाक्यार्थमितये तेषां प्रवृत्तौ नान्तरीयकम् ।
पाके ज्वालेव काष्ठानां पदार्थप्रतिपादनम् ॥

इति शब्दावगतैः पदार्थैस्तात्पर्येण योऽर्थ उत्थाप्यते स एव वाक्यार्थः, स एव च वाच्य इति । प्राभाकरदर्शनेऽपि दीर्घदीर्घो व्यापारो निमित्तिनि वाक्यार्थे, पदार्थानां तु निमित्तभावः पारमार्थिक एव । वैयाकरणानां तु सोऽपारमार्थिक इति विशेषः । एतच्चास्माभिः प्रथमोद्द्योत एव वितत्य निर्णीतमिति न पुनरायस्यते ग्रन्थयोजनैव तु क्रियते । तदेतन्मतत्रयं पूर्वपक्षे योज्यम् ।

अत्रेति पूर्वपक्षे । उच्यत इति सिद्धान्तः । वाचकत्वं गमकत्वं चेति स्वरूपतो भेदः, स्वार्थेऽर्थान्तरे क्रमेणेति विषयतः । ननु तस्माच्चेदसौ गम्यतेऽर्थः कथं तर्ह्युच्यतेऽर्थान्तरमिति । नो चेत्स तस्य न कश्चिदिति को विषयार्थ इत्याशङ्क्याह— न चेति ।

न स्यादिति । एवकारो भिन्नक्रमः, नैव स्यादित्यर्थः । यावता न साक्षात्सम्बन्धित्वं तेन युक्त एवार्थान्तरव्यवहार इति विषयभेद उक्तः ।

लोचन

(या तिसऱ्या) उद्‌द्योताच्या प्रारंभी[२] 'आता व्यंजकांच्या दृष्टीने ध्वनीचे स्वरूप व त्याचे प्रकार दाखविले जात आहेत' असे जे म्हटले होते, त्याचा आता समारोप करिताना व्यंजकत्वाची सिद्धि जरी पहिल्या उद्‌द्योतात (निरनिराळ्या ठिकाणी) करून दाखविली असली, तरी वाचकांच्या मनात एकाच सलग भागाने ती ठसविण्याच्या उद्देशाने वृत्तिकार 'तेव्हा त्याप्रमाणे' इ. शब्दांनी पूर्वपक्ष मांडतात. 'एखादा'– म्हणजे मीमांसक वगैरे.[३] 'हे व्यंजकत्व म्हणजे काय प्रकार आहे?'– (येथपासून पुढे) आक्षेपकाचे मत (लगेच) सांगण्यात येणार आहे. 'पूर्वीच' म्हणजे पहिल्या उद्‌द्योतात 'अभाववादा' चे खंडन करतेवेळी.[४] आणि म्हणूनच व्यंग्यार्थाची सिद्धि ही व्यंजकाच्या सिद्धीवर अवलंबून नाही. तसे असते, तर अन्योन्याश्रय या दोषाची शंका घेणे शक्य झाले असते. उलट निरनिराळ्या प्रमाणांनी व्यंग्यार्थाची सिद्धि केली असल्यामुळे (व्यंग्यार्थाची सिद्धि व्यंजकाच्या सिद्धीवर अवलंबून नाही). म्हणूनच वृत्तिकार "व्यंजकाची सिद्धि ही आपोआप" इ. विधान करितात. "पण त्या अर्थाला"– तो दुसरा अर्थ अस्तित्वात असेना का, पण त्याला तुम्ही जर (केवळ आपल्या इच्छेने) "व्यंग्य" असे नाव दिले असेल, तर त्याला "वाच्य" असेही नाव काय म्हणून देत नाही? किंवा तुम्ही ज्याला "वाच्य" म्हणता, त्याला "व्यंग्य" असे नाव का देत नाही.? कारण उच्चारलेल्या शब्दावरून जो त्या शब्दाचा अर्थ म्हणून ध्यानात येतो तो त्या शब्दाचा वाच्यार्थ होय. आणि जो त्या (वाच्य) अर्थांचा बोध करून देतो, तो त्या अर्थाचा वाचक होय. कारण शब्दाच्या अभिधेचे पर्यवसान ज्या अर्थात होते, त्या अर्थाचाच तो शब्द वाचक असतो असे म्हणणे[५] योग्य होईल. आणि त्या अभिधेचे पर्यवसान प्रधान असलेल्या त्या (म्हणजे तुम्ही ज्याला व्यंग्य म्हणता, त्या) अर्थातच होत असते, म्हणून तुम्ही ध्वनीचा जो (रसादि हा) प्रकार सर्वश्रेष्ठ म्हणून वर्णिला,[६] तोच अभिधाव्यापाराने ज्ञात होतो असे मानणे योग्य होईल. तेच वृत्तिकार "आणि ज्या ठिकाणी" इ शब्दांनी सांगतात. 'तो प्रधान अर्थ प्रकट करणाऱ्या'– त्या म्हणजे तुम्हाला व्यंग्य म्हणून अभिप्रेत असलेल्या अर्थाचा प्रत्यय जे वाक्य हमखास[७] घडवते, त्या वाक्याचा. 'केवळ साधनच'– (भाट्ट, प्राभाकर व वैयाकरण या) तिघांनाही लागू पडणाऱ्या या (म्हणजे 'केवळ साधनच' या) शब्दप्रयोगाने वृत्तिकार भाट्ट, प्राभाकर व वैयाकरण या तिघांचीही मते 'पूर्वपक्ष' म्हणून सुचवितात. कारण भाट्टांच्या मतानुसार–

वाक्याच्या अर्थाचे ज्ञान होण्यासाठी शब्दांचा जो व्यापार घडून येतो, त्याच्या बाबतीत शब्दांनी प्रथम आपापल्या अर्थांचा बोध करून देणे ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे.[९] जसे अन्न शिजविताना लाकडांनी पेट घेणे ही एक आवश्यक गोष्ट असते, तसे.[१०]

अशा प्रकारे उच्चारलेल्या शब्दांपासून ज्ञात होणाऱ्या अर्थाकडून मुख्य म्हणून ज्या (एकमुखी) अर्थाचा बोध करून दिला जातो, तोच वाक्याचा अर्थ होय, आणि तोच शब्दांचा वाच्य अर्थ होय.[११] प्राभाकर मीमांसकांच्या मताप्रमाणेही शेवटी वाक्याचे कार्य म्हणून जो वाक्यार्थ प्रतीत होतो, त्याचा बोध करून देणारे कारण लांब लांब पसरत जाणारा अभिधाव्यापार हे होय. व सुट्या शब्दांचे अर्थ ही त्या संपूर्ण वाक्यार्थाच्या बोधाची खरीखुरी निमित्ते होत. पण वैयाकरणांच्या मते शब्दांचे (वाच्य) अर्थ ही वाक्यार्थाच्या बोधाघी खरी कारणे नव्हेत.[१२] हाच वैयाकरण व प्राभाकर मीमांसक यांच्या मतांतील फरक होय. आणि या विषयाचा निर्णय आम्ही पहिल्या उद्‌द्योतातच सविस्तर विवरण करून केलेला असल्याने त्याबाबत आम्ही पुनः काही सांगण्याचे परिश्रम घेतले नाहीत पण ग्रंथाचा अर्थ तेवढा सांगितला. तेव्हा ही तिन्ही मते पूर्वपक्ष[१३] म्हणून समजावी.

'या बाबतीत' म्हणजे या 'पूर्वपक्षाच्या बाबतीत. आमचे म्हणणे' म्हणजे आमचा सिद्धांत (म्हणजेच सिद्धांत्याचे म्हणणे). वाचकत्व आणि गमकत्व या दोहोंमध्ये स्वरूपदृष्ट्या भेद आहे.[१४] आणि एकामुळे (म्हणजे वाचकत्वामुळे) स्वतःच्या (संकेतावर अवलंबून असलेल्या) अर्थाचा बोध होतो. आणि दुसऱ्यामुळे म्हणजे व्यंजकत्वामुळे त्याहून निराळया अर्थाचा बोध होतो. असा त्यांमध्ये अनुक्रमे "विषय" दृष्ट्या फरक आहे. "पण काय हो, तो दुसरा अर्थ जर त्या शब्दापासूनच समजत असेल तर त्याला तुम्ही 'निराळा अर्थ' असे काय म्हणून म्हणता? आणि तो दुसरा अर्थ त्या शब्दापासून समजत नसेल, तर त्या अर्थाचा व त्या शब्दाचा काहीही संबध नाही असे होईल व मग त्याला त्या शब्दाचा विषय (अर्थ) म्हणण्यात काय औचित्य आहे?" अशी शंका कल्पून वृत्तिकार तिला "आणि वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांचे" इ. शब्दांनी उत्तर देतात. "म्हटलेच नसते"– यातील 'च' ची ('म्हटले या शब्दाच्या जवळची) जागा बदलून तो शब्द 'नसते' या शब्दाला जोडावा म्हणजे "म्हटले नसतेच" असा अर्थ करावा. ज्या अर्थी त्या दुसऱ्या अर्थाचा शब्दाशी प्रत्यक्ष (म्हणजे निकटचा) संबंध नाही, त्या अर्थी व त्याला 'निराळा अर्थ' म्हणणे हे योग्यच आहे. अशा तऱ्हेने वाचकत्व व व्यंजकत्व यांच्या विषयांतील (म्हणजे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांमधील) भेद वृत्तिकारांनी स्पष्ट केला.

टीपा

१) शांकरभाष्यामध्ये या 'अन्योन्यसंश्रय' किंवा 'इतरेतराश्रय' दोषाच्या संदर्भात 'कुण्डबदरन्याया'चा उल्लेख केला आहे. 'कुण्ड कोठे आहे?' असे एकाने विचारले असता 'बोरीच्या झाडाजवळ' असे दुसऱ्याने उत्तर दिले. 'आणि बोरीचे झाड कोठे आहे?' असे विचारता 'कुण्डाजवळ' असे उत्तर मिळाले. यामुळे कुण्ड व बदर यांच्या स्थानाविषयी नक्की काहीच बोध होऊ शकत नाही. दोहोंपैकी एकतरी कोठे आहे हे नक्की माहीत असले, तरच दुसरे त्याच्याजवळ आहे असे म्हणणे ठीक आहे. पण दोहोंपैकी कोणतेच कोठे आहे याचा पत्ता नसताना पहिले दुसऱ्याजवळ व दुसरे पहिल्याजवळ आहे असे म्हटल्याने त्या दोनपैकी एकाचीही सिद्धि होत नाही. अशा रीतीने एकाची सिद्धि दुसऱ्यावरच अवलंबून व दुसऱ्याची पहिल्यावरच अवलंबून अशी परिस्थिति असणे याला 'अन्योन्यसंश्रय' दोष म्हणतात.

२) म्हणजे द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'अविवक्षितवाच्य ध्वनीच्या अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य प्रकारांच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे'" वर.

३) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'" वरील टीप १४ वी व त्यापुढील टीप ५३ वी यामधील अभिहितान्वयवादी व अन्विताभिधानवादी यांची मते. काव्यप्रकाश उल्लास ५ ही पाहा.

४) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'ध्वनीबद्दलच्या आनंदवर्धनकाली मतभेदांचा निर्देश' ते 'सारांश, व्यंग्यार्थयुक्त अलंकार वेगळे आणि 'ध्वनि' वेगळा'".

५) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'प्रतीयमानाचा 'वस्तु' हा प्रकार वाच्य अर्थाहून वेगळा, कारण (१) स्वरूपभेद'" वरील **यत्परः शब्दः स शब्दार्थः** हे वाक्य व दशरुपक ४–३७ या श्लोकावरील 'अवलोक' नामक टीकेमध्ये 'धनिका'ने उद्धृत केलेले त्याचे स्वतःचेच पुढील श्लोक :–

तात्पर्यानतिरेकाच्च व्यञ्जकत्वस्य न ध्वनिः ।
एतावत्येव विश्रान्तिस्तात्पर्यस्येति किंकृतम् ।
यावत्कार्यप्रसारित्वात् तात्पर्यं न तुलाधृतम् ॥

(व्यंग्यार्थ हा तात्पर्यार्थाहून निराळा नसल्यामुळे त्याला म्हणजे व्यंग्यार्थाला तात्पर्याहून वेगळे अस्तित्व नाही. वाक्यांचा तात्पर्यार्थ एका विशिष्ट ठिकाणीच संपतो हे कोणी ठरवले आहे? वाक्य ऐकल्यावर जितके अर्थ ध्यानात येतात, त्या सर्वांचा तात्पर्यातच समावेश होतो. म्हणून तात्पर्याच्या व्याप्तीला मर्यादा नाही.)

६) हे प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'प्रतीयमान अर्थाच्या प्रकारांत 'रसादि' प्रकार मुख्य होय'" वरील वृत्तीमधील शेवटच्या 'कारण रस, भाव'... इ. वाक्याला अनुलक्षून आहे.

७) 'हमखास घडविते' असे म्हणण्याचे कारण तो अर्थ प्रकट केल्याशिवाय त्या वाक्याच्या ठिकाणी कोणतेही सौंदर्य असल्याचे प्रत्ययास येणार नाही.

८) भाट्ट म्हणजे कुमारिल भट्टाचे अनुयायी व प्राभाकर म्हणजे प्रभाकर गुरूचे अनुयायी.

९) म्हणजे शब्द श्रवण आणि वाक्यार्थज्ञान यांच्या मध्ये शब्दांनी आपापले अर्थ प्रकट करणे हा एक आवश्यक टप्पा आहे.

१०) गजेंद्रगडकरांच्या मते हा श्लोक श्लोकवार्तिकाच्या वाक्याधिकरणातील ३४३ वा श्लोक आहे. काव्यप्रकाश (मुंबई, १९३९), पृ. २१३.

११) म्हणजे भाट्टमतानुसार वाक्यातील सुट्या शब्दांचे अर्थ हे संपूर्ण वाक्याच्या अर्थाच्या ज्ञानाचे साधन असून तथाकथित व्यंग्यार्थ हाही वाक्याचा अंतिम अर्थ असल्याने त्याचे ज्ञान वाक्यातील सुट्या शब्दांमुळे व त्यांच्या अभिधावृत्तीनेच होते. म्हणून व्यंग्य अर्थ हाही वाच्य अर्थच होय व अभिधावृत्तीहून वेगळी व्यंजनावृत्ति मानण्याचे कारण नाही.

१२) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्याचां पहिला वर्ग'" वरील टीप १७ व "उद्‌द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'" वरील टीप ७१. म्हणजे शब्दार्थ व वाक्यार्थ यांमधील कार्यकारणसंबंध प्राभाकर मीमांसक हे खरा मानितात, तर वैयाकरण तो संबंध काल्पनिक मानितात.

१३) पूर्वपक्ष म्हणजे ध्वनिसिद्धातांचा पूर्वपक्ष.

१४) कारण (१) जेथे वाचकशक्ति नाही, तेथेही व्यंजकशक्ति असू शकते. आणि (२) एक (म्हणजे वाचकत्व हे) संकेतावर अवलंबून असते व दुसरे 'गमकत्व' हे संकेतावर अवलंबून नसते.

ध्वन्यालोकः

रूपभेदोऽपि प्रसिद्ध एव । न हि यैवाभिधानशक्तिः सैवावगमनशक्तिः । अवाचकस्यापि गीतशब्दादे रसादिलक्षणार्थावगमदर्शनात् । अशब्दस्यापि चेष्टादेरर्थविशेषप्रकाशनप्रसिद्धेः । तथाहि— 'व्रीडायोगान्नतवदनया' इत्यादिश्लोके चेष्टाविशेषः सुकविनार्थप्रकाशनहेतुः प्रदर्शित एव । तस्माद्भिन्नविषयत्वाद्भिन्नरूपत्वाच्च स्वार्थाभिधायित्वमर्थान्तरावगमहेतुत्वं च शब्दस्य यत्तयोः स्पष्ट एव भेदः । विशेषश्चैन्न तर्हीदानीमवगमनीयस्याभिधेयसामर्थ्याक्षिप्तस्यार्थान्तरस्य वाच्यत्वव्यपदेश्यता । शब्दव्यापारगोचरत्वं तु तस्यास्माभिरिष्यत एव, तत्तु व्यङ्ग्यत्वेनैव, न वाच्यत्वेन । प्रसिद्धाभिधानान्तरसम्बन्धयोग्यत्वेन च तस्यार्थान्तरस्य प्रतीतेः शब्दान्तरेण स्वार्थाभिधायिना यद्विषयीकरणं तत्र प्रकाशनोक्तिरेव युक्ता ।

ध्वन्यालोक

आणि त्या व्यापारांची स्वरूपेही वेगवेगळी आहेत, ही गोष्ट अगदी उघडच आहे. कारण वाच्यार्थ प्रकट करण्याची जी शक्ति, तीच काही व्यंग्यार्थाचा बोध करून देणारी शक्ति नव्हे. कारण 'वाचक' नसलेले म्हणजे वाच्यार्थ प्रकट करू न शकणारे जे गाण्याचे सूर वगैरे, त्यांपासून रसादि स्वरूपाच्या अर्थाची प्रतीति झालेली दिसते. (इतकेच नव्हे, तर) ज्यांना शब्दाचे देखील स्वरूप नाही, ते (शारीरिक) हावभाव वगैरेसुद्धा विशिष्ट अर्थ (म्हणजे व्यंग्यार्थ) प्रकट करू शकतात, हे सर्वांच्या परिचयाचे आहे. उदा.— 'वडील माणसे जवळ होती म्हणून तिने लज्जेने आपले मुख खाली केले होते'... इ.[१] श्लोकात. ते पद्य रचणाऱ्या कविवराने दाखवून दिलेच आहे की, विशिष्ट हालचालीदेखील (विशिष्ट) अर्थ सुचवायला कारणीभूत होतात.[२] म्हणून शब्दाच्या ठिकाणचा स्वतःचा (प्रसिद्ध) अर्थ प्रकट करण्याचा व्यापार आणि त्याहून दुसरा अर्थ ज्ञात करून देण्याचा व्यापार या दोन व्यापारांचे विषय (म्हणजे अर्थ) आणि स्वरूपेही वेगवेगळी असल्यामुळे हे दोन व्यापारही भिन्न आहेत, हे स्पष्टच आहे. आणि त्या दोन व्यापारांमध्ये जर वेगळेपण असले, तर मग आता सूचित केल्या जाणाऱ्या आणि वाच्यार्थाच्या सामर्थ्याने प्रकट होणाऱ्या दुसऱ्या अर्थाला 'वाच्य' हे नाव देणे योग्य होणार नाही. मात्र तो दुसरा अर्थही शब्दाच्या (व्यंजनारूपी) व्यापाराने ज्ञात होणारा आहे, हे आम्हालाही इष्टच आहे. पण तो 'व्यंग्य' म्हणून; 'वाच्य' म्हणून नाही. त्या दुसऱ्या (म्हणजे व्यंग्य) अर्थाचे वाचक म्हणून प्रसिद्ध असलेले शब्दच वापरणे योग्य आहे, हे (वक्त्याला) माहीत असताना ज्यावेळी तो दुसरा अर्थ, त्याचे वाचक शब्द न वापरता, ज्यांचा वाच्यार्थ निराळा आहे अशा शब्दांच्या द्वारे (वक्त्याकडून) प्रकट केला जातो, त्यावेळी या प्रकटीकरणाला 'प्रकाशन' म्हणणेच योग्य होईल ('अभिधान' म्हणणे नव्हे.)[३]

लोचनम्

ननु भिन्नेऽपि विषये अक्षशब्दादेर्बह्वर्थस्य एक एवाभिधालक्षणो व्यापार इत्याशङ्क्य रूपभेदमुपपादयति—रूपभेदोऽपीति । प्रसिद्धिमेव दर्शयति— न हीति । विप्रतिपन्नं प्रति हेतुमाह— अवाचकस्यापीति । यदेव वाचकत्वं तदेव गमकत्वं यदि स्यादवाचकस्य गमकत्वमपि न स्यात्, गमकत्वे नैव वाचकत्वमपि न स्यात् । न चैतदुभयमपि । गीतशब्दे शब्दव्यतिरिक्ते चाधोवक्त्रत्वकुचकम्पनबाष्पावेशादौ तस्यावाचकस्याप्यवगमकारित्वदर्शनादवगमकारिणोऽप्यवाचकत्वेन प्रसिद्धत्वादिति तात्पर्यम् ।

एतदुपसंहरति– तस्माद्भिन्नेति । न तर्हीति । वाच्यत्वं ह्यभिधाव्यापारविषयता न तु व्यापारमात्र विषयता, तथात्वे तु सिद्धसाधनमित्येतदाह– शब्दव्यापारेति ।

ननु गीतादौ मा भूद्वाचकत्वमिह त्वर्थान्तरेऽपि शब्दस्य वाचकत्वमेबोच्यते, किं हि तद्वाचकत्वं सङ्कोच्यत इत्याशङ्क्याह– प्रसिद्धेति । शब्दान्तरेण तस्यार्थान्तरस्य यद्विषयीकरणं तत्र प्रकाशनोक्तिरेव युक्ता न वाचकत्वोक्तिः शब्दस्य, नापि वाचयतोक्तिरर्थस्य तत्र युक्ता । वाचकत्वं हि समयवशादव्यवधानेन प्रतिपादकत्वं, यथा तस्यैव शब्दस्य स्वार्थे, तदाह– स्वार्थाभिधायिनेति । वाच्यत्वं हि समयबलेन निर्व्यवधानं प्रतिपाद्यत्वं यथा तस्यैवार्थस्य शब्दान्तरं प्रति, तदाह– प्रसिद्धेति । प्रसिद्धेन वाचकतयाभिधानान्तरेण यः सम्बन्धो वाच्यत्वं तदेव तत्र वा यद्योग्यत्वं तेनोपलक्षितस्य । न चैवंविधं वाचकत्वमर्थ प्रति शब्दस्येहास्ति, नापि तं शब्दं प्रति तस्यार्थस्योक्तरूपं वाच्यत्वम् । 'यदि नास्ति तर्हि कथं तस्य विषयीकरणमुक्तम्' इत्याशङ्क्याह– प्रतीतेरिति । अथ च प्रतीयते सोऽर्थो न च वाच्यवाचकव्यापारेणेति विलक्षण एवासौ व्यापार इति यावत् ।

लोचन

"पण काय हो, 'अक्ष' वगैरे शब्दाचेही (कोशात) वेगवेगळे अर्थ आहेत,[४] पण ते अर्थ प्रकट करण्याच्या बाबतीत त्यांचा एकच, 'अमिधा' या स्वरूपाचा व्यापार मानिला जातो" अशी शंका कल्पून वृत्तिकार तिचे समाधान करण्यासाठी त्या दोन व्यापारांची स्वरूपे कशी भिन्न आहेत, हे 'आणि त्या व्यापारांची स्वरूपेही' इ. शब्दांनी पटवून देतात. ही गोष्ट अगदी उघड आहे, हे वृत्तिकार '**कारण वाच्यार्थ**' इ. शब्दांनी प्रकट करितात. इतके सांगूनही प्रतिपक्षी जर 'वाचकत्व व गमकत्व एकच होत' याच मताला चिकटून राहिला, तर त्याची खात्री पटविण्यासाठी वृत्तिकार 'कारण वाचक नसलेले' इ. शब्दांनी आपल्या मताचे समर्थन करितात. वाचकत्व हेच जर गमकत्व (म्हणजे व्यंजकत्व) असते, तर जे वाचक नाही,[५] ते गमकही (म्हणजे व्यंजकही) असणार नाही आणि जे गमक (म्हणजे व्यंजक) आहे त्याच्या ठिकाणी वाचकत्वही नाही असे होणार नाही (म्हणजे वाचकत्व असणारच). पण हे दोन्ही निष्कर्ष बरोबर नाहीत, कारण गाण्याचे सूर वगैरेंमध्ये, तसेच जे (शब्द म्हणजे) आवाज या स्वरूपाचेही नाहीत, त्यांमध्ये म्हणजे लज्जेने मान खाली घालणे,[६] ऊर वरखाली होणे, अश्रूंचा आवेग येणे वगैरे (क्रियां)– मध्ये वाचकत्व नसूनसुद्धा गमकत्व असल्याचे आढळते. तसेच गमक (म्हणजे व्यंजक) असलेल्या क्रियासुद्धा वाचक नसल्याचे लोकप्रसिद्ध आहे, हे तात्पर्य. आता या विषयाचा समारोप वृत्तिकार 'म्हणून शब्दाच्या ठिकाणचा' इ. शब्दांनी करितात. 'तर मग... होणार नाही'– कारण वाच्य असणे याचा अर्थ अमिधा या विशिष्ट व्यापाराने प्रकट होणे हा होय, कोणत्याही व्यापाराने प्रकट होणे हा नव्हे. तसे (म्हणजे वाच्य असणे म्हणजे कोणत्याही व्यापाराने प्रकट होणे असे) जर तुमचे मत असेल, तर तुम्ही आम्हाला इष्ट असलेलेच मत मान्य करीत आहात असे होईल, हे वृत्तिकार 'शब्दाच्या (व्यंजना) व्यापाराने ज्ञात होणारा आहे' इ. शब्दांनी सांगतात.

'पण काय हो, गाण्याचे सूर वगैरेंमध्ये[७] वाचकत्व नसेना का! पण येथे म्हणजे काव्यामध्ये जेव्हा एखादा शब्द आपल्या प्रसिद्ध अर्थाहून निराळा अर्थ प्रकट करितो, तेव्हा त्या दुसऱ्या अर्थाच्या बाबतीतही शब्दाच्या ठिकाणी वाचकत्व हाच धर्म असतो असे आमचे[८] म्हणणे आहे. ते (दोन्ही अर्थ प्रकट करणारे) वाचकत्व[९] तुम्ही पहिल्या अर्थापुरतेच मर्यादित का करिता?' अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'तर... म्हणून प्रसिद्ध असलेले' इ. शब्दांनी उत्तर देतात. तो दुसरा अर्थ त्याच्या वाचक शब्दाखेरीज निराळ्या

शब्दाने प्रकट करणे याला 'प्रकाशन' म्हणणेच योग्य, त्या निराळ्या शब्दाला त्या अर्थाचा वाचक म्हणणे योग्य नाही, आणि त्या दुसऱ्या अर्थाला वाच्य अर्थ म्हणणेही उचित नाही. कारण वाचकत्व म्हणजे संकेताच्या सामर्थ्याने ताबडतोब[१०] अर्थ प्रकट करणे. जसे त्याच शब्दाचे[११] स्वतःच्या प्रसिद्ध अर्थाच्या बाबतीत वाचकत्व असते. हाच आशय वृत्तिकार 'ज्यांचा वाच्यार्थ निराळा आहे अशा शब्दांच्या द्वारे' इ. वाक्याने सांगतात. 'वाच्य' असणे म्हणजे संकेताच्या सामर्थ्याने ताबडतोब प्रकट केले जाणे, जसे तोच अर्थ[१२] विशिष्ट शब्दांनी[१३] वाच्य झालेला असतो, हे वृत्तिकार 'वाचक म्हणून प्रसिद्ध असलेले' इ. शब्दांनी सांगतात. 'प्रसिद्धाशी' म्हणजे वाचक म्हणून प्रसिद्ध असलेल्या दुसऱ्या शब्दाशी जो संबंध म्हणजे वाच्यत्व, तेच जे योग्यत्व किंवा त्याच्या बाबतीतले[१४] जे योग्यत्व, त्या योग्यत्वाने विशिष्ट[१५] किंवा युक्त असलेल्या त्या दुसऱ्या अर्थाची प्रतीति होत आहे असे वक्त्याला माहीत असताना. आणि येथे[१६] या अर्थाच्या बाबतीत शब्दांच्या ठिकाणी[१७] वर सांगितलेल्या प्रकारचे वाचकत्व असत नाही, किंवा त्या (म्हणज, 'गंगा' या) शब्दाच्या बाबतीत त्या (म्हणजे थंडपणा, पावित्र्य या) अर्थाचे ठिकाणी वर सांगितल्याप्रकारचे 'वाच्यत्व' असत नाही. '(पण काय हो,) जर (थंडपणा, पावित्र्य) हा (गंगा शब्दाचा) वाच्यार्थ नसेल, तर तो (म्हणजे थंडपणा इ.) अर्थ त्या शब्दाकडून प्रकट होतो असे वृत्तीमध्ये कसे म्हटले?' अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'त्या दुसऱ्या अर्थाची प्रतीति' इ. वाक्याने उत्तर देतात. आणि तो (म्हणजे थंडपणा, पावित्र्य हा) अर्थ (गंगा या शब्दाच्या द्वारे सहृदयांना) प्रतीत तर होतो, पण वाच्य–वाचक व्यापाराने (म्हणजे अभिधेने) प्रतीत होत नाही असे असल्यामुळे तो व्यापार अभिधेहून निराळाच आहे, असा आशय.

टीपा

१) पाहा, हाच उद्‌द्योत, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'त्याच प्रकारच्या ध्वनीला वद व पदाचा अंशही प्रकट करू शकतात याची उदाहरणे'".

२) पूर्वी हे 'वडील माणसे जवळ होती'... इ. उदाहरण 'त्रिभाग' (कटाक्ष, एक तृतीयांश भाग) या पदावयवाचे व्यंजकत्व दाखविण्यासाठी दिले होते. पण त्या श्लोकामधील नायिकेच्या विशिष्ट हालचालीसुद्धा प्रवासविप्रलंभाच्या परिस्थितीमधील भावनांच्या सूचक आहेत, असेही आता सांगितले जात आहे.

३) हा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी 'गंगेवर गौळीवाडा आहे' हे उदाहरण घेऊ. कमालीचा थंडपणा, पावित्र्य इ. अर्थ 'गंगा' या शब्दामुळे जेव्हा प्रतीत होतो, तेव्हा त्या अर्थाचे वाचक शब्द म्हणजे 'कमालीचा थंडपणा व पावित्र्य' हेच होत. ते शब्द वापरून जर त्या अर्थाची प्रतीति घडविली असती, तर ती वाचकत्वाने म्हणजे अभिधेने झाली असे म्हणणे योग्य झाले असते. पण 'कमालीचा थंडपणा, पावित्र्य' वगैरे शब्द न वापरता 'विशिष्ट जलप्रवाह' हा वाच्यार्थ असलेला 'गंगा' शब्द वापरून त्या द्वारे 'कमालीचा थंडपणा' वगैरे अर्थाची प्रतीति करून दिली जात असल्यामुळे ती व्यंग्यत्वाने होते असेच म्हणणे योग्य आहे, वाच्यत्वाने होते असे म्हणणे बरोबर नाही.

४) अक्ष या शब्दाचे कोशात (१) इंद्रिय (२) द्यूतक्रीडेतील फासा आणि (३) गाडीचा आस असे अनेक अर्थ दिले आहेत.

५) वाचकत्व व गमकत्व हे पूर्वपक्षाच्या म्हणण्याप्रमाणे एकच म्हणजे समव्याप्तिक आहेत असे मानिल्यास चार निष्कर्ष निघू शकतील :— (१) जेथे वाचकत्व आहे तेथे गमकत्व आहे (२) जेथे वाचकत्व नाही तेथे गमकत्व नाही (३) जेथे गमकत्व आहे तेथे वाचकत्व आहे (४) जेथे गमकत्व नाही तेथे वाचकत्व नाही. या चार निष्कर्षांपैकी २ व ४ यांचाच अभिनव गुप्तांनी येथे निर्देश केला आहे.

६) या क्रियांचा संबंध द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'त्याच प्रकारच्या ध्वनीला वद व पदाचा अंशही प्रकट करू शकतात याची उदाहरणे'"वरील 'वडील माणसे जवळ होती, म्हणून'... इ. श्लोकाशी आहे.

७) वगैरेंमध्ये म्हणजे शब्दस्वरूपी नसलेल्या हावभावांमध्ये.

८) आमचे म्हणजे मीमांसक वगैरेंचे.

९) प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'अन्विताभिधानवाद'" वरील 'आणि अन्विताभिधानवादी' इ. मजकूर.

१०) **अव्यवधानेन** या शब्दाच्या 'ताबडतोब' या अर्थासाठी पाहा, काव्यप्रकाश २–७ मधील **साक्षात्संकेतितम्** हा शब्दप्रयोग.

११) उदा. गंगा' हा शब्द स्वतःच्या "विशिष्ट जलप्रवाह" या अर्थाचा वाचक आहे किंवा शैत्य व पावनत्व हे शब्द अनुक्रमे थंडपणा व पावित्र्य या अर्थांचे वाचक आहेत.

१२) म्हणजे थंडपणा व पावित्र्य हे अर्थ किंवा विशिष्ट जलप्रवाह हा अर्थ.

१३) म्हणजे शैत्य, पावनत्व या शब्दांनी किंवा गंगा या शब्दाने.

१४) म्हणजे 'थंडपणा, पावित्र्य' या अर्थाच्या बाबतीतले.

१५) उदा. थंडपणा, पावित्र्य हा दुसरा अर्थ शैत्य, पावनत्व या दुसऱ्या शब्दांशी संबंध असण्यास योग्य आहे अशी प्रतीति होत असल्यामुळे. अभिनवगुप्तांनी **योग्यत्वेन** ही **उपलक्षणे** तृतीया घेऊन **योग्यत्वेन उपलक्षितस्य अर्थान्तरस्य प्रतीतिः** असा केला आहे.

१६) म्हणजे 'गंगेवर गौळीवाडा आहे' या उदाहरणात.

१७) म्हणजे 'गंगा' या शब्दाच्या ठिकाणी.

ध्वन्यालोकः

न च पदार्थवाक्यार्थन्यायो वाच्यव्यङ्ग्ययोः । यतः पदार्थप्रतीतिरसत्यैवेति कैश्चिद्विद्वद्भिरास्थितम् । यैरप्यसत्यत्वमस्या नाभ्युपेयते तैर्वाक्यार्थपदार्थयोर्घटतदुपादानकारणन्यायोऽभ्युपगन्तव्यः । यथाहि घटे निष्पन्ने तदुपादानकारणानां न पृथगुपलम्भस्तथैव वाक्ये तदर्थे वा प्रतीते पदतदर्थानाम् । तेषां तदा

विभक्ततयोपलम्भे वाक्यार्थबुद्धिरेव दूरीभवेत् । न त्वेष वाच्यव्यङ्ग्ययोर्न्यायः, न हि व्यङ्ग्ये प्रतीयमाने वाच्यबुद्धिर्दूरीभवति, वाच्यावभासाविनाभावेन तस्य प्रकाशनात् । तस्माद्घटप्रदीपन्यायस्तयोः, यथैव हि प्रदीपद्वारेण घटप्रतीतावुत्पन्नायां न प्रदीपप्रकाशो निवर्तते तद्वद्व्यङ्ग्यप्रतीतौ वाच्यावभासः । यत्तु प्रथमोद्द्योते 'यथा पदार्थद्वारेण' इत्याद्युक्तं तदुपायमात्रात् साम्यविवक्षया ।

नन्वेवं युगपदर्थद्वययोगित्वं वाक्यस्य प्राप्तं तद्भावे च तस्य वाक्यतैव विघटते, तस्या ऐकार्थ्यलक्षणत्वात् । नैष दोषः, गुणप्रधानभावेन तयोर्व्यवस्थानात् । व्यङ्ग्यस्य हि क्वचित्प्राधान्यं वाच्यस्योपसर्जनभावः, क्वचिद्वाच्यस्य प्राधान्यमपरस्य गुणभावः । तत्र व्यङ्ग्यप्राधान्ये ध्वनिरित्युक्तमेव । वाच्यप्राधान्ये तु प्रकारान्तरं निर्देक्ष्यते । तस्मात् स्थितमेतत् —व्यङ्ग्यपरत्वेऽपि काव्यस्य न व्यङ्ग्यस्याभिधेयत्वम्, अपि तु व्यङ्ग्यत्वमेव ।

किञ्च व्यङ्ग्यस्य प्राधान्येनाविवक्षायां वाच्यत्वं तावद्भवद्भिर्नाभ्युपगन्तव्यमतत्परत्वाच्छब्दस्य । तदस्ति तावद्व्यङ्ग्यः शब्दानां कश्चिद्विषय इति । यत्रापि तस्य प्राधान्यं तत्रापि किमिति तस्य स्वरूपमपह्नूयते । एवं तावद्वाचकत्वादन्यदेव व्यञ्जकत्वमः इतश्च वाचकत्वाद् व्यञ्जकत्वस्यान्यत्वं यद्वाचकत्वं शब्दैकाश्रयमितरत्तु शब्दाश्रयमर्थाश्रयं च शब्दार्थयोर्द्वयोरपि व्यञ्जकत्वस्य प्रतिपादितत्वात् ।

ध्वन्यालोक

आणि पदांच्या अर्थांचा बोध व वाक्याच्या अर्थाचा बोध यांमधील संबंध हा वस्तुतः वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांच्यामध्ये असणाऱ्या संबंधासारखा नाही. कारण पदांच्या अर्थाची प्रतीति ही खरी नव्हे, मिथ्याच आहे असे काही विद्वानांचे[१] म्हणणे आहे. आणि जे (विद्वान) ही प्रतीति खोटी मानीत नाहीत[२], त्यांनी वाक्याचा अर्थ आणि त्यांतील पदांचे अर्थ यांमधला संबंध घट आणि त्याचे उपादानकारण (म्हणजे माती) यांमधील संबंधासारखा मानिला पाहिजे. कारण ज्याप्रमाणे घट उत्पन्न झाल्यावर त्याची उपादान कारणे (मातीचे कण) घटाहून वेगळी असल्याचे जाणवत नाही, त्याप्रमाणे वाक्य म्हणा किंवा त्याचा अर्थ म्हणा, कळल्यानंतर पदे व त्यांचे अर्थ ही वेगळेपणाने जाणवत नाहीत्. आणि त्यावेळी म्हणजे वाक्यार्थाचे ज्ञान झाल्यावर त्यांचे म्हणजे पदार्थाचे वेगळेपणाने ज्ञान झाले, तर वाक्यार्थाची जाणीवच लुप्त होईल! पण असे काही वाच्यार्थ आणि व्यंग्यार्थ यांच्या बाबतीत होत नाही. कारण व्यंग्यार्थ प्रतीत होत असताना वाच्यार्थाचे ज्ञान काही लुप्त होत नाही, तर व्यंग्यार्थाचे भान हे वाच्यार्थाच्या भानासहच होत असते. म्हणून व्यंग्यार्थ व वाच्यार्थ यांमध्ये घट आणि दिवा यांसारखा संबंध असतो, कारण ज्याप्रमाणे दिव्यामुळे घटाचे दर्शन झाल्यावर दिव्याचा प्रकाश निवृत्त होत नाही, त्याप्रमाणे व्यंग्यार्थाचा प्रत्यय आल्यावर वाच्यार्थाचे भान दूर होत नाही. मात्र पहिल्या उद्द्योतामध्ये 'ज्याप्रमाणे वाक्यातील पदांचा अर्थ प्रथम'... वगैरे[३] म्हटले, ते केवळ दोहोंमध्ये एक दुसऱ्याचा उपाय असणे हे साम्य आहे इतकेच सांगण्याच्या इच्छेने म्हटले.[४]

(शंका)— 'पण काय हो, (तुम्ही म्हणता)' तसे असले (म्हणजे व्यंग्यार्थाचे ज्ञान झाल्यावर वाच्यार्थाचे भानही त्याच्याबरोबर होतच राहाते, असे असले), तर एक वाक्य (एकाच वेळी) दोन अर्थांचा बोध करून देते असा प्रसंग येईल! आणि तसे झाले म्हणजे त्याचा 'वाक्य'पणाच राहणार नाही, कारण त्याचे (म्हणजे वाक्यपणाचे) लक्षण '(संपूर्ण वाक्याने) एका अर्थाचे प्रतिपादन करणे' हे आहे.[५]'

(उत्तर)– त्यामुळे काही बिघडत नाही, कारण ते दोन अर्थ (म्हणजे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ) हे गौण व मुख्य या संबंधाने निगडित झालेले असतात. कारण काही उदाहरणात व्यंग्यार्थ प्रधान असतो व वाच्यार्थ त्याचा दुय्यम म्हणून असतो, तर काही ठिकाणी वाच्यार्थ प्रधान असून व्यंग्यार्थाला गौणपणा प्राप्त झालेला असतो. त्यांपैकी व्यंग्यार्थ प्रधान असेल तर ते ध्वनीचे उदाहरण होय हे पूर्वी (उद्द्योत १, कारिका १३ मध्ये) सांगितलेच आहे. आणि वाच्यार्थ प्रधान असल्यास तो काव्याचा दुसरा प्रकार असतो, हे पुढे (उद्द्योत ३, कारिका ३४ मध्ये) सांगितले जाईल. तेव्हा हे आता पक्के झाले की, एखाद्या काव्याचे पर्यवसान जरी व्यंग्यार्थातच होत असले, म्हणजे त्या काव्यात व्यंग्यार्थ हा मुख्य असला, तरी व्यंग्यार्थ कधी वाच्य असू शकत नाही, तर तो व्यंग्यच असतो.

आणखी असे की, व्यंग्यार्थ ज्या ठिकाणी प्रधान म्हणून विवक्षित नसेल, तेथे तर तुम्ही त्याला काही वाच्य म्हणू शकणार नाही; कारण शब्द त्या ठिकाणी 'तत्पर' म्हणजे व्यंग्यार्थाला मुख्यत्व देऊन प्रकट करण्यासाठी वापरलेले नसतात. तेव्हा (निदान गुणीभूतव्यङ्ग्य काव्याचे बाबतीत तरी) शब्दाला 'व्यंग्य' म्हणून काहीतरी अर्थ असतो, हे तर निश्चित झाले. मग जेथे तो व्यंग्यार्थ प्रधान असेल तेथेदेखील त्याचे स्वरूप नाकारण्याचा अट्टाहास कशाला करिता? तेव्हा एकतर अशा रीतीने व्यंजकत्व हे वाचकत्वाहून निराळेच आहे. आणि हे व्यंजकत्व वाचकत्वाहून वेगळे असण्याचे आणखी एक कारण असे की, वाचकत्व हे केवळ शब्दाच्याच ठिकाणी असते, तर व्यंजकत्व हे शब्द व अर्थ या दोहोंच्याही ठिकाणी असते, कारण शब्द व अर्थ हे दोन्हीही व्यंजक असतात, हे (मागे)[६] प्रतिपादन केले आहे.

लोचनम्

नन्वेवं मा भूद्वाचकशक्तिस्तथापि तात्पर्यशक्तिर्भविष्यतीत्याशङ्क्याह– न चेति । कैश्चिदिति वैयाकरणैः । यैरपीति भट्टप्रभृतिभिः । तमेव न्यायं व्याचष्टे– यथा हीति । तदुपादानकारणानामिति । समवायिकारणानि कपालानि अनयोक्त्या निरूपितानि । सौगतकापिलिकमते तु यद्यप्युपादातव्यघटकाले उपादानानां न सत्ता एकत्र क्षणक्षयित्वेन परत्र तिरोभूतत्वेन तथापि पृथक्तया नास्त्युपलम्भ इतीयत्यंशे दृष्टान्तः । दूरीभवेदिति । अर्थैकत्वस्याभावादिति भावः ।

एवं पदार्थवाक्यार्थन्यायं तात्पर्यशक्तिसाधकं प्रकृते विषये निरा कृत्याभिमतां प्रकाशनशक्तिं साधयितुं तदुचितं प्रदीपघटन्यायं प्रकृते योजयन्नाह– तस्मादिति । यतोऽसौ पदार्थवाक्यार्थन्यायो नेह युक्तस्तस्मात् । प्रकृतं न्यायं व्याकरणपूर्वकं दार्ष्टान्तिके योजयति– यथैव हीति । ननु पूर्वमुक्तम्–

यथा पदार्थद्वारेण वाक्यार्थः संप्रतीयते ।
वाच्यार्थपूर्विका तद्वत्प्रतिपत्तस्य वस्तुनः ॥

इति, तत्कथं स एव न्याय इह यत्नेन निराकृत इत्याशङ्क्याहयत्त्विति । तदिति । न तु सर्वथा साम्येनेत्यर्थः । एवमिति । प्रदीपघटवद्युगपदुभयावभासप्रकारेणेत्यर्थः । तस्या इति वाक्यतायाः । ऐकार्थ्यलक्षणम् । अर्थैकत्वाद्धि वाक्यमेकमित्युक्तम् । सकृत् श्रुतो हि शब्दो यत्रैव समयस्मृतिं करोति स चेदनेनैवावगमितः तद्विरम्य व्यापाराभावात् समयस्मरणानां बहूनां युगपदयोगात्कोऽर्थभेदस्यावसरः । पुनः श्रुतस्तु स्मृतो वापि नासाविति भावः । तयोरिति वाच्यव्यङ्ग्ययोः । तत्रेति । उभयोः प्रकारयोर्मध्याद्यदा प्रथमः प्रकार इत्यर्थः । प्रकारान्तरमिति गुणीभूतव्यङ्ग्यसंज्ञितम् । व्यङ्ग्यत्वमेवेति प्राधान्यत्वमेवेत्यर्थः ।

ननु यत्परः शब्दः स शब्दार्थ इति व्यङ्ग्यस्य प्राधान्ये वाच्यत्वमेव न्याय्यम् । तर्ह्यप्राधान्ये किं युक्तम्? व्यङ्ग्यत्वमिति चेत्, सिद्धो नः पक्षः, एतदाह– किं चेति । ननु प्राधान्ये मा भूद् व्यङ्ग्यत्वमित्याशङ्क्याह– यत्रापीति । अर्थान्तरत्वं सम्बन्धिसम्बन्धित्वमनुपयुक्तसमयत्वमिति व्यङ्ग्यतायां निबन्धनं, तच्च प्राधान्येऽपि विद्यत इति स्वरूपमहेयमेवेति भावः । एतदुपसंहरति– एवमिति । विषयभेदेन स्वरूपभेदेन चेत्यर्थः । तावदिति, वक्तव्यान्तरमासूत्रयति । तदेवाहइतश्चेति । अनेन सामग्रीभेदात्कारणभेदोऽप्यस्तीति दर्शयति । एतच्च वितत्य ध्वनिलक्षणे 'यत्रार्थः शब्दो वा' इति वाग्रहणं 'व्यङ्क्तः' इति द्विवचनं च व्याचक्षाणैरस्माभिः प्रथमोद्योत एव दर्शितमिति पुनर्न विस्तार्यते ।

लोचन

'पण काय हो, वर दाखविल्याप्रमाणे त्या दुसऱ्या (थंडपणा, पावित्र्य या) अर्थाचे ज्ञान करून देण्याचे काम (गंगा या शब्दाची) वाचकशक्ति करीत नसली, तर न करू दे, पण त्या दुसऱ्या अर्थाचा बोध तात्पर्यशक्तीने[७] होईल की!' अशी शंका कल्पून वृत्तिकार 'आणि पदांच्या अर्थाचा बोध' इ. शब्दांनी तिचे समाधान करितात. 'काही विद्वानांचे' म्हणजे वैयाकरणांचे. 'आणि जे (विद्वान)' म्हणजे कुमारिलभट्ट वगैरे.[८] त्याच (म्हणजे घट व त्याचे उपादानकारण या) दृष्टान्ताचे विवरण वृत्तिकार 'कारण ज्याप्रमाणे' इ. शब्दांनी करितात. 'त्याची उपादान कारणे'– या शब्दांनी घटाची समवायिकारणे[९] असलेल्या कपालांचा[१०] (म्हणजे मातीच्या कणांचा) निर्देश केला आहे. पण बुद्धाचे आणि कपिलाचे अनुयायी (बौद्ध आणि सांख्य) यांच्या मते कार्य जो घट, तो अस्तित्वात आल्यावर जरी उपादानकारणे असलेले मृत्तिकाकण त्याहून वेगळेपणाने अस्तित्वात नसतात– कारण पहिल्या म्हणजे बौद्धांच्या मतानुसार उपादानकारण हे क्षणात नष्ट होणारे असते, आणि दुसऱ्या म्हणजे सांख्य मतानुसार घट अस्तित्वात आल्यावर त्याची उपादानकारणे अदृश्य होतात म्हणजे निराळेपणाने दिसत नाहीत– तरीही कार्य (जो) घट (तो) पाहताना त्या उपादानकारणांचे घटाहून वेगळेपणाने भान होत नाही. अशा रीतीने वेगळेपणाने भान न होणे एवढ्या, (त्या दोघांना मान्य असलेल्या[११]) बाबतीत (म्हणजे उपादानकारणाचे निराळेपणाने ज्ञान होत नाही या बाबतीत) हा दृष्टान्त दिलेला आहे. 'जाणीवच लुप्त होईल'– कारण एका वाक्यातूत एकाच अर्थाचा बोध व्हावा या नियमाला बाध येईल,[१२] असा भावार्थ.

याप्रमाणे सुट्या पदांचे अर्थ व सर्व वाक्याचा अर्थ यांचा तात्पर्यशक्तीला आधारभूत असलेला दृष्टान्त[१३] प्रस्तुत विषयाला, म्हणजे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ या दोहोंमधील संबंधाच्या बाबतीत, लागू होत नाही असे दाखवून आपल्याला इष्ट असलेल्या व्यंजनेची सिद्धि करण्यासाठी अनुकूल असणारा दिवा व घट यांचा दृष्टान्त प्रस्तुत विषयाच्या बाबतीत लागू करण्याच्या इच्छेने वृत्तिकार 'म्हणून व्यंग्यार्थ व वाच्यार्थ' इ. विधान करितात. ज्या अर्थी तो पदांचा अर्थ व वाक्याचा अर्थ यांचा दृष्टान्त प्रस्तुत ठिकाणी लागू पडत नाही, त्या अर्थी. प्रस्तुत असलेल्या दिवा व घट यांच्या दृष्टान्ताचे विवरण करून तो प्रस्तुत विषयाला म्हणजे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांमधील संबंधाला कसा योग्य आहे, हे 'कारण ज्याप्रमाणे' इ. शब्दांनी वृत्तिकार दाखवितात.

पण काय हो, पूर्वी–[१४]

'ज्याप्रमाणे वाक्यातील पदांचे अर्थ प्रथम कळून मग त्यांद्वारे वाक्याचा अर्थ लक्षात येतो, त्याप्रमाणे त्या प्रतीयमान अर्थाचा बोधही आधी (वाक्याचा) वाच्यार्थ कळून मगच होतो.'

असे म्हटले होते. मग त्याच (म्हणजे पदार्थ व वाक्यार्थ यांच्या) दृष्टान्ताचे आता प्रयत्नपूर्वक खंडन का केले? अशी शंका कोणी घेईल हे जाणून वृत्तिकार 'मात्र पहिल्या उद्द्योतामध्ये' इ. म्हणतात. 'ते'– तो पूर्वीचा दृष्टान्त वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यांच्या संबंधाला सर्वस्वी जुळणारा आहे या कल्पनेमुळे कारिकावारांनी दिला होता असे नाही.[१५]

'तसे असले तर–' 'दिवा व घट हे जसे एकाच वेळी[१६] भासमान होतात, तसे' असा अर्थ. 'त्याचे' म्हणजे वाक्यपणाचे. 'एका अर्थाचे प्रतिपादन करणे'– कारण (जैमिनीने) म्हटले आहे की, अर्थाच्या एकत्वामुळे वाक्य होते.[१७] शब्द एकदा ऐकल्यावर (व त्याचा पहिल्या अर्थाचा बोध अभिधेने झाल्यावर) त्या शब्दापासून ज्या दुसऱ्या अर्थाच्या संकेताची आठवण होते, त्या अर्थाचा बोध जर त्याच शब्दापासून होत असला, तर (अमिधा) व्यापार एकदा आपले कार्य करून थांबल्यावर पुनः कार्य करीत नसल्यामुळे आणि पुष्कळ अर्थांच्या संकेतांचे एकाच वेळी स्मरण होऊ शकत नसल्यामुळे (शब्दशक्तिमूल ध्वनीच्या बाबतीत) अभिधेने वेगवेगळे अर्थ प्रतीत होण्यास वाव कोठे आहे? आता तो शब्द पुनः ऐकला जात नाही व त्यामुळे त्याच्या दुसऱ्या अर्थाचे स्मरणही होत नाही. 'ते दोन अर्थ' म्हणजे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ. 'त्यांपैकी' म्हणजे दोन प्रकारांपैकी जेव्हा (काव्याचा) पहिला प्रकार असेल तेव्हा, असा अर्थ. '(काव्याचा) दुसरा प्रकार'– म्हणजे 'गुणीभूतव्यंग्य' या नावाचा. 'व्यंग्यच' असतो म्हणजे प्रकाशित होणाराच असतो. शंका– "पण काय हो, 'शब्द जो अर्थ शेवटी, मुख्यत्वाने प्रकट करितो, तोच शब्दाचा (वाच्य) अर्थ समजावा' या उक्तीनुसार[१८] काव्यात व्यंग्यार्थ मुख्य असेल, तेव्हा त्या अर्थाला वाच्यार्थ म्हणणेच योग्य होईल, नाही का?" उत्तर– 'मग व्यंग्यार्थ प्रधान नसेल, तेव्हा त्याला काय म्हणणे योग्य होईल?' 'व्यंग्य अर्थ म्हणणे योग्य होईल' असे तुमचे उत्तर असल्यास आमचेच मत[१९] सिद्ध झाले हे, वृत्तिकार 'आणखी असे की' इ. शब्दांनी सांगतात. 'पण काय हो, तुम्ही ज्याला व्यंग्यार्थ म्हणता, तो जेव्हा प्रधान असेल, तेव्हा तरी त्याला व्यंग्य न म्हणता आमच्या म्हणण्याप्रमाणे वाच्यच म्हणणे योग्य' अशी शंका कल्पून वृत्तिकार तिचे 'आणि जेथे तो व्यंग्यार्थ' इ. शब्दांनी समाधान करितात. वाच्य अर्थाहून भिन्न असणे, शब्दाशी साक्षात् संबद्ध असलेला जो वाच्य अर्थ, त्या वाच्य अर्थाशी संबद्ध असणे आणि संकेतावर अवलंबून नसणे ही एखाद्या अर्थाला व्यंग्य ठरवायला कारणीभूत असतात व ती कारणे तो व्यंग्यार्थ प्रधान असतानाही असतातच, म्हणून व्यंग्यार्थ प्रधान असतानाही त्याचे व्यंग्यत्व नाकारता येणे शक्य नाही, हा भावार्थ. या विवेचनाचा उपसंहार वृत्तिकार 'तेव्हा अशा रीतीने' इ. शब्दांनी करितात. (व्यंजकत्वाचा म्हणजे व्यंजना–व्यापाराचा) विषय (म्हणजे अर्थ) (वाचकत्वाच्या विषयाहून) वेगळा असल्यामुळे आणि त्या दोन व्यापारांची स्वरूपेही[२०] वेगळी असल्यामुळे, असा आशय. 'एकतर' हा शब्द योजून वृत्तिकार आणखीही एक कारण सांगावयाचे आहे असे सुचवितात. तेच कारण 'आणखी एक कारण' इ. शब्दांनी सांगण्यात येत आहे. (वृत्तीतील) या वाक्याने वाचकत्व व व्यंजकत्व यांची सहकारी कारणे वेगळी असणे हेही ते दोन व्यापार वेगळे असण्याचे कारण आहे असे वृत्तिकार दर्शवितात. आणि हे सर्व पहिल्या उद्द्योतातच (कारिका १३) ध्वनीच्या लक्षणातील 'ज्या ठिकाणी वाच्य अर्थ किंवा वाचक शब्द' यामधील 'किंवा' या शब्दाचे विवरण करिताना आणि **व्यङ्क्तः** हे द्विवचन वापरण्यामागील अभिप्राय सांगताना आम्ही स्पष्टपणे दर्शविले[२१] असल्याने येथे त्याचा आम्ही पुन्हा विस्तार करीत बसत नाही.

टीपा

१) काही विद्वानांचे म्हणजे वैयाकरणांचे. त्यांच्या मताप्रमाणे सबंध वाक्यापासूनच अखंड अशा एका अर्थाची प्रतीति होत असल्यामुळे पदे ही वाक्याहून वेगळी नसतात व पदांचे अर्थही वाक्यार्थाहून वेगळे असत

नाहीत. पाहा, भर्तृहरीचे 'वाक्यपदीय', काण्ड पहिले, श्लोक ७३ वा (प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" वरील १७ वी टीप पाहा).

२) म्हणजे कुमारिलभट्ट व त्याचे अनुयायी.

३) पाहा, उद्‌द्योत १, कारिका १० वी व प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'वाच्यार्थ हे व्यंग्यार्थप्रकटीकरणांचे साधन'" वरील टीप १.

४) म्हणजे त्या दोहोंमध्ये फक्त अंशतःच साम्य आहे, संपूर्णपणे नव्हे.

५) ज्यातून एकच अर्थ प्रकट होतो, त्याला वाक्य म्हणावे. त्या वाक्याचे भाग पाडले तर प्रत्येक भाग स्वयंपूर्ण नसतो. त्या भागांना एकमेकांची आकांक्षा असते म्हणूनच ते भाग एकत्र येऊन एक पूर्ण अर्थ प्रकट करतात असे जैमिनीने म्हटले आहे. (पूर्वमीमांसासूत्र, २–१–४६. **अर्थैकत्वादेकं वाक्यं साकांक्षं चेद् विभागे स्यात्**)

६) पाहा, उद्‌द्योत १, कारिका १३ वी.

७) सुट्या पदांचे अर्थ समजल्यावर संपूर्ण वाक्याचा जुळलेला, एकमुखी अर्थ तात्पर्यशक्तीने कळतो असे अभिहितान्वयवादी म्हणतात. पण येथे पूर्वपक्ष्याने तात्पर्यशक्तीच्या या अर्थाकडे डोळेझाक करून वाक्य उच्चारणाऱ्याच्या मनात जे प्रयोजन असते, ते तात्पर्यशक्तीने प्रकट होईल असे म्हटले आहे.

वाक्याचे तात्पर्य दोन प्रकारचे असते :– (१) वाक्यातील शब्दांच्या वाच्यार्थांपासून प्रतीत होणाऱ्या संपूर्ण एकमुखी अर्थाला 'अभिधीयमान' तात्पर्य म्हणतात व (२) वाक्य उच्चारणाऱ्याच्या मनात या अभिधीयमान तात्पर्याच्या पलीकडे जे एक प्रयोजन किंवा उद्दिष्ट असते, त्याला 'प्रतीयमान' तात्पर्य म्हणतात. पूर्वपक्ष्याने येथे 'प्रतीयमान तात्पर्य' या अर्थी 'तात्पर्य' हा शब्द वापरला आहे.

८) 'वगैरे' म्हणजे कुमारिल भट्टाचे अनुयायी किंवा प्रभाकर व त्याचे अनुयायी.

९) उपादानकारणे किंवा समवायिकारणे म्हणजे कार्य ज्या घटकांचे बनलेले असते, ती घटक कारणे. उदा. माती, तंतु, सोने ही अनुक्रमे घट, वस्त्र व दागिना यांची उपादानकारणे किंवा समवायिकारणे होत.

१०) 'कपाल' याचा नेहमीचा अर्थ जरी 'खापराचे तुकडे' असा असला, तरी येथे 'मातीचे कण' असा घेणे इष्ट आहे; कारण घट हा काही खापराचे तुकडे जोडून बनविला जात नाही.

११) बौद्ध हे क्षणिकत्ववादी आणि सांख्य हे सत्कार्यवादी असले, तरी घट निर्माण झाल्यावर उपादानकारणांचे वेगळे अस्तित्व जाणवत नाही या बाबतीत दोघांचेही एकमत आहे. बौद्ध मतानुसार कार्य अस्तित्वात आल्यावर उपादानकारण नष्ट होते व सांख्य मतानुसार कार्यनिर्मिती झाल्यावर उपादानकारण अस्तित्वात असले, तरी ते कार्याहून वेगळ्या रूपात दिसेनासे होते.

१२) वाक्याच्या अर्थाचे ज्ञान होताना जर त्याबरोबर पदांच्या अर्थाचेही ज्ञान होते असे मानिले, तर एकाच वाक्यातून वाक्यार्थ व पदार्थ या दोन गोष्टींचे ज्ञान होत असल्याने वाक्यभेद दोष उत्पन्न होती, म्हणजेच एका वाक्यातून एकाच अर्थाचा बोध व्हावा, या नियमाचा भंग होती.

१३) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'ध्वनीबद्दलच्या आनंदवर्धनकालीन मतभेदांचा निर्देश'", उद्‌द्योत १–१०.

१४) पूर्वी म्हणजे उद्‌द्योत १, १० व्या कारिकेमध्ये. (प्रथम् खंड, "उद्‌द्योत – १ 'ध्वनीबद्दलच्या आनंदवर्धनकालीन मतभेदांचा निर्देश'"). लोचनात (काशी आवृत्ति) दुसऱ्या ओळीत 'वाक्यार्थ' असे छापले आहे. ते आम्ही 'वाच्यार्थ' असे बदलून त्याप्रमाणे भाषांतर केले आहे. (कारण कारिका १–१० मध्ये जो 'वाच्यार्थ' असाच पाठ आहे).

१५) पूर्वी कारिका १–१० मध्ये जो दृष्टांत दिला, त्यामध्ये आता सुधारणा करण्यात येत आहे. त्यावरून वृत्तिकार ही व्यक्ति कारिकाकाराहून भिन्न असावी या तर्काला पुष्टि मिळते. कारण दोघे एकच असते, तर कारिका १–१० मध्ये दिवा व घट यांचाच दृष्टान्त दिला असता, **तस्य पोषेऽप्यदोषता** या उद्‌द्योत ३, कारिका २५ मधील चरणाच्या बाबतीतही वृत्तिकारांनी '**अपि**' हा शब्द भिन्नक्रम आहे' असे समजून **तस्यापि पोषे अदोषता** अशी (वृत्तीत) दुरुस्ती केली आहे. पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'" वरील टीप ४.

१६) हे पूर्वपक्ष्याचे म्हणणे अगदी बरोबर आहे असे नाही, कारण दिवा पेटविल्यावर लगेच घटही दिसू लागतो असे वाटले, तरी दिवा पेटविल्यावर त्याचे किरण घटापर्यंत पोहोचावयास अत्यंत सूक्ष्म का होईना, पण वेळ लागतो. तसेच रसादींची प्रतीति ही वाच्यार्थानंतर लगेच होत असली, तरी त्या दोन प्रतीति **एकाच वेळी** होत नाहीत.

१७) पाहा, द्वितीय खंड, वरील पाचवी टीप.

१८) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर'" वरील ५ वी टीप.

१९) म्हणजे वाच्यार्थाहून निराळा व्यंग्य नावाचा अर्थ असतो हे मत.

२०) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'वरील जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर'" टीप १४ वी. संकेतावर अवलंबून असणे व नसणे हा वाचकत्व व व्यंजकत्व यांच्या स्वरूपांमधील भेद होय.

२१) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्यांच्या तिसऱ्या मताचे खंडन'".

ध्वन्यालोकः

गुणवृत्तिस्तूषचारेण लक्षणया चोभयाश्रयापि भवति । किन्तु ततोऽपि व्यञ्जकत्वं स्वरूपतो विषयतश्च भिद्यते । रूपभेदस्तावदयम्यदमुख्यतया व्यापारो गुणवृत्तिः प्रसिद्धा । व्यञ्जकत्वं तु मुख्यतयैव शब्दस्य व्यापारः । न ह्यर्थाद्व्यङ्ग्यत्रयप्रतीतिर्या तस्या अमुख्यत्वं मनागपि लक्ष्यते ।

अयं चान्यः स्वरूपभेदः । यद्गुणवृत्तिरमुख्यत्वेन व्यवस्थितं वाचकत्वमेवोच्यते । व्यञ्जकत्वं तु वाचकत्वादत्यन्तं विभिन्नमेव । एतच्च प्रतिपादितम् । अयं चापरो रूपभेदो यद्गुणवृत्तौ यदार्थोऽर्थान्तरमुपलक्षयाति तदोपलक्षणीयार्थात्मना परिणत एवासौ सम्पद्यते । यथा 'गङ्गायां घोषः' इत्यादौ । व्यञ्जकत्वमार्गे तु यदार्थोऽर्थान्तरं द्योतयति तदा स्वरूपं प्रकाशयन्नेवासावन्यस्य प्रकाशकः प्रतीयते प्रदीपवत् । यथा– 'लीलाकमलपत्राणि गणयामास पार्वती' इत्यादौ । यदि च यत्रातिरस्कृतस्वप्रतीतिरर्थोऽर्थान्तरं लक्ष्यति तत्र लक्षणाव्यवहारः क्रियते, तदेवं सति लक्षणैव मुख्यः शब्दव्यापार इति प्राप्तम् । यस्मात्प्रायेण वाक्यानां वाच्यव्यतिरिक्ततात्पर्यविषयार्थावभासित्वम् ।

ध्वन्यालोक

आता गुणवृत्ति (म्हणजे शब्दाचा मुख्य नसणारा दुय्यम व्यापार), मग ती 'उपचार[१]' या प्रकाराची असो, किंवा (शुद्ध) 'लक्षणा' या प्रकारची असो, तीदेखील शब्द व अर्थ दोहोंच्याही ठिकाणी असते[२]. तथापि व्यंजकत्व हे गुणवृत्तीहूनही स्वरूपाच्या दृष्टीने आणि अर्थाच्याही दृष्टीने वेगळे आहे. (त्यांपैकी) स्वरूपाच्या दृष्टीने भिन्नपणा असा– १. गुणवृत्ति हा दुय्यमपणाने प्रवृत्त होणारा, म्हणजे मुख्य नसलेला व्यापार म्हणून प्रसिद्ध आहे. पण व्यंजकत्व हा मात्र मुख्यत्वानेच (म्हणजे वाच्यार्थाचा बाध व्हावा न लागता) प्रवृत्त होणारा शब्दाचा व्यापार होय. कारण वाच्यार्थापासून जी तीन प्रकारच्या (म्हणजे रसादि, अलंकार व वस्तु या) व्यंग्य अर्थाची प्रतीति होते, ती मुख्य नाही असे लवमात्र प्रत्ययास येत नाही.

स्वरूपांमधील दुसरा एक भेद असा, की गुणवृत्ति हे दुय्यमपणाने (म्हणजे वाच्यार्थाचा बाध होऊनच) प्रवृत्त होणारे, पण वाचकत्वच होय असे म्हटले जाते. पण व्यंजकत्व हे वाचकत्वाहून सर्वस्वी भिन्नच होय. आणि हे आम्ही (नुकतेच) (पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग्य हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर' व 'वाक्य हे व्यंजक असत नाही, या मीमांसकाच्या मताचे खंडन'") दाखविले आहे (या दोहोंच्या) स्वरूपांमधला आणखी एक फरक हा की, लाक्षणिक शब्दप्रयोगाचे उदाहरणात जेव्हा (वाच्य) अर्थ दुसऱ्या (लक्ष्य) अर्थाकडे बोट दाखवतो, तेव्हा तो वाच्य अर्थ लक्ष्य अर्थामध्ये रूपांतरितच होतो जसे गंगेवर गौळीवाडा' इत्यादी उदाहरणांमध्ये.[३] पण व्यंजकत्व असलेल्या ठिकाणी जेव्हा (वाच्य) अर्थ दुसऱ्या (व्यंग्य) अर्थाला सूचित करतो, तेव्हा दिव्याप्रमाणे तो स्वतःच्या रूपाचे दर्शन घडवीतच दुसऱ्या अर्थाचेही प्रकाशन करीत असतो. जसे 'पार्वती हातातल्या क्रीडाकमळाच्या पाकळ्या मोजू लागली' इ. उदाहरणामध्ये. आणि ज्या ठिकाणी वाच्य अर्थ स्वतःचा बोध बाजूला न सारताच दुसऱ्या अर्थाचा बोध करून देतो, तेथेही तर लक्षणा आहे असे म्हणावयाचे झाले तर लक्षणा हाच शब्दाचा मुख्य व्यापार होय असे म्हणण्याचा प्रसंग येईल! कारण सामान्यपणे वाक्ये ही वाच्याहून वेगळा असा, वक्त्याला अभिप्रेत असलेला अर्थ प्रकाशित करीत असतात.[४]

लोचनम्

एवं विषयभेदात्स्वरूपभेदात्कारणभेदाच्च वाचकत्वान्मुख्यात्प्रकाशकत्वस्य भेदं प्रतिपाद्योभयाश्रयत्वाविशेषात्तर्हि व्यंजकत्वगौणत्वयोः को भेद इत्याशङ्क्यामुख्यादपि प्रतिपादयितुमाह— गुणवृत्तिरिति । उभयाश्रयापीति शब्दार्थाश्रया । उपचारलक्षणयोः प्रयमोद्द्योत एव विभज्य निर्णीतं स्वरूपमिति न पुनर्लिख्यते । मुख्यतयैवेति । अस्खलद्गतित्वेनेत्यर्थः । व्यङ्ग्यत्रयमिति वस्त्वलङ्काररसात्मकम् । वाचकत्वमेवेति । तत्रापि हि तथैव समयोपयोगोऽस्त्येवेत्यर्थः । प्रतिपादितमिति । इदानीमेव । परिणत इति । स्वेन रूपेणानिर्भासमान इत्यर्थः ।

लोचन

अशा रीतीने वाचकत्व व व्यंजकत्व यांचे (१) विषय म्हणजे ते ज्या अर्थाचा बोध करून देतात ते अर्थ भिन्न असल्यामुळे (२) त्या व्यापारांची स्वरूपे वेगळी असल्यामुळे आणि (३) ते व्यापार ज्या कारणांवर अवलंबून असतात ती कारणेही भिन्न असल्यामुळे शब्दाचा मुख्य व्यापार जो वाचकत्व, त्याहून प्रकाशकत्व म्हणजे व्यंजकत्व हा व्यापार कसा निराळा आहे हे दाखविल्यावर व्यंजकत्व व गौणत्व (म्हणजे लक्षणा) हे दोन्ही व्यापार (शब्द व अर्थ या) दोहोंवर सारखेच अवलंबून असल्यामुळे त्या व्यापारांयध्ये फरक कोणता, ही शंका कल्पून व्यंजकत्वाचा गुणवृत्तीहून निराळेपणा स्पष्ट करण्यासाठी वृत्तिकार 'आता गुणवृत्ति' इ. विधान करितात. दोहोंच्याही ठिकाणी म्हणजे शब्द व अर्थ यांचे ठिकाणी. उपचार आणि लक्षणा यांची वेगवेगळी स्वरूपे पहिल्या उद्द्योतातच[५] निश्चितपणे स्पष्ट केली होती, म्हणून त्यांबद्दल आता आम्ही पुन्हा लिहीत नाही. 'मुख्यत्वानेच'— शब्दाची गति कोठेही न अडता[६], असा अर्थ. वस्तु, 'तीन प्रकारचे व्यंग्य अर्थ'— वस्तु, अलंकार व रस या तीन प्रकारचे. 'वाचकत्वच'— कारण तेथेही म्हणजे गुणवृत्तीमध्येही वाचकत्वातल्याप्रमाणेच (म्हणजे अभिधेतल्याप्रमाणेच) संकेता'चा उपयोग आवश्यक असतोच[७]. दाखविले आहे'— आता नुकतेच[८]. 'रूपांतरित'— स्वतःच्या स्वतंत्र रूपाने प्रकाशित न होणारा[९], असा अर्थ.

टीपा

१) 'उपचार' हा शब्द साहित्यशास्त्रात व्यापक व मर्यादित अशा दोन अर्थांनी वापरला जातो. व्यापक अर्थाने 'उपचार' म्हणजे एखादा शब्द दुय्यम अर्थाने वापरणे. 'लक्षणा' या शब्दाचा व्यापक अर्थही तोच असतो. पण 'उपचार' या शब्दाचा मर्यादित अर्थ मात्र 'सादृश्यसंबंधावर आधारलेला दुय्यम व्यापार' हा होय. आणि 'लक्षणा' शब्दाचा मर्यादित अर्थ 'सादृश्येतर संबंधावर आधारलेला दुय्यम व्यापार'. वरील वाक्यात 'उपचार' व 'लक्षणा' हे दोन्ही शब्द मर्यादित अर्थाने वापरले आहेत, तर 'गुणवृत्ति' हा शब्द व्यापक अर्थाने म्हणजे केवळ 'दुय्यम व्यापार' या अर्थाने वापरला आहे.

२) 'गुणवृत्ति' हा शब्दाचा व्यापार असल्यामुळे ती शब्दाश्रित आहे, हे उघडच आहे. पण तिला अर्थाश्रित म्हणण्याचे कारण हेच की, त्या शब्दाचा वाच्यार्थ आधी समजावा लागतो व तो लागू पडत नाही म्हणून (अंशतः किंवा पूर्णपणे) बाजूला झाल्यावरच गुणवृत्ति हा व्यापार आपले कार्य करू शकतो. म्हणजे गुणवृत्ति ही वाच्यार्थावर म्हणजे वाच्यार्थाच्या निवृत्तीवर अवलंबून असते. म्हणूनच गुणवृत्तीला 'अभिधेचे पुच्छ' मानतात. त्यामुळे अभिनवगुप्तांनी पहिल्या उद्द्योतातील अठराव्या कारिकेवरील 'लोचन' टीकेमध्ये म्हटले आहे की— 'लक्षणा ही अभिधेच्या शेपटाप्रमाणे आहे... ती वाचकत्वाच्या म्हणजे अभिधाव्यापाराच्या आश्रयाने

व त्या अभिधाव्यापाराचा बाध झाल्यामुळेच उभी राहते, म्हणून आणि ती अभिधेच्या पुच्छाप्रमाणे असल्यामुळे ती गुणवृत्ति म्हणजे दुय्यमच व्यापार आहे' (पाहा प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'ध्वनीच्या असंलक्ष्यक्रम प्रकारात लक्षणा मुळीच नाही'")

३) 'गंगेवर गौळीवाडा' या उदाहरणामध्ये 'गंगा' शब्दाचा वाच्यार्थ जो 'विशिष्ट जलप्रवाह', त्याची स्वतंत्रत्वाने प्रतीति न होता (गंगेच्या) तटाचीच मुख्यत्वाने प्रतीति होत असते. हाच न्याय लक्षणेच्या कोणत्याही उदाहरणात लागू पडतो. उदा. 'लाठ्या प्रवेश करितात' या उदाहरणामध्ये 'लाठीवाले' हा लक्ष्यार्थ प्रतीत होत असताना 'लाठ्या' या वाच्यार्थाची स्वतंत्रपणे (मुख्यत्वाने) प्रतीति होत नाही.

४) वक्ता जेव्हा कोणतेही वाक्य उच्चारतो, त्यावेळी तो त्या वाक्याचा वाच्यार्थ सांगण्यासाठीच ते वाक्य उच्चारतो असे नाही, तर स्वतःच्या मनात असलेला कोणतातरी उद्देश प्रकट करण्यासाठीच उच्चारीत असतो. 'गाय आण' यासारख्या अगदी साध्या उदाहरणात सुद्धा त्या गाईची धार काढणे यासारखा उद्देशच मुख्यत्वाने अभिप्रेत असतो.

५) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'ध्वनि आणि लक्षणा एकच नव्हेत'"

६) पाहा, प्रथमखंड, उद्‌द्योत १, कारिका १७ व "उद्‌द्योत – १ 'कोणत्या शब्दांना 'ध्वनिकाव्य' म्हणावे?'".

'गंगेवर गौळीवाडा आहे' या उदाहरणातील 'गंगा' हा शब्द सुसंगत वाच्यार्थ प्रकट करिताना अडतो. पण अतिशीतलता, पावित्र्य हा व्यंग्य अर्थ प्रकट करताना 'गंगा' शब्द मुळीत अडत नाही, म्हणजे तो व्यंग्य अर्थ त्याच शब्दामुळे प्रकट होतो.

७) तुलनार्थ पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'कोणत्या शब्दांना 'ध्वनिकाव्य' म्हणावे?'".यात व त्यापुढील आणि 'ध्वनीच्या असंलक्ष्यक्रम प्रकारात लक्षणा मुळीच नाही' वरील कुमारिलभट्टांची अवतरणेही पाहा.

८) म्हणजे द्वितीयखंड, "उद्‌द्योत – ३ 'जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर' व 'वाक्य हे व्यंजक असत नाही, या मीमांसकांच्या मताचे खंडन वर'".

९) म्हणजे 'गंगा' या शब्दाचा वाच्यार्थ स्वतःच्या स्वतंत्र रूपात दिसेनासा होऊन 'गंगातीर' या लक्ष्यार्थात रूपांतरित होतो. काशी आवृत्ति, पृष्ठ ५०४ वरील लोचनातील 'संक्रान्तिस्तु तस्यैतद्रूपतापत्ति.' । हे वाक्य पाहा.

ध्वन्यालोकः

ननु त्वत्पक्षेऽपि यदार्थो व्यङ्ग्यत्रयं प्रकाशयति तदा शब्दस्य कीदृशो व्यापारः । उच्यते– प्रकरणाद्यवच्छिन्नशब्दवशेनैवार्थस्य तथाविधं व्यञ्जकत्वमिति शब्दस्य तत्रोपयोगः कथमपह्नूयते । विषयभेदोऽपि गुणवृत्तिव्यञ्जकत्वयोः स्पष्ट एव । यतो व्यञ्जकत्वस्य रसादयोऽलङ्कारविशेषा व्यङ्ग्यरूपावच्छिन्नं वस्तु चेति त्रयं विषयः । तत्र रसादिप्रतीतिर्गुणबृत्तिरिति न केनचिदुच्यते न च शक्यते

वक्तुम् । व्यङ्ग्यालङ्कारप्रतीतिरपि तथैव । वस्तु चारुत्वप्रतीतये स्वशब्दानभिधेयत्वेन यत्प्रतिपादयितुमिष्यते तद् व्यङ्ग्यम् । तच्च न सर्वं गुणवृत्तेर्विषयः प्रसिद्ध्यनुरोधाभ्यामपि गौणानां शब्दानां प्रयोगदर्शनात् । तथोक्तं प्राक् । यदपि च गुणवृत्तेर्विषयस्तदपि च व्यञ्जकत्वानुप्रवेशेन । तस्माद्गुणवृत्तेरपि व्यञ्जकत्वस्यात्यन्तविलक्षणत्वम् । वाचकत्वगुणवृत्तिलक्षणस्यापि च तस्य तदुभयाश्रयत्वेन व्यवस्थानम् ।

व्यञ्जकत्वं हि क्वचिद्वाचकत्वाश्रयेण व्यवतिष्ठते, यथा विवक्षितान्यपरवाच्ये ध्वनौ । क्वचित्तु गुणवृत्त्याश्रयेण, यथा अविवक्षितवाच्ये ध्वनौ । तदुभयाश्रयत्वप्रतिपादनायैव च ध्वनेः प्रथमतरं द्वौ प्रभेदावुएन्यस्तौ । तदुभयाश्रितत्वाच्च तदेकरूपत्वं तस्य न शक्यते वक्तुम् । यस्मान्न तद्वाचकत्वैकरूपमेव, क्वचिल्लक्षणाश्रयेण वृत्तेः । न च लक्षणैकरूपमेवान्यत्र वाचकत्वाश्रयेण व्यवस्थानात् । न चोभयधर्मत्वेनैव तदेकैकरूपं न भवति । यावद्वाचकत्वलक्षणादिरूपरहितशब्दधर्मत्वेनापि । तथाहि गीतध्वनीनामपि व्यञ्जकत्वमस्ति रसादिविषयम् । न च तेषां वाचकत्वं लक्षणा वा कथञ्चिल्लक्ष्यते । शब्दादन्यत्रापि विषये व्यञ्जकत्वस्य दर्शनाद्वाचकत्वादिशब्दधर्मप्रकारत्वमयुत्कं वक्तुम् । यदि च वाचकत्वलक्षणादीनां शब्दप्रकाराणां प्रसिद्धप्रकारविलक्षणत्वेऽपि व्यञ्जकत्वं प्रकारत्वेन परिकल्प्यते तच्छब्दस्यैव प्रकारत्वेन कस्मान्न परिकल्प्यते । तदेवं शाब्दे व्यवहारे त्रयः प्रकाराः— वाचकत्वं गुणवृत्तिर्व्याञ्जतत्वं च । तत्र व्यञ्जकत्वे यदा व्यङ्ग्यप्राधान्यं तदा ध्वनिः, तस्य चाविवक्षितवाच्यो विवक्षितान्यपरवाच्यश्चेति द्वौ प्रभेदावनुक्रान्तौ प्रथमतरं तौ सविस्तरं निर्णीतौ ।

ध्वन्यालोक

"पण काय हो, तुमच्या पक्षीसुद्धा ज्यावेळी वाच्य अर्थ तीन प्रकारचे व्यंग्य अर्थ सूचित करितो, त्यावेळी तेथे शब्दाचा व्यापार कोणत्याप्रकारचा असतो?" सांगतो वाच्यार्थ ज्यावेळी तशा प्रकारचे व्यंग्यार्थ प्रकाशित करितो, त्यावेळी तो विशिष्ट संदर्भात उच्चारलेल्या शब्दांच्या मदतीनेच ते कार्य करीत असल्यामुळे त्या व्यंग्यार्थ–प्रकाशनाचे कामी शब्दांचा होत असलेला उपयोग नाकबूल कसा करिता येईल? लाक्षणिकत्व व व्यंजकत्व यांनी प्रकट केलेल्या अर्थांमध्ये फरक असतो, हे स्पष्टच आहे. कारण व्यंजकत्वामुळे ज्ञात करून दिले जाणारे अर्थ हे तीन प्रकारचे– १) रस, भाव वगैरे २) निरनिराळे अलंकार आणि ३) व्यंग्य स्वरूपात असलेली वस्तु. त्यांपैकी रस, भाव वगैरेंची प्रतीति लक्षणेमुळे होते असे कोणी म्हणतही नाही आणि म्हणू शकतही नाही. व्यंग्य असलेल्या अलंकाराच्या प्रतीतीचीही तशीच स्थिति आहे.[१] एखाद्या वस्तुरूप अर्थाचे सौंदर्य प्रत्ययास आणून देण्यासाठी त्याचे वाचक शब्द न वापरता तो अर्थ प्रकट करण्याची वक्त्याची इच्छा असते व त्याप्रमाणे तो प्रकट केला जातो, तेव्हा तो 'व्यंग्य' होय आणि व्यंग्य अर्थाचे ते सर्वच प्रकार काही गुणवृत्तीच्या क्षेत्रात येतात असे नाही. कारण केवळ दृढमूल झालेल्या रूढीमुळे, वृत्ताच्या सोयीसाठी व अनुप्रासादि शब्दालंकार साधण्यासाठी सुद्धा गौण शब्दांचा प्रयोग केला जात असल्याचे दिसते. आणि तसेच पूर्वी[२] सांगितले आहे. आणि जो व्यंग्यार्थ गुणवृत्तीवर अवलंबून असतो, तोसुद्धा तेथे गुणवृत्तीमागोमाग 'व्यंजकत्व' काम करते, म्हणूनच. म्हणून व्यंजकत्व हे गुणवृत्तीहूनही सर्वस्वी वेगळे आहे. आणि व्यंजकत्व हे वाचकत्व व गुणवृत्ति यांहून निराळे असले तरी ते त्या दोहोंच्या आश्रयाने राहते.

कारण व्यंजकत्व हे काही ठिकाणी वाचकत्वाच्या आश्रयाने राहते, जसे ध्वनीच्या 'विवक्षितान्यपर वाच्य' या प्रकारात. पण काही वेळा ते गुणवृत्तींच्या आश्रयाने राहते, जसे ध्वनीच्या 'अविवक्षितवाच्य' या प्रकारात. आणि वाचकत्व व गुणवृत्ति हे दोन्हीही त्याचे आश्रय असू शकतात हे सांगण्यातसाठीच तर पूर्वी[३]

आम्ही ध्वनींच्या दोन मोठ्या प्रकारांचा निर्देश केला आणि व्यंजकत्व हे त्या दोहोंच्याही आश्रयाने असू शकते, म्हणून ते त्या दोहोंपैकी (कोणत्याही) एकाशी एकरूप आहे, असे म्हणता येत नाही. कारण ते काही ठिकाणी लक्षणेच्या आश्रयाने राहते म्हणून ते केवळ वाचकत्वाशी एकरूप नव्हे आणि इतर कित्येक ठिकाणी ते वाचकत्वाच्या आश्रयाने असते म्हणून ते केवळ लक्षणेशीही एकरूप नाही. आणि या दोहोंपैकी एकाशीही ते एकरूप नसते, याचे कारण ते त्या दोहोंच्याही आश्रयाने असू शकते, एवढे एकच नव्हे तर वाचकत्व, लक्षणा वगैरे प्रकारांनी विरहित अशा (केवळ नादमय) शब्दाचाही ते (व्यंजकत्व) धर्म असू शकते, म्हणूनही ते, वाचकत्व व गुणवृत्ति यांहून भिन्न आहे. उदाहरणार्थ, गाण्याच्या सुरांच्या ठिकाणीही रसादींना अभिव्यक्त करणारे व्यंजकत्व असते आणि त्यांच्या (त्या सुरांच्या) ठिकाणी वाचकत्व किंवा लक्षणा आहे असे कोणत्याही प्रकारे दिसून येत नाही. शिवाय शब्दाखेरीज इतर ठिकाणीही (उदा. करपल्लवी, नेत्रपल्लवी वगैरेसारख्या क्रियांमध्ये) व्यंजकत्व असल्याचे दिसून येत असल्याने ते म्हणजे व्यंजकत्व हे (उच्चारलेल्या) शब्दाचाच धर्म असणाऱ्या वाचकत्व वगैरेशी एकरूप असते, असे म्हणणे अयोग्य आहे. आणि शब्दांचे वाचकत्व, लक्षणा वगैरे जे धर्म आहेत, त्या प्रसिद्ध धर्माहून व्यंजकत्व हे भिन्न असतानाही जर ते त्या धर्माशी अभिन्न आहे असे मानावयाचे, तर ते व्यंजकत्व शब्दाहूनच अभिन्न आहे असे काय म्हणून मानू नये? तर मग या प्रमाणे भाषेतल्या शब्दांच्या उपयोगाच्या बाबतीत तीन प्रकार असतात– वाचकत्व, गुणवृत्ति आणि व्यंजकत्व. त्यांपैकी व्यंजकत्व असून जेव्हा व्यंग्यार्थ हा प्रधान असतो, तेव्हा ते ध्वनीचे उदाहरण होय, आणि त्या ध्वनीच्या अविवक्षितवाच्य व विवक्षितान्यपरवाच्य अशा दोन मोठ्या प्रकारांचा पूर्वी (पहिल्या उद्द्योतात) निर्देश करून त्यांचे स्वरूप सविस्तरपणे निश्चित केले.

लोचनम्

कीदृश इति मुख्यो वा न वा, प्रकारान्तराभावात् । मुख्यत्वे वाचकत्वमन्यथा गुणवृत्तिः, गुणो निमित्तं सादृश्यादि तद्द्वारिका वृत्तिः शब्दस्य व्यापारो गुणवृत्तिरिति भावः । मुख्य एवासौ व्यापारः सामग्री भेदाच्च वाचकत्वाद् व्यतिरिच्यत इत्यभिप्रायेणाह–उच्यत इति । एवमस्खलद्गतित्वात् कथञ्चिदपि समयानुपयोगात्पृथगाभासमानत्वाच्चेति त्रिभिः प्रकारैः प्रकाशकत्वस्य, एतद्विपरीतरूपत्रयायाश्च गुणवृत्तेः स्वरूपभेदं व्याख्याय विषयभेदमप्याह–विषयभेदोऽपीति । वस्तुमात्रं गुणवृत्तेरपि विषय इत्यभिप्रायेण विशेषयति–व्यङ्ग्यरूपावच्छिन्नमिति । व्यञ्जकत्वस्य यो विषयः स गुणवृत्तेर्न विषयः, अन्यश्च तस्या (विषयः इति) विषयभेदो योज्यः । तत्र प्रथमप्रकारमाह–तत्रेति । न च शक्यत इति । लक्षणासामग्र्यास्तत्राविद्यमानत्वादिति हि पूर्वमेवोक्तम् । तथैवेति । न तत्र गुणवृत्तिर्युक्तेत्यर्थः । वस्तुनो यत्पूर्वं विशेषणं कृतं तद्व्याचष्टे–चारुत्वप्रतीतय इति न सर्वमिति । किंचित्तु भवति । यथा– 'निःश्वासान्ध इवादर्शः' इति । यदुक्तम्– 'कस्यचिद् ध्वनिभेदस्य सा तु स्यादुपलक्षणम्' इति । प्रसिद्धितो लावण्यादयः शब्दाः, वृत्तानुरोधव्यवहारानुरोधादेः 'वदति बिसिनीपत्रशयनम्' इत्येवमादयः । प्रागिति । प्रथमोद्द्योते 'रूढा ये विषयेऽयत्र' इत्यत्रान्तरे । न सर्वमिति यथास्माभिर्व्याख्यातं तथा स्फुटयति– यदपि चेति । गुणवृत्तेरिति पञ्चमी । अधुनेतररूपोपजीवकत्वेन तदितरस्मात्तदितररूपोपजीवकत्वेन च तदितरस्मादित्यनेन पर्यायेण वाचकत्वाद् गुणवृत्तेश्च द्वितयादपि भिन्नं व्यञ्जकत्वमित्युपपादयति– वाचकत्वेति । चोऽवधारणे भिन्नक्रमः, अपिशब्दोऽपि । न केवलं पूर्वोक्तो हेतुकलापो यावत्तदुभयाश्रयत्वेन मुख्योपचाराश्रयत्वेन यद्व्यवस्थानं तदपि वाचकत्वगुणवृत्तिविलक्षणस्यैवेति व्याप्तिघटनम् । तेनायं तात्पर्यार्थ :– तदुभयाश्रयत्वेन व्यवस्थानात्तदुभयवैलक्षण्यमिति ।

एतदेव विभजते—व्यञ्जकत्वं हीति । प्रथमतरमिति । प्रथमोद्द्योते 'स च' इत्यादिना ग्रन्थेन । हेत्वन्तरमपि सूचयति— न चेति । वाचकत्वगौणत्वोभयवृत्तान्तवैलक्षण्यादिति सूचितो हेतुः । तमेव प्रकाशयतितथाहीत्यादिना । तेषामिति । गीतादिशब्दानाम् । हेत्वन्तरमपि सूचयति— शब्दादन्यत्रेति । वाचकत्वगौणत्वाभ्यामन्यद् व्यञ्जकत्वं, शब्दादन्यत्रापि वर्तमानत्वात्प्रमेयत्वादिवदिति हेतुः सूचितः । नन्वन्यत्रावाचके यद्व्यञ्जकत्वं तद्भवतु वाचकत्वादेर्विलक्षणभ् । वाचके तु यद् व्यञ्जकत्वं तदविलक्षणमेवास्त्वित्याशङ्क्याह— यदीति । आदिपदेन गौणं गृह्यते । शब्दस्यैवेति । व्यञ्जकत्वं वाचकत्वमिति यदि पर्यायौ कल्प्येते तर्हि व्यञ्जकत्वं शब्द इत्यपि पर्यायता कस्मान्न कल्प्यते, इच्छाया अव्याहतत्वात् । व्यञ्जकत्वस्य तु विविक्तं स्वरूपं दर्शितं तद्विषयान्तरे कथं विपर्यस्यताम् । एवं हि पर्वतगतो धूमोऽनग्निजोऽपि स्यादिति भावः । अधुनोपपादितं विभागमुपसंहरति—तदेवमिति । व्यवहारग्रहणेन समुद्रघोषादीन् व्युदस्यति ।

लोचन

'कोणत्या' प्रकारचा?' म्हणजे मुख्य असणारा (अभिधा) किंवा मुख्य नसणारा (गुणवृत्ति). कारण यांहून तिसरा प्रकार असू शकत नाही. मुख्य असला, तर तो व्यापार वाचकत्व (अभिधा) होय व मुख्य नसला तर तो (गुणवृत्ति)[४] होय. गुण म्हणजे (वाच्यार्थ व लक्ष्यार्थ यांमधील) सादृश्य वगैरे 'लक्षणेचे कारण. त्या कारणामुळे प्रवृत्त होणारी 'वृत्ति' म्हणजे शब्दाचा व्यापार ही गुणवृत्ति होय, असा आशय. शब्दाचा तो (म्हणजे व्यंजकत्व) व्यापार मुख्यच असून (म्हणजे गुणवृत्तीप्रमाणे अमुख्य नसून) तो व वाचकत्व हे वेगवेगळ्या सहकारी कारणांवर[५] अवलंबून असल्याने तो व्यापार वाचकत्वाहून भिन्न आहे, या अभिप्रायाने वृत्तिकार, 'सांगतो' इ. शब्दांनी उत्तर देतात. याप्रमाणे (व्यंग्यार्थाचा बोध करून देण्याच्या बाबतीत) वाच्यार्थाचा बाध न होणे, (गुणवृत्ति ज्याप्रमाणे संकेतावर अवलंबून असते[६] त्याप्रमाणें) संकेतावर कोणत्याही प्रकारे अवलंबून नसणे आणि वाच्यार्थाहून अगदी वेगळेपणाचे प्रतीत होणे या तीन वैशिष्ट्यांमुळे प्रकाशकत्व (म्हणजे व्यंजकत्व) आणि त्यांच्या उलट स्वरूपाच्या तीन वैशिष्टयांनी[७] युक्त अशी गुणवृत्ति (म्हणजे लक्षणा) यांच्या स्वरूपांमधील फरक स्पष्ट करून वृत्तिकार त्या दोन व्यापारांच्या विषयामधील (म्हणजे त्यांमुळे ज्ञात होणाऱ्या अर्थांमधील) भेदही 'अर्थांमध्येही फरक' इ. शब्दांनी सांगतात. केवळ वस्तुस्वरूपी अर्थ (उदा. तीर) हा 'गङ्गेवर गौळीवाडा' यातील) लक्षणेमुळेही प्रकट होतो हे लक्षात घेऊन वृत्तिकार त्याहून व्यंजकत्वाचा वेगळेपणा 'व्यंग्य स्वरूपात असलेली' या शब्दांनी सांगतात. व्यंजकत्वायुळे ज्या अर्थाचे ज्ञान होते त्या अर्थाचा प्रत्यय लक्षणेने होत नाही.[८] आणि लक्षणेने व्यंग्यार्थाहून निराळ्याच अर्थाचा बोध होतो, अशा रीतीने या दोन व्यापारांच्या विषयभेदा'चे विवरण करावे. त्या व्यंग्य अर्थाच्या पहिल्या (म्हणजे रसादि या) प्रकाराविषयी वृत्तिकार 'त्यांपैकी' इ. शब्दांनी सांगतात. 'म्हणू शकतही नाही'— कारण लक्षणेला आवश्यक असलेली कारणे रसादिप्रतीतीच्या बाबतीत अस्तित्वात नसतात हे आम्ही पूर्वीच[९] सांगितले आहे. 'तशीच स्थिति'— तेथे (म्हणजे व्यंग्य अलंकाराच्या बाबतीत) गुणवृत्ति कार्य करिते असे म्हणणे योग्य होणार नाही, असा अर्थ. वस्तुरूपी अर्थाला पूर्वी ('व्यंग्य स्वरूपात असलेले' हे) जे विशेषण दिले त्याचे विवरण वृत्तिकार 'सौन्दर्य प्रत्ययास आणून देण्यासाठी' इ. शब्दांनी करितात. 'ते सगळे प्रकार—' पण व्यंग्यार्थप्रतीतीची काही उदाहरणे गुणवृत्तीच्या क्षेत्रात येऊ शकतात. जसे—निःश्वासांनी आंधळ्या झालेल्या आरशाप्रमाणे' इ. श्लोक[१०]. कारण पूर्वी[११] असे म्हटले होते की, 'मात्र लक्षणा हे ध्वनीच्या एखाद्या प्रकाराचे उपलक्षण असू शकेल.' (रूढीमुळे'—) रूढीमुळे 'लावण्य' वगैरे शब्द लक्षणेने वापरले जातात.[१२] याची आणि वृत्ताच्मा सोयीसाठी व शब्दालंकार साधण्यासाठी केल्या जाणाऱ्या लाक्षणिक शब्दप्रयोगांची उदाहरणे म्हणजे 'ही कमलिनीपत्रांची शय्या त्या तन्वंगीला झालेला विरहताप सांगत

आहे.[१३]' वगैरे. पूर्वी– पहिल्या उद्‌द्योतात, 'आणि लावण्य वगैरेसारखे शब्द' या (सोळाव्या) कारिकेचे विवरण करिताना. 'ते सगळे' याचा आम्ही जो नुकताच[१४] अर्थ केला, तोच वृत्तिकार 'आणि जो व्यंग्यार्थ इ. शब्दांनी स्पष्ट करून सांगत आहेत. **तस्माद् गुणवृत्तेः** यातील **गुणवृत्तेः** ही पंचमी विभक्ति आहे. आता व्यंजकत्व हे (काही वेळा)[१५] व्यंजकत्वाहून निराळ्या असलेल्या वाचकत्वावर अवलंबून असते, म्हणून ते वाचकत्वाहून वेगळला असलेल्या गुणवृत्तीहून निराळे व काही वेळा[१६] (व्यंजकत्व हे) वाचकत्वाहून निराळ्या असलेल्या गुणवृत्तीवर अवलंबून असल्यामुळे वाचकत्वाहून निराळे आहे व अशा रीतीने वाचकत्व व गुणवृत्ति या दोहींहूनही व्यंजकत्व आळीपाळीने भिन्न असल्यामुळे त्या दोहोंहूतही ते सर्वस्वी निराळे आहे हे वृत्तिकार 'वाचकत्व व गुणवृत्ति यांहून' इ. शब्दांनी पटवून देतात. **विलक्षणस्यापि च तस्य** यातील **च** हे अव्यय **एव** या अर्थी वापरले असून ते अयोग्य जागी पडले आहे. ते **विलक्षणस्य** यानंतर लगेच वाचावे, **अपि** हे अव्ययही योग्य ठिकाणी पडलेले नाही. ते **च** या अव्ययानंतर वाचावे.[१७] पूर्वी सांगितलेल्या कारणांमुळेच नव्हे,[१८] तर व्यंजकत्व हे दोहोंच्या म्हणजे वाचकत्व व गुणवृत्ति यांच्या आश्रयाने असणे हे ते (म्हणजे व्यंजकत्व), वाचकत्व व गुणवृत्ति यांहून वेगळे असण्याचे कारण आहे हे लक्षात घेऊन व्याप्ति[१९] जुळवावी. त्यामुळे या वाक्याचे तात्पर्य असे:– व्यंजकत्व हे त्या दोघांच्या आश्रयाने राहात असल्यामुळे ते त्या दोहोहून निराळे आहे.

हाच मुद्दा वृत्तिकार 'कारण व्यंजकत्व' इ. शब्दांनी फोड करून स्पष्ट करितात. 'पूर्वी' म्हणजे पहिल्या उद्‌द्योतात 'तो स्थूलमानाने'[२०] इ. शब्दांनी सांगितलेल्या वाक्यात. आणखी एक (म्हणजे चवथे[२०अ] कारणही वृत्तिकार 'येवढे एकच नव्हे' इ. शब्दांनी सुचवितात. (म्हणजे सांगतात). 'वाचकत्व आणि गुणवृत्ति या दोहोंसाठी जी परिस्थिति लागते, तीहून वेगळ्या परिस्थितीत[२१] व्यंजकत्व आढळते म्हणून' हे वृत्तिकारांनी सुचविलेले चवथे कारण होय. तेच वृत्तिकार 'उदाहरणार्थ' इ. वाक्याने स्पष्ट करितात. 'त्यांच्या ठिकाणी' म्हणजे गाणे वगैरेंच्या स्वरांच्या ठिकाणी. याहूनही निराळे (पाचवे) कारण 'शिवाय आवाजाखेरीज इतर ठिकाणीही'[२२] या वाक्याने वृत्तिकार सुचवितात (म्हणजे सांगतात). वाचकत्व व गौणत्व यांहून व्यंजकत्व हे निराळे आहे, कारण ते (व्यंजकत्व) भाषेतील शब्दांहून अन्य ठिकाणीही असू शकते, जसे प्रमेयत्व[२३] वगैरे धर्म शब्दांहून अन्य ठिकाणीही राहू शकतात, तसे, हे ते सुचविलेले[२४] कारण होय. 'पण काय हो, दुसरीकडे म्हणजे वाचकत्व नसलेल्या ठिकाणी[२५] जे व्यंजकत्व असते ते वाचकत्व आणि गुणवृत्ति यांहून वेगळे असू दे. पण वाचक असलेल्या शब्दांच्या ठिकाणी जे व्यंजकत्व असते, असे तुम्ही म्हणता, ते वाचकत्व व गुणवृत्ति यांहून वेगळे नाही असे म्हणणेच योग्य होईल' अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'आणि शब्दांचे वाचकत्व... जर ते' इ. शब्दांनी उत्तर देतात. 'लक्षणा वगैरे' यातील 'वगैरे' शब्दाने लक्षणेच्या 'गौणी' प्रकाराचा[२६] समावेश केला गेला आहे. 'शब्दाहूनच अभिन्न'– व्यंजकत्व आणि वाचकत्व हे जर तुम्ही समानार्थक शब्द (म्हणजे एकमेकांहून अभिन्न) मानीत असाल, तर 'व्यंजकत्व' आणि 'शब्द' हेही तुम्ही समानार्थक शब्द (म्हणजे एकमेकांहून अभिन्न) काय म्हणून मानीत नाही? कारण इच्छा काय, वाटेल तिकडे निरर्गलपणे धावू शकते[२७]. पण व्यंजकत्वाचे स्वरूप (वाचकत्वाहून व गुणवृत्तीहून) वेगळे आहे हे आम्ही स्पष्टपणे दाखविल्यावरही त्या व्यंजकत्वाचे स्वरूप वाचकत्व व गुणवृत्ति यांहून निराळे नाही असे वेगळे चुकीचे ज्ञान कसे उत्पन्न होईल? कारण, असे मानिल्यास पर्वतावरील धूर हा अग्नीपासून उत्पन्न झाला नसून जल इ. दुसऱ्या कशापासूनही निर्माण होतो असे काहीही म्हणणे शक्य आहे, असा आशय. (पण ते केव्हाही बरोबर नाही). आता व्यंजकत्वाचा वाचकत्व व गुणवृत्ति यांहून जो वेगळेपणा दाखविला, त्याचा समारोप वृत्तिकार 'तर मग याप्रमाणे' इ. शब्दांनी करितात. 'भाषेतल्या शब्दांच्या उपयोगाच्या बाबतीत' असे म्हणून वृत्तिकार समुद्राच्या खवळण्याचा आवाज इत्यांदींचा[२८] प्रांत वेगळा काढतात.

टीपा

१) म्हणजे तीही लक्षणेने होते असे म्हणता येणार नाही. कारण मुख्यार्थ बाध वगैरे लक्षणेच्या सामग्रीचा तेथे काहीही संबंध नसतो.

२) पाहा, उद्द्योत पहिला, कारिका १४, उत्तरार्धावरील वृत्ति.

३) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'ध्वनीचे दोन प्रकार'".

४) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'गुणवृत्ति शब्दाचे अभिनवगुप्तांनी सांगितलेले चार अर्थ' वरील 'गुणवृत्ति' या शब्दाचे विवरण व काशी आवृत्ति पृ. ४३० वरील लोचनातील गुणेन निमित्तेन इ. वाक्य.

५) वाचकत्वाचे सहकारी कारण संकेत व व्यंजकत्वाची सहकारी कारणे वक्तृ– वैशिष्ट्य इ.

६) पाहा, द्वितीयखंड, "उद्द्योत – ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'" वरील टीप ७ वी.

७) म्हणजे लक्षणा ही वाच्यार्थाचा बाध झाल्यामुळेच अस्तित्वात येते. ती संकेतावर अवलंबून असते व लक्ष्य अर्थ हा वाच्य अर्थाशी कोणत्यातरी संबंधाने निगडित असल्यामुळे तो वाच्यार्थाहून स्वतंत्रपणे भासत नाही.
८) 'गंगा' शब्दाचा लक्ष्यार्थ 'गंगातीर'. हा (लक्ष्य) वस्तुस्वरूपी आहे, (व्यंग्य) वस्तुस्वरूपी नाही.

९) पूर्वीच म्हणजे प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'शान्त हा स्वतंत्र रस आहेत या सिद्धान्ताचे प्रतिपादन'" वरील ओळींमध्ये.

१०) पाहा, प्रथमखंड, उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार – (२) 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' हा प्रकार.

११) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'लक्षणा हे ध्वनीच्या एखाद्या प्रकाराचे निदर्शक चिह्न असू शकेल'" वर.

१२) पाहा, कारिका १–१६.

१३) प्रथमखंड, "उद्द्योत – ३ 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'" येथे प्रसिद्ध्यनुरोधप्रवर्तितव्यवहाराः असा शब्दप्रयोगः आनन्दवर्धनांनी केला आहे. आणि सर्व उदाहरणें रूढीचीच दिली आहेत; म्हणून तेथे प्रसिद्ध्यनुरोध याचा अर्थ 'रूढीला अनुसरणे' असा करावा लागतो. पण येथे प्रसिद्ध्यनुरोधाभ्याम् असे द्विवचन वापरले आहे. त्याचे विवरण अभिनवगुप्तांनी प्रसिद्धि म्हणजे रूढि आणि अनुरोध म्हणजे वृत्तानुरोध व शब्दालंकारानुरोध असे केले आहे, आणि ते योग्यच आहे. पण अनुरोधाचे उदाहरण म्हणून त्यांनी **वदति बिसिनीपत्रशयनम्** हे जे दिले आहे, ते बरोबर नाही. कारण **वदति बिसिनीपत्रशयनम्** हे उदाहरण व त्यानंतरची उदाहरणे आनंदवर्धनांनी रूढीची

म्हणून दिली आहेत. अनुरोधाची म्हणजे वृत्तानुरोध व शब्दालंकारानुरोध यांची योग्य उदाहरणे म्हणजे प्रथमखंड, ५८६–८७ वर अभिनवगुप्तांनी दिलेली **प्रेङ्खत्प्रेम**... इ. व विषमकाण्ड... इ. उदाहरणे.

१४) म्हणजे काही उदाहरणे गुणवृत्तीच्या क्षेत्रात येतात. (पाहा द्वितीयखंड, "उद्द्योत – ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'").

१५) काही वेळा म्हणजे आर्थी व्यंजनेच्या उदाहरणामध्ये, जेथे लक्षणा मुळीच नसते, तेथे.

१६) म्हणजे लक्षणामूल व्यंजनेच्या उदाहरणांमध्ये, की जेथे वाचकत्वाचा बाध झालेला असतो.

१७) म्हणजे योग्य क्रम लाविल्यास ते वाक्य वाचकत्व**गुणवृत्तिविलक्षणस्य चापि** तस्य असे होईल.

१८) पूर्वी सांगितलेली कारणे म्हणजे स्वरूपभेद व विषयभेद.

१९) ही व्याप्ति पुढीलप्रमाणे जुळविता येईल– जेथे जेथे एक वस्तु दोन पदार्थांच्या आश्रयाने राहते, तेथे तेथे ती त्या दोन पदार्थांहून वेगळी असते.

२०) प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'ध्वनीचे दोन प्रकार'".

२० अ) यापूर्वीची तीन कारणे म्हणजे,

१) स्वरूपभेद.
२) विषयभेद.
३) उभयाश्रितत्व.

२१) म्हणजे जेथे वाचकत्व किंवा गुणवृत्ति यांचा मागमूसहि नसतो, अशा (गाण्याचे स्वर इ.) ठिकाणी.

२२) म्हणजे अभिनय इ. हालचालींमध्ये.

२३) प्रमेयत्व म्हणजे ज्ञानाचा विषय असणे. हा धर्म आवाजातच नव्हे, तर घट, पट इत्यादींमध्येही असू शकतो; कारण तेही ज्ञानाचे विषय होऊ शकतात.

२४) **शब्दादन्यत्रापि व्यञ्जकत्वस्य दर्शनात्** असे वृत्तीमध्ये स्पष्ट म्हटलेले असल्यामुळे लोचनातील सूचितः याचा अर्थ उक्तः व त्यापूर्वीच्या सूचयति याचा **वक्ति** असाच अर्थ करावयास पाहिजे, तसेच "उद्द्योत – ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'" वरील 'सुचवितात' व 'सुचविलेले' याचा अर्थ 'सांगतात' व 'सांगितलेले' असा आहे.

२५) म्हणजे मूक अभिनय, गाण्याचे सूर इत्यादींमध्ये.

२६) म्हणजे सादृश्यसंबंधावर आधारलेल्या लक्षणेच्या प्रकाराचा.

२७) तुलनार्थ पाहा; **मनोरथानामगतिर्न विद्यते** । (कुमारसंभवम्, ५—६४).

२८) म्हणजे मेघगर्जना, संगीतातील सूर वगैरेंचा सारांश हा की, समुद्राच्या खवळण्याचा आवाज, मेघगर्जना व संगीतातील केवळ नादमय सूर यांच्या बाबतीत वाचकत्व व गुणवृत्ति हे व्यापार संभवत नाहीत. केवळ व्यंजकत्व हा व्यापार संभवतो आणि तो व्यापार असला, तरी ते आवाज 'काव्या'च्या कोणत्याही प्रकारात येत नाहीत.

ध्वन्यालोकः

अन्यो ब्रूयात्— "ननु विवक्षितान्यपरवाच्ये ध्वनौ गुणवृत्तिता नास्तीति यदुच्यते तद्युक्तम् । यस्माद्वाच्यवाचकप्रतीतिपूर्विका यत्रार्थान्तरप्रतिपत्तिस्तत्र कथं गुणवृत्तिव्यवहारः, न हि गुणवृत्तौ यदा निमित्तेन केनचिद्विषयान्तरे शब्द आरोप्यते अत्यन्ततिरस्कृतस्वार्थः यथा— 'अग्निर्माणवकः' इत्यादौ, यदा वा स्वार्थमंशेनापरित्यजंस्तत्सम्बन्धद्वारेण विषयान्तरमाक्रामति, यथा— 'गङ्गायां घोषः' इत्यादौ, तदा विवक्षितवाच्यत्वमुपपद्यते । अत एव च । विवक्षितान्यपरवाच्ये ध्वनौ वाच्यवाचकयोर्द्वयोरपि स्वरूपप्रतीतिरर्थावगमनं च दृश्यत इति व्यञ्जकत्वव्यवहारो युक्त्यनुरोधी । स्वरूपं प्रकाशयन्नेव परावभासको व्यञ्जक इत्युच्यते, तथाविधे विषये वाचकत्वस्यैव व्यञ्जकत्वमिति गुणवृत्तिव्यवहारो नियमेनैव न शक्यते कर्तुम् । अविवक्षितवाच्यस्तु ध्वनिर्गुणवृत्तेः कथं भिद्यते । तस्य प्रभेदद्वये गुणवृत्तिप्रभेदद्वयरूपता लक्ष्यत एव यतः ।" अयमपि न दोषः । यस्मादविवक्षितवाच्यो ध्वनिर्गुणवृत्तिमार्गाश्रयोऽपि भवति न तु गुणवृत्तिरूप एव । गुणवृत्तिर्हि व्यञ्जकत्वशून्यापि दृश्यते । व्यञ्जकत्वं च यथोक्तचारुत्वहेतुं व्यङ्ग्यं विना न व्यवतिष्ठते । गुणवृत्तिस्तु वाच्यधर्माश्रयेणैव व्यङ्ग्यमात्राश्रयेण चाभेदोपचाररूपा सम्भवति, यथा तीक्ष्णत्वादग्निर्माणवकः, आह्लादकत्वाच्चन्द्र एवास्या मुखमित्यादौ । यथा च 'प्रिये जने नास्ति पुनरुक्तम्' इत्यादौ । यापि लक्षणारूपा गुणवृत्तिः साप्युपलक्षणीयार्थसंबन्धमात्राश्रयेण चारुरूपव्यङ्ग्यतीतिं विनापि सम्भवत्येव, यथा— मञ्चाः क्रोशन्तीत्यादौ विषये ।

यत्र तु सा चारुरूपव्यङ्ग्यप्रतीतिहेतुस्तत्रापि व्यञ्जकत्वानुप्रवेशेनैव वाचकत्ववत् । असम्भविना चार्थेन यत्र व्यवहारः, यथा— 'सुवर्णपुष्पां पृथिवीम्' इत्यादौ, तत्र चारुरूपव्यङ्ग्यप्रतीतिरेव प्रयोजिकेति तथाविधेऽपि विषये गुणवृत्तौ सत्यामपि ध्वनिव्यवहार एव युक्त्यनुरोधी । तस्मादविवक्षितवाच्ये ध्वनौ द्वयोरपि प्रभेदयोर्व्यञ्जकत्वविशेषाविशिष्टा गुणवृत्तिर्न तु तदेकरूपा सहृदयहृदयाह्लादिनी प्रतीयमानाप्रतीतिहेतुत्वाद्विषयान्तरे तद्रूपशून्याया दर्शनात् । एतच्च सर्वं प्राक्सूचितमपि स्फुटतरप्रतीतये पुनरुक्तम् ।

ध्वन्यालोक

दुसरा (प्रतिपक्षी) म्हणेल :— 'खरेच, विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीमध्ये गुणवृत्ति (लक्षणा) नाही असे जे तुम्ही म्हणता, ते योग्य आहे. कारण ज्या ठिकाणी वाच्यार्थ व वाचकशब्द यांचा आधी प्रत्यय येऊन मगच दुसऱ्या (व्यंग्य) अर्थाचा बोध होतो, तेथे लक्षणाव्यापार असतो असे कसे म्हणता येईल? कारण लाक्षणिक शब्दप्रयोगामध्ये जेव्हा शब्दाचा वाच्यार्थ पूर्णपणे बाजूला सारून कोणत्यातरी निमित्तामुळे म्हणजे

(संबंधामुळे) तो शब्द दुसऱ्याच अर्थाने वापरला जातो, जसे– 'माणवक हा अग्नि[१] आहे' अशासारख्या उदाहरणामध्ये– तेव्हा किंवा ज्यावेळी शब्द आपला मूळचा अर्थ अंशतः कायम ठेवून[२] दुसऱ्या अर्थाशी असलेल्या त्याच्या संबंधामुळे तो दुसऱ्या अर्थाचा बोध करून देतो, जसे 'गंगेवर गौळीवाडा' वगैरे उदाहरणांमध्ये, तेव्हा तेथे काही वाच्यार्थ (पूर्णपणे) विवक्षित नसतो असे म्हणणे योग्य होणार नाही[३]. असे असल्यामुळेच 'विवक्षितान्यपरवाच्य' ध्वनीमध्ये वाच्यार्थ व वाचकशब्द या दोघांचीही स्वरूपे पूर्णपणे व स्पष्ट दिसतात व वेगळा अर्थही प्रतीत झाल्याचे अनुभवास येते, म्हणून तेथे व्यंजकत्व असते असे म्हणणे तर्काला धरून आहे. जो स्वतःच्या रूपाचे दर्शन घडवीत असताना दुसऱ्याला प्रकाशित करितो त्याला 'व्यंजक' म्हणतात. आणि तशा उदाहरणामध्ये वाचकत्व (म्हणजे अभिधेने प्रकट केलेला वाच्यार्थ हा) व्यंजक होत असल्यामुळे तेथे गुणवृत्ति आहे, असे मुळीच म्हणता येणे शक्य नाही.

पण अविवक्षितवाच्य ध्वनि हा गुणवृत्तीहून वेगळा कसा? कारण त्याच्या (अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य या) दोन्ही प्रकारात गुणवृत्तीचे दोन्ही प्रकार असलेले दिसतातच!'

यामुळेही आमच्या मताला बाध येत नाही, कारण अविवक्षितवाच्य हा गुणवृत्तीच्या (दोन्ही) प्रकारांच्या आश्रयाने[४] असलेलाही आढळतो, पण तो गुणवृत्तीशी एकरूप नाही. कारण गुणवृत्ति ही ही सर्वस्वी व्यंजकत्व–विरहित असलेलीही आढळते.[५] पण व्यंजकत्व मागे सांगितल्याप्रमाणें[६] सौंदर्यास कारणीभूत असलेल्या व्यंग्यार्थाशिवाय असू शकत नाही. पण तादात्म्य संबंधावर आधारलेली गुणवृत्ति केवळ वाच्यार्थाच्या धर्माचे समर्थन करण्यासाठी सामान्य प्रतीच्या व्यंग्यार्थाचा आश्रय घेतलेली आढळते;[७] जसे :– 'प्रखरपणामुळे माणवक हा अग्नि आहे' किंवा 'आल्हाददायक असल्यामुळे हिचे मुख म्हणजे चंद्रच आहे' इत्यादि उदाहरणांमध्ये. तसेच 'प्रिय व्यक्तीच्या बाबतीत पुनरुक्ति नसते' इ. उदाहरणांमध्ये. (पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'लक्षणा हे ध्वनीचे लक्षण नाही'"). आता लक्षणेचा दुसरा प्रकार जो 'शुद्धा' लक्षणा, तो देखील केवळ वाच्यार्थाच्या लक्ष्यार्थाशी असलेल्या (सादृश्याहून निराळ्या) संबंधामुळे चारुत्वरूप व्यंग्यार्थाची प्रतीति न घडविताही असू शकतोच. जसे 'मंचक ओरडतात' इत्यादि उदाहरणांमध्ये.[८]

पण ज्या ठिकाणी ती गुणवृत्ति सुंदर स्वरूपाच्या व्यंग्यार्थाचा बोध करून देण्यास कारणीभूत होते, तेथेदेखील तिच्यामध्ये व्यंजकत्व संचारते, म्हणूनच. वाचकत्वदेखील जसे त्याच्यात व्यंजकत्व संचारल्यामुळेच सुंदर व्यंग्यार्थाची प्रतीति आणून देते, त्याप्रमाणे. आणि ज्या ठिकाणी असंभवनीय अर्थाने शब्दप्रयोग केला जातो, जसे– 'सोन्याची नाणी फुलविणाऱ्या[९]...' इ. उदाहरणांमध्ये– तेथेही तसा (आरोपात्मक) शब्दप्रयोग करण्याचे कारण सुंदर स्वरूप असलेल्या व्यंग्यार्थाची प्रतीति घडवणे हेच असते. आणि म्हणून तशा प्रकारच्या उदाहरणांमध्येही गुणवृत्ति असली, तरी तशा उदाहरणांना ध्वनीची उदाहरण म्हणणे हेच तर्काला अनुसरून आहे. म्हणून 'अविवक्षितवाच्य' ध्वनीच्या दोन्ही प्रकारांमध्ये गुणवृत्ति ही विशेष प्रकारच्या व्यंजकत्वाने पूर्णपणे व्याप्त असते. ती काही त्या (व्यंजकत्वा) शी एकरूप नसते किंवा सहृदयांच्या हृदयास आनंद देणारीही नसते. कारण ती 'सुंदर' व्यंग्यार्थाचा प्रत्यय करून देण्यास कारणीभूत नसते, आणि इतर (म्हणजे गुणवृत्ति असून व्यंजकत्व नसलेल्या) उदाहरणांत गुणवृत्ति तशी (म्हणजे व्यंग्यार्थाची प्रतीति घडवावयाला कारणीभूत) नसल्याचे दिसून येते. हे सगळे प्रतिपादन पूर्वी[१०] सूचित केलेले असले, तरी आणखी स्पष्टपणे समजावे म्हणून ते (आम्ही) येथे पुन्हा केले.

लोचनम्

ननु वाचकत्वरूपोपजीवकत्वाद् गुणवृत्त्यनुजीवकत्वादिति च हेतुद्वयं यदुक्तं तदविवक्षितवाच्यभागे सिद्धं न भवति, तस्य लक्षणैकशरीरत्वादित्यभिप्रायेणोपक्रमते— अन्यो ब्रूयादिति । यद्यपि च तस्य तदुभयाश्रयत्वेन व्यवस्थानादिति ब्रुवता निर्णीतचरमेवैतत्, तथापि गुणवृत्तेरविवक्षितवाच्यस्य च दुर्निरूपं वैलक्षण्यं यः पश्यति तं प्रत्याशङ्कानिवारणार्थोऽयमुपक्रमः । अत एवाद्यभेदस्याङ्गीकरणपूर्वकमयं द्वितीयभेदाक्षेपः । विवक्षितान्यपरवाच्य इत्यादिना पराभ्युपगमस्य स्वाङ्गीकारो दर्श्यते । गुणवृत्तिव्यवहाराभावे हेतुं दर्शयितुं तस्या एव गुणवृत्तेस्तावद् वृत्तान्तं दर्शयति— न हीति । गुणतया वृत्तिर्व्यापारो गुणवृत्तिः । गुणेन निमित्तेन सादृश्यादिना वृत्तिः अर्थान्तरविषयेऽपि शब्दस्य सामानाधिकरण्यमिति गौणं दर्शयति । यदा वा स्वार्थमिति लक्षणां दर्शयति । अनेन भेदद्वयेन च स्वीकृतमविवक्षितवाच्यभेदद्वयात्मकमिति सूचयति । अत एव अत्यन्ततिरस्कृतस्वार्थशब्देन विषयान्तरमाक्रामति चेत्यनेन शब्देन तदेव भेदद्वयं दर्शयति । अत एव चेति । यत एव न तत्रोक्तहेतुबलाद् गुणवृत्तिव्यवहारो न्याय्यस्तत इत्यर्थः । युक्तिं लोकप्रसिद्धिरूपामबाधितां दर्शयति— स्वरूपमिति । उच्यत इति प्रदीपादिः, इन्द्रियादेस्तु करणत्वान्न व्यञ्जकत्वं प्रतीत्युत्पत्तौ ।

एवमभ्युपगमं प्रदर्श्याक्षेपं दर्शयति— अविवक्षितेति । तुशब्दः पूर्वस्माद्विदोषं द्योतयति । तस्येति । अविवक्षितवाच्यस्य यत्प्रभेदद्वयं तस्मिन् गौणलाक्षणिकत्वात्मकं प्रकारद्वयं लक्ष्यते निर्भासत इत्यर्थः । एतत्परिहरति— अयमपीति । गुणवृत्तेर्यो मार्गः प्रभेदद्वयं स आश्रयो निमित्ततया प्राक्कक्ष्यानिवेशी यस्येत्यर्थः । एतच्च पूर्वमेव निर्णीतम् । तादृप्याभावे हेतुमाह— गुणवृत्तिरिति । गौणलाक्षणिकरूपोभयी अपीत्यर्थः । ननु व्यञ्जकत्वेन कथं शून्या गुणवृत्तिर्भवति, यतः पूर्वमेवोक्तम्—

मुख्यां वृत्तिं परित्यज्य गुणवृत्त्यार्थदर्शनम् ।
यदुद्दिश्य फलं तत्र शब्दो नैव स्खलद्‌ितः ॥ इति ॥

न हि प्रयोजनशून्य उपचारः, प्रयोजनांशनिवेदी च व्यञ्जनव्यापार इति भवद्भिरेवाभ्यधायीत्याशङ्क्याभिमतं व्यञ्जकत्वं विश्रान्तिस्थानरूपं तत्र नास्तीत्याह— व्यञ्जकत्वं चेति । वाच्यधर्मेति । वाच्यविषयो यो धर्मोऽभिधाव्यापारस्तस्याश्रयेण तदुपबृंहणायेत्यर्थः । श्रुतार्थापत्ताविवार्थान्तरस्याभिधेयार्थोपपादन एव पर्यवसानादिति भावः । तत्र गौणस्योदाहरणमाह— यथेति । द्वितीयमपि प्रकारं व्यञ्जकत्वशून्यं निदर्शयितुमुपक्रमते— यापीति । चारुरूपं विश्रान्तिस्थानं, तदभावे स व्यञ्जकत्वव्यापारो नैवोन्मीलति, प्रत्यावृत्त्य वाच्य एव विश्रान्तेः, क्षणदृष्टनष्टदिव्यविभवप्राकृतपुरुषवत् ।

ननु यत्र व्यङ्ग्येऽर्थे विश्रान्तिस्तत्र किं कर्तव्यमित्याशङ्क्याहयत्र त्विति । अस्ति तत्रापरो व्यञ्जनव्यापारः परिस्फुट एवेत्यर्थः । दृष्टान्तं पराङ्गीकृतमेवाह— वाचकत्ववदिति । वाचकत्वे हि त्वयैवाङ्गीकृतो व्यञ्जनव्यापारः प्रथमं ध्वनिप्रभेदमप्रत्याचक्षाणेनेति भावः । किञ्च वस्त्वन्तरे मुख्ये सम्भवति सम्भवदेव वस्त्वन्तरं मुख्यमेवारोप्यते, विषयान्तरमात्रतस्त्वारोपव्यवहार इति जीवितमुपचारस्य । सुवर्णपुष्पाणां तु मूलतः एवासम्भवात्तदुद्यनस्य तत्र क आरोपव्यवहारः? 'सुवर्णपुष्पां पृथिवीम्' इति हि स्यादारोपः । तस्मादत्र व्यञ्जनव्यापार एव प्रधानभूतो नारोपव्यवहारः । स परं व्यञ्जनव्यापारानुरोधितयोत्तिष्ठति । तदाह— असम्भविनेति । प्रयोजिकेति । व्यङ्ग्यमेव हि प्रयोजनरूपं प्रतीतिविश्रामस्थानम्, आरोपिते त्वसम्भवति प्रतीतिविश्रान्तिराशङ्कनीयापि न भवति । सत्यामपीति । व्यञ्जनव्यापारसम्पत्तये क्षणमात्रमवलम्बितायामिति भावः । तस्मादिति । व्यञ्जकत्वलक्षणो यो विशेषस्तेनाविशिष्टा अविद्यमानं विशिष्टं विशेषो भेदनं यस्याः, व्यञ्जकत्वं न तस्या भेद इत्यर्थः । यदि वा

व्यञ्जकत्वलक्षणेन व्यापारविशेषेणाविशिष्टा न्यक्कृतस्वभावा आसमन्ताद्व्याप्ता । तदेकेति । तेन व्यञ्जकत्वलक्षणेन सहैकं रूपं यस्याः सा तथाविधा न भवति । अविवक्षितवाच्ये व्यञ्जकत्वं गुणवृत्तेः पृथक्चारुप्रतीतिहेतुत्वात्, विवक्षितवाच्यनिष्ठव्यञ्जकत्ववत्, न हि गुणवृत्तेश्चारुप्रतीतिहेतुत्वमस्तीति दर्शयति– विषयान्तर इति । अग्निर्बटुरित्यादौ । प्रागिति । प्रथमोद्द्योते ।

लोचन

"पण काय हो (व्यंजकत्व हे गुणवृत्तीहून वेगळे आहे याला) (१) ते वाचकत्वाच्या आश्रयाने असते आणि (२) ते गुणवृत्तीच्या आश्रयाने राहते अशी जी दोन कारणे सांगितली, ती ध्वनीच्या 'अविवक्षितवाच्य' या प्रकाराच्या बाबतीत लागू पडत नाहीत, कारण तो म्हणजे अविवक्षितवाच्य हा ध्वनीचा प्रकार लक्षणा याच स्वरूपाचा असतो" अशी शंका कल्पून ती शंका मांडण्यास वृत्तिकार (दुसरा म्हणेल) या शब्दांनी प्रारंभ करितात. आणि जरी 'ते व्यंजकत्व (आलटून पालटून) वाचकत्व व गुणवृत्ति या दोहोंच्या आश्रयाने राहात असल्यामुळे[११]' असे म्हणून वृत्तिकारांनी या मुद्द्याचा म्हणजे ध्वनीचा तो प्रकार गुणवृत्तीहून वेगळा आहे याचा निर्णय केला असला, तरी गुणवृत्ति व अविवक्षितवाच्य ध्वनि यांमधील वेगळेपणा स्पष्टपणे दिसत नाही, असे जो मानितो, त्याची शंका दूर करण्यासाठी वृत्तिकार पुढील चर्चेला सुरुवात करीत आहेत. म्हणूनच ध्वनीच्या पहिल्या म्हणजे विवक्षितान्यपरवाच्य या प्रकारामध्ये गुणवृत्ति नसते हे मान्य करूनच पूर्वपक्षी दुसऱ्या म्हणजे अविवक्षितवाच्य या प्रकारावर आक्षेप घेत आहे.[१२] 'विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीमध्ये' इ. वाक्याने वृत्तिकार ध्वनिवाद्याच्या मताचा पूर्वपक्ष्याने स्वीकार केला असे सुचवीत आहेत. विवक्षितान्यपरवाच्य या प्रकारामध्ये गुणवृत्ति नसते असे म्हणण्याचे कारण दाखविण्यासाठी पूर्वपक्षी गुणवृत्तीतील परिस्थिति 'कारण लाक्षणिक' इ. शब्दांनी वर्णीत आहे. गुणत्वाने म्हणजे अमुख्यपणाने कार्य करणारा व्यापार म्हणजे गुणवृत्ति होय. तसेच 'गुणामुळे म्हणजे सादृश्य वगैरे कारणामुळे[१३] शब्द आपल्या वाच्य अर्थाखेरीज इतर अर्थी वापरलेला असणे म्हणजेच विषयवाचक शब्द[१४] व विषयिवाचक शब्द हे एका विभक्तीत वापरलेले असणे' असे 'गुणवृत्ति' या शब्दाचे विवरण केल्यास 'गुणवृत्ति' या शब्दाने लक्षणेच्या गौणी प्रकाराचा बोध करून दिला जात आहे. 'किंवा ज्यावेळी शब्द' इ. वाक्याने सादृश्येतर संबंधावर आधारलेल्या लक्षणेचा निर्देश केला जात आहे. आणि लक्षणेच्या या दोन प्रकारांद्वारे अविवक्षितवाच्य ध्वनीचे अत्यंततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य हे दोन प्रकार आहेत याला पूर्वपक्ष्याने मान्यता दिल्याचे दर्शविले जात आहे. म्हणूनच (वृत्तीतल्या) 'शब्दाचा वाच्यार्थ पूर्णपणे बाजूला सारून' या शब्दांनी आणि 'दुसऱ्या अर्थाचा बोध करून देतो' या शब्दांनी पूर्वपक्षी त्याच दोन प्रकारांचा निर्देश करीत आहे.[१५] 'असे असल्यामुळेच'– ज्या अर्थी त्या (विवक्षितान्यपरवाच्य) प्रकारामध्ये वर सांगितलेल्या कारणांमुळे लक्षणा प्रवृत्त होते असे म्हणणे योग्य होणार नाही, असा आशय (तर्काला धरून आहे). हा तर्क लोकप्रसिद्ध व सर्वत्र लागू पडणारा आहे. हे वृत्तिकार 'जो स्वतःच्या रूपाचे दर्शन' इ. शब्दांनी दर्शवितात. 'त्याला व्यंजक म्हणतात–' उदा. दिवा वगैरेंना.[१६] पण इंद्रिये वगैरे प्रतीति घडविण्याची 'करणे'[१७] असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी ज्ञान करून देण्याच्या बाबतीत 'व्यंजकत्व' नसते.

याप्रमाणे पूर्वपक्ष्यानें ध्वनिवाद्याच्या मताचा जो अंश[१८] मान्य केला, तो दाखविल्यानंतर वृत्तिकार त्याने घेतलेला आक्षेप कोणता[१९] ते 'पण अविवक्षितवाच्य ध्वनि' इ. शब्दांनी सांगतात. 'पण' हा शब्द विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीहून अविवक्षितवाच्य ध्वनीचा निराळेपणा सुचवितो. 'कारण त्याच्या–' अविवक्षितवाच्य ध्वनीचे जे दोन प्रकार, त्यांमध्ये लक्षणैचे गौणी व शुद्धा हे दोन प्रकार दिसतात म्हणजे स्पष्टपणे प्रत्ययास येतात, असा अर्थ. पूर्वपक्ष्याच्या या आक्षेयाचे खंडन वृत्तिकार 'यामुळेही' इ. शब्दांनी

करितात. गुणवृत्तीचा जो 'मार्ग' म्हणजे दोन प्रकार, तो ज्याचा आश्रय म्हणजे कारण असल्यामुळे आधीच्या टप्प्यात कार्य करणारा आहे, असा अर्थ. आणि हे पूर्वीच[२०] स्पष्ट केले आहे. अविवक्षितवादय ध्वनि हा गुणवृत्तीशी एकरूप नाही याचे कारण वृत्तिकार 'कारण गुणवृत्ति' इ. शब्दांनी सांगतात. गुणवृत्ति म्हणजे 'गौणी' व 'शुद्ध' लक्षणा या दोन्ही प्रकारची गुणवृत्ति, असा अर्थ.

"पण काय हो, गुणवृत्ति ही व्यंजकत्वविरहित कशी असू शकते? कारण तुम्हीच पूर्वी[२१] म्हटले होते की—

'मुख्य व्यापार (म्हणजे अभिधाव्यापार) बाजूला सारून गुणवृत्तीने (लक्षणेने) लक्ष्य अर्थाचा बोध करून देण्याचे काम ज्या फलाची (म्हणजे प्रयोजनाची) प्रतीति करून देण्याच्या उद्देशाने केले जाते, त्या (फलाचा बोध करून देण्याचे) कामी शब्दाची गति (म्हणजे सामर्थ्य) मुळीच खुंटत नाही.'

कारण उपचार[२२] हा प्रयोजनाशिवाय असू शकत नाही व व्यंजनाव्यापार हा तर प्रयोजन या अंशाचा बोध करून देणारा असतो, असे आपणच[२३] म्हटले होते!" अशी शंका कल्पून गुणवृत्तीच्या काही प्रकारांमध्ये आम्हाला[२४] इष्ट ते व्यंजकत्व म्हणजे मन विश्रान्त होण्याजोगी[२५] परिस्थिति नसते, हे वृत्तिकार 'पण व्यंजकत्व' इत्यादि शब्दांनी सांगतात. 'वाच्यार्थाच्या धर्माचे—' वाच्यार्थाच्या बाबतीतला जो धर्म म्हणजे अभिधा व्यापार, त्याच्या आश्रयाने म्हणजे, त्याच्या समर्थनासाठी,[२६] असा अर्थ. जसे श्रुतार्थापत्तीमध्ये,[२७] तसेच गुणवृत्तीमध्ये दुसऱ्या अर्थाचे पर्यवसान वाच्यार्थाचे समर्थन करण्यातच होते[२८] म्हणून, असा आशय. गुणवृत्तीच्या गौणी व लक्षणा या दोन प्रकारांपैकी गौणी या प्रकाराची उदाहरणे वृत्तिकार 'जसे प्रखरपणामुळे' इ. शब्दांनी सांगतात. गुणवृत्तीचा दुसरा जो 'शुद्धा लक्षणा' हा प्रकार त्याचेही (सुंदर अशा) व्यंग्यार्थाने विरहित असलेले उदाहरण वृत्तिकार 'आता लक्षणेचा जो' इ. शब्दांनी दाखविण्यास प्रारंभ करितात. रसिकाचे मन विश्रांत होण्याचे ठिकाण (म्हणजे त्याला आनंद देण्याचे कारण) असे जे सुंदर प्रयोजन, ते नसले तर तो व्यंजकत्वव्यापार प्रवृत्तच होत नाही. उलट तो (असुंदर अशा व्यंग्यार्थांपासून) परत फिरून वाच्यार्थातच विलीन होतो,[२९] जसे एखाद्या दरिद्री माणसाला स्वप्नात क्षणभरच दिव्य वैभव प्राप्त झालेले दिसावे व लगेच ते नष्ट व्हावे, त्याप्रमाणे[३०].

'पण काय हो, गुणवृत्तीच्या ज्या उदाहरणात रसिकाचे मन सुंदर अशा व्यंग्य अर्थात विश्रांत होते, तेथे काय करावे?'[३१] अशी शंका कल्पून तिचे वृत्तिकार 'आणि ज्या ठिकाणी' इ. शब्दांनी समाधान करितात. अशा उदाहरणात (व्यंग्यार्थाची प्रतीति गुणवृत्तीमुळे होत नसून तेथे) गुणवृत्तीहून निराळा व्यंजकत्वव्यापार स्पष्टपणेच प्रत्ययास येतो, असा अर्थ. याला पूर्वपक्ष्याने मान्य केलेलाच दृष्टान्त 'वाचकत्वसुद्धा जसे' या शब्दांनी वृत्तिकार देतात. कारण पहिल्या म्हणजे 'विवक्षितान्यपरवाच्य' या ध्वनिप्रकाराचा (पूर्वी) स्वीकार करिताना तुम्हीच वाचकत्वाच्या ठिकाणी (म्हणजे वाच्यार्थाच्या ठिकाणी) व्यंजनाव्यापार असतो हे मान्य केले आहे.[३२] आणखी असे की, एखादी वस्तु खरोखर अस्तित्वात असताना तिच्यावर खरोखर अस्तित्वात असणाऱ्याच दुसऱ्या वस्तूचा आरोप केला जाणे आणि त्या दोन वस्तु एकमेकींहून भिन्न असल्यामुळेच तेथे एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा आरोप केला जाणे, हाच 'उपचारा'चा प्राण आहे. पण सोन्याची नाणी फुलविणे ही गोष्ट मुळातच असंभवनीय असल्यामुळे ती नाणी गोळा करणे याला 'आरोप' कसे म्हणता येईल?[३३] पृथ्वी ही सोन्याची नाणी फुलविणारी आहे (व ती नाणी तीन प्रकारचे लोक गोळा करितात) यामध्ये 'आरोप' आहे असे मानिले तरी या उदाहरणात व्यंजनाव्यापार हाच प्रधान आहे, 'आरोप' हा प्रधान नाही. तो आरोप (व त्यामुळे प्रवृत्त होणारी गुणवृत्ति हे) त्या व्यंजनाव्यापाराचे उपाय म्हणूनच प्रकट

होतात.[३४] तेच वृत्तिकार 'आणि असंभवनीय अर्थाने' इ. शब्दांनी सांगतात. 'तसा (आरोपात्मक) शब्दप्रयोग करण्याचे कारण—' कारण (सुंदर) प्रयोजनरूपी व्यंग्यार्थाच्या प्रतीतीतच रसिकाचे मन विश्रान्त होते (म्हणजे रसिकाच्या मनाला खरेखुरे समाधान होते). पण आरोपाचा 'विषयी' म्हणजे ज्याचा आरोप केला जातो, तो (संभवनीय असो किंवा) असंभवनीय असो, त्याच्या ज्ञानाने रसिकाचे समाधान होण्याच प्रश्नही उद्‌भवत नाही. 'गुणवृत्ति असली तरी' म्हणजे व्यंजनाव्यापार कार्यप्रवृत्त होण्यासाठी गुणवृत्तीचा क्षणभर आश्रय केला जात असला तरी, असा आशय. 'म्हणून'— 'व्यंजकत्व' या वैशिष्ट्यापासून ज्या प्रयोजनवती लक्षणेची ताटातूट झालेली नसते[३५] अशी गुणवृत्ति, म्हणजे ज्या 'प्रयोजनवती गुणवृत्तीहून व्यंजकत्व हे वेगळे नसतें, अशी गुणवृत्ति, असा अर्थ. किंवा व्यंजकत्व या स्वरूपाचा जो विशिष्ट व्यापार, त्याने जी गुणवृत्ति अविशिष्ट[३६] आहे म्हणजे ज्या गुणवृत्तीचे स्वरूप दडपून टाकले आहे अशी (किंवा[३७]) त्या व्यंजकत्वाने जिला सर्व बाजूंनी व्यापून टाकले आहे, अशी गुणवृत्ति. 'त्या (व्यंजकत्वा) शी (एकरूप नसते)'— त्या व्यंजकत्वरूपी व्यापाराचे व जिचे स्वरूप एकच आहे अशा प्रकारची ती गुणवृत्ति असत नाही. अविवक्षितवाच्य ध्वनीमध्ये व्यंजकत्व हे गुणवृत्तीहून भिन्न असते, कारण त्या व्यंजकत्वामुळेच सौंदर्याची प्रतीति येते, ज्याप्रमाणे विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीमध्ये असलेल्या व्यंजकत्वामुळे सौंदर्याची प्रतीति येते (व म्हणून ते व्यंजकत्व वाचकत्वाहून निराळे असते) त्याप्रमाणे. कारण गुणवृत्ति हे काही सौंदर्याच्या प्रतीतीचे कारण नसते हे वृत्तिकार 'इतर उदाहरणात' इ. शब्दांनी दर्शवितात. इतर उदाहरणात म्हणजे 'हा मुलगा अग्नि आहे' इ. उदाहरणांत. 'पूर्वी' म्हणजे पहिल्या उद्‌द्योतात.[३८]

टीपा

१) येथे अग्नि शब्दाचा वाच्यार्थ टाकून द्यावा लागून 'तेजस्वी', किंवा 'बाणेदार', अशासारखा अर्थ स्वीकारावा लागतो. अग्नि आणि तेजस्वी माणूस यांमध्ये सादृश्य संबंध आहे.

२) येथे 'गंगा' याचा अर्थ शेवटी 'तीर' असा घ्यावा लागत असला तरी ते गंगेचे ती रच घ्यावे लागते. या दृष्टीने 'गंगा' शब्दाचा मूळचा अर्थ काही अंशाने तरी कायम रहातो.

३) 'माणवक हा अग्नि आहे' आणि 'गंगेवर गौळीवाडा' हे दोन प्रकार मम्मटादि उत्तरकालीन शास्त्रकारांच्या मते 'लक्षणलक्षणे'चे होत. कारण 'लाठ्या प्रवेश करितात' या उदाहरणामध्ये लाठीवाले पुरुष या लक्ष्यार्थामध्ये लाठ्या हा वाच्यार्थ अंतर्भूत आहे, पण तेजस्वी या लक्ष्यार्थामध्ये प्रत्यक्ष अग्नीचा किंवा गंगातीर या लक्ष्यार्थामध्ये प्रत्यक्ष गंगेचा अंतर्भाव नाही.

४) म्हणजे गुणवृत्ति ही काही ठिकाणी ध्वनीला निमित्तभूत म्हणजेच ध्वनीच्या आधीची पायरी असू शकते.

५) म्हणजे रूढिमूला लक्षणा. उदा. 'लावण्य' वगैरेसारख्या शब्दांचा उपयोग. पाहा, उद्‌द्योत १, कारिका १६ वी.

६) पाहा, उद्‌द्योस १, कारिका १५ वी.

७) उदा. 'माणवक हा अग्नि आहे' या उदाहरणामध्ये 'अग्नि' शब्दाच्या वाच्यार्थाच्या (म्हणजे अग्नीच्या) ठिकाणचा धर्म जो दाहकत्व ती माणवकामध्ये नसल्यामुळे त्याचे समर्थन करण्यासाठीच 'अग्नीमधील

दाहाकत्वासारखे दाहकत्व (तेजस्वीपणा) असलेला' अशा मामुली (सौंदर्यहीन) स्वरूपाच्या व्यंग्यार्थाचा आश्रय केला आहे. तसेच 'हिचे मुख चंद्रच आहे' वगैरे उदाहरणात समजावे.

८) या उदाहरणात व्यंग्यार्थच नाही, मग सुंदर व्यग्यार्थ असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

९) पाहा, उद्‌द्योत १, प्रथमखंड, उद्‌द्योत पहिला पाहा.

१०) पाहा, उद्‌द्योत १, कारिका १८ व १९ चा पूर्वार्ध.

११) मूळ वृत्तीमध्ये **व्यवस्थानम्** असा पाठ आहे. (पाहा, द्वितीयखंड, "उद्‌द्योत – ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'" वरील ओळ). तो स्वीकारूनच आम्ही वृत्तीचा अनुवाद केला आहे. **पण व्यवस्थानात् इति ब्रुवता** असे शब्द लोचनात असल्यामुळे **व्यवस्थानम्** या ऐवजी **व्यवस्थानात्** असा पाठ अभिनवगुप्तांच्या समोर असला पाहिजे असे वाटते व तो **व्यवस्थानम्** यापेक्षा अधिक चांगला आहे. कारण, **व्यवस्थानम्** हे मागील वाक्यातील विधानाचे समर्थक कारण आहे व त्या दृष्टीने प्रथमान्त रूपापेक्षा पञ्चम्यन्त रूप अधिक चांगले.

१२) म्हणजे 'अविवक्षितवाच्य या प्रकारातील व्यंजकत्व हे गुणवृत्तीहून वेगळे नाही' असा आक्षेप पूर्वपक्षी घेत आहे.

१३) पाहा, द्वितीयखंड, "उद्‌द्योत – ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'" मध्ये व त्यावरील टींप चवथी.

१४) 'माणवक हा अग्नि आहे' यातील माणवक हा शब्द विषयवाचक आहे व अग्नि हा शब्द विषयिवाचक आहे.

१५) पाहा, वरील २ व ३ या टीपा. म्हणजे अभिनवगुप्तांच्या मते 'गंगेवर गौळीवाडा आहे' हे उपादानलक्षणेचे व म्हणून अर्थान्तरसंक्रमितवाच्य या प्रकाराचे उदाहरण आहे असे दिसते. पाहा, वरील टीप ३.

१६) वगैरेंमध्ये चन्द्र, सूर्य इत्यादींचा अंतर्भाव होईल.

१७) ज्ञानेन्द्रिये ही विषयांच्या ज्ञानाची मुख्य साधने आहेत, सहकारी किंवा उपकारक कारणे नव्हेत, म्हणून त्यांना 'व्यंजक' म्हटले जात नाही. ती ज्ञानाची 'उत्पादक' कारणे असतात, 'व्यंजक 'कारणे नसतात.

१८) म्हणजे विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीमध्ये व्यंजकत्व असते, हा अंश.

१९) म्हणजे अविवक्षितवाच्य ध्वनीमध्ये व्यंजकत्व नसते हा आक्षेप.

२०) म्हणजे प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'प्रयोजनवती' लक्षणेत चार व्यापारट'" व 'ध्वनीच्या असंलक्ष्यक्रम प्रकारात लक्षणा मुळीच नाही'" वर.

२१) पाहा, १–१७ (प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'कोणत्या शब्दांना 'ध्वनिकाव्य' म्हणावे?'").

२२) म्हणजे गुणवृत्ति.

२३) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १, 'कोणत्या शब्दांना 'ध्वनिकाव्य' म्हणावे'" कारिका १७ व तीवरील वृत्ति.

२४) म्हणजे ध्वनिवाद्याला.

२५) म्हणजे रसिकाला पूर्ण समाधान देऊन त्यातच रमवून ठेवणारी.

२६) **आश्रयेण** याचा अर्थ अभिनवगुप्तांनी **उपबृंहणाय** म्हणजे समर्थनासाठी, असा केला आहे. 'आश्रय' याचा 'उपबृंहण' (समर्थन) हा अर्थ अस्वाभाविक वाटतो. त्यापेक्षा पुढीलप्रमाणे अर्थ करणे हे अधिक योग्य होईल. गुणवृत्ति ही एका बाजूला बाधित झालेल्या (सुंदर किंवा असुंदर) अभिधेच्या आश्रयाने राहते, तर दुसऱ्या बाजूला ती कोणत्याही प्रकारचा व्यंग्यार्थ प्रकट करण्यासाठी असते.

२७) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – १ '(व्यंगार्थप्रधान काव्यातील) व्यंजक शब्द, व्यंग अर्थ, व्यंजना व्यापार, व्यंजक वाच्यार्थ हे चारही 'ध्वनि' च पण या सर्वांच्या समुदायाला 'ध्वनिकाव्य' म्हणावे'"वरील टीप १५ वी.

२८) 'लठ्ठ देवदत्त दिवसा जेवीत नाही' या अर्थापतौच्या उदाहरणातून 'तो रात्री जेवीत असला पाहिजे' हा दुसरा अर्थ जो प्रतीत होतो, तो 'देवदत्त दिवसा जेवीत नसूनही लठ्ठ आहे' या वाच्यार्थाचे समर्थन करण्यासाठीच खर्च होतो. तसेच 'माणवक हा अग्नि आहे' या गुणवृत्तीच्या उदाहरणातून 'अग्नि' या शब्दाचा 'तेजस्वी' हा जो लक्ष्यार्थ प्रतीत होतो, तोही 'माणवक हा 'प्रत्यक्ष अग्नि आहे' या विसंगत वाटणाऱ्या वाच्यार्थाचे समर्थन करण्यासाठी खर्ची पडतो.

२९) तुलनार्थ पाहा, भर्तृहरीच्या नीतिशतकातील दुसऱ्या श्लोकामधील **जीर्णमङ्गे** सुभाषितम् । हे वचन. तसेच 'उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः । हे सुभाषितही पाहा.

३०) म्हणजे तो व्यंग्यार्थ प्रकट होतो न होतो तोच केवळ वाच्यार्थाचे समर्थन करण्यासाठी खर्ची पडल्यामुळे स्वतःच्या पायावर उभा राहू शकत नाही व वाच्यार्थातच विलीन होऊन जातो.

३१) म्हणजे तेथे त्या सुंदर व्यंग्यार्थाची प्रतीति गुणवृत्तीमुळेच होते असे मानिल्यावाचून काय उपाय आहे?

३२) पाहा, द्वितीयखंड, "उद्द्योत – ३ 'रसादि अलंकार'"वरील वृत्तीमधील **तथाविधे विषये** इ. पूर्वपक्ष्याने म्हटलेले वाक्य.

३३) अभिनवगुप्तांच्या या विवेचनाचे तात्पर्य असे :–

'गवळणीच्या डोक्यावर दुधाची घागर आहे' या उदाहरणात डोके व घागर या दोन्ही गोष्टी वास्तवातल्या असून घागरीची डोक्यावरील स्थापना हा आरोप खराखुरा आहे. 'मुख हा चन्द्रच होय' येथे या दोन्ही गोष्टी अस्तित्वात आहेत, पण चन्द्राचा मुखावरील आरोप कविकल्पित आहे. 'पृथ्वी सोन्याची नाणी फुलविणारी असणे' या उदाहरणात पृथ्वी खरोखर अस्तित्वात आहे, पण ती सोन्याची नाणी फुलविणारी असणे हा धर्म अस्तित्वात नसून कविकल्पित आहे व त्यामुळे त्या धर्माचा तिच्यावरील आरोपही खोटा आहे. तसेच पृथ्वीने फुलविलेली सोन्याची नाणी गोळा करणे हा धर्म असत्य असून 'समृद्धीचा लाभ होणे' या वास्तव गोष्टीवर केलेला त्याचा आरोपही खोटा आहे. इतक्या उपरही हे दोन्ही आरोप क्षणभर खरे मानले, तरी तो आरोप येथे मुख्य नसून तो ज्या व्यंजनाव्यापाराला उत्थापित करितो, तो व्यंजनाव्यापार चमत्कृतिजनक अत एव मुख्य आहे.

लोचनात **इति हि स्यादारोपः** यानंतर **तस्माद्** असा जो शब्द आहे, त्याऐवजी तथापि अशासारखा शब्द असता, तर अभिप्रेत अर्थ अधिक स्पष्ट झाला असता.

३४) आरोप व गुणवृत्ति हे केवळ उपाय असल्यामुळे मुख्य जो व्यंजनाव्यापार, तो प्रवृत्त होताच त्या उपायांचा त्यागच केला जातो. पाहा प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'रसप्रतीतीचे स्वरूप अलौकिक असते'" वरील टीप ३१.

३५) काशी आवृत्तीमध्ये ध्वन्यालोकात **विशेषाविशिष्टा** असा पाठ आहे. तोच अभिनवगुप्तांसमोर असावा, म्हणून त्याचा सुसंगत अर्थ लावण्यासाठी त्यांना बरेच सायास करावे लागलेले आहेत. काव्यमाला आवृत्तीतील तळटीपांमध्ये **अविशिष्टा** याऐवजी **आविष्टा** असा पाठभेद दिला आहे व तो चांगला आहे. तो स्वीकारल्यास अर्थ लावण्यास प्रयास पडण्याचे कारणच नाही. आविष्टा म्हणजे व्यापली गेलेली.

३६) **अविशिष्टा** याचा दुसरा अर्थ अभिनवगुप्तांनी 'जिच्यात स्वतःचे काही विशिष्टत्व म्हणजे प्राधान्य राहिलेले नाही अशी' असा केलेला आहे असे दिसते.

३७) **न्यक्कृतस्वभावा** यानंतर **यदि वा** यांसारखे शब्द अध्याहृत घेणे आवश्यक आहे, कारण **व्यंजकत्वविशेषाविशिष्टा** याचा तिसरा अर्थ अभिनवगुप्तांनी येथे केलेला दिसतो. हा अर्थ **आविष्टा** या पाठाशी अधिक मिळतो जुळता वाटतो.

३८) पाहा, उद्‌द्योत १, कारिका १८ व १९ चा पूर्वार्ध आणि त्यांवरील वृत्ति.

ध्वन्यालोकः

अपि च व्यञ्जकत्वलक्षणो यः शब्दार्थयोर्धर्मः स प्रसिद्धसम्बन्धानुरोधीति न कस्यचिद्विमतिविषयतामर्हति । शब्दार्थयोर्हि प्रसिद्धो यः सम्बन्धो वाच्यवाचकभावाख्यस्तमनुरुन्धान एव व्यञ्जकत्वलक्षणो व्यापारः सामग्रयन्तरसम्बन्धादौपाधिकः प्रवर्तते । अत एव वाचकत्वात्तस्य विशेषः ।

वाचकत्वं हि शब्दविशेषस्य नियत आत्मा व्युत्पत्तिकालादारभ्य तदविनाभावेन तस्य प्रसिद्धत्वात् । स त्वनियतः, औपाधिकत्वात् । प्रकरणाद्यवच्छेदेन तस्य प्रतीतेरितरथा त्वप्रतीतेः ।

ननु यद्यनियतस्तत्किं तस्य स्वरूपपरीक्षया । नैष दोषः; यतः शब्दात्मनि तस्यानियतत्वम्, न तु स्वे विषये व्यङ्ग्यलक्षणे ।

लिङ्गत्वन्यायश्चास्य व्यञ्जकभावस्य लक्ष्यते, यथा लिङ्गत्वमाश्रयेष्वनियतावभासम्, इच्छाधीनतत्वात्, स्वविषयव्यभिचारि च, तथैवेदं यथादर्शितं व्यञ्जकत्वम् । शब्दात्मन्यनियतत्वादेव च तस्य वाचकत्वप्रकारता न शक्या कल्पयितुम् । यदि हि वाचकत्वप्रकारता तस्य भवेत्तच्छब्दात्मनि नियततापि स्याद्वाचकत्ववत् ।

ध्वन्यालोक

आणखी असे की, शब्द आणि अर्थ यांच्या ठिकाणचा जो 'व्यंजकत्व' या स्वरूपाचा धर्म असतो, तो शब्द आणि (वाच्य) अर्थ यांच्यामधील प्रसिद्ध संबंधाला अनुसरणाराच असतो, म्हणून तो कोणी नाकारणे योग्य होणार नाही. कारण शब्द व (वाच्य) अर्थ यांमधील प्रसिद्ध असलेला जो 'वाचक–वाच्य–संबंध' नावाचा संबंध, त्याला अनुसरूनच व्यंजकत्व या स्वरूपाचा व्यापार, त्याचा दुसऱ्या (म्हणजे विशिष्ट प्रकारचा वक्ता, श्रोता, संदर्भ इ.) सामग्रीशी संबंध असल्यामुळे (त्या सामग्रीरूपी) निरनिराळ्या कारणांना अनुसरूनच प्रवृत्त होणारा (अतएव अनिश्चित स्वरूपाचा) आहे. म्हणूनच वाचकत्वाहून तो वेगळा आहे. कारण वाचकत्व हे शब्दाचे ठरलेले स्वरूप होय, कारण श्रोत्याला व वाचकाला त्या शब्दाचा (वाच्य) अर्थ प्रथम माहीत झाल्यापासूनच तो शब्द त्या अर्थाच्या बाबतीतल्या वाचकत्वाला सोडून राहू शकत नाही, हे सुप्रसिद्ध आहे. पण व्यंजकत्व हा शब्दाला विशिष्ट सामग्रीमुळेच प्राप्त होणारा व्यापार असल्यामुळे तो त्याचा स्थिर स्वरूपाचा धर्म नव्हे; कारण त्या व्यंजकत्वाची प्रतीति विशिष्ट संदर्भ वगैरेमुळेच येते, नाहीतर येत नाही. (शंका–) 'पण काय हो, तो व्यापार शब्दाला जर केव्हातरीच प्राप्त होणारा असला, (म्हणजे त्याला जर स्थिर असे स्वरूपच नसेल[१]) तर मग त्याच्या स्वरूपाची चिकित्सा करून काय फायदा?'

उत्तर–'या आक्षेपात काहीही जीव नाही. कारण तो व्यापार प्रवृत्त होणे न होणे, हे केवळ त्या शब्दाच्या नादमय (म्हणजे श्रव्य) स्वरूपाच्या दृष्टीनेच अनिश्चित आहे[२], पण आपल्या व्यंग्य स्वरूपाच्या अर्थाच्या दृष्टीने तो अनिश्चित नाही, (म्हणजे विशिष्ट परिस्थितीमुळे एकदा का तो व्यापार प्रवृत्त झाला की, तो आपला जो व्यंग्य स्वरूपाचा अर्थ, त्याचा निश्चितपणे म्हणजे हटकून बोध करून देतो).'

आणि हा व्यंग्य– व्यंजक– भाव अनुमानातल्या साध्य– लिंग[३] संबंधासारखा असलेला दिसतो. जसे लिंगत्व हे आपल्या आश्रयांच्या ठिकाणी केव्हातरी प्रकट होणारे आहे (म्हणजे नेहमीच प्रकट होणारे नाही), कारण ते (अनुमान करणाऱ्याच्या) इच्छेवर अवलंबून असते; पण (अनुमान करण्याची इच्छा असल्यास) आपला विषय जो साध्य, त्याच्याशी ते लिंग व्यभिचारी नसते[४], आणि पूर्वी दर्शविल्याप्रमाणे[५] हे व्यंजकत्वही तसेच आहे आणि तो व्यंजकत्व व्यापार (श्रव्य) शब्दाच्या ठिकाणी अनिश्चितपणे येणारा असल्यामुळेच तो वाचकत्वाचाच प्रकार आहे असे मानणे शक्य नाही, कारण तो व्यंजकत्व व्यापार हा जर वाचकत्वाचाच प्रकार असता, तर वाचकत्वाप्रमाणे तोही शब्दाच्या ठिकाणी नेहमी अटळपणे राहणारा झाला असता!

लोचनम्

नियतस्वभावाच्च वाच्यवाचकत्वादौपाधिकत्वेनानियतं व्यञ्जकत्वं कथं न भिन्ननिमित्तमिति दर्शयति– अपि चेति । औपाधिक इति । व्यञ्जकत्ववैचित्र्यं यत्पूर्वमुक्तं तत्कृत इत्यर्थः । अत एव समयनियमितादभिधाव्यापाराद्विलक्षण इति यावत् । एतदेव स्फुटयति– अत एवेति । औपाधिकत्वं दर्शयति– प्रकरणादीति । किं तस्येति । अनियतत्वाद्यथारुचि कल्प्येत, पारमार्थिकं रूपं नास्तीति । न चावस्तुनः परीक्षोपपद्यत इति भावः । शब्दात्मनीति । सङ्केतास्पदे पदस्वरूपमात्र इत्यर्थः । आश्रयेष्विति । न हि धूमे वह्निगमकत्वं सदातनम्, अन्यगमकत्वस्य वह्न्यगमकत्वस्य च दर्शनात् । इच्छाधीनत्वादिति । इच्छात्र पक्षधर्मत्वजिज्ञासाव्याप्तिसुस्मूर्षाप्रभृतिः । स्वविषयेति । स्वस्मिन् विषये च गृहीते त्रैरूप्यादौ न व्यभिचरति ।

लोचन

वाच्यार्थ आणि वाचकत्व (म्हणजे अभिधाव्यापार) यांचे स्वरूप निश्चित असल्याने ज्याचे स्वरूप नैमित्तिक (म्हणजे विशिष्ट परिस्थितीतच उत्पन्न होणारे असल्याने अस्थिर) असते अशा व्यंजकत्वाची कारणे त्या वाचकत्वाच्या कारणांहून भिन्न कशी नसतील?[६] (म्हणजे असतीलच) हे वृत्तिकार 'आणखी असे की' इ. शब्दांनी दर्शवितात. 'कारणांना[७] अनुसरूनच प्रवृत्त होणारा'– व्यंजकत्वामधील जी वेगवेगळी कारणे पूर्वी[८] दाखविली, त्यामुळे प्रवृत्त झालेला, असा अर्थ म्हणूनच तो व्यंजकत्वव्यापार संकेतावरच सर्वस्वी अवलंबून असलेल्या अभिधाव्यापाराहून वेगळा असतो, असा आशय. हेच वृत्तिकार 'म्हणूनच' इ. शब्दांनी प्रकट करितात. व्यंजकत्व हे विशिष्ट कारणांमुळेच प्रवृत्त होते हे वृत्तिकार 'विशिष्ट संदर्भ इ.' वगैरे शब्दांनी सांगतात. 'त्याच्या स्वरूपाची... काय फायदा?'– तो व्यंजकत्व व्यापार अनिश्चित स्वरूपाचा असल्यामुळे त्याला वास्तव असे स्वरूप असणार नाही व म्हणून त्याच्या स्वरूपाची लोक आपल्याला आवडेल तशी कल्पना करतील. आणि जे वास्तव नाही, त्याची चिकित्सा करणे योग्य होणार नाही, असा आशय. 'शब्दाच्या नादमय स्वरूपाच्या दृष्टीने'– संकेताचा आश्रय असलेले जे शब्दाचे निव्वळ श्रव्य स्वरूप, त्याच्या दृष्टीने, असा अर्थ. 'आश्रयांच्या ठिकाणी– कारण धुराच्या ठिकाणी अग्नीचे ज्ञान करून देण्याचे सामर्थ्य नेहमीच असते असे नाही. कारण काही वेळा धूर हा अग्नीचे ज्ञान करून न देता इतरच काही गोष्टीचे[९] ज्ञान करून देतो असे दिसून येते. 'कारण इच्छेवर अवलंबून असते'– 'इच्छा' म्हणजे येथे हेतु (उदा. धूर) पक्षावर (म्हणजे उदा. पर्वतासारख्या एखाद्या ठिकाणी) आहे हे जाणण्याची इच्छा, (धूर आणि अग्नि यांमधील) व्याप्तीची आठवण व्हावी अशी इच्छा,[१०] वगैरे,[११] 'आपला विषय'– अनुमानाच्या (पक्षावर असणे, सपक्षावर असणे व विपक्षावर नसणे या) तीन अटी इ. पाळल्या गेल्यावर आपल्या साध्याचे ज्ञान करून देण्यास ते लिंगत्व कधीही चुकल्याचे आढळत नाही.

टीपा

१) व्यंग्यार्थ हा वाचकाकडून त्याला पाहिजे असेल त्याप्रमाणे कल्पिला जात असल्यामुळे त्याला ठराविक, टिकाऊ असे स्वरूप नसते.

२) म्हणजे केवळ तो शब्द ऐकल्यामुळेच त्याचा व्यंजकत्व हा व्यापार प्रवृत्त होतो असे नाही, तर तो विशिष्ट सामग्री असली तरच प्रवृत्त होणारा आहे व शिवाय त्या सामग्रीऐवजी दुसरी सामग्री आली तर त्याचे स्वरूप बदलणारेही आहे.

३) लिंग म्हणजे साध्याचे अनुमान ज्या हेतूमुळे केले जाते, तो हेतु.

४) धुराचे उदाहरण घ्या. धुरावरून आपण अग्नीचे अनुमान करू शकत असलो, तरी प्रत्येक वेळी धूर दिसला की आपण अग्नीचे अनुमान करतोच, असे नाही. म्हणजे आपल्याला ज्यावेळी अनुमान करावेसे वाटते त्यावेळीच धुराचे ठिकाणी लिंगत्व म्हणजे अनुमानाचे साधन असण्याचे सामर्थ्य उत्पन्न होते. ज्यावेळी अनुमान करण्याची इच्छा नसते, त्यावेळी धूर दृष्टीस पडला असला, तरी त्याच्या ठिकाणी लिंगत्व उत्पन्न होत नाही. पण अनुमान करण्याची इच्छा झाल्यामुळे जर लिंगत्व उत्पन्न झाले, तर मात्र ते साध्याच्या म्हणजे अग्नीच्या अस्तित्वाचे ज्ञान हटकून करून देते.

५) व्यंजकत्व हे वक्ता, श्रोता, संदर्भ इत्यादि विशिष्ट परिस्थितीमुळेच कसे निष्पन्न होते हे पहिल्या उद्द्योतात 'हे धार्मिक! ...' इ. उदाहरणांचे विवेचन करिताना दाखवलेच आहे. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'" व 'व्यंजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वरील अनुक्रमे **प्रकरणाद्यवच्छिन्न**... इ. आणि 'कारण त्या व्यंजकत्वाचे' इ. वाक्ये.

६) मूळ लोचनात न हा शब्द नसता, तर बरे झाले असते. म्हणजे 'भिन्न कशी नसतील? (म्हणजे असतीलच)' असा अर्थ करीत बसण्यापेक्षा **कथं भिन्नम्** म्हणजे 'कशी भिन्न असतील ते...' असा अर्थ करणे सोपे गेले असते.

७) ही कारणे पुढच्या, ८ व्या टीपेत पाहा.

८) पूर्वी म्हणजे द्वितीय खंड"उद्द्योत ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'" व 'व्यंजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वरील वृत्तीत उल्लेखिलेली प्रकरण इ. कारणे व उद्द्योत ३, कारिका २ व १६ यांमध्ये सांगितलेली सहकारी कारणे.

९) उदा. या विशिष्ट ठिकाणी धूर असल्यामुळे त्यापासून कपड्यांना काळे लागेल, डोळ्यांना त्रास होईल म्हणून आपण त्यापासून दूर जाणे इष्ट आहे, असेही ज्ञान होऊ शकेल.

१०) तात्पर्य, लिंगावरून म्हणजे हेतूवरून साध्याचे अनुमान करण्याची व व्याप्तीचे स्मरण करण्याची इच्छा असल्याशिवाय आपण अनुमान करीत नाही व त्यावेळी त्या लिंगामध्ये लिंगत्व हा धर्म नसतो.

११) 'वगैरे' या शब्दाने हेतु सपक्षावरच असणे व विपक्षावर नसणे यांचा बोध होतो.

ध्वन्यालोकः

स च तथाविध औपाधिको धमः शब्दानामौत्पत्तिकशब्दार्थसम्बन्धवादिना वाक्यतत्त्वविदा पौरुषेयापौरुषेययोर्वाक्ययोर्विशेषमाभिदधता नियमेनाभ्युपगन्तव्यः, तदनभ्युपगमे हि तस्य शब्दार्थसम्बन्धनित्यत्वे सत्यप्यपौरुषेयपौरुषेययोर्वाक्ययोरर्थप्रतिपादने निर्विशेषत्वं स्यात् । तदभ्युपगमे तु पौरुषेयाणां वाक्यानां पुरुषेच्छानुविधानसमारोपितौपाधिकव्यापारान्तराणां सत्यपि स्वाभिधेयसम्बन्धापरित्यागे मिथ्यार्थतापि भवेत् ।

दृश्यते हि भावानामपरित्यक्तस्वभावानामपि साम्यग्र्यन्तरसम्पातसम्पादितौपाधिकव्यापारान्तराणां विरुद्धक्रियत्वम् । तथा हि—हिममयूखप्रभृतीनां निर्वापितसकलजीवलोकं शीतलत्वमुद्वहतामेव प्रियाविरहदहनदह्यमानमानसैर्जनैरालोक्यमानानां सतां सन्तापकारित्वं प्रसिद्धमेव । तस्मात् पौरुषेयाणां वाक्यानां सत्यषि नैसर्गिकेऽर्थसम्बन्धे मिथ्यार्थत्वं समर्थयितुमिच्छता वाचकत्वव्यतिरिक्तं किञ्चिद्रूपमौपाधिकं व्यक्तमेवाभिधानीयम् । तच्च व्यञ्जकत्वादृते नान्यत् । व्यङ्ग्यप्रकाशनं हि व्यञ्जकत्वम् । पौरुषेयाणि च वाक्यानि प्राधान्येन पुरुषाभिप्रायमेव प्रकाशयन्ति । स च व्यङ्ग्य एव न त्वभिधियः, तेन सहाभिधानस्य वाच्यवाचकभावलक्षणसम्बन्धाभावात् ।

ध्वन्यालोक

आणि तो त्या प्रकारचा शब्दांच्या ठिकाणी (विशिष्ट परिस्थिति या) निमित्तामुळे प्रकट होणारा धर्म वाक्याच्या यथार्थ स्वरूपाचे तज्ज्ञ, आणि शब्द व त्यांचे वाच्यार्थ यांचा संबंध जन्मसिद्ध (म्हणजे नित्य) आहे असे मत प्रतिपादन करणारे जे मीमांसक, त्यांनी पौरुषेय वाक्ये (म्हणजे लौकिक, अवैदिक वाक्ये) यांमध्ये फरक आहे असे सांगताना तर नियमाने मान्य करावयाला पाहिजे, कारण त्यांनी तो न मानल्यास (त्यांच्या मते) शब्द आणि अर्थ यांचा संबंध नित्य असला, तरी पौरुषेय (अवैदिक) वाक्यांनी केले जाणारे अर्थप्रतिपादन व अपौरुषेय (वैदिक) वाक्यांनी केले जाणारे अर्थप्रतिपादन यांत काही फरक उरणार नाही. पण तो नैमित्तिक धर्म (व्यंजकत्व) जर त्यांनी मान्य केला, तर मात्र शब्दांनी आपल्या वाच्यार्थाशी असलेला आपला संबंध सोडला नाही, तरी (म्हणजे वाच्यार्थाचा बोध जरी त्यांनी करून दिला तरी) मानवांच्या इच्छेनुसार पौरुषेय वाक्यांवर विशिष्ट परिस्थितीमुळे प्रवृत्त होणारा दुसरा व्यापार लादला गेल्यामुळे त्या पौरुषेय वाक्यांचा अर्थ, अप्रमाणही असू शकतो (असे त्या मीमांसकांना म्हणता येईल![1])

कारण पदार्थांनी जरी आपापले स्वभाव सोडले नाहीत, तरी दुसरी, (विशिष्ट परिस्थिति ही) सामग्री उपस्थित झाल्यामुळे त्यांच्यामध्ये दुसरे नैमित्तिक व्यापार उत्पन्न होतात व त्यामुळे ते आपल्या नेहमीच्या कार्याविरुद्ध कार्य करिताना आढळतात. उदाहरणार्थ चंद्र वगैरेच्या ठिकाणी जरी सर्व जीवसृष्टीला निवविणारे शीतलत्व कायमच असले, तरी प्रियेच्या विरहाचे चटके ज्यांच्या अंतःकरणाला बसत आहेत, अशा लोकांच्या दृष्टीस ते पडले असताना तेच चंद्र वगैरे त्या लोकांना दाहक होतात हे प्रसिद्धच आहे. म्हणून पौरुषेय (मानवांनी वापरलेल्या) वाक्यांचा आपल्या अर्थांशी असलेला संबंध जरी स्वाभाविक (म्हणजे नित्य) असला, तरी त्यांचा अर्थ अप्रमाण असू शकतो, या मताचे समर्थन करू इच्छिणाऱ्या (मीमांसका)ने वाचकत्वाहून निराळा आणि विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असा काहीतरी धर्म सांगितला पाहिजे, हे स्पष्टच आहे. आणि तो धर्म व्यंजकत्वाहून दुसरा कोणताही नाही. कारण व्यंजकत्व म्हणजे व्यंग्यार्थ प्रकट करणे, आणि पौरुषेय वाक्य मुख्यतः मानवांच्या मनातील अभिप्रायच प्रकट करीत

असतात आणि तो अभिप्राय वाच्य नसून व्यंग्यच असतो,[२] कारण त्या अभिप्रायाशी शब्दांचा वाच्य–वाचक संबंध नसतो.

लोचनम्

न कस्यचिद्विमतिमेतीति यदुक्तं तत्स्फुटयति– स चेति । व्यञ्जकत्वलक्षण इत्यर्थः । औत्पत्तिकेति । जन्मना द्वितीयो भावविकारः सत्तारूपः सामीप्याल्लक्ष्यते, विपरीतलक्षणातो वानुत्पत्तिः, रूढ्या वा औत्पत्तिकशब्दो नित्यपर्यायः, तेन नित्यं यः शब्दार्थग्रोः शक्तिलक्षणं सम्बन्धमिच्छति जैमिनेयस्तेनेत्यर्थः । निर्विशेषत्वमिति । ततश्च पुरुषदोषानुप्रवेशस्याकिञ्चित्करत्वात्तन्निबन्धनं पौरुषेयेषु वाक्येषु यदप्रामाण्यं तन्न सिध्येत् । प्रतिपत्तुरेव हि यदि तथा प्रतिपत्तिस्तर्हि वाक्यस्य न कश्चिदपराध इति कथमप्रामाण्यम् । अपौरुषेये वाक्येऽपि प्रतिपत्तृदौरात्म्यात्तथा स्यात् ।

ननु धर्मान्तराभ्युपगमेऽपि कथं मिथ्यार्थता, न हि प्रकाशकत्वलक्षणं स्वधर्मं जहाति शब्द इत्याशङ्क्याह–दृश्यत इति । प्राधान्येनेति । यदाह– 'एवमयं पुरुषो वेदेति भवति प्रत्ययः न त्वेवमयमर्थ' इति । तथा प्रमाणान्तरदर्शनमत्र बाध्यते, न तु शाब्दोऽन्वय इत्यनेन पुरुषाभिप्रायानुप्रवेशादेवाङ्गुल्यग्रवाक्यादौ मिथ्यार्थत्वमुक्तम् । तेन सह इति । अनियततया नैसर्गिकत्वाभावादिति भावः ।

लोचन

'कोणी नाकारणे हे योग्य होणार नाही' असे जे (द्वितीयखंड, 'व्यंजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वर) म्हटले, ते वृत्तिकार 'आणि तो' इ. शब्दांनी स्पष्ट करितात. तो (औपाधिक धर्म) म्हणजे व्यंजकत्व या स्वरूपाचा धर्म, असा अर्थ. 'जन्मसिद्ध[३] (म्हणजे नित्य)'– उत्पत्ति या शब्दाने त्याच्या लगेच जवळचा, अस्तित्व या स्वरूपाचा जो भावविकार,[४] तो (सामीप्य संबंधाच्या आधारे) लक्षित केला जातो.[५] किंवा विपरीत लक्षणेने 'उत्पत्ति' या शब्दाचा अनुत्पत्ति म्हणजे जन्म नसणे असा (विरुद्ध) अर्थ लक्षित होतो[६] किंवा रूढीमुळे औत्पत्तिक हा शब्द 'नित्य' या शब्दाशी समानार्थक समजावा.[७] त्यामुळे शब्द व अर्थ यांमधील अभिधा हा संबंध नित्य आहे असे जो मानितो, त्याने– म्हणजे मीमांसकाने, असा अर्थ. 'यांत काही फरक उरणार नाही'–आणि मग (बोलणाऱ्या) माणसाने केलेल्या प्रमादांमुळे पौरुषेय वाक्यांवर काहीही परिणाम घडून येत नसल्याने माणसांचे दोष त्यांनी म्हटलेल्या वाक्यांत शिरल्याकारणाने ती वाक्ये प्रमाणभूत नसतात हे म्हणणे सिद्ध होणार नाही.[८] आता जो ती वाक्ये ऐकणारा असतो, त्याची जर तशीच (म्हणजे प्रामादिक) समजूत होते असे जर मीमांसकाचे म्हणणे असेल तर त्याला उत्तर असे की, त्यात त्या पौरुषेय वाक्याचा काहीही दोष नाही व मग ते वाक्य अप्रमाण कसे म्हणता येईल? आणि मग अपौरुषेय (म्हणजे वेदातील स्वयंभू) वाक्ये सुद्धा ऐकणाऱ्याच्या (अज्ञान इ.) दोषांमुळे अप्रमाण ठरतील!

'पण काय हो, पौरुषेय वाक्यामध्ये वाचकत्वाहून निराळा असा व्यंजकत्व हा धर्म मानिला, तरी त्यामुळे ती वाक्ये चुकीची किंवा अप्रमाण कशी म्हणावयाची? कारण वाच्यार्थ प्रकट करणे हे जे शब्दाचे कार्य, ते करणे काही तो शब्द सोडीत नाही' अशी शंका कल्पून वृत्तिकार तिला 'कारण... आढळतात' इ.

वाक्याने उत्तर देतात. 'मुख्यतः'– कारण म्हटलेच आहे[९]– 'बोलणाऱ्या माणसाला या बाबतीत असे असे वाटत आहे' असेच ज्ञान (मनुष्याने उच्चारलेल्या वाक्यांमुळे) ऐकणाऱ्याच्या मनात उत्पन्न होते. 'ही गोष्ट तो म्हणतो तशीच खरोखर आहे' असे ज्ञान ऐकणाऱ्याला होत नाही." असे असल्यामुळे काही वेळा पौरुषेय वाक्यांचा अर्थ प्रत्यक्षादि इतर प्रमाणांनी प्राप्त झालेल्या ज्ञानाने बाधित होतो, पण त्या वाक्यांमधील शब्दांच्या अर्थांतील परस्परसंबंध बाधित होत नाही,[१०] या दृष्टीने पाहता वक्त्याचा अभिप्राय (हास्यास्पद विधान करण्याचा) असला, तरच 'माझ्या बोटावर शंभर हत्ती आहेत' इ. वाक्ये[११] अप्रमाण आहेत असे म्हटले जाते. 'त्या अभिप्रायाशी'– कारण तो अभिप्राय (निरनिराळ्या परिस्थितीमुळे निरनिराळा असू शकतो, म्हणून) अनिश्चित स्वरूपाचा असल्याने त्या अभिप्रायाचा (त्या शब्दाशी) स्वाभाविक (म्हणजे नित्य) संबंध असू शकत नाही, हा भावार्थ.

टीपा

१) लौकिक व्यवहारातील वाक्ये नेहमी केवळ त्यांच्या वाच्यार्थाचाच बोध करून देतात, असे नाही. वक्ता काही वेळा काही स्वार्थ साधण्यासाठी बोलत असेल म्हणून किंवा त्याचे बोलणे राग, लोभ, द्वेंष इ. मनोविकारांनी कलुषित असेल म्हणून त्याच्या बोलण्याचा वाच्यार्थ कित्येक वेळा वस्तुस्थितीला सोडूनही असेल आणि म्हणूनच कित्येक वेळा त्याचे बोलणे अप्रमाण असण्याचीही शक्यता असते. हे त्याचे स्वार्थ, मनोविकार, वगैरे दोष कधीही वाच्य नसतात, तर ते व्यंग्यच असतात.

२) पाहा, वरील १ ही टीप.

३) औत्पत्तिक (= जन्मसिद्ध, नित्य) हा शब्द पूर्वमीमांसासूत्र १–१–५ मध्ये आला आहे व शबरांनी आपल्या भाष्यात (आनंदाश्रम, आवृत्ति १९२९, पृ. २३) त्याचा 'नित्य' असाच अर्थ केला आहे. पाहा, **औत्पत्तिकः, इति नित्यं ब्रूमः । उत्पत्तिर्हि भाव उच्यते लक्षणया ।** म्हणजे अभिनवगुप्तांनी औत्पत्तिक याचे पहिले विवरण शबरांच्या भाष्याला अनुसरूनच केलेले दिसते. वैयाकरण हेही मीमांसकांप्रमाणेच शब्द व वाच्यार्थ यांमधील संबंध सिद्ध म्हणजे नित्य आहे असेच मानितात. पाहा, कात्यायनाचे वार्तिक १–१–१ **सिद्धे शब्दार्थसंबन्धे**. यावर पतंजलि म्हणतात– **नित्यपर्यायवाची सिद्धशब्दः ।**

४) यास्काचार्यांनी निरुक्त १–२ मध्ये ६ 'भावविकार' म्हणजे पदार्थाच्या अवस्था सांगितल्या आहेत त्या अशा :– (१) **जायते** (२) **अस्ति** (३) **वर्धते** (४) **विपरिणमते** (५) **अपक्षीयते** (६) **विनश्यति** । यांपैकी अस्ति म्हणजे सत्ता ही क्र. २ ची अवस्था, **जायते** = जन्मणे या अवस्थेच्या लगेच जवळची आहे. म्हणून सामीप्यसंबंधाच्या आधारावर 'उत्पत्ति' ह्याचा लक्ष्यार्थ 'सत्ता' असा केला आहे.

५) म्हणून औत्पत्तिक म्हणजे जोपर्यंत शब्द अस्तित्वात आहे तोपर्यंत टिकून राहणारा (वाचकत्व हा धर्म).

६) मग उत्पत्ति (= अनुत्पत्ति) याला मत्वर्थी इक हा प्रत्यय लागला आहे असे मानावयाचे व औत्पत्तिक = 'ज्याला जन्म नाही तो' असा अर्थ करावयाचा.

७) म्हणजे या तिहींपैकी अर्थ लावण्याची कोणतीही पद्धत अवलंबिली, तरी औत्पत्तिक याचा अर्थ शेवटी 'नित्य' असाच होती.

८) मनुष्य जेव्हा एखादे विधान करितो, तेव्हा ते विधान वस्तुस्थितीबरहुकूम असते असे नसून ते त्याच्या अज्ञान, रागद्वेषादि, मनोविकार वगैरेंमुळे कलुषित झालेले असते व हे सगळे 'विकार' वाच्य नसून व्यंग्य असतात. आणि यामुळेच मनुष्याने केलेली विधाने प्रमाणभूत म्हणजे पूर्णपणे विश्वसनीय असत नाहीत.

९) शाबरभाष्य, १९२९ ची आनंदाश्रम आवृत्ति, पृ. १६—१७.

१०) म्हणजे ते वाक्य म्हणणाऱ्याला झालेले ज्ञान बरोबर नाही असे वाटेल, पण त्या वाक्यातील शब्दांचा अन्वय केवळ कारकविषयक नियमांनुसार जुळविण्यात काही अडचण येणार नाही.

११) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत — १ 'भ्रम धार्मिक' या उदाहरणात 'विपरीतलक्षणा' नाही" वरील शेवटून ६ वी ओळ.

ध्वन्यालोकः

नन्वनेन न्यायेन सर्वेषामेव लौकिकानां वाक्यानां ध्वनिव्यवहारः प्रसक्तः । सर्वेषामप्यनेन न्यायेन व्यञ्जकत्वात् । सत्यमेतत्; । किं तु वक्त्रभिप्रायप्रकाशनेन यद् व्यञ्जकत्वं तत्सर्वेषामेव लौकिकानां वाक्यानामविशिष्टम् । तत्तु वाचकत्वान्न भिद्यते व्यङ्ग्यं हि तत्र नान्तरीयकतया व्यवस्थितम् । न तु विवक्षितत्वेन । यस्य तु विवक्षितत्वेन व्यङ्ग्यस्य स्थितिः, तद्व्यञ्जकत्वं ध्वनिव्यवहारस्य प्रयोजकम् ।

यत्त्वभिप्रायविशेषरूपं व्यङ्ग्यं शब्दार्थाभ्यां प्रकाशते तद्भवति विवक्षितं तात्पर्येण प्रकाश्यमानं सत् । किं तु तदेव केवलमपरीमितविषयस्य ध्वनिव्यवहारस्य न प्रयोजकमव्यापकत्वात् । तथा दर्शितभेदत्रयरूपं तात्पर्येण द्योत्यमानमभिप्रायरूपमनमिप्रायरूपं च सर्वमेव ध्वनिव्यवहारस्य प्रयोजकमिति यथोक्तव्यञ्जकत्वविशेषे ध्वनिलक्षणे नातिव्याप्तिर्न चाव्याप्तिः । तस्माद्वाक्यतत्त्वविदां मतेन तावद् व्यञ्जकत्वलक्षणः शाब्दो व्यापारो न विरोधी प्रत्युतानुगुण एव लक्ष्यते । परिनिश्चितनिरपभ्रंशशब्दब्रह्मणां विपश्चितां मतमाश्रित्यैव प्रवृत्तोऽयं ध्वनिव्यवहार इति तैः सह किं विरोधाविरोधौ चिन्त्येते ।

ध्वन्यालोक

(शंका) 'पण काय हो, या विचारसरणीप्रमाणे सर्वच लौकिक (म्हणजे वैदिक नसलेल्या) वाक्यांना 'ध्वनि' म्हणण्याचा प्रसंग येईल, नाही का? कारण तुमच्या या मताप्रमाणे सगळीच वाक्ये (विशिष्ट अभिप्रायाची) व्यंजक असणार?'

उत्तर—हे तुमचे म्हणणे खरे आहे; पण वक्त्याच्या मनातील विशिष्ट अभिप्राय प्रकट करणे या स्वरूपाचे जे व्यंजकत्व आहे ते एकजात सर्वच लौकिक वाक्यांच्या ठिकाणी सारखेच आढळणारे आहे. मात्र ते वाचकत्वाहून वेगळे नसते, कारण त्या ठिकाणी तो व्यंग्य अभिप्राय वाच्यार्थाशी अविनाभावाने संबद्ध असतो. तो काही (मुख्य म्हणून) विवक्षित नसतो.[१] पण जो व्यंग्यार्थ (मुख्य म्हणून) विवक्षित असतो, त्या व्यंग्यार्थाचे व्यंजकत्व त्या वाक्याला 'ध्वनि' ही संज्ञा मिळवून द्यावयास कारणीभूत असते.[२]

परंतु शब्द व (वाच्य) अर्थ जेव्हा एखाद्या विशिष्ट अभिप्रायरूपी व्यंग्यार्थाला प्राधान्य देऊन प्रकाशित करतात, तेव्हा तो व्यंग्यार्थ वक्त्याला (प्रधानत्वाने) विवक्षित असतो (असे म्हणता येईल). परंतु ध्वनि ही (सर्वसामान्य) संज्ञा केवळ तशा प्रकारच्या विशिष्ट अभिप्रायापुरतीच मर्यादित नाही, कारण (सर्वसामान्य) ध्वनीचे क्षेत्र अमर्याद असून त्या सर्व क्षेत्राला तशा प्रकारचा विशिष्ट अभिप्राय व्यापू शकत नाही. म्हणजे असे की, पूर्वी दाखविलेला प्राधान्याने सुचविला जाणारा तीन प्रकारचा[३] व्यंग्यार्थ, तसेच अभिप्राय या स्वरूपाचा व्यंग्यार्थ,[४] आणि त्याहून निराळ्या स्वरूपाचा[५] व्यंग्यार्थ, या सर्वांनाच व्यापक अर्थाने 'ध्वनि' ही संज्ञा देणे शक्य आहे. म्हणून (पहिल्या उद्द्योतातील १३ व्या कारिकेत) 'विशिष्ट प्रकारच्या व्यंजकत्वाने युक्त असलेले' असे ध्वनीचे म्हणजे ध्वनिकाव्याचे जे लक्षण केले,[६] त्यात अव्याप्ति नाही किंवा अतिव्याप्तिही नाही. म्हणून वाक्याचे यथार्थ स्वरूप जाणणारे जे मीमांसक, त्यांच्या मताला तरी व्यंजकत्व या स्वरूपाचा व्यापार प्रतिकूल तर नाहीच, उलट त्यांना तो अनुकूल म्हणजे उपकारकच आहे, असे दिसते. आता अविनाशी, नित्य अशा शब्दब्रह्माचे स्वरूप सर्व बाजूंनी निश्चित करणारे जे वैयाकरण, त्यांच्या तर मताचा आधार घेऊनच[६अ] 'ध्वनि' ही संज्ञा चालू झालेली असल्यामुळे ध्वनि हा त्यांच्या मताच्या विरुद्ध आहे की नाही याचा विचारच कशाला करायचा?

लोचनम्

नान्तरीयकतयेति । गामानयेति श्रुतेऽप्यभिप्राये व्यक्ते तदभिप्रायविशिष्टोऽर्थ एवाभिप्रेतानयनादिक्रियायोग्यो न त्वभिप्रायमात्रेण किञ्चित्कृत्यमिति भावः । विवक्षितत्वेनेति । प्राधान्येनेत्यर्थः । यस्य त्विति । ध्वन्युदाहरणेष्विति भावः । काव्यवाक्येभ्यो हि न नयनानयनाद्युपयोगिनी प्रतीतिरभ्यर्थ्यते, अपि तु प्रतीतिर्विश्रान्तिकारिणी, सा चाभिप्रायनिष्ठैव, नाभिप्रेतवस्तुपर्यवसाना ।

नन्वेवमभिप्रायस्यैव व्यङ्ग्यत्वात्त्रिविधं व्यङ्ग्यमिति यदुक्तं । तत्कथमित्याह—यत्त्विति । एवं मीमासकानां नात्र विमतिर्युक्तेति प्रदर्श्य । वैयाकरणानां नैवात्र सास्तीति दर्शयति— परिनिश्चितेति । परितः निश्चितं प्रमाणेन स्थापितं निरपभ्रंशं गलितभेदप्रपञ्चतया अविद्यासंस्काररहितं शब्दाख्यं प्रकाशपरामर्शस्वभावं ब्रह्म व्यापकत्वेन बृहद्विशेषशक्तिनिर्भरतया च बृंहितं, विश्वनिर्माणशक्तीश्वरत्वाच्च बृंहण यैरिति । एतदुक्तं भवति— वैयाकरणास्तावद् ब्रह्मपदेनान्यत्किञ्चिदिच्छन्ति तत्र का कथा वाचकत्वव्यञ्जकत्वयोः, अविद्यापदे तु तैरपि व्यापारान्तरमभ्युपगतमेव । एतच्च प्रथमोद्द्योते वितत्य निरूपितम् ।

लोचन

'अविनाभावाने'[६आ]— 'गाय आण' हे शब्द ऐकले तरी आणि त्यामागचा बोलणाऱ्याचा अभिप्राय (उदा. त्या गायीचे दूध हवे असणे हा) श्रोत्याला व्यक्तही झाला, तरी त्या (व्यंग्य) अभिप्रायाने विशिष्ट असलेला गाय हा वाच्यार्थच (म्हणजे गाय हा प्राणीच) वक्त्याला इष्ट असलेल्या 'आणणे' वगैरे क्रियांचे कर्म व्हावयास योग्य ठरतो; वक्त्याच्या केवळ अभिप्रायाशी श्रोत्याला काहीही कर्तव्य नसते, असा भावार्थ. 'विवक्षित नसतो'— मुख्य म्हणून (विवक्षित नसतो), असा अर्थ. 'पण जो व्यंग्यार्थ—' ध्वनिकाव्याच्या उदाहरणांमध्ये, असा भावार्थ. कारण काव्यातील वाक्यांपासून नेणे, आणणे वगैरे (लौकिक) क्रियांना उपयोगी पडणारे ज्ञान व्हावे अशी कोणी अपेक्षा करीत नसतो, तर मनाला (चमत्कृति-रूप) आनंद प्राप्त

होईल अशी प्रतीतीच तो अपेक्षीत असतो. आणि ती प्रतीति (रसादिरूपी) व्यंग्यार्थावरच अवलंबून असते, काव्यातील शब्दांच्या वाच्यार्थावर अवलबून नसते.

"पण काय हो, अशा रीतीने बोलणाऱ्याचा (अनेक प्रकारचा) अभिप्राय हाच जर 'व्यंग्य' असला, तर 'व्यंग्यार्थ हा तीन प्रकारचा असतो' असे जे म्हटले,[७] ते कसे काय?" याला वृत्तिकार 'पण शब्द व अर्थ जेव्हा' इ. शब्दांनी उत्तर देतात. याप्रमाणे मीमांसकांनी या (म्हणजे व्यंजकत्वाला मान्यता देण्याच्या) बाबतीत विरोध करणे योग्य नाही हे दाखविल्यावर वैयाकरणांचा तर या बाबतीत मतभेद असणे शक्य नाहीच असे वृत्तिकार 'आता...सर्व बाजूंनी निश्चित करणारे' इ. वाक्याने सांगतात. सर्व बाजूंनी निश्चित म्हणजे प्रमाणांनी सिद्ध केले आहे, 'शब्द'— नावाचे ब्रह्म ज्या विद्वानांनी (म्हणजे वैयाकरणांनी). ते शब्दनामक ब्रह्म 'निरपभ्रंश' म्हणजे सर्व प्रकारच्या भेदांपासून मुक्त आहे व अज्ञानाच्या संस्कारांनी म्हणजे परिणामांनी विरहित आहे, आणि त्या ज्ञानमय प्रकाशस्वरूपी शब्दनामक तत्त्वाला 'ब्रह्म' असे म्हणतात. कारण ते व्यापक असल्यामुळे 'बृहत्' म्हणजे मोठे आहे. तसेच ते लोकोत्तर शक्तीने संपन्न असल्यामुळे 'बृंहित' म्हणजे परिपुष्ट झालेले आहे. त्या ब्रह्माचे ठिकाणी विश्व निर्माण करण्याच्या शक्तीवरील प्रभुत्व असल्यामुळे ते स्वतःच 'बृंहण' म्हणजे वाढण्याची क्रिया या स्वरूपाचे आहे.[८]

वृत्तिकारांच्या या सर्व विवेचनाचा सारांश असा :— वैयाकरणांच्या मते ब्रह्माच्या पारमार्थिक अवस्थेत ब्रह्मरूप अशा शब्दतत्त्वाहून दुसरे काहीच नाही, मग त्या अवस्थेत वाचकत्व किंवा व्यंजकत्व असण्याची गोष्टच कोठली? पण अज्ञानाच्या अवस्थेत म्हणजे व्यावहारिक अवस्थेत ते म्हणजे वैयाकरणसुद्धा वाचकत्व व व्यंजकत्व हे दोन्ही व्यापार मानतातच! आणि हे सर्व पहिल्या उद्द्योतात[९] विस्ताराने स्पष्ट केले आहे.

टीपा

१) 'गाय आण' हे वाक्य 'अ' ने 'ब' ला उद्देशून म्हटले असताना वक्त्याला त्या गायीची धार काढणे या सारखा उद्देश जरी अभिप्रेत असला, व तो जरी श्रोत्याच्या ध्यानात आला असला, तरी वक्त्याच्या या वाक्याचे तात्पर्य श्रोत्याने वक्त्यापुढे गाय आणून उभी करावी, इतकेच असते. ती गाय वक्त्याला धार काढायला हवी आहे की तिला प्रेमाने कुरवाळण्यासाठी हवी आहे हे श्रोत्याला कळणे वक्त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे नाही. श्रोत्याला आपण गाय आणली पाहिजे हे कळावे हा वक्त्याचा मुख्य उद्देश आहे. म्हणजे अशा उदाहरणात व्यंग्यार्थ असूनही तो श्रोत्याच्या दृष्टीने मुख्यत्वाने विवक्षित नसल्याने अशा उदाहरणांना 'ध्वनि' म्हणण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२) पण वरील टीपेत सांगितलेल्या उदाहरणाच्या उलट ध्वनिकाव्याची स्थिति असते, कारण तेथे सहृदयाला वाच्यार्थाच्या तुलनेंने रसादि व्यंग्यार्थच प्राधान्याने प्रतीत व्हावा असा कवीचा ते काव्य लिहिण्यामागे मुख्य हेतु असतो. म्हणून अज्ञा काव्याला 'ध्वनि' म्हणावयाचे.

३) तीन प्रकारचा म्हणजे वस्तु, अलंकार व रसादि या प्रकारचा. पाहा, प्रथमखंड, उद्द्योत — १ प्रतीयमानाचा 'वस्तु' हा प्रकार वाच्य अर्थाहून वेगळा, कारण (१) स्वरूपभेद.

४) अभिप्राय या स्वरूपाचा म्हणजे वक्त्याची शब्द वापरण्याची इच्छा व त्या शब्दांद्वारे काहीतरी अर्थ प्रकट करण्याची इच्छा या स्वरूपाचा. (म्हणजे पुढे काशी आवृत्ति, पृ. ४४९ वर वृत्तीमध्ये सांगितलेल्या शब्दस्वरूपप्रकाशनेच्छा व शब्देन अर्थप्रकाशनेच्छा या स्वरूपाचा).

५) म्हणजे 'गाय आण' हे वाक्य उच्चारणाऱ्याच्या मनात असलेला (पण प्राधान्याने विवक्षित नसलेला) असा (उदा. गाईपासून दूध मिळवणे यासारखा) व्यंग्यार्थ.

६) हे लक्षण प्रथमखंड, "उद्‌द्योत – १ 'लक्षणा हे ध्वनीचे 'लक्षण' नाही'" वर आले आहे.

६ अ) पाहा, प्रथमखंड, उद्‌द्योत – १ सारांश, व्यंगार्थयुक्त अलंकार वेगळे आणि 'ध्वनि' वेगळा.

६ आ) मुळातील **नान्तरीयकतया** याचे भाषांतर आम्ही 'अविनाभावाने' असे केले आहे. नियतसाहचर्य व व्याप्ति हे शब्दही याच अर्थाने (म्हणजे एक वस्तु अस्तित्वात असली तरच दुसरी वस्तु अस्तित्वात असणे या अर्थाने) वापरले जातात.

७) प्रथमखंड,"उद्‌द्योत – १ 'प्रतीयमानाचा 'वस्तु' हा प्रकार वाच्य अर्थाहून वेगळा, कारण (१) स्वरूपभेद'".

८) अशा प्रकारे अभिनवगुप्तांनी 'ब्रह्म' याचे तीन अर्थ सांगितले :– (१) व्यापक (बृहत्), (२) परिपुष्ट झालेले (बृंहित) व (३) वाढण्याची क्रिया असे स्वरूप असलेले (बृंहण). तुलनार्थ पाहा, वाक्यपदीय १–१ :– **अनादिनिधनं ब्रह्म शब्दरूपं यदक्षरम् । विवर्ततेऽर्थभावेन प्रक्रिया जगतो यतः ॥**

९) पाहा, प्रथमखंड, लोचन, "उद्‌द्योत -१ 'अनुक्तनिमित्ता विशेषोक्ति म्हणजे 'ध्वनि' नव्हे' व 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'" वरील टीप ७१.

ध्वन्यालोकः

कृत्रिमशब्दार्थसम्बन्धवादिनां तु युक्तिविदामनुभवसिद्ध एवायं व्यञ्जकभावः शब्दानामर्थान्तराणामिवाविरोधश्चेति न प्रतिक्षेप्यपदवीमवतरति ।

वाचकत्वे हि तार्किकाणां विप्रतिपत्तयः प्रवर्तन्ताम्, किमिदं स्वाभाविकं शब्दानामाहोस्वित्सामयिकमित्याद्याः । व्यञ्जकत्वे तु तत्पृष्ठभाविनि भावान्तरसाधारणे लोकप्रसिद्ध एवानुगम्यमाने को विमतीनामवसरः । अलौकिके ह्यर्थे तार्किकाणां विमतयो निखिलाः प्रवर्तन्ते न तु लौकिके । न हि नीलमधुरादिष्वशेषलोकेन्द्रियगोचरे बाधारहिते तत्त्वे परस्परं विप्रतिपन्ना दृश्यन्ते । न हि बाधारहितं नीलं नीलमिति ब्रुवन्नपरेण प्रतिषिध्यते नैतन्नीलं पीतमेतदिति । तथैव व्यञ्जकत्वं वाचकानां शब्दानामवाचकानां च गीतध्वनीनामशब्दरूपाणां च चेष्टादीनां यत्सर्वेषामनुभवसिद्धमेव तत्केनापह्नूयते?

अशब्दमर्थं रमणीयं हि सूचयन्तो व्याहारास्तथा व्यापारा निबद्धाश्चानिबद्धाश्च विदग्धपरिषत्सु विविधा विभाव्यन्ते । तानुपहास्यतामात्मनः परिहरन् कोऽतिसन्दधीत सचेताः ।

ध्वन्यालोक

पण शब्द आणि अर्थ यांचा संबंध हा (ईश्वरेच्छेमुळे किंवा मनुष्याच्या इच्छेमुळे उत्पन्न झालेला, अत एव) कृत्रिम आहे, असे मत प्रतिपादन करणारे जै नैयायिक (वगैरे) त्यांच्या दृष्टीने तर (दिवा वगैरे) इतर वस्तूंप्रमाणे शब्दांच्याही ठिकाणी व्यंजकत्व असते हे अनुभवसिद्धच आहे आणि ते व्यंजकत्व दुसऱ्या कोणत्याही प्रमाणाने बाधित होत नाही, म्हणूनच त्यांना व्यंजकत्व नाकारता येणार नाही.

वाचकत्व हा शब्दाचा धर्म नैसर्गिक आहे, की संकेतामुळे त्याला प्राप्त होणारा आहे अशा प्रकारचे नैयायिक वगैरे चिकित्सकांचे मतभेद वाचकत्वाच्या बाबतीत (खुशाल) असू देत. पण व्यंजकत्व हा धर्म वाचकत्वाच्या नंतरच प्रकट होणारा आहे. तो इतर (म्हणजे दिवा वगैरे) पदार्थांच्या ठिकाणी जसा असतो, तसाच शब्दाच्याही ठिकाणी[1] स्वयंभूपणे आढळतो. अशा रीतीने जी गोष्ट लोकांच्या अनुभवाची आहे, तिचाच आम्ही पुरस्कार करीत असल्यामुळे (व्यंजकत्वाच्या बाबतीत) मतभेदांना वाव कोठे आहे? चिकित्सकांचे सगळे मतभेद (व स्वतःच्या मताबद्दलचे आग्रह) अलौकिक (म्हणजे लोकांच्या अनुभवाचा विषय नसलेल्या) गोष्टींच्या बाबतीतच उत्पन्न होतात, लौकिक (म्हणजे लोकांच्या अनुभवास येणाऱ्या) गोष्टींच्या बाबतीत नव्हे.

कारण निळे, गोड वगैरे पदार्थ – की ज्यांचे स्वरूप साऱ्या जगाच्या ज्ञानेंद्रियांचा विषय असते, आणि ज्यांचा अनुभव मागाहून कोणत्याही प्रकारे चुकीचा ठरत नाही, त्यांचे बाबतीत तर्कवाद्यांचा एकमेकांशी मतभेद झालेला दिसत नाही- कारण जिचे ज्ञान कोणत्याही प्रमाणांनी बाधित होत नाही, अशा निळ्या वस्तूला 'ही निळी आहे' असे जर कोणी म्हटले, तर दुसरा कोणी 'ही निळी नाही, ही पिवळी आहे' असे म्हणून त्याचे मत खोडून काढीत नाही. तसेच व्यंजकत्व हा धर्म वाचक शब्दांच्या ठिकाणी, तसेच वाचक नसलेल्या, गाण्याचे सूर वगैरे (केवळ श्रव्य) शब्दांच्या ठिकाणी आणि जे शब्दरूपही नाहीत अशा हावभाव वगैरेंच्या ठिकाणी असलेला सर्वांच्या अनुभवास येणारा असाच आहे, तो कोण नाकबूल करील? कारण शब्दांनी वाच्य नसलेला रम्य अर्थ सुचवणाऱ्या प्रबन्धरूपी व मुक्तकरूपी शब्दरचना (व्याहार) आणि क्रिया (व्यापार) विद्वानांच्या सभांमध्ये उपयोगात आणलेल्या आढळतात. ते सर्व व्यवहार आपले हसे होऊ नये अशी इच्छा असणारा कोण समंजस मनुष्य अमान्य करील?

लोचनम्

एवं वाक्यविदां पदविदां चाविमतिविषयत्वं प्रदर्श्य प्रमाणतत्त्वविदां तार्किकाणामपि न युक्तात्र विमतिरिति दर्शयितुमाह – कृत्रिमेति । कृत्रिमः सङ्केतमात्रस्वभावः परिकल्पितः शब्दार्थयोः संबन्ध इति ये वदन्ति नैयायिकसौगतादयः । यथोक्तम् – 'न, सामयिकत्वाच्छब्दार्थप्रत्ययस्ये'ति । तथा 'शब्दाः सङ्केतितं प्राहुः' इति । अर्थान्तराणामिति दीपादीनाम् । नन्वनुभवेन द्विचन्द्राद्यपि सिद्धं तच्च विमतिपदमित्याशङ्क्याह – अविरोधश्चेति । अविद्यमानो विरोधो निरोधो बाधकात्मको द्वितीयेन ज्ञानेन यस्य । तेनानुभवसिद्धश्चाबाधितश्चेत्यर्थः । अनुभवसिद्धं न प्रतिक्षेप्यं यथा वाचकत्वम् ।

ननु तत्राप्येषां विमतिः । नैतत्; न हि वाचकत्वे सा विमतिः । अपि तु वाचकत्वस्य नैसर्गिकत्वकृत्रिमत्वादौ । तदाह – वाचकत्वे हीति । नन्वेवं व्यञ्जकत्वस्यापि धर्मान्तरमुखेन विप्रतिपत्तिविषयतापि स्यादित्याशङ्क्याह् – व्यञ्जकत्वे त्विति । भावान्तरेति । अक्षिनिकोचादेः साङ्केतिकत्वं

चक्षुरादिकस्यानादिर्योग्यतेति दृष्ट्वा काममस्तु संशयः शब्दस्याभिधेयप्रकाशने, व्यञ्जकत्वं तु यादृशमेकरूपं भावान्तरेषु तादृगेव प्रकृतेऽपीति निश्चितैकरूपे कः संशयस्यावकाश इत्यर्थः । नैतन्नीलमिति । नीले हि न विप्रतिपत्तिः, अपि तु प्राधानिकमिदं पारमाणवमिदं ज्ञानमात्रमिदं तुच्छमिदमिति तत्सृष्टावलौकिक्य एव विप्रतिपत्तयः । वाचकानामिति । ध्वन्युदाहरेणष्विति भावः ।

अशब्दमिति । अभिधाव्यापारेणास्पृष्टमित्यर्थः । रमणोयमिति । यद् गोप्यमानतयैव सुन्दरीभवतीत्यनेन ध्वन्यमानतायामसाधारणप्रतीतिलाभः प्रयोजनमुक्तम् । निबद्धाः प्रसिद्धाः । तानिति व्यवहारान् । कः सचेता अतिसन्दधीत नाद्रियेतेत्यर्थः । लक्षणे शत्रादेशः आत्मनः कर्मभूतस्य योपहसनीयता तस्याः परिहारेणोपलक्षितस्तां परिजिहीर्षुरित्यर्थः ।

लोचन

अशा रीतीने वाक्यशास्त्रवेत्ते जे मीमांसक व पदशास्त्रवेत्ते जे वैयाकरण, त्या दोघांचाही व्यंजकत्वाला विरोध असण्याचे कारण नाही हे दाखविल्यानंतर 'प्रमाणांच्या शास्त्राचे जाणकार' [२] जे तार्किक, म्हणजे नैयायिक व वैशेषिक, त्यांनीही व्यंजकत्वाला विरोध करणे योग्य नाही हे दाखविण्यासाठी वृत्तिकार '(शब्द व अर्थ यांचा संबंध) कृत्रिम आहे' इ. विधान करितात. शब्द व अर्थ यांचा संबंध केवळ संकेत या स्वरूपाचा असून तो कृत्रिम (म्हणजे ईश्वराने किंवा मनुष्याने निर्माण केलेला) आहे असे जे मानितात, ते म्हणजे नैयायिक, बौद्ध वगैरे. असे म्हटलेच आहे [३], की– 'तसे नाही, [४] कारण शब्दापासून होणारे अर्थज्ञान हे सर्वस्वी संकेतावरच अवलंबून असते.' तसेच [५] 'शब्द हे संकेताने ठरविलेल्या अर्थाचेच ज्ञान करून देतात. [६] 'इतर वस्तूंप्रमाणे' म्हणजे दिवा वगैरे [७] वस्तूंप्रमाणे.

'पण काय हो, (काही लोकांना एका चंद्राच्या जागी) दोन चंद्र दिसणे [८] वगैरे गोष्टीदेखील अनुभवाने सिद्ध झालेल्या आहेत, पण (इतरांच्या दृष्टीने) त्या गोष्टीही मतभेदाचा विषय असू शकतात!' अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'बाधित होत नाही' इ. शब्दांनी उत्तर देतात. ज्या व्यंजकत्वाला विरोध म्हणजे दुसऱ्या उत्तरकालीन ज्ञानामुळे बाधरूपी प्रतिबंध उत्पन्न होत नाही म्हणून जे व्यंजकत्व अनुभवसिद्ध आणि बाधारहित आहे, असा अर्थ. जे जे अनुभवसिद्ध असते, ते ते अमान्य करिता येत नाही, जसे शब्दांचा वाचकत्व हा धर्म अनुभवसिद्ध असल्यामुळे तो (धर्म) नाकारणे शक्य नाही.

(शंका–) 'पण काय हो, त्या वाचकत्वाच्या बाबतीतही या विद्वानांचे मतभेद आहेतच की! [९]' (उत्तर) हे म्हणणे बरोबर नाही. कारण ते मतभेद वाचकत्व अस्तित्वात आहे की नाही याविषयी नाहीत, तर वाचकत्व नैसर्गिक म्हणजे स्वभावसिद्ध आहे की कृत्रिम आहे वगैरे बाबतीत ते मतभेद आहेत. म्हणून वृत्तिकार 'वाचकत्व हा' इ. विवरण करितात.

'पण काय हो, तर मग व्यंजकत्वाच्या बाबतीतही ते नैसर्गिक आहे की कृत्रिम आहे अशा धर्मांच्या दृष्टीने मतभेद असू शकतील अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'पण व्यंजकत्व हा धर्म' इ. शब्दांनी उत्तर देतात. [१०] 'इतर (म्हणजे दिवा वगैरे) पदार्थांच्या ठिकाणी–' डोळे मिचकावणे, विस्फारणे वगैरे क्रियांच्या द्वारे निरनिराळ्या भावनांचा आविष्कार संकेताला अनुसरून म्हणजे कृत्रिमपणे केला जातो, पण डोळे वगैरे इंद्रियांच्या ठिकाणचे पदार्थांचे ज्ञान करून देण्याचे सामर्थ्य हे अनादिकालापासून त्यांच्या ठिकाणी नैसर्गिकच असते हे पाहिल्यामुळे शब्दाचे वाच्यार्थ प्रकट करण्याचे सामर्थ्य नैसर्गिक आहे की संकेतामुळे

उत्पन्न होणारे म्हणजे कृत्रिम आहे याबद्दल विद्वानांना हवा तेवढा संशय असू दे. पण व्यंजकत्व हे इतर (म्हणजे दिवा वगैरे) पदार्थांच्या ठिकाणी ज्या विशिष्ट प्रकारचे असते त्याच विशिष्ट प्रकारचे [११] व निश्चित स्वरूपाचे प्रस्तुत ठिकाणी म्हणजे शब्दांच्या ठिकाणीही असते. त्याच्या बाबतीत संशयाला जागाच कोठे आहे, असा अर्थ. कारण एखाद्या काळ्या पदार्थाविषयी 'हा काळा नाही' असा मतभेद कधी होत नाही, तर हा पदार्थ (सांख्यमतानुसार) प्रकृतीचे कार्य आहे की (वैशेषिकांच्या म्हणण्याप्रमाणे) तो परमाणूंचा बनलेला आहे किंवा (विज्ञानवादी बौद्धांच्या मतानुसार) तो केवळ विज्ञानात्मकच [१२] आहे की (सर्वशून्यवादी बौद्धांच्या म्हणण्याप्रमाणे) तो तुच्छ म्हणजे अस्तित्वशून्य आहे अशा प्रकारचे, त्या पदार्थाची उत्पत्ति कशी होते अशा अलौकिक [१३] बाबतीतच मतभेद उत्पन्न होतात. 'वाचक शब्दांच्या ठिकाणी—' अर्थात् ध्वनिकाव्यातील (वाचकशब्दांच्या ठिकाणी) असा आशय.

'शब्दांनी वाच्य नसलेला' — म्हणजे अभिधाव्यापाराचा ज्याला मुळीच स्पर्श झाला नाही, असा. 'रम्य' — जो अर्थ झाकलेल्या स्वरूपात असल्यामुळेच त्या अर्थाला सौंदर्य प्राप्त होते [१४]. अशा रीतीने अर्थ सुचविला गेल्यामुळे त्याच्या प्रतीतीला विशेष सौंदर्य प्राप्त व्हावे, हा (बोलणाऱ्याच्या मनातील) उद्देश 'शब्दांनी वाच्य नसलेला रम्य अर्थ' या शब्दसमूहाने सुचविला गेला आहे. 'निबद्ध (म्हणजे प्रबंधरूप) [१५] रचना प्रसिद्धच आहेत. ते (सर्व) म्हणजे (व्याहार व व्यापार हे) व्यवहार. 'कोण समंजस मनुष्य अमान्य करील' म्हणजे त्यांना महत्त्व देणार नाही, असा अर्थ. **परिहरन्** (टाळणारा) यातील वर्तमानकालवाचक धातुसाधिताचा **अत्** हा प्रत्यय लक्षण (वैशिष्ट्य) या अर्थी आहे. [१६] आपण स्वतः ज्या उपहसन क्रियेचे कर्म म्हणजे उद्दिष्ट आहोत, ती क्रिया टाळणे या धर्माने तो (समंजस मनुष्य) उपलक्षित (म्हणजे युक्त) असतो, म्हणजे जो ती उपहसनक्रिया टाळू इच्छितो, असा अर्थ.

टीपा

१) दिवा जसा स्वतःचे प्रकाशमय स्वरूप प्रकट करण्याबरोबरच इतरही वस्तू प्रकाशित करतो, त्याप्रमाणे शब्द ही वाच्यार्थाचा बोध करून देऊन त्याहून निराळा व्यंग्यार्थही प्रकाशित करितो.

२)पाहा, उत्तररामचरिताच्या प्रस्तावनेमधील **पदवाक्यप्रमाणज्ञः** हे विशेषण.

३) पाहा, न्यायसूत्र, २—१—५५.

४) म्हणजे पूर्वपक्ष म्हणतो त्याप्रमाणे शब्द व अर्थ यांमध्ये व्याप्तिसंबंध असतो हे बरोबर नाही.

५) धर्मकीर्ति, प्रमाणवार्तिक, १-९२. (स्वार्थानुमान, परिच्छेद ९४).

६) हा संपूर्ण श्लोक अभिनवगुप्तांनी पुढे काशी आवृत्ति पृ. ५४२ वर उद्धृत केला आहे.

७) वगैरे म्हणजे सूर्य, चंद्र, विजेचे चकाकणे इ. प्रकाशक गोष्टी.

८) 'तिमिर' (Diplopia) ही विकृति झालेल्या माणसाला एकाऐवजी अनेक चंद्र दिसतात ही गोष्ट त्या माणसाच्या अनुभवाची असली तरी ती इतर लोकांच्या अनुभवाची नसल्याने ते तिला विरोध करणारच!

९) कारण मीमांसक हे वाचकत्व नैसर्गिक आहे असे मानणारे आहेत, तर तार्किक हे वाचकत्व कृत्रिम, ईश्वरनिर्मित किंवा मानवनिर्मित आहे असे मानणारे आहेत.

१०) पूर्वपक्षाने जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याला लोचनात किंवा ध्वन्यालोकात समर्पक, नेमके उत्तर दिलेले आढळत नाही. पण ध्वनिवाद्यांच्या दृष्टीने व्यंजकत्व हा व्यापार नैसर्गिक नसून कृत्रिम म्हणजे विशिष्ट परिस्थितीमध्येच उत्पन्न होणारा असतो. त्यामुळे नैसर्गिक आहे की कृत्रिम हा प्रश्नच उद्‌भवण्याला कारण नाही.

११) म्हणजे द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'अविवक्षितवाच्य ध्वनि हा गुणवृत्तीपेक्षा वेगळा नाही या मताचे खंडन'" वर 'जो स्वतःच्या रूपाचे दर्शन घडवीत असताना' इ. वाक्यात सांगितलेल्या प्रकारचे.

१२) विज्ञानवादी बौद्ध हे बाह्य वस्तूंना स्वतंत्र अस्तित्व नसून त्या द्रष्ट्याच्या मनातील ज्ञानाच्या रूपानेच अस्तित्वात असतात असे मानितात.

१३) 'अलौकिक' म्हणजे इन्द्रियगोचर नसणारी अवस्था म्हणजेच पदार्थाची उत्पत्तीपूर्वीची अवस्था.

१४) गोष्यमानतेमुळे सौंदर्य उत्पन्न होते हा विचार अभिनवगुप्तांनी यापूर्वी प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'लक्षणा हे ध्वनीचे 'लक्षण' नाही'". व "उद्‌द्योत – २ 'अलंकार सूचित केल्यास काव्याचे सौंदर्य वाढते'" (टीप ५) यावर व यानंतर काशी आवृत्ति, लोचन पृ. ४५१, ४७५ व ४७६ यांवर प्रकट केला आहे. आनंदवर्धनांनी काशी आवृत्ति पृ. ५३३ वरील वृत्तीमध्ये हाच विचार मांडला आहे.

१५) 'निबद्ध' म्हणजे रघुवंश, कादंबरी वगैरेसारख्या प्रबंधरूप रचना आणि 'अनिबद्ध' म्हणजे मुक्तक वगैरेसारखी (स्फुट) रचना. निबद्ध व अनिबद्ध या दोन संज्ञांचा विचार वामनाने काव्यालंकारसूत्रवृत्ति, १–३–२१ ते २७ येथे केला आहे व त्यावरील 'कामधेनु' या टीकेमध्ये **अनिबद्धं मुक्तकम्, निबद्धं प्रबन्धरूपम् इति प्रसिद्धिः** असे म्हटले आहे. बालप्रियेने मात्र या 'प्रसिद्धीच्या' उलट, म्हणजे अनिबद्ध = गद्य आणि निबद्ध = पद्य असा अर्थ दिला आहे.

१६) पाहा, द्वितीयखंड "उद्‌द्योत -३ संघटना रसांची अभिव्यक्ति करते, ती गुणांशी एकरूप होऊन, की गुणांच्या आश्रयाने राहून की गुणसंघटनेच्या आश्रयाने राहून, या तीन पक्षांसंबंधी चर्चा. हे तीन पक्ष कल्पिण्याचे प्रयोजन'" वरील **लक्षणहेत्वोः क्रियायाः** हे सूत्र व त्यावरील १८ वी टीप.

ध्वन्यालोकः

(ब्रूयात्) अस्त्यतिसंधानावसरः । व्यञ्जकत्वं शब्दानां गमकत्वं तद्य लिङ्गत्वमतश्च व्यङ्ग्यप्रतीतिर्लिङ्गिप्रतीतिरेवेति लिङ्गिलिङ्गभाव एव तेषां व्यङ्ग्यव्यञ्जकभावो नापरः कश्चित् । अतश्चैतदवश्यमेव बोद्धव्यं यस्माद्वक्त्राभिप्रायापेक्षया व्यञ्जकत्वमिदानीमेव त्वया प्रतिपादितं, वक्त्रभिप्रायश्चानुमेयरूप एव ।

ध्वन्यालोक

यावर एखादा पूर्वपक्षी म्हणेल – होय. उपरिनिर्दिष्ट शब्दप्रयोग व हालचाली यांचे व्यञ्जकत्व अमान्य करावयाला जागा आहे. (कारण) ते व्यंजकत्व म्हणजे शब्दांच्या ठिकाणचे सूचकत्व. आणि म्हणून ते म्हणजे लिंगत्व [१] (म्हणजे अनुमान करण्यास कारणीभूत असणे) हे होय. म्हणूनच व्यंग्यार्थाचे ज्ञान म्हणजे (अनुमानातील) साध्याचे ज्ञानच होय. आणि म्हणून त्या शब्दांचा व्यंग्यार्थीशी व्यंजक या नात्याने असणारा संबंध म्हणजे दुसरेतिसरे काहीही नसून अनुमानातील लिंगाच्या साध्याशी असणारा संबंधच होय. [२] आणखी एका कारणासाठी हे अवश्य मान्य केले पाहिजे आणि ते कारण असे की, वक्त्याचा अभिप्राय सुचवण्याच्या दृष्टीने वाक्याच्या ठिकाणी व्यंजकत्व असते असे तुम्ही नुकतेच (म्हणजे मीमांसकांच्या मताचे परीक्षण करिताना) म्हटले. आणि वक्त्याचा अभिप्राय अनुमानाने समजणारा असाच असतो.

लोचनम्

अस्तीति । व्यञ्जकत्वं नापह्नूयते तत्त्वतिरिक्तं न भवति । अपि तु लिङ्गिलिङ्गभाव एवायम् । इदानीमेवेति । जैमिनीयमतोपक्षेपे ।

लोचन

'(जागा) आहे' – (शब्दांचे व हालचालींचे) 'प्रकाशकत्व नाही' असे आम्ही म्हणत नाही, पण ते प्रकाशकत्व अनुमापकत्वाहून भिन्न नसून ते (प्रकाशकत्व) म्हणजे साध्य (लिङ्गिन्) व साधन (लिङ्ग) ह्यांमधील संबंधच होय. 'नुकतेच' म्हणजे जैमिनीच्या अनुयायांचे (मीमांसकांचे) याबाबतचे मत [३] मांडताना.

टीपा

१) येथे पूर्वपक्षी लिंगत्व हा शब्दाचाच एक व्यापार असतो असे मान्य करीत आहे. वस्तुतः लिंगत्व हा धर्म शब्दाच्या ठिकाणी नसून त्या शब्दाच्या वाच्य अर्थाच्या ठिकाणी असतो. पण शब्द व वाच्य अर्थ यांचे नियतसाहचर्य असते, म्हणून उपचाराने पूर्वपक्षी शब्दाच्याच ठिकाणी लिंगत्व आहे असे म्हणत असावा.

२) म्हणजे व्यंजकत्व हे नवीन काही नसून अनुमापकत्वच होय, असे या प्रतिपक्ष्याचे म्हणणे. आनंदवर्धनांनंतर ध्वनीला जे काही विरोधक उत्पन्न झाले, त्यांपैकी 'व्यक्तिविवेक' या ग्रंथाचा कर्ता महिमभट्ट हा एक होय. त्या ग्रंथात 'ध्वनीचे सगळे प्रकार अनुमानातच अंतर्भूत होतात' असे दाखवण्याचा तो प्रयत्न करितो. पण त्या आधीच तसा पूर्वपक्ष कल्पून आनंदवर्धन यापुढील विवेचनात त्याचे खंडन करीत आहेत.

३) पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत -३ 'व्यजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा, म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वरील 'आणि पौरुषेय वाक्ये' इ. वाक्य.

अत्रोच्यते — नन्वेवमपि यदि नाम स्यात्तत्किं नश्छिन्नम् । वाचकत्वगुणवृत्तिव्यतिरिक्तो व्यञ्जकत्वलक्षणः शब्दव्यापारोऽस्तीत्यस्माभिरभ्युपगतम् । तस्य चैवमपि न काचित् क्षतिः । तद्धि व्यञ्जकत्वं लिङ्गत्वमस्तु, अन्यद्वा । सर्वथा प्रसिद्धशाब्दप्रकारविलक्षणत्वं शब्दव्यापारविषयत्वं च तस्यास्तीति नास्त्येवावयोर्विवादः । न पुनरयं परमार्थो यद्द्वञ्जकत्वं लिङ्गत्वमेव सर्वत्र व्यङ्ग्यप्रतीतिश्च लिङ्गिप्रतीतिःरेवेति ।

यदपि स्वपक्षसिद्धयेऽस्मदुक्तमनूदितं त्वया वक्त्रभिप्रायस्य व्यङ्ग्यत्वेनाभ्युपगमात्तत्प्रकाशने शब्दानां लिङ्गत्वमेवेति तदेतद्यथास्माभिरभिहितं तद्विभज्य प्रतिपाद्यते श्रूयताम् — द्विविधो विषयः शब्दानाम् अनुमेयः प्रतिपाद्यश्च । तत्रानुमेयो विवक्षालक्षणः । विवक्षा च शब्दस्वरूपप्रकाशनेच्छा शब्देनार्थप्रकाशनेच्छा चेति द्विप्रकारा । तत्राद्या न शाब्दव्यवहाराङ्गम् । सा हि प्राणित्वमात्रप्रतित्तिफला । द्वितीया तु शब्दविशेषावधारणावसितव्यवहितापि शब्दकरणव्यवहारनिबन्धनम् । तु द्वे अप्यनुमेयो विषयः शब्दानाम् । प्रतिपाद्यस्तु प्रयोक्तुरर्थप्रतिपादनसमीहाविषयीकृतोऽर्थः ।

स च द्विविध :— वाच्यो व्यङ्ग्यश्च । प्रयोक्ता हि कदाचित्स्वशब्देनार्थं प्रकाशयितुं समीहते कदाचित्स्वशब्दानभिधेयत्वेन प्रयोजनापेक्षया कयाचित् । स तु द्विविधोऽपि प्रतिपाद्यो विषयः शब्दानां न लिङ्गितया स्वरूपेण प्रकाशते, अपि तु कृत्रिमेणाकृत्रिमेण वा संबंन्धान्तरेण । विवक्षाविषयत्वं हि तस्यार्थस्य शब्दैर्लिङ्गितया प्रतीयते न तु स्वरूपम् । यदि हि लिङ्गितया तत्र शब्दानां व्यापारः स्यात्तच्छब्दार्थे सम्यङ्मिथ्यात्वादिविवादा एव न प्रवर्तेरन् धूमादिलिङ्गानुमितानुमेयान्तरवत् । व्यङ्ग्यश्चार्थो वाच्यसामर्थ्याक्षिप्ततया वाच्यवच्छब्दस्य सम्बन्धी भवत्येव । साक्षादसाक्षाद्भावो हि सम्बन्धस्याप्रयोजकः, वाच्यवाचकभावाश्रयत्वं च व्यञ्जकत्वस्य प्रागेव दर्शितम् । तस्माद्वक्त्रभिप्रायरूप एव व्यङ्ग्ये लिङ्गतया शब्दानां व्यापारः । तद्विषयीकृते तु प्रतिपाद्यतया । प्रतीयमाने तस्मिन्नभिप्रायरूपेऽनभिप्रायरूपे च वाचकत्वेनैव व्यापारः सम्बन्धान्तरेण वा । न तावद्वाचकत्वेन यथोक्तं प्राक् । सम्बन्धान्तरेण व्यञ्जकत्वमेवे । न च व्यञ्जकत्वं लिङ्गत्वरूपमेव, आलोकादिष्वन्यथा दृष्टत्वात् । तस्मात्प्रतिपाद्यो विषयः शब्दानां न लिङ्गित्वेन सम्बन्धी वाच्यवत् । यो हि लिङ्गित्वेन तेषां सम्बन्धी यथा दर्शितो विषयः स न वाच्यत्वेन प्रतीयते, अपि तूपाधित्वेन । प्रतिपाद्यस्य च विषयस्य लिङ्गित्वे तद्विषयाणां विप्रतिपत्तीनां लौकिकैरेव क्रियमाणानामभावः प्रसज्येतेति । एतद्योक्तमेव ।

यथा च वाच्यविषये प्रमाणान्तरानुगमेन सम्यक्त्वप्रतीतौ क्वचित्क्रियमाणायां तस्य प्रमाणान्तरविषयत्वे सत्यपि न शब्दव्यापारविषयताहानिस्तद्वद् व्यङ्ग्यस्यापि । काव्यविषये च व्यङ्ग्यप्रतीतीनां सत्यासत्यनिरूपणस्याप्रयोजकत्वमेवेति तत्र प्रमाणान्तरव्यापारपरीक्षोपहासायैव सम्पद्यते । तस्माल्लिङ्गिप्रतीतिरेव सर्वत्र व्यङ्ग्यप्रतीतिरिति न शक्यते वक्तुम् ।

यत्त्वनुमेयरूपव्यङ्ग्यविषयं शब्दानां व्यञ्जकत्वं तद्ध्वनिव्यवहारस्याप्रयोजकम् । अपि तु व्यञ्जकत्वलक्षणः शब्दानां व्यापार औत्पत्तिकशब्दार्थसम्बन्धवादिनाप्यभ्युपगन्तव्य इति प्रदर्शनार्थमुपन्यस्तम् । तद्धि व्यञ्जकत्वं कदाचिल्लिङ्गत्वेन कदाचिद्रूपान्तरेण शब्दानां वाचकानामवाचकानां च सर्ववादिभिरप्रतिक्षेप्यमित्ययमस्माभिर्यत्न आरब्धः । तदेवं गुणवृत्तिवाचकत्वादिभ्यः शब्दप्रकारेभ्यो नियमेनैव तावद्विलक्षणं व्यञ्जकत्वम् । तदन्तःपातित्वेऽपि तस्य हठादभिधीयमाने तद्विशेषस्य

ध्वनेर्यत्प्रकाशनं विप्रतिपत्तिनिरासाय सहृदयव्युत्पत्तये वा तक्रियमाणमनतिसन्धेयमेव । न हि सामान्यमात्रलक्षणेनोपयोगिविशेषलक्षणानां प्रतिक्षेपः शक्यः कर्तुम् । एवं हि सति सत्तामात्रलक्षणे कृते सकलसद्वस्तुलक्षणानां पौनरुक्त्यप्रसङ्गः । तदेवम्—

विमतिविषयो य आसीन्मनीषिणां सततमविदितसतत्त्वः ।
ध्वनिसञ्ज्ञितः प्रकारः काव्यस्य व्यञ्जितः सोऽयम् ॥

ध्वन्यालोक

या पूर्वपक्ष्याला आमचे उत्तर असे की, 'काय हो, असे क्षणभर मानिले तरी त्यामुळे आमच्या सिद्धांताला कोठे बाध आला? कारण शब्दाचा वाचकत्व व गुणवृत्ति यांहून वेगळा असा व्यंजकत्व या स्वरूपाचा व्यापार असतो, हे तर आम्ही सिद्धांत म्हणून स्वीकारले आहे! मग तो व्यापार लिंगत्व या रूपाचा आहे असे क्षणभर मानले, तरीसुद्धा त्यामुळे आमच्या म्हणण्याला काहीही बाध येत नाही. कारण ते (आमचे) व्यंजकत्व हे लिंगत्व असो, किंवा दुसरे काही असो. ते व्यंजकत्व शब्दाचे प्रसिद्ध असे जे (वाचकत्व व गुणवृत्ति हे) व्यापार, त्यांहून निराळे, पण शब्दाचा एक व्यापार व त्या स्वरूपात (ज्ञानाचा) विषय आहे या बाबतीत आपल्यामध्ये वाद नाहीच. [१] पण वस्तुतः सगळीकडे व्यंजकत्व म्हणजेच लिंगत्व (म्हणजे साधनत्व) आणि सगळीकडे व्यंग्यार्थाची प्रतीति म्हणजे साध्याचीच प्रतीति होय, ही खरी गोष्ट नाही.

आणि (आमचे मत सिद्ध करण्यासाठी) वक्त्याची इच्छा ही व्यंग्य असते असे जे आम्ही म्हटले, त्याचा अनुवाद करून ती इच्छा प्रकाशित करण्यामध्ये शब्दांच्या ठिकाणी लिंगत्वच असते असे तुम्ही तुमचे म्हणणे सिद्ध करण्यासाठी आमच्या म्हणण्याला वळण दिले. त्या आमच्या म्हणण्यामागील आमचा अभिप्राय आता आम्ही स्पष्ट करून सांगतो, तुम्ही लक्ष देऊन ऐका :— शब्दापासून ज्या विषयाचा बोध होतो, तो विषय दोन प्रकारचा असतो :— (श्रोत्याला) ज्याचे अनुमान करिता येते असा आशय व (वक्त्याला) शब्दांच्या द्वारे ज्याचे प्रतिपादन करावयाचे असते तो आशय; त्यांपैकी वक्त्याची इच्छा या स्वरूपाचा जो आशय, त्याचे अनुमान करिता येते. आणि बोलण्याची इच्छा देखील दोन प्रकारची असते :— (१) शब्दाचे श्रव्य किंवा नादमय स्वरूप प्रकट करण्याची इच्छा व (२) तो शब्द उच्चारून विशिष्ट अर्थ प्रकट करण्याची इच्छा. त्यांपैकी पहिल्या प्रकारची इच्छा ही काही शब्दांमुळे होणाऱ्या अर्थप्रतीतीचा भाग नव्हे. कारण तीमुळे शब्द उच्चारणारा एक सचेतन प्राणी आहे येवढेच ऐकणाराला (अनुमानाने) समजेल. परंतु दुसऱ्या प्रकारची इच्छा, आणि तदनुसार शब्दप्रयोग करणे यांमध्ये जरी विशिष्ट शब्दांची योग्य निवड करण्याचे काम शेवटास नेणे ही पायरी येत असली, तरी ती इच्छा शब्दप्रयोग करण्याला कारणीभूत असते. त्या दोन्ही इच्छा हा आशय शब्दावरून अनुमान करिता येण्याजोगा असतो. पण शब्दांनी 'प्रतिपादन' केला जाणारा आशय कोणता? तर शब्द योजणाऱ्याच्या अर्थ प्रकट करण्याच्या इच्छेचा विषय असलेला जो अर्थ, तो. (म्हणजे वक्ता ज्या अर्थाचा बोध करून देऊ इच्छितो, तो अर्थ).

तो प्रतिपादन करावयाचा अर्थ दोन प्रकारचा असतो :— (१) वाच्य आणि (२) व्यंग्य. कारण बोलणारा केव्हा केव्हा इष्ट अर्थाचे वाचक शब्द वापरून इष्ट अर्थ प्रकट करू इच्छितो, तर केव्हा केव्हा तो कोठल्यातरी विशेष उद्देशाने [२] त्या अर्थाचे वाचक शब्द न वापरता तो अर्थ प्रकट करू पाहातो. पण शब्दाच्या प्रयोगाच्या द्वारे प्रतिपादन करावयाचा असलेला तो दोन्ही प्रकारचा (म्हणजे वाच्य व व्यंग्य) अर्थ शब्दावरून अनुमानाने कळणारे साध्य या स्वरूपात ज्ञात होत नाही, तर शब्दाशी त्याच्या असलेल्या कृत्रिम

[३] किंवा अकृत्रिम अशा दुसऱ्या संबंधामुळे ज्ञात होतो. कारण तो अर्थ वक्त्याच्या बोलण्याच्या इच्छेचा विषय आहे हे शब्दामुळे अनुमानाने प्रतीत होते, पण तो प्रत्यक्ष अर्थ अनुमानाने कळणारा नव्हे. कारण त्या अर्थाशी शब्दाचा साध्य व हेतु असा संबंध असता, तर शब्दाचा अर्थ बरोबर की चुकीचा असे वादविवादच उत्पन्न होणार नाहीत— जसे धूर वगैरे लिंगांवरून (अग्नि वगैरे) साध्यांचे बाबतीत वाद उत्पन्न होत नाहीत, तसेच. [४] आणि वाच्यार्थ हा जसा शब्दाशी संबद्ध असतो, तसाच व्यंग्य अर्थही शब्दाच्या वाच्यार्थाच्या सामर्थ्याने सुचवला जात असल्यामुळे शब्दाशी संबद्ध असतोच. (संबंधाचा) प्रत्यक्षपणा किंवा अप्रत्यक्षपणा यावर काही संबंधाचा 'संबंधपणा' अवलंबून नाही. आणि व्यंजकत्व हे वाच्यवाचक संबंधाच्या आश्रयाने राहते, हे मागेच [५] दाखविले आहे. म्हणून बोलणाऱ्याची (बोलण्याची) इच्छा या स्वरूपाचा जो व्यंग्यार्थ, त्याच्या बाबतीतच शब्द हे लिंग म्हणून कार्य करितात. पण त्या इच्छेचा विषय असणारा जो अर्थ, त्याच्याशी शब्दांचा प्रतिपादकप्रतिपाद्य असा संबंध असतो. तो व्यंग्यार्थ बोलण्याची इच्छा असो किंवा सा इच्छेपेक्षा इतर स्वरूपाचा असो, तो प्रकट करण्यामध्ये शब्दाचा वाचकत्व या संबंधानेच व्यापार असतो की, दुसऱ्या संबंधाने? तो वाचकत्व या संबंधाने तर असणे शक्य नाही, हे पूर्वी [६] सांगितले आहे, आणि दुसऱ्या संबंधाने असेल, तर मात्र तो संबंध म्हणजे व्यंजकत्वच होय आणि ते व्यंजकत्व म्हणजे लिंगत्वच असे नाही. कारण प्रकाश वगैरेंच्या ठिकाणी (लिंगत्वाहून) निराळ्याच प्रकारचे व्यंजकत्व दिसून येते. म्हणून जसा वाच्यार्थ हा शब्दांशी साध्य म्हणून संबद्ध असत नाही, तसाच प्रतिपादन करावयाचा असलेला व्यंग्यार्थही शब्दांशी साध्य या नात्याने संबद्ध असू शकत नाही. जो अर्थ शब्दांशी साध्य म्हणून संबंधित असतो, उदा. मागे सांगितलेली बोलणाऱ्याची (बोलण्याची) इच्छा, तो काही शब्दांचा प्रतिपाद्य अर्थ म्हणून जाणवत नाही, तर वाच्यार्थाची उपाधि (म्हणजे विशेषण) म्हणून प्रत्ययास येतो, आणि प्रतिपाद्य विषय हा जर 'साध्य' असता, तर लोकांचेच त्याच्या बाबतीत जे मतभेद [७] होताना दिसतात, ते मतभेद उत्पन्न होण्याचा प्रसंगच उद्‌भवणार नाही. हे सगळे नुकतेच [८] सांगितले.

वाच्यार्थाच्या बाबतीत तो वस्तुस्थितीला धरून आहे की नाही हे एखादेवेळी दुसऱ्या प्रमाणाने पारखून पाहिले आणि त्यामुळे तो वाच्यार्थ त्यावेळी त्या दुसऱ्या प्रमाणांचा विषय झाला, तरी तो शब्दाच्या व्यापाराचा विषय असण्याला काही बाध येत नाही, तसेच व्यंग्यार्थाचेही आहे. काव्याच्या प्रांतात तर व्यंग्यार्थाचा झालेला बोध खरा आहे की खोटा, हे पारखून पहाणे अगदी निरर्थकच असते म्हणून अशा व्यंग्यार्थाची परीक्षा दुसरी प्रमाणे वापरून करू पाहिल्यास ते लोकांचे हसे ओढवून घेण्यासच कारणीभूत होईल. म्हणून प्रत्येक उदाहरणातली व्यंग्यार्थाची प्रतीति म्हणजे अनुमानातल्या साध्याचीच प्रतीति, असे म्हणणे शक्य नाही.

आणि शब्दांच्या ठिकाणचे जे व्यंजकत्व अनुमेय अशा व्यंग्य अभिप्रायाचा [९] बोध करून देण्यास कारणीभूत होते, ते 'ध्वनि' या संज्ञेस पात्र होत नाही. [१०] तरीही त्या व्यंजकत्वाचे प्रतिपादन आम्ही केले ते एवढ्यासाठीच की, शब्दांचा व्यंजकत्व या स्वरूपाचा जो व्यापार असतो, तो शब्द आणि (वाच्य) अर्थ यांचा संबंध नैसर्गिक असतो असे मानणाऱ्या मीमांसकांनी देखील मान्य केला पाहिजे, हे दाखवण्यासाठीच केले. कारण ते व्यंजकत्व वाचक व अवाचक शब्दांच्या ठिकाणी काही वेळा अनुमानातील लिंगत्वाने तर इतर निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या रूपांनी कार्य करिते. ते कोणत्याही मताच्या लोकांना नाकबूल करिता येणार नाही, हे पटविण्यासाठी आम्ही हा (व्यंजकत्व हा व्यापार अगदी वेगळा आहे हे सिद्ध करण्याचा) खटाटोप आरंभिला. [११]

तेव्हा याप्रमाणे शब्दांच्या गुणवृत्ति, वाचकत्व वगैरे धर्मापेक्षा व्यंजकत्व हे खात्रीने वेगळे आहे. आणि असे असतानाही वाचकत्व किंवा गुणवृत्ति यांचाच व्यंजकत्व हा एक विशेष प्रकार आहे असे कोणी हेकटपणाने म्हणत बसला, तरी त्या व्यंजकत्वाचा खास आविष्कार असणारा जो ध्वनि, त्याचे विवरण ध्वनिविरोधी मतांचे [१२] खंडन करण्यासाठी म्हणा, किंवा सहृदयांना विशेष दृष्टि प्राप्त करून देण्यासाठी म्हणा, जर आम्ही केले, तर ते स्वागतार्हच मानिले पाहिजे. कारण केवळ सामान्यरूप असलेल्या पदार्थांचे लक्षण केले, म्हणजे त्यांच्या लोकोपयोगी अशा विशिष्ट प्रकारांचे लक्षण करणे आवश्यक नाही असे म्हणणे शक्य नाही. कारण असे असले तर केवळ सत्तेचे म्हणजे अस्तित्वाचे लक्षण केले, की कोणत्याही 'असणाऱ्या' वस्तूचे लक्षण करणे म्हणजे पुनरुक्ति करणे असे म्हणण्याचा प्रसंग येईल! तेव्हा अशा रीतीने 'त्याचे यथार्थस्वरूप ज्ञात नसल्यामुळे [१३] जो आतापर्यंत एकसारखा विद्वानांच्या मतभेदाचा विषय होऊन बसला होता, तो हा ध्वनि नावाचा काव्याचा प्रकार आम्ही स्पष्ट करून दाखविला.'

लोचनम्

यदि नाम स्यादिति । प्रौढवादितयाभ्युपगमेऽपि स्वपक्षस्तावन्न सिध्यतीति दर्शयति शब्देति । शब्दस्य व्यापारः सन् विषयः शब्दव्यापारविषयः । अन्ये तु शब्दस्य यो व्यापारस्तस्य विषयो विशेष इत्याहुः । न पुनरिति । प्रदीपालोकादौ लिङ्गिलिङ्गभावशून्योऽपि हि व्यङ्ग्यव्यञ्जकभावोऽस्तीति व्यङ्ग्यव्यञ्जकभावस्य लिङ्गिलिङ्गभावोऽव्यापक इति कथं तादात्म्यम् । विषय इति । शब्द उच्चरिते यावति प्रतिपत्तिस्तावान्विषय इत्युक्तः । तत्र शब्दप्रयुयुक्षा अर्थप्रतिपिपादयिषा चेत्युभय्यपि विवक्षानुमेया तावत् । यस्तु प्रतिपिपादयिषायां कर्मभूतोऽर्थस्तत्र शब्दः करणत्वेन व्यवस्थितः न त्वसावनुमेयः, तद्विषया हि प्रतिपिपादयिषैव केवलमनुमीयते । न च तत्र शब्दस्य करणत्वे यैव लिङ्गस्येतिकर्तव्यता पक्षधर्मत्वग्रहणादिका सास्ति, अपि त्वन्यैव संकेतस्फुरणादिका, तन्न तत्र शब्दो लिङ्गम् । इतिकर्तव्यता च द्विधा— एकयाभिधाव्यापारम् करोति द्वितीयया व्यञ्जनाव्यापारम् । तदाह्— तत्रेत्यादिना । कयाचिदिति गोपनकृतसौन्दर्यादिलाभाभिसन्धानादिकयेत्यर्थः । शब्दार्थ इति । अनुमानं हि निश्चयस्वरूपमेवेति भावः । उपाधित्वेनेति । वक्त्रिच्छा हि वाच्यादेरर्थस्य विशेषणत्वेन भाति । प्रतिपाद्यस्येति । अर्थाद्व्यङ्ग्यस्य । लिङ्गित्व इति । अनुमेयत्व इत्यर्थः । लौकिकैरेवेति । इच्छायां लोको न विप्रतिपद्यतेऽर्थे तु विप्रतिपत्तिमानेव ।

ननु यदा व्यङ्ग्योऽर्थः प्रतिपन्नस्तदासत्यत्वनिश्चयोऽस्यानुमानादेव प्रमाणान्तरात् क्रियत इति पुनरप्यनुमेय एवासौ । मैवम्; वाच्यस्यापि हि सत्यत्वनिश्चयोऽनुमानादेव । यदाहु :—

'आप्तवादाविसंवादादत्र चेदनुमानता' इति ।

न चैतावता वाच्यस्य प्रतीतिरानुमानिकी किं तु तद्गतस्य ततोऽ धिकस्य सत्यत्वस्य । तद्वत्यङ्ग्येऽपि भविष्यति । एतदाह — <u>यथा चेत्यादिना</u> । एतद्याभ्युपगम्योक्तं न त्वनेन नः प्रयोजनमित्याह । <u>काव्यविषये चेति</u> । <u>अप्रयोजकत्वमिति</u> । न हि तेषां वाक्यानामाग्निष्टोमादिवाक्यवत्सत्यार्थप्रतिपादनद्वारेण प्रवर्तकत्वाय प्रामाण्यमन्विष्यते, प्रीतिमात्रपर्यवसायित्वात् । प्रीतेरेव चालौकिकचमत्काररूपाया व्युत्पत्त्यङ्गत्वात् । एतद्योक्तं वितत्य प्राक् । <u>उपहासायैवेति</u> । नायं सहृदयः केवलं शुष्कतर्कोपक्रमकर्कशहृदयः प्रतीतिं परामर्ष्टु नालमित्येष उपहासः ।

नन्वेवं तर्हि मा भूद्यत्र यत्र व्यञ्जकता तत्र तत्रानुमानत्वम्; यत्र यत्रानुमानत्वं तत्र तत्र व्यञ्जकत्वमिति कथमपह्नयत इत्याशङ्क्याह – यत्त्वनुमेयेति । तद्व्यञ्जकत्वं न ध्वनिलक्षणमभिप्रायव्यतिरिक्तविषयाव्यापारादिति भावः । नन्वभिप्रायविषयं यद्वयञ्जकत्वमनुमानैकयोगक्षेमं, तच्चेन्न प्रयोजकं ध्वनिव्यवहारस्य, तर्हि किमर्थ तत्पूर्वमुपक्षिप्तमित्याशङ्क्याह -- अपि त्विति । एतदेव संक्षिप्य निरूपयति – तद्धीति । यत एव हि क्वचिदनुमानेनाभिप्रायादौ, क्वचित्प्रत्यक्षेण दीपालोकादौ, क्वचित्कारणत्वेन गीतध्वन्यादौ, क्वचिदभिधया विवक्षितान्यपरे, क्वचिद्गुणवृत्त्या अविवक्षितवाच्येऽनुगृह्यमाणं व्यञ्जकत्वं दृष्टं तत एव तेभ्यः सर्वेभ्यो विलक्षणमस्य रूपं नस्सिध्यति । तदाह् – तदेवमिति ।

ननु प्रसिद्धस्य किमर्थं रूपसंकोचः क्रियते अभिधाव्यापारगुणवृत्त्यादेः । तस्यैव सामग्र्यन्तरोपनिपाताद्यद्विशिष्टं रूपं तदेव व्यञ्जकत्वमुच्यतामित्याशङ्क्याह– तदन्तःपातित्वेऽपीति । न वयं संज्ञानिवेशनादि निषेधाम इति भावः । विप्रतिपत्तिस्तादृग्विशेषो नास्तीति । व्युत्पत्तिः संशयाज्ञाननिरासः । न हीति । उपयोगिषु विशेषेषु यानि लक्षणानि तेषाम् । उपयोगिपदेनानुपयोगिनां काकदन्तादीनां व्युदासः । एवं हीति । त्रिपदार्थसङ्करी सतेत्यनेनैव द्रव्यगुणकर्मणां लक्षितत्वाच्छुति स्मृत्यायुर्वेदधनुर्वेदप्रभृतीनां सकललोकयात्रोपयोगिनामनारम्भः स्यादिति भावः । विमतिविषयत्वे हेतु :-- अविदितसतत्त्व इति । अत एवाधुनात्र न कस्यचिद्विमतिरेतस्मात्क्षणात्प्रभृतीति प्रतिपादयितुम् -- आसीत् । इत्युक्तम् ॥ ३३ ॥

लोचन

'असे क्षणभर मानिले तरी' – प्रौढवादाचा [१४] अवलंब करूनही तुमचे हे (म्हणजे वक्त्याचा अभिप्राय सुचविणारे शब्दांचे व्यंजकत्व म्हणजे लिंगत्व होय हे) मत मान्य केले, तरी तुमचा (सर्व प्रकारचे व्यंजकत्व हे लिंगत्व होय) हा पक्ष सिद्ध होऊ शकत नाही हे वृत्तिकार 'शब्दव्यापार–विषय [१५] इ. शब्दांनी सांगतात. शब्दाचा व्यापार असून जो ज्ञानाचा विषय [१६] असतो, तो 'शब्दव्यापार–विषय' होय. पण दुसरे विवरणकार 'शब्दाचा जो व्यापार, त्याचा विषय म्हणजे विशेष प्रकार' असे विवरण करितात.

'पण...खरी गोष्ट नाही'–दिव्याचा प्रकाश इ. च्या बाबतीत साध्यसाधन हा संबंध नसूनही व्यंग्य व व्यंजक असा संबंध असतो. [१७] म्हणून साध्य–साधन संबंध हा व्यंग्य–व्यंजक संबंधाला व्यापू शकत नसल्यास ते दोन संबंध एकरूप कसे असू शकतील? '(तो) विषय (दोन प्रकारचा) : शब्द उच्चारला असताना ज्या ज्या आशयाचे ज्ञान होते, त्या सर्व आशयाला 'विषय' म्हटले आहे. [१८] त्या (विषया) पैकी शब्द वापरण्याची इच्छा आणि काहीतरी अर्थाचा बोध करून देण्याची इच्छा या दोन्ही प्रकारची विवक्षा म्हणजे बोलण्यामागील इच्छा, ही तर 'अनुमेय' असते (यात संशय नाही). पण अर्थप्रतिपादन करण्याच्या इच्छेचे 'कर्म' [१९] असलेला जो अर्थ, त्याचे ज्ञान करून देण्याचे कामी शब्द हे 'करण' म्हणजे साधन असले, तरी तो (कर्म असलेला) अर्थ श्रोत्याला अनुमानाने कळतो असे नाही. तो अर्थ प्रकट करण्याची वक्त्याची इच्छा तेवढीच 'अनुमित' करिता येते. आणि ज्या अर्थाचे प्रतिपादन करावे अशी वक्त्याची इच्छा असते, त्या अर्थाचे ज्ञान करून देण्याचे कामी शब्द हे करण (म्हणजे साधन) असते, पण शब्द हे त्या अर्थाचे ज्ञापक, 'लिंग' नसते. याचे कारण हेतु पक्षावर आहे याचे ज्ञान होणे वगैरे [२०] ज्या प्रक्रियेचा अवलंब अनुमितीच्या बाबतीत करावा लागतो, ती प्रक्रिया या कामी उपयोगात येत नाही. तर संकेताची आठवण होणे वगैरे [२१] निराळीच प्रक्रिया या बाबतीत अवलंबावी लागते. आणि ती प्रतिपाद्य अर्थाचे ज्ञान होण्याची प्रक्रिया दोन प्रकारची असते. पहिल्या प्रक्रियेने श्रोत्याला अभिधाव्यापाराच्या द्वारे 'वाच्य' अर्थाचे ज्ञान होते, तर दुसऱ्या

प्रक्रियेने त्याला व्यंजनाव्यापाराच्या द्वारे 'व्यंग्य' अर्थाचे ज्ञान होते. हेच वृत्तिकार 'त्यापैकी तसे शब्द वापरण्याची इ.' शब्दांनी सांगतात. 'कोठल्या तरी विशेष उद्देशाने'-श्रोत्याला कळवावयाचा आशय झाकल्या स्वरूपात प्रकट केल्याने [२२] त्या आशयाला सौंदर्य इ.' प्राप्त व्हावे. [२३] ही इच्छा इ. [२४] उद्देशाने' असा अर्थ. शब्दाचा अर्थ बरोबर की' – कारण अनुमानाचे स्वरूप निष्कर्षाचा निश्चितपणा हे असते, [२५] हा भावार्थ. 'उपाधि (म्हणजे विशेषण) म्हणून'—कारण बोलण्याची इच्छा ही त्याच्या बोलण्याच्या वाच्य इ. अर्थाचे विशेषण म्हणून [२६] प्रत्ययास येते. 'आणि प्रतिपाद्य विषय' – म्हणजे अर्थात् व्यंग्य अर्थ. [२७] 'जर साध्य असता—' 'म्हणजे अनुमानाने ज्ञात होणारा जर असता असा अर्थ. 'लोकांचेच' – बोलणाऱ्याला शब्द वापरण्याची व काहीतरी अर्थ प्रकट करण्याची इच्छा होती की नाही या बाबतीत लोकांचे मतभेद होत नाहीत, तर (त्याने वाच्यार्थाच्या द्वारे सूचित केलेल्या) अर्थाच्या सत्यासत्यतेबद्दलच मतभेद होतात.

(शंका) पण काय हो, व्यंग्यार्थ एकदा समजला म्हणजे मग तो बरोबर आहे हा निर्णय, अनुमान याच दुसऱ्या प्रमाणाने केला जातो. म्हणून निराळ्या दृष्टीने विचार करिता तो व्यंग्यार्थ 'अनुमेय'च म्हणावयास पाहिजे! (उत्तर—) असे म्हणणे बरोबर नाही. कारण वाच्यार्थ हादेखील खरा आहे की नाही हे अनुमानानेच ठरविले जाते. [२८] कारण म्हटलेच आहे की— [२९]

'आप्तांच्या (म्हणजे सत्यवक्त्यांच्या) बोलण्याशी विरोध नसल्यामुळे वाक्यार्थाचे ज्ञान अनुमानाने होते असे कोणी म्हटले तर [३०]—

आणि (केवळ येवढ्यावरून [३१]) वाच्यार्थाचे ज्ञान अनुमानाने होते असे म्हणता येत नाही, तर वाच्यार्थाहून निराळे असणाऱ्या त्याच्या खरेपणाचे ज्ञान अनुमानाने होते. तीच विचारसरणी व्यंग्यार्थाच्या बाबतीतही लागू पडेल [३२] हे वृत्तिकार 'आणि वाच्यार्थाच्या बाबतीत' इ. शब्दांनी सांगतात. आणि हे म्हणजे (वाच्यार्थाच्या) सत्यत्वाचे किंवा असत्यत्वाचे ज्ञान अनुमानाने होते, हे आम्ही तुष्यतु दुर्जनः या न्यायाने म्हटले असले तरी (काव्याच्या प्रांतात) त्याच्याशी आम्हाला काहीही कर्तव्य नाही, असे वृत्तिकार 'आणि काव्याच्या प्रांतात... अगदी निरर्थकच' या शब्दांनी सांगतात. [३३] कारण अग्निष्टोम वगैरे यागांचे विधान करणारी वाक्ये सत्य अर्थ प्रकट करितात किंवा नाही व त्याद्वारे अधिकारी पुरुषास कार्यप्रवृत्त करण्यास पात्र आहेत किंवा नाहीत हे जसे शब्दप्रमाणाच्या [३४] आधारे पारखून पाहिले जाते, तसे काव्यातील वाक्यांच्या बाबतीत कोणी करीत नाही. कारण काव्याचे पर्यवसान केवळ आनंदातच [३५] होत असते आणि लोकोत्तर विस्मय (चमत्कार) हेच ज्याचे स्वरूप आहे असा काव्यानंद हा वाचकाच्या उद्‌बोधनाचे अंग होत असतो. आणि हे सर्व पूर्वी [३६]विस्ताराने विवेचिले आहे. 'हसे ओढवून घेण्यासच' हा मनुष्य सहृदय म्हणजे रसिक नसून केवळ शुष्क तर्क करीत बसण्याच्या सवयीमुळे याचे हृदय संवेदनाशून्य, रूक्ष झालेले असून काव्यानंदाचा आस्वाद घेण्यास ते असमर्थ आहे, अशा प्रकारे त्याचे हसे होते.

पण काय हो, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे जेथे जेथे व्यंजकत्व असते तेथे तेथे (सर्वत्र [३७]) अनुमानत्व नसू द्या, पण जेथे जेथे अनुमानत्व असते तेथे तेथे व्यंजकता [३८] असते हे तुम्ही कसे काय नाकारू शकाल? अशी शंका लक्षात आणून तिचे निरसन वृत्तिकार 'आणि शब्दांच्या ठिकाणचे जे 'व्यंजकत्व अनुमेय' इ. शब्दांनी करितात. ते व्यंजकत्व 'ध्वनि' ही संज्ञा देण्यास कारणीभूत होत नाही, कारण तो व्यंजकत्वव्यापार 'वक्त्याची विवक्षा' या स्वरूपाच्या अर्थाहून वेगळा अर्थ प्रकट करू शकत नाही, हा भावार्थ. पण काय हो, अभिप्राय या अर्थाचे ज्ञान करून देणारे जे व्यंजकत्व अनुमान याच प्रकारचे असते, ते जर 'ध्वनि' ही संज्ञा देण्यास पात्र होत नसेल, तर मग तुम्ही त्याचा प्रथम [३९] निर्देश कशासाठी केला?' ही शंका कल्पून तिचे

समाधान वृत्तिकार 'तरीही' इ. शब्दांनी करितात. याच मुद्द्याची वृत्तिकार 'कारण ते व्यंजकत्व' इ. शब्दांनी थोडक्यात मांडणी करीत आहेत. ज्या अर्थी ते व्यंजकत्व काही बाबतींत म्हणजे वक्त्याचा अभिप्राय वगैरे [४०] बाबतींत अनुमानाचे सहकार्य घेऊन प्रकट होते, दिव्याचा प्रकाश वगैरे काही उदाहरणात ते 'प्रत्यक्ष' प्रमाणाची मदत घेते, गाण्याचे सूर इ. काही ठिकाणी रसनिष्पत्ति करिताना व्यंजकत्व हे कार्यकारणभावाचे साहाय्य घेऊन [४१] प्रकट होते, तर विवक्षितान्यपरवाच्य या ध्वनिप्रकारामध्ये त्या व्यंजकत्वाला अभिधेचे सहकार्य असते व अविवक्षितवाच्य या ध्वनिप्रकारामध्ये त्याला लक्षणेची मदत होते असे आढळून येते, त्या अर्थी ह्या व्यंजकत्वाचे स्वरूप त्या अनुमान वगैरे सर्व सहकारी कारणांच्या स्वरूपाहून वेगळे आहे [४२] हे आमच्या दृष्टीने सिद्ध होते, हे वृत्तिकार 'तेव्हा याप्रमाणे' इ. शब्दांनी सांगतात. [४३]

'पण काय हो, अभिधाव्यापार, गुणवृत्ति, वगैरे [४४] लोकप्रसिद्ध असलेल्या व्यापारांचे क्षेत्र तुम्ही संकुचित काय म्हणून करीत आहात? त्या प्रसिद्ध व्यापारांना जेव्हा वक्त्याच्या वैशिष्ट्याचे ज्ञान असणे, विशिष्ट संदर्भाचे ज्ञान असणे वगैरे विशिष्ट सहकारी कारणांची जोड मिळत असेल, तेव्हा तुम्ही व्यंजकत्व हा त्या प्रसिद्ध व्यापारांचाच एक प्रकार म्हणा!' अशी शंका कल्पून वृत्तिकार तिला 'आणि असे असतानाही' इ. शब्दांनी उत्तर देतात. आमच्या व्यंजकत्वाला कोणी नुसते निराळे नाव दिले [४५] तर त्याला आम्ही विरोध करीत नाही, हा भावार्य. 'विरोधकांचे' म्हणजे व्यंजकत्वासारखे वेगळे तत्त्वच नाही असे म्हणणाऱ्यांचे. 'विशेष दृष्टि' म्हणजे (सहृदयांच्या मनातील) संशय व अज्ञान यांचे निरसन. 'कारण केवळ' – त्यांच्या लोकोपयोगी विशिष्ट प्रकारांची जी वर्णने, त्यांचे. 'उपयोगी' या शब्दाने कावळ्याचे दात [४६] वगैरे (अनुपयोगी) गोष्टींच्या चर्चा बाजूला सारल्या गेल्या. 'कारण असे [४७] असले' – (द्रव्य, गुण व कर्म या) तीन पदार्थांना 'सत्ता' (अस्तित्व) हा धर्म व्यापून राहतो, येवढ्यानेच द्रव्य, गुण व कर्म यांचे लक्षण केले गेले असे होत असल्यामुळे संपूर्ण ऐहिक जीवनाला उपयोगी असणाऱ्या वेद, स्मृति, आयुर्वेद, धनुर्वेद वगैरे शास्त्रांचा विचार करण्याचे कारणच उरणार नाही, [४८] असा आशय. काव्याचा ध्वनिनामक प्रकार मतभेदाचा विषय असण्याचे कारण असे की, 'त्याचे यथार्थ स्वरूप अज्ञात होते.' म्हणूनच आता म्हणजे या क्षणापासून पुढे या ध्वनीबाबत कोणाचाही मतभेद राहणार नाही, हे सांगण्यासाठी वृत्तिकारांनी 'होऊन बसला होता' असे भूतकाळी क्रियापद वापरले. ॥ ३३ ॥

टीपा

१) लिंगत्व हा शब्दव्यापार आहे हे मत पूर्वपक्ष्याने यापूर्वीच द्वितीय खंड "उद्द्योत – ३ 'व्यंजकत्व म्हणजे अनुमानच असे म्हणणाऱ्यांचा युक्तिवाद आणि त्या मताचे खंडन'" वर मान्य केले आहे. त्यावरील पहिली टीप पाहा.

२) हा उद्देश म्हणजे अर्थाच्या सौंदर्याची वाढ करण्याच्या हेतूने तो उघडपणे न सांगता सुचवणे. कै. तात्यासाहेब केळकरांचा एक चुटका उदाहरण म्हणून घेऊ. एक बाई प्रदर्शन दाखविणाऱ्या एका माणसास 'हे हेंगाडे चित्र येथे कशाला ठेविले आहे?' असे रागाने विचारते, तो उत्तर देतो :– 'बाईसाहेब! हे चित्र नाही, हा आरसा आहे.' यात 'आपण कुरूप आहात' असे उघड न म्हणता सुचविल्यामुळेच मौज उत्पन्न झाली आहे.

३) वाच्य अर्थाशी शब्दांचा संबंध नैसर्गिक, अत एव अकृत्रिम असतो, तर व्यंग्य अर्थ हा विशिष्ट परिस्थितीमुळेच प्रकट होणारा (औपाधिक) असल्याने व्यंजकत्व हा संबंध कृत्रिम होय.

४) कारण अनुमानाने ज्ञात होणारे साध्य हे निश्चित स्वरूपाचेच असते.

५) उद्‌द्योत पहिला, कारिका १० वी पाहा. शब्दापासून व्यंग्यार्थ हा वाच्यार्थाच्या द्वारेच प्रकट होतो. म्हणजे वाच्यार्थ हा शब्दाचा साक्षात् संबंधी, तर व्यंग्यार्थ हा संबंधीशी म्हणजे वाच्यार्थाशी संबंधी असतो. (पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर'").

६) पाहा द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर'" वरील ओळी.

७) वक्त्याची इच्छा काहीतरी बोलण्याची होती, याबद्दल लोकांचे मतभेद होत नाहीत, तर त्याच्या म्हणण्याचा आशय बरोबर की चुकीचा याबाबत होतात. काहीजण तो आशय बरोबर म्हणतील, तर काहीजण तोच चुकीचा म्हणतील. म्हणून तो आशय अनुमानाचा विषय होऊ शकत नाही.

८) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत -३ 'व्यंजकत्व म्हणजे अनुमानच असे म्हणणाऱ्यांचा युक्तिवाद आणि त्या मताचे खंडन'" वरील पहिल्या काही ओळी.

९) म्हणजे वक्त्याच्या शब्दद्वारा अर्थ प्रकट करण्याच्या इच्छेचा.

१०) कारण ते व्यंजकत्व केवळ बोलणाऱ्याच्या शब्दप्रयोग करून अर्थ प्रकट करण्याच्या इच्छेचाच बोध करून देते; वस्तु, अलंकार, रस वगैरे प्रकारच्या सुंदर व्यंग्यार्थाचा बोध करून देत नाही. म्हणूनच ते ध्वनि या संज्ञेला पात्र नसते.

११) या शब्दांच्या तुलनेसाठी पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत -१ 'रसभावयुक्त काव्यप्रकारात रसभावांना विरोधी असल्यामुळे टाळावयाच्या गोष्टी कोणकोणत्या, याचे विवरण'" वरील "आणि म्हणूनच इ. परिच्छेद.

१२) हे विरुद्ध मत म्हणजे 'व्यंजकत्व हे वाचकत्व गुणवृत्ति वगैरेंपैकीच होय, ते वाचकत्व इत्यादींहून आगळा आविष्कार या स्वरूपाचे नाही,' असे म्हणणाऱ्यांचे मत.

१३) कारिकाकार व वृत्तिकार हे वेगळे असते, कारिकाग्रंथ वृत्तिग्रंथाच्या पूर्वी अस्तित्वात असता तर ध्वनीचे यथार्थ स्वरूप विद्वानांना अज्ञात होते असे विधान वृत्तिकारांनी केले नसते. ग्रंथाच्या शेवटी हे तत्त्व विद्वानांच्या मनामध्ये 'चिरप्रसुप्तकल्प' होते असेही उद्‌गार आनंदवर्धनांनी काढले नसते. या दोन्ही विधानांवरून कारिका व वृत्ति या दोन्ही ग्रंथांचा कर्ता एकच असावा या मताला पुष्टि मिळते.

१४) (प्रौढवाद) म्हणजे 'अभ्युपगम', म्हणजे **तुष्यतु दुर्जनः** या न्यायाने प्रतिपक्ष्याचे मत क्षणभर मान्य करणे. पण पुढे त्याही मताचे खंडन केले जातेच.

१५) वस्तुतः **शब्दव्यापारविषयत्वम्** याऐवजी **शब्दव्यापारत्वम्** येवढेच म्हणणे इष्ट झाले असते. पण **शब्दव्यापारविषयत्वम्** असा शब्द वृत्तीतच वापरला असल्यामुळे अभिनवगुप्तांनी व इतर विवरणकारांनी आपापल्या परीने त्यातून सुसंगत अर्थ काढण्याचा प्रयत्न केला आहे.

१६) म्हणजे शब्दाचा व्यापार या स्वरूपात त्याचे ज्ञान होऊ शकते.

१७) दिव्याच्या प्रकाशामुळे घटासारख्या वस्तु जेव्हा प्रकाशित होतात तेव्हा त्या वस्तूंचे बघणाऱ्याला 'प्रत्यक्ष' ज्ञान होते. ते 'अनुमानाने' होत नाही. पण तरीही दिवा व घट यांमध्ये प्रकाशक व प्रकाश्य (म्हणजेच व्यंजक व व्यंग्य) असा संबंध असतो.

१८) तुलनार्थ पाहा, "प्रथम खंड, 'उद्द्योत – १ 'अन्विताभिधानवाद'" वरील 'पण अन्विताभिधानवादी' वगैरे वाक्य.

१९) म्हणजे शब्द उच्चारल्याने जो अर्थ श्रोत्याला कळावा अशी वक्त्याची इच्छा असते, तो अर्थ.

२०) 'वगैरे' म्हणजे हेतु सपक्षावरच असणे, विपक्षावर नसणे, व्याप्तिस्मरण इ.

२१) 'वगैरे' म्हणजे वक्ता, श्रोता, प्रकरण इत्यादिकांच्या वैशिष्ट्यांचे ज्ञान.

२२) पाहा. द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'व्यंजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा, म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वरील टीप १३ वी.

२३) इ. म्हणजे विस्मययुक्त आनंद वगैरे.

२४) इ. म्हणजे उदा. आपल्या चातुर्याने श्रोत्याला प्रभावित करण्याची इच्छा.

२५) अनुमान आणि व्यंजना यांमधील भेद सांगणारे हे वाक्य फार महत्त्वाचे आहे. एखाद्या वाक्यातून निरनिराळ्या संदर्भ वगैरेमुळे निरनिराळे व्यंग्य अर्थ निष्पन्न होऊ शकतात. (प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'प्रतीयमानाचा वस्तु प्रकार वाच्यार्थाहून भिन्न, कारण (२) विषयभेद'" वरील 'आपल्या प्रियेच्या अधरोष्ठावर व्रण 'इ० गाथेवरील 'लोचन' पाहा.) पण **पर्वतो धूमवान्** यासारख्या वाक्यावरून मात्र पर्वतो वह्निमान् हो सामान्यपणे निघणारा अर्थ निश्चित स्वरूपाचा असतो.

२६) उदा. वक्त्याने 'गाय आण' असे म्हटल्यावर 'मी गाय आणावी अशी बोलणाऱ्याची इच्छा आहे 'इतका अर्थ श्रोत्याच्या ध्यानात येतो. म्हणजे वक्त्याची इच्छा हे गाय आणणे या वाच्य अर्थाचे विशेषण असते.

२७) 'प्रतिपाद्य' या शब्दाचा वाच्य व व्यंग्य असा अर्थ होणे शक्य असले तरी येथे 'व्यंग्य' हाच अर्थ आनंदवर्धनांना अभिप्रेत आहे, कारण वाच्य अर्थ संकेताने नियंत्रित झालेला असल्यामुळे त्याबद्दल श्रोत्यांचे मतभेद होऊ शकत नाहीत. म्हणून अभिनवगुप्तांनी प्रतिपाद्य = व्यंग्य असे मुद्दाम सांगितले.

२८) 'म्हणून वाच्यार्थ' हा सुद्धा अनुमेय असतो असे म्हणण्याची आपत्ति ओढवेल.

२९) पूर्वमीमांसासूत्र, १–१–५ वरील **'श्लोकवार्त्तिका'** मधील वाक्याधिकरणातल्या २४३ व्या श्लोकाचा पूर्वार्ध.

३०) या श्लोकाचा उत्तरार्ध असा आहे :– **'निर्णयस्तावता सिध्येद् बुद्ध्युत्पत्तिर्न तत्कृता ।'** कुमारिलभट्टांच्या या म्हणण्याचा आशय असा की, सत्यवक्त्यांच्या बोलण्याशी विरोध नसल्यामुळे वक्त्याने म्हटलेले वाक्य खरे आहे की नाही हे अनुमानाने ठरेल, पण वाक्यार्थाचे ज्ञान हे काही अनुमानाने प्राप्त होत नाही. कारण, वाक्यार्थज्ञान आधी होते व मागाहून त्याची सत्यासत्यता पारखली जाते.

३१) म्हणजे सत्यासत्यता आप्तवाक्याच्या आधारे ठरविली जाते, यावरून.

३२) म्हणजे व्यंग्यार्थाचा खरेपणा जरी अनुमानाने कळत असला, तरी व्यंग्यार्थाचे ज्ञान अनुमानाने होत नाही हा निष्कर्ष निघेल.

३३) तुलनार्थ पाहा, व्यक्तिविवेक, पृ. ७८ (हिंदी संस्करण), वरील पुढील वाक्य – **काव्यविषये च वाच्यव्यङ्ग्यप्रतीतीनां सत्यासत्यविचारो निरुपयोग एवेति तत्र प्रमाणान्तरपरीक्षोपहासायैव संपद्यते ।**

३४) शब्दप्रमाण म्हणजे आप्तवाक्य (सत्यवक्त्याचे वाक्य) या स्वरूपात असणारे 'आगम' हे प्रमाण.

३५) म्हणजे काव्याचे कार्य केवळ आनंद देणे हेच असते. 'अमुक कर किंवा तमुक करू नको' असे सांगणे हे नसते. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत -३ 'व्यंजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा, म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वरील 'कारण काव्यातील वाक्यांपासून' इ. वाक्य. तसेच प्रथम खंड, "उद्द्योत -१ 'रसप्रतीतीचे स्वरूप अलौकिक असते'" वरील काही ओळीही पाहा.

३६) काव्यापासून लाभणारा आनंद पर्यवसानी व्युत्पत्ति प्राप्त करून देतो हा विचार पूर्वी द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. या प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" व "उद्द्योत - ३ 'मुख्य रसाला विरोध होणार नाही, ही दक्षता विशेषतः शृंगार रसाच्या बाबतीत विशेष कटाक्षाने बाळगावी'" वर अभिनवगुप्तांनी मांडलाच आहे. व्युत्पत्तीचा नेहमीचा अर्थ 'पुरुषार्थाच्या प्राप्तीसंबंधी उपदेश हा असला तरी प्रथम खंड, "उद्द्योत -३ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वर अभिनवगुप्तांनी 'सहृदयाच्या प्रतिभेचा विकास' अशा आणखी एका प्रकाराने केला आहे.

३७) उदा. दिव्याचा प्रकाश वगैरे ठिकाणी. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत -३ 'व्यंजकत्व म्हणजे अनुमानच असे म्हणणाऱ्यांचा युक्तिवाद आणि त्या मताचे खंडन'"

३८) कारण अनुमान हा देखील तुम्हाला व्यंजकत्वाचा एक प्रकार मानणे भाग आहे असे प्रतिपक्ष्याला म्हणावयाचे आहे.

३९) प्रथम म्हणजे द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'व्यंजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा, म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वर 'आणि पौरुषेय वाक्ये मुख्यतः मानवांच्या' इ. विधान करिताना.

४०) 'वगैरे' म्हणजे धूमाच्या ठिकाणचे अग्नीचे ज्ञान करून देण्याचे सामर्थ्य हेही एक प्रकारचे व्यंजकत्वच होय.

४१) म्हणजे गाण्याचे सूर हे कारण व व्यंजकत्व हे कार्य.

४२) तुलनार्थ पाहा, द्वितीय खंड "उद्‌द्योत – ३ 'व्यंजकत्व हे गुणवृत्ती (लक्षणे) हून निरनिराळ्या कारणांमुळे वेगळे आहे याचे सविस्तर प्रतिपादन'" वरील 'आणि व्यंजकत्व हे वाचकत्व व गुणवृत्ति याहून निराळे' इ. वाक्य.

४३) सारांश, अद्वैत वेदांतातील **सर्व खल्विदं ब्रह्म** या महावाक्याप्रमाणे येथे सर्व **खल्विदं व्यञ्जकत्वम्** अशी परिस्थिति आहे. ब्रह्मसूत्र २–१–३४ वरील शांकरभाष्यातील पुढील वाक्य पाहा :– **ईश्वरस्तु पर्जन्यवद् द्रषटव्यः । यथा हि पर्जन्यो व्रीहियवादिसृष्टौ साधारणकारणं भवति, व्रीहियवादिवैषम्ये तु तत्तद्‌बींजगतान्येवासाधारणानि सामर्थ्यानि कारणानि भवन्ति, एवमीश्वरो देवमनुष्यादिसृष्टौ साधारणं कारणं भवति, देवमनुष्यादिवैषम्ये तु तत्तज्जीवगतान्येव असाधारणानि कर्माणि कारणानि भवन्ति ।**

व्यंजकत्वाच्या बाबतीतही आनंदवर्धनांना व अभिनवगुप्तांना असे म्हणावयाचे आहे की, व्यंजकत्व हे सगळीकडेच असले तरी भिन्न भिन्न सहकारी कारणांमुळे व्यंजकत्वाचे आविष्कारही भिन्न भिन्न होतात. पण त्यांपैकी वस्तु, अलंकार व रसादि या प्रकारच्या व्यंग्यार्थाचा प्राधान्याने होणारा आविष्कार हाच 'ध्वनि' या संज्ञेस पात्र होऊ शकतो. पूर्वी प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'हे पारध्या' यातील शोक हा मुनीचा शोक नव्हे" वरील शेवटचे, 'त्यामुळे ध्वननव्यापार' इ. विधान पाहा.

४४) वगैरे म्हणजे उदाहरणार्थ अनुमान.

४५) आमच्या व्यंजकत्वाला तुम्ही अभिधा, गुणवृत्ति किंवा अनुमान यांपैकी कोणतेही नाव दिलेत, तर त्याला विरोध करीत बसण्याची आमची इच्छा नाही. पण ते व्यंजकत्व आहे व त्यामुळे काव्याला सौंदर्य प्राप्त होते हे तुम्ही मान्य केले पाहिजे. व मग अशा त्या व्यंजकत्वाचे विवेचन करणे ही गोष्टही तुम्ही आवश्यकच मानिली पाहिजे.

४६) **काकदन्त** हा दृष्टान्त मागे द्वितीय खंड, "उद्‌द्योत – १ 'रसभावयुक्त काव्यप्रकारात रसभावांना विरोधी असल्यामुळे टाळावयाच्या गोष्टी कोणकोणत्या, याचे विवरण'" वर आला आहे. त्यावरील टीप १४ पाहा.

४७) 'असे' म्हणजे सामान्यरूप पदार्थाचे निरूपण केले म्हणजे लोकोपयोगी विशिष्ट प्रकारांचे निरूपण करण्याची जरूर नाही असे (असले).

४८) तुलनार्थ पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'ध्वनीचे स्वरूप 'अवर्णनीय' आहे या मताचे खंडन'" वरील वृत्ति व लोचनात. तसेच पुढे काशी आवृत्ति, पृ. ५४२ वरील **वाल्मीकिव्यतिरिक्तस्यान्यस्य कविव्यपदेश एव...**इ. (वृत्तीतील) वाक्य.

ध्वन्यालोकः

प्रकारोऽन्यो गुणीभूतव्यङ्ग्यः काव्यस्य दृश्यते ।
यत्र व्यङ्ग्यान्वये वाच्यचारुत्वं स्यात्प्रकर्षवत् ॥ ३४ ॥

व्यङ्ग्योऽर्थो ललनालावण्यप्रख्यो यः प्रतिपादितस्तस्य प्राधान्ये ध्वनिरित्युक्तम् । तस्य तु गुणीभावेन वाच्यचारुत्वप्रकर्षे गुणीभूतव्यङ्ग्यो नाम काव्यप्रभेदः प्रकल्प्यते । तत्र वस्तुमात्रस्य व्यङ्ग्यस्य तिरस्कृतवाच्येभ्यः प्रतीयमानस्य कदाचिद्वाच्यरूपवाक्यार्थापेक्षया गुणीभावे सति गुणीभूतव्यङ्ग्यता ।

यथा–
लावण्यसिन्धुरपरैव हि केयमत्र
यत्रोत्पलानि शशिना सह सम्प्लवन्ते ।
उन्मज्जति द्विरदकुम्भतटी च यत्र
यत्रापरे कदलिकाण्डमृणालदण्डाः ॥

अतिरस्कृतवाच्येभ्योऽपि श्ब्देभ्यः प्रतीयमानस्य व्यङ्ग्यस्य कदाचिद्‌वाच्यप्राधान्येन काव्यचारुत्वापेक्षया गुणीभावे सति गुणीभूतव्यङ्ग्यता, यथोदाहृतम्– 'अनुरागवती सन्ध्या' इत्येवमादि । तस्यैव स्वयमुक्त्या प्रकाशीकृतत्वेन गुणीभावः, यथोदाहृतम्– 'सङ्केतकालमनसम्' इत्यादि । रसादिरूपव्यङ्ग्यस्य गुणीभावो रसवदलङ्कोरेषु दर्शित, तत्र च तेषामाधिकारिकवाक्यापेक्षया गुणीभावो विवहनप्रवृत्तभृत्यानुयायिराजवत् । व्यङ्ग्यालङ्कारस्य गुणीभावे दीपकादिर्विषयः ।

ध्वन्यालोक

काव्याचा 'गुणीभूतव्यंग्य' नावाचा दुसरा एक प्रकार आढळतो. त्या प्रकारात व्यंग्य अर्थ हा वाच्य अर्थाला अनुसरीत असल्यामुळे वाच्य अर्थाचे सौंदर्य कमालीचे वाढते. ॥ ३४ ॥

अंगनांच्या लावण्याप्रमाणे असणाऱ्या व्यंग्य अर्थाचे आम्ही प्रतिपादन केले. [१] तो अर्थ प्रधान असेल तेव्हा ध्वनि हे (ही) आम्ही सांगितले. [२] पण त्या व्यंग्यार्थाला गौणपणा येऊन जेथे वाच्यार्थाचेच सौंदर्य विशेष उठून दिसते, तो काव्याचा गुणीभूतव्यंग्य नावाचा प्रकार, असे आम्ही मानितो. [३] त्या प्रकारात काही वेळा वस्तु व्यंग्य असून ती 'तिरस्कृत–वाच्य' शब्दांतून व्यक्त होऊन वाच्यार्थरूपी वाक्यार्थाच्या तुलनेने त्या व्यंग्य वस्तूला दुय्यमपणा प्राप्त होतो व म्हणून ते काव्य गुणीभूतव्यंग्य होते. जसे–

"या ठिकाणी ही लावण्याची आगळीच (म्हणजे अलौकिक अशी नदी कोण आहे बरे? त्या नदीत चंद्राशी संलग्न होऊन नीलकमले तरंगत आहेत; हत्तींची गण्डस्थले तीतून वर येताना दिसत आहेत; आणि तीमध्ये अपूर्व केळीचे खांब आणि कमळाचे देठ दिसत आहेत." ज्यांचा वाच्यार्थ 'तिरस्कृत' नसतो (म्हणजे

विवक्षित असतो) अशा शब्दांपासून प्रतीत होणाऱ्या व्यंग्यार्थाला देखील केव्हा केव्हा काव्याला सौंदर्य मुख्यत्वेकरून वाच्यार्थामुळेच प्राप्त होत असल्यामुळे दुय्यमपणा येतो. म्हणून ते काव्य 'गुणीभूतव्यंग्य' ठरते. जसे पूर्वीच (प्रथम खंड "उद्‌द्योग – १ 'आक्षेप म्हणजे ध्वनि नव्हे'" वर) उद्‌धृत केलेले, 'संध्या ही अनुरागाने निर्भर आहे. इ.' उदाहरण. काही वेळा त्या व्यंग्यार्थालाच त्याचा वाचक असलेला एखादा दुसरा शब्द वापरून प्रकट केल्याने गौणत्व येते. जसे पूर्वी (प्रथम खंड "उद्‌द्योत – २ 'व्यंगार्थही वाच्य करून टाकल्याची उदाहरणे'" पाहा.) सांगितलेले 'ज्याने आपल्या हसऱ्या डोळ्यांनी' इ. उदाहरण. [४] रसादि स्वरूपाच्या व्यंग्यार्थाला गौणत्व कसे येते हे रसवदलंकाराचे विवेचन करिताना आम्ही यापूर्वी (उद्योत २, कारिका ५ वी व तीवरचे विवेचन पाहा) दाखवले आहे. आणि त्यांच्या बाबतीत त्या त्या व्यंग्यार्थाचे मुख्य असणाऱ्या वाच्यार्थाच्या दृष्टीने गौणत्व म्हणजे जो आपल्या विवाहासाठी मिरवणुकीने निघाला आहे अशा सेवकाच्या मागून जसे राजाला जावे लागते तसे समजावे. [५] आणि व्यंग्य असलेला अलंकार गौण असण्याचे उदाहरण म्हणजे दीपक वगेरे [६] अलंकारांचे होय.

लोचनम्

एवं यावद्‌ध्वनेरात्मीयं रूपं भेदोपभेदसहितं यच्च व्यञ्जकभेदमुखेन रूपं तत्सर्वं प्रतिपाद्य प्राणभूतं व्यङ्‌ग्यव्यञ्जकभावमेकप्रघट्टकेन शिष्यबुद्धौ विनिवेदयितुं व्यञ्जकवादस्थानं रचितमिति ध्वनिं प्रति यद्वक्तव्यं तदुक्तमेव । अधुना तु गुणीभूतोऽप्ययं व्यङ्ग्यः कविवाचः पवित्रयतीत्यमुना द्वारेण तस्यैवात्मत्वं समर्थयितुमाह्– प्रकार इति । व्यङ्ग्येनान्वयो वाच्यस्योपस्कार इत्यर्थः । प्रतिपादित इति । 'प्रतीयमानं पुनरन्यदेव' इत्यत्र । उक्तमिति । 'यत्रार्थः शब्दो वा' इत्यत्रान्तरे । व्यङ्‌ग्यं च वस्त्वादित्रयं तत्र वस्तुनो व्यङ्ग्यस्य ये भेदा उक्तास्तेषां क्रमेण गुणभावं दर्शयति– तत्रेति । लावण्येति । अभिलाषविस्मयगर्भेयं कस्यचित्तरुणस्योक्तिः ।

अत्र सिन्धुशब्देन परिपूर्णता, उत्पलशब्देन कटाक्षच्छटाः, शशिशब्देन वदनं, द्विरदकुभ्भतटीशब्देन स्तनयुगलं, कदलिकाण्डशब्देनोरुयुगलं, मृणालदण्डशब्देन दोर्युग्ममिति ध्वन्यते । तत्र चैषां स्वार्थस्य सर्वथानुपपत्तेरन्धशब्दोक्तेन न्यायेन तिरस्कृतवाच्यत्वम् । स च प्रतीयमानोऽप्यर्थविशेषः 'अपरैव हि केयम्' इत्युक्तिगर्भीकृते वाच्येंऽशे चारुत्वच्छायां विधत्ते, वाच्यस्यैव स्वात्मोन्मज्जनया निमज्जितव्यङ्‌ग्यजातस्य सुन्दरत्वेनावभासनात् । सुन्दरत्वं चास्यासम्भाव्यमानसमागमसकललोकसारभूतकुवलयादिभाववर्गस्यातिसुभगैकाधिकरणविश्रान्तिलब्धसमुच्चयरूपतया विस्मयविभावताप्राप्तिपुरस्कारेण व्यङ्ग्यार्थोपस्कृतस्य तथा विचित्रस्यैव वाच्यरूपोन्मज्जनेनाभिलाषादिविभावत्वात् । अत एवेयति यद्यपि वाच्यस्य प्राधान्यं, तथापि रसध्वनौ तस्यापि गुणतेति सर्वस्य गुणीभूतव्यङ्ग्यस्य प्रकारे मन्तव्यम् । अत एव ध्वनेरेवात्मत्वमित्युक्तचरं बहुशः ।

अन्ये तु जलक्रीडावतीर्णतरुणीजनलावण्यद्रवसुन्दरीकृतनदीविषयेयमुक्तिरिति सहृदयाः, तत्रापि चोक्तप्रकारेणैव योजना । यदि वा नदीसन्निधौ स्नानावतीर्णयुवतिविषया । सर्वथा तावद्विस्मयमुखेनेयति व्यापाराद्‌गुणता व्यङ्‌ग्यस्य । उदाहृतमिति । एतच्च प्रथमोद्द्योत एव निरूपितम् । अनुरागशब्दस्य चाभिलाषे तदुपरक्तत्वलक्षणया लावण्यशब्दवत्प्रवृत्तिरित्यभिप्रायेणातिरस्कृतवाच्यत्वमुक्तम् । तस्यैवेति । वस्तुमात्रस्य । रसादीति । आदिशब्देन भावादयः रसवच्छब्देन प्रेयस्विप्रभृतयोऽलङ्कारा उपलक्षिताः ।

नन्वत्यर्थं प्रधानभूतस्य रसादेः कथं गुणीभावः गुणीभावे वा कथमचारुत्वं न स्यादित्याशङ्क्य प्रत्युत सुन्दरता भवतीति प्रसिद्धदृष्टान्तमुखेन दर्शयति– तत्र चेति । रसवदाद्यलङ्कारविषये । एवं वस्तुनो रसादेश्च गुणीभावं प्रदर्श्यालङ्कारात्मनोऽपि तृतीयस्य व्यङ्ग्यप्रकारस्य तं दर्शयति व्यङ्ग्यालङ्कारस्येति । उपमादेः ॥ ३४ ॥

लोचन

याप्रमाणे ध्वनिकाव्याचे स्वतःचे स्वरूप, त्याचे प्रकार व उपप्रकार [७] आणि व्यंजकांच्या प्रकारांमुळे ध्वनीला प्राप्त होणारी नानाविध रूपे [८] ही सर्व पूर्णपूणे सांगून झाल्यावर त्या ध्वनीचा प्राणच असणारा जो व्यंग्यव्यंजकसंबंध, तो वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठी एकाच सलग भागाने व्यंजकत्वासंबंधी असणाऱ्या निरनिराळ्या मतभेदांचे [९] विवरण (आणि त्यांचे खंडनही) केले. म्हणून ध्वनीसंबंधी जे सांगणे आवश्यक होते ते सांगून झालेच आहे. पण आता या व्यंग्यार्थाला काही वेळा दुय्यमपणा प्राप्त झाला तरी तो व्यंग्यार्थ कवींच्या वाणीला पावन करितो (म्हणजे तिचे सौंदर्य वाढवितो) [१०] असे (कारिकेत) म्हणून त्या काव्याचा आत्मा व्यंग्यार्थच होय हे पटविण्यासाठी (कारिकाकार) 'काव्याचा गुणीभूतव्यंग्यप्रकार' इ. कारिका सांगतात. 'व्यंग्यार्थाने वाच्यार्थ्याला अनुसरणे' म्हणजे वाच्य अर्थाला भूषविणे, असा अर्थ. 'प्रतिपादन केले' – उद्‌द्योत १ मधील चवथ्या, 'परंतु महाकवींच्या वाणीत प्रतीयमान हा जो काही'... इ. कारिकेमध्ये. 'आम्ही सांगितले'–उद्‌द्योत १ मधील १३ व्या, 'ज्या ठिकाणी वाच्य अर्थ स्वतःकडे'... इ. कारिकेत व तीवरील वृत्तीमध्ये. व्यंग्यार्थ्याचे वस्तु, अलंकार व रसादि हे तीन भेद आहेत. त्यांपैकी 'वस्तु' या स्वरूपाच्या व्यंग्यार्थाचे जे प्रकार [११] सांगितले ते गुणीभूत होतात, हे वृत्तिकार क्रमाने 'त्या प्रकारांत' इ. वाक्यांत दाखवितात. (व त्यांची उदाहरणे देतात.) :–

'या ठिकाणी लावण्याची' ...हे पद्य म्हणजे कोणा एका तरुणाचे उद्‌गार असून त्यांच्या पोटी त्याचा अभिलाष व विस्मय दडलेले आहेत. यात 'सिंधु' (म्हणजे नदी) या शब्दाने (लावण्याचा) परिपूर्णपणा, 'कमळे' शब्दाने कटाक्षांची परंपरा, 'चंद्र' 'शब्दाने मुख, हत्तींची गण्डस्थले' या शब्दांनी स्तनयुगल, 'केळीचे खांब' या शब्दांनी दोन्ही मांड्या आणि 'कमळाचे देठ' या शब्दांमुळे बाहुयुगल असे अर्थ सूचित होतात. पण प्रस्तुत (वर्ण्य) विषयाच्या संबंधात या (म्हणजे नदी वगैरे) शब्दांचे वाच्यार्थ मुळीच लागू पडत नसल्यामुळे 'आंधळा' या शब्दाच्या बाबतीत (प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार- (२) 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' हा प्रकार" पाहा) सांगितलेल्या रीतीने ते शब्द 'तिरस्कृतवाच्य' ठरतात. (म्हणजे त्यांचे वाच्यार्थ संपूर्णपणे टाकून द्यावे लागत आहेत). आणि वर सांगितलेले त्यांचे अर्थ 'सूचित' होत असले तरी ते' आगळीच अशी ही (नदी) कोण?'...इ. उक्तीमध्ये सामावलेल्या ('असामान्य' या) वाच्य अर्थाचीच शोभा वाढवितात, कारण या श्लोकात वाच्यार्थच स्वतःकडे प्राधान्य घेत असल्याने निरनिराळे व्यंग्यार्थ खाली दडपले जातात. व त्यामुळे त्या वाच्यार्थाचेच सौंदर्य प्रामुख्याने प्रत्ययास येते. आणि वाच्यार्थच सुंदर वाटण्याचे कारण असे :– जे एकत्र येणे असंभवनीय आहे, असे अखिल जगतातील सुंदर सुंदर असणारे नीलकमले वगैरे पदार्थ अत्यंत सुंदर अशा (नायिकारूपी) एका ठिकाणी समुदायाने वास्तव्य करीत आहेत असे (कवीने म्हटले) असल्यामुळे तो वाच्यार्थ 'विस्मय' या व्यभिचारिभावाचा विभाव होतो व तो (वाच्यार्थ) कटाक्ष, मुख, इ. व्यंग्यार्थांनी भूषित झाल्याने त्याला आगळेच सौंदर्य प्राप्त प्राप्त होते आणि तो वाच्य स्वरूपानेच प्राधान्य मिळवून (त्या तरुणाच्या) अभिलाषरतीचा विभाव बनतो. म्हणूनच येथपर्यंत जरी वाच्यार्थाला प्राधान्य मिळाले, तरी यानंतर शृंगाररसाची प्रामुख्याने अभिव्यक्ति होताना त्या वाच्यार्थालाही दुय्यमपणा प्राप्त होतो. [१२] असेच सर्व गुणीभूतव्यंग्य काव्यप्रकाराच्या उदाहरणांच्या बाबतीत समजावे.

म्हणूनच '(सरतेशेवटी प्रतीत होणारा रसध्वनि हाच काव्याचा आत्मा होय' असे आतापर्यंत पुष्कळ वेळा [१३] म्हटले गेले आहे.

पण दुसरे (कोणी) सहृदय [१४] विवरणकार ह्या श्लोकात जलक्रीडेसाठी पाण्यात उतरलेल्या अनेक तरुणींच्या इतस्ततः फाकलेल्या अंगकांतीमुळे रमणीय दिसणाऱ्या एका नदीचे वर्णन आहे असे म्हणतात. त्यांचे मत मानिले, तरी या श्लोकातील ('कमळे' इ. इतर शब्दांचे [१५]) सूचितार्थ वर सांगितल्याप्रमाणेच समजावेत. किंवा नदीजवळच स्नानासाठी उतरलेल्या एका तरुणीचे वर्णन करणारा हा श्लोक आहे असे समजावे. या तिन्हींपैकी कोणतेही मत घेतले, तरी विस्मय हा व्यभिचारिभाव सूचित करणाऱ्या वाच्यार्थाचेच समर्थन करण्यासाठी [१६] निरनिराळ्या शब्दांचे व्यंग्यार्थ उपयोगी पडत असल्याने ते व्यंग्यार्थ गुणीभूत झालेले आहेत. '(जसे पूर्वीच) उद्धृत केलेले–' या उदाहरणाचे विवरण पहिल्या उद्द्योतातच [१७] केले आहे. 'अनुराग' या शब्दामध्ये 'त्याने उपरंजित होणे' या सादृश्यावर आधारलेली लक्षणा असली, तरी त्याचा 'अभिलाष' हा वाच्यार्थच आहे, कारण तो शब्द येथे 'लावण्य' या शब्दासारखाच वापरला आहे. [१८] या अभिप्रायाने 'ज्यांचा वाच्यार्थ तिरस्कृत झालेला नसतो)' असे (वृत्तीमध्ये [१९] म्हटले आहे). 'त्या व्यंग्यार्थालाच' म्हणजे वस्तुरूप व्यंग्यार्थालाच. 'रसादि स्वरूपाच्या' यातील 'आदि' शब्दाने भाव, रसाभास, भावाभास वगैरेंचा [२०] व 'रसवत्' शब्दाने प्रेयस्वी, ऊर्जस्वी वगैरे अलंकारांचा [२१] निर्देश केला आहे,

'पण काय हो, रसादि हे संपूर्ण वाक्यामध्ये अतिशय महत्त्वाचे असल्यामुळे त्यांना (वाच्यार्थापेक्षा) गौणता कशी येते? आणि गौणता आल्यास त्यामुळे त्या रसादींचे सोंदर्य कसे नष्ट होणार नाही?' अशी शंका कल्पून वृत्तिकार त्या रसादि व्यंग्यार्थाच्या सौंदर्याचा नाश तर होत नाहीच, पण उलट त्याला (अधिक) सौंदर्य प्राप्त होते, हे प्रसिद्ध दृष्टांताच्या द्वारे दाखवितात. 'आणि त्यांच्या' म्हणजे रसवदादि अलंकारांच्या (बाबतीत). याप्रमाणे वस्तु आणि रसादि स्वरूपाच्या व्यंग्यार्थाला दुय्यमणा कसा प्राप्त होतो ते दाखविल्यानंतर तिसच्या प्रकारचा, म्हणजे 'अलंकार' या स्वरूपाचा व्यंग्यार्थही गुणीभूत कसा होतो, ते वृत्तिकार 'व्यंग्य असलेला अलंकार' इ. वाक्याने दाखवितात. 'व्यंग्य अलंकार' म्हणजे उपमा वगैरे. [२२] ॥ ३४ ॥

टीपा

१) उद्द्योत १, कारिका चवथी पाहा.

२) उद्द्योत १, कारिका १३ वी पाहा.

३) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत -१ 'आक्षेप म्हणजे 'ध्वनि' नव्हे'", 'वाच्यार्थ व व्यंग्यार्थ' इ. वाक्य.

४) या उदाहरणात पहिल्या तीन चरणांमुळे व विशेषतः 'आकूत' या शब्दाने, व्यंग्यार्थ बराचसा उघड केला गेला आहे.

५) हाच दृष्टांत पुढे मम्मटाते वापरला आहे. पाहा, काव्यप्रकाश, झळकीकरांची आवृत्ति, पृ. १२७. जगन्नाथाने मात्र रसगंगाधर पृ. २१ वर दास्यमनुभवद् **राजकलत्रमिव** हा दृष्टांत वापरला आहे.

६) दीपकात उपमा व्यंग्य असून दीपकाच्या वाच्य आकृतिबंधापेक्षा गौण असते. पाहा, "प्रथम खंड, 'उद्द्योत – २ अंलकारध्वनीत व्यंग्य अलंकारच मुख्य हवा'".

७) ध्वनीचे स्वतःचे स्वरूप उद्द्योत १ मध्ये व त्याच्या मुख्य प्रकारांचे व उपप्रकारांचे विवेचन उद्द्योत २ मध्ये केले.

८) व्यंजकांच्या द्वारे होणाऱ्या ध्वनीच्या निरनिराळ्या प्रकारांचे निरूपण उद्द्योत ३ च्या १ ते १६ या कारिकांमध्ये व त्यांवरील वृत्तीमध्ये आले आहे.

९) या सर्व मतभेदांचा विचार, द्वितीय खंड, "उद्द्योत -३ 'जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर ते 'व्यंजकत्व म्हणजे अनुमानच असे म्हणणाऱ्यांचा युक्तिवाद आणि त्या मताचे खंडन' वरील वृत्तीमध्ये केला गेला.

१०) तुलनार्थ पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'अलंकार सूचित केल्यास काव्याचे सौंदर्य वाढते'" वरील 'पण काव्यातील व्यंग्यता' इ. वाक्ये. तसेच पुढे (काशी आवृत्ति) पृ. ४६४ वरील **अमुना व्यंग्यार्थेन काव्यं पवित्रीकृतम्** हे वाक्यही पाहा.

११) येथे मुळात **भेदाः** असे बहुवचनी रूप योजिले आहे, त्याऐवजी भेदौ असे द्विवचनी रूप वापरणे अधिक योग्य झाले असते, कारण येथील एक उदाहरण तिरस्कृतवाच्याचे म्हणजे अविवक्षितवाच्याचे असून बाकीची अतिरस्कृतवाच्याची म्हणजे अविवक्षितवाच्य या प्रकाराची आहेत.

१२) पाहा, हाच उद्द्योत, कारिका ४० वी. तसेच प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'ध्वनीला व्यंगार्थ अस्पष्ट किंवा वाच्याचे अंग असणे नको'" वरील 'पण वाच्यार्थ संपूर्णपणे समजल्यावर' इ. वाक्यही पाहा.

१३) प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'प्रतीयमान अर्थाच्या प्रकारांत 'रसादि' प्रकार मुख्य होय' व "उद्द्योत – १ 'श्रुतिदुष्टादि अनित्य दोष शृंगार व तत्सम रस-ध्वनीमध्येच वर्ज्य'" वर.

१४) येथे या टीकाकाराला अभिनवगुप्तांनी 'सहृदय' हे विशेषण लावले आहे, तर मागे प्रथम खंड "उद्द्योत – १ 'पर्यायोक्त आणि ध्वनि'" वर एका टीकाकाराला 'रसिक' असे म्हटले आहे.

१५) वर सांगितलेल्या व्यंग्य अर्थांपैकी या ठिकाणी फक्त 'सिंधु' (म्हणजे कोणतीही एक नदी) या शब्दालाच व्यंग्यार्थ नाही, कारण या टीकाकाराने या श्लोकातील वर्णन प्रत्यक्ष नदीचेच आहे असे मानिले आहे. इतर म्हणजे 'कमळे' वगैरे शब्दांतून मात्र ते ते व्यंग्यार्थ निघतातच.

१६) लोचनात **विस्मयमुखेन इयति व्यापारात्** असे शब्द आहेत. म्हणजे प्रथम वाच्यार्थ समजल्यावर 'या इतक्या सगळ्या सुंदर गोष्टी एकत्र कशा?' असा वाचकाला विस्मय उत्पन्न होतो व मग त्या त्या शब्दाचा व्यंग्यार्थ ध्यानात आल्यावर तो विस्मय दूर होतो. तेव्हा **इयति** म्हणजे वाच्यार्थाच्या बाबतीत आणि **व्यापारात्** म्हणजे (वाच्यार्थाचे) समर्थन करणाऱ्या क्रियेमुळे, असा अर्थ करावयाचा. या व्यंग्यार्थांनी समर्थित झालेला

वाच्यार्थ हा वक्त्याच्या मनातील 'अभिलाष रति' या स्थायिभावाचा उद्दीपनविभाव होतो व सरतेशेवटी वाचकांना अभिलाषशृंगार या रसाचा आस्वाद मिळतो.

१७) म्हणजे प्रथम खंड, आक्षेप म्हणजे 'ध्वनि' नव्हे वर.

१८) तांत्रिक दृष्ट्या 'अनुराग' या शब्दामध्ये सादृश्यमूलक लक्षणा आहे असे म्हणता येईल. कारण 'अनुराग' या शब्दाचा वाच्यार्थ 'रक्तिमा' असा आहे. रक्तिमा जसा पदार्थांना रंगवितो, तसेच प्रेम हेही मनुष्याच्या मनाला रंजित करिते. म्हणून (तांत्रिक दृष्ट्या) 'अनुराग' शब्दाचा प्रेम' हा लक्ष्यार्थ म्हणता येईल. पण व्यवहारात 'अनुराग' हा शब्द 'प्रेम' या अर्थानेच वापरला जात असल्याने रूढीच्या बळावर 'प्रेम' हा त्याचा वाच्यार्थच होय व येथे लक्षणा मानण्याची गरज नाही. जसे 'लावण्य' इ. शब्दांच्या बाबतीत. पाहा, प्रथम खंड, उद्योग १, कारिका १६, तीवरील विवरण व उद्द्योत -१ कोणत्या शब्दांना 'ध्वनिकाव्य' म्हणावे? वरील टीप १.

प्रस्तुत श्लोकामध्ये संध्या–दिवस–वर्णन हे प्रस्तुत असून त्याच्या बाबतीत 'अनुराग' याचा वाच्य अर्थ 'रक्तिमा' असाच आहे. अर्थात 'अनुराग' या शब्दाचा प्रेम हा दुसरा अर्थ प्रसिद्ध, अतएव वाच्यच आहे. या श्लोकामध्ये संदर्भामुळे 'अनुराग' शब्दाच्या वरील दोन वाच्यार्थांपैकी 'रक्तिमा' हाच अर्थ वाच्यार्थ म्हणून नियंत्रित होतो व मागाहून प्रतीत होणाऱ्या 'प्रेम' या अर्थाला व्यंग्यत्व येते. हा व्यंग्यार्थ वाच्यार्थाची शोभा वाढविण्याचे काम करीत असल्यामुळे त्याला दुय्यमपणा प्राप्त झाला आहे. म्हणून हे उदाहरण लक्षणेचे नसून अतिरस्कृत गुणीभूतव्यंग्याचे आहे.

१९) द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'काव्याचा गुणीभूतव्यंग हा दुसरा प्रकार; त्याचे उदाहरणांसह विवेचन'" वर.

२०) पाहा, प्रथम खंड, उद्द्योत -१ पारध्याने क्रौञ्चपक्ष्यांच्या जोडप्यांपैकी नर मारला की मादी? (टीप ४), 'विवक्षितान्यपरवाच्य' ध्वनीचे दोन प्रकार- वरील टीपा १ ते ४.

२१) पाहा, प्रथम खंड "उद्द्योत – १ 'वस्तुतः रसध्वनि हाच आत्मा व अलंकार्य'" व त्यावरील टीप १४.

२२) उदाहरणार्थ, 'दीपक' अलंकारात उपमा ही व्यंग्य असते. पाहा, प्रथम खंड "उद्द्योत – २ 'अलंकारध्वनीत व्यंग्य अलंकारच मुख्य हवा'" वरील टीप २ व टीप ४.

ध्वन्यालोकः

तथा–

प्रसन्नगम्भीरपदाः काव्यबन्धाः सुखावहाः ।
ये च तेषु प्रकारोऽयमेव योज्यः सुमेधसा ॥ ३५ ॥

ये चैतेऽपरिमितस्वरूपा अपि प्रकाशमानास्तथाविधार्थरमणीयाः सन्तो विवेकिनां सुखावहाः काव्यबन्धास्तेषु सर्वेष्वेवायं प्रकारो गुणीभूतव्यङ्ग्यो नाम योजनीयः : यथा—

लच्छी दुहिआ जामाउओ हरी तस्स धरिणिआ [**तस्य धरिणिआ** याऐवजी **तह घरल्लिया** (क. ल. वि. पृ. १८१), **तह घरिल्लिआ** (अलंकाररत्नाकर, पृ. १०८) तहय पणइणी (गाहारयण कोस, पृ. ५) असे पाठभेद आढळतात.] **गंगा ।**
अमिआमिअंका अ सुआ अहो कुडुंबं महोअहिणो ॥
[लक्ष्मीर्दुहिता जामाता हरिस्तस्य गृहिणी गङ्गा ।
अमृतमृगाङ्कौ च सुतावहो कुटुम्बं महोदधेः ॥

ध्वन्यालोक

तसेच—

प्रसन्न (म्हणजे प्रसादगुणाने युक्त) व अर्थघन अशीं पदे ज्यांमध्ये आहेत अशा सर्व आनन्ददायक काव्यरचनांचेमध्ये हा गुणीभूतव्यंग्यनामक प्रकार असतो, हे जाणत्या सहृदयाने समजून घ्यावे ॥ ३५ ॥

आणि जे हे काव्यरचनांचे प्रकार अनन्त असलेले आढळतात व जे तशा प्रकारच्या (म्हणजे गुणींभूत) व्यंग्यार्थामुळे सुंदर झालेले असतात व म्हणून विचारवंताना आनन्द देतात, त्या सर्व काव्यरचनांच्या प्रकारांमध्ये हा गुणोभूतव्यंग्य नावाचा प्रकार असतो, तो सहृदयांनी समजून घ्यावा. जसे—

“लक्ष्मी ही मुलगी, विष्णु हा जावई, तसेच गंगा हीं गृहिणी, अमृत आणि चन्द्र हीं अपत्ये— किती अद्‌भुत हे महासागराचे कुटुम्ब. ।”

लोचनम्

एवं प्रकारत्रयस्यापि गुणभावं प्रदर्श्य बहुतरलक्ष्यव्यापकतास्येति दर्शयितुमाह— तथेति । प्रसन्नानि प्रसादगुणयोगाद्‌गभीराणि च व्यङ्ग्यार्थाक्षेपकत्वात्पदानि येषु । सुखावहा इति चारुत्वहेतुः । तत्रायमेव प्रकार इति भावः । सुभेधसेति । यस्त्वेतं प्रकारं तत्र योजयितुं न शक्तः स परमलीकसहृदयभावनामुकुलितलोचनोक्त्योपहसनीयः स्यादिति भावः ।

लक्ष्मीः सकलजनाभिलाषभूमिर्दुहिता । जामाता हरिः यः समस्तभोगापवर्गदानसततोद्यमी । तथा गृहिणी गङ्गा यस्याः समभिलषणीये सर्वस्मिन्वस्तुन्यनुपहत उपायभावः । अमृतमृगाङ्कौ च सुतौ । अमृतमिह वारुणी । तेन गङ्गास्नानहरिचरणाराधनाद्युपायशतलब्धाया लक्ष्म्याश्चन्द्रोदयपानगोष्ठ्युपभोगलक्षणं मुख्यं फलमिति त्रैलोक्यसारभूतता प्रतीयमाना सती अहो कुटुम्बं महोदधेरित्यहोशब्दाद्य गुणीभावमनुभवति ॥ ३५ ॥

लोचन

याप्रमाणे तिन्ही प्रकारच्या व्यंग्यार्थाला गौणत्व (कसे) प्राप्त होते हे दाखविल्यानंतर हा गुणीभूतव्यंग्य प्रकार काव्यांमधून विपुल प्रमाणात असलेला आढळतो हे दर्शविण्यासाठी वृत्तिकार 'म्हणून' या शब्दाने पुढील ३५ व्या कारिकेची प्रस्तावना करितात. प्रसादगुणाने युक्त असल्यामुळे 'प्रसन्न' आणि व्यंग्यार्थाने परिपूर्ण असल्याने 'अर्थघन' आहेत पदे ज्यांमध्ये (अशा काव्यरचना). 'आनंददायक' हा शब्द त्या काव्यरचना सुंदर असण्याचे कारण सुचवीत आहे. अशा (म्हणजे आनंददायक) काव्यरचनांमध्ये हाच प्रकार (म्हणजे व्यंग्यार्थाचा गुणीभाव) आढळून येतो, असा भावार्थ. 'जाणत्या'—पण ज्याला तशा काव्यांमध्ये व्यंग्यार्थाच्या गुणीभावामुळे सौंदर्य निर्माण होते हे जाणता येत नाही, त्याचे उलट हसेच होईल, कारण 'हा आपण सहृदय आहोत अशी खोटीच कल्पना करून घेऊन डोळे मिटून घेणारा आहे [१]' अशी जाणकार त्याची सम्भावना करितील, हा आशय.

सर्व लोकांना हवीशी वाटणारी लक्ष्मी ही (ज्याची) मुलगी, (आपल्या भक्तांना) सर्व सांसारिक सुखे आणि मोक्ष प्राप्त करून देण्यात सतत गढलेला विष्णु (ज्याचा) जावई, तसेच सर्व हव्या असणाऱ्या गोष्टी मिळवून देण्याच्या अकुंठित सामर्थ्याने संपन्न असणारी गंगा ही ज्याची गृहिणी, आणि अमृत आणि चंद्र ही ज्याची अपत्ये आहेत, असा (हा महासागर). 'अमृत' याचा अर्थ येथे 'मदिरा' हा आहे. [२] त्यामुळे गंगेत स्नान करणे, विष्णूच्या पदकमलांची आराधना करणे वगैरे शेकडो उपाय केल्यावर प्राप्त होणाऱ्या लक्ष्मीचे मुख्य फळ चंद्रोदयानंतर अनेकांनी एकत्र जमून मदिरापान इ. विषयोपभोगांचे सेवन करणे हे असल्याने 'हा महासागर त्रैलोक्यामध्ये श्रेष्ठ आहे' असा (वस्तुरूपी) अर्थ सूचित होतो. आणि तो व्यंग्यार्थ 'किती अद्‌भुत' हे महासागराचे कुटुंब!' यातील 'किती अद्‌भुत' या शब्दाने (काहीसा वाच्य झाल्यामुळे त्याचे ध्वनित्व नाहीसे होऊन) त्याला या गाथेत गौणत्व प्राप्त झाले आहे. ॥ ३५ ॥

टीपा

१) तुलनार्थ पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत -१ 'अभाववाद्यांचा तिसरा वर्ग'" सारांश, उत्कृष्ट काव्यांमध्ये असणारा ध्वनि काय, किंवा गुणीभूतव्यंग्य अर्थ काय, ज्याला ओळखता येत नाही तो मनुष्य त्या काव्यातील अनुप्रासादि बाह्य वैशिष्ट्यामुळेच 'वाहवा! वाहवा!' असे उद्‌गार काढणारा असतो.

२) मूळ गाथेतील **अमिअ** (अमृत) या शब्दाचा अर्थ 'मदिरा' असाच का करावयाचा याचे कारण अभिनवगुप्तांनी सांगितलेले नाही. स्वर्गातील अमृत हे सामान्य जनांना अप्राप्य असते, पण चंद्रप्रकाश हा मात्र सर्वांना मिळणारा असतो, म्हणून 'अमृत' याचा अर्थ सर्वांना मिळू शकणारी मदिरा असा अभिनवगुप्तांनी केला आहे असे 'बालप्रिया' या टीकेच्या कर्त्याने म्हटले आहे. पण अमृत हे मानवांना दुर्लभ असल्यामुळेच त्याचे महत्व सिद्ध होते. म्हणून मदिरा असा अर्थ करण्याची गरज नाही. कारण, असे दुर्लभ अमृत हेच ज्याचे अपत्य आहे असा सागराचा मोठेपणा आणखीच उठून दिसतो. कदाचित् 'मदिरा' असा अर्थ करण्याचे कारण पुढीलप्रमाणे असावे :— **सुतौ** याचा (पाणिनीच्या **पुमान् स्त्रिया** १—२—६७ या सूत्राप्रमाणे) विग्रह **सुतःच सुता च** (मुलगा व मुलगी) असा होतो. 'अमृत' हा शब्द नपुंसकलिंगी असल्याने त्याला 'मुलगी' समजता येत नाही, म्हणून 'मदिरा' असा स्त्रीलिंगी शब्द योजून अभिनवगुप्तांनी विवरण केले असावे.

ध्वन्यालोकः

वाच्यालङ्कारवर्गोऽयं व्यङ्ग्यांशानुगमे सति ।
प्रायेणैव परां छायां बिभ्रल्लक्ष्ये निरीक्ष्यते ॥ ३६ ॥

वाच्यालङ्कारवर्गोऽयं व्यङ्ग्यांशस्यालंकारस्य वस्तुमात्रस्य वा । यथायोगमनुगमे सति च्छायातिशयं विभ्रल्लक्षणकारैरेकदेशेन दर्शितः । स तु तथारूपः प्रायेण सर्व एव परीक्ष्यमाणो लक्ष्ये निरीक्ष्यते । तथा हि — दीपकसमासोक्त्यादिवदन्येऽप्यलङ्काराः प्रायेण व्यङ्ग्यालङ्कारान्तरवस्त्वन्तरसंस्पर्शिनो दृश्यन्ते । यतः प्रथमं तावदतिशयोक्तिगर्भता सर्वालङ्कारेषु शक्यक्रिया । कृतैव च सा महाकविभिः कामपि काव्यच्छविं पुष्यति । कथं हयतिशययोगिता स्वविषयौचित्येन क्रियमाणा सती काव्ये नोत्कर्षमावहेत् ।

भामहेनाप्यतिशयोक्तिलक्ष्णे यदुक्तम—
सैषा सर्वैव वक्रोक्तिरनयार्थो विभाव्यते ।
यत्नोऽस्यां कविना कार्यः कोऽलङ्कारोऽनया विना ॥
इति ।

तत्रातिशयोक्तिर्यमलङ्कारमधितिष्ठति कविप्रतिभावशात्तस्य चारुत्वातिशययोगोऽन्यस्य त्वलङ्कारमात्रतैवेति सर्वालङ्कारशरीरस्वीकरणयोग्यत्वेनाभेदोपचारात्सैव सर्वालङ्काररूपेत्ययमेवार्थोऽवगन्तव्यः । तस्याश्चालङ्कारान्तरसङ्कीर्णत्वं कदाचिद्वाच्यत्वेन कदाचिद्व्यङ्ग्यत्वेन । व्यङ्ग्यत्वमपि कदाचित्प्राधान्येन कदाचिद्गुणभावेन । तत्राद्ये पक्षे वाच्यालङ्कारमार्गः । द्वितीये तु ध्वनावन्तर्भावः । तृतीये तु गुणीभूतव्यङ्ग्यरूपता ।

ध्वन्यालोक

सर्वच वाच्य अलंकारांमध्ये जर व्यंग्यार्थाचा अंश (म्हणजे गुणीभाव) असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होत असल्याचे बहुतेक उदाहरणांत आढळून येते. ॥ ३६ ॥

वाच्य अलंकारांना जर गुणीभूत व्यंग्यार्थाची — मग तो व्यंग्यार्थ परिस्थितीप्रमाणे अलंकार स्वरूपाचा असो, किंवा केवळ वस्तु या स्वरूपाचा असो जोड मिळाली, तर त्या वाच्यालंकारांना कमालीचे सौंदर्य प्राप्त होते हे आतापर्यंतच्या शास्त्रकारांनी एकदेशाच्या (म्हणजे रूपकाच्या 'एकदेशविवर्ति' या [१] प्रकाराच्या) द्वारे दाखविले. पण त्या सर्व अलंकारांच्या बाबतीत अशीच परिस्थिती असते. म्हणजे व्यंग्यार्थामुळे ते विशेष सुंदर दिसतात, असे काव्यग्रंथ बारकाईने पाहिले असताना त्यांत सामान्यपणे आढळून येते. उदा. दीपक, समासोक्ति वगैरेप्रमाणे इतर अलंकारातही दुसऱ्या व्यंग्य अलंकारांचा किंवा व्यंग्य वस्तूंचा स्पर्श असल्याचे दिसून येते. कारण पहिल्याने एक तर असे की व्यंग्य अतिशयोक्तीचा अंतर्भाव करणे हे कवींना कोणत्याही अलंकाराच्या बाबतीत करिता येते. आणि महाकवींनी त्या व्यंग्य अतिशयोक्तीने युक्त अशी रचना केल्याने त्यांच्या त्या रचनेला काही वेगळेच काव्यसौंदर्य प्राप्त होते. कारण आपापल्या वर्ण्यविषयाबाबतचे औचित्य पाळून (संभवनीय भासेल असा) अतिशयाचा अंश काव्यात आणल्यास त्यामुळे काव्याला सुन्दरता का म्हणून येणार नाही? भामहाने देखील अतिशयोक्तीचे विवरण करिताना—

"सर्व प्रकारची [२] वक्रोक्ति (म्हणजे सर्व प्रकारचे अलंकार हे आम्ही आतापर्यंत जिचे विवेचन केले) ती ही 'अतिशयोक्ति'च होय. हिच्यामुळे काव्यविषयाला नवीन (च) सौंदर्य प्राप्त होते. ती आपल्या वाङ्मयात आणण्यासाठी कवीने प्रयत्न करावा. कोणता अलंकार हिच्यावाचून असणे शक्य आहे?"

असे जे म्हटले, त्याचा अर्थ हाच समजावा की, ज्या अलंकारात कवीच्या प्रतिभेच्या सामर्थ्यामुळे अतिशयोक्तीचे अधिष्ठान असते, तोच अलंकार विशेष सुंदर वाटतो. तीविरहित असलेला अलंकार हा केवळ एक मामुली अलंकारच म्हणावयाचा. तेव्हा कोणताही अलंकारच शरीर म्हणून धारण करण्याचे सामर्थ्य हिच्यामध्यें असते म्हणून अभेद लक्षणेने ही अतिशयोक्ति म्हणजेच कोणताही अलंकार होय. आणि ही जी कोणत्याही अलंकारांशी एकजीव होते, ती काही वेळा वाच्य रूपाने तर काही वेळा व्यंग्य रूपाने. ती जेव्हा व्यंग्य रूपाने असते, तेव्हादेखील काही वेळा ती प्रधान असते., तर काही वेळा गौण किंवा दुय्यम असते. त्यांपैकी पहिल्या पक्षी (म्हणजे अतिशयोक्ति वाच्य असताना) ती एक वाच्यालंकार होईल. दुसऱ्या पक्षी (म्हणजे ती व्यंग्य असून मुख्य असताना) ती ध्वनीचे उदाहरण होईल आणि तिसऱ्या पक्षी (म्हणजे ती व्यंग्य असून गौण असली, तर) तिची गुणीभूतव्यंग्य या काव्याच्या प्रकारात गणना होईल. [३]

लोचनम्

एवं निरलङ्कारेषूत्तानतायां तुच्छतयैव भासमानममुनान्तःसारेण काव्यं पवित्रीकृतमित्युक्त्वालङ्कारस्याप्यनेनैव रम्यतरत्वमिति दर्शयतिवाच्येति । अंशत्वं गुणमात्रत्वम् । एकदेशेनेति । एकदेशविवर्ति रूपकमनेन दर्शितम् । तदयमर्थ :— एकदेशविवर्तिरूपके—

राजहंसैरवीज्यन्त शरदैव सरोनृपाः ।

इत्यत्र हंसानां यद्यामरत्वं प्रतीयमानं तन्नृपा इति वाच्येऽर्थे गुणतां प्राप्तमलङ्कारकारैर्यावदेव दर्शितं तावदमुना द्वारेण सूचितोऽयं प्रकार इत्यर्थः । अन्ये त्वेकदेशेन वाच्यभागवैचित्र्यमात्रेणेत्यनुद्भिन्नमेव व्याचचक्षिरे । व्यङ्ग्यं यदलङ्कारान्तरं वस्त्वन्तरं च संस्पृशन्ति ये स्वात्मनः । संस्कारायाश्लिष्यन्तीति ते तथा । महाकविभिरिति । कालिदासादिभिः । काव्यशोभां पुष्यतीति यदुक्तं तत्र हेतुमाह— कथं हीति । हिशब्दो हेतौ । अतिशययोगिता कथं नोत्कर्षमावहेत् काव्ये, नास्त्येवासौ प्रकार इत्यर्थः, स्वविषये यदौचित्यं तेन चेद्धृदयस्थितेन तामतिशयोक्तिं कविःकरोति । यथा भट्टेन्दुराजस्य—

यद्विश्रम्य विलोकितेषु बहुशो निःस्थेमनी लोचने ।
यद्गात्राणि दरिद्रति प्रतिदिनं लूनाब्जिनीनालवत् ॥
दूर्वाकाण्डविडम्बकश्च निबिडो यत्पाण्डिमा गण्डयोः ।
कृष्णे यूनि सयौवनासु वनितास्वेषैव वेषस्थितिः ॥

अत्र हि भगवतो मन्मथवपुषः सौभाग्यविषयः सम्भाव्यत एवायमतिशय इति तत्काव्ये लोकोत्तरैव शोभोल्लसति । अनौचित्येन तु शोभा लीयेत एव । यथा—

अल्पं निर्मितमाकाशमनालोच्यैव वेधसा ।
इदमेवंविधं भावि भवत्याः स्तनजृम्भणम् ॥ इति ॥

नन्वतिशयोक्तिः सर्वालङ्कारेषु व्यङ्ग्यतयान्तर्लीनैवास्त इति यदुक्तं तत्कथम्? यतो भामहोऽतिशयोक्तिं सर्वालङ्कारसामान्यरूपामवादीत् । न च सामान्यं शब्दाद्विशेषप्रतीतेः पृथग्भूततया पश्चात्तनत्वेन चकास्तीति कथमस्य व्यङ्ग्यत्वमित्याशङ्क्याह- भामहेनेति । भामहेनापि यदुक्तं तत्राऽयमेवार्थोऽवगन्तव्य इति दूरेण सम्बन्धः । किं तदुक्तम्-सैषेति । यातिशयोक्तिर्लक्षिता सैव सर्वा वक्रोक्तिरलङ्कारप्रकारः सर्वः ।

वक्राभिधेयशब्दोक्तिरिष्टा वाचामलङ्कृतिः । इतिवचनात् ।

शब्दस्य हि वक्रता अर्थस्य च वक्रता लोकोत्तीर्णेन रूपेणावस्थानमित्ययमेवासावलङ्कारस्यालङ्कारभावः, लोकोत्तरतैव चातिशयः, तेनाति शयोक्तिः सर्वालङ्कारसामान्यम् । तथाहि—अनया अतिशयोक्त्या, अर्थः सकलजनोपभोगपुराणीकृतोऽपि विचित्रतया भाव्यते । तथा प्रमदोद्यानादिविभावतां नीयते । विशेषेण च भाव्यते रसमयीक्रियते, इति तावत्तेनोक्तं, तत्र कोऽ सावर्थ इत्यत्राह— अभेदोपचारात्सैव सर्वाङ्काररूपेति । उपचारे निमित्तमाह- सर्वालङ्कारेति । उपचारे प्रयोजनमाह— अतिशयोक्तिरित्यादिना अलंकारमात्रतैवेत्यन्तेन । मुख्यार्थबाधोऽप्यत्रैव दर्शितः कविप्रतिभावशादित्यादिना ।

अयं भाव :— यदि तावदतिशयोक्तेः सर्वालङ्कारेषु सामान्यरूपता सा तर्हि तादात्म्यपर्यवसायिनीति तद्व्यतिरिक्तो नैवालङ्कारो दृश्यत इति कविप्रतिभानं न तत्रापेक्षणीयं स्यात् । अलंकारमात्रं च न किञ्चिद् । अथ सा काव्यजीवितत्वेनेत्थं विवक्षिता, तथाप्यनौचित्येनापि निबध्यमाना तथा स्यात् । औचित्यवती जीवितमिति चेत्-औचित्यनिबन्धनं रसभावादिमुक्त्वा नान्यत्किञ्चिदस्तीति तदेवान्तर्यामिं [ध्वन्यालोकाच्या काव्यमाला संस्करणामध्ये अन्तर्भासि असा पाठ आहे.] मुख्यं जीवितमित्यभ्युपिगन्तव्यं न तु सा । एतेन यदाहुः केचित्— औचित्यघटितसुन्दरशब्दार्थमये काव्ये किमन्येन ध्वनिनात्मभूतेनेति ते स्ववचनमेव ध्वनिसद्भावाभ्युपगमसाक्षिभूतं मन्यमानाः [ध्वन्वालोकाच्या काव्यमाला संस्करणामध्ये अमन्यमानाः असा पाठभेद दिला आहे.] प्रत्युक्ताः । तस्मान्मुख्यार्थबाधादुपचारे च निमित्तप्रयोजनसद्भावादभेदोपचार एवायम् । ततश्चोपपन्नमतिशयोक्तेर्व्यङ्ग्यत्वमिति । यदुक्तमलङ्कारान्तरस्वीकरणं तदेव त्रिधा विभजते-तस्याश्चेति । वाच्यत्वेनेति । सापि वाच्या भवति । यथा 'अपरैव हि केयमत्र' इति । अत्र रूपकेऽप्यतिशयः शब्दस्पृगेव । अस्य त्रैविध्यस्य विषयविभागमाहतत्रेति । तेषु प्रकारेषु मध्ये य आद्यः प्रकारस्तस्मिन् ।

लोचन

याप्रमाणे मुळीच अलंकार नसल्यामुळे जी उदारहणे [४] वरवर पाहता उपेक्षणीय वाटतात, त्यांमध्ये काव्याचे अन्तर्गत सार असणाऱ्या गुणीभूत व्यंग्यार्थामुळे काव्याला सौन्दर्य प्राप्त होते [५] असे सांगून वाच्यालंकारांनाही या व्यंग्यार्थामुळेच अधिक शोभा येते हे (कारिकाकार) 'सर्वच वाच्य' इ. कारिकेने दर्शवितात. कारिकेतील 'अंश' या शब्दाचा अर्थ 'वाच्यार्थाच्या मानाने गौण असलेला' असा आहे. 'एकदेशाच्या द्वारे'—'एकदेश' या शद्वाने एकदेशविवर्ति रूपकाचा निर्देश वृत्तिकारांनी केला आहे (असे समजावे).

तर मग वृत्तिकारांच्या या विवेचनाचा भावार्थ असा— एकदेशविवर्ति रूपकाच्या बाबतीत सरोवररूपी राजांना शरद्नेच राजहंसांच्या योगाने वारा घातला [६] या उदाहरणात हंसांचे चामरत्व (म्हणजे हंसांवरील

चामरत्वाचा आरोप) हा अर्थ व्यंग्य असला तरी त्याला '(सरोवररूपी) राजे' या वाच्य अर्थाचे अंगत्व प्राप्त झालेले प्राचीन अलंकारकारांनी ज्यावेळी दाखवले, त्यावेळी त्यांनी तसे करून काव्याच्या गुणीभूतव्यंग्य या प्रकाराचे अस्तित्व अप्रत्यक्षपणे सुचविले, असा अर्थ पण दुसऱ्या काही टीकाकारांनी (वृत्तीतील) 'एकदेशाच्याद्वारे' याचे विवरण केवळ वाच्यार्थ या अंशाच्या सौंदर्यामुळे असे अधिक खुलासा न करिता केले [७] आहे. (व्यंग्य अलंकारांचा किंवा व्यंग्य वस्तूंचा स्पर्श—) व्यंग्य असलेला जो अलंकाररूपी किंवा वस्तुरूपी अर्थ, त्याला जे अलंकार स्पर्श करितात, म्हणजे आपली शोभा वाढविण्यासाठी आपल्या कवेमध्ये घेतात, त्यांना (वृत्तीमध्ये) त्या प्रकारचे (म्हणजे व्यंग्य अलंकार व व्यंग्य वस्तु यांना स्पर्श करणारे असे म्हटले आहे. 'महाकवींनी' म्हणजे कालिदास वगैरेंनी. 'काही वेगळेच सौंदर्य प्राप्त झालेले असते' असे जे वृत्तिकारांनी म्हटले, त्याचे कारण ते 'कारण आपापल्या' इ. वाक्याने सांगतात. वृत्तीतल्या **हि** या शब्दाचा अर्थ 'कारण' असा आहे. 'अतिशयाचा अंश महाकवींनी आपल्या काव्यात योजिल्यास त्यामुळे काव्याला सुंदरता काय म्हणून येणार नाही?' काव्यामध्ये 'असा' म्हणजे अतिशयोक्तीमुळे सौंदर्य प्राप्त न होणारा प्रकारच नाही, असा अर्थ. आपआपल्या वर्ण्य विषयाचे (रसाच्या दृष्टीने) जे औचित्य ते ध्यानात ठेऊन जर कवीने त्या अतिशयोक्तीची योजना केली, तर (काव्याला सौंदर्य काय म्हणून प्राप्त होणार नाही?) जसे भट्टेन्दुराज यांचा पुढील श्लोक—[८]

'मध्येच थांबून थांबून (कृष्णाकडे) अनेकवेळा पाहिल्याने (गोपस्त्रियांची) दृष्टि जर चंचल होत असेल; तोडलेल्या कमलवेलींच्या देठाप्रमाणे त्यांची गात्रे जर प्रत्येक दिवशी कृश होऊन सुकून जात असतील आणि दूर्वाकुरांचे अनुकरण करणारा दाट पांढरेपणा जर गालांवर दिसत असेल, तर तीच म्हणजे अशीच, कृष्णाने तारुण्यात पदार्पण केले असताना नवयौवना गोपस्त्रियांची अवस्था असणार (नाही का)?'

या श्लोकात मदनाच्या रूपाप्रमाणे रूप असलेल्या भगवान् कृष्णाच्या मोहकपणाचा जो उत्कटपणा सुचविला गेला आहे, तो पूर्णपणे संभवनीयच आहे. [९] त्यामुळे भट्टेन्दुराजांच्या त्या काव्यातून काही असामान्यच सौंदर्य प्रकट होत आहे. पण (अतिशयोक्ति योजण्याच्या बाबतीत जर औचित्य पाळले गेले नाही, तर काव्यातील सौंदर्याचा नाशच होईल. जसे (पुढील पद्यामध्ये)—

'ब्रह्मदेवाने तुझ्या स्तनांचा विस्तार (यौवनाच्या कालात) इतका वाढणार आहे हे विचारात न घेताच हे आकाश संकुचित निर्माण केले आहे (असे म्हटले पाहिजे)' [१०]

'पण काय हो, 'अतिशयोक्ति ही सर्व अलंकारांमध्ये व्यंग्यत्वाने व (म्हणून) गुप्तरूपाने असते' असे जे (वृत्तिकारांनी) म्हटले आहे; [११] ते कसे काय? कारण भामहाने [१२] 'सर्व अलंकारांमध्ये अतिशयोक्ति ही सामान्य (म्हणजे जाति) या रूपाने असते' असे म्हटले आहे. आणि सामान्य हे [१३] (विशेषाहून निराळे नसल्यामुळे ते) विशेषाच्या प्रतीतीहून वेगळेपणाने, मागाहून प्रतीत होणारे असते असा काही अनुभव येत नाही. असे असल्यामुळे ते सामान्य (म्हणजे ती अतिशयोक्ति) 'व्यंग्य' कशी म्हणता येईल?" अशी शंका कल्पून तिचे निरसन (वृत्तिकार) 'भामहाने' इ. वाक्यांनीं करितात. **भामहेनापि यदुक्तम्** या शब्दांचा संबंध **तत्र ... अयमेवार्थः अवगन्तव्यः** या शब्दांशी दूरान्वयाने जोडावा. (भामहाने) ते काय म्हटले? तर 'सर्व प्रकारची' इ. आम्ही आतापर्यंत ज्या अतिशयोक्तीचे लक्षण केलें, ती म्हणजेच सर्व वक्रोक्ति म्हणजे सर्व प्रकारचे अलंकार होय. कारण 'वाच्यार्थ व शब्द यांचा लोकविलक्षण पद्धतीने वापर म्हणजेच भाषेतील अलंकार होत [१४] असे भामहाने म्हटले आहे [१५] शब्दाची वक्रता आणि वाच्यार्थाची वक्रता म्हणजे त्यांचा अलौकिक स्वरूपात आविष्कार हेच अलंकाराचे 'अलंकारत्व' होय. आणि 'अतिशय' म्हणजे

अलौकिकपणाच. त्यामुळे 'अतिशयोक्ति हे सर्व अलंकारांमधील सामान्य तत्त्व होय. [१६] कारण असे की, एखादा अर्थ (म्हणजे वर्ण्य विषय) सर्वांनी वारंवार अनुभवून जुना झाला असला, तरी ह्या अतिशयोक्तीमुळे त्याचे (१) चमत्कृतिपूर्ण स्वरूपात दर्शन घडविले जाते. तसेच (ह्या अतिशयोक्तीमुळे) वनिता, उद्यान वगैरे (रोजच्या) गोष्टींना (रसभावादिकांच्या) (२) विभावांचे स्वरूप दिले जाते. शिवाय ते विषय (३) विशेषत्वाने 'भावयुक्त' केले जातात म्हणजे त्यांना रसाभिव्यक्ति करण्यास समर्थ असे स्वरूप दिले जाते. [१७] हे त्याने (म्हणजे भामहाने) म्हटले हे प्रसिद्धच आहे. 'त्याच्या त्या उक्तीमधील आशय कोणता आहे?' अशी पृच्छा कोणी केल्यास तिला वृत्तिकार 'अभेद लक्षणेने [१८] ही अतिशयोक्ति म्हणजेच कोणताहीं अलंकार होय.' असे उत्तर देतात. अशी लक्षणा करण्याला कारणीभूत असलेला वाच्यार्थ व लक्ष्यार्थ यांमधील (जीव–शरीर हा) संबंध वृत्तिकार 'कोणताही अलंकार शरीर म्हणून धारण करण्याचे सामर्थ्य [१९]' इ. शब्दांनीं सांगतात. ही लक्षणा करण्यामागील प्रयीजन 'ज्या अलंकारात कवीच्या प्रतिभेच्या सामर्थ्यामुळे 'अतिशयोक्तीचे अधिष्ठान' येथपासून 'मामुली अलंकारच म्हणावयाचा' येथपर्यंतच्या शब्दांनी सांगितले आहे. या लक्षणेत होणारा मुख्यार्थाचा म्हणजे वाच्यार्थाचा बाधही वृत्तिकारांनी याच वाक्यात 'कवीच्या प्रतिभेच्या सामर्थ्यामुळे' इ. शब्दांनी दाखविला आहे. [२१]

वृत्तिकारांच्या ह्या म्हणण्याचा भावार्थ असा :– जर 'सर्व' अलंकारांमध्ये अतिशयोक्ति हे सामान्य तत्त्व असेल, तर त्या अतिशयोक्तीचे पर्यवसान ती व कोणताही अलंकार हे एकरूप आहेत असे म्हणण्यात होते व म्हणून अतिशयोक्ति ज्यामध्ये नाही असा अलंकार असणारच नाही (आणि कोणताही अलंकार वापरला की त्यात अतिशयोक्ति ओघानेच येईल व मग) अतिशयोक्तीचा वापर करण्यास कवीच्या प्रतिभेची काहीही गरज लागणार नाही आणि (शुद्ध म्हणजे अतिशयोक्तीवाचून असलेला) एकही अलंकार आढळणार नाही. [२२] आता ती अतिशयोक्ति काव्याचे जीवित असल्यामुळे तिचे असे (म्हणजे भामहाने सर्व प्रकारची वक्रोक्ति इ. श्लोकात सांगितल्याप्रमाणे) वर्णन केले आहे असे जर प्रतिपक्ष्याचे म्हणणे असेल, तर 'औचित्य न सांभाळताही कवीने अतिशयोक्तीचा वापर केला तरी ती काव्याचा प्राण असते' असे (म्हटल्यासारखे) होईल! यावर 'औचित्य पाळूनच वापरलेली अतिशयोक्ति काव्याचे जीवित असते' असे जर प्रतिपक्षी म्हणेल तर ते औचित्याचे कारण रस, भाव वगैरेंशिवाय दुसरे कोणतेही असू शकणार नाही, [२३] म्हणून (व्यंग्य) रसभावादि हेच काव्याचे 'अंतर्यामी [२४]' असलेले (म्हगजे काव्याचे काव्यत्व ठरविणारे) मुख्य, प्राणभूत तत्त्व होय, अतिशयोक्ति नाही, हे मान्य केले पाहिजे. यामुळे काही लोकांनी [२५] पुढीलप्रमाणे जे म्हटले की– "औचित्याला अनुसरून योजिलेले सुंदर शब्द आणि अर्थ यांनी युक्त असलेल्या काव्यामध्ये 'आत्मा' असलेला 'ध्वनि' नावाचा वेगळा कोणीतरी मानण्याची काय गरज आहे?" त्याचे खंडन झाले. कारण, त्या लोकांचे म्हणणे वस्तुतः ध्वनीच्या अस्तित्वाला मान्यता देणारे असून [२६] ते लोक (हे वाक्य ध्वनीचे खंडन करणारे आहे असे समजून) त्याला विशेष महत्त्व देतात. त्यामुळे 'ही अतिशयोक्ति म्हणजे अलंकारांचे सर्व प्रकार' या वाक्यातील 'अभेद' या मुख्यार्थाचा बाध होत असल्याकारणाने व ही लक्षणा वापरावयास निमित्त व प्रयोजनही असल्याने या वाक्यात 'अभेद लक्षणा' च आहे [२७] आणि म्हणून अतिशयोक्ति ही (सर्व अलंकारांमध्ये) व्यंग्य असते हे तर्कसंगत आहे. आता 'ती अतिशयोक्ति इतर अलंकारांना शरीर म्हणून धारण करिते' असे जे (वृत्तीत) [२८] म्हटले आहे, त्याचेच (म्हणजे अतिशयोक्तीने इतर अलंकारांना शरीर म्हणून धारण करण्याचे तीन प्रकार वृत्तिकार 'ती काही वेळा' इ. शब्दांनी करून दाखवितात. 'वाच्यरूपाने'–ती अतिशयोक्तिदेखील वाच्य असते, (व त्या वाच्य, रूपात ती इतर अलंकारांशी मिश्रित होते), जसे– 'ही आगळीच कोण आहे बरे?' या (द्वितीय खंड "उद्द्योत – ३ 'काव्याचा गुणीभूतव्यंग्य हा दुसरा प्रकार; त्याचे उदाहरणासह विवेचन'" वरील 'या ठिकाणी ही लावण्याची आगळीच' या श्लोकातील) शब्दांमध्ये. या श्लोकात 'रूपक' असले तरी [२९] अतिशोयक्ति ही शब्दांनी वाच्यच

झाली आहे. (अतिशयोक्तीच्या) या तीन प्रकारांची वेगवेगळी क्षेत्रे कोणती हे वृत्तिकार 'त्यांपैकी' इ. शब्दांनी सांगतात. 'त्यांपैकी' म्हणजे त्या (तीन) प्रकारांपैकी जो पहिला प्रकार, त्यामध्ये.

टीपा

१) ज्या सांग–रूपकामध्ये काही भागात उपमानाचा शब्दांनी उल्लेख केलेला असतो, तर काही भागात तो नसतो, ते एकदेशविवर्ति रूपक. जेथे तो उल्लेख केलेला नसतो, तेथे तो उपमानरूपी अंश 'सूचित' होतो. या सूचित अंशामुळेच एकदेशविवर्तिरूपकाला सौंदर्य प्राप्त होते असे आनन्दवर्धन व अभिनवगुप्त यांचे मत. वृत्तीतील **एकदेशेन** याचा अर्थ अभिनवगुप्तांनी 'एकदेशविवर्ति रूपक' असा केला आहे. पण एकदेशविवर्ति रूपक हा अलंकार आनंदवर्धनांच्या पूर्वी फक्त उद्‌भटाच्या काव्यालंकारसारसंग्रहामध्येच आढळतो. म्हणून वृतीतील **लक्षणकारैः** या बहुवचनाची संगति लागत नाही. तेव्हा वृत्तिकाराच्या मते 'एकदेश' याचा अर्थ 'एकदेशविवर्ति रूपक, अपहूनुति, दीपक, समासोक्ति वगैरे काही अलंकार' असा करणे योग्य होईल व मग लोचनातील 'एकदेशविवर्ति रूपक' हे तत्सम अलंकारांचे उपलक्षण मानावे लागेल.

२) येथे उद्‌धृत केलेल्या भामहाच्या कारिकेत **'सर्वेव'** असा पाठ आम्ही स्वीकारला आहे. कारण आनंदवर्धनांनी वृत्तीमध्ये **'सर्वालंकाररूपा'** असे म्हटले आहे आणि अभिनवगुप्तांनी **'सैव सर्वा वक्रोक्तिः'** असेच विवरण केले आहे. ध्वन्यालोकाच्या काव्यमाला आवृत्तीमध्ये व मम्मटाच्या काव्यप्रकाशामध्ये (झळकीकर आवृत्ति, पृ. ७४४) **सैषा सर्वत्र**...असा पाठ आढळतो.

३) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'अलंकार सूचित केल्यास काव्याचे सौंदर्य वाढते'" वरील वृत्ति व त्यावरील दुसरी टीप.

४) उदा. 'लक्ष्मी ही मुलगी' यासारखी उदाहरणे, कारण यात कोणताही अलंकार नाही.

५) तुलनार्थ पाहा, प्रथमखंड "उद्‌द्योत – २ 'वाच्य वस्तूच्या द्वारा अलंकार सूचित झाल्यास तो 'व द्वितीय खंड, उद्‌द्योत – ३ काव्याचा गुणीभूतव्यंग हा दुसरा प्रकार; त्याचे उदाहरणासह विवेचन'".

६) पाहा, प्रथमखंड, उद्‌द्योत – २ आक्षेप म्हणजे 'ध्वनि' नव्हे".

७) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'अलंकारध्वनीत व्यंग्य अलंकारच मुख्य हवा'". अभिनवगुप्तांनी **एकदेशेन** याचा अर्थ 'एकदेशविवर्तिरूपक इ. अलंकारांच्या बाबतीत' असा केला. दुसऱ्या टीकाकारांनी त्याचा अर्थ 'व्यंग्यार्थयुक्त अलंकारांतील केवळ वाच्यार्थाचे सौंदर्य लक्षात घेऊन' असा केला. म्हणजे प्राचीन आलंकारिकांनी व्यंग्यार्थाच्या सौंदर्याकडे लक्ष दिले नाही व त्याचे विवरणही केले नाही.

८) हा श्लोक पूर्वी प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" वर निराळ्या संदर्भात उद्‌धृत करण्यात आला आहे.

९) म्हणजे त्यात अवास्तव असे काही वाटत नाही.

१०) काव्यादर्श, १—९१, हे उदाहरण 'दंडी' ने गौडी रीतीच्या 'अत्युक्ति' (म्हणजे असंभाव्य कोटीतील अतिशयोक्ति) या वैशिष्ट्याचे म्हणून दिले आहे. याउलट वैदर्भी रीतीतील अतिशयोक्तीचे उदाहरण त्याने संभाव्य कोटीतले, अत एव आनंददायक म्हणून दिले आहे, ते असे :— **अनयोरनवद्याङ्गि स्तनयोर्जृम्भमाणयोः । अवकाशो न पर्याप्तस्तव बाहुलतान्तरे ।** याशिवाय तुलनार्थ पाहा, 'काव्यालंकारसूत्रवृत्ति, ४—२—११ आणि काव्यप्रकाश, १० वा उल्लास, पृ. ७७३ (झळकीकर आवृत्ति).

११) पाहा, व्दितीय खंड, "उद्‌द्योत — ३ 'वाच्य अलंकारांमध्ये व्यंग्य अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन'" वरील 'व्यंग्य अतिशयोक्तीचा अंतर्भाव करणे' हे वृत्तीतील शब्द.

१२) सर्व गोव्यक्तींमध्ये ज्याप्रमाणे गोत्व हे 'सामान्य' म्हणजे जाति (हा प्राणप्रद धर्म) या स्वरूपात राहते, त्याप्रमाणेच सर्व अलंकारांमध्यें अतिशयोक्ति ही प्राणप्रद धर्म या स्वरूपाने राहते, असा आशय.

१३) मूळ लोचनातील वाक्यात **सामान्यम्** या शब्दानंतर **शब्दात्** असा एक शब्द आहे. पण या वाक्याचा अर्थ लावताना तो शब्द गैरसोयीचा वाटल्यामुळे आम्ही त्याचा अनुवाद केला नाही.

१४) हे वाक्य पूर्वी प्रथमखंड, उद्‌द्योत — १ 'लोचनात तीन प्रकारांनी सांगितलेली 'वाक्' शब्दाची व्युत्पत्ति'" वर उद्‌धृत करण्यात आले आहे.

१५) काव्यालंकार १—३६.

१६) तुलनार्थ पाहा, काव्यादर्श २—२२०—**अलङ्कारान्तराणामप्येकमाहुः परायणम् । वागीशमहितामुक्तिमिमामतिशयाह्वयाम् ॥**

१७) अशा रीतीने भामहाच्या **विभाव्यते** या शब्दाचा अर्थ अभिनवगुप्तांनी तीन प्रकारांनी केला आहे.

१८) वर्ण्य विषयावर त्याहूश भिन्न असणाऱ्या वस्तूचा तादात्म्यसंबंधाने आरोप करणे हे अभेद लक्षणेचे स्वरूप होय. उदा. मुख चंद्राहून भिन्न असूनही त्याला चंद्रच म्हणणे. प्रायः सर्वच अलंकार हे अतिशयोक्तीचे व्यंजक असतात व अतिशयोक्ति हा त्यांचा व्यंग्य अर्थ असतो. अशा रीतीने त्यांमध्ये व्यंजक व व्यंग्य असा संबंध असल्यामुळे ते एकमेकांहून निराळे असतात. तरीसुद्धा भामहाने 'अतिशयोक्ति म्हणजेच सर्व अलंकार' असे जे विधान केले आहे ते अभेदलक्षणा योजूनच केले आहे.

१९) म्हणजे कोणताही अलंकार हे शरीर व अतिशयोक्ति हा त्यामधील जीव होय:

२०) म्हणजे 'कवीने आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्याने अलंकारामध्ये अतिशयोक्ति योजिली, तर त्या अलंकाराला असामान्य सौंदर्य प्राप्त होते हे 'अतिशयोक्ति म्हणजे कोणताही अलंकार होय' अशी लक्षणा वापरण्यामागील व्यंग्य प्रयोजन होय.

२१) अतिशयोक्ति आणि कोणताही अलंकार यांमध्ये खरोखर भेदच आहे. पण काही वेळा; म्हणजे कवीने आपल्या प्रतिभेने अतिशयोक्तीचा वापर केला, तर त्या अलंकाराला खरेखुरे अलंकारत्व (म्हणजे विशेष सौंदर्य) प्राप्त होते. म्हणून कोणतीही अतिशयोक्ति म्हणजे 'अलंकार' असे म्हटल्यास वाच्यार्थांचा बाध होतो, कारण हे म्हणणे काही वेळाच योग्य होते, नेहमी नाही. हा मुख्यार्थाचा बाध वृत्तिकारांनी कविप्रतिभावशात् हा शब्द वापरून सुचविला आहे.

२२) वस्तुतः स्वभावोक्ति, यथासंख्य वगैरे काही अलंकारांमध्ये कोणतीही अति्शयोक्ति नसूनसुद्धा त्यांना 'अलंकार' म्हणप्यात येतेच, याचे कारण त्यांमध्य कवीच्या प्रतिभेमुळे सौंदर्य निर्माण झालेले असते. तेव्हा अतिशयोक्ति असली किंवा नसली तरीही अलंकाराला अलंकारत्व येते, याला खरे कारण कवीची प्रतिभा हे आहे. कवीच्या प्रतिभेमुळे उत्पन्न होणाऱ्या अलंकारांमध्ये रसाचे औचित्य पाळले गेलेलेच असते. तरीही 'अतिशयोक्ति म्हणजेच सर्व अलंकार' असे जे भामहाने म्हटले, त्याचे कारण कविप्रतिभेने निर्माण झालेली अतिशयोक्ति बहुतेक सर्व अलंकारांमध्ये व्यंग्य स्वरूपात असते हे होय. ती प्रत्येक अलंकारामध्ये नसल्याने भामहाचे 'अतिशयोक्ति म्हणजेच सव अलंकार' हे विधान लक्षणेने घ्यावयाचे.

२३) रसभावादि हेच औचित्याचे कारण; म्हणजे औचित्य हे नेहमी रसभावादींनाच अनुसरून असणार; ते दुसऱ्या कोणालाही अनुसरून असू शकणार नाही. पाहा, प्रथम खंड उद्‌द्योत – १ ध्वन्यालोक-कारिका २ वरील 'साहित्यदर्पण' काराच्या आक्षेपाचे खंडन (टीप १ पाहा) आणि द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत . प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वरील 'तेवढे – औचित्य पाळणे हे रसाच्या परिपोषाचे'...इ. वाक्य.

२४) 'अंतर्यामी' याचा शब्दशः अर्थ **अन्तः** म्हणजे 'आत' राहून (काव्याच्या काव्यत्वाचे) 'नियमन करणारे.'

२५) हे 'काही लोक' म्हणजे 'औचित्य हाच काव्याचा प्राण' असे मानणाऱ्या क्षेमेन्द्राच्या परंपरेतले, पण अभिनवगुप्तांच्या पूर्वीचेः क्षेमेन्द्र हा अभिनवगुप्तांनंतर, इ. स. १०२५ ते ६० या काळात झाला. त्याने आपल्या 'औचित्याविचारचर्चा' या ग्रंथात कारिका ३ मध्ये पुढील उद्‌गार काढले आहेत. – **औचित्यस्य चमत्कारकारिणः चारुचर्वणे । रसजीवितभूतस्य विचारं कुरुतेऽधुना ।** 'औचित्य हेच रसाचे जीवित' असे हे औचित्यवादी मानितात, तर औचित्य हे रसादींना अनुसरून असते, म्हणून रसादि हेच काव्याचे जीवित होय' असे ध्वनिवाद्यांचे म्हणणे.

२६अ) त्या लोकांनी औचित्याला काव्याचे जीवित म्हणून मान्यता दिली असल्यामुळे व रसादिध्वनि हा औचित्याचा नियामक असल्याने त्यांनी रसादि ध्वनीला काव्याचे जीवित म्हणून मान्यता दिल्यासारखेच आहे.

२७) 'अतिशयोक्ति म्हणजेच सर्व अलंकार' या वाक्याचा मुख्यार्थ बाधित झाल्यामुळे कविप्रतिभेच्या सामर्थ्याने औचित्य पाळून योजिलेली अतियोक्ति ही कोणत्याही अलंकाराला अलंकारत्व प्राप्त करून देण्याचे कारण असते, असा लक्ष्यार्थ घ्यावा लागतो व मग मुख्यार्थाचा बाध दूर होतो.

२८) द्वितीय खंड, ११०१.

२९) या श्लोकात 'ही लावण्याची आगळीच नदी' येथेच फक्त रूपक आहे असे म्हणता येईल. तसे मानिल्यास 'ही' हा शब्द 'तरुणी' या उपमेयाचा वाचक आहे असे समजावे लागेल. येथे हे रूपक असले तरी श्लोकातील अतिशयोक्ति मात्र 'आगळीच' या शब्दांनी वाच्य झाली आहे. (त्याचप्रमाणे या श्लोकातील चवथ्या चरणामधील **अपरे** (अपूर्व) या शब्दानेही 'अतिशयोक्ति' वाच्य झाली आहे). 'नीलकमले' वगैरे शब्दांमध्ये रूपक नाही, कारण ते सर्व शब्द 'उपमानां'चे वाचक असून या श्लोकात उपमेयाचा कोठेही निर्देश केलेला नाही.

ध्वन्यालोकः

अयं च प्रकारोऽन्येषामप्यलङ्काराणामस्ति, तेषां तु न सर्वविषयः । अतिशयोक्तेस्तु सर्वालङ्कारविषयोऽपि सम्भवतीत्ययं विशेषः । येषु चालङ्कारेषु सादृश्यमुखेन तत्त्वप्रतिलम्भः यथा रूपकोपमातुल्ययोगितानिदर्शनादिषु तेषु गभ्यमानधर्ममुखेनैव यत्सादृश्यं तदेव शोभातिशयशालि भवतीति ते सर्वेऽपि चारुत्वातिशययोगिनः सन्तो गुणीभूतव्यङ्ग्यस्यैव विषयाः । समासोक्त्याक्षेपपर्यायोक्तादिषु तु गम्यमानांशाविनाभावेनैव तत्त्वव्यवस्थानाद्गुणीभूतव्यङ्ग्यता निर्विवादैव । तत्र च गुणीभूतव्यङ्ग्यतायामलङ्काराणां केषाञ्चिदलंकारविशेषगर्भतायां नियमः । यथा व्याजस्तुतेः प्रेयोऽलङ्कारगर्भत्वे । केषाञ्चिदलङ्कारमात्रगर्भतायां नियमः । यथा सन्देहादीनामुपमागर्भत्वे । केषाञ्चिदलङ्काराणां परस्परगर्भतापि सम्भवति । यथा दीपकोपमयोः । तत्र दीपकमुपमागर्भत्वेन प्रसिद्धम् । उपमापि कदाचिद्दीपकच्छायानुयायिनी । यथा मालोपमा । तथा हि 'प्रभामहत्या शिखयेव दीपः' इत्यादौ स्फुटैव दीपकच्छाया लक्ष्यते ।

तदेवं व्यङ्ग्यांशसंस्पर्शे सति चारुत्वातिशययोगिनो रूपकादयोऽलङ्काराः सर्व एव गुणीभूतव्यङ्ग्यस्य मार्गः । गुणीभूतव्यङ्ग्यत्वं च तेषां तथाजातीयानां सर्वेषामेवोक्तानुक्तानां सामान्यम् । तल्लक्षणे सर्व एवैते सुलक्षिता भवन्ति । एकैकस्य स्वरूपविशेषकथनेन तु सामान्यलक्षणरहितेन प्रतिपदपाठेनेव शब्दा न शक्यन्ते तत्त्वतो निर्ज्ञातुम्, आनन्त्यात् । अनन्ता हि वाग्विकल्पास्तत्प्रकारा एव चालङ्काराः । गुणीभूतव्यङ्ग्यस्य च प्रकारान्तरेणापि व्यङ्ग्यार्थानुगमलक्षणेन विषयत्वमस्त्येव । तदयं ध्वनिनिष्यन्दरूपो द्वितीयोऽपि महाकविविषयोऽतिरमणीयो लक्षणीयः सहृदयैः । सर्वथा नास्त्येव सहृदयहृदयहारिणः काव्यस्य स प्रकारो यत्र न प्रतीयमानार्थसंस्पर्शेन सौभाग्यम् । तदिदं काव्यरहस्यं परमिति सूरिभिर्भावनीयम् ।

ध्वन्यालोक

आणि अशी म्हणजे इतर अलंकारांमध्ये व्यंग्य रूपाने असण्याची परिस्थिति अतिशयोक्तीखेरीज बाकीच्या अलंकारांच्या बाबतीतही शक्य असते. पण त्या अलंकारांमध्ये सर्व अलंकारांना व्यापण्याचे सामर्थ्य नसते. अतिशयोक्ति ही मात्र कोणत्याही अलंकारात मिसळू शकते हे तिचे खास वैशिष्ट्य होय. आणि इतर अलंकारांपैकी जे (व्यंग्य असलेल्या) सादृश्यामुळेच अस्तित्वात येतात– उदा. रूपक, उपमा, [१] तुल्ययोगिता, निदर्शना वगैरे, त्यांच्या बाबतीत सूचित असणाऱ्या (साधारण) धर्माच्या द्वारे जे सादृश्य निष्पन्न होते, तेच कमालीचे सुंदर असते, म्हणून ते सर्वच अलंकार जेव्हा (त्या प्रकारच्या व्यंग्य सादृश्यामुळे) विशेष सुंदर झालेले असतील, तेव्हा ती गुणीभूतव्यंग्य काव्याचीच उदाहरणे होत. समासोक्ति, आक्षेप, पर्यायोक्त, वगैरे अलंकारांच्या बाबतीत सूचित अंशाशिवाय ते अस्तित्वातच येऊ शकत

नसल्यामुळे ते अलंकार गुणीभूतव्यंग्य प्रकारात मोडणार हे अगदी निर्विवादच आहे. व्यंग्य अलंकार गुणीभूत असताना काही अलंकारांच्या पोटी काही विशिष्ट अलंकारच दडलेले असतात असा नियम आहे. उदा. व्याजस्तुतीच्या पोटी नेहमी प्रेय अलंकारच असतो. [२] काही अलंकारांतून (सादृश्यासारख्या एखाद्या तत्त्वावर आधारलेल्या कित्येक अलंकारांपैकीच) कोणता तरी (अलंकार) सूचित होऊ शकतो असा नियम आहे. उदा. सन्देह वगैरे अलंकारांच्या ठिकाणी उपमा ही सूचित झालेली असते. काही वेळा दोन अलंकार एकमेकांमध्ये गर्भित असणे हेही संभवते. उदा. दीपक व उपमा हे अलंकार. त्यांपैकी दीपकाच्या पोटी उपमा असते, हे तर प्रसिद्धच आहे. पण उपमेतही केव्हा केव्हा दीपकाच्या सौंदर्याची झाक दिसते. उदा. मालोपमा; कारण 'अतिशय तेजस्वी ज्योतीने ज्याप्रमाणे दिवा.....' (त्याप्रमाणे तो हिमालय तिच्यामुळे पावन व भूषितही झाला [३]) इत्यादि उदाहरणांत दीपकाचे सौंदर्य सूचित होते हे उघड आहे.

तर मग याप्रमाणे व्यंग्य अंशाची जोड मिळाल्यामुळे ज्यांना विशेष सौंदर्य लाभते, ते रूपक वगैरे सगळेच अलंकार गुणीभूतव्यंग्य या काव्याच्या प्रकारात मोडतात. त्या प्रकाराच्या सगळ्याच अलंकारांनामग ते अलंकार आम्ही आतापर्यंत उदाहरणादाखल निर्दिष्ट केलेले असोत किंवा नसोत– गुणीभूतव्यंग्यत्व हे साधारण असते. त्या गुणीभूतव्यंग्यप्रकाराचे लक्षण केले असताना त्या सगळ्याच अलंकारांचे स्वरूप उत्तम प्रकारे स्पष्ट केल्यासारखे होते. हे सामान्य लक्षण न सांगता एकेक अलंकाराचे विशिष्ट स्वरूप (तेवढे) सांगत बसल्याने त्या सर्व अलंकारांचे स्वरूप पूर्णपणे लक्षात येणे शक्य नाही, कारण ते अलंकार अनंत आहेत. जसे शब्द हे अनन्त असल्याने प्रत्येक शब्द उच्चारून त्याचे विश्लेषण करीत बसले, तर [४] त्यामुळे शब्दांच्या यथार्थस्वरूपाचे संपूर्णज्ञान होणे शक्य नाही, तसेच. कारण बोलण्याच्या तऱ्हा अनंत आहेत व अलंकार म्हणजे काय? तर त्यांपैकीच विशिष्ट प्रकार!

आणि काव्याच्या 'गुणीभूतव्यंग्य' प्रकारात (नेहमी केवळ अलंकारच व्यंग्य असतो असे नाही, तर) आणखीही निराळ्या प्रकारचे (म्हणजे रसादि किंवा वस्तु या स्वरूपाचा व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत असणे या प्रकारचे) क्षेत्र गुणीभूतव्यंग्याला असू शकतेच! म्हणून ध्वनीचा एक निराळा, त्याहून काहीसा निकृष्ट आविष्कार [५] असलेल्या पण महाकवींच्या रचनेचा विषय होणाऱ्या या दुसऱ्याही प्रकाराची सहृदयांनी दखल घेणे आवश्यक आहे, खरोखर सहृदयांचे हृदय वेधून घेणाऱ्या काव्याचा असा प्रकार नाहीच की ज्याला व्यंग्यार्थाच्या उपस्थितीमुळे सौंदर्य प्राप्त होत नाही. तेव्हा याप्रमाणे जाणत्या सहृदयांनी समजून घ्यावे की, हे (म्हणजे व्यंग्यार्थाचे प्रधानत्व किंवा अंगत्वाने अस्तित्व) (आम्ही सांगितलेले) काव्याच्या सौंदर्याचे सार होय.

लोचनम्

नन्वतिशयोक्तिरेव चेदेवंभूता तत्किमपेक्षया प्रथमं तावदिति क्रमः सूचित इत्याशङ्क्याह– अयं चेति । योऽतिशयोक्तौ निरूपितोऽलंकारान्तरेऽप्यनुप्रेवशात्मकः ।

नन्वेवमपि प्रथममिति केनाशयेनोक्तमित्याशङ्क्याह-तेषामिति । एवमलङ्कारेषु तावद्व्यङ्ग्यस्पर्शोऽस्तीत्युक्त्वा तत्र किं व्यङ्ग्यत्वेन भातीति विभागं व्युत्पादयति– येषु चेति । रूपकादीनां पूर्वमेवोक्तं स्वरूपम् । निदर्शनायास्तु 'क्रियायैव तदर्थस्य विशिष्टस्योपदर्शनम् । इष्टा निदर्शने'ति । उदाहरणम्–

अयं मन्दद्युतिर्भास्वानस्तं प्रति यियासति ।
उदयः पतनायेति श्रीमतो बोधयन्नरान् ॥

प्रेयोऽलंकारेति । चाटुपर्यवसायित्वात्तस्याः । सा चोदाहृतैव द्वितीयोद्द्योतेऽस्माभिः । उपमागर्भत्व इत्युपमाशब्देन सर्व एव तद्विशेषा रूपकादयः, अथवौपम्यं सर्वसामान्यमिति तेन सर्वमाक्षिप्तमेव । स्फुटैवेति । 'तया स पूतश्च विभूषितश्च' इत्येतेन दीपस्थानीयेन दीपनाद्दीपकमत्रानुप्रविष्टं प्रतीयमानतया, साधारणधर्माभिधानं ह्येतदुपमायां स्पष्टेनाभिधाप्रकारेणैव ।

तथाजातीयानामिति चारुत्वातिशयवतामित्यर्थः । सुलक्षिता इति । यत्किलैषां तद्विनिर्मुक्तं रूपं न तत्काव्येऽभ्यर्थनीयम् । उपमा हि 'यथा गौस्तथा गवयः' इति । रूपकं 'खलेवाली यूप' इति । श्लेषः द्विर्वचनेऽची' ति तन्त्रात्मकः । यथासंख्यं 'तुदीशलातुरे' ति । दीपकं 'गामश्वम्' इति । ससन्देहः 'स्थाणुर्वा स्यात्' इति । अपह्नुतिः 'नेदं रजतम्' इति । पर्यायोक्तं 'पीनो दिवा नात्ति' इति । तुल्ययोगिता 'स्थाध्वोरिच्च' इति । अप्रस्तुतप्रशंसा सर्वाणि ज्ञापकानि, यथा पदसंज्ञायामन्तवचनम् – 'अन्यत्र संज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे तदन्तविधिर्न' इति । आक्षेपश्चोभयत्र विभाषासु विकल्पात्मकविशेषाभिधित्सया इष्टस्यापि विधेः पूर्व निषेधनात् प्रतिषेधेन समीकृत इति न्यायात् । अतिशयोक्तिः 'समुद्रः कुण्डिका' विन्ध्यो वर्धितवानर्कवर्त्मागृहणात् इति । एवमन्यत् । न चैवमादि काव्योपयोगि, इतिं गुणीभूतव्यङ्ग्यतैवात्रालङ्कारतायां मर्मभूता लक्षिता तान् सुष्ठु लक्षयति । यथा सुपूर्णं कृत्वा लक्षिताः संगृहीता भवन्ति, अन्यथा त्ववश्यमव्याप्तिर्भवेत् । तदाह–एकैकस्येति । न चातिशथोक्तिवक्रोक्त्युपमादीन सामान्यरूपत्वं चारुताहीनानामुपपद्यते चारुता चैतदायत्तेत्येतदेव गुणीभूतव्यङ्यत्वं सामान्यलक्षणणम् । व्यङ्ग्स्य च चारुत्वं रसाभिव्यक्तियोग्यतात्मकम् रसस्य स्वात्मनैव विश्रान्तिधाम्न आनन्दात्मकत्वमिति नानवस्था काचिदिति तात्पर्यम् । अनन्ता हीति । प्रथमोद्द्यात एव व्याख्यातमेतत् 'वाग्विकल्पानामानन्त्यात्' इत्यत्रान्तरे ।

'ननु सर्वेष्वलङ्कारेषु नालङ्कारान्तरं व्यङ्ग्यं चकास्ति, तत्कथं गुणीभूतव्यङ्ग्येन लक्षितेन सर्वेषां संग्रहः' । मैवम्, वस्तुमात्रं वा रसो वा व्यङ्ग्यं सद् गुणीभूतं भविष्यति । तदेवाह– गुणीभूतव्यङ्ग्यस्य चेति । प्रकारान्तरेण वस्तुरसात्मनोपलक्षितस्य ।

यदि वेत्थमवतरणिका– ननु गुणीभूतव्यङ्ग्येनालङ्कारा यदि लक्षितास्तहि लक्षणं वक्तव्यं किमिति नोक्तमित्याशङ्क्याह् गुणीभूतेति । विषयत्वमिति लक्षणीयत्वमिति यावत् । केन लक्षणीयत्वम्? ध्वनिव्यतिरिक्तो यः प्रकारो व्यङ्ग्यत्वेनार्थानुगमो नाम तदेव लक्षणं तेनेत्यर्थः । व्यङ्ग्ये लक्षिते तद्गुणीभावे च निरूपिते किमन्यदस्य लक्षणं क्रियतामिति तात्पर्यम् । एवं 'काव्यस्यात्मा ध्वनि' रिति निर्वाह्योपसंहरति, तदयमित्यादिना सौभाग्यमित्यन्तेन । यत् प्रागुक्तं सकलसत्कविकाव्योपनिषद्भूतमिति तन्न प्रतारणमात्रमर्थवादरूपं मन्तव्यमिति दर्शयितुम्, तदिदमिति ॥ ३६ ॥

लोचन

"पण काय हो, अतिशयोक्ति हीच जर अशा स्वरूपाची (म्हणजे सर्व अलंकारांमध्ये प्राणभूत होऊन राहिलेली) असेल, तर वृत्तिकारांनी (द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'वाच्य अलंकारांमध्ये व्यंग अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन'") 'कारण पहिल्याने,

एकतर' [६] असे शब्द योजून क्रम कशासाठी सुचविला?' अशी शंका कल्पून वृत्तिकार तिला 'आणि अशी' इ. शब्दांनी उत्तर देतात. 'अशी (परिस्थिती)' म्हणजे अतिशयोक्तीने इतर अलंकारांमध्येही व्यंग्य स्वरूपात प्रवेश करणे (व त्यांचे सौंदर्य वाढविणे), ही (परिस्थिती). पण काय हो, असे असले तरी [७] देखील 'पहिल्याने' असा शब्द अतिशयोक्तीच्याच बाबतीत कोणत्या हेतूने वापरला? अशी शंका कल्पून तिचे निरसन वृत्तिकार 'त्या अलंकारांमध्ये' इ. शब्दांनी करितात. याप्रमाणे अलंकारांमध्ये तर व्यंग्यार्थांचा अंश असतो असे सांगितल्यावर त्यांमध्ये कोणकोणते दुसरे अलंकार व्यंग्यत्वाने प्रतीत होतात, त्यांचा तपशील वृत्तिकार 'आणि इतर अलंकारांमध्ये' इ. शब्दांनी सांगतात. रूपक वगैरे अलंकारांचे स्वरूप पूर्वीच [८] सांगितले आहे. पण (तरीही) निदर्शनेचे (भामहाने [९] केलेले) लक्षण पुढीलप्रमाणे– 'एखादा विशिष्ट (उपदेश रूप) अर्थ (एखाद्या वस्तूच्या किंवा प्राण्याच्या ठिकाणीं असणाऱ्या) क्रियेच्या द्वारेच प्रकट करणे म्हणजे निदर्शना होय.' (निदर्शनेचे) उदाहरण [१०] "ज्याचा प्रकाश (आता) क्षीण झाला आहे असा हा सूर्य अस्ताला जाण्याच्या बेतात आहे (व त्या द्वारे [११]) तो धनिक लोकांना 'उत्कर्षाचे पर्यवसान अपकर्षात होते [१२]' असा उपदेश करीत आहे. 'प्रेय अलङ्कारच' – कारण त्या व्याजस्तुतीचे पर्यवसान शेवटी स्तुतीत होते [१३] आणि त्या व्याजस्तुतीचे उदाहरण आम्ही दुसऱ्या उद्द्योतात दिलेच आहे. [१४] 'उपमा ही सूचित होऊ शकते–' यातील 'उपमा' या शब्दाने उपमेचेच आविष्कार असलेल्या रूपकादि अलंकारांचा बोध होतो किंवा सादृश्य हे सर्व औपम्यमूलक अलंकारांमध्ये आढळून येते, म्हणून 'उपमा' या शब्दाने सर्वच औपम्यमूलक अलंकारांचा बोध होतो. [१५] 'हे उघड आहे–' 'तो हिमालय तिच्यामुळे (म्हणजे पार्वतीमुळे) पावन आणि अलंकृतही झाला' या दिव्यासारख्या असणाऱ्या वाक्याने (या श्लोकातील तीनही उपमानांना) प्रकाशित केल्यामुळे येथे 'दीपक' व्यंग्यत्वाने [१६] प्रविष्ट झालेले आहे. (पावन होणे आणि अलङ्कृत होणे हा) साधारण धर्म या मालोपमेमध्ये अभिधेच्या पद्धतीनेच उक्त झाला आहे. 'त्या प्रकारचे–' म्हणजे पराकाष्ठेच्या सौंदर्याने युक्त असलेले, असा अर्थ. 'स्वरूप उत्तम प्रकारे स्पष्ट केल्यासारखे–' म्हणजे अशा अलंकारांचे जे स्वरूप गुणीभूत व्यंग्यार्थाच्या सौंदर्याने विरहित असेल, ते काव्यात समाविष्ट करणे इष्ट नाही. [१७] कारण 'जसा बैल असतो तसाच गवय असतो' ही उपमा; [१८] 'धान्याच्या खळ्यामधील खांब हा यज्ञीय पशु बांधण्याचा खांब आहे' हे रूपक; 'द्वित्व करावयास कारण असलेला स्वर १) पुढे आला असताना व २) द्वित्व करावयाचे असताना [१९] स्वराला (लोप, यण् इ.) आदेश होत नाहीत हा तंत्र या स्वरूपाचा 'श्लेष; [२०] **'तुदीशलातुर'** इ. सूत्रात [२१] 'यथासंख्य', 'गाईला, घोड्याला [२२]' इ. हे दीपक, 'हा खांब असेल किंवा पुरुष असेल [२३]' हा ससंदेह, 'ही चांदी नाही (पण शिंप आहे) [२४]' ही अपह्नुति 'धष्टपुष्ट (देवदत्त) दिवसा जेवीत नाही [२५]' हे पर्यायोक्त, 'तृतीयभूत. काळाचे प्रत्यय लावताना **'स्था'** धातूच्या व **घु** संज्ञक धातूंच्या शेवटी असलेल्या **'आ'** या स्वराला **इ** हा आदेश करावा ही तुल्ययोगिता [२६] सर्व 'ज्ञापके' ही अप्रस्तुतप्रशंसेची उदाहरणे; जसे– 'पदसंज्ञेचे विधान करिताना, 'अन्त' या शब्दाचा वापर हे, (पद या संज्ञेखेरीज) इतरत्र, संज्ञांचे विधान करतेवेळी प्रत्ययाचा निर्देश केला असताना तो प्रत्यय ज्याचे शेवटी आहे त्या शब्दाला ती संज्ञा होत नाही, प्रत्ययालाच [२७] होते, याचे ज्ञापक आहे. 'आक्षेपा'चे उदाहरण म्हणजे विभाषेचा **'उभयत्र विभाषा** [२८]' हा प्रकार असणाऱ्या उदाहरणांमध्ये पुढे 'विकल्प' हा विशेष अर्थ सांगण्याच्या इच्छेने 'विधि' इष्ट असला तरी त्याचा प्रथम निषेध वाच्यत्वाने संगितला जातो [२९] – निषेधाने 'विषय' हा 'सम' केल्यावर मगच निषेध प्रवृत्त होतो या न्यायाने अतिशयोक्तीची उदाहरणे म्हणजे 'ही कुंडी समुद्रच आहे' हे आणि 'विंध्य पर्वत वाढत गेला व त्याने सूर्याचा मार्ग अडविला [३०]' हे. याप्रमाणे इतर अलंकारांचीही उदाहरणे (शास्त्रीय वाङ्मयातून देता येतील). पण अशी उदाहरणे (सौंदर्यहीन असल्यामुळे ती) काव्याच्या द्रृष्टीने उपयोगाची नाहीत. यामुळे 'काव्यामधील अलंकारांमध्ये गुणीभूत झालेला व्यंग्यार्थ असणे हे त्या अलंकारांच्या अलंकारत्वाचे मर्म होय.' त्या गुणीभूत व्यंग्यार्थाने युक्त असणे असे अलंकारांचे लक्षण सांगितले, म्हणजे त्या अलंकाराचे स्वरूप चांगल्या रीतीने स्पष्ट होते. त्या गुणीभूतव्यंग्यतेच्या योगाने त्या अलंकारांचे संपूर्णपणे म्हणजे उत्तम प्रकारे

लक्षण केले गेले असल्यामुळे [३१] त्या सर्वांचे स्वरूप वाचकांना चांगल्याच तऱ्हेने ज्ञात होते. असे झाले नसते, तर या लक्षणात 'अव्याप्ति' हा दोष [३२] उत्पन्न झाला असता. म्हणून वृत्तिकार 'हे सामान्य लक्षण न सांगता एकेका अलंकाराचे' इ. विधान करितात. आणि अतिशयोक्ति, वक्रोक्ति, [३३] उपमा इ. अलंकार सौंदर्यविहीन असले, तर त्यांमध्ये अलंकारांचे सामान्यरूप असणे म्हणजे ते अलंकार इतर अलंकारांना व्यापणारे 'सामान्य' रूप असणे हे तर्काला धरून होणार नाही. आणि अतिशयोक्ति इ. अलंकारांचें सौंदर्य हे ह्या गुणीभूतव्यंग्यतेवर अवलंबून आहे, म्हणून असा म्हणजे गुणीभूत व्यंग्यार्थ अलंकारामध्ये असणे हेच कोणत्याही अलंकाराच्या अलंकारत्वाचे सर्वसामान्य लक्षण होय. आणि व्यंग्यार्थ सुंदर असणे म्हणजे त्या व्यंग्यार्थामध्ये रसाभिव्यक्ति करण्याचे सामर्थ्य असणे [३४] हे होय. रस हा स्वतःच सहृदयाचे मन विश्रांत होण्याचे स्थान असल्यामुळे तो आनंदस्वरूप असतो, म्हणून त्याच्या बाबतीत अनवस्थाप्रसंग [३५] उद्‌भवण्याचा प्रश्नच नाही, असा वृत्तिकारांचा आशय. 'बोलण्याच्या तऱ्हा अनंत—' याचे विवरण आम्ही पहिल्या उद्‌द्योतातच, 'भाषेमध्ये बोलण्याचे प्रकार अनंत असल्याने [३६]' इ. वाक्याचे व्याख्यान करिताना केले आहे.

'पण काय हो, प्रत्येक अलंकारात दुसरा अलंकार व्यंग्य असल्याचा प्रत्यय येत नाही. मग 'गुणीभूतव्यंग्य अलंकाराने युक्त असणे, असे अलंकारांचे सामान्य लक्षण केल्याने त्या लक्षणात सर्व अलंकारांचा समावेश होतो' असे कसे म्हणता येईल?' अशी शंका घेऊ नये, कारण (प्रत्येक अलंकारात दुसरा अलंकारच व्यंग्य नसला तरी) वस्तुरूप अर्थ किंवा रसादि हे गुणीभूत रूपाने व्यंग्य असू शकतील. म्हणूनच वृत्तिकार 'आणि काव्याच्या गुणीभूतव्यंग्य प्रकारात नेहमी' इ. विधान करितात. 'निराळ्या प्रकारचे' म्हणजे वस्तु किंवा रसादि या स्वरूपाचा व्यंग्यार्थ गुणीभूत असलेल्या प्रकारचे.

किंवा पूर्वपक्ष्याची शंका पुढीलप्रमाणेही असू शकेल :—

'पण काय हो, गुणीभूतव्यंग्य अलंकाराने युक्त असणे असे जर वृत्तिकारांना अलंवारांचे लक्षण करावयाचे असेल, तर त्या गुणीभूतव्यंग्य अर्थाचे वृत्तिकारांनी लक्षण सांगावयास पाहिजे होते, ते का सांगितले नाही?' अशी शंका कल्पून वृत्तिकार 'गुणीभूत व्यंग्यार्थाचे' इ. शब्दांनी तिचे निरसन करितात. वृतीतल्या **विषयत्वम्** याचा अर्थ **लक्षणीयत्वम्** असा, (म्हणजे 'गुणीभूत व्यंग्यार्थाचे लक्षण करणे योग्य होईल' असा) करावा. कोणत्या प्रकाराने लक्षण करणे योग्य होईल? असे विचाराल, तर काव्याचा ध्वनीखेरीज दुसरा जो प्रकार (म्हणजे वैशिष्ट्य), म्हणजे व्यंग्यार्थाने वाच्यार्थाला गुणीभूत असणे हा प्रकार (म्हणजे वैशिष्ट्य), त्या द्वारे (लक्षण करणे योग्य होईल).

व्यंग्यार्थ म्हणजे काय हे स्पष्ट केल्यावर आणि त्याच्या गुणीभावाचेही विवरण केल्यावर (काव्याच्या) या प्रकाराचे आणखी वेगळे लक्षण ते काय करावयाचे, हे तात्पर्य. याप्रमाणे 'ध्वनि हा काव्याचा आत्मा होय' ही (पहिल्या उद्‌द्योताच्या पहिल्या कारिकेत केलेली) प्रतिज्ञा पूर्ण करून या विवेचनाचा समारोप वृत्तिकार 'म्हणून ध्वनीचा एक निराळा' येथपासून 'सौंदर्य प्राप्त होत नाही' येथपर्यंतच्या वाक्याने करितात. पूर्वी (प्रथमखंड, उद्‌द्योत – १ काव्याचे मुख्य प्रयोजन 'आनंद' वर) 'सर्व सत्कवींच्या काव्यांचे सार असलेले ध्वनीचे स्वरूप)' असे जे म्हटले होते, ती वाचकांची केवळ फसवणूक किंवा ध्वनीची केवळ (अंधश्रद्धेने केलेली) स्तुति होती असे समजू नये, हे दाखविण्यासाठी (वृत्तिकार) 'तेव्हा याप्रमाणे' असे (आवर्जून सांगतात) ॥ ३६ ॥

टीपा

१) उपमेच्या ज्या प्रकारात साधारणधर्म हा शब्दांनी वाच्य केलेला नसतो, तोच प्रकार येथे 'उपमा' या शब्दाने विवक्षित आहे.

२) म्हणजे येथे व्याजस्तुतीचा वाच्य निंदेतून सूचित होणारी स्तुति हा एकच प्रकार विचारात घेतलेला दिसतो.

३) येथे मालोपमा वाच्य असून दीपक सूचित होत आहे. कारण एकाच ('पावन व भूषित झाला' या) साधारण धर्मांचा एकदाच निर्देश झालेला असून तो मालोपमेमध्ये असणाऱ्या अनेक उपमानांशी संबद्ध होतो. वर उद्धृत केलेल्या 'कुमारसंभवा'तील संपूर्ण श्लोकाचा अनुवाद पुढीलप्रमाणे आहे– अतिशय, तेजस्वी ज्योतीमुळे ज्याप्रमाणे दिवा, गंगेमुळे ज्याप्रमाणे स्वर्गाचा मार्ग, । किंवा सुसंस्कृत वाणीने ज्याप्रमाणे विद्वान् त्याप्रमाणे तो हिमालय तिच्यामुळे (पार्वतीमुळे) शुद्ध व भूषित झाला.

वस्तुतः साध्या उपमेतही साधारण धर्म उल्लिखित असल्यास दीपक सूचित होऊ शकेल, कारण तो साधारण धर्म उपमेय व उपमान या दोहोंशी संबद्ध असतो.

४) पाहा– **"अनभ्युपाय एव शब्दानां प्रतिपत्तौ प्रतिपदपाठः । कथं तहि इमे शब्दाः प्रतिपत्तव्याः । किंचित् सामान्यविशेषवत् लक्षणं प्रवर्त्यम्, येन अल्पेन यत्नेन महतो महतः शब्दौघान् प्रतिपद्येरन् । किं पुनस्तत्? उत्सर्गापवादौ । कश्चिद् उत्सर्गः कर्तव्यः कश्चिदपवादः ।"** – महाभाष्यकारः पतंजलि. तसेच अलंकारांचे सामान्य तत्त्व म्हणजे गुणीभूतव्यंग्य अर्थाचा स्पर्श हे एकदासांगितल्यावर सर्व अलंकारांचे स्वरूप सुस्पष्ट होईल.

५) **ध्वनिनिष्यन्द** याचा वरीलप्रमाणे अर्थ आम्ही 'दीधिति' या टीकेस अनुसरून केला आहे.

६) 'एकतर' असा शब्द योजिल्याने दुसरेही काही अलंकार व्यंग्य असू शकतात, असे सांगण्याचा उद्देश आहे.

७) म्हणजे अतिशयोक्तीप्रमाणे इतर अलंकारही व्यंग्य स्वरूपात मिसळून दुसऱ्या अलंकारांचे सौंदर्य वाढवितात असे असताना अतिशयोक्तीलाच अग्रक्रम का दिला?

८) 'पूर्वीच' याचा अर्थ 'पूर्वीच्या आलंकारिकांनी' असा घेणे भाग आहे, कारण ध्वन्यालोकात किंवा लोचनात रूपक, उपमा व तुल्ययोगिता या अलंकारांची लक्षणे कोठेही दिली नाहीत. त्या अलंकारांच्या ध्वनीची उदाहरणे मात्र दिली आहेत.

९) काव्यालंकार, ३·३३

१०) काव्यालंकार, ३·३४

११) निदर्शनेच्या या उदाहरणामध्ये उपमा व्यंग्य आहे, कारण सूर्याचे अस्ताला जाणे व श्रीमंत लोकांच्या संपत्तीचा नाश होणे यांमध्ये साम्य आहे.

१२) तुलनार्थ पाहा, महाभारतातील पुढील श्लोक –
सर्वे क्षयान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छयाः ।
संयोगा विप्रयोगान्ताः सर्वमुत्पादि भङ्गुरम् ॥
Gray च्या Elegy मधील 'The paths of glory lead but to the grave' हे ही वचन पाहावे.

१३) द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'वाच्य अलंकारांमध्ये व्यंग्य अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होत'" याचे उदाहरणांसह प्रतिपादन वरील २ ही टीप पाहा.

१४) वस्तुतः व्याजस्तुतीचे उदाहरण लोचनात दुसऱ्या उद्‌धोतात दिलेले नसून पहिल्या उद्‌धोतात, प्रथम खंड, "उद्‌द्योत -१ 'सारांश, व्यंगार्थयुक्त अलंकार वेगळे आणि ध्वनि वेगळा'" वर दिले आहे. 'दुसऱ्या' हा शब्द लेखनिकाच्या प्रमादामुळे किंवा विस्मरणामुळे लिहिला गेला असावा.

१५) अभिनवगुप्तांचे हे विधान चिन्त्य आहे, कारण ससंदेहादि औपम्यमूलक अलंकारांमध्ये उपमा सूचित होत असली तरी इतर म्हणजे रूपकादि अलंकार कसे सूचित होतात हे समजत नाही. कदाचित् वामनाने सर्व साम्यमूलक अलंकारांना 'उपमाप्रपंच' म्हटले असल्यामुळे 'उपमा' या शब्दामध्ये रूपकादींचा अंतर्भाव केला असावा मागे प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'उभयशक्तिमूल ध्वनीचे उदाहरण. अर्थशक्तिमूल 'अनुरणनरूप' ध्वनीचे दोन प्रकार'" वर अभिनवगुप्तांनी 'ससंदेह अलंकारातून उपमा किंवा रूपक सूचित होत आहे' असे म्हटले आहे.

१६) येथे **इव** या शब्दाने उपमा वाच्य झालेली असल्यासे दीपक व्यंग्य आहे. **इव** च्या ऐवजी **च** असे म्हटले असते, तर मात्र दीपक वाच्य झाले असते व उपमा व्यंग्य झाली असती. म्हणजे असे म्हणता येईल की, जेथे उपमा वाच्य असते तेथे दीपक व्यंग्य असते व जेथे दीपक वाच्य असते तेथे उपमा व्यंग्य असते.

१७) ते स्वरूप काव्यात समाविष्ट करणे इष्ट नाही, कारण ते सौंदर्यविरहित असल्यामुळे ते अलंकारांना 'अलंकार' ही संज्ञा देण्यास समर्थ होत नाही. म्हणूनच वामनाने **काव्यं ग्राह्यमलंकारात् । सौंदर्यमलंकारः ।** असे म्हटले व मम्मटाने **वैचित्र्यं चालंकारः ।** असे विधान केले. अलंकाराच्या ठिकाणी गुणीभूत व्यंग्यार्थामुळे सौंदर्य उत्पन्न होते, असे ध्वनिवाद्यांचे म्हणणे.

१८) हे उदाहरण 'उपमान' या प्रमाणाचे म्हणून न्याय व वैशेषिक इ. दर्शनासंबधीच्या ग्रंथात आढळते. पाहा, न्यायसूत्र १–१–६ व त्यावरील वात्स्यायन भाष्य.

१९) द्विर्वचनेऽचि । या अष्टाध्यायीमधील १–१–५९ व्या सूत्रातील द्विर्वचने हा शब्द द्‌व्यर्थी आहे.

२०) 'तन्त्र' हा शब्द प्रथम खंड "उद्‌द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वर आला आहे. "उद्‌द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वरील १६ वी टीप ही पाहा.

२१) अष्टाध्यायी, ५–३–९४ **'तुदी, शलातुर, वर्मती व कूचवार'** या शब्दांना अनुक्रमे **एय, ईय, एय व य** असे तद्धित प्रत्यय 'ते ह्याचे निवासस्थान' या अर्थी लागतात.

२२) हे वाक्य प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'सारांश, व्यंग्यार्थकृत अलंकार वेगळे आणि ध्वनि वेगळा'" वर आले आहे. "उद्द्योत – १ 'ध्वनिकाव्य व काव्यातील 'ध्वनि'"वरील बारावी टीप ही पाहा.

२३) अयथार्थज्ञानाच्य 'संशय' या प्रकाराचे विवेचन करिताना हे उदाहरण शास्त्रीय ग्रंथांत दिलेले आढळते.

२४) हा शुक्तिकारजत दृष्टांत प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'लावण्य हे अलंकार किंवा अवयव यांहून निराळे'" व "उद्द्योत – १ 'प्रयोजनवती लक्षणेत चार व्यापार'", इ. पृष्ठांवर आला आहे वस्तुतः शिंप हे उपमेय व चांदी हे उपमान समजून अपहूनुतीचे उदाहरण देणे नेहमीच्या पद्धतीस अनूसरून झाले असते. अभिनवगुप्तांनी मात्र चांदी हे उपमेय व शिंप हे उपमान मानून उदाहरण दिलेले आहे.

२५) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" व "उद्द्योत – २ 'अलंकारध्वनीची उदाहरणे'".

२६) अष्टाध्यायी, १–२–१७ येथे स्था हा धातु व घुसंज्ञक धातु हे दोन्ही 'प्रस्तुत' असून त्या दोहोंचा 'इत्व' या एकाच धर्माशी संबंध जोडला आहे, म्हणून येथे तुल्ययोगितेचे लक्षण लागू पडते. पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'अलंकारध्वनीची उदाहरणे'" वरील, टीप २.

२७) **सुप्तिङन्तं पदम्** (अष्टाध्यायी, १–४–१४) या सूत्राने पदसंज्ञेचे विधान केले असून त्या सूत्रात **अन्त** हा शब्द वापरला आहे. वस्तुतः **येन विधिस्तदन्तस्य** । या (१–१–७२) सूत्रानुसार 'अन्त' हा शब्द वापरण्याची जरूर नव्हती. तरीही तो ज्ञापक म्हणून वापरला आहे. तो पुढील अर्थाचा ज्ञापक आहे. प्रस्तुत सूत्राव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्रत्ययाचा निर्देश करून एखाद्या संज्ञेचे विधान केले असताना ती संज्ञा त्या प्रत्ययाने शेवट होणाऱ्या शब्दाला होत नाही, तर ती केवळ त्या प्रत्ययालाच होते. उदा, **तरप्तमपौ घः** (१–१–२२) या सूत्रान्वये **घ** ही संज्ञा **तर** व **तम** या प्रत्ययांनाच होते, लघुतर, लघुतम या शब्दांना होत नाही.

२८) **अष्टाध्यायीमध्ये न वेति विभाषा ।** (१–१–४४) हे सूत्र आहे. त्याचा अर्थ– एखाद्या कार्याचा प्रथम निषेध करून मग 'विकल्प' म्हणजे दुसऱ्या पक्षी ते कार्य करावे असे जेथे सांगितले असेल, तेथे विभाषा असते असे समजावे. व्याकरणशास्त्रात विभाषेचे तीन प्रकार सांगितले आहेत– (१) **प्राप्ते विभाषा** (म्हणजे एखाद्या सूत्राने काही करणे 'प्राप्त' झाल्यावर त्याच्या बाबतीत सांगण्यात येणारी विभाषा), (२) **अप्राप्ते विभाषा** (म्हणजे दुसऱ्या कोणत्याही नियमाने जे करणे प्राप्त नाही, अशा एखाद्या गोष्टीबाबत सांगितली जाणारी विभाषा) आणि (३) **उभयत्र विभाषा** (म्हणजे काही वेळा प्राप्त विषयाबाबत तर काही वेळा अप्राप्त विषयाबाबत– अशी, दोन्ही प्रकारच्या विषयांबाबत अमलात आणण्यास सांगितलेली विभाषा), **विभाषा श्वेः ।** (६–१–३०) हे सूत्र **उभयत्र** विभाषेचे उदाहरण म्हणून सांगितले जाते. या सूत्राचा अर्थ असा– **श्वि** धातूची परोक्षभूतकाळी व पौनःपुन्यार्थक रूपे करिताना **श्वि** मधील **व्** चे संप्रसारण करण्याबाबत विभाषा आहे. **वचिस्वपियजादीनां किति ।** (६–१–१५) या सूत्राप्रमाणे परोक्षभूतकाळाची द्विवचनी व बहुवचनी रूपे करिताना **श्वि** या धातूमधील व् चे संप्रसारण करणे 'प्राप्त' झाले आहे. त्याबाबत 'विभाषा' आहे असे **विभाषा**

श्विः हे सूत्र सांगते. एवढ्या पुरती ही **प्राप्ते** विभाषा होय. म्हणजे **श्वि** धातूची परोक्षभूतकाळी तृतीय पुरुषो द्विवचनाची व बहुवचनाची रूपेः, **शुशुवतुः, शिश्वियतुः, शुशुवुः, शिश्वियुः** अशी दोन दोन होतील.

आता परोक्षभूतकाळाचा तृतीय पुरुषी एक वचनाचा प्रत्यय **कित्** नाही, **पित्** आहे. म्हणून तो लागताना संप्रसारण करणे प्राप्त नाही. पण **विभाषा श्वेः** हे सूत्र तोही प्रत्यय लावताना विकल्पाने संप्रसारण करावे असे सांगते, म्हणून या पुरती ही **अप्राप्ते** विभाषा झाली. याप्रमाणे **श्वि** धातूची परोक्षभूतकाळी तृतीय पुरुषी एक वचनाची रूपे **शुशाव, शिश्वाय** अशी दोन होतील. अशा रीतीने काही वेळा **प्राप्ते** व काही वेळा **अप्राप्ते** म्हणून **विभाषा श्वेः** । या सूत्राने सांगितलेली विभाषा ही **उभयत्र विभाषा** होय.

२९) 'आक्षेप' अलंकाराची माहिती प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'आक्षेप म्हणजे ध्वनि नव्हे'" वर 'लोचना'त व पुढे टीप १ मध्ये आली आहे. 'उभयत्र विभाषे' च्या उदाहरणामध्ये 'विकल्प' हा विशेष अर्थ ज्ञात करून देण्याच्या इच्छेने आधी वाच्यत्वाने निषेध केलेला असतो, म्हणून केवळ व्याख्येपुरता विचार केल्यास **विभाषा श्वेः** सारख्या ठिकाणी 'आक्षेप' अलंकार मानण्याचा प्रसंग येईल असे अभिनव गुप्तांचे म्हणणे. पण काटेकोरपणे विचार करीत 'आक्षेप' अलंकारामध्ये निषेधाच्याद्वारे विशेष अर्थ 'सुचविण्याची' इच्छा असते, तर 'उभयत्र विभाषे' मधील 'विकल्प' हा विशेष अर्थही वाच्यच असतो, हा फरक आहे.

३०) अष्टाध्यायीतील २–३–५० या सूत्रावरील महाभाष्यात **विन्ध्यो वर्धितकम्** असा पाठ आढळतो. **वर्धितकम्** याचा अर्थ पानात वाढलेल्या अन्नाचा ढीग, असा आहे. 'तो ढीग म्हणजे विन्ध्य पर्वतच' असे म्हटल्यास ती अतिशयोक्ति होते हे स्पष्ट असल्यामुळें हा पाठ समर्पक वाटतो. **विन्ध्यो वर्धितवान** इ. पाठ अभिनवगुप्तांनी कोठून घेतला हे समजत नाही. विन्ध्य वाढत जाऊन त्याने सूर्याचा मार्ग अडविला ही पुराणात वस्तुस्थिती म्हणून सांगितली असल्यामुळे ती अतिशयोक्ति मानावी किंवा नाही हा प्रश्न आहे.

३१) वृत्तीच्या द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन'" पासून पुढील काही पृष्ठांवर.

३२) गुणीभूतव्यंग्यार्थ असल्यामुळे अलंकाराना अलंकारत्व प्राप्त होते असे न म्हणता अलंकाराच्या केवळ बहिरंगाला 'अलंकार' म्हटले, तर ते लक्षण अलंकाराच्या खऱ्या स्वरूपाला व्यापणार नाही, अशी अव्याप्ति. येथे अव्याप्ति या ऐवजी अतिव्याप्ति ही शब्दयोजना अधिक चांगली झाली असती कारण ते केवळ बहिरंगाचे वर्णन वर सांगितलेल्या शास्त्रातील उदाहरणांनाही लागू पडेल व त्या लक्षणात 'अतिव्याप्ति' हा दोष उत्पन्न होईल.

३३) येथे अभिनवगुप्तांनी 'वक्रोक्ति' हा शब्द कोणताही अलंकार या अर्थी वापरला नसून 'वक्रोक्ति नावाचा विशिष्ट अलंकार' या अर्थी वापरला आहे हे उघड आहे. वक्रोक्तीचे श्लेषवक्रोक्ति व काकुवक्रोक्ति असे दोन प्रकार आहेत. त्यांची लक्षणे व उदाहरणे यांसाठी पाहा, रूद्रट, काव्यालंकार २–१४ ते १७ व मम्मट, काव्यप्रकाश, ९–१.

३४) रस हाच काव्याचा आत्मा होय. वस्तुरूप व अलंकाररूप व्यंग्यार्थ मग तो व्यंग्यार्थ काव्यात प्रधान असो किंवा गूणीभूत असो– त्यामध्ये रसाभिव्यक्ति करण्याचे सामर्थ्य असलेच पाहिजे, यावर अभिनवगुप्तांचा भर

आहे, तुलनार्थ पाहा, प्रथमखंड "उद्‌द्योत – १ 'पारध्याने क्रौञ्चपक्ष्यांच्या जोडप्यांपैकी नर मारला की मादी" (टीप ४)'".

३५) अलंकारांचे सौंदर्य त्यातील गुणीभूत व्यंग्यार्थाच्या सौंदर्यावर अवलंबून आहे. गुणीभूत व्यंग्यार्थांचे सौंदर्य तो अर्थ व्यंग्य असण्यावर अवलंबून आहे असे म्हटल्यास व्यंग्य असणे याला सौंदर्य कशामुळे प्राप्त होते असा प्रश्न उद्‌भवेल. त्याचे काहीतरी कारण सांगितल्यास ते कारण कशामुळे सुंदर होते अशा प्रश्नाची मालिका कधी संपणारच नाही व म्हणून 'अनावस्था प्रसंग' उत्पन्न होईल. पण रस हा स्वतःच आनंदरूप असल्यामुळे तो सुंदर कशाच्या योगाने होतो हा प्रश्नच उद्‌भवत नाही. म्हणून गुणीभूत व्यंग्यार्थाचे सौंदर्य त्यास रसाभिव्यक्ती करण्याचे सामर्थ्य असणे यावरच अवलंबून आहे असे म्हटल्याने अनवस्था टळते.

३६) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'अभाववाद्यांचा तिसरा वर्ग'".

ध्वन्यालोकः

मुख्या महाकविगिरामलंकृतिभृतामपि ।
प्रतीयमानच्छायैषा भूषा लज्जेव योषिताम् ॥ ३७ ॥

अनया सुप्रसिद्धोऽप्यर्थः किमपि कामनीयकमानीयते । तद्यथा–
'विस्रम्भोत्था मन्मथाज्ञाविधाने ये मुग्धाक्ष्याः केऽपि लीलाविशेषाः ।

अक्षुण्णास्ते चेतसा केवलेन स्थित्वैकान्ते संततं भावनीयाः ॥'

इत्यत्र केऽपीत्यनेन पदेन वाच्यमस्पष्टमभिदधता प्रतीयमानं वस्त्वाक्लिष्टमनन्तमर्पयता का छाया नोपपादिता ।

ध्वन्यालोकः

अलंकार धारण केलेल्या स्त्रियांच्या बाबतीतसुद्धा ज्याप्रमाणें लज्जा हे मुख्य भूषण असते, त्याप्रमाणे महाकवींची काव्यरचना इतर अलंकारांनी समृद्ध असली, तरी व्यंग्यार्थांमुळे प्राप्त होणारे सौंदर्य हेच (त्या काव्यरचनेचे) मुख्य भूषण होय. ॥ ३७ ॥

या व्यंग्यार्थाच्या छटेमुळे नेहमीचा, अगदीं परिचयाचा असलेला विषयसुद्धा काही अवर्णनीय सौंदर्याने नटलेला दिसतो. याचे उदाहरण असे :–

"मदनाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी रतिक्रीडेच्या वेळी निःसंकोचपणे उपस्थित होणाऱ्या, त्या चारुनेत्रीच्या अवयवांच्या व डोळ्यांच्या, प्रतिक्षणी नवनवीन व आगळ्याच अशा ज्या विलासपूर्ण हालचालीं, त्यांची एकांतात राहून एकाग्र मनानेच यथार्थ कल्पना करिता येईल."

या उदाहरणातील 'आगळ्याच' या पदाने वाच्यार्थ अस्पष्टपणेच सांगून व अनंत व्यंग्यार्थ अनायासे प्रकट करून काव्याला कोणते सौंदर्य प्राप्त करून दिले नाही बरे?

लोचनम्

मुख्या भूषेति । अलंकृतिभृतामपि । अपिशब्दादलंकारशून्यानामपीत्यर्थः । प्रतीयमानकृता छाया शोभा, सा च लज्जासदृशी गोपनासारसौन्दर्यप्राणत्वात् । अलंकारधारिणीनामपि नायिकानां लज्जा मुख्यं भूषणम् । प्रतीयमाना छाया अन्तर्मदनोद्भेदजहृदयसौन्दर्यरूपा यया । लज्जा ह्यन्तरुद्भिन्न मान्मथविकारजुगोपयिषारूपा मदनविजृम्भैव । वीतरागाणां यतीनां कौपीनापसारणेऽपि त्रपाकलङ्कादर्शनात् । तथा हि कस्यापि कवे :— 'कुरङ्गीवाङ्गानि—' इत्यादिश्लोकः । तथा प्रतीयमानस्य प्रियतमाभिलाषानुनाथनमानप्रभृतेः छाया कान्तिः यया । शृङ्गारसतरङ्गिणी हि लज्जावरुद्धा निर्भरतया तास्तान् विलासान्नेत्रगात्रविकार परम्परारूपान् प्रसूत इति गोपनासारसौन्दर्य लज्जाविजृम्भितमेतदिति भावः ।

विस्रम्भेति । मन्मथाचार्येण त्रिभुवनवन्द्यमानशासनेन अत एव लज्जा साध्वसध्वंसिना दत्ता येयमलङ्घनीयाज्ञा तदनुष्ठानेऽवश्यकर्तव्ये सति साध्कसलज्जात्यागेन विस्रम्भसंभोगकालोपनताः, मुग्धाक्ष्या इति अकृतकसंभोगपरिभावनोचितदृष्टिप्रसरपवित्रिता येऽन्ये विलासा गात्रनेत्रविकाराः, अअ एवाक्षुण्णा नवनवरूपतया प्रतिक्षणमुन्मिषन्तः, ते केवलेन नान्यत्राव्यग्रेणैकान्तावस्थानपूर्व सर्वेन्द्रियोपसंहारेण भावयितुं शक्या अर्हा उचिताः । यतः केऽपि नान्येनोपायेन शक्यनिरूपणाः ॥ ३७ ॥

लोचन

'मुख्य भूषण,' 'अलंकार धारण केलेल्यांचे सुद्धा' यातील 'सुद्धा' या शब्दाचा अलंकारशून्य असलेल्या स्त्रियांच्या बाबतीत सुद्धा असा अर्थ होतो. व्यंग्य अर्थामुळे निर्माण झालेली छाया म्हणजे शोभा ही लज्जेसारखी असते; कारण झाकल्यामुळे प्राप्त झालेले कमालीचे सौंदर्य हेच दोहोंचेही [१] प्राणभूत तत्त्व होय. नायिकांनी अंगावर अलंकार धारण केले असले, तरी लज्जा हेच त्यांचे मुख्य भूषण होय, (किंवा) जिच्यामुळे त्या स्त्रियांच्या ठिकाणी मदनविकार उदित झाल्याने उत्पन्न झालेली हृदयाची सुन्दरता प्रकट होते अशी लज्जा म्हणजे हृदयात उदय पावणारा मदनविकार झाकण्याची इच्छाच असून ती मदनाची लीलाच होय. कारण विरागी संन्याशांचे कटिवस्त्र दूर केले तरी त्यांच्या चेहऱ्यावर लज्जेने काळिमा उत्पन्न झालेला दिसत नाही. कारण कोणातरी कवीने 'हरिणीप्रमाणे जी आपली गात्रें [२]' इ. श्लोक रचला आहे (व त्यामध्ये मदनाच्या लीलेचे वर्णन केले आहे.) त्याचप्रमाणे सूचित होणाऱ्या प्रियकराविषयीचा अभिलाष, त्याचा अनुनय, मान वगैरेंना जिच्यामुळे रमणीयता प्राप्त होते अशी [३] लज्जा (असाही अर्थ होऊ शकेल). कारण शृंगाररसांची सरिता लज्जेने अडविली गेली असताना तिला आणखीच भर येऊन ती डोळे व इतर अवयव यांच्या नाना प्रकारच्या हालचाली रूपी त्या त्या विलासांच्या आविष्कारास कारणीभूत होते. [४]' म्हणून मनातील प्रेमभावना झाकण्यामुळे उत्पन्न झालेले कमालीचे सौन्दर्य हे स्वरूप असलेल्या लज्जेचा हा सर्व प्रभाव होय, हा भावार्थ.

'(मदनाच्या आज्ञेचे). निःसंकोचपणे' — ज्या मदनरूपी गुरूची आज्ञा त्रैलोक्य शिरसावन्द्य मानिते व म्हणूनच जो मदन लज्जा व भय यांचा नाश करितो, त्या मदनगुरूने केलेली जी मोडता न येण्याजोगी

आज्ञा, तिचे पालन करणे आवश्यक असताना नायिकेने भय व लज्जा झुगारून दिल्याने तिच्यासह निःसंकोचपणे होणाऱ्या रतिक्रीडेच्या वेळी उपस्थित झालेले (आणि) 'चारुनेत्रीच्या' – निर्व्याजपणे रतिसुखाचा आस्वाद घेण्याचा अटळ परिणाम म्हणून उत्पन्न झालेल्या डोळ्यांच्या हालचालींमुळे सुंदर झालेले जे अवर्णनीय असे विलास म्हणजे अवयव व नेत्र [५] यांचे जे मोहक विभ्रमरूपी आविर्भाव 'अक्षुण्ण' म्हणजे प्रत्येक क्षणी नवनवीन रूपाने प्रकट [६] होत होते, त्या मोहक आविर्भावांचे 'केवळ' म्हणजे अन्यत्र कोठेही न गुंतलेल्या मनाने, एकान्तात राहून व सर्व इंद्रियांचे व्यापार आवरूनच चिंतन करणे शक्य आहे किंवा योग्य आहे. [७] कारण ते विलास आगळेच असतात, म्हणजे त्यांचे वर्णन दुसऱ्या कोणत्याही प्रकारे करणे शक्य नाही. ॥ ३७ ॥

टीपा

१) दोहोंचेही म्हणजे स्त्रियांच्या लज्जेचे आणि काव्यातील व्यंग्य अर्थाचे. झाकण्यामुळे सौंदर्य प्राप्त होते ही कल्पना पूर्वी अनेकवार येऊन गेली आहे. (उदा प्रथम खंड. पृ. ५७०–५७१.)

२) हा संपूर्ण श्लोक असा आहे– **कुरङ्गीवाङ्गानि स्तिमितयति गीतध्वनिषु यत्, सखीं कान्तोदन्तं श्रुतमपि पुनः प्रश्नयति यत् । अनिद्रं यच्चान्तः स्वपिति तदहो वेदभ्यभिनवां प्रवृत्तोऽस्याः सेक्तुं हृदि मनसिजः प्रेमलतिकाम् ॥** मम्मटांने काव्यप्रकाशातील १० व्या उल्लासात निरङ्ग रूपकाचे उदाहरण म्हणून हाच श्लोक उद्धृत केला आहे. (पाहा, झळकीकर आवृत्ति, पृ. ५९८). या श्लोकाचे मराठी भाषांतर असे– 'गाण्याचे सूर कानी पडले असताना ज्या अर्थी एखाद्या हरिणीप्रमाणे ही आपली गात्रे निश्चल करिते, ज्या अर्थी प्रियकरासंबंधीचे वृत्त ऐकल्यावरही मैत्रिणीलाही तेच पुनः विचारते, आणि ज्या अर्थी झोप न लागता ही घरातल्या घरात शय्येवर नुसती पडून राहते, त्या अर्थी मला वाटते की, हिच्या मनात नव्याने उदित झालेल्या प्रेमवेलीवर मदन जलसिंचन करू लागला आहे.'

'लज्जा ही मदनविकार झाकण्याचे साधन आहे' या आपण केलेल्या विधानाचे उदाहरण म्हणून अभिनवगुप्तांनी प्रस्तुत श्लोक उद्धृत केला आहे. पण वस्तुतः त्या नायिकेच्या या श्लोकात वर्णिलेल्या हालचाली उलट तिचा मदन विकार प्रकटच करावयास कारण होतात. या श्लोकात मदनाच्या लीलेचे म्हणजे प्रभावाचे वर्णन केले आहे, या दृष्टीने अभिनवगुप्तांनी या श्लोकाचा निर्देश केला असावा.

३) प्रतीयमानच्छाया हा समास स्त्रियांच्या लज्जेकडे घेताना **प्रतीयमाना छाया यया (लज्जया)** असा बहुव्रीहि घेतला असून महाकवींच्या वाणीकडे घेताना तो **प्रतीयमानकृता छाया** असा मध्यमपदलोपी कर्मधारय घेतला आहे. मात्र लज्जेकडे घेताना या समासाचा अर्थ अभिनवगुप्तांनी दोन प्रकारांनी लावला आहे.

४) तुलनार्थ पाहा, अभिज्ञानशाकुन्तल, २–१७ मधील पुढील ओळ– **पुरः प्रतिहते शैले स्रोतः स्रोतोवहो यथा** (द्वैधीभवति)।

५) 'नेत्र' हा शब्द येथे पुनरुक्त झालेला आहे, कारण याच्या लगेच आधी 'डोळ्यांच्या हालचाली' यात तो येऊन गेला आहे.

६) तुलनार्थ पाहा, माघ, शिशुपालवध, ४—१७ मधील पुढील प्रसिद्ध वचन—**क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः ।**

७) विध्यर्थी धातुसाधित विशेषणांच्या शक्य किंवा योग्य या दोन अर्थांसाठी पाहा, अष्टाध्यायी, ३—३—१६९ व १७२.

ध्वन्यालोकः

अर्थान्तरगतिः काक्वा या चैषा परिदृश्यते ।
सा व्यङ्ग्यस्य गुणीभावे प्रकारमिममाश्रिता ॥ ३८ ॥

या चैषा काक्वा क्वचिदर्थान्तरप्रतीतिर्दृश्यते सा व्यङ्ग्यस्यार्थस्य गुणीभावे सति गुणीभूतव्यङ्ग्यलक्ष्णं काव्यप्रभेदमाश्रयते । यथा 'स्वस्था भवन्ति मयि जीवति धार्तराष्ट्राः' ।

यथा वा— आम असइओ [गाथासप्तशती, ५—१७ येथे असइ म्ह ओसर असा पाठ आहे.] **ओरम पइव्वए ण तुएँ** [गाथासप्तशतीमध्ये तुह असा पाठ.] **मलिणिअं सीलं ।**

किं उण जणस्स जाअ व्व चंदिलं तं ण कामेमो ॥

शब्दशक्तिरेव हि स्वाभिधेयसामर्थ्याक्षिप्तकाकुसहाया सत्यर्थविशेषप्रतिपत्तिहेतुर्न काकुमात्रम् । विषयान्तरे स्वेच्छाकृतात्काकुमात्रात् तथाविधार्थप्रतिपत्त्यसम्भवात् । स चार्थः काकुविशेषसहायशब्दव्यापारोपारूढोऽप्यर्थसामर्थ्यलभ्य इति व्यङ्ग्यरूप एव । वाचकत्वानुगमेनैव तु यदा तद्विशिष्टवाच्यप्रतीतिस्तदा गुणीभूतव्यङ्ग्यतया तथाविधार्थद्योतिनः काव्यस्य व्यपदेशः । व्यङ्ग्यविशिष्टवाच्याभिधायिनो हि गुणीभूतव्यङ्ग्यत्वम् ।

ध्वन्यालोक

आणि जेव्हा स्वर बदलल्यामुळे (व्यंजनेने) दुसऱ्या अर्थाचा बोध होताना दिसतो, तेव्हा तो दुसरा (व्यंग्य) अर्थ गौण असला, तर तो (दुसऱ्या अर्थाचा) बोध या 'गुणीभूतव्यंग्य' प्रकारात अंतर्भूत होतो. ॥ ३८ ॥

आणि काहीं उदाहरणात स्वर बदलल्यामुळे दुसऱ्या (व्यंग्य) अर्थाची ही जी प्रतीति झालेली दिसते, ती त्या व्यंग्यार्थाला तेथे गौणत्व प्राप्त होत असल्यास [१] या गुणीभूतव्यंग्य स्वरूपाच्या काव्यप्रकारातच अंतर्भूत होते. उदा.— 'मी जिवंत असताना धृतराष्ट्राचे मुलगे निश्चिंत होतील [२] ?' किंवा जसे :—

"हो, आहोत आम्ही कुलटा. हे साध्वी स्त्रिये! तू गप्प बैस. तू मात्र आपले शील कलंकित होऊ दिले नाहीस. तरी पण (तथाकथित मोठ्या कुळातल्या) एका माणसाच्या लग्नाच्या बायकोसारखे आम्ही काही त्या न्हाव्याचा अभिलाष धरीत नाही!"

अशा उदाहरणांत शब्दाची अभिधाशक्ति हीच आपल्या वाच्यार्थाने (आपल्या सिद्धीसाठी) ओढून आणलेल्या स्वरातील बदलाच्या मदतीने विशिष्ट प्रकारच्या अर्थाचा बोध करून देण्यास कारण होते. केवळ स्वर बदलणे हे एकच काही दुसरा अर्थ सुचवू शकत नाहीं. कारण (तशी परिस्थिति नसलेल्या, म्हणजे वाच्यार्थाच्या सिद्धीसाठी काकूने सूचित झालेला व्यंग्यार्थ आवश्यक नसतो अशा) दुसऱ्या उदाहरणात आपल्या इच्छेने केवळ स्वर बदलल्यास तशा प्रकारच्या अर्थाची प्रतीति होणे शक्य नाही. आणि तो दुसरा अर्थ स्वरातील विशिष्ट बदलाचे साहाय्य असलेल्या अशा शब्दाच्या (अभिधारूपी) व्यापारावर उभा राहिलेला असला, तरी वाच्यार्थाच्या ठिकाणच्या व्यंजकत्व या सामर्थ्यामुळे लक्षात येतो [३], म्हणून तो व्यंग्य स्वरूपाचाच होय. पण जेव्हा तो व्यंग्य अर्थ वाच्यार्थाला उपकारक होऊनच त्या व्यंग्य अर्थाने विशिष्ट अशा वाच्यार्थाची प्रतीति होत असते, तेव्हा तशा प्रकारचा (म्हणजे वाच्यार्थाला उपकारक असा) व्यंग्य अर्थ प्रकाशित करणाऱ्या त्या काव्याला 'गुणीभूतव्यंग्य' अशी संज्ञा दिली जाते. कारण जे काव्य व्यंग्यार्थाने उपकृत अशा वाच्यार्थ्याचे प्रतिपादन करिते, ते काव्य गुणीभूतव्यंग्यकाव्य होय.

लोचनम्

गुणी भूतव्यङ्ग्यस्योदाहरणान्तरमाह— अर्थान्तरेति । 'कक लौल्ये' इ त्यस्य धातोः काकुशब्दः । तत्र हि साकाङ्क्षनिराकाङ्क्षादिक्रमेण पठ्यमानोऽसौ शब्दः प्रकृतार्थातिरिक्तमपि वाञ्छतीति लौल्यमस्याभिधीयते । यदि वा ईषदर्थे कुशब्दस्तस्य कादेशः । तेन हृदयस्थवस्तुप्रतीतेरीषद्भूमिः काकुः तया याऽर्थान्तरगतिः स काव्यविशेष इमं गुणीभूतव्यङ्ग्यप्रकारमाश्रितः । अत्र हेतुर्व्यङ्ग्यस्य तत्र गुणीभाव एव भवति । अर्थान्तरगतिशब्देनात्र काव्यमेवोच्यते । न तु प्रतीतेरत्र गुणीभूतव्यङ्ग्यत्वं वक्तव्यं, प्रतीतिद्वारेण वा काव्यस्य निरूपितम् ।

अन्ये त्वाहु :— व्यङ्ग्यस्य गुणीभावेऽयं प्रकारः, अन्यथा तु तत्रापि ध्वनित्वमेवेति । तच्चासत्; काकुप्रयोगे सर्वत्र शब्दस्पृष्टत्वेन व्यङ्ग्यस्योन्मीलितस्यापि गुणीभावात् । काकुर्हि शब्दस्यैव कश्चिद्धर्मस्तेन स्पृष्टं 'गोप्यैवं गदितः सलेशम्' इति, 'हसन्नेत्रार्पिताकूतम्' इतिवच्छब्देनैवानुगृहीतम् । अत एव भम धम्मिअ' इत्यादौ काकुयोजने गुणीभूतव्यङ्ग्यतैव व्यक्तोक्तत्वेन तदाभिमानाल्लोकस्य । स्वस्था इति, भवन्ति इति, मयि जीवति इति, धार्तराष्ट्रा इति च साकाङ्क्षदीप्तगद्गदतारप्रशमनोद्दीपनचित्रिता काकुरसम्भाव्योऽयमर्थोऽत्यर्थमनुचितश्चेत्यमुं व्यङ्ग्यमर्थं स्पृशन्ती तेनैवोपकृता सती क्रोधानुभावरूपतां व्यङ्ग्योपस्कृतस्य वाच्यस्यैवाधत्ते । आमेति ।

आम असत्यः उपरम पतिव्रते न त्वया मलिनितं शीलम् ।
किं पुनर्जनस्य जायेव नापितं तं न कामयामहे ॥

इति च्छाया । आम असत्यो भवामः इत्यभ्युपगमकाकुः साकाङ्क्षोख पहासा । उपरमेति निराकाङ्क्षतया सूचनगर्भा । पतिव्रते इति दीप्तस्मितयोगिनी । न त्वया मलिनितं शीलमिति सगद्गदाकाङ्क्षा । किं पुनर्जनस्य जायेव मन्मथान्धीकृताः, चन्दिलं नापितमिति पामरप्रकृतिं न कामयामहे

इति निराकाङ्क्षगद्गोपहासगर्भा । एषा हि कयाचिन्नापितानुरक्तया कुलवध्वा दृष्टाविनयाया उपहास्यमानायाः प्रत्युपहासावेशगर्भोक्तिः काकुप्रधानैवेति । गुणीभावं दर्शयितुं शब्दस्पृष्टतां तावत्साधयति— शब्दशक्तिरेवेत्यादिना । नन्वेवं व्यङ्ग्यत्वं कथमित्याशङ्क्याह स चेति । अधुना गुणीभावं दर्शयति— वाचकत्वेति । वाचकत्वेऽनुगमो गुणत्वं व्यङ्ग्यव्यञ्जकभावस्य । व्यङ्ग्यविशिष्टवाच्यप्रतीत्या तत्रैव काव्यस्य प्रकाशकत्वं कल्प्यते; तेन च तथा व्यपदेश इति काकुयोजनायां सर्वत्र गुणीभूतव्यङ्ग्यतैव । अत एव 'मथ्नामि कौरवशतं समरे न कोपात्' इत्यादौ विपरीतलक्षणां य आहुस्ते न सम्यक्परामृशुः । यतोऽत्रोच्चारणकाल एव 'न कोपात्' इति दीप्ततारगद्गदसाकाङ्क्षकाकुबलान्निषेधस्य निषिध्यमानतयैव युधिष्ठिराभिमतसन्धिमार्गाक्षमारूपत्वाभिप्रायेण प्रतिपत्तिरिति मुख्यार्थबाधाद्यनुसरणविघ्नाभावात्को लक्षणाया अवकाशः । 'दर्शे यजेत' इत्यत्र तु तथाविधकाक्काद्युपायान्तराभावाद्भवतु विपरीतलक्षणा इत्यलमवान्तरेण बहुना ॥ ३८ ॥

लोचनम्

गुणीभूतव्यंग्याचे आणखी एक उदाहरण— '(आणि जेव्हा) ···· दुसऱ्या (व्यंग्य) अर्थाची' इ. शब्दांनी (कारिकाकार) सांगतात. 'हाव धरणे,' 'इच्छा करणे' या अर्थाच्या **कक्** या धातूपासून (**उण्** हा उणादि प्रत्यय लागून [४]) 'काकु' हा शब्द बनला आहे. आता वाक्यातील शब्दांना साकांक्ष [५] निराकांक्ष इ. प्रकारच्या स्वरविकारांची जोड दिली असताना ते शब्द स्वतःच्या वाच्यार्थाखेरीज आणखीही अर्थाची इच्छा बाळगतात, म्हणून त्या शब्दांच्या ठिकाणी 'हाव असणे' हा धर्म असतो, असे 'काकु' या शब्दाने सांगितले जाते. [६] किंवा **कु** या अल्प, थोडे या अर्थी असलेल्या शब्दाला **का** असा आदेश होतो, असे मानावे. [७] त्यामुळे वक्त्याच्या मनात असलेला आशय प्रकट होण्याचे जो काहीसे कारण असतो, तो (स्वरविकार म्हणजे) 'काकु.' त्या काकूमुळे जे आणखी (म्हणजे व्यंग्य) अर्थ समजण्याचे कारण असते, ते विशिष्ट काव्य ह्या म्हणजे गुणीभूतव्यंग्य प्रकारात येते. याला कारण व्यंग्यार्थ तेथे गुणीभूतच झालेला असतो, हे होय.

'दुसऱ्या अर्थाचा बोध' या शब्दाचा या ठिकाणी अर्थ 'काव्य' असाच आहे. [८] पण या ठिकाणी 'प्रतीति' (म्हणजे व्यंग्यार्थाचे ज्ञान) हीच गुणीभूतव्यंग्यकाव्य आहे असे मानू नये. किंवा त्या वाच्यार्थाहून भिन्न, गुणीभूतव्यंग्य अर्थाची प्रतीति त्या काव्यापासून होते, म्हणून त्या काव्यालाच वृत्तिकारांनी गुणीभूतव्यंग्य मानलेले आहे (असे समजावे.)

मात्र दुसरे कोणी (विवरणकार) म्हणतात — 'काकुयुक्त काव्यामध्ये व्यंग्यार्थ गुणीभूत झाला असला, तरच तेथे काव्याचा हा, म्हणजे गुणीभूतव्यंग्य प्रकार मानावा. पण तसे नसेल, (म्हणजे व्यंग्यार्थ गुणीभूत झाला नसून प्रधानच असेल), तर ते काव्यही ध्वनिकाव्यच आहे असे समजावे.' पण ते त्यांचे म्हणणे बरोबर नाही, कारण काकूचा उपयोग केलेल्या सर्व काव्यांमध्ये व्यंग्यार्थ प्रकट होत असला, तरी तो व्यंग्यार्थ शब्दांतील काकूचे कार्य असल्यामुळे त्या व्यंग्यार्थालाही गुणीभूतत्व येते [९] कारण 'काकु' हा शब्दाचाच एक धर्म आहे. त्या धर्माचा स्पर्श झालेला व्यंग्यार्थ 'असे गोपीने सूचकपणे ज्याला गोकुळात म्हटले [१०]' याप्रमाणे, किंवा 'आपल्या हसऱ्या डोळ्यांनी आपला अभिप्राय प्रकट करीत [११]' याप्रमाणे शब्दानेच 'उपकृत' झालेला [१२] (अतएव गुणीभूतच) समजावा. म्हणूनच 'हे धार्मिक!' इ. गाथेत 'काकु' या स्वरविक्रियेचा वापर केला, तर ते गुणीभूतव्यंग्याचेच उदाहरण होईल. कारण त्यावेळी त्यातील व्यंग्यार्थ (त्यातील शब्दांच्या सामर्थ्याने सूचित झाला, असे न वाटता) त्या काकूमुळे व्यंग्यार्थ स्पष्टपणे उक्त केला गेला असे लोकांना वाटू लागते. 'निश्चिंत' यात, 'होतील' यात, 'मी जिवंत असताना' यात आणि

'धृतराष्ट्राचे मुलगे' यात [१३] साकांक्ष म्हणजे अर्थाची अपेक्षा असणारी, दीप्त म्हणणे आवेशयुक्त, गद्‌गद म्हणजे भावनातिशयामुळे किंचित् अडखळणारी, तारस्वराने युक्त व स्वर कमीअधिक करणे यामुळे विविधता प्राप्त झालेली 'काकु', कौरवांना स्वास्थ्य लाभणे ही गोष्ट असंभवनीय आणि सर्वस्वी अयोग्य आहे हा व्यंग्य अर्थ उघड करिते आणि त्याच व्यंग्य अर्थाच्या साहाय्याने त्याच व्यंग्य अर्थाने सुशोभित झालेल्या वाच्यार्थाला क्रोधाचा अनुभाव बनविते. [१४] **'आम'** इ.– (या गायेची) **'आम असत्यो भवामः'** इ. ही संस्कृत छाया आहे). 'हो आहोत आम्ही कुलटा' यातील मान्यता दर्शविणारी काकु आकांक्षायुक्त म्हणजे आणखी अर्थ अपेक्षिणारी [१५] आणि उपहासगर्भ आहे. 'तू गप्प बैस' यातील काकु आणखी अर्थांची अपेक्षा बाळगणारी नसून सूचक [१६] आहे. 'हे साध्वी स्त्रिये!' यातील काकु उपरोधिक [१७] स्मिताने युक्त आहे. 'तू मात्र आपले शील मलिन होऊ दिले नाहीस' या शब्दांतील काकु अडखळत अडखळत बोलणे या रूपाची असून आणखी अर्थ अपेक्षिणारी आहे. [१८] 'पण एका माणसाच्या लग्नाच्या बायकोसारखे'– 'कामपीडेने विवेकशून्य होऊन आम्ही त्या चन्दिलाचा म्हणजे नापिताचा म्हणजे हीन दर्जाच्या मनुष्याचा अभिलाष धरीत नाही.' यातील काकु आणखी अर्थाची अपेक्षा नसणारी अडखळत बोलणे या रूपाची आणि उपहाससूचक आहे. कारण ही गाथा म्हणजे नापितावर आसक्त असलेल्या एका विवाहित स्त्रीला जिचे अनैतिक वर्तन दिसून आले व म्हणून ती विवाहित स्त्री जिचा उपहास करू लागली, अशा एका स्त्रीने दिलेला उपहासपूर्ण व आवेशयुक्त प्रतिटोला असल्यामुळे ते बोलणे काकुप्रधानच आहे. [१९] काकुयुक्त उदाहरणामधील व्यंग्यार्थ गुणीभूत झालेला असतो हे दर्शविण्यासाठी (वृत्तिकार) तो व्यंग्यार्थ काकुयुक्त शब्दाचा परिणाम असतो हे 'अशा उदाहरणांत अभिधाशक्ति हीच' इ. शब्दांनी प्रकट करितात. 'पण काय हो, असे असेल (म्हणजे तो अर्थ काकुयुक्त शब्दाचे कार्य असेल), तर तो अर्थ व्यङ्‌ग्य कसा म्हणता येईल?' अशी शंका कल्पून (वृत्तिकार) तिला 'आणि तो दुसरा अर्थ' इ. शब्दांनी उत्तर देतात. [२०] आता तो व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत झालेला असतो हे (वृत्तिकार) 'पण जेव्हा वाच्यार्थांला उपकारक' इ. शब्दांनी सांगतात. व्यंग्यव्यंजकसंबंध म्हणजे व्यंजकत्व (म्हणजे व्यंग्यार्थ) हा गुणीभूतव्यंग्य काव्यामध्ये वाचकत्वाला म्हणजे वाच्यार्थाला अनुसरणारा म्हणजे गुणीभूत असतो. अशा काव्यातून व्यंग्यार्थाने विशिष्ट अशा वाच्यार्थाची प्रतीति होत असल्यामुळे ते काव्य त्या म्हणजे व्यंग्यार्थविशिष्ट वाच्य अर्थांचेच बोधक मानले जाते व म्हणून त्या काव्याला 'गुणीभूतव्यंग्य' अशी संज्ञा दिली जाते. म्हणून जेथे जेथे काकूचा उपयोग केलेला असेल ती सर्व उदाहरणे गुणीभूतव्यंग्याचीच होत. म्हणूनच 'रागावल्यावर मी युद्धात शंभर कौरवांचा संहार करणार नाही. [२१]' इ. श्लोकात विपरीतलक्षणा आहे असे जे म्हणतात, त्यांनी काही योग्य विचार केलेला नाही. कारण या श्लोकात तो म्हणतेवेळी **न** आणि **कोपात्** या शब्दांतील दीप्त, तार, गद्‌गद आणि साकांक्ष (प्रश्नार्थक) काकूच्या सामर्थ्यामुळे (**न** यातील) निषेधाचा निषेधच होत असल्यामुळे युधिष्ठिराला इष्ट वाटत असलेला कौरवांशी समेट करण्याचा मार्ग भीमाला मुळीच सहन होत नाही या स्वरूपाचा अभिप्रायच प्रतीत होतो, म्हणून मुख्यार्थाचा बाध इ. लक्षणेच्या बीजांचा विचार करणे ही विघ्ने उपस्थित होत नसल्याने [२२] लक्षणेला येथे वावच कोठे आहे? पण 'दर्शाच्या दिवशी यज्ञ करावा' [२३] या उदाहरणात त्या प्रकारच्या म्हणजे 'काकु' वगैरेसारखा दुसरा उपाय उपलब्ध नसल्याने विपरीतलक्षणा असेना का? असो, ही इतर, अवांतर गोष्टींची [२४] फार चर्चा पुरे.

टीपा

१) कारिकेत **व्यङ्‌ग्यस्य गुणीभावे** असे शब्द असून वृत्तीत त्यांचे विवरण करिताना **गुणीभावे** यानंतर **सति** हा शब्द योजिला आहे. म्हणजे कारिका व वृत्ति यांप्रमाणे या शब्दांचा अर्थ 'व्यंग्यार्थ जेव्हा गुणीभूत असेल तेव्हा' असा होईल. कारिकेचा व वृत्तीचा अनुवाद आम्ही असाच केला आहे. अभिनवगुप्तांनी द्वितीय

खंड."उद्द्योत – ३ 'वाच्य अलंकारांमध्ये व्यंग अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन'" वर 'मात्र दुसरे कोणी म्हणतात' या सदराखाली जे दुसऱ्यांचे मत मांडले आहे, तेही आमच्या अनुवादासारखेच आहे. याप्रमाणे या कारिकेचे तात्पर्य असे होईल की, काकु या स्वरविक्रियेचा उपयोग असून जेथे व्यंग्यार्थ गुणीभूत झालेला असेल, ते काव्य 'गुणीभूतव्यङ्ग्य' प्रकारचे समजावे. यावरून दुसरा निष्कर्ष निघतो तो हा की, ज्या उदाहरणात काकु असूनही व्यंग्यार्थ प्रधान असेल, ते उदाहरण मात्र 'ध्वनी' चे होय. पुढे मम्मट वगैरेंनी याच मताची कास धरली आहे. जेथे वाच्यार्थ सुसंबद्ध व स्वयंपूर्ण असतो, त्याचा बाध होत नाही व काकूमुळे वाच्यार्थाखेरीज आणखी अर्थ प्रामुख्याने सूचित होतो, ते उदाहरण मम्मट 'ध्वनी' चे म्हणून देतो. उदा. 'वेणीसंहार' नाटकातील १ ल्या अंकातला भीमसेनाने म्हटलेला ११ वा श्लोक–

तथाभूतां दृष्ट्वा नृपसदसि पाञ्चालतनयां
वने व्याधैः सार्धं सुचिरमुषितं वल्कलधरैः ।
विराटस्यावासे स्थितमनुचितारम्भनिभृतं
गुरुः खेदं खिन्ने मयि भजति नाद्यापि कुरुषु?

यातील ४ थ्या ओळीचा– 'मी रागावलो म्हणून दादांना माझा राग येतो आणि कौरवांचा अजून राग येत नाही काय? 'हा वाच्यार्थ सुसंबद्ध व स्वयंपूर्ण असून शिवाय त्या प्रश्नार्थक काकूमुळे 'दादांनी मजवर रागावणे योग्य नाही, तर कौरवांवरच रागावणे योग्य आहे' असा आणखी अर्थ प्राधान्याने सूचित होतो. म्हणून हे मम्मटाच्या मते ध्वनीचे उदाहरण होय. पण 'मी रागावल्यावर शंभरही कौरवांचा संहार करणार नाही' या वाक्याचा वाच्यार्थ भीमाच्या संदर्भात असंभवनीय वाटतो. म्हणून तो बाधित होतो व मग, प्रश्नार्थक काकूमुळे 'मी संहार करीनच' हा सूचित होणारा अर्थ वरील. बाधित होणाऱ्या वाच्यार्थाचे समर्थन करण्याकरिता खर्ची पडल्याने तो व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत होतो आणि म्हणून हे उदाहरण 'गुणीभूतव्यङ्ग्य' प्रकारच्या काव्याचे होय, 'ध्वनी'चे नव्हे.

पण अभिनवगुप्तांनी मात्र काकूमुळे सूचित होणारा अर्थ प्रधान असो की गौण असो, काकुयुक्त शब्द असलेली सर्व उदाहरणे गुणीभूतव्यंगाचीच समजावीत, असे म्हटले आहे व याचे कारण त्यांनी हेच दिले आहे की व्यंग्यार्थ प्रधान असला, तरी तो 'काकू' च्या उच्चारामुळेच प्रतीत होतो, म्हणजे तो शब्दाने थोडासा वाच्य केल्यासारखा असतो, व म्हणून त्याला 'हे केशवा!' वगैरे उदाहरणांतील 'सूचकपणे' वगैरे शब्दांनी किंचित् वाच्य झालेल्या व्यंग्यार्थाप्रमाणे गौणताच प्राप्त होते.

२) वेणीसंहार नाटकाच्या प्रस्तावनेच्या शेवटी सूत्रधाराने कौरव व पांडव या दोघांचेही 'कुशल' चिंतिले आहे. त्यावर भीम पहिल्या अंकाच्या प्रारंभी प्रवेश करितानाच 'मी जिवंत असताना कौरवांना स्वास्थ्य लाभेल?' असे म्हणतो. हे वाक्य प्रश्नार्थक न घेता साधे विधानात्मकच मानले तर ते भीमसेनाच्या स्वभावाशी सर्वस्वी विसंगत होते. 'कौरव सुखी होतील' असे भीम कधीही म्हणणे शक्य नाही. पण तेच वाक्य प्रश्नार्थक मानले, तर त्यातून 'कौरव कधीही सुखी होणे शक्य नाही' असा व्यंग्यार्थ निष्पन्न होऊन ते वाक्य भीमाच्या स्वभावाशी जुळणारे असे होते. या ठिकाणी वाच्यार्थाला संभवनीयता आणण्यासाठी व्यंग्यार्थ खर्ची पडत असल्यामुळे त्या व्यंग्यार्थाला गौणपणा येतो व हे उदाहरण 'वाच्यसिद्ध्यङ्गव्यंग्य'या प्रकारात मोडते. (पाहा, काव्यप्रकाश, उल्लास ५ वा, कारिका १.)

३) अशा उदाहरणांत आधी वाक्याचा वाच्यार्थ अभिधेने समजतो, पण तो वाच्यार्थ विसंगत असल्यामुळे त्याला स्वरांतील बदलाची जोड मिळून व्यंग्यार्थ प्रतीत होतो म्हणून प्रथम व्यंग्यार्थ अभिधासामर्थ्यवरच उभा राहिलेला दिसला, तरी शेवटी तो अर्थ वाच्य अर्थाच्या व्यंजकत्वामुळे ध्यानात येत असल्याने तो व्यंग्यच असतो, वाच्य नव्हे.

४) **उण्** हा प्रत्यय णित् असल्यामुळे **कक्** या धातूच्या **अ** या आद्य स्वराची **आ** अशी वृद्धि झाली आहे.

५) राजशेखराने काव्यमीमांसा, अध्याय ७ मध्ये **वाक्यान्तराकाङ्क्षिणी साकाङ्क्षा वाक्योत्तरभाविनी निराकाङ्क्षा ।** असे म्हटले आहे. म्हणजे काकुयुक्त वाक्य उच्चारल्यावर त्या वाक्याचा अर्थ पूर्ण करण्याकरिता जर आणखी अर्थाची अपेक्षा असली, तर ते **साकाङ्क्ष** काकूचे उदाहरण होय व आणखी अर्थाची अपेक्षा न धरिता त्या वाक्याचा अर्थ पूर्ण होत असला, तर ते निराकांक्ष काकूचे उदाहरण समजावे.

६) 'काकु' म्हणजे बोलणाऱ्याच्या आवाजात होणारे, वेगवेगळा अभिप्राय सुचविणारे बदल. राजशेखराने काव्यमीमांसेतील ७ व्या अध्यायात 'काकु' या विषयाचे प्रदीर्घ विवेचन केले आहे. तेथे त्याने साकांक्ष आणि निराकांक्ष असे दोन काकूचे मुख्य प्रकार सांगितले असून त्यांचे प्रत्येकी तीन तीन पोटप्रकार सांगितले आहेत. यांशिवाय अभ्युपगम– अनुनयकाकु, अभ्यनुज्ञा–उपहासकाकु इ. मिश्र प्रकार सांगून त्यांची उदाहरणे दिली आहेत. हेमचंद्राने काव्यानुशासन, पृ. ३३६ वर (अहमदाबाद संस्करण) 'काकू' चे विवरण केले आहे. डॉ. वा. म. कुलकर्णी यांनी 'Journal of the Oriental Institute. Baroda' च्या खंड १६, क्रमांक १ मध्ये Treatment of intonation in Sanskrit Poeties' या लेखामध्ये 'काकु' या विषयाचे अनेक ग्रंथांतील उतारे देऊन विवेचन केले आहे. अभिनवगुप्तांनी लोचनाच्या यापुढील काही पृष्ठांवर 'काकू' च्या अनेक प्रकारांचा निर्देश केला आहे.

७) म्हणजे 'काकु' या शब्दातील पहिला **'का'** हा **'कु'** या शब्दाला 'अल्प' या अर्थी झालेला आदेश आहे. [पाहा, अष्टाध्यायी, ६–३–१०५, **ईषदर्थे (कोः कादेशः)**] । 'काकु' या शब्दातील दुसरे जे **कु** अक्षर, त्याचा अर्थ 'भूमि' (म्हणजे लक्षणेने 'निमित्त' किवा 'कारण') म्हणून काकु याचा अर्थ **ईषदभूमिः** म्हणजे 'थोडेसे कारण.'

८) मूळ कारिकेत 'गति' असा शब्द असून वृत्तिमध्ये त्या शब्दाचे विवरण 'प्रतीति' असे केले आहे. ते विवरण सरळ असल्यामुळे त्याला अनुसरूनच आम्ही कारिकेचा व वृत्तीचा अनुवाद केला आहे. पण अभिनवगुप्तांनी 'अर्थान्तरगति' या शब्दावर लक्षणा मानून 'दुसऱ्या अर्थाचा बोध' या वाच्यार्थाऐवजी 'दुसऱ्या अर्थाचा बोध करून देणारे काव्य' असा लक्ष्यार्थ घेतला आहे किंवा 'अर्थान्तरगति' हा बहुव्रीहि समास मानून 'दुसऱ्या (म्हणजे व्यंग्य) अर्थाची प्रतीति ज्यामुळे होते असे काव्य' असा अर्थ केला असणे शक्य आहे.

९) पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ काव्याचा गुणीभूतव्यंग हा दुसरा प्रकार; त्याचे उदाहरणांसह विवेचन" वरील वृत्तीमधील 'त्या व्यंग्यार्थालाच त्याचा वाचक असलेला एखादा दुसरा शब्द वापरून प्रकट केल्याने गौणत्व येते' हे वाक्य.

१०) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'सुचविलेल्या अलंकाराची एका शब्दानेही 'वाच्यता' नको वर'".

११) पाहा, प्रथमखंड, "उदद्योत – २ 'व्यंगार्थही वाच्य करून टाकल्याची उदाहरणे'".

१२) अभिनवगुप्तांचे म्हणणे असे की, **सलेशम्** यासारखे शब्द वापरल्यामुळे जसे व्यंग्यार्थाला वाच्यत्व आल्यासारखे होते, तसेच 'काकु' हा शब्दाचाच धर्म असल्यामुळे काकूचा वापर केल्यानेही व्यंग्यार्थाला वाच्यत्व अत एव गुणीभूतत्व येते.

१३) **स्वस्था भवति मयि जीवति धार्तराष्ट्राः** ही वेणीसंहार, १–८ या श्लोकाची ४ थी ओळ आहे. त्या ओळीत 'मी जिवंत असताना कौरवांना स्वास्थ्य लाभेल काय?' असे उद्‌गार भीम काढतो. या ओळीत प्रश्नरूप काकु आहे व ती साकांक्ष आहे (पाहा, द्वितीय खंड, "उदद्योत – ३ 'वाच्य अलंकारांमध्ये व्यंग अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणासह प्रतिपादन'" वरील ५ वी टीप) या ओळीबाबत अभिनवगुप्तांनी नानातऱ्हेच्या काकूंचा उल्लेख केला आहे. पण 'हे धार्मिका!' इ. गाथेच्या बाबतीत मात्र काकूचा वापर करावयाचा झाल्यास कोणकोणत्या प्रकारच्या काकूचा वापर करणे इष्ट आहे हे त्यांनी सांगितले नाही.

१४) या श्लोकातील प्रत्येक काकुयुक्त शब्दातून गुणीभूत व्यंग्यार्थ प्रकट होत असून त्याने सुशोभित झालेला वाच्यार्थ शेवटी रौद्र रसाची अभिव्यक्ति करतो. पाहा, पुढे द्वितीय खंड "उद्‌द्योत – ३ 'गूणीभूत-व्यंग प्रकारातून शेवटी प्राधान्याने रसादिकांचीच प्रतिति होत असेल, तर ते ध्वनिकाव्यच होते'" वरील 'म्हणून तेथे वाक्यात ध्वनि आहे. पण पदे मात्र गुणीभूतव्यंग्य आहेत' हे 'मला शत्रु असावेत' इ. श्लोकासंबंधी केलेले विधान.

१५) येथील काकु मान्यता दर्शविणारी आणि उपहासगर्भ आहे हे सहज कळते, पण ती 'साकांक्ष' म्हणजे आणखी अर्थ अपेक्षिणारी कशी, याचा उलगडा होणे कठीण आहे.

१६) 'असे बोलण्याची तुझी लायकी नाही' हा यातील सूचित अर्थ.

१७) मुळात 'दीप्त' असा शब्द आहे, पण येथील स्मित हे दीप्त आहे म्हणजे उपरोधिक आहे असे समजून आम्ही अनुवाद केला आहे.

१८) हे वाक्य प्रश्नासारखे उच्चारल्यास त्यातून 'तूही आपले शील कलंकित केलेली आहेस' असा आणखी अर्थ सूचित होईल.

१९) म्हणजे ते काकूचा उपयोग करूनच म्हणावयाचे आहे.

२०) काकुयुक्त उदाहरणातील व्यंग्यार्थ त्यातील काकुयुक्त शब्दांचा वाच्यार्थ समजल्याशिवाय ध्यानात येत नाही, म्हणून तो वाच्यार्थांच्या सामर्थ्याने प्रतीत होणारा, अत एव व्यंग्य होय.

२१) वेणीसंहार, १–१५. हे वाक्य भीमाने म्हटलेले आहे. 'मी कौरवांचा संहार करणार नाही' असे त्याने म्हणणे त्याच्या स्वभावाशी सर्वस्वी विसंगत आहे. म्हणून या वाच्यार्थाचा बाध होतो व 'मी रागावल्यावर

कौरवांचा संहार करीनच' असा, बरोबर उलट लक्ष्यार्थ स्वीकारावा लागतो. याला विपरीतलक्षणा म्हणतात. एखाद्या मंदबुद्धीला 'बृहस्पति' म्हणणे हे व्यवहारातील विपरीतलक्षणेचे उदाहरण आहे.

२२) येथे लक्षणा आहे असे मानिल्यास मुख्यार्थबाध इ. लक्षणाबीजांचा विचार करावा लागतो. व त्यामुळे लक्ष्यार्थ ध्यानात येण्यास विलंब लागतो. त्याऐवजी या वाक्यात प्रश्नरूप काकूचा उपयोग केल्यास योग्य तो अर्थ ताबडतोब ध्यानात येतो, म्हणून येथे लक्षणा मानणे योग्य नाही (त्यात गौरव दोष आहे) असे अभिनवगुप्तांचे म्हणणे.

२३) मूळ श्रुतिवचन **दर्शपूर्णमासाभ्यां यजेत स्वर्गकामः** असे आहे. त्यातील 'पूर्णमास' या शब्दाचा अर्थ 'पौर्णिमेच्या दिवशी करावयाचा यज्ञ' हा स्पष्ट आहे. दर्श या शब्दाचा व्युत्पत्तिलभ्य अर्थ जरी पौर्णिमा **(दृश्यते सकलकलायुक्तः चन्द्रः यस्मिन् दिने)** असा असला, तरी या वाक्यात पौर्णिमा या अर्थाची पुनरुक्ति होत असल्याने 'दर्श' या शब्दाचा व्युत्पत्तिलभ्य अर्थ बाधित होतो व अमावास्या हा त्याच्या उलट असलेला लक्ष्य अर्थ विपरीत लक्षणेने स्वीकारावा लागतो.

२४) **मथ्नामि** इ. श्लोकात काकु हा उपाय उफलब्ध असल्यामुळे योग्य तो अर्थ तत्क्षणी ध्यानात येतो पण **दर्शे यजेत** येथे काकु हा उपाय उपलब्ध नसल्याने विपरीत लक्षणा स्वीकारणे भाग होते. हा मुद्दा महत्त्वाचा व प्रस्तुत आहे. तेव्हा त्याला अभिनवगुप्तांनी इतर अवांतर असे का म्हणावे हे समजत नाही.

ध्वन्यालोकः

प्रभेदस्यास्य विषयो यश्च युक्त्या प्रतीयते ।
विधातव्या सहृदयैर्न तत्र ध्वनियोजना ॥ ३९ ॥

संकीर्णो हि कश्चिद्ध्वनेर्गुणीभूतव्यङ्ग्यस्य च लक्ष्ये दृश्यते मार्गः । तत्र यस्य युक्तिसहायता तत्र तेन व्यपदेशः कर्तव्यः । न । सर्वत्र ध्वनिरागिणा भवितव्यम् ।

यथा—

'पत्युः शिरश्चन्द्रकलामनेन स्पृशेति सख्या परिहासपूर्वम् ।
सा रञ्जयित्वा चरणौ कृताशीर्माल्येन तां निर्वचनं जधान ॥'
यथा च—

'प्रयच्छतोचैः कुसुमानि मानिनी विपक्षगोत्रं दयितेन लम्भिता ।
न किंचिदूचे चरणेन केवलं लिलेख बाष्पाकुललोचना भुवम् ॥'

इत्यत्र 'निर्वचनं जघान' 'न किंचिदूचे' इति प्रतिषेधमुखेन व्यङ्ग्यस्यार्थस्योक्त्या किंचिद्विषयीकृतत्वाद्गुणीभाव एव शोभते । यदा वक्रोक्तिं विना व्यङ्ग्योऽर्थस्तात्पर्येण प्रतीयते तदा तस्य प्राधान्यम् । यथा 'एवंवादिनि देवर्षौ' इत्यादौ । इह पुनरुक्तिर्भङ्ग्यास्तीति वाच्यस्यापि प्राधान्यम् । तस्मान्नात्रानुरणनरूपव्यङ्ग्यध्वनिव्यपदेशो विधेयः ।

ध्वन्यालोक

युक्तिवादाचा अवलंब केल्यावर जी उदाहरणे या गुणीभूतव्यंग्य प्रकारातच समाविष्ट होतात असे सहृदयांना वाटत असेल, ती त्यांनी ध्वनीची (उदाहरणे) आहेत असे मानू नये. ॥ ३९ ॥

कारण वाङ्मयामध्ये ध्वनि आणि गुणीभूतव्यंग्य यांची क्षेत्रे काही ठिकाणी एकमेकांत मिसळल्यासारखी दिसतात. त्यांमध्ये युक्तिवादाच्या बळावर जो प्रकार ज्या ठिकाणी आहे असे (निश्चितपणे) वाटत असेल त्या ठिकाणी त्या दृष्टीने नाव द्यावे. प्रत्येक ठिकाणी ध्वनीचेच स्तोम माजवू नये. जसे :—

"पार्वतीचे पाय अळित्याने रंगविल्यानंतर सखीने तिला थट्टेने आशीर्वाद दिला की, तुझ्या यजमानांच्या मस्तकावरील चंद्रकलेला या (पाया) ने स्पर्श करण्याचे भाग्य तुला लाभो. त्याबरोबर पार्वतीने काही एक न बोलता त्या सखीला हातातल्या फुलाने तडाखा दिला. [१]"

आणखी जसे :— "प्रियकर उंचावर असलेली फुले तोडून प्रियेला देत असताना त्याने तिला (चुकून) सवतीच्या नावाने हाक मारली. त्याबरोबर ती मानिनी काहीही बोलली नाही. तिचे नेत्र अश्रूंनी डबडबले, व ती पायाने जमिनीवर रेघोट्या काढू लागली. [२]"

या दोन्ही उदाहरणांत अनुक्रमे 'काही एक न बोलता तडाखा दिला,' 'काहीही बोलली नाही' अशा निषेधाच्या द्वारे व्यंग्यार्थ थोडासा वाच्यच केल्याने ही उदाहरणे गुणीभूतव्यंग्याची मानणेच योग्य दिसेल. [३] वाच्य केला न जाता [४] जेथे व्यंग्यार्थ मुख्यत्वाने प्रतीत होत असेल, तेथे त्याचे (व्यंग्यार्थाचे) प्राधान्य असते. जसे 'तो देवर्षि अंगिरस् [५] याप्रमाणे बोलत असताना' ...इ. उदाहरणामध्ये. पण या, म्हणजे 'पार्वतीचे पाय अळित्याने' इ. व 'प्रियकर उंचावर असलेली फुले' इ. या दोन उदाहरणांत (व्यंग्यार्थाची) विशिष्ट शब्दांनी उक्ति आहे. म्हणून या उदाहरणांस अनुरणनरूप व्यंग्यार्य असलेला ध्वनि हे नाव देणे योग्य होणार नाही.

लोचनम्

अधुना संकीर्ण विषयं विभजते— प्रभेदस्येति । युक्त्येति । चारुत्वप्रतीतिरेवात्र युक्तिः । पत्युरिति । अनेनेति अलक्तकोपरक्तस्य हि चन्द्रमसः परभागलाभः, अनवरतपादपतनप्रसादनैर्विना न पत्युर्झटिति यथेष्टानुवर्तिन्या भाव्यमिति चोपदेशः । शिरोधृता या चन्द्रकला तामपि परिभवेति सपत्नीलोकापजय उक्तः ।

निर्वचनमिति । अनेन लज्जावहित्थहर्षेर्ष्यासाध्वससौभाग्याभिमानप्रमृति यद्यपि ध्वन्यते, तथापि तन्निर्वचनशब्दार्थस्य कुमारीजनोचितस्याप्रतिपत्तिलक्षणस्यार्थस्योपस्कारकतां केवलमाचरति । उपस्कृतस्त्वर्थः शृङ्गाराङ्गतामेतीति ।

प्रयच्छतेति । उच्चैरिति । उच्चैर्यानि कुसुमानि कान्तया स्वयं ग्रहीतुमशक्यत्वाद्याचितानीत्यर्थः । अस्मदुपाध्यायास्तु ह्रद्यतमानि पुष्पाणि अमुके, गृहाण गृहाणेत्युच्चैस्तारस्वरेणादरातिशयार्थं प्रयच्छता । अत एव लम्भितेति । न किंचिदिति । एवंविधेषु शृङ्गारावसरेषु तामेवायं स्मरतीति भानप्रदर्शनमेवात्र न युक्तमिति

सातिशयमन्युसंभारो व्यङ्ग्यो वचननिषेधस्यैव वाच्यस्य संस्कारः । तद्वक्ष्यति– उक्तिर्भङ्ग्यास्तीति । तस्येति व्यङ्ग्यस्य । इहेति पत्युरित्यादौ । वाच्यस्यापीति । अपिशब्दो भिन्नक्रमः । प्राधान्यमपि भवति वाच्यस्य, रसाद्यपेक्षया तु गुणतापीत्यर्थः । अत एवोपसंहारे ध्वनिशब्दस्य विशेषणमुक्तम् ॥ ३९ ॥

लोचन

आता ज्या काव्यात ध्वनि आहे की गुणीभूतव्यंग्यार्थ आहे हे चटकन ध्यानात येत नसेल, अशा काव्यात यांपैकी नेमका प्रकार कोणता आहे हे निश्चित करण्याबाबत युक्तिवादाचा अवलंब केल्यावर या गुणीभूतव्यंग्य प्रकारात इ, शब्दांनी (कारिकेत) मार्गदर्शन करण्यात येत आहे. 'युक्तिवादाचा अवलंब केल्यावर–' अशा ठिकाणी (वाच्यार्थामध्ये व्यंग्यार्थापेक्षा अधिक) सौन्दर्याची प्रतीति होणे हाच युक्तिवाद होय. [६] 'पार्वतीचे पाय.....तुझ्या यजमानांच्या इ, 'या (पाया) ने' इ.– अळित्याचा रक्तिमा प्राप्त झाल्याने चंद्राला [७] खरी शोभा प्राप्त होईल; तुझ्या पतीने एकसारखे पाया पडून तुला प्रसन्न करण्याचे प्रयत्न केल्याशिवाय तू झटकन त्याच्या मर्जीप्रमाणे वागू नयेस, असा पार्वतीला मैत्रिणींचा उपदेश; (शंकराने अगदी डोक्यावर घेतलेली जी चंद्रकोर, तिच्यावरही मात कर; अशा प्रकारे (चंद्रकला व गंगा या दोन्ही) सवतींचा तू पराजय कर, असे सुचविले [८] आहे.

'काही एक न बोलता'– या शब्दांमुळे लज्जा, मनातील भाव लपविणे, हर्ष, ईर्ष्या, भय, आपल्या मोहकतेबद्दल अभिमान इ. व्यभिचारिभाव जरी ध्वनित होत असले, तरी तो सूचितार्थ **निर्वचनम्** या शब्दाच्या, कुमारीवर्गाला स्वाभाविक असलेल्या, तो सखीचा उपदेश मान्य नसणे [९] ह्या वाच्य अर्थाची शोभा वाढविण्याचेच कार्य करितो. मात्र (व्यभिचारिभावरूपी) सूचितार्थाने सुशोभित झालेला तो अर्थ पर्यवसानी शृंगाररसाच्या अभिव्यक्तीचे कारण होत आहे. 'प्रियकर'... 'उंचावर असलेली' –जी फुले उंचावर होती, म्हणजे प्रियेला स्वतःला जी तोडून घेणे शक्य नव्हते, व म्हणून जी फुले तिने प्रियकराला मागितली, असा अर्थ. पण आमचे गुरुजी "ही फुले फार सुन्दर आहेत, अग ए अमुक (नावाच्या) स्त्रिये! घे, घे, असे अतिशय आदर व्यक्त करण्यासाठी मोठमोठ्याने हाक मारून (फुले) देणाऱ्या प्रियकराने" असा अर्थ करितात. व म्हणूनच या श्लोकात **लभ्भिता** म्हणजे '(जिला त्याने सवतीचेच नाव दिले) असा शब्द योजिला आहे, असे (ते म्हणतात.) 'काहीही (बोलली) नाही' – 'अशा प्रणयप्रसंगी ह्याला तिचीच आठवण होत आहे, म्हणून यावेळी आपण प्रणयकोप प्रकट करणे योग्य होणार नाही'. अशाप्रकारे 'दुःखाचा अतिशय भर' या ठिकाणी व्यंग्य अर्थ असून तो व्यंग्य अर्थ 'बोलली नाही' या शब्दांनी वाच्य झालेल्या' 'न बोलणे' या अर्थाचीच शोभा वाढविणारा झाला आहे. असे असल्यामुळे वृत्तिकार म्हणणार आहेत की, 'या उदाहरणांमध्ये (व्यंग्यार्थाची) विशिष्ट शब्दांनी वाच्यता झाली आहे. [१०]' 'त्याचे' म्हणजे व्यंग्यार्थाचे (प्राधान्य).' या उदाहरणात म्हणजे 'पार्वतीचे पाय' इ. (दोन) उदाहरणांत. 'वाच्यार्थाचे सुद्धा' – येथील 'सुद्धा' या शब्दाची जागा बदलावयास हवी. तो शब्द 'प्रधान' यानंतर घ्यावा, म्हणजे 'वाच्य अर्थ (प्रथम) प्रधानसुद्धा होतो, आणि (नंतर) रसादिकांच्या दृष्टीने [११] त्या वाच्यार्थाला गौणत्वही येते, असा अर्थ. म्हणूनच (३९ व्या कारिकेवरील) वृत्तीच्या शेवटच्या वाक्यात 'ध्वनि' याला 'अनुरणनरूप व्यंग्यार्थ असलेला' असे विशेषण देण्यात आहे. [१२] ॥ ३९ ॥

टीपा

१) पाहा, कुमारसंभव, ७–१९.

२) पाहा, किरातार्जुनीय, ८—१४.

३) पहिल्या उदाहरणात 'काही एक न बोलता' या शब्दांतून पार्वतीच्या ठिकाणी उदित झालेले लज्जा, ईर्ष्या, हर्ष इ. व्यभिचारिभाव सूचित होतात. पण ते व्यंग्य भाव 'काही एक न बोलता' या शब्दांनी थोड्याशा प्रमाणात वाच्य झाल्यामुळे त्या व्यंग्यार्थाला गौणत्व आलेले आहे. मात्र या व्यंग्यार्थाने पुष्ट झालेला वाच्यार्थही 'पूर्वानुराग' या रूपाची रति अभिव्यक्त करीत असल्यामुळे त्या दृष्टीने हे शृङ्गाररसध्वनीचे उदाहरण आहेच.

दुसऱ्या उदाहरणात 'काहीही बोलली नाही' या शब्दातून कमालीचा विषाद हा व्यभिचारिभाव सूचित होत आहे. पण तोही 'काहीही बोलली नाही' या शब्दांनी थोड्याशा प्रमाणात वाच्य झाल्यामुळे गौण झाला आहे. या गौण व्यंग्यार्थाने वाच्यार्थ उपस्कृत होऊन तो ईर्ष्याविप्रलंभरति ध्वनित करितो.

म्हणजे 'पार्वतीचे पाय' व 'प्रियकर उंचावर' या दोन उदाहरणातील व्यंग्यार्थ 'हे केशवा!' (प्रथम खंड, "उदद्योत -२ 'सुचविलेल्या अलंकाराची एका शब्दानेही वाच्यता नको'") व 'ज्याने आपल्या हसऱ्या डोळ्यांनी' (प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'व्यंगार्थही वाच्य करून टाकल्याची उदाहरणे'") या श्लोकांतील व्यंग्यार्थाप्रमाणे किंचित् प्रमाणात वाच्य झाल्यामुळे ही गुणीभूतव्यंग्याची उदाहरणे होत.

'पार्वतीचे पाय' व 'प्रियकर उंचावर' या उदाहरणात व्यंग्यार्थ हा 'काही एक न बोलता' व 'काहीही बोलली नाही' यांच्या वाच्य अर्थाचे समर्थन करण्यासाठी खर्ची पडत असल्यामुळेही उदाहरणे गुणीभूत व्यंग्याच्या 'वाच्यसिद्ध्यंग' या प्रकारात घालणे इष्ट होईल.

४) येथे 'वक्रोक्ति' हा शब्द 'उक्ति' (म्हणजे वाच्यत्व) इतक्याच अर्थाने वापरला आहे.

५) येथे 'तो देवर्षि अंगिरस्' या व 'पार्वतीचे पाय' किंवा 'प्रियकर उंचावर असलेली फुले' या उदाहरणामध्ये व्यंग्यार्थाच्या बाबतीत फरक कसा आहे, हे दाखविले आहे. पहिल्या उदाहरणात लज्जारूपी व्यभिचारिभाव हा कोणत्याही वाच्यार्थाला गुणीभूत नसून स्वतः प्रधान म्हणून व्यंग्य आहे, तर नंतरच्या उहाहरणात व्यंग्य असलेले व्यभिचारिभाव वाच्यार्थाला गुणीभूत आहेत. पहिल्या उदाहरणामध्ये 'अनुरणनरूपव्यंग्य' ध्वनि आहे व नंतरच्या दोन्ही उदाहरणांत त्या प्रकारचा ध्वनि नसून गुणीभूतव्यंग्यता आहे.

६) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'आक्षेप म्हणजे 'ध्वनि' नव्हे'" वरील 'वाच्यार्थ व व्यंग्यार्थ यातील कोणता अर्थ कवीला मुख्य' इ. वृत्तीतील वाक्य व उद्द्योत २ मधील ३० व्या कारिकेचा 'जर अधिक सौंदर्यामुळे' इ. उत्तरार्ध.

७) लोचनात अभिनवगुप्तांनी **चन्द्रमसः परभागलाभः** असे शब्द योजिले आहेत **चन्द्रमसः** हे पंचमीचे व षष्ठीचेही एकवचन होऊ शकत असल्याने **चन्द्रमस** याचे दोन अर्थ होऊ शकतील— १) तुझ्या पदस्पर्शाने शुभ्र असलेल्या चंद्राला रक्तिमा प्राप्त होऊन त्याची शोभा वाढेल व २) अळित्याने रंगविलेल्या तुझ्या पायाला चंद्रापेक्षाही अधिक शोभा प्राप्त होईल.

८) म्हणजे अभिनवगुप्तांच्या मते या श्लोकातून तीन वस्तुरूप अर्थ सुचविले जातात– १) चंद्राला अधिक शोभेची प्राप्ति, २) सखीने पार्वतीला केलेला उपदेश व ३) पार्वतीचा सवतीवरील विजय.

९) लोचनात **अप्रतिपत्ति** असा शब्द आहे. त्याचे दोन अर्थ होऊ शकतील– १) सखीचा उपदेश पार्वतीला स्वीकारार्ह न वाटणे व २) काय करावे हे तिला न सुचणे. वस्तुतः **निर्वचनम्** याचा वाच्यार्थ 'काही एक न बोलता' एवढाच आहे. तरीही अभिनवगुप्तांनी न बोलणे हे असंमतीचे लक्षण समजले जाते या रूढीला अनुसरून असंमति या अर्थाला वाच्यार्थ म्हटलेले दिसते.

१०) या श्लोकातील व्यंग्यार्थ गुणीभूत का, याबद्दल वृत्तिकार व अभिनवगुप्त यांच्या म्हणण्यात थोडासा फरक दिसतो. अभिनवगुप्तांच्या म्हणण्याप्रमाणे येथील 'अतिशय दुःख' हा व्यंग्यार्थ वाच्यार्थाची शोभा वाढविणारा, म्हणून गुणीभूत आहे, तर वृत्तिकारांच्या म्हणण्याप्रमाणे हा व्यंग्यार्थ 'काहीही बोलली नाही' या शब्दांनी थोडासा वाच्य केला गेल्यामुळे गुणीभूत आहे. व्यंग्यार्थाची थोडीशी वाच्यता केली, तर तो गुणीभूत होतो याचे 'हे केशवा' इ. उदाहरण साहित्यदर्पणकार विश्वनाथाने गुणीभूतव्यंग्याच्या 'असुंदर व्यंग्य' या प्रकारात दिले आहे.

११) 'पार्वतीचे पाय' इ. श्लोकात प्रथम व्यंग्यार्थाने सुशोभित झालेला वाच्यार्थ. हा शेवटी अभिलाषविप्रलम्भ रतीला गुणीभूत होतो व 'प्रियकर उंचावर : असलेली' इ. श्लोकातील वाच्यार्थ शेवटी ईर्ष्याविप्रलंभ रतीला गुणीभूत होतो.

१२) 'पार्वतीचे पाय' व 'प्रियकर उंचावर असलेली' या दोन उदाहरणांमध्ये व्यंग्यार्थ हा प्रथम वाच्यार्थाचे अंग झाला असल्यामुळे त्या उदाहरणांना अनुरणनरूपव्यंग्य 'ध्वनि' म्हणता येत नाही. पण पर्यवसानी प्रतीत होणाऱ्या रसादींच्या दृष्टीने ती दोन्ही पद्ये असंलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनीची उदाहरणे आहेत.

ध्वन्यालोकः

प्रकारोऽयं गुणीभूतव्यङ्ग्योऽपि ध्वनि रूपताम् ।
धत्ते रसादितात्पर्यपर्यालोचनया पुनः ॥ ४० ॥

गुणीभूतव्यङ्ग्योऽपि काव्यप्रकारो रसभावादितात्पर्यालोचने पुनर्ध्वनिरेव सम्पद्यते । यथात्रैवानन्तरोदाहृते श्लोकद्वये । यथा च–

दुराराधा राधा सुभग यदनेनापि मृजत–
स्तवैतत्प्राणेशाजधनवसनेनाश्रु पतितम् ।
कठोरं स्त्रीचेतस्तदलमुपचारैर्विरम हे
क्रियात्कल्याणं वो हरिरनुनयष्वेवमुदितः ॥

एवं स्थिते च 'न्यक्कारो ह्ययमेव' इत्यादिश्लोकनिर्दिष्टानां पदानां व्यङ्ग्यविशिष्टवाच्यप्रतिपादनेऽप्येतद्वाक्यार्थीभूतरसापेक्षया व्यञ्जकत्वमुक्तम् । न तेषां पदानामर्थान्तरसंक्रमितवाच्यध्वनिभ्रमो विधातव्यः, विवक्षितवाच्यत्वात्तेषाम् । तेषु हि व्यङ्ग्यविशिष्टत्वं

वाच्यस्य प्रतीयते न तु व्यङ्ग्यरूपपरिणतत्वम् । तस्माद्वाक्यं तत्र ध्वनिः, पदानि तु गुणीभूतव्यङ्ग्यानि । न च केवलं गुणीभूतव्यङ्ग्यान्येव पदान्यलक्ष्यक्रमव्यङ्ग्यध्वनेर्व्यञ्जकानि यावदर्थान्तरसंक्रमितवाच्यानि ध्वनिप्रभेदरूपाण्यपि । यथात्रैव श्लोके रावण इत्यस्य प्रभेदान्तररूपव्यञ्जकत्वम् । यत्र तु वाक्ये रसादितात्पर्यं नास्ति गुणीभूतव्यङ्ग्यैः पदैरुद्भसितेऽपि तत्र गुणीभूतव्यङ्ग्यतैव समुदायधर्मः । यथा—

राजानमपि सेवन्ते विषममप्युपयुञ्जते ।
रमन्ते च सह स्त्रीभिः कुशलाः खलु मानवाः ॥

इत्यादौ । वाच्यव्यङ्ग्ययोः प्राधान्याप्राधान्यविवेके परः प्रयत्नो विधातव्यः, येन ध्वनिगुणीभूतव्यङ्ग्ययोरलङ्काराणां चासङ्कीर्णो विषयः सुज्ञातो भवति । अन्यथा तु प्रसिद्धालङ्कारविषय एव व्यामोहः प्रवर्तते । यथा—

लावण्यद्रविणव्ययो न गणितः क्लेशो महान् स्वीकृतः
स्वच्छन्दस्य सुखं जनस्य वसतश्चिन्तानलो दीपितः ।
एषापि स्वयमेव तुल्यरमणाभावाद्वराकी हता
कोऽथेश्वेतसि वेधसा विनिहितस्तन्व्यास्तनुं तन्वता ॥

इत्यत्र व्याजस्तुतिरलङ्कार इति व्याख्यायि केनचित्तन्न चतुरस्रम् । यतोऽस्याभिधेयस्यैतदलङ्कारस्वरूपमात्रपर्यवसायित्वे न सुश्लिष्टता । यतो न तावदयं रागिणः कस्यचिद्विकल्पः । तस्य 'एषापि स्वयमेव तुल्यरमणाभावाद्वराकी हता' इत्येवंविधोक्त्यनुपपत्तेः । नापि नीरागस्य; तस्यैवंविधिविकल्पपरिहारैकव्यापारत्वात् । न चायं श्लोकः क्वचित्प्रबन्ध इति श्रूयते, येन तत्प्रकरणानुगतार्थतास्य परिकल्प्यते । तस्मादप्रस्तुतप्रशंसेयम् । यस्मादनेन वाच्येन गुणीभूतात्मना निस्सामान्यगुणावलेपाध्मातस्य निजमहिमोत्कर्षजनितसमत्सरजनज्वरस्य विशेषज्ञमात्मनो न कञ्चिदेवापरं पश्यतः परिदेवितमेतदिति प्रकाश्यते । तथा चायं धर्मकीर्तेः श्लोक इति प्रसिद्धिः । सम्भाव्यते च तस्यैव । यस्मात्—

अनध्यवसितावगाहनमनल्पधीशक्तिना—
प्यदृष्टपरमार्थतत्त्वमधिकाभियेगैरपि ।
मतं मम जगत्यलब्धसदृशप्रतिग्राहकं
प्रयास्यति पयोनिधेः पय इव स्वदेहे जराम् ॥
इत्यनेनापि श्लोकेनैवंविधोऽभिप्रायः प्रकाशित एव ।

ध्वन्यालोक

या गुणीभूतव्यंग्य प्रकारातून सरतेशेवटी प्राधान्याने प्रतीत होणाऱ्या रसादिकांचा विचार केल्यास त्या दृष्टीने तो प्रकारदेखील 'ध्वनी'च्या क्षेत्रात येतो ॥ ४० ॥

काव्याच्या 'गुणीभूतव्यंग्य' या प्रकाराचे पर्यवसान मुख्यतः रस वगैरेमध्ये होते हे लक्षात घेतल्यास तो गुणीभूतव्यंग्य प्रकारही त्या दृष्टीने 'ध्वनि' या संज्ञेसच पात्र होतो. जसे आताच उदाहरण म्हणून उद्धृत

केलेल्या 'पार्वतीचे पाय' व 'प्रियकर उंचावर असलेली फुले...' या दोन श्लोकांत आणि जसे पुढील श्लोकात–

'हे भाग्यवान् कृष्णा, राधेला प्रसन्न करणे खरोखरच फार कठीण आहे. कारण तू (नेसलेल्या) या आपल्या प्राणेश्वरीच्या वस्त्राने माझी ओघळलेली आसवे पुसत राहिला आहेस (तरीही ती प्रसन्न होत नाही). स्त्रियांचें अंतःकरण कठोर असते, म्हणून हे तुझे सांत्वनाचे प्रयत्न करू नकोस. ते सोडून दे.' अनुनयाच्या (अनेक) प्रसंगी राधेकडून असे म्हटला गेलेला कृष्ण तुमचे कल्याण करो [१]!"

असे असल्यामुळे 'माझ्या बाबतीत शत्रू असावेत हेच मला लांछन आहे.' [२] इ. श्लोकातील (आम्ही) निर्देशिलेली पदे ही व्यंग्याने विशिष्ट असा वाच्यार्थ प्रतिपादन करीत असली, तरी या श्लोकातून मुख्यतया अभिव्यक्त होणाऱ्या रसाच्या दृष्टीने 'ती पदे व्यंजक आहेत' असे आम्ही म्हटले. ती पदे अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनीची आहेत असा चुकीचा समज करून घेऊ नये, कारण त्या पदांचा वाच्यार्थ पूर्णपणे विवक्षित आहे. [३] त्या पदांत वाच्यार्थ हा व्यंग्यार्थाने विशिष्ट आहे, असा प्रत्यय येतो; वाच्यार्थाचे व्यंग्यार्थात रूपांतर झाल्याचा प्रत्यय येत नाही. म्हणूनच तेथे (संपूर्ण) वाक्यात 'ध्वनि' आहे, पण पदे 'गुणीभूतव्यंग्य' आहेत. आणि ('गोसावी' वगैरेसारखी) गुणीभूतव्यंग्य पदेच 'रसादि' ध्वनीची व्यंजक असू शकतात असे नाही, तर अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनीची उदाहरणे असलेली पदे सुद्धा रसादिध्वनीची व्यंजक होतात. उदा. याच, 'माझ्या बाबतीत शत्रू...' इ. श्लोकात 'रावण' हे पद (अर्थान्तरसंक्रमितवाच्य प्रकारच्या ध्वनीचे उदाहरण असून) त्याहून निराळ्या प्रकारच्या ध्वनीचे, म्हणजे (रौद्र) रसध्वनीचें व्यंजक आहे.

मात्र जी वाक्ये गुणीभूतव्यंग्य पदांनी उजळलेली असूनही त्या वाक्यांतून शेवटी मुख्यत्वाने रसादींची प्रतीति होत नाही, त्या वाक्यांमधील पदसमुदायाचा गुणीभूतव्यंग्यत्व हाच धर्म असतो. जसे पुढील प्रकारच्या उदाहरणांमध्ये–

'(माणसे ही) राजाचीही सेवा बजावतात, विषदेखील भक्षण करितात आणि स्त्रियांबरोबर रममाणही होतात. तेव्हा माणसे खरोखरीच मोठी हुशार असतात [४]'

वाच्यार्थ आणि व्यंग्यार्थ यांमध्ये मुख्य कोण आणि गौण कोण यांचा विवेक करण्याचे बाबतीत कसोशीने प्रयत्न करावा, म्हणजे त्यामुळे ध्वनिकाव्य, गुणीभूतव्यंग्यकाव्य आणि अलंकार यांची वेगवेगळी क्षेत्रे निःसंदिग्धपणे लक्षात येतील. नाहीतर मात्र प्रसिद्ध अलंकारांच्या बाबतीतच गोंधळ होईल. [५] जसे–

'या तनुगात्रीचे [६] रूप निर्माण करिताना विधात्याने आपल्या मनात कोणत्या फळाचा उद्देश ठेवला होता कोण जाणे! कारण त्यासाठी त्याने त्या कामी झालेल्या लावण्यरूपी संपत्तीच्या उधळपट्टीची पर्वा केली नाही. (त्यासाठी) त्याने खूप कष्ट घेतले. आपल्या मर्जीनुसार वागणाऱ्या व सुखाने राहात असलेल्या लोकांच्या मनात त्याने हिच्या प्राप्तीविषयीच्या चिंतेचा अग्नि प्रज्वलित केला. आणि हिला अनुरूप वर न मिळाल्यामुळे ब्रह्मदेवाने स्वतःच या विचारीच्या जन्माचा सुद्धा नाश केला.'

या उदाहरणात 'व्याजस्तुति' अलंकार आहे असे कोणीतरी म्हटले आहे, ते योग्य नाही. कारण या श्लोकाच्या वाच्यार्थाचे पर्यवसान केवळ या अलंकारात होणे हे सयुक्तिक वाटत नाही. कारण एकतर या

श्लोकात प्रकट झालेले विचार कोणातरी प्रेमिकाचें असणे संभवत नाही याचे कारण तो 'हिला अनुरूप वर न मिळाल्यामुळे ही वाया गेली' असे का म्हणतो याची उपपत्ति लागत नाही. किंवा हे बोलणे विरक्त मनुष्याचेही असणे शक्य वाटत नाही. कारण विरक्त माणसाची, असले तर्क टाळणे ही एकच धडपड असते. आणि हा श्लोक कोणत्या तरी ग्रंथाचा भाग आहे असेही ऐकिवात नाही. तसे असते, तर त्याचा अर्थ त्याच्या संदर्भाप्रमाणे लावावयाचा आहे अशी कल्पना करणे शक्य झाले असते. [७] म्हणून ही 'अप्रस्तुतप्रशंसा' आहे. कारण येथे वाच्यार्थ हा स्वतः गुणीभूत होऊन, आपल्या असामान्य गुणांच्या गर्वाने फुगलेल्या, आपल्या थोरपणाने मत्सरी लोकांच्या मनात ईर्ष्येमुळे बेचैनी निर्माण केलेल्या व ज्याला आपल्या गुणांची किंमत ओळखणारा जगात दुसरा कोणी दिसत नाही अशा एखाद्या माणसाचा हा विलाप आहे असे तो वाच्यार्थ सूचित करीत आहे. कारण हा श्लोक 'धर्मकीर्ती' चा म्हणून प्रसिद्ध आहे. आणि हा (श्लोक) त्याचाच असणे हे संभवनीयही वाटते. कारण—

"विपुल बुद्धिसामर्थ्य असलेल्या मनुष्यांनी सुद्धा माझ्या सिद्धान्ताच्या आकलनासाठी खोलवर जाण्याचा विचारही मनात आणलेला नाही. माझ्या सिद्धान्ताचे यथार्थ, सारभूत स्वरूप पुष्कळ प्रयत्न करणाऱ्यांना देखील समजू शकलेले नाही. या जगात माझ्या सिद्धान्ताचे आकलन करू शकणारा योग्य असा माणूस आजपर्यंत जन्माला न आल्यामुळे तो सिद्धान्त महासागराच्या लाटांप्रमाणे 'माझ्या देहातल्या देहातच जिरून जाणार (असे) दिसते."

या श्लोकातूनही अशा प्रकारचा (म्हणजे विलापाच्या स्वरूपाचा) आशय प्रकट केला गेला आहेच.

लोचनम्

एतदेव निर्वाह्यन् काव्यात्मत्वं ध्वनेरेव परिदीपयति— प्रकार इति । श्लोकद्वय इति तुल्यच्छायं यदुदाहृतं पत्युरित्यादि तत्रेति, द्वयशब्दादेवंवादिनीत्यस्यानवकाशः । दुराराधेति । अकारणकुपिता पादपतिते मयि न प्रसीदसि अहो दुराराधासि मा रोदीरित्युक्तिपूर्वं प्रियतमेऽश्रूणि मार्जयति इयमस्या अभ्युपगमगर्भोक्तिः । सुभगेति प्रिययाः स्वसंभोगभूषणविहीनः क्षणमपि मोक्तुं न पार्यसे । अनेनापीति । पश्येदं प्रत्यक्षेणेत्यर्थः । तदेव च यदेवमादृतं यत् लज्जादित्यागेनाप्येवं धार्यते । मृजत इत्यनेन हि प्रत्युत स्तोतस्सहस्रवाही बाष्पो भवति । इयच्च त्वं हतचेतनो यन्मां विस्मृत्य तामेव कुपितां मन्यसे । अन्यथा कथमेवं कुर्याः । पतितमिति । गत इदानीं रोदनावकाशोऽपीत्यर्थः । यदि तूच्यते इयताप्यादरेण किमिति कोपं न मुञ्चसि, तत्किं क्रियते कठोरस्वभावं स्त्रीचेतः । स्त्रीति हि प्रेमाद्ययोगाद्वस्तुविशेषमात्रमेतत् तस्य चैष स्वभावः आत्मनि चैतत्सुकुमारहृदया योषित इति न किञ्चिद्वज्रसाराधिकमासां हृदयं यदेवंविधवृत्तान्तसाक्षात्कारेऽपि सहस्रधा न दलति । उपचारैरिति । दाक्षिण्यप्रयुक्तैः । अनुनयेष्विति बहुवचनेन वारं वारमस्य बहुवल्लभस्येयमेव स्थितिरिति सौभाग्यातिशय उक्तः । एवमेष व्यङ्ग्यार्थसारो वाच्यं भूषयति । तत्तु वाच्यं भूषितं सदीर्ष्याविप्रलभ्याङ्गत्वमेतीति ।

यस्तु त्रिष्वपि श्लोकेषु प्रतीयमानस्यैव रसाङ्गत्वं व्याचष्टे स्म, स देवं विक्रीय तद्यात्रोत्सवमकार्षीत् । एवं हि व्यङ्ग्यस्य या गुणीभूतता । प्रकृता सैव समूलं त्रुट्येत् । रसादिव्यतिरिक्तस्य हि व्यङ्ग्यस्य रसाङ्गभावयोगित्वमेव प्राधान्यं नान्यत्किञ्चिदित्यलं पूर्ववंश्यैः सह विवादेन ।

एवं स्थित इति । अनन्तरोक्तेन प्रकारेण ध्वनिगुणीभूतव्यङ्ग्ययोर्विमागे स्थिते सतीत्यर्थः । कारिकागतमपिशब्दं व्याख्यातुमाह न चेति । एष च श्लोकः पूर्वमेव व्याख्यात इति न पुनर्लिख्यते । यत्र त्विति । यद्यपि चात्र विषयनिर्वेदात्मकशान्तरसप्रतीतिरस्ति, तथापि चमत्कारोऽयं वाच्यनिष्ठ एव । व्यङ्ग्यं त्वसम्भाव्यत्वविपरीतकारित्वादि तस्यैवानुयायि, तद्यापिशब्दाभ्याभुभयतो योजिताभ्यां चशब्देन स्थानत्रययोजितेन खलुशब्देन चोभयतो योजितेन, मानवशब्देन स्पृष्टमेवेति गुणीभूतम् । विवेकदर्शना चेयं न निरुपयोगेति दर्शयति— वाच्यव्यङ्ग्ययोरिति । अलङ्काराणां चेति । यत्र व्यङ्ग्यं नास्त्येव तत्र तेषां शुद्धानां प्राधान्यम् । अन्यथा त्विति । यदि प्रयत्नवता न भूयत इत्यर्थः ।

व्यङ्ग्यप्रकारस्तु यो मयाऽपूर्वमुत्प्रेक्षितस्तस्यासंदिग्धमेव व्यामोहस्थानत्वमित्येवकाराभिप्रायः द्रविणशब्देन सर्वस्वप्रायत्वमनेकस्वकृत्योपयोगित्वमुक्तम् । गणित इति । चिरेण हि यो व्ययः सम्पद्यते, न तु विद्युदिव झटिति, तत्रावश्यं गणनया भवितव्यम् । अनन्तकालनिर्माणकारिणोऽपि तु विधेर्न विवेकलेशोऽप्युदभूदिति परमस्याप्रेक्षावत्वम् । अत एवाह— क्लेशो महानिति । स्वच्छन्दस्येति । विशृङ्खलस्येत्यर्थः । एषापीति । यत्स्वयं निर्मीयते तदेव च निहन्यत इति महद्वैशसमपिशब्देन एवकारेण चोक्तम् । कोऽर्थ इति । न स्वात्मनो न लोकस्य न निर्मितस्येत्यर्थः । तस्येति । रागिणो हि वराकी हतेति कृपणता [हेमचन्द्र, काव्यानुशासन, पृ. ३६२ येथे 'कृपालिङ्गितम' असा पाठ आढळतो.] लिङ्गितममङ्गलोपहतं चानुचितं वचनम् । तुल्यरमणाभावादिति स्वात्मन्यत्यन्तमनुचितम् । आत्मन्यपि तद्रूपासम्भावनायां रागितायां च पशुप्रायत्वं स्यात् ।

ननु च रागिणोऽपि कुतश्चित्कारणात्परिगृहीतकतिपयकालव्रतस्य वा, रावणप्रायस्य वा सीतादिविषये, दुष्यन्तप्रायस्य वाऽनिर्ज्ञातजातिविशेषे शकुन्तलादौ किमियं स्वसौभाग्याभिमानगर्भा तत्स्तुतिगर्भा चोक्तिनं भवति । वीतरागस्य वा अनादिकालाभ्यस्तरागवासनावासिततया मध्यस्थत्वेनापि तां वस्तुतस्तथा पश्यतो नेयमुक्तिः न संभाव्या । न हि वीतरागो विपर्यस्तान् भावान् पश्यति न ह्यस्य वीणाक्वणितं काकरटितकल्पं प्रतिभाति । तस्मात्प्रस्तुतानुसारेणोभयस्यापीयमुक्तिरुपपद्यते । अप्रस्तुतप्रशंसायामपि ह्यप्रस्तुतः सम्भवन्नेवार्थो वक्तव्यः । न हि तेजसीत्थमप्रस्तुतप्रशंसा सम्भवति— अहो धिक्ते काष्ण्यमिति । सा परं प्रस्तुतपरतयेति नात्रासम्भव इत्याशङ्क्याह— न चेति । निस्सामान्येति निजमहिमेति विशेषज्ञमिति परिदेवितमित्येतैश्चतुर्भिर्वाक्यखण्डैः क्रमेण पादचतुष्ट्यस्य तात्पर्यं व्याख्यातम् । नन्वत्रापि किं प्रमाणमित्याशङ्क्याह— तथा चेति । ननु किमियतेत्याशङ्क्य तदाशयेन निर्विवादतदीयश्लोकापितेनास्याशयं संवादयति— सम्भाव्यत इति । अवगाहनमध्यवसितमपि न यत्र, आस्तां तस्य सम्पादनम् । परमं यदर्थतत्त्वं कौस्तुभादिभ्योऽप्युत्तमम् । अलब्धं प्रयत्नपरीक्षितमपि न प्राप्तं सदृशं यस्य तथाभूतं प्रतिग्राहमेकैको ग्राहो जलचरः प्राणी ऐरावतोच्चैःश्रवोधन्वन्तरिप्रायो यत्र तदलब्धसदृशप्रतिग्राहकम् ।

एवंविध इति । परिदेवितविषय इत्यर्थः । इयति चार्थे अप्रस्तुतप्रशंसोपमालक्षणमलङ्कारद्व्यम् । अनन्तरं तु स्वात्मनि विस्मयधामतयाद्भुते विश्रान्तिः । परस्य च श्रोतृजनस्यात्यादरास्पदतया प्रयत्नग्राह्यतया चोत्साहजननेनैवंभूतमत्यन्तोपादेयं सत्कतिपयसमुचितजनानुग्राहकं कृतमिति स्वात्मनि कुशलकारिताप्रदर्शनया धर्मवीरस्पर्शनेन वीररसे विश्रान्तिरिति मन्तव्यम् । अन्यथा परिदेवितमात्रेण किं कृतं स्यात् । अप्रेक्षापूर्वकारित्वमात्मन्यावेदितं चेत्किं ततः, स्वार्थपदार्थासम्भवादित्यलं बहुना ।

लोचन

याच (म्हणजे गुणीभूतव्यंग्याचे शेवटी रसादिध्वनीत पर्यवसान होते, या) मुद्याला पुष्टि देण्यासाठी 'ध्वनि हाच काव्याचा आत्मा होय' हे तत्व कारिकाकार 'तो प्रकारही' या कारिकेने पुन्हा स्पष्टपणे सांगतात. 'दोन श्लोकात' – म्हणजे आताच एका बाबतीत सारख्या प्रकारची असलेली जी 'पार्वतीचे पाय' इ. व 'प्रियकर उंचावर असलेली फुले' इ. दोन उदाहरणे दिली, त्यांमध्ये 'दोन' या शब्दामुळे 'तो देवर्षि' इ. श्लोक या प्रकारात अंतर्भूत होण्याचा प्रश्नच नाही. [९]

'हे भाग्यवान कृष्ण! राधेला प्रसन्न करणे' – 'तू विनाकारण रागावली आहेस, मी तुझ्या पाया पडलो तरी तू प्रसन्न होत नाहीस, तेव्हा तुला प्रसन्न करणे कठीण आहे, (पण) तू रडू नकोस' असे आधी म्हणून प्रियकर कृष्ण राधेचे अश्रु पुसत असताना (तुला प्रसन्न करणे कठीण आहे हे) त्याचे म्हणणे मान्य करून राधेने म्हटलेले हे वाक्य आहे. 'भाग्यवान [१०]' कारण तुझी (दुसरी) प्रिया, तिच्याशी तू केलेल्या रतिक्रीडेची चिन्हे तू अंगावर धारण केल्याशिवाय तुला क्षणभरही बाजूला होऊ देत नाही. 'या वस्त्राने' – हे वस्त्र तू धारण केले आहेस, ते प्रत्यक्ष पाहा, असा अर्थ. तेच हे वस्त्र की, ज्या वस्त्राबद्दल तुला एवढा आदर आहे की, लज्जा वगैरे गुंडाळून ठेवूनही ते वस्त्र तू असे ऐटीने अंगावर मिरवीत आहेस! 'पुसत राहिला आहेस–' कारण या (वर्तमानकालवाचक धातुसाधित) विशेषणामुळे तू माझे अश्रू पुसत आहेस, तरी ते उलट हजारो धारांनी वाहात आहेत (असे सुचविले जात आहे.) आणि तुझे भान तर तिच्यामुळे इतके हरपले आहे की, मी राधा आहे हे विसरून तीच (म्हणजे तुझी दुसरी प्रियाच) तुझ्यावर रागावली आहे असे तू समजतो आहेस! तसे नसते तर तू असे (म्हणजे तुझ्या त्या प्रेयसीच्या वस्त्राने माझे अश्रू पुसणे हे कृत्य) कसे बरे केले असतेस? 'ओघळलेली' – (यापूर्वी मी अश्रू गाळले, पण) आता मी रडत राहण्याची वेळदेखील आता निघून गेली आहे, असा (भूतकाळी विशेषण वापरण्यामागील सूचित) अर्थ. पण जर तू असे म्हणशील की, 'मी इतका कळवळा दाखवूनही तू राग का सोडीत नाहीस?' तर त्याचे उत्तर हेच की, मी काय करणार? स्त्रियांचे मन स्वभावतः निष्ठुरच असते. [११] कारण स्त्री म्हणजे प्रेम वगैरे भावनांनी विरहित अशी केवळ एक व्यक्ति आहे. त्या व्यक्तीचा स्वभावच असा आहे. आणि त्या स्त्रियांच्या स्वतःच्या बाबतीत (काही म्हणावयाचे, तर ते) असे की, स्त्रियांचे हृदय नाजूक असते असे जे म्हटले जाते, त्यात काही तथ्य नाही. (उलट) त्यांचे हृदय वज्राहूनही कठोर असते. कारण अशा प्रकारच्या घटनेचा प्रत्यक्ष अनुभव येऊनही माझ्या हृदयाचे हजारो तुकडे होत नाहीत. [१२] 'सांत्वनाचे प्रयत्न' – म्हणजे (माझी मर्जी सांभाळण्यासाठी तू) वरकरणी सौजन्याने केलेले (प्रयत्न). 'अनुनयाच्या (अनेक) प्रसंगी' – असे बहुवचन वापरून अनेक स्त्रियांचा प्रियकर असलेल्या ह्या कृष्णाची वारंवार ही अशीच अवस्था होत असते असे सुचवून कृष्णाचा कमालीचा मोहकपणा प्रकट केला आहे. अशा रीतीने हे सगळे सुन्दर व्यंग्यार्थ वाच्यार्थाचे सौन्दर्य खुलवितात. पण अशा प्रकारे भूषित झालेला तो वाच्यार्थ शेवटी 'ईर्ष्याविप्रलंभ' रतीचे अंग होतो (म्हणजे त्या रतीचा व्यंजक होतो).

पण ज्या कोणी विवरणकाराने या तिन्ही श्लोकांत व्यंग्य अर्थ रसाचेच अंग होतो असे विवरण केले, त्याने देवमूर्ति विकून त्या देवाच्या यात्रेचा उत्सव केल्याप्रमाणे झाले. [१३] कारण असे व्याख्यान केल्यास व्यंग्यार्थ हा वाच्यार्थाला गुणीभूत असतो हा जो मुद्दा (सध्या) चालू आहे, तो मुळासकट उखडून टाकल्यासारखे होईल. कारण रसादिकांहून भिन्न असलेला (वस्तुरूपी किंवा अलंकाररूपी) व्यंग्यार्थ रसादिकांचे अंग होणे हे त्या व्यंग्यार्थांचे प्राधान्यच होय, दुसरे काही (म्हणजे गुणीभूतत्व) नाही, [१४] अशी परिस्थिती असल्यामुळे आमच्याच वंशातील पूर्वजांशी [१५] वादविवाद करणे पुरे.'

'असे असल्यामुळे' – आता नुकत्याच सांगितलेल्या रीतीने ध्वनिकाव्य आणि गुणीभूतव्यंग्यकाव्य यांमध्ये फरक असल्यामुळे, असा अर्थ. कारिकेतील 'देखील' या शब्दाचे विवरण करण्यासाठी वृत्तिकार 'आणि (गोसावी.....) असे नाही' इ. विधान करितात. (मला शत्रू असावेत) ह्या श्लोकाचे विवरण आम्ही पूर्वीच [१६] केले असल्यामुळे ते आता पुन्हा येथे करीत नाही. 'मात्र जी वाक्ये' जरी या– [म्हणजे '(माणसे ही) राजाचीही सेवा' इ.] उदाहरणामध्ये विषयोपमोगाचा वीट हे स्वरूप असलेल्या शान्त रसाचा प्रत्यय येत असला, तरी या उदाहरणातील चमत्कार (म्हणजे सविस्मय आनंद) हा वाच्यार्थामुळेच [१७] आहे. असंभवनीयता, अनिष्ट कृति करणे [१८] वगैरे व्यंग्यार्थ हा त्या वाच्यार्थालाच अनुसरणारा आहे. आणि तो व्यंग्यार्थ **अपि** या शब्दाचा प्रत्येक चरणात दोनदा अन्वय करावयाचा असल्यामुळे, [१९] 'आणि' या शब्दाचा तीनही चरणांमध्ये अन्वय, करावयाचा असल्यामुळे [२०], तसेच 'खरोखरीच' या शब्दाचा अन्वय दोनदा करावयाचा असल्याने [२१] आणि 'माणसे' या शब्दामुळे [२२] (काहीसा) वाच्य केला गेल्याने त्या व्यंग्यार्थाला दुय्यमपणा प्राप्त झाला आहे. आणि हे भेदाचे [२३] विवेचन करणे निरुपयोगी नाही हे वृत्तिकार 'वाच्यार्थ आणि व्यंग्यार्थ 'इ. शब्दांनी दाखवितात. 'आणि अलंकार यांची'– जेथे (प्रधान किंवा गौण) व्यंग्यार्थ नसतोच, तेथे केवळ ते (म्हणजे व्यंग्यार्थरहित) अलंकारच [२४] प्रधान असतात. 'नाहीतर मात्र' म्हणजे वाच्यार्थ व व्यंग्यार्थ प्रधान आहेत किंवा नाहीत यासंबंधीचा विवेक करण्याचा कसोशीने प्रयत्न केला नाही तर, असा अर्थ.

('प्रसिद्ध अलंकारांच्या बाबतीतच' यातील 'च' [२५] हे शब्दयोगी अव्यय योजिण्यामागील वृत्तिकारांचा अभिप्राय असा की, मी नव्यानेच कल्पिलेल्या गुणीभूतव्यंग्य या प्रकाराच्या बाबतीत तर वाचकांचा गोंधळ उडेल, यात मुळीच संशय नाही. 'संपत्ति' हा शब्द योजिल्याने [२६] आपले सर्वस्व असणे.' व 'स्वताच्या अनेक कामी उपयोगी पडणे' हे अर्थ सुचविले गेले आहेत. 'परवा केली नाही'– कारण दीर्घकाळपर्यत हळूहळू जो खर्च होत राहतो, व जो विजेच्या लखलखाटासारखा एकदम होऊन जात नाही, त्याच्या बाबतीत विचार अवश्य केला जातो. पण ब्रह्मदेव अनादिकाळापासून निर्मिति करणारा असूनही त्याच्या मनात लवमात्र विवेक उपजला नाही [२७] हा त्याचा कमालीचा अविचारीपणा होय. म्हणूनच कवीने 'खूप कष्ट' असे म्हटले [२७अ] आपल्या मर्जीनुसार वागणाऱ्या ज्यांच्या स्वातंत्र्याला नियमांचा जाच नाही अशा, असा अर्थ. 'या बिचारीच्या सुद्धाब्रह्मदेव जे स्वतः निर्माण करितो, त्याचाच घात त्याने (स्वतःच) करावयाचा [२८] हे फार भयंकर होय, हे 'च' या आणि 'सुद्धा' यां अवयवांनी सुचविले आहे. 'कोणत्या फळाचा उद्देश'– स्वतःचा फायदा नव्हे किंवा जगाचा नव्हे किंवा आपण निर्मिलेल्या नायिकेचाही नव्हे, असा अर्थ. 'याचे कारण तो'– कारण प्रेमिकाच्या तोंडीं 'बिचारीच्या जन्माचा नाश केला' अशा तऱ्हेचे दीनवाणे व अभद्र शब्द येणे अयोग्य वाटते. आणि 'अनुरूप वर न मिळाल्यामुळे' हे उद्‌गार प्रेमिकाच्या स्वतःच्या दृष्टीने अगदीच अनुचित होत. आणि आपण तिला अनुरूप नाही हे समजूनही तिच्यावर प्रेम करणे हे पशुतुल्य म्हणावे लागेल.

"पण काय हो, रावणासारख्या एखाद्या प्रेमिकाने सुद्धा जर कोणत्यातरी कारणामुळे काही काळापुरते (स्त्रियांयिषयी आसक्ति न ठेवण्याचे) व्रत घेतले असेल तर त्याच्या तोंडून सीतेसारख्या स्त्रीविषयी, किंवा जिच्या विशिष्ट जातीसंबंधी काही माहिती नाही अशा शकुंतलेसारख्या स्त्रींविषयी दुष्यंतासारख्या एखाद्या पुरुषाच्या तोंडून स्वतःच्या मोहकपणाच्या अभिमानाच्या पोटी, किंवा तिची स्तुति करण्याच्या अभिप्रायाने असे उद्‌गार [२९] का निघू शकणार नाहीत? किंवा एखाद्या विरक्त मनुष्यावरही अनादिकालापासून (अनंत जन्मांमध्ये उपभोगिलेल्या) विषयोपभोगाचे संस्कार झालेले असल्यामुळे त्याला ती स्त्री खरोखरीच सुंदर वाटून त्याने अलिप्तपणेच तिजबद्दल असे म्हणणे असंभवनीय नाही. कारण एखादा मनुष्य विरागी असला, तरी त्याला पदार्थ जसे असतात, त्याच्या काही उलट दिसत नाहीत! [३०] त्याला

वीणेचा (मधुर) झंकार काही कावळ्याच्या ओरडण्यासारखा (कर्कश) वाटत नाही! म्हणून ज्या प्रकारच्या वक्त्याच्या संदर्भात हा श्लोक आला असेल, त्याप्रमाणे हे बोलणे (प्रेमिक आणि विरागी अशा) दोन्ही प्रकारच्या पुरुषांच्या तोंडी संभवते. (व्याजस्तुतीप्रमाणे) अप्रस्तुतप्रशंसेमध्ये सुद्धा [३१] अप्रस्तुत असलेली गोष्ट जी वर्णावयाची, तीही संभवनीय असेल अशीच असली पाहिजे; कारण तेजाचे वर्णन करिताना 'अरे तुझ्या या कमालीच्या काळेपणाला धिक्कार असो!' अशी अप्रस्तुतप्रशंसा संभवत नाही. [३२] पण अप्रस्तुतप्रशंसेमध्ये (किंवा व्याजस्तुतीमध्ये) जरी अप्रस्तुताचे वर्णन केलेले असले, तरी ते प्रस्तुताचे सूचन करण्यासाठीच असते, म्हणून त्यात असंभवनीयता नाही. [३३] अशी शंका कल्पून वृत्तिकार 'आणि हा श्लोक कोणत्यातरी' इ. विधान करितात. वृत्तीमधील 'आपल्या असामान्य गुणांच्या गर्वाने फुगलेल्या' आपल्या थोरपणाने मत्सरी लोकांच्या मनात ईर्ष्येमुळे बेचैनी निर्माण केलेल्या' 'आपल्या गुणांची किंमत ओळखणारा' आणि 'विलाप' या चार वाक्यांशांनीं वृत्तिकारांनी अनुक्रमे प्रत्येक चरणाचे (येथील प्रस्तुत अर्थांच्या बाबतीतील व्यंग्य असलेले) तात्पर्य विशद केले आहे. 'पण काय हो, येथे अप्रस्तुतप्रशंसा आहे या (वृत्तिकारांनी केलेल्या) विधानालाही प्रमाण काय?' अशी शंका कल्पून वृत्तिकार तिला 'कारण हा श्लोक' इ. वाक्याने उत्तर देतात. 'पण काय हो, हा श्लोक धर्मकीर्तीचा असेल असे म्हणून तुम्ही येथे अप्रस्तुतप्रशंसा आहे असे कसे सिद्ध करू शकता?' अशी शंका कल्पून वृत्तिकार या श्लोकातील आशयाशी जुळणारा आशय ज्यात आहे असा, निर्विवादपणे धर्मकीर्तीचाच असलेला श्लोक 'संभवनीयही आहे' असे म्हणून उद्धृत करितात. ज्या माझ्या सिद्धान्तामध्ये (आणि सागरामध्ये) अवगाहन करण्याचा विचारही कोणी मनात आणीत नाही, तेथे प्रत्यक्ष अवगाहन करणे तर राहूच द्या. माझ्या सिद्धान्तातील सारभूत असे जे तत्त्व (आणि सागरातील संपत्ति) ते कौस्तुभ मणि वगैरेपेक्षाही उत्कृष्ट आहे. ते न मिळालेले म्हणजे प्रयत्नपूर्वक शोध करूनही ज्याच्या तोडीचा दुसरा गवसला म्हणजे प्राप्त झालेला नाही, असा **'प्रतिग्राह'** [३४] म्हणजे ऐरावत, उच्चैःश्रवा, धन्वन्तरी यांसारखा एकेक जलचर प्राणी ज्याच्यात आहे असे (सागराचे पाणी) [३५] हा **अलब्धसदृशप्रतिंग्राहक** याचा अर्थ.

'अशा प्रकारचा' म्हणजे विलाप या स्वरूपाचा, असा अर्थ. आणि या दोन श्लोकांमधील वाच्य अर्थाला अप्रस्तुतप्रशंसा व उपमा हे दोन अलंकार भूषित करीत आहेत. पण त्यानंतर आपण स्वतः [३६] विस्मयाचा विषय असल्यामुळे त्या वाच्यार्थाचे पर्यवसान अद्भुत रसात होत आहे. आणि दुसऱ्या श्लोकाच्या बाबतीत (अद्भूत रसाच्या प्रतीतीनंतर) श्रोत्यांच्या अतिशय आदरास पात्र आणि त्यांना प्रयासांनीच समजण्यासारखा असा हा माझा सिध्दान्त असल्यामुळें तो सिद्धांत श्रोतृवृंदाच्या मनात उत्साह (हा स्थायिभाव) निर्माण करीत असल्याने अतिशय स्वीकार्य असा असून तो मी काही अधिकारी लोकांच्या आटोक्यात आणून त्यांच्यावर उपकार केले व अशा रीतीने मी त्यांचे कल्याण करणारा आहे असे सुचवून धर्मकीर्तीने 'धर्मवीर' या प्रकाराला स्पर्श करून या सर्व श्लोकाचे पर्यवसान शेवटी वीररसात केले आहे असे समजावे. तसे नसते, तर (वाच्यार्थाच्या कक्षेत असलेला असा) केवळ 'विलाप' करण्याने कवीला काय मिळाल्यासारखे होणार? यावर आपण अविचारीपणाने कार्य करणारे आहोत हे धमेकीर्तीने दाखविले आहे असे कोणी म्हणेल, तर तो अविचारीपणा प्रकट केल्यामुळे काय लाभ? म्हणजे त्यापासून कवीचा स्वतःचा किंवा दुसऱ्यांचाही फायदा होण्याचा संभव नाही. म्हणून आता याचे फार विवरण पुरे.

टीपा

१) दुसऱ्या स्त्रीबरोबर क्रीडा करूनच नव्हे, तर तिचे नेसते वस्त्र धारण करून कृष्ण राधेकडे आलेला आहे. ते दृश्य पाहून संतप्त झालेली राधा त्याला वरीलप्रमाणे म्हणत आहे; 'दुसऱ्या स्त्रीशी क्रीडा केल्याचा प्रत्यक्ष पुरावा पाहूनही माझे हृदय फुटत नाही,' या व्यंग्यार्थामुळे 'स्त्रीचे हृदय कठीण असते' या वाच्यार्थाचे समर्थन

केले जात असल्याने तो व्यंग्यार्थ गुणीभूत झाला असून तो वाच्यार्थाचे सौंदर्य खुलवीत आहे. अर्थात् अशा तऱ्हेने खुलविला गेलेला वाच्यार्थ शेवटी ईर्ष्याविप्रलंभ शृंगार या व्यंग्य रसाचे अंग होतो.

२) पाहा, द्वितीय खंड, उद्द्योत – ३ 'अलक्ष्यक्रम' ध्वनि हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादी अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे **न्यक्कारो ह्ययमेव** इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण.

३) हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनीचे दुसऱ्या उद्द्योतातील (प्रथमखंड, "उदद्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार पाहा'") 'मी राम सगळे सहन करू शकतो' हे उदाहरण घेऊ. येथे 'राम' हा शब्द वापरण्यामागील मुख्य उद्देश त्यातील व्यंग्यार्थ (जन्म झाल्यापासून केवळ दुःखच भोगणे इ. स्वरूपाचा) प्रत्ययास आणून देणे हा आहे. तेथील 'राम ही व्यक्ति' हा वाच्यार्थ व्यंग्यार्थामध्ये टिकून राहतो. 'सर्व दुःखे सहन करणारा' हा व्यंग्यार्थ जरी प्रामुख्याने सूचित होत असला, तरी तो सहन करणारी व्यक्ति 'राम' ही आहे. मात्र 'राम' या शब्दाने वाच्य असलेला 'दशरथपुत्र' हा अर्थ 'अनेक दुःखे सहन करणारा दशरथपुत्र' या व्यंग्यार्थामध्ये परिणत होतो. 'पण त्यातदेखील तो शत्रू एक क्षुद्र गोसावी' (तपस्वी), यातला 'गोसावी' हा शब्द जरी 'पराक्रमशून्यत्व' हा अर्थ सुचवीत असला, तरी रामाने वनवासकाळात तापस म्हणून जीवन कंठले असल्यामुळे 'तापस' या शब्दाचा वाच्यार्थ विवक्षितच आहे. तो बाधित होत नाही. 'पराक्रमशून्य तपस्वी' असा व्यंग्यार्थाने सजविलेला वाच्यार्थ रौद्ररसाचा परिपोषक होतो, म्हणून हे गुणीभूतव्यंग्याचेच उदाहरण होय. अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनीचे नव्हे.

४) या उदाहरणातून राजसेवेसारख्या दुर्घट गोष्टी करणे, विषभक्षणासारख्या अनिष्ट गोष्टी करणें इ. व्यंग्यार्थ **अपि खलु च मानवाः** इ. शब्दांनी अंशतः 'वाच्य' झाले असल्यामुळे त्या व्यंग्यार्थाला गौणत्व आले आहे.

५) एखाद्या श्लोकातील दोन संभाव्य अलंकारांपैकी हा अलंकार आहे की तो याबद्दल विद्वानांत मतभेद होणे शक्य आहे हे आनंदवर्धनांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांनी यानंतर जे उदाहरण दिले आहे, त्यात व्याजस्तुति हा अलंकार आहे की अप्रस्तुतप्रशंसा आहे याबद्दल दुमत होऊ शकेल हींही गोष्ट खरी पण व्यंग्यार्थ व वाच्यार्थ यांमध्ये प्रधान कोण हे ओळखणे महत्वाचे आहे व त्यामुळे अलंकार कोणता हे ओळखण्यास मदत होते, याला त्यांनी दिलेले उदाहरण समर्पक वाटत नाही. कारण या श्लोकात व्याजस्तुति माना किंवा अप्रस्तुतप्रशंसा माना, तेथे व्यंग्यार्थ हा वाच्यार्थाच्या समर्थनार्थ खर्ची पडतो म्हणून तो गुणीभूतच आहे. तेव्हा आनंदवर्धनांनी उदाहरण असे द्यावयास पाहिजे होते की, जेथे अमुक अलंकार मानिल्यामुळे व्यंग्यार्थ वस्तुतः प्रधान असून तो गुणीभूत आहे असे उगाचच मानावे लागते किंवा व्यंग्यार्थ वस्तुतः गुणीभूत असून तो प्रधान आहे असे मानण्याचा प्रसंग येतो. अशा प्रकारचे उदाहरण म्हणजे संदर्भानुसार जे सभासोक्तीचे किंवा अप्रस्तुत प्रशंसेचे उदाहरण होऊ शकते, असे पद्य.

६) वल्लभदेवाची सुभाषितावलि, श्लोक १४७२. या श्लोकाचे कर्तृत्व वल्लभदेवाने प्रसिद्ध बौद्ध तत्त्ववेत्ता धर्मकीर्ति याजकडे दिले आहे.

७) म्हणजे हा श्लोक एखाद्या ग्रंथाचा भाग असता, तर त्याचा वक्ता कोण आहे व त्याच्या मनात काय आहे हे लक्षात घेऊन ही व्याजस्तुति आहे असे एखादेवेळी म्हणता आले असते. पण हा श्लोक अन्योक्तीसारखा

असल्यामुळे त्याचा संदर्भ दिला असण्याची आवश्यकता नाही व म्हणून या श्लोकात व्याजस्तुति न मानिता अप्रस्तुतप्रशंसा मानावी असे आनंदवर्धनांचे म्हणणे वस्तुतः अन्योक्तीच्या किंवा अप्रस्तूतप्रशंसेच्या बाबतीत संदर्भ दिलेला नसला, तरी तेथे विशिष्ट संदर्भ कल्पावा लागतोच.

८) वरील वर्णन महासागराच्या लाटांकडे लावताना पुढीलप्रमाणे अर्थ घेता येतो– 'खोलंवर जाणें' म्हणजे महासागरात बुडी मारणे. बुद्धिसामर्थ्य म्हणजे निश्चयाचे बळ आणि साहसीपणा; सारभूत स्वरूप म्हणजे सागराच्या तळी दडलेल्या अनेक आश्चर्यकारक वस्तु. **अलब्धसदृशप्रतिग्राहकम्** याचा णर्थ 'ऐरावत, उच्चैःश्रवा, इ. प्राण्यांना जगात तोड नाही' असा घ्यावा.

९) म्हणजे 'पार्वतीचे पाय' इ. व 'प्रियकर उंचावर' इ. श्लोकांमधील व्यंग्यार्थ शब्दांनी किंचित वाच्य झाला असल्यामुळे वाच्यार्थाला गुणीभूत झालेला आहे. हा त्यांमधील सारखेपणा. पण 'तो देवर्षि' इ. श्लोकातील 'लज्जा' हा अनुरणनरूपी व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत झालेला नाही, म्हणून ते उदाहरण गुणीभूतव्यंग्याचे नाही.

१०) 'सुभग' या शब्दाचे विवरण मल्लिनाथाने **सखलु सुभगो यमङ्गनाः कामयन्ते ।** असे केले आहे. (**मेघदूतम्,** १–३०)

११) तुलनार्थ पाहा, ऋग्वेद मंडल १०, सूक्त ९५ मधील १५ व्या ऋचेतील उर्वशीचे पुढील वाक्य– **न वै स्त्रैणानि सख्यानि सन्ति, सालावृकाणां हृदयान्येंताः ।**

१२) तुलनार्थ पाहा, **कुमारसंभवम् ४–५ मधील न विदीर्ये, कठिनाः खलु स्त्रियः ।** हे रतीने काढलेले उद्‌गार.

१३) वरील तिन्ही श्लोकात व्यंग्यार्थ हा **वाच्यार्थाचे** अंग होत असल्यामुळे ती गुणीभूतव्यंग्याची उदाहरणे झाली आहेत असे आनंदवर्धन व अभिनवगुप्त यांचे म्हणणे आहे. पण या दुसऱ्या टीकाकाराचे म्हणणे असे की, या तिन्ही श्लोकांतील व्यंग्यार्थ (वाच्यार्थाचे अंग न होता) रसादिकांचे अंग होतो, म्हणून ही गुणीभूतव्यंग्याची उदाहरणे आहेत. पण त्या टीकाकाराचे म्हणणे मानिल्यास ती सर्व ध्वनीची उदाहरणे होतील. गुणीभूतव्यंग्याची होणार नाहीत. कारण व्यंग्यार्थ हा वाच्यार्थाला गुणीभूत होत असला तरच ते काव्य गुणीभूतव्यंग्य म्हणावयाचे, आणि व्यंग्यार्थ हा रसादींना गुणीभूत होत असेल तर ते ध्वनीचेच उदाहरण म्हणावयाचे.

१४) किंवा या वाक्याचा दुसरा अर्थ असा होईल की, वस्तुरूप किंवा अलंकाररूप व्यंग्यार्थ रसादिकांचा व्यंजक होणे हेच त्याचे प्राधान्य होय. तो स्वतः प्रधान असणे हे नव्हे. कारण वस्तुध्वनि व अलंकारध्वनि यांचे पर्यवसान नेहमी रसादिकांतच होते.

१५) पाहा, द्वितीय खंड, "उदद्योत – ३ 'वाच्यार्थ रसादि यांच्या प्रतीतींमध्ये क्रम असतोच, पण तो लक्षात येत नाही; म्हणून 'अलक्ष्यक्रम' ही संज्ञा'".

१६) पाहा, द्वितीय खंड, "उदद्योत – ३ 'अलक्ष्यक्रम' ध्वनि हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादि अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे न्यक्कारो ह्यमेव इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण'".

१७) तुलनार्थ पाहा, प्रथमखंड "उदद्योत – २ 'ती दक्षता म्हणजे १) अलंकार रसादीचे अंगच राहिला पाहिजे, तो अलंकारच 'अंगी' म्हणजे मुख्य होता कामा नये'" वरील 'ज्या विष्णूने आपल्या चक्राला' इ. श्लोक व त्यावर पुढे केलेले विवरण.

१८) राजाची यशस्वीपणे सेवा करणे हे अतिशय कठीण म्हणून असंभवनीय आहे विषभक्षण हे इष्टाच्या उलट म्हणजे अनिष्ट आहे. 'वगैरे' म्हणजे स्त्रियांच अतिसंग परिणामी नुकसानकारक आहे.

१९) म्हणजे 'राजाचीही' आणि 'सेवाही' करितात; विषदेखील, भक्षणदेखील करितात; स्त्रियांबरोबरही, रममाणही होतात, असे तात्पर्य.

२०) 'आणि' या अव्ययाचा संबंध तिन्ही वाक्यांशी जोडावयाचा आहे. म्हणजे यातील एक एक गोष्टही दुर्घट आणि अनर्थावह आहे. मग या तिन्ही गोष्टी करणे किती दुर्घट आणि अनर्थावह आहे हा भावार्थ.

२१) खरोखर माणसे आणि खरोखर मोठी हुशार आहेत असा अभिप्राय.

२२) म्हणजे 'माणसे' बोलूनचालून दुबळी असूनही ती इतकी दुर्घट कार्ये करितात.

२३) हे भेदाचे म्हणजे वाच्य अर्थ आणि व्यंग्य अर्थ यांपैकी प्रधान कोणता आणि दुय्यम कोणता यांमधील भेदाचे विवेचन.

२४) मुळातील 'शुद्ध' या शब्दाच्या अर्थासाठी पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'रसादि अलंकाराचे दोन प्रकार १) शुद्ध'".

२५) तात्पर्य, 'च' या अव्ययाचा येथे 'सुद्धा' असा अर्थ करावा. म्हणजे प्रसिद्ध अलंकारांच्या बाबतीतसुद्धा गोंधळ उडेल, मग गुणीभूतव्यंग्य आणि ध्वनि यांच्या बाबतीत तर उडेलच, यात काय संशय?

२६) 'या तनुगात्रीचे रूप' इ. श्लोकात 'संपति' हा शब्द वापरल्यामुळे 'लावण्य ही विधात्याची सुंदर वस्तु आणि अनेकविध सुंदर व्यक्ती निर्माण करण्यास अत्यंत उपयोगी व श्रेष्ठ अशी सामग्री आहे,' असा अर्थ प्रतीत होतो.

२७) म्हणजे इतका दीर्घकाळ निर्मिति करण्याचा अनुभव असल्यामुळे विधात्याला विवेक सुचावयास पाहिजे होता, पण हिची निर्मिति करिताना त्याने मुळीच विचार केला नाही.

२७अ) या दोन प्रतीकांवर लोचनामध्ये काहीच विवरण केले नाही. पण हेमचन्द्राने काव्यानुशासन, पृ. ३६२ येथे केलेले विवरण रसग्रहणाच्या दृष्टीने लक्षणीय असल्याने जिज्ञासूनी ते पाहावे.

२८) तुलनार्थं पाहा, **कुमारसंभवम्,** २—५५ मधील **विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम् ।** हे वाक्य.

२९) म्हणजे 'या तनुगात्रीचे रुप' इ. श्लोकामध्ये काढले आहेत, तसे. म्हणजे पूर्वपक्ष्याच्या म्हणण्याप्रमाणे हे उद्‌गार एखाद्या व्रतस्थ माणसाचे किंवा रावणासारख्याचे किंवा दुष्यंतासारख्याचे असणे शक्य आहे. कारण, आपण स्वतः जरी तिला सर्वस्वी अनुरूप आहोत असा बोलणाऱ्याला अभिमान असला, तरी आपले व्रत या कारणामुळे किंवा ती आपल्याला वश होत नाही म्हणून किंवा तिची व आपली जात एक आहे की नाही हे माहीत नाही म्हणून, 'तिला तिच्या तोडीचा जोडीदार मिळू शकत नाही' असे तो म्हणू शकेल. 'तिचा जन्म फुकट गेला' ही वाच्य निंदा आणि 'ही असामान्य सौंदर्यवती आहे खरी' अशी व्यंग्य स्तुति येथे असू शकेल म्हणून येथे व्याजस्तुति आहे असे पूर्वपक्ष्याचे म्हणणे.

३०) म्हणजे ते खरेखुरे सुंदर असले, तर ते त्याला काही असुंदर आहेत असे वाटत नाही.

३१) येथे पूर्वपक्ष्याने या श्लोकात व्याजस्तुति आहे अशीच भूमिका घेतलेली आहे आणि 'अप्रस्तुतप्रशंसा अलंकारामध्येही अशीच परिस्थिती असते' असे म्हणून अप्रस्तुतप्रशंसेकडे केवळ अंगुलिनिर्देश केला आहे.

३२) म्हणजे अप्रस्तुत गोष्टीच्या द्वारे जरी प्रस्तुताचे वर्णन करणे असले, तरी ती अप्रस्तुत गोष्ट तेजाच्या काळेपणाप्रमाणे असंभवनीय असता कामा नये.

३३) कारण The end justifies the means!

३४) **प्रतिग्राह** या अव्ययीभाव समासातील **प्रति** चा अर्थ 'साकल्य' असा घ्यावयाचा आहे. म्हणून **प्रतिग्राह = सकलाः ग्राहाः.**

३५) या श्लोकातील पहिल्या दोन चरणांचे विवरण अभिनवगुप्तांनी धर्मकीर्तीचा सिद्धान्त व सागर या दोहोंनाही मोघमपणे लागू पडेल असे केले आहे. पण तिसऱ्या चरणाचे विवरण त्यांनी सागराला लागू पडेल अशाच रीतीने केलेले दिसते. ते धर्मकीर्तीच्या सिद्धान्ताला कसे लागू पडेल हे स्पष्टपणे दाखविण्याची गरज त्यांना वाटली नाही. ते वृत्तीतल्या त्या चरणाच्या अनुवादावरून कल्पिणे शक्य आहे. या पक्षी सदृशप्रतिग्राहक याचा अर्थ आकलन करणारा योग्य (म्हणजे बुद्धिमान) मनुष्य असा आहे.

३६) 'आपण स्वतः' म्हणजे कवि स्वतः किंवा श्लीकातील वाच्यार्थ.

ध्वन्यालोकः

अप्रस्तुतप्रशंसायां च यद्वाच्यं तस्य कदाचिद्विवक्षितत्वं, कदाचिदविवक्षितत्वं, कदाचिद्विवक्षिताविवक्षितत्वमिति त्रयी बन्धच्छाया । तत्र विवक्षितत्वं यथा—

परार्थे यः पीडामनुभवति भङ्गेऽपि मधुरो
यदीयः सर्वेषामिह खलु विकारोऽप्यभिमतः ।
न सम्प्राप्तो वृद्धिं यदि स भृशमक्षेत्रपतितः ।

किमिक्षोर्दोषोऽसौ न पुनरगुणाया मरुभुवः ।

यथा वा ममैव—
अमी ये दृश्यन्ते ननु सुभगरूपाः सफलता
भवत्येषां यस्य क्षणमुपगतानां विषयताम् ।
निरालोके लोके कथमिदमहो चक्षुरधुना
समं जातं सर्वैर्न सममथवान्यैरवयवैः ॥

अनयोर्हि द्वयोः श्लोकयोरिक्षुचक्षुषी विवक्षितस्वरूपे एव न च प्रस्तुते । महागुणस्याविषयपतितत्वादप्राप्तपरभागस्य कस्यचित्स्वरूपमुपवर्णयितुं द्वयोरपि श्लोकयोस्तात्पर्येण प्रस्तुतत्वात् । अविवक्षितत्वं यथा—

कस्त्वं भोः, कथयामि, दैवहतकं मां विद्धि शाखोटकं
वैराग्यादिव वक्षि, साधु विदितं, कस्मादिदं, कथ्यते ।
वामेनाग्र वटस्तमध्वगजनः सर्वात्मना सेवते
न च्छायापि परोपकारकरणे मार्गस्थितस्यापि मे ॥

न हि वृक्षविशेषेण सहोक्तिप्रत्युक्ती सम्भवत इत्यविवक्षिताभिधेयेनैवानेन श्लोकेन समृद्धासत्पुरुषसमीपवर्तिनो निर्धनस्य कस्यचिन्मनस्विनः परिदेवितं तात्पर्येण वाक्यार्थीकृतमिति प्रतीयते ।

विवक्षितत्वाविवक्षितत्वं यथा—
उप्पहजाआएँ असोहिणीएँ फलकुसुमपत्तरहिआए ।
बोरीएँ वइं देंता पामर हो [उत्पथजातायाः अशोभनायाः फलकुसुमपत्ररहितायाः । बदर्या वृतिं ददत्पामर भोः उपहसिष्यसे ॥] **ओहसिञ्झिहिसि ॥**
अत्र हि वाच्यार्थो नात्यन्तं सम्भवी न चासम्भवी ।
तस्माद्वाच्यव्यङ्ग्ययोः प्राधान्याप्राधान्ये यत्नतो निरूपणीये ॥

ध्वन्यालोक

अप्रस्तुतप्रशंसेमध्ये जो वाच्यार्थ असतो, तो काही वेळा (संभवनीय असल्यामुळे) विवक्षित असतो (म्हणजे सोडून द्यावा लागत नाही); काही वेळा तो संभवनीय नसल्यामुळे विवक्षित नसतो (म्हणजे त्याचा त्याग करावा लागतो); तर काहीवेळा तो अंशतः विवक्षित व अंशतः अविवक्षित असतो. अशा तऱ्हेने अप्रस्तुतप्रशंसेत रचनेचे वैचित्र्य तीन प्रकारचे असू शकते. त्यांपैकी वाच्यार्थ (संभवनीय असल्यामुळे) विवक्षित असतानाचे उदाहरण पुढीलप्रमाणे—

जो दुसऱ्यासाठी पीडा [१] (१. दाब, २. दुःख) अनुभवतो, भंग (१. मोडणे, २. मानभंग) झाला तरी जो गोडच (दुसरा अर्थ-स्नेहपूर्णच) असतो, ज्याचा विकार— (१. त्यापासून बनविलेले गूळ, साखर इ. पदार्थ, २. क्रोध इ. मनोविकार) देखील या जगात सर्वांना खरोखर आवडतो, तो (ऊस) जर अयोग्य क्षेत्री

(१. नापीक जमिनीत, २. अयोग्य परिस्थितीत) पडल्यामुळ फार वाढला (१. मोठा झाला, २. उत्कर्ष पावला) नाही, तर तो काय त्या उसाचा दोष? आणि त्या गुणहीन, रेताड जमिनीचा नाही?

किंवा माझाच पुढील श्लोक पाहा—

खरोखर या जगामध्ये रमणीय असे जे निरनिराळे पदार्थ दिसतात, त्यांच्या अस्तित्वाचे सार्थक क्षणभर तरी ज्या डोळ्यांचा विषय होणे हेच असते, ते डोळे आता, जग प्रकाशरहित (म्हणजे अंधकारमय) झाले असताना, इतर अवयवांप्रमाणे निरुपयोगी झालेले आहेत, किंवा त्या डोळ्यांचा त्या अवयवांइतकाही उपयोग उरलेला नाही[२]!

या दोन श्लोकांमध्ये वाच्य असलेले अनुक्रमे ऊस व डोळे हे विषय संभवनीय, अन एव विवक्षितच आहेत, पण प्रस्तुत नाहीत. थोर गुणांनी संपन्न असलेल्या, पण प्रतिकूल परिस्थितीत सापडल्यामुळे ज्याचा उत्कर्ष होऊ शकला नाही अशा कोणा व्यक्तीचे स्वरूप वर्णन करणे हेच या दोन्ही श्लोकांचे मुख्य उद्दिष्ट असून तेच 'प्रस्तुत' आहे.

वाच्यार्थ (असंभवनीय असल्याने) विवक्षित नसतानाचे उदाहरण :—

'बाबा, तू कोण आहेस?' 'सांगतो. मी अभागी शाखोटक [३] आहे.' 'वैतागूनसा बोलतो आहेस?' 'बरोबर ओळखलेस.' (हे वैराग्य) कशामुळे रे बाबा?' 'हे बघ सांगतो. येथे डाव्या बाजूला वटवृक्ष आहे. वाटसरू लोक त्या वटवृक्षाचा मोठ्या आतुरतेने आश्रय करितात. पण मी अगदी रस्त्यावर असून देखील माझी सावलीही लोकांना सुख देण्यास उपयोगी पडत नाही!'

कोणत्याही एखाद्या वृक्षाबरोबर प्रश्नोत्तरे होणे संभवनीय नाही, म्हणून या श्लोकाचा वाच्यार्थ सोडूनच द्यावा लागतो, पण या श्लोकातून संपन्न अशा दुर्जनापासून जवळ असलेल्या दरिद्री पण स्वाभिमानी स्वभावाच्या कोणा माणसाचे गाऱ्हाणे प्रामुख्याने सूचित होत असल्याचा प्रत्यय येतो.

वाच्यार्थ (अंशतः संभवनीय असल्यामुळे) अंशतः विवक्षित व (अंशतः असंभवनीय असल्यामुळे) अंशतः अविवक्षित असतानाचे उदाहरण :—

'अरे वेड्या, रस्ता सोडून भलतीकडेच उगवलेल्या, शोभून न <u>दिसणाऱ्या</u> व फळे, फुले, पाने वगैरे नसलेल्या 'बदरी'ला तू कुंपण घालतो आहेस हे पाहून सगळ्या लोकांत तुझे हसे होईल [४]!'

या उदाहरणात वाच्यार्थ पूर्णपणे संभवनीय असा नाही किंवा पूर्णपणे असंभवनीयही नाही.[५]

म्हणून वाच्यार्थ मुख्य की व्यंग्यार्थ मुख्य हे ओळखण्याचा कसोशीने प्रयत्न करावा.

लोचनम्

ननु यथास्थितस्यार्थस्यासङ्गतौ, भवत्वप्रस्तुतप्रशंसा, इह तु सङ्गतिरस्त्येवेत्याशङ्क्य सङ्गतावपि भवत्येवैषेति दर्शयितुमुपक्रमते अप्रस्तुतेति । नन्विति । यैरिदं जगद्भूषितमित्यर्थः । यस्य चक्षुषो विषयतां क्षणं गतानामेषां सफलता भवति तदिदं चक्षुरिति । सम्बन्धः । आलोको विवेकोऽपि । न सममिति । हस्तो हि परस्पर्शादानादावप्युपयोगी । अवयवैरिति । अतितुच्छप्रायैरित्यर्थः । अप्राप्तः पर उत्कृष्टो भागोऽर्थलाभात्मकः स्वरूपप्रथनलक्षणो वा येन तस्य । कथयामीत्यादि प्रत्युक्तिः । अनेन पदेनेदमाह— अकथनीयमेतत् श्रूयमाणं हि निर्वेदाय भवति, तथापि तु यदि निर्बन्धस्तत्कथयामि । वैराग्यादिति । काक्का दैवहतकमित्यादिना च सूचितं ते वैराग्यमिति यावत् । साधु विदितमित्युत्तरम् । कस्मादिति वैराग्ये हेतुप्रश्नः । इदं कथ्यत इत्यादि सनिर्वेदस्मरणोपक्रमं कथं कथमपि निरूपणीयतयोत्तरम् । वामेनेति । अनुचितेन कुलादिनोपलक्षित इत्यर्थः । वट इति । छायामात्रकरणादेव फलदानादिशून्यादुद्धुरकन्धर इत्यर्थः । छायापीति । शाखोटको हि स्मशानाग्निज्वालालीढलतापल्लवादिस्तरुविशेषः ।

अत्राविवक्षायां हेतुमाह— न हीति । समृद्धो योऽसत्पुरुषः । 'समृद्धसत्पुरुष' इति पाठे समृद्धेन ऋद्धिमात्रेण सत्पुरुषो न तु गुणादिनेति व्याख्येयम् । नात्यन्तमिति । वाच्यभावनियमोऽस्ति नास्तीति न शक्यं वक्तुं, व्यङ्ग्यस्यापि भावादिति तात्पर्यम् । तथा हि उत्पथजाताया इति न तथाकुलोद्भूतायाः । अशोभनाया इति लावण्यरहितायाः । फलकुसुमपत्ररहिताया इति । एवम्भूतापि काचित्पुत्रिणी वा म्रात्रादिपक्षपरिपूर्णतया सम्बन्धिवर्गपोषिका वा परिरक्ष्यते । बदर्या वृत्तिं ददत्पामर भोः [हेमचंद्राच्या काव्यानुशासनात भोः भोः असा पाठ आहे.]**, हसिष्यसे सर्वलोकैरिति भावः । एवमप्रस्तुतप्रशंसां प्रसङ्गतो निरूप्य प्रकृतमेव यन्निरूपणीयं तदुपसंहरति— तस्मादिति । अप्रस्तुतप्रशंसायामपि लावण्येत्यत्र श्लोके यस्माद्व्यामोहो लोकस्य दृष्टस्ततो हेतोरित्यर्थः ॥ ४० ॥**

लोचन

'पण काय हो, ज्या ठिकाणी वाच्यार्थ हा आहे त्या स्वरूपात असंभवनीय असेल, तेथे अप्रस्तुतप्रशंसा असू द्या, पण 'या तनुगात्रीचे रूप' इ. श्लोकाचा वाच्यार्थ आहे त्या स्वरूपातही संभवनीय आहेच की[६]!' अशी शंका कल्पून वाच्यार्थ सुसंगत असेल तेव्हासुद्धा अप्रस्तुतप्रशंसा असू शकते हे दाखविण्यास 'अप्रस्तुतप्रशंसेमध्ये' इ. शब्दांनी वृत्तिकार प्रारंभ करितात.

'या जगामध्ये रमणीय'— ज्यांमुळे हे जग शोभिवंत होते, असा ('रमणीय' या शब्दाचा) अर्थ. ज्या दृष्टीचे हे पदार्थ क्षणभर विषय झाले असताना त्या पदार्थाच्या अस्तित्वाचे सार्थक होते ती ही दृष्टी, असा अर्थ. 'प्रकाश' याचा दुसरा (व्यंग्य) अर्थ 'विवेक' असाही घ्यावा. 'इतकाही उपयोग..... नाही'— कारण हात हा दुसऱ्या वस्तूंना स्पर्श करणे, त्या उचलून घेणे इ. कार्यांनाही उपयोगी पडतो.[७] 'अवयवांप्रमाणे—' जवळजवळ अगदी कुचकामी असलेल्या अवयवांप्रमाणे, अवयव,[८] असा अर्थ. 'पर'[९] म्हणजे उत्कृष्ट आणि 'भाग' म्हणजे वैभव प्राप्त होणे किंवा स्वतःची कीर्ती पसरणे या स्वरूपाचे भाग्य ज्याला मिळाले नाही, त्याचा. 'सांगतो'.... इ,— हे ('तू कोण आहेस?' या प्रश्नाला वृक्षाने दिलेले) उत्तर आहे. ('सांगतो') या शब्दाने असे सुचविले जात आहे की, हे सांगण्यासारखे नाही, कारण ते कानी पडले की उद्वेग वाटेल. तरी पण आग्रहच असला, तर सांगतो. 'वैतागून—' (तू) स्वरामध्ये विशिष्ट बदल करून म्हटल्यामुळे आणि (तुझ्या) 'अभागी' वगैरे[१०] शब्दांमुळे तुझे वैराग्य सूचित होत आहे, असा भावार्थ. 'बरोबर ओळखलेस—' हे

(वृक्षाने दिलेले) उत्तर आहे. 'कशामुळे' हा वैराग्याचे कारण विचारणारा प्रश्न आहे. 'हे बघ सांगतो... वगैरे—' उद्वेगपूर्वक आठवण करण्यास सुरुवात करून काहीही करून सांगितलेच पाहिजे या भावनेने वृक्षाने दिलेले हे उत्तर आहे. 'डाव्या बाजूला—' ('वाम' या शब्दाचा) हीन कुळात जन्मलेला वगैरे, असा (व्यंग्य) अर्थ. 'वटवृक्ष—' फळे देणे वगैरे[११] उपयोग नसलेला[१२] व केवळ सावली देऊ शकण्यामुळे गर्वाने मान ताठ केलेला, असा अर्थ. 'सावलीही—' कारण 'शाखोटक' म्हणजे श्मशानात पेटणाऱ्या चितांच्या ज्वाळांनी ज्याचे पल्लव व ज्याच्या बारीकबारीक शाखा होरपळून गेलेल्या असतात असे एक झाड.

या श्लोकातील वाच्यार्थ अविवक्षित (म्हणजे असंभवनीय) असण्याचे कारण वृत्तिकार 'कोणत्याही वृक्षाबरोबर.....संभवनीय नाही' या वाक्याने सांगतात. 'समृद्ध' म्हणजे संपन्न असा दुर्जन. (समृद्धासत्पुरुषः या ऐवजी) समृद्धसत्पुरुष हा पाठ घेतल्यास त्या शब्दाचा अर्थ 'केवळ वैभवामुळे[१३] सत्पुरुष असलेला, पण अंगचे गुण वगैरेंमुळे सत्पुरुष नसलेला' असा अर्थ करावा.

'पूर्णपणे'— ('रस्ता सोडून' इ. पद्यातील) वाच्यार्थ पूर्णपणे संभवनीय आहे[१४] किंवा पूर्णपणें संभवनीय नाही असे निश्चितपणे म्हणणे शक्य नाही, कारण त्या वाच्यार्थातून (संभवनीय) व्यंग्यार्थाचाही बोध होतो.[१५] तो व्यंग्यार्थ असा की :— 'रस्ता सोडून भलतीकडेच उगवलेल्या या शब्दाने तशा म्हणजे— चांगल्या कुळात जन्म न लाभलेल्या (असा अर्थ सूचित होतो). 'शोभून न दिसणाऱ्या' ह्याचा व्यंग्यार्थ 'लावण्य'— रहित असलेल्या.' फळे, फुले, पाने वगैरे नसलेल्या (याचा सूचितार्थ अपत्य किंवा आप्तवर्ग नसलेल्या). अशी म्हणजे चांगल्या कुळातली किंवा लावण्यवती नसूनही एखादी स्त्री पुत्रवती असल्यामुळे किंवा तिला भाऊ वगैरे कुटुंबीय विपुल असल्यामुळे किंवा ती इतर आप्तांची पोशिंदी[१६] असल्यामुळे तिची काळजी घेतली जाते. 'बदरीला कुंपण घालणाऱ्या हे वेड्या! तुझे हसे होईल'— सगळ्या लोकांमध्ये, हा भावार्थ. याप्रमाणे प्रसंगाने उपस्थित झालेल्या 'अप्रस्तुतप्रशंसे'चे सविस्तर विवरण केल्यावर आता चालू विषयाचा[१७] उपसंहार करावयाचा, तो वृत्तिकार 'म्हणून वाच्यार्थ' इ. शब्दांनी करितात. 'म्हणून' म्हणजे 'या तनुगात्रीचे रूप' इ. श्लोकातील अप्रस्तुतप्रशंसेच्या बाबतीतसुद्धा ज्या अर्थी गोंधळ उडताना दिसतो त्या अर्थी, असा आशय.

टीपा

१) हा श्लोक प्रथम खंड, "उद्द्योत — १ 'लक्षणा हे ध्वनीचे 'लक्षण' नाही'" वर आलाच आहे.

२) डोळ्यांखेरीज इतर अवयव केव्हाच पाहू शकत नाहीत. अंधार असला म्हणजे डोळ्यांनाही (इतर अवयवांप्रमाणेच) काही दिसेनासे होते, म्हणूनच ते डोळे पाहण्याच्या बाबतीत इतर अवयवांसारखेच म्हणावयाचे. शिवाय अंधार असला तरी, इतर अवयवांना शब्द, स्पर्श, रस किंवा गंध यांचे ज्ञान होऊ शकते; पण (अंधारात) डोळ्यांना मात्र कशाचेच ज्ञान होऊ शकत नसल्याने अवयवांहूनही अधिक निरुपयोगी ठरतात. हे सर्व उद्‌गार रात्रीच्या अंधाराला अनुलक्षून असतील किंवा एखाद्या आंधळ्या व्यक्तीनेही काढले असणे शक्य आहे.

३) शाखोटक हे अगदी थोडी पाने असल्यामुळे अल्प छाया असलेले एक झाड असावे. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत — ३ 'अप्रस्तुत-प्रशंसेचे तीन प्रकार'" वर अभिनवगुप्तांनी केलेले विवरण.

४) 'बदरी' याचा अर्थ 'बोरीचे झाड' असा आहे. पण बोरीला फळे, फुले, पाने असतात. लोक त्याला कुंपण घालतानाही फारसे आढळत नाहीत. तेव्हा या ठिकाणी बदरी या शब्दाने नेमके कोणते झाड अभिप्रेत असावे हे चिन्त्य आहे. या श्लोकातील वाच्यार्थ जरी बदरीला उद्देशून असला, तरी सूचितार्थ एका स्त्रीला उद्देशून आहे. ती स्त्री हीन कुळात जन्मलेली, कुरूप आणि संतती किंवा भाऊ बहीण इ. नातेवाईक नसलेली अशी आहे. तरीही तिचे पोषण करणाऱ्या एका माणसाला उद्देशून कोणी दुसरी स्त्री ही गाथा म्हणत आहे.

५) या ठिकाणी वाच्यार्थ म्हणजे बदरीवृत्तांत हा अंशतः संभवनीय व अंशतः असंभवनीय कसा हे आनंदवर्धनांनी स्पष्ट केले नाही व अभिनवगुप्तांनीही ते फारसे समाधानकारकपणे स्पष्ट केलेले नाही. यापेक्षा मम्मटाने काव्यप्रकाशात दिलेले उदाहरण (पाहा, झळकीकर आवृत्ति, पृ. ६२७) अधिक चांगले आहे. तरीही याचे समर्थन करावयाचे झाल्यास ते असे करिता येईल :– अशा प्रकारच्या बदरीच्या झाडाला कुंपण घालताना सामान्यपणे कोणीही आढळत नाही, या दृष्टीने वाच्यार्थ असंभवनीय म्हणावयाचा. तरीपण एखादा विक्षिप्त मनुष्य असे करू लागला, तर ते शक्य आहे, या दृष्टीने वाच्यार्थ 'असंभवनीय' नाही.

६) या तनुगात्रीचे रूप इ. उद्‌गार एखाद्या प्रेमिकाने किंवा विरक्त माणसाने काढणे शक्य आहे, म्हणजे तो अर्थ संभवनीय आहे असे पूर्वपक्ष्याचे म्हणणे. पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'गूणीभूत-व्यंग प्रकारातून शेवटी प्राधान्याने रसादिकांचीच प्रतिति होत असेल, तर ते ध्वनिकाव्यच होते'" वर अभिनवगुप्तांनी मांडलेले पूर्वपक्ष्यांचे मत. अभिनवगुप्तांचे उत्तर असे की, अप्रस्तुतप्रशंसा अलंकारात वाच्यार्थ असंभवनीयच असावा लागतो असे नाही, तर तो संभवनीय असला तरी तेथे अप्रस्तुतप्रशंसा असू शकते. म्हणून 'या तनुगात्रीचे रूप' इ. श्लोकातही अप्रस्तुतप्रशंसा असावयास काहीही हरकत नाही.

७) पण डोळे मात्र आंधळे झाले की, ते इतर पदार्थांना स्पर्श करणे किंवा त्यांना उचलून घेणे यांसारख्या कामी उपयोगी पडत नाहीत.

८) डोळेच नसल्यास इतर अवयव असून नसल्यासारखे, असा अर्थ.

९) पर भाग (म्हणजे गुणोत्कर्ष) हा शब्द पूर्वी प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार- (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार'" व द्वितीयखंड, "उद्‌द्योत – ३ 'ध्वनि आणि गुणीभूतव्यंग हे दोन प्रकार वेगळे असून ते रसिकांनी ओळखायचा सराव करावा '"वर येऊन गेला आहे.

१०) 'वगैरे' शब्दाने 'मी शाखोटक आहे' या अर्थाचा बोध होतो.

११) वगैरे या शब्दाने 'फुले देणे' यासारखा काहीतरी अर्थ घ्यावा.

१२) वस्तुतः वडाला फळे असतात, पण ती माणसांनी खाण्याच्या उपयोगाची नसतात या दृष्टीने अभिनवगुप्तांनी त्याला फलदानशून्य असे म्हटले असावे.

१३) येथे 'समृद्ध' याचा अर्थ अभिनवगुप्तांनी 'समृद्धि' असा घेतला आहे.

१४) काशी आवृत्ति, पृ. ४९४ वर 'लोचना'त नास्ति नास्तीति असा पाठ आहे. पण त्याचा नीट अर्थ लागत नसल्याने आम्ही अस्ति नास्तीति असा पाठ समजून अनुवाद केला आहे.

१५) या पद्यातील वाच्यार्थं कसा संभवनीय आहे किंवा कसा संभवनीय नाही याचे कारण देऊन स्पष्टीकरण आनंदवर्धनांनी केलेले नाही. अभिनवगुप्तांनी मात्र कारण दिले आहे, पण ते 'कारण' या दृष्टीने तितके समर्पक वाटत नाही. कारण कोणत्याही अप्रस्तुतप्रशंसेमध्ये व्यंग्य अर्थ हा संभवनीयच असतो. आणि येथेही व्यंग्यार्थ संभवनीयच आहे. पण म्हणून वाच्यार्थ अंशतः संभवनीय आहे किंवा अंशतः असंभवनीय आहे याचे समर्थन होऊ शकत नाही. त्यापेक्षा तो अंशतः संभवनीय कसा आहे किंवा अंशतः असंभवनीय कसा आहे हे दाखविणे इष्ट झाले असते.

१६) काशी आवृत्ति (पृ. ४९४ वर) पोषिता असा पाठ आहे, पण हेमचंद्राच्या काव्यानुशासनात पोषिका असा पाठ आहे व तो अधिक चांगला असल्यामुळे आम्ही घेतला आहे.

१७) चालू विषय म्हणजे द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'गूणीभूत-व्यंग प्रकारातून शेवटी प्राधान्याने रसादिकांचीच प्रतिति होत असेल, तर ते ध्वनिकाव्यच होते'" वरील 'वाच्यार्थ व व्यंग्यार्थं यांच्या प्राधान्याप्राधान्याच्या विवेकाच्या बाबतीत कसून प्रयत्न करावा,' या आशयाच्या वाक्याने सुरू होऊन "उद्द्योत – ३ 'अप्रस्तुत-प्रशंसेचे तीन प्रकार'" अखेर चालू असलेला विषय.

ध्वन्यालोकः

प्रधानगुणभावाम्यां व्यङ्ग्यस्यैवं व्यवस्थिते ।
काव्ये उभे, ततोऽन्यद्यत्तच्चित्रमभिधीयते ॥ ४१ ॥
चित्रं शब्दार्थभेदन द्विविधं च व्यवस्थितम् ।
तत्र किञ्चिच्छब्दचित्रं वाच्यचि मतः परम् ॥ ४२ ॥

व्यङ्ग्यस्यार्थस्य प्राधान्ये ध्वनिसंज्ञितकाव्यप्रकारः, गुणभावे तु गुणीभूतव्यङ्ग्यता । ततोऽन्यद्रसभावादितात्पर्यरहितं व्यङ्ग्यार्थविशेषप्रकाशनशक्तिशून्यं च काव्यं केवलवाच्यवाचकवैचित्र्यमात्राश्रयेणोपनिबद्धमालेख्यप्रख्यं यदाभासते तच्चित्रम् । न तन्मुख्यं काव्यम् । काव्यानुकारो ह्यसौ । तत्र किञ्चिच्छब्दचित्रं यथा दुष्करयमकादि । वाच्यचित्रं ततः शब्दचित्रादन्यद् व्यङ्ग्यार्थसंस्पर्शरहितं प्राधान्येन वाक्यार्थतया स्थितं रसादितात्पर्यरहितमुत्प्रेक्षादि ।

अथ किमिदं चित्रं नाम? यत्र न प्रतीयमानार्थसंस्पर्शः । प्रतीयमानो ह्यर्थस्त्रिभेदः प्राक्प्रदर्शितः । तत्र यत्र वस्त्वलङ्कारान्तरं वा व्यङ्ग्यं नास्ति स नाम चित्रस्य कल्प्यतां विषयः । यत्र तु रसादीनामविषयत्वं स काव्यप्रकारो न सम्भवत्येव । यस्मादवस्तुसंस्पर्शिता काव्यस्य नोपपद्यते । वस्तु च सर्वमेव जगद्गतमवश्यं कस्यचिद्रसस्य भावस्य वाङ्गत्वं प्रतिपद्यते, अन्ततो विभावत्वेन । चित्तवृत्तिविशेषा हि रसादयः । न च तदस्ति वस्तु किञ्चिद्यन्न चित्तवृत्तिविशेपमुपजनयति । तदनुत्पादने वा कविविषयतैव तस्य न स्यात् । कविविषयश्च चित्रतया कश्चिन्निरूप्यते ।

अत्रोच्यते—सत्यं न तादृक्काव्यप्रकारोऽस्ति यत्र रसादीनामप्रतीतिः । किं तु यदा रसभावादिविवक्षाशून्यः कविः शब्दालङ्कारमर्थालङ्कारं वोपनिबध्नाति तदा तद्विवक्षापेक्षया रसादिशून्यतार्थस्य परिकल्प्यते । विवक्षोपारूढ एव हि काव्ये शब्दानामर्थः । वाच्यसामर्थ्यवशेन च कविविवक्षाविरहेऽपि तथाविधे विषये रसादिप्रतीतिर्भवन्ती परिदुर्बला भवतीत्यनेनापि प्रकारेण नीरसत्वं पर्किल्प्य चित्रविषयो व्यवस्थाप्यते । तदिदमुक्तम्—

'रसभावादिविषयविवक्षाविरहे सति ।
अलङ्कारनिबन्धो यः स चित्रविषयो मतः ॥
रसादिषु विवक्षा तु स्यात्तात्पर्यवती यदा ।
तदा नास्त्येव तत्काव्यं ध्वनेर्यत्र न गोचरः ॥'

ध्वन्यालोक

याप्रमाणे व्यंग्यार्थ मुख्य की गौण यावर 'ध्वनि' व 'गुणीभूतव्यंग्य' ही दोन प्रकारची काव्ये आधारलेली आहेत. याहून निराळे जे असेल, त्याला 'चित्र'[१] म्हटले जाते ॥ ४१ ॥

शब्दचित्र व अर्थचित्र या प्रकारांमुळे 'चित्र' हे दोन प्रकारांचे आहे. त्यापैकी काही उदाहरणे शब्दचित्राची व त्याहून निराळी असलेली वाच्यचित्राची होत ॥ ४२ ॥

व्यंग्य अर्थ प्रधान असला, तर तो काव्याचा 'ध्वनि' नावाचा प्रकार होय. पण व्यंग्यार्थ दुय्यम असला, तर ते काव्य 'गुणीभूतव्यंग्य' म्हणावयाचे. या दोहोंहून निराळे, म्हणजे ज्यात रस, भाव वगैरेपैकी काहीही मुख्यत्वाने अभिप्रेत नाही, किंवा ज्यात विशेष प्रकारचा व्यंग्यार्थ प्रकट करण्याचे सामर्थ्य नाही असे जे काव्य केवळ वाच्यार्थ व वाचक शब्द यांच्यातीलच चमत्कृतीचे साहाय्य घेऊन रचलेले, एखाद्या 'चित्रा' सारखे भासते, ते 'चित्र' होय. ते खरेखुरे काव्य नव्हे. ती काव्याच्या केवळ बहिरंगाची नक्कल होय. या 'चित्रा' पैकी काही उदाहरणे शब्दचित्राची म्हणजे शब्दचमत्कृतीची असतात; जसे 'दुष्कर'[२] म्हणजे जुळवावयास कठीण अशी यमके वगैरे. वाच्यचित्र हे या 'शब्दचित्रा'हून वेगळे, व्यंग्यार्थाचा स्पर्श नसलेले, व जे प्राधान्याने कवीला मुख्य म्हणून अभिप्रेत असते, ज्यातून रस, भाव वगैरेपैकी कशाचीही प्रतीति होत नाही असे असते, ते, जसे 'उत्प्रेक्षा' वगैरे.

(पूर्वपक्ष—) पण काय हो, हे 'चित्र' म्हणजे काय प्रकार आहे?

(उत्तरपक्ष—) याचे उत्तर असे की, चित्र म्हणजे व्यंग्यार्थाचा स्पर्श नसलेली रचना.

(पूर्वपक्ष—) व्यंग्यार्थ हा वस्तु, अलंकार व रसादि असा तीन प्रकारचा असतो, हे तुम्ही मागे सांगितले; तर मग ज्या उदाहरणात वस्तु किंवा एखादा अलंकार व्यंग्य नसेल, त्याला तुम्ही वाटल्यास 'चित्रा'चा विषय समजा पण ज्या ठिकाणी रस वगैरेंचा स्पर्श नसेल असा काव्याचा प्रकार असणे शक्यच नाही. कारण काव्य हे जगातील कोणत्याही पदार्थाशी संबद्ध नसलेले असे असू शकत नाही. आणि जगातील कोणताही पदार्थ हा कोणत्या तरी रसाचा किंवा भावाचा निदान विभाव तरी होऊन त्या द्वारे त्याचे अंग होणारच. कारण 'रसादि' म्हणजे अन्तःकरणाच्या विशिष्ट प्रकारच्या अवस्था. आणि अशी तर कोणतीहीं

वस्तु नाही की, जी अन्तःकरणाची कोणती ना कोणती तरी अवस्था जागृत करीत नाही. आणि ती तशी जागृत करणारी नसेल, तर ती कवीच्या काव्याचा विषयच होणार नाही[३] आणि तुम्ही तर 'चित्र' म्हणजे कवीचीच कोणती तरी कृति असे समजता!

या बाबतीत आमचे म्हणणे असे– हे खरे आहे की, ज्या ठिकाणी रस वगैरे प्रत्ययाला येत नाहीत असा काव्यप्रकार असू शकत नाही. पण ज्यावेळी रस, भाव वगैरेंची प्रतीति घडवण्याची इच्छा न बाळगता कवि एखादा शब्दालंकार किंवा अर्थालंकार रचतो, त्यावेळी ते काव्य रचण्यामागील रसभावादींची प्रतीति न घडवण्याचा[४] त्याचा अभिप्राय लक्षात घेऊन काव्याचा विषय हा रस वगैरेंनी विरहित आहे असे आम्ही मानतो. काव्यातील शब्दांचा अर्थ हा कवीच्या काव्यरचनेमागील इच्छेवरच अवलंबून असतो. आणि कवीला रसादींचा प्रत्यय आणून देण्याची इच्छा नसतानाही अशा एखाद्या काव्यातून वाच्यार्थाच्या व्यंजकत्वरूपी सामर्थ्यामुळे (सहृदयाला) रसादींचा प्रत्यय आलाच, तर तो अगदी क्षीणपणे येतो. (त्यात काही 'जीव' नसतो), या दृष्टीनेही ते काव्य नीरस होय अशी कल्पना करून तो 'चित्रा'चा प्रान्त होय असे आम्ही ठरवून देत आहोत. म्हणूनच मी असे म्हणतो की–

रस, भाव वगैरेंची प्रतीति घडविण्याची इच्छा नसताना अलंकारांची रचना केल्यास ते 'चित्रा'चे उदाहरण समजले जाते. पण कवीचा मुख्य उद्देश जेव्हा रसादींचा प्रत्यय घडवण्याचा असेल, तेव्हा असे काव्यच असणार नाही की जे ध्वनीच्या क्षेत्रात येणार नाही.[५]

लोचनम्

एवं व्यङ्ग्यस्वरूपं निरूप्य सर्वथा यत्तच्छून्यं तत्र का वार्तेति निरूपयितुमाह– प्रधानेत्यादिना कारिकाद्वयेन । शब्दचित्रमिति । यमकचक्रबन्धादि चित्रतया प्रसिद्धमेव । तत्तुल्यमेवार्थचित्रं मन्तव्यमिति भावः । आलेख्यप्रख्यमिति । रसादिजीवरहितं मुख्यप्रतिकृतिरूपं चेत्यर्थः ।

अथ किमिदमिति । आक्षेपे वक्ष्यमाण आशयः । अव्रोत्तरम्– यत्र नेति । आक्षेप्ता स्वाभिप्रायं दर्शयति–प्रतीयमान इति । अवस्तुसंस्पर्शितेति । कचटतपादिवन्निरर्थकत्वं दशदाडिमादिवदसंबद्धार्थत्वं वेत्यर्थः ।

ननु मा भूत्कविविषय इत्याशङ्क्याह कविविषयश्चेति । काव्यरूपतया यद्यपि न निर्दिष्टस्तथापि कविगोचरीकृत एवासौ वक्तव्यः । अन्यस्य वासुकिवृत्तान्ततुल्यस्येहाभिधानायोगात् । कवेश्चेद् गोचरो नूनममुना प्रीतिर्जनयितव्या सा चावश्यं विभावानुभावव्यभिचारिपयैवसायिनीति भावः । किं त्विति ।

विवक्षा तत्परत्वेन नाङ्गित्वेन कथंचन ।

इत्यादिर्योऽलंकारनिवेशने समीक्षाप्रकार उक्तस्तं यदा नानुसरतीत्यर्थः । रसादिशून्यतेति । नैव तत्र रसप्रतीतिरस्ति यथा पाकानभिज्ञसूदविरचिते मांसपाकविशेषे । ननु वस्तुसौन्दर्यादवश्यं भवति कदाचित्तथास्वादोऽकुशलकृतायामपि शिखरिण्यामिवेत्याशङ्क्याह–वाच्येत्यादि । अनेनापीति । पूर्व सर्वथा तच्छून्यत्वमुक्तमधुना तु दौर्बल्यमित्यपिशब्दस्यार्थः । अज्ञकृतायां च शिखरिण्यामहो शिखरिणीति न

तज्ज्ञानाद्यमत्कारः अपि तु दधिगुडमरिचं चैतदसमञ्जसयोजितमिति वक्तारो भवन्ति । <u>उक्तमिति</u> । <u>मयैवेत्यर्थः ।</u>

(<u>अलङ्कारनिबन्ध</u> इति ।) अलङ्काराणां शब्दार्थगतानां निबन्ध इत्यर्थः ।

लोचन

याप्रमाणे व्यंग्यार्थाचे स्वरूप स्पष्ट करून झाल्यावर जी रचना सर्वस्वी व्यंग्यार्थविरहित असेल, तिला काय नाव द्यावे हे 'याप्रमाणे व्यंग्यार्थ...' इ. दोन कारिकांमध्ये सांगितले जात आहे. 'शब्दचित्र—' यमक, चक्रबन्ध[६] वगैरे रचना 'चित्र' म्हणून प्रसिद्धच आहेत. 'अर्थचित्र' हे त्यासारखेच[७] समजावे, हा भावार्थ. 'एखाद्या चित्रासारखे' म्हणजे ज्यात रस, भाव वगैरे स्वरूपाचा 'जीव' नाही असे, मूळ वस्तूच्या प्रतिकृतीच्या स्वरूपाचे असलेले[८] असा अर्थ.

'पण काय हो, हे चित्र म्हणजे काय' इ.—या पूर्वपक्ष्याने विचारलेल्या प्रश्नामागील आशय यानंतर (लवकरच, 'व्यंग्यार्थ हा वस्तु' इ. वाक्याने) सांगितला जाणार आहे. या आक्षेपाला वृत्तिकारांनी दिलेले उत्तर 'चित्र म्हणजे व्यंग्यार्थाचा स्पर्श नसलेली रचना' हे वाक्य. (मग) आक्षेप घेणारा मनुष्य स्वतःचा अभिप्राय 'व्यंग्यार्थ हा वस्तु, अलंकार' इ. शब्दांनी सांगतो. 'कारण काव्य हे' म्हणजे कोणतेही काव्य 'कचटतप' वगैरे वर्णांप्रमाणे निरर्थक असणे[९] किंवा 'दहा डाळिंबे' वगैरे वाक्यांप्रमाणे परस्परांशी संबद्ध नसलेल्या अर्थांनी युक्त असण, असा भावार्थ.

'पण काय हो, (तो चित्रप्रकार) कवीच्या काव्याचा विषय नाही झाला, तर काय बिघडले?' असे ध्वनिवादी म्हणेल, तर पूर्वपक्षी त्याला 'आणि तुम्ही तर चित्र म्हणजे' इ. शब्दांनी उत्तर देतो.[१०] तो काव्यस्वरूपाचा आहे असा जरी तुम्ही त्याचा उल्लेख केला नसला, तरी तो कोणत्या तरी कवीच्या लिखाणाचा विषय होतो असेच म्हणावयास पाहिजे! कारण (निराळ्या म्हणजे कवीने न वर्णिलेल्या, अत एव रसभावादिशून्य अशा विषयाचा) उल्लेख या ग्रंथात करणे हे वासुकीच्या[११] जीवनातील एखादी घटना वर्णन करण्याप्रमाणे अयोग्य आहे. आणि तो प्रकार जर कवीच्या काव्याचा विषय होत असला, तर अशा लिखाणाने वाचकांना आनंदप्राप्ति होत असली पाहिजे आणि ती आनंदप्राप्ति विभाव, अनुभाव, व्यभिचारिभाव यांच्या वर्णनामुळेच[१२] होणार असा भावार्थ. 'पण'—

(रूपकादि अलंकार हे रसादींना उपकारक होण्यासाठी ते) रसादींना प्राधान्य देऊन योजावेत. कोणत्याही प्रकारे अलंकारच अंगी होतील अशी इच्छा ठेवू नये....

वगैरे[१३] कारिकांमध्ये काव्यात अलंकारांचा समावेश करिताना जी खबरदारी घ्यावी म्हणून सांगितली, ती खबरदारी जेव्हा एखादा कवि घेत नाही तेव्हा, असा अर्थ. रसभाव वगैरेंनी विरहित' —त्या लिखाणापासून रसाची प्रतीति होतच नाही. ज्याप्रमाणे उत्तम स्वयंपाक कसा करावा याचे मर्म न जाणणाऱ्या एखाद्या अडाणी स्वयंपाक्याने मांस शिजवून एखादा खाद्य पदार्थ तयार केला, तर त्या पदार्थापासून खाणाऱ्याला चवदारपणाचा अनुभव येत नाही, त्याप्रमाणे. 'पण काय हो, केवळ वर्ण्य विषयाच्या सौंदर्यांमुळे एखाद्या वेळी रसास्वाद अवश्य मिळू शकतो. जसे कौशल्य अंगी नसलेल्या स्वयंपाक्याने बनविलेले श्रीखंडही (त्यातील मूळ घटक पदार्थाच्या सुंदर चवीमुळे) चविष्ट लागते, तसे.' अशी शंका कल्पून

वृत्तिकार तिला 'आणि कवीला रसादींचा प्रत्यय' इ. शब्दांनी उत्तर देतात. 'या दृष्टीनेही' —यातील 'ही' या (शब्दयोगी) अव्ययाचा अर्थ असा की, पूर्वी सर्वस्वी रसभावविरहित असल्यामुळे 'चित्र' ही संज्ञा दिली जाते असे म्हटले, तर आता (रसभावादिकांचा) क्षीणपणे प्रत्यय येत असल्यामुळेहीं 'चित्र' हे नाव मिळते असे म्हटले. आणि जाणकार नसलेल्या माणसाने केलेल्या श्रीखंडाच्या बाबतीत 'काय सुरेख आहे हे श्रीखंड!' असे सविस्मय आनंदाचे उद्‌गार ते खाणाऱ्याच्या तोंडून बाहेर पडत नाहीत, तर 'दही, साखर, मिरे यांचा उपयोग कोणातरी अडाणी माणसाने केला आहे, असे खाणारे लोक म्हणतात.[१३] असे म्हटले आहे'— मीच म्हटले आहे[१४] असा अर्थ.

'अलंकारांची' म्हणजे शब्दालंकार व अर्थालंकार यांची (रचना) असा अर्थ.

टीपा

१). पाहा, प्रथम खंड, उद्‌द्योत — १ (व्यंगार्थप्रधान काव्यातील) व्यंजक शब्द, व्यंग अर्थ, व्यंजना-व्यापार, व्यंजक वाच्यार्थ हे चारही 'ध्वनि' च, पण या सर्वांच्या समुदायाला 'ध्वनिकाव्य' म्हणावे.

२). 'दुष्करयमकादि' या मधला 'दुष्कर' हा शब्द 'यमक' या शब्दाचे विशेषण मानल्यास 'जुळवावयास कठीण अशी यमके वगैरे' असा अर्थ होईल. पण दुसऱ्या उद्‌द्योतामध्ये कारिका १५ वरील वृत्तीवरच्या लोचनात अभिनवगुप्तांनी 'दुष्कर' याचा अर्थ मुरज, चक्रबन्ध इ. कृत्रिम रचना असा घेतला आहे. तसा घेतल्यास दुष्कर, यमक इ. अशी फोड करावी लागेल.

३). पूर्वपक्ष्याच्या म्हणण्याचा अभिप्राय असा की, तुम्ही प्रतीयमानाचे जे तीन प्रकार पहिल्या उद्‌द्योतात सांगितले; त्यापैकी व्यंग्य वस्तु किंवा व्यंग्य अलंकार ज्यात नाही, त्यासच तुम्ही 'चित्र' म्हणा. परंतु व्यंग्य रसभावादि जेथे नाहीत असे काव्यच असू शकत नसल्यामुळे 'रसभावहीन' रचनेला (तशी रचना संभवतच नसल्याने) चित्र म्हणण्याचा प्रश्न उद्‌भवतच नाही.

येथे तद्‌विवक्षा म्हणजे कवीची रसादिप्रतीति न घडविण्याची इच्छा.

४). म्हणजे अशी सगळी काव्ये ध्वनिकाव्येच होत.

५) हा शब्द पूर्वी प्रथम खंड, "उद्‌द्योत — २ 'शृंगारध्वनीत यमकादि अलंकार कटाक्षाने वर्ज्य करावे'" वर 'मुरजबन्ध' या शब्दाबरोबर आला आहे. त्यापुढे २ री टीपही पाहावी.

६) 'त्यासारखेच' म्हणजे व्यंग्यार्थविरहित असणे याबाबतीत शब्दचित्रासारखेच. 'वाच्यचित्र' या शब्दाने येथे अशा अर्थालंकारांचा उल्लेख केला आहे की, ज्यांमध्ये व्यंग्यार्थ एक तर मुळीच नसतो, किंवा असला तरी अत्यंत क्षीण असतो. 'क्षीण' या अर्थी जगन्नाथाने 'लीन (पेंगुळलेला)' व 'अजागरूक (निद्रित)' हे शब्द वापरले आहेत.

७) म्हणजे प्रतिकृति हे जसे मूळ वस्तूचे किंवा व्यक्तीचे शनुकरण असते, तशीच 'चित्र' रचना ही मुख्य प्रकारच्या म्हणजे व्यंग्यार्थयुक्त काव्याचे अनुकरणच म्हणावयाची.

८) काव्याचा विषय हा जगात असलेल्या कोणत्यातरी पदार्थाशी संबद्ध असाच असतो, 'क, च, ट, त, प,' यासारख्या निरर्थक वर्णरचनेला जसे कोणी 'काव्य' म्हणत नाही, तसेच 'येथे दहा डाळिंबे (आहेत), सहा वडे (आहेत) भांडे (आहे), बकऱ्याचे कातडे (आहे), गवताची पेंढी (आहे)' इ. परस्परांशी संबंध नसलेल्या वाक्यांच्या समुदायालाही 'काव्य' म्हणणे शक्य नाही. काव्य म्हणजे कोणत्यातरी पदार्थाचे (मग तो पदार्थ भौतिक, मानसिक, कोणताही असो) सुसंगत वर्णनच होय.

क, च, ट, त, प ही व्यंजनांच्या पाच वर्गांची पहिली व्यंजने आहेत. त्यापासून कोणत्याही पदार्थाचा बोध होत नाही. 'दहा डाळिबे' इ. वाक्यांचा उल्लेख पूर्वी प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'भ्रम धार्मिक' या उदाहरणात 'विपरीतलक्षणा' नाही'" वर येऊन गेला आहे. शिवाय प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन' यांवरील टीप २५ वी पाहावी. याखेरीज जैमिनीय सूत्र, १–१–१ वरील शावरभाष्यही पाहावे.

९) कारिंका ४१ मध्ये ध्वनि व गुणीभूतव्यङ्ग्य हे काव्याचे दोन प्रकार आहेत असे म्हटले आहे. व त्याहून जे वेगळे असेल त्याला 'चित्र' म्हणतात, असे म्हटले आहे. म्हणजे कारिकेने 'चित्र' प्रकाराला काव्य म्हटलेले नाही. वृत्तिकारांनी पृ. ५०८ वर 'जे काव्य' असे म्हणून 'चित्रा'च्या संदर्भात 'काव्य' हा शब्द वापरला आहे, पण ते मुख्य अर्थाने काव्य नव्हे, ती काव्याच्या केवळ बहिरंगाची नक्कल होय– असे म्हटले आहे. यावर पूर्वपक्षी म्हणतो की, चित्रप्रकार हा 'काव्य' नाही असे समजणे कसे काय बरोबर होईल? कारण हा ग्रंथ काव्यशास्त्रावरचा आहे व तुम्ही ज्याला चित्रप्रकार म्हणता तो प्रकार कोणातरी कवीनेच लिहिला असणार व कवीने जे लिहिले त्याला 'काव्य' म्हणावयासच पाहिजे.

१०) लोचनातील 'वासुकिवृत्तान्त' या शब्दाने अभिनवगुप्तांना केवळ वासुकि या सर्पाच्या जीवनातील एखादी विशिष्ट घटना (की जिच्याशी कोणाही वाचकाला काहीही कर्तव्य नाही) इतकाच अर्थ अभिप्रेत आहे की, अशा घटनेची केवळ माहिती देणारे एखादे लिखाण अभिप्रेत आहे हे समजावयास मार्ग नाही.

११) मुळातील **विभावानुभावव्यभिचारिपर्यवसायिनी** हा समास येथे **विभावानु भावव्यभिचारिभ्यः पर्यवस्यति इति** असा पंचमी विभक्ति योजून सोडवावयास पाहिजे.

१२) उद्द्योत २, कारिका १८ व १९.

१३) अडाणी स्वयंपाक्याने मांस शिजवून एखादा खाद्य पदार्थ बनविला, तर तो पूर्णपणे बेचव होतो. कारण त्यांतील मुख्य जे मांस, त्याला स्वतःची सुंदर अशी चव नसते. पण श्रीखंडातील दही इ. घटक पदार्थ मूळचेच चवदार असल्यामुळे त्यांपासून श्रीखंड हे जरी अडाणी आचाऱ्याने बनविले, तरी ते सर्वस्वी बेचव लागत नाही, पण त्याचा चविष्टपणा पुष्कळच कमी होतो. तात्पर्य, सर्वस्वी रसशून्य काव्याला मांसपाकाचा, तर किंचित् रसयुक्त काव्याला श्रीखंडाचा दृष्टांत दिला आहे.

१४) लोचनात येथे व पुढे काशी आवृत्ति पृ. ५२० वर अशा दोनच ठिकाणी परिकरश्लोकांच्या बाबतीत अभिनवगुप्तांनी **मया** हा शब्द स्पष्टीकरणार्थ योजिला आहे. इतर कोणत्याही परिकरश्लोकाच्या संदर्भात त्यांनी **मया** हा किंवा त्या अर्थांचा शब्द योजिला नाही. यावरून असा निष्कर्ष काढणे शक्य आहे की ध्वन्यालोकात इतर ठिकाणी जे परिकरश्लोक दिले आहेत, ते आनंदवर्धनांचे नसून ध्वनिवाद्यांच्या वर्तुळात

प्रचलित असलेले असावेत पण हा निष्कर्ष सर्वच परिकरश्लोकांच्या बाबतीत लागू पडेल असे वाटत नाही, कारण त्यांपैकी बरेच आनंदवर्धनांनी रचलेले असण्याची शक्यता आहे.

ध्वन्यालोकः

एतच्च चित्रं कवीनां विशृङ्खलगिरां रसादितात्पर्यमनपेक्ष्यैव काव्यप्रवृत्तिदर्शनादस्माभिः परिकल्पितम् । इदानीन्तनानां तु न्याय्ये काव्यनयव्यवस्थापने क्रियमाणे नास्त्येव ध्वनिव्यतिरिक्तः काव्यप्रकारः । यतः परिपाकवतां कवीनां रसादितात्पर्यविरहे व्यापार एव न शोभते । रसादितात्पर्ये च नास्त्येव तद्वस्तु यदभिमतरसाङ्गतां नीयमानं न प्रगुणीभवति । अचेतना अपि हि भावा यथायथमुचितरसविभावतया चेतनवृत्तान्तयोजनया वा न सन्त्येव ते ये यान्ति न रसाङ्गताम् । तथा चेदमुच्यते—

अपारे काव्यसंसारे कविरेकः प्रजापतिः ।
यथास्मै रोचते विश्वं तथेदं परिवर्तते ॥

शृङ्गारी चेत्कविः काव्ये जातं रसमयं जगत् ।
स एव वीतरागश्चेन्नीरसं सर्वमेव तत् ॥

भावानचेतनानपि चेतनवच्चेतनानचेतनवत् ।
व्यवहारयति यथेष्टं सुकविः काव्ये स्वतन्त्रतया ॥

तस्मान्नास्त्यव तद्वस्तु यत्सर्वात्मना रसतात्पर्यवतः कवेस्तदिच्छया तदभिमतरसाङ्गतां न धत्ते । तथोपनिबध्यमानं वा न चारुत्वातिशयं पुष्णाति । सर्वमेतच्च महाकवीनां काव्येषु दृश्यते । अस्माभिरपि स्वेषु काव्यप्रबन्धेषु यथायथं दर्शितमेव । स्थिते चैवं सर्व एव काव्यप्रकारो न ध्वनिधर्मतामतिपतति । रसाद्यपेक्षायां कवेर्गुणीभूतव्यङ्ग्यलक्ष्णोऽपि प्रकारस्तदङ्गतामवलम्बत इत्युक्तं प्राक् । यदा तु चाटुषु देवतास्तुतिषु वा रसादीनामङ्गतया व्यवस्थानं हृदयवतीषु च सप्रज्ञकगाथासु [काव्यमाला आवृतीत षट्प्रज्ञगाथासु असा पाठ आढळतो.] **कासुचिद्व्यङ्ग्यविशिष्टवाच्ये प्राधान्यं तदपि गुणीभूतव्यङ्ग्यस्य ध्वनिनिष्यन्दभूतत्वमेवेत्युक्तं प्राक् । तदेवमिदानींतनकविकाव्यनयोपदेशे क्रियमाणे प्राथमिकानामभ्यासार्थिनां यदि परं चित्रेण व्यवहारः, प्राप्तपरिणतीनां तु ध्वनिरेव काव्यमिति स्थितमेतत् । तदयमत्र संग्रहः—**

यस्मिन् रसो वा भावो व तात्पर्येण प्रकाशते ।
संवृत्याभिहितौ वस्तु यत्रालङ्कार एव वा ॥
काव्याध्वनि ध्वनिर्व्यङ्ग्यप्राधान्यैकनिबन्धनः ।
सर्वत्र तत्र विषयी ज्ञेयः सहृदयैर्जनैः ॥

ध्वन्यालोक :

आणि आपली वाणी अनिर्बन्धपणे [१] योजून, रस वगैरेची प्रतीति प्रामुख्याने घडविण्याकडे दुर्लक्ष करून काव्यरचना करण्याकडे कवींची प्रवृत्ति होते हे आढळून आल्यामुळे आम्ही हा 'चित्र' नावाचा प्रकार कल्पिला आहे.[२] पण काव्याच्या बाबतीत आम्ही आता योग्य असा मार्ग घालून दिल्यावर आताच्या म्हणजे

नवीन कवींच्या बाबतीत ध्वनीशिवाय दुसरा काव्यप्रकार उपलब्ध नाहीच. कारण रसोचित शब्दार्थ उपयोजिण्याच्या बाबतीत जे अनुभवी आहेत, अशा कवींनी मुख्यत्वाने रसादींची प्रतीति घडविण्याची इच्छा न बाळगता काव्यरचना करण्याचा उद्योग आरंभावा हेच त्यांच्या दर्जाला शोमणारे नाही. आणि रसादींची प्रतीति प्रामुख्याने घडविण्याचे मनात आणल्यास अशी वस्तु नाहीच की, जिचे वर्णन कवीला इष्ट असलेल्या रसाचे अंग म्हणून केले असता ते सौन्दर्याने संपन्न होणार नाही. (सजीव व्यक्तींची गोष्ट तर राहूच द्या, पण) अशा निर्जीव वस्तूसुद्धा नाहीतच की, परिस्थित्यनुसार अनुरूप अशा रसांचे विभाव म्हणून किंवा सचेतन व्यक्तींच्या व्यवहाराचा त्यांच्याशी संबंध जोडून [३] त्या वर्णिल्यास त्या रसप्रतीतीस पोषक होणार नाहीत. आणि असे आहे, म्हणूनच म्हटले जाते की—

'काव्याची सृष्टि ही अमर्याद असून कवि हा (तिचा) एकमेव विधाता असतो. त्याची जशी मर्जी असेल त्याप्रमाणे सर्व पदार्थांचे स्वरूप बदलत जाते. काव्य रचताना कवीची चित्तवृत्ति जर शृंगाररसाच्या आविष्काराला अनुकूल असेल, तर विश्वसुद्धा (शृंगार) रसमय झाले म्हणून समजा. पण त्याचीच चित्तवृत्ति (काव्यरचतेवेळी) जर विषयपराङ्मुख असेल, तर सर्व विश्वही रूक्ष (च) भासणार! चांगला कवि हा काव्यात आपल्या इच्छेप्रमाणे आणि स्वतंत्रतेने अचेतन पदार्थांनाही ते सचेतन असल्याप्रमाणे व सचेतन पदार्थांनाही ते अचेतन असल्याप्रमाणे आचरण करावयास लावतो.'

म्हणून सर्वस्वी रसभावादिकांचीच प्रामुख्याने प्रतीति घडवावी अशी आकांक्षा बाळगणाऱ्या कवीच्या दृष्टीने अशी वस्तु नाहीच की, जी त्याच्या इच्छेप्रमाणे, त्याला इष्ट असेल त्या रसाच्या प्रतीतीला उपकारक होत नाही, किंवा त्याने त्या तऱ्हेने वर्णिल्यास जिला कमालीचे सौन्दर्य प्राप्त होत नाही. आणि हे सर्व महाकवींच्या काव्यात आढळून येते. आम्हीदेखील आमची काव्यरचना असलेल्या ग्रंथातून[४] हे आपल्या आचरणाने दाखविलेच आहे. असे असल्याने काव्याचा कोणताही प्रकार ध्वनीची कक्षा सोडून असत नाही. कवीने (अंतिम) व्यंग्य अर्थ या नात्याने) रसभावदिकांची अपेक्षा ठेवली, तर 'गुणीभूतव्यंग्य' प्रकारही त्याला (म्हणजे अंतिम रसादिध्वनीला) अंगभूत होतो हे या पूर्वी सांगितले. (पाहा, हाच उद्‌द्योत, कारिका ४० वी). पण जेव्हा मानवस्तुतिपर किंवा देवस्तुतिपर काव्यांमध्ये रस वगैरे अंगभूत झालेले असतात, तेव्हा आणि विदग्ध सहृदयांच्या, रम्य गूढार्थ असलेल्या काही (प्राकृत) गाथांमध्ये व्यंग्यार्थ हा वाच्यार्थ्यांला अंगभूत असतो (व वाच्यार्थ प्रधान असतो), तेव्हा ते प्रकारही ध्वनीच्या एका वेगळ्या व काहीशा निकृष्ट असलेल्या 'गुणीभूतव्यंग्य' या प्रकारात येतात, हे मागे (पाहा, द्वितीय खंड, उद्‌द्योत -३ वाच्य अलंकारांमध्ये व्यंग अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन) सांगितले आहे. तेव्हा याप्रमाणे आधुनिक किंवा यापुढील कवींना (आम्ही) काव्यासंबंधी (काही) मार्गदर्शन केल्यानंतर अगदीच नवशिक्या लोकांना काव्यरचनेचा सराव करावयाचा असला. तर त्यांनीच फार तर 'चित्र' रचण्याचा उद्योग करावा. पण अनुभवी कवींच्या बाबतीत 'ध्वनि हेच (खरे) काव्य होय' हे सिद्ध झाले. तेव्हा या बाबतीत सारांश असा—

ज्या काव्यामध्ये रसची अथवा भावाची प्रधानत्वाने प्रतीति होते, किंवा ज्या ठिकाणी एखादी वस्तु किंवा एखादा अलंकार आडपडद्याने (प्रधान म्हणून) सूचित केलेला असतो, तो काव्याचा सगळा प्रांत व्यंग्यार्थाच्या प्राधान्यावरच अवलंबून असणाऱ्या 'ध्वनी' चा विषय होतो, हे सहृदय लोकांनी समजावे.

लोचनम्

ननु 'तच्चित्रमभिधीयते' इति किमनेनोपदिष्टेन । अकाव्यरूपं हि तदिति कथितम् । हेयतया तदुपदिश्यत इति चेत्, घटे कृते कविर्न भवतीत्येतदपि वक्तव्यमित्याशङ्क्य कविभिः खलु तत्कृतमतो हेयतयोपदिश्यत इत्येतन्निरूपयति—एतच्चेत्यादिना । परिपाकवतामिति । शब्दार्थविषयो रसौचित्यलक्षणः परिपाको विद्यते येषाम् ।

यत्पदानि त्यजन्त्येव परिवृत्तिसहिष्णुताम् ।
(तं शब्दन्यासनिष्णाताः परिपाकं प्रचक्षते ॥)

इत्यपि रसौचित्यशरणमेव वक्तव्यमन्यथा निर्हेतुकं तत् । अपार इति । अनाद्यन्त इत्यर्थः । यथारुचि परिवृत्तिमाह—शृङ्गारीति । शृङ्गारोक्तविभावानुभावव्यभिचारिचर्वणारूपप्रतीतिमयो न तु स्त्रीव्यसनीति मन्तव्यम् । अत एव भरतमुनिः— 'कवेरन्तर्गतं भावं', 'काव्यार्थान् भावयन्ति' इत्यादिषु कविशब्दमेव मूर्धाभिषिक्ततया प्रयुङ्क्ते । निरूपितं चैतद्रसस्वरूपनिर्णयावसरे । जगदिति । तद्रसनिमज्जनादित्यर्थः । शृङ्गारपदं रसोपलक्षणम् । स एवेति । यावद्रसिको न भवति तदा परिदृश्यमानोऽप्ययं भाववर्गो यद्यपि सुखदुःखमोहमाध्यस्थ्यमात्रं लौकिकं वितरति, तथापि कविवर्णनोपारोहं विना लोकातिक्रान्त-रसास्वादभुवं नाधिशेत इत्यर्थः । चारुत्वातिशयं यन्न पुष्णाति तन्नास्त्येवेति संबन्धः । स्वेष्विति । विषमबाणलीलादिषु । हृदयवतीष्विति । 'हिअअलिआ' इति प्राकृतकविगोष्ठ्यां प्रसिद्धासु त्रिवर्गोपायोपेयकुशलासु । सप्रज्ञकाः सहृदया उच्यन्ते । तद्गाथाः । यथा भट्टेन्दुराजस्य-

लंघिअगअणा फलहीलआओ होंतु त्ति वढ्ढअंतीअ ।
हालिअस्स आसिसं पाडिवेसवहुआ विणिव्वविआ [लङ्घितगगना कार्पासलता भवन्त्विति वर्धयन्त्या हालिकस्याशिष प्रातिवेश्यवधूका निर्वापिता ॥] ॥

अत्र लङ्घितगगना कर्पासलता भवन्त्विति हालिकस्याशिषं वर्धयन्त्या प्रातिवेश्यकवधूका निर्वृतिं प्रापिता इति चौर्यसंभोगाभिलाषिणीयमित्यनेन व्यङ्ग्येन विशिष्टं वाच्यमेव सुन्दरम् ।

गोलाकच्छकुडंगे भरेण जंबूसु पच्चमाणासु [गोदाकच्छनिकुञ्जं भरेण जम्बूषु पच्यमानासु हालिकवधूर्निबसति जम्बूरससिक्तं सिचयम् ॥] ।
हलिअबहुआ णिअंसइ जंबूरसरत्तअं सिअअं ॥

अत्र गोदावरीकच्छलतागहने भरेण जम्बूफलेषु पच्यमानेषु हालिकवधूः परिधत्ते जम्बूफलरसरक्तं निवसनमिति त्वरितचौर्यसंभोगसंभाव्यमानजम्बूफलरसरक्तत्वपरभागनिह्नवनं गुणीभूतव्यङ्ग्यमित्यलं बहुना ।

ध्वनिरेव काव्यमिति । आत्मात्मिनोरभेद एव वस्तुतो, व्युत्पत्तये नु विभागः कृत इत्यर्थः । वाग्रहणात्तदाभासादेः पूर्वोक्तस्य ग्रहणम् । संवृत्येति । गोप्यमानतया लब्धसौन्दर्यम् इत्यर्थः । काव्याध्वनीति । काव्यमार्गे । विषयीति । स त्रिविधस्य ध्वनेः काव्यमार्गो विषय इति यावत् ॥ ४१—४२ ॥

लोचन

पण काय हो, 'त्याला चित्र म्हटले जावे' असे जे कारिकेत सांगितले, त्याचा उपयोग काय? कारण 'ते काव्य या स्वरूपाचे नाही' असे (वृत्तीत स्पष्टपणे) सांगण्यात आले आहे! 'कवीने त्याचा त्याग केला पाहिजे' हे सांगण्यासाठी त्याचा निर्देश केला आहे असे (ध्वनिवाद्याचे) म्हणणे असेल, तर मग 'घट (किंवा पट) तयार केल्याने कवि म्हणून योग्यता प्राप्त होत नाही' असेही तुम्ही सांगावयास पाहिजे होते! अशी शंका कल्पून काही पूर्वकालीन कवींनी त्या 'चित्रा'ची रचना केली आहे, म्हणून (नवीन) कवींनी त्याचा त्याग करावा या अभिप्रायाने त्याचे वर्णन केले जात आहे, हे वृत्तिकार 'आणि आपली वाणी (अनिर्बंधपणे)' इ. वाक्याने स्पष्ट करितात. 'जे अनुभवी आहेत अशा कवींनी म्हणजे रसादींच्या परिपोषाला उचित[५] असे शब्द व अर्थ उपयोजिणे या बाबतीत ज्यांना प्रगल्भता प्राप्त झाली आहे अशा कवींनी.

'जेव्हा काव्यातील पदे इतकी उत्कृष्टपणे निवडलेली असतात की ती पदे बदलून दुसरी योजिणे हे त्या पदांना सहन होत नाही, (तेव्हा त्या परिस्थितीला शब्दांचा वापर करण्यात निष्णात असलेले लोक 'शब्दपाक' म्हणतात)'.[६] या वचनाचा रोख रसाच्या औचित्याकडे आहे असेच समजले पाहिजे. नाहीतर या वचनात काहीही अर्थ राहणार नाही.[७] 'काव्याची सृष्टि अमर्याद—' ती सृष्टि अनादि आणि अनंत आहे,[८] असा अर्थ. कवीच्या मर्जीप्रमाणे सर्व पदार्थांचे स्वरूप कसे बदलते, हे वृत्तिकार 'जर शृंगाररसाच्या' इ. श्लोकात सांगतात. 'शृंगार रसाच्या—' म्हणजे शृंगाररसाचे जे विभाव, अनुभाव व व्यभिचारिभाव सांगितले आहेत, त्यांच्या आस्वादरूपी प्रतीतीने भरलेला [९] असा अर्थ, स्त्रीलंपट असा नव्हे. म्हणूनच भरतमुनि 'कवींच्या अन्तःकरणातील भावनेला,[१०] 'काव्यविषयांची सहृदयांना प्रतीति घडवितात[११] इ. वचनांमध्ये 'कवि' हा शब्दच अग्रमान देऊन योजितात. आणि हे सर्व आम्ही रसाचे स्वरूप निश्चित करतेवेळी[१२] स्पष्ट केले आहे. 'विश्व—' (जग) या रसात बुडून गेल्यामुळे, असा आशय. परिकरश्लोकातील 'शृंगाररसाच्या' यातील 'शृगार' हा शब्द सर्व रसांचे उपलक्षण म्हणून वापरला आहे.

'त्याचीच चित्तवृत्ति—' जगातील सर्व पदार्थ (वाचकांच्या) दृष्टीस पडत असले तरी ते त्यांना केवळ सुख, दुःख किंवा मोहरूपी ताटस्थ्य[१३] यांपैकीच कोणता तरी अनुभव आणून देत असतात. पण त्या पदार्थाकडे बघणारा कवि हा जोपर्यंत रसाने भारलेला नसेल आणि तसा होऊन तो जोपर्यंत त्या पदार्थांचे वर्णन करीत नसेल, तोपर्यंत त्या पदार्थांना (रसिक वाचकाला) लोकोत्तर रसाचा आस्वाद मिळवून देण्याचे सामर्थ्य प्राप्त होत नाही, असा भावार्थ. 'जिला कमालीचे सौंदर्य प्राप्त होत नाही' याचा संबंध 'अशी वस्तु नाहीच' याच्याशी जोडावा. 'आमची काव्यरचना असलेल्या—' म्हणजे 'विषमबाणलीला' इ.[१४] ग्रंथांतून. 'रम्य गूढार्थ असलेल्या—' 'हिअअललिआ[१५]' या नावाने प्राकृत कवींच्या काव्यचर्चामंडळामध्ये सुप्रसिद्ध असलेल्या व धर्म, अर्थ, काम या तिन्ही पुरुषार्थांची साधने सांगण्यात कौशल्य प्रकट करणाऱ्या गाथांमध्ये. (वृत्तीतील) 'सप्रज्ञक[१६]' या शब्दाचा अर्थ सहृदय' असा आहे. त्यांनी रचलेल्या गाथा. उदा. भट्ट इंदुराज यांच्या पुढील (दोन) गाथा—

'या कपाशीच्या वेली आकाश भेदून उंच जावोत' असा शेतकऱ्याला आशीर्वाद देणाऱ्या कोणातरी स्त्रीमुळे त्याच्या शेजाऱ्याच्या सुनेला आनंद झाला.'

या गाथेमध्ये 'कपाशीच्या वेली गगन भेदून उंच जावोत' असा शेतकऱ्याला आशीर्वाद देणाऱ्या कोणातरी स्त्रीने शेजाऱ्याच्या सुनेला समाधान प्राप्त करून दिले— या वाच्यार्थालाच 'शेजाऱ्याच्या सुनेला

त्या शेतकऱ्याशी चोरून रतिक्रीडा करण्याची ओढ आहे' या व्यंग्यार्थामुळे शोभा प्राप्त होते व त्यायोगे तो वाच्यार्थच (व्यंग्यार्थापेक्षा अधिक) सुंदर वाटतो.[१७]

'गोदावरीच्या काठच्या लताकुंजामध्ये जांभळे प्राचुर्याने पिकू लागली असताना शेतकऱ्याची सून (गडद) जांभळ्या रंगाचे वस्त्र नेसते.'

या गाथेत 'गोदावरीच्या तीरावरील वेलींच्या दाट जाळीत जांभळाची फळे प्राचुर्याने पिकत असता शेतकऱ्याची सून गडद जांभळ्या रंगाचे वस्त्र परिधान करिते' या वाच्यार्थातून घाईघाईने चोरून केलेल्या रतिक्रीडेमुळे जांभळांच्या रसाचा रंग आपल्या वस्त्रांला लागून तो उठून दिसणे संभवनीय आहे, तो लपविणे हा व्यंग्यार्थ प्रकट होत असून तो (वाच्यार्थाला) गुणीभूत झालेला आहे.[१८] असो, आता याचे फार विवरण पुरे.

'ध्वनि हेच काव्य—' ध्वनि हा आत्मा आणि काव्य हा त्या आत्म्याने युक्त असलेला देह यांमध्ये वास्तविक अभेदच असून[१९] केवळ लोकांना समजावे, म्हणून काव्य व ध्वनि यांमध्ये भेद कल्पिला आहे, असा अर्थ. 'अथवा' हा शब्द वापरल्यामूळे पूर्वी[२०] सांगितलेल्या रसाभास, भावाभास वगैरेंचाही[२१] समावेश झाला आहे असे समजावे.

'आडपडद्याने (सांगितलेले)—' झाकल्यामुळे म्हणजे वाच्य न केल्यामुळे ज्याला सौंदर्य प्राप्त झाले आहे असा (वस्तु किंवा अलंकार) असा अर्थ. तो काव्याचा प्रांत—' म्हणजे तो काव्याचा प्रकार, 'विषय होतो—' तो काव्याचा प्रकार त्रिविध ध्वनीचा विषय होतो, हा आशय. ॥ ४१—४२ ॥

टीपा

१) अनिर्बन्धपणे म्हणजे अलंकारांचा समावेश करण्याबाबत दुसऱ्या उद्द्योतात जी 'समीक्षा' (खबरदारी) सांगितली (प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'ध्वनिकाव्यात खराखुरा अलंकार कोणता?'"), ती पाळण्याकडे दुर्लक्ष करून.

२) अशा रचना 'अ—काव्य' ठरू नयेत, यासाठी ध्वनिकारांनी 'चित्र' हा प्रकार प्रथम कल्पून अस्तित्वात आणला.

३) अचेतन वस्तूंवर चेतन वस्तूंचा आरोप करणे यासाठी उद्द्योत २ रा, कारिका ५ वरील 'वृत्ति' (प्रथम खंड "उद्द्योत – २ 'रसवदलंकाराबाबत पूर्वपक्षाचे खंडन'") पाहा.

४) द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'" वर आनंदवर्धनांनी आपल्या अर्जुनचरिताचा उल्लेख केला आहे व प्रथम खंड "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार" "उद्द्योत – २ अलंकारध्वनीची उदाहरणे" वर विषमबाणलीला या ग्रंथांतील उदाहरणे दिली आहेत. अभिनवगुप्तांनी मात्र द्वितीयखंड "उद्द्योत – ३ 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'" वर अर्जुनचरितातील २ ओळी उद्धृत केल्या आहे.

५) औचित्य हे नेहमी रसादिकांनाच अनुलक्षून असणार हे अभिनवगुप्तांनी आतापर्यंत अनेक वेळा म्हटले आहे. पाहा प्रथम खंड,उद्द्योत – १ ध्वन्यालोक-कारिका २ वरील 'साहित्यदर्पण' काराच्या आक्षेपाचे खंडन (टीप १ पाहा) व द्वितीय खंड "उद्द्योत – ३ 'वाच्य अलंकारामध्ये व्यंग अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन'".

६) वामन, काव्यालंकारसूत्रवृत्ति, १–३–१५ (व काव्यमीमांसा, अध्याय ५). पाक या अर्थी 'शय्या' हाही शब्द वापरला जातो. 'शय्या' या शब्दाच्या अर्थासाठी पाहा, प्रतापरुद्रयशोभूषण, पृ. ६७ (मुंबई, १९००)– **या पदानां परान्योन्यमैत्री शय्येति कथ्यते ।**'

७) काव्यातील पदांची निवड ती पदे रसनिष्पत्तीला अनुकूल होतील अशीच केली पाहिजे. रसनिष्पत्ति हे नियामक कारण नसेल, तर तीच विशिष्ट पदे का निवडावयाची, याला काहीही कारण उरणार नाही.

८) काव्याची सृष्टि काळाच्या दृष्टीने जशी अनादि व अनंत आहे, तशी व्यापकपणाच्या दृष्टीनेही ती अतिविस्तीर्ण आहे असे म्हणता येईल.

९) तुलनार्थ पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'हे पारध्या यातील शोक हा मुनीचा शोक नव्हे'" वरील 'हे पारध्या, या श्लोकाचे अभिनवगुप्तांनी केलेले विवरण व त्यानंतर "उद्द्योत – १ 'प्रतिभा' शब्दाचा अर्थ'" वरील भट्टतौतांचे 'म्हणून नायकाला, कवीला' इ. वचन.

१०) नाट्यशास्त्र, ७–२ पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'प्रतिभा' शब्दाचा अर्थ'".

११) नाट्यशास्त्र, अध्याय ७ च्या प्रारंभीला गण भाग.

१२) म्हणजे उद्द्योत १ मधील ५ व्या कारिकेचे विवरण करितेवेळी (पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'हे पारध्या यातील शोक हा मुनीचा शोक नव्हे'", व शिवाय उद्द्योत – १ पारध्याने क्रौञ्चपक्ष्यांच्या जोडप्यापैकी नर मारला की मादी? (टीप ४) वरील टीप ११ वी). तात्पर्य, कवि हा बाह्य घटना पाहून त्यामुळे प्रभावित होण्याइतका संवेदनाक्षम असलाच पाहिजे.

१३) 'मोहरूपी ताटस्थ्य' म्हणजे त्या पदार्थांमळे सुखही नाही व दुःखही नाही अशी (उदासीनतेची) स्थिति.

१४) 'इ.' या शब्दामुळे 'अर्जुनचरित' व 'देवीशतक' या (आनंदवर्धनकृत) काव्यांचा बोध होतो.

१५) काशी आवृत्ति, पृ. ४९९ वर 'हिअअललिआ' असा पाठ आहे. त्याची संस्कृत छाया 'हृदयललिता' अशी होईल. 'हृदय' म्हणजे गूढार्थ किवा रहस्य आणि 'हृदयललिता' म्हणजे गूढार्थ असल्यामुळे सुंदर. पण 'हिअअललिआ' हा शब्द प्रसिद्ध नसून 'हिआअलि' किंवा 'हिआलिआ' असा शब्द प्रसिद्ध आहे व त्याचा अर्थ संस्कृतमध्ये '**हृदयवती**' या शब्दाने बरोबर प्रकट होतो. पाहा, 'वज्ञालग्ग', प्रा. पटवर्धन, पृ. ५४९ ते ५५१.
१६) वृत्तीमध्ये 'सप्रज्ञक' असा शब्द योजिला आहे. काव्यमाला आवृत्तीमध्ये 'षट् प्रज्ञ' असा पाठ आढळतो. 'षट्प्रज्ञ' याचा अर्थ 'शब्दकल्पद्रुमांत 'धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ आणि लौकिक व्यवहार व

तत्त्वार्थ अशा सहा विषयांत निष्णात असलेला' असा दिला आहे. पाहा, डॉ. उपाध्ये, Saptaśatisāra with chappaṇṇayagāhā, पृ. ५१.

१७) वस्तुतः हा गुणीभूतव्यंग्याचा 'वाच्यसिद्ध्यंगव्यंग्य' हा प्रकार आहे. दुसऱ्या एका स्त्रीने शेतकऱ्याला जर आशीर्वाद दिला तर त्यामुळे तिसरीला आनंद होण्याचे काय कारण? याचे उत्तर वर सांगितलेल्या व्यंग्यार्थांमुळे मिळते व म्हणून तो व्यंग्यार्थ वाच्यार्थाचे समर्थन करण्याकरिता खर्ची पडतो व त्यामुळे तो वाच्यार्थाला गुणीभूत होतो.

१८) हेही वरच्याप्रमाणे 'वाच्यसिद्ध्यंगव्यंग्य' प्रकाराचेच उदाहरण आहे.

१९) वास्तविक ध्वनि हेच काव्य म्हणजे काव्य आणि ध्वनि हे वेगळे नाहीत असे अभिनवगुप्तांनी येथे म्हटले आहे. उद्द्योत १–१३ मध्येही 'त्या काव्यप्रकाराला जाणकार ध्वनि नावाचा काव्यप्रकार म्हणतात' असे म्हणून अभेदच प्रतिपादिलेला आहे. पण उद्द्योत १, कारिका १ व ५ यामध्ये 'काव्याचा आत्मा ध्वनि हा होय' आणि 'तोच अर्थ काव्याचा आत्मा होय' असे म्हणून काव्य आणि ध्वनि यांमध्ये भेद असल्याचे कल्पिले आहे. 'ध्वनि आणि काव्य एकच' आणि– 'काव्याचा आत्मा ध्वनि' ही दोन्ही विधाने आपापल्या परीने बरोबरच आहेत, असे अभिनवगुप्तांनी प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'सारांश, व्यंगार्थयुक्त अलंकार वेगळे आणि 'ध्वनि' वेगळा'"वर म्हटले आहे. पण आता येथे मात्र वस्तुतः ध्वनि व काव्य यांमधील अभेद हाच खरा आणि दोहोंमधील भेद हा खरा नसून केवळ लोकांना समजावे म्हणून कल्पिला आहे, असे अभिनवगुप्त म्हणतात. यामुळे 'दोन्ही विधाने बरोबरच आहेत' आणि 'वस्तुतः ध्वनि आणि काव्य हे एकच' या अभिनवगुप्तांच्या दोन वाक्यात विसंगति प्रत्ययाला येते. खरे म्हणजे उद्द्योत १, कारिका १३ मध्ये 'ध्वनि नावाचा काव्यप्रकार' असे जे म्हटले आहे, त्याचा अर्थ 'व्यंग्यार्थप्रधान काव्य म्हणजे ध्वनि' असा आहे. आणि कारिकाकार उद्द्योत १, कारिका १ व ५ मध्ये 'काव्याचा आत्मा ध्वनि' असे जेव्हा म्हणतात, तेव्हा सदर व्यंग्यार्थाला ते ध्वनि हे नाव देतात. तेव्हा प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'सारांश, व्यंग्यार्थयुक्त अलंकार वेगळे आणि 'ध्वनि' वेगळा'"वर अभिनवगुप्तांनी ही दोन्ही विधाने आपापल्या परीने बरोबरच आहेत असे जे म्हटले आहे, तेच योग्य. 'ध्वनि हेच खरे काव्य' हे येथे आनंदवर्धनांनी केलेले विधान तेवढेच बरोबर (आणि दुसरे बरोबर नाही) हे अभिनवगुप्तांचे मत स्वीकार्य वाटत नाही.

द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'अनुभवी कवींनी रसादींची प्रतीति घडवणे हेच मुख्य मानावे'" वरील वृत्तीमध्ये 'ध्वनि हेच (खरे) काव्य होय' असे जे म्हटले आहे, त्यातील वृत्तिकारांचा स्पष्ट आशय असा आहे की, परिणतप्रज्ञ कवींनी 'चित्र' रचनेला काव्य न समजता व्यग्यार्थप्रधान रचनेलाच काव्य समजून तशी रचना करावी.

२०) पूर्वी म्हणजे प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वर आणि त्यापुढील लोचनात सांगितलेले, तसेच उद्द्योत २, कारिका ३ मध्ये सांगितलेले.

२१) 'वगैरे' म्हणजे भाबोदय, भावसंधि, भावशबल आणि भावशान्ति (प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'काही काव्यांत मात्र वाच्यार्थ व व्यंगार्थ यांच्या प्रतीतींमधला क्रम लक्षात येतो, म्हणून त्याला 'संलक्ष्यक्रम' ही

संज्ञा'" व 'जो अर्थ मुख्यतया विवक्षित, तोच वाच्य समजा, व्यंग हा वेगळा व्यापार मानू नये हा आक्षेप आणि त्याला उत्तर' यांवर).

५२५ध्वन्यालोकः

सगुणीभूतव्यङ्ग्यैः सालङ्कारैः सह प्रभेदैः स्वैः ।
संकरसंसृष्टिभ्यां पुनरप्युद्द्योतते बहुधा ॥ ४३ ॥

तस्य च ध्वनेः स्वप्रभेदैर्गुणीभूतव्यङ्ग्येन वाच्यालङ्कारैश्च संकरसंसृष्टिव्यवस्थायां क्रियमाणायां बहुप्रभेदता लक्ष्ये दृश्यते । तथाहि स्वप्रभेदसङ्कीर्णः, स्वप्रभेदसंसृष्टो, गुणीभूतव्ययङ्ग्यसङ्कीर्णो, गुणीभूतव्यङ्ग्यसंसृष्टो, वाच्यालङ्कारान्तरसङ्कीर्णो, वाच्यालङ्कारान्तरसंसृष्टः, संसृष्टालङ्कारसङ्कीर्णः, संसृष्टालङ्कारसंसृष्टश्चेति बहुधा ध्वनिः प्रकाशते ।

तत्र स्वप्रभेदसङ्कीर्णत्वं कदाचिदनुग्राह्यानुग्राहकभावेन । यथा 'एवंवादिनि देवर्षौ' इत्यादौ । अत्र ह्यर्थशक्त्युद्भवानुरणनरूपव्यङ्ग्यध्वनिप्रभेदेनालक्ष्यक्रमव्यङ्ग्यध्वनिप्रभेदोऽनुगृह्यमाणः प्रतीयते । एवं कदाचित्प्रभेदद्वयसम्पातसन्देहेन । यथा—

खणपाहुणिआ देअर एसा जाआएँ किंपि दे भणिआ ।
रुअइ पडोहरवलहीघरम्मि अणुणिज्जउ वराई ॥
क्षणप्राघुणिका देवर एषा जायया किमपि ते भणिता ।
रोदिति शून्यवलभीगृहेऽनुनीयतां वराकी ॥
(इति च्छाया)

अत्र ह्यनुनीयतामित्येतत्पदमर्थान्तरसङ्क्रमितवाच्यत्वेन विवक्षितान्यपरवाच्यत्वेन च सम्भाव्यते । न चान्यतरपक्षनिर्णये प्रमाणमस्ति । एकव्यञ्जकानुप्रवेशेन तु व्यङ्ग्यत्वमलक्ष्यक्रमव्यङ्ग्यस्य स्वप्रभेदान्तरापेक्षया बाहुल्येन सम्भवति । यथा 'स्निग्धश्यामल' इत्यादौ । स्वप्रभेदसंसृष्टत्वं च यथा पूर्वोदाहरण एव । अत्र ह्यर्थान्तरसङ्क्रमितवाच्यस्यात्यन्ततिरस्कृतवाच्यस्य च संसर्गः ।

ध्वन्यालोक

गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी, अलंकारांशी आणि स्वतःच्या प्रकारांशी ध्वनीच्या स्वतःच्या प्रकारांच्या होणाऱ्या 'संकर' व 'संसृष्टि' या दोन प्रकारच्या[1] मिश्रणामुळे 'ध्वनि' हा पुन्हा किती तरी अनेक प्रकारांनी प्रकट होतो ॥ ४३ ॥

म्हणजे असे की, त्या ध्वनीच्या स्वतःच्या प्रकारांचे परस्परांशी होणारे संकर व संसृष्टि, तसेच गुणीभूतव्यंग्याशी व वाच्य अलंकारांशी होणारे संकर व संसृष्टि या दृष्टीने पाहिल्यास त्या ध्वनीचे पुष्कळच प्रकार आहेत असे वाङ्मयात दिसून येते. उदाहरणार्थ आपल्याच प्रकारांशी संकर झालेला, आपल्याच प्रकारांशी संसृष्टि झालेला, तसेच गुणीभूतव्यंग्याशी संकर झालेला व गुणीभूतव्यंग्याशी संसृष्टि झालेला, कोणत्या तरी 'वाच्य' अलंकाराशी संकर झालेला व कोणत्या तरी वाच्य अलंकाराशी संसृष्टि झालेला,

एकमेकांशी संसृष्ट झालेल्या अलंकारांशी संकर झालेला व एकमेकांशी संसृष्ट असलेल्या अलंकारांशी संसृष्ट असलेला, अशा निरनिराळ्या स्वरूपात ध्वनि प्रकाशित होतो.

त्यांपैकी ध्वनीच्या एखाद्या प्रकाराचा स्वतःच्याच दुसऱ्या एखाद्या प्रकाराशी संकर, काही वेळा एक प्रकार अनुग्राह्य व दुसरा प्रकार अनुग्राहक (म्हणजे एक प्रकार मुख्य व दुसरा प्रकार त्याला उपकारक) या रूपात होतो. उदा. 'तो देवर्षि अंगिरस् असे म्हणत असताना'[२] इत्यादि उदाहरणात ध्वनीच्या अर्थशक्तिमूल, अनुरणनरूपव्यंग्य या स्वतःच्या प्रकाराकडून असंलक्ष्यक्रम (रसादि) ध्वनि उपकृत झालेला दिसतो. याप्रमाणेच काही उदाहरणांत ध्वनीच्या कोणत्या दोन प्रकारांचा संकर झाला आहे याचा संदेह पडत असल्याने संदेह-संकर होऊ शकतो. उदा. "भावोजी, सणासाठी पाहुणी म्हणून आलेल्या हिला तुमची बायको काहीतरी (लागेल असे) म्हणाली. त्यामुळे ती मागच्या परड्यातील निर्जन अशा माळ्यावर रडत बसली आहे. तेव्हा जा, त्या विचारीचे सांत्वन करा."

या उदाहरणातील 'तिचे सांत्वन करा'[३] हे शब्द 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' असू शकतील, किंवा 'विवक्षितान्यपरवाच्य' ही असू शकतील. यांपैकी अमुकच प्रकार येथे आहे असा निर्णय घ्यावयास काही पुरावा नाही. एकाच उदाहरणात 'अलक्ष्यक्रमव्यंग्य (रसादि) ध्वनीच्या एका प्रकाराचे त्याच्याच दुसऱ्या प्रकाराशी मिश्रण होणे अनेक वेळा संभवते. उदा. 'मेघांनी आपल्या तजेलदार सावळ्या कांतीचा आकाशाला लेप दिला आहे[४]...' इ. उदाहरणात. 'अलक्ष्यक्रमव्यंग्या'च्या एका प्रकाराची त्याच्याच दुसऱ्या प्रकाराशी संसृष्टि झाल्याचे उदाहरणही तेच. कारण या उदाहरणात. 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' संलक्ष्यक्रम ध्वनि हा 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' संसक्ष्यक्रम ध्वनीशी संसृष्ट[५] झालेला आहे.

लोचनम्

एवं श्लोकद्वयेन सङ्ग्रहार्थमभिधाय बहुप्रकारत्वप्रदर्शिकां पठतिसगुणीति । सह गुणीभूतव्यङ्ग्येन सहालङ्कारैर्ये वर्तन्ते स्वे ध्वनेः प्रभेदास्तैः सङ्कीर्णतया संसृष्ट्या वानन्तप्रकारो ध्वनिरिति तात्पर्यम् । बहुप्रकारतां दर्शयति-तथा हीति । स्वभेदैर्गुणीभूतव्यङ्ग्येनालंकारैः प्रकाश्यत इति त्रयो भेदाः । तत्रापि प्रत्येकं सङ्करेण संसृष्ट्या चेति षट् । सङ्करस्यापि त्रयः प्रकाराः अनुग्राह्यानुग्राहकभावेन सन्देहास्पदत्वेनैकपदानुप्रवेशेनेति द्वादश भेदाः । पूर्व च ये पञ्चत्रिंशद्भेदा उक्तास्ते गुणीभूतव्यङ्ग्यस्यापि मन्तव्याः । स्वप्रभेदास्तावन्तोऽलङ्कार इत्येकसप्ततिः । तत्र सङ्करत्रयेण संसृष्ट्या च गुणने द्वे शते चतुरशीत्यधिके । तावता पञ्चत्रिंशतो मुख्यभेदानां गुणने सप्तसहस्राणि चत्वारि शतानि विंशत्यधिकानि भवन्ति । अलंकारामानन्त्यात् त्वसंख्यत्वम् ।

तत्र व्युत्पत्तये कतिपयभेदेषूदाहरणानि दित्सुः स्वप्रभेदानां कारिकामन्यपदार्थत्वेन प्रधानतयोक्तत्वात्तदाश्रयाण्येव चत्वार्युदाहरणान्याहतत्रेति । अनुगृह्यमाण इति । लज्जया हि प्रतीतया अभिलाषशृङ्गारोऽत्रानुगृह्यते व्यभिचारिभूतत्वेन ।

क्षण उत्सवस्तत्र निमन्त्रणेनानीता हे देवर! एषा ते जायया किमपि भणिता रोदिति । पडोहरे शून्ये वलभीगृहे अनुनीयतां वराकी । सा तावद्देवरादुक्ता तज्जायया विदितवृत्तान्तया किमप्युक्तेत्येषोक्तिस्तद्वृत्तान्तं दृष्टवत्या अन्यस्यास्तद्देवरचौरकामिन्याः । तत्र तव गृहिण्यायं वृत्तान्तो ज्ञात इत्युभयतः कलहायितुमिच्छन्त्येवमाह । तत्रार्थान्तरे सम्भोगेनैकान्तोचितेन परितोष्यतामित्येवंरूपे

वाच्यस्य सङ्क्रमणम् । यदि वा त्वं तावदेतस्यामेवानुरक्त इतीर्ष्याकोपतात्पर्यादनुनयनमन्यपरं विवक्षितम् । एषा तवेदानीमुचितमगर्हणीयं प्रेमास्पदमित्यनुनयो विवक्षितः, वयं त्विदानीं गर्हणौयाः संवृत्ता इत्येतत्परतया । उभयथापि च स्वाभिप्रायप्रकाशनादेकतरनिश्चये प्रमाणाभाव इत्युक्तम् । विवक्षितस्य हि स्वरूपस्थस्यैवान्यपरत्वम् । संक्रान्तिस्तु तस्यैतद्रूपतापत्तिः । यदि वा देवरानुरक्ताया एव तं देवरमन्यया सहावलोकितसम्भोगवृत्तान्तं प्रतीयमुक्तिः, देवरेत्यामन्त्रणात् । पूर्वव्याख्याने तु तदपेक्षया देवरेत्यामन्त्रणं व्याख्यातम् । बाहुल्येनेति । सर्वत्र काव्ये रसादितात्पर्यं तावदस्ति । तत्र रसध्वनेर्भावध्वनेश्चैकेन व्यञ्जकेनाभिव्यञ्जनम् । स्निग्धश्यामलेत्यत्र विप्रलम्भशृङ्गारस्य तद्व्यभिचारिणश्च शोकावेगात्मनश्चर्वणीयत्वात् । एवं त्रिविधं सङ्करं व्याख्याय संसृष्टिमुदाहरति । स्वप्रभेदेति । अत्र हीति । लिप्तशब्दादौ तिरस्कृतो वाच्यः, रामादौ तु सङ्क्रान्त इत्यर्थः ।

लोचन :

याप्रमाणे वरील दोन परिकरश्लोकांतून आतापर्यंतच्या विवेचनाचा सारांश सांगितल्यावर ध्वनीचे प्रकार अगणित कसे होतात, हे दाखविण्यासाठी वृत्तिकार 'गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी' इ. कारिका सांगतात. गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी व अलंकारांशी व ध्वनीच्या स्वतःच्या प्रकारांशी ध्वनीच्या स्वतःच्या प्रकारांचा संकर किंवा संसृष्टि झाल्यामुळे ध्वनीचे अनंत प्रकार होतात, हे तात्पर्य. अशा रीतीने ध्वनीचे पुष्कळच प्रकार होऊ शकतात, हे वृत्तिकार 'उदाहरणार्थ' इ. शब्दांनी दर्शवितात. ध्वनि स्वतःच्या प्रकारांशी, गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी व अलंकारांशी मिश्रित झाल्याचे आढळते, म्हणून त्या ध्वनीचे (प्रथम) तीन प्रकार होतात. त्यांतही या तीन प्रकारांपैकी प्रत्येकामध्ये ध्वनि हा संकर या रूपाने किंवा संसृष्टि या रूपाने मिश्रित होतो, म्हणून त्या तिहींचे सहा प्रकार होतात. संकराचेही १) अनुग्राह्यअनुग्राहकसंबंधामुळे, २) संदेहामुळे आणि ३) एकाच पदात समाविष्ट झाल्यामुळे जे तीन प्रकार होतात, त्यांयोगे (संकराचे ३ × ३ = ९ आणि संसृष्टीचे ३ असे) एकूण १२ प्रकार झाले. आणि पूर्वी[६] जे ध्वनीचे पसतीस प्रकार सांगितले, ते गुणीभूत व्यंग्याचेही होतात असे समजावे. ध्वनीचे स्वतःचे तितकेच म्हणजे पसतीस (मिळून ७०) आणि अलंकार[७] मिळून ७१ प्रकार होतील. त्या ७१ प्रकारांचे आपापसात तीन प्रकारचा संकर आणि एक प्रकारची संसृष्टि होणे शक्य असल्याने एकूण ७१ × ४ = २८४ इतके प्रकार होतात. त्या संख्येने ध्वनीच्या मुख्य ३५ भेदांना गुणले,[८] तर सात हजार चारशे वीस प्रकार होतात.[९] वस्तुतः अलंकार हे अनंत[१०] असल्याने वरील प्रकार त्या अलंकारांशी मिश्रित झाल्यास ध्वनीचे एकूण असंख्य प्रकार होतील.

त्या असंख्य प्रकारांपैकी काहींची उदाहरणे वाचकांच्या मार्गदर्शनासाठी द्यावीत अशी वृत्तिकारांची इच्छा आहे. कारिका ४३ मध्ये 'सगुणीभूतव्यंग्य' आणि सालंकार' हे दोन बहुव्रीहि समास स्वप्रभेदांची विशेषणे असल्यामुळे ध्वनीच्या स्वप्रभेदांना प्राधान्य[११] दिले गेले आहे. म्हणून वृत्तिकार प्रथम ध्वनीच्या प्रभेदांच्या स्वप्रभेदांशी होणाऱ्या मिश्रणाचीच चार उदाहरणे 'त्यांपैकी' इ. शब्दांनी सुरुवात करून देतात. 'उपकृत झालेला—' या श्लोकातून प्रतीत होणारी लज्जा ही व्यभिचारी भाव या रूपाने शेवटी प्रतीत होणाऱ्या अभिलाषरतीला उपकारक होत आहे. 'क्षण' म्हणजे उत्सव. त्यासाठी निमंत्रणपूर्वक येथे आणलेल्या पाहुणीला, 'अहो (पाहुणीचे) भावोजी! तुमची बायको काहीतरी बोलल्यामुळे ती मागील परड्यातील निर्जन माळ्यावर रडत बसली आहे. तेथे जाऊन त्या बिचारीचे तुम्ही सान्त्वन करा!' ती बोलाविलेली पाहुणी आपल्या दिरावर अनुरक्त झाली होती. ते त्या दिराच्या बायकोला कळल्यामुळे ती त्या पाहुणीला काहीतरी बोलली. तसे बोलताना पाहिलेल्या दुसऱ्या स्त्रीने ही गाथा त्या पाहुणीच्या भावोजीला उद्देशून म्हटली आहे.

ती बोलणारी स्त्रीही त्या पाहुणीच्या दिरावर चोरून प्रेम करीत होती. असे भाषण करण्यामागे 'तुमच्या बायकोला तुम्ही व ही पाहुणी यांमधील प्रेमप्रकरण कळले आहे' हे सांगून तो दीर व त्याची बायको यांमध्ये कलह लावून देण्याची बोलणारीची मनीषा आहे. त्या बोलण्यातील ('सांत्वन करा' या) या वाच्यार्थाचे 'एकांतात करावयास योग्य अशी रतिक्रीडा करून तिला संतुष्ट करा' या स्वरूपाच्या दुसऱ्या व्यंग्य अर्थामध्ये रूपांतर होत आहे.[१२] किंवा 'तुम्ही स्वतःतर ह्या पाहुणीवरच प्रेम करिता आहात' असे सुचवून बोलणाऱ्या स्त्रीला स्वतःला ईर्ष्येमुळे वाटणारा कोप हा दुसरा अर्थ मुख्यतः प्रकट करावयाचा असल्यामुळे 'तुम्ही तिला संतुष्ट कर' हा वाच्यार्थ विवक्षित असून तो अन्यपर म्हणजे व्यंग्यार्थपर आहे. 'आता ती तुम्हाला सर्वस्वी योग्य आणि प्रशंसनीय असा प्रेमाचा विषय झालेली आहे' हा व्यंग्यार्थ सुचविण्यासाठी 'तिचा अनुनय तुम्ही करा' हा वाच्यार्थ विवक्षित आहे 'आम्ही मात्र आता तुमच्या दृष्टीने निंदेस पात्र झालो आहोत हाही व्यंग्यार्थ सुचविण्यासाठी ('तुम्ही तिचा अनुनय करा' हा) वाच्यार्थ विवक्षित आहे. अशा रीतीने येथे अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनि मानिला किंवा विवक्षितान्यपरवाच्य ध्वनि मानिला, तरी बोलणाऱ्या स्त्रीला स्वतःला त्या दिराविषयी वाटणारा अभिलाष सूचित होत असल्यामुळे आणि या दोहोंपैकी अमुक एक प्रकारच येथे आहे हे मानावयास काही प्रमाण नाही (व म्हणून येथे संदेहसंकर आहे[१३]) असे वृत्तिकारांनी म्हटले आहे. कारण जो वाच्यार्थ विवक्षित असतो, तो आहे तसाच राहून दुसरा अर्थ प्राधान्याने प्रकट करीत असेल, तर तो विवक्षितान्यपरवाच्य ध्वनि होय. पण तो वाच्यार्थ 'संक्रमित' होणे म्हणजे तो व्यंग्यार्थाशी एकरूप होणे[१४] होय. किंवा 'भावोजी' 'इ. गाथेतील बोलणे हे आपल्या स्वतःच्याच दिरावर अनुरक्त झालेल्या स्त्रीने, त्याने अन्य स्त्रीशी म्हणजे पाहुणीशी रतिक्रीडा केल्याचे पाहिल्यावर त्याला उद्देशून केलेले बोलणे समजावे, कारण त्यात बोलणारीने त्याला 'भावोजी' असे संबोधिले आहे. पहिल्या विवरणात 'भावोजी' हे संबोधन त्या पाहुणीच्या संदर्भात आहे. (म्हणजे तो त्या पाहुणीचा दीर आहे) असे समजून आम्ही अर्थ लाविला आहे.[१५] 'अनेक वेळा—' सर्व काव्यांमध्ये (वाच्यार्थाच्या द्वारा) रसादिकांची प्रतीति घडविणे हे तर मुख्य उद्दिष्ट असते. या पार्यन्तिक रसध्वनीच्या बाबतीत रसरूप ध्वनीची आणि (अवान्तर) भावरूप ध्वनीची अभिव्यक्ति पद्यरूपी एकाच व्यंजकाने होते. उदा, 'मेघांनी आपल्या तजेलदार सावळ्या कांतीने'[१६] या श्लोकात विप्रलंभशृंगार आणि त्याचा शोकावेग हा व्यभिचारिभाव हे दोन्ही आस्वादाचा विषय झाले आहेत. याप्रमाणे संकराच्या तिन्ही प्रकारांचे विवरण केल्यावर[१७] वृत्तिकार संसृष्टीचे उदाहरण 'त्याच्याच दुसऱ्या प्रकाराशी इ. वाक्याने प्रारंभ करून देतात. 'कारण या उदाहरणात'— 'लेप' वगैरे[१८] शब्दांचा वाच्यार्थ 'तिरस्कृत' झालेला आहे, पण 'राम' वगैरे शब्दात त्याचे दुसऱ्या व्यंग्य अर्थात रूपांतर झालेले आहे, हा भावार्थ.

टीपा

१) संकर व संसृष्टि यांच्या स्पष्टीकरणासाठी प्रथम खंड, उद्‌द्योत – २ . जेव्हा दोन किंवा अधिक प्रकार एकमेकांशी अभेद्यपणे गुंतलेले असतील, तेव्हा त्यांचा 'संकर' आहे असे म्हणावयाचे व ते जेव्हा एकाच उदाहरणात, पण परस्परनिरपेक्ष असतील तेव्हा त्यांची 'संसृष्टि' आहे असे म्हणावयाचे.

२) पाहा, प्रथमखंड, "उद्‌द्योत – २ 'काही उदाहरणांत प्रथम 'संलक्ष्यक्रम' ध्वनि व मग त्याचे असंलक्ष्यक्रम ध्वनीत पर्यवसान'".

३) उत्सवासाठी दिराने बोलावलेली एक तरुणी त्याच्यावर आसक्त आहे. त्या पाहुणीवर त्या दिराचे प्रेम आहे ही गोष्ट दिराच्या बायकोला कळल्यामुळे ती त्या पाहुणीला काहीतरी लागेल असे बोलली. हे वृत्त त्या

दिरावर चोरुन प्रेम करणाऱ्या दुसऱ्या एका बाईला माहीत होईल व दिराचे त्याच्या बायकोशी बिनसले तर आपल्या दृष्टीने ते चांगलेच झाले, म्हणून ती बाई त्याला वरीलप्रमाणे म्हणत आहे, 'सांत्वन करा' या वाच्यार्थाचे रूपांतर 'त्या पाहुणीशी रममाण होऊन तिचे सांत्वन करा' यात होते, म्हणून हा 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' ध्वनि समजावयाचा की, 'माझ्याकडे लक्ष द्यावयाचे सोडून तुम्ही त्या पाहुणीवरच प्रेम करिता!' असे म्हणून ईर्ष्येमुळे तिला आलेला राग मुख्यत्वाने व्यंग्य समजून हे 'विवक्षितान्यपरवाच्या' चे ('अनुनय करा' या वाच्यार्थाच्या प्रतीतीनंतर बोलणारणीचा राग सूचित होतो, याचे) उदाहरण मानावयाचे?

४) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार"'.

५) या श्लोकामध्ये 'लेप दिला आहे' या शब्दात 'लेप' याचा 'द्रव पदार्थाने माखणे' हा वाच्यार्थ 'अत्यन्ततिरस्कृत' आहे व 'राम' शब्दाचा 'राम ही व्यक्ति' हा वाच्यार्थ 'अर्थान्तरसंक्रमित' झालेला आहे (पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार- (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार'"). या श्लोकामध्ये हे दोन ध्वनिप्रकार परस्पर निरपेक्ष असल्यामुळे त्यांची 'संसृष्टि' झाली आहे.

६) प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'ध्वनीला व्यंगार्थ अस्पष्ट किंवा वाच्याचे अंग असणे नको'" व त्यावरील टीप ११ वी.

७) सर्व अलंकारांमध्ये 'अलंकारत्व' (म्हणजे वाच्यार्थाची शोभा वाढविणे) हा धर्म समान असल्यामुळे सर्व अलंकारांचा एकच प्रकार मानिला आहे.

८) संकर किंवा संसृष्टि यांमुळे होणाऱ्या २८४ प्रकारांना ३५ या संख्येने गुणावयाचे कशासाठी हे स्पष्ट होत नाही. संकर किंवा संसृष्टि नसलेले ध्वनीचे व गुणीभूतव्यंग्याचे असे सत्तर शुद्ध प्रकारही विचारात घेणे अवश्य आहे असे म्हणणे असेल, तर ते सत्तर प्रकार २८४ मध्ये मिळविणे योग्य होईल. तसे केल्यास बेरीज २८४+७०=३५४ इतकी होईल. मम्मटाने काव्यप्रकाश उल्लास ४, कारिका ४३-४४ येथे निराळ्या रीतीने गणन करून ध्वनिप्रकारांची अंतिम संख्या १०४५५ इतकी होते दाखवले आहे.

९) वास्तविक २८४ ला ३५ ने गुणले, तर गुणाकार ९९४० येतो, अभिनवगुप्त म्हणतात त्याप्रमाणे ७४२० नाही. शिवाय हे ७१ प्रकार सांगण्यापूर्वी जे १२ प्रकार सांगितले, ते अभिनवगुप्तांनी तेथे तसेच सोडून दिले. त्यांचा ७४२० या (चुकीच्या) गुणाकाराशी बेरजेने किंवा गुणाकाराने काहीही संबंध जोडला नाही.

१०) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'शृंगारध्वनीत रूपकादि अलंकार घालताना दक्षता घ्यावयास हवी'".

११) **अनेकमन्यपदार्थे** । (अष्टाध्यायी, २–२–२४) हे सूत्र बहुव्रीहि समासासंबंधी आहे. बहुव्रीहि समासाचा अर्थ कोणत्या तरी अन्य पदार्थाच्या म्हणजे विशेष्याच्या विशेषणासारखा असतो. उदा. **चक्रपाणि** हा शब्द **चक्र** व **पाणि** यांहून अन्य, विष्णु या विशेष्याचा बोध करून देतो. विशेषण व विशेष्य यांत विशेष्य हे प्रधान व विशेषण हे गौण असते, म्हणून बहुव्रीहि समासाच्या बाबतीत 'अन्यपदाचा' अर्थ हा प्रधान असतो.

१२) म्हणजे येथे अविवक्षितवाच्यध्वनीचा अर्थान्तरसंक्रमितवाच्य हा प्रकार आहे. येथे 'तिची समजूत घाला' हा वाच्यार्थ 'अत्यन्ततिरस्कृत' नाही. 'रतिक्रीडा करून तिची समजूत घाला' या व्यंग्यार्थात तो वाच्यार्थ अंतर्भूत आहे. या उपादान लक्षणेचे व्यंग्य प्रयोजन पाहुणीशी मनमुराद रतिक्रीडा करून सांत्वन करणे असे काहीतरी मानावयास पाहिजे.

१३) म्हणजे येथे अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनि मानावयाचा किंवा विवक्षितान्यपरवाच्य ध्वनि (म्हणजे ईर्ष्याकोप या व्यभिचारिभावाचा ध्वनि) मानावयाचा, या बाबतीत संदेह उत्पन्न होतो. या गाथेच्या संबधात काव्यप्रकाश, उल्लास ४, पृ. १८७ (झळकीकर आवृत्ति) ही पाहावे.

१४) 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' ध्वनीमध्ये वाच्यार्थाचा संपूर्णपणे त्याग केला जातो. 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' ध्वनीमध्ये वाच्यार्थाचा संपूर्णपणे त्याग केला जात नाही. 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' ध्वनीमध्ये वाच्यार्थात दुसऱ्या अर्थाची भर घालून त्याचे रूपांतर केले जाते. पण 'विवक्षितान्यपरवाच्य' ध्वनीमध्ये वाच्यार्थाचा त्यागही होत नाही किंवा तो रूपांतरितही होत नाही. तो आहे तसा कायम राहून (प्रधान) व्यंग्यार्थाकडे बोट दाखवितो.

१५) सारांश, पहिल्या विवरणात ऐकणारा पुरुष हा अभिनवगुप्तांनी त्या पाहुणीचा दीर मानिला आहे, तर दुसऱ्या विवरणात तो बोलणाऱ्या स्त्रीचा स्वतःचाच दीर कल्पिला आहे.

१६) प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार – (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार",

१७) म्हणजे अनुग्राह्य–अनुग्राहकसंबंधावर आधारलेल्या (संकराच्या) प्रकाराचे उदाहरण 'तो देवर्षि अंगिरस्' हे; संदेहसंकराचे 'भावोजी' हे व एकव्यंजकानुप्रवेश–प्रकाराचे 'मेघांनीं आपल्या तजेलदार 'अशी तीन उदाहरणे देऊन.

१८) 'वगैरे' 'म्हणजे 'मित्र' हा शब्द.

ध्वन्यालोकः

गुणीभूतव्यङ्ग्यसङ्कीर्णत्वं यथा— 'न्यक्कारो ह्ययमेव मे यदरयः' इत्यादौ । यथा वा–

कर्ता द्यूतच्छलानां जतुमयशरणोद्दीपनः सोऽभिमानी
कृष्णाकेशोत्तरीयव्यपनयनपटुः पाण्डवा यस्य दासाः ।
राजा दुःशासनादेर्गुरुरनुजशतस्याङ्गराजस्य मित्रं
क्वास्ते दुर्योधनोऽसौ कथयत न रुषा द्रष्टुमभ्यागतौ स्वः ॥

अत्र ह्यलक्ष्यक्रमव्यङ्ग्यस्य वाक्यार्थीभूतस्य व्यङ्ग्यविशिष्टवाच्याभिधायिभिः पदैः सम्मिश्रता । अत एव च पदार्थाश्रयत्वे गुणीभूतव्यङ्ग्यस्य वाक्यार्थाश्रयत्वे च ध्वनेः सङ्कीर्णतायामपि न विरोधः स्वप्रभेदान्तरवत् । यथा हि ध्वनिप्रभेदान्तराणि परस्परं सङ्कीर्यन्ते । पदार्थवाक्याश्रयत्वेन च न विरुद्धानि ।

किं चैकव्यङ्ग्याश्रयत्वे तु प्रधानगुणभावो विरुद्ध्यते न तु व्यङ्ग्यभेदापेक्षया, ततोऽप्यस्य न विरोधः । अयं च संकरसंसृष्टिव्यवहारो बहूनामेकत्र वाच्यवाचकभाव इव व्यङ्ग्यव्यञ्जकभावेऽपि निर्विरोध एव मन्तव्यः । यत्र तु पदानि कानिचिदविवक्षितवाच्यान्यनुरणनरूपव्यङ्ग्यवाच्यानि वा तत्र ध्वनिगुणीभूतव्यङ्ग्ययोः संसृष्टत्वम् । यथा– 'तेषां गोपवधूविलाससुहृदाम्' इत्यादौ । अत्र हि 'विलाससुहृदां', 'राधारहःसाक्षिणाम्' इत्येते पदे ध्वनिप्रभेदरूपे 'ते', 'जाने' इत्येते च पदे गुणीभूतव्यङ्ग्यरूपे ।

वाच्यालङ्कारसङ्कीर्णत्वमलक्ष्यक्रमव्यङ्ग्यापेक्षया रसवति सालङ्कारे । काव्ये सर्वत्र सुव्यवस्थितम् ।

ध्वन्यालोक

अलक्ष्यक्रमव्यङ्ग्य ध्वनीचा गुणीभूतव्यंग्याशी 'संकर' होण्याचे उदाहरण 'माझ्या बाबतीत शत्रु असावेत हेच मुळी मला लांछन आहे[१]' इत्यादि. किंवा जसे–

'द्यूतामधील कपटी डावपेच करणारा, लाक्षागृहाला आग लावणारा, द्रौपदीचे केस आणि उत्तरीय वस्त्र ओढण्यात तरबेज असलेला, पांडव ज्याला आपले दास वाटत होते, दुःशासन इ. नव्याण्णव (शब्दशःशंभर) धाकट्या भावांना गुरुस्थानी असणारा, अंगराज कर्णाचा मित्र असा तो अहंकारी राजा दुर्योधन कोठे आहे ते सांगा. आम्ही काही रागावून आलेलो नाही, तर त्याला भेटायला आलेले आहो.[२]'

येथे एकंदर वाक्याचा मुख्य आशय अलक्ष्यक्रमव्यंग्य असून (पदांच्या) व्यंग्यार्थाने खुलवलेल्या वाच्यार्थाचा बोध करून देणाऱ्या पदांशी (त्याचा) अंगांगिभावसंकर झालेला आहे. आणि म्हणूनच गुणीभूतव्यंग्य हा पदांच्या अर्थांच्या आश्रयाने असल्यामुळे व ध्वनि सर्व वाक्याच्या अर्थांच्या आश्रयाने असल्यामुळे त्यांचा संकर होणे यात काही विरोध नाही– ध्वनीच्या स्वतःच्याच एका प्रकाराचा ध्वनीच्या दुसऱ्या प्रकाराशी संकर झाला तरी त्यात काहीही विरोध नसतो, त्याप्रमाणे. कारण जसा ध्वनीच्या निरनिराळ्या प्रकारांचा एकमेकांशी संकर होतो आणि त्या ध्वनीच्या प्रकारांचे आश्रय असलेल्या पदांचे अर्थ व वाक्याचा अर्थ हे [जसे वेगवेगळे असल्यामुळे त्या ध्वनिप्रकारांमध्ये विरोध उत्पन्न होत नाही (तसेच) याही बाबतीत आहे.] आणि व्यंग्यार्थ एकच असला, तर तोच प्रधान आणि तोच अंगभूत असणे हे असंभवनीय आहे, पण व्यंग्यार्थ वेगवेगळे असून त्यांपैकी एक मुख्य व दुसरा अंगभूत असतो, त्यामुळेसुद्धा या श्लोकाच्या बाबतीत काही विरोध येत नाही.

आणि काव्याचे अनेक घटक एकाच उदाहरणात 'वाच्य' असताना त्यांना ज्याप्रमाणे संसृष्टि किंवा संकर ही संज्ञा देण्यात काही वावगे असत नाही, त्याप्रमाणे ते घटक एकाच उदाहरणात व्यंग्य असतानाही त्या संज्ञा देण्यात काही विरोध असू शकत नाही असे मानावे. पण जेथे काही पदे अविवक्षितवाच्य व्यंग्यार्थाने आणि दुसरी काही अनुरणनरूप व्यंग्यार्थ सुचविणाऱ्या वाच्यार्थाने युक्त असतील, तेथे गुणीभूतव्यंग्य आणि ध्वनि यांची 'संसृष्टि' असते. उदा. 'मित्रा! यमुनातीरावरील त्या लतागुहांचे कुशल आहे ना? इ. उदाहरणामध्ये.[३] कारण या उदाहरणात (गोपीचे प्रणयक्रीडेच्या वेळचे) सोबती व (राधेने माझ्याशी केलेल्या एकांताचे) साक्षीदार ही दोन पदे ध्वनीच्या 'अविवक्षितवाच्य' प्रकाराची[४] आहेत, तर 'त्यांचा', 'मला वाटते'[५] ही पदे 'गुणीभूतव्यंग्य' स्वरूपाची आहेत.

वाच्य अलंकारांचा असंलक्ष्यक्रमव्यंग्याशी संकर असणे हे सर्वंच रसाळ आणि वाच्यालंकारयुक्त काव्यांमध्ये नेहमीच आढळणारे आहे.

लोचनम्

एवं स्वप्रभेदं प्रति चतुर्भेदानुदाहृत्य गुणीभूतव्यङ्ग्यं प्रत्युदाहरति गुणीभूतेति । अत्र हीत्युदाहरणद्वयेऽपि । अलक्ष्यक्रमव्यङ्ग्यस्येति रौद्रस्य । व्यङ्ग्यविशिष्टेत्यनेन गुणता व्यङ्ग्यस्योक्ता । पदैरित्युपलक्षणे तृतीया । तेन तदुपलक्षितो योऽर्थो व्यङ्ग्यगुणीभावेन वर्तते तेन सम्मिश्रता सङ्कीर्णता । सा चानुग्राह्यानुग्राहकभावेन सन्देहयोगेनैकव्यञ्जकानुप्रवेशेन चेति यथासम्भवमुदाहरणद्वये योज्या । तथाहि मे यदरय इत्यादिभिः सर्वैरेव पदार्थैः, कर्तेत्यादिभिश्च विभावादिरूपतया रौद्र एवानुगृह्यते । कर्तेत्यादौ च प्रतिपदं प्रत्यवान्तरवाक्यं प्रतिसमासं च व्यङ्ग्यमुत्प्रेक्षितुं शक्यमेवेति न लिखितम् । 'पाण्डवा यस्य दासाः' इति तदीयोक्त्यनुकारः । तत्र गुणीभूतव्यङ्ग्यतापि योजयितुं शक्या, वाच्यस्यैव क्रोधोद्दीपकत्वात । दासैश्च कृतकृत्यैः स्वाम्यवश्यं द्रष्टव्य इत्यर्थशक्त्यनुरणनरूपतापि । उभयथापि चारुत्वादेकपक्षग्रहे प्रमाणाभावः । एकव्यञ्जकानुप्रवेशस्तु तैरेव पदैः गुणीभूतस्य व्यङ्ग्यस्य प्रधानीभूतस्य च रसस्य विभावादिद्वारतयाभिव्यञ्जनात् । अत एव चेति । यतोऽत्र लक्ष्ये दृश्यते तत इत्यर्थः । ननु व्यङ्ग्यं गुणीभूतं प्रधानं चेति विरुद्धमेव तद् दृश्यमानमप्युक्तत्वान्न श्रद्धेयमित्याशङ्क्य व्यञ्जकभेदात्तावन्न विरोध इति दर्शयति अत एवेति । स्वेति । स्वप्रभेदान्तराणि सङ्कीर्णतया पूर्वमुदाहृतानि, इति तान्येव दृष्टान्तयति । तदेव व्याचष्टे— यथा हीति । तथात्रापीत्यध्याहारोऽत्र कर्तव्यः । 'तथाहि' इति वा पाठः ।

ननु व्यञ्जकभेदात्प्रथमभेदयोः परिहारोऽस्तु, एकव्यञ्जकानुप्रवेशे तु किं वक्तव्यमित्याशङ्क्य पारमार्थिकं परिहारमाह— किञ्चेति । ततोऽपीति । यतोऽन्यद्व्यङ्ग्यं गुणीभूतमन्यच्च प्रधानमिति को विरोधः? ननु वाच्यालङ्कारविषये श्रुतोऽयं सङ्करादिव्यवहारो न तु व्यङ्ग्यविषय इत्याशङ्क्याह— अयं चेति । मन्तव्य इति । मननेन प्रतीत्या तथा निश्चेयः, उभयत्रापि प्रतीतेरेव शरणत्वादिति भावः ।

एवं गुणीभूतव्यङ्ग्यसङ्करभेदांस्त्रीनुदाहृत्य संसृष्टिमुदाहरति—यत्र तु पदानीति । कानिचिदित्यनेन सङ्करावकाशं निराकरोति । सुहृच्छब्देन साक्षिशब्देन चाविवक्षितवाच्यो ध्वनिः । 'ते' इतिपदेनासाधारणगुणगणोऽभिव्यक्तोऽपि गुणत्वमवलम्बते, वाच्यस्यैव स्मरणस्य प्राधान्येन चारुत्वहेतुत्वात् । 'जाने' इत्यनेनोत्प्रेक्ष्यमाणानन्तधर्मव्यञ्जकेनापि वाच्यमेवोत्प्रेक्षणरूपं प्रधानीक्रियते । एवं गुणीभूतव्यङ्ग्येऽपि चत्वारो भेदा उदाहृताः ।

अधुनालङ्कारगतांस्तान् दर्शयति— वाच्यालङ्कारेति । व्यङ्ग्यत्वे त्वलङ्काराणामुक्तभेदाष्टक एवान्तर्भाव इति वाच्यशब्दस्याशयः । काव्य इति । एवंविधमेव हि काव्यं भवति । सुव्यवस्थितमिति । 'विवक्षा तत्परत्वेन' इति द्वितीयोद्द्योतमूलोदाहरणेभ्यः सङ्करत्रयं संसृष्टिश्च लभ्यत एव । 'चलापाङ्गां दृष्टिम्' इत्यत्र हि रूपकव्यतिरेकस्य प्राग्व्याख्यातस्य शृङ्गारानुग्राहकत्वं, स्वभावोक्तेः शृङ्गारस्य चैकानुप्रवेशः । 'उप्पहजाआ' इति गाथायां पामरस्वभावोक्तिर्वा ध्वनिर्वेति प्रकरणाद्यभावे एकतरग्राहकं प्रमाणं नास्ति ।

यद्यप्यलङ्कारो रसमवश्यमनुगृह्णाति, तथापि 'नातिनिर्वहणैषिता' इति यदभिप्रायेणेक्तं तत्र सङ्करासम्भवात् संसृष्टिरेवालङ्कारेण रसध्वनेः । यथा बाहुलतिकापाशेन बद्ध्वा दृढम्' इत्यत्र ।

लोचन

याप्रमाणे ध्वनीच्या एका प्रकाराच्या त्याच्या दुसऱ्या प्रकारांशी होणाऱ्या मिश्रणाच्या चार प्रकारांची उदाहरणे दिल्यावर वृत्तिकार ध्वनीच्या गुणीभूतव्यंग्याशी होणाऱ्या मिश्रणाची उदाहरणे देण्यास 'गुणीभूतव्यंग्याशी संकर' इ. शब्दांनी सुरुवात करितात. 'येथे—' म्हणजे 'मला शत्रु असावेत' आणि 'द्यूतामधील कपटी डावपेच' या दोन्ही उदाहरणांत. 'अलक्ष्यक्रमव्यंग्य' म्हणजे रौद्र रस. 'व्यंग्यार्थाने खुलविलेल्या' हे शब्द '(निरनिराळ्या पदांतून सुचविले गेलेले वस्तुरूप) व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत झालेले आहेत' हा अर्थ सांगतात. 'पदांशी' या शब्दातील तृतीया 'उपलक्षण' या अर्थी आहे; त्यामुळे त्या पदांनी उपलक्षित असा जो वाच्य अर्थ, तो त्याला गुणीभूत झालेल्या व्यंग्यार्थाने विशिष्ट असा आहे व त्या (गुणीभूतव्यंग्य) वाच्यार्थाशी अलक्ष्यक्रमव्यंग्याचे संमिश्रण (म्हणजे संकर) झालेले आहे. तो संकर वरील दोन उदाहरणांत अनुग्राह्य— अनुग्राहक संबंध, संदेह व एकाच व्यंजकात प्रविष्ट होणे यांपैकी कोणत्या प्रकारचा आहे, हे जशी शक्यता दिसत असेल तसे ठरवावे.[६] उदा. 'मला शत्रु असावेत' इ. श्लोकातील सर्वच शब्दांचे व 'द्यूतामधील कपटी डावपेच करणारा' इ. सर्व शब्दांचे व्यंग्य अर्थ रौद्ररसाचे विभाव वगैरे असल्यामुळे रौद्ररसाचाच परिपोष होत आहे.

आणि 'द्यूतामधील … करणारा' इ. श्लोकामध्ये प्रत्येक पदात, प्रत्येक पोटवाक्यात, प्रत्येक समासात व्यंग्यार्थ कल्पिणे (सहृदयांना) शक्य आहे, म्हणून येथे आम्ही त्याचे विवरण केले नाही.[७] 'पांडव ज्याला आपले दास वाटत होते' हे शब्द दुर्योधनाने (पूर्वी म्हणजे पांडव द्यूतात हरल्यावर) जे म्हटले होते, त्याचा पुनरुच्चार आहे. त्या वाक्याच्या (व इतर व्यंजक शब्दांच्या) बाबतीत त्यातील (वस्तुरूप) व्यंग्यार्थ हा वाच्यार्थांला गुणीभूत झाला आहे असेही दाखविता येईल, कारण (व्यंग्यार्थाने भूषविलेला) वाच्यार्थच येथे भीमाच्या क्रोधाचा उद्दीपनविभाव[८] आहे. सेवकांनी (आपली कामगिरी चोखपणे पार पाडल्यावर (ती निवेदन करण्यासाठी) त्यांनी धन्याची गाठ घेणे हे त्यांचे अवश्यमेव कर्तव्य आहे, असा अनुरणनरूप व्यंग्यार्थही या वाक्यातील वाच्यार्थाच्या व्यञ्जकशक्तीने प्रकट होतो. दोन्हीपैकी म्हणजे गुणीभूत आणि अनुरणनरूप व्यंग्यार्थ यांपैकी कोणताही मानिला, तरी त्यात सौंदर्य असल्यामुळे त्यांपैकी अमुक एकच येथे स्वीकारला पाहिजे असे ठरविण्यास काहीही प्रमाण नाही (म्हणून येथे अनुरणनरूपव्यंग्य ध्वनि आणि गुणीभूतव्यंग्य हे दोन्ही सारखेच सुंदर असल्यामुळे त्यांचा संदेहसंकर झाला आहे). आणि पद्यरूपी एका व्यंजकामध्ये प्रविष्ट होणे या स्वरूपाचा संकर येथे कसा होतो म्हणाल, तर या श्लोकातील पदे गुणीभूत व्यंग्यार्थही प्रकट करितात, आणि तीच पदे (उद्दीपन) विभाव इ. अर्थ प्रकट करून त्यांद्वारे प्रधानभूत रौद्र रसाची अभिव्यक्ति करितात. 'आणि म्हणूनच—' म्हणजे ज्या अर्थी या दोन्ही श्लोकांमध्ये तसे (म्हणजे ध्वनि व गुणीभूतव्यंग्य यांचा संकर झाल्याचे) दिसत आहे, त्या अर्थी,[९] असा आशय. 'पण काय हो, व्यंग्यार्थ हा (एकाच श्लोकात) प्रधान आणि गुणीभूत दोन्ही असणे हे तर्कविसंगत नव्हे काय? ती विसंगति दिसत असतानाही केवळ वृत्तीत सांगितले आहे म्हणून या उदाहरणात व्यंग्यार्थ हा (एकाच श्लोकात) प्रधान व गुणीभूत आहे या म्हणण्यावर विश्वास ठेवणे शक्य नाही' अशी प्रतिपक्ष्याची शंका कल्पून दोन्ही प्रकारच्या व्यंग्यार्थाचे (आश्रय असलेले) व्यंजक निराळे[१०] आहेत म्हणून त्यांच्यामध्ये विरोध नाही हे वृत्तिकार 'आणि म्हणूनच' इ. शब्दांनी सांगतात. 'स्वतःच्या'— ध्वनीच्या स्वतःच्याच प्रभेदांच्या आपापसातील संकराची जी उदाहरणे (पूर्वी) दिली, त्यांचा वृत्तिकार या वाक्यामध्ये 'दृष्टान्त' म्हणून उपयोग करीत आहेत. त्याच दृष्टान्ताचे विवरण वृत्तिकार 'कारण जसा' इ. वाक्याने करितात. या वाक्यानंतर 'तसेच याही बाबतीत आहे' हे शब्द अध्याहृत घेऊन वाक्य पुरे करावे. किंवा येथे यथा हि याऐवजी तथा हि असा पाठ घ्यावा.[११]

'पण काय हो,' संकराच्या पहिल्या दोन (म्हणजे अनुग्राह्यअनुग्राहकसंबंधमूलक व संदेहरूप या) प्रकारांच्या बाबतीत (ध्वनीचे आणि गुणीभूतव्यंग्याचे) व्यंजक वेगळे असल्यामुळे त्यांमधील विरोधाचा परिहार (तुम्ही म्हटल्याप्रमाणे) होत असला तर होऊ द्या, पण ज्यावेळी (ध्वनीचा आणि गुणीभूतव्यंग्याचा आश्रय असलेला) व्यंजक एकच असतो– म्हणजे एकाच व्यंजकात प्रविष्ट होणे या प्रकारचा संकर ज्यावेळी होतो, त्यावेळी विरोधाचा परिहार होतो किंवा नाही याबद्दल तुम्ही काय म्हणाल?' अशी शंका कल्पून वृत्तिकार विरोधाचा परिहार कसा होतो याचे खरेखुरे (म्हणजे अधिक चांगले) कारण 'आणि व्यंग्यार्थ एकच असला, तर' इ. वाक्याने सांगतात. 'त्यामुळेसुद्धा–' ज्या अर्थी एक व्यंग्यार्थ गुणीभूत आहे आणि दुसरा मुख्य आहे, त्याअर्थी त्या दोन व्यंग्यार्थामध्ये विरोध कसा असणार? 'पण काय हो, संकर व संसृष्टि हे प्रकार आम्ही वाच्य अलंकारांच्या बाबतीत ऐकले आहेत, पण व्यंग्य अर्थांच्या बाबतीत ऐकले नाहीत!' अशी शंका कल्पून वृत्तिकार 'आणि काव्याचे' इ. वाक्याने तिचे समाधान करितात. 'असे मानावे–' मानावे म्हणजे विचार करून येणाऱ्या अनुभवाच्या आधारे ते प्रकार होऊ शकतात याबद्दल खात्री करून घ्यावी; कारण दोन्ही (म्हणजे वाच्य अलंकार व व्यंग्य अर्थ यांच्या) बाबतीत (मननपूर्वक आलेला) अनुभव हेच निर्णायक प्रमाण होय, असा अर्थ. याप्रमाणे ध्वनीच्या गुणीभूतव्यंग्याशी होणाऱ्या संकराच्या तीन प्रकारांची उदाहरणे दिल्यावर[१२] वृत्तिकार संसृष्टीचे उदाहरण 'पण जेथे' इ. वाक्याने देतात. 'काही... (आणि दुसरी काही)' या शब्दांनी वृत्तिकार 'संकरा'चा संभव बाजूला करितात. 'सोबती' या शब्दात आणि 'साक्षीदार' या शब्दात अविवक्षितवाच्य 'ध्वनि' आहे. 'त्या' (पल्लवांचा) या शब्दाने (पल्लवांच्या) असामान्य गुणांचा समुदाय सूचित होत असला, तरी तो व्यंग्यार्थ प्रस्तुत श्लोकातील वाच्यार्थाला गुणीभूत झालेला आहे, कारण येथील वाच्य अर्थ जो 'स्मरण'[१३] तोच या ठिकाणी सौंदर्याला मुख्यत्वेकरून कारणीभूत होतो. 'मला वाटते' हे शब्द कल्पना केले जाणारे, पल्लवांचे असंख्य धर्म सुचवीत असले[१४] तरी ते व्यंग्य धर्म 'उत्प्रेक्षा' या वाच्यार्थालाच प्राधान्य देत आहेत (म्हणजे त्याचे सौंदर्य खुलवीत आहेत). अशा रीतीने ध्वनीच्या गुणीभूतव्यंग्याशी होणाऱ्या चारही प्रकारांची उदाहरणे देऊन झाली.

आता ध्वनीच्या (वाच्य) अलंकारांशी होणाऱ्या मिश्रणाची उदाहरणे वृत्तिकार 'वाच्य अलंकारांचा' इ. शब्दांनी देतात. मात्र अलंकार जर व्यंग्य असतील, तर त्यांच्याशी होणाऱ्या मिश्रणाच्या प्रकारांचा[१५] अंतर्भाव आतापर्यंत सांगितलेल्या आठ प्रकारांतच होईल[१५]*, अशा अभिप्रायाने वृत्तिकारांनी 'वाच्य (अलंकारांचा)' हा शब्द योजिला आहे. 'काव्यांमध्ये–' कारण काव्य हे अशा प्रकारचेच[१६] असते. 'नेहमीच आढळणारे–' दुसऱ्या उद्द्योतातील १८ व १९ या कारिकांत सांगितलेल्या 'रसादींना प्राधान्य देऊन (अलंकार) योजावेत' इ. नियमांचे विवरण करिताना वृत्तिकारांनी जी उदाहरणे दिली होती, त्यांतही तिन्ही प्रकारचा संकर व संसृष्टि असल्याचे आढळतेच. उदा. 'कोपऱ्यांशी चंचल' ... या उदाहरणात पूर्वी आमच्या विवरणात आम्ही 'रूपकव्यतिरेक हा अलंकार आहे' या मताचा जो निर्देश केला,[१७] त्या मतानुसार असणारा रूपकव्यतिरेक अलंकार शृंगाराला (म्हणजे अभिलाषरति या स्थायिभावाला) अनुग्राहक आहे आणि त्या श्लोकातील स्वभावोक्ति अलंकार व शृंगार (म्हणजे अभिलाषरति) हे श्लोकरूपी एकाच व्यंजकात समाविष्ट झाले आहेत. 'अरे वेड्या, रस्ता सोडून' इ. गाथेमध्ये क्षुद्र व्यक्तीचे स्वभाववर्णन (म्हणजे स्वभावोक्ति अलंकार) आहे किंवा ध्वनि आहे. यांपैकी एक पक्ष स्वीकारावयास संदर्भ वगैरेच्या ज्ञानाच्या अभावी निर्णायक प्रमाण नाही.

जरी अलंकार हा रसाला अवश्य पोषक होत असला, तरी त्याचा वाजवीपेक्षा जास्त विस्तार करण्याची इच्छा बाळगू नये' हे ज्या अभिप्रायाने सांगितले,[१९] त्या दृष्टीने तशा उदाहरणात अनुग्राह्य–

अनुग्राहकभावसंकार असंभवनीय[२०] असल्यामुळे तेथील रसध्वनीची अलंकाराशी संसृष्टिच असते. उदा. 'बाहुलतांच्या पाशात करकचून बांधले' या श्लोकात.

टीपा

१) पाहा, द्वितीय खंड "उद्‌द्योत – ३ 'अलक्ष्यक्रम' ध्वनी हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादि अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे न्यक्कारो ह्यमेव इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण'".

२) वेणीसंहार, अंक ५, २६.

३) पाहा प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'रसवदलंकाराबाबत पूर्वपक्षाचे खंडन'".

४) अचेतन लतागृहे ही वाच्यार्थाने 'सोबती' आणि 'साक्षीदार' कशी असणार? म्हणून त्या पदांच्या वाच्यार्थांचा बाध होऊन व त्यांचा पूर्णपणे त्याग केला जाऊन लक्षणेने 'प्रणयक्रीडेला सहायक' आणि 'एकांताच्या वेळी जवळ असलेले' या अर्थांचा स्वीकार करावा लागतो. मग त्या लक्षणेचे प्रयोजन म्हणून 'प्रणयक्रीडेला **अत्यंत** उपकारक' व 'एकांताच्या वेळी **अतिशय** जवळ असलेले' असे अर्थ सुचवले जातात. वाच्यार्थाचा पूर्णपणे त्याग केला जाऊन व्यंग्यार्थ सुचवला जातो, म्हणून ही उदाहरणे 'अविवक्षितवाच्य' ध्वनीची म्हटली आहेत.

५) 'त्यांचा' आणि 'मला वाटते' या पदांचे वाच्यार्थ अनुक्रमे 'मी अनुभवलेले' व 'मी ज्यांची कल्पना करू शकतो असे' हे आहेत. त्यांतून अनुक्रमे हिरवेपणा, टवटवीतपणा, शीतलपणा, इ. मला चांगले आठवत असलेले धर्म आणि पिवळेपणा, शुष्कता इ. धर्म, हे व्यंग्यार्थ सूचित होतात व त्या व्यंग्यार्थामुळे वाच्यार्थ भूषविला जात असल्याने त्या वाच्यार्थाला हे व्यंग्यार्थ गुणीभूत आहेत. वाच्यार्थाचा पूर्णपणे त्याग केला जाऊन व्यंग्यार्थ वस्तुतः पिवळेपणा, शुष्कता इ. धर्म **जाने** (मला वाटते) या पदातून सूचित होत नसून 'ते' या पदातून सूचित होत आहेत. पाहा, यानंतरचीच टीप १४ वी.

६) या दोन्ही उदाहरणांपैकी प्रत्येकात एकाच पद्यातून गुणीभूत व्यंग्यार्थ व प्रधानभूत रौद्ररस प्रकट होत असल्याने ही दोन्ही उदाहरणे एकव्यंजकानुप्रवेश या प्रकारच्या संकराची होतील. शिवाय पहिल्या म्हणजे 'मला शत्रु असावेत' इ. श्लोकात अनुग्राह्य– अनुग्राहकसंबंधमूलक संकर आहे, तर 'द्यूतामधील कपटी डावपेच' यामध्ये संदेहसंकर आहे. येथे संदेहसंकर कसा हे अभिनवगुप्तांनी पुढच्याच परिच्छेदात स्पष्ट केले आहे.

७) डॉ. रामसागर त्रिपाठी यांनी ध्वन्यालोकाच्या आपल्या हिन्दी आवृत्तीमध्ये खंड २, पृ. १२५६ व १२५७ वर २ ऱ्या श्लोकातील प्रत्येक ठिकाणी संभवणारे अवांतर व्यंग्यार्थ स्पष्ट करून दाखविले आहेत, ते जिज्ञासूंनी पाहावे.

८) त्या उद्दीपन विभावाच्या द्वारे क्रोध या स्थायिभावाची अभिव्यक्ति होऊन त्याचे पर्यवसान शेवटी रौद्ररसात होते.

९) त्याअर्थी इतर उदाहरणातही असा संकर असण्यामध्ये काहीही विरोध नाही, हा भावार्थ.

१०) म्हणजे गुणीभूतव्यंग्यार्थाचे व्यंजक सुटे शब्द हे आहेत व प्रधान रौद्ररसाचे व्यंजक सबंध वाक्य हे आहे. आश्रयभेदामुळे विरोध येत नाही हा विचार पूर्वी प्रथमखंड, "उद्‌द्योत – २ 'अलंकारध्वनीची उदाहरणे'" वर येऊन गेला आहे.

११) **तथा हि** (कारण) असा पाठ घेतल्यास वृत्तीतल्या वाक्यामधील 'जसे' हा शब्द जाईल व 'तसेच' इ. म्हणण्याची जरूर राहणार नाही व 'जसे 'याशिवाय जे वाक्य राहील, ते स्वयंपूर्ण होईल.

१२) गुणीभूतव्यंग्याचा ध्वनीशी संकर होण्याची दोन उदाहरणे वृत्तिकारांनी 'मला शत्रु असावेत' व 'द्यूतामधील कपटी डावपेच' ही दिली आहेत. त्या दोनांपैकी पहिल्या श्लोकात अंगागिभावसंकर आहे व संकराचे उरलेले दोन प्रकार 'द्यूतामधील कपटी डावपेच' या श्लोकात आहेत हे अभिनवगुप्तांनी नुकतेच दाखविले आहे. म्हणूनच 'तिन्ही प्रकारांची उदाहरणे देऊन झाल्यावर' असे अभिनवगुप्त म्हणतात.

१३) या सबंध श्लोकात 'स्मरण' या अर्थाचा एकही 'वाचक' शब्द नाही. 'त्या' (पल्लवांचा) या शब्दाने स्मरण या अर्थाचा बोध होतो, पण तो बोध व्यंजनेने होतो. (पाहा द्वितीय खंड " उद्‌द्योत – ३ 'त्याच प्रकारच्या ध्वनीला पद व पदाचा अंशही प्रकट करू शकतात याची उदाहरणे' व 'अलक्ष्यक्रम' ध्वनि हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादि अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे न्यक्कारो ह्यमेव इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण"). तेव्हा 'वाच्य अर्थ जो स्मरण' हे अभिनवगुप्तांचे म्हणणे चिन्त्य आहे.

१४) येथेही पल्लवांचे पूर्वीचे असंख्य धर्म हे **जाने** (मला वाटते) या शब्दाने सूचित होत नसून '**ते**' या शब्दाने सूचित होत आहेत.

१५) व्यंग्य अलंकारांचा आपापसात होणारा संकर व संसृष्टि यांचा निर्देश अभिनवगुप्तांनी प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'अलंकारध्वनीची उदाहरणे'" वर केला आहे.

१५*) थ्वनीच्या निरनिराळ्या प्रकारांचे आपापसात मिश्रण होण्याचे चार प्रकार (संकराचे तीन प्रकार व संसृष्टीचा एक), तसेच ध्वनीच्या प्रकाराचे गुणीभूत व्यग्यांशी होणाऱ्या मिश्रणाचे चार प्रकार (संकराचे तीन व संसृष्टीचा एक). रसध्वनीच्या बाबतीत या आठही प्रकारांची उदाहरणे देऊन झाली आहेत. अलंकार व्यंग्य असल्यास त्यांच्या मिश्रणाचे वरील प्रमाणेच आठ प्रकार होतील.

१६) अशा प्रकारचेच म्हणजे रसाने निर्भर व अलंकारांनी युक्त असलेलेच. तुलनार्थ पाहा, प्रथम खंड "उद्‌द्योत -१ 'रस' प्रकार स्वप्नातही 'वाच्य' नसतो" व "प्रतीयमान अर्थाच्या प्रकारांत 'रसादि' प्रकार मुख्य होय".

१७) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'ती दक्षता म्हणजे १) अलंकार रसादीचे अंगच राहिला पाहिजे,".

१८) ही गाथा 'मुक्तक' या स्वरूपाची असल्यामुळे तिचा निश्चित संदर्भ माहीत नाही असे अभिनवगुप्त म्हणतात. अशा झाडाला खरोखरच कुंपण घालीत बसणाऱ्या एखाद्या अडाणी माणसालाच उद्देशून ही गाथा

असली, तर येथे स्वभावोक्ति अलंकार होईल, आणि आपल्या रूपगुणहीन पत्नीला सांभाळणाऱ्या मत्सरी पतीला उद्देशून ही उक्ति आहे असे मानिल्यास तेथे वस्तुध्वनि समजावा लागेल. द्वितीय खंड, उद्द्योत -३ प्राधान्याने रसादिकांचीच प्रतिति होत असेल, तर ते ध्वनिकाव्यच होते वर उद्धृत केलेल्या 'या तनुगात्रीचे रूप'... इ. श्लोकाबाबतही संदर्भ वगैरेंच्या ज्ञानाच्या अभावी तेथे व्याजस्तुति व अप्रस्तुतप्रशंसा या दोन वाच्य अलंकारांचा संदेहसंकर आहे असे म्हणणे शक्य आहे. मग तेथे अप्रस्तुतप्रशंसाच आहे असे वृत्तिकारांनी व अभिनवगुप्तांनी का म्हणावे हे समजत नाही. हा श्लोक धर्मकीर्तीने रचला असल्यामुळे केवळ त्याचा स्वभाव लक्षात घेता तो एकच सदर्भ गृहीत धरून तेथे अप्रस्तुतप्रशंसाच आहे तर्क या दोघांनी केला असावा.

१९) उद्द्योत २, कारिका १८ मध्ये.

२०) प्रथम खंड, "उद्द्योत - २ 'ती दक्षता म्हणजे - ४) रसपरिपोषाला विघ्न करणारा अलंकाराचा अतिविस्तार टाळावा'" वर 'प्रियेने रागावून' इ. श्लोक आला आहे. त्यावर वृत्तिकारांनी **अत्र रूपकम्** (आक्षिप्तमनिर्व्यूढं च) **परं रसपरिपुष्टये** । असे म्हटले आहे. तेव्हा अर्धोन्मीलित स्वरूपात असलेले ते रूपक रसध्वनीचे अनुग्राहक आहे की नाही? अनुग्राहक असल्यास 'येथे संकर असंभवनीय आहे' असे अभिनवगुप्तांनी का म्हणावे?

ध्वन्यालोकः

प्रभेदान्तराणामपि कदाचित्सङ्कीर्णत्वं भवत्येव । यथा ममैव—

या व्यापारवती रसान् रसयितुं काचित्कवीनां नवा
दृष्टिर्या परिनिष्ठितार्थविषयोन्मेषा च वैपश्चिती ।

ते द्वे अप्यवलम्ब्य विश्वमनिशं निर्वर्णयन्तो वयं
श्रान्ता नैव च लब्धमब्धिशयन त्वद्भक्तितुल्यं सुखम् ॥

इत्यत्र विरोधालङ्कारेणार्थान्तरसङ्क्रमितवाच्यस्य ध्वनिप्रभेदस्य सङ्कीर्णत्वम् ।

वाच्यालङ्कारसंसृष्टत्वं च पदापेक्षयैव । यत्र हि कानिचित् । पदानि वाच्यालङ्कारभाञ्जि कानिचिच्च ध्वनिप्रभेदयुक्तानि ।

यथा—

दीर्घीकुर्वन् पटु मदकलं कूजितं सारसानां
प्रत्यूषेषु स्फुटितकमलामोदमैत्रीकषायः ।

यत्र स्त्रीणां हरति सुरतग्लानिमूङ्गानुकूलः,
सिप्रावातः प्रियतम इव प्रार्थनाचाटुकारः ॥

अत्र हि मैत्रीपदमाविवक्षितवाच्यो ध्वनिः । पदान्तरेष्वलङ्कारान्तराणि ॥

ध्वन्यालोक

इतर (म्हणजे संलक्ष्यक्रमव्यंग्य) प्रकारांचाही वाच्यालंकाराशी केव्हा केव्हा संकर होतोच. उदा. माझाच पुढील श्लोक–

'कवींची जी आश्चर्यकारक[१] अवर्णनीय दृष्टि (रसिकांना) रसांचा आस्वाद मिळवून देण्याचा प्रयत्न करिते आणि शास्त्रवेत्त्यांची जी दृष्टि पदार्थांच्या वास्तव स्वरूपावर स्थिर प्रकाश टाकणारी असते, त्या दोन्ही दृष्टींचा उपयोग करून आम्ही संपूर्ण विश्वाचे अविश्रांतपणे यथार्थ वर्णन करिता करिता दमलो, पण हे क्षीरसमुद्रावर (योग) निद्रा घेणाऱ्या विष्णो! तुझ्या भक्तीतील सुखासारखे सुख आम्हाला कोठे मिळाले नाही.'

या उदाहरणात 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य[२]' या ध्वनिप्रकाराचा विरोधालंकाराशी[३] संकर झाला आहे.

ध्वनीची वाच्य अलंकाराशी 'संसृष्टि' होणे हे पदांमध्येच शक्य होते. ज्या उदाहरणात काही पदांमध्ये वाच्यालंकार असतो, तर काही पदांत ध्वनीचा एखादा प्रकार असतो. (तेथे वेगवेगळ्या पदांमध्येच ध्वनीची वाच्य अलंकाराशी संसृष्टि असू शकते.)

उदा.– 'ज्या ठिकाणी हर्षाने धुंद झाल्यामुळे मधुर असणारे सारसपक्ष्यांचे कूजित हळुवारपणे दूरवर पसरविणारा, दररोज पहाटेच्या वेळी फुललेल्या (सूर्यविकासी) कमळांच्या सुगंधाशी मैत्री केल्यामुळे सुवासिक झालेला, सिप्रा नदीवरून वाहात येणारा वारा, स्त्रियांच्या शरीराला कुरवाळून अधिक समागमसुखाच्या प्रार्थनेसह गोडीगुलाबी करणाऱ्या प्रियकराप्रमाणे त्या स्त्रियांना आधीच्या प्रणयक्रीडेमुळे आलेली ग्लानि दूर करितो.[४]' कारण या उदाहरणातील 'मैत्री[५] ' हा शब्द 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे उदाहरण आहे, आणि इतर पदांमध्ये निरनिराळे अलंकार आहेत.

लोचनम्

<u>प्रभेदान्तराणामपीति</u> । रसादिध्वनिव्यतिरिक्तानाम् । <u>व्यापारवतीति ।</u> निष्पादनप्राणो हि रस इत्युक्तम् । तत्र विभावादियोजनात्मिका वर्णना, ततःप्रभृति घटनापर्यन्ता क्रिया व्यापारः, तेन सततयुक्ता । <u>रसानिति ।</u> रस्यमानतासारान् स्थायिभावान् रसयितुं रस्यमानतापत्तियोग्यान् कर्तुम् । काचिदिति लोकवार्तापतितबोधावस्थात्यागेनोन्मीलन्ती । अत एव ते कवयः, वर्णनायोगात् तेषाम् । नवेति । क्षणे क्षणे नूतनैर्नूत नैवैचित्र्येर्जगन्त्यासूत्रयन्ती । दृष्टिरिति प्रतिभारूपा । तत्र दृष्टिश्चाक्षुषं ज्ञानं षाडवादि रसयतीति विरोधालङ्कारः । अत एव नवा । तदनुगृहीतश्च ध्वनिः । तथा हि चाक्षुषं ज्ञानं नाविवक्षितमत्यन्तमसम्भवाभावात् । न चान्यपरम्, अपि त्वर्थान्तरे ऐन्द्रियकविज्ञानाभ्यासोल्लसिते प्रतिभानलक्षणेऽर्थे सङ्क्रान्तम् । सङ्क्रमणे च विरोधोऽनुग्राहक एव । तद्वक्ष्यति 'विरोधालङ्कारेण' इत्यादिना । या चैवंविधा दृष्टिः परिनिष्ठितोऽचलः अर्थविषये निश्चेतव्ये विषये उन्मेषो यस्याः । तथा परिनिष्ठिते लोकप्रसिद्धेऽर्थे न तु कविवदपूर्वस्मिन्नर्थे उन्मेषो यस्याः सा । विपश्चितामियं वैपश्चिती । ते अवलम्ब्येति, कवीनामिति, वैपश्चितीति वचनेन नाहं कविर्नं पण्डित इत्यात्मनोऽनौद्धत्यं ध्वन्यते ।

अनात्मीयमपि दरिद्रगृह इवोपकरणतयाऽन्यत आहृतमेतन्मया दृष्टिद्वयमित्यर्थः । ते द्वे अपीति । न ह्येकया दृष्ट्या सम्यङ् निर्वर्णनं निर्वहति । विश्वमित्यशेषम् । अनिशमिति पुनः पुनरनवरतम् । निर्वर्णयन्तो वर्णनया, तथा निश्चितार्थं वर्णयन्तः इदमित्थमिति । परामर्शानुमानादिना निर्भज्य निर्वर्णनं किमत्र सारं स्यादिति तिलशस्तिलशो विचयनम् । यद्य निर्वर्ण्यते तत्खलु मध्ये व्यापार्यमाणया मध्ये चार्थविशेषेषु निश्चितोन्मेषया निश्चलया दृष्ट्या सम्यङ्निर्वर्णितं भवति । वयमिति । मिथ्यातत्त्वदृष्ट्याहरणव्यसनिन इत्यर्थः । श्रान्ता इति । न केवलं सारं न लब्धं यावत्प्रत्युत खेदः प्राप्त इति भावः । चशब्दस्तुशब्वस्यार्थे । अब्धिशयनेति । योगनिद्रया । त्वमत एव सारस्वरूपवेदी स्वरूपावस्थित इत्यर्थः । श्रान्तस्य शयनस्थितं प्रति बहुमानो भवति । त्वद्भक्तीति । त्वमेव परमात्मस्वरूपो विश्वसारस्तस्य भक्तिः श्रद्धादिपूर्वक उपासनाक्रर्मजस्तदावेशस्तेन तुल्यमपि न लब्धमास्तां तावत्तज्ञातीयम् ।

एवं प्रथममेव परमेश्वरभक्तिभाजः कुतूहलमात्रावलम्बितकविप्रामाणिकोभयवृत्तेः पुनरपि परमेश्वरभक्तिविश्रान्तिरेव युक्तेति मन्वानस्येयमुक्तिः । सकलप्रमाणपरिनिश्चितदृष्टादृष्टविषयविशेषजं यत्सुखं, यदपि वा लोकोत्तरं रसचर्वणात्मकं, तत उभयतोऽपि परमेश्वरविश्रान्त्यानन्दः प्रकृष्यते, तदानन्दविप्रुण्मात्रावभासो हि रसास्वाद इत्युक्तं प्रागस्माभिः । लौकिकं तु सुखं ततोऽपि निकृष्टप्रायं बहुतरदुःखानुषङ्गादिति तात्पर्यम् । तत्रैव दृष्टिशब्दापेक्षयैकपदानुप्रवेशः । दृष्टिमवलम्ब्य निर्वर्णनमिति विरोधालङकारो वाश्रीयताम् अन्धपदन्यायेन दृष्टिशब्दोऽ त्यन्ततिरस्कृतवाच्यो वास्तु इत्येकतरनिश्चये नास्ति प्रमाणम्, प्रकारद्वयेनापि ह्रद्यत्वात् । न च पूर्वत्रापि एवं वाच्यम् : नवाशब्देन शब्दशक्त्यनुरणनतया विरोधस्य सर्वथावलम्बनात् ।

एवं सङ्करं त्रिविधमुदाहृत्य संसृष्टिमुदाहरति वाच्येति । सकलवाक्ये हि यद्यलङ्कारोऽपि व्यङ्ग्यार्थोऽपि प्रधानं तदानुग्राह्यानुग्राहकत्वसङ्करस्तदभावे त्वसङ्गतिरित्यलङ्कारेण वा ध्वनिना वा, पर्यायेण द्वाभ्यामपि वा युगपत्पदविश्रान्ताभ्यां भाव्यमिति त्रयो भेदाः । एतद्गर्भीकृत्य सावधारणमाह- पदापेक्षयैवेति । यत्रानुग्राह्यानुग्राहकभावं प्रत्याशङ्कापि नावतरति तं तृतीयमेव प्रकारमुदाहर्तुमुपक्रमते— यत्र होति । यस्माद्यत्र कानिचिदलङ्कारभाञ्जि कानिचिद्ध्वनियुक्तानि, यथा दीर्घीकुर्वन्नित्यत्रेति । तथाविधपदापेक्षयैव वाच्यालङ्कारसंसृष्टत्वमित्यावृत्त्या पर्वग्रन्थेन सम्बन्धः कर्तव्यः । अत्र हीति । अत्रत्यो हिशब्दो मैत्रीपदमित्यस्यानन्तरं योज्य इति ग्रन्थसङ्गतिः ।

दीर्घीकुर्वन्निति । सिप्रावातेन हि दूरमप्यसौ शब्दो नीयते, तथा सुकुमारपवनस्पर्शजातहर्षाः चिरं कूजन्ति, तत्कूजितं च वातान्दोलितसिप्रातरङ्गजमधुरशब्दमिश्रं भवतीति दीर्घत्वम् । पट्विति । तथासौ सुकुमारो वायुर्येन तज्ञः शब्दः सारसकूजितमपि नाभिभवति प्रत्युत तत्सब्रह्मचारी तदेव दीपयति । न च दीपनं तदीयमनुपयोगि यतस्तन्मदेन कलं मधुरमाकर्णनीयम् । प्रत्यूषेष्विति । प्रभातस्य तथाविधसेवावसरत्वम् । बहुवचनं सदैव तत्रैषा ह्रद्यतेति निरूपयति । स्फुटितान्यन्तर्वर्तमानमकरन्दभरेण । तथा स्फुटितानि विकसितानि नयनहारीणि यानि कमलानि तेषां य आमोदस्तेन या मैत्री अभ्यासङ्गावियोगपरस्परानुकूल्यलाभस्तेन कषाय उपरक्तो, मकरन्देन च कषायवर्णीकृतः । स्त्रीणामिति । सर्वस्य तथाविधस्य त्रैलोक्यसारभूतस्य य एवं करोति सुरतकृतां ग्लानिं तान्तिं हरति, अथ च तद्विषयां ग्लानिं पुनः सम्भोगाभिलाषोद्दीपनेन हरति । न च प्रसह्य प्रभूततया । अपि त्वङ्गानुकूलो ह्रद्यस्पर्शः ह्रदयान्तर्भूतश्च । प्रियतमे तद्विषये प्रार्थनार्थं चाटूनि कारयति । प्रियतमोऽपि तत्पवनस्पर्शप्रबुद्धसम्भोगाभिलाषः प्रार्थनार्थं चाटूनि करोतीति तेन तथा कार्यत इति परस्परानुरागप्राणशृङ्गारसर्वस्वभूतोऽसौ पवनः । युक्तं चैतत्तस्य, यतः सिप्रापरिचितोऽसौ वात इति

नागरिको न त्वविदग्धो ग्राम्यप्राय इत्यर्थः । प्रियतमोऽपि रतान्तेऽङ्गानुकूलः संवाहनादिना प्रार्थनार्थं चाटुकार एवमेव सुरतग्लानिं हरति । कूजितं चानङ्गीकरणवचनादिमधुरध्वनितं दीर्घीकरोति । चाटुकरणावसरे च स्फुटितं विकसितं यत्कमलकान्तिधारि वदनं तस्य यामोदमैत्री सहजसौरभपरिचयस्तेन कषाय उपरक्तो भवति । अङ्गेषु चातुष्षष्टिकप्रयोगेष्वनुकूलः । एवं शब्दरूपगन्धस्पर्शा यत्र ह्रद्या यत्र च पवनोऽपि तथा नागरिकः स तवावक्ष्यमभिगन्तव्यो देश इति मेधदूते मेघं प्रति कामिन इयमुक्तिः । उदाहरणे लक्षणं योजयति– मैत्रीपदमिति । हिशब्दोऽनन्तरं पठितव्य इत्युक्तमेव । अलङ्कारान्तराणीति । उत्प्रेक्षा स्वभावोक्षितरूपकोपमाः क्रमेणेत्यर्थः ।

लोचन

'इतर प्रकारांचा' म्हणजे रसादिध्वनीखेरीज इतर (म्हणजे संलक्ष्यक्रमव्यंग्य) प्रकारांचा. 'प्रयत्न करिते–' कारण रसिकांना रसाचा आस्वाद मिळवून देणे हेच रसाचे खरे स्वरूप होय' असे आम्ही मागे[६] म्हटले आहे. त्वा संबंधात विभावादिकांचे योग्य असे प्रकटीकरण हेच काव्यातील वर्णनाचे स्वरूप होय आणि तेथपासून[७] गुणांचा उचित असा वापर करण्यापर्यंतचा जो प्रयत्न, तो म्हणजे 'व्यापार', त्या व्यापाराने सतत[८] युक्त असलेली (दृष्टि). 'रसांचा–' आस्वादिले जाणे हेच ज्यांचे सारसर्वस्व आहे अशा स्थायिभावांचा आस्वाद मिळवून देण्यास म्हणजे त्या स्थायिभावांना रसावस्थेस पोहोचण्याचे सामर्थ प्राप्त करून देण्यास. 'अवर्णनीय–' म्हणजे लौकिक व्यवहारातील घडामोडींचे वास्तव ज्ञान बाजूला सारून[९] जी विकास पावत जाते, अशी. म्हणूनच म्हणजे अशा वर्णनाचे सामर्थ्य त्यांच्या अंगी असते, म्हणूनच ज्यांना 'कवि[१०]' म्हणावयाचे, त्या कवीची. 'आश्चर्यकारक' म्हणजे दरक्षणी जगाच्या स्वरूपाला नवनवीन सौंदर्याने नटविणारी.[११] 'दृष्टि'– म्हणजे प्रतिभा या स्वरूपाची. आता दृष्टि म्हणजे चक्षुरिन्द्रियाने मिळणारे ज्ञान. ते ज्ञान (रसांची म्हणजे) षाडव[१२] वगैरे पेयांची गोडी चाखावयास साहाय्य करिते असे म्हणण्यात विरोधालंकार असल्यामुळेच त्या दृष्टीला 'आश्चर्यकारक' म्हटले आहे.[१३] आणि त्या विरोधालंकाराने 'दृष्टि' या शब्दातील (अर्थान्तरसंक्रमितवाच्य) ध्वनि उपकृत झाला आहे;[१४] कारण दृष्टि या शब्दाचा 'चक्षुरिन्द्रियाने होणारे ज्ञान' हा वाच्य अर्थ येथे सर्वस्वी असंभनीय नसल्याने[१५] विवक्षित नाही असे नाही (म्हणजे विवक्षित आहे). तसेच तो वाच्यार्थ 'अन्य-पर' सुद्धा नाही;[१६] तर तो वाच्यार्थ इंद्रियांच्या द्वारे होणारे ज्ञान आणि काव्य करण्याचा सराव यांमुळे जागृत होणाऱ्या 'प्रतिभा' या स्वरूपाच्या दुसऱ्या अर्थामध्ये संक्रमित म्हणजे रूपांतरित झाला आहे. आणि या संक्रमणाला विरोधालंकार उपकारकच[१७] आहे. तेच वृत्तिकार (लवकरच) 'विरोधालंकाराशी' इ. शब्दांनी सांगणार आहेत.[१८]

आणि जी दृष्टि अशा प्रकारची असते की, तिचा प्रकाश, ज्याचे स्वरूप निश्चित करावयाचे त्या पदार्थावर परिनिष्ठितपणे म्हणजे न ढळता, स्थिरपणे पडतो. त्याचप्रमाणे ती दृष्टि पदार्थांच्या परिनिष्ठित म्हणजे लोकप्रसिद्ध स्वरूपावर प्रकाश टाकणारी आहे, पण कवीच्या दृष्टीप्रमाणे पदार्थाच्या कविकल्पित, अपूर्व स्वरूपाचे ज्ञान करून देणारी नसते.[१९] वैपश्चिती म्हणजे विपश्चितांची म्हणजे शास्त्रवेत्त्यांची (दृष्टि). 'त्या (दोन्ही) दृष्टींचा उपयोग करून–' 'कवींची' आणि 'शास्त्रवेत्त्यांची' असे म्हटल्याने मी कवि नाही किंवा शास्त्रवेत्ताही नाही अशा तऱ्हेने लेखकाचा विनय सूचित होत आहे. या दोन्ही दृष्टि मजजवळ नसल्या, तरी एखाद्या दरिद्र्याच्या घरी (प्रसंगविशेषी) साधनसामग्री दुसऱ्याकडून (उसनी) आणण्यात यावी, त्याप्रमाणे त्या दोन दृष्टि मी दुसऱ्याकडून (उसनवारीने माझ्या व्यासंगाचे) साधन म्हणून आणल्या आहेत, असा आशय.

'त्या दोन्ही—' कारण कोणत्याही एका (च) दृष्टीने[२०] यथार्थ, निरीक्षणपूर्वक वर्णन केले जात नाही. 'विश्व' याचा (दुसरा) अर्थ 'संपूर्ण.'[२१] 'अविश्रांतपणे' म्हणजे पुनः पुनः, एकसारखे. 'वर्णन करिता करिता—' (बाह्य जगाचे बारकाईने अवलोकन करून, काव्यमय पद्धतीने) वर्णन करिता करिता. त्याचप्रमाणे 'हे असे आहे' असे निश्चितपणे वर्णन करिता करिता.[२२] विचार, अनुमान वगैरे उपायांच्या आधारे पदार्थांचे विश्लेषण करणे म्हणजे त्यांमध्ये सार काय असेल हे पदार्थांचे तिळाएवढे[२३] भाग पाडुन ते पदार्थ पारखणे आणि कवि एखाद्या विषयाचे जो वर्णन करितो, ते वास्तविक काही वेळा कवीच्या दृष्टीचा उपयोग करून, तर काही वेळा विशिष्ट पदार्थावर निश्चित प्रकाश टाकणाऱ्या स्थिर दृष्टीचा अवलंब करून करितो. यामुळे ते वर्णन उत्तम प्रकारचे होते.[२४] 'आम्ही' म्हणजे मिथ्यादृष्टि व शास्त्रदृष्टि या दोन्ही[२५] मिळविण्याची ओढ असलेले, असा अर्थ. 'दमलो' म्हणजे आम्हाला सारभूत असे तत्त्व मिळाले नाही; इतकेच नव्हे, तर उलट थकवा मात्र आमच्या पदरी पडला, असा आशय. (श्लोकातील शेवटच्या ओळींमधील) **च** हा शब्द 'पण' या अर्थी वापरला आहे. 'हे क्षीरसमुद्रावर निद्रा घेणाऱ्या'— 'योगनिद्रेमध्ये मग्न होऊन.[२६]' म्हणूनच विश्वाचे सार असलेले स्वतःचे रूप जाणणारा, म्हणजे स्वस्वरूपावस्थेत असणारा (म्हणजे ब्रह्माशी एकरूप झालेला), असा अर्थ. दमल्याभागल्या माणसाला शयन करणाऱ्या व्यक्तीबद्दल विशेष आदर (म्हणजे हेवा) वाटतो. 'तुझ्या भक्तीतील—' परमात्म्याचे जे स्वरूप, तेच तुझेही स्वरूप आहे आणि तूच विश्वाचे सार आहेस. त्या तुझी भक्ति म्हणजे श्रद्धावगैरेपूर्वक उपासनेचा[२७] विधि करून त्यामुळे भक्ताची उपास्य देवतेशी होणारी एकरूपता. त्या भक्तीच्या सुखाशी साम्य असलेलेही सुख आम्हास मिळाले नाही, तर मग प्रत्यक्ष त्याच प्रकारचे[२८] सुख मिळणे तर दूरच राहू द्या.

याप्रमाणे प्रारंभापासूनच[२९] परमेश्वराची भक्ति करणारा व मग केवळ जिज्ञासेच्या पोटी कवि आणि प्रमाणांनी परीक्षा करणारा शास्त्रवेत्ता, या दोघांच्या मनोवृत्तीचा आश्रय करणाऱ्या व शेवटी पुनः परमेश्वर-भक्तीतच स्थिर होणे योग्य होय अशा मताला आलेल्या माणसाने हा श्लोक म्हटला आहे.[३०] सर्व प्रमाणांच्या आधारे जगातील दृष्ट व अदृष्ट विषयांच्या स्वरूपाचे निश्चित ज्ञान मिळविल्याने प्राप्त होणारे जे सुख, किंवा काव्यातील रसाचा आस्वाद घेणे या स्वरूपाचे जे अलौकिक सुख, त्या दोहोंहूनही भक्तीमुळे परमेश्वराशी एकरूप होण्याचा आनंद श्रेष्ठ होय, कारण रसास्वाद हा त्या आनंदाचा (म्हणजे भक्तीमुळे होणाऱ्या सुखाचा) केवळ एका बिंदूइतकाच आहे, असे आम्ही पूर्वी[३१] म्हटले आहे. पण व्यावहारिक सुख मात्र त्या रसास्वादाहूनही अगदी हलक्या प्रतीचे असते, कारण ते (व्यावहारिक) सुख आपल्यामागोमाग पुष्कळ दुःखे घेऊन येत असते, हे तात्पर्य. तेथेच (म्हणजे 'कवींची जी दृष्टि' या श्लोकात) 'दृष्टि' या शब्दामध्ये (विरोधालंकार व अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनि यांचा) 'एकपदानुप्रवेश' या प्रकाराचा[३२] संकर झालेला आहे. 'दृष्टींचा उपयोग करून वर्णन करणे' यात विरोधालंकार[३३] आहे असे मानावे किंवा 'निःश्वासांनी आंधळ्या' इ. श्लोकातील[३४] 'आंधळा' या शब्दाप्रमाणे 'दृष्टि' या शब्दात अत्यन्ततिरस्कृतवाच्य ध्वनि मानावा. अमुक एकच ध्वनिप्रकार स्वीकारला पाहिजे याला काही प्रमाण नाही, कारण दोन्ही प्रकारांमध्ये सौंदर्य आहे. मात्र पूर्वी म्हणजे 'जी दृष्टि रसांचा आस्वाद मिळवून देते' यातही विरोधालंकार व अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनि यांचा संदेहसंकर आहे असे म्हणू नये, कारण **नवा** (आश्चर्यकारक) या शब्दामुळे शब्दशक्त्यनुरणनरूप पद्धतीने[३५] विरोधाला सर्वस्वी आधार दिला जात आहे.

अशा रीतीने (वाच्यालंकार व ध्वनि यांच्या) तीन प्रकारच्या संकराची उदाहरणे दिल्यावर[३६] (वृत्तिकार) संसृष्टीचे उदाहरण 'ध्वनीची वाच्य अलंकाराशी' इं. शब्दांनी देतात. कारण सर्व वाक्याला जेव्हा वाच्य अलंकार व्यापीत असेल, आणि प्रधान व्यंग्यार्थही (सर्व वाक्याला) व्यापीत असेल, तेव्हा त्या वाक्यात अनुग्राह्य-अनुग्राहक संबंधावर आधारलेला संकर असतो. पण तसे नसल्यास (म्हणजे अलंकार व ध्वनि हे

सर्व श्लोकाला व्यापीत नसल्यास) अनुग्राह्य-अनुग्राहक संबंधावर आधारलेला संकर असू शकत नाही.[३७] म्हणून अशा ठिकाणी म्हणजे जेथे ध्वनि आणि अलंकार यांची क्षेत्रे भिन्न असतील तेथे, (संसृष्टीचे) तीन प्रकार संभवतातः— १) अलंकार हा पदात आणि ध्वनि सर्व वाक्यात असणे २) ध्वनि पदामध्ये आणि अलंकार वाक्यामध्ये असणे आणि ३) ध्वनि व अलंकार दोघेही एकाच वेळी वेगवेगळ्या पदांत असणे. अशा रीतीने संसृष्टीचे तीन प्रकार होऊ शकतील हे मनात ठेवून (वृत्तिकार) '**च**' हे अव्यय वापरून 'पदांमध्येच' असे निश्चितपणे म्हणतात. ज्या उदाहरणात वाच्यालंकार व ध्वनि यांमध्ये अनुग्राह्य-अनुग्राहक संबंध असण्याची शंकाही उत्पन्न होऊ शकत नाही अशा तिसऱ्या प्रकाराचेच उदाहरण द्यावयास वृत्तिकार 'ज्या उदाहरणात' इ. शब्दांनी प्रारंभ करितात. कारण जेथे वाक्यामधील काही पदांतच (वाच्य) अलंकार असतो, उदा. 'ज्या ठिकाणी हर्षाने धुंद' इ. श्लोकात, असा अर्थ. 'ज्या उदाहरणात काही पदांमध्ये वाच्यालंकार असतो, तर काही पदांमध्ये ध्वनीचा एखादा प्रकार असतो' या वृत्तीतील वाक्यांशानंतर 'त्या प्रकारच्या (म्हणजे वेगवेगळ्या पदांमध्ये असल्यामुळेच ध्वनीची वाच्य अलंकारांशी संसृष्टि असू शकते' या वाक्याची पुनरुक्ति करून या वाक्याचा त्या, म्हणजे आधीच्या वाक्याशी संबंध जोडावा. **अत्र हि** ('कारण या उदाहरणात)' यातील **हि** (कारण) हा शब्द **मैत्री** या शब्दानंतर घालावा.[३८] अशा रीतीने वृत्तीतील वाक्यांचा अन्वय करावा.

'दूरवर पसरविणाऱ्या' — कारण सिप्रा नदीवरून वाहात येणाऱ्या वाऱ्यामुळे ते कूजित[३८*] लांबपर्यंतही नेले जाते. तसेच वाऱ्याच्या हळुवार स्पर्शामुळे ते सारसपक्षी आनंदित होऊन पुष्कळ वेळ कूजन करितात आणि ते त्यांचे कूजन वाऱ्याने हलविलेल्या सिप्रा नदीच्या तरंगांच्या गोड खळबळीशी मिश्रित होते, म्हणून त्या कूजनाला दीर्घत्व प्राप्त होते म्हणजे तो आवाज मोठा होतो.[३९] 'हळुवारपणे—' तो वारा इतका कोमल असतो की, त्यामुळे उत्पन्न होणारा आवाज सारसांच्या कूजनालासुद्धा दडपून टाकीत नाहीच, पण उलट तो त्या कूजनासारखाच कोमल असल्याने त्यात मिळून जाऊन त्या कूजनालाच अधिक पुष्ट करितो. आणि त्याने केलेली पुष्टि निरुपयोगी होत नाही, कारण ते कूजित हर्षाच्या धुंदीमुळे (मूळचेच) गोड, श्रवणीय असते.[४०] 'दररोज पहाटेच्या वेळी' — पहाटेची वेळ ही त्या प्रकारच्या सेवेला[४१] योग्य अशी असते. **प्रत्यूषेषु** (दररोज पहाटे) हे बहुवचन त्या वाऱ्याच्या झुळुकीमध्ये अशी रम्यता नेहमीच असते असे सुचवीत आहे. ('फुललेल्या—') फुललेल्या म्हणजे आत असलेल्या मधाच्या दाबामुळे उकललेल्या. तसेच फुललेली म्हणजे उमललेली व म्हणून नेत्रांना आकृष्ट करणारी जी कमळे, त्यांचा जो सुगंध, त्याच्याशी (त्या वाऱ्याची) जी मैत्री म्हणजे अखंड सहवासामुळे एकमेकांच्या उपयोगी पडणे.[४२] त्या मैत्रीने संस्कारित झालेला, तसेच मकरंदामुळे म्हणजे परागांमुळे[४३] पिवळसर रंग चढलेला. 'स्त्रियांच्या—' त्या प्रकारच्या म्हणजे आपल्या मोहकपणामुळे त्रैलोक्याचे सारसर्वस्व असलेल्या सर्व स्त्रियांच्या बाबतीत जो असे करितो, म्हणजे त्यांना प्रणयक्रीडेमुळे आलेली ग्लानि म्हणजे थकवा दूर करितो, तसेच रतिक्रीडेविषयी त्यांना आलेला कंटाळा पुन्हा रतिक्रीडेविषयीचा अभिलाष उद्दीपित करून घालवितो.

आणि वाऱ्याचा स्पर्श हा त्या वाऱ्याने आपल्या ठिकाणी आलेल्या भरगच्चपणामुळे धसमुसळेपणाने केलेला नाही, तर तो वारा (स्त्रियांच्या) शरीराला कुरवाळणारा आहे, म्हणजे त्याचा स्पर्श सुखकर असून हृदयाला भिडणारा आहे. तो वारा प्रियकराला[४४] रतिकीडेविषयी प्रार्थना करण्यासाठी स्त्रियांना त्याच्याशी गोडीगुलाबी करावयास लावीत आहे. प्रियकराच्या मनातही वाऱ्याच्या त्या स्पर्शामुळे रतिक्रीडेविषयीचा अभिलाष जागृत झाला आहे. म्हणून रतिक्रीडासुख मागण्यासाठी तो (प्रियकर) स्त्रियांची खुशामत करितो, म्हणजे तो वारा प्रियकरांना तसे करावयास लावितो. असा तो वारा, परस्परांविषयीचे प्रेम हा ज्याचा प्राण आहे, अशा शृंगाराचे सर्वस्व म्हणजे त्याचे उद्दीपन करणारा आहे आणि त्या वाऱ्याने असे आचरण करणे हे

योग्यच आहे, कारण तो (उज्जयिनी नगरीजवळील सिप्रा नदीशी परिचय असलेला, म्हणून नागरी संस्कृतीत मुरलेला आहे, गांवढळ माणसासारखा अडाणीं नाही, असा आशय. प्रियकरदेखील रतिक्रीडेनंतर प्रेयसीचे अंग हळुवारपणे चेपणे इ. कृति करून तिच्या शरीराला सुखकारक होतो, व रतिक्रीडेचे सुख मागण्यासाठी तिची स्तुति करून अशाच तऱ्हेने (म्हणजे वाऱ्याप्रमाणेच) रतिक्रीडेविषयींचा तिचा कंटाळा दूर करितो. आणि 'कूजित' म्हणजे 'नको, पुरे' अशा तऱ्हेचे तिचे जे गोड बोलणे वगैरे, ते तो वाढवितो (म्हणजे तिला तसे पुनः पुनः म्हणावयास लावितो.) आणि स्तुति करतेवेळी तिचे 'स्फुटित' म्हणजे प्रफुल्लित झालेले जे कमळाची टवटवी धारण करणारे मुख, त्याच्या सुगंधाशी[४५] 'मैत्री' म्हणजे त्याच्या स्वाभाविक सुवासाशी असलेला (त्या वाऱ्याचा व प्रियकराचा) जो परिचय, त्यामुळे तो 'कषाय' म्हणजे प्रभावित[४६] होतो. (**अङ्गानुकूलः** याचा दुसरा, व्यंग्य अर्थ असा–)' अंगांविषयी, म्हणजे रतिक्रीडेच्या चौसष्ट अंगांचा[४७] प्रयोग करण्याविषयी उत्सुक. याप्रमाणे शब्द, रूप, गंध व स्पर्श हे ज्या (उज्जयिनी) नगरीत सुखकर आहेत आणि जेथील वारासुद्धा असा नागरी संस्कृतीचा आहे, त्या नगरीप्रत तू अवश्य जावयास पाहिजेस, असे हे 'मेघदूत' काव्यामध्ये कामपीडित यक्षाचे मेघाला उद्देशून बोलणे आहे. [वाच्य अलंकार व ध्वनि यांच्या संसृष्टीचे मागे, (द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'ध्वनीचे प्रकार गुणीभूतव्यंगाच्या प्रकारांशी किंवा अलंकारांशी मिश्रित होऊन त्यांची संसृष्टि व संकर विचारात घेतल्यास अनंत प्रकार होतात.'") केलेले] लक्षण वृत्तिकार या उदाहरणाचे बाबतीत 'मैत्री हा शब्द' इ वाक्याने लावून दाखवितात. या वाक्यातील **हि** हा शब्द **मैत्रीपदम्** 'यानंतर जोडावा हे आम्ही मागे[४८] सांगितलेच आहे. 'निरनिराळे अलंकार–' म्हणजे क्रमाने उत्प्रेक्षा, स्वभावोक्ति, रूपक आणि उपमा,[४९] असा अर्थ.

टीपा

१) आश्चर्यकारक म्हणजे जगाला प्रतिक्षणी नवीन सौंदर्याने नटविणारी आणि दृष्टि म्हणजे येथे 'प्रतिभा'.

२) 'दृष्टि' या शब्दाचा वाच्यार्थ 'डोळ्यांनी मिळणारे ज्ञान' असा आहे. पण त्या अर्थाचा 'रसांचा आस्वाद मिळवून देणे' या अर्थाशी अन्वय होत नसल्याने 'दृष्टि' या पदाचा 'कविप्रतिभा' असा लक्ष्यार्थ स्वीकारावा लागतो. परंतु चर्मचक्षूंनी जगाचे निरीक्षण केल्यावरच कविप्रतिभा आपले कार्य करू लागत असल्यामुळे वाच्यार्थाचाही लक्ष्यार्थामध्ये अंतर्भाव होतो. म्हणून ही 'उपादान' लक्षणा आहे. 'प्रतिभा' याऐवजी 'दृष्टि' हा शब्द वापरण्यामागे 'प्रतिभेने होणारे ज्ञान डोळ्यांनी होणाऱ्या ज्ञानाइतके सुस्पष्ट असते', हे 'व्यंग्य' प्रयोजन आहे, म्हणून हे 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' ध्वनीचे उदाहरण म्हटले आहे. 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' ध्वनीच्या माहितीसाठी प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य ध्वनीचे दोन उपप्रकार'" मध्ये व त्यातील "(१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार".

३) 'दृष्टि' या शब्दाच्या वाच्यार्थाचा, रसांचा आस्वाद मिळवून देणे याच्याशी विरोध असल्याने येथे विरोधालंकार आहे. 'दृष्टि' या शब्दाचा लक्ष्यार्थ घेतल्यावर त्या विरोधाचा परिहार होतो.

४) मेघदूतम्, पूर्वमेघ, श्लोक ३२. 'ज्या ठिकाणी' म्हणजे उज्जयिनीमध्ये.

५) अचेतन वारा कमलाच्या सुगंधाशी 'मैत्री' करणे शक्य नाही, म्हणून 'मैत्री' शब्दाचा वाच्यार्थ टाकून देऊन 'संयोग' असा लक्ष्यार्थ घ्यावा लागतो 'मैत्री' शब्दाचा लाक्षणिक उपयोगकरण्यामागील प्रयोजन 'कमलांच्या सुगंधाचे वाऱ्यामध्ये संक्रमण विपुल प्रमाणात झाले आहे' असा अर्थ सूचित करणे, हे आहे.

६) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रसप्रतीतीचे स्वरूप अलौकिक असते'" वरील 'आस्वादन हाच ज्याचा प्राण असतो' इ. वाक्य, व "उद्द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वरील 'आणि विशिष्ट प्रकारची प्रतीति म्हणजे आस्वाद होय' हे वाक्य.

७) मूळ लोचनातील ततःप्रभृति या शब्दाचा नेमका कोणता अर्थ घ्यावयाचा ही अडचण आहे. कारण '**प्रभृति**' म्हणजे 'पासून'. तेव्हा विभावादिकांच्या वर्णनापासून 'घटने'पर्यंत असे म्हटल्यास तो क्रम उलटा वाटतो. कारण आधी घटना (म्हणजे गुणांची योजना) व शेवटी त्याचे फलित म्हणजे वर्णन. आधी वर्णन व मग 'घटना' हे कसे जुळावयाचे?

८) **व्यापारवती** यातील वत् प्रत्ययाचा एक अर्थ 'नित्ययोग' असा आहे. त्याला अनुसरून 'व्यापाराने सतत युक्त असलेली' असा अर्थ अभिनवगुप्तांनी केलेला दिसतो.

९) कवीला सृष्टीतील घडामोडींचे प्रतिभेमुळे होणारे ज्ञान हे सामान्य लोकांना होणाऱ्या इन्द्रियार्थ–संनिकर्षजन्य ज्ञानाहन वेगळे असते, म्हणून प्रतिभेला **काचित्** म्हणजे 'लोकोत्तर (दृष्टि)' असे म्हटले आहे.

१०) **कवि** हा शब्द कु (शब्दांनी वर्णन करणे) या धातूला इ हा 'उणादि' प्रत्यय लागून बनला आहे.

११) पाहा, शिशुपालवधम्, ४–१७ या श्लोकाचा **क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः** हा उत्तरार्ध.

१२) 'षाडव' हे एका पेयाचे नाव आहे. षाडव या नावाचा कटु, अम्ल, लवण, मधुर, कषाय व तिक्त या षड्रसांशी संबंध असावा. पाहा, 'संगीतरत्नाकर', अध्याय ७,१३५६ व ५७ यांवरील कल्लिनाथाच्या टीकेमधील पुढील वाक्य–षड्भर्मंधुरादिभिर्निवृत्तः षाडवः ॥

१३) मूळ श्लोकातील '**नवा**' याचे अभिनवगुप्तांनी दोन अर्थ केले– १) जगाला नवनवीन वैचित्र्याने नटविणारी आणि (२) आश्चर्यकारक म्हणजे सामान्य दृष्टीहून विलक्षण.

'दृष्टि' आणि ती 'पेयांची गोडी चाखावयास मदत करणारी' याला अभिनवगुप्तांनी 'विरोधालंकार' म्हटले आहे. वस्तुतः 'दृष्टि' हा शब्द येथे लाक्षणिक आहे. केवळ तेवढ्यामुळे त्यात विरोध हा 'अलंकार' आहे असे म्हटल्यास जेथे जेथे लक्षणा असते, तेथे तेथे वाच्यार्थ बाधित होत असल्यामूळे विरोधालंकार मानावा लागेल. शिवाय **या ब्यापारवती** या श्लोकात **अपि** यासारखा विरोधवाचक शब्द नसल्यामुळे येथील विरोध 'वाच्य' कसा? आणि आनन्दवर्धनांनी तर हे 'वाच्य' विरोधाच्या संकराचे उदाहरण म्हणून दिले आहे.

१४) म्हणून येथे अनुग्राह्य–अनुग्राहक संबधावर आधारलेला संकर आहे.

१५) 'दृष्टि' या शब्दाचा वाच्य अर्थ असंभवनीय नाही, कारण कवीला होणारे 'चाक्षुष ज्ञान' हेही त्याला उपयोगी पडणारे असतेच! मम्मटाने **लोकावेक्षण** हे प्रतिभेला उपकारक आहे असे काव्यप्रकाश १–३ मध्ये म्हटले आहे.

१६) म्हणजे हे विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीचेही उदाहरण नाही.

१७) कारण 'दृष्टि' या शब्दाचा 'चाक्षुषज्ञान' हा वाच्यार्थ बाधित होत नसता, तर येथे लक्षणा मानिता आली नसती व लक्षणा नसली, तर तीवर आधारलेला अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनिही शक्य होणार नाही.

१८) म्हणजे येथे विरोधालंकाराशी अर्थान्तरसंक्रमितवाच्य ध्वनीचा संकर अनुग्राह्य– अनुग्राहक संबंधावर आधारलेला या प्रकारचा आहे, असेच वृत्तिकारांना अभिप्रेत आहे.

१९) हाच विषय पुढे उद्द्योत ४ मध्ये महाभारताच्या संदर्भात शास्त्रनय व काव्यनय यांची चर्चा करिताना येणार आहे.

२०) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वरील लोचनातील 'आणि काव्यामध्ये सुद्धा स्वभावोक्ति व वक्रोक्ति'... इ. वाक्य. तसेच दण्डीच्या काव्यादर्श, २–३६३ मधील **भिन्नं द्विधा स्वभावोक्तिर्वक्रोक्तिश्चेति वाङ्मयम् ।** हेही वाक्य पाहा. तात्पर्य, कवीच्या कल्पनेचा अंश कितीही असला तरी त्याला आधार म्हणून वास्तवाचाही थोडाफार अंश असावा लागतोच!

२१) मूळ श्लोकातील 'विश्व' या शब्दाचे अभिनवगुप्तांनी १) जग व २) संपूर्ण असे दोन अर्थ केले आहेत व 'विश्व' या शब्दाचा 'संपूर्ण जग' हा अर्थ त्यांना अभिप्रेत असावा.

२२) म्हणजे काव्यमय पद्धतीने वर्णन करणे ही झाली कवीची रीत आणि निश्चितपणे वर्णन करणे ही झाली शास्त्रज्ञांची रीत.

२३) 'तिळाएवढे' हा शब्दप्रयोग पूर्वी द्वितीयखंड' "उद्द्योत – ३ 'अलक्ष्यक्रम' ध्वनि हा काही ठिकाणी विभक्तिप्रत्यय, वचन इत्यादि अत्यंत लहान लहान अंशांमुळेही प्रकाशित होतो; याचे **न्यक्कारो ह्ययमेव** इ. सुंदर उदाहरण व त्याचे विवरण" वर लोचनात येऊन गेला आहे.

२४) सारांश, कवीला दोन्ही प्रकारच्या दृष्टि अवलंबाव्या लागतात. पाहा, या आधीची २० ही टीप.

२५) मिथ्यादृष्टि हे येथे कवीच्या दृष्टीबाबत म्हटले आहे व तत्त्वदृष्टि हे शास्त्रज्ञाच्या दृष्टीबाबत म्हटले आहे.

२६) पाहा, रघुवंश, १३–६ मधील **युगान्तोचितयोगनिद्रः** हे विष्णूचे विशेषण.

२७) भागवत पुराणामध्ये नवविधा भक्ति पुढील प्रमाणे वर्णिली आहे–

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

२८) मुळातील **तज्ञातीय** या शब्दातील **जातीय** या प्रत्ययाचा अर्थ 'प्रकार' असा आहे. पाहा, अष्टाध्यायी, ५–३–६९, **प्रकारवचने जातीयर् ।** हे सूत्र सारांश 'तुल्य' म्हणजे दुरून (म्हणजे काही बाबतीतच) साम्य असलेले आणि 'जातीय' म्हणजे अगदी निकटचे (म्हणजे पुष्कळ बाबतीत) साम्य असलेले.

२९) ध्वन्यालोकाच्या प्रारंभीचा मंगलाचरणाचा श्लोक आनंदवर्धनांच्या भक्तीचा द्योतक आहे. प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'आनंदवर्धनकृत ध्वन्यालोक-वृत्तीचे मंगलाचरण'" वरील 'परमेश्वराला...वृत्तिकार स्वतः' इ. लोचनातील वाक्य पाहा. ध्वन्यालोकात अनेक ठिकाणी आनंदवर्धनांनी स्वतः रचलेली विष्णुभक्तिपर पद्ये उदाहरणादाखल दिली आहेत. आनंदवर्धनांचे पहिले म्हणून समजले जाणारे **देवीशतकम्** हेही काव्य देवतास्तुतिपरच आहे.

३०) अभिनवगुप्त हे आनंदवर्धनानंतर थोड्याच कालाने होऊन गेले असल्यामुळे लोचनातील विधान अभिनवगुप्तांनी आनंदवर्धनांविषयी त्यांना उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे केले असावेसे वाटते.

३१) प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'रसादि प्रतीयमान अर्थ हेच दिव्य प्रतिभेचे गमक'" वर 'ब्रह्मानंद हा काव्याच्या रसाच्या तोडीचा नव्हे' असे अभिनवगुप्तांनी भट्टनायकाचा श्लोक उद्धृत करून म्हटले आहे. "उद्द्योत - २ 'अभिनवगुप्ताचा अभिव्यक्तिवाद'" वर 'रसाचा आस्वाद परब्रह्माच्या आस्वादासारखा असतो' याला अभिनवगुप्त मान्यता देतात. पण 'काव्यानंद म्हणजे ब्रह्मानंदाचा केवळ एक बिंदु' असे अभिनवगुप्तांनी लोचनामध्ये पूर्वी कोठेही म्हटलेले आढळत नाही. कदाचित् लोचनापूर्वीच्या आपल्या एखाद्या ग्रंथांत त्यांनी तशा आशयाचे विधान केले असावे!

३२) वास्तविक विरोध अलंकार हा 'दृष्टि रसांचा आस्वाद मिळवून देण्याचा प्रयत्न करिते' या वाक्यात आहे, केवळ 'दृष्टि' या एका पदात नाही. तेव्हा येथे 'एकपदानुप्रवेश' संकर म्हणण्याऐवजी 'एकवाक्यानुप्रवेश' संकर म्हणणे अधिक बरे झाले असते. किंवा पद म्हणजे पदसमूह म्हणजेच वाक्य असा अभिनवगुप्तांचा अभिप्राय असावा.

३३) मूळ श्लोकात 'त्या दोन्ही दृष्टींचा उपयोग करून' असे आहे, 'एकाच दृष्टीचा (म्हणजे चाक्षुष ज्ञानाचा) उपयोग करून' असे नाही. आणि दोन्ही दृष्टींचा उपयोग करून (मग) वर्णन करणे यात विरोधालंकार कसा ते समजत नाही, कारण दृष्टि या शब्दात 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' 'ध्वनि' आहे असे आनंदवर्धन व अभिनवगुप्त या दोघांनीही म्हटले आहे. तसेच 'दोन्ही दृष्टि' या शब्दात अत्यंततिरस्कृतवाच्य ध्वनि आहे हेही तितकेसे पटत नाही. त्यामुळे येथे विरोधालंकार व ध्वनि यांचा संदेहसंकर कसा मानावयाचा?

३४) प्रथमखंड "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य' ध्वनीचे दोन उपप्रकार- (२) 'अत्यन्ततिरस्कृतवाच्य' हा प्रकार".

३५) **नवा** या शब्दामध्ये शब्दशक्तिमूल ध्वनि कसा मानावयाचा, ते कळत नाही. कारण नवा या शब्दाला नवीन (म्हणजे अपूर्व, असामान्य) हा एकच अर्थ आहे. तो वाच्यार्थ समजल्यास त्या शब्दाचा व्यंग्यार्थ कोणता घ्यावयाचा?

३६) आनंदवर्धनांनी असंलक्ष्यक्रम ध्वनीच्या संकराची उदाहरणे कोठेच दिली नाहीत. संलक्ष्यक्रम ध्वनीच्या संकराचे 'कवींची जी आश्चर्यकारक, अवर्णनीय दृष्टि' इ. एकच उदाहरण दिले आहे. त्यांतही तीन प्रकारचा संकर आहे असे व तो संकर कसा आहे हे आनन्दवर्धनांनी सांगितले नाही. ते अभिनवगुप्तांनी स्पष्ट केले आहे. सेच असंलक्ष्यक्रम ध्वनीच्या अलंकाराशी झालेल्या विविध संकराची उदाहरणे म्हणून अभिनवगुप्तांनी 'कोपऱ्यांशी चंचल' (प्रथमखंड "उद्द्योत - २ 'ती दक्षता म्हणजे १) अलंकार रसादीचे अंगच राहिला पाहिजे,'") व 'अरे वेड्या, रस्ता सोडून' (द्वितीयखंड, "तृतीय – ३ 'अप्रस्तुत-प्रशंसेचे तीन प्रकार'") या दोन पद्यांकडे बोट दाखविले आहे.

३७) पाहा, द्वितीयखंड, "उद्द्योत – ३ 'ध्वनीचे प्रकार गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी किंवा अलंकारांशी मिश्रित होऊन त्यांची संसृष्टि व संकर विचारात घेतल्यास अनंतर प्रकार होतात.'" वरील 'जरी अलंकार हा रसाला अवश्य' इ. वाक्य.

३८) वस्तुतः **अत्र हि मैत्रीपदम्** आणि अत्र **मैत्रीपदं हि** यापैकी काहीही म्हटले, तरी अर्थामध्ये विशेष फरक पडतो असे नाही. **अत्र हि मैत्रीपदम्** याचा अर्थ 'कारण येथे मैत्री हा शब्द' असा होईल व **अत्र मैत्रीपदं हि** याचा अर्थ 'कारण येथील मैत्री हा शब्द' असा होईल, इतकेच. तरीही याच किरकोळ मुद्द्याचा अभिनवगुप्तांनी द्वितीयखंड, "उद्द्योत – ३ 'ध्वनीचे प्रकार गुणीभूतव्यंगाच्या प्रकारांशी किंवा अलंकारांशी मिश्रितच होऊन त्यांची संसृष्टि व संकर विचारात घेतल्यास अनंत प्रकार होतात'" वर पुनर्निर्देश केला आहे.

३८*) येथून पुढे अभिनवगुप्तांनी मेघदूतातील **दीर्घीकुर्वन्** इ. श्लोकाचे जे विवरण केले आहे, ते त्यांच्या पराकाष्ठेच्या रसिकपणाचे व मार्मिकपणाचे द्योतक आहे. मेघदूतातीलच आणखी एका, **श्यामास्वङ्गं** इ. श्लोकाचेही अभिनवगुप्तांनी केलेले सुंदर रसग्रहण प्रथमखंड द्वितीय उद्द्योत पाहा वर आलेच आहे. मेघदूततील या श्लोकांचे इतके मार्मिक रसग्रहण अभिनवगुप्तांखेरीज दुसऱ्या कोणीही—मल्लिनाथानेही केलेले नाही. या संदर्भात पाहा, 'विदर्भ संशोधन मंडळा'च्या १९७७ च्या (मार्च १९७८ मध्ये प्रकाशित झालेल्या) वार्षिकातील 'मेघदूतातील दोन श्लोक' हा प्रा. पु. ना. वीरकर यांचा लेख.

३९) म्हणजे १) लांबवर पसरल्याने त्या कूजनाचे क्षेत्र वाढते, २) ते कूजन दीर्घकाळ होत राहिल्याने त्याचा कालावधि वाढतो व ३) त्या कूजनामध्ये नदीच्या तरंगांचा आवाज मिसळल्यामुळे तो आवाजही मोठा होतो. अशा रीतीने त्या आवाजाला तीन प्रकारचे दीर्घत्व प्राप्त होते.

४०) एखादा आवाज जर कर्कश बनला तर त्याची पुष्टि नकोशी वाटेल, पण मूळच्या मधुर असलेल्या आवाजाचे दींपन स्वागतार्हच होते.

४१) म्हणजे प्रेयसींना रतिक्रींडेमुळे आलेला शीण दूर करणे, या प्रकारच्या सेवेला.

४२) वारा सुगंधाच्या उपयोगी पडतो, म्हणजे त्याला दूरवर पसरवितो आणि सुगंध वाऱ्याच्या उपयोगी पडतो म्हणजे त्या वाऱ्याला सुगंधयुक्त करितो.

४३) 'मकरंद' 'याचा नेहमीचा अर्थ जरी 'मध' असा असला, तरी प्राचार्यं आपटे यांच्या कोशात 'फुलातील पराग धारण करणारा तंतु' असाही अर्थं दिला आहे. म्हणून आम्ही 'मकरंद' याचा 'पराग' हाच अर्थ घेतला आहे, कारण कारण परागामुळे वाऱ्याला भगवा रंग प्राप्त होणे हे स्वाभाविक वाटते.

४४) सारांश, **प्रियतम इव** असा पाठ घेतल्यास तेथे प्रियकराप्रमाणे खुशामत करणारा (वारा) असा 'उपमा' अलंकार होईल व **प्रियतमे इव** असा पाठ घेतला तर 'स्त्रियांना प्रियकरांशी जणू काही खुशामत करावयास लावणारा अशी उत्प्रेक्षा होईल.

४५) **स्फुटितकमलामोद** हेच शब्द भवभूतीने उत्तररामचरित, ३—२४ या श्लोकात योजले आहेत.

४६) म्हणजे वारा पिवळसर व सुगंधित होतो आणि प्रियकर उत्तेजित होतो.

४७) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत — २ 'रसादिध्वनीचे प्रकार असंख्य'" वरील टीप ३.

४८) द्वितीय खंड, "उद्द्योत — ३ 'ध्वनीचे प्रकार गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी किंवा अलंकारांशी मिश्रित होऊन त्यांची संसृष्टि व संकर विचारात घेतल्यास अनंत प्रकार होतात.'"

४९) वस्तुतः या श्लोकातील ४ थ्या ओळीमधील **प्रियतम** इव यामध्ये 'उपमा' अलंकार स्पष्ट आहे. २ ऱ्या चरणातील '**मैत्री**' यात अविवक्षितवाच्य ध्वनि असून त्या ध्वनीची उपमेशी संसृष्टि झाली आहे असे म्हणता येईल. आनंदवर्धन **पदान्तरेषु अलङ्कारान्तराणि** इतकेच म्हणतात. त्या 'सर्वांची' **मैत्री** शब्दातील ध्वनीशी संसृष्टि झाली आहे असे म्हणत नाहीत. हे 'इतर पदांमधील अलंकार' म्हणजे अनुक्रमे उत्प्रेक्षा, स्वभावोक्ति, रूपक व उपमा असे अभिनवगुप्त म्हणतात. यातील शेवटची 'उपमा' स्पष्ट आहे. पहिल्या तीन ओळीत 'स्वभावोक्ति' मानिता येईल, पण येथे उत्प्रेक्षा व रूपक कोठे आहेत याची कल्पना करिता येत नाही. कारण **दीर्घीकुर्वन्** यात दीर्घी. कुर्वन्निव अशी उत्प्रेक्षा मानिता येत नाही, किंवा **ग्लानिं हरति** येथे **ग्लानिं हरतीव** अशी उत्प्रेक्षाही मानणे शक्य नाही. कारण या दोन्ही शब्दाच्या द्वारे वस्तुस्थितीच सांगितली जात आहे; त्यात कल्पनेचा अंश संभवत नाही. फार तर 'कमळ' शब्दामध्ये मुख हे उपमेय 'निगीर्ण' आहे असे समजून 'रूपकातिशयोक्ति' मानिता येईल व मग ही रूपकातिशयोक्ति, पहिल्या तीन चरणांतील स्वमावोक्ति व चवथ्या चरणातील उपमा हे तीन अलंकार या श्लोकामध्ये आहेत असे मानून आनन्दवर्धनांच्या **पदान्तरेषु अलंकारान्तराणि** या विधानाचे स्पष्टीकरण करिता येईल.

ध्वन्यालोकः

संसृष्टालङ्कारान्तरसङ्कीर्णो ध्वनिर्यथा—
दन्तक्षतानि करजैश्च विपाटितानि
प्रोद्भिन्नसान्द्रपुलके भवतः शरीरे ।
दत्तानि रक्तमनसा मृगराजवध्वा
जातस्पृहैर्मुनिभिरप्यवलोकितानि ॥

अत्र हि समासोक्तिसंसृष्टेन विरोधालङ्कारेण सङ्कीर्णस्यालक्ष्यक्रमव्यङ्ग्यस्य ध्वनेः प्रकाशनम् । दयावीरस्य परमार्थतो वाक्यार्थीभूतत्वात् ।

संसृष्टालङ्कारसंसृष्टत्वं च ध्वनेर्यथा—

अहिणअपओअ[पाउस]**रसिएसु पहिअ** [सो॑ हइ] **सामाइएसु दिअहेसु ।**

सहइ[रहस] **पसारिअगीआणँ** [गीवाणँ असे पाठ 'गाथासप्तशती'त आढळतात. पण ते स्वीकारल्यास अभिनवगुप्तांनी दाखवलेला व्यंग्यार्थ निघू शकणार नाही.] **णच्चिअं मोरवंदाणं ॥**

अत्र ह्युपमारूपकाभ्यां शब्दशक्त्युद्भवानुरणनरूपव्यङ्ग्यस्य ध्वनेः संसृष्टत्वम् ।

ध्वन्यालोक

दुसऱ्या अलंकाराशी एक अलंकार संसृष्ट असताना त्या अलंकाराशी ध्वनीचा ज्यात संकर झाला आहे असे उदाहरण—

(हे बोधिसत्त्वा[१]!) ज्यावर विपुल रोमांच उभे राहिले आहेत अशा तुमच्या शरीरावर रक्तमनस्क[२] सिंहिणीने केलेली दन्तक्षते व नखक्षते[३], मुनींच्याही मनात अभिलाष उत्पन्न होऊन त्यांनी पाहिली.

या पद्यात समासोक्ति[४] अलंकाराशी विरोधालंकाराची संसृष्टि[५] झाली असून त्या विरोधालंकाराचा 'अलक्ष्यक्रमव्यंग्य' ध्वनीशी संकर झालेला दिसून येतो. कारण वस्तुतः या वाक्यातून मुख्यतया दयावीर प्रकट होत आहे.

एकमेकांशी संसृष्ट असलेल्या अलंकारांशी ध्वनीची 'संसृष्टि' झाल्याचे उदाहरण पुढीलप्रमाणे—

'नवोदित मेघांची गर्जना[६] होत असलेले जे दिवस प्रवासीजनांना काळरात्रीप्रमाणे भासतात, त्या दिवसात माना उंच केलेल्या व केकाध्वनि आसमंतात् पसरविणाऱ्या मोरांच्या समूहांचे नर्तन आकर्षक दिसते'.

या पद्यात उपमा[७] व रूपक[८] यांची एकमेकांशी 'संसृष्टि'[९] झाली असून त्या अलंकाराशी शब्दशक्त्युद्भव अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीची संसृष्टि[१०] झाली आहे.

लोचनम्

एवमियता—

"सगुणीभूतव्यङ्ग्यैः सालंकारैः सह प्रभेदैः स्वैः । संकरसंसृष्टिभ्याम्" इत्येतदन्तं व्याख्यायोदाहरणानि च निरूप्य 'पुनरपि' इति यत्कारिकाभागे पदद्वयं तस्यार्थं प्रकाशयत्युदाहरणद्वारेणैव—संसृष्टित्यादि । पुनः शब्दस्यायमर्थः—न केवलं ध्वनेः स्वप्रभेदादिभिः संसृष्टिसंकरौ विवक्षितौ यावत्तेषामन्योन्यमपि । स्वप्रभेदानां स्वप्रभेदैर्गुणीभूतव्यङ्ग्येन वा सङ्कीर्णानां

संसृष्टानां च ध्वनीनां सङ्कीर्णत्वं संसृष्टत्वं च दुर्लक्षमिति विस्पष्टोदाहरणं न भवतीत्यभिप्रायेणालङ्कारस्यालङ्कारेण संसृष्टस्य संकीर्णस्य वा ध्वनौ सङ्करसंसगौं प्रदर्शनीयौ ।

तदस्मिन् भेदचतुष्टये प्रथमं मेदमुदाहरति—दन्तक्षतानीति । बोधिसत्त्वस्य स्वक्रिशोरभक्षणप्रवृत्तां सिंहीं प्रति निजशरीरं वितीर्णवतः केनचिद्याटुकं क्रियते । प्रोद्भूतः सान्द्रः पुलकः परार्थसम्पत्तिजेनानन्दभरेण यत्र । रक्ते रुधिरे मनोऽभिलाषो यस्याः, अनुरक्तं च मनो यस्याः । मुनयश्चोद्बोधितमदनावेशाश्चेति विरोधः । जातस्पृहैरिति च वयमपि कदाचिदेवं कारुणिकपदवीमधिरोक्ष्यामस्तदा सत्यतो मुनयो भविष्याम इति मनोराज्ययुक्तैः । समासोक्तिश्च नायिकावृत्तान्तप्रतीतेः । दयावीरस्येति । दयाप्रयुक्तत्वादत्र धर्मस्य धर्मवीर एव दयावीरशब्दोक्तः । वीरश्चात्र रसः, उत्साहस्यैव स्थायित्वादिति भावः । दयावीरशब्देन वा शान्तं व्यपदिशति । सोऽत्र रसः संसृष्टार्लकारेणानुगृह्यते । समासोक्तिमहिम्ना ह्ययमर्थः सम्पद्यते— यथा कश्चिन्मनोरथशतप्रर्थितप्रेयसीसम्भोगावसरे जातपुलकस्तथा त्वं परार्थसम्पादनाय स्वशरीरदान इति करुणातिशयोऽनुभावविभावसम्पदोद्दीपितः ।

द्वितीयं भेदमुदाहरति—ससृष्टेति । अभिनवं हृद्यं पयोदानां मेघानां रसितं येषु दिवसेधु । तथा पथिकान् प्रति श्यामायितेषु मोहजनकत्वाद्रात्रिरूपतामाचरितवत्सु । यदि वा पथिकानां श्यामायितं दुःखवशेन श्यामिका येभ्यः । शोभते प्रसारितग्रीवाणां मयूरवृन्दानां नृत्तम् । अभिनयप्रयोगरसिकेषु पथिकसामाजिकेषु सत्सु मयूरवृन्दानां प्रसारितगीतानां प्रकृष्टसारणानुसारिगीतानां तथा ग्रीवारेचकाय प्रसारितग्रीवाणां नृत्तं शोभते । पथिकान् प्रति श्यामा इवाचरन्तीति क्यङ् प्रत्ययेन लुप्तोपमा निर्दिष्टा । पथिकसामाजिकेष्विति कर्मधारयस्य स्पष्टत्वाद्रूपकम् । ताभ्यां ध्वनेः संसर्ग इति ग्रन्थकारस्याशयः । अत्रैवोदाहरणेऽन्यद्भेदद्वयमुदाहर्तु शक्यमित्याशयेनोदाहरणान्तरं न दत्तम् । तथाहि— व्याघ्रादेराकृतिगणत्वे पथिकसामाजिकेष्वित्युपमारूपकाभ्यां सन्देहास्पदत्वेन संकीर्णाभ्यामभिनय प्रयोगे, अभिनवप्रयोगे च रसिकेष्विति प्रसारितगीतानामिति यः शब्दशक्त्युद्भवस्तस्य संसर्गमात्रमनुग्राह्यत्वाभावात् । 'पहिअसामाइएसु' इत्यत्र तु पदे सङ्कीर्णाभ्यां ताभ्यामुपमारूपकाभ्यां शब्दशक्तिमूलस्य ध्वनेः संकीर्णत्वमेकव्यञ्जकानुप्रवेशादिति संकीर्णालङ्कारसंसृष्टः संकीर्णालङ्कारसङ्कीर्णश्चेत्यपि भेदद्वयं मन्तव्यम् ॥ ४३ ॥

लोचन

अशा प्रकारे आतापर्यंत 'गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी, अलंकारांशी आणि स्वतःच्या प्रकारांशी ध्वनीच्या स्वतःच्या प्रकारांच्या होणाऱ्या संकर व संसृष्टि या दोन प्रकारच्या मिश्रणामुळे' येवढ्या कारिकेच्या भागाचे विवरण केल्यावर व उदाहरणे दिल्यावर कारिकेतील **पुनरपि** हे जे दोन शब्द, त्यांचा अर्थ केवळ दोन उदाहरणे देऊन प्रकट करण्यास वृत्तिकार 'दुसऱ्या अलंकाराशी एक अलंकार संसृष्ट असताना' इ. शब्दांनी प्रारंभ करितात. त्यातील **पुनः** या शब्दाचा अर्थ असा— शुद्ध ध्वनीच्या स्वतःच्या प्रकारांचे त्यांच्या स्वतःच्या प्रकारांशी, गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी व अलंकारांशी होणारे संकर व संसृष्टि हेच फक्त अभिप्रेत आहेत असे नाही, तर या संकर व संसृष्टींचे[१०]* इतर संकर व संसृष्टि यांशी संकर व संसृष्टि होणेही शक्य आहे. ध्वनीच्या प्रभेदांचे स्वतःच्या प्रभेदांशी किंवा गुणीभूतव्यंग्याशी संकर किंवा संसृष्टि झाल्यावर अशा संकर किंवा संसृष्टि यांनी युक्त प्रकारांचे अशाच इतर प्रकारांशी संकर किंवा संसृष्टि झाल्याची उदाहरणे

मिळणे कठीण आहे. म्हणून तशा प्रकारांची सुस्पष्ट उदाहरणे देणे शक्य होणार नाही, यास्तव एका वाच्य अलंकाराचा दुसऱ्या वाच्य अलंकाराशी संकर किंवा संसृष्टि झाल्याची उदाहरणे देणे योग्य होईल.

म्हणून वृत्तिकार या चार[१०]** प्रकारांपैकी पहिल्या प्रकाराचे (म्हणजे संसृष्ट अलंकारांशी होणाऱ्या ध्वनीच्या संकराचे) '(हे बोधिसत्त्वा!) ज्यावर विपुल' इ. उदाहरण देतात. आपल्याच छाव्याला खावयास उद्युक्त झालेल्या सिंहिणीला आपले स्वतःचे शरीर अर्पण केलेल्या 'बोधिसत्त्वा' ची कोणीतरी प्रशंसा करीत आहे. दुसऱ्याचे कार्य आपण साधले या जाणिवेने झालेल्या आनंदभराने ज्यावर बिपुल रोमांच उभे राहिले आहेत (असे शरीर). रक्त पिण्यासाठी जिचे मन लुब्ध झाले आहे अशी (सिंहीण). तसेच जिचे मन प्रियकरावर अनुरक्त झाले आहे अशी (नायिका). स्वतः मुनि असून त्यांच्या मनात मदनविकार जागृत झाला हा 'विरोध' होय. 'मनात अभिलाष उत्पन्न झालेले' म्हणजे आम्ही सुद्धा केव्हातरी दयाळूपणाच्या इतक्या उच्च पायरीला जाऊ, तेव्हाच खरेखुरे 'मुनि' होऊ अशी मनोराज्ये जे करीत होते, असे मुनि. या पद्यातील (द्व्यर्थी शब्द योजनेमुळे) नायिकेचा व्यवहार प्रतीत होत असल्याने येथे समासोक्ति अलंकार आहे. 'दयावीर'— या ठिकाणी दयेच्या पोटीच बोधिसत्त्वाची धार्मिक प्रवृत्ति उत्पन्न होत असल्याने 'दयावीर' शब्दाने 'धर्मवीरा' चा निर्देश केला आहे असे समजावे.[११] (दयावीर असो किंवा धर्मवीर असो), येथे वीररस आहे (हे निश्चित), कारण उत्साह हाच या ठिकाणी स्थायिभाव आहे, असा वृत्तिकाराचा आशय. किंवा वृत्तिकार शान्तरसाचाच निर्देश 'दयावीर 'शब्दाने करितात[११]* असे मानले तरी चालेल. तो (म्हणजे दयावीर किंवा शान्त) रस येथे दोन अलंकारांच्या संसृष्टीने उपकृत झाला आहे.[१२] कारण समासोक्तीच्या सामर्थ्यामुळे येथे एकूण पुढील अर्थाची निष्पत्ति होत आहे— 'शेकडो मनोरथ करून प्राप्त झालेल्या प्रेयसीशी रतिक्रीडा करीत असताना एखादा प्रियकर जसा रोमांचित होतो, तसा तू दुसऱ्याचे अभीष्ट साधण्यासाठी स्वतःचे शरीर अर्पण करिताना (पुलकित झाला होतास)' असे म्हटल्याने अनुभाव व विभाव यांच्या सामर्थ्याने कमालीची दया या ठिकाणी उत्कटत्वाने प्रकाशित केली जात आहे.

दुसऱ्या (म्हणजे एकमेकांशी संसृष्ट असलेल्या दोन अलंकारांची शुद्ध ध्वनीच्या प्रकाराशी संसृष्टि होणे या) प्रकाराचे उदाहरण वृत्तिकार 'एकमेकांशी संसृष्ट' इ वाक्याने प्रारंभ करून देतात. ज्या दिवसांत मेघांचा ध्वनि अभिनव म्हणजे नावीन्यामुळे रमणीय असतो, तसेच ज्या काळात दिवस हे वाटसरांना श्यामेसारखे होतात म्हणजे मूर्च्छा आणून काळरात्रीचे स्वरूप धारण करतात, किंवा ज्या दिवसांमुळे वाटसरूंची चर्या दुःखामुळे काळवंडून जाते.[१३] (अशा वेळी) ज्यांनी आपल्या माना उंच केल्या आहेत अशा मयूरांच्या थव्यांचे नृत्य सुन्दर दिसते. (दुसरा व्यंग्य अर्थ—) अभिनयाच्या प्रयोगाचा रसिकपणे आस्वाद घेणारे वाटसरूरूपी प्रेक्षक उपस्थित असताना जेव्हा मयूरांचे वृंद (केका) गान करू लागतात, म्हणजे उत्कृष्ट 'सारणे'[१३]* च्या अनुरोधाने जेव्हा गाणे गाऊ लागतात. तसेच ग्रीवारेचकासाठी[१४] जेव्हा ते आपल्या माना दीर्घ करितात, तेव्हा ते मयूरवृंदांचे नृत्य सुंदर दिसते. वाटसरांच्या बाबतीत 'रात्रींप्रमाणे आचरण करितात' या अर्थी (**श्यामा** या शब्दाला) **क्यङ्**[१५] प्रत्यय लागला आहे. हा **क्यङ्** प्रत्यय येथे लुप्तोपमा[१६] अलंकार असल्याचे सांगत आहे. **पथिकसामाजिंकेषु**[१७] (वाटसरूरूपी प्रेक्षक उपस्थित असताना हा कर्मधारय समास स्पष्ट असल्याने यात रूपक अलंकार आहे. त्या दोन (उपमा व रूपक या) अलंकारांशी ध्वनीची संसृष्टि झाली आहे, असा ग्रंथकारांचा अभिप्राय आहे. याच पद्यात उरलेल्या दोन प्रकारांची उदाहरणे[१८] असल्याचे दाखविणे शक्य आहे, या अभिप्रायाने वृत्तिकारांनी आणखी निराळी उदाहरणे दिली नाहीत. कारण व्याघ्रादिगण (आणि तसाच मयूरव्यंसकादिगण) हा आकृतिगण[१९] असल्यामुळे **पथिकसामाजिकेषु** यात उपमा स्वीकारावी की रूपक असा संदेह उत्पन्न होत असल्याने त्या दोन अलंकारांचा येथे संदेहसंकर झाला आहे. अभिनयाच्या प्रयोगांविषयी रसिक मंडळी उपस्थित असताना

ज्यांनी गाणे सुरू केले आहे. (आणि ज्यांनी आपल्या माना ग्रीवारेचकासाठी उंच केल्या आहेत) यात जो शब्दशक्त्युद्भव ध्वनि आहे, त्याची वरील अलंकारांच्या संदेहसंकराबरोबर केवळ संसृष्टिच आहे. कारण, त्या अलंकारांचा संदेहसंकर व हा शब्दशक्तिमूल वस्तुध्वनि यांमध्ये अनुग्राह्य व अनुग्राहक असा संबंध नाही (तर उलट भिन्नाश्रयत्व आहे). **पहिअसामाइएसु** येथे मात्र उपमा व रूपक अलंकार एकाच पदात प्रविष्ट झाले असल्यामुळे त्यांचा एकपदानुप्रवेश संकर झाला आहे व त्या संकराशी शब्दशक्तिमूल ध्वनीचा[२०] एकाच पदात संकर झाला आहे. अशा तऱ्हेने संपूर्ण गाथेतून 'संकीर्णालंरसंसृष्ट' ध्वनि[२१] व 'संकीर्णालंकारसंकीर्ण' ध्वनि हेही दोन प्रकार या उदाहरणात[२२] आहेत हे समजून घ्यावे. ॥ ४३ ॥

टीपा

१) बोधिसत्त्व म्हणजे साधकावस्थेतींल बौद्ध सत्पुरुष.

२) 'रक्तमनस्क' याचा एक अर्थ 'रक्त पिण्यासाठी मन लुब्ध झालेली' व दुसरा अर्थ 'जिचे मन अनुरक्त आहे अशी.'

३) दन्तक्षते व नखक्षते यांचा एक अर्थ दातांनी व नखांनी केलेल्या जखमा व दुसरा अर्थ प्रेमाने दात व नखे यांनी उमटविलेली चिन्हे.

४) नायिकेचे प्रियकराशी होणारे वर्तन सूचित होत असल्याने येथे 'समासोक्ति' अलंकार आहे.

५) येथे पहिल्या तीन ओळींत 'समासोक्ति' असून तिची (चौथी ओळ या) भिन्न आश्रयातील 'विरोधा'शीं 'संसृष्टि' झाली आहे. दोन्ही अलंकारांचे आश्रय वेगवेगळे असल्यामुळे येथे 'संसृष्टि' आहे असे आंनंदवर्धनांनी म्हटलेले दिसते. पण समासोक्तीशिवाय चौथ्या ओळीतील विरोध उभा राहू शकत नसल्याने त्यांमध्ये परस्पर-निरपेक्षत्व नाही, म्हणून मम्मटासारख्या उत्तरकालीनाच्या दृष्टीने ही 'संसृष्टि' मानली जाईल काय, ही शंकाच आहे. आनंदवर्धनांच्या मते केवळ आश्रयभेद असला, म्हणजे संसृष्टि होते असे दिसते. तुलनेसाठी पाहा, प्रथम खंडातील "उद्द्योत - २ 'ती दक्षता म्हणजे ३) चालू अलंकाराचा, योग्य वेळ येताच त्यागही करायला हवा'" वरील 'तू तुझ्या कोवळ्या पालवीमुळे'..... इ. श्लोक व त्यावरील "उद्द्योत – २ 'ती दक्षता म्हणजे ३) चालू अलंकाराचा, योग्य वेळ येताच त्यागही करायला हवा'" वरील ९ वी टीप : वस्तुतः प्रस्तुत श्लोकामध्ये अनुग्राह्य-अनुग्राहकभाव असल्यामुळे येथे अंगांगिभावसंकर आहे असे म्हणणे अधिक योग्य झाले असते.

६) गाथासप्तशती, ५६०.

७) 'वाटसरूंना दिवस काळोख्या काळरात्रीप्रमाणे वाटतात' ही उपमा होय.

८) मूळ गाथा 'प्राकृत' भाषेत आहे. 'पहिअसामाइएसु' असा मूळ गाथेत शब्द असून त्याची संस्कृत छाया **पथिकश्यामायितेषु** अशी किंवा **पथिकसामाजिकेषु** अशीही होऊ शकते. त्यांपैकी पहिली छाया स्वीकारली तर येथे पथिक हेच सामाजिक म्हणजे (नृत्याचे) प्रेक्षक असे 'रूपक' प्रत्ययास येते.

९) उपमा व रूपक हे दोन अलंकार जरी एकाच प्राकृत समासाच्या आश्रयाने असले, तरी त्या प्राकृत समासाची संस्कृतमध्ये दोन स्वतंत्र रूपे होऊ शकत असल्याने येथे उपमा व रूपक यांचे आश्रय भिन्न मानून संसृष्टि आहे असे म्हटले असावे. साहित्यदर्पणकार 'विश्वनाथ' येथे उपमा व रूपक यांचा एकव्यंजकानुप्रवेश 'संकर' मानतो. हे दोन अलंकार स्वतःच्या अस्तित्वासाठी एकमेकांवर अवलंबून नाहीत म्हणून येथे या दोन अलंकारांची संसृष्टि आहे असे ध्वन्यालोकावर अलीकडेच म्हणजे सुमारे ३५ वर्षांपूर्वी 'दीधिति' नावाचीं टीका लिहिणारे 'बदरीनाथ' म्हणतात.

१०) **पहिअसामाइएसु** हा समास बाजूला ठेवला, तर उरलेल्या भागातील **अहिणवपओअरसिएसु** या प्राकृतातील समाजाचे **अभिनवपयोदरसितेषु** आणि **अभिनवप्रयोगरसिकेषु** असे दोन पर्याय (संस्कृतमध्ये) होऊ शकतात. तसेच **पसारिअगीआणं** या प्राकृतमधील समासाचे **प्रसारितग्रीवाणाम्** आणि **प्रसारितगीतानाम्** असे दोन संस्कृत पर्याय होतात. त्यांपैकी **अभिनवपयोदरसितेषु** आाणि **प्रसारितग्रीवाणाम्** हे अर्थ प्रस्तुत असल्याने प्रथम ध्यानात येतात व नंतर **अभिनयप्रयोगरसिकेषु** व **प्रसारितगीतानाम्** हे अप्रस्तुत अर्थ काही वेळाने लक्षात येत असल्यामुळे तो ('प्रेक्षक मोठ्या रुचीने मोरांचा अभिनय पाहतात व त्यांचा केकाध्वनि ऐकतात' हा) अर्थ 'अनुरणनरूपव्यंग्य' समजावयाचा. या व्यंग्यार्थाचा आश्रय उपमा व रूपक या वाच्य अलंकारांच्या आश्रयाहून निराळा असल्यामुळे येथे व्यंग्यार्थाची वाच्य अलंकारांशी संसृष्टि मानली आहे.

१०*) मुळात **तेषाम्** असा पाठ आहे, तो **तयोः** असा पाहिजे, कारण त्या आधी **संसृष्टिसङ्करौ** असे द्विवचन वापरले आहे.

१०**) हे चार प्रकार म्हणजे संसृष्ट अलंकारांची ध्वनीशी संसृष्टि, संसृष्ट अलंकारांचा ध्वनीशी संकर, संकीर्ण अलंकारांनी ध्वनीशी संसृष्टि आणि संकीर्ण अलंकारांचा ध्वनीशी संकर.

११) कारण भरताने दयावीराला स्वतंत्र स्थान दिलेले नाही. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत - ३, 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'" वरील टीप ३०.

११*) पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'विरोधी म्हणून समजल्या जाणाऱ्या रसांचा समावेश कसा केला म्हणजे विरोध दूर होतो याचे विवेचन'".

१२) म्हणजे येथे समासोक्ति व विरोध या दोन अलंकारांच्या संसृष्टीचा धर्मवीर किंवा शान्त रसाच्या ध्वनीशी अनुग्राह्य-अनुग्राहक भावाने संकर झाला आहे.

१३) म्हणजे अभिनवगुप्तांनी **श्यामायित** याचे दोन अर्थ केले आहेत– (१) **श्यामायितेषु** म्हणजे रात्रीप्रमाणे वर्तन करणारे येथे **श्यामा** या शब्दाला **उपमानादाचारे** (पाणिनि, ३–१–१०) व **कर्तुः क्यङ् सलोपश्च** (पाणिनि. १३–१–११) या सूत्रांप्रमाणे **क्यङ्** प्रत्यय लागला आहे, तर (२) **श्याम** या शब्दाला 'अभूत-तद्भव' या अर्थी अष्टाध्यायी, ३–१–१२ या सूत्राप्रमाणे 'श्यामीभवन' या अर्थी **क्यङ्** प्रत्यय लागला आहे व **श्यामायित** हे **श्यामाय** या नामधातूपासून **श्यामिका** (काळेपणा) या अर्थी नाम झाले आहे.

१३*) श्रुतींची माहिती प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'काव्यात व्यङग्य अर्थ प्रधान, आणि तो अर्थ योग्य प्रकारे काव्यातून प्रकट करण्यामुळेच 'महाकवी' ला महाकवित्व प्राप्त होते'" वरील पहिल्या टीपेत दिली आहे. स्वर-सप्तकात एकूण ज्या २२ श्रुति असतात, त्यांपैकी ठराविक क्रमांकांच्या श्रुतींवर 'सा' पासून 'नि' पर्यंतच्या प्रत्येक स्वराचे स्थान निश्चित केलेले असते. उदा. प्रारंभापासून चौथ्या श्रुतीवर 'सा,' सातव्या श्रुतीवर 'रे,' वगैरे. अशा रीतीने ठराविक अंतर सोडून विशिष्ट क्रमांकांच्या श्रुतींवर प्रत्येक स्वराची स्थापना केल्यावर निश्चित झालेल्या स्वरसप्तकाच्या सुसंवादी रचनेला 'सारणा' म्हणतात. यांपैकी एखाद्या दुसऱ्या स्वराची जागा एखाद्या श्रुतीने बदलून स्वरसप्तकाची रचना केली की, दुसऱ्या प्रकारची 'सारणा' होते. अशा प्रकारच्या चार सारणा शास्त्रात सांगितल्या आहेत. दिलीप व सुदक्षिणा रथातून वसिष्ठाच्या आश्रमाकडे जात असताना त्यांच्या कानी आलेल्या मोरांच्या केका 'षड्जसंवादिनी' म्हणजे 'सा' या स्वराशी संवादी होत्या, असे कालिदासाने रघुवंश, १–३९ येथे म्हटले आहे. **अहिणअपओअ** ... इ. गाथेत वर्णिलेले मोरांचे गीत 'प्रसारित' म्हणजे प्रकृष्ट म्हणजे उत्कृष्ट सारणेला अनुसरून होते, असे अभिनवगुप्त म्हणतात. म्हणजे मोरांच्या केका दोन सप्तकांतल्या षड्जांशी इतक्या जुळणाऱ्या होत्या की, त्या दोन षड्जांमधील अंतर अगदी बरोबर, मोजून मापून २२ श्रुतींचेच होते. **शिशुपालवधम्**, १–१० या श्लोकावरील टीकेत मल्लिनाथाने श्रुतींच्या संख्येबाबत पुढील श्लोक उद्धृत केला आहे :–

चतुश्चतुश्चतुश्चैव षड्जमध्यमपञ्चमाः ।
द्वे द्वे निषादगान्धारौ त्रिस्त्री ऋषभधैवतौ ॥

वरील प्रकार हा सारणेच्या चार प्रकारांपैकी एक मानितात.

१४) 'ग्रीवारेचक' हा एक संगीत शास्त्रातील पारिभाषिक शब्द आहे. मान हलविणे व ती वर्तुळाकार फिरविणे असा त्याचा अर्थ आहे. पाहा, संगीतरत्नाकर, अध्याय ७, श्लोक ३३४ (आनंदाश्रम आवृत्ति, पृ. ६७२)

१५) वरचीच १३ वी टीप पाहा.

१६) मम्मटाच्या मते ही 'वाचकलुप्ता' उपमा आहे. विश्वनाथ हिला 'धर्मलुप्ता' मानितो, तर जगन्नाथाच्या मते ही धर्म-वाचकलुप्ता उपमा आहे.

१७) हा समास मयूरव्यंसकादयश्च (२–१–७२) या सूत्राने झाला आहे. त्याचा **विग्रह पथिका एव सामाजिकाः** असा करावयाचा.

१८) हे उरलेले दोन प्रकार म्ह. मागे १०** या टीपेमध्ये सांगितलेले ३ व ४ हे प्रकार.

१९) अष्टाध्यायीच्या शेवटी पाणिनीने 'गणपाठ' या सदराखाली 'गणांची एक यादी दिली आहे. एक नियम काही विशिष्ट शब्दांना लागू पडत असेल, तर त्या शब्दांची यादी पाणिनीने त्यांचा एक गण कल्पून दिली आहे. त्या गणातील पहिल्या शब्दाला 'आदि', 'प्रभृति' असे शब्द जोडून त्या गणाला 'व्याघ्रादि' गण, 'मयूरव्यंसकादि' गण, 'शरत्प्रभृति' गण असे म्हणण्यात येते. काही गणांना 'आकृतिगण' म्हणून मानिले आहे. त्या गणात पाणिनीने जे शब्द घातले आहेत, त्यांखेरीज भाषेत आणखीही काही शब्द असे आढळू शकतात की ज्यांना त्या गणातील शब्दांना लागणारा नियम लागला आहे, असे म्हणता येईल. व्याघ्रादिगण

मयूरव्यंसकादिगण हे 'आकृतिगण' आहेत. **उपमितं व्याघ्रदिभिः सामान्याप्रयोगे ।** (२—१—५६) या सूत्राप्रमाणे होणाऱ्या समासात 'उपमा' असते तर **मयूरव्यंकादयश्च** (अष्टाध्यायी, २—१—७२) या सूत्राप्रमाणे होणाऱ्या समासात 'रूपक' असते. हे दोन्ही गण आकृतिगण असल्यामुळे **पथिकसामाजिकाः** हा शब्द वरीलपैकी कोणत्याही गणात आहे असे मानिता येईल व म्हणून तो पथिकाः सामाजिका इव । (उपमा) असा, किंवा पथिका एव सामाजिकाः । (रूपक) असाही सोडविता येईल.

२०) हा शब्दशक्तिमूल ध्वनि म्हणजे **पहिअसामाइएसु** याच पदातला. कारण याच पदातून प्रथम **पथिक—श्यामायितेषु** हा वाच्यार्थ प्रकट होतो व मागाहून **पथिकसामाजिकेषु** हा व्यंग्यार्थ प्रकट होतो.

२१) या दोन प्रकारांपैकी पहिल्या म्हणजे 'संकीर्णालंकारसंसृष्टध्वनि या प्रकारात दोन अलंकारांचा 'संदेहसंकर' आहे, तर दुसऱ्या म्हणजे 'संकीर्णालंकार' या प्रकारात या गाथेत दोन अलंकारांचा संकर 'एकपदानुप्रवेश' या प्रकारचा आहे.

२२) या गाथेतून 'पथिकांना व्यथित करणारा पावसाळा सुरू असताना मयूराचे नृत्य सुंदर दिसते' हा वाच्यार्थ प्रथम ध्यानात येतो व मागाहून काही प्राकृत पदांच्या दोन प्रकारच्या संस्कृत छाया संभवत असल्यामुळे पथिकरूपी प्रेक्षक मयूरांचे नृत्य पाहतात' हा दुसरा व्यंग्य अर्थ प्रतीत होतो. एकाच पदातून एक वाच्य व एक व्यंग्य असे दोन अर्थ प्रकट होत असल्याने या ध्वनीला 'शब्दशक्तिमूल' म्हणता येईल. वास्तविक या वस्तुध्वनीचा आश्रय **अहिणअपओअरसिएसु, पहिअसामाइएसु** व **पसारिअगीआणं** ही तीन सामासिक पदे हा आहे. उपमा आणि रूपक यांची संसृष्टि **पहिअसामाइएसु** या शब्दाच्या दोन वेगळ्या संस्कृत छायांतून उत्पन्न झाली आहे. आणि या (एका पदातून निघणाऱ्या संसृष्टीची तीन पदातून निघणाऱ्या वस्तुध्वनीशी संसृष्टि झाली आहे असे म्हटले आहे. (पण ज्या तीन पदातून वस्तुध्वनि प्रकट होतो, त्या तीन पदांपैकीच एकातून अलंकाराची संसृष्टि निर्माण होत असल्यामुळे त्या दोघांचे आश्रय शंभर टक्के भिन्न नाहीत हे लक्षात घेतले पाहिजे.

ध्वन्यालोकः

एवं ध्वनेः प्रभेदाः प्रभेदभेदाश्च केन शक्यन्ते ।
संख्यातुं, दिङ्मात्रं तेषामिदमुक्तमस्माभिः ॥ ४४ ॥

अनन्ता हि ध्वनेः प्रकाराः । सहृदयानां व्युत्पत्तये तेषां दिङ्मात्रं कथितम् ।

इत्युक्तलक्षणो यो ध्वनिर्विवेच्यः प्रयत्नतः सद्भिः ।
सत्काव्यं कर्तुं वा ज्ञातुं वा सम्यगभियुक्तैः ॥ ४५ ॥

उक्तस्वरूपध्वनिनिरूपणानिपुणा हि सत्कवयः सहृदयाश्च नियतमव काव्यविषये परां प्रकर्षपदवीमासादयन्ति ।

अस्फुटस्फुरितं काव्यतत्त्वमेतद्यथोदितम् ।
अशक्नुवद्भिर्व्याकर्तुं रीतयः सम्प्रवर्तिताः ॥ ४६ ॥

एतद्ध्वनिप्रवर्तनेन निर्णीतं काव्यतत्त्वमस्फुटस्फुरितं सदशक्नुवद्भिः प्रतिपादयितुं वैदर्भी गौडी पाञ्चाली चेति रीतयः प्रवर्तिताः । रीतिलक्षणाविधायिनां हि काव्यतत्त्वमेतदस्फुटतया मनाक्स्फुटितमासीदिति लक्ष्यते । तदत्र स्फुटतया सम्प्रदर्शितेनान्येन रीतिलक्षणेन न केश्चित् ।

ध्वन्यालोक

अशा रीतीने ध्वनीचे जे मुख्य प्रकार व त्या प्रकारचे जे उपप्रकार आहेत, त्यांची मोजदाद कोण करू शकेल? त्यापैकी काहींचे हे आम्ही केवळ नमुन्यादाखल विवरण केले ॥ ४४ ॥

कारण ध्वनीचे प्रकार अमर्याद आहेत. सहृदयांना त्यांची माहिती मिळावी, म्हणून आम्ही केवळ दिग्दर्शन केले.

याप्रमाणे ध्वनीचे आणि त्याच्या प्रकारांचे स्पष्टीकरण (आतापर्यन्त) आम्ही केले. जे श्रेष्ठ कवि सत्काव्य करण्यासाठी किंवा जे रसिक सत्काव्याचा योग्य तऱ्हेने आस्वाद घेण्यासाठी उत्सुक असतात, अशांनी तो ध्वनि प्रयत्नपूर्वक समजून घ्यावा.[१] ॥ ४५ ॥

ज्याचे स्वरूप आतापर्यंत वर्णिले, तो ध्वनि पारखण्यात निपुण असलेले सत्कवि आणि रसिक हे काव्याच्या क्षेत्रात[१]* नक्कीच फार मोठा अधिकार प्राप्त करून घेतात.

काव्याचे (ध्वनिरूपी) तत्त्व आम्ही सांगितले. ते पूर्वीच्या ज्या लोकांना अस्पष्टपणेच दिसले आणि म्हणून ज्यांना त्याचे (अचूक) विवरण[२] करिता आले नाही, त्यांनी 'रीती'चा पुरस्कार केला. ॥ ४६ ॥

या ध्वनिसिद्धांताच्या प्रतिपादनाच्या द्वारे निश्चित केलेले काव्याचे तत्त्व ज्यांना अंधुकपणेच प्रतीत झाले व म्हणून जे त्याचे यथार्थ वर्णन करू शकले नाहीत, त्यांनी वैदर्भी, गौडी, पांचाली अशा रीतीचे प्रतिपादन केले. कारण रीतींचे प्रतिपादन करणाऱ्यांच्या नजरेस हे काव्याचे तत्त्व अस्फुटस्वरूपात, म्हणजे अल्प प्रमाणात आले, असे दिसते. म्हणून या ग्रंथात ध्वनिरूपी काव्यतत्त्व स्फुटपणे, चांगल्या प्रकारेमांडले असल्यामुळे रीतीचे लक्षण (ध्वनीहून) स्वतंत्रपणे करून काहीही फायदा नाही.

लोचनम्

एतदुपसंहरति— <u>एवमिति</u> । स्पष्टम् ॥ ४४ ॥

अथ 'सहृदयमनःप्रीतये' इति यत्सूचितं तदिदानीं न शब्दमात्रमपि तु निर्व्यूढमित्याशयेनाह— <u>इत्युक्तेति</u> । यः प्रयत्नतो विवेच्यः, अस्माभिश्चोक्तलक्षणो ध्वनिरेतदेव काव्यतत्त्वं यथोदितेन प्रपञ्चनिरूपणादिना व्याकर्तुमशक्नुवद्भिरलङ्कारकारैः रीतयः प्रवर्तिताः इत्युक्तकारिकया संबन्धः । अन्ये तु यच्छब्दस्थाने 'अयम्' इति पठन्ति । <u>प्रकर्षपदवीमिति</u> । निर्माणे बोधे चेति भावः । व्याकर्तुँमशक्नुवद्भिरित्यत्र हेतुः— अस्फुटं कृत्वा स्फुरितमिति । <u>लक्ष्यत</u> इति । रीतिर्हि गुणेष्वेव पर्यवसिता । यदाह— विशेषो गुणात्मा । गुणाश्च रसपर्यवसायिन एवेति ह्युक्तं प्राग्गुणनिरूपणे— 'शृङ्गार एव मधुरः' इत्यत्रेति ॥ ४५—४६ ॥

लोचन

या (म्हणजे ध्वनीची अनेक प्रकारची मिश्रणे या) विषयाचा समारोप (कारिकाकार) 'अशा रीतीने' इ. कारिकेने करितात. या कारिकेचा अर्थ स्पष्ट आहे. ॥ ४४ ॥

आता पहिल्या उद्‌द्योताच्या पहिल्या कारिकेत 'सहृदयांच्या मनाच्या संतोषासाठी (आम्ही त्याचे स्वरूप सांगतो)' असे जे म्हटले होते, ते आता केवळ पोकळ आश्वासन राहिले नसून ते कार्य पूर्णही केले या आशयाने (कारिकाकार) 'अशा रीतीने ध्वनीचे' इ. विधान करितात. जो प्रयत्नपूर्वक विश्लेषण करून जाणला पाहिजे आणि ज्याचे स्वरूप आम्ही सविस्तरपणे सांगितले, तो ध्वनि हेच काव्याचे मर्म[३] होय. त्याचे आम्ही सांगितल्याप्रमाणे म्हणजे विस्ताराने विवेचन करून विवरण करण्यास असमर्थ असलेल्या प्राचीन आलंकारिकांनी (ध्वनीच्या ऐवजी) 'रीतीं'चा पुरस्कार केला असा ४५ व्या कारिकेतील 'ध्वनि' या शब्दाचा पुढील (४६ व्या) कारिकेतील 'काव्यतत्त्व' या शब्दाशी संबंध जोडावा.[४] पण दुसरे काही (४५ व्या कारिकेतील) **यः** (जो) या शब्दाचे ऐवजी **अयम्** हा पाठ स्वीकारतात.[५] 'मोठा अधिकार'..... म्हणजे काव्य निर्माण करण्याच्या आणि काव्यसौंदर्याचे रसिकतेने ग्रहण करण्याच्या बाबतीत, असा अर्थ. '(अचूक) विवरण करिता आले नाही' याचे कारण त्यांना त्याचे ज्ञान अंधुक, अस्पष्ट स्वरूपात झाले होते. 'असे दिसते'– रीतींचे पर्यवसान गुणांतच होते (म्हणजे रीतींना गुणांहून वेगळे अस्तित्व नाही), कारण म्हटलेच आहे–[६] '(रीतीचे)' वैशिष्ट्य म्हणजे गुण या स्वरूपाचे (वैशिष्ट्य),' आणि गुण हे रसपर्यवसायीच असतात (म्हणजे ते रसांचे धर्मच असतात) हे पूर्वी (कारिकाकारांनी) गुणांचे निरूपण करतेवेळी 'शृंगार हाच पराकाष्ठेचा आनंद देणारा' इ. कारिकांत[७] सांगितलेच आहे. ॥ ४५ ॥ ४६ ॥

टीपा

१) अभिनवगुप्तांनी कारिका ४५ व ४६ मिळून एकच वाक्य आहे असे समजून विवरण केले आहे. आम्ही मात्र कारिका ४५ हे स्वतंत्र वाक्य मानून भाषांतर केले आहे. पाहा, यापुढील टीप ४.

१*) म्हणजे काव्यरचना करण्यात व काव्याचा आस्वाद घेण्यात.

२) पाहा, चौथ्या उद्‌द्योतामधील शेवटचा श्लोक.

३) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ काव्याचे मुख्य प्रयोजन 'आनंद'" वरील 'सर्व सत्कवींच्या काव्याचे सार असलेले' हे शब्द.

४) म्हणजे अभिवगुप्तांचे म्हणणे असे की, ४५ व ४६ या दोन्ही कारिकांमिळून एक महावाक्य तयार होते असे समजावे. म्हणजे त्याचा सारांश 'आम्ही आतापर्यंत वर्णिलेला थ्वनि हेच काव्यतत्त्व होय व ते ज्यांना समजले नाही, त्यांनी रीतींचा पुरस्कार केला' असा होईल.

५) तात्पर्य, ४५ व्या कारिकेत यः हा शब्द असेल, तरच ४५ व ४६ मिळून एक वाक्य होईल. पण त्याऐवजी **अयम्** हा शब्द घेतल्यास ४५ व ४६ या कारिका दोन स्वतंत्र वाक्ये होतील.

६) काव्यालंकारसूत्रवृत्ति, १—२.८.

७) म्हणजे उद्द्योत २, कारिका ७ ते १०, व शिवाय कारिका ६ वी.

ध्वन्यालोकः

शब्दतत्त्वाश्रयाः काश्चिदर्थतत्त्वयुजोऽपराः ।
वृत्तयोऽपि प्रकाशन्ते ज्ञातेऽस्मिन् काव्यलक्षणे ॥ ४७ ॥

अस्मिन् व्यङ्ग्यव्यञ्जकभावविवेचनमये काव्यलक्षणे ज्ञाते सति याः काश्चित्प्रसिद्धा उपनागरिकाद्याः शब्दतत्त्वाश्रया वृत्तयो याश्चार्थतत्त्वसम्बद्धाः कैशिक्यादयस्ताः सम्यग्रीतिपदवीमवतरन्ति । अन्यथा तु तासामदृष्टार्थानामिव वृत्तीनामश्रद्धेयत्वमेव स्यान्नानुभवसिद्धत्वम्—

एवं स्फुटतयैव लक्षणीयं स्वरूपमस्य ध्वनेः । यत्र शब्दानामर्थानां च केषाञ्चित्प्रतिपत्तृविशेषसंवेद्यं जात्यत्वमिव रत्नविशेषाणां चारुत्वमनाख्येयमवभासते काव्ये तत्र ध्वनिव्यवहार इति यल्लक्षणं ध्वनेरुच्यते केनचित्तदयुक्तमिति नाभिधेयतामर्हति । यतः शब्दानां स्वरूपाश्रयस्तावदक्लिष्टत्वे सत्यप्रयुक्तप्रयोगः । वाचकाश्रयस्तु प्रसादो व्यञ्जकत्वं चेति विशेषः । अर्थानां च स्फुटत्वेनावभासनं व्यङ्ग्यपरत्वं व्यङ्ग्यांशविशिष्टत्वं चेति विशेषः ।

तौ च विशेषौ व्याख्यातुं शक्येते व्याख्यातौ च बहुप्रकारम् । तद्व्यतिरिक्तानाख्येयविशेषसम्भावना तु विवेकावसादभावमूलैव । यस्मादनाख्येयत्वं सर्वशब्दागोचरत्वेन न कस्यचित्संभवति । अन्ततोऽनाख्येयशब्देन तस्याभिधानसम्भवात् । सामान्यसंस्पर्शिविकल्पशब्दागोचरत्वे सति प्रकाशमानत्वं तु यदनाखेययत्वमुच्यते क्वचित् तदपिकाव्यविशेषाणां रत्नविशेषाणामिव न सम्भवति । तेषां लक्षणकारैर्व्याकृतरूपत्वात् । रत्नविशेषाणां च सामान्यसम्भावनयैव मूल्यस्थितिपरिकल्पनादर्शनाच्च । उभयेषामपि तेषां प्रतिपत्तृविशेषसंवेद्यत्वमस्त्येव । वैकटिका एव हि रत्नतत्त्वविदः, सहृदया एव हि काव्यानां रसज्ञा इति कस्यात्र विप्रतिपत्तिः?

यत्त्वनिर्देश्यत्वं सर्वलक्षणविषयं बौद्धानां प्रसिद्धं तत्तन्मतपरीक्षायां ग्रन्थान्तरे निरूपयिष्यामः । इह तु ग्रन्थान्तरश्रवणलवप्रकाशनं सहृदयवैममस्यप्रदायीति न प्रक्रियते । बौद्धमतेन वा यथा प्रत्यक्षादिलक्षणं तथास्माकं ध्वनिलक्ष्णं भविष्यति । तस्माल्लक्षणान्तरस्याघटना दशब्दार्थत्वाच्च तस्योक्तमेव ध्वनिलक्षणं साधीयः । तदिदमुक्तम्—

अनाख्येयांशभासित्वं निर्वाच्यार्थतया ध्वनेः ।
न लक्षणं, लक्षणं तु साधीयोऽस्य यथोदितम् ॥

इति श्रीराजानकानन्दवर्धनाचार्यविरचिते ध्वन्यालोके तृतीय उद्द्योतः ॥

काव्याचे हे लक्षण ध्यानात आले, म्हणजे ज्या वृत्ति शब्दस्वरूपावर अवलंबून असतात त्यांचे आणि ज्या अर्थस्वरूपावर अवलंबून असतात, त्यांचे—दोन्ही प्रकारच्या वृत्तींचेही—स्वरूप स्पष्ट होते ॥ ४७ ॥

हे म्हणजे व्यंग्य—व्यंजकसंबंधाचे विवेचन ज्यात आहे असे काव्याचे स्वरूप लक्षात आले म्हणजे शब्दस्वरूपाच्या आश्रयाने असलेल्या 'उपनागरिका' वगैरे[१] ज्या काही वृत्ति सुप्रसिद्ध आहेत त्या आणि 'कैशिकी' वगैरे[२] ज्या वृत्ति अर्थावर अवलंबून आहेत त्या, अशा दोन्ही प्रकारच्या वृत्तींची परिस्थिति अगदी रीतींप्रमाणेच होते[३] नाहीतर (म्हणजे ध्वनिरूपी काव्यतत्त्वाचे आकलन झाले नाही, तर) त्या वृत्तींचे अस्तित्व अनुभवसिद्ध ठरणार नाही व त्यांच्या अस्तित्वावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. ज्यांचे फळ अनुभवास येत नाही अशा गोष्टींवर ज्याप्रमाणे कोणाचाही विश्वास बसत नाही, त्याप्रमाणे.

अशा रीतीने ध्वनीचे स्वरूप अगदी स्पष्टपणे वर्णन करून सांगता येते. आता काही लोक ध्वनीचे लक्षण पुढीलप्रमाणे करितात—ज्याप्रमाणे काही विशेष प्रकारच्या रत्नांचा जातिवंतपणा रत्नपारख्यांना समजू शकणारा असूनही त्याचे नक्की विवरण करणे अशक्य असते; त्याप्रमाणे ज्या काव्यातील काही विशिष्ट शब्दांचे व अर्थाचे सौंदर्य श्रेष्ठ काव्यसमीक्षकांच्याच प्रत्ययाला येते, पण त्याचे विश्लेषण करणे शक्य नसते, त्या काव्याला ध्वनिकाव्य म्हणावे. पण हे लक्षण अयोग्य आहे, अत एव ते ध्वनीचे लक्षण म्हणून सांगता येण्यासारखे नाही. कारण, शब्दांचे त्यांच्या (श्रवणगोचर[४]) स्वरूपावर अवलंबून असलेले वैशिष्ट्य म्हणजे ते शब्द (कानांना किंवा मनाला) क्लेशकारक नसणे व एकदा वापरलेले शब्द पुन्हा न वापरणे. वाचक शब्दांचे (अर्थाच्या दृष्टीने) वैशिष्ट्य म्हणजे त्या शब्दांचा वाच्यार्थ स्पष्टपणे लक्षात येणे व ते शब्द व्यंजकही असणे, हे होय. आणि अर्थांचे वैशिष्ट्य म्हणजे ते अर्थ स्पष्टपणे समजणे, ते अर्थ व्यंग्यार्थाची मुख्यत्वाने प्रतीति करून देणारे असणे किंवा ते व्यंग्य अर्थाने सजविलेले असणे हे होय. आणि (ध्वनिसंज्ञक काव्यातील शब्दांच्या व अर्थांच्या) त्या दोन वैशिष्ट्यांचे (वस्तुनिष्ठतेने) वर्णन करणे शक्य आहे; इतकेच नव्हे, तर आतापर्यंत आम्ही निरनिराळ्या प्रकारांनी त्यांचे विवरण केलेही आहे. त्या दोन वैशिष्ट्यांहून निराळे अवर्णनीय असे वैशिष्ट्य ध्वनिकाव्यात असते अशी कल्पना करणे म्हणजे विवेकाला सोडचिठ्ठीच देणे होय. कारण (एखाद्या वस्तूचे) अवर्णनीयत्व म्हणजे (वस्तुतः त्या वस्तूच्या बाबतीत) 'कोणताही शब्द वापरतायेण्याची शक्यताच नसणे' असे असल्यामुळे ते अवर्णनीयत्व कोणत्याही वस्तूच्या बाबतीत संभवत नाही. कारण 'अवर्णनीय' हा तरी शब्द योजूनत्या वस्तूचे वर्णन करिता येतेच! आता जर— ज्या गोष्टीचे सामान्यपणाने[५] (म्हणजे निर्विकल्पक स्वरूपात) ज्ञान तर होते, पण जिच्या 'जाति' वगैरे विशिष्ट धर्मांचे निश्चित ज्ञान न झाल्यामुळे तिचे विशिष्ट रूप शब्दांनी सांगता येत नाही, ती अनाख्येय असा 'अनाख्येयत्व' शब्दाचा अर्थ मानला, तर त्या प्रकारचे अनाख्येयत्व हे वैशिष्ट्ययुक्त रत्नांप्रमाणेच वैशिष्ट्ययुक्त काव्यांच्या बाबतीतही संभवत नाही. कारण काव्य शास्त्रकर्त्यांनी अशा काव्यवैशिष्ट्यांचे स्वरूप यापूर्वीच विशद करून सांगितले आहे. शिवाय वैशिष्ट्ययुक्त रत्नांच्या केवळ सामान्यस्वरूपाचे म्हणजे ती रत्ने आहेत इतकेच ज्ञान झाले व त्यांच्या खास वैशिष्ट्यांचे ज्ञान झाले नाही, तर त्यांचे निश्चित मूल्य ठरविता येत नाही असे आढळते. पण दोहोंच्याही (म्हणजे रत्ने आणि काव्ये यांच्या) वैशिष्ट्यांची पारख खास अधिकारी व्यक्तींना होतेच होते. कारण रत्नांचे रहस्य जवाहिऱ्येच समजू शकतात आणि काव्यातील रसाचे ज्ञानही सहृदयांनाच होऊ शकते, याबाबतीत कोणाचा मतभेद असणार?

कोणत्याही पदार्थांचे लक्षण करण्याच्या बाबतीत तो पदार्थ 'अनि र्देश्य' म्हणजे ज्याच्या धर्मांचे भावरूपाने वर्णन करिता येत नाही असा असतो हे जे बौद्धांचे प्रसिद्ध मत आहे,[६] त्याचे विवरण आम्ही दुसऱ्या ग्रंथात त्यांच्या तत्वज्ञानाचे परीक्षण करिताना करणार आहो. येथे आम्ही ते करीत नाही, कारण दुसऱ्या ग्रंथातील विवेचनाच्या अल्पशा भागाचे प्रतिपादन चालू ग्रंथात करणे हे सहृदयांच्या मनात अरुचि उत्पन्न करणारे होईल. किंवा बौद्ध सगळ्याच गोष्टींना अनिर्देश्य समजूनही ज्याप्रमाणे प्रत्यक्ष वगैरे प्रमाणांची लक्षणे करितातच, त्याप्रमाणे आम्हीही ध्वनीचे लक्षण करण्यात काहीएक गैर नाही. म्हणून (आम्ही केलेल्या लक्षणाशिवाय) ध्वनीचे दुसरे (म्हणजे ध्वनि हा लक्षणारूप आहे, ध्वनि हा अभिधारूप किंवा तात्पर्यरूप किंवा अनुमितिरूप आहे, किंवा ध्वनि हा अनिर्वाच्य आहे हे) लक्षण अयोग्य असल्याने आणि ध्वनि हा शब्दाचा 'वाच्यार्थ' नसल्याने आम्ही वर्णिलेले ध्वनीचे लक्षणच उत्तम आहे. म्हणून (मीच सारांशरूपाने) असे सांगत आहे की—ध्वनीचा अर्थ तपशीलवार, संपूर्ण पणे सांगता येत असल्याने 'ध्वनीचे रूप भासमान होते, पण ते अनाख्येय आहे' हे ध्वनीचे लक्षण योग्य नाही, आम्ही जे लक्षण (उद्द्योत १, कारिका १३ मध्ये) सांगितले, तेच ध्वनीचे लक्षण चांगले आहे.

याप्रमाणे राजानक श्री आनंदवर्धनाचार्यांनी रचलेल्या ध्वन्यालोकातील तिसरा उद्द्योत समाप्त झाला.

लोचनम्

प्रकाशन्त इति । अनुभवसिद्धतां काव्यजीवितत्वे प्रयान्तीत्यर्थः । रीतिपदवीमिति । तद्वदेव रसपर्यवसायित्वात् । प्रतीतिपदवीमिति वा पाठः । नागरिकया ह्युपमितेत्यनुप्रासवृत्तिः शृङ्गारादौ विश्राम्यति । परुषेति दीप्तेषु । रौद्रादिषु । कोमलेति हास्यादौ । तथा— 'वृत्तयः काव्यमातृकाः' इति यदुक्तं मुनिना तत्र रसोचित एव चेष्टाविशेषो वृत्तिः । यदाह कैशिकी श्लक्ष्णनेपथ्या शृङ्गाररससम्भवा' इत्यादि ।

इयता 'तस्याभावं जगदुरपरे' इत्यादावभावविकल्पेषु 'वृत्तयो रीतयश्च गताः श्रवणगोचरं, तदतिरिक्तः कोऽयं ध्वनिरिति, तत्र कथंश्चिदभ्युपगमः कृतः कथञ्चिच्च दूषणं दत्तमस्फुटस्फुरितमिति वचनेन । इदानीं 'वाचां स्थितमविषये' इति यदूचे तत्तु प्रथमोद्द्योते दूषितमपि दूषयत्ति सर्वप्रपञ्चकथने हि असम्भाव्यमेवानाख्येयत्वमित्यभिप्रायेण । अक्लिष्टत्व इति । श्रुतिकष्टाद्यभाव इत्यर्थः । अप्रयुक्तस्य प्रयोग इत्यपौनरुक्त्यम् । ताविति शब्दगतोऽर्थगतश्च । विवेकस्यावसादो यत्र तस्य भावो निर्विवेकत्वम् । सामान्यस्पर्शी यो विकल्पस्ततो यः शब्दः । दृष्टान्तेऽपि अनाख्येयत्वं नास्तीति दर्शयति—रत्नविशेषाणां चेति । ननु सर्वेण तन्न संवेद्यत इत्याशङ्क्याभ्युपगमेनैवोत्तरयति उभयेषामिति । रत्नानां काव्यानां च ।

ननु नार्थं शब्दाः स्पृशन्त्यपीति, अनिर्देश्यस्य वेदकमित्यादौ कथमनाख्येयत्वं वस्तूनामुक्तमिति चेदत्राह—यत्त्विति । एवं हि सर्वभाववृत्तान्ततुल्य एव ध्वनिरिति ध्वनिस्वरूपमनाख्येयमित्यतिव्यापकं लक्षणं स्यादिति भावः । ग्रन्थान्तर इति विनिश्चयटीकायां धर्मोत्तर्यां या विवृतिरमुना ग्रन्थकृता कृता तत्रैव तद्व्याख्यातम् । उक्तमिति । संग्रहार्थं मयैवेत्यर्थः । अनाख्येयांशस्याभासो विद्यते यस्मिन् काव्ये तस्य भावस्तन्न लक्षणं ध्वनेरिति सम्बन्धः । अत्र हेतुः— निर्वाच्यार्थतयेति । निर्विभज्य वक्तुं शक्यत्वादित्यर्थः । अन्यस्तु 'निर्वाच्यार्थतया' इत्यत्र निसो नञर्थत्वं परिकल्प्यानाख्येयांशभासित्वेऽयं हेतुरिति ण्याचष्टे, तत्तु क्लिष्टम् । हेतुश्च साध्याविशिष्ट इत्युक्तव्याख्यानमेवेति शिवम् ।

काव्यालोके प्रथां नीतान् ध्वनिभेदान् परामृशत् ।
इदानीं लोचनं लोकान् कृतार्थान् संविधास्यति ॥
आसूत्रितानां भेदानां स्फुटतापत्तिदायिनीम् ।
त्रिलोचनप्रियां वन्दे मध्यमां परमेश्वरीम् ॥

इति श्रीमहामाहेश्वराचार्यवर्याभिनवगुप्तोन्मीलिते सहृदयालोकलोचने ध्वनिसङ्केते तृतीय उद्द्योतः ॥

लोचन

'स्वरूप स्पष्ट होते'– त्या (वृत्ति) काव्याचे जीवित होतात असा अनुभव येतो, असा अर्थ. 'परिस्थिति अगदी रीतींप्रमाणेच'–कारण त्या रीतींच्या प्रमाणेच वृत्तींचेही पर्यवसान रसातच होते. किंवा **रीतिपदवीम्** याऐवजी **प्रतीतिपदवीम्**[७] असाही पाठ आहे. कारण जी (उपनागरिका) वृत्ति विदग्ध स्त्रीसारखी असते,[८] तिचे पर्यवसान शृंगारादि[९] रसांतच होते. (म्हणजे ती शृंगारादि रसांना उपकारक होते). 'परुषा' (म्हणजे नागरिका) ही अनुप्रासवृत्ति रौद्र इ. 'दीप्त' रसांना पोषक होते आणि 'कोमला' (म्हणजे ग्राम्या)[१०] वृत्तीचें पर्यवसान हास्य वगैरे रसांत होते. त्याचप्रमाणे '(नाट्य) वृत्ति या काव्याच्या माता होत' हे जे (भरत) मुनीने म्हटले आहे,[११] त्यातील अभिप्राय वृत्ति म्हणजे रसाला उचित असतील, असे विशिष्ट वर्तन,[१२] हाच होय. कारण (मुनीने) म्हटलेच आहे– 'कैशिकी वृत्तीमध्ये सुकुमार वेष (म्हणजे वस्त्रालंकार) असणे आवश्यक आहे[१३] व त्या वृत्तीमधून शृंगाररस उदित होतो. [१४]'

एवढ्याने (म्हणजे ३३व्या कारिकेवरील वृत्तीमधील पहिल्या 'कारण व्यवहाराला'–इ. वाक्याने) पुढील कार्यभाग साधला आहे–पूर्वी (प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'ध्वनीबद्दलच्या आनंदवर्धनकालीन मतभेदांचा निर्देश'" वर) 'त्याचा अभावच आहे असे इतर लोकांनी म्हटले' या कारिकांशाचे विवरण करिताना वृत्तिकारांनी अभाववादाचे तीन प्रकार मांडले. त्यांपैकी अभाववादाचा पहिला प्रकार मांडताना 'वृत्ति आणि रीति यादेखील आमच्या कानांवर आल्या आहेत,' 'त्याहून वेगळा असा हा ध्वनि नावाचा कोण आहे?' असे प्रतिपक्ष्याचे मत मांडले होते, त्या मताचा (४७ व्या कारिकेत) अंशतः स्वीकार केला, आणि[१५] 'अस्पष्टपणे दिसले' इ. शब्दांद्वारे अंशतः त्याग केला.[१६] आता 'त्याचे यथार्थ स्वरूप शब्दांनी वर्णन करिता येण्याजोगे नाही' असे जे (अनिर्वचनीयवाद्यांचे) मत (प्रथमखंड, "उद्द्योत – १ 'ध्वनीबद्दलच्या आनंदवर्धनकालीन मतभेदांचा निर्देश'" वरच) मांडले गेले होते, त्याचे खंडन पहिल्या उद्द्योतात[१७] केले, तरी वृत्तिकार त्याचेच पुन्हा (विस्ताराने) खंडन करीत आहेत, कारण ध्वनीचे निरूपण संपूर्णपणे व उदाहरणांसह केले गेल्यानंतर 'ध्वनि अवर्णनीय आहे असे कोणीही म्हणणे सर्वस्वी असंभवनीयच आहे,' असा वृत्तिकारांचा अभिप्राय आहे. 'क्लेशकारक नसणे' म्हणजे त्या शब्दात 'श्रुतिकष्ट' इ. दोषांचा[१८] अभाव असणे, हा अभिप्राय. शब्द आधी वापरलेले नसणे याचा अर्थ काव्यात पुनरुक्ति हा दोष नसणे. 'त्या दोन वैशिष्ट्यांचे'– 'त्या' म्हणजे शब्दांच्या ठिकाणच्या व अर्थाच्या ठिकाणच्या वैशिष्ट्यांचे. विवेकाचा अवसाद (म्हणजे नाश) ज्याच्या ठिकाणी असतो, तो मनुष्य 'विवेकावसाद' होय त्याचा भाव म्हणजे विवेकशून्य असण्याची अवस्था. वस्तूच्या सामान्य म्हणजे निर्विकल्पक स्वरूपाला स्पर्श करणारा जो विकल्प म्हणजे जाति वगैरे विशिष्ट धर्म, तद्वाचक शब्द (असा 'सामान्यसंस्पर्शिविकल्पशब्द' याचा अर्थ आहे). दृष्टान्ताच्या बाबतीतही[१९] 'अनाख्येयत्व' नसते, हे वृत्तिकार 'शिवाय वैशिष्ट्ययुक्त रत्नांच्या' इ. वाक्याने सांगतात.[२०] 'पण काय हो, सर्वानाच त्याचे (म्हणजे रत्नांच्या जातिवंतपणाचे व काव्याच्या श्रेष्ठत्वाचे) ज्ञान होत नाही!'

अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार ती गोष्ट मान्य करूनच 'पण दोहोंचीही' इ. वाक्याने उत्तर देतात. दोहोंच्याही म्हणजे रत्नांच्या आणि काव्याच्या (वैशिष्ट्यांची पारख).

पण काय हो, शब्द हे अर्थाला स्पर्शसुद्धा करीत नाहीत.[२१] आणि 'ज्यांचे वर्णन करिता येत नाही त्यांचेच ज्ञान शब्द हे करून देतात' इ. वाक्यांमध्ये[२२] वस्तूंचे स्वरूप अवर्णनीय आहे असे कसे म्हटले? अशी शंका घेतल्यास तिला वृत्तिकार 'पण ... हे जे बौद्धांचे मत आहे' इ. वाक्याने उत्तर देतात. कारण या बौद्धांच्या मतानुसार ध्वनीची स्थिति इतर सर्व पदार्थांच्या सारखीच असल्यामुळे 'ज्याचे स्वरूप अनाख्येय असते तो ध्वनि' असे ध्वनीचे लक्षण केल्यास ते लक्षण अतिव्याप्ति[२३] या दोषाने युक्त होईल! 'दुसऱ्या ग्रंथात' म्हणजे प्रस्तुत ग्रंथकाराने (धर्मकीर्तीच्या) 'प्रमाणविनिश्चय' या ग्रंथावरील 'धर्मोत्तरी' नावाच्या (धर्मोत्तरपंडितकृत) टीकेचे जे विवरण केले आहे, त्यातच या बाबतच्या बौद्धमताचे परीक्षण केले आहे. 'सांगत आहे'– 'सारांशरूपाने मीच[२४] (सांगत आहे)' असा अर्थ. 'ज्या काव्यामध्ये अनाख्येय अंशाचे भान (म्हणजे ज्ञान) होते ते ध्वनिकाव्य' हे ध्वनिकाव्याचे लक्षण नव्हे' असा संक्षेपश्लोकातील वाक्याचा अन्वय करावा. 'ते ध्वनिकाव्याचे लक्षण नव्हे' याचे कारण ध्वनीचा अर्थ संपूर्णपणे सांगता येतो, हे होय, असा अर्थ. पण दुसऱ्या कोणी टीकाकाराने **निर्वाच्यार्थतया** यातील **निंस्** हा उपसर्ग **नञ्** च्या अर्थी म्हणजे अभाव या अर्थी समजून अवर्णनीयता हे ध्वनीचे स्वरूप अनाख्येय वाटण्याचे कारण होय असे व्याख्यान केले आहे, पण ते क्लिष्ट म्हणजे कृत्रिम, अस्वाभाविक आहे. त्या व्याख्यानात हेतु हा साध्याहून वेगळा नसणे हा दोष असल्यामुळे आम्ही केले आहे ते विवरण योग्य होय. असो, सर्वाचे मंगल होवो.

'काव्यालोका'त ध्वनीचे प्रकार सविस्तरपणे प्रतिपादिले. त्या प्रकारांचे विवेचन केल्यामुळे आता 'लोचन' ही टीका (सहृदय) लोकांना कृतकृत्यता प्राप्त करून देईल.

पश्यन्ती अवस्थेमध्ये निरनिराळ्या ध्वनींच्या ज्या प्रतिमा अस्पष्ट रूपात व्यक्त झालेल्या असतात, त्या प्रतिमांना स्पष्टत्व प्राप्त करून देणाऱ्या श्रीशिवप्रिय भगवती मध्यमावाणीला मी वंदन करितो.

अशा रीतीने श्रीमहामाहेश्वराचार्य अभिनवगुप्तांनी उमलविलेली (सहृदयालोक) या ग्रंथांवरील, ध्वनिशास्त्राचे विवरण करणारी जी (लोचन) नामक टीका, तीमधील तिसरा उद्द्योत समाप्त झाला.

टीपा

१) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" वरील ७ ते ९ या टीपा.

२) या वृत्तींची माहिती पहिल्याने द्वितीय खंड "उद्द्योत – ३ 'रसभावयुक्त काव्यप्रकाराच रसभावांना विरोधी असल्यामुळे टाळावयाच्या गोष्टी कोणकोणत्या, याचे विवरण' वरील दुसऱ्या टीपेत आली आहे.

३) रीतींचे पर्यवसान ज्याप्रमाणे रसांमध्ये होते, त्याप्रमाणेच वृत्तींचेही पर्यवसान रसांमध्येच होत असल्याने वृत्तीचे लक्षण स्वतंत्रपणे देण्याचे कारण नाही.

४) 'श्रवणगोचर' म्हणजे श्रोत्याच्या कानांना प्रतीत होणारे.

५) कोणत्याही वस्तूचे 'सामान्यपणे' (म्हणजे केवळ तिच्या अस्तित्वाचे) होणारे ज्ञान व 'तिच्या जाति वगैरे धर्मांसहित' होणारे ज्ञान म्हणजे अनुक्रसे 'निर्विकल्पक' शान व 'सविकल्पक' ज्ञान. समजा, आपण एखाद्या समुद्राच्या किनाऱ्यावर उभे असून आपणापुढे अमर्याद समुद्र पसरलेला आहे. अशा वेळी क्षितिजाजवळ समुद्राचा जो भाग दिसतो, तेथे पाण्याच्या पृष्ठभागावर काहीतरी दिसू लागले अशी कल्पना करू या. प्रथम 'ते काहीतरी आहे (**इदं किंचित्**) इतकेच आपल्याला समजू शकते, लांबून त्याची काहीच वैशिष्ट्ये दिसू शकत नाहीत, म्हणून ते काय आहे हे सांगता येत नाही व त्याच्या कोणत्याही वैशिष्ट्याचे वर्णनही करिता येत नाही. अगदी लांबून होणाऱ्या 'हे काहीतरी आहे' इतक्याच ज्ञानाला 'निर्विकल्पक' (म्हणजे कोणत्याही विकल्पाने अथवा वैशिष्ट्याने विरहित) ज्ञान म्हणतात. मग ती वस्तु जवळ येऊ लागली की हळूहळू तिचा एकूण आकार, रंग, इ. वैशिष्ट्यांचे ज्ञान होऊ लागून नंतर शेवटी 'ती अमुक अमुक आहे' असे आपल्याला निश्चितपणे कळते व मग त्या वैशिष्ट्यांचे वर्णनही करता येते. त्या वस्तूच्या या, म्हणजे विकल्पांसहित होणाऱ्या ज्ञानाला 'सविकल्पक' ज्ञान म्हणतात.

ही वैशिष्ट्ये किंवा हे धर्म चार प्रकारचे मानले आहेत. १. जाति, २. गुण, ३. क्रिया, ४. नाम, '**जाति**' म्हणजे ती वस्तु कोणत्या वर्गात मोडणारी आहे याचे ज्ञान तिच्यामधील ज्या धर्मामुळे होते, तो धर्म. उदा. प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणी असणारा 'मनुष्यत्व' हा धर्म, की ज्यामुळे हा मनुष्येतर कोणीही नसून मनुष्यच आहे. हे कळते. '**गुण**' म्हणजे या मनुष्यात इतर मनुष्यांहूनच, पण वेगळेपणा कोणता आहे, याचे ज्ञान करून देणारे धर्म. उदा. त्याचा काळेपणा अथवा गोरेपणा, उंची, स्थूलपणा, इ. इ. 'क्रिया' म्हणजे त्या व्यक्तीचे चालणे, बसणे, उठणे, इ. धर्म आणिं ४. 'नाम' म्हणजे त्या व्यक्तीचे राम, कृष्ण इ. ठेवलेले नाव

'माघ' कवीच्या 'शिशुपाल वध' या महाकाव्याच्या पहिल्याच सर्गातील तिसरा श्लोक पाहा. एकदा श्रीकृष्णाकडे नारदाचे आगमन होत होते. प्रथम श्रीकृष्णाला तेजाचा एक पुंजच दिसला. मग 'हा कोणीतरी देहधारी आहे' हे लक्षात आले. मग त्याच्या अवयवांची ठेवण दिसू लागून हा कोणीतरी पुरुष आहे' हे कळून शेवटी 'हा नारदच होय याची ओळख पटली असे तेथे म्हटले आहे. म्हणजे क्रमाने 'निर्विकल्पकाकडून सविकल्पकाकडे' ज्ञानाची प्रगति होत गेल्याचे त्यावरून स्पष्ट होते.

६) बौद्धांच्या मतानुसार जगातील सर्व पदार्थ अनिर्वचनीय आहेत, त्याप्रमाणे 'तुमचा ध्वनि देखील अनिर्वचनीयच आहे' असे अवर्णनीयतावाद्यांचे म्हणणे.

७) हा पाठ स्वीकारल्यास 'त्या वृत्तींचे स्वरूप (चांगल्या रीतीने) ध्यानात येते' (म्हणजे त्या वृत्ति रसाला परिपोषक आहेत हे ध्यानात येते) असा अर्थ होईल.

८) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" वरील 'ती नागरिक म्हणजे विदग्ध किंवा चतुर ललनेसारखी असते 'इ. वाक्य.

९) आदि म्हणजे करुण व शांत हे (कोमल) रस.

१०) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'अभाववाद्यांचा पहिला वर्ग'" वरील टीप ९ वी.

११) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत -३ 'रसपरिपोष करावयाचा, तर त्यासंबंधीचे औचित्य पाळणे हे कवे मुख्य कर्तव्य होय'" वरील ५ वी टिप.

१२) कारण, 'वृत्ति' यामधील **वृत्** या धातूचा अर्थ 'वर्तन करणे', 'क्रिया करणे' हाच आहे.

१३) हे वचन नाट्यशास्त्राच्या २० या (वृत्ति) अथ्यायात कोठेही सापडत नाही, पण पुढील श्लोकमात्र आढळतो—

या श्लक्ष्णनेपथ्यविशेषचित्रा स्त्रीसंकुला पुष्करनृत्यगीता ।
कामोपभोगप्रभबोपचारा सा कैशिकी चारुविलासयुक्ता ॥
(नाट्यशास्त्र, २०—४७)

साहित्यदर्पण', ६—१२२, येथे वृत्तींचा निरनिराळ्या रसांशी संबंध पुढीलप्रमाणे दाखविला आहे—

शृंगारे कैशिकी बीरे सात्वत्यारभटी पुनः ।
रसे रौद्रे च बीभत्से, वृत्तिः सर्वत्र भारती ॥

१४) मुळातील **शृंगाररससंभवा** हा बहुव्रीहि समास **शृंगाररसस्य संभवः यस्याः सा** असा सोडविणे इष्ट आहे. **शृंगाररसात् संभवः यस्याः** सा असा विग्रह इष्ट नाही.

१५) अशीच शब्दरचना अभिनवगुप्तांनी प्रथम खंड, "उद्‌द्योत — १ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही 'वाच्य' असत नाही'" वर 'पण दुसरा काहीसा खोडला आणि काहीसा स्वीकारला' या वाक्यात योजिली आहे.

१६) तात्पर्य, रीति व वृत्ति यांना काव्यात प्रमुख स्थान देणे या अंशाचा कारिकाकारांनी त्याग केला; व रसभावादिध्वनीच्या परिपोषाची अंगे म्हणून त्यांचा स्वीकार केला.

१७) प्रथम खंड, "उद्‌द्योत — १ 'ध्वनीचे स्वरूप 'अवर्णनीय' आहे' या मताचे खंडन" वर संक्षिप्तपणे.

१८) या दोषाची माहिती प्रथम खंड "उद्‌द्योत — २ 'श्रुतिदुष्टादि अनित्य दोष शृंगार व तत्सम रस-ध्वनीमध्येच वर्ज्य'" वर दिली आहे.

१९) दृष्टांताच्या म्हणजे रत्नांच्या जातिवन्तपणाच्या (बाबतीत अवर्णनीयत्व नसते.)

२०) रत्नपारख्यांना रत्नांच्या खास वैशिष्ट्यांचे ज्ञान झाल्यावरच ते त्यांचा जातिवन्तपणा जाणून त्यांची किंमत करू शकतात. यावरून रत्नेसुद्धा अवर्णनीय नसतात हे सिद्ध होते.

२१) बौद्धांचे म्हणणे असे की, प्रत्येक वल्तु क्षणभंगुर असल्यामुळे सर्व जग हे शून्यस्वरूपच आहे, म्हणजे कोणतीही वस्तु अस्तित्वात नाही. मग शून्यस्वरूपी वस्तूला शब्द हे स्पर्श कसे करू शकणार?

२२) धर्मकीर्ति इ. लेखकांच्या वाक्यांमध्ये.

२३) कारण प्रत्येक पदार्थ अनिर्वचनीय असल्यामुळे 'ध्वनि' या संज्ञेमध्ये जगातील सर्वच पदार्थांचा अन्तर्भाव होईल!

२४) **मयैव** असा उल्लेख अभिनवगुप्तांनी या पूर्वी द्वितीय खंड, "तृतीय - ३ 'चित्र' रचनेची रसादींची प्रतीति घडवणे हेच मुख्य मानावे" वर केला आहे. पाहा. द्वितीय खंड, "तृतीय - ३ 'अनुभवी कवींनी रसादींची प्रतीति घडवणे हेच मुख्य मानावे'", वरील टीप १४ वी.

२५) ध्वन्यालोकाच्या चार उद्द्योतांवरील 'लोचना'च्या शेवटी अभिनवगुप्तांनी अनुक्रमे परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चार वाणीच्या शक्तींना (म्हणजे अवस्थांना) वंदन केले आहे. वाणीच्या या चार शक्ति म्हणजे जगाची उत्पत्ति करणाऱ्या महेश्वराच्या चार शक्ति होत. कारण महेश्वर हा शब्दरूपच आहे व त्याची सृजनशक्ती ही शब्दशक्तीच आहे. सर्व विश्वाची निर्मिति शब्दरूप परमात्म्यातून (म्हणजे शब्दब्रह्मातून) झाली हा विचार वैदिक वाङ्मयातूनही आढळतो. उदा. तैत्तिरीय ब्राह्मण २-२-४-२ **स भूरिती व्याहरत, स भूमिमसजत**. हा विचार बायबलमध्येही आढळतो. उदा. God Said Let there be light & there was light. शिवाच्या सृजनशक्तीच्या चार अवस्थांची माहिती थोडक्यात पुढीतप्रमाणे देता येईल. १) ही सृजनशक्ती प्रथम शिवाच्या ठिकाणी त्याच्याशी एकरूप अवस्थेत असते. २) त्याला सृष्टि निर्माण करण्याची इच्छा झाली की ही शक्ति अस्फुट स्वरूपात जागृत होणे. ३) मग ती शक्ती शिवाच्या मनापुढेच संपूर्ण विश्व स्पष्टपणे प्रकट करिते व शेवटी ४) विश्व उत्तन्न होते म्हणजे प्रत्यक्ष आकार घेते. वाणीच्या बाबतीतही अशाच चार अवस्था आहेत. १) (परा) ही वाणीच्या शक्ति प्रथम वक्त्याच्या अहम् या जाणीवेशी एकरूप अवस्थेत असते. २) (पश्यन्ती) त्याला काही आशय प्रकट करण्याची इच्छा उत्पन्न झाली की ही शक्ती जागृत होते, पण त्या आशयाला उचित असे शब्द अद्यापि स्फुट झालेले नसतात. ३) (मध्यमा) या शब्दांच्या प्रतिमा कवीच्या मनापुढे स्पष्ट होतात व ४) (वैखरी) प्रत्यक्ष वाणी उच्चारली जाते, म्हणजे बाहेर उमटते. तुलनार्थ पाहा, ऋग्वेद १—१६४ मधील पुढील ऋचा..... **चत्वारि वाक्परिमिता पदानि । तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः । गुहा त्रीणी निहिता नेङ्गयन्ति । तुरीयं वाचं मनुष्या वदन्ति ।**

उद्द्योत तिसरा समाप्त.

□□

चतुर्थ उद्‌द्योतः

ध्वन्यालोकः

एवं ध्वनिं सप्रपञ्चं विप्रतिपत्तिनिरासार्थं व्युत्पाद्य तद्‌व्युत्पादने प्रयोजनान्तरमुच्यते—

ध्वनेर्यः सगुणीभूतव्यङ्‌ग्यस्याध्वा प्रदर्शितः ।
अनेनानन्त्यमायाति कवीनां प्रतिभागुणः ॥ १ ॥

य एष ध्वनेर्गुणीभूतव्यङ्‌ग्यस्य च मार्गः प्रकाशितस्तस्य फलान्तरं कविप्रतिभानन्त्यम् ।

कथमिति चेत्,
अतो ह्यन्यतमेनापि प्रकारेण विभूषिता ।
वाणी नवत्वमायाति पूर्वार्थान्वयवत्यपि ॥ २ ॥

अतो ध्वनेरुक्तप्रभेदमध्यादन्यतभेनापि प्रकारेण विभूषिता सती वाणी पुरातनकविनिबद्धार्थसंस्पर्शवत्यपि नवत्वमायाति ।

उद्‌द्योत चवथा

ध्वन्यालोक

याप्रमाणे, मतभेदांचे निराकरण करण्यासाठी ध्वनीचे सविस्तर विवरण केले. आता त्याचे विवरण करण्यामागे आणखी एक उद्देश कोणता ते सांगण्यात येत आहे :—

ध्वनि आणि गुणीभूतव्यंग्य यांच्या स्वरूपाचे (आतापर्यंत) जे विवरण केले, त्यामुळे कवींच्या प्रतिभेचा आविष्कार अनंत प्रकारांनी होऊ शकतो. ॥ १ ॥

हा जो ध्वनीचा आणि गुणीभूतव्यंग्याचा मार्ग उजेडात आणला, त्यामागील दुसरे उद्दिष्ट म्हणजे कविप्रतिभा अमर्याद रूपांनी प्रकट होते, हे होय. हे कसे घढून येते असे म्हणाल, तर—

या ध्वनीच्या प्रकारांपैकी एका प्रकाराने देखील, कवीची वाणी मंडित झालेली असली, तर ती वाणी पूर्वीच्या ग्रंथांत येऊन गेलेल्या विषयावर आधारलेली असली तरी तिला नवीनपणा प्राप्त होतो ॥ २ ॥

आतापर्यंत जे ध्वनीचे प्रकार वर्णिले, त्यांपैकी एका जरी प्रकाराने कवीची वाणी सजविली गेली, तरी ती वाणी पूर्वीच्या कवींनी वर्णिलेल्या विषयाशी जरी संबद्ध असली, तरी तिला नावीन्याची झळाळी चढते.

लोचनम्

चतुर्थ उद्द्योतः

कृत्यपञ्चकनिर्वाहयोगेऽपि परमेश्वरः ।
नान्योपकरणापेक्षो यया तां नौमि शाङ्करीम् ॥

उद्द्योतान्तरसङ्गतिं विरचयितुं वृत्तिकार आह— एवमिति । प्रयोजनान्तरमिति । यद्यपि 'सहृयमनःप्रीतय' इत्यनेन प्रयोजनं प्रागेवोक्तं, तृतीयोद्द्योतावधौ च 'सत्काव्यं कर्तुं वा ज्ञातुं वेति' तदेवेषत्स्फुटीकृतं, तथापि स्फुटतरीकर्तुमिदानीं यत्नः । यतस्सुस्पष्टरूपत्वेन विज्ञायते, अतोऽस्पष्टनिरूपितात्स्पष्टनिरूपणमन्यथैव प्रतिभातीति प्रयोजनान्तरमित्युक्तम् । अथवा पूर्वोक्तयोः प्रयोजनयोरन्तरं विशेषोऽभिधीयते; केन विशेषेण सत्काव्यकरणमस्य प्रयोजनं, केन च सत्काव्यबोध इति विशेषो निरूप्यते । तत्र सत्काव्यकरणे कथमस्य व्यापार इति पूर्वं वक्तव्यं निष्पादितस्य ज्ञेयत्वादिति तदुच्यते ध्वनेर्य इति ॥ १ ॥

ननु ध्वनिभेदात् प्रतिभानामानन्त्यमिति व्यधिकरणमेतदित्यभिप्रायेणाशङ्कते— कथमितीति ।

अत्रोत्तरम्— अतो हीति । आसतां तावद् बहवः प्रकाराः, एकेनाप्येवं भवतीत्यपिशब्दार्थः । एतदुक्तं भवति— वर्णनीयवस्तुनिष्ठः प्रज्ञाविशेषः प्रतिभानं, तत्र वर्णनीयस्य पारिमित्यादाद्यकविनै व स्पृष्टत्वात् सर्वस्य तद्विषयं प्रतिभानं तज्ञातीयमेव स्यात् । ततश्च काव्यमपि तज्ञातीयमेवेति भ्रष्ट इदानीं कविप्रयोगः, उक्तवैचित्र्येण तु त एवार्था निरवधयो भवन्तीति तद्विषयाणां प्रतिभानामानन्त्यमुपपन्नमिति । ननु प्रतिभानन्त्यस्य किं फलमिति निर्णेतुं वाणी नवत्वमायातीत्युक्तं, तेन वाणीनां काव्यवाक्यानां तावन्नवत्वमायाति । तच्च प्रतिभानन्त्ये सत्युपपद्यते तच्चार्थानन्त्ये तच्च ध्वनिप्रभेदादिति ।

लोचन

चवथा उद्द्योत

सृष्टीची निर्मिति वगैरे आपली पाच कार्ये[२] पार पाडण्याचे वेळीदेखील परमेश्वराला जिच्यामुळे दुसऱ्या कोणत्याही साधनाची अपेक्षा असत नाही, त्या आदि शिवशक्तीचे मी स्तवन करितो.

मागील (तीन) उद्द्योतांचा या उद्द्योताशी तर्कदृष्ट्या संबंध दाखविण्यासाठी वृत्तिकार 'याप्रमाणे' इ. विधान करितात. 'आणखी एक उद्देश'— जरी 'सहृदयांच्या मनाच्या संतोषासाठी' इ. वाक्याने या ग्रंथाचे प्रयोजन पूर्वीच[३] सांगितले होते आणि तिसऱ्या उद्द्योताच्या अखेरीस[३] 'सत्काव्य करण्यासाठी किंवा सत्काव्याचा योग्य तऱ्हेने आस्वाद घेण्यासाठी' इ. शब्दांनी तेच प्रयोजन जरी थोडेसे स्पष्ट केलेले होते,[४] तरीसुद्धा ते प्रयोजन त्याहून अधिक स्पष्ट करण्यासाठी आता प्रयत्न केला जात आहे. कारण कोणताही विषय अत्यंत स्पष्ट रूपात सांगितला म्हणजे तो उत्तम तऱ्हेने कळतो. यासाठी ध्वनीच्या प्रयोजनाच्या अस्पष्ट विवरणापेक्षा त्याचे स्पष्टपणे केलेले विवरण हे काही वेगळेच वाटते, म्हणून 'आणखी एक उद्देश' असे (वृत्तिकारांनी) म्हटले आहे. किंवा पूर्वी[५] सांगितलेल्या दोन प्रयोजनांमधील 'अंतर' म्हणजे फरक आता

सांगितला जात आहे (असा **प्रयोजनान्तरम्** या वृत्तीतील शब्दाचा दुसरा अर्थ करावा)[६], म्हणजे कोणत्या वैशिष्ट्यामुळे सत्काव्य करणे हे ध्वनिप्रतिपादनाचे प्रयोजन होते व कोणत्या वैशिष्ट्यामुळे सत्काव्याचा आस्वाद घेणे हे प्रयोजन होते, हा त्या दोन प्रयोजनांमधील फरक आता चवथ्या उद्द्योतात सांगितला जात आहे. त्यांपैकी ध्वनीचे प्रतिपादन हे सत्काव्य करण्याचे कामी कसे उपयोगी पडते हे पहिल्याने सांगितले पाहिजे. कारण कवीने काव्य आधी निष्पन्न केले, म्हणजे मगच त्याचा आस्वाद घेणे शक्य आहे. म्हणूनच[७] 'ध्वनि आणि गुणीभूतव्यंग्य यांच्या' इ. कारिका सांगितली जात आहे ॥ १ ॥

पण काय हो, ध्वनीच्या प्रकारांच्या निरूपणाने कवींच्या प्रतिभेचा आविष्कार अनंत प्रकारांनी होऊ शकतो यातील कारण व कार्य यांची घटनास्थळे भिन्न भिन्न आहेत![८] या अभिप्रायाने प्रतिपक्षी 'हे कसे घडून येते?' या शब्दांनी शंका प्रकट करीत आहे व त्या शंकेला उत्तर 'या ध्वनीच्या प्रकारांपैकी' इ. (दुसऱ्या) कारिकेने दिले जात आहे. ध्वनीच्या पुष्कळ प्रकारांची गोष्ट तर राहूच द्या, पण एका प्रकाराने सुद्धा असे (म्हणजे कवीच्या वाणीमध्ये नावीन्य उत्पन्न) होते, हा दुसऱ्या कारिकेतील 'देखील' या शब्दाचा अर्थ आहे.

(ग्रंथकाराचा) आशय असा :— वर्ण्य विषयासंबंधी कवीला होणारे विशेष (म्हणजे सामान्य लोकांना होते त्याहून निराळे) ज्ञान म्हणजे 'प्रतिभान' होय.[९] त्या बाबतीत काव्यातील वर्ण्यविषय[१०] हे मर्यादित (म्हणजे मोजकेच) असल्यामुळे त्या विषयांचे वर्णन प्रथम आदिकवीनेच (म्हणजे वाल्मीकीनेच) केलेले आहे व म्हणून आदिकवीनंतरच्या इतर सर्व कवींना त्या विषयांचे जे ज्ञान होत राहणार, ते आदिकवीला झालेल्या ज्ञानासारखेच असणार! आणि त्यामुळे नंतरची काव्येही आदिकवीच्या काव्याबरहुकूमच असणार, म्हणून आता म्हणजे आदिकवीनंतर झालेल्या कोणालाही कवि हे विशेषण लावता येणार नाही. पण आतापर्यंत सांगितलेल्या ध्वनीच्या निरनिराळ्या प्रकारांचा आश्रय करून वर्णिल्यास तेच वर्ण्य विषय अनंतरूपे धारण करितात. म्हणून 'त्या वर्ण्य विषयांच्या ज्ञानाचे अनंत आविष्कार' असणे हे तर्कसंगत ठरते. 'पण काय हो, कवीला होणाऱ्या ज्ञानांच्या अनंत आविष्कारांचा फायदा काय?' या शंकेचे समाधान करण्यासाठी कारिकेत 'वाणीला नवीनपणा प्राप्त होतो' असे म्हटले आहे- म्हणजे असे की, कवींच्या वाणींना म्हणजे काव्यांतील वाक्यांना नवीनता येते, यात शंका नाही. आता ते म्हणजे काव्यवाक्यांना नवे स्वरूप प्राप्त होणे हे प्रतिभेचे अनंत आविष्कार होतात म्हणून तर्कसंगत आहे. आणि ते प्रतिभेचे अनंत आविष्कार वर्ण्य विषयांच्या नावीन्यामुळे उत्पन्न होतात. आणि विषयांना नावीन्य प्राप्त होणे हे ध्वनीच्या निरनिराळ्या प्रकारांचा अवलंब करण्याने शक्य होते[११] असा भावार्थ.

टीपा

१) 'देखील' याचा अर्थ हाच की, पुष्कळ प्रकार वापरले तर प्रश्नच नाही, पण एका प्रकाराचा उपयोग केला, तरीदेखील वाणीला नावीन्याचे तेज चढते.

२) परमेश्वराची ही पाच कार्ये कोणती हे सर्वदर्शनसंग्रह, शैवदर्शन, पृ. १८० (भांडारकर प्राच्य विद्या संशोधन मंदिर संस्करण) वर सांगितले आहे. ती कार्ये अशी :— सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लय, तिरोभाव (म्हणजे दिसेनासे होणे) आणि अनुग्रह (म्हणजे भक्तांवर कृपा करणे).

३) प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याचे प्रयोजन'" वर.

४) म्हणजे कारिका ३–४५ मध्ये.

५) कारिका ३–४५ मध्ये.

६) म्हणजे **अन्यत् प्रयीजनं प्रयोजनान्तरम्** (वेगळे प्रयोजन) हा एक अर्थ किंवा **प्रयोजनयोः अन्तरम** म्हणजे (३–४५ मध्ये) जी दोन प्रयोजने सांगितली, त्यांमधील फरक हा दुसरा अर्थ.

७) म्हणजे ध्वनि–निरूपण हे सत्काव्य–निर्मितीला उपकारक ठरते, हे सांगण्यासाठी.

८) म्हणणे ध्वनीचे निरूपण ध्वनिविषयक ग्रंथाच्या ठिकाणी व त्या निरूपणाचा प्रतिभेचा अनंत रूपांनी आविष्कार हा परिणाम कवीच्या ठिकाणी राहणारा आहे. तुलनार्थ पाहा, काव्यप्रकाश, झळकीकर आवृत्ति उल्लास १०, पृ. ७१४ वरील **इह हि यद्देशं कारणं तद्देशमेव कार्यमुत्पद्यमानं दृष्टम् ।** इ. वाक्य.

९) प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रसादि प्रतीयमान अर्थ हेच दिव्य प्रतिभेचे गमक'" येथे अभिनवगुप्तांनी **अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा** असे । प्रतिभेचे लक्षण केले होते व येथे **वर्णनीयवस्तुनिष्ठः प्रज्ञाविशेपः** असे म्हटले आहे. या दोन विधानांमध्ये तफावत नाही.

१०) उदा. गिरि, नदी, सागर, ऋतु इ.

११) म्हणजे कवीच्या दृष्टीने विचार केल्यास चार अवस्था दिसून येतात– १) ध्वनीच्या प्रकारांच्या निरूपणामुळे कवीला त्या प्रकारांचे ज्ञान होते. २) ते ज्ञान झाल्यामुळे त्या प्रकारांचा उपयोग केल्यास वर्ण्य विषय हवे तेवढे मिळू शकतात, हे कवीच्या लक्षात येते. ३) ते लक्षात आल्यानंतर कोणत्या तरी ध्वनि–प्रकाराची योजना करण्याचा विचार करीत असता कवीच्या प्रतिभेला नवीनपणा प्राप्त होतो व ४) त्यामुळे शेवटी कवीने केलेल्या वर्णनालाही नावीन्य प्राप्त होते.

ध्वनिप्रकारांच्या निरूपणाचा काव्यामध्ये नित्यनूतनता उन्पन्न करण्यास (**सत्काव्यं कर्तुम्**) कवीला जसा उपयोग होतो, तसेच सहृदय वाचकालाही सत्काव्याला प्राप्त झालेल्या नावीन्यामुळे काव्याच्या उत्कृष्टपणाची पारख करण्यास (**सत्काव्यम् ज्ञातुम्**) मदत होते हे वाचकांनी समजून घ्यावे, हा– ही कारिका २ मागील अभिप्राय आहे.

ध्वन्यालोकः

तथा ह्यविवक्षितवाच्यस्य ध्वनेः प्रकारद्वयसमाश्रयणेन नवत्वं पूर्वार्थानुगमेऽपि यथा—

स्मितं किंचिन्मुग्धं तरलमधुरो दृष्टिविभवः
परिस्पन्दो वाचामभिनवविलासोर्मिसरसः ।
गतानामारम्भः किसलयितलीलापरिमलः
स्पृशन्त्यास्तारुण्यं किमिव हि न रम्यं मृगदृशः ॥

इत्यस्य,

सविभ्रमस्मितोद्भेदा लोलाक्ष्यः प्रस्खलद्गिरः ।
नितम्बालसगामिन्यः कामिन्यः कस्य न प्रियाः ॥

इत्येवमादिषु श्लोकेषु सत्स्वपि तिरस्कृतवाच्यध्वनिसमाश्रयेणापूर्वत्वमेव प्रतिभासते । तथा—

यः प्रथमः प्रथमः स तु तथाहि हतहस्तिबहलपललाशी ।
श्वापदगणेषु सिंहः सिंहः केनाधरीक्रियते ।

इत्यस्य,

'स्वतेजःक्रीतमहिमा केनान्येनातिशय्यते ।
महद्भिरपि मातङ्गैः सिंहः किमभिभूयते ॥'

इत्येवमादिषु श्लोकेषु सत्स्वप्यर्थान्तरसंक्रमितवाच्यध्वनिसमाश्रयेण नवत्वम् ।

ध्वन्यालोक

कारण 'अविवक्षितवाच्य' ध्वनीच्या दोहोंपैकी कोणत्याही प्रकाराचा आश्रय केल्याने पूर्वीच्या कवींनी वर्णिलेल्या विषयाचेच पुन्हा वर्णन करणाऱ्या कवीच्या वाणीला नवीनपणा येतो याचे उदाहरण—

त्या हरिणनयनेचे मंदस्मित निरागस आहे; तिच्या नजरेचे वैभव चंचलपणामुळे गोड झालेले आहे; तिच्या बोलण्याच्या क्रियेत नवनवे डौल प्रकट झाल्यामुळे ती क्रिया रसाने ओथंबलेली वाटते; तिची चालण्याची क्रिया पालविलेल्या तिच्या विलासांच्या सुगंधाने दरवळत आहे; खरोखर, यौवनाला स्पर्श करणाऱ्या तिची कोणती कृति रमणीय नाही बरे?

या श्लोकापूर्वी पुढीलसारखे काही श्लोक रचलेले होतेच—'ज्यांच्या स्मितांचे आविष्कार नखरेल असतात, ज्यांचे नेत्र चंचल, ज्यांची वाणी अडखळणारी आणि ज्यांची गति नितंबभारामुळे मंद झालेली असते, अशा रमणी कोणाला प्रिय नसतात?'

पण तरीदेखील (तोच आशय असलेल्या, पण) 'तिरस्कृतवाच्य' ध्वनीचा आश्रय केलेल्या 'त्या हरिणनयनेचे'... या श्लोकात नावीन्यच वाटते. तसेच—

'जो पहिला, तो पहिला (यात शंका नाही). उदा. (स्वतः) मारलेल्या हत्तींचे विपुल मांस खाणारा व पशुसमुदायामध्ये समावेश असलेला जो सिंह, त्या 'सिंहा'वर कोण मात करू शकतो?'

या शलोकात 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' ध्वनीचा आश्रय केलेला आहे, म्हणून हा श्लोक, पुढीलसारखे श्लोक अस्तित्वात असले, तरी नवीनच भासतो—

‘स्वतःच्या तेजाने मोठेपण मिळवलेल्याला दुसरा कोण मागे टाकील? हत्ती जरी शरीराने प्रचंड असले, तरी ते काय सिंहावर वर्चस्व गाजवतात?’

लोचनम्

तत्र प्रथममत्यन्ततिरस्कृतवाच्यान्वयमाह—स्मितमिति। मुग्धमधुरविभवसरसकिसलयितपरिमलस्पर्शनान्यत्यन्ततिरस्कृतानि । तैरनाहृत सौन्दर्यसर्वजनवाल्लभ्याक्षीणप्रसरत्वसन्तापप्रशमनतर्पकत्वसौकुमार्यसार्वकालिकतत्संस्कारानुवृत्तित्वयत्ना भिलषणीयसङ्गतत्वानि व्वन्यमानानि यानि, तैः स्मितादेः प्रसिद्धस्यार्थस्य स्थविरवेधोविहितधर्मव्यतिरेकेण धर्मान्तरपात्रता यावत् क्रियते, तावत्तदपूर्वमेव सम्पद्यत इति सर्वत्र मन्तव्यम् । अस्येति अपूर्वत्वमेव भासत इति दूरेण सम्बन्धः । सर्वत्रैवास्य नवत्वमिति सङ्गतिः । द्वितीयः प्रथमशब्दोऽर्थान्तरेऽनपाकरणीयप्रधानत्वासाधारणत्वादिव्यङ्ग्यधर्मान्तरे संक्रान्तं स्वार्थं व्यनक्ति । एवं सिंहशब्दोऽपि वीरत्वानपेक्षत्वविस्मयनीयत्वादौ व्यङ्ग्यधर्मान्तरे सङ्क्रान्तं स्वार्थं ध्वनति ।

लोचन

त्यांपैकी म्हणजे ध्वनींच्या अनंत प्रकारांपैकी प्रथम वृत्तिकार ‘अत्यन्ततिरस्कृतवाच्य’ ध्वनिप्रकाराचा, पूर्वी कोणीतरी केलेल्या समानार्थक पण ध्वनिप्रकार न वापरलेल्या काव्याशी संबंध जोडल्यास काव्याला नवीनपणा प्राप्त होतो, हे ‘त्या हरिणनयनेचे मंदस्मित’ इ. उदाहरणाने स्पष्ट करितात. या उदाहरणातील ‘मुग्ध (निरागस), मधुर (गोड), विभव (वैभव), सरस (रसाने ओथंबलेली), किसलयित (पालविलेले), परिमल (सुगंध) आणि स्पर्शन (स्पर्श)’ या शब्दांचा वाच्यार्थ ‘अत्यन्ततिरस्कृत’ आहे[१]. त्या शब्दांनी अनुक्रमे अकृत्रिम सौंदर्य सर्व लोकांना आवडणे, कटाक्षांचा वर्षाव न थांबता एकसारखा होतच राहणे, दाह शांत करून तृप्ति देणे, नाजूकपणा, बघणाऱ्याच्या मनात कायमचा ठसा उमटविण्याचे (चालण्याच्या पद्धतीतील) सामर्थ्य, प्रयत्न करून तिचा सहवास मिळवावा असें लोकांना वाटावयास लावण्याचा तिच्या तारुण्यामधील गुण ही (लक्षणांचीं) प्रयोजने ध्वनित होतात. त्यामुळे स्मित वगैरे शब्दांचे जे लोकप्रसिद्ध (म्हणजे वाच्य) अर्थ आहेत त्या अर्थानां वयोवृद्ध विधात्याने निर्मिलेल्या धर्मांहून वेगळे धर्म धारण करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिले जाते व त्या कारणाने स्मितादि शब्दांचे वाच्यार्थ वेगळेच वाटू लागतात. असेच अशा सर्व उदाहरणांत[२] होते, असे समजावे. **अस्य** (या श्लोकात) याचा **अपूर्वत्वमेव भासते** (नावीन्यच वाटते) या दूरच्या शब्दांशी अन्वय करावा. ‘सर्वच उदाहरणांच्या[३] बाबतीत ह्या (म्हणजे उत्तरकालीन श्लोकात) वर्णनाला नवीनपणा प्राप्त होतो’ असा अन्वय करावा. दुसऱ्या वेळी वापरलेला ‘पहिला’ हा शब्द त्याच्या वाच्यार्थाचे, नाकारता न येण्याजोगे प्राधान्य असामान्यत्व इ. व्यंग्य धर्मांमध्ये रूपांतर होऊन एकूण रूपांतरित झालेला अर्थ सुचवितो. त्याचप्रमाणे दुसरा ‘सिंह’ शब्दही त्याच्या वाच्यार्थाचे, शौर्य, दुसऱ्याच्या साहाय्याशी गरज नसणे, आश्चर्यचकित करून सोडणे इ. व्यंग्य धर्मांमध्ये रूपांतर होऊन बनलेला एकूण रूपांतरित अर्थ सुचवीत[४] आहे.

टीपा

१) म्हणजे त्यांचा वाच्यार्थ संपूर्णपणे टाकून द्यावा लागतो.

२) म्हणजे अत्यन्ततिरस्कृतवाच्य ध्वनीने युक्त अशा सर्व उदाहरणात.

३) म्हणजे द्वितीय, खंड "उद्द्योत – ४ 'ध्वनीच्या अनंत प्रकारांपैकी एकाही प्रकाराने जर कवीची वाणी मंडित झाली, तर तिला नवीनता प्राप्त होते'" वर दिलेल्या उदाहरणाच्या व त्यातच पुढे दिलेल्या दोन उदाहरणांचे बाबतीत.

४) वास्तविक येथे योजिलेला **व्यनक्ति** (सुचवितो) हा शब्द अगदी समर्पक नाही. कारण 'शब्द (एवंगुणविशिष्ट) वाच्यार्थ सुचवितो' हे म्हणणे तर्कसंगत नाही. खरे म्हणजे येथे अनेक धर्म हे व्यंग्य आहेत व धर्मी हा वाच्यच आहे.

ध्वन्यालोकः

विवक्षितान्यपरवाच्यस्याप्युक्तप्रकारसमाश्रयेण नवत्वं यथा–

'निद्राकैतविनः प्रियस्य वदने विन्यस्य वक्त्रं वधू–
र्बोधत्रासनिरुद्धचुम्बनरसाप्याभोगलोलं स्थिता ।

वैलक्ष्याद्विमुखीभवेदिति पुनस्तस्याप्यनारम्भिणः
साकाङ्क्षप्रतिपत्ति नाम हृदयं यातं तु पारं रतेः ॥'

इत्यस्य श्लोकस्य,

'शून्यं वासगृहं विलोक्य शयनादुत्थाय किंचिच्छनै–
र्निद्राव्याजमुपागतैस्य सुचिरं निर्वर्ण्य पत्युर्मुखम् ।

विस्रब्धं परिचुम्ब्य जातपुलकामालोक्य गण्डस्थलीं
लज्जानम्रमुखी प्रियेण हसता बाला चिरं चुम्बिता ॥'

इत्यादिषु श्लोकेषु सत्स्वपि नवत्वम् । यथा वा– 'तरङ्गभ्रूभङ्गा-' इत्यादिश्लोकस्य 'नानाभङ्गिभ्रमभ्रूः' इत्यादिश्लोकापेक्षयान्यत्वम् ।

ध्वन्यालोक

'विवक्षितान्यपरवाच्य' ध्वनीच्या आतापर्यंत सांगितलेल्या प्रकारांपैकी एखाद्याचा आश्रय केला, तरी (काव्यात) नवत्व येते, याचे उदाहरण–

'प्रियकराने झोपेचे सोंग केले आहे.[1] त्यांच्या नवोढा पत्नीने त्याच्या मुखावर आपले मुख टेकवलेले आहे. ती जागा होईल या भीतीने तिने त्याचे चुंबन घेण्याचा मोह आवरून धरला आहे खरा, पण याला खरोखर झोप लागली आहे की नाही हा विचार पुन्हा पुन्हा मनात येऊन ती दोलायमान मनःस्थितीत

राहिली आहे. इकडे, मी हिचे चुंबन घेतले, तर लज्जित होऊन ही एकदम तोंड फिरवील म्हणून तोही तिचे चुंबन घेण्याचा प्रयत्न करीत नाही– पण त्याच्या अंतःकरणाची स्थिति साभिलाष अशी राहून (ही) दोघांच्या अंतःकरणाला चुंबनसुखाची संपूर्ण तृप्ति मिळाली.'

यासारखे श्लोक, त्यापूर्वी खालील प्रकारचे श्लोक रचले गेले असले, तरीही नवीनच वाटतात–

'शयनगृहात इतर कोणीही नाही असे पाहून[२], शय्येवरून हळूहळू थोडेसे उठून, झोपेचे नाटक केलेल्या पतीचे मुख खूप वेळ निरखून पाहिल्यावर तिने त्याचे निःशंकपणे चुंबन घेतले. त्यामुळे प्रियकराच्या गालांवर रोमांच उभे राहिलेले पाहून ती लज्जेने अधोवदन झाली. त्याबरोबर तिच्या प्रियकराने हसत हसत त्या आपल्या तरुण पत्नीची दीर्घकाळ चुंबने घेतली.'

किंवा–

'(हे) तरंग म्हणजे तिने वक्र केलेल्या भ्रुकुटी होत...' इ. श्लोक[३] त्यापूर्वी 'जिच्या भुवयांचे विलास निरनिराळ्या प्रकारचे आहेत...' इ. रचना[४] होऊन गेलेली असली तरी वेगळाच वाटतो.

लोचनम्

एवं प्रथमस्य द्वौ भेदावुदाहृत्य द्वितीयस्याप्युदाहर्तुमासूत्रयतिविवक्षितेति । निद्रायां कैतवी कृतकसुप्त इत्यर्थः । वदने विन्यस्यवक्त्रमिति । वदनस्पर्शजमेव तावद्दिव्यं सुखं त्यक्तुं न पारयतीति । अत एव प्रियस्येति । वधूः नवोढा । बोधत्रासेन प्रियतमप्रबोधभयेन निरुद्धो हठात् प्रवर्तमानः प्रवर्तमानोऽपि कथञ्चित्कथञ्चित् क्षणमात्रं धृतश्चुम्बनाभिलाषो यया । अत एव आभोगेन पुनः पुनर्निद्राविचारनिर्वर्णनया विलोलं कृत्वा स्थिता, न तु सर्वथैव चुम्बनान्निवर्तितुं शक्नोतीत्यर्थः । एवंभूतैषा यदि मया परिचुम्ब्यते, तद्विलक्षा विमुखीभवेदिति तस्यापि प्रियस्य परिचुम्बनविषये निरारम्भस्य । हृदयं साकांक्षप्रतिपत्ति नामेति । साकांक्षा साभिलाषा प्रतिपत्तिः स्थितिर्यस्य तादृशं रुहरुहिकाकदर्थितं न तु मनोरथसम्पत्तिचरितार्थम् । किन्तु रतेः परस्परजीवितसर्वस्वाभिमानरूपायाः परनिर्वृतेः केनचिदप्यनुभवेनालब्धावगाहनायाः पारङ्गतमिति परिपूर्णीभूत एव श्रृङ्गारः । द्वितीयश्लोके तु परिचुम्बनं सम्पन्नं लज्जा स्वशब्देनोक्ता । तेनापि सा परिचुम्बितेति यद्यपि पोषित एव श्रृङ्गारः, तथापि प्रथमश्लोके परस्पराभिलाषप्रसरनिरोधपरम्परापर्यवसानासम्भवेन या रतिरुक्ता, सोभयोरप्येकस्वरूपचित्तवृत्त्यनुप्रवेशमाचक्षाणा रतिं सुतरां पोषयति ॥ २ ॥

लोचन

याप्रमाणे पहिल्या म्हणजे अविवक्षितवाच्य ध्वनीच्या दोन प्रकारांचा आश्रय केल्याने काव्याला नवत्व कसे प्राप्त होते याचीं उदाहरणे देऊन झाल्यावर दुसऱ्या म्हणजे विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीच्या प्रकारांच्या आश्रयाने नावीन्य प्राप्त होण्याची उदाहरणे देण्यासाठी (वृत्तिकार) 'विवक्षितान्यपरवाच्य' इ. शब्दांनी प्रस्ताव करितात. निद्रेच्या बाबतीत बहाणा केलेला[५] म्हणजे झोपण्याचे सोंग घेतलेला, असा अर्थ. ('प्रियकराच्या) मुखावर आपले मुख टेकविलेले–' ती प्रियकराच्या मुखाच्या नुसत्या स्पर्शामुळे होणारे दिव्य सुखच सोडू शकत नव्हती, असा अर्थ. म्हणूनच त्याला 'प्रियकर' (म्हणजे सुखविणारा) असे म्हटले

आहे. 'वधूने' म्हणजे नवविवाहित पत्नीने, जागृतीच्या भीतीने म्हणजे प्रियकर जागा होईल या भयाने. 'जबरदस्तीने मोह आवरून धरला आहे' म्हणजे पुन्हा पुन्हा उफाळून येत असली तरी कशीबशी क्षणभरच आवरून धरली आहे चुंबनाची इच्छा जिने, अशी. म्हणूनच 'आभोगामुळे[६]' म्हणजे 'हा खरेच निजला आहे काय?' हे ठरविण्यासाठी त्याच्याकडे पुन्हा पुन्हा निरखून पाहात ती चुंबन घेऊ की नको अशा दोलायमान मनःस्थितीत राहिली होती. पण ती चुंबन घेण्यापासून पूर्णपणे परावृत्त मात्र होऊ शकली नाही, असा अर्थ. अशा दोलायमान स्थितीत असलेल्या हिचे जर मी चुंबन घेईन, तर ती शरमून माझ्याकडे असलेले तिचे मुख उलट बाजूला फिरवील या विचाराने तोही (म्हणजे तिचा प्रियकरही) तिचे चुंबन घेण्यास उद्युक्त झाला नाही. 'त्या दोघांच्याही हृदयाची स्थिति साभिलाष अशींच राहून—' साकांक्ष म्हणजे साभिलाष अशीच प्रतिपत्ति म्हणजे अवस्था आहे ज्याची असे, म्हणजे उत्कंठेने हैराण झालेले, पण मनोरथ पूर्ण झाल्याने (हृदय) कृतकृत्य झालेले नव्हते. तरीही आपण एकमेकांचे जीवितसर्वस्व आहोत असे स्वरूप असणाऱ्या[७] व त्यांच्यापैकी कोणीही कोणत्याही प्रकारच्या स्वानुभवाने ज्या रतिसुखात अद्यापि अवगाहन केले नव्हते, अशा रतिसुखाच्या पलीकडच्या टोकाला (ते हृदय) जाऊन पोहोचले. अशा रीतीने त्यांचा शृंगार (म्हणजे रतिक्रीडा) परमोच्च बिंदूला जाऊन पोहोचली.[८] पण दुसऱ्या श्लोकात परस्परांच्या चुंबनसुखाचा अनुभव दोघांनाही मिळाला आहे, आणि लज्जा हा व्यभिचारिभाव त्याच्या वाचक शब्दाने वाच्य केला आहे.[९] 'त्यानेही तिची दीर्घकाळ चुंबने घेतली' जसे म्हटल्याने संभोगशृंगाराचा परिपोष झालेला असला, तरीही पहिल्या श्लोकात एकमेकांचा एकमेकांचे चुंबन घेण्याचा अभिलाष वाढणे व तो आवरून धरणे या क्रिया पुन्हा पुन्हा होत राहून त्या थांबण्याची शक्यताच दिसत नसल्याने जी रति वर्णिली आहे, ती दोघांचीही चित्तवृत्ति एकमेकांचे चुंबन घेण्याची इच्छा या एकाच स्वरूपाची झाली आहे हे सुचवीत असल्याने पहिल्या श्लोकात रति या स्थायिभावाचा कमालीचा परिपोष होत आहे, ॥ २ ॥

टीपा

१) हा श्लोक आनंदवर्धनांच्या मते **शून्यं वासगृहम्** इ. श्लोकानंतर रचलेला आहे, पण तो कोणी रचला आहे हे समजू शकत नाही.

२) अमरुशतक, ८२ वा श्लोक.

३) पाहा, प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'रसवदलंकाराबाबत पूर्वपक्षाचे खंडन'".

४) या ठिकाणी श्लोकाचा अंशच उद्धृत केलेला आहे. तो श्लोक पूर्ण स्वरूपात कोठेही उपलब्ध होत नाही. व त्याचा कर्ता कोण हेही दुर्दैवाने अज्ञातच आहे मात्र हा श्लोक कालिदासापूर्वी होऊन गेलेल्या कोणातरी लेखकाचा आहे. असे आनंदवर्धन म्हणतात.

५) **निद्रायां कैतवी** हा सप्तमी तत्पुरुष समास आहे.

६) 'आभोग' याचा शब्दशः अर्थ 'वक्रपणा' असा आहे. तेव्हा **आभोगलोलम्** याचा एक अर्थ ती त्याच्या मुखावर वाकून (**आभोग**) चुंबन घेऊ की नको अशा दोलायमान मनःस्थितीत राहिली असा करिता येईल. अभिनवगुप्तांनी 'आभोग' याचा अर्थ विचार करणे, मनन करणे असा केला आहे. 'आभोग' शब्दाचा असा

अर्थ जैन व बौद्ध वाङ्मयात, तसेच योगभाष्यातही आढळतो. एखाद्या विषयावर मन वाकविणे म्हणजे त्या विषयाचा एकाग्रतेने विचार करणे, अशी उपपत्ति लाविता येईल.

७) रतीचे स्वरूप अशा प्रकारचे (म्हणजे मानसिक तादात्म्याचे) असते हा विचार अभिनवगुप्तांनी लोचनात यापूर्वी पुष्कळ वेळा प्रकट केला आहे. मानसिक तादात्म्याच्या दृष्टीने पाहा, उत्तररामचरितम्, १—३९. **अद्वैतं सुखदुःखयोः** इ. श्लोक.

८) पाहा, वज्जालग्ग गाथा ४१२ : त्या गाथेची संस्कृत छाया अशी आहे :—

तथा तेनापि सा दृष्टा तया तथा तस्य प्रेषिता दृष्टिः ।
यथा द्वावपि समकालमेव निर्वृत्तरतौ जातो ॥

९) प्रत्यक्ष चुंबन न घेताही चुंबनसुखाची तृप्ति मिळाली यात प्रत्यक्ष चुंबन घेण्यापेक्षाही अधिक सौन्दर्य आहे. शिवाय दुसऱ्या श्लोकात लज्जा हा व्यभिचारिभाव सूचित न करिता वाच्य केला आहे हा एक प्रकारे दोषच होय असे अभिनवगुप्त म्हणतात. पण पहिल्या श्लोकातही वैलक्ष्य आणि रति या शब्दांनी अनुक्रमे व्यभिचारिभाव व स्थायिभाव हे दोन्हीही स्वशब्दवाच्य झालेले आहेतच!

ध्वन्यालोकः

युक्त्याऽनयानुसर्तव्यो रसादिर्बहुविस्तरः ।
मितोऽप्यनन्ततां प्राप्ताः काव्यमार्गो यदाश्रयात् ॥ ३ ॥

बहुविस्तारोऽयं रसभावतदाभासतत्प्रशमनलक्षणो मार्गो यथास्वं विभावानुभावप्रभेदकलनया यथोक्तं प्राक् । स सर्व एवानया युक्त्यानुसर्तव्यः । यस्य रसादेराश्रयादयं काव्यमार्गः पुरातनैः कविभिः सहस्रसंख्यैरसंख्यैर्वा बहुप्रकारं क्षुण्णत्वान्मितोऽप्यनन्ततामेति । रसभावादीनां हि प्रत्येकं विभावानुभावव्यभिचारिसमाश्रयादपरिमितत्वम् । तेषां चैकैकप्रभेदापेक्षयापि तावज्जगद्वृत्तमुपनिबध्यमानं सुकविभिस्तदिच्छावशादन्यथा स्थितमप्यन्यथैव विवर्तते । प्रतिपादितं चैतद्चित्रविचारावसरे । गाथा चात्र कृतैव महाकविना—

‘अतहट्ठिए वि तहसंठिए व्व
हिअअम्मि जा णिवेसेइ ।
अत्थविसेसे सा जअइ
विअडकइगोअरा वाणी ॥’

ध्वन्यालोक

रसादिध्वनीचे प्रकार पुष्कळ आहेत. त्यांचा आश्रय याच पद्धतीस अनुसरून करावा. त्यांचा आश्रय केल्याने काव्याचे क्षेत्र मर्यादित असले, तरी ते अपार होत जाते ॥ ३ ॥

हा रस, भाव त्यांचे आभास व प्रशमन[१] या स्वरूपाचा काव्याचा विषय, त्या रस-भावांचे विभाव, अनुभाव इ. विचारात घेतल्यास खूप विस्तीर्ण आहे, हे पूर्वी[२] सांगितले आहे. त्या सर्वच विषयाचा अवलंब या पद्धतीने करावा. त्या रसादींचा आश्रय केल्याने काव्याचे क्षेत्र पूर्वी हजारो किंवा असंख्य कवींनी निरनिराळ्या प्रकारांनी वहिवाटले असल्यामुळे मर्यादित झालेले असले तरी ते अमर्याद होते. कारण वेगवेगळ्या विभाव, अनुभाव, व्यभिचारिभाव यांच्या आश्रयाने रसभावादिकांपैकी प्रत्येकाचे प्रकार असंख्य होतात. त्यांच्या एकेका प्रकाराचाही आश्रय करून जगाच्या व्यवहाराचे श्रेष्ठ कवींनी वर्णन केल्यास त्या कवींच्या इच्छेप्रमाणे तो जगाचा व्यवहार त्याच्या वास्तव स्वरूपाहून निराळ्याच स्वरूपाने भासमान होतो. आणि हेही आम्ही 'चित्र' या प्रकाराची चर्चा केली त्या प्रसंगी सांगितले आहे.[३] आणि एका महाकवींने[४] या विषयी (पुढील प्राकृत) गाथा रचलीच आहे– 'पदार्थांचे रूप वस्तुतः तसे (म्हणजे आगळ्या सौंदर्याने नटलेले) नसले तरी तसे आहे असा ठसा जी (सहृदयांच्या) मनावर उमटविते व जिच्यामुळे कवीला दिसणारे वर्ण्य विषय अपरिमित होतात,[५] त्या वाणीचा विजय असो.'

लोचनम्

एवं मौलं भदचतुष्टमुदाहृत्यालक्ष्यक्रमभेदेष्वतिदेशमुखेन सर्वोपभेदविषयनिर्देश करोति– युक्त्यानयेति । अनुसर्तव्य इति । उदाहर्तव्य इत्यर्थः । यथोक्तमिति ।

तस्याङ्गानां प्रभेदा ये प्रभेदाः स्वगताश्च ये ।
तेषामानन्त्यमन्योन्यसम्वन्धपरिकल्पने ॥

इत्यत्र । प्रतिपादितं चैतदिति । चशब्दोऽपिशब्दार्थे भिन्नक्रमः । एतदपि प्रतिपादितं 'भावानचेतनानपि चेतनवच्चेतनानचेतनवदि'त्यत्र । अतथास्थितानपि बहिस्तथासंस्थितानिवेति । इवशब्देन एकतरत्र विश्रान्तियोगाभावादेव सुतरां विचित्ररूपानित्यर्थः । हृदय इति । प्रधानतमे समस्तभावकनकनिकषस्थान इत्यर्थः । निवेशयति– यस्य यस्य हृदयमस्ति, तस्य तस्य अचलतया तत्र स्थापयतीत्यर्थः । अतएव ते प्रसिद्धा र्थेभ्योऽन्य एवेत्यर्थविशेषास्सम्पद्यन्ते । हृदयनिविष्टा एव च तथा भवन्ति नान्यथेत्यर्थः । सा जयति परिच्छिन्नशक्तिभ्यः प्रजापतिभ्योऽप्युत्कर्षेण वर्तते । तत्प्रसादादेव कविगोचरो वर्णनीयोऽर्थो विकटो निस्सीमा सम्पद्यते ॥ ३ ॥

लोचन

याप्रमाणे ध्वनीच्या मूळ चार प्रकारांची [६] उदाहरणे दिल्यावर अलक्ष्यक्रमव्यंग्याच्या उपप्रकारांच्या बाबतीत (पुढील, तिसऱ्या कारिकेत) अतिदेश करून ध्वनीच्या सर्व उपप्रकारांचा [७] निर्देश 'याच पद्धतीस अनुसरून' इ. शब्दांनी तिसऱ्या कारिकेने केला जात आहे. 'आश्रय करावा' म्हणजे त्याची उदाहरणे (सहृदयांनी) शोधून काढावीत. [८] 'पूर्वी सांगितल्याप्रमाणे' म्हणजे– 'त्याच्या अंगांचे जे प्रकार जे प्रकार किंवा त्याचे स्वतःचे जे प्रकार, त्यांची परस्परांशी (होऊ शकणारी) मिश्रणे विचारात घेतल्यास ते प्रकार असंख्य होतील.' या कारिकेत. [९] 'आणि हे सांगितले आहे' – 'आणि' या शब्दाची जागा योग्य नाही, व त्या 'आणि' या शब्दाचा अर्थ 'सुद्धा' असा समजावा. हेदेखील सांगितले गेले आहे म्हणजे 'अचेतन पदार्थांनाही ते सचेतन असल्याप्रमाणे' येथे [१०]. 'पदार्थाचे रूप वस्तुतः तसे नसले, तरी बाह्यतः तसे असल्याप्रमाणे' ह्यातील 'प्रमाणे' या शब्दामुळे एकाच रूपाचे ठिकाणी [११] ते पदार्थ विश्रांति पावलेले दिसत नाहीत, म्हणूनच

अत्यंत वेगवेगळी रूपे धारण करितात, असा अर्थ. 'ठसा मनावर' – म्हणजे काव्यातील सर्व अर्थरूपी सोन्याचा श्रेष्ठ निकष असलेल्या [१२] (सहृदयांच्या मनावर), असा अर्थ. 'मनावर ठसा उमटविते' – ज्याला ज्याला (संवेदनाशील) मन आहे, त्याच्या त्याच्या मनावर स्थिरपणे ठसा उमटविते, हा आशय. म्हणूनच ते (कवीने वर्णिलेले) पदार्थ लोकांना परिचित असलेल्या पदार्थांहून निराळेच असल्याने ते अलौकिक स्वरूप धारण करितात. त्यांचा सहृदयांच्या हृदयात प्रवेश झाला, तरच ते तसे म्हणजे अलौकिक होतात, नाहीतर नाही, [१३] असा अर्थ. 'त्या वाणीचा विजय असो' – मर्यादित सामर्थ्य असलेल्या (निरनिराळ्या कल्पांमधील) प्रजापतींहूनसुद्धा ती वाणी अधिक सामर्थ्य संपन्न [१४] आहे. तिच्या कृपेमुळेच कवीच्या वर्णनाचा विषय विकट म्हणजे अपरिमित बनतो ॥ ३ ॥

टीपा

१) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत -२ 'रसादिरूप अर्थ ज्यात प्रधान, तीच असंलक्ष्यक्रम ध्वनीची उदाहरण'" वरील टीपा १ ते ४

२) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'रसादिध्वनीचे प्रकार असंख्य'"

३) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'अनुभवी कवींनी रसादीची प्रतीति घडवणे हेच मुख्य मानावे'" वरील 'चांगला कवि हा आपल्या इच्छेप्रमाणे' ...या व या आधीच्या काही ओळीं.

४) हा 'महाकवि' कोण हे समजू शकत नाही. पण 'गउडवहो' या प्राकृत काव्यातील ६६ व्या गाथेमधील कल्पना व प्रस्तुत गाथेतील कल्पना, यात साम्य वाटते. त्या (६६ व्या) गाथेची संस्कृत छाया अशी–

स्थितमस्थितमिव दृश्यते अस्थितमपि प्रतिष्ठितमिव प्रतिभाति ।
यथासंस्थितं च दृश्यते सुकवीनामिमः प्रकृतयः ॥

५) मुळात 'विकटकविगोचरा' असा शब्द आहे. त्याचा अनुवाद आम्ही अभिनवगुप्तांच्या विवरणास अनुसरून केला आहे. त्यात त्यांनी '**कविगोचर**' याचा अर्थ 'वर्णनीय विषय' असा केला आहे व '**विकट**' याचा अर्थ 'अमर्याद' असा करून तो शब्द '**कविगोचर**' याचे विशेषण मानला आहे. अभिनवगुप्तांनी सांगितलेल्या अर्थाला पोषक अशी 'गउडवहो' या प्राकृत काव्यातील क्रमांक ८७ ही गाथा आहे. तिची संस्कृत छाया अशी–

आसंसारं कविपुंगवैः प्रतिदिवसगृहीतसारोऽपि ।
अद्याप्यभिन्नमुद्र इव जयति वाक्परिस्पन्दः ॥

गउडवहो यातील या (६६ व ८७) दोन गाथांचा विचार केल्यास ध्वन्यालोकात उद्‌धृत केलेली गाथा वाक्पतिराजाचीच आहे व ती त्याच्या 'मधुमथनविजय' या (प्राकृत) काव्यातून घेतली आहे असा तर्क करणे शक्य आहे. **विकट** (विशाल, मोठा) याचा अर्थ लक्षणेने 'थोर' असा घेऊन ते कवीचे विशेषण मानणेही शक्य आहे.

६) म्हणजे अविक्षितवाच्य ध्वनीच्या अत्यन्ततिरस्कृतवाच्य व अर्थान्तरसंक्रमितवाच्य या दोन प्रकारांची व विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीच्या असंलक्ष्यक्रम व संलक्ष्यक्रम या दोन प्रकारांची. मात्र विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीची आनंदवर्धनांनी 'प्रियकराने झोपेचे सोंग' व 'हे तरंग म्हणजे तिने वक्र केलेल्या' ही जी दोन उदाहरणे दिली आहेत, ती दोन्ही एकाच म्हणजे असंलक्ष्यक्रमव्यंग्य याच प्रकारची आहेत. संलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनीचा अवलंब केल्याने नावीन्य प्राप्त झाल्याचे उदाहरण यापूर्वी दिले गेले नसून 'तो देवर्षि अंगिरस्' हे त्याचे उदाहरण यानंतर काही वेळाने ("उद्द्योत – ४ 'ध्वनीच्या अनंत प्रकारांपैकी एकाही प्रकाराने जर कवीची वाणी मंडित झाली, तर तिला नवीनता प्राप्त होते'" वर) देण्यात येईल. तेव्हा अभिनवगुप्तांनी 'चारही प्रकारांची उदाहरणे देऊन झाल्यावर' असे का म्हणावे हे चिन्त्य आहे.

७) म्हणजे अलक्ष्यक्रमव्यंग्य ध्वनीच्या सर्व उपप्रकारांचा.

८) **उदाहर्तव्यः** याचा अर्थ आम्ही ('वाचकांनी) उदाहरणे द्यावीत' असा न करिता 'उदाहरणे शोधून काढावीत' असा केला आहे.

९) उद्द्योत २, कारिका १२ मध्ये.

१०) द्वितीय खंड, "उद्द्योत -३ 'अनुभव कवींनी रसादींची प्रतीति घडवणे हेच मुख्य मानावे'" वर.

११) म्हणजे (१) सर्वांना सुपरिचित असलेल्या नेहमीच्या रूपाचे ठिकाणी किंवा (२) एका कवीने वर्णिलेल्या रूपाचे ठिकाणी.

१२) पाहा, रघुवंश, १—१० मधील **हेम्नः संलक्ष्यते हयग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा ।** हा उत्तरार्ध.

१३) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'अलंकारध्वनीत व्यंग अलंकारच मुख्य हवा'", तसेच त्यावरील २ ऱ्या टीपेचा २ रा परिच्छेद, आणि "उद्द्योत – १ 'अभिनवगुप्तकृत 'लोचनाचे' मगलाचरण'" वरील लोचनाच्या प्रारंभीच्याच श्लोकातले 'सरस्वती देवतेचे... सर्वांहून श्रेष्ठ' इ. शब्द.

१४) पाहा, काव्यप्रकाश १—१ ही कारिका व मम्मटाची तीवरील वृत्ति.

ध्वन्यालोकः

तदित्थं रसभावाद्याश्रयेण काव्यार्थानामानन्त्यं सुप्रतिपादितम् । एतदेवोपपादयितुमुच्यते—

दृष्टपूर्वा अपि ह्यर्थाः काव्ये रसपरिग्रहात् ।
सर्वे नवा इवाभान्ति मधुमास इव द्रुमाः ॥ ४ ॥

तथा हि विवक्षितान्यपरवाच्यस्यैव शब्दशक्युद्भवानुरणनरूपव्यङ्ग्यप्रकारसमाश्रयेण नवत्वम् । यथा— 'धरणीधारणायाधुना त्वं शेषः' इत्यादेः

‘शेषो हिमगिरिस्त्वं च महान्तो गुरवः स्थिराः ।
यदलङ्घितमर्यादाश्चलन्तीं बिभ्रते भुवम् ॥’
इत्यादिषु सत्स्वपि ।

ध्वन्यालोक

तेव्हा याप्रमाणे आम्ही असे सविस्तरपणे दाखविले की, रसभाबादिकांचा आश्रय केल्याने काव्याचे विषय अनंत पटींनी वाढत जातात. हेच (दृष्टांताचे द्वारे) पटविण्यासाठी असे म्हणण्यात येत आहे की—

काव्याचे विषय दैनंदिन व्यवहारात नेहमी अनुभवलेले असले किंवा त्यांचे वर्णन पूर्वीच्या कवींनी आधीच केलेले असले, तरी रसांचा आश्रय केल्याने त्या सर्वांना वसंतऋतूतील वृक्षांप्रमाणे जणू काहीं नवीनच रूप प्राप्त झाल्यासारखे भासते. ॥ ४ ॥

उदा. ‘विवक्षितान्यपरवाच्य’ ध्वनींच्या ‘शब्दशक्त्युद्भव अनुरणनरूपव्यंग्य [१]’ या प्रकाराचा आश्रय केल्याने (पूर्वी वर्णन केलेल्या विषयालाही) नवीनपणा येतो, याचा नमुना —

‘धरणीचे धारण करण्यासाठी आता तू शेष आहेस [२]’ हे वर्णन पुढीलसारखे श्लोक त्यापूर्वी झालेले असले तरी (नवीनच वाटते) —

‘शेष, हिमालय आणि तू [३] हे मोठे (१. अवाढव्य २. मोठ्या योग्यतेचे), गुरु (१. वजनदार २. आदरणीय) आणि स्थिर (१. आपल्या जागेवरून न हलणारे २. ध्येयापासून न ढळणारे) आहात, कारण तुम्ही आपल्या मर्यादा (१. ठिकाण, २. आदर्श आचरणाचे नियम) न उल्लंघिता (१. आपल्या जागेपासून २. सामाजिक बन्धनांपासून) चळणाऱ्या (१. डळमळणाऱ्या २. सामाजिक बन्धनांपासून विचलित होणाऱ्या) पृथ्वीला (१. भूमीला २ प्रजेला) धारण करिता. (१. एका जागी स्थिर ठेवता २. सामाजिक बन्धने पाळावयास लावता.)

लोचनम्

प्रतिभानां वाणीनां चानन्त्यं ध्वनिकृतमिति यदनुद्भिन्नमुक्तं, तदेव कारिकया भङ्ग्या निरुप्यत इत्याह— उपपादयितुमिति । उपपत्त्या । नरूपयितुमित्यर्थः । यद्यप्यर्थानन्त्यमात्रे हेतुर्वृत्तिकारेणोक्तः, तथापि कारिकाकारेण नोक्त इति भावः । यदि वा उच्यते संग्रहश्लोकोऽयमिति भावः । अत एवास्य श्लोकस्य वृत्तिग्रन्थे व्याख्यानं न कृतम् ।

दृष्टपूर्वा इति । बहिः प्रत्यक्षादिभिः प्रमाणैः प्राक्तनैश्च कविभिरित्युभयथा नेयम् । काव्यं मधुमासस्थानीयम् ।

लोचन

ध्वनीचा आश्रय केल्याने कवींच्या प्रतिभांना आणि वाणींना अनंतत्व प्राप्त होते हे जे (चौथ्या उद्‌द्योतातील कारिका १ व २ मध्ये) मोघमपणे (म्हणजे दृष्टांत न देता) म्हटले, तेच यापुढील चौथी कारिका निराळ्या प्रकारे (म्हणजे दृष्टांताच्या साहाय्याने) सांगते हे वृत्तिकार 'पटविण्यासाठी' म्हणजे दृष्टांतरूपी युक्तिवादाने पटवून देण्यासाठी, असा अर्थ. जरी विषयांना अनंतत्व का प्राप्त होते याचे कारण वृत्तिकारांनी सांगितले आहे, तरी कारिकाकारांनी सांगितले नाही, [४] असा भावार्थ. किंवा 'असे म्हणण्यात येत आहे' म्हणजे आता हा संग्रह–श्लोक [५] सांगण्यात येत आहे, असा अभिप्राय. म्हणूनच या चौथ्या श्लोकाचे विवरण वृत्तीमध्ये केलेले नाही.

'आधीच अनुभवलेले–' (१) बाह्य जगामध्ये (लोकांनी) प्रत्यक्ष वगैरे प्रमाणांनी अनुभवलेले आणि (२) पूर्वीच्या कवींनी आधीच पाहिलेले (म्हणजें वर्णिलेले) असा दोन्ही प्रकारे अर्थ करावा.

'काव्या'ला मधुमासारखे म्हणजे वसंतऋतूसारखे म्हटले आहे. (व काव्यातील विषय हे वृक्षासारखे मानिले आहेत.)

टीपा

१) पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत – २ 'शब्दशक्तिमूल अलंकारध्वनीची उदाहरणे' व 'श्लेषमूलक (शब्दशक्तिमूल) ध्वनीसंबंधी पाच मते'".

२) द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीच्या 'शब्द शक्त्युद्‌भव' प्रकाराच्या पदप्रकाश व वाक्यप्रकाश प्रकारांची उदाहरणे'" वर हे वाक्य आले आहे.

३) भामहाच्या काव्यालंकाराच्या ३ ऱ्या परिच्छेदातील हा २८ वा श्लोक आहे. हा भामहाने स्वतः रचलेला असला, तर भामह बाणभट्टापूर्वी होऊन गेला असा निष्कर्ष निघतो. पण भामहाने दुसऱ्याचा उद्‌धृत केलेला असला, तर मात्र हा निष्कर्ष काढता येणार नाही.

४) अभिनवगुप्तांचे हे विधान चिन्त्य आहे, कारण ध्वनीच्या प्रकारांचा अवलंब केल्याने विषयांना अनंतत्व प्राप्त होते हे कारिका १ व २ मध्ये कारिकारांनीही सांगितले आहे. केवळ वृत्तिकारांनीच सांगितले आहे असे नाही. बरे, रसादिध्वनीचे प्रकार अनंत आहेत म्हणून विषयांना अनंतत्व प्राप्त होते हे कारण मानिल्यास तेही कारिका ३ मध्ये 'रसादिध्वनीचे प्रकार पुष्कळ आहेत' या शब्दांनी सांगितले आहे. म्हणून अभिनवगुप्तांच्या प्रस्तुत विधानाचा अर्थ असा काहीतरी करावा लागेल– जरी कारिकारांनी व वृत्तिकारांनी ही गोष्ट आतापर्यंत सामान्यपणे सांगितली होती, तरी ती दृष्टांन्त देऊन सांगितली नव्हती, म्हणून ती आता कारिका ४ मध्ये दृष्टांत देऊन सांगितली जात आहे.

५) म्हणजे 'काव्याचे विषय नेहमी अनुभवलेले' इ. श्लोक ही कारिका नसून वृत्तीतीलच परिकरश्लोक आहे असे समजावे, असे अभिनवगुप्तांचे मत.

ध्वन्यालोकः

तस्यैवार्थशक्त्युद्भवानुरणनरूपव्यङ्ग्यसमाश्रयेण नवत्वम् । यथा— 'एवंवादिनि देवर्षौ' इत्यादिश्लोकस्य

'कृते वरकथालापे कुमार्यः पुलकोद्गमैः ।
सूचयन्ति स्पृहामन्तर्लज्जयावनतानना: ॥'

इत्यादिषु सत्स्वपि अर्थशक्त्युद्भवानुरणनरूपव्यङ्ग्यस्य कविप्रौढोक्तिनिर्मितशरीरत्वेन नवत्वम् । यथा— 'सज्जेइ सुरहिमासो——' इत्यादेः

'सुरभिसमये प्रवृत्ते सहसा प्रादुर्भवन्ति रमणीयाः ।
रागवतामुत्कलिकाः सहैव सहकारकलिकाभिः ॥'
इत्यादिषु सत्स्वप्यपूर्वत्वमेव ।

ध्वन्यालोक

त्याच, म्हणजे विवक्षितान्यपरवाच्य ध्वनीच्याच अर्थशक्त्युद्भव अनुरणनरूपव्यंग्य प्रकाराचा आश्रय केल्याने (काव्याला) नवीनपणा प्राप्त होतो याचे उदाहरण म्हणजे 'तो देवर्षि अंगिरस् असे म्हणत असताना'... इ. श्लोक [१] हे होय. जरी त्यापूर्वी पुढीलसारखे श्लोक रचले गेले होते, तरीही (हा श्लोक नवीनच वाटतो).

'वरांबद्दलच्या गोष्टी काढल्या, म्हणजे कुमारी लज्जेने खाली मान घालतात व आपल्या अंगावर उभ्या राहिलेल्या रोमांचांच्या द्वारे आपल्या मनातील अभिलाष सूचित करतात. [२]'

अर्थशक्त्युद्भव अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीच्या, 'कवीच्या कल्पनासृष्टीतूनच उद्भवू शकणारा वाच्यार्थ असलेल्या' प्रकाराचे उदाहरण म्हणजे 'वसंतऋतु मदनासाठी'..... इ. पद्य [३] होय. त्यापूर्वी पुढीलसारखी रचना झालेली होती—

'वसंतऋतु सुरू झाला की, आम्रवृक्षांच्या कळ्यांबरोबरच (मोहोराबरोबरच) प्रेमी जनांच्या हृदयांत एकदम उत्कंठा निर्माण होऊ लागतात.'

तरीसुद्धा 'वसंतऋतु मदनासाठी'..... इ. पद्य नवीनच वाटते.

लोचनम्

स्पृहां लज्जामिति, रागवतामुत्कलिका इति च शब्दस्पृष्टेऽर्थे का हृद्यता ।

लोचन

'अभिलाष', 'लज्जेने' आणि 'प्रेमीं' जनांच्या हृदयात उत्कंठा' यांतील व्यभिचारिभाव त्यांच्या वाचक शब्दांनी वाच्य केलेले असल्यामुळे त्या दोन्ही जुन्या पद्यांमध्ये रम्यता ती कोणती राहिलेली आहे [४]?

टीपा

१) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत -२ 'अर्थशक्तिमूल ध्वनि'".

२) हा श्लोक कोणत्या ग्रंथातून घेतला आहे ते कळत नाही, पण हा कालिदासाच्या आधीच्या कोणातरी ग्रंथकाराचा असला पाहिजे हे निर्विवाद होय. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ४ 'ध्वनीच्या अनंत प्रकारांपैकी एकाही प्रकाराने जर कवीची वाणी मंडित झाली, तर तिला नवीनता प्राप्त होते'", वरील टीप चौथी.

३) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'उभयशक्तिमूल ध्वनीचे उदाहरण. अर्थशक्तिमूल 'अनुरणनरूप' ध्वनीचे दोन प्रकार'".

४) नवीन पद्यांमध्ये मात्र हे भाव सूचित झालेले असल्यामुळे त्या नवीन पद्यांना नवत्व प्राप्त झालेले आहे. 'लज्जा हा व्यभिचारिभाव त्याच्या वाचक शब्दाने वाच्य केला आहे' असे अभिनवगुप्तांनी यापूर्वी द्वितीय खंड, "उद्द्योत – ४ 'ध्वनीच्या अनंत प्रकारांपैकी एकाही प्रकाराने जर कवीची वाणी मंडित झाली, तर तिला नवीनता प्राप्त होते'" वर म्हटले आहे.

ध्वन्यालोकः

अर्थशक्त्युद्भवानुरणनरूपव्यङ्ग्यस्य कविनिबद्धवक्तृप्रौढोक्तिमात्रनिष्पन्नशरीरत्वेन सति नवत्वम् । यथा– 'वाणिअअ हत्थिदंता–' इत्यादिगाथार्थस्य

'करिणीवेहव्वअरो मह पुत्तो एक्ककंडविणिवाई ।
हअसोन्हाएँ तह कओ जह कंडकरंडअं वहइ ॥'
[करिणीवैधव्यकरो । मम पुत्र एककाण्डविनिपाती ।
हतस्नुषया तथा कृतो यथा काण्डकरण्डकं बहति ॥
एवमदिष्वर्येषु सत्स्वप्यनालीढतैव । इति च्छाया]

ध्वन्यालोक

अर्थशक्त्युद्भव अनुरणनरूपव्यंग्य ध्वनीच्या, कविनिर्मित पात्राच्या कल्पनासृष्टीमधूनच उद्भवू शकणारा वाच्यार्थ असलेले उदाहरण म्हणजे 'हे. सौदागरा' ... इ. प्राकृत पद्य. जरी त्यापूर्वी पुढीलसारखी पद्ये झाली होती, तरीही त्यामुळे 'हे सौदागरा' ... इ. पद्याच्या अर्थाचे नावीन्य कमी होत नाही—

‘हत्तिणींना वैधव्य प्राप्त करून देणाऱ्या, एकाच बाणाने (हत्तीचा) वध घडवून आणू शकणाऱ्या माझ्या मुलाची या मेल्या माझ्या सुनेने अशी अवस्था करून टाकली आहे की आता त्याला बाणांचा भाता जवळ बाळगावा लागतो [१]’

लोचनम्

एतानि चोदाहरणानि पूर्वमेव व्याख्यातानीति किं पुनरुक्त्या । सत्यपि प्राक्तनकविस्पृष्टत्वे नूतनत्वं भवत्येवैतत्प्रकारानुग्रहादित्येतावति तात्पर्य हि ग्रन्थस्याधिकं नान्यत् । करिणीवैधव्यकरो मम पुत्रः एकेन काण्डेन विनिपातनसमर्थः हतस्नुषया तथा कृतो यथा काण्डकरण्डकं वहतीत्युत्तान एवायमर्थः । गाथार्थस्यानालीढतैवेति सम्बन्धः ।

लोचन

आणि या उदाहरणांचे [२] विस्ताराने विवरण पूर्वीच केले असल्यामुळे त्यांची आता पुनरुक्ति कशाला? एखादा विषय पूर्वीच्या कवीने वर्णिला असला तरी (ध्वनीच्या प्रकारांचा आश्रय करून तोच वर्णिल्यास) त्याला नवीनपणा प्राप्त होतो इतके सांगणे हा वृत्तीतील प्रस्तुत विवेचनाचा उद्देश आहे, याहून वेगळा नाही. ‘हत्तिणींना वैधव्य प्राप्त करून देणारा’ माझा मुलगा, एका बाणाने हत्तींचा वध घडवून आणण्यास समर्थ होता, त्याची या मेल्या सुनेने अशी अवस्था करून टाकली की, त्याला आता बाणांचा भाता जवळ बाळगावा लागतो. या गाथेचा अर्थ अगदी स्पष्ट आहे. ‘हे सौदागरा!’ या गाथेचे नावीन्य, तो विषय पूर्वीच्या (म्हणजे ‘हत्तिणींना वैधव्य’ इ.) गाथेत वर्णिला असला तरी कमी होत नाही’ असा अन्वय करावा ॥ ४ ॥

टीपा

१) मुळात **अनालीढता** असा शब्द आहे. **‘अनालीढ’** याचा अर्थ ‘ज्याचा आस्वाद पूर्वी कोणी घेतला नाही,’ म्हणजे नवीन. म्हणजे आता तो इतका क्षीण झाला आहे की, एका बाणाने तो हत्तीचा वध करू शकत नाही. त्यासाठी त्याला पुष्कळच बाण सोडावे लागतात.

२) या उदाहरणांचे, म्हणजे ‘हा महाप्रलय झाला असताना आता धरणीचा भार धारण करावयास तू शेष आहेस’ हे (हाच खंड. “उद्द्योत – ४ ‘ध्वनीच्या अनंत प्रकारांपैकी एकाही प्रकाराने जर कवीची वाणी मंडित झाली, तर तिला नवीनता प्राप्त होते’”), ‘तो देवर्षि (अंगिरस्)’ हे प्रथम खंड, “उद्द्योत -२ ‘काही उदाहरणांत प्रथम संलक्ष्यक्रम ध्वनि व मग त्याचे असंलक्ष्यक्रम ध्वनीत पर्यवसान’” व ‘वसंत ऋतु मदनासाठी’ हे (प्रथम खंड, “उद्द्योत -२ ‘उभयशक्तिमूल ध्वनीचे उदाहरण. अर्थशक्तिमूल ‘अनुरणनरूप’ ध्वनीचे दोन प्रकार’”) या उदाहरणांचे.

ध्वन्यालोकः

यथा व्यङ्ग्यभेदसमाश्रयेण ध्वनेः काव्यार्थानां नवत्वमुत्पद्यते तथा व्यञ्जकभेदसमाश्रयेणापि । तत्तु ग्रन्थविस्तरभयान्न लिख्यते स्वयमेव सहृदयैरभ्यूह्यम् । अत्र च पुनःपुनरुक्तमपि सारतयेदमुच्यते ।

व्यङ्ग्यव्यञ्जकभावेऽस्मिन्विविधे संभवत्यपि ।
रसादिमय एकस्मिन्कविः स्यादवधानवान् ॥ ५ ॥

अस्मिन्नर्थानन्त्यहेतौ व्यङ्ग्यव्यञ्जकभावे विचित्रे शब्दानां संभवत्यपि कविरपूर्वार्थलाभार्थी रसादिमय एकस्मिन्व्यङ्ग्यव्यञ्जकभावे यत्नादवदधीत । रसभावतदाभासरूपे हि व्यङ्ग्ये तद्व्यञ्जकेषु च यथानिर्दिष्टेषु वर्णपदवाक्यरचनाप्रबन्धेष्ववहितमनसः कवेः सर्वमपूर्व काव्यं संपद्यते । तथा च रामायणमहाभारतादिषु सङ्ग्रामादयः पुनःपुनरभिहिता अपि नवनवाः प्रकाशन्ते । प्रबन्धे चाङ्गी रस एक एवोपनिबध्यमानोऽर्थविशेषलाभं छायातिशयं च पुष्णाति । कस्मिन्निवेति चेत्, यथा रामायणे यथा वा महाभारते । रामायणे हि करुणो रसः स्वयमादिकविनासूत्रितः 'शोकः श्लोकत्वमागतः' इत्येवंवादिना । निर्व्यूढश्च स एव सीतात्यन्तवियोगपर्यन्तमेव स्वप्रबन्धमुपरचयता । महाभारतेऽपि शास्त्ररूपे काव्यच्छायान्वयिनि वृष्णिपाण्डवविरसावसानवैमनस्यदायिनीं समाप्तिपनिबन्धता महामुनिना वैराग्यजननतात्पर्यं प्राधान्येन स्वप्रबन्धस्य दर्शयता मोक्षलक्षणः पुरुषार्थः शान्तो रसश्च मुख्यतया विवक्षाविषयत्वेन सूचितः । एतच्चांशेन विवृतमेवान्यैर्व्याख्याविधायिभिः । स्वयमेव चैतदुद्गीर्णं तेनोदीर्णमहामोहमग्नमुज्जिहीर्षता लोकमतिविमलज्ञानालोकदायिना लोकनाथेन—

'यथा यथा विपर्येति लोकतन्त्रमसारवत् ।
तथा तथा विरागोऽत्र जायते नात्र संशयः ॥'

इत्यादि बहुशः कथयता । ततश्च शान्तो रसो रसान्तरैर्मोक्षलक्षणः पुरुषार्थः पुरुषार्थान्तरैस्तदुपसर्जनत्वेनानुगम्यमानोऽङ्गित्वेन विवक्षाविषय इति महाभारततात्पर्यं सुव्यक्तमेवावभासते । अङ्गाङ्गिभावश्च यथा रसानां तथा प्रतिपादितमेव ।

ध्वन्यालोक

ज्याप्रमाणे ध्वनिकाव्यामध्ये व्यंग्यार्थाच्या प्रकारांचा आश्रय केल्याने काव्यविषयांना नवता प्राप्त होते, त्याप्रमाणे व्यंजकांचे [१] प्रकार उपयोजिल्यानेदेखील होते. पण त्याची उदाहरणे आम्ही ग्रंथ फार वाढेल या भीतीने देत नाही. ती (उदाहरणे) सहृदयांनी स्वतःच जाणून घ्यावी. पण आम्ही यापूर्वी पुन्हा पुन्हा सांगितले असले, [२] तरी हा मुद्दा असाधारण महत्वाचा असल्याने येथे आम्ही असे सांगत आहोत की—

या व्यंग्यार्थांचे आणि व्यंजकाचे अनेक प्रकार संभवत असले, तरी त्यापैकी 'रसादि' या एकाच प्रकाराकडे कवीने लक्ष पुरवावे ॥ ५ ॥

काव्यविषयांच्या अनंतत्वाला कारणीभूत असणारा हा व्यंग्यव्यंजकसंबंध निरनिराळ्या तऱ्हांनी संभवतो. तथापि आपल्या काव्यात नवीनपणा यावा अशी इच्छा असणाऱ्या कवीने रसादिस्वरूपाचा व्यंग्यार्थ असलेल्या एकाच व्यंग्य-व्यंजकसंबंधावर प्रयत्नपूर्वक आपले लक्ष केंद्रित करावे. कारण रस, भाव, त्यांचे आभास या स्वरूपाच्या व्यंग्यार्थावर व तो व्यक्त करणाऱ्या पूर्वी [३] सांगितलेल्या वर्ण, पदे, वाक्ये, संघटना व संपूर्ण काव्ये यांवर दृष्टि ठेवणाऱ्या कवीच्या सर्व काव्याला अपूर्वता प्राप्त होते. त्यामुळेच युद्धे वगैरेची वर्णने रामायण, महाभारत इत्यादींमध्ये पुन्हा पुन्हा केलेली असली, तरी (रसादींचा आश्रय केल्यास) ती वर्णने नवनवीन भासतात. आणि एकाच रसाला प्राधान्य देऊन त्याची जर संपूर्ण काव्यात योजना केली, तर

तीमुळे त्या काव्याला अपूर्वपणाचे वैशिष्ट्य व कमालीचे सौंदर्य प्राप्त होते. 'कशाप्रमाणे?' असे विचाराल, तर जसे रामायणाला, किंवा महाभारताला. कारण (संपूर्ण) रामायणात मुख्य धागा करुणरसाचाच आहे, हे आदिकवींनी 'शोक श्लोक झाला [४]' असे म्हणून सूचित केले आहे. आणि त्यांनी रामाला सीतेचा कायमचा वियोग घडेपर्यंत [५] आपल्या महाकाव्याचा विस्तार करून तोच करुण रस मुख्य म्हणून टिकवून धरिला आहे.

महाभारताचे स्वरूप सुद्धा 'शास्त्र' या प्रकाराचे [६] असून ते काव्य सौंदर्यानेही युक्त आहे. महर्षि व्यासांनी यादव व पांडव यांच्या दुःखकारक शेवटामुळे उद्वेग उत्पन्न करणारी अशी त्या काव्याची समाप्ति करून आपल्या काव्याचे तात्पर्य मुख्यतः वैराग्य निर्माण करणे हे असून आपल्या काव्याच्या प्रतिपादनाचा मुख्य विषय 'मोक्ष' हा पुरुषार्थ व 'शांत' हा रस आहे, हेच सुचविले आहे, आणि हेच इतर टीकाकारांनीही [६*] काही प्रमाणात प्रदर्शित केले आहे. इतकेच नव्हे, तर सर्वत्र दाटून राहिलेल्या गाढ अज्ञानांधकारात बुडालेल्या जगाचा उद्धार करण्याच्या इच्छेने परमशुद्ध ज्ञानांचा प्रकाश दाखविणाऱ्या त्या लोक-तारक (व्यास) मुनीने स्वतःच असे उद्‌गार काढले आहेत की—

'या जगात चाललेले व्यवहार [७] जसजसे फोल, आभासमय असल्याप्रमाणे दिसू लागतात, तसतशी त्यांच्याबद्दल वैराग्यभावना उत्पन्न होते यात शंका नाही. [८]'

आणि यासारखे विचार व्यासांनी पुनः पुनः सांगितले आहेत. त्यामुळे (महाभारतात) शांत रस हा 'अंगी' असून इतर रस [९] त्याला अंगभूत म्हणजे त्याचाच परिपोष करणारे आहेत व मोक्ष हा पुरुषार्थ मुख्य असून इतर पुरुषार्थ [१०] त्याला साधनीभूत आहेत हाच प्रतिपादनाचा मुख्य विषय होय हे महाभारताचे तात्पर्य असल्याचे स्पष्टपणे प्रत्ययास येते. रसांमध्ये एक मुख्य व बाकीचे अंगभूत असा संबंध कशा प्रकारे असू शकतो, हे मागे [११] सांगितलेच आहे.

लोचनम्

अत्यन्तग्रहणेन निरपेक्षभावतया विप्रलम्भाशङ्कां परिहरति । वृष्णीनां परस्परक्षयः, पाण्डवानामपि महापथक्लेशेनानुचिता विपतिः, कृष्णस्यापि व्याधाद्विध्वंस इति सर्वस्यापि विरसमेवावसानमिति । मुख्यतयेति । यद्यपि 'धर्मे चार्थे च कामे च मोक्षे चे' त्युक्तं, तथापि चत्वारश्चकारा एवमाहुः— यद्यपि धर्भार्थकामानां सर्वस्वं तादृङ्नास्ति यदन्यत्र न विद्यते, तथापि पर्यन्तविरसत्वमत्रैवावलोक्यताम् । मोक्षे तु यद्रूपं तस्य सारतात्रैव विचार्यतामिति ।

यथा यथेति । लोकैस्तन्त्र्यमाणं यत्नेन सम्पाद्यमानं धर्मार्थकामतत्साधनलक्षणं वस्तुभूततयाभिमतमपि । येन येनार्जनरक्षणक्षयादिना प्रकारेण । असारवत्तुच्छेन्द्रजालादिवत् । विपर्येति प्रत्युत विपरीतं सम्पद्यते, आस्तां तस्य स्वरूपचिन्तेत्यर्थः । तेन तेन प्रकारेण अत्र लोकतन्त्रे विरागो जायत इत्यनेन तत्त्वज्ञानोत्थितं निर्वेदं शान्तरसस्थायिनं सूचयता तस्यैव च सर्वेतरासारत्वप्रतिपादनेन प्राधान्यमुक्तम् ।

लोचन

'कायमचा' हा शब्द योजून रामाला सीतेच्या पुनर्भेटीची आशा नसल्याने, विप्रलंभ शृंगार असू शकेल या संभाव्य शंकेचे वृत्तिकार निवारण करितात. यादवांनी परस्परांचा केलेला नाश आणि पांडवांनासुद्धा अखेरच्या प्रवासामध्ये नाना प्रकारचीं दुःखे सोसावी लागून त्यांना न साजेशा पद्धतीचे मरण पत्करावे लागणे, कृष्णालाही पारध्याकडून मृत्यु येणे, [१२] अशा रीतीने सगळ्यांचाच म्हणजे (म्हणजे यादव, पांडव, कृष्ण यांचा) महाभारतामध्ये शोककारक शेवट होतो. 'मुख्य (विषय)' – जरी (महाभारतात) 'धर्माच्या व अर्थाच्या व कामाच्या बाबतीत आणि मोक्षाच्या बाबतीत' असे म्हटले आहे [१३], तरी त्या (म्हणजे **धर्मे च अर्थे च कामे च मोक्षे च** या) वचनात जे चार **'च'** कार योजिले आहेत, त्यांचा सूचितार्थ असा– जरी धर्म अर्थ व काम यांचे महाभारतात सांगितलेले सारभूत स्वरूप दुसऱ्या कोणत्याही ग्रंथात आढळणार नाही अशा प्रकारचे नाही, तरी या तीन पुरुषार्थांचा शेवट शोककर होतो, हा विचार याच ग्रंथात पाहावयास मिळेल. मोक्षाच्या बाबतीत मात्र त्या मोक्षाचे जे निरपवाद श्रेष्ठ स्वरूप, ते या महाभारतातच आढळेल, असा अर्थ.

'जसजसे' – लोकांकडून साधिले जाणारे म्हणजे प्रयत्नपूर्वक मिळविले जाणारे धर्म, अर्थ, काम व त्यांचे उपाय हे सत्य आहेत असे सामान्य लोकांना वाटत असले तरी संपादन, रक्षण, नाश इ. निरनिराळ्या अवस्थांमधून जात असताना ते फोल, आभासमय असल्याप्रमाणे म्हणजे जादूगाराच्या सत्त्वशून्य, पोकळ जादूप्रमाणे वेगळे (म्हणजे असत्य असल्याप्रमाणे) दिसू लागतात, म्हणजे (त्यांच्या मूळ मोहक रूपाहून) अगदी विरुद्धच रूप धारण करितात. मग त्यांच्या त्या असत्य, पोकळ स्वरूपाचा विचार करण्याची गोष्ट राहू द्या, असा अर्थ. त्या त्या प्रकाराने म्हणजे तसतशी, त्या म्हणजे धर्मार्थकाम यांच्या व त्यांच्या उपायांच्या बाबतीत वैराग्यभावना उत्पन्न होते. या श्लोकाच्याद्वारे शांत रसाचा स्थायिभाव जो तत्त्वज्ञानामुळे उदित होणारा निर्वेद (म्हणजे संसाराविषयीचा तिटकारा), तो सुचवून जगातील इतर सर्व गोष्टींचा फोलपणा प्रतिपादन केल्याने त्या शांतरसाचा स्थायीभाव असलेल्या निर्वेदाचे प्राधान्य महाभारतात व्यासमहर्षींनी सुचविले आहे.

टीपा

१) पाहा, उद्द्योत ३, कारिका २ व १६.

२) उदा. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'अनुभवी कवींनी रसादींची प्रतीति घडवणे हेच मुख्य मानावे'" वरील 'कारण रसोचित शब्दार्थ उपयोजिण्याच्या बाबतीत ..... इ.' वाक्य.

३) पाहा, उद्द्योत ३, कारिका २.

४) पाहा, वाल्मीकिरामायण, सर्ग २, श्लोक ४०.

५) रामायणात सीतेला पृथ्वीने आपल्या उदरात घेऊन तिच्या दुःखपूर्ण जीविताचा शेवट केला, व अशा रीतीने रामाची सीतेपासून कायमची ताटातूट झाल्याचे वर्णिले आहे. त्यानंतर अखेरीस म्हटले आहे की, रामाला यामुळे अत्यंत दुःख होऊन पृथ्वीने सीता आपणास परत द्यावी अशी त्याने प्रार्थना केली. या शोकाकुल अवस्थेमध्ये ब्रह्मदेव तेथे प्रगट झाले व मरणोत्तर स्वर्गलोकात रामाची व सीतेची पुनर्भेट होत

असल्याने, रामाने आपला शोक आवरावा अशा प्रकारे त्यांनीं रामाचे सांत्वन केले. हा भाग अर्थातच प्रक्षिप्त असल्यासारखा दिसतो. आनन्दवर्धनांच्या वेळी तो भाग एकतर रामायणात नसावा किंवा तो असला तरी, रामायणाचे साहित्य या दृष्टीने मूल्यमापन करताना त्या भागाकडे दुर्लक्षच करणे योग्य असे आनन्दवर्धनांचे ठाम मत असावे. हे मत साहित्यसमीक्षेच्या दृष्टीने अपूर्व व लक्षणीय आहे हे निःसंशय.

६) कारण महाभारतात ऐहिक व्यवहार व मोक्ष यांसंबंधी जागोजाग विवेचन केलेले आहे.

६*) आनंदवर्धनांच्या पूर्वीचे टीकाकार कोण हे सांगणे कठीण आहे.

७) अभिनवगुप्तांनी मूळ श्लोकातील 'लोकतन्त्र' या शब्दाचा अर्थ 'मनुष्यांची सारी धडपड ज्या धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थाच्या प्राप्तीसाठी चाललेली असते, ते पुरुषार्थ व त्यांच्या प्राप्तीचे उपाय असा केला आहे. त्या शब्दाचा अनुवाद आम्ही अभिनवगुप्तांना अनुसरूनच केला आहे.

८) महाभारत, भांडारकर संस्करण, शांतिपर्व, १६८—४.

९) उदा.— महाभारतातील वीर, रौद्र, भयानक इ. रस अंगभूत होत.

१०) म्हणजे धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ.

११) उद्द्योत ३, कारिका २० ते २३ व त्यांवरील वृत्तीमध्ये.

१२) कृष्ण विश्रांति घेत असता एका पारध्याने त्याच्या तळपायास बाण मारल्यामुळे त्याला मृत्यु आला अशी महाभारतात कथा आहे.

१३) महाभारत, भांडारकर संस्था संस्करण, १—५६—३३. तो संपूर्ण श्लोक पुढील प्रमाणे आहे.

धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च भरतषंभ ।
यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित् ॥

ध्वन्यालोकः

पारमार्थिकान्तस्तत्त्वानपेक्षया शरीरस्येवाङ्गभूतस्य रसस्य पुरुषार्थस्य च स्वप्राधान्येन चारुत्वमप्यविरुद्धम् ।

ननु महाभारते यावान्विवक्षाविषयः सोऽनुक्रमण्यां सर्व एवानुक्रान्तो न चैतत्तत्र दृश्यते, प्रत्युत सर्वपुरुषार्थप्रबोधहेतुत्वं सर्वरसगर्भत्वं च महाभारतस्य तस्मिन्नुद्देशे स्वशब्दनिवेदितत्वेन प्रतीयते । अत्रोच्यते सत्यं शान्तस्यैव रसस्याङ्गित्वं महाभारते मोक्षस्य च सर्वपुरुषार्थेभ्यः प्राधान्यमित्येतन्न स्वशब्दाभिधेयत्वेनानुक्रमण्यां दर्शितं, दर्शितं तु व्यङ्ग्यत्वेन— 'भगवान्वासुदेवश्च कीर्त्यतेऽत्र सनातनः' इत्यस्मिन्वाक्ये । अनेन ह्ययमर्थो व्यङ्ग्यत्वेन विवक्षितो यदत्र महाभारते । पाण्डवादिचरितं यत्कीर्त्यते

तत्सर्वमवसानविरसमविद्याप्रपञ्चरूपं च, । परमार्थसत्यस्वरूपस्तु भगवान् वासुदेवोऽत्र कीर्त्यते । तस्मात्तस्मिन्नेव परमेश्वरे भगवति भवत भावितचेतसो, मा भूत विभूतिषु निःसारासु रागिणो गुणेषु वा नयविनयपराक्रमादिष्वमीषु केवलेषु केषुचित्सर्वात्मना प्रतिनिविष्टधियः । तथा चाग्रे—पश्यत निःसारतां संसारस्येत्यमुमेवार्थं द्योतयन्स्फुटमेवावभासते व्यञ्जकशक्त्यनुगृहीतश्च श्ब्दः । एवंविधमेवार्थं गर्भीकृतं संदर्शयन्तोऽनन्तरश्लोका लक्ष्यन्ते — 'स हि सत्यम्—' इत्यादयः ।

अयं च निगूढरमणीयोऽर्थो महाभारतावसाने हरिवंशवर्णनेन । समाप्तिं विदधता तेनैव कविवेधसा कृष्णद्वैपायनेन सम्यक्स्फुटीकृतः । अनेन चार्थेन संसारातीते तत्त्वान्तरे भक्त्यतिशयं प्रवर्तयता सकल एव । सांसारिको व्यवहारः पूर्वपक्षीकृतो न्यक्ष्येण प्रकाशते । देवतातीर्थतपः प्रभृतीनां च प्रभावातिशयवर्णनं तस्यैव परब्रह्मणः प्राप्त्युपायत्वेन तद्विभूतित्वेनैव देवताविशेषाणामन्येषां च । पाण्डवादिचरितवर्णनस्यापि वैराग्यजननतात्पर्याद्वैराग्यस्य च मोक्षमूलत्वान्मोक्षस्य च भगवत्प्राप्त्युपायत्वेन मुख्यतया गीतादिषु प्रदर्शितत्वात्परब्रह्मप्राप्त्युपायत्वमेव परम्परया । वासुदेवादिसंज्ञाभिधेयत्वेन चापरिमितशक्त्यास्पदं परं ब्रह्म गीतादिप्रदेशान्तरेषु तदभिधानत्वेन लब्धप्रसिद्धि माथुरप्रादुर्भावानुकृतसकलस्वरूपं विवक्षितं न तु माथुरप्रादुर्भावांश एव, सनातनशब्दविशेषितत्वात् । रामायणादिषु चानया संज्ञया भगवन्मूर्त्यन्तरे व्यवहारदर्शनात् । निर्णीतश्चायमर्थः शब्दतत्त्वविद्भिरेव ।

तदेवमनुक्रमणीनिर्दिष्टेन वाक्येन भगवद्व्यतिरेकिणः सर्वस्यान्यस्यानित्यतां प्रकाशयता मोक्षलक्षण एवैकः परः पुरुषार्थ शास्त्रनये, काव्यनये च तृष्णाक्षयसुखपरिपोषलक्षणः शान्तो रसो महाभारतस्याङ्गित्वेन विवक्षित इति सुप्रतिपादितम् । अत्यन्तसारभूतत्वाद्यायमर्थो व्यङ्ग्यत्वेनैव दर्शितो न तु वाच्यत्वेन । सारभूतो ह्यर्थः स्वशब्दानभिधेयत्वेन प्रकाशितः सुतरामेव शोभामावहति । प्रसिद्धिश्चेयमस्त्येव विदग्धविद्वत्परिषत्सु यदभिमततरं वस्तु व्यङ्ग्यत्वेन प्रकाश्यते न साक्षाच्छब्दवाच्यत्वेन ।

ध्वन्यालोक

आतील खऱ्या तत्त्वाचा (म्हणजे आत्म्याचा) विचार बाजूला ठेवल्यास त्या तत्त्वाच्या तुलनेने दुय्यम असणाऱ्या शरीराचे केवळ स्वतःच्या दृष्टीने प्राधान्य व सौन्दर्य असते यात जसा काही विरोध जाणवत नाही, त्याप्रमाणेच अंगभूत असणारा रस किंवा पुरुषार्थ यांचेही केवळ स्वतःचे असे प्राधान्य व सौंदर्य असण्यात काही वावगे वाटत नाही.

पण काय हो, महाभारतात जेवढे म्हणून विषय प्रतिपादन करावयाचे होते, ते सर्व महाभारताच्या अनुक्रमणीयध्ये [१] क्रमाने निर्देशिले आहेत, पण त्या अनुक्रमणीत शान्तरस किंवा मोक्ष मुख्य असल्याचा कोठे उल्लेख दिसत नाही. उलट सर्व पुरुषार्थांबद्दल प्रतिपादन करणे व सर्व रसांनी संपन्न असणे हे महाभारताचे मुख्य स्वरूप आहे. असे त्या अनुक्रमणीत उघड शब्दांनी सांगितल्याचा [२] प्रत्यय येतो!' या बाबतीत आमचे म्हणणे असे— हे खरे आहे की अतुक्रमणीमध्ये शांतरस हाच महाभारतात 'अंगी [३]' असल्याचे व मोक्ष हाच सर्व पुरुषार्थांमध्ये मुख्य असल्याचे शब्दांनी सरळ सांगितलेले नाही, पण ते पुढील वाक्यातून सूचित केले आहे—

'या ग्रंथात शाश्वत अशा भगवान् वासुदेवाचे माहात्म्य वणिले आहे. [४]'

या वाक्याचे द्वारे असा अर्थ सूचित करण्याचा उद्देश आहे की, या महाभारतामध्ये पाण्डव वगैरेंचा जो जीवनवृत्तांत वर्णन केला आहे, त्याचे पर्यवसान दुःखातच होते आणि त्या सर्वांचे स्वरूप म्हणजे मायेचा एक विलास अशा प्रकारचे आहे. पण ज्याचे स्वरूप खरोखर अस्तित्वात असणारे आहे, अशा भगवान वासुदेवाच्या थोरवीचे वर्णन या ग्रंथात केले आहे. म्हणून त्याच परम ऐश्वर्यसंपन्न असणाऱ्या भगवंताचे ठिकाणी आपली मने जडवा, सारहीन असणाऱ्या ऐहिक संपत्तीवर प्रेम करू नका, किंवा व्यवहारकुशलता, नम्रता, पराक्रम, इत्यादि परमेश्वराच्या भक्तीला पारखे झालेल्या कोणत्याही गुणांवर तुमचे मन सर्वस्वी लुब्ध होऊ देऊ नका. त्याप्रमाणे पुढे [५] (म्हणजे अनुक्रमणीनंतर महाभारत या ग्रंथातही) असे शब्द असलेले स्पष्टच दिसतात, की जे व्यंजकशक्तीने युक्त असून हाच अर्थ सुचवितात की, संसार किती फोल, अर्थशून्य आहे, पाहा. नंतरचे 'कारण तोच सत्यस्वरूपी आहे [६]' इत्यादि श्लोकही वरीलसारखाच सूचितार्थ प्रकट करणारे दिसतात.

आणि हाच गूढ, रम्य आशय, कविवंशाचा निर्माता असलेल्या त्या कृष्णद्वैपायन व्यासांनीच महाभारताची समाप्ति हरिवंशवर्णनाने करून उत्तम प्रकारे विशद करून दाखविला आहे. आणि या आशयाच्या द्वारे, संसाराच्या पलीकडील तत्त्वावर पराकाष्ठेची भक्ति करण्यास प्रवृत्त करून त्यांनी संसाराच्या सगळ्या घडामोडी फोल, व्यर्थ असल्याचे दाखवून त्या संसाराचे खंडन केले आहे असे दिसते. आणि देवता, तीर्थे तपे इत्यादिकांच्या थोर प्रभावाचे जे वर्णन (महाभारतात) केले आहे, ते त्याच परब्रह्माच्या प्राप्तीचा उपाय म्हणून केले आहे व इतर विशिष्ट देवतांचे वर्णनही त्या देवता त्याचाच अंश असल्यामुळे त्याच परब्रह्माच्या प्राप्तीचा उपाय म्हणून केले आहे. पांडव वगैरेचा वृत्तांत कथन करण्यामागील उद्दिष्टही वैराग्य उत्पन्न करणे हेच आहे. आणि वैराग्य हा मोक्षाचा पाया असून भगवद्गीता वगैरे ग्रंथातून मोक्ष हा भगवप्राप्तीचा उपाय म्हणून मुख्यत्वाने सांगितला असल्यामुळे तो (पांडवादिकांचा वृत्तांत म्हणजे) परंपरेने परब्रह्माच्याच प्राप्तीचे साधन होय. (महाभारतातील) 'वासुदेव' इ. नावांचा कोणता वाच्य अर्थ अभिप्रेत आहे? तर भगवद्गीता इ. महाभारताच्या भागांमध्ये 'वासुदेव' याच नावाने प्रसिद्धि पावलेले, अपरिमित सामर्थ्याने संपन्न असलेले, मथुरेत झालेल्या (कृष्ण या) अवतारामध्ये ज्याचे समग्र स्वरूप प्रकट झाले होते, ते परब्रह्म हा (अर्थ अभिप्रेत आहे), मथुरेत प्रकट झालेला केवळ कृष्ण हा अंशच (वासुदेव या नावाचा आशय) नव्हे, कारण वर उद्धृत केलेल्या वाक्यात 'वासुदेव' या शब्दाला 'सनातन' म्हणजे 'शाश्वत' हे विशेषण लावले आहे आणि रामायण इ. ग्रंथामध्येही [६] ही संज्ञा भगवंताच्या अन्य अवतारांना उद्देशून वापरली आहे. आणि शब्दांचे यथार्थ स्वरूप जाणणाऱ्या वैयाकरणांनीच 'वासुदेव' शब्दाचा हाच अर्थ निश्चित केला आहे [७].

म्हणून अशा रीतीने अनुक्रमणीत सांगितलेल्या आणि भगवंताखेरीज इतर सर्व अनित्य आहे असा अर्थ प्रकट करणाऱ्या वाक्याचे [८] द्वारा, मोक्षस्वरूपी एकच परमपुरुषार्थ महाभारतात प्रधान म्हणून शास्त्रदृष्ट्या [९] अभिप्रेत असून काव्यदृष्ट्या [१०] तृष्णेच्या क्षयामुळे होणाऱ्या सुखाचा परिपोष हेच ज्याचे स्वरूप आहे असा शांतरस [११] महाभारतात मुख्य म्हणून अभिप्रेत आहे असे उत्तम प्रकारे दाखविले गेले आहे.

आणि हा विचार महाभारताचे सारसर्वस्वच असल्यामुळे तो व्यंग्य रूपानेच प्रकट केला आहे, वाच्यरूपाने नव्हे; कारण अत्यंत महत्त्वाचा विचार जर त्याच्या साक्षात् वाचक शब्दांनी प्रकट करण्याऐवजी निराळ्या प्रकारे म्हणजे व्यंजनेने प्रकट केला, तर त्याला कमालीचे सौंदर्य प्राप्त होते. रसिकांच्या व विद्वानांच्या वर्तुळांमध्ये ही गोष्ट सुविश्रुत आहे की विशेष आवडती गोष्ट तिच्या वाचक शब्दांनी 'वाच्य' केली जात नाही, तर ती व्यंग्यरूपानेच प्रकट केली जाते.

लोचनम्

ननु श्रृङ्गारवीरादिचमत्कारोऽपि तत्र भातीत्याशङ्क्याह—पारमार्थिके ति । भोगाभिनिवेशिनां लोकवासनाविष्टानामङ्गभूतेऽपि रसे तथाभिमानः, यथा शरीरे प्रमातृत्वाभिमानः प्रमातुर्भोगायतनमात्रेऽपि । केवलेष्विति । परमेश्वरभक्त्युपकरणेषु तु न दोष इत्यर्थः । विभूतिषु रागिणो गुणेषु च निविष्टधियो मा भूतेति सम्बन्धः । अग्र इति । अनुक्रमण्यनन्तरं यो भारतग्रन्थः तत्रेत्यर्थः । ननु वसुदेवापत्यं वासुदेव इत्युच्यते, न परमेश्वरः परमात्मा महादेव इत्याशङ्क्याह्— वासुदेवादिसंज्ञाभिधेयत्वेनेति ।

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वम्

इत्यादौ अंशिरूपमेतत्संज्ञाभिधेयमिति निर्णीतं तात्पर्यम् । निर्णीत श्चेति । शब्दा हि नित्या एव सन्तोऽनन्तरं काकतालीयवशात्तथा सङ्केतिता इत्युक्तम् —'ऋष्यन्धकवृष्णिकुरुभ्यश्चे'त्यत्र ।

शास्त्रनय इति । तत्रास्वादयोगाभावे पुरुषेणार्थ्यत इत्ययमेव व्यपदेशः सादरः, चमत्कारयोगे तु रसव्यपदेश इति भावः । एतच्च ग्रन्थकारेण तत्त्वालोके वितत्योक्तमिह त्वस्य न मुख्योऽवसर इति नास्माभिस्तद्दर्शितम् । सुतरामेवेति यदुक्तं तत्र हेतुमाह— प्रसिद्धिश्चेति । चशब्दो यस्मादर्थे । यत इयं लौकिकी प्रसिद्धिरनादिस्ततो भगवद्व्यासप्रभृतीनामप्ययमेवास्वशब्दाभिधाने आशयः, अन्यथा हि क्रियाकारकसम्बन्धान्दौ 'नारायणं नमस्कृत्ये' त्यादिशब्दार्थनिरूपणे च तथाविध एव तस्य भगवत आशय इत्यत्र किं प्रमाणमिति भावः । विदग्धविद्वद्ग्रहणेन काव्यनये शास्त्रनय इति चानुसृतम् ।

लोचन

पण काय हो, महाभारतात शृंगार, वीर वगैरेंच्या परिपोषामुळेही सहृदयांना चमत्काराचा म्हणजे अलौकिक आनंदाचा अनुभव येतोच की! (मग वृत्तिकारांनी 'शान्तरसालाच प्राधान्य दिले गेले आहे' असे काय म्हणून म्हटले?) अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'आतींल खऱ्या तत्त्वाचा' इ. शब्दांनी उत्तर देतात. भोगांविषयी आसक्त असलेल्या आणि ऐहिक वासनांनी म्हणजे आकांक्षांनी ग्रस्त झालेल्या लोकांना वास्तविक अंगभूत असलेले शृंगार, वीर वगैरे रसही तसे म्हणजे प्रधान असल्याप्रमाणे वाटतात. (पण हे त्यांचे मत चुकीचे आहे). जसे सामान्य लोक [१२] जीवाला विषयोपभोग मिळण्याचे केवळ अधिकरण असलेल्या शरीरालाही ज्ञाता मानितात, तसे. 'परमेश्वरभक्तीला पारखे झालेल्या—' पण ते गुण जर परमेश्वरभक्तीला उपकारक होत असतील, तर त्यांत काही वावगे नाही, असा अर्थ. 'ऐहिक संपत्तीवर प्रेम करणारे आणि व्यवहारकुशलता इ. गुणांवर तुमचे मन लुब्ध होऊ देऊ नका' असा (मधले शब्द गाळून) सरळ अन्वय करावा. 'पुढे' म्हणजे अनुक्रमणीनंतरचा जो महाभारत या ग्रंथाचा भाग, त्यामध्ये, असा अर्थ. 'पण काय हो, कृष्णाला 'वासुदेव' असे जे नाव दिले आहे, ते 'वसुदेवाचा मुलगा' या अर्थाने दिले आहे, कृष्ण हा परमेश्वर, परमात्मा किंवा देवाधिदेव आहे या दृष्टीने त्याला वासुदेव म्हणत नाहीत!' अशी प्रतिपक्ष्याची शंका कल्पून तिला वृत्तिकार 'वासुदेव इ. नावांचा कोणता वाच्य अर्थ' इ. शब्दांनी उत्तर देतात. 'ज्ञानी मनुष्य पुष्कळ जन्मांनंतर जगात जे काही आहे ते सर्व वासुदेवच आहे या भावनेने माझ्या भजनी लागतो—' यासारख्या (गीतेतील) श्लोकांतून या म्हणजे 'वासुदेव [१३] या नावाचा खरा अर्थ संपूर्ण परब्रह्म' हाच आहे (परमात्म्याचा अंश असलेला कृष्ण हा त्याचा खरा अर्थ नाही) हेच तात्पर्य असल्याचे निश्चित झाले

आहे. 'आणि हाच अर्थ निश्चित केला आहे—' कारण शब्द हे नित्यच (म्हणजे अनादिकालापासून भाषेत प्रचलित झालेले) असून मागाहून काकतालीयन्यायाने (म्हणजे योगायोगाने) त्यांचा त्या त्या (म्हणजे वसुदेवपुत्र कृष्ण इ.) अर्थांवर संकेत झाला [१४] असे **ऋष्यन्धकवृष्णिकुरुभ्यश्च** [१५] या सूत्राच्या संदर्भात म्हटले आहे.

'शास्त्रदृष्ट्या' – त्या (म्हणजे शास्त्रीय) दृष्टिकोणातून पाहताना 'आस्वाद' घेण्याचा प्रश्न उपस्थित होत नसल्याने पुरुष (म्हणजे मनुष्य) जे मिळविण्याची इच्छा करितो, तो पुरुषार्थ या दृष्टीने हाच म्हणजे मोक्ष हाच पुरुषार्थ महाभारताचा प्रतिपाद्य विषय आहे असे म्हणणे योग्य होईल. पण महाभारतातून प्रत्ययाला येणाऱ्या चमत्कृतीच्या म्हणणे सविस्मय आनंदाच्या दृष्टीने महाभारतात निरनिराळ्या रसांचे (व विशेषतः शांत रसाचे) चित्रण केले आहे असे म्हणणे उचित होईल, असा भावार्थ. हा विषय [१६] ग्रंथकाराने आपल्या 'तत्त्वालोक' या ग्रंथामध्ये सविस्तर चर्चिला आहे. पण येथे त्याची चर्चा करण्याचा योग्य प्रसंग नाही. म्हणून आम्ही येथे त्याचे अधिक विवेचन केले नाही. 'कमालीचे (सौंदर्य)' असे जे वृत्तीत म्हटले आहे, त्याचे कारण वृत्तिकार 'कारण ही गोष्ट सुविश्रुत आहे' या शब्दांनी सांगतात. या वाक्यातील **च** हा शब्द 'कारण' या अर्थी घ्यावा. कारण ज्या अर्थी अशी अनादि कालापासून सुपरिचित असलेली पद्धत आहे, त्या अर्थी भगवान् व्यास वगैरेंनी मोक्ष हा पुरुषार्थ व शान्त हा रस हाच महाभारतातील मुख्यत्वाने विवक्षित असलेला विषय होय ही गोष्ट तिच्या वाचक शब्दांनी वाच्य न करिता सुचविली, या मागील त्यांचा अभिप्राय हाच (म्हणजे सर्वात महत्त्वाची गोष्ट सरळ शब्दांनी न सांगता सुचविणे योग्य होय, हा) आहे. तसे नसते, तर [१७] महाभारतातील वाक्यांमधील क्रिया व कारक यांच्या संबंधांच्या बाबतीत आणि 'नारायणाला नमस्कार करून' इ. शब्दांच्या अर्थांचे निरूपण करितानाही भगवान् व्यासांच्या मनातील आशय तसाच म्हणजे व्याकरणशास्त्रातील संकेतांना अनुसरणे हा होता, हे तरी समजण्याला प्रमाण काय? [१९] असा प्रश्न उपस्थित करणे शक्य आहे, असा भावार्थ. 'रसिकांच्या व विद्वानांच्या' असे शब्द योजिल्याने (अनुक्रमे) काव्यदृष्ट्या व शास्त्रदृष्ट्या ह्या दोन शब्दप्रयोगांचा निर्देश केला आहे.

टीपा

१) म्हणजे 'आदिपर्वा' च्या पहिल्या दोन अध्यायांत.

२) द्वितीय खंड, "उद्द्योत – ४ रामायणातील मुख्य रस 'करुण' व महाभारतातील मुख्य रस 'शान्त' होय." वर टीप १३ मध्ये उद्धृत केलेल्या श्लोकात चारही पुरुषार्थाचा स्पष्ट उल्लेख आहे, पण निरनिराळ्या रसांचा स्पष्ट उल्लेख महाभारतात आढळत नाही, असे **याकोबी** म्हणतात.

३) 'अंगी' म्हणजे मुख्य.

४) आदिपर्व, अ. १, श्लो. १९३ (भांडारकर संस्करण).

५) 'पुढे' म्हणजे 'अनुक्रमणीनंतरच्या सर्व महाभारत या 'ग्रंथामध्ये' किंवा 'अनुक्रमणीनंतर लगेच पुढे आलेल्या **'भगवान् वासुदेश्च'**...या वाक्यामध्ये. प्रथमपक्षी वृत्तीतील **शब्दः** याचा अर्थ 'महाभारतातील शब्दांची योजना' असा करावयाचा, कारण **सर्वे क्षयान्ता निचयाः पतनान्ताः समुच्छयाः ।** (स्त्रीपर्व, अ. २,

श्लो. ३) इ. अनेक श्लोकांमधून हाच आशय प्रकट केलेला आढळतो. द्वितीय पक्षी शब्दः या शब्दाने **भगवान् वासुदेवश्च** या पंक्तीमधील **'सनातनः'** या शब्दाचा निर्देश केला आहे असे मानावे लागेल.

६) या अर्थाची महाभारतातील (आदिपर्व, अ. १, श्लोक १९३ मधील) पूर्ण ओळ अशी आहे–
स हि सत्यमृतं चैव पवित्रं पुण्यमेव च ।

७) पाहा, रामायण बालकाण्ड सर्ग ४०, श्लोक २५ :– **ददृशुः कपिलं तत्र वासुदेवं सनातनम् ।** येथे परमेश्वराचा कपिल हा जो माधुर कृष्णाहून निराळा आविष्कार, त्याला सनातन वासुदेव असे म्हटले आहे.

७*) हाच अर्थ म्हणजे सगळ्या जगाला आपल्यामध्ये सामावून घेणारे ब्रह्मतत्त्व म्हणजे विष्णु हा अर्थ. ('वसुदेवाचा मुलगा' हा अर्थ नव्हे).

८) पाहा, द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ४ रामायणातील मुख्य रस 'करुण' व महाभारतातील मुख्य रस 'शान्त' होय." वरील 'या ग्रंथात शाश्वत...' हे वाक्य. या वाक्यातील 'सनातन' शब्दामुळे भगवान् वासुदेव हाच नित्य असून इतर सर्व गोष्टी अनित्य आहेत असे सुचविले गेले आहे. वासुदेव इ. शब्द नित्य असून ते 'परब्रह्म' वाचक आहेत. तरीही ते कृष्ण वगैरे व्यक्तींना लावले जातात, असा या म्हणण्याचा एकंदर निष्कर्ष आहे.

९) म्हणजे महाभारताचे व्यवहारशास्त्र व मोक्षशास्त्र यांचा उपदेश ग्रंथ हे स्वरूप लक्षात घेतल्यास.

१०) म्हणजे महाभारत हे काव्यही आहे ही गोष्ट विचारात घेतल्यास.

११) पाहा, उद्योत ३ द्वितीय खंड 'शान्त हास्वंतंत्र रस आहेत या सिद्धान्ताचे प्रतिपादन'.

१२) म्हणजे उदा. चार्वाकमतानुयायी लोक.

१३) विष्णुपुराणातील **वासुः सर्वनिवासश्च विश्वानि सर्वलीमसु । वासुदेवस्ततो ज्ञेयो बृहत्वाद्विष्णुरुच्यते ॥** या श्लोकामध्ये वासुदेव म्हणजे सर्व विश्वाचे निवासस्थान अमलेला (जगन्निवास) असाच केला आहे.

१४) 'वासुदेव' हा शब्द पहिल्याने 'वसुदेवाचा मुलगा' या अर्थाने वापरात आला असे नाही. कारण, प्रत्येक वसुदेव नामक व्यक्तीच्या मुलाचे नाव वासुदेवच असते असे नाही व प्रत्येक वासुदेव नावाच्या व्यक्तीच्या पित्याचे नाव वसुदेव असते असेही नाही. 'वासुदेव' या शब्दाचा मूळ अर्थ विश्वाला व्यापून राहणारा परमात्मा असा असला, तरी वैयाकरणानी त्याचा संबंध वसुदेव या व्यक्तिनामाशी जोडला व वसुदेव इ. शब्दांना **अण्** हा अपत्यार्थी प्रत्यय लावून वासुदेव इ. शब्द साधता येतात असे दाखविले.

१५) अष्टाध्यायी, ४–१–११४. या सूत्रावरील काशिका वृत्तीमध्ये वरील विधान (म्हणजे लोचनातीक 'कारण शब्द हे... इ.' विधान) केले आहे.

१६) 'तत्त्वालोक' या आनन्दवर्धनकृत ग्रंथाचा पूर्वी "उद्‌द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्याचे मत व त्याचे खंडन'" (प्रथम खंड) वर निर्देश केला आहे. पण तो उपलब्ध नसल्याने त्यात कोणकोणत्या विषयांचा विचार केला असावा हे नक्की सांगता येत नाही. पण प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्याचे मत व त्याचे खंडन'" वरील 'पारमार्थिक पातळीवर गेल्यानंतर सर्वत्र एकच एक ब्रह्म' इ. विधानावरून त्यात मुख्यतः अध्यात्मशास्त्राचा विचार केला असावा असे दिसते. पण येथे 'हा विषय' म्हणजे शास्त्रदृष्टि व काव्यदृष्टि हा असावा असे वाटते. व यामुळे द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ३ 'ध्वनीचे प्रकार गुणीभूतव्यंग्याच्या प्रकारांशी किंवा अलंकारांशी मिश्रित होऊन त्यांची संसृष्टि व संकर विचारात घेतल्यास अनंत प्रकार होतात.'" वरील 'कवींची जी आश्चर्यकारक अवर्णनीय दृष्टि' हा श्लोक तत्त्वालोकातील असण्याचा बराचसा संभव आहे. कारण त्यातही शास्त्रदृष्टि व काव्यदृष्टि यांचा उल्लेख आहे.

१७) 'तसे नसते तर' म्हणजे मोक्ष हा पुरुषार्थ व शांत हा रस प्रधानत्वाने अभिप्रेत आहे असा निर्देश महाभारतामध्ये कोठेही केलेला नसणे हे विदग्ध विद्वानांच्या वर सांगितलेल्या रूढ संकेतास अनुसरून नसते व खरोखरच त्या गोष्टी महत्त्वाच्या नाहीत असे वाटल्यामुळे असते, तर. महाभारतातील वाक्यांचा अर्थ सांगताना ज्याप्रमाणे आपण व्यासांनी व्याकरणशास्त्रातील अर्थप्रक्रियेला अनुसरले आहे असे गृहीत धरतो, त्या प्रमाणेच मोक्ष या पुरुषार्थाचा व शान्त या रसाचा वाच्यतेने निर्देश न करण्वाच्या बाबतीतही व्यासांनी विदग्ध विद्वानांच्या वर सांगितलेल्या रूढ संकेताला अनुसरले आहे, असे आपणास मानावेच लागेल.

ध्वन्यालोकः

तस्मात्स्थितमेतत् – अङ्गिभूतरसाद्याश्रयेण काव्ये क्रियमाणे नवनवार्थलाभो भवति बन्धछाया च महती संपद्यत इति । अत एव च रसानुगुणार्थविशेषोपनिबन्धनमलंकारान्तरविरहेऽपि च्छायातिशययोगि लक्ष्ये दृश्यते । यथा–

मुनिर्जयति योगीन्द्रो महात्मा कुम्भसैभवः ।
येनैकचुलुके [काशी आवत्तीमध्ये 'चुलके' असा पाठ आहे.] **दृष्टौ तौ दिव्यौ मत्स्यकच्छपौ ॥**

इत्यादौ । अत्र हयद्‌भुतरसानुगुणमेकचुलके मत्स्यकच्छपदर्शनं छायातिशयं पुष्णाति । तत्र हयेकचुलके सकलजलधिसंनिधानादपि दिव्यमत्स्यकच्छपदर्शनमक्षुण्णत्वाददद्‌भुतरसानुगुणतरम् । क्षुण्णं हि वस्तु लोकप्रसिद्‌ध्याद्‌भुतमपि नाश्चर्यकारि भवति । न चाक्षुण्णं वस्तूपनिबध्यमानमद्‌भुतरसस्यैवानुगुणं यावद्रसान्तरस्यापि । तद्यथा–

'सिञ्झइ रोमंचिञ्झइ वेवइ रच्छातुलग्गपडिलग्गो ।
सो पासो अज्ज वि सुहअ जेणासि बोलीणो ॥'
[स्विद्यति रोमाञ्चति वेपते रथ्यायदृच्छाप्रतिलग्नः ।
स पार्श्वोऽद्यापि सुभग येनास्यतिक्रान्तः ॥ – इति च्छाया]

एतद्‌गाथार्थाद्भाव्यमानाद्या रसप्रतीतिर्भवति, सा त्वां स्पृष्ट्वा स्विद्यति रोमाञ्चते वेपत इत्येवंविधादर्थात्प्रतीयमानान्मनागपि नो जायते ।

ध्वन्यालोक

म्हणून आता हे निश्चित झाले की, रस, भाव इत्यादिकांना अंगित्व म्हणजे मुख्यत्व देऊन त्यांच्या आश्रयाने काव्य केल्यास त्या काव्याला नावीन्य व रचनेचेही मोठे सौंदर्य प्राप्त होते. आणि याच कारणामुळे काव्यामध्ये रसानुकूल अशा विशेष प्रकारच्या वाच्य अर्थांची योजना केली, तर त्या योजनेला, त्या काव्यात कोणताही खास अलंकार नसला [१], तरी असाधारण सौंदर्य प्राप्त होते. जसे–

'ज्याने एका आचमनात ते दिव्य मत्स्य आणि कूर्म पाहिले, तो योगीश्वर कुम्भजन्मा महात्मा (अगस्त्य) ऋषि धन्य होय.'

यासारख्या श्लोकांमध्ये. कारण या उदाहरणात एका आचमनात मत्स्य व कूर्म यांचे दर्शन अद्‌भुत रसाला अनुकूल असल्याने ते सौंदर्याचा पराकाष्ठेचा परिपोष करीत आहे. कारण त्यात एका आचमनात सर्व समुद्र उपस्थित होणे या गोष्टीपेक्षाही दिव्य मत्स्य व कूर्म यांचे दर्शन घडणे ही गोष्ट त्यापूर्वी कोणीही वर्णिली नसल्याने अद्‌भुत रसाला अधिक पोषक झाली आहे. कारण परिचित झालेली वस्तु अद्‌भुत असली तरी ती लोकांमध्ये प्रसिद्धि पावलेली असल्याने आश्चर्यकारक ठरत नाही. आणि पूर्वी न वर्णिलेली गोष्ट काव्यात वाचक शब्दांनी वर्णिल्यास ती केवळ अद्‌भुत रसालाच उपकारक होते असे नसून तीमुळे अन्य रसांचाही परिपोष होऊ शकतो. उदा—

'रस्त्यात तिच्या शरीराच्या ज्या भागाजवळून तू गेलास व (म्हणून) जो सहजासहजी तुझ्या शरीराला लागला, तो भाग, हे भाग्यशाली पुरुषा! अद्याप धर्मबिन्दूंनी युक्त असून रोमांचित अवस्थत कंप पावत आहे.'

या प्राकृत पद्याचा वाच्यार्थ विचारात घेतल्यास (विप्रलंभशृंगार) रसाचा जो प्रत्यय येतो, तो 'तुझा स्पर्श झाल्याने ती धर्मबिन्दुयुक्त व रोमांचित होऊन कम्प पावते' अशा प्रकारच्या सूचित होणाऱ्या अर्थामुळे किंचित् देखील होत नाही.

लोचनम्

रसादिमय एकस्मिन् कविः स्यादवधानवानिति यदुक्तं, तदेव प्रसङ्गागतभारतसम्बद्धनिरूपणानन्तरमुपसंहरति— तस्मात्स्थितमिति । अत इति । यत एवं स्थितमत एवेदमपि यल्लक्ष्ये दृश्यते, तडुपपन्नमन्यथा तदनुपपन्नमेव, न च तदनुपपन्नम्; चारुत्वेन प्रतीतेः । तस्याश्चैतदेव कारणं रसानुगुणार्थत्वमेवेत्याशयः । अलङ्कारान्तरेति । अन्तरशब्दो विशेषवाची यदि वा दित्सिते उदाहरणे रसवदलङ्कारस्य विद्यमानत्वात्तदपेक्षयालङ्कारान्तरशब्दः ।

ननु मत्स्यकच्छपदर्शनात्प्रतीयमानं यदेकचुलुके जननिधिसन्निधानं ततो मुनेर्माहात्म्यप्रतिपत्तिरिति न रसानुगुणेनार्थेन च्छाया पोषितेत्याशङ्क्याह— अत्र हीति। नन्वेवं प्रतीयमानं जलनिधिदर्शनमेवाद्‌भुतानुगुणं भवत्विति रसानुगुणोऽत्र वाच्योऽर्थ इत्यस्मिन्नंशे कथमिदामुदहरणमित्याशिङ्कयाह— तत्रेति । क्षुण्णं हीति । पुनः पुनर्वर्णननिरूपणादिना यत्पिष्टपिष्टत्वादतिनिर्भिन्नस्वरूपमित्यर्थः । बहुतरलक्ष्यव्यापकं चैतदिति दर्शयति- न चेत्यादिना । रथ्यायां

तुलाग्रेण काकतालीयेन प्रतिलग्नस्साम्मुख्येन स पार्श्वोऽद्यापि सुभग तस्या येनास्यतिक्रान्तः । रसप्रतीतिरिति । परस्परहेतुकश्रृङ्गारप्रतीतिः । अस्यार्थस्य रसानुगुणत्वं व्यतिरेकद्वारेण द्रढ्यति- सा त्वामित्यादिना ।

लोचन

'रसादि या एकाच प्रकाराकडे कवीने लक्ष पुरवावे' असे जे कारिका ५ मध्ये म्हटले, त्याचाच समारोप प्रसंगाने आलेल्या [२] (रामायणाच्या व) महाभारताच्या संबंधातील विवरणानंतर वृत्तिकार 'म्हणून आता हे निश्चित झाले.' इ. शब्दांनी करितात. 'याच कारणामुळे' — ज्या अर्थी अशी वस्तुस्थिति [३] आहे, त्या अर्थी हे देखील [४] जे ललित साहित्यामध्ये आढळते, ते योग्य ठरते. तसे नसते, तर रसाला उपकारक अशी वाच्यार्थाची योजनाही योग्य होणार नाही. पण ती योजना योग्य नाही असे मुळीच अनुभवाला येत नाही. कारण ती वाच्यार्थाची योजना सुंदर आहे असा रसिकांना अनुभव येतो आणि ती सुंदर वाटण्याचे कारण त्या काव्याचा (वाच्य) अर्थ मुख्यरसाच्या परिपोषास अनुकूल असतो हेच होय, असा अर्थ. [५] 'कोणताही खास अलंकार नसला'— 'अलंकारान्तर' यातील 'अन्तर' हा शब्द विशिष्ट किंवा खास (म्हणजे चटकन डोळ्यात भरणारा) या अर्थाचा वाचक आहे. किंवा जे उदाहरण देण्याचे वृत्तिकारांच्या मनात आहे, त्यात 'रसवदलंकार' [६] असल्यामुळे 'त्या रसवदलंकाराहून वेगळा अलंकार' या अर्थाने वृत्तीत 'अलंकारान्तर' हा शब्द योजिला आहे असे समजावे. [७]

'पण काय हो, मत्स्य आणि कूर्म यांच्या दर्शनामुळे सूचित होणारे जे एका आचमनात सर्व समुद्र सामावणे, त्यायोगे मुनीचे लोकोत्तर सामर्थ्य प्रत्ययास येते! म्हणून येथे अद्‌भुत रसाला अनुकूल असलेल्या वाच्य अर्थाने काव्याचे सौंदर्य वाढते असे नाही.' [८] अशी शंका कल्पून तिचे समाधान वृत्तिकार 'कारण या उदाहरणात' इ. शब्दांनी करितात. [९] 'पण काय हो, अशा रीतीने मत्स्य व कूर्म यांचे दर्शन या वाच्य अर्थाच्या द्वारे सूचित होणारा समुद्राचे दर्शन हा जो (व्यंग्य) अर्थ, तोच व्यंग्यार्थ अद्‌भुत रसाला पोषक होतो असे समजा! म्हणजे हे उदाहरण वाच्यार्थ [१०] हा अद्‌भुत रसाला उपकारक आहे या दृष्टीने कसे काय योग्य समजावयाचे?' अशी शंका कल्पून तिला वृत्तिकार 'कारण त्यात एका आचमनात' इ. शब्दांनी उत्तर देतात. 'परिचित झालेली वस्तु'— म्हणजे पुन्हा पुन्हा वर्णन किंवा निरूपण करण्यामुळे एखाद्या वस्तूचे चर्वितचर्वण झाल्याने जिचे स्वरूप अतिशय उघड झालेले असते अशी वस्तु, असा अर्थ. आणि हीच परिस्थिति पुष्कळ काव्यांमध्ये असल्याचे आढळून येते. हे वृत्तिकार 'आणि पूर्वी न वर्णिलेली गोष्ट' इ. शब्दांनी सांगतात. रस्त्यात तिच्या शरीराच्या ज्या भागाजवळून तू गेलास, तो भाग तुझ्या शरीराच्या अगदी समोर असल्याकारणाने तुलाग्राने म्हणजे योगायोगाने [११] तुझ्या शरीराला लागला, तो तिच्या शरीराचा भाग हे भाग्यशाली पुरुषा! अजूनही (घर्मबिंदूंनी युक्त असून रोमांचित अवस्थेत कंप पावत आहे). 'रसाचा प्रत्यय' म्हणजे नायक व नायिका या दोघांच्या ठिकाणी एकमेकांमुळे [१२] उदित झालेल्या प्रीतिभावाचा अभिलाषविप्रलम्भशृंगार या रसाच्या रूपाने वाचकांना येणारा प्रत्यय. हा वाच्य अर्थ अभिलाषविप्रलम्भशृंगाररसाला उपकारक आहे हे वृत्तिकार 'तुझा स्पर्श झाल्याने' इ. शब्दांनी व्यतिरेक पद्धतीचा उपयोग करून [१३] त्या द्वारे अधिक दृढपणे प्रस्थापित करितात.

टीपा

१) यावरूनच मम्मटाने आपल्या काव्यलक्षणात (पाहा. काव्यप्रकाश, उल्लास? कारिका' ३ री) **अनलंकृती पुनः क्वापि** (म्हणजे काव्यातील शब्दार्थात क्वचित् ठिकाणी स्फुट अलंकार नसला तरी चालते) हे शब्द घातले असावे तसे वाटते.

२) 'प्रबन्धामध्ये एकाच रसाला प्राधान्य द्यावे' हा मुद्दा मांडताना दृष्टांतादाखल रामायण व महाभारत यांचा उल्लेख केला होता, असे म्हणून त्या उल्लेखाला 'प्रसंगाने आलेला' असे म्हटले आहे.

३) अशी म्हणजे एकाच रसाला मुख्यत्व देऊन काव्याची रचना केल्यास त्या काव्याला नावीन्य व रचनेचे सौन्दर्य प्राप्त होते, अशी.

४) हे म्हणजे रसभावादिकांना प्राधान्य देऊन त्यांना उपकारक अशीच वाच्यार्थाची योजना करण हे.

५) तात्पर्य, काव्यात रसभावादिकांचा परिषोष नसला, तर केवळ वाच्यार्थामध्ये रसिकांना सौन्दर्याचा प्रत्यय येत नाही. म्हणून रसादिकांना प्रामुख्य असले पाहिजे,म्हणजेच काव्यात सौंदर्याची प्रतीति येईल,नाहीतर नाही.

६) पुढे लगेच दिलेल्या 'ज्याने एका आचमनात' इ. श्लोकात अद्‌भुत हा रस 'मुनिप्रभावातिशय' या वाच्यार्थाला गुणीभूत असल्याने त्यात 'रसवदलंकार' आहे.

७) 'अलंकारान्तर' या शब्दाचा अभिनवगुप्तांनी केलेल्या दोन अर्थापैकी दुसरा अर्थ अधिक ग्राह्य वाटतो, कारण पहिला अर्थ घेतल्यास 'रसबदलंकार' असताना 'खास अलंकार नाही' असे वृत्तीमध्ये म्हणणे योग्य वाटत नाही.

८) म्हणजे अद्‌भुत रसाला अनुकूल असलेल्या वाच्य अर्थाने नव्हे, तर अगस्त्य मुनीच्या तळहतामध्ये सर्व समुद्र मावणे या व्यंग्य अर्थाने काव्याचे सौंदर्य वाढते, असे आक्षेपकाचे म्हणणे.

९) यावरून वृत्तिकारांचा असे म्हणण्याचा उद्देश दिसतो की, या वाच्य अर्थाने प्रथम अद्‌भुत रसाचेच पोषण होते व त्यामुळे या श्लोकांचे सौंदर्य वाढते.

१०) म्हणजे येथे अगस्त्य मुनीला झालेले सर्व सागराचे दर्शन हा वस्तुरूप व्यंग्यार्थ अद्‌भुत रसाला अभिव्यक्त करणारा आहे, वाच्यार्थ नव्हे, असे आक्षेपकाचे म्हणणे.

११) 'तुलग्ग' हा प्राकृत शब्द 'योगायोग' (काकतालीय) या अर्थी हेमचंद्राच्या देशी नाममालेमथ्ये नमूद केला आहे. या गाथेतील विचार **विक्रमोर्वशीयम्,** १—११ व ३—११ यासारखाच आहे. ह्या दोन पद्यांमधील एकात उर्वशीच्या खांद्याचा ओझरता स्पर्श पुरूरव्याच्या खांद्याला झाल्यामुळे त्याच्या मनात प्रेमभावना जणू अंकुरली आहे. असे म्हटले आहे, व दुसऱ्यामध्ये ज्या खांद्याला उर्वशीच्या खांद्याचा स्पर्श झाला, तो अवयव कृतकृत्य झाला असून बाकीचे अवयव भुईला भारभूत आहेत असे म्हटले आहे.

१२) वास्तविक 'परस्परहेतुक (एकमेकांमुळे)' हा शब्दप्रयोग अगदी अचूक नाही, कारण या गाथेत वर्णिलेले स्वेदन, रोमांचन व वेपन हे तीन अनुभाव नायिकेचेच असल्यामुळे तिच्या ठिकाणी नायकाविषयी उदित झालेल्या रतिभावाची प्रतीति वाचकांना येते. नायकाच्या मनातही तिजबद्दल रतिभाव उदित झाला असला पाहिजे हे गाथेच्या संदर्भावरून अभिनवगुप्तांनी गृहीत धरलेले दिसते.

१३) 'तुझ्या स्पर्शाने तिच्या शरीराचा विशिष्ट भाग अजून कंप पावतो' या वाच्य अर्थामुळे अभिलाषशृंगाराची प्रतीति होते' हे विधान वृत्तिकारांनी अन्वय पद्धतीने केले आहे. (अन्वय व व्यतिरेक या शब्दांच्या स्पष्टीकरणार्थ प्रथम खंड, "उद्द्योत -१ 'रसादिस्वरूपाचा अर्थ केव्हाही वाच्य असत नाही'", टीप पहिली पाहा) व 'तुझा स्पर्श झाल्याने ती म्हणजे तिचे सर्व शरीर कंप पावते' इ. व्यंग्यार्थातून अभिलाषशृंगाराची मुळीच प्रतीति होत नाही' हे विधान व्यतिरेक पद्धतीने केलेले आहे.

ध्वन्यालोकः

तदेवं ध्वनिप्रभेदसमाश्रयेण यथा काव्यार्थानां नवनवत्वं जायते तथा प्रतिपादितम् । गुणीभूतव्यङ्ग्यस्यापि त्रिभेदव्यङ्ग्यापेक्षया ये प्रकारास्तत्समाश्रयेणापि काव्यवस्तूनां नवत्वं भवत्येव । तत्त्वातिविस्तारकारीति नोदाहृतं सहृदयैः स्वयमुत्प्रेक्षणीयम् ।

ध्वनेरित्थं गुणीभूतव्यङ्ग्यस्य च समाश्रयात् ।
न काव्यार्थविरामोऽस्ति यदि स्यात्प्रतिभागुणः ॥ ६ ॥

सत्स्वपि पुरातनकविप्रबन्धेपु यदि स्यात्प्रतिभागुणः । तस्मिंस्त्वसति न किंचिदेव कवेर्वस्त्वस्ति । बन्धच्छायाप्यर्थद्वयानुरूपशब्दसंनिवेशोऽर्थप्रतिभानाभावे कथमुपपद्यते । अनपेक्षितार्थविशेषाक्षररचनैव बन्धच्छायेति नेदं नेदीयः सहृदयानाम् । एवं हि सत्यर्थानपेक्षचतुरमधुरवचनरचनायामपि काव्यव्यपदेशः प्रवर्तेत । शब्दार्थयोः साहित्येन काव्यत्वे कथं तथाविधे विषये काव्यव्यवस्थेति चेत्, परोपनिबद्धार्थविरचने यथा तत्काव्यत्वव्यवहारस्तथा तथाविधानां काव्यसंदर्भाणाम् ।

ध्वन्यालोक

तेव्हा याप्रमाणे 'ध्वनी' च्या भिन्नभिन्न प्रकारांचा आश्रय केल्याने (पूर्वी येऊन गेलेल्या) काव्यविषयांना नवे स्वरूप कसे प्राप्त होते हे दाखविले. तिन्ही प्रकारच्या [१] व्यंग्यार्थांमुळे 'गुणीभूतव्यंग्य' काव्याचे जे प्रकार होऊ शकतात, त्या प्रकारांचा आश्रय केल्यानेही काव्याच्या विषयांना नवीनपणा प्राप्त होतो, यात शंका नाही. पण त्या वैचित्र्याचे तपशीलवार वर्णन केल्यास ते फार लांबलचक होईल म्हणून त्याची उदाहरणे आम्ही दिली नाहीत. ती (साहित्यामधून) सहृदयांनी स्वतः शोधून काढावीत,

याप्रमाणे 'प्रतिभा' हा गुण अंगी असल्यास, ध्वनीचा आणि गुणीभूतव्यंग्याचा आश्रय केल्याने काव्याच्या विषयांच्या नावीन्याला मर्यादा राहात नाही. ॥ ६ ॥

पूर्वीच्या कवींनी रचलेली काव्ये असली, तरी प्रतिभागुण जवळ असला, म्हणजे (काव्याच्या विषयांना मर्यादा उरत नाही). पण तो प्रतिभागुण नसला, तर मात्र कवीला कोणताही विषय मिळणार नाही

(आणि मिळाला तरी त्याचे काव्यमय वर्णन त्याला करिता येणार नाही). रचनासौंदर्य म्हणजे तरी वाच्य व व्यंग्य या दोन्ही प्रकारच्या अर्थांना अनुरूप अशी शब्दयोजनाच असल्यामुळे ती देखील जर वाच्य व व्यंग्य या अर्थांचे कवीला स्फुरण झाले नाही, तर कशी शक्य आहे? विशेष सुंदर अशा (व्यंग्य) अर्थाची जिला आवश्यकता नाही अशी केवळ अक्षरांची जुळणी म्हणजेच सुंदर काव्यरचना ही कल्पना सहृदयांना मुळीच मान्य होणार नाही. कारण असे (म्हणजे केवळ अक्षरांची जुळणी हेच रचनासौंदर्य असे) मानले, तर कोणत्याही अर्थांशी संबंध नसणाऱ्या, पण चतुर (म्हणजे समासप्रचुर) अशा कोमल शब्दांच्या रचनेलाच काव्यपदवी द्यावी लागेल! यावर तुम्ही असे म्हणाल की, शब्द आणि अर्थ यांच्या अतूट साहचर्यामुळेच काव्य निर्माण होऊ शकते असे असल्यामुळे तशा (म्हणजे अर्थशून्य असलेल्या, केवळ अक्षरांच्या) रचनेला काव्य कसे म्हटले जाईल,' तर (त्याला उत्तर असे की) पूर्वीच्या कवीने रचलेल्या काव्यातील अर्थ घेऊन त्यावरच (नवीन व्यंग्यार्थाची भर न घालता) एखाद्याने केवळ नवीन शब्दरचना केली, तर त्यालादेखील तुम्ही जसे काव्यच म्हणता, तसेच अशा प्रकारच्या कोणताच वाच्यार्थ प्रकट न करणाऱ्या त्या प्रकारच्या (म्हणजे समासप्रचुर व कोमल अक्षररचना असलेल्या) काव्यांच्या बाबतीतही होईल!

लोचनम्

'ध्वनेर्यस्सगुणीभूतव्यङ्ग्यस्याध्वा प्रदर्शित' इत्युद्योतारम्भे यः श्लोकः तत्र, ध्वनेरध्वना कवीनां प्रतिभागुणोऽनन्तो भवतीत्येष भागो व्याख्यात इत्युपसंहरति—तदेवमित्यादिना । सगुणीभूतव्यङ्ग्यस्येत्यमुं भागं व्याचष्टे — गुणीभूतेत्यादिना । त्रिप्रभेदो वस्त्वलङ्काररसात्मना यो व्यङ्ग्यः तस्य यापेक्षा वाच्ये गुणीभादः तयेत्यर्थः । तत्र सर्वे ये ध्वनिभेदास्तेषां गुणीभावादानन्त्यमिति तदाह—<u>अतिविस्तरेति । स्वयमिति ।</u> तत्र वस्तुना व्यङ्ग्येन गुणीभूतेन नवत्वं सत्यपि पुराणार्थस्पर्शे यथा ममैव—

भअविहलरक्खणेक्कमल्ल सरणागआण अत्थाणं ।
खणमेत्तं वि ण दिण्णा विस्सामकह त्ति जुत्तमिणं ॥
(भयविहवलरक्षणैकमल्ल, शरणागतानामर्थानाम् ।
क्षणमात्रमपि न दत्ता विश्रामकथेति युक्तमिदम्? ॥ इति च्छाया)

अत्र त्वमनवरतमर्थास्त्यजसीति औदार्यलक्षणं वस्तु ध्वन्यमानं वाच्यस्योपस्कारकं नवत्वं ददाति, सत्यपि पुराणकविस्पृष्टेऽर्थे । तथाहि पुराणी गाथा—

चाइअणकरपरंपरसंचारणखेअणिस्सहसरीरा ।
अत्था किवणघरत्था सत्थावत्था सुवंति व्व ॥
(त्यागिजनकरपरम्परासंचरणखेदनिस्सहशरीराः।
अर्थाः कृपणगृहस्थाः स्वस्थावस्थाः स्वपन्तीव ॥ इति च्छाया)
अलङ्कारेण व्यङ्ग्येन वाच्योपस्कारे नवत्वं यथा ममैव—
वसन्तमत्तालिपरम्परोपमाः कचास्तवासन् किल रागवृद्धये ।
श्मशानभूभागपरागभासुराः कथं तदेते न मनाग्विरक्तये ॥

अत्र ह्याक्षेपेण विभावनया च ध्वन्यमानाभ्यां वाच्यमुपस्कृतमिति नवत्वं सत्यपि पुराणार्थयोगित्वे । तथाहि पुराणश्लोक :—

क्षुत्तृष्णाकाममात्सर्यं मरणाद्य महद् भयम् ।
पञ्चैतानि विवर्धन्ते वार्द्धके विदुषामपि ॥ इति ॥

व्यङ्ग्येन रसेन गुणीभूतेन वाच्योपस्कारेण नवत्वं यथा ममैव—
जरा नेयं मूर्ध्नि ध्रुवमयमसौ कालभुजगः
क्रुधान्धः फूत्कारैः स्फुटगरलफेनान् प्रकिरति ॥

तदेनं संपश्यत्यथ च सुखितम्मन्यहृदयः
शिवोपायं नेच्छन् बत बत सुधीरः खलु जनः ॥

अत्राद्भुतेन व्यङ्ग्येन वाच्यमुपस्कृतं शान्तरसप्रतिपत्त्यङ्गत्वाद्यारु भवतीति नवत्वं सत्यप्यस्मिन् पुराणश्लोके—

जराजीर्णशरीरस्य वैराग्यं यन्न जायते ।
तत्नूनं हृदये मृत्युर्दृढं नास्तीति निश्चयः ॥ ५ ॥

सत्स्वपीत्यादि कारिकाया उपस्कारः । त्रीन् पादान् स्पष्टान्मत्वा तुर्यं पादं व्याख्यातुं पठति— यदीति । विद्यमानो ह्यसौ प्रतिभागुण उक्तरीत्या भूयान् भवति, न त्वत्यन्तासन्नेवेत्यर्थः । तस्मिन्निति । अनन्तीभूते प्रतिभागुणे । न किञ्चिदेवेति । सर्वं हि पुराणकविनैव स्पृष्टमिति किमिदानीं वर्ण्यं, यत्र कवेर्वर्णनाव्यापारस्स्यात् । ननु यद्यपि वर्ण्यमपूर्व नास्ति, तथाप्युक्तिपरिपाकगुम्फघटनाद्यपरपर्यायबन्धच्छाया नवनवा भविष्यति, यन्निवेशने काव्यान्तराणां संरम्भ इत्याशङ्क्याह — बन्धच्छायापीति । अर्थद्व्यं गुणीभूतव्यङ्ग्यं प्रधानभूतं व्यङ्ग्यं च । नेदीय इति । निकटतरं हृदयानुप्रवेशि न भवतीत्यर्थः । अत्र हेतुमाह — एवं हि सतीति । चतुरत्वं समाससङ्घटना । मधुरत्वमपारुष्यम् । तथाविधानामिति । अपूर्वबन्धच्छायायुक्तानामपि परीपनिबद्धार्थनिबन्धने परकृतकाव्यत्वव्यवहार एव स्यादित्यर्थस्यापूर्वत्वमाश्रयणीयम् । कवनीयं काव्यं तस्य भावः काव्यत्वं, न त्वयं भावप्रत्ययान्तात् भावप्रत्यय इति शङ्कितव्यम् ।

लोचन

या उद्द्योताच्या सुरुवातीस 'ध्वनि आणि गुणीभूतव्यंग्य यांच्या स्वरूपाचे आतापर्यंत जे विवरण केले' इ. श्लोकापैकी 'ध्वनीच्या स्वरूपाचा अवलंब केल्याने कवींच्या प्रतिभागुणाचा अनंत प्रकारांनी आविष्कार होतो' या भागाचे विवरण करण्याचे काम पुरे झाले, म्हणून वृत्तिकार 'तेव्हा यांप्रमाणे' इ. शब्दांनी या विवरणाचा समारोप करितात. आता (त्या कारिकेतील) 'आणि गुणीभूतव्यंग्य' या भागाचे विवरण वृत्तिकार 'गुणीभूतव्यंग्य काव्याचे जे प्रकार' इ. शब्दांनी करितात. वस्तु, अलंकार व रसादि या स्वरूपाचा असल्यामुळे जो व्यंग्यार्थ तीन प्रकारचा असतो, त्याच्या दृष्टीने म्हणजे तो व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत असण्याच्या दृष्टीने, असा अर्थ. त्यामध्ये (म्हणजे गुणीभूतव्यंग्य काव्यामध्ये) ध्वनीचे आतापर्यंत सांगितलेले जे प्रकार, ते सर्व वाच्यार्थाला गुणीभूत झाल्यास काव्याला अनंत प्रकारचे वैचित्र्य प्राप्त होते. म्हणून वृत्तिकार 'ते फार लांबलचक' इ. विधान करितात. 'सहृदयांनी स्वतः' — अशा उदाहरणांपैकी वस्तुरूपी

व्यंग्यार्थ वाच्यार्थांला गुणीभूत झाला असताना तो विषय पूर्वी कोणी वर्णिला असला तरी तो नवे रूप धारण करितो याचे उदाहरण म्हणजे माझीच पुढील गाथा—

भयाने व्याकुळ झालेल्यांचे रक्षण करण्याच्या बाबतीत अद्वितीय सामर्थ्य असलेल्या हे राजा! तुला शरण आलेल्या संपत्तींला तू आपल्यापाशी एक क्षणभरही विसावा देण्याची गोष्ट बोलला नाहीस हे योग्य झाले काय?

या गाथेतून 'तू संपत्तीचे अखंड दान करितोस' हा 'प्रस्तुत राजाचे औदार्य' या स्वरूपाचा अर्थ वाच्यार्थाची [२] शोभा वाढविणारा [३] झाल्याने हा विषय पूर्वीच्या एका कवीने हाताळला असला, तरी (हा व्यंग्यार्थ गुणीभूत झाल्याने) तो या काव्याला नवीनपणा प्राप्त करून देत आहे. कारण यापूर्वी रचली गेलेली गाथा अशी आहे. —

(अनेक) त्यागी लोकांच्यां हातांतून एकसारखे भ्रमण करीत राहण्याच्या श्रमाने संपत्तीचे शरीर अतिशय थकून गेले, म्हणून संपत्ति कंजुष माणसांच्या घरी राहून जणू काय स्वस्थपणाने निद्रा घेत असते. [४]

व्यंग्यार्थ हा अलंकारस्वरूपी असून तो वाच्यार्थाची शोभा वाढवणारा (म्हणजे वाच्यार्थाला गुणीभूत) झाल्याने काव्याला नवता प्राप्त होते याचे उदाहरण म्हणजे माझाच पुढील श्लोक :—

वसंतऋतूमध्ये आनंदाने धुंद झालेल्या भ्रमरांच्या थव्याची उपमा ज्यांना शोभेल असे तुझे विपुल केश पूर्वी खरोखर तुझ्या मनातील राग म्हणजे कामुकता वाढविण्यास कारणीभूत होत असत. पण ते आता श्मशानातील भूप्रदेशावरील चिताभस्माप्रमाणे पांढुरके झाले असताना तुझ्या मनात थोडीही विरक्ति उत्पन्न करीत नाहीत हे कसे काय?

या श्लोकातून आक्षेप व विभावना [५] हे अलंकार सूचित होऊन ते वाच्यार्थाचे सौंदर्य वाढवीत असल्यामुळे [६] जरी या श्लोकातील विषय जुन्या पद्यात येऊन गेला असला, तरी या श्लोकात नवीनपणा उत्पन्न झाला आहे. या आधीचा (जुना) श्लोक असा :—

भूक, तहान, कामवासना, मत्सर आणि मरणाची मोठी भीति या पाच गोष्टींची म्हातारपण आले असताना विद्वानांच्या बाबतीत सुद्धा वाढ होते. [७]

व्यंग्य 'रस' गुणीभूत होऊन वाच्यार्थाला उपकारक झाला म्हणजे काव्याला नवत्व येते याचे उदाहरण म्हणजे माझाच पुढील श्लोक—

'डोक्यावर असलेले (केसांचे पांढरेपण) हे वार्धक्य नव्हे, तर रागाने अंध झालेल्या व फूत्कार करणाऱ्या मृत्युरूपी सर्पाने विखुरलेले हे विषाच्या फेसाचे पांढरे शुभ्र पुंजके आहेत यात शंका नाही. तो काळसर्प (जवळ आलेला) दिसत असला, तरी लोक स्वतःला सुखी समजतात (व निश्चिंत असतात), पण ते आत्मकल्याणचे [८] उपाय शोधण्याची इच्छा करीत नाहीत. किती, किती थंड, निर्विकार आहेत हे लोक!'

या श्लोकातून अभिव्यक्त होणाऱ्या अद्‌भुत रलाने वाच्यार्थाचे सौंदर्य वाढविले जाऊन तो वाच्यार्थ शांतरसाच्या प्रत्ययाचे अंग होत असल्या मुळे, जरी यापूर्वी रचलेला पुढील श्लोक असला, तरी या श्लोकाला नवीन सौंदर्य प्राप्त झाले आहे —

म्हातारपणामुळे शरीर जर्जर झालेले असले, तरी माणसाला ज्याअर्थी वैराग्य उत्पन्न होत नाही, त्याअर्थी त्याच्या मनाची 'मृत्यू नाही' अशीच ठाम समजूत झाली असली पाहिजे. ॥ ५ ॥

'पूर्वीच्या कवींनी रचलेली काव्ये असली तरी' इ. (वृत्तीतील) शब्द कारिका ६ मधील चरणांचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी शेवटी घातलेली भर आहे. पहिल्या तीन चरणांचा अर्थ स्पष्ट आहे असा विचार करून वृत्तिकार चवथ्या चरणाचे विवरण करण्यासाठी 'जर' इ. शब्दांनी त्याचा पुनरुच्चार करितात. तो प्रतिभागुण मुळात कवीजवळ असला, तरच तो वर सांगितलेल्या उपायांचा अवलंब केल्यास अनंत प्रकारांनी विस्तार पावतो. पण जर तो कवीजवळ मुळीच नसेल, तर तो अनंत प्रकारांनी विस्तार पावत (नाही), असा अर्थ.

'तो' म्हणजे अनंत अंकुर फुटलेला प्रतिभागुण. 'कोणताही विषय—' कारण सर्वच विषय आदिकवीने (वाल्मीकीने) पूर्वी वर्णिले असल्यामुळे आता वर्णन करण्याजोगे वेगळे काय शिल्लक असणार, की ज्याचे वर्णन करण्याच्या उद्योगाला कवीने लागावे? 'पण काय हो [८], वर्णन करण्याजोगा नवीन, विषय जरी शिल्लक नसला, तरी उक्ति, (शब्दप्रयोग), परिपाक (शब्दार्थांचे औचित्य), गुम्फ (शब्दार्थांची गुंफण), घटना (शैली) इ. समानार्थक शब्द ज्याला आहेत असे जे रचनासौंदर्य, ते नवनवीन प्रकारचे असू शकेल व ते रचनासौंदर्य आपल्या काव्यात आणण्यासाठी कवि (आदिकाव्याहून) इतर नवनवी काव्ये लिहिण्याचा खटाटोप करतीलच!' अशी शंका कल्पून वृत्तिकार तिचे समाधान 'रचनासौंदर्य म्हणजे तरी' इ, शब्दांनी करितात. 'दोन्ही प्रकारचे अर्थ' म्हणजे गुणीभूत व्यंग्यार्थ आणि प्रधान असलेला व्यंग्यार्थ. [९] 'मान्य होणारी नाही—' म्हणजे अगदी जवळची, हृदयाला जाऊन भिडणारी होत नाही, असा अर्थ. असे म्हणण्याचे कारण वृत्तिकार 'कारण असे' इ. शब्दांनी सांगतात. '(रचनेचे) चतुरत्व' म्हणजे समासयुक्त रचना. [१०] 'कोमलपणा' म्हणजे कर्कशपणाचा (किंवा कठोर पणाचा) अभाव. 'तशा प्रकारच्या'—जर (एखाद्या उत्तरकालीन कवीने) नव्या रचनासौंदर्याने युक्त काव्य रचले असले, तर जरी पूर्वीच्या कवीने [११] केलेल्या काव्यातील विषय घेऊनच ते काव्य रचले असले, तरी त्या काव्याला नवीन कवीने केलेले काव्य असेच म्हणावे लागेल. (असा अनिष्ट प्रसंग येऊ नये) म्हणून अर्थामुळे उत्पन्न होणारे अपूर्वत्व उत्तरकालीन कवींच्या काव्यात असणे अवश्य आहे. जे तोंडाने (विशिष्ट लयीत) म्हणण्याजोगे [१२] असते, ते 'काव्य' व तसे असणे म्हणजे 'काव्यत्व' होय. पण 'काव्यत्व' हा शब्द एकदा कवि या शब्दाला **ष्यञ् (य)** हा भाववाचक प्रत्यय लागून बनलेल्या 'काव्य' या शब्दाला पुन्हा **त्व** हा भाववाचक प्रत्यय लागून बनला आहे अशी शंका घेऊ नये. ॥ ६ ॥

टीपा

१) पाहा. प्रथम खंड, "उद्‌द्योत -१ 'अनुक्तनिमित्ता विशेषोक्ति म्हणजे 'ध्वनि' नव्हे'" वरील वृत्ति.

२) 'शरणागतांना आश्रय न देण्यातील अनौचित्य' हा वाच्यार्थ. प्रस्तुत गाथेच्या पहिल्या चरणात दहाच मात्रा आहेत, पण **भअविहलरक्खणम्मे** अशी सुधारणा केल्यास १२ मात्रा मिळतात.

३) या गाथेत व्याजस्तुति हा अलंकार आहे, कारण त्यामध्ये राजाची वरवर निंदा केली असली तरी पर्यवसानी ती स्तुतिपरच ठरते. स्तुतिपर व्यंग्यार्थ वाच्यार्थाचे समर्थन करण्याकरिता खर्ची पडतो, म्हणून तो वाच्यसिद्ध्यंग या नात्याने वाच्यार्थाची शोभा वाढविणारा होतो.

४) प्रस्तुत गाथा **छप्पण्णयगाहाओ** नामक गाथासंग्रहामध्ये क्र. १४९ येथे थोड्याशा पाठभेदाने आली आहे. 'त्यागी' याचा अर्थ 'दानशूर' असा केल्यास एका दानशूराच्या हातात व त्याच्या हातून दुसऱ्या दानशूराच्या हातात संपत्ति जाते, असे म्हणण्यात स्वारस्य नाही. म्हणून 'त्यागी जन' याचा अर्थ 'पैसा न साठविता खर्च करणारे' असा करणे इष्ट.

५) 'तुझे केश आता तुझ्या मनात विरक्ति उत्पन्न करीत नाहीत याबद्दल मी काही बोलत नाही.' असे वक्त्याने म्हटले असते, तर तो वाच्य 'आक्षेप' अलंकार झाला असता. पण 'हे कसे काय?' इतकेच म्हटल्याने 'मी' अधिक बोलत नाही' हा आक्षेपस्वरूपी अर्थ सूचित झाला आहे. 'मी बोलत नाही,' हा निषेध ही तुझी वृत्ति अनुचित आहे हे वैशिष्ट्य सुचवीत आहे. (आक्षेप अलंकाराबाबत प्रथम खंड, "'उद्‌द्योत – १ आक्षेप म्हणजे 'ध्वनि' नव्हे'" वरील पहिली टीप पाहा.) 'कारण घडले नाही तरी कार्य घडते' असे वर्णन असल्यास 'विभावना' अलंकार होतो. येथे केश पांढरे होणे हे तारुण्याचा जोम शिल्लक नसल्याचे लक्षण होय. तेव्हा 'तारुण्याचा जोम असणे हे कारण नसताही कामुकता वाढणे हे कार्य घडून येते' असे म्हटले असते, तर येथे वाच्य विभावना झाली असती. पण तसे न म्हणता 'केस पांढरे झाले तरी विरक्ति का उत्पन्न होत नाही?' असे (वाच्य विशेषोक्तीच्या स्वरूपात) म्हटल्याने येथे विभावना सूचित होत आहे.

६) वरच्या, म्हणजे पाचव्या टीपेत दाखविल्याप्रमाणे येथे आक्षेप व विभावना हे अलंकार सूचित होत असले, तरी 'केस पांढरे झाले तरी तुझी आसक्ति कशी कमी होत नाही' या वाच्यार्थाची शोभा तो व्यंग्य अलंकाररूपी अर्थ वाढवीत असल्याने तो व्यंग्यार्थ वाच्यार्थाला गुणीभूत झाला आहे.

७) पाहा, मनुस्मृति, २, – २१५ चा पुढील उत्तरार्ध :–
बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ।]

८) किंवा 'शिवा' च्या म्हणजे परमात्म्याच्या प्राप्तीचे.

९) अभिनवगुप्तांच्या या विवरणाला अनुसरूनच आम्ही वृत्तीतील 'अर्थद्वय' या शब्दाचे भाषांतर केले आहे. पण 'दोन्ही प्रकारचे अर्थ' म्हणजे वाच्य अर्थ आणि (गुणीभूत व्यंग्य व प्रधानभूत व्यंग्य अशा) दोन्ही प्रकारचा व्यंयार्थ' असेही भाषांतर करणे शक्य आहे.

१०) 'रचना' हा शब्द येथे 'संघटना या अर्थी वापरला आहे. पाहा, उद्‌द्योत ३, कारिका ५ वी.

११) लोचनामध्ये 'पर 'हा शब्द दोनदा वापरला आहे. त्यातील पहिल्या 'पर' शब्दाचा अर्थ 'अन्य' (म्हणजे पूर्वीचा) असा आम्ही केला आहे, तर दुसऱ्या 'पर' शब्दाचा अर्थ 'अन्य' (म्हणजे नंतरचा) असा केला आहे.

१२) कु (२ प. प.) या धातूचा अर्थ 'तोंडाने आवाज करणे' असा आहे. 'कवनीय' याचा अर्थ 'तोंडाने आवाज करून विशिष्ट लयीत म्हणण्याजोगी सार्थ शब्दांची रचना' असा करावयाचा. **कु** धातूला **ण्यत्** (य) हा प्रत्यय

आवश्यकत्व या अर्थी लागून 'काव्य' शब्द बनला आहे. (पाहा, अष्टाध्यायी, ३—३—१२५, **ओरावश्यके** ।). तेव्हा 'काव्य' याचा अर्थ जे तोंडाने विशिष्ट लयीत म्हणणे अवश्य आहे ते, असा होईल. व भावनेच्या उद्रेकामुळे ज्यामध्ये शब्दार्थाची जोड देणे अपरिहार्य असते ते, असाही होईल, पाहा. Wordsworth चे पुढील प्रसिद्ध वचन :— 'Poetry is a spontaneous overflow of powerful feelings…'

'काव्य या शब्दाची व्युत्पत्ति प्रथम खंड, "उद्‌द्योत — १ 'अभाववाद्यांचा दुसरा वर्ग'" वर **कवनीयं काव्यम्** अशीच दिली आहे, पण प्रथम खंड, "उद्‌द्योत — २ 'वाच्यही अलंकार व व्यंगही अलंकार असल्यास व्यंग अलंकार जर प्रधान तरच ध्वनि'"५७४ वर 'कवि या शब्दापासून **कवेः कर्म** या अर्थी काव्य हा शब्द साधला आहे.

ध्वन्यालोकः

न चार्थानन्त्यं व्यङ्ग्यार्थापेक्षयैव यावद्वाच्यार्थापेक्षयापीति प्रतिपादयितुमुच्यते—

अवस्थादेशकालादि विशेषैरपि जायते ।
आनन्त्यमेव वाच्यस्य शुद्धस्यापि स्वभावतः ॥ ७ ॥

शुद्धस्यानपेक्षितव्यङ्ग्यस्यापि वाच्यस्यानन्त्यमेव जायते स्वभावतः । स्वभावो ह्ययं वाच्यानां चेतनानामचेतनानां च यदवस्थाभेदाद्देशभेदात्कालभेदात्स्वालक्षण्यभेदाद्यानन्तता भवति । तैश्च तथाव्यवस्थितैः सद्भिः प्रसिद्धानेकस्वभावानुसरणरूपया स्वभावोक्त्यापि तावदुपनिबध्यमानैर्निरवधिः काव्यार्थः संपद्यते । तथा ह्यवस्थाभेदान्नवत्वं यथाभगवती पार्वती कुमारसंभवे 'सर्वोपमाद्रव्यसमुच्चयेन—' इत्यादिभिरुक्तिभिः प्रथममेव परिसमापितरूपवर्णनापि पुनर्भगवतः शंभोर्लोचनगोचरमायान्ती 'वसन्तपुष्पाभरणं वहन्ती' मन्मथोपकरणभूतेन भङ्ग्यन्तरेणोपवर्णिता । सैव च पुनर्नवोद्वाहसमये प्रसाध्यमाना 'तां प्राङ्मुखीं तत्र निवेश्य तन्वीं' इत्याद्युक्तिभिर्नवेनैव प्रकारेण निरूपितसौष्ठवा । न च ते तस्य कवेरेकत्रैवासकृत्कृता वर्णनप्रकारा पुनरुक्तत्वेन वा अनवनवार्थनिर्भरत्वेन वा प्रतिभासन्ते । दर्शितमेव चैतद्विषमबाणलीलायाम्—

'ण अ ताण घडइ ओही ण अ ते दीसंति कह वि पुनरुत्ता ।
जे विब्भमा पिआणं अत्था वा सुकइवाणीणं ॥'

ध्वन्यालोक

आणि काव्याच्या विषयांना अनंत प्रकारचे नावीन्य प्राप्त होणे ही परिस्थिति केवळ (विविध) व्यंग्यार्थांच्या दृष्टीने निर्माण होते असे नाही, तर ती (विविध) वाच्यार्थांमुळेही उत्पन्न होऊ शकते, हे दाखविण्यासाठी असे सांगण्यात येत आहे की—

अवस्था, स्थळ, काळ, इत्यादींच्या भिन्नतेमुळे केवळ वाच्यार्थदेखील स्वरूपतः अनंत प्रकारचे होऊ शकतात. ॥ ७ ॥

'केवळ' म्हणजे व्यंग्यार्थाचा विचार बाजूला ठेवला, तरीही वाच्यार्थ स्वाभाविकपणे अनंत असू शकतात. कारण सचेतन आणि अचेतन वाच्यार्थाचा हा स्वभाव आहे की, त्यांच्यामध्ये निरनिराळ्या अवस्थांमुळे, निरनिराळ्या ठिकाणांमुळे, निरनिराळ्या वेळांमुळे व निरनिराळ्या वैशिष्ट्यांमुळे [१] अमर्याद विविधता उत्पन्न होते. आणि वाच्यार्थाचे असे अनंत प्रकार असल्यामुळे त्यांच्या अनेक प्रकारच्या लोकप्रसिद्ध स्वभावांना अनुसरून 'स्वभावोक्ति' या अलंकाराच्या द्वारेही जरी ते वाच्यार्थ वर्णिले, तरीसुद्धा काव्याच्या विषयांना अनंतता प्राप्त होऊ लागते उदा. (एकाच वर्ण्य विषयाच्या) वेगवेगळ्या अवस्थांचे वर्णन केल्याने नवीनपणा येतो, याचा नमुना पुढीलप्रमाणे– कुमारसंभवामध्ये प्रारंभीच देवी पार्वतीच्या सौन्दर्याचे वर्णन 'सर्व उपमान–पदार्थ एकत्र करून (विधात्याने तिला निर्मिले)' इ. श्लोकाने [१*] (कवीने) पूर्ण केले असले, तरी ती भगवान् शंकरांच्या दृष्टिपथात येत असताना 'वसंत ऋतूतील फुलांचा साज–शृंगार धारण करणारी...' इ. श्र्लोकामध्ये [२] तिचे वर्णन पुन्हा एकदा निराळ्या प्रकाराने म्हणजे मदनविकाराला आवाहन करणाऱ्या रूपामध्ये केले आहे. आणि त्या ठिकाणी त्या 'तनुगात्री पार्वतीला पूर्वाभिमुख बसवून...' इ. श्लोकांनी [३] (तिला विवाहसमारंभाचे वेळी सजविले जात अगताना) तिचे सौन्दर्य पुन्हा नवीन प्रकाराने वर्णिले आहे. आणि त्या कवीने एकाच ग्रंथात पुन्हा पुन्हा केलेल्या त्या वर्णनाच्या प्रकारांमध्ये पुनरुक्ति आहे [३*] असे किंवा ते नवनवीन अर्थानी परिपूर्ण नाहीत असे मुळीच भासत नाही. आणि हे 'विषमबाणलीले [४]' त दाखविले गेलेच आहे,–

प्रेयसींचे शृंगारिक हावभाव घ्या, किंवा महाकवींच्या वाणीतून प्रकट झालेले विषय घ्या, त्यांनी आपली सीमा गाठली असे कधीच होत नाही. त्यांच्या बाबतीत पुनरुक्तपणा (म्हणजे तोचतोपणा) कधीहीं जाणवत नाही. [५]

लोचनम्

प्रतिपादयितुमिति । प्रसङ्गादिति शेषः । यदि वा वाच्यं तावद् विविधव्यङ्ग्योपयोगि, तदेव चेदनन्तं तद्बलादेव व्यङ्ग्यानन्त्यं भवतीत्यभिप्रायेणेदं प्रकृतमेवोच्यते । शुद्धस्येति । व्यङ्ग्यविषयो यो व्यापारः तत्स्पर्शं विनाप्यानन्त्यं स्वरूपमात्रेणैव । पश्चात्तु तथास्वरूपेणानन्तं सद्वयङ्ग्यं व्यनक्तीति भावः । न तु सर्वथा तत्र व्यङ्ग्यं नास्तीति मन्तव्यमात्मभूततद्रूपाभावे काव्यव्यवहारहानेः । तथा चोदाहरणेषु रसथ्वनेस्सद्भावोऽस्त्येव । आदिग्रहणं व्याचष्टे–स्वालक्षण्येति । स्वरूपेत्यर्थः । तथा रूपस्पर्शयोस्तीव्रैकावस्थयोरेकद्रव्यनिष्ठयोरेककालयोश्च ।

न च तेषां घटतेऽवधिः, न च ते दृश्यन्ते कथमपि पुनरुक्ताः ।
ये विभ्रमाः प्रियाणामर्था वा सुकविवाणीनाम् ॥

चकाराभ्यामतिविस्मयस्सूच्यते । कथमपीति । प्रयत्नेनापि विचार्यमाणं पौनरुक्तयं न लभ्यमिति यात्रत् । प्रियाणामिति । बहुवल्लभो हि सुभगो राधावल्लभप्रायस्तास्ताः कामिनीः परिभोगसुभगमुपभुञ्जानोऽपि न विभ्रमपौनरुक्त्यं पश्यति तदा । एतदेव प्रियात्वमुच्यते, यदाह–

'क्षणे क्षणे पन्नयतामुपैति तदेव रूपं रमणीयताया' इति ।

प्रियाणामिति चासंसारं प्रवहद्रूपो योऽयं कान्तानां विभ्रमविशेषः स नवनव एव दृश्यते । न ह्यसावग्निचयनादिवदन्यतश्शिक्षितः, येन तत्सादृश्यात्पुनरुक्ततां गच्छेत् । अपि तु निसर्गोद्भिद्यमानमदनाङ्कुरविकासमात्रं तदिति नवनवत्वम् । तद्वत्परकीयशिक्षानपेक्षनिजप्रतिभागुणनिष्यन्दभूतः काव्यार्थ इति भावः ।

लोचन

'दाखविण्यासाठी' – या आधी 'प्रसंग आल्यामुळे [६]', अशी भर घालावी. किवा आधी वाच्यार्थ हाच (परिस्थित्यनुसार) निरनिराळे व्यंग्यार्थ प्रकट करू शकतो, मग तो वाच्यार्थ स्वतःच जेथे अनंत प्रकारचा असू शकतो, तेथे त्या अनंत प्रकारच्या वाच्यार्थामुळे व्यंग्यार्थाना अनंतत्व प्राप्त होणारच, या अभिप्रायाने पुढील कारिका हे म्हणजे प्रस्तुत विषयाशी साक्षात् संबद्ध असेच सांगत आहे. 'केवळ (वाच्यार्थ)' – वाच्यार्थाच्या ठिकाणी असणारा व्यंग्यार्थ प्रकट करण्याचा जो व्यापार, त्याचा व्याच्यार्थाला स्पर्श झाला नाही तरी वाच्यार्थ स्वतःच्या रूपानेच अनन्त प्रकारचा असू शकतो. पण मागाहून तो अनन्त स्वरूपे असलेला वाच्यार्थ (अनंत प्रकारचा) व्यङ्ग्यार्थ प्रकट करितो, असा आशय. पण काव्यामधील वाच्यार्थामध्ये व्यंग्यार्थ मुळीच नसतो असे समजू नये, कारण काव्याचा आत्मा असलेला व्यंग्यार्थ काव्यात नसेल, तर त्याला 'काव्य' म्हणता येणार नाही. आणि असे असल्यामुळे (वाच्यार्थाचे आनन्त्य दाखविण्यासाठी यानंतर वृत्तिकार जी उदाहरणे देणार आहेत, त्या) उदाहरणांमध्ये रसध्वनीचे अस्तित्व आहेच! (७ व्या कारिकेतील) 'इत्यादि' शब्दाचे विवरण वृत्तिकार 'वैशिष्ट्यांमुळे' या शब्दाने करितात. वैशिष्ट्ये म्हणजे स्वतःची खास रूपे असा अर्थ. ज्याप्रमाणे एका वस्तूच्या ठिकाणी एका वेळी आणि एका उत्कट अवस्थेत असणाऱ्या रूप व स्पर्श या [७] गुणधर्मामुळे त्या वस्तूला वेगळे वैशिष्ट्य प्राप्त होते, [८] त्याप्रमाणे.

'प्रेयसींचे शृंगारिक हावभाव' इ.–मूळ गाथेमध्ये **च** हे अव्यय दोनदा वापरले आहे, त्यामुळे कमालीचे आश्चर्य सूचित होत आहे. [९] 'काही झाले तरी' पुनरुक्ततेसंबंधी मोठ्या प्रयासाने विचार केला तरी त्यांच्या बाबतीत (पुनरुक्तपणा [१०] म्हणजे) तोचतोपणा आढळत नाही, हा भावार्थ.

'प्रेयसींचे–' कारण राधेचा प्रियकर जो श्रीकृष्ण त्याप्रमाणे जो पुरुष 'सुभग' म्हणजे स्त्रियांची मने जिंकणारा असतो, व म्हणून ज्यावर अनेक स्त्रियांचे प्रेम असते, तो त्या स्त्रियांचा उपभोग पुन्हा पुन्हा नवीन रुचीने घेत असतानाही त्यावेळी (म्हणजे उपभोगाचे वेळी) त्याला त्यांच्या विलासांचा तोचतोपणा कधीही जाणवत नाही. त्यामुळेच त्या स्त्रियांना 'प्रिया' म्हटले आहे. कारण असे म्हटले आहे की–

'क्षणाक्षणाला जे नवीनता धारण करिते, तेच रमणीयतेचे खरे' स्वरूप होय. [११]

सृष्टीच्या प्रारंभापासून सृष्टीमध्ये सगळीकडे प्रियांचे म्हणजे प्रेयसींचे जे शृंगारिक हावभाव अखंडपणे चालत आलेले असतात, ते नित्यनूतनच वाटतात. ते शृंगारिक हावभाव त्या स्त्रियांनी अग्निचयनादिकांच्या प्रक्रियेप्रमाणे दुसऱ्यांपासून शिकून मिळविलेले नसतात. तसे असते, तर ते हावभाव त्या ज्यांच्यापासून शिकल्या, त्यांच्या हावभावांशी साम्य असल्यामुळे ते हावभाव पुररुक्त झाले असते. पण उलट निसर्गतःच [१२] त्यांच्या ठिकाणी तरारलेल्या मदनविकाररूपी अंकुराचा तो केवळ आविष्कारच असतो, म्हणून त्या

हावभावांना नवीनपणा प्राप्त होत असतो, त्याचप्रमाणे दुसऱ्याने शिकविण्यावर जो अवलंबून नाही, असा जो कवीचा स्वतःचा प्रतिभागुण, त्याला सहजसुन्दर आविष्कार [१३] म्हणजे काव्याचा आशय होय, असा अर्थ.

टीपा

१) **स्वं लक्षणं यस्य, तस्य भावः स्वालक्षण्यम् ।** म्हणजे पदार्थाचे खास, अनन्यसाधारण स्वरूप.

१*) **कुमारसंभवम्,** सर्ग १, श्लोक ४९.

२) **कुमारसंभवम्,** सर्ग ३, श्लोक ५३ ते ५६.

३) **कुमारसंभवम्,** सर्ग, ७, श्लोक १३ ते २०.
काव्यमाला व काशी आवृत्ति यांमध्ये **अपुनरुक्तत्वेन व नवनवार्थनिर्भरत्वेन** असे पाठ आहेत. पण त्यांतून विपरीत अर्थ निष्पन्न होत असल्याने आम्ही ते पाठ सुधारून घेतले आहेत. प्रतिपाद्य विषय एकच असला, तरी कवीच्या वर्णनकौशल्यामुळे त्यात नावीन्य उत्पन्न होते, या आशयासाठी पुढील सुभाषित पाहा—
त एव पदविन्यासास्ता एवार्थविभूतयः ।
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रंथनकौशलात् ॥

४) आनंदवर्धनांच्या 'विषमबाणलीला' या प्राकृत भाषेत लिहिलेल्या ग्रंथाचा उल्लेख यापूर्वी तीन वेळा आलेला आहे. पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – २ 'अविवक्षितवाच्य ध्वनीचे दोन उपप्रकार- (१) 'अर्थान्तरसंक्रमितवाच्य' हा प्रकार" तसेच "उद्द्योत – २ 'अलंकारध्वनीची उदाहरणे'" व हाच (चवथा) उद्द्योत, कारिका ७ वरील वृत्ति. यांपैकी शेवटच्या दोन उल्लेखांवरून 'विषमबाणलीला' या ग्रंथाचा विषय कामदेवाचे पराक्रम असा असावासा वाटते. पण प्रस्तुत उल्लेख आणि पुढच्याच पानावर आलेले 'आणि काव्यातील ही सर्व पद्धत'... इ. वाक्य, यांवरून 'विषमबाणलीले' चा काही भाग काव्यशास्त्राचा तात्त्विक विचार करणारी असावा असे वाटते. याशिवाय अभिनवगुप्तांनी विषमबाणलीलेतून दोन गाथा उद्धृत केल्या आहेत. पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ ध्वनीचा 'संलक्ष्यक्रमव्यंग्य' प्रकारही काही प्रबंधातून प्रकट होतो" वर.

५) या श्लोकातील आशयासारखा आशय शेक्सपिअरच्या 'Antony and Cleopatra' (ॲटनीं ॲंड क्लिओपॅट्रा) या नाटकाच्या दुसऱ्या अंकातील पुढील पंक्तींत आढळतो—

> Age cannot wither her, nor
> Stale her infinite variety,
> Other women cloy the appetite they feed on,
> But she makes hungry where, she
> most satisfies,

६) म्हणजे प्रस्तुत विषयाशी साक्षात् संबद्ध नव्हे, पण विवेचनाच्या अनुषंगाने आल्यामुळे.

७) रूप व स्पर्श हे शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध यांचे उपलक्षण समजावे.

८) एकाच वस्तूच्या रूप व स्पर्श या दोन वैशिष्ट्यांमुळे ती वस्तु निरनिराळी वाटते.

९) **च** या अव्ययामधून विशिष्ट व्यंग्यार्थ प्रकट होतो हे मागे द्वितीय खंड, "उद्द्योत – ४ 'रामायणातील मुख्य रस 'करुण' व महाभारतातील मुख्य रस 'शान्त' होय.'" वर **धर्मे च अर्थे च कामे च** इ. श्लोकाच्या बाबतीत अभिनवगुप्तांनी दाखविलेच आहे.

१०) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'लक्षणा हे ध्वनीचे 'लक्षण' नाही" वरील **प्रियो जनो नास्ति पुनरुक्तम् ।** हे वाक्य.

११) शिशुपालवधम्, ४–१७.

१२) तुलनार्थ पाहा, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ वाच्य अलंकारांमध्ये व्यंग्य अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन" व **उपदिशति कामिनीनां यौवनमद एक ललितानि ।** (काव्यप्रकाश, उल्लास, २, पृ. ५७, झळकीकर आवृत्ति).

१३) निकृष्ट आविष्कार या अर्थी 'निष्यन्द' हा शब्द पूर्वी ध्वन्यालोकात द्वितीय खंड, "उद्द्योत -३ 'वाच्य अलंकारांमध्ये व्यंग्य अर्थाचा अंश असला, तर त्या अलंकारांना विशेष सौंदर्य प्राप्त होते याचे उदाहरणांसह प्रतिपादन' व 'अनुभवी कवींनी रसादींची प्रतीति घडवणे हेच मुख्य मानावे'" वर) योजिलेला आहे. येथे मात्र अभिवगुप्तांनी हा शब्द 'आविष्कार' येवढ्याच अर्थाने वापरला आहे.

ध्वन्यालोक

अयमपरश्चावस्थाभेदप्रकारो यदचेतनानां सर्वेषां चेतनं द्वितीयं रूपमभिमानित्वप्रसिद्धं हिमवद्ङ्गादीनाम् । तद्योचितचेतनविषयस्वरूपयोजनयोपनिबध्यमानमन्यदेव संपद्यते । यथा कुमारसंभव एव पर्वतस्वरूपस्य हिमवतो वर्णनं, पुनः सप्तर्षिप्रियोक्तिषु चेतनतत्स्वरूपापेक्षया प्रदर्शितं तदपूर्वमेव प्रतिभाति । प्रसिद्धश्चायं सत्कवीनां मार्गः । इदं च प्रस्थानं कविव्युत्पत्तये विषमबाणलीलायां सप्रपञ्चं दर्शितम् । चेतनानां च बाल्याद्यवस्थाभिरन्यत्वं सत्कवीनां प्रसिद्धमेव । चेतनानामवस्थाभेदेऽप्यवान्तरावस्थाभेदान्नानात्वम् । यथा कुमारीणां कुसुमशरभिन्नहृदयानामन्यासां च । तत्रापि विनीतानामविनीतानां च । अचेतनानां च भावानामारभ्याद्यवस्थाभेदभिन्नानामेकैकशः स्वरूपमुपनिबध्यमानमानन्त्यमेवोपयाति । यथा–

'हंसानां निनदेषु यैः कवलितैरासज्यते कूजता–
मन्यः कोऽपि कषायकण्ठलुठनादाघर्घरो विभ्रमः ।
ते संप्रत्यकठोरवारणवधूदन्ताङ्कुरस्पर्धिनो
निर्याताः कमलाकरेषु बिसिनीकन्दाग्रिमग्रन्थयः ॥'
एवमन्यत्रापि दिशानयानुसर्तव्यम् ।

देशभेदान्नानात्वमचेतनानां तावत् । यथा, वायूनां नानादिग्देशचारिणामन्येषामपि सलिलकुसुमादीनां प्रसिद्धमेव । चेतनानामपि मानुषपशुपक्षिप्रभृतीनां ग्रामारण्यसलिलादिसमेधितानां परस्परं महान्विशेषः समुपलक्ष्यत एव । स च विविच्य यथायथमुपनिबध्यमानस्तथैवानन्त्यमायाति । तथा हि—मानुषाणामेव तावद्दिग्देशादिभिन्नानां ये व्यवहारव्यापारादिषु विचित्रा विशेषास्तेषां केनान्तः शक्यते गन्तुम्, । विशेषतो योपिताम् । उपनिबध्यते च तत्सर्वमेव सुकविभिर्यथाप्रतिभम् ।

कालभेदाच्च नानात्वं यथा ऋतुभेदाद्दिग्व्योमसलिलादीनामचेतनानाम् । चेतनानां चौत्सुक्यादयः कालविशेषाश्रयिणः प्रसिद्धा एव । स्वालक्षण्यप्रभेदाच्च सकलजगद्गतानां वस्तूनां विनिबन्धनं प्रसिद्धमेव । तच्च यथावस्थितमपि तावदुपनिबध्यमानमनन्ततामेव काव्यार्थस्यापादयति ।

अत्र केचिदाचक्षीरन् यथा सामान्यात्मना वस्तूनि वाच्यतां प्रतिपद्यन्ते न विशेषात्मनाः तानि हि स्वयमनुभूतानां सुखादीनां तन्निमित्तानां च स्वरूपमन्यत्रारोपयद्भिः स्वपरानुभूतरूपसामान्यमात्राश्रयेणोपनिबध्यन्ते काविभिः । नहि तैरतीतमनागतं वर्तमानं च परचित्तादिस्वलक्षणं योगिभिरिव प्रत्यक्षीक्रियते; तच्चानुभाव्यानुभवसामान्यं सर्वप्रतिपत्तृसाधारणं परिमितत्वात्पुरातनानामेव गोचरीभूतम्, तस्याविषयत्वानुपपत्तेः । अत एव स प्रकारविशेषो यैरद्यतनैरभिनवत्वेन प्रतीयते तेषामभिमानमात्रमेव । भणितिकृतं वैचित्र्यमात्रमत्रास्तीति ।

ध्वन्यालोक

अवस्थेच्या भिन्नतेचा आणखी एक प्रकार हा आहे की, हिमालय, गंगा, इ. सर्व निर्जीवांचे त्यांच्या अधिष्ठात्री देवतांच्या रूपाने प्रसिद्ध असलेले, चेतन असे दुसरे स्वरूप असते. अचेतन पदार्थांच्या त्या चेतन स्वरूपाचे वर्णन जर चेतन व्यक्तींचे यथायोग्य गुणधर्म उपयोगात आणून केले, तर त्याला काही वेगळीच अपूर्वाई प्राप्त होते. जसे कुमारसंभवातच प्रारंभी [१] हिमालयाचे पर्वत या रूपाने वर्णन केले आहे, पण पुन्हा सप्तर्षींच्या स्तुतिपर उद्‌गारांमध्ये [२] हिमालयाच्या चेतन स्वरूपाच्या दृष्टीने त्याचे जे वर्णन केले आहे, ते वर्णन अपूर्वच वाटते. आणि महाकवींच्या काव्याची ही रीत असते हे प्रसिद्धच आहे. काव्यातील ही सर्व पद्धत कवींना मार्गदर्शन व्हावे, म्हणून आम्ही 'विषमबाणलीले' मध्ये सविस्तरपणें दाखविली आहे.

आणि चेतन व्यक्तींचे स्वरूप बाल्य वगैरे अवस्थांमुळे वेगवेगळे होत असते हे महाकवींच्या काव्यांतून निदर्शनास येतेच. चेतनांमध्ये विशिष्ट अवस्थांमुळे जो फरक पडतो, त्यातही त्या अवस्थांच्या पोटविभागांमुळे निराळेपणा उत्पन्न होतो. जसे कुमारीच्या बाबतीत मदनबाणांनी हृदय विद्ध झालेले असणे आणि नसणे हे (दोन) प्रकार संभवतात, त्याप्रमाणे आणि मदनबाणांनी विद्ध झालेल्या कुमारिकांच्या बाबतीतही मनोविकारांचा आविष्कार संयमाने करणाऱ्या व निःसंकोचपणे करणाऱ्या असे दोन पोटविभाग पडतात. आणि अचेतन वस्तूंचे 'आरम्भ' वगैरे वेगवेगळ्या अवस्थांमुळे [३] भिन्न असणारे स्वरूप वर्णू गेल्यास ती स्वरूपे अनंतच होत राहतात. उदा. —

'जे भक्षण केले असताना' [४] कूजन करणाऱ्या हंसांच्या मधुर कंठांशी संयोग पावल्यामुळे त्यांच्या किंचित् अस्पष्ट असलेल्या आवाजामध्ये एक आगळा, अवर्णनीय असा डौल उत्पन्न होतो', ते तरुण हत्तिणींच्या नुकत्याच उगवलेल्या कोवळ्या दंतांकुरांशी स्पर्धा करणारे, कमलिनींच्या कंदांमधून प्रथमच बाहेर पडणारे अंकुर कमळांच्या ताटव्यांमध्ये सध्या बाहेर डोकावू लागले आहेत. [५]

या (च) रीतीने अन्य (म्हणजे वृद्धि इ.) अवस्थांची उदाहरणेही शोधून काढावीत.

आता अचेतनांमध्ये भिन्न भिन्न स्थळांमुळे उत्पन्न होणारी नानाविधता म्हणजे निरनिराळ्या दिग्भागांमधून वाहणारे वारे किंवा निरनिराळ्या ठिकाणी उपलब्ध होणारे पाणी, फुले, वगैरेमधील वैचित्र्य सुप्रसिद्धच आहे. निरनिराळी गावे, अरण्ये, जलाशय इ. ठिकाणी राहणाऱ्या, व वाढणाऱ्या मानव, पशु, पक्षी इ. सजीवांमध्येही एकमेकांहून फार मोठा निराळेपणा आढळून येतोच. तो सूक्ष्म दृष्टीने निवडून काढून यथायोग्य रीतीने काव्यातून वर्णिल्यास त्या निराळेपणाला तसाच नवनवीनपणा प्राप्त होतो. उदा. निरनिराळ्या दिशा, ठिकाणे यांमुळे वेगवेगळ्या असणाऱ्या मानवांच्याच व्यवहार, क्रिया वगैरेंमध्ये जे नानाप्रकार असतात, त्या सर्वाचे, आणि त्यातही स्त्रियांच्या बाबतीत संपूर्णपणे वर्णन कोण करू शकेल? आणि चांगले कवि आपापल्या प्रतिभेच्या मगदुराप्रमाणे आपापल्या काव्यातून त्या सर्वच गोष्टींचे वर्णन करितात.

निरनिराळ्या कालभेदांमुळेही काव्यात नवनवीनपणा येतो याचे उदाहरण म्हणजे दिशा, पाणी वगैरे अचेतनांमध्ये ऋतुबदलांमुळे होणारा पालट [६] आणि सचेतनांच्या ठिकाणी विशिष्ट काळामुळे उत्पन्न होणाऱ्या उत्कंठा इ. वेगवेगळ्या मनोवृत्ती [७] प्रसिद्धच आहेत. तसेच सर्व जगात असलेल्या वस्तूंची त्यांच्या निरनिराळ्या विशिष्ट स्वरूपांस अनुसरून केली जाणारी वर्णने लोकप्रसिद्धच आहेत. ती वर्णने त्या वस्तूंच्या असेल तशा स्वरूपाबरहुकूम (म्हणजे कोणताही अलंकार वगैरे न वापरता किंवा व्यंजनेचा अवलंब न करिता) केली, तरी त्यांमुळे काव्यविषयांना अमर्यादपणा प्राप्त होतो.

या बाबतीत कदाचित् काही लोक म्हणतील की वस्तु जेव्हा शब्दांच्या द्वारा काव्यात वर्णिल्या जातात, तेव्हा त्या त्यांच्या 'सामान्य [८]' स्वरूपानेच वर्णिल्या जातात, 'विशेष' स्वरूपाने नव्हे. कारण कवि स्वतः अनुभवलेली सुखे दुःखे (वगैरे) आणि त्यांची कारणे यांचे स्वरूप इतरांवर म्हणजे आपल्या काव्यातील पात्रांवर लादून आणि स्वतः व इतरांनी अनुभविलेले त्यांचे वरवर दिसणारे स्वरूपच ध्यानात घेऊन त्यांचे वर्णन करितात. (आणि हे बरोबरच आहे,) कारण ते कवि काही योग्यांप्रमाणे, पूर्वी होऊन गेलेल्या, पुढे होणार असलेल्या आणि सध्या घडत असलेल्या दुसऱ्यांच्या मनातील विचार वगैरेंचे सूक्ष्म, तपशीलवार स्वरूप जाणू शकत नाहीत. आणि अनुभवाचा विषय असणाऱ्या वस्तूंच्या बाबतीतला तो सर्व लोकांना येणारा 'सामान्य' स्वरूपाचा अनुभव मर्यादित, ठराविक ठशाचाच असल्यामुळे तो प्राचीनांनाच येऊन गेलेला असतो. त्यांनी तो तसा अनुभवलेला नसतो असे समजण्याला काहीही प्रमाण नाही. म्हणूनच कवींनी (तथाकथित) व्यंजनेचा अवलंब करून विशिष्ट प्रकारे केलेले वर्णन आधुनिकांना जे अगदी नवीन असल्यासारखे वाटते, तो त्यांचा त्या बाबतीतला केवळ (खोटा) अभिमानच होय. अशा बाबतीत केल्या जाणाऱ्या काव्यातील वर्णनात फक्त शब्दांचा नवीनपणा असतो, इतकेच.

लोचनम्

<u>तावदिति ।</u> उत्तरकालं तु व्यंग्यस्पर्शनेन विचित्रतां परां भजतां नाम, तावति तु स्वभावेनैव सा विचित्रतेति तावच्छब्दस्याभिप्रायः । तन्निमित्तानां चेति । ऋतुनाल्यादीनाम् । स्वेति । स्वानुभूतपरानुभूतानां यत्सामान्यं तदेव विशेषान्तररहितं तन्मात्रं तस्याश्रयेण; न हि तैरिति कविभिः । एतद्यात्यन्तासंभावनार्थमुक्तम् । प्रत्यक्षदर्शनेऽपि हि—

शब्दास्संकेतितं प्राहुर्व्यवहाराय स स्मृतः ।
तदा स्वलक्षणं नास्ति सङ्केतस्तेन तत्र न ॥
इत्यादियुक्तिभिस्सामान्यमेव स्पृश्यते ।

लोचन

'त्याच्या असेल तशा स्वरूपावरहुकूम —' मागाहून व्यंग्यार्थाच्या स्पर्शामुळे वाच्यार्थाला अनंत प्रकारची विविधता खुशाल प्राप्त होऊ दे, पण देशकालादि भेदांना अनुसरून केलेल्या त्यांच्या वाच्य वर्णनामध्ये वैचित्र्य मुळातच म्हणजे प्रथमपासूनच असते, असा 'असेल तसे स्वरूप' या शब्दामागील अभिप्राय आहे. 'आणि त्यांची कारणे यांचे—' म्हणजे ऋतु, फुले वगैरे जी सुखदुःखांची कारणे, त्यांचे. स्वतः—स्वतः अनुभवलेली आणि दुसऱ्यांनी अनुभवलेली (सुखदुःखे) यांचे सामान्य (म्हणजे ढोबळ) स्वरूपच लक्षात घेऊन म्हणजे त्यांची सूक्ष्म वैशिष्ट्ये लक्षात न घेता. 'कारण ते' —ते म्हणजे कवि. आणि हे (म्हणजे 'कारण ते' इ.) वाक्य, पदार्थांची व प्रसंगांची सूक्ष्म वैशिष्ट्ये ध्यानात घेऊन त्यांचे वर्णन करणे सर्वथैव असंभवनीय आहे हे दाखविण्यासाठी म्हटले आहे. आणि कवींना त्या सूक्ष्म वैशिष्ट्यांचे ज्ञान झाले, तरी—

'शब्द हे ज्या अर्थावर त्यांचा संकेत झालेला असतो, त्या अर्थाचा बोध करून देतात. [९] जगाचे व्यवहार सुरळीतपणे चालावेत यासाठी तो संकेत केलेला असतो असे मानिले गेले आहे. त्यावेळी [१०] पदार्थाची सूक्ष्म वैशिष्ट्ये (बोलणारासमोर) नसतात व त्यामुळे त्या वैशिष्ट्यांवर संकेत झालेला नसतो.'

अशा प्रकारच्या युक्तिवादामुळे हेच सिद्ध होते की, शब्दांमुळे वस्तूच्या सामान्य स्वरूपाचाच बोध करून दिला जातो.

टीपा

१) कुमारसंभवम्, सर्ग १, श्लोक १ ते १७.

२) कुमारसंभवम्, सर्ग ६, श्लोक ६६ ते ७३.

३) या अवस्था म्हणजे यास्काने पदार्थाच्या उत्पत्ति इ. ज्या सहा अवस्था सांगितल्या आहेत, त्या त्या पुढीलप्रमाणे :—

१) **जायते** = उत्पन्न होतो, २) **अस्ति** = अस्तित्वात राहतो, ३) **वर्धते** = वाढतो, ४) **विपरिणमते** = बदलतो, ५) **अपक्षीयते** = क्षीण होतो, ६) **नश्यति** = नाश पावतो.

४) हे पद्य **'कमलायुध'** नावाच्या कवीचे आहे असे 'सुभाषितरत्नकोश' या ग्रंथात पृ. ५२ वर म्हटले आहे.

५) या श्लोकामध्ये अंकुरांची 'आरंभ' ही अवस्था वर्णिलेली आहे.

६) जॉन रस्किन याने Modern Painters, Vol. 1, pp. 194—195 येथे क्षणोक्षणी पालटणारे आकाशाचे स्वरूप पुढीलप्रमाणे वर्णिले आहे—

> "Sometimes gentle, sometimes capricious, sometimes awful, never the same for two moments together, almost human in its passions, almost spritual in its teuderness, almost divine in its infinity."

७) निसर्गातील बदलांमुळे मनोवृतींमध्ये फरक पडत जातो याचे वर्णन कालिदासाच्या 'ऋतुसंहारा' त आहे. 'मेघदूता'तील तिसऱ्याच श्लोकामधील **'मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्ति चेतः ।'** ही ओळ सुप्रसिद्धच आहे.

८) सामान्य म्हणजे त्या वस्तूंचे वरवर दिसणारे, स्थूल, ठरीव ठशाचे स्वरूप, त्यातील सूक्ष्म तपशीलासह नव्हे.

९) द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'व्यंजकत्व हा धर्म शब्दाला अनिश्चितपणे, केव्हातरीच प्राप्त होणारा, म्हणून त्याच्या स्वरूपाचे परीक्षण नको, या मताचे खंडन व व्यंजकत्व हा वेगळा व्यापार आहेच या मताची पक्की प्रतिष्ठापना'" वर या श्लोकाचा फक्त पहिलाच चरण उद्धृत केला आहे. हा श्लोक धर्मकीर्तीचे प्रमाणवार्तिक, १—९२ हा आहे.

१०) त्यावेळी म्हणजे शब्दांचा वापर करतेवेळी.

ध्वन्यालोकः

तत्रोच्यते—यदि सामान्याश्रयेण काव्यप्रवृत्तिस्तत्प्रदर्शितप्रकारं काव्यवैचित्र्यमवस्थादिविशेषात् किं पुनरुक्तमेवास्तु? न चेत्तत्तथा तत्कथं न काव्यानन्त्यम् । यत्तूक्तं सामान्यमात्राश्रयेण काव्यप्रवृत्तिस्तस्य च परिमितत्वेन प्रागेव गोचरीकृतत्वान्नास्ति नवत्वं काव्यवस्तूनामिति, तदयुक्तम्; । यतो यदि सामान्यमात्रमाश्रित्य काव्यं प्रवर्तते किंकृतस्तर्हि महाकविनिबध्यमानानां काव्यार्थानामतिशयः । वाल्मीकिव्यतिरिक्तस्यान्यस्य कविव्यपदेश एव वा, सामान्यव्यतिरिक्तस्यान्यस्य काव्यार्थस्याभावात्; सामान्यस्य चादिकविनैव प्रदर्शितत्वात् । उक्तिवैचित्र्यान्नैष दोष इति चेत्, किमिदमुक्तिवैचित्र्यम् । उक्तिर्हि वाच्यविशेषप्रतिपादि वचनम् तद्वैचित्र्ये कथं न वाच्यवैचित्र्यम् । वाच्यवाचकयोरविनाभावेन प्रवृत्तेः । वाच्यानां च काव्ये प्रतिभासमानानां यद्रूपं तत्तु ग्राह्यविशेषाभेदेनैव प्रतीयते । तेनोक्तिवैचित्र्यवादिना वाच्यवैचित्र्यमनिच्छताप्यवश्यमेवाभ्युपगन्तव्यम् । तदयमत्र संक्षेप :—

'वाल्मीकिव्यतिरिक्तस्य यद्येकस्यापि कस्यचित् ।
इष्यते प्रतिभार्थेषु तत्तदानन्त्यमक्षयम् ॥'

किं च, उक्तिवैचित्र्यं यत्काव्यनवत्वे निबन्धनमुज्यते तदस्मत्पक्षानुगुणमेव । यतो यावानयं काव्यार्थानन्त्यभेदहेतुः प्रकारः प्राग्दर्शितः स सर्व एव पुनर्, उक्तिवौचित्र्याद् द्विगुणतामापद्यते । यश्चायमुपमाश्लेषादिरलंकारवर्गः प्रसिद्धः स भणितिवैचित्र्यादुपनिबध्यमानः स्वयमेवानवधिर्धत्ते पुनः

शतशाखताम् । भणितिश्च स्वभाषाभेदेन व्यवस्थिता सती प्रतिनियतभाषागोचरार्थवैचित्र्यनिबन्धनं पुनरपरं काव्यार्थानामानन्त्यमापादयति : यथा ममैव—

महुमहु इत्ति भणंतहो वच्चादि काल जणस्स ।
तोइ ण देउ जणद्दणु गोअरे ⌣ भोदि मणस्स ॥

ध्वन्यालोक

या बाबतीत आमचे म्हणणे असे :— जर काव्यातील वर्णने केवळ पदार्थांच्या सामान्य स्वरूपावरच आधारलेली असतील, तर अवस्था वगैरेंमधील भिन्नतेमुळे काव्यात उत्पन्न होणारे वैचित्र्याचे जे प्रकार आम्ही दाखविले, ते सर्व प्रकार काय केवळ पुनरुक्त म्हणूनच समजावयाचे? (आणि) ते जर पुनरुक्त नसतील, तर काव्याला अनंतत्व काय म्हणून प्राप्त होणार नाही? सामान्य स्वरूपांच्या अनुभवांच्या आश्रयानेच कविजन काव्य रचावयास प्रवृत्त होतात आणि ते सामान्य स्वरूपाचे अनुभव मर्यादित असून त्यांचा वर्णनासाठी वापर पूर्वीच्या कवींनी आधीच केलेला असल्याने काव्यविषयांच्या बाबतीत अपूर्व असे काही राहातच नाही असे जे तुम्ही म्हणता, ते अयोग्य आहे. कारण पदार्थांच्या सामान्य स्वरूपावरच काव्यातील वर्णने आधारलेली असतील, तर महाकवींनी वर्णिलेल्या काव्यविषयांमध्ये वैशिष्ट्य कशामुळे निर्माण होते? तसेच वाल्मीकिव्यतिरिक्त इतर कवींना कवि ही संज्ञा कशामुळे प्राप्त होते? कारण तुमच्या म्हणण्याप्रमाणे सामान्य म्हणजे ढोबळ स्वरूपाव्यतिरिक्त (अन्य) काव्यविषयच असू शकत नाही आणि पदार्थांचे ते सामान्य स्वरूप तर आदिकवीनेच (म्हणजे वाल्मीकीनेच) वर्णिले आहे!

यावर 'काव्यांमध्ये वर्णनशैलीचे नावीन्य असते [१], म्हणून काव्यातील विषय जरी आदिकवीने पूर्वी वर्णिलेलेच असले तरी त्यांमुळे त्यांच्या काव्यात (तुम्ही) वर दाखविलेला दोष [२] उत्पन्न होत नाही' असे जर तुम्ही म्हणत असाल तर, (आम्ही विचारतो की) हे वर्णनशैलीचे नावीन्य म्हणजे तरी काय आहे? वर्णनशैली म्हणजे विशेष प्रकारचा वाच्यार्थ प्रकट करणारी शब्दयोजना. ती वर्णनशैलीं जर नवीन असली, तर वाच्यार्थातही नवीनपणा कसा असणार नाही? कारण वाच्यार्थ व त्यांचे वाचक शब्द यांमध्ये अतूट संबंध [३] असतो.

आणि काव्यातून ज्ञात होणाऱ्या वाच्यार्थाचे जे स्वरूप, ते तर कवीच्या ज्ञानेंद्रियांच्या कक्षेत येणाऱ्या सूक्ष्म वैशिष्ट्यांनी युक्त अशा स्वरूपाहून निराळे नसल्याचेच प्रतीत होते. तेव्हा वर्णनशैलीच्या नावीन्यामुळे काव्यात सौंदर्य उत्पन्न होते हे मत प्रतिपादन करणाराची इच्छा नसली, तरी त्याला वाच्यार्थामध्ये विविधता असते हे अवश्यच मान्य करावे लागणार! तेव्हा या सर्व विवेचनाचा सारांश हा की—

वाल्मीकीहून भिन्न असलेल्या कोणा एकानेही वर्णिलेल्या काव्यविषयांमध्ये जर प्रतिभेची वेगळी चमक दिसते असे म्हणावयाचे असेल, तर त्या प्रतिभेमुळे काव्यविषयांची अनंतता (म्हणजे नावीन्य) केव्हाही अबाधितच राहणार, (हेही सिद्ध होते) [४].

आणखी असे की, काव्य नवीन वाटावयास वर्णनशैलीचे नावीन्य हे कारण असते असे जे तुम्ही म्हणता, ते उलट आमच्या मताला पोषकच आहे. कारण काव्यांच्या विषयांच्या अनंततेला कारण होणारे हे जेवढे प्रकार पूर्वी दाखविले, [५] ते सगळेच्या सगळे पुन्हा, वर्णनशैलीच्या नवीनपणामुळे काव्यविषयांच्या

अनंततेला आणखीनच कारणीभूत होतील! आणि उपमा, श्लेष वगैरे अलंकारांचा जो वर्ग सुप्रसिद्ध आहे, त्याची योजना नवनवीन वर्णनशैलीची जोड देऊन केल्यास ते अलंकार आधीच अनंत प्रकारचे असेल, तरी त्यांची विविधता शेकडो पटींनी वाढते, (व तीमुळे खुलणाऱ्या रसादि व्यंग्यार्थाची विविधताही कितीतरी पटींनी अधिक होते.)

तसेच शब्दयोजना ही निरनिराळ्या भाषांत निरनिराळ्या प्रकारची असल्याने प्रत्येक विशिष्ट भाषेतून जो वेगवेगळा विशिष्ट अर्थ प्रत्ययास येतो, त्या अर्थाच्या वेगवेगळेपणामुळे ती काव्यविषयांना आणखी एक अनन्तत्व प्राप्त करून देते. उदा. माझीच पुढील रचना पाहा—

महुमहु (१. मधुमथन २. माझे माझे) असे म्हणता म्हणता लोकांचे आयुष्य व्यतीत होत असते. तरीही त्या देव जनार्दनाचा साक्षात्कार काही त्यांच्या मनाला होत नाही. [५*]

लोचनम्

किमिति । असंबेद्यमानमर्थपौनरुक्त्यं कथं प्रामाणिकैरङ्गीकार्यमिति भावः । तमेय प्रकटयति— न चेदिति । उक्तिहोंति । पर्यायमात्रतैव यद्युक्तिविशेषस्तत्पर्यायान्तरैरविकलं तदर्थोपनिबन्धे अपौनरुक्त्याभिमानो न भवति । तस्माद्विशिष्टवाच्यप्रतिपादकेनैवोक्तेविशेष इति भावः । ग्राह्यविशेषेति । ग्राह्य प्रत्यक्षादिप्रमाणैर्यो विशेषः, तस्य यः अभेदः, तेन ।

अयमर्थ :— पदानां तावत्सामान्ये वा तद्वति वाऽपोहे वा यत्र कुत्रापि वस्तुनि समयः, किमनेन वादान्तरेण? वाक्यात्तद्विशेषः प्रतीयत इति कस्यात्र वादिनो विमतिः । अन्विताभिधानतद्विपर्ययसंसर्गभेदादिवाक्यार्यपक्षेषु सर्वत्र विशेषस्याप्रत्याख्येयत्वात् । उक्तिवैचित्र्यं च न पर्यायमात्रकृतमित्युक्तम् । अन्यत् यतत्प्रत्युतास्माकं पक्षसाधकमित्याहकिञ्चेति । पुनरिति । भूय इत्यर्थः । उपमा हि निभ, प्रतिम, च्छल, प्रतिबिम्ब, प्रतिच्छाय, तुल्य, सदृशाभासादिभिविचित्राभिरुक्तिभिर्विचित्रीभवत्येव । वस्तुत एतासामुक्तीनामर्थवैचित्र्यस्य विद्यमानत्वात् । नियमेन भानयोगाद्धि निभशब्दः, तदनुकारितया तु प्रतिमशब्द इत्येवं सर्वत्र वाच्यं, केवलं बालोपयोगिकाव्यटीकापरिशीलनदौरात्म्यादेषु पर्यायत्वभ्रम इति भावः । एवमर्थानन्त्यमलङ्कारानन्त्यं च भणितिवैचित्र्याद्भवति । अन्यथापि च तत्ततो भवतीति दर्शयति—

भणितिश्चेति । प्रतिनियताया भाषाया गोचरो वाच्यो योऽर्थस्तकृतं यद्वैचित्र्यं तन्निबन्धनं निमित्तं यस्य, अलङ्काराणां काव्यार्थानां चानन्त्यस्य । तत्कर्मभूतं, भणितिवैचित्र्यं कर्तृभूतमापादयतीति सम्बन्धः । कर्मणो विशेषणच्छलेन हेतुर्दर्शितः ।

मम मम इति भणतो व्रजति कालो जनस्य ।
तथापि न देवो जनार्दनो गोचरे भवति मनसः ॥

मधुमथ इति यः अनवरतं भणति, तस्य कथं न देवो मनोगोचरो भवतीतिविरोधालङ्कारच्छाया । सैन्धवभाषया महुमहु इत्यनया भणित्या समुन्मेषिता ॥ ७ ॥

लोचन

'काय (केवळ पुनरुक्त)?' – अर्थाची पुनरुक्ति जाणवत नसताना तर्कशुद्ध विचार करणाऱ्यांनी [६] ती आहे म्हणून कशी काय मान्य करावी, असा आशय. तोच आशय वृत्तिकार 'आणि ती जर (पुनरुक्त) नसतील, तर' इ. शब्दांनी प्रकट करितात.

'वर्णनशैली – पूर्वीच्या कवींनी केलेल्या वर्णनात जर केवळ समानार्थक शब्द वापरून उक्तींमध्ये वैशिष्ट्य निर्माण होत असेल, तर त्याहून निराळ्या समानार्थक शब्दांनी मूळ अर्थापैकी काहीही कमी न करिता तोच अर्थ वर्णिला, तर यात पुनरुक्ति नाही असा वाचकांना अनुभव येत नाही. [७] म्हणून विशिष्ट प्रकारचा वेगळा वाच्यार्थ प्रकट करणाऱ्या शब्दांमुळेच वर्णनशैलीमध्ये नवीनपणा जाणवतो, असा भावार्थ. 'ज्ञानेंद्रियांच्या कक्षेत येणाऱ्या' – प्रत्यक्षादि प्रमाणांनी ज्ञात होऊ शकणारे जे वैशिष्ट्य, त्याहून जी अभिन्नता, तिने (युक्त असेच बाह्य पदार्थाचे रूप कवीला ज्ञात होते.) [८]

वृत्तिकारांचा आशय असा :– शब्दांचा संकेत जातीवर, [९] जातिविशिष्ट व्यक्तीवर किंवा अपोहावर [१०] किंवा दुसऱ्या कोणत्याही अर्थावर [११] होऊ द्या, या निरनिराळ्या वादांशी आम्हाला काय करावयाचे आहे? वैशिष्ट्यांनी युक्त अशा पदार्थांचे ज्ञान वाक्यामुळे होते, याबाबत कोणत्या पक्षाचा मतभेद आहे? पदे 'अन्वित' अर्थाचा बोध करून देतात हे मत [१२] किंवा त्याच्या उलट म्हणजे 'पदे ही आपल्या सुट्या अर्थाचीच बोधक असतात हे मत [१३] किंवा संसर्गवाद, [१४] भेदवाद [१५] इ. मतांपैकी कोणतेही मत स्वीकारले, तरी वाक्यार्थ हा विशेषरूपीच असतो, हे कोणीही नाकारू शकत नाही. आणि वर्णनशैलीमध्ये विविधता केवळ समानार्थक शब्द वापरून येत नाही हे (आम्ही नुकतेच [१६]) सांगितले आहे. आणि याहून निराळे [१७] जे (उक्तिवैचित्र्य) आहे, ते उलट आमच्याच मताचे समर्थन करणारे आहे, हे वृत्तिकार 'आणखीं असे की' इ. शब्दांनी सांगतात. 'पुन्हा' – आणखी एकदा, असा अर्थ. कारण उपमा ही निभ, प्रतिम, छल, प्रतिबिंब, प्रतिच्छाय, तुल्य, सदृश, आभास इ. निरनिराळे (औपम्यवाचक) शब्द [१८] योजिल्याने प्रत्येकवेळी वेगवेगळी वाटतेच. [१९] वास्तविक ह्या निरनिराळ्या औपम्यवाचक शब्दांच्या अर्थामध्ये वेगवेगळ्या छटा आहेत, म्हणून. कारण (उपमानासारखे) 'नियमाने भान होणे (म्हणजे दिसणे)' या अर्थी **निभ** हा शब्द, 'त्याचे अनुकरण करणे' या अर्थाने 'प्रतिम' हा शब्द, याप्रमाणे सर्व औपम्यवाचक शब्दांच्या बाबतीत समजावे. पण बालांना म्हणजे नवशिक्यांना उपयोगी पडणाऱ्या काव्य-टीका वाचण्याच्या वाईट सवयीमुळे हे सर्व शब्द समानार्थक आहेत असा भ्रम होतो, (असे आम्हाला वाटते.) अशा प्रकारे उक्तिवैचित्र्यामुळे काव्याच्या (वाच्य) अर्थांना आणि (वाच्य) अलंकारांना अनंतत्व प्राप्त होते, याला (म्हणजे वाच्य अर्थाच्या नावीन्याला) उक्तिवैचित्र्याहून दुसरेही एक कारण आहे हे वृत्तिकार 'तसेच शब्दयोजना ही' इ. वाक्याने सांगतात. विशिष्ट भाषेचा विषय असणारा जो वाच्य अर्थ, त्यामुळे निर्माण होणारे जे वैशिष्ट्य, त्या वैशिष्ट्यामुळे उत्पन्न होणारे अलंकारांचे आणि काव्यविषयांचे अनंतत्व. ते अनंतत्व हे कर्म आहे आणि उक्तिवैचित्र्य [२०] हा कर्ता आहे व प्राप्त करून देते हे क्रियापद आहे असे समजून अन्वय करावा. (**आपादयति** या कियापदाच्या) कर्माचे कारण '**प्रतिनियत**·····**निबन्धनं**' हे विशेषण योजून वृत्तिकारांनी दाखविले आहे.

'माझे माझे' असे म्हणता म्हणता लोकांचे आयुष्य व्यतीत होत असते. तरीही त्या देवजनार्दनाचा साक्षात्कार काही त्यांच्या मनाला होत नाही. 'मधुमथ' असे जो अखंडपणे म्हणत असतो, त्याच्या मनाला देवाचा साक्षात्कार कसा होत नाही, अशी विरोधालंकाराची झलक येथे प्रतीत होते व ती सैंधव भाषेत [२१] **महु महु** असा शब्दप्रयोग केल्याने ('मधुमथ' हा दुसरा अर्थ व त्यामुळे) निर्माण झाली आहे [२२]॥ ७ ॥

टीपा

१) पाहा, राजशेखराच्या कर्पूरमञ्जरी नाटकामधील पहिल्याच अंकातील पुढील वचन – **उक्तिविशेषः काव्यं, भाषा या भवति सा भवतु ॥**

२) हा दोष म्हणजे वैशिष्ट्य किंवा नवीनपणा नसण्याचा आणि म्हणून 'महाकवि' या संज्ञेला वाल्मीकीखेरीज कोणताही कवि पात्र नसण्याचा दोष.

३) पाहा, कालिदासाच्या रघुवंशातील पहिलेच शब्द – **वागर्थाविव संपृक्तौ** (म्हणजे शब्द आणि अर्थ हे जसे अतूटपणे, अ–विभाज्यपणे संबद्ध असतात, तसे असलेले)...

४) या आतापर्यंतच्या सगळ्या विवेचनाचे तात्पर्य असे की, वाल्मीकीनंतर कालिदास वगैरे पाचसहाच का होईना (पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रसादि प्रतीयमान अर्थ हेच दिव्य प्रतिभेचे गमक'"), पण महाकवि झाले व त्यांच्या काव्यात रसिकांना प्रतिभेची चमक आढळून येते. त्यावरून काव्यविषयांचे नवनवीन दर्शन कवींना घडत असते हे मान्य करणे भागच आहे (ह्याच उद्द्योतातील कारिका ६ पहा) या संदर्भात पुढील वचने पाहण्यासारखी आहेत–**नानृषिः कविरित्याहुः ऋषिश्च किल दर्शनात् ।** कविवर्य केशवसुतही म्हणतात–

'पाणिस्पर्शचि आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या ॥'

किंवा

'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे!'

आणि या 'मोठ्या आशया' चे दर्शन कवीलाच होते. सामान्य जन 'नित्याच्या अवलोकने आंधळ' झालेले असतात.

५) पाहा, हाच (चवथा) उद्द्योत, कारिका १ व ६.

५*) प्रस्तुत 'अपभ्रंश' भाषेतील गाथा 'दोहा' वृत्तामध्ये असून १९०५ साली Pischel ने प्रसिद्ध केलेल्या 'Materials for the knowledge of अपभ्रंश' या ग्रंथामध्ये काही किरकोळ पाठभेदांसह दिलेली आहे.

६) धन्यालोकाच्या काशी आवृत्तीमध्ये लोचन पृ. ५४२ वर **प्राकरणिकैः** असा पाठ आहे, पण सुशीलकुमार दे यांनी संपादिलेल्या (चतुर्थ उद्द्योतावरील) लोचनामध्ये (Some Problems of Sanskrit Poetics, P : 257). **प्रामाणिकैः** असा पाठ आहे. तो आम्ही स्वीकारला आहे.

७) म्हणजे पुनरुक्ति आहे असाच त्यांना अनुभव येतो. तेव्हा दुसरे समानार्थक शब्द वापरूनही जर पुनरुक्ताचाच अनुभव येतो, तर पहिले समानार्थक शब्द वापरूनही पुनरुक्तीचा अनुभव का येऊ नये? म्हणजे केवळ समानार्थक शब्द वापरल्यामुळे (म्हणजेच उक्तिवैचित्र्यामुळे) काव्यविशेषाला नावीन्य प्राप्त होते हा प्रतिपक्ष्याचा दावा टिकू शकत नाही.

८) म्हणजे कवीला पदार्थाचे जे ज्ञान होते, ते सामान्य स्वरूपाचेच नसून विशिष्ट स्वरूपाचे असते. त्यामुळे कवीने केलेले वर्णन सुद्धा सामान्यस्वरूषी नसून वर्ण्य वस्तूच्या सूक्ष्म वैशिष्ट्यांना स्पर्श करणारे असते.

९) शब्दाचा संकेत कोणत्या अर्थावर होतो, यासंबंधी पाच मते प्रचलित आहेत—

> १) केवलजातिवाद (मीमांसक), २) जातिविशिष्टव्यक्तिवाद (प्राचीन नैयायिक), ३) अपोहवाद (बौद्ध), ४) केवलव्यक्तिवाद (नव्यनैयायिक) आणि, ५) जात्यादिवाद (वैयाकरण). या सर्वांच्या स्पष्टीकरणार्थ पाहा, काव्यप्रकाश उल्लास २.

१०) अपोहवाद म्हणजे शब्द उच्चारल्याबरोबर जो अर्थ ध्यानात येतो, तो भावरूप नसून तदितर सर्व पदार्थांचा जभाव (अतद्व्यावृत्ति) या स्वरूपाचा असतो, असे मत.

११) दुसरा कोणताही अर्थ म्हणजे 'केवल व्यक्ति, आणि जाति, गुण. क्रिया व द्रव्य या व्यक्तीच्या चार उपाधि.

१२) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'" वरील, टीप १४.

१३) पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'दीर्घ अभिधावाद्यांचे मत व त्याचे खंडन'" वरील, टीप ५३.

१४) संसर्ग म्हणजे दोन पदार्थांमधील संबंध हा संबंध विशेषण–विशेष्य संबंध व क्रियाकारक संबंध या स्वरूपाचा असतो. वाक्य हे त्यातील शब्दांच्या अर्थांच्या संसर्गाचाच म्हणजे संबंधाचाच बोध करून देते, या मताला 'संसर्गवाद' म्हणतात. हे मत काही मीमांसकांचे व काही नैयायिकांचे आहे.

१५) 'पांढरी गाय' यातील 'गाय' हा शब्द गोभिन्न व्यक्तींचा पांढरेपणाशी संबंध नाही अशा व 'पांढरी' हा शब्द पांढऱ्या रंगाहून भिन्न रंगांचा या गायीशी संबंध नाही अशा अर्थाचा बोध करून देतो या मताला 'भेदवाद' म्हणतात. हे मत पाणिनीच्या पूर्वी होऊन गेलेल्या 'व्याडि' नावाच्या वैयाकरणाने मांडले. पाहा, कुमारिलभट्टाचे तन्त्रवार्तिक (आनंदाश्रम, १९२९ आवृत्ति), पृ. ४४७ वरील पुढील श्लोक—

> **संसर्गोऽपि पदार्थानामन्योन्येनानुरञ्जनम् ।**
> **भेदो नाम पदार्थानां व्यवच्छेदः परस्परम् ॥**

१६) द्वितीय खंड, "उद्द्योत – ४ 'अवस्था, स्थळ, काळ इत्यादींच्या भिन्नतेमुळे वाच्यार्थदेखील अनंतप्रकारचे होतात व त्यामुळेही काव्य-विषयांना नवीनता प्राप्त होते. यावर आक्षेप- 'शब्दांमुळे वस्तूंच्या सामान्य स्वरूपाचाच बोध होतो. तो बोध पूर्वी अनेकवेळा झाला असल्यामुळे काव्यात केवळ शब्दांचे नावीन्य असते, अर्थाचे नाही, या आक्षेपाचे खंडन'" वर.

१७) याहून निराळे म्हणजे समानार्थक शब्द वापरल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या उक्तिवैचित्र्याहून भिन्न म्हणजे वाच्यार्थाच्या निराळेपणामुळे उत्पन्न होणारे उक्तिवैचित्र्य.

१८) संस्कृतातील औपम्यवाचक शब्द काव्यादर्श, २, ५७ ते ६५ मध्ये सांगितले आहेत.

१९) म्हणजे समानार्थक शब्दांतही अर्थांच्या भिन्न भिन्न सूक्ष्म छटा असतात व त्यामुळे समानार्थक शब्द हे पूर्णमणे एकाच अर्थाचे असू शकत नाहीत.

२०) लोचनातील **भणितिवैचित्र्य** हा शब्द मूळ वृत्तीत नाही. **स्वभाषाभेदेन व्यवस्थिता सती भणितिः** याबद्दल 'भणितिवैचित्र्य' हा शब्द योजिलेला दिसतो. **भणितिः काव्यार्थानाम् आनन्त्यमापादयति** यातील कर्ता-कर्म संबंध अगदी स्पष्ट आहे. तेव्हा अभिनवगुप्तांच्या समोरील प्रतीमध्ये **भणितिवैचित्र्यं च व्यवस्थितं सत्** असा पाठ असण्याची शक्यता आहे.

२१) म्हणजे 'अपभ्रंश' भाषेत.

२२) 'महु महु' याचा **मम मम** असा अर्थ घेतल्यास विरोधालंकार नाही, पण **मधुमथ** असा अर्थ केल्यास मात्र विरोधालंकार निर्माण होतो. 'लोक तोंडाने **मधुमथ** म्हणतात, पण त्यांचे मन अन्यत्र असल्याने त्यांना जनार्दनाची प्राप्ति न होणे हे स्वाभाविक आहे' हे लक्षात घेतल्याने त्या विरोधाचा परिहार होतो.

ध्वन्यालोकः

इत्थं यथा यथा निरूप्यते तथा तथा न लभ्यतेऽन्तः काव्यार्थानाम् । इदं तूच्यते—

अवस्थादिविभिन्नानां वाच्यानां विनिबन्धनम् ।
यत्प्रदर्शितं प्राक्

भूम्नैव दृश्यते लक्ष्ये तत्तु भाति रसाश्रयात् ॥ ८ ॥
न तच्छक्यमपोहितुम् ।

तदिदेमत्र संक्षेपणाभिधीयते सत्कवीनामुपदेशाय—
रसभावादिसंबद्धा यद्यौचित्यानुसारिणी ।

अन्वीयते वस्तुगतिर्देशकालादिभेदिनी ॥ ९ ॥
तत् का गणना कवीनामन्येषां परिमितशक्तीनाम् ।

वाचस्पतिसहस्राणां सहस्रैरपि यत्नतः ।
निबद्धा सा क्षयं नैति प्रकृतिर्जगतामिव ॥ १० ॥

यथाहि जगत्प्रकृतिरतीतकल्पपरम्पराविर्भूतविचित्रवस्तुप्रपञ्चा सती पुनरिदानीं परिक्षीणापरपदार्थनिर्माणशक्तिरिति न श्क्यतेऽभिधातुम् । तद्वदेवेयं काव्यास्थितिरनन्ताभिः कविमतिभिरुपभुक्तापि नेदानीं परिहीयते, प्रत्युत नवनवाभिर्व्युत्पात्तिभिः परिवर्धते ।

ध्वन्यालोक

याप्रमाणे जसजसा बारकाईने विचार करावा, तसतसे (व्यंग्यार्थाची जोड मिळाल्याने) काव्याच्या विषयांच्या नवीनपणाला मर्यादा उरत नाही. पण आम्ही येवढे (च) म्हणतो की—

अवस्था इत्यादिकांमुळे भिन्न भिन्न स्वरूप प्राप्त होणाऱ्या वाच्यार्थांची योजना—

ती योजना कशी केली जाते हे पूर्वीच [१] सांगितले आहे.

—काव्यग्रंथांमध्ये विपुल प्रमाणात केलेली आढळते, ही गोष्ट कोणालाही नाकबूल करिता येणार नाही.

पण (भिन्न भिन्न वाच्यार्थांची) ही योजना जी सुंदर दिसते, ती मात्र रसाचा आश्रय केल्यामुळे होय ॥ ८ ॥

तेव्हा चांगले काव्य रचू इच्छिणाऱ्या कवींच्या मार्गदर्शनासाठी या ठिकाणी थोडक्यात असे सांगण्यात येत आहे की—

स्थळ, काळ इत्यादींमुळे जिची विविधता (एकसारखी) वाढत जाते, ती (निसर्गातील) वस्तुस्थिति जर रस, भाव इत्यादींच्या आश्रयाने व 'औचित्य' पाळून वर्णिली असली, ॥ ९ ॥

तर इतर बेताबाताची प्रतिभा असलेल्या कवींची गोष्ट तर राहू द्या, पण

बृहस्पतितुल्य-असलेल्या लाखो कवींनी त्या वस्तुस्थितीचे प्रयत्नपूर्वक वर्णन आधीच केलेले असले, तरी तिचे नावीन्य कमी होत नाही. याला दाखला विश्वाचे उपादानकारण असलेल्या 'प्रकृती 'चा होय. [२] ॥ १० ॥

कारण ज्याप्रमाणे आतापर्यंत होऊन गेलेल्या युगांच्या मालिकेमध्ये मूळ प्रकृतीच्या नानाविध स्वरूपांचा आविष्कार झालेला असला, तरी नवनवीन पदार्थ निर्माण करण्याचे तिचे सामर्थ नाहीसे झाले असे अद्यापि म्हणता येत नाही, त्याप्रमाणेच ही काव्यांमध्ये वर्णिली जाणारी (जगातील) वस्तुस्थिति अनंत कवींनीं आपल्या प्रतिभेने आधीच वर्णिली असली, तरी ती आताही कमी न होता उलट नवनवीन कविनैपुण्याच्या [३] योगाने वाढतच जात आहे.

लोचनम्

<u>अवस्थादिविभिन्नानां वाच्यानां विनिबन्धनम्</u>
<u>भूम्नैव दृश्यते लक्ष्ये तत्तु भाति रसाश्रयात् ॥</u>
इति कारिका । अन्यस्तु ग्रन्थो मध्योपस्कारः ॥ ८ ॥

अत्र तु पादत्रयस्यार्थमनूद्य चतुर्थपादार्थोऽपूर्वतयाभिधीयते । तदित्यादि शक्तीनामित्यन्तं कारिकयोर्मध्योपस्कारः । द्वितीयकारिकायास्तुर्यं पादं व्याचष्टे, यथा हीति ॥ ९–१० ॥

लोचन

अवस्थादिविभिन्नानां वाच्यानां विनिबन्धनम् ।
भूम्नैव दृश्यते लक्ष्ये तत्तु भाति रसाश्रयात् ॥

अशी ही (८ वी) कारिका आहे, [४] पण 'ती योजना कशी केली जाते' इ. वाक्य व 'ही गोष्ट कोणालाही नाकबूल' इ. वाक्य म्हणजे कारिकेच्यामध्ये वृत्तिकारांनी स्पष्टीकरणार्थ घातलेली भर [५] होय ॥ ८ ॥

पण येथे (म्हणजे कारिका १० च्या बाबतीत वृत्तिकार) पहिल्या तीन चरणांच्या अर्थाचे मागाहून विवरण करितात आणि चवथ्या चरणाचा आशय अगदी नवीन असल्यामुळे तो वृत्तिकार आधी सांगत आहेत. [६]

'तर इतर' ····· पासून 'राहू द्या' पर्यंतचा भाग म्हणजे ९ व १० या दोन कारिकांच्यामध्ये वृत्तिकारांनी स्पष्टीकरणार्थ घातलेली भर आहे. दुसऱ्या (म्हणजे १० व्या) कारिकेच्या ४ थ्या चरणाचे व्याख्यान वृत्तिकार 'कारण ज्याप्रमाणे' इ. वाक्याने करितात. ॥ ९, १० ॥

टीपा

१) पाहा, चवथा उद्द्योत, कारिका ७ व तीवरील वृत्ति.

२) तुलनेसाठी बिह्लणाच्या 'विक्रमांकदेवचरिता' तील पहिल्याच सर्गामधील पुढील श्लोक पाहा–

गृहणन्तु सर्वे यदि वा यथेष्टं, नास्ति क्षतिः काऽपि कवीश्वराणाम् ।
रत्नेषु लुप्तेषु बहुष्वमर्त्यैरद्यापि रत्नाकर एव सिन्धुः ॥

म्हणजे वाङ्मयचौर्य करणारांनी थोर कवींच्या काव्यातून कितीही चोरले, तरी त्यामुळे त्या कवींची कोणतीच हानि होणार नाही. देवांनी पुष्कळ रत्ने हिरावून नेली, तरी सागर हा अद्यापि 'रत्नाकर' च आहे.]

३) मुळातल्या 'व्युत्पत्ति' या शब्दाचा अनुवाद येथे कोशातील अर्थांना अनुसरून '(कवि–) नैपुण्य' असा केला आहे. रूद्रटाने काव्यालंकार, १–१७ मध्ये 'प्रतिभेला व्युत्पत्तीची आवश्यकता असते' असे विधान केले आहे. आणि या चवथ्या उद्द्योतातील कारिका ६ पाहिल्यास व्युत्पत्ति म्हणजे प्रतिभागुणच आनंदवर्धनांना अभिप्रेत आहे असे वाटते. राजशेखराने **उचितानुचितविवेको व्युत्पतिः ।** असे काव्यमीमांसेच्या ५ व्या अध्यायात म्हटले आहे.

४) 'लोचना' मध्ये आतापर्यंत कोठेही मूळ ग्रंथातील कारिकेचे विवरण चालू असताना ती कारिका संपूर्णपणे उद्धृत केलेली नाही. पण चवथ्या उद्द्योतातील ८, १२, १३, १४ व १६ या पाच कारिका 'लोचना'त पुन्हा उद्धृत केल्या आहेत. याचे कारण अभिनवगुप्तानी असे दिले आहे की, वृत्तीत या कारिकांचे भाग पाडून त्यांचे विवरण केले आहे. पण हा प्रकार सर्वच हस्तलिखित प्रतींत होता असे नाही, तर काही हस्तलिखित प्रतींत कारिका व वृत्ति सलग लिहिलेल्या होत्या असे अभिनवगुप्तांनी कारिका १४ वरील लोचनात म्हटले आहे.

कारिकांचे भाग पाडून विवरण करणे ही परिस्थिति कारिका ८, १२, १४ व १६ यांमध्ये दिसते. पण वृत्तीमध्ये कारिका १३ चे भाग पाडलेले नाहीत. तेव्हा अभिनवगुप्तांनी वापरलेल्या ध्वन्यालोकाच्या प्रतीमध्ये या १३ व्या कारिकेचेही भाग पाडून त्यांचे विवरण वृत्तीमध्ये वेगवेगळे केलेले असण्याचा संभव आहे.

५) **उपस्कार** हा शब्द लोचनात या पूर्वी प्रथमखंड, "उद्द्योत – २ 'वाच्यही अलंकार व व्यंगही अलंकार असल्यास व्यंग अलंकार जर प्रधान तरच ध्वनि', 'प्रतिभेच्या अभावी लक्षणेचा उपयोग म्हणजे ध्वनि नव्हे'" व या खंडातील "उद्द्योत – ३ ध्वनीचा 'संलक्ष्यक्रमव्यंग' प्रकारही काही प्रबंधातून " वर आला आहे.

६) वास्तविक हा मजकूर कारिका १० संबंधी असल्यामुळे ती ९ व १० या कारिकांयधील उपस्कारासंबंधीच्या पुढच्या म्हणजे 'तर इतर... घातलेली भर आहे' या वाक्यानंतर येणे इष्ट होते.

ध्वन्यालोकः

इत्थं स्थितेऽपि—
'संवादास्तु भवन्त्येव बाहुल्येन सुमेधसाम् ॥'
स्थितं ह्येतत्– संवादिन्यो मेधाविनां बुद्धयः । किं तु—
'नैकरूपतया सर्वे ते मन्तव्या विपश्चिता ॥ ११ ॥'

कथमिति चेत्–

'संवादो ह्यन्यसादृश्यं, तत् पुनः प्रतिबिम्बवत् ।
आलेख्याकारवत् तुल्यदोहिवच्च शरीरिणाम् ॥ १२ ॥

संवादो हि काव्यार्थस्योच्यते यदन्येन काव्यवस्तुना सादृश्यम् । तत् पुनः शरीरिणां प्रतिबिम्बवदालेख्याकारवत् तुल्यदेहिवच्च त्रिधा व्यवस्थितम् । किञ्चिद्धि काव्यवस्तु वस्त्वन्तरस्य शरीरिणः प्रतिबिम्बकल्पम्, अन्यदालेख्यप्रख्यम्, अन्यत् तुल्येन शरीरिणा सदृशम् ।

'तत्र पूर्वमनन्यात्म तुच्छात्म तदनन्तरम् ।
तृतीयं तु प्रसिद्धात्म नान्यसाम्यं त्यजेत् कविः ॥ १३ ॥

तत्र पूर्वं प्रतिबिम्बकल्पं काव्यवस्तु परिहर्तव्यं सुमतिना । यतस्तदनन्यात्म तात्त्विकशरीरशून्यम् । तदनन्तरमालेख्यप्रख्यमन्यसाम्यं शरीरान्तरयुक्तमपि तुच्छात्मत्वेन त्यक्तव्यम् । तृतीयं तु

विभिन्नकमनीयशरीरसद्भावे सति ससंवादमपि काव्यवस्तु न त्यक्तव्यं कविना । नहि शरीरी शरीरिणाऽन्येन सदृशोऽप्येक एवेति शक्यते वक्तुम् ।

एतदेवोपपादयितुमुच्यते—
आत्मनोऽन्यस्य सद्भावे पूर्वस्थित्यनुयाय्यपि ॥
वस्तु भातितरां तन्व्याः शशिच्छायमिवाननम् ॥ १४ ॥

तत्त्वस्य सारभूतस्यात्मनः सद्भावेऽन्यस्य पूर्वस्थित्यनुयाय्यपि वस्तु भातितराम् । पुराणं रमणीयच्छायाऽनुगृहीतं हि वस्तु शरीरवत् । परां शोभां पुष्यति । न तु पुनरुक्तत्वेनावभासते । तन्व्याः शशिच्छायमिवाननम् ।

एवं तावत् ससंवादानां काव्यार्थानां विभक्ताः सीमानः ।

ध्वन्यालोक

पण असे असले, तरी—

अतिशय बुद्धिमान लोकांच्या विचारांमध्ये 'संवाद' (म्हणजे साम्य) असल्याचे पुष्कळ वेळा आढळते, यात शंका नाही.

कारण ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे की, बुद्धिमान लोकांचे विचार समान असतात. पण ते सर्व एकाच स्वरूपाचे [१] असतात असे जाणकाराने समजू नये ॥ ११ ॥

का? असे विचाराल, तर—

संवाद म्हणजे दुसऱ्याशी साम्य. आणि ते १) प्रतिबिम्बाप्रमाणे २) चित्राच्या आकाराप्रमाणे आणि ३) मूर्त व्यक्तींपैकी सारख्या दिसणाऱ्या दोघांप्रमाणे, असे (तीन प्रकारचे) असते. ॥ १२ ॥

कारण काव्यविषयांच्या बाबतीतला संवाद म्हणजे एका काव्यातील विषयाचे दुसऱ्या काव्यातील विषयाशी असणारे साम्य होय. आणि ते साम्य मूर्त वस्तूच्या प्रतिबिम्बासारखे, मूर्त वस्तूच्या चित्रासारखे आणि दोन मूर्त व्यक्तींमधील सादृश्यासारखे, असे तीन प्रकारचे असते. कारण एखाद्या काव्यविषयाचे दुसऱ्या काव्यविषयाशी प्रतिबिम्बाचे मूळ, मूर्त पदार्थाशी असावे तसे साम्य असते. दुसऱ्या प्रकारचे साम्य हे चित्रविषयाशी असलेल्या चित्राच्या साम्यासारखे असते आणि तिसऱ्या प्रकारचे साम्य हे एका व्यक्तीच्या दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या साम्यासारखे असते.

त्यांपैकी पहिले साम्य म्हणजे दोहोंचे स्वरूप (दोन्ही काव्यातील आशय) एकच असणे हे होय. (कारण प्रतिबिम्बाला वेगळे अस्तित्व नसते). त्यानंतरच्या दुसऱ्या साम्यात स्वरूप (म्हणजे काव्यातील आशय) वेगळे असले तरी ते वेगळेपण उपेक्षणीय असते. [२] तिसऱ्या साम्यात मात्र स्वरूपे (म्हणजे

काव्यातील आशय) पूर्णपणे व खरोखरच वेगवेगळी असतात. म्हणून कवीने दुसऱ्याच्या कृतीशी (तिसऱ्या प्रकारचे [३]) साम्य असणाऱ्या काव्यविषयाचा त्याग करू नये. ॥ १३ ॥

त्या (तीन) साम्यांपैकी पहिला प्रकार म्हणजे काव्यातील (वाच्य व व्यंग्य) आशयाचे स्वरूप पूर्वीच्या काव्यातील (वाच्य व व्यंग्य) आशयाच्या प्रतिबिम्बासारखा असणे. तो विवेकी कवीने टाळावा, कारण त्या दुसऱ्या (म्हणजे नंतरच्या) काव्यातील आशयाला स्वतंत्र वास्तव स्वरूप नसते, (म्हणजे तो (आशय) केवळ छायेसारखा असतो) त्यानंतरच्या दुसऱ्या म्हणजे चित्रासारख्या साम्याच्या प्रकारात आशयाला स्वतंत्र, वास्तव स्वरूप असले तरी त्या प्रकारच्या सादृश्याने युक्त काव्य पोचट, उपेक्षणीय असल्यासुळे वर्ज्य होय. पण साम्याच्या तिसऱ्या प्रकारात काव्यातील आशयाला वेगळे, आकर्षक स्वरूप असल्यामुळे त्या प्रकारात एका काव्यविषयाचे दुसऱ्या काव्यविषयाशी साम्य असले तरी तो प्रकार कवीने टाकून देऊ नये; कारण एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तीसारखी असली तरी त्या दोन्ही एकच आहेत असे म्हणणे शक्य नसते.

हेच (दृष्टान्ताने) पटवून देण्यासाठी असे सांगण्यात येत आहे की—

आत्मा (म्हणजे व्यंग्य आशय) वेगळा असेल, तर एक काव्यविषय पूर्वी येऊन गेलेल्या विषयासारखा असला, तरी तों तनुगात्रीच्या चंद्रसदृश कांति असलेल्या मुखाप्रमाणे अतिशय शोभून दिसतो. ॥ १४ ॥

आत्मा म्हणजे व्यंग्य रसादि स्वरूपाचे स्वतंत्र प्राणभूत तत्त्व असले, तर काव्यविषय पूर्वीच्या कवीने वर्णिलेल्या विषयासारखाच असला तरी तो अतिशय खुलून दिसतो. कारण जुनाच विषय (व्यंग्यार्थाच्या नवीन) कांतीने युक्त असेल, तर दुसऱ्या शरीरासारखेच असणाऱ्या पण स्वतःच्या स्वतंत्र आकर्षकपणाने नटलेल्या शरीराप्रमाणे कमालीचा शोभिवंत दिसतो. तो पुनरुक्त असल्यासारखा वाटत नाही. तनुगात्रीच्या चन्द्रसदृश कांति असलेल्या मुखाप्रमाणे. [४]

याप्रमाणे संवादयुक्त म्हणजे साम्ययुक्त असलेल्या [५] पदसमुदायरूपी वाक्यांच्या अर्थाचे ग्राह्यत्व व त्याज्यत्व कोणत्या परिस्थितीवर अवलंबून असते, हे स्पष्ट दर्शविले.

लोचनम्

संवादा इति कारिकाया अर्ध नैकरूपतयेति द्वितीयम् ॥ ११ ॥
किमियं राज्ञाज्ञेत्यभिप्रायेणाशङ्कते कथमिति । चेदिति अत्रोत्तरम्—

संवादो ह्यन्यसादृश्यं तत्पुनः प्रतिबिम्बवत् ।
आलेख्याकारबत्तुल्यदेहिवच्च शरीरिणाम् ॥

इत्यनया कारिकया । एषा खण्डीकृत्य वृत्तौ व्याख्याता । शरीरिणामित्ययं च शब्दः प्रतिवाक्यं द्रष्टव्य इति दर्शितम् । शरीरिण इति । पूर्वमेव प्रतिलब्धस्वरूपतया प्रधानभूतस्येत्यर्थः ॥ १२ ॥

तत्र पूर्वमनन्यात्म तुच्छात्म तदनन्तरम् ।
तृतीयं तु प्रसिद्धात्म नान्यसाम्यं त्यजेत्कविः ।

इति कारिका । अनन्यः पूर्वोपनिबद्धकाव्यादात्मा स्वभावो यस्य तदनन्यान्म येन रूपेण भाति तप्रात्क्कविस्पृष्टमेव, यथा येन रूपेण प्रतिबिम्बं भाति, तेन रूपेण बिम्बमेवैतत् । स्वयं तु तत्कीदृशमित्यत्राह्—तात्त्विकशरीरशून्यमिति । न हि तेन किञ्चिदपूर्वमुत्प्रेक्षितं, प्रतिबिम्बमप्येवमेव । एवं प्रथमं प्रकारं व्याख्याय द्वितीयं व्याचष्टेतदनन्तरमिति । द्वितीयमित्यर्थः । अन्येन साम्यं यस्य तत्तथा । तुच्छात्मेति । अनुकारे ह्यनुकार्यबुद्धिरेव चित्रपुस्तादादिव न तु सिन्दूरादिबुद्धिः स्फुरति, सापि च न चारुत्वायेति भावः ॥ १३ ॥

एतदेवेति तृतीयस्य रूपस्यात्याज्यत्वम्
आत्मनोऽन्यस्य सद्भावे पूर्वस्थित्यनुयाय्यपिं ।
वस्तु भातितरां तन्व्याः शशिच्छायमिवाननम् ॥

इति कारिका खण्डीकृत्य वृत्तौ पठिता । केषुचित्पुस्तकेषु कारिका अखण्डीकृता एव दृश्यन्ते । आत्मन इत्यस्य शब्दस्य पूर्वपठिताभ्यामेव तत्त्वस्य सारभतस्येति च पदाभ्यामर्थो निरूपितः ॥ १४ ॥

ससंवादानामिति पाठः । संवादानामिति तु पाठे वाक्यार्थरूपाणां समुदायानां ये संवादास्तेषामिति वैयधिकरण्येन सङ्गतिः ॥ १४ ॥

लोचन

संवादास्तु इ.— हा कारिकेचा पूर्वार्ध असून नैकरूपतया ··· इ. हा (त्या कारिकेचा) उत्तरार्ध आहे. ही (म्हणजे सगळे 'संवाद' एकरूप समजू नये) काय राजाची आज्ञा आहे? अशी शंका कल्पून वृत्तिकार 'का? असे विचाराल' या शब्दांनी ती शंका मांडतात. या शंकेचे उत्तर **संवादो ह्यन्यसादृश्यं** ··· या (म्हणजे १२ व्या) कारिकेने देण्यात आले आहे. या (१२ व्या) कारिकेचे दोन भाग पाडून वृत्तीमध्ये त्यांचे विवरण करण्यात आले आहे. [७]

'शरीरिणाम्' हा शब्द (कारिकेच्या दुसऱ्या भागातील म्हणजे शेवटच्या तीन चरणातील) प्रत्येक वाक्यानंतर वाचावा, असे (बृत्तीत) दर्शविले आहे. 'मूर्त वस्तूच्या' याचा अर्थ ज्या वस्तूला आधीच मूर्त स्वरूप प्राप्त झाले असल्यामुळे जी वस्तू (तिच्या प्रतिबिंबाहून) प्रधान असते, तिच्या (प्रतिबिंबाप्रमाणे) असा अर्थ. ॥ १२ ॥

तत्र पूर्वमनन्यात्म ··· **त्यजेत्कवि :** ॥ अशी (१३ वी) कारिका आहे. [८]

अनन्य म्हणजे पूर्वी रचलेल्या काव्याहून वेगळा नाही आत्मा म्हणजे स्वरूप ज्याचे, (तें 'अनन्यात्म'). (म्हणजे असे की) तो नंतरचा काव्यविषय ज्या स्बरूपात (नंतरच्या कवीने वर्णिलेला) दिसतो, त्या रूपात तो पूर्वीच्या कवीने हाताळलेला असतोच. जसे, ज्या रूपात प्रतिबिंव दिसत असते त्या रूपाने (प्रतिबिंब) हे बिंबच असते, (तसे [९]) पण ते नंतरचे काव्य स्वतः कसे असते, या प्रश्नाबाबत वृत्तिकार

'त्याला स्वतंत्र वास्तव रूप नसते' असे स्पष्टीकरण करितात. कारण त्या (म्हणजे नंतरच्या कवीने वर्णिलेल्या) काव्यविषयामध्ये नवीन काही कल्पना केलेली नसते. प्रतिबिंबसुद्धा असेच असते. [१०] याप्रमाणे 'संवादा' च्या पहिल्या प्रकाराचे [११] विवरण केल्यावर वृत्तिकार दुसऱ्या प्रकाराचे [१२] विवरण 'त्यानंतरच्या' इ. शब्दांनी करितात. 'त्यानंतरच्या' म्हणजे दुसऱ्या प्रकारच्या वृत्तीतील **अन्यसाम्यम्** याचा अर्थ 'दुसऱ्याशी (म्हणजे मूळ काव्याशी) ज्याचे (चित्राप्रमाणे) साम्य असते, ते, असा करावा.

'उपेक्षणीय स्वरूपाचे' कारण चित्रे, लगदा वगैरेंपासून केलेल्या प्रतिकृति वगैरे अनुकरणांच्या बाबतीत त्यांच्यापासून मूळ वस्तूचेच ज्ञान होते, त्या वस्तु करिताना वापरलेल्या शेंदूर वगैरे रंगद्रव्यांचे ज्ञान होत नाही. आणि ते रंगद्रव्य वगैरेंचे ज्ञान झाले, तरीदेखील ते चमत्कारकारी होत नाही, असा आशय. ॥ १३ ॥

हेच म्हणजे तिसऱ्या प्रकारचे साम्य त्याज्य नसते, हेच. **आत्मनोऽन्यस्य सद्भावे ····· मिवाननम् ॥** ही कारिका वृत्तीमध्ये तिचे भाग पाडून लिहिली आहे. काही हस्तलिखित प्रतींमध्ये या (सर्व) कारिकांचे (व त्यांवरील वृत्तीचेही) भाग न पाडताच त्या कारिका सलगपणे लिहिलेल्या दिसतात. [१३] 'आत्मा' या शब्दाचा अर्थ [१४] १४ व्या कारिकेवरील वृत्तीच्या प्रारंभी वापरलेल्या 'तत्त्व' [१४] आणि 'सारभूत' या शब्दांनी सांगितला आहे. ॥ १४ ॥

(आमच्यापुढील हस्तलिखित प्रतीमध्ये) **ससंवादानाम्** (म्हणजे **संवादयुक्तानाम्**) असा पाठ आहे. पण त्याऐवजी **संवादानाम्** असा पाठ अनुसरल्यास 'वाक्यार्थरूपी समूहांचे' [१५] जे संवाद असतात, त्यांचे (ग्राह्यत्व व त्याज्यत्व) असा भेदान्वयाचा [१६] उपयोग करून वाक्यांच्या अर्थाची संगति लावावी.

टीपा

१) एकाच स्वरूपाचे याचे येथे दोन अर्थ होऊ शकतील. १. प्रत्येक संवाद हा मुळाशी एकरूप असतो असे नाही, म्हणजे काही एकरूप असतात, तर काही नसतात. २. सर्व संवाद एकाच स्वरूपाचे म्हणजे एकाच मापाने मोजण्यासारखे नसतात. काही ग्राह्य असतात, तर काही त्याज्य असतात.

२) पाहा, याच पृष्ठाच्या प्रारंभीचे 'उपेक्षणीय स्वरूपाचे'...इ. वाक्य. वस्तूचे भान होते, रंग इत्यादीचे होत नाही.

३) मूळ कारिकेत ४ थ्या चरणात **अन्यसाम्यम्** असा पाठ असण्याचा संभव आहे, व त्याचे विवरण अभिनवगुप्तांनी **अन्येन साम्यं यस्य** असे केले आहे. पण मुळात **अन्त्यसाम्यम्** असाही पाठ असण्याचा संभव आहे.

४) 'तनुगात्रीच्या चंद्रसदृश कांति असलेल्या' याचा अर्थ दोन प्रकारांनी लावता येईल :— १) आधीच अस्तित्वात असलेल्या चन्द्रबिम्बाप्रमाणें झळकणारे मुख किंवा २) इतर सुंदरींच्या चन्द्रतुल्य मुखाप्रमाणे असलेले चन्द्रतुल्य मुख.

५) दोन काव्यकृतींमध्ये विषयांचे साम्य असलेले पुष्कळ वेळा आढळते. विषयसादृश्य या अर्थी आनंदवर्धनांनी 'संवाद' हा शब्द वापरला असून त्याचे प्रतिबिंबतुल्य, आलेख्यप्रख्य व तुल्यदेहिवत् हे तीन प्रकार प्रथम त्यांनीच आपल्या ग्रंथात मांडलेले आढळतात. मात्र त्या प्रकारांची लक्षणे व उदाहरणे आनंदवर्धनांनी दिलेली नाहीत.

आनंदवर्धनांच्या पूर्वी वामनाने 'काव्यालंकारसूत्रवृत्ति' या ग्रंथात या विषयाचा केवळ ओझरता उल्लेख केला आहे. तिसऱ्या अधिकरणातील दुसऱ्या अध्यायाच्या आठव्या सूत्रामध्ये 'अयोनि' (मौलिक) व अन्यच्छायायोनि' (दुसऱ्यापासून उसनवारीने घेतलेले) असे काव्यातील विषयांचे दोन प्रकार त्याने सांगितले आहेत. त्याने 'अयोनि' या शब्दाचा अर्थ **अकारणः अवधानमात्रकारणः** असा दिला आहे. जो विषय किंवा विचार पूर्वीच्या कवींनो केव्हाही हाताळलेला नाही व जो उत्तरकालीन कवीला त्याच्या केवळ बुद्धीच्या एकाग्रतेच्या क्षणी स्फुरलेला असतो तो 'अयोनि' म्हणजे मौलिक विषय किंवा विचार. पूर्वीच्या काव्यात येऊन गेलेल्या विषयासारखा, विचारासारखा जो उत्तरकालीन काव्यातील विषय किंवा विचार असतो, तो **'अन्यच्छायायोनि'** म्हणजे दुसऱ्या कवीच्या काव्यातून उसनवारीने घेतलेला विषय किंवा विचार होय. वामनाने या दोन प्रकारांची प्रत्येकी एक याप्रमाणे उदाहरणे देऊन आपले विवेचन संपविले आहे.

आनंदवर्धनानंतर झालेल्या राजशेखराने (इ. स. चे १० शतक) संवादांचे किंवा साम्यांचे प्रकार व त्यांची उदाहरणेही दिली आहेत. त्या प्रकारांतही आनंदवर्धनांनी दिलेल्या तीन प्रकारांचा उल्लेख राजशेखराने या तीन प्रकारांची आपल्या मते लक्षणे करून त्यांची उदाहरणे (काव्यमीमांसा, अध्याय १२ व १३ मध्ये) दिली आहेत. त्याने केलेली लक्षणे अशी—

१) पूर्वीच्या काव्यातील सर्व अर्थ दुसऱ्या काव्यात असला, व फक्त शब्दरचनाच काय ती वेगळी असली, तर ते दुसरे काव्य पहिल्याच्या **प्रतिबिम्बासारखे** समजावे. त्यात पहिल्या काव्याहून खराखुरा निराळा असा काही विषय नसतो.

२) पूर्वीच्या काव्यातील अर्थात् काही किरकोळ बदल केल्यामुळे जर दुसरे काव्य थोडे निराळे भासू लागले, तर त्या दुसऱ्या काव्याला विद्वान् लोक 'आलेख्यप्रख्य' असे म्हणतात.

ज्या दोन काव्यांतील विषय वस्तुतः विषय वेगळे असूनही कमालीचे साम्य' असल्यामुळे ती काव्ये अभिन्न वाटतात, त्या काव्यांना **'तुल्यदेहिवत्** म्हणतात.

पण या प्रकारांची राजशेखराने दिलेली उदाहरणे पाहिली, तर त्यात त्याने फक्त वाच्यार्थांचाच विचार केलेला दिसतो. व्यंग्यार्थाबद्दल तो अवाक्षरही काढीत नाही. उलट त्याची शेवटच्या म्हणजे **तुल्यदेहिवत्** प्रकाराची उदाहरणे पाहिली, तर त्यात वाच्यार्थ वेगवेगळे असून जो व्यंग्यार्थ आहे, तो मात्र एकच असल्यासारखा आहे.

पण राजशेखराच्या आधी आनंदवर्धनांनी निर्देशिलेल्या या तीन प्रकारांची कल्पना आनंदवर्धनांच्या मनात निराळी असावी असे वाटते. चवथ्या उद्द्योतात जो विषय मुख्यत्वाने चर्चिला आहे तो म्हणजे पूर्वी येऊन गेलेल्या विषयालाच जर नव्या व्यंग्यार्थाची जोड दिली गेली तर ते दुसरे काव्य नव्यासारखे वाटू लागते हा होय. तेव्हा आनंदवर्धनांच्या मते या तीन प्रकारांचे स्वरूप असे असावेसे

वाटते—दोन काव्यांत वाच्यार्थ एकच आहे. व्यंग्यार्थ एकतर नाही, किंवा असला तरी तोच आहे, फक्त वाक्ये म्हणजे शब्द भिन्न आहेत; तर तो 'प्रतिबिंबतुल्य' साम्याचा प्रकार. दोन काव्यात शब्द व वाक्ये वेगळी, वाच्यार्थाच्या अंशात थोडासा बदल व व्यंग्यार्थ नाही किंवा असला तरी तोच असेल, तर ते दुसरे काव्य 'आलेख्यप्रख्य' होय आणि तिसरा 'तुल्यदेहिवत्' प्रकार मात्र असा की, पहिल्या काव्यात व्यंग्यार्थ नसला तरी दुसऱ्या काव्यात मूळच्याच किंवा मूळच्यासारख्याच वाच्यार्थाला व्यंग्यार्थाची जोड दिली आहे. किंवा पहिल्या काव्यात व्यंग्यार्थ असला तरी दुसऱ्या काव्यात व्यंग्यार्थाचा आविष्कार निराळ्या, सुन्दर स्वरूपात झालेला आहे. दोन काव्यातील वाच्यार्थ सारखे वाटले तरी व्यंग्यार्थ वेगवेगळे किंवा दुसऱ्या काव्यात व्यंग्यार्थ काहीसा पहिल्यासारखाच असला, तरी तो नव्या सौन्दर्याने नटलेला वाटतो, तो तुल्यदेहिवत् प्रकार समजावा.

मात्र आनंदवर्धन वरील तीन प्रकारांपैकी पहिले दोन प्रकार त्याज्य मानतात तर राजशेखर फक्त पहिलाच (प्रतिबिंबतुल्य) प्रकार त्याज्य मानून बाकीचे ग्राह्य समजतो.

राजशेखराच्या नंतर होऊन गेलेल्या साहित्यशास्त्रकारांपैकी भोजाच्या (अकरावे शतक, पूर्वार्ध) 'सरस्वतीकंठाभरण' व 'शृंगारप्रकाश' या ग्रंथांमध्ये **'पठिति'** या शब्दालंकाराचे विवेचन करताना एखाद्या पदाच्या प्रकृत्यंशामध्ये किंवा प्रत्ययांशामध्ये बदल केल्यामुळे किंवा एखाद्या श्लोकाचा एक चरण, दोन चरण किंवा तीन चरण बदलल्यामुळे मूळ श्लोकातील अर्थामध्ये कसा बदल होतो हे दाखवताना 'पठिती'चे काही प्रकार सांगून त्यांची उदाहरणे दिली आहेत. त्यांपैकी काही उदाहरणे राजशेखराने 'अर्थहरणा'च्या संदर्भात दिली आहेत. पण भोज त्यांना अर्थहरणाची उदाहरणे न मानता 'पठिति' या शब्दालंकाराची उदाहरणे मानितो.

बाराव्या शतकात होऊन गेलेल्या 'हेमचन्द्रा'ने 'काव्यानुशासन' ग्रंथामध्ये व त्यावरील 'विवेक' नामक स्वतःच लिहिलेल्या टीकेमध्ये 'कविशिक्षा' या विषयाच्या संदर्भात छायोपजीवन, पदोपजीवन, पादोपजीवन, पादैकदेशोपजीवन या अर्थहरणाच्या प्रकारांचे विवेचन करिताना आनंदवर्धनांनी व राजशेखराने 'निर्देशिलेल्या प्रतिबिंब, आलेख्य, तुल्यदेही (व राजशेखराने सांगितलेल्या परपुरप्रवेश) या प्रकारांची उदाहरणे राजशेखराच्या नावाचा निर्देश न करिता राजशेखराच्या 'काव्यमीमांसे' मधूनच घेतलेली आहेत. हेमचन्द्राने सांगितलेल्या छायोपजीवन इ. अर्थहरणाच्या प्रकारांपैकी काही प्रकारांचा निर्देश क्षेमेन्द्राने कविकण्ठाभरण, संधि २ मध्ये केला आहे.

६) म्हणजे हे म्हणणे आम्ही प्रमाणाशिवाय निमूटपणे स्वीकारावयाचे काय?

७) वास्तविक ध्वन्यालोकाच्या सर्व आवृत्त्यांमध्ये १२ वी कारिका तिचे भाग न पाडता सलग छापलेली असून त्यानंतर तिच्यावरील वृत्तीही सलग छापलेली आहे, पण अभिनवगुप्तांच्या म्हणण्यावरून **संवादो ह्यन्यसादृश्यं** हा कारिकेचा पहिला भाग असावा व **संवादो हि...सादृश्यम् ।** ही वृत्ति त्यानंतर लगेच लिहिलेली असावी. **तत्पुनः प्रतिबिंबवत्** पासून शेवटपर्यंतचा कारिकेचा दुसरा भाग असावा व त्यानंतर लगेच त्यावरील **तत्पुनः शरीरिणा ... सदृशम्** ही वृत्ति लिहिलेली असावी. म्हणून आम्ही ध्वन्यालोकाची संहिता छापताना कारिकेचे व वृत्तीचे तसेच भाग पाडून अनुवादही तसाच छापला आहे.

८) द्वितीय खंड, "उद्‌द्योत – ४ 'बुद्धिमान लोकांच्या विचारात साम्य (संवाद), म्हणून अनेक कवींच्या काव्यातही साम्य आढळते. त्या साम्याचे तीन प्रकार. त्यातला तिसरा प्रकार कवीने केव्हाही त्याज्य समजू नये.'" वरील चौथी टीप पाहा. या १३ व्या कारिकेचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग पाडता येतील. त्यांना अनुसरून **तत्र पूर्व .....त्यक्तव्यम् ।** येथपर्यंतचा वृत्तीचा भाग कारिकेच्या पूर्वार्धानंतर लिहिलेला असावा व **तृतीयं तु .....**शक्यते वक्तुम् येथपर्यंतचा भाग कारिकेच्या उत्तरार्धानंतर लिहिलेला असावा.

९) तसेच नंतरच्या कवीने रचलेले काव्य ज्या रूपात भासमान होते, त्या रूपात ते काव्य म्हणजे पूर्वीच्या कवीने रचलेले काव्यच होय.

१०) म्हणजे प्रतिबिंबामध्ये बिंबाहून अपूर्व असे काहीही नसते.

११) म्हणजे बिंब व प्रतिबिंब यासारख्या प्रकाराचे.

१२) म्हणजे मूळ वस्तु व तिचे चित्र यासारख्या प्रकाराचे.

१३) चौदाव्या कारिकेचे भाग ज्या प्रतींत पाडलेले असतील, त्या प्रतींत ते भाग असे पाडलेले असावेत– १) **आत्मनोऽन्यस्य..... पासून वस्तु भातितरा** पर्यंत व २) **तन्व्या :** पासून **आननम्** पर्यंत.

१४) तुलनार्थ पाहा, प्रथम खंड, "उद्‌द्योत - १ 'ध्वनीबद्दलच्या आनंदवर्धनकालीन मतभेदांचा निर्देश'" वरील 'आत्मा या शब्दाचा' इ. वाक्य.

१५) वृत्तीमध्ये समुदायरूपाणां **वाक्यार्थानाम्** असा पाठ आहे, पण अभिनवगुप्तांनी लोचनात **वाक्यार्थसरूपाणां समुदायानाम्** असा पाठ अनुसरला आहे असे दिसते. मात्र दोन्ही पाठांत अर्थाच्या दृष्टीने विशेष फरक नाही.

१६) विशेषण व विशेष्य यांचा अन्वय अभेदाने होतो. उदा. **ससंवाद** हे विशेषण व **वाक्यार्थ** हे विशेष्य यांमध्ये अभेदसंबंध आहे. पण **वाक्यार्थानां संवादाः** असे म्हटल्यास त्या दोहोंमध्ये विशेषण–विशेष्य संबंध राहात नाही. वाक्याथ हे आश्रय व संवाद हे आश्रयी असे होऊन त्यांमध्ये वैयधिकरण्य म्हणज भेदान्वय असतो.

ध्वन्यालोकः

पदार्थरूपाणां च वस्त्वन्तरसदृशानां काव्यवस्तूनां नास्त्येव दोष इति प्रतिपादयितुमुच्यते–

अक्षरादिरचनेव योज्यते यत्र वस्तुरचना पुरातनी ।
नूतने स्फुरति काव्यवस्तुनि व्यक्तमेव खलु सा न दुष्यति ॥ १५ ॥

नहि वाचस्पतिनाप्यक्षराणि पदानि वा कानिचिदपूर्वाणि घटयितुं शक्यन्ते । तानि तु तान्येवोपनिबद्धानि न काव्यादिषु न वतां विरुध्यन्ति । तथैव पदार्थरूपाणि श्लेषादिमयान्यर्थतत्त्वानि । तस्मात्

यदपि तदपि रम्यं यत्र लोकस्य किंचित् ।
स्फुरितमिदमितीयं बुद्धिरभ्युज्झिहीते ।
स्फुरणेयं काचिदिति सहृदयानां चमत्कृतिरुत्पद्यते ।
अनुगतमपि पूर्वच्छायया वस्तु तादृक्-
सुकाविरुपनिबध्नन्निन्द्यतां नोपयाति ॥ १६ ॥

तदनुगतमपि पूर्वच्छायया वस्तु तादृक् तादृक्षं सुकविर्विवक्षितव्यङ्ग्यवाच्यार्थसमर्पणसमर्थशब्दरचनारूपया बन्धच्छाययोपनिबध्नन्निन्द्यतां नैव याति ।

ध्वन्यालोक

केवळ काही सुट्या पदांचे अर्थ अन्य कृतीतील सुट्या पदांच्या अर्थासारखे असणारी काव्यकृति करण्यामध्ये पुनरुक्तीचा (म्हणजे अनुकरणाचा) दोष नाहीच हे प्रतिपादन करण्यासाठी सांगण्यात येत आहे की—

पूर्वीच्या काव्यातील अक्षरांचा किंवा अक्षरसमूहांचा वापर नंतरच्या काव्यामध्ये करणे हे जसे दोषास्पद नाही, तसेच पूर्वीच्या काव्यातील सुट्या शब्दांच्या अर्थांचा उपयोग नंतरच्या काव्यामध्ये त्यांच्या व्यंग्य आशयामध्ये जर नवी चमक उत्पन्न होईल अशा रीतीने केला असेल, तर त्यामध्ये कोणताही (अनुकरणाचा) दोष नाही, हे उघडच आहे ॥ १५ ॥

कारण बृहस्पतीलादेखील पूर्वी कधीच न वापरलेली अक्षरे किंवा शब्द बनविणे शक्य नाही. पण ती अक्षरे (किंवा ते शब्द) जरी कवींनी काव्यनाटकामध्ये पुन्हा पुन्हा वापरली, तरी त्यामुळे काव्याच्या नवतेला मुळीच बाध येत नाही. तीच गोष्ट पूर्वीच्या कवींनी वापरलेले पदांचे अर्थ व श्लेष, उपमा इ. अर्थतत्त्वे [१] (म्हणजे रमणीयार्थबोधक साधने) यांच्या योजनेबाबतही आहे. म्हणून—

कोणतेही काव्य (मग त्याचा विषय पूर्वी वर्णिलेला असो वा नसो, ते) रम्यच होय, की ज्या काव्याच्या विषयाचे बाबतीत यात काहीतरी प्रतिभेचे अपूर्व स्फुरण (म्हणजे चमक) आहे असा सहृदयांच्या मनाचा निश्चय होतो.

'यात काहीतरी उत्स्फूर्त आहे' असे वाटून सहृदयांच्या मनात अलौकिक आनंद [२] उत्पन्न होतो. काव्यकृतीतील त्या प्रकारचा विषय जरी पूर्वीच्या काव्यातील विषयासारखा असला, तरी ती काव्यकृति निर्माण करणाऱ्या थोर कवीच्या पदरी निंदा येत नाही. ॥ १६ ॥

श्रेष्ठ कवीने आपल्याला अभिप्रेत अशा व्यंग्य व वाच्य अर्थाचा बोध करून देण्याचे सामर्थ्य असलेल्या शब्दांच्या योजनेने युक्त अशा रचनासौंदर्याचा अवलंब केला, तर त्यांच्या कृतीचा विषय पूर्वीच्या कवींच्या कृतींतील विषयासारखा असला, तरी त्यात त्याला बिलकुल कमीपणा येत नाही.

लोचनम्

वस्तुशब्देन एको वा द्वौ वा त्रयो वा चतुरादयो वा पदानामर्थाः । तानि त्विति । अक्षराणि च पदानि च । तान्येवेति । तेनैव रूपेण युक्तानि मनागप्यन्यरूपतामनागतानीत्यर्थः । एवमक्षरादिरचनेवेति दृष्टान्तभागं व्याख्याय दार्ष्टान्तके योजयति—तथैवे ति । श्लेषादिमयानीति । श्लेषादिस्वभावानीत्यर्थः । सद्वृत्ततेजस्विगुणद्विजादयो हि शब्दाः पूर्वपूर्वैरपि कविसहस्रैः श्लेषच्छायया निबध्यन्ते, निबद्धाश्चन्द्रादयश्चोपमानत्वेन । तथैव पदार्थरूपाणीत्यत्र नापूर्वाणि घटयितुं शक्यन्ते इत्यादि विरुध्यन्तीत्येवमन्तं प्राक्तनं वा क्यमभिसन्धानीयम् ॥ १५ ॥

लोकस्येति व्याचष्टे—सहृदयानामिति । चमत्कृतिरिति । आस्वादप्रधाना बुद्धिरित्यर्थः । 'अभ्युज्झिहीते' इति व्याचष्टे—उत्पद्यत इति । उदेतीत्यर्थः । बुद्धेरेवाकारं दर्शयति—स्फुरणेयं काचिदिति ।

यदपि तदपि रम्यं यत्र लोकस्य किञ्चि—
त्स्फुरितमिदमितीयं बुद्धिरभ्युज्झिहीते ।

अनुगतमपि पूर्वच्छायया वस्तु तादृ—
क्सुकविरुपनिबध्नन्निन्द्यतां नोपयाति ॥
इति कारिका खण्डीकृत्य पठिता ॥ १६ ॥

लोचन

(कारिका १५ मधील दुसऱ्या चरणातील) 'वस्तु' या शब्दाने एक, दोन, तीन किंवा चार किंवा अधिक सुट्या पदांच्या अर्थांचा बोध होतो. 'ती' म्हणजे अक्षरे आणि पदे. तीच तीच— त्या स्वरूपाने युक्त असलेली व ज्यांचे स्वरूप थोडेही बदलले नाही अशी, असा अर्थ. याप्रमाणे 'पूर्वीच्या काव्यातील अक्षरांचा' इ. दृष्टान्तस्वरूपी भागाचे विवरण केल्यावर त्याचा प्रस्तुत विषयाशीं संबंध वृत्तिकार 'तसेच पूर्वीच्या काव्यातील' इ. शब्दांनी जोडून दाखवितात. 'श्लेष, उपमा इ. ····· असलेल्या'····· श्लेष वगैरे स्वरूपे असलेल्या, असा अर्थ. कारण सद्वृत्त, [३] 'तेजस्वी, [४] गुण, [५] द्विज [६] इ, शब्द पूर्वीच्या हजारो कवींनी सुद्धा दोन दोन अर्थानी वापरले आहेत. व त्याचप्रमाणे त्यांनी चन्द्र वगैरे शब्दांचा उपमाने म्हणून उपयोग केला आहे. 'तीच गोष्ट पूर्वीच्या इ.' — या ठिकाणी 'पूर्वी कधीच न वापरलेले शब्द किंवा' येथपासून 'नवतेला मुळीच बाध येत नाही' येथपर्यंतचे आधीचे वाक्य जोडून वाक्य पुरे करावे ॥ १५ ॥

'लोकांच्या' याचे व्याख्यान वृत्तिकार 'सहृदयांच्या' या शब्दाने करितात. 'अलौकिक आनंद' याचा अर्थ 'मुख्यत्वेकरून आस्वादरूपी असलेली प्रतीतिः' **अभ्युज्झिहीते** (निश्चय होतो) याचे व्याख्यान वृत्तिकार **उत्पद्यते** 'उत्पन्न होतो' या शब्दांनी करितात. त्याचा अर्थ 'उदित होतो [७]' असा समजावा. सहृदयांच्या निश्चयाचे स्वरूप कोणते असते हे वृत्तिकार 'यात काहींतरी उत्स्फूर्त आहे,' या शब्दांनी सांगतात.

यदपि तदपि ·····निन्द्यतां नोपयाति ॥ ही कारिका (ग्रंथात) तिचे विभाग पाडून दिली आहे ॥ १६ ॥

टीपा

१) श्लेष, उपमा इत्यादिकांना 'अर्थतत्त्वे' म्हणण्याचे कारण ती कविमनातील विचार सुन्दरपणे प्रकट करण्याची साधने असतात, हे होय.

२) हा वृत्तीतील 'चमत्कृति' शब्दाचा अनुवाद आहे. 'चमत्कृती हा शब्द' काव्यापासून होणारा सविस्मय आनंद या अर्थोंने येथेव प्रथम वापरलेला दिसतो. यापूर्वीच्या काव्यशास्त्राविषयक ग्रंथात हा शब्द या अर्थोंने कोठेही वापरलेला दिसत नाही. आनंदवर्धनानंतर मात्र अभिनवगुप्तांनी व इतर काव्यशास्त्रकारांनी या शब्दाचा विपुलप्रमाणात वापर केला आहे. चम् = चाखणे, आस्वाद घेणे यावरून चमत्कार = मिटक्या मारीत आस्वाद घेणे असे अभिनवांनी अभिनवभारतीत सांगितले आहे. (चमचः करणम् चमत्कारः) माघाच्या शिशुपालवधात ४—१७ येथे सुंदर वस्तूच्या दर्शनाने सविस्मय आनंद वाटतो असे म्हटले आहे.

३) 'सद्वृत्त' याचा एक अर्थ 'सद्वर्तनी' आणि दुसरा अर्थ 'सर्वबाजूंनी गोल असणारा.'

४) तेजस्वी = १) प्रकाशमान आणि २) मानी, वीरवृत्तीचा.

५) गुण = १) गुणधर्म आणि २) दोरा.

६) द्विज = १) ब्राह्मण किंवा त्रैवर्णिक आणि २) पक्षी, ३) चंद्र, ४) दात.

७) वृत्तीतील उत्पद्यते याचा अर्थ वभिनवगुप्तांनी 'उदित होते.' असा करण्याचे कारण त्यांच्या मते रस हा 'उत्पन्न होणार' नसून 'अभिव्यक्त होणारा' असतो.

ध्वन्यालोक

तदित्थं स्थितम्—
प्रतायन्तां वाचो निमितविविधार्थामृतरसा
न सादः कर्तव्यः कविभिरनवद्ये स्वविषये ।

सन्ति नवाः काव्यार्थाः, परोपनिबद्धार्थविरचने न कश्चित्कवे गुण इति भावयित्वा ।

परस्वादानेच्छविरनमनसो वस्तु सुकवेः
सरस्वत्येवैषा घटयति यथेष्टं भगवती ॥ १७ ॥

परस्वादानेच्छाविरतमनसः सुकवेः सरस्वत्येवैषा भगवती यथेष्टं घटयति वस्तु । येषां सुकवीनां प्राक्तनपुण्याभ्यासपरिपाकवशेन प्रवृत्ति स्तेषां परोपरचितार्थपरिग्रहनिःस्पृहाणां स्वव्यापारो न क्वचिदुपयुज्यते । सैव भगवती सरस्वती स्वयमभिमतमर्थमाविर्भावयति । एतदेव हि महाकवित्वं महाकवीनामित्योम् ।

इत्यक्लिष्टरसाश्रयोचितगुणालंकारशोभाभृतो
यस्माद्वस्तु समीहितं सुकृतिभिः सर्वं समासाद्यते ।
काव्याख्येऽखिलसौख्यधाम्नि विबुधोद्याने ध्वनिर्दर्शितः
सोऽयं कल्पतरूपमानमहिमा भोग्योऽस्तु भव्यात्मनाम् ।
सत्काव्यतत्त्वनयवर्त्मचिरप्रसुप्त–
कल्पं मनःसु परिपक्वधियां यदासीत् ।
तद्व्याकरोत्सहृदयोदयलाभहेतो–
रानन्दवर्धन इति प्रथिताभिधानः ॥

इति श्रीराजानकानन्दवर्धनाचार्यविरचिते ध्वन्यालोके चतुर्थ उद्द्योतः ।

समाप्तोऽयं ग्रन्थः ।

ध्वन्यालोक

तेव्हा या सर्वांचा निष्कर्ष असा–

नानाविध (वाच्य व व्यंग्य) अर्थांच्या अमृताच्या माधुरीने निर्भर अशा कविवाणीचा प्रवाह एकसारखा पुढे पुढे वाहात राहो. कवीने आपल्याला निर्दोष, नवीन विषय कसे स्फुरतील याबाबत निराश होऊ नये.

नवीन काव्यविषयांची वाण नाही व दुसऱ्याने वर्णिलेल्या विषयांवर काव्य रचण्यामध्ये कवीची काही कर्तबगारी नाही असा विश्वास बाळगून– दुसऱ्यांनी वर्णिलेले विषय आपण घ्यावे या इच्छेपासून पराङ्मुख असलेल्या महाकवीला साक्षात् सरस्वतीदेवीच त्याच्या इच्छेनुसार नित्यनवीन विषय पुरविते [१] ॥ १७ ॥

दुसऱ्यांनी वर्णिलेले विषय आपण घ्यावे ही इच्छा ज्यांच्या मनात नसते अशा महाकवींच्या पुढे ही भगवती सरस्वतीच त्यांना इष्ट ते नित्यनवीन विषय आणून उभे करिते. जे महाकवि पूर्वजन्मी वारंवार केलेल्या पुण्यकर्मांचा परिणाम म्हणून काव्य करावयास उद्युक्त होतात आणि ज्यांना दुसऱ्यांनी हाताळलेले विषय आपण वर्णावयास घ्यावे अशी इच्छा नसते त्यांना खास स्वतःची अशी काही धडपड करावी लागत नाही. तीच पूज्य सरस्वतीदेवी स्वतः त्यांना इष्ट असे विषय त्यांच्या मनश्चक्षूंपुढे उभे करिते. आणि हेच महाकवींच्या मोठेपणाचे रहस्य आहे. **ओम्.** [२]

रसांचे पोषण करण्यास योग्य असलेल्या आणि विनासायास साधल्या जाणाऱ्या गुण आणि अलंकार यांच्या सौंदर्याने जे नटलेले असते आणि ज्यापासून पुण्यवान रसिकांच्या काव्यविषयक सर्व अपेक्षा पूर्ण होतात, त्या निर्भेळ सौख्याचे निधान असलेल्या, काव्यनामक नंदनवनतुल्य उद्यानातील 'ध्वनि' आम्ही या ग्रंथात सहृदयांना विशद करून दाखविला. कल्पतरूप्रमाणे महान शक्ति अमलेल्या त्या ह्या ध्वनीचा आस्वाद भाग्यवान सहृदय घेत राहोत.

उत्कृष्ट काव्याच्या सारसर्वस्वाचे ज्ञान करून देणारा जो मार्ग आजपर्यंतच्या परिणतप्रज्ञ शास्त्रकारांच्या मनात दीर्घकाळपर्यंत झोपी गेल्यासारखा होता, [३] त्या मार्गाचे सहृदयांना ज्ञान व्हावे (किंवा

सहृदयांना तो मार्ग दिसल्यामुळे आनंद व्हावा) या हेतूने, 'आनंदवर्धन' हे प्रसिद्ध नाव धारण करणाऱ्या मी (त्या मार्गाचे) स्पष्टपणे विवरण केले.

अशा रीतीने श्री राजानक आनंदवर्धनाचार्यांनी रचलेल्या 'ध्वन्यालोका'तील चवथा उद्‌द्योत समाप्त झाला.

हा ग्रन्थ समाप्त झाला.

लोचनम्

स्वविषय इति । स्वयं तात्कालिकत्वेनास्फुरित इत्यर्थः । परस्वादानेच्छेत्यादिद्वितीयं श्लोकार्धं पूर्वोपस्कारेण सह पठति । परस्वादानेच्छाविरतमनसो वस्तु सुकवेरिति त्तीयः पादः । कुतः खल्वपूर्वमानयामीत्याशयेन निरुद्योगः परोपनिबद्धवस्तूपजीवको वा स्यादित्याशङ्क्याह— सरस्वत्येवेति । कारिकायां सुकवेरिति जातावेकवचनमित्यभिप्रायेण व्याचष्टे— सुकवीनामिति । एतदेव स्पष्टयतिः ।— प्राक्तनेत्यादिना तेषामित्यन्तेन । आविर्भावयतीति । नूतनमेव सृजतीत्यर्थः ॥ १७ ॥

इतीति । कारिकातद्‌वृत्तिनिरूपणप्रकारेणेत्यर्थः । अक्लिष्टा रसाश्रयेण उचिता ये गुणालङ्कारास्ततो या शोभा तां बिभर्ति काव्यम् । उद्यानमप्यक्लिष्टः कालोचितो यो रसः सेकादिकृतः तदाश्रयस्तत्कृतो यो गुणानां सौकुमार्यच्छायावत्त्वसौगन्ध्यप्रभृतीनामलङ्कारः पर्याप्ताकरणं तेन च या शोभा तां बिभर्ति । यस्मादिति काव्याख्यादुद्यानात् । सर्व समीहितमिति । व्युत्पत्तिकीर्तिप्रीतिलक्षणमित्यर्थः । एतच्च सर्व पूर्वमेव वितत्योक्तमिति श्लोकार्थमात्रं व्याख्यातम् । सुकृतिभिरिति । ये कष्टोपदेशेनापि विना तथाविधफलभाजः, तैरित्यर्थः । अखिलसौख्यधाम्नीति । अखिलं दुःखलेशेनाप्याननुविद्धं यत्सौख्यं तस्य धाम्नि एकायतन इत्यर्थः । सर्वथा प्रियं सर्वथा च हितं दुर्लभं जगतीति भावः । विबुधोद्यानं नन्दनम् । सुकृतिनां कृतज्योतिष्टोमादीनामेव समीहितासादननिमित्तम् । विबुधाश्च काव्यतत्त्वविदः । दर्शित इति । स्थित एव सन् प्रकाशितः, अप्रकाशितस्य हि कथं भोग्यत्वम् । कल्पतरुणा उपमानं यस्य तादृङ्महिमा यस्येति बहुव्रीहिगर्भो बहुव्रीहिः ।

सर्वसमीहितप्राप्तिर्हि काव्ये तदेकायत्ता ।
एतद्योक्तं विस्तरतः ॥
सत्काव्यतत्त्वनयवर्त्म चिरप्रसुप्त—
कल्पं मनस्सु परिपक्वधियां यदासीत् ।
तद्‌व्याकरोत्सहृदयोदयलाभहेतोः

इति सम्बन्धाभिधेयप्रयोजनोपसंहारः । इह बाहुल्येन लोको लोकप्रसिद्‌ध्या सम्भावनाप्रत्ययबलेन प्रवर्तते । स च सम्भावनाप्रत्ययो नामश्रवणवशात्प्रसिद्धान्यतदीयसमाचारकवित्वविद्वत्तादिसमनुस्मरणेन भवति । तथाहि— भर्तृहरिणेदं कृतम्, यस्यायमौदार्यमहिमा; यस्यास्मिञ्छास्त्रे एवंविधस्सारो दृश्यते तस्यायं श्लोकप्रबन्धः; तस्मादादरणीयमेतदिति । लोकः प्रवर्तमानो दृश्यते । लोकश्चावश्यं प्रवर्तनीयः तच्छास्त्रोदितप्रयोजनसम्पत्तये । तदनुग्राह्यश्रोतृजनप्रवर्तनाङ्गत्वाद् ग्रन्थकाराः स्वनामनिबन्धनं कुर्वन्ति, तदभिप्रायेणाह्— आनन्दवर्धन इति । प्रथितशब्देनैतदेव प्रथितम् । यत्तु तदेव नामश्रवणं केषाञ्चिन्निवृत्तिं

करोति, तन्मात्सर्यविजृम्भितं नात्र गणनीयम् । निःश्रेयसप्रयोजनादेव हि श्रुतात्कोऽपि रागान्धो यदि निवर्तते किमेतावता प्रयोजनमप्रयोजनमप्यवश्यं वक्तव्यमेव स्यात् । तस्मादर्थिनां प्रवृत्त्यङ्गं नाम प्रसिद्धम् ।

स्फुटीकृतार्थवैचित्र्यबहिःप्रसरदायिनीम् ।
तुर्यां शक्तिमहं वन्दे प्रत्यक्षार्थनिदर्शिनीम् ॥
आनन्दवर्धनविवेकविकासिकाव्यालोकार्थतत्त्वघटनादनुमेयसारम् ।
यत्प्रोन्मिषत्सकलसद्विषयप्रकाशि व्यापार्यताभिनवगुप्तविलोचनं
तत् ॥

श्रीसिद्धिचेलचरणाब्जपरागपूतभट्टेन्दुराजमतिसंस्कृतबुद्धिलेशः ।
वाक्यप्रमाणपदवेदिगुरुः प्रबन्धसेवारसो व्यरचयद्ध्वनिवस्तुवृत्तिम् ॥

सज्ञनान् कविरसौ न याचते ह्लादनाय शशभृत्किमर्थितः ।
नैव निन्दति खलान्भुहुर्मुहुर्धिक्कृतोऽपि न हि शीतलोऽनलः ॥

वस्तुतश्शिवमये ह्रदि स्फुटं सर्वतश्शिवमयं विराजते ।
नाशिवं क्वचन कस्यचिद्वचस्तेन वश्शिवमयी दशा भवेत् ॥

इति महामाहेश्वराभिनवगुप्तविरचिते काव्यालोकलोचने चतुर्थ
उद्द्योतः ।

समाप्तश्चायं ग्रन्थः ।

लोचन

'आपल्याला नवीन विषय कसे स्फुरतील—' कवीला जे आपण होऊन ताबडतोब स्फुरावेत, अशा [४] विषयांच्या बाबतीत, असा अर्थ. 'दुसऱ्यांनी वर्णिलेले विषय आपण घ्यावे या इच्छेपासून' इ. शब्दांनी प्रारंभ झालेला १७ व्या कारिकेचा उत्तरार्ध वृत्तिकार 'नवीन काव्यविषयांची वाण नाही' इ. प्रस्ताव करून त्यासह लिहितात. **परस्वादानेच्छाविरतमनसो वस्तु सुकवेः** हा कारिकेचा तिसरा चरण आहे. 'खरेच, मी कोठून (नवा विषय) आणू?' या चिंतेने कवि मुळीच प्रयत्न न करिता स्वस्थ बसेल किंवा दुसऱ्या कवीने वर्णिलेला विषय घेऊन त्यावरच निर्वाह करील, अशी शंका कल्पून कारिकाकार 'साक्षात् सरस्वतीदेवीच' इ. शब्दांनी तिचे समाधान करितात. कारिकेमधील 'महाकवीला' हे एकवचन जातिवाचक आहे हे लक्षात घेऊन वृत्तिकार त्याचे व्याख्यान 'महाकवींच्या (पुढे)' या बहुवचनाने करितात. याचेच स्पष्टीकरण वृत्तिकार 'पूर्वजन्मी वारंवार केलेल्या'····· येथपासून त्यांना धडपड करावी लागत नाही' येथपर्यंतच्या वाक्याने करितात. 'मनश्चक्षूं पुढे उभे करिते—' नवीनच विषय निर्माण करिते (व त्यांच्यापुढे उभे करिते), असा अर्थ. ॥ १७ ॥

'अशा रीतीने' — ··· म्हणजे कारिका व त्यांच्यावरील वृत्तीमध्ये केलेल्या निरूपणाच्या योगाने, असा अर्थ. 'अक्लिष्ट म्हणजे विनासायास साधले जाणारे आणि रसांचे पोषण करण्याच्या दृष्टीने उचित असलेले

जे गुण आणि अलंकार, त्यांमुळे जे सौंदर्य, ते धारण करणारे काव्य.' उद्यानसुद्धा अक्लिष्ट म्हणजे त्या त्या ऋतूस अनुरूप असे जे पाणी सिंचन वगैरे करून पुरविले जाते, त्याच्या आश्रयामुळे म्हणजे त्या पाण्यामुळे प्राप्त झालेल्या सुकुमारता, तजेलदारपणा, सुगंधीपणा वगैरे गुणांचा जो 'अलं' कार म्हणजे परिपूर्णता मिळवून देणे, त्यामूळे प्राप्त होणारी शोभा धारण करिते. 'ज्यापासून' म्हणजे 'काव्य' नामक उद्यानापासून. 'काव्यविषयक सर्व अपेक्षा' म्हणजे व्युत्पत्ति [५], कीर्ति व आनंद या स्वरूपाच्या अपेक्षा, असा अर्थ. हे सर्व [६] पूर्वीच [७] सविस्तरपणे सांगितले आहे म्हणून येथे (म्हणजे लोचनात) आम्ही या श्लोकाचा नुसता अर्थच सांगितला आहे. 'पुण्यवान' – म्हणजे कोणीही दुष्कर असा उपदेश केला नसताही ज्यांना त्या प्रकारची (म्हणजे व्युत्पत्ति इ.) फळे मिळतात, ते, असा अर्थ. 'निर्भेळ सौख्याचे निधान' अखिल म्हणजे दुःखाच्या लवलेशाचाही ज्याला स्पर्श झाला नाही असे जे सौख्य, त्याचे निधान म्हणजे एकमेव आगर असलेल्या, असा आशय. संपूर्णपणे सुखकर आणि संपूर्णपणे कल्याणकारक अशी गोष्ट या जगात दुर्मिळ असते, [८] असा भावार्थ. 'विबुधोद्यान' म्हणजे (देवांचे) नंदनवन. 'पुण्यवंतांच्या' म्हणजे ज्यांनी ज्योतिष्टोम इ. यज्ञ केले आहेत, अशांच्याच अपेक्षापूर्तीचे नंदनवन हे कारण असते. 'विबुध' याचा दुसरा (म्हणजे काव्याच्या संदर्भातील) अर्थ 'काव्याचे मर्म जाणणारे.' 'दाखविला' म्हणजे असलेलाच [९] प्रकट केला. कारण जो प्रकट केला गेला नाही, त्याचा आस्वाद (रसिकांना) कसा घेता येणार? 'कल्पवृक्षाची उपमा ज्याला द्यावी अशी थोरवी आहे ज्याची' असा हा बहुव्रीहि समासाने युक्त असलेला बहुव्रीहि समास [१०] आहे. कारण काव्यापासून (व्युत्पत्ति इ. सर्व ईप्सिते पूर्ण होणे हे ध्वनीमुळेच शक्य आहे. आणि हे या ग्रंथात (जागोजाग) सविस्तरपणे सांगितले आहे. **सत्काव्यतत्त्वनयवर्त्म** ··· **सहृदयोदयलाभहेतोः** या तीन चरणांमध्ये या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषयाशी संबंध, प्रतिपाद्य विषय आणि प्रयोजन [११] या तीन अनुबन्धांचा [१२] समारोपादाखल पुनर्निदेश [१३] केला आहे. या जगात व्यक्तींना त्यांच्या कर्तबगारीबद्दल मिळालेल्या प्रसिद्धीमुळे त्यांच्याबद्दल आदर व विश्वास उत्पन्न झाल्यानेच लोक त्यांच्यासारखी कर्तबगारी करावयास प्रवृत्त होत असतात. [१४] आणि तो आदर व विश्वास त्या व्यक्तीचे नाव ऐकल्याने तिच्या प्रसिद्ध असलेल्या दुसऱ्या म्हणजे आचरण, काव्य, विद्वत्ता वगैरे गोष्टींची आठवण झाल्यामुळे उत्पन्न होतो. उदा. ज्याचे औदार्य इतके मोठे आहे, त्या भर्तृहरीने हे केले. [१५] ज्या भर्तृहरीचे या शास्त्रावर इतके प्रभुत्व आहे, त्याने हा श्लोकमय ग्रंथ [१६] रचला आहे, म्हणून त्याच्या कृतींचे आदरपूर्वक वाचन केले पाहिजे, या विचारसरणीने लोक त्याच्या कृतीचे वाचन करण्यास प्रवृत्त होताना दिसतात. आणि त्या त्या शास्त्रात जे प्रयोजन सांगितले असेल, ते साध्य करण्यासाठी लोकांना प्रवृत्त तर अवश्य करावे लागते. त्या शास्त्राच्या अध्ययनाने ज्यांना फायदा व्हावयाचा, त्या श्रोत्यांना त्या विषयाच्या अध्ययनाला प्रवृत्त करण्याचे साधन म्हणून ग्रंथकार ग्रंथांमध्ये आपल्या नावाचा उल्लेख करितात, या अभिप्रायाने (वृत्तिकार) 'आनंदवर्धन हे (प्रसिद्ध नाव)' असा निर्देश करितात, 'प्रसिद्ध या शब्दाने हाच आशय प्रकट केला आहे. आता ग्रंथकाराने निर्देशिलेले स्वतःचे नाव कानी पडल्यावर काही लोकांना तो ग्रंथ वाचण्यापासून परावृत्त व्हावेसे वाटते, तो केवळ त्यांना वाटणाऱ्या मत्सराचा परिणाम असतो. म्हणून त्या गोष्टीचा या ठिकाणी विचार मनात आणण्याचे कारण नाही. कारण निःश्रयस (म्हणजे मोक्ष) हे प्रयोजन असलेल्या वेदादि शास्त्रांचे नाव ऐकताच एखाद्या विकारी मनुष्याला जर तो ग्रंथ वाचणे नको असे वाटले, तर तेवढ्यामुळे प्रयोजन हे (प्रयोजन असूनसुद्धा) अभिलषणीय प्रयोजन नाही असे म्हणणे योग्य होईल काय? म्हणून ग्रंथकाराचे प्रसिद्धि पावलेले नाव हे अध्ययनेच्छु लोकांना त्या विषयाकडे प्रवृत्त करावयास उपकारक होते.

(मध्यमा अवस्थेत) मनश्चक्षूपुढे स्पष्ट झालेल्या निरनिराळ्या पदार्थांना शब्दरूपाने बाहेर वाट करून देणाऱ्या व श्रोत्यांना वक्त्याच्या विचारांचे साक्षात् दर्शन घडविणाऱ्या चवथ्या म्हणजे वैखरीनामक शकतीला मी वंदन कारितो.

आनंदवर्धनाच्या विवेचक बुद्धीमुळे विकसित झालेल्या 'काव्यालोक' या ग्रंथातील विषयांचे खरे स्वरूप स्पष्ट केल्यामुळे ज्या लोचन टीकेच्या सामर्थ्याचे वाचकांना अनुमान करिता येते आणि जी लोचन टीका लिहिली जाऊ लागली असताना तिने काव्यशास्त्रातील सारभूत विषयांना प्रकाशित केले, ती अभिनवगुप्तांनी लिहिलेली 'लोचन' टीका आता ध्वन्यालोकातील विषयांच्या स्पष्टीकरणार्थ सज्ज करण्यात आली आहे.

श्रीसिद्धिचेल यांच्या चरणकमलातील परागकणांनी पवित्र झालेले भट्ट इंदुराज यांच्या विद्वतेमुळे ज्याची अल्पबुद्धि संस्कारित झाली असता, मीमांसा, न्याय व व्याकरण ही शास्त्रे जाणणाऱ्यांमध्ये श्रेष्ठ आणि (साहित्यशास्त्रविषयक व तत्त्वज्ञानविषयक) प्रबंध लिहिण्याची आवड असणाऱ्या अभिनवगुप्ताने 'ध्वनिविषयावरील' टीका लिहिली.

हा कवि (म्हणजे आनंदवर्धन) सहृदयांजवळ (माझ्या ग्रंथाची प्रशंसा करा अशी) याचना करीत नाही. आम्हाला आनंदित कर' अशी लोक चन्द्राजवळ प्रार्थना करितात काय? दुष्टांनी पुनः पुनः निर्भर्त्सना केली, तरी हा कवि त्यांची मुळीच निंदा करीत नाही. कारण अग्नीची हवी तेवढी निंदा केली, तरी तो कधीही थंडगार होत नाही.

मन शिवाशीं खरोखर एकरूप झाले असले, तर सर्व गोष्टी शिवरूप (म्हणजे मंगलमय) दिसतात. त्या मनाला कोणाचेही बोलणे कितीही वाईट असले, तरी ते केव्हाही अ-शिव वाटत नाही. म्हणून तुमचीही स्थिती शिवाजी एकरूप होवो.

अशा रीतीने महामाहेश्वर अभिनवगुप्तांनी लिहिलेल्या 'काव्यालोंकलोचन' या टीकेमधील चवथा उद्द्योत समाप्त झाला.

आणि हा ग्रंथ (ही) समाप्त झाला.

टीपा

१) तुलनार्थ पाहा, प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'रसादि प्रतीयमान अर्थ हेच दिव्य प्रतिभेचे गमक'", वरील कारिका ६ वी.

२) ग्रंथाचे शेवटी अखेरचे मंगल म्हणून 'ओमृ' (म्हणजे शुभ होवो, सर्वाचे कल्याण होवो) हा शब्द वहिवाटीस अनुसरून वापरला आहे. वृत्तीतील हा शब्द कारिकांचे विवरण संपले असे दर्शवितो.

३) तुलनेसाठी पाहा, उद्द्योत ३, कारिका ४६, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'रीती' चे काव्यातील स्थान"

४) काशी आवृत्तीत तात्कालिकत्वेनास्क्ररिते असा पाठ आहे. पण डॉ. सुशील कुमार दे यांनी संपादिलेल्या ४ थ्या उद्द्योतावरील लोचनांमध्ये तात्कालिकत्वेनस्फुरिते असा पाठ आहे. आम्ही काशी आवृत्तीतील पाठ स्वीकारून त्याचा पदच्छे तात्कालिकत्वेन आस्फुरितें असा केला आहे व त्याप्रमाणे भाषांतर केले आहे.

स्फुरिते व अस्फुरिते यांच्या अर्थात फरक नाही, पण अ–स्फुरिते असा पज्च्छेद केल्यास 'नवीन विषय स्फुरला नाही म्हणून' असा अर्थ करिता येईल.

५) व्युत्पत्ति म्हणजे वाचकांना मिळणाऱ्या पुरुषार्थ–संपादनाच्या उपायांचे ज्ञान, हा शब्द या अर्थाने लोचनात यापूर्वो अनेकदा येऊन गेला आहे.

६) हे सर्व म्हणजे काव्याची (व्युत्पत्ति इ.) प्रयोजने, काव्याचे गुण व अलंकार रस वगैरे.

७) काव्याच्या प्रयोजनांचे विवरण प्रथम खंड "उद्‌द्योत – १ 'सहृदया'चे (रसिकाचे) अभिनवगुप्तांनी केलेले लक्षण" वर व हा खंड, "उद्‌द्योत – ३ 'रामायण, महाभारत इ. प्रबंधांतून असंलक्ष्यक्रम ध्वनि प्रकाशित होतो. प्रबंधातून कवींनी तो कसा प्रकाशित करावा यासंबंधी मार्गदर्शन'" वर. काव्याचे गुण व अलंकार यांचे विवेचन उद्‌द्योत २ व त्यावरील लोचनामध्ये व रसांचे विवरण १ व २ या उद्‌द्योतांवरील लोचनामध्ये केलेले आहे.

८) पाहा, भारविकृत किरातार्जुनीय, १–४ मधील **हितं मनोहारि च दुर्लभं वचः ।** हे वचन.

९) असलेलाच म्हणजे रामायणादि काव्यांमध्ये असलेला आणि पूर्वीच्या विद्वानांनीही मान्य केलेला (पाहा, **यः समाम्नातपूर्वः,** ध्वन्यालोक, १–१; आणि प्रथम खंड, उद्‌द्योत – १ काव्याचे मुख्य प्रयोजन 'आनंद' व सारांश, व्यंगार्थयुक्त अलंकार वेगळे आणि 'ध्वनि' वेगळा.

१०) **कल्पतरुः उपमानं यस्य** हा पहिला बहुव्रीहि समास आणि **कल्पतरूपमानः महिमा** यस्य हा दुगरा बहुव्रीहि समास होय.

११) ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय ध्वनि. तो काव्याचा आत्मा होय असे असे म्हटले आहे आणि व्युत्पत्ति इ. जी काव्याची प्रयोजने म्हणून सांगितली आहेत, ती काव्याचा आत्मा असलेल्या ध्वनीपासूनच प्राप्त होणार!

१२) 'अनुबन्धां'ची माहिती प्रथम खंड, "उद्‌द्योत – १ 'प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याचे प्रयोजन'" टीप ३ मध्ये पाहा. प्रस्तुत श्लोकात तीनच अनुबन्धांचा निर्देश झाला आहे असे अभिनवगुप्तांनी म्हटले आंहे, पण 'सहृदय' या शब्दाने 'अधिकारी' या ४ थ्या अनुबन्धांचाही निर्देश झाला आहे, असे म्हणता येईल.

१३) 'पुनर्निर्देश' म्हणण्याचे कारण १ ल्या उद्‌द्योताच्या १ ल्या कारिकेत या चारही अनुबन्धांचा उल्लेख येऊन गेला आहे.

१४) पाहा, **यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।** श्रीमद्‌भगवद् गीता, ३–२१.

१५) 'हे केले' म्हणजे 'वाक्यपदीय' नावाचा व्याकरणाचा तात्त्विक विचार करणारा ग्रंथ लिहिला.

१६) हा श्लोकमय ग्रंथ म्हणजे शृंगार, नीति व वैराग्य ही तीन शतके. यावरून वाक्यपदीयकार भर्तृहरि व शतककार भर्तृहरि एकच असावेत असे अभिनवगुप्तांचे मत असावेसे वाटते. भर्तृहरि हा इ. स. च्या ७ व्या

शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. तो एक दानशूर राजा होता व त्याने 'वाक्यपदीय' ग्रंथ व पतंजलीच्या महाभाष्यावरील दीपिका ही टीका असे दोन शास्त्रीय ग्रंथ आणि तीन शतके लिहिली, अशी परंपरागत समजूत आहे. तिच्याच आधारे अभिनवगुप्तांनी वरील विधान केले असावे. अभिनवगुप्त हे भर्तृहरीच्या पुष्कळच जवळचे, म्हणून त्यांचे मत विश्वसनीय मानण्यास हरकत नाही.

१७) हाच म्हणजे आम्ही वर सांगितलेला, म्हणजे 'प्रसिद्ध नावाचा निर्देश केल्यामुळे लोकांची प्रवृत्ति होते,' हा.

१८) वाणीच्या चार शक्तींच्या स्पष्टीकरणासाठी तिसऱ्या उद्द्योताच्या शेवटी, द्वितीय खंड, "उद्द्योत – ३ 'ध्वनि अनिर्वचनीय आहे' या मताचे पुनः खंडन" वरील पंचविसावी टीप पाहा.

१९) 'विलोचन' याचा दुसरा अर्थ डोळा किंवा दृष्टि. यासाठी पाहा. प्रथम खंड, "उद्द्योत – १ 'आनंदवर्धनकृत ध्वन्यालोक-वृत्तीचे मंगलाचरण'", वरील टीप ६ आणि "उद्द्योत – १ ध्वनीचे स्वरूप 'अवर्णनीय' आहे या मताचे खंडन" वरील लोचन. हा अर्थ घेतल्यास तिसऱ्या ओळींचा आशय असा सांगता येईल :– ज्याप्रमाणे डोळा उघडला गेला असता तो बाह्य जगातील सर्व पदार्थांना प्रकाशित करितो, त्यापप्रमाणे.

२०) हा समास सप्तमी तत्पुरुष मानून वरील अर्थ केला आहे. पण तो आणखी दोन प्रकारांनी सोडविता येईल :– १) पदवाक्यप्रमाणज्ञ आहेत गुरु ज्याचे असा (बहुव्रीहि). तुलनार्थ पाहा, **पदवाक्यप्रमाणज्ञो जातूकर्णीपुत्रः ।** (उत्तररामचरित, प्रस्तावना) व मुकुलभट्टाचे पुढील वचन :– **पदवाक्यप्रमाणेषु तदेतत् प्रतिबिम्बितम् । यो योजयति साहित्ये तस्य बुद्धि : प्रसीदति ।**

२१) पाहा, **तं सन्तः श्रोतुमर्हन्ति ।** (रघुवंश, १–१०). येथे सन्तः हा शब्द रसिक या अर्थीच वापरला आहे.

२२) म्हणजे ध्वनिसिद्धांताचे विवरण करण्याचे कर्तव्य आनंदवर्धनांनी या ग्रंथात बजावले. माझा ग्रंथ चांगला आहे असे म्हणा अशी त्यांनी कोणाला याचनाही केली नाही किंवा विरोध करून निंदा केली, तरी त्याची खंतही बाळगली नाही.

□ □

द्वितीय खंडातील
कारिकार्धांची सूची

अकाण्ड एव विच्छित्तिः
अक्षरादिरचनेव
अतो ह्यन्यतमेनापि
अनुस्वानोपमात्मापि
अनेनानन्त्यमायाति
अन्वीयते वस्तुगतिः
अर्थान्तरगतिः काक्वा
अलंकृतीनां शक्ताव—
अवधानातिशयवान्
अवस्थादिविभिन्नानाम्
अवस्थादेशकालादि
अविरोधी विरोधी वा
अविवक्षितवाच्यस्य
अशक्नुवद्भिःव्यकिर्तुम्
असमासा समासेन
अस्फुटस्फुरितं काव्य—
आत्मनोऽन्यस्य सद्भावे
आनन्त्यमेव वाच्यस्य
आलेख्याकारवत्
इतिवृत्तवशायातां
इत्युक्तलक्षणो यः
उत्प्रेक्ष्याप्यन्तराभीष्ट
उद्दीपनप्रशमने
एकाश्रयत्वे निर्दोषः
एको रसोऽङ्गीकर्तव्यः
एतद्यथोक्तमौचित्यम्
एवं ध्वनेः प्रभेदाः
औचित्यवान्यस्ता एताः
कार्यमेकं यथा व्यापि
कालप्रभेदाश्रयतः
काव्ये उभे, ततोऽन्यद्यत्
कृत्तद्धितसमासैश्च
गुणानाश्रित्य तिष्ठन्ती
चित्रं शब्दार्थभेदेन
त एव तु निवेश्यन्ते
तत्र किंचिच्छब्दचित्रम्

तत्र पूर्वमनन्यात्म
तथा दीर्घसमासेति
तथा रसस्यापि विधी
तदन्यस्यानुरणन–
तदा तं दीपयन्त्येव
तद्विरुद्धरसस्पर्शः
तृतीयं तु प्रसिद्धात्म
दृष्टपूर्वा अपि ह्यर्थाः
धत्ते रसादितातात्पर्य-
ध्वनेरस्य प्रबन्धेषु
ध्वनेरित्थं गुणीभूत–
ध्वनेर्यः सगुणीभूत–
न काव्यार्थविरामोऽस्ति
न तु केवलया शास्त्र-
निबद्धा सा क्षयं नैति
निवर्तते हि रसयोः
नूतने स्फुरति काव्य–
नैकरूपतया सर्वे
नोपहन्त्यङ्गितां सोऽस्य
परस्वादानेच्छाविरत–
परिपोषं गतस्यापि
परिपोषं न नेतव्यः
प्रकारोऽन्यो गुणीभूत–
प्रकारोऽयं गुणीभूत–
प्रतायन्तां वाचः
प्रतीयमानच्छायैषा
प्रधानगुणभावाभ्याम्
प्रबन्धे मुक्तके वापि
प्रबन्धस्य रसादीनाम्
प्रभेदस्यास्य विषयः
प्रसन्नगम्भीरपदाः
प्रसिद्धेऽपि प्रबन्धानाम्
प्रायेणैव परां छायाम्
बाध्यानामङ्गभावं वा
भवेत्तस्मिन् प्रमादो हि
भूम्नैव दृश्यते लक्ष्ये
मितोऽप्यनन्ततां प्राप्तः
मुख्या महाकविगिराम्
यत्नः कार्यः सुमतिना

यत्र व्यङ्ग्यान्वये वाच्य–
यदपि तदपि रम्यम्
यस्त्वलक्ष्यक्रमव्यङ्ग्यो
युक्त्यानयानुसर्तव्यौ
रसभावादिसंबद्धा
ये च तेषु प्रकारोऽयम्
रचना विषयापेक्षम्
रसबन्धोक्तमौचित्यम्
रसस्यारब्धविश्रान्तेः
रसस्य स्याद् विरोधाय
रसादिमय एकस्मिन्
रसादिविषयेणैतत्
रसाद्यनुगुणत्वेन
रसान्तरव्यवधिना
रसान्तरसमावेशः
रसान्तरान्तरितयोः
वस्तु भातितरां तन्व्याः
वाक्ये संघटनायां च
वाचस्पतिसहस्राणाम्
वाच्यानां वाचकानां च
वाच्यालङ्कारवर्गोऽयं
वाणी नवत्वमायाति ।
विज्ञायेत्थं रसादीनाम्
विधातव्या सहृदयैः
विधिः कथाशरीरस्य
विनेयानुन्मुखीकर्तुम्
विभावभावानुभाव–
विरुद्धैकाश्रयो यस्तु
विरोधमविरोधं च
विरोधिनः स्युः शृङ्गारे
विरोधिरससम्बन्धि–
विवक्षिते रसे लब्ध–
विशेषतस्तु शृङ्गारे
विषयं सुकविः काव्यम्
विषयाश्रयमप्यन्यद्
विस्तरेणान्वितस्यापि
वृत्तयोऽपि प्रकाशन्ते
व्यङ्ग्यव्यञ्जकभावेऽस्मिन्
शब्दतत्त्वाश्रयाः काश्चिद्

शषौ सरेफसंयोगौ
संकरसंसृष्टिभ्याम्
संख्यातुं दिङ्मात्रम्
संवादास्तु भवन्त्येव
संवादो ह्यन्यसादृश्यम्
सत्काव्यं कर्तु वा
सगुणीभूतव्यङ्ग्यैः
सन्धिसन्ध्यङ्गघटनं
सर्वत्र गद्यबन्धेऽपि
सर्वे नवा इवाभान्ति
स विभिन्नाश्रयः कार्यः
सा व्यङ्ग्यस्य गुणीभावे
सुप्तिङ्वचनसम्बन्धैः

द्वितीय खंड

वृत्तीतील पद्यांची व उदाहरणांची सूची
(* अशी खूण केलेले 'परिकरश्लोक' किंवा 'संग्रहश्लोक' आहेत)

अग्निर्माणवकः
अण्णत्थ वच्च बालअ
अतहट्ठिए वि तह
अतिक्रान्तसुखाः कालाः
अनध्यवसितावगाहन
अवरतनयनजल
* अनाख्येयांशभासित्वम्
* अनिष्टस्य श्रुतिर्यद्वत्
अनुगतमपि पूर्व–
अनुरागवती सन्ध्या
* अनौचित्यादृते नान्यद्
* अपारे काव्यसंसारे
अमी ये दृश्यन्ते
अत्यं स रशनोत्कर्षी
अयमेकपदे तया
* अलंकारनिबन्धो यः
अवसर रोत्तुं चिअ
* अव्युत्पत्तिकृतो दोषः
अहिणवपओअरसिएसु
अहो बतासि स्पृहणीयवीर्यः
आम असईओ अम्हे
* इत्यक्लिष्टरसाश्रयो
* इष्यते प्रतिभार्थेषु
उत्कम्पिनी भयपरि–
उप्पइजाआऍ
एक्कत्तो रुअइ पिआ
एमेय जणो तिस्सा
एवंवादिनि देवर्षौ
एहि गच्छ पतोत्तिष्ठ
कण्ठाच्छित्वाक्षमाला
* कथाशरीरमुत्पाद्य
करिणीवेहव्वअरो
कर्ता द्यूतच्छलानाम्
कस्त्वं भोः कथयामि

काव्याख्ये ऽ खिल—
काव्याध्वनि ध्वनि
किमिव हि मधुराणाम्
कृतककुपितैः
कृते वरकथालापे
कोपात्कोमललोलबाहु
कऽ सन्नद्धे विरहविधुराम्
क्रामन्त्यः क्षतकोमला—
क्काकार्य शशलक्ष्मणः
क्षिप्तो हस्तावलग्नः
खणपाहुणिआ देअर
गङ्गायां घोषः
गङ्गायां घोषः
गावो वः पावनानाम्
चूअं करावअंसं
ण अ ताण घडइ
* तदभिप्रायबाह्योऽयम्
* तदा नास्त्येव तत्कान्यम्
तद्गेहं नतभित्ति
* तद् व्याकरोत्
तरङ्गभ्रूभङ्गा
तां प्राङ्मुखीं तत्र निवेश्य
* तान् समाश्रित्य न
तेषां गोपवधूविलास
* तेषां निबन्धने भाव्यं
दन्तक्षतानि करजैश्व
दुराराधा राधा
धरणीधारणायाधुना त्वं शेषः
* न लक्षणं लक्षणं
नानाभङ्गिभ्रमद्भ्रूः
निद्राकैतविनः प्रियस्य
* नीरसस्तु प्रबन्धो यः
नीवाराः शुकगर्भ—
न्यक्कारो ह्ययमेव मे
पत्युः शिरश्चन्द्र—
* पदानां स्मारकत्वेऽपि
परार्थे यः पीडाम्
पाण्डु क्षामम्
* पूर्वे विशृङ्खलगिरः

प्रयच्छतोच्चैः कुसुमानि
प्रभ्रश्यत्युत्तरीयत्विषि
प्रातुं धनैरर्थिजनस्य
प्रिये जने नास्ति
भगवान् वासुदेवश्च
* भावानचेतनानपि
भूरेणुदिग्धान्नव—
भ्रमिमरतिमलस
मञ्चाः क्रोशन्ति
मनुष्यवृत्त्या
मन्दारकुसुमरेणु
महुमहु त्ति भणंतहु
मा पंथं रुंध महं
तालैः शिञ्जद्वलय—
* मुख्या व्यापारविषयाः
मुनिर्जयति योगीन्द्रो
मुहुरङ्गुलिसंवृता—
यच्च कामसुखं लोके
* यथास्मै रोचते विश्वम
यथा यथा विपर्येति
यद्वञ्चनाहितमतिः
* यास्मिन् रसो वा भावी वा
या निशा सर्वभूतानाम्
ये जीवन्ति न मान्ति
यो यः शस्त्रं बिभर्ति
यः प्रथमः स प्रथमः
* रसभावादिविषय-
* रसादिषु विवक्षातु
राजहंसैरवी ज्यन्त
राजानमपि सेवन्ते
रामेण प्रियजीवितेन
लच्छी दुहिआ जामाओ
लावण्यद्रविण-
लावण्यसिन्धुरपरैव
लीलाकमलपन्नाणि
वसन्तपुष्पाभरणं
वाणिअअ हत्थिदंता
* वाल्मीकिव्यतिरिक्तस्य
* विच्छित्तिशोभिनैकेन

* वाल्मीकिव्यासमुख्याः
* विमतिविषयो यः
विमानपर्यङ्कतले
विसमइओ चिअ काण
विस्रम्भोत्था मन्मथाज्ञा-
व्रीडायोगान्नत—
* व्यवहारयति यथेष्टम्
* शृङ्गारी चेत् कविः
शून्यं वासगृहं
शेषो हिमगिरिस्त्वं च
शोकः श्लोकत्वमागतः
* स एव वीतरागश्चेत्
सङ्केतकालमनसम्
सज्जेइ सुरहिमासो
सज्जेइ सुरहिमासो
* स तेनाकविरेव
* सत्काव्यतत्त्वनय—
सत्यं मनोरमा रामाः
* सन्ति सिद्धरसप्रख्याः
सप्तैताः समिधः श्रियः
समविसमणिव्विसेसा
* सर्वत्र तत्र विषयी
* सर्वोपमाद्रव्य—
सविभ्रमस्मितो
स हि सत्यम्
सशोणितैः क्रव्यभुजाम्
* संवृत्याभिहितौ वस्तु-
सिज्जइ रोमंचिज्जइ
सिहिपिच्छकण्णऊरा
सुरभिसमये प्रवृत्ते
सुवर्णपुष्पां पृथिवीं
सैषा सर्वत्र वक्रोक्तिः
स्मरनवनदीपूरेणोढा
स्मितं किंचिन्मुग्धम्
स्वतेजःक्रीतमहिमा
स्वस्था भवन्ति मयि
हंसानां निनदेषु

द्वितीय खंड

'लोचना'तील पद्ये, अवतरणे व उदाहरणे यांची सूची
(लोचनात निर्देशिलेले ध्वन्यालोकातील कारिका व वृत्ति यांचे अंश या सूचीत दिले नाहीत.)

अतिरात्रे षोडशिन गृह्णन्ति
अतोऽनिर्ज्ञातरूपत्वात्
अनुरागवती सन्ध्या
अनौचित्यादृते नान्यत्
अन्यत्र संज्ञाविधौ प्रत्ययग्रहणे
अमुं कनकवर्णाभम्
अयं मन्दद्युतिर्भास्वान्
अयं स राजा उदयणो त्ति
अलं स्थित्वा श्मशाने
अल्पं निर्मितमाकाशम्
अहो गीतमहो वादित्रम्
आ गर्भादा विमर्शाद्वा
आदित्योऽयं स्थितो
आनन्दवर्धनविवेकविकासिं
आप्तवादाविसंवादादत्र
आश्चर्यवदभिख्यानम्
आसूत्रितानां भेदानाम्
इतिवृत्तं हि नाट्यस्य
इन्दीवरद्युति यदा
इष्टस्यार्थस्य रचना
उपक्षेपः परिकरः
उपभोगावसरोऽयम्
उप्पहजाआ—
ऋष्यन्धकवृष्णिकुरुभ्यः
एवमयं पुरुषो वेद
कक लौल्ये
कथमपि कृतप्रत्यापत्ती
करुणो रसो नाम
कवेरन्तर्गतं भावम्
कवेः प्रयत्नान्नेतृणाम्
कः सन्देहः द्वींपाद्
काव्यशोभायाः कर्तारो धर्माः
काव्यार्थान् भावयन्ति
काव्यालोके

किं किम्—स्वस्था भवन्ति
कि रसानां स्थायिसंचारिता
कुरङ्गीवाङ्गानि
कुरबक कुचाघात-
कृतककुपितैर्बाष्पा—
कृत्यपञ्चकनिर्वाह
कैशिकी श्लक्ष्णनेपथ्या
क्रिययैव तदर्थस्य
क्वचिच्छमः
क्षणे क्षणे यन्नवतामुपैति
क्षुत्तृष्णाकाममात्सर्यम्
खलेवाली यूपः
गद्यपद्यमयी चम्पूः
गामश्वम्
गमिगाम्यादीनाम्
गुणः कृतात्मसंस्कारः
गोप्यैवं गदितः सलेशम्
गोला कच्छकुडंगे
चलापाङ्गां दृष्टिम्
चाइअणकरपरंपरसंचारण
चूर्णपादैः प्रसन्नैः
जरा नेयं मूर्ध्नि
तच्छिद्रेषु प्रत्ययान्तराणि
तटी तार ताम्यति
तथाभूते तस्मिन्
तदतिशयहेतवस्तु
तद्वक्त्रेन्दुविलोकनेन
तया स पूतश्च विभूषितश्च
तस्य प्रशान्तवाहिता संस्कारात्
तीर्थे तोयव्यतिकरभवे
तुदीशालातुर
त्वत्संप्राप्तिविलोभितेन
त्वामालिख्य प्रणयकुपितां
त्वां चन्द्रचूडं सहसा
दर्शे यजेत
दानवीरं धर्मवीरम्
दृष्टिर्नामृतवर्षिणी
देवीस्वीकृतमानसस्य
द्विर्वचनेऽचि

धर्मे चार्थे च कामे च मोक्षे च
धृतिः क्षमा दया शौचम्
न चेह जीवितः कश्चित्
न निःसुखः स्यात्
न मुग्धे प्रत्येतुम्
न सामायिकत्वाच्छब्दार्थ—
निर्दोषदर्शनाः कन्यकाः
निःश्वासान्ध इवादर्शः
नेदं रजतम्
नोपादानं विरुद्धस्य
पश्य, द्वीपादन्यस्मादपि
पाण्डु क्षामं वदनम्
पीनो दिवा नात्ति
पुरुषार्थहेतुकमिदम्
प्रकरणनाटकयोगाद्
प्रत्याख्यानरुषः कृतम्
प्रयोजनानां विच्छेदे
प्रसादे वर्तस्व
प्राप्ता देवी भूतधात्री च भूयः
प्रारम्भश्च प्रयत्नश्च
प्रारम्भेऽस्मिन् स्वामिनः
प्रासङ्गिके परार्थत्वात्
बहूनां जन्मनामन्ते
बहूनां समवेतानाम्
बद्धोत्कण्ठर्मिदं मनः
बाढमस्ति
बाहुलतिकापाशेन बद्ध्वा
भअविहलरक्खणेक्कं
मथ्नामि कौरवशतम्
मन्त्रिबुद्धौ नायकबुद्धौ च
मनुष्यवृत्त्या समुपाचरन्तम्
यत्तदोर्नित्यसम्बन्धत्वम्
यत्पदानि त्यजन्त्येव
यथा गौस्तथा गवयः
यद्वामाभिनिवेशितम
यद् विश्रम्य विलोकितेषु
यो यः शस्त्रम्
रागस्यास्पदमित्ये
राजहंसैरवीज्यन्त

राज्यं निर्जितशत्रु
रौद्रस्य चैव यत्कर्म
रौद्रस्यैव च यत्कर्म
लक्षणहेत्वोः
लंघिअगअणा
लीलादाढग्गुब्बूढ
वक्राभिधेयशब्दोक्तिः
वदति बिसिनीपत्रशयनम्
वसन्तगत्तालिपरम्परोपमाः
वस्तुतः शिवमये हृदि स्फुटम
वाक्यार्थमितये तेषाम्
वागङ्गसत्त्वेपेतान् काव्यार्थान्
विन्ध्यो वर्धितवान्
विश्रान्तविग्रहकथः
विषयत्वमनापन्नैः
वीतरागजन्मादर्शनात्
वीरस्य चैव यत्कर्म
वृतयः काव्यमातृकाः
व्यक्तिर्व्यञ्जनधातुना
शब्दाः संकेतितं प्राहुः
श्ङ्गारश्च तैः प्रसभं
श्रीसिद्धिचेलचरणाब्ज
स एव वीतरागश्चेद्
सङ्केतकालमनसम्
सज्ञनात् कविरसौ न याचते
सत्यं मनोरमा रामाः
समर्पकत्वं काव्यस्य
समीहा रतिंभोगार्था
समुत्थिते धनुर्ध्वनौ
समुद्रः कुण्डिका
सर्व एव शृङ्गारे व्यभिचारिणः
सर्वक्षितिभृतां नाथ
सर्वत्र ज्वलितेषु
सुवर्णपुष्पां पृथिवीम्
संसर्पद्भिः समन्तात्
संसाध्ये फलयोगे तु
स्त्रियो नरपतिर्वह्नि—
स्त्रीति नामापि मधुरम्
स्थाघ्वौरिच्च

स्थाणुर्वा स्यात्
स्थैर्येणोत्तममध्यानां
स्फुटीकृतार्थवैचित्र्य
स्मरनवनदीपूरेणोढाः
सत्रितपक्ष्मकपाटम्
स्वल्पमात्रं समुत्सृष्टेम्
स्वं स्वं निमित्तमासाद्य
स्वादुकाव्यरसोन्मिश्रम
हुमि अवहत्थिअ

विषय–सूचि

(अनुक्रमणिकेत आलेले विषय सूचीमध्ये विशेष कारणाशिवाय दिले नाहीत. आनंदवर्धन, अभिनवगुप्त, ध्वनि इ. पानोपानी येणारे शब्दही दिले नाहित.)

अतिरात्र याग – त्यातील षोडशिग्रहण व अग्रहण यांबद्दल मीमांसकांचा निर्णय –
अतिशयोक्ति – तिचा इतर अलंकाराहून आगळेपणा
अनिर्वचनीयतावादाचे (ध्वनि अनिर्वचनीय आहे या मताचे) खंडन
अनुभवी कवींनी रसादींची प्रतीति घडवणे हेच मुख्य उद्दिष्ट ठेवावे.
अनुमान – व्यंजकत्वाचा त्याहून वेगळे पणा–
अन्योन्यसंश्रयदोष –
अप्रस्तुतप्रशंसा – तिचे तीन प्रकार.
अभिनय – त्याचे चार प्रकार
अभिनवगुप्तपूर्व टीकाकार –
अभ्युपगम –
अमरुक कवि –
अर्जुनचरित – आनंदवर्धनकृत महाकाव्य –
‘लोचनम् पूर्वीच्या दोन ओळी.
अर्थप्रकृति –
अर्थवृत्ति – त्यांचे प्रकार.
अर्थापत्ति प्रमाण –
अवस्था – पदार्थांच्या –
फलप्राप्तीच्या उपायांच्या,
अव्युत्पत्तिकृत दोष आणि अशक्तिकृत दोष –
आंग्लकवि ग्रे –
आनन्द (रसास्वादामुळे होणारा) हेच व्युत्पत्तीचे कारण –
उपसर्ग, विभक्ति प्रत्यय, वचन इ. लहान अंशही रसव्यंजक कसे होतात या शंकेचे उत्तर –, याचे एक सुंदर उदाहरण,
एकाश्रयत्वमूलक विरोधी रस व त्याचा परिहार –
औचित्य – वक्ता आणि वाच्यार्थ यांचे – विषयाचे म्हणजे काव्यप्रकाराचे – औचित्य हे (रसभावांनाच उद्देशून –)
रसपरिपोषाचे कारण –(टीप १०)
कथानायक – चार प्रकारचे,
करुण व विप्रलंभशृंगार हे अत्यंत नाजूक प्रकृतीचे रस –
कल्पलताविवेक –, तळटीपा * व कवि म्हणजे इतिहासकार नव्हे. मूळ ग्रंथात रसानुकूल नसलेले प्रसंग वगळून कवीने रसानुकूल प्रसंग निर्मावे (टीप ४)
काकदन्तपरीक्षेचा दृष्टान्त –
काकाक्षिन्याय –
काकु –

त्यामुळे काव्याला गुणीभूतव्यंग्यता –
कारिका व वृत्ति यांचा कर्ता एकच की वेगळे,
कालिदास –
काव्य व नाट्य यांचे एक प्रयोजन प्रिय पत्नीसारखा उपदेश करणे, शेवटच्या दोन ओळी
'काव्य' या शब्दाची व्युत्पत्ती –
काव्यसौंदर्याचे निकष – १ रचना, २. प्रसाद, ३. चारुता –
काव्य हे वेद व इतिहास यांहून वेगळे का? –
शेवटच्या काही ओळी.
काव्याचे मुक्तक इ. प्रकार –
काव्यातील शब्द हे रचना, प्रसादगुण, आणि सौंदर्य यांनी संपन्न हवेत –
किरातार्जूनीय
कुयारसंभव (कालिदासकृत)
कुण्डबदरन्याय –
कैशिकी वृत्ति,
क्रम (पौर्वापर्य) – वाच्यार्थ व रसादि यांच्या प्रतीतींमध्ये असतो, पण लक्षात येत नाही –
क्षेत्रिय रोग
क्षेमेन्द्र – औचित्यविचारचर्चा
गुण व संघटना यांमधील संबंध ३ पक्ष
गुणवृत्ति (लक्षणा) व्यंजकत्वाहून सर्वस्वी वेगळी –
गुणांचा खरा आश्रय रसच, शब्द हे केवळ लक्षणेने –
गुणीभूतव्यंग्य काव्य –
गुणीभूतव्यंग्य व ध्वनि यातील फरक नीट जाणावा –
गुणीभूतव्यंग्यातूनही शेवटी रसादीची प्रतीति होत असेल तर त्यालाही ध्वनित्व प्राप्त होते –
ग्रीवारेचक (संगीतातील) –
घटप्रदीपन्याय –
चन्द्रक कवि
चन्द्रिकाकार – ध्वन्यालोकावरील प्राचीन टीकाकार हा अभिनव-गुप्तगुरूंचा सगोत्र
'चमत्कार' शब्दाची व्युत्पत्ति
'चित्र'रचना हे काव्य नव्हे –
चित्ररचनेचे शब्द चित्र व अर्थचित्र हे दोन प्रकार
चित्ररचनेच्या नादी अनुभवी कवींनी लागू नये, तर रसालाच प्राधान्य द्यावे
डिम – एक नाट्यप्रकार –
तत्त्वालोक (आनन्दवर्धनकृत)
तात्पर्यार्थ हाच व्यंग्यार्थ – घनिकाचे मत –
तापसवत्सराज – मायुराजकृत नाटक
दयावीर – वीररसाचा एक प्रकार – भरतांनी दयावीराला स्वतंत्र स्थान दिले नाही.
देवीशतकम्/आनन्दवर्धनकृत) –
धर्मकीर्ति –

ध्वनीची स्वतःच्या प्रकारांशी – गुणीभूत, व्यंग्याच्या प्रकारांशी, विविध वाच्य अलंकारांशी संसृष्टि वा संस्कार यांमुळे ध्वनीचे असंख्य प्रकार–
ध्वन्यालोक लिहिण्याचा मुख्य उद्देश कवीने लक्ष रसादि व्यंग्य अर्थावर केंद्रित करावे हा, केवळ ध्वनीचे प्रतिपादन हा नव्हे –
नवविधा भक्ति –
नागानन्द नाटक –
नाट्य व काव्य यांचा उपदेश वेदांहून शक्तिशाली –
नाट्यशास्त्रावरील प्राचीन टीकाकार –
'निपात' वाचक नसून द्योतक असतात –
निबद्ध आणि अनिबद्ध रचना –
निर्विकल्पक ज्ञान व सविकल्पक ज्ञान
नेयार्थ – एक काव्यदोष –
नैरन्तर्यविरोधी रस व त्यांचा परिहार –
पताका –
पदे स्मारक, त्यांना वाचकत्व नाही – ३३ संपूर्ण वाक्यच वाचक,
प्रकरी –
प्रतिभा –
प्रतिभा (शक्ति) व व्युत्पत्ति यांची लक्षणे –
प्रबन्धात रसाचे औचित्य कसे पाळावे –
प्रसज्यप्रतिषेध –
बिन्दु (अर्थप्रकृति) –
वीज (अर्थप्रकृति) –
'ब्रह्म' या शब्दाचे अभिनवगुप्तांनी केलेले तीन अर्थ –
भट्ट इन्दुराज, अभिनव गुप्त – गुरु –
भट्टतौत – अभिनवगुप्तांचे एक गुरु –
भट्टनायक, अभिनवगुप्तपूर्व टीकाकार –
भर्तृहरि (वाक्यपदीयकार) –
भागुरि – नाट्यशास्त्रावरील टीकाकार –
भामह– काव्यालंकारकर्ता –
'भामहविवरण' –
मधुमथनविजय –
'मरण' या व्यभिचारिभावाचा अर्थ –
महाभारत – गृध्रजम्बूकसंवाद –
महाभारतामधील मुख्य रस 'शान्त'
महिमभट्ट – 'व्यक्तिविवेक' ग्रंथाचा कर्ता –
मुक्तक – इ. काव्यरचनाप्रकार –
मेघदूतम् – एका श्लोकाचे अभिनवगुप्तकृत सुंदर विवरण –
यशोवर्मन् – 'रामाभ्युदय' कर्ता –

रतिविलाप – करुणरस परिपुष्ट झाल्यावरही त्याचे पुत्हा पुन्हा उद्दीपन केले आहे असे अभिनवगुप्तांचे मत–
'रत्नावली' नाटिकेतील रत्नावलीच्या रतिभावाचे आलटूनपालटून उद्दीपन व प्रकाशन
'रत्नावली' – नाट्यतंत्रपालनाचे उत्तम उदाहरण –
रसविरोधी कोणत्या गोष्टी कवीने टाळाव्या –
रसध्वनि हाच काव्याचा आत्मा –
'रस' हा शब्द लक्षणेने स्थायिभाव या अर्थी वापरतात –
रसास्वादातील विघ्ने –
राजनिकटस्थित – आततायिद्वयन्याय –
रामायणातील मुख्य रस करुण –
रीतींच्या, पुरस्कर्त्यांना, ध्वनितत्त्व अस्पष्टपणेच कळले. 'वृत्ती' सुद्धा 'रीती' सारख्याच –
लोष्टप्रस्तर न्याय –
वसिष्ठादिकांनी केलेले स्मृतिमार्गाचे अतिक्रमण –
वाचकत्व हे शब्दाच्या ठिकाणी नियत, तर व्यंजकत्व हे अनियत, हा आणखी एक भेद–
'वा' चा अर्थ काही वेळा उत्तरपक्ष-दाढर्य असा असतो –
वाच्य अलंकारात एका अलंकाराला गौणता –
वाच्य अलंकारात व्यंग्य अर्थाचा अंश असला, तर त्याचे सौंदर्य अधिक खुलते –
वाच्यार्थ व रस यांच्या प्रतीतींमध्ये क्रम असतोच, पण तो लक्षात येत नाही. इतर प्रकारच्या व्यंग्यार्थाच्या बाबतीत मात्र तो लक्षात येतोच –
वाच्यार्थ व वाचक उब्द यांची योजना रसादिविषयक औचित्याला अनुसरूनच हवी –
वाणीच्या परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चार शक्ति –
'वासुदेव' शब्दाचे विष्णुपुराणातील स्पष्टीकरण –
विधि आणि अनुवाद –
विरोधी असलेले दोन रस तिसऱ्याची अंगे झाल्यास दोषास्पद नाही –
विरोधी रसादिकांचा अभिनय –
विरोधी व अविरोधी रस –
विलास – प्रतिमुख संधीचे अंग –
विवाहप्रवृत्त भृत्यानुयायी राजाचा दृष्टांत –
विषमबाणलीला (आनंदवर्धनकृत) –
'विषय' म्हणजे इतरत्र असू न शकणे –
'वृत्ति' शब्दाचे तीन अर्थ –
वृत्तींचे दोन प्रकार म्हणजे अर्थ व शब्द यांची योजना रसानुकूल करणे –
वेणीसंहार –
वेणीसंहारातील शृंगाराचे अनौचित्य –
व्यपदेशिवद्भाव –
व्यंजकत्व म्हणजे अनुमानच या आक्षेपाचे खंडन –
व्यंजकत्व म्हणजे वाचकत्वच या आक्षेपाचे खंडन –
व्यंगार्थामुळेच काव्याला सौंदर्य –
व्यंग्यार्थाशिवाय काव्याला सौंदर्य नाही याची उदाहरणे –

व्युत्पत्ति –
शब्दपाक –
शब्दवृत्ति व अर्थवृत्ति –
शब्दसाम्य दोषास्पद नाही, प्रतिभेची नवी चमक मात्र हवी –
शांतरस इतर रसांहून श्रेष्ठ असे अभिनवगुप्तांचे मत –
शांतरसप्रकरण नाट्यशास्त्राच्या एका प्रतीत –
शांतरस – त्याचा स्थायिभाव –
शांत रसाची स्वतंत्र रस म्हणून प्रतिष्ठापना –
शान्त व वीर रसांमधील फरक
शृंगाररस – अत्यंत नाजूक व सर्वांच्या परिचयाचा–
शृंगाररसाबाबत विरोध कसोशीने टाळावा –
शृंगारविरोधी रस प्रस्तुत असता प्रेक्षकांना आकृष्ट करण्यासाठी किंवा काव्याला शोभा यावी म्हणून शृंगाराची अंगे समाविष्ट केल्यास दोष नाही –
श्रुति (संगीतातील) –
श्रुतिस्मृतींचे तात्पर्य धन्याप्रमाणे आज्ञा करणे हेच असतें –
संकर – व संसृष्टि (ध्वनीची) –
संघटनेचे नियामक–वक्तृ–औचित्य व वाच्य अर्थाचे औचित्य –
संघटनेचे स्वरूप –, तिचा गुणांशी संबंध कोणता याबाबत ३ पक्ष
संधि व संध्यंगे –
संबंधी सर्वनामांना स्वतंत्र अर्थ नसतो
सर्व संघटनांना ‘प्रसाद’ गुण आवश्यक
सहृदयत्व म्हणजे रसज्ञता किंवा रसास्वादक्षमता –
‘सुभग’ शब्दाचे मल्लिनाथकृत विवरण –
सूर्यशतक (मयूरकविकृत) –
स्थायिभावांना काहीजण लक्षणेने ‘रस’ म्हणतात –
स्वप्नवासवदत्त –
हरिविजय, सर्वसेनकृत –
हर्षचरित, सिंहनाद –

महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी म्हणतात—

"आनंदवर्धनाचा ध्वन्यालोक हा संस्कृत साहित्यशास्त्रावरील प्रमुख-आकर ग्रंथ आहे. अनेक भारतीय विद्यापीठांतील संस्कृतच्या अंतिम पदवीपरीक्षेकरिता हा ग्रंथ नेमलेला असतो तसाच तो महाराष्ट्रातील विद्यापीठांत आहे; पण त्याच्या सूक्ष्म अभ्यासाला आवश्यक ती साधने उपलब्ध नाहीत. प्रस्तुत अनुवादात मूळ कारिका, त्यांवरील आनंदवर्धनांचे भाष्य आणि त्यांचे सविस्तर विवेचन करणारी अभिनवगुप्तांची टीका यांचे सुबोध भाषांतर असून त्यावरील विपुल टिप्पण्यांत आवश्यक ते सर्व संदर्भ व शास्त्रीय संज्ञांची स्पष्टीकरणे दिली आहेत. हा ग्रंथ संस्कृत साहित्यशास्त्राच्या अभ्यासकांस उपयुक्त आहेच, पण संस्कृत साहित्यशास्त्राचे प्रारंभिक ज्ञान असलेल्या मराठी समीक्षणशास्त्राच्या विद्यार्थ्यांसही तो अभ्यसनीय व आल्हाददायक झाला आहे.

प्रा. वीरकर स्वतः कवि असून संस्कृत व मराठी काव्यांचे सहृद्य समीक्षक आहेत दीर्घकालीन परिश्रमाने त्यांनी प्रा. पटवर्धनांच्या सहकार्याने तयार केलेल्या या एकाच ग्रंथाने संस्कृत साहित्यशास्त्राचे मार्मिक विवेचक म्हणून त्यांची कीर्ति चिरकाल टिकेल या विषयी मला संदेह नाही."

पं. बाळाचार्य खुपेरकर लिहितात—

"प्रा. वीरकर हे प्रतिभाशाली जातिवंत कवि ... ध्वन्यालोकासारख्या दार्शनिक ग्रंथातील मार्मिक विषयाचे आकलन होण्यासारखी कुशाग्र बुद्धिमत्ता व प्रतिभा अभ्यासाने प्रगल्भ झाल्याने अधिकारवाणीने वीरकरांनी मूळ ग्रंथाचे सरळ मराठी भाषांतर आणि दुर्बोध स्थळी स्पष्टीकरणार्थ टीपांचे द्वारा विवरण...हे अवघड कार्य प्रा. पटवर्धनांचे साहाय्याने पुरे केले... मला असे अभिमानाने म्हणावेसे वाटते की, प्रा. वीरकर यांनी मराठी भाषेतील एका साहित्यविषयक ग्रंथाची आजवर असलेली उणीव चांगल्या रीतीने भरून काढली.

डॉ. वा. म. कुलकर्णी, भूतपूर्व संचालक, भाषासंचालनालय, मुंबई, लिहितात—

"आनंदवर्धन व अभिनगुप्त यांच्यासारख्या असामान्य साहित्यशास्त्रकारांना प्रा. वीरकर व प्रा. पटवर्धन यांच्यासारखे संस्कृत पंडित व सहृद्य भाष्यकार त्यांच्या ग्रंथाच्या मराठी रूपांतरासाठी लाभावेत हा एक अपूर्व योग होय"